Barcode - 5010010089712
Title - brxhadyogavaasishht'hasaara bhaaga 1
Subject - Literature
Author - ve.shaa.san'. vishhnd-uvamana baapat'ashaastrii
Language - marathi
Pages - 890
Publication Year - 1909
Creator - Fast DLI Downloader
https://github.com/cancerian0684/dli-downloader
Barcode EAN.UCC-13
5010010089712

मुं. संपादक व ग्रंथप्रसारक मंडळीची ग्रंथमाला

ग्रंथ ४३ वा.

# बृहद्योगवासिष्ठसार.

## भाग १ ला.

( वैराग्य—मुमुक्षुव्यवहार—जगदुत्पत्ति प्रकरणात्मक )

सारलेखक

वे. शा. सं. विष्णु वामन बापटशास्त्री.

प्रकाशक

दामोदर सांवळाराम आणि मंडळी.

प्रिंटर्स, पब्लिशर्स आणि कमिशन एजंटस्,—मुंबई.

मुंबई,—' इंदुप्रकाश ' स्टीम प्रेसमध्यें छापिला.

सन १९०९.

किंमत २॥ रुपये.

Ma. 2229

al. 49765
1996

हा ग्रंथ सन १८६७ च्या आक्टाप्रमाणे रजिस्टर करून
या ग्रंथासंबंधी सर्व हक्क प्रकाशकानीं स्वाधीन ठेविले आहेत.

T SUBASWAMI RAO
DICSHNARI

# प्रस्तावना.

श्रीमद्बृहद्योगवासिष्ठसार भाग पहिला. या नांवाचें हें पुस्तक माझ्या प्रिय महाराष्ट्र बांधवांस सादर, सप्रेम व सविनय समर्पण करण्याचा सुयोग आला याबद्दल नियंत्याचे अनंत उपकार मानणे, हें माझें प्रथम कर्तव्य आहे.

योगवासिष्ठ ( अथवा वासिष्ठ महारामायण ) हा अद्वैतवेदान्ताचा प्रसिद्ध ग्रंथ आहे. त्याचा बत्तीस हजार ग्रंथ असून सहा प्रकरणें आहेत. त्यातील पहिल्या तीन ( म्हणजे वैराग्य, मुमुक्षुव्यवहार व उत्पत्ति या ) प्रकरणाचा संग्रह या ग्रंथात केला आहे. या तिन्ही प्रकरणाचे मिळून सुमारे साडे नऊ सहस्र श्लोक असून त्याचे व त्यावरील आनंदबोधेंद्र–सरस्वती–विरचित वासिष्ठमहारामायणतात्पर्यप्रकाश नावाच्या टीकेचें सार या पुस्तकात आलें आहे. ईश्वराची इच्छा असल्यास पुढच्या, स्थिति व उपशम या दोन प्रकरणाचे ( ह्मणजे सुमारे आठ हजार श्लोकाचे ) सार दुसऱ्या भागात व निर्वाण नामक शेवटच्या प्रकरणाचे ( ह्म. सुमारें साडे चवदा हजार श्लोकाचे ) सार तिसऱ्या भागात आणावे, असा विचार आहे. वसिष्ठानीं रामास केलेला उपदेश ब्रह्मदेवाच्या सांगण्यावरून श्रीवाल्मीकि–मुनींनीं ग्रंथरूपाने रचिला, अशी याची मूळ आख्यायिका आहे, व त्याचें सविस्तर वर्णन पहिल्याच प्रकरणात आले आहे. यास्तव येथे त्याचा अधिक विस्तार करण्याचे कारण दिसत नाही.

निर्णयसागर छापखान्याच्या मालकानी 'लघुयोगवासिष्ठ' ह्मणून एक सटीक संस्कृत ग्रंथ प्रसिद्ध केला आहे. तें या बृहद्योगवासिष्ठाचे अथवा वासिष्ठ महारामायणाचेच संक्षिप्त रूप आहे. रंगनाथी योगवासिष्ठ व योगवासिष्ठसार या नावाचे मराठी ओवीबद्ध ग्रंथ आहेत. तेही याच्या आधारानेंच लिहिलेले ग्रंथ होत. सुमारे दहा वर्षांपूर्वी वे. शा. स. भाऊशास्त्री लेले यांनीं आर्यधर्मदर्पण या नावाच्या मासिकात याचें शब्दशः भाषांतर देण्यास

आरंभ केला होता, पण पहिलीं लहान लहान दोन प्रकरणें संपवून त्यांनीं आपलें मासिक बंद केलें. वर सांगितलेले ओवीबद्ध ग्रंथ बरेच कठिण असून शिवाय मूळ ग्रंथाचें रहस्य त्यांत पूर्णपणें आलेलें नाहीं. फार काय, पण त्या अनुभवी साधूनीं त्यांतील प्रकरणाचीं नावेंही निराळींच ठेविलीं आहेत. त्यामुळें मूळ ग्रंथाचें प्रकरणशः ज्ञान त्यावरून होत नाहीं. भाऊशास्त्र्यांप्रमाणें शब्दशः भाषांतर केल्यास तें जरा कंटाळवाणें व विस्तृत होण्याचाही बराच संभव आहे. शिवाय त्यांच्याच पद्धतीचे अवलंबन केल्यास त्यांना पुनः तें ल्याहावयाचें झाल्यास अडचण पडणार; इत्यादि गोष्टींचा विचार करून मी हें अगदीं सरळ व सोप्या भाषेंत सार लिहिलें आहे. त्याच्या गुणदोषाचें परीक्षण वाचकांनीं करावें. यांत मूळ ग्रंथाचें शब्दशः भाषांतर जरी नसलें तरी मूळ व टीका यांतील कोणताही महत्त्वाचा भाग सोडलेला नाहीं. विस्तार मात्र करवेल तितका कमी केला आहे. पुनरुक्तींनाही बराच संक्षेप दिला आहे. कांहीं ठिकाणीं प्रसंगाला शोभतील असे नवेच दृष्टांत दिले आहेत व क्वचित् अधिक वर्णनही केलें आहे. अनेक रमणीय आख्यानें व वर्णनें यांनीं युक्त असलेला हा ग्रंथ वाचून वेदान्तभक्तास व इतरांसही पुष्कळ आनंद होईल व पुढचे दोन भाग वाचण्यासही ते उत्सुक होतील, अशी मला मोठी उमेद आहे.

मूळ ग्रंथाच्या कर्त्याविषयीं व कालाविषयीं मोठा वाद आहे. कोणी म्हणतात कीं, जवळ जवळ वाल्मीकिरामायणा इतकाच हा ग्रंथ जुना असून दोघांचे कर्ते वाल्मीकिमुनीच होत. कित्येक आधुनिक म्हणतात कीं, रामायणापेक्षां या ग्रंथाची भाषा कठीण आहे, व विषयही अद्वैत वेदान्त आहे. यास्तव श्रीशंकराचार्यांच्या मागून त्यांच्या परंपरेंतील कोणींतरी विद्वान् यतीनें हा ग्रंथ रचिलेला असावा शिवाय श्रीमत् आचार्यांच्या भाष्यांत यांतील एकाद्याही श्लोकाचें अवतरण घेतलेलें आढळत नाहीं. तेव्हां हा ग्रंथ त्यांच्यावेळीं उपलब्ध नव्हता, असेंच म्हणावें लागतें. यावर माझ्यासारख्या सारग्राही मनुष्याचें एवढेंच उत्तर आहे कीं, यांतील कोणताही पक्ष जरी खरा असला तरी त्यांत आमची किंवा वेदान्त-शास्त्राची कांहीं हानि नाहीं. आम्हांला ग्रंथाच्या तात्पर्याकडे पहावयाचें आहे. त्याचा कर्ता व काल या गौण गोष्टींकडे फारसें

लक्ष द्यावयाचें नाहीं. ज्याना त्यांसच अधिक महत्त्व द्यावयाचे असेल त्यानी काकदन्तपरीक्षण खुशाल करीत रहावें. आचार्यानीं आपल्या भाष्यात ठराविक दहा–बारा उपनिषदें क्वचित् वेदमत्र, मनुस्मृति, श्रीगीता विष्णुपुराण व महाभारत यावांचून दुसऱ्या कोठचींच अवतरणें प्रायः घेतलेलीं नाहींत. पण तेवढ्यावरून बाकीचे अनेक ग्रंथ त्याच्यापूर्वी नव्हतेच, असें म्हटल्यास अनर्थ होईल. शिवाय आचार्यांच्या परपरेतील कोणीं जरी हा ग्रथ लिहिलेला असला तरी तें भूषणावहच आहे. कारण असला ग्रथ निर्माण करण्यास समर्थ असे मुनितुल्य यती ज्या परपरेत झाले ती भगवत्पूज्यपादाची परपरा धन्य होय, असें मूळ ग्रथ पाहिल्यावर कोणास वाटणार नाहीं ! श्रीविद्यारण्य, मधुसूदन–सरस्वती इत्यादि प्रसिद्ध ग्रथकारानीं आपल्या पूज्य ग्रथात या ग्रथांतील वचनाचा व स्वतः ग्रथाचा अनेकदा निर्देश केला आहे.

टीकाराच्या कालाचाही निर्णय होत नाहीं. पण ते श्रीविद्यारण्याच्या पूर्वी झाले असावेत, असें वाटत नाहीं. तरी सुद्धा त्याच्याविषयीं अधिक माहिती मिळाल्यास मी ती शेवटच्या भागात देईन

असो, परमात्मस्वरूप श्रीशंकराचार्यांच्या निःसीम कृपेनेंच माझ्या हातून पार पडलेल्या या ग्रथाचा उपयोग माझे महाराष्ट्र बाधव यथेच्छ करोत, अशी सदिच्छा व्यक्त करून मी ही प्रस्तावना सपवितों.

हैदराबाद सिंध, ज्येष्ठ कृ. ३०. गुरुवार
शके १८३१ सौम्यनामसंवत्सरे.

विष्णु वामन बापटशास्त्री.

# विषयानुक्रमणिका.

## १. वैराग्यप्रकरण १-४९


| सर्ग. | विषय | पृष्ठ. |
|---|---|---|
| १,२ | प्रस्तुतकथेच्या प्रारभाचा इतिहास .... .... .... | १ |
| ३ | रामाची तीर्थयात्रा .... .... .... .... .... | ७ |
| ४ | त्याचा दिवसव्यवहार .... .... .... .... .... | ११ |
| ५ | वैराग्यामुळे रामाच्या शरीराचें अस्वास्थ्य.... .... .... | १२ |
| ६ | विश्वामित्राचें आगमन व पूजनोत्तर दशरथाने केलेलें भाषण | १३ |
| ७ | विश्वामित्रानें यज्ञरक्षणार्थ रामाची याचना केली .... .... | १५ |
| ८ | त्यावर दुःखी दशरथाने केलेले दीनभाषण .... .... | १६ |
| ९ | वसिष्ठांनीं दशरथाचे सात्वन केलें .... .... .... | १७ |
| १० | सेवकानें रामाच्या विषादाचें वर्णन केलें.... .... .... | १९ |
| ११ | रामाचें सभेंत आगमन, दशरथादिकांनीं त्याचे केलेलें सात्वन व विश्वामित्राचा प्रश्न .... .... .... .... .... | २१ |
| १२ | रामानें वर्णिलेलें भोगाचे दुःखरूपत्व, विषयाची अनित्यता व सपत्तीचे अनर्थत्व .... .... .... .... .... | २२ |
| १३ | लक्ष्मीचें निराकरण .... .... .... .... .... | २४ |
| १४ | मूर्खजीवितनिन्दा .... .... .. .... .... | २७ |
| १५ | अहंकारनिन्दा .... .... .... .... .... | २९ |
| १६ | चित्ताच्या दोषांचे वर्णन . .... .... .... | ३१ |
| १७ | तृष्णानिन्दा .... .... .... .... .... | ३२ |
| १८ | शरीरनिन्दा .... .... .. .... .... .... | ३३ |
| १९ | बाल्यनिन्दा .... .... .... ... .... | ३५ |
| २० | यौवननिन्दा .... .... .... .... .... .... | ३६ |
| २१ | स्त्रीजुगुप्सा .... .... .... .... .... .... | ३७ |
| २२ | जरानिन्दा .... .... .... .... .... .... | ३९ |
| २३-२५ | कालाचें वर्णन, काळ विलास, कृतांत विलसित.... | ४० |

सर्ग विषय पृष्ठ.


२६ दैवदुर्विलास .... .... .... .... .... .... ४१

२७ पुरुषार्थाच्या विरोधी भावाची निन्दा .... .... .... ४३

२८-३१ सर्व पदार्थांच्या विपरीतपणाचें वर्णन 'सर्व पदार्थ सदोष असल्यामुळें मी त्याविषयीं विरक्त झालो आहें; मला उपदेश करा,' अशी राघवाची प्रार्थना व प्रश्न .... .... ४४

३२-३३ आकाशगामी सिद्धानीं त्याची केलेली प्रशंसा, आकाशचर व भूचर याचा दशरथसभेंत झालेला समागम .... ४७


## २. मुमुक्षुव्यवहारप्रकरण. ४९–९७.


१ शुकाच्या ज्ञानाचें व निर्वाणाचें वर्णन .... .... .... ४९

२ विश्वामित्र उपदेशार्थ वसिष्ठाची प्रार्थना करितात .... ५३

३ वारंवार होणाऱ्या सर्गांचें वर्णन .... .... .... ५४

४ शास्त्रीय पौरुषाची प्रशसा .... .... .... .... ५७

५ पौरुषच सर्व पुरुषार्थांचें साधन आहे व दैव त्याहून निराळें नाहीं .... .... .... .... .... .... .... ५९

६ दैवनिराकरण .. .... .... .... .... .... ६२

७ पौरुषप्राधान्य .... .... .... .... .... .... ६३

८ दैवखंडन .... .. .... .... .... .... ६६

९ कर्मविचार .... .... .... .... .... .... ६७

१० भूलोकीं ज्ञानाचा अवतार कसा झाला त्याचें वर्णन .... ७०

११ वक्ता व पृच्छक याचीं लक्षणे .. ... .... .... ७३

१२ तत्त्व–माहात्म्य–वर्णन ... .... .... .... .... ७७

१३ शमनिरूपण .. .... .... .... .... ७९

१४ विचारनिरूपण.... .... .... .... .... .... ८२

१५ सतोषनिरूपण.... .... .... .... .... .... ८५

१६ सदाचारनिरूपण .... .... .... .... .... ८६

१७ ग्रथसंख्यादि–निरूपण .... .... .... ... .... ८७

१८ दृष्टांतनिरूपण .... .... .... .... .... .... ८९

| सर्ग | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| १९ | प्रमाणनिरूपण.... .... .... .... .... .... | ९३ |
| २० | सदाचाराचा क्रम .... .... .... .... .... | ९१ |


## ३. उत्पत्तिप्रकरण. ९७–४९६


| | | |
|---|---|---|
| १ | बधहेतुवर्णन .... .... .... .... .... .... | ९७ |
| २ | आद्य सृष्टिकर्त्याचें वर्णन .... .... .. . .... | १०४ |
| ३ | हें ब्रह्माच्या मनोमय जग मनोराज्यासारिखें आहे .... | १०८ |
| ४ | मनोमय पदार्थकल्पना .. . .... ... .... .... | ११२ |
| ५ | मूलकारणभूत देवाच्या स्वरूपाचें वर्णन .... ... | ११९ |
| ६ | ज्ञानप्राप्त्यर्थ प्रयत्नाचा उपदेश.... . .. .. .... | १२१ |
| ७ | दृश्याच्या असत्तेची प्रतिज्ञा .... .. .... .... | १२५ |
| ८ | सच्छास्त्रनिरूपण .. .. .... .... .... | १२९ |
| ९ | परमकारणवर्णन .... .. . .... .... | १३० |
| १० | महाकल्पातसमयीं अवशिष्ट रहाणाऱ्या परम भावाचे वर्णन | १३५ |
| ११ | परमार्थवर्णन .... .... .... .... .... .... | १४३ |
| १२ | जगदुत्पत्तिवर्णन .... . .... .... .... | १४८ |
| १३ | स्वयभूच्या उत्पत्तीचें वर्णन .... .... .... .... | १५३ |
| १४ | ब्रह्मप्रतिपादन .... .... .... ... .... .... | १५८ |


### ( मंडपाख्यान )


| | | |
|---|---|---|
| १५ | पद्मराजाचे वर्णन .... .... .... .... .... | १६१ |
| १६-१७ | राज्ञीचा शोक व संदेहराष्ट्रवर्णन .... .... .... | १६७ |
| १८ | सकलजगद्भ्रान्तिप्रतिपादन .... .... .... | १७५ |
| १९ | वसिष्ठ–ब्राह्मणमरण .... ... .... .... .... | १८० |
| २० | परमार्थप्रतिपादन ... .. .... .... .... | १८२ |
| २१ | विश्रातीचा उपदेश .... .... ... .... .... | १८८ |
| २२ | विज्ञानाभ्यासाचे वर्णन.... .... .... .... .... | १९७ |
| २३ | लीला व देवी याचे ज्ञानदेहानें आकाशात गमन .... | २०२ |
| २४ | आकाशवर्णन .... .... .... .... .. .... | २०३ |

| सर्ग | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| २५ | भूलोकवर्णन .... .... .... .... .... .... | २०७ |
| २६ | लीलेनें ब्राह्मणपुत्रावर केलेला अनुग्रह व सिद्धांच्या दर्शनाचें कारण यांचें वर्णन .... .... .... .... .... | २०९ |
| २७ | लीलेस आपल्या अनेक पूर्वजन्मांचें स्मरण .... .... | २१४ |
| २८ | गिरिग्रामवर्णन .... .... .... .... .... | २१९ |
| २९ | लीलेनें सागितलेली आपल्या पूर्व जन्माची कहाणी व परमाकाशवर्णन ... .... .... .... .... .... | २२२ |
| ३० | असंख्य विचित्र ब्रह्माडाचे वर्णन .... .... .... | २२७ |
| ३१ | भूलोकीं चाललेलें युद्ध पहाण्याकरितां आलेल्या सिद्धादिकांचीं आकाशात झालेली गर्दी व धर्माधर्म–युद्ध–वर्णन.... | २२३ |
| ३२ | सैन्याचें वर्णन व युद्धारभ .... ... .... .... | २३६ |
| ३३-४० | युद्ध, त्यातील अनेक चमत्कार, प्रेक्षकाचें सभाषण, निशाचरानीं आकुल झालेलें रणागण इत्यादिकांचें वर्णन, लीला व देवी याचा विदूरथ राजाच्या शयन–स्थानीं प्रवेश व सूक्ष्म देहाचें तत्त्व .... .... .... .... .... | २४८ |
| ४१ | भ्रातिविचारवर्णन .... .... .... .... ... | २५६ |
| ४२ | स्वप्नातील पुरुषाचे सत्यत्व .... .... .... .... | २६० |
| ४३ | शत्रूच्या लोकानीं रात्रीं नगरात शिरून केलेला नगरदाहादि अनर्थ .... .... .... .... .... | २६५ |
| ४४ | भयभीत झालेल्या विदूरथाच्या राज्ञीचें तेथे आगमन, क्रोधाविष्ट राजाचे युद्धार्थ गमन व लीलेचे तत्त्व . .... | २६८ |
| ४५ | सत्यकामता व सत्यसकल्पता याचे अस्तित्व .... .... | २७४ |
| ४६ | पुनर्युद्धाचे वर्णन .... .... .... .... .... | २७६ |
| ४७–५१ | विदूरथ व सिंधु याचा सग्राम, विदूरथाच्या पराक्रमाचे याच्या भार्येने केलेले वर्णन, त्याच्यावर सिधूनें केलेले प्रहार सिधूस राज्यप्राप्ति व राष्ट्रस्वास्थ्य .... .... .... | २७७ |
| ५२ | मरणोत्तर होणाऱ्या देहप्रतिभेचे वर्णन .... .. .... | २८४ |

| सर्ग | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| ५३ | विदूरथाचा पत्नी त्याच्या पूर्वी कोणत्या मार्गानें पतिलोकीं गेली त्याचे वर्णन .... .... .... .... .... | २९० |
| ५४ | मरणविचार .... .... .... .... .... .... | २९३ |
| ५५ | मरणावस्थेचें वर्णन .... .... .... .... .... | ३०३ |
| ५६ | मरणोत्तर प्रेतव्यवस्था .... .... .... .... | ३१३ |
| ५७ | स्वप्नविषयविचार .... .... .. .... .... | ३१८ |
| ५८ | पद्मराजाचे पुनरुज्जीवन.... . .... .... .... | ३२४ |
| ५९ | दीर्घकाल राज्य केल्यावर त्या जीवन्मुक्तांस मिळालेला विदेह मोक्ष .... .... .... .... .... .... | ३२८ |
| ६० | मंडपाख्यानाचें प्रयोजन .... .... ... .... | ३२९ |
| ६१ | जगत्स्वरूपवर्णन .... .... .... .... | ३३७ |
| ६२ | दैव या शब्दाच्या अर्थाचें निरूपण .... .... .... | ३४२ |
| ६३ | चित्तविकार .... .... ... ... .... .... | ३४५ |
| ६४ | बीजाकुरयोग ... .... .... .... .... | ३४६ |
| ६५ | जीवविचार .... .... .... .... .... .... | ३४९ |
| ६६ | संसृतिपरमयोग .... .... .... ... .... | ३५१ |
| ६७ | सत्योपदेश .... .... .... .... .... .... | ३५४ |


( कर्कटीचें उपाख्यान )


| सर्ग | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| ६८ | कर्कटीराक्षसीचे वर्णन व तिचें तप .... .. .... | ३६३ |
| ६९ | ब्रह्मदेवानें तिला दिलेला वर .... ... .... .... | ३६४ |
| ७० | तिला सूचित्वाची प्राप्ति व सूचीच्या व्यवहाराचें वर्णन .... | ३६५ |
| ७१ | तिच्या पश्चात्तापाचें वर्णन .... .... .... .... | ३६९ |
| ७२,७३ | पुनः तपश्चरण व तिच्या तपाचा प्रभाव .... .... | ३७२ |
| ७४ | वायूनें इंद्रापुढे केलेलें तिच्या तपाचें वर्णन .... .. | ३७५ |
| ७५ | ब्रह्मदेवाचे आगमन, वरदान व तिला शरीरलाभ . . | ३७७ |
| ७६ | सहा महिने समाधिस्थ राहून उठलेल्या तिने ऐकलेली आकाशस्थ वायूची वाणी व त्याप्रमाणे तिचे तेथून निघणे | ३७८ |
| ७७ | तिचे किरातमंडलात आगमन, रात्रीचे वर्णन, राजा व मंत्री याचे दर्शन व विचार ... .... .... .... | ३८० |

| सर्ग | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| ७८ | राक्षसी, राजा व मंत्री यांचे संभाषण .... .... .... | ३८२ |
| ७९–८१ | राक्षसीचे ब्रह्मासंबंधी अनेक प्रश्न व राजा आणि मंत्री यांनीं दिलेलीं योग्य उत्तरें.... .... .... | ३८५ |
| ८२,८३ | तिच्याशीं झालेलें त्याचें सख्य, कंदरादेवीचें पूजन | ३९४ |
| ८४ | मनोकुरोत्पत्तिकथन ... .... .... .... .... | ३९८ |
| ८५ | ऐंदवाख्यानांतील ब्रह्मा व सूर्य यांचा समागम .... .... | ४०० |
| ८६,८७ | इंदु–ब्राह्मणाचे पुत्र, त्याचें विचारपूर्वक तप, समाधान व भानूने केलेलें त्यांच्या दहा जगाचे वर्णन .... .... | ४०२ |
| ८८ | ऐंदवाचा निश्चय व उपाख्यानसमाप्ति .... ... .... | ४०४ |
| | ( इंद्राहल्योपाख्यान ) | |
| ८९ | अहल्याराणी व इंद्र ब्राह्मण याचा पापी समागम, राजानें त्यास केलेली कठोर शिक्षा व कृत्रिम इंद्राचे भाषण .... | ४०५ |
| ९० | उभयतांस झालेला शाप व त्याचें प्रेम .... ... ... | ४०८ |
| ९१ | जीवावतरण–क्रम .... .... .... | ४०९ |
| ९२ | मनोमाहात्म्यवर्णन ... .... .... .... .... | ४१० |
| ९३ | उत्पत्तिदर्शन .... .... .... .... .... .... | ४१३ |
| ९४ | ब्रह्मापासून सर्व उत्पन्न होतें .... .... .... .... | ४१४ |
| ९५ | कर्म व पुरुष याचे ऐक्यप्रतिपादन .... ... .... | ४१६ |
| ९६ | मनाच्या निरनिराळ्या नांवाचा विचार .... ... . | ४२२ |
| ९७ | चिदाकाशमाहात्म्य .. .... .... .... | ४२९ |
| ९८,९९ | चित्तोपाख्यान .... .... ... .... .... | ४३१ |
| १०० | चित्ताचिकित्सापूर्वक चित्तोत्पत्ति .... .... .... | ४३७ |
| १०१ | दायीने बालकास सांगितलेली कथा .... .... .... | ४३९ |
| १०२,१०३ | विवेकाचा व आत्मतत्त्वाचा उपदेश, चित्ताचे माहात्म्य.... .... .... .... .... .... .... | ४४१ |
| | ( इंद्रजालोपाख्यान ) | |
| १०४ | लवणराजास आलेली मूर्च्छा .... .... .... .... | ४४४ |
| १०५ | राजाचे सावध होणें .... .... .... .... .... | ४४६ |

| सर्ग | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| १०६ | मोहावस्थेंत दूर अरण्यात गमन व चांडालीशीं झालेला विवाह .... .... .... .... .... .... .... | ४४८ |
| १०७ | चांडालग्रामांतील वास्तव्य व आपत्ति .... .... .... | ४५३ |
| १०८ | दुर्भिक्षवर्णन .... .... .... .... .... .... | ४५९ |
| १०९ | त्या देशाचा त्याग, दुःखानें अग्नींत देहत्याग व लागलेंच राजाचें सावध होणे याचें वर्णन .... .... .... | ४५६ |
| ११० | मनाच्या वैभवाचें वर्णन .... .... .... .... | ४५८ |
| १११ | अहममाभिमानत्यागपूर्वक चित्ताचें ऐकाग्र्य हाच त्यास जिंकण्याचा उपाय आहे .... .... .... .... .. . | ४६१ |
| ११२ | वासनात्याग हाही चित्तजयाचा उपाय आहे व चिन्मात्र भावनेनें तो साध्य होतो .... .... .... .... | ४६३ |
| ११३ | अविद्यावर्णन–तत्त्वबोध .... .... .... | ४६५ |
| ११४ | स्वात्मदर्शन हाच अविद्याक्षयाचा उपाय आहे, असें सांगून दोषत्यागाचा उपदेश ... .... .... | ४६८ |
| ११५ | लवणराजाच्या आपत्तीचें कारण व सुख भोक्तृत्वोपदेश | ४७१ |
| ११६ | साधक जन्माचा अवतार व योगभूमिका .... .... | ४७४ |
| ११७ | अज्ञानावस्थेंतील सात भूमिकाचे वर्णन .. .... | ४७६ |
| ११८ | सात ज्ञानभूमिकाचा उपदेश .... . .... | ४७८ |
| ११९ | सुवर्णाच्या मुद्रिकेचा दृष्टांत देऊन केलेला उपदेश .... | ४८१ |
| १२०,१२१ | लवणराजाचें तें अरण्य व चांडाल ग्राम पहाण्या करितां गमन, त्याचें दर्शन, चांडालीचा शोक, तिचें सांत्वन करून राजाचें स्वदेशीं पुनरागमन, वसिष्ठास त्याचा प्रश्न, समाधान, व चित्ताभावप्रतिपादन .... .... .... .... | ४८५ |
| १२२ | आत्मस्वरूपनिरूपण व प्रकरणोपसंहार.... .... .... | ४९१ |

# विक्रीस तयार.

## वे. शा. सं. विष्णु वामन बापट शास्त्री यांनीं तयार केलेले

## वेदांत विषयावरील सार्थ सविवरण मराठी ग्रंथ.

---

### पंचदशी पूर्वार्ध.

( मान्वयार्थविवरणसमेता ) ह्या भागांत श्रीमद्विद्यारण्यकृत– १ तत्त्वविवेक, २ पचभूतविवेक, ३ पचकोशविवेक, ४ द्वैतविवेक, ५ महावाक्यविवेक आणि ६ चित्रदीप-अशी सहा प्रकरणे आहेत पुढील श्रीभारतीतीर्थकृत नऊ प्रकरणें दुसऱ्या भागात घेतलीं आहेत. ग्रथाची रचना, मूळ श्लोक घेऊन त्याचा अन्वय व अर्थ त्याखाली देऊन नतर शुद्ध मराठी भाषेत त्याचे विवरण दिलें आहे श्लोकाची सख्या २९० असून पृष्ठाची सख्या ४४५ आहे. किं १॥। रु.

### पंचदशी उत्तरार्ध.

( सान्वयार्थविवरणसमेता ) ह्या दुसऱ्या भागात भारतीतीर्थकृत ९ प्रकरणें आली आहेत ती अशी—१ तृप्तिदीप, २ कूटस्थदीप, ३ धान्यदीप, ४ नाटकदीप, ५ ब्रह्मानदे योगानद, ६ ब्र आत्मानद, ७ ब्र अद्वैतानद, ८ ब्र. विद्यानद, आणि ९ विषयानद याप्रमाणे सार्थ व साविवरण अशी ९ प्रकरणे असून पृष्ठसख्या ५५० आहे. कि २ रु

### अपरोक्षानुभूति.

श्री जगद्गुरु शकराचार्य प्रणीत हा वेदात विषयाचा ग्रथ आहे मूळ श्लोक, त्याखाली टीका व त्याखाली सरळ प्राकृत विवरण, याप्रमाणे याची योजना केलेली आहे एकदर श्लोक १४४ असून त्यात वेदाताच्या सर्व बाजूचा विचार केलेला आहे कि ८ आणे

### सांख्यतत्त्व कौमुदीसार.

हा ग्रथ, ईश्वरकृष्णविरचित सांख्यकारिका व श्रीवाचस्पतीमिश्रविरचित तत्त्वकौमुदीनामक त्याची टीका, याच्या आधारे तयार केला आहे. कपीलमुनीप्रणीत साख्यशास्त्राचे सहा अध्याय आहेत व त्यात एकदर ५२६ सूत्रे आहेत हा साख्यकारिका--ग्रथ साख्यशास्त्राचे सपूर्ण रहस्य समजण्यास पुरेसा आहे. याची रचना मूळ अन्वय, अर्थ आणि कौमुदीसार अशा प्रकारे मराठी वाचकास सुलभ रीतीने समजेल अशी आहे. पृष्ठसख्या १६० किमत १२ आणे.

## हरीमिडे-स्तोत्रम्.

हा ग्रंथ श्रीच्छंकराचार्य प्रणीत असून यात थोडक्यांत वेदांताच्या सर्व बाजूंचे सोपपत्तिक विवेचन आले आहे. मूळ श्लोक व त्याखालीं त्याचे विवरण याप्रमाणें याची रचना आहे. पृष्ठसंख्या ९६. किंमत ६ आणे.

## जीवन्मुक्ति-विवेकसार.

श्रीविद्यारण्यस्वामीप्रणीत जीवन्मुक्तिविवेक नामक निवृत्तिधर्मपर पंचदशी-प्रमाणे हा ग्रंथ सर्वमान्य आहे त्याचे हें साररूपाने मराठी भाषांतर आहे. पृ. सं. १६८ बांधणी कागदी पुठ्याची, किंमत १२ आणे

## तत्त्वानुसंधानसार.

हा अद्वैत वेदान्तशास्त्राचा न्यायप्रधान पारिभाषिक ग्रंथ आहे. न्यायावाचून वेदान्त वाचणें ह्मणजे आंधळ्याने काठीवाचून प्रवास करूं लागण्यासारखेंच आहे दक्षिण हिंदुस्थानात पंचदशीचा जसा प्रचार आहे, तसाच उत्तर हिंदुस्थानात या ग्रंथाचा प्रचार आहे पंचदशी पेक्षा यात न्यायपरिभाषा अधिक आहे यास्तव वेदान्तवाचकांनी ह्या ग्रंथाचे नुस्तें वाचनच नव्हे तर विद्यार्थ्याप्रमाणे वारवार वाचून याचा अभ्यासच केला पाहिजे हा ग्रंथ चांगला समजला ह्मणजे मराठीतील दुसरा कोणताही वेदान्तग्रंथ समजण्यास अडचण पडणार नाही

मूळ संस्कृत ग्रंथाचे चार परिच्छेद असून त्यावर अद्वैतकौस्तुभ नावाची टीका आहे काशीमध्ये शिळाप्रेसवर छापलेल्या त्या पुस्तकाची किंमत ४ रुपये आहे या सटीक ग्रंथाच्या आधारें आचार्यभक्त विष्णु वामन बापट यांनी हे मराठीत सोपें व सरळ सार लिहिलें आहे या पुस्तकाच्या प्रत्येक पृष्ठावर चालू विषयाचें नाव देऊन वाचकास त्यातील पाहिजे तो विषय पाहिजे तेव्हा सहज मिळावा अशी योजना केली आहे या सर्वमान्य सर्वोपयोगी ग्रंथाचे भाषांतर मराठीत अद्यापि झालेलें नव्हतें बारीक टाईपाची पृष्ठें सुमारें ४० झाली आहेत बांधणी कापडी जाड पुठ्याची किंमत २ रुपये

---

## विश्वनिरीक्षण.

( वेदांतावरील स्वतंत्र ग्रंथ ) ह्या ग्रंथात जुन्या व नव्या मतास धरून वेदांत विषयाचा विचार केलेला आहे यातील विषयानुक्रम पुढीलप्रमाणे आहे— १ प्रस्तावना भाग १ ला—तत्त्वनिर्णय, २ पंचमतें ३ उपाधि निरसन, ४ वस्तु-स्वरूप, ५ सदसत.परम्, भाग दुसरा—१ ब्रह्मज्ञानाचें व्यवहाराशी संगतीक-रण, २ धर्मनीति, ३ विरोध, ४ आक्षेप, ५ ब्रह्मज्ञानाचा व्यवहारात उपयोग, ६ तजवीज याप्रमाणे पहिल्या भागात ५ व दुसरे भागात ६ मिळून एकंदर ११ विषय आहेत. मन, बुद्धि व विवेक, ही पात्रें योजून वेदांताच्या तत्त्वांचा होईल तितका सुलभ रीतीने यात निर्णय केला आहे. किंमत १। रु.

## कर्मयोग, भक्तियोग व राजयोग.

प्रसिद्ध स्वामी विवेकानद यानीं युरोप व अमेरिकेंत वेगवेगळ्या योगांवर दिलेल्या व्याख्यानापैकीं वरील तीम योगांवर वेगवेगळ्या तीन विद्वानांनीं मराठींत लिहिलेले हे तोन ग्रंथ एकत्र बांधलेले आहेत. किंमत १ रुपाया.

## ज्ञानयोग.

प्रसिद्ध स्वामी विवेकानद यांनीं इंग्लड व अमेरिकेंत ज्ञानयोगावर दिलेलीं व्याख्याने अत्यत लोकमान्य झालीं होती, त्याचें हें भाषातर केवळ मराठी वाचकाच्या सोईकरिता रा. रा. श्रीकृष्ण नीळकठ चापेकर यानी केले आहे. ह्या ग्रथात—१ मनुष्यास धर्माची आवश्यकता, २ सर्वसग्राह्य धर्माची कल्पना व तिचे अत्युच्च स्वरूप, ३ वस्तुपुरुष व भ्रान्तिपुरुष, ४ माया, ५ माया आणि ईश्वरविषयक कल्पनेचा विकास, ६ माया आणि मोक्ष, ७ अव्यक्त ब्रह्म आणि साकार ब्रह्म, ८--९ विश्वविचार १०--११ पुनर्जन्मवाद, १२ आत्म्याचे अमरत्व, १३ भिन्नत्वात ऐक्याचा प्रत्यय. याप्रमाणे १३ विषय आहेत. किंमत १॥। रुपये.

**सूचना**—आमच्या किताबखान्यात सर्व प्रकारचे मराठी ग्रंथ, व शालोपयोगी पुस्तके व इतर सामान एकाच भावाने मिळतात. लायब्ररी व शाळामास्तर यास योग्य व भरपूर कमिशन दिले जाते. श्रीमत गायकवाड सरकार, डेक्कन व्हरनाक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी, सत्कार्योत्तेजक सभा, इत्यादि सस्थानी प्रसिद्ध केलेल्या ग्रथाची एजन्सी आमच्याकडे आहे. पुस्तकास लागणारा वाजवी व्ही. पी. व टपालखर्च किमतीवर चढविला जाईल.

सर्व पत्रव्यवहार खालील पत्त्यावर करावा कांही खुलासा पाहिजे असल्यास उत्तराकरिंता टिकिट पाठवावे.

## दामोदर सांवळाराम आणि मंडळी.

**ग्रंथ संपादक मंडळीचा किताबखाना--ठाकुरद्वार—मुंबई.**

T S Subramaniam's
13001

॥ श्रीः ॥

( आचार्यभक्त विष्णुकृत मराठी )

# बृहद्योगवासिष्ठसार.

## अथ वैराग्यप्रकरणम् ।

—— ००X०० ——

ॐ तत्सद्ब्रह्मणे नमः ।

श्रीगणेशाय नम । वाल्मीकि, व्यास, श्रीशंकराचार्य इत्यादि वेदांताचार्यांस अनन्यभक्तीने वंदन करून मी हे बृहद्योगवासिष्ठसार स्वबुद्धिशुद्ध्यर्थ लिहितो.

**सर्ग १**—या सर्गांत-वेदांतसंप्रदायाच्या शुद्धीकरिता ऋषि व देव यांचा संवाद आणि रामाच्या अज्ञानाचे कारण वर्णिले आहे. हा सर्ग बृहद्योगवासिष्ठाचा उपोद्घात आहे, असे ह्मटले तरी चालेल

ज्याच्यामुळे ही सर्व चराचर भूते भासतात, ज्याच्यामुळेच त्यांची स्थिति होते आणि प्रलयसमयी सर्व ज्याच्यामध्ये लीन होतात त्या सत्यस्वरूप परमात्म्यास नमस्कार असो. ज्ञाता ( जाणणारा ), ज्ञान ( जाणण्याचे साधन ), ज्ञेय ( ज्ञानाचा विषय ), द्रष्टा, दर्शन, दृश्य, कर्ता, करण, कार्य, इत्यादि त्रिपुट्या ज्याच्या योगाने सिद्ध होतात त्या ज्ञानरूप परमात्म्यास नमस्कार असो. स्वर्गापासून ब्रह्मलोकापर्यंत जे ऊर्ध्व लोक आहेत त्यांत रहाणाऱ्या देवादिकांमध्ये व या लोकांतील मनुष्यापासून स्थावरापर्यंत प्राण्यांमध्ये कर्मा-अधिक प्रमाणाने व्यक्त होणारे आनंदाचे कण ज्याच्या सत्तेमुळे स्फुरण पावतात व जे सर्व प्राण्यांचे जीवन आहे त्या आनंदरूप ब्रह्मास नमस्कार असो पूर्वी एकदा सुतीक्ष्ण नामक कोणा एका ब्राह्मणास मोक्षाच्या साधनाविषयी संशय आला, व त्याच्या निरसनार्थ तो आपल्या गुरूच्या ह्मणजे अगस्त्य मुनींच्या आश्रमास जाऊन त्यास मोठ्या आदराने विचारू लागला. **सुतीक्ष्ण**—भगवन्, मला एक संशय आला आहे, व आपण सर्व धर्मांस जाणणारे आहां, ह्मणून मी

आपल्याकडे आलो आहे. तरी कृपा करून त्या माझ्या सशयाचे निरसन करा. मोक्षाचे साधन केवल श्रौतस्मार्त–कर्म आहे; कीं केवल ज्ञान आहे, की ज्ञान व कर्म हीं दोन्ही मोक्ष–साधने आहेत ? ( वेदाने सागितलेल्या अग्निहोत्रादि कर्मांस श्रौत कर्म, व स्मृतीनी सागितलेल्या पच महायज्ञादिकर्मांस स्मार्त कर्म ह्मणतात. आणि ज्ञान ह्मणजे आत्म्याचा साक्षात्कार. ) सुतीक्ष्णाचा हा प्रश्न ऐकून अगस्त्य ह्मणाले—बा प्रिय सुतीक्ष्णा, दोन्ही पखाच्या सहायाने जशी पक्ष्याची अतरिक्षात गति होते, त्याप्रमाणे ज्ञान व कर्म या दोन उपायाच्या योगाने प्राण्यास परम पद प्राप्त होते. ज्ञानावाचून केवल कर्म व कर्मावाचून केवल ज्ञान मोक्षाच्या उपयोगी पडत नाही. किंवा कर्म ज्ञानाचे साधन आहे व ज्ञान मोक्षाचे साधन आहे. ह्मणजेच ज्ञान हे मोक्षाचे साक्षात्कारण आहे व कर्म ज्ञानाच्या द्वारा ह्मणजे परपरेने मोक्षास कारण होते. वर पखाचा जो दृष्टात दिला आहे तो–पक्ष्याच्या गतीस जशी दोन्ही पखाची गरज असते त्याप्रमाणे मोक्षास कर्म व ज्ञान या दोघाचीही गरज आहे-एवढे सुचविण्यापुर्ताच आहे. कारण पक्ष्यास उडताना दोन्ही पंख एकदम हालवावे लागतात. पण साधकास कर्म व ज्ञान याचा एकाच वेळी उपयोग करिता येत नाही. कारण कर्म ज्ञानाचे साधन आहे व साधनाच्या अनुष्ठानानंतर साध्याची सिद्धि होत असते. असो, याविषयी मी तुला एक पूर्व इतिहास सागतो. पूर्वी कारुण्य या नावाचा कोणी एक ब्राह्मणपुत्र होता. त्याच्या बापाचे नाव अग्निवेश्य असे होते. त्याने सर्व वेदाचे व शास्त्राचे सागोपाग अध्ययन केले व गुरूच्या आज्ञेने तो आपल्या घरीं परत आला. पण तो आपल्या घरी आल्यावर शास्त्रविहित कर्मे न करिता बावरल्यासारिखा होऊन राहूं लागला. तेव्हा आपला पुत्र कर्माचा त्याग करून राहण्याची इच्छा करीत आहे, असे पाहून अग्निवेश्य त्यास हितबुद्धीने ह्मणाला–बाळा, तू स्वकर्माचे अनुष्ठान का करीत नाहीस ? स्वकर्मत्यागाने तुला सिद्धि कशी प्राप्त होईल ? याप्रमाणे कर्मांपासून निवृत्त होण्यास तुला काय कारण झाले, ते मला साग. आपल्या पित्याचा, अगदी कळकळीने केलेला, हा प्रश्न ऐकून कारुण्य ह्मणाला–जीवात जीव असे तो अग्निहोत्र ठेवावें, सध्योपासना नित्य करावी, इत्यादि श्रुति ( वेद ) व स्मृति यानी सागितलेला हा प्रवृत्तिरूप धर्म आहे.

आणि " मोक्ष धनाने मिळत नाहीं, कर्मांच्या अनुष्ठानाने मिळत नाही किंवा शुद्ध संततीच्या योगानेही मिळत नाहीं; तर तो केवल सर्वसंगपरित्याग केल्यानेच मिळतो " या वचनानी सांगितलेला निवृत्त धर्म आहे. पण अशा एकमेकांच्या विरुद्ध उपदेश करणाऱ्या दोन प्रकारच्या श्रुति व स्मृति आढळत असल्यामुळें, काय करावे हे मला समजत नाही. बाबा, एवढ्याच करिता मी कर्में सोडून असा स्वस्थ बसलो आहे आपल्या प्रिय पुत्राचे हे दीन व अज्ञतुल्य भाषण ऐकून अग्निवेश्य त्यास पुनः ह्मणाला-बाळा, मी तुला एक गोष्ट सांगतो ती ऐक, तिचे तात्पर्य तू मनात आण, व मग तुला वाटेल तसे कर. कारण कोणतेही काम विचार केल्यावाचून व आपल्या समजुतीप्रमाणेच करू नये.

सुरुचि नामक एक श्रेष्ठ अप्सरा एकदा-ज्याच्यावर पुष्कळ मयूर आहेत, जेथे कामसंतप्त किन्नरी किन्नरासह क्रीडा करीत आहेत व मोठमोठ्या पापांच्या भारांस नष्ट करून सोडणाऱ्या भागीरथीचा प्रवाह ज्याच्यावरून वहात आहे- अशा हिमालयाच्या शिखरावर बसली होती. इतक्यात अंतरिक्षातून जात असलेला इंद्राचा एक दूत तिच्या दृष्टीं पडला त्यास ती ह्मणाली- बा देवदूता, तुझे कोठून आगमन झाले ? तू आता कोणत्या कामाकरिता गेला होतास ? **देवदूत**-अप्सरे अरिष्टनेमि ह्मणून एक राजा आहे. विरक्त झालेल्या त्याने आपले राज्य पुत्रास देऊन तप करण्याकरिता वनात गमन केले. तो महात्मा या समोरच्या गंधमादन पर्वतावर तप करीत आहे. त्याच्याकडे मी काही कामाकरिता गेलो होतो, व तेथूनच हा मी आता परत येत आहे. तेथील वृत्तात सांगण्याकरिता मला पुनः इंद्राकडे जावयाचे आहे. हे ऐकून ती सुरुचि ह्मणाली-तेथे असा कोणता मोठा वृत्तांत झाला आहे ? कृपा करून तो मला सांगशील का ? **देवदूत**-हो, तुला न सांगण्या सारिखे त्यात गुप्त कांही नाही. तो राजा वनात येऊन दुस्तर तप करू लागला असता, देवेंद्र मला ह्मणाला- दूता, तू हे उत्तमोत्तम विमान घेऊन जा व त्या राजास त्यात बसवून स्वर्गभोग भोगण्याकरिता येथे घेऊन ये. स्वामीची ही आज्ञा शिरसा मान्य करून मी सर्व उपकरणासह विमान घेऊन तेथे गेलो, व त्या- जास इंद्राची आज्ञा कळविली. पण तो संशयी राजा मला- दूता, स्वर्गातील सर्व गुण-दोष मला सांग. ते ऐक-

करावेसे वाटेल ते मी करीन. ही त्याची विनति मान्य करून मी ह्मटलें-स्वर्गांत पुण्यसामग्रीच्या योगाने सुख होते. जो उत्तम पुण्यवान् असतो त्यास उत्तम सुख मिळते; तसाच मध्यम पुण्यवानास मध्यम व कनिष्ठ पुण्याच्या योगाने कनिष्ठ प्रतीचा स्वर्ग मिळतो. तेथे दुसऱ्याचा उत्कर्ष सहन होत नाही. बरोबरीच्या सुखी प्राण्याशी मोठी स्पर्धा करावी लागते व आपल्यापेक्षां कमी सुखी प्राण्यास पाहून मोठा संतोष वाटतो. सारांश सुखोपभोगाने पुण्य क्षीण होईतो हे असे चाललेले असते, आणि पुण्यांश संपला की तो प्राणी पुनः या मर्त्यलोकांत येतो. माझे हे भाषण ऐकून तो पूर्ण विरक्त राजा ह्मणाला—दूता, मला असल्या स्वर्गाची मुळीच इच्छा नाही. मी याहीपेक्षा उग्र तप करून सापाच्या कांतेप्रमाणे या अशुद्ध शरीराचा त्याग करीन. तू हे विमान घेऊन परत जा. तुला नमस्कार असो. देवदूत—अप्सरे, हे त्याचे निग्रहाचे भाषण ऐकून मी इंद्राकडे परत गेलो व राजाचा हा वृत्तांत स्वामीस सांगितला. तो ऐकून त्यालाही मोठे आश्चर्य वाटले, व तो पुनः मधुर शब्दांनी मला ह्मणाला—दूता त्या विरक्त राजास आत्मबोधाकरितां तू वाल्मीकीच्या आश्रमांत घेऊन जा, व त्या ज्ञानी ऋषीस माझा असा निरोप सांग की—हे महर्षे, स्वर्गादि सर्व क्षणिक व सांसारिक सुखास तुच्छ समजणाऱ्या या नम्र व शीलसंपन्न राजास आत्मतत्त्वाचा उपदेश कर ह्मणजे त्याच्या योगाने जन्म जरा, बाल्य, रोग, तृष्णा इत्यादिकांच्या योगाने प्राप्त होणाऱ्या सांसारिक दुःखाने व्याकुळ झालेल्या या राजास मोक्ष प्राप्त होईल. अप्सरे, देवाधिदेवाचा हा निरोप घेऊन मी पुनरपि राजाकडे आलो, त्याच्या सह वाल्मीकीकडे गेलो व त्या महर्षीस स्वामीची इच्छा कळविली. तेव्हा त्या पुण्यवान् ब्राह्मणानें राजास प्रेमाने अनामय प्रश्न केला असता अरिष्टनेमि ह्मणाला—भगवन्, आपल्या दर्शनाने मी धन्य झालो व यातच माझे कुशल आहे. महाराज, या संसारदुःखातून मी मुक्त कसा होईन, ते मला सांगा. असा मोठ्या काकुळतीने केलेला प्रश्न ऐकून ते दयासागर मुनि म्हणाले—राजा, मी तुला रामायण सांगतो. ते ऐकून तू त्याचा अर्थ मनांत आण व मनन कर. ह्मणजे जिवन्मुक्त होशील. मी तुला वसिष्ठ व राम यांचा संवाद सांगतो. ही शुभ कथा ह्मणजे मोक्षाचा एक उपायच आहे. त्यावर राजा म्हणाला—राम हा कोण होता ? तो बद्ध होता की मुक्त ? हा प्रश्न ऐकून

वाल्मीकि म्हणाले–शापाच्या निमित्ताने स्वतः हरीच राम झाला, व बळेच आपल्या मध्ये अज्ञान आणून तो प्रभु किंचिज्ज्ञ म्हणजे सामान्य जीव झाला. एकदा निष्काम सनत्कुमार ब्रह्मदेवाच्या लोकी रहात असता तेथे तो श्रीहरी वैकुंठाहून आला. ब्रह्मदेवाने त्याची पूजा केली व त्यानंतर सनत्कुमारावाचून सत्य लोकातील दुसऱ्या सर्वांनीही त्याचा योग्य सत्कार केला. ते पाहून तो भगवान् सनत्कुमारास म्हणाला, "सनत्कुमारा, निष्काम असल्यामुळे तू इतका गर्वित झाला आहेस काय ? तू कामविह्वल शरभंग हो" भगवानाचा हा शाप ऐकताच त्या तेजस्वी ब्राह्मणासही राग आला व तो उठला आणि ह्मणाला "तुझे जे सर्वज्ञत्व आहे, त्याचाही लोप होऊन तू अज्ञानी होशील." त्याचप्रमाणे एकदा शुक्राचार्य समाधिस्थ असताना देवाच्या भीतीने शरण आलेल्या असुरांचे, आश्रमात असलेल्या याच्या पत्नीने आपल्या पातिव्रत्याच्या सामर्थ्याने देवाच्या अस्त्रास निष्फल करून, रक्षण केले. ते पाहून देवाचा पक्ष घेणाऱ्या विष्णूने सुदर्शनाने तिचा शिरश्छेद केला नंतर समाधि सोडून उठलेल्या भृगूने क्रोधाने ह्मटले "हे विष्णो, तुझ्याही भार्येची व तुझी ताटातूट होईल" जलंधराचा वेष घेऊन त्या भगवानाने देवकार्याकरिता वृंदेचे पातिव्रत्य नष्ट केले. तेव्हा ती जलधरपत्नी त्यास ह्मणाली "विष्णो ज्याअर्थी तू कपट करून व मला फसवून माझ्या पतीस मारले आहेस त्याअर्थी तूही स्त्रीविरहाचे दुःख भोगशील !" पयोष्णीचे तीरी असलेल्या देवदत्ताच्या भित्र्या स्त्रीने श्रीविष्णूच्या नारसिंह अवताराचे भयंकर स्वरूप पाहताच प्राण सोडले. त्यामुळे दुःखाने विह्वल झालेल्या त्याने "तुलाही मजप्रमाणेच स्त्रीविरह होईल" असा भगवानास शाप दिला. या चार शापामुळे त्या सर्वज्ञ ईश्वरास दशरथाच्या उदरी राम या नावाने अवतीर्ण व्हावे लागले. असो, अशा त्या रामास वैराग्य उत्पन्न झाले असता वसिष्ठांनी कसा उपदेश केला, ते मी तुला सविस्तर सांगतो, ह्मणजे तुला मोक्षसाधनाचे ज्ञान होईल १.

---

१ तेजस्वी व निःस्पृह ब्राह्मण प्रत्यक्ष भगवानासही मोजित नाहींत व अन्यायाचा प्रतिकार तेजस्वी झाल्यावाचून करिता येत नाही, हे या आख्यायिकेचें रहस्य आहे.

**सर्ग २**—या सर्गांत या शास्त्राचा अधिकारी, उपाय, ब्रह्मदेवाच्या आज्ञेने या ग्रंथाचा आरंभ व भरद्वाजाचा प्रश्न ह्यांचे वर्णन केलें आहे.

वाल्मीकि ह्मणतात–बा राजा, " मी बद्ध आहें. मला या बंधानांतून मुक्त झाले पाहिजे " अशी ज्यास उत्कट इच्छा झाली असेल तो या पुढील उपदेशाचा अधिकारी होय. अति अज्ञही या उपदेशाचें पात्र नाहीं व अति ज्ञानीही याचा खरा भोक्ता नव्हे. ज्याला आत्म्याचा साक्षात्कार होतो तोच अति ज्ञानी होय. पूर्व रामायणावरून प्रवृत्ति धर्माचे उपाय समजून घेऊन त्याचे यथाविधि अनुष्ठान करावे व चित्तशुद्धि हे त्याचे फल प्राप्त झाले असता या मोक्षोपायाचा विचार करावा. याप्रमाणे जो करतो तो या कष्टकर ससारात पुनः जन्म घेत नाहीं. मनुष्याच्या चित्तातील राग-लोभादि दोष समूल नाहीसे व्हावे या हेतूने मी पूर्वरामायण केले व तो चोवीस सहस्र ग्रथ आपल्या भरद्वाजनामक शिष्यास शिकविला वाल्मीकि-रामायण या नावाने या लोकी प्रसिद्ध असलेल्या त्या ग्रथानतर उत्तर रामायण ह्मणून आणखी एक बत्तीस सहस्र श्लोकाचा ग्रथ करावा, असे माझ्या मनात होतेच. कारण पूर्व रामायणात मी श्रीरामाच्या प्रवृत्ति मार्गाचे वर्णन केले आहे व या उत्तररामायणात निवृत्तिमार्गाचे उपपादन करावे असा माझा उद्देश होता. इतक्यात तो भरद्वाज मेरूवरील ब्रह्मदेवाच्या सभेत गेला व त्याने ते पूर्व रामायण तेथे ह्मणून दाखविले. ते ऐकून परमेष्ठीस मोठा आनद झाला, व त्याने भरद्वाजास " वर माग " ह्मणून ह्मटले. तेव्हा तो माझा परोपकारी शिष्य ह्मणाला, " हे भगवन्, सर्व प्राणी दुःखातून कसे मुक्त होतील ते सागा! " हे ऐकून तो पितामह ह्मणाला–प्रिय भरद्वाजा, याविषयी तू आपल्या गुरूची प्रार्थना कर. त्याने जे हे रामायण आरभिले आहे, त्याचे अध्ययन केले असता मनुष्य मुक्त होतील. असे बोलून तो देव लागलाच स्वतः माझ्या आश्रमास आला. मी त्याची यथाविधि पूजा केल्यावर तो ह्मणाला, " मुने, आरभिलेले हे रामायण मध्येच सोडू नकोस. कारण एवढा मोठा ग्रथ लिहिता लिहिता कटाळा येण्याचा सभव आहे. ह्मणून मी हे मुद्दाम सागण्याकरिता येथे आलो आहे. हा

---

१ यावरून स्त्रीशूद्रादि मनुष्यमात्रास या वेदान्त ग्रथाच्या श्रवणाचा अधिकार आहे, असे ठरतें. कारण " मुक्त होण्याची उत्कट इच्छा " हेच येथील अधिकाऱ्याचे लक्षण आहे.

तुझा रामायण ग्रंथ प्राण्यांस संसारसागरांतून पार निघून जाण्याकरितां एक नौकाच होणार आहे. परोपकारापुढें दीनदयाळु सज्जन आपल्या शारीरिक श्रमांस मोजीतही नसतात. हे ध्यानात धरून केवळ लोक-हितार्थ हें उत्तम शास्त्र तू माझ्या आज्ञेने शेवटास ने " असें बोलून तो परमेश्वर गुप्त झाला. मलाही या अकल्पित घडून आलेल्या गोष्टीचे मोठें आश्चर्य वाटले. माझा उत्तर रामायणाविषयीचा मंद विचार त्यामुळे तीव्र झाला व त्या देवाची आज्ञा पूर्ण करण्याचें मी मनात आणले. माझा भरद्वाज शिष्य तेथे होताच. मी ब्रह्मदेवाच्या आज्ञेने उत्तर रामायण करणार आहे, असे त्यास समजताच त्या नम्र अधिकाऱ्याने " महागुरो, या भयंकर संसारामध्यें रामाने व त्याच्या इतर संबंधी जनांनी व्यवहार कसा केला, ते मला सांगा. ह्मणजे त्याचे अनुकरण करून मीही आपला उद्धार करून घेईन. " असे ह्मटले. हा त्या योग्य शिष्याचा प्रश्न ऐकून मी त्यास ह्मटले, " भरद्वाजा, मी सांगतो ते ऐक. या कथाश्रवणाच्या योगाने तुझे पाप नाहीसे होईल, व रामाप्रमाणेच जर तू आपले आचरण ठेविलेस तर या संकटातून मुक्त होशील. मोक्षाचे उपाय सांगणारी ही कथा तुझ्या प्रमाणे दुसऱ्याही अधिकाऱ्याच्या उपयोगी पडेल. कारण यातील एखादा उत्तम उपायही ज्याच्या हाती लागतो ते धन्य पुरुष शोक, दैन्य, व संताप यातून तत्काल मुक्त होतात २.

**सर्ग ३**—वासनाक्षय हाच या दृश्य जगाच्या मार्जनाचा उपाय आहे, असे अगोदर प्रतिपादन करून नंतर रामाच्या यात्रेचे वर्णन यात केलें आहे.

हे भाग्यवाना, रामाचे उदाहरण घेऊन मी आता तुला जीवन्मुक्ताची स्थिति सांगतो. प्रथम जीवन्मुक्तीचे लक्षण व स्वरूप तुला सांगितलें पाहिजे. हे जग आकाशाच्या नीलवर्णाप्रमाणे भ्रमाने उत्पन्न झालें आहे. आकाश ह्मणजे कांही नसणे. ते जसे आपल्या आसपास आहे तसेच नक्षत्रे, चंद्र, ग्रह इत्यादि जेथे दिसतात तेथेही आहे. पण दृष्टिदोषामुळें भ्रम होऊन आपणास ते निळ्या रंगाचे व उपड्या कढयीच्या आकाराचें दिसते. त्याचप्रमाणे वस्तुतः जग ह्मणून कांही पदार्थच नसताना ते आपणास भ्रमामुळे आहेसे भासते. या भ्रमास अध्यास ह्मणतात. आत्म्याच्या यथार्थ स्वरूपाचे ज्ञान न झाल्यामुळे ह्मणजेच अविद्येमुळें तो होत असतो. या अविद्येचा आत्मज्ञानानें उच्छेद करून,

पुनरपि कधीही स्मरण होणार नाही, इतक्या दृढपणे जगास विसरणे हेच जीवन्मुक्तीचे लक्षण व स्वरूप आहे. लक्षण ह्मणजे ओळखण्याचे चिह्न व स्वरूप ह्मणजे आकार, असा या दोन शब्दांचा स्थूल अर्थ येथे समजावा. पण ही स्थिति प्राप्त होणे अतिशय कठिण आहे. ह्मणूनच अद्वैत सिद्धांत सर्वांस पटत नाही व त्यामुळेच विशिष्टाद्वैत, शुद्धाद्वैत, द्वैत, केवळ भक्तिमार्ग, केवल कर्ममार्ग, नास्तिकांचा संघ व केवळ विषयासक्त उन्मार्गी लोकांचा समूह हे सर्व या जगात अस्तित्वात आहेत. जगात जेवढे ह्मणून अनुभवास येणारे पदार्थ आहेत त्यांचा अत्यंत अभाव आहे ह्मणजे मनुष्याच्या शिंगाप्रमाणे किंवा पुच्छाप्रमाणे ते तिन्ही काळी विद्यमान नाहीत, असा दृढ बोध झाल्यावाचून त्या अवस्थेचा अनुभव येणे शक्य नाही. पण तो बोध दृढ कसा होणार ? त्याला उपाय कोणता ? ह्मणून विचारशील तर सांगतो. आत्म्याचे यथार्थ स्वरूप जाणणे हाच त्याचा उपाय आहे. यास्तव उपायाच्या योगाने आत्मसाक्षात्कार संपादन केला पाहिजे. या शास्त्राचे श्रवण केले असता त्याचा उपाय समजतो. हे जग जरी दिसत आहे तरी ते वस्तुतः नाही, असा बोध होणे अशक्य समजूं नकोस. कारण अशी अशक्य गोष्टही सुशक्य करण्याचे सामर्थ्य या शास्त्रामध्ये आहे चित्तवृत्ति आत्म्यामध्ये स्थिर करून तिला द्वैतमय बाह्य पदार्थांपासून दूर करणे हाच दृश्य नाहीसे करण्याचा उपाय आहे, व तो साध्य झाल्यास तीच परम शांति उत्पन्न झाली, असे जाणावे. पण असे न करिता जे विचारे आत्म्यावाचून इतर पदार्थांचे सविस्तर वर्णन करणाऱ्या शास्त्रांतच लोळत रहातात त्यास अनंत कोटी कल्पांतही ती शांति मिळणे शक्य नाही. त्यांतील कांहीं शास्त्रे प्राण्यांच्या उत्कर्षाचे उपाय सांगतात, हे खरे पण केवल कर्मे, भक्ति, तर्कतः पदार्थांचे विवरण इत्यादिकांच्या योगाने फार तर या दुःखमय संसारांतील एकादे जरा कमी दुःखाचे स्थान मिळणे शक्य आहे. दुःखाचा सर्वथैव नाश होणे शक्य नाही. प्राण्याच्या अनंत वासना हेच त्याच्या जन्माचे बीज आहे व जन्म हे दुःखाचे घर आहे. यास्तव बीजच नाहीसे केले पाहिजे. अर्थात् वासनांचा सर्वस्वी त्याग केला पाहिजे. या वासनांच्या त्यागासच उत्तम मोक्ष ह्मणतात. यास्तव कर्मे, उपासना, वेदांतश्रवण, मनन इत्यादि साध-

नाच्या अनुष्ठानाचे शेवटी वासनात्यागात पर्यवसान होईल, असाच शुद्ध क्रम ठेवावा. एकदा या वासनासमूहाचा क्षय झाला की मग मन शिथिल होण्यास वेळ लागत नाही. कारण वासनांचा पुजका ( समूह ) हेच मनाचे स्वरूप आहे. यास्तव थंडीचा मारा कमी झाला असतां बर्फाचा गोळा जसा वितळून जातो त्याप्रमाणे वासना क्षीण झाल्या की मनही नाहीसे होते. पक्ष्यास अडकवून ठेवण्याकरिता जसा लांकडाचा किंवा लोखडादिकाचा पिंजरा करितात त्याप्रमाणे प्राण्यास अडकवून ठेवण्याकरिता देह हा एक पच भूताचा पिंजराच केलेला आहे, व त्याची उत्पत्ति आणि अस्तित्व या वासनासमूहावरच अवलबून असतात. यास्तव वासनाचा क्षय केला असता देहाचाही क्षय होणे अगदी सहज आहे. देहक्षयावाचून दु.खांचा क्षय होत नसतो, व देहक्षयानतर दु ख होणे शक्य नाही. शुद्ध व मलिन अशी वासना दोन प्रकारची आहे त्यातील मलिन वासना जन्मास कारण होते व शुद्ध वासना जन्माचा नाश करते. कारण मलिन वासना हे बीज असून अज्ञान ( ह्मणजे आत्म्याचे यथार्थ ज्ञान नसणे ) हे क्षेत्र ( शेत ) आहे दृढ अहकार हा त्या वासना बीजास पाणी घालणारा शेतकरी ( माळी ) असल्यामुळे राग ( आवडत्या वस्तूविषयी प्रेम ) व द्वेष ( नावडत्या वस्तूविषयी क्रोध ) याच्या द्वारा त्यास जन्म हा अकुर येतो, व शुद्ध वासना, अहकार, राग, द्वेष आणि अज्ञान यानी रहित असल्यामुळे भाजलेल्या बीजाप्रमाणे पुनर्जन्मरूप अकुरास कारण होत नाही. भाजलेल्या बीजापासून अकुर उत्पन्न होत नाही, हे सर्व लोकास ठाऊक आहेच. आत्म्याचे ज्ञान हाच अग्नि असून त्याने अज्ञान क्षेत्रास जाळून टाकिल्यावर त्यातील वासनाबीज भाजल्यावाचून कसे राहील ? पण भाजलेले बी पेरण्याच्या उपयोगी जरी नसले तरी खाण्याच्या उपयोगी जसे पडते त्याप्रमाणे शुद्ध वासना पुनर्जन्माच्या जरी उपयोगी नसली तरी ती देह धारण करू शकते, व आत्मसाक्षात्कार झाल्यानतरही प्रारब्धाचा क्षय होईतो देह असावाच लागतो. अशा या शुद्ध वासनेने जे युक्त असतात व त्यामुळेच पुनर्जन्मरूपी अनर्थाचे पात्र होत नाहींत ते कृतकृत्य व ज्ञातज्ञेय पुरुष जीवन्मुक्त होत. ज्याना काहीएक कर्तव्य राहिलेले नसते ते कृतकृत्य व ज्याना काहीं ज्ञातव्य म्हणजे जाणावयाचे राहिलेले नसते ते

ज्ञातज्ञेय होत. मनाची अशी भावना होणे हेच परम शांतीचे कारण आहे. कारण आपण सर्व मानव कर्तव्य, प्राप्तव्य, व ज्ञातव्य यांकरितांच एवढी सगळी खटाटोप करीत असतों,व आमच्या मध्यें जो रजोगुण आहे तो आह्मास त्यात प्रवृत्त केल्यावाचून रहातच नाहीं. एवढ्याच करितां मुमुक्षूनीं नित्य सत्त्वस्थ झालें पाहिजे. नित्य सत्त्वस्थ ह्मणजे सदा सत्त्वगुणी होऊन रहाणे. दीर्घकाल सतत अभ्यास केल्यावाचून नित्यसत्त्वस्थ होता येत नाही.

असो, हे प्रियशिष्या, राम या जीवन्मुक्तपदास कसा प्राप्त झाला ते तूं ऐक. म्हणजे तूही सर्व अनार्थातून सुटशील. उपनयनानतर क्षत्रियपुत्रास उचित असलेली विद्या शिकण्याकरितां तो महात्मा गुरुगृही जाऊन राहिला. योग्य समयी विद्या समाप्त करून तो दाशरथि गुरूच्या आज्ञेने स्वगृही परत आला व काही दिवस त्याने मोठ्या मौजेने घालविले. पुढे राजा दशरथ आपल्या प्रजेचे पुत्राप्रमाणे पालन करीत असून प्रजाही मानुषी किंवा दैवी आपत्तिरहित होऊन आनदाने राजावर पित्याप्रमाणे प्रेम करीत असता गुणी रामाच्या मनात, तीर्थे व पवित्र आश्रम पहावे असे आले. तेव्हा तो विनयसपन्न कौसल्यापुत्र आपल्या पित्याजवळ गेला व त्याचे पवित्र चरण धरून ह्मणाला "बाबा, पवित्र तीर्थें, आश्रम, वनें, देवस्थाने इत्यादि पहावी, असे माझ्या मनात आहे. आपण प्राणिमात्राची इच्छा पूर्ण करीत असता, तेव्हा मज दीनाचाही मनोभग करणार नाही. असे समजून मी ही प्रार्थना केली आहे. रामचद्राने अशा प्रकारे पूर्वी कधीही काही मागितलेले नाही, हे जाणून वसिष्ठाच्या समतीनें राजाने सुमुहूर्तावर लक्ष्मणादि तिन्ही भ्रात्यासह रामास तीर्थयात्रेस पाठविले. प्रस्थानसमयी ब्राह्मणाकडून स्वस्त्ययन करविले, वसिष्ठानी त्याच्या बरोबर चागले चागले ब्राह्मण दिले, मत्र्यानी यात्रेची धन-वाहनादि सर्व सामग्री रवाना केली व आपल्या मातास वदन करून ते गुरु, शुक्र, बुध व मगळ या ग्रहांप्रमाणे दिसणारे चारी भ्राते राजगृहातून मोठ्या थाटाने निघाले. राजपत्नीनी पुत्रास आलिंगन व अनेक आशीर्वाद देऊन मोठ्या कष्टाने जाण्याची आज्ञा दिली, अयोध्या नगरीतील लोक रामास पोचवावयास निघाले, मगल वाद्याचा एकच गजर होऊन राहिला, आबालवृद्ध स्त्री-पुरुष त्या राजपुत्रांस आनदित चित्ताने व विकसित नेत्रांनी पाहूं लागले, नगरातील कन्या त्यांच्यावर लाह्या व पुष्पें फेकू लागल्या व अशा उत्सा-

हाने राम नगरांतून बाहेर पडला. अनेक ब्राह्मणास दानें देत, अनेक स्त्रीपुरुषांचे आशीर्वाद घेत व अनेक रमणीय प्रदेश पहात तो अरण्यातून मार्ग आक्रमण करू लागला. आपल्या कोसल देशापासूनच तो, स्नान, दान, तप व ध्यान करून प्रत्येक नदीचे पवित्र तीर, वने, देव व मुनि याची स्थाने, रमणीय अरण्ये, पर्वताचे कडे, मदाकिनी, चंद्रभागा, यमुना, सरस्वती, शुतुद्रु, सरयु, नर्मदा, गोदावरी, कृष्णावेणी, सिधु, इत्यादि नद्या, प्रयाग, पुष्कर, धर्मारण्य, नैमिष, गया, श्रीगिरि, केदार इत्यादि स्थाने, मानस, चक्रमसर, उत्तरमानस इत्यादि सरोवरे, अग्नितीर्थ, महातीर्थ इत्यादि तीर्थे, स्वामीकार्तिक, शालग्राम, हरीची व हराची चवसष्ट स्थाने, नानाप्रकारच्या आश्चर्यानी भरलेले चारी समुद्राचे तट, विध्य, मदर, सह्य इत्यादि पर्वत, व मोठमोठे राजर्षि, ब्रह्मर्षि, तापसी, कुलगुरु ब्राह्मण, इत्यादिकाचे पवित्र आश्रम याचे दर्शन घेत चालला. आपल्या प्रिय भ्रात्यासह त्याने सर्व पृथ्वीवर पर्यटन केले. काही काही अति रमणीय स्थळे तर त्याने दोनदोनदा पाहिलीं. आणि येणेप्रमाणे आपल्या मनाची हौस पुरी करून घेऊन बऱ्याच दिवसानी तो पुण्यशील महात्मा स्वनगरास परत आला ३.

**सर्ग ४**—येथे, तीर्थयात्रा करून परत आलेला राम स्वगृहात प्रविष्ट होऊन आपल्या पिता, माता इत्यादि सुहृदास आनदित करिता झाला, असें सागून शेवटी त्याची दिनचर्या वर्णिली आहे.

रामाच्या नगरप्रवेशसमयी अयोध्येतील लोकानी फारच मोठा उत्सव केला. पूर्णिमेच्या चद्राप्रमाणे सर्वास एकसारिखा अह्लाद देत तो आपल्या गृहात गेला. पिता, माता, गुरु, आप्त, मित्र, बाधव, ब्राह्मण, कुलवृद्ध इत्यादिकास नमस्कारादि योग्य उपचाराऱ्या योगाने त्याने सतुष्ट केलें. त्यावेळी त्या राजगृहात सर्वत्र आनद पसरला होता. हर्षाने एकमेकाशी बोलणाऱ्या सर्व जातींच्या व सर्व दर्जाच्या लोकाच्या ध्वनींनी ते भव्य गृहही त्यावेळी दुमदुमून गेलें. राम यात्रा करून सुखरूप परत आल्यामुळे राजाने आपल्या राज्यात आठ दिवस मोठा उत्सव केला. त्यानतर तो आपल्या नगरात आनदानें राहू लागला. प्रसगविशेषीं तो आपल्या मातोश्रीस, पित्यास व कधीं कधी श्रीगुरूसही यात्रेत पाहिलेले चमत्कार सागत असे. राम प्रत्यही प्रातःकाळी उठून सध्योपासनेनतर

आसनावरून उठून त्या श्रेष्ठ ब्राह्मणास सामोरा गेला. क्षात्र व ब्राह्म अशा दोन्ही प्रकारच्या तेजाने व्याप्त झालेलें त्याचे ते शरीर पाहून राजास—हा दुसरा सूर्यच आहे कीं काय—असा भ्रम झाला. त्याच्या पिकलेल्या व खाद्यावर लोळणाऱ्या जटा, त्रिकाल स्नानादि—नियमामुळें व तपश्चर्येमुळे पिंवळट दिसत होत्या व त्यामुळे तर त्याच्या शरीरास अधिकच शोभा आली होती. त्याची मुद्रा जरी अति शात दिसत होती तरी रमणीय, जरा भयप्रद, प्रसन्न, गभीर व धीर अशा तेजाने व्यापिलेल्या त्या शरीराकडे सहज पहावत नसे. त्या मुनिवर्याच्या हातांत एक कमडलु मात्र होता. असो, दुरूनच दृष्टादृष्ट होताच राजाने त्यास साष्टांग प्रणाम केला. तेव्हा त्यानेही त्यास योग्य आशीर्वाद दिला. त्यानतर वसिष्ठादि मुनीनीही त्याचे स्वागत व योग्य सत्कार केला. पुढे त्यास बरोबर घेऊन राजा सभास्थानी जाऊ लागला असता ह्मणाला, "प्रभो, आपल्या या आकस्मिक येण्याने आमच्यावर मोठाच अनुग्रह झाला आहे. आपल्या चरणकमलाच्या दर्शनाने चित्तास परमानंद होत आहे. आज आह्मी धन्य झालो." वसिष्ठादि मुनि व इतर ब्राह्मणादिही अशाच गोड गोड शब्दांनी त्याचे गौरव करू लागले. इतक्यांत ते सर्व सभास्थानीं आले, राजाने त्या अतिथीस उत्तम आसनावर बसवून वसिष्ठाच्या सागण्याप्रमाणे त्याची अर्घ्यादिकाच्या योगाने पूजा केली. विश्वामित्रानेही राजास व इतर मान्य पुरुषास कुशल प्रश्न केले व ते सर्व सभासद एक क्षणभर आनदसागरात निमग्न झाल्याप्रमाणे दिसू लागले. त्या अतिथीस थोडी विश्रांति घेऊं देऊन, राजा शातपणें हात जोडून ह्मणाला—महाराज, मरावयास टेकलेल्या माणसास अमृत मिळाले असतां, अधास नेत्र आले असतां, अपुत्रास पुत्र झाला असता, शेते वाळून जात असताना वृष्टि झाली असता व स्वप्नांत पाहिलेल्या इष्ट वस्तूचा उठल्याबरोबर प्रत्यक्ष लाभ झाला असता जसा एकाद्यास आनंद होतो तसाच आनंद आज मला आपल्या आगमनानें झाला आहे. पूर्वी राजर्षि असून तपाच्या योगाने अद्भुत ब्राह्मण्य सपादन केलेल्या आपल्या चित्तांत काम, भय, क्रोध इत्यादिकातील एकही दोष असणें शक्य नाही. पण असे असतानाही ज्याअर्थी आपण मज दीनावर अनुग्रह करण्याकरितां आला आहां त्याअर्थी "मी आपले कोणतें काम करू?" असा प्रश्न विचारल्यावांचून माझ्याने रहावत नाही. आपल्या-

सारिखें सत्पात्र मिळणे हें थोड्याशा पुण्याचें लक्षण खचित नव्हे. गंगाजलाच्या स्नानाने पवित्र व तृप्त झालेल्या पुरुषाप्रमाणे आपल्या दर्शनाने तृप्त झालेल्या माझ्या चित्तात आनंद मावत नाही. करितां आपण कोणत्या उद्देशाने या गृहास पवित्र केलेंत ते मन मोकळे करून सांगा. आपल्या सारिख्यास अदेय ( न देण्यासारिखे ) असे मजजवळ काही नाहीं. आपलें कोणतेही जरी कार्य असलें तरी ते मी केलेच आहे, असे समजून मनात कांही विचार न करिता मला सांगा. आपण माझे परम दैवत आहां, असे मी समजतो. राजाचे हे उदार भाषण ऐकून विश्वामित्र मुनि आनंदित झाला ६.

**सर्ग ७**—विश्वामित्र मुनींनी राजाच्या औदार्याची प्रशंसा करून यज्ञास विघ्ने कशी येतात ते सांगितलें व विघ्नकर्त्या राक्षसाचा वध करण्याकरिता रामास मजबरोबर पाठिव अशी याचना केली, इतका कथाभाग या सर्गात आहे.

आणि त्या राजास ह्मणाला—महाकुलात उत्पन्न झालेल्या व या श्रीवसिष्ठाच्या आज्ञेत राहणाऱ्या तुला असे बोलणे योग्यच आहे. माझ्या येण्याचा उद्देश मी सांगतो तो ऐक. हे गोब्राह्मणपालका, मी सिद्धीकरितां धर्माचरण करू लागलो की घोर राक्षस मला विघ्न करितात. मी यज्ञास आरंभ केला की ते येऊन त्याचा विध्वंस करितात. पवित्र वेदीस रक्तमांसानी भ्रष्ट करितात. एकदा दोनदाच नव्हे तर हा प्रकार अनेकदां उडला आहे. त्यामुळें अतिशय कंटाळून त्या राक्षसाधमाचा नाश करविण्याच्या हेतूने मी आज तुजकडे आलो आहे. त्यास शाप देऊन भस्म करून टाकण्याचे सामर्थ्य जरी माझ्या ठायी आहे तरी तप क्षीण होईल या भीतीने मी क्रोध करण्याचे सोडिले आहे. राजा तुला चार पुत्र आहेत. त्यातील महा बलाढ्य राम राक्षसास मारून माझ्या यज्ञाचे रक्षण करण्यास समर्थ आहे तरी त्या तुझ्या ज्येष्ठ व सोळा वर्षाच्या आतच असलेल्या बालकास माझ्या स्वाधीन कर. मी त्याचे रक्षण करीत असताना राक्षस त्यास काहीं करू शकणार नाहीत. त्या तुझ्या पुत्राचे मी इतके कल्याण करून सोडीन की त्यामुळे तो त्रिभुवनास पूज्य होईल. रामावाचून दुसरा कोणी वीर त्याचे उन्मूलन करण्यास समर्थ नाही, हे मला ठाऊक आहे. खर व दूषण याचे ते मारीचादि पापी अनुचर महाघोर व पराक्रमी आहेत. पण रामाचे बाण ते सहन करू शकणार नाहीत. वास्तव हे

राजा पुत्रमोहात  ता त्याला मजबरोबर पाठीव. माझा यज्ञ दहा दिवस चालणार आहे. तेवढ्या अवकाशात तुझ्या पुत्राने राक्षसाचा विध्वस करून माझ्या यज्ञाचे रक्षण केले की त्याचे परम कल्याण करून मी त्यास तुझ्याकडे आणून पोचवीन. धार्मिक आपल्या वचनाचे परिपालन करीत असतात. याचकाचा मनोभग करणे यासारिखे पाप नाही. मी केवल याचकच नव्हे तर या वेळी शरणार्थी होऊनही तुझ्याकडे आलो आहे. करिता तुझे वसिष्ठादि मत्रीही तुला याविषयी अनुमोदन देवोत. माझा यज्ञाचा काल निघून जाईल, असे करू नको. राजा, तू आपल्या पुत्राविषयी काही चिंता करू नको. ठेवीप्रमाणे मी त्याचे रक्षण करीन. प्रसगी थोडेसे कार्य करण्यातही मोठे उपकार होतात व प्रसग नसताना कितीही उपकार केले तरी ते व्यर्थ होतात, हे तुला ठाऊकच आहे. असे बोलून तो मुनिवर्य यावर राजा काय बोलतो, ते ऐकण्याकरिता अति उत्सुक होऊन स्वस्थ बसला इकडे राजाही त्याचे भाषण ऐकून मनात अति खिन्न झाला, व आता यास काय सागावे या विचारात पडला ७.

**सर्ग ८**—या सर्गात, स्नेहामुळे राजाने, राम युद्ध करण्यास अयोग्य आहे, असे म्हणून व रावणादि राक्षसाच्या बलाचा निर्देश करून, कसा खेद केला, त्याचे वर्णन आहे

तो राजा एक क्षणभर तर मोहित झाल्यासारिखाच झाला. पण इतक्यात धैर्य धरून दीनवाणीने गाधिजास म्हणतो—भगवन , माझ्या रामाला अजून सोळावे वर्षही लागले नाही. तो त्या भयकर राक्षसाबरोबर कसा युद्ध करील ? आपल्या यज्ञाचे रक्षण झाल्याशी काम की नाही ? त्या राक्षसाशी लढण्याकरिता एक अक्षौहिणी सेना घेऊन मी स्वत येतो. माझे सर्व शूर सैनिक त्या राक्षसाचा नाश केल्यावाचून रहाणार नाहीत. रामाला युद्धाचा मुळीच अनुभव नाही. तो त्या कपटाने लढणाऱ्या राक्षसापुढे कितिवेळ टिकणार ? त्यास शस्त्रास्त्राचा उपयोग कसा करावा, हेही अजून माहीत नाही. फुलांच्या बागातून हिंडावे, बरोबरीच्या मुलाशी खेळावे, उडया माराव्या, जलविहारादि करावे, एवढे काय ते त्याला ठाऊक. शिवाय, हे ब्रह्मन्, अलिकडे तर माझ्या दुर्भाग्यामुळे तो क्षीण होऊ लागला आहे. त्याच्या शरीरात तेज व बल 'कसे' ते मुळीच राहिले नाही. तो मनातल्या मनात एकसारिखा झुरत असतो.

कोठ जात नाहीं; येत नाहीं; काय होतें ते सांगत नाहीं. त्यास पोटभर जेवावयाचेही सामर्थ्य राहिलेलें नाहीं. अशा अवस्थेत त्यास राक्षसांशीं लढण्याकरितां नेणे, किंवा पाठविणे ही दोन्हीं कृत्ये अयोग्य आहेत. पुत्रसुखापुढे व्यवहारांतील दुसरी सर्व सुखे तुच्छ असतात. रामाचा व माझा वियोग झाल्यास मी जिवतही राहूं शकणार नाही. त्याच्या मातेची व अनुजांचीही तीच गत होईल. वृद्धावस्थेत अनेक दैवी उपाय करून मला हे चार पुत्र लाभले आहेत. त्यांतील राम तर माझा बाहेर फिरणारा प्राणच आहे. तो राक्षसाशी लढावयास गेल्यावर माझे शरीर कसे राहील? ते राक्षसही सामान्य नव्हेत. रावणाच्या आज्ञेनेंच ते तुमच्या यज्ञात विघ्न करीत असतील. रावणाने तर त्रिभुवनास त्राहि त्राहि करून सोडिले आहे. देव व गंधर्वही ज्याच्यापुढे उभे राहू शकत नाहींत त्याच्याशी किंवा त्याच्या अनुयायीशीं मी किंवा माझा पुत्र कसा लढणार? महाराज माझ्यावर हा एक मोठाच प्रसंग आला आहे. पुत्राने रोगी व्हावे, मी वृद्ध व पुत्रसुखेच्छु असावे, व इतक्यातच आपण अशी अशक्य याचना करावीत हे माझ्या दुर्भाग्याचेच फळ होय. सुबाहु व मारीच या सुंदोपसुंद–पुत्राशी लढण्याकरिता रामास पाठवावे, असे माझी मनोदेवता मला सांगत नाही. पण त्यातूनही आग्रह करून किंवा तप.सामर्थ्याने जर आपण त्यास येथून नेलेत तर मी मेलोच, असे समजावे. याप्रमाणे अति मृदु वाणीने बोलून तो रघुकुलनन्दन, काय करावे याचा निश्चय न करवल्यामुळे चिंतातुर होऊन राहिला ८.

सर्ग ९—येथे, विश्वामित्राचा कोप व वसिष्ठानीं राजास त्याचें तप व बल किती आहे ते सांगून राजाचे केलेले समाधान याचा विस्तार केला आहे

राजा दशरथाची ती दीन अवस्था पाहून व भाषण ऐकून विश्वामित्र मुनीस क्रोध आला व तो महात्मा ह्मणाला,–राजा, एकदा "करितों" असे ह्मणूंन मागून "नाही" ह्मणणें तुला शोभत नाही. तू सिंहासारिखा शूर असून असा हरिणासारखा भीरु का होतोस? रघूच्या कुलातील राजाला हे उचित नव्हे. चंद्राचे किरण कधीही उष्ण होत नाहीत. मग तुझ्याच स्वभावात असे अंतर का पडावे? अथवा मला अधिक बोलून काय करावयाचे आहे. तुला जर रामास पाठवावयाचे नसेल तर मी आल्या मार्गाने परत जातों. आपली प्रतिज्ञा पूर्ण न करिता तूं सुखी

संन्याशाप्रमाणें अथवा तपस्व्याप्रमाणें राहण्याची फार इच्छा दाखवितो. एकातस्थळीं सुद्धां तो हंसत नाहीं, गात नाहीं, कीं रडत नाहीं. तर अन्या तळ हातावर गाल टेंकून मनांतल्या मनांत काहीं चिंतन करीत बसतो. तो कोणत्याही गोष्टीचा अभिमान धरीत नाहीं; हें राज्य व गृहादि माझे आहे, असे त्याला वाटत नाहीं; व आपण राजा व्हावे हीं त्याला इच्छा नाही; सुख व दुःख या दोघांनाही तो एकसारिखेच लेखितो; त्याचे खरे हृद्गत आह्मास कळत नाहीं; तो प्रत्यही अधिक अधिक कृश होत आहे; दिवसें दिवस त्याचें शरीर निस्तेज होत आहे; प्रतिदिनी त्याची विरक्ति वाढत आहे; आपल्या ज्येष्ठ भ्रात्याची ही दशा पाहून कुमार लक्ष्मण व शत्रुघ्नही तसेच क्षीण व दीन होऊ लागले आहेत. सवक व माता यातील कोणालाही तो आपल्या या अवस्थेचे कारण सागत नाही. त्याचा ज्याच्यावर अतिविश्वास आहे, अशा एकादोघा मित्रांशी एकातात बोलतांना " प्रथम थोडेसें सुख व परिणामीं असह्य दुःख देणाऱ्या या विषयोपभोगात निमग्न होऊ नका," असे त्यास बजावून सागतो. कोणतीही उत्तम वस्तु त्याच्या पुढे आणा; तो त्याच्या नाशाचे चिंतन अगोदर करितो. " अरेरे, परमानदपदप्राप्ति करून न घेता, व्यर्थ चेष्टा करीत, प्राणी आपले आयुष्य घालवीत आहेत," असे व्यवहारात तत्पर असलेल्या लोकाकडे पाहून तो मोठ्या खेदाने पण हळुच ह्मणतो. 'राम-भद्रा, तू सार्वभौम राजा हो,' असे कोणी ह्मटल्यास तो त्याच्याकडे पाहून हसतो; "धन सर्व विपत्तींचे कारण आहे, यास्तव आपल्याजवळ जे असेल ते सत्पात्री अर्पण करा," असे तो सर्वास सागतो. " अरे, हे मूढ प्राणी, हाय हाय करून आक्रोश करीत असतात; पण विषयाविषयी विरक्त होत नाहीत, " असे ह्मणून तो विस्मित होतो. साराश राजाधिराज, राजपुत्रानें आह्मास खिन्न करून सोडलें आहे. हे जग ह्मणजे एक मिथ्या कल्पना आहे, असे तो जाणतो. शत्रु, मित्र, स्वपर, आप्त, इष्ट इत्यादिकातील कोणावरही त्याची आस्था नाही. " मला या सर्वास घेऊन काय करा-वयाचे आहे ? " असे तो नेहमी ह्मणत असतो. कौसल्यासुताची ही वृत्ति कोणी पालटूं शकेल, असे आह्मास तर वाटत नाहीं. तरी पण आपण समर्थ आहा. काही उपाय योजा. आता त्याची अधिक 'काल उपेक्षा करणे हितावह नाही १०.

**सर्ग ११—विश्वामित्राच्या आज्ञेनें रामास सभेंत आणवून राजानें त्याचें आश्वासन केलें व ' तुझ्या मानसिक व्यथेचें कारण काय ' ह्मणून त्याने व वसिष्ठ-विश्वामित्रानीं विचारिलें, असें येथे वर्णन केलें आहे.**

हें सर्व वर्तमान ऐकून विश्वामित्र मुनि ह्मणाले—राजा, असें असेल तर रामास त्वरित येथें आणीव. त्यास हा मोह आपत्तीमुळें किंवा आसक्तीमुळें झालेला नसून तो महाफल देणारा बोध आहे, असें समज. कारण विवेक व वैराग्य-संपन्न पुरुषास होणारा मोह बोधास कारण होत असतो. यास्तव त्याला मोह असे न ह्मणता बोध असेच ह्मटलें पाहिजे. तो येथें येऊ दे. आह्मी त्याचा हा मोह एका क्षणात नाहीसा करितो, पहा. मोह गेला की तो परमपदी विश्राति घेईल, व त्यामुळे अमृतपान केल्याप्रमाणें त्याच्या शरीरावर काति येईल; तो पुष्ट होईल, त्याच्या व्यवहारात सत्य आढळू लागेल; त्याची बुद्धिमत्ता प्रकट होईल, त्याच्या मनास परम समाधान होईल व त्यामुळे तो तुह्मा सर्वास पूर्वीप्रमाणेच किंबहुना त्याहून अधिक आनददायी होईल. मुनींचे हे भाषण ऐकून राजास बरे वाटले, व त्याने रामास आणण्याकरितां एकामागून एक असे अनेक दूत पाठविले. पण इतक्यात स्वतःरामच पित्याच्या दर्शनास जाण्याच्या उद्देशाने आपल्या आसनावरून उठला. आणि लक्ष्मण, शत्रुघ्न व काही सेवक यास बरोबर घेऊन पितृदर्शनार्थ निघाला. राजसभेंत प्रवेश करिताच, अनेक प्रकारच्या ऐश्वर्याने मडित झालेला राजा दशरथ त्याच्या दृष्टीं पडला व वसिष्ठ, विश्वामित्र आणि राजा दशरथ यानीही येत असलेल्या रामास दुरून पाहिले. धैर्य, शाति, औदार्य, विनय, इत्यादि सर्व दैवी गुणानी सपन्न असलेला तो तरुण बालक एकाद्या कृतकृत्य व परमानदपूर्ण निःस्पृह वृद्धाप्रमाणे दिसत होता. जवळ येताच त्याने प्रथम पित्याच्या व नतर वसिष्ठविश्वामित्राच्या चरणांवर आपले सुदर मस्तक ठेविले. ब्राह्मणास नमस्कार करून इतर सभासदाचाही त्याने यथायोग्य सत्कार केला. विश्वामित्रादिकानी आशीर्वाद दिल्यावर राजाने रामास आपल्या जवळ बसविलें व त्याच्या अगावरून हात फिरविला. रामाप्रमाणेच लक्ष्मण व शत्रुघ्न यानी सर्वास क्रमाने नमस्कार केले व तेही राजाच्या सिंहासनाजवळ बसले. काही वेळ रामाच्या मुखाकडे पाहून राजा म्हणाला, " पुत्रा, तू विवेकी आहेस व सर्व काही तुला अनुकूल आहे. मग रूक्ष मनाने खिन्न का होतोस? या

वृद्ध गुरूचे म्हणणे ऐकल्यास तुझें अकल्याण कधींही होणार नाहीं. मोह-वश होणे चांगलें नव्हे. कारण मोह म्हणजे अविवेक; त्याच्या योगानें अनेक अनर्थ प्राप्त होतात. पण जो त्याचा त्याग करितो, त्यास आपत्ति स्पर्शही करीत नाहींत. या गोष्टीचा तूं चांगला विचार कर." इतकें बोलून दशरथ स्वस्थ बसला असता मुनिवसिष्ठ जरा हंसत म्हणाले—राजपुत्रा, तूं मोठा शूर आहेस. कारण तू दुर्जय विषयशत्रूसही जिंकलें आहेस. धैर्या-वाचून शौर्य येत नाही, हेही आम्हास माहित आहे. तेव्हां स्वाभाविक धैर्य सोडून एकाद्या अज्ञाप्रमाणे तूं या मोहजालांत कसा सांपडलास ? याचें मोठे आश्चर्य वाटते. नतर विश्वामित्र रामास म्हणाले-अरे बा सत्पुरुषा, मनाचे व नेत्राचे चांचल्य सोडून, तू असा कां मोहित होत आहेस, तें सांग. उदीर ज्याप्रमाणे घरास पोखरतात त्याप्रमाणे मानसिक व्यथा तुझ्या शरीरास पोखरीत आहेत. पण त्याचे कारण काय ? तुझ्या सारख्या सद्गुणी बालकास भलतीच काहीं चिंता लागली असेल व त्यामुळे तू झुरत असशील, असे समजणे अगदीच अयोग्य आहे. यास्तव मनात कांहीं न आणतां तुझ्या चिंतेचे खरे कारण आम्हास सांग. म्हणजे हे सच्छील दाशरथे, पुनः तुला असे कष्ट होणार नाहींत; असा उपाय आम्ही योजू. विश्वामित्राचे हें भाषण ऐकून रामाच्या चित्तास जरा समाधान वाटले व त्यामुळे त्याच्या मुखावर थोडीशी आनंदाची छाया आली ११.

**सर्ग १२**—भोगांचे दुःखरूपत्व, विषयाचें असत्यत्व व संपत्तीचें अनर्थत्व याचें येथे रामानें वर्णन केलें आहे.

नतर तो सद्गुणी राजपुत्र म्हणाला—मुनिवर्य, मी या शुभ गृहात उत्पन्न झालों व या माझ्या पूज्य पित्याच्या कृपेमुळे वाढलों. गुरुकुलात वास करून मीं विद्यासपादन केली. पुढे सदाचारयुक्त होऊन मी भूमीवर यात्रा करीत हिंडलो. इतक्यांत संसारावरील आस्थेस नाहींसे करून सोडणारा हा विवेक माझ्या मनात उद्भवला भोगाविषयीं माझी बुद्धि निरस झाली. या प्रचड ससारात सुख मुळी तरी आहे काय ? प्रत्येक प्राणी मरण्याकरितां उत्पन्न होतो. कारण जो एकदा जन्म घेतो त्यास मेल्यावांचून सुटकाच नाही. जन्माबरोबर मरण त्याच्या बोकाडी येऊन बसते. प्राणी मरणास टाळण्याकरिता जरी प्रयत्न करीत राहिला तरी अखेर मृत्यूचाच जय होतो. तसेंच जो मरतो तोही पुनः

जन्म घेण्याकरितांच मरतो. कारण मरणसमयीं त्याला जरी असंख्य असह्य यातना होत असल्या तरी केलेल्या पुण्यपापांचा अभिमान त्याच्याने सोडवत नाहीं. तर मी अमुक केलें, अमुक करविलें, अमुक करावयाचें आहे, यांतून उठल्यास ते करीन इत्यादि वासनामय अहंकार त्याच्या अंतःकरणांत कायम असतो व त्यामुळें त्याने त्या जीर्ण शरीरास जरी सोडिले तरी त्याला पुनरपि जन्म घ्यावा लागतो. मरणाप्रमाणे जन्महीं असह्य दुःखदायी आहे. जन्म व मरण यांच्या मधली अवस्था (ह्मणजे जीवित काल) तरी सुखमय असेल व बऱ्याचशा सुखाकरितां थोडेसे दुःख सहन केले ह्मणून काय झालें ? अशी मनाची समजूत करून घ्यावी, तर त्या मध्य–अवस्थेत तरी सुख कोठे आहे ? शरीर असेपर्यंत एकना एक व्याधि त्याच्या मागे असतेच. आज काय मस्तकशूल उठला, उद्या ताप आला, परवा पडसे झाले, तेरवा दात दुखू लागला, दात बरा होतो आहे तो पोट बिघडले, औषधोपचारानीं ते बरे होत आहे तों घरास आग लागली, नवीन घर बांधून ससार थाटावा तो गुरांचा रोग येऊन दहा पाच गुरांचा नाश झाला, बायको मेली, तरुण मुलानें स्वर्गी प्रयाण केलें, द्रव्य चोरीस गेले, राजाचा कोप ... कांहीं आरोप आला, सारांश जिवत असे पर्यंत ऐश्वर्याच्या जोरा... गता येत नाहीं. कारण या सृष्टींतील सर्व भाव ( पदार्थ )... त्यांची स्थिति स्थिर नाहीं. ते प्राण्यास नियमाने एक सुख... दुःख तर दुःखच देत नाहींत. तर जो पदार्थ या... देत आहे तोच घटिकाभऱ्याने दुःख देतो. आज... दुःख भोगावे लागते तोच आणखीं चार दिवसानीं... तस्मात् सर्व भाव आपत्तींत पाडणारे आहेत. जग... सख्य वस्तु आहेत त्याचा परस्पर सबध कांहीं नसतो. पण ... मानसिक संकल्पाने त्यांतील कित्येकांस आपल्याशीं संबद्ध क... त्येक हे आपले नव्हेत, असे मानतो. अर्थात् प्राण्याच्या भो... होणारे हे जग मनाच्या अधीन आहे. मन तर विवेक केला अस... असल्यासारिखें भासते. पण या असत् ( अविद्यमान ) मनानेच आह्मा मूढांस अति कष्टांत पाडलें आहे. आह्मांस खरोखर कोणी विकलेलें नसतांना आह्मी विकल्याप्रमाणें परतत्र होऊन राहिलो आहों, व सर्व कांहीं

जाणत असूनही मूढ झालों आहों. या प्रपंचांतील विषयसुखलेश अति अमगल आहेत. कारण एकतर ते क्षणिक आहेत व दुसरे, दुःखास कारण होतात. पण असें असतांनाही आम्हीं व्यर्थ त्याच्या आशेत गुतून गेलो आहो. फार दिवसांनीं मला हे समजलें. आता मला राज्य काय करावयाचे आहे? भोगांपासून मला काय मिळणार? वस्तुतः मीच कोण आहे? व हे जग कां व कोठून आले? सर्वच चमत्कार आहे. हे सर्व मायामात्र आहे. मायेमुळे आह्मास ते भासते. त्यात सत्याचा लेशही नाहीं. अशा प्रकारचा विचार मनात आल्यापासून मला कांही एक नकोसे झाले आहे. हें प्रत्यक्ष दिसणारे जग व त्यातील पदार्थ पहाता पहातां नाहीसे होतात व कित्येक नवे नवेच उत्पन्न होतात. उत्पन्न झालेल्या त्या पदार्थातील काही थोडे दिवस वाचतात, काही फार दिवस रहातात पण शेवटीं ते नाहींसे होतातच. पण ही सर्व घडामोड कशी व का होतें आणि हिचा कर्ता कोण? या तीन प्रश्नांचें उत्तर मला कोणी दिल्यास मी ते लक्ष देऊन ऐकेन. या वाचून मला दुसरें काही नको. वाद्यामध्ये जसा वारा जात-येत असतो त्याप्रमाणे नाकाच्या छिद्रातून आंत जाणाऱ्या व बाहेर येणाऱ्या या जड प्राणांचीही मला गरज नाहीं. मग धनादि इतर वस्तूची काय कथा? जरा, मरण, आपत्ति, जन्म, अनर्थांचे कारण सपत्ति व हर्ष-विषाद यापासून मी कसा सुटेन? चिंतेसारिखें चित्तास जाळणारे दुसरे काही नाहीं. तथापि ज्याच्या चित्तात विवेक जागत असतो त्यास या वरील पिशाचाची बाधा होत नाहीं, हें मी समजतों, पण तो विवेक दृढ न झाल्यामुळे माझे चित्त शात होत नाही १२.

**सर्ग १३**—सर्व मूढांस प्रिय असणाऱ्या व भोग देऊन अनर्थात पाडणाऱ्या लक्ष्मीची येथें निंदा केली आहे.

मुनिवर्य या जगात लक्ष्मीचे दास जितकें दुःख भोगीत असतात तितके दुःख दुसऱ्या कोणासही होत नसेल, असें मी समजतों. पण ती बाई मनुष्यमात्रास मोहित करते. नदीच्या प्रवाहाप्रमाणे ती अविवेक्यास कल्याणापासून दूर ओढून नेते. अनेक चिंता ह्याच हिच्या कन्या आहेत, व दुष्ट आचरणाने त्या प्रत्यही वाढत असतात ही दुष्ट लक्ष्मी मनुष्यास रात्रीं सुखाने निजू देत नाहीं, दिवसां बसू देत नाही व एकाच स्थानीं फार दिवस राहू देत नाहीं. मित्रास अमित्र व शत्रूस मित्र बनविते,

परदेशास वास्तव्य भूमि व जन्मभूमीस परदेश करिते. या लक्ष्मीच्या आशेनेच मनुष्य सत्य सोडतो, विश्वासघात करितो; कपटी होतो, अन्याय व बलात्कार करितो; निर्दय होतो, व इतस्ततः धावत सुटतो. दिव्याच्या ज्योतीवरून बोट फिरविले असता तें जसे काळे होते त्याप्रमाणें या लक्ष्मीचा स्पर्श झाला असता मनुष्याचे क्षमा, औदार्य, प्रेम इत्यादि गुण जातात व त्याच्या स्वभावावर दुर्गुणाचा मळ बसतो. यास्तव अशा या रोषप्रचुर लक्ष्मीस आश्रय देणे ह्मणजे आपल्याच हातानी आपला घात करणे आहे. पण काय सागावे, महाराज, हे तत्त्व सर्वांच्याच ध्यानात येत नाही, व त्यामुळें लक्ष्मीस नसतेच महत्त्व आलें आहे. मनुष्यमात्रास अन्न, वस्त्र व निवाऱ्याचे स्थान ही अवश्य पाहिजेत. त्यावाचून त्याचे चालणारच नाहीं. ह्मणून तेवढ्या पुरते लागणारें द्रव्य जर कोणी मिळवू व साठवूं लागला तर त्यात त्याच्याकडे फारसा दोष येणार नाहीं. फारसा ह्मणण्याचे कारण असे की ज्या क्वचित् एकाद्या मनुष्याचा—ईश्वर कोणाचीही उपेक्षा करीत नाहीं; तो विश्वभर आहे. प्राणिमात्राचे रक्षण करीत असताना तो मलाच उपाशीं मारील हे संभवत नाहीं. पशु, पक्षी, कीट, पतंग इत्यादिकास जसे तो त्याचे अन्न तयार करून देतो, तसेच माझेही अन्न व समाजस्थितीस अवश्य असलेले वस्त्रादि मला देईल,—असा दृढ विश्वास असतो, तो जर एकाद्या पामरप्रमाणें द्रव्याकरिता हाय हाय करू लागला तर तो केवल दोषीच नव्हे तर महादोषी आहे, असे ह्मणावे लागेल. पण अगोदर इतका निग्रही मनुष्यच विरला व जो कोणी कोट्यावधि लोकात असा एकादा असेल तो या दोषास पात्रच होणार नाही. परतु वर सागितलेल्या तीन पदार्थावाचून इतर मौजेच्या साधनाकरिता जेव्हा मनुष्य धडपड करू लागतो तेव्हा त्याची दया आल्यावाचून रहात नाही व अशा वेळी त्याच्या हातून घडणारे दोष मर्यादेच्या बाहेर गेलेले असतात. ह्मणून खरा महादोषी तोच आहे. त्याच्या अपेक्षेने वरील पुरुष अल्प दोषीच ठरतात. प्रत्येक मनुष्य ह्मणतो की पोटाकरिता ही सगळी खटपट चालली आहे. पण हे ह्मणणे सत्यास धरून नाही. कारण केवल जाड्या भरड्या अन्नाककरिता व वस्त्राकरिताच कोणी इतकी खटपट करीत नाही. तर त्याच्या दुसऱ्या ज्या अनिवार्य आशा असतात त्या पुऱ्या करून घेण्याकरिता

तो आपल्या जीवास धोक्यांत घालूनही सुखाचें साधन ह्मणून मानलेलें द्रव्य मिळविण्याची इच्छा करितो. पण जेथें संग्रह आला तेथें सुख कोठचें? मग तो संग्रह धान्याचा असो, वस्त्राचा असो, कीं पांढऱ्या व पिंवळ्या मातीचा असो. मधाचा संग्रह करावा अशी इच्छा होतांच मधमाशाना त्या मधाचेच दास्य करावें लागतें व शेवटीं तो मधच त्यांच्या नाशास कसा कारण होतो ते सर्वांस ठाऊक आहेच. द्रव्याच्या संग्रहासच लक्ष्मी ह्मणतात. पण ती सदां एके ठिकाणी रहात नाहीं. सज्जनांची व सदाचरणी धार्मिकाची तर तिला फारच भीति वाटते. कारण ते तिला इतस्ततः धावू न देता अडकवून ठेवितात. त्यामुळे तिला फार दिवस एके ठिकाणी रहावे लागतें. दुर्गुण हे तिचे पळून जाण्याचे मार्ग आहेत. पण धार्मिक सज्जन त्या मार्गावर सद्गुणाचा पहारा ठेवितात. शस्त्रसपन्न निर्दय चोर तिला घरांतून ओढून नेतात आणि व्यसनें व विषय तिला लुटतात, हे जाणून, ते सद्गृहस्थ तिला आपल्या गृहांत पेटींत घालून ठेवित नाहींत; तर अन्नादिकास महाग झालेल्या सत्पात्रीं तिचा विनियोग करितात व व्यसन आणि विषय याना मुळीं थाराच देत नाहींत. पण अशा रीतीने चोहोकडून कोंडमारा झाला असता तिला फार क्लेश होतात. कारण एकाद्याच्या इच्छेविरुद्ध व स्वभावाविरुद्ध एकादे कृत्य घडणे, हेच त्याच्या क्लेशाचें मूळ असते. त्यामुळे एकदा तिला बाहेर पडावयास अवकाश मिळाला ह्मणजे पुन. ती असल्या लोकांच्या हाती सांपडत नाहीं. ह्मणूनच सज्जन धार्मिकास प्रायः दरिद्रात दिवस काढावे लागतात. या लक्ष्मीस भाडणे, मारामाऱ्या, उलाढाल्या, चळवळी, अन्याय, बलात्कार इत्यादिकाची फार आवड असते व या गोष्टी तर प्राण्यास दुःखी केल्यावांचून घडत नाहींत. ह्मणून मी या लक्ष्मीचा तिरस्कार करितो. बाकी ससाराचें अवश्य ते कार्य करून घेण्यापुरता हिचा योग्य उपयोग केल्यास त्यात काहीच वावगे होणार नाहीं. पण ससाराविषयी जे अत्यत विरक्त झाले आहेत, त्यास ही लक्ष्मी विषवल्लीसारखी भयकर, पाण्यावरील तरगाप्रमाणे चंचल, दुःखरूपी सर्पाची गुहा, सत्कार्याची वैरीण, भीतीचें आगर, शूरास मृत्यूच्या मुखात लोटणारी, तरवारीच्या धारेप्रमाणें तीक्ष्ण व सर्व प्रकारच्या अनर्थाचे कारण आहे, असे वाटल्यावाचून रहाणार नाही. मुनिराज, मला मोठे आश्चर्य वाटतें ते हेच कीं, हे

लक्ष्मीचे लालसी लोक, ती त्यांस वारवार लाथा मारून दूर उडवून देत असतांनाही पुनः निर्लज्ज होऊन तिच्या मागें कां धांवत सुटतात ! ! अथवा त्यात आश्चर्य तरी कसलें ! एकादी अपूर्व वस्तु पाहिली तर याचें आश्चर्य. लक्ष्मी व लक्ष्मीचे प्रेमी यांची ही धावपळ तर प्रत्यहीं, प्रतिक्षणीं, व प्रायः सर्वत्र चालली आहे. तेव्हां हीच गोष्ट खरी कीं जग बहकलें आहे; त्यास ही रमणीय वाटते; तिनें पाडलेला मोह अनिवार्य झाला आहे. त्यामुळें तिचे दोषही त्यास गुण वाटतात व ते दोष आहेत, असे कोणी सागूं लागल्यास तेंही त्यास आवडत नाही १३.

सर्ग १४—व्याधि, रोग, जरा इत्यादिकांनीं ग्रस्त व कामादिकाच्या योगाने कलुषित झालेले मूर्खांचें जीवित व यौवन याची येथे निंदा केली आहे.

असो; ज्यांची फारशी गरज नाहीं अशा विषयात आसक्त होऊन, द्रव्य हेच त्यांच्या प्राप्तीचे साधन आहे, असे समजून, पृथ्वीच्याच काहीं अंशास द्रव्य कल्पून, त्याचे मूल्य आपल्या कल्पनेनेच वाढवून, मग आसपासच्या इतर लोकाप्रमाणे श्रीमान् होण्याची मनुष्य प्राणी इच्छा करितो व त्यामुळे त्याने ह्या ससारास भयकर करून सोडले आहे. पण ही सर्व खटाटोप ज्याच्या बळावर करिता येते त्या आयुष्याची कितीशी शाश्वती आहे, ह्याचा कोणीच विचार करीत नाही. एकाद्या पानाच्या टोकावर जाऊन राहिलेल्या जलबिंदूप्रमाणे आयुष्य चपल आहे. ते अकस्मात् शरीरास सोडून जाते. ज्याचें चित्त विषयाच्या आशानी जर्जर झालेले असते व ज्यास सर्वोत्तम आत्मविवेक होत नाहीं त्यास हे आयुष्य फार क्लेश देते, व जे आत्मविवेकी आहेत; ज्यास लाभ व अलाभ सारिखेच वाटतात आणि जे ज्ञानाने कृतकृत्य होऊन शातचित्त झाले आहेत त्यास ते सुख देते. पण, हे मुने, असे भाग्यवान् जन आहेत कोठें ? प्रायः सर्व जन या देहादि वस्तूवर आस्था ठेऊन,—बस्स, शरीरास “ येन केन प्रकारेण ” सुखीं करणे यातच सर्व काहीं आहे. पुरुषार्थ पुरुषार्थ ह्मणून ज्यास ह्मणतात तो हाच. आत्मा, आत्मा, आत्मा ह्मणून ज्याच्या विषयीं शास्त्रात कंठघोष केलेला असतो, तो आत्मा ह्मणजे शरीरच. त्याचा नाश होणें यासारिखी हानि. नाही.- असे ह्मणतात व त्यामुळे केवढ्याही आयुष्यानें त्यांची तृप्ति होत नाहीं. वायूची मोट बाधण्यास, आकाशाचे तुकडे करण्यास व लाटाची माळ ओवण्यास तयार होणेही योग्य होईल

पण या अस्थिर आयुष्यावर आस्था ठेवणें योग्य होणार नाही. तें तेल संपलेल्या दिव्याप्रमाणे आहे, आहे, ह्मणेपर्यंत निघून जाते. पण त्याचा हा महा दोष ठाऊक असतानाही सर्व प्राणी व विशेषतः मनुष्य ते दीर्घ व्हावें असें इच्छितो, व दीर्घ आयुष्य सपादन करण्यांत हेतु कोणता तर—यथेच्छ दुःख भोगणे—हा. कारण काहीं थोड्याशा पुण्यवानावांचून किंवा निःस्पृह धार्मिकावाचून बाकीच्या सर्व जीवास अधिक आयुष्यांत अधिक क्लेश होणेच शक्य आहे. पण असल्या जिण्यास जिणेच ह्मणणें अयोग्य आहे. व्यर्थ आयुष्य कोण नाहीं घालवीत ? पशु व पक्षी याच्या आयुष्याचा व जिण्याचा त्यास परमार्थतः काही तरी उपयोग होतो का ? झाडे, झुडपे, माशा, मुग्या, किडे इत्यादि प्राणी आपापल्या आयुर्मर्यादे-प्रमाणे जिवत नाहीं का रहात ? पण त्यांस जिवत ह्मटल्यावर मृत कोणास ह्मणणार ? ज्याच्या शरीरात प्राणवायु नाही त्यास ? मी तर असे समजतो कीं, ज्याच्यायोगाने अवश्य प्राप्त करून घ्यावयाची वस्तु प्राप्त करून घेता येते, ज्याच्या योगाने पुनरपि शोक करावा लागत नाही व जे परम समाधानाचे स्थान असते तेच जीवित (जिणे) होय, व ज्याचे मन मनन करण्यात गुतलेले नसते, ह्मणजे विषयचितनाने विक्षिप्त झालेले नसते तोच मनुष्य जिवत आहे अर्थात् अतःकरण कामादिमलरहित झाल्यामुळे स्थिर, एकाग्र व सूक्ष्म होणे किवा कामादिकाचा त्याग करून शुद्ध वासनाच्या योगाने त्यास स्थिर करणे हेच जीवितसाफल्य आहे. या दुर्लभ मानुषयोनींत जन्म घेऊन सदाचरणादि साधनाच्या योगाने जे धन्य पुरुष पुनर्जन्माचे बीजच नाहींसे करितात, तेच जन्मास आले, असे मी समजतो. अनेक जन्माचे बी तयार करण्याकरिता उत्पन्न होणाऱ्यास मी “ जन्मास आले ” असे ह्मणत नाही. उलट त्यांचा जन्म मरण-तुल्यच आहे. अविवेक्यास शास्त्राचा, कामासक्तास ज्ञानाचा व अशात मनुष्यास मनाचा जसा भार होतो तसाच आत्म्यास न जाणणाऱ्या पामरास शरीराचा भार होतो. “ याचे कसे होईल ” ही चिता त्यास सोडीत नाही. ज्याला उत्तम बुद्धि नसते त्यास रूप, आयुष्य,

बुद्धि, अहकार व शरीराची चेष्टा हीं सर्व भारवाही पुरुषाच्या डोक्यावरील भाराप्रमाणे जड होतात. अहो, हे आयुष्य प्राण्यास विश्राति घेऊ देत नाहीं, त्याची इच्छा कधीं पूर्ण होऊ

त नाहीं; त्याच्यावर अनेक प्रकारची सकटे आणते व ते रोगांचे ारटे होऊन रहातें. जुन्या झाडास जसे किडे पोखरून टाकितात त्या‗ ।माणे दुःखे या शरीरास खिळखिळे करितात. उदरास धरून, खाऊन ाकण्याकरितां जसा बोका टपून बसतो त्याप्रमाणें या आयुष्याचा नाश करण्यास मृत्यु टपलेला असतो. अधाशी पुरुष जसें पुष्कळ अन्न खाऊन फस्त करून टाकितो त्याप्रमाणें जरा (वार्द्धक्य) आयुष्यास पचवून शरीरास क्षीण करून सोडिते. सुजन जसा दुर्जनाची संगति सोडितो त्याप्रमाणे तारुण्य थोडयाच दिवसात या दुष्ट शरीराचा त्याग करितें. कामी पुरुष जसा सुदर स्त्रीचा सदा अभिलाष करीत असतो त्याप्रमाणे कृतात या आयुष्याची इच्छा करितो. साराश आत्मोन्नति करून घेण्याकडे ज्याचा उपयोग होत नाही ते आयुष्य अति तुच्छ, गुणरहित, व क्लेशकारि होतें १४.

**सर्ग १५**—सर्व अनर्थ व ममत्व याचे मूळ जो अहकार त्याची येथे निंदा केली आहे.

मुनिराज, दुरहकार हा एक प्रबल शत्रु आहे. मला त्याचे फार भय वाटते. आत्म्याचे ज्ञान नसल्यामुळेच हा उद्भवतो व व्यर्थ याची वाढ होते. या अहकारामुळेच मनुष्याच्या हातून अनेक दोष घडतात. विषयलपट झाल्यामुळे दीनाहून दीन झालेल्या लोकास अनेक प्रकारच्या कष्टमय संसारात पाडणारा हा अहकारच आहे. याच्यामुळेच प्राण्यास शारीरिक व मानसिक दुःखे भोगावी लागतात. याच्या योगानेच मनुष्यास इच्छा होतात, या अहकाराच्याच कृपेने " माझे, माझे, " हें पिशाच किवा हा रोग मनुष्यास ग्रासतो. याच फार दिवसाच्या शत्रूच्या भयाने मी अन्न खात नाही, जल पीत नाही, व भोग भोगीत नाही. सर्व लहान मोठी सकटे याचीच बालके होत. शाति, वैराग्य, दैवी सपत्त व सर्व सद्गुण यास जाळून टाकणारा हा प्रबल अग्निच आहे. आसुर सपत्तीची उत्पत्ति याच्याच पासून होते. जगातील भाडणे, वाद, लढाया, कष्ट व बलात्कार याचे अहंकारावाचून दुसरे काहीं कारण सागता येण्या-सारिखे आहे काय? पशु, पक्षी व इतर सर्व प्राणी यामध्येही अहकार असतो. पण तो व्यक्तीच्या पलीकडे जात नाही. तो त्या त्या प्राण्यापुरतांच असतो, व त्यामुळे खानपानादि व शरीररक्षण याच्या पलिकडे त्या त्या प्राण्याची महत्त्वाकाक्षा नसते. शिवाय शरीरस्थितीस या

मला नागविले, मी या अगाध व दुस्तर संसारसागरांतून वर निघण्याकरिता एकसारखी धडपड करीत आहें; पण काय करूं? हें निर्दय मन मला वर येऊं देत नाही. बराच वेळ प्रयत्न करून कांहीं मार्ग चालून यावे तो ते असा एक हिसका देते की त्याच्यायोगानें मूळच्या स्थानाहूनही दूर जाऊन पडावे लागते. कोठेही जा व कितीही उपाय योजा, ते पिच्छा सोडीत नाहीं. मला वाटतें की स्वतः काळही त्याला हात जोडीत असेल. तें अमर आहे की काय? असाही भास होतो. समुद्रास पिऊन टाकिता येईल पण या मनाचा निग्रह करिता येणार नाहीं. हे मन आहे ह्मणूनच विषय, सुख, दुःख, इहलोक व परलोक आहे. ते क्षीण झाले की मी नाहीं, तुह्मी नाही; राज्य नाही, राजा नाहीं, प्रजा नाही; सुखदुःख नाहीं; शत्रुमित्र नाहीत, शास्त्र नाही, शास्ता गुरु नाही, बंध नाही व मोक्षही नाही. यास्तव याच्या क्षयाकरिता प्रयत्न केला पाहिजे. यद्यपि ते सामान्य प्रयत्नास यश देत नाही, तथापि विवेकबलाने त्याला क्षीण करून सोडण्याचा मी दृढ संकल्प केला आहे. या मनास जिंकण्यात जो पुरुषार्थ आहे त्याच्या सहस्रांशही इतर महत्कृत्यात, शेकडो राज्ये मिळविण्यात व अपार संपत्ति साठविण्यात तो नाहीं १६.

**सर्ग १७**—सर्व पापाच्या समूहाची जननी, दैन्य, कार्पण्य व मृत्यु देणारी आणि सर्व जगास भ्रमण करावयास लावणारी जी तृष्णा तिचे येथें वर्णन केलें आहे.

परंतु हे मन तृष्णेच्या योगाने अति पुष्ट झाले आहे. आत्म्यास आच्छादित करून व विवेकास हृदयातून हाकलून देऊन तृष्णा चित्तात प्रवेश करिते, व तेथेच तिला चिंता ही मुलगी होते. आशा व तृष्णा या सख्या बहिणीच आहेत. पण पुष्कळ वेळा त्या दोघी आहेत, असे वाटत नाही. कारण त्यांचा आकार अगदी सारखाच भासतो. ज्यांना यांची चांगली ओळख आहे तेच मात्र त्यास बरोबर ओळखू शकतात. मन, आशा, तृष्णा व चिंता या चवकडीच्या जाळ्यात सापडलेला मनुष्य घोर यातनांतून सुटेल, ही आशा करणेच व्यर्थ आहे. मी जो जो निश्चय करितो तो तो या तृष्णेच्या भीतीने पळून जातो. कारण ती त्यास जणु काय तोडीत सुटते. पाण्यात वाळलेले पान जसे तरंगत असतें; वावटळींत सुकलेली गवताची काडी जशी उडत रहाते किंवा अंतरिक्षां

मेघाची जशी तिरपिट उडते त्याप्रमाणे या तृष्णाचक्रात सांपडल्यावर माझी अवस्था होते. तृष्णा ही एक भयकर अग्निज्वालाच आहे. ती मला एकसारखी जाळीत सुटते व तो दाह अमृतानेही शांत होईलसें वाटत नाही. ही मनाच्या सहायानें मला कोठें कोठे घेऊन जाते याचा काहीं पत्ता लागत नाही. जड ह्मणजे अनात्म, ह्मणजेच आत्म्यावाचून इतर पदार्थांशींच सबध ठेवणारी ही बया रहाटगाडग्यास लाविलेल्या मोघ्याप्रमाणे जीवाकडून खालून वर व वरून खाली हेलपटे घालविते. व्यावहारिक जन बैलाच्या नाकात वेसण घालून त्यास जसे हवे तिकडे नेतात त्याप्रमाणे ही मनुष्यास किंबहुना प्राण्यास खेचून नेते. ही मज धीरासही भिवविते, डोळसासही अध करिते व सुखी आणि भाग्यवान् पुरुषासही खिन्न करिते. कोणी आनदाने राहू लागल्यास ते हिला खपत नाही. मनुष्याच्या हृदयाचे तुकडे कसे करावे हे हिला चागले अवगत आहे. हा देह जरी जरा, रोग इत्यादि निमित्तानी जर्जर व अशक्त झाला तरी ती सदा नवी तरुणीच असते. हिची कधीं तृप्ति होत नाही. आत्म्याचे अज्ञान जितके वाढत जाईल तितके हिला आपली वृद्धि करून घेण्यास फावते, अशक्य पदार्थांचीही ही पिच्छा सोडित नाहीं, सर्व गुणाची हिसा करण्यास ती सदा टपलेली असते. जगातील सर्व प्राणी या तृष्णेच्या पायीच इतके दुःख भोगीत आहेत. पण तिला सोडण्याचे धैर्य प्रायः कोणामध्ये नाही. हिच्यापुढे मोठमोठ्या शूराचे शौर्य, यतीचा निग्रह, मत्र्याचे मत्र, ज्ञानी पुरुषाचे ज्ञान, विरक्ताची विरक्ति व मानी पुरुषाचें मौन लटपटून जाते. तरवारीची धार, बाणाचे तापलेलें अग्र व यमदूताचे शूलही हिच्या इतके तीक्ष्ण नाहीत. हे महाप्राज्ञ, या पिशाचास गाडून टाकण्याचा एकादा मत्र आपणास माहित असल्यास मला सागा १७.

**सर्ग १८**—आधि, व्याधि, अनेक क्लेश, जरा, मरण, मान, तृष्णा इत्यादिकाचें आदि कारण जो क्षणभंगुर देह त्याची येथे निंदा केली आहे.

ज्याच्या स्वास्थ्याकरिता प्राण्याची एकसारखी खटपट चालते, ज्याच्या आश्रयानेच वर सागितलेली मनादि-चवकडी रहाते, ज्याच्या द्वारा अहित व हित ही दोन्ही होऊं शकतात, ज्याच्या करितांच एक प्राणी दुसऱ्या प्राण्याचे अन्याय, बलात्कार व छल सहन करितो; ज्याच्या लोभामुळेच प्राणी साहस करू शकत नाहीं, तर भिऊन रहातो, मनांत असलेलें सत्यही उघड

बोलून दाखविण्यास कचरतो; व ज्याच्या योगानेच कृतकर्मांची चागली किंवा वाईट फळे अनुभवावीं लागतात त्या देहाची तात्त्विक अवस्था काय आहे ? याचा जर विचार करूं लागलें तर आश्चर्य वाटतें. कारण वरून सुदर दिसणाऱ्या या शरीरांत काय आहे ? व आपण त्याच्याविषयीं सामान्यत: काय समजतों ? याचा विचार आश्चर्य–उत्पादकच आहे. आतडीं, नाड्या, हाडें, रक्त, मास, विष्ठा, मूत्र, कफ, लाळ, शेबूड, डोळ्यातील अश्रु व पू, कानातील मळ, घाम इत्यादि पदार्थांनी भरलेल्या या शरीराम खुळा प्राणी किती पवित्र मानतो, याचा कांहीं सुमार तरी आहे का ? हा जड गोळा प्राण्यास आपल्या आत्म्याहून, आपल्या स्वाभाविक स्वतत्रतेहून व आपल्या स्वरूपानदाहूनही शतपट किंवा सहस्रपट अथवा अनतपट प्रिय वाटावा व त्याच्या करिता त्यानीं काय पाहिजे ते पाप करण्यास तयार व्हावे यापेक्षा आणखी अधिक चमत्काराचे उदाहरण कोठे मिळणार ? सामान्य जनसमूहास हा कल्याणकर आहे की अकल्याणकर आहे ? नित्य आहे की अवश्य नाश पावणारा आहे ? जड आहे की चेतन आहे ? सुखाचे निमित्त आहे की दु:खाचे मूळ आहे ? हे जरी न समजले तरी विचारी ह्मणविणाऱ्या व ज्ञानी ह्मणून मिरविणाऱ्या आमच्या सारिख्या श्रेष्ठास का समजू नये ? हा जरी जड असला तरी आत्म्याच्या कृपेने सचेतन झाला आहे, जरी वस्तुत. मलिन असला तरी आत्मसत्तेमुळे तो अतिशुद्ध झाला आहे व आत्मोन्नति करून घेतल्यास त्याची शुद्धि याहूनही अधिक वाढेल, तो मोक्षास कारण होईल, असे ममजल्यास व त्याप्रमाणे त्याचा उपयोग केल्यास, या अमगलापासूनही केवढे मगल होणार आहे ? पण अज्ञ पुरुष अशा दृष्टीने त्याच्याकडे पहात नाहींत, आणि त्यामुळेच त्याची निंदा करावी तितकी थोडीच वाटते. ते मूर्ख या देहासच आत्मा समजतात. पण तो तर क्षणात तृप्त व क्षणात अतृप्त होणारा आहे, गुणशून्य व दोषपूर्ण आहे, उत्पन्न होऊन नाश पावणारा आहे, स्वभावत.च दु:खदायी मनाचा हस्तक आहे; अहकाराचे घर आहे, रोगाचें क्षेत्र आहे व सर्वतोपरी अनर्थकर आहे. तेव्हा, मुनिराज, मी या दुष्टाच्या नादी कसे लागावे ? त्याला तुच्छ मानिल्यावाचून माझे कल्याण कसे होईल ? या वाइटापासूनही जर कोणास आपल हित साधून घ्यावयाचे असेल व या ससारातील यातनांतून

मुटावयाचे असेल तर त्याला माझ्याप्रमाणेच शरीराची योग्यता व उपयोग ओळखला पाहिजे १८.

**सर्ग १९—अज्ञान, क्षुधा, तृषा, रोग, अशौच व चाचल्य यानीं दूषित झालेलें आणि तिर्यक्–जतू सारिखेंच असणारें बालपण कौमार कसें निंद्य आहे ते येथें सागितलें आहे.**

देह दुःखाचे मूळ आहे, असे जे मी आता सुचविलें, तें सर्वास पटणार नाहींसें वाटते. कारण प्राकृत जन प्रत्यहीं भोगाव्या लागणाऱ्या नाना प्रकारच्या यातनास सुखच मानितात. मोठासा अनर्थ ओढवल्यावाचून व " हाय, हाय " करण्याचा प्रसग येईपर्यंत आपणास दुःख होत आहे, याचे त्यास भानच नसते. अभ्यासाने विषही गोड लागते व पचनी पडते. पण अतर्दृष्टि पुरुषास काय वाटते, व सूक्ष्मदृष्टीने पाहिल्यास कोणता अनुभव येतो, ते मला सागावयाचे आहे. जन्मापूर्वी देह अदृश्य असतो, तो कोणालाही प्रत्यक्ष दिसत नाही. त्यामुळें जन्माचे वेळी व गर्भाशयांत असताना प्राण्यास कोणत्या यातना भोगाव्या लागतात व त्याचा त्यास अनुभव येतो की नाही, हे गूढ आहे. म्हणून मी जन्मानतरच्या अवस्थेचेंच अगोदर परीक्षण करितो. बाल्य ही जन्मानतरची पहिली अवस्था आहे. त्या अवस्थेत प्राण्यास दुःख होते की सुख ? सुख होते म्हणावे तर त्या अवस्थेत त्याच्या मुखावर प्रसन्नताच सतत असावयास पाहिजे होती, कारण सुखाचे मुख्य चिह्न प्रसन्नताच आहे. पण ती नसते. उलट त्याची मुद्रा घटिकेत सतरा वेळा बदलते. शिवाय असामर्थ्य, परतत्रता, तृष्णा, मुकेपणा, अविचार, इत्यादि दुःखाचीं सर्व निमित्ते त्या अवस्थेत सज्ज असतात एकाद्या लहान बालकाकडे पहात रहावे, म्हणजे त्याचा राग, लोभ, रडणे, दैन्य, इत्यादिकाचा अनुभव येतो. मला तर असे वाटते की मरण, जरा, रोग, संकट, तारुण्य इत्यादिकातील एकही अवस्था बाल्यातील दुःखाची व चिताची बरोबरी करू शकणार नाही. पशूची कृति व बालकाचे आचरण यात कांहीं अतर नसते. उजाडल्यापासून दिवस मावळेपर्यंत व जागे झाल्यापासून निजेपर्यंत प्रत्यही लहान मुलास किती वेळा व किती निरनिराळ्या कारणानी रडावे लागते, याचा काही नियम नाही. बाल्यावस्थेविषयी विचार करू लागले असता प्राण्यास पूर्वदुष्कर्माचे फळ भोगण्याकरिताच ईश्वराने

ही अवस्था निर्माण केली आहे, शांतीकरिता नव्हे, असे मनात येते. पण महर्षे, " बाल्यावस्थेसारिखें सुख नाहीं " असे सांसारिक चिंतेनें संतप्त झालेले काही लोक म्हणत असतात ! ते ऐकून मला त्यांच्या अज्ञानाचे हसू येते. आपल्या अवस्थेशीं तूलना करून पहाताना त्यास बाल्यावस्थेत सांसारिक चिंता कमी असते व त्या मानाने उद्योगही बेताचाच करावा लागतो, असे आढळतें व तेवढ्यावरूनच ते त्या अवस्थेस सुखकर समजतात. पण अन्नवस्त्रादिकाची जरी फारशी चिंता नसली तरी तेवढ्यावरून चिंतेची व दुःखाची इतर कारणें नसतातच, असे म्हणता येत नाही. कारण सुखाचे मुख्य साधन समाधान आहे. पण चंचलवृत्तीत त्याचा उदय होत नाही. बाल्यावस्थेत प्राण्याची चित्तवृत्ति दुसऱ्या कोणत्याही अवस्थेहून अधिक चंचल असते, हे कोणीही मान्य करील. तेव्हा अशा स्थितीत सुख असते, असे म्हणणे युक्त नव्हे. बरें बाल्यावस्था आरंभी जरी दुःखकर असली तरी ती उत्तरोत्तर सुखकर होत जाते, असे म्हणावे तर तेही बरोबर नाही. कारण बालक चार-पांच वर्षांचा झाला म्हणजे त्यास चालता, बोलता व आपलें दुःख सांगता येते व तो पूर्वीप्रमाणेच अति परतंत्र नसतो, हें जरी खरें आहे, तरी दुसऱ्या चिंता त्याच्या बोकांडीं बसतात. त्याला गुरुगृही जाऊन विद्या शिकावी लागते. ती न आल्यास गुरुजी ताडण करितात. शाळेंत न गेल्यास माता, पिता, बंधु व इतर जन रागावतात. खेळण्याकडे मनाचा ओढा फार असतो. पण त्यावेळी वैऱ्याप्रमाणे वाटणारी आईबापे मनमुराद खेळू देत नाहींत. त्यामुळे त्यास असह्य क्लेश होतात. वडिल माणसास काहीं तरी सांगून मार चुकवावा लागतो. पण खोटे बोलण्याचे पाप मनास कंपायमान केल्यावाचून रहात नाहीं. दैव योगाने एकाद्याची बुद्धि चांगली असली तर त्याला चांगला गुरु भेटत नाहीं; गुरु भेटला तर पालक पिता अल्पायु होतो, किंवा तो बालकच व्याधिग्रस्त होतो. सारांश कुमारावस्थाही बाल्या-इतकीच कष्टकर आहे १९.

**सर्ग २०**—लोभ, द्वेष, मद, असूया, मान व मात्सर्य यानीं दूषित व कामादि अनर्थांचें गृह अशा तारुण्याची येथें निंदा केलेली आहे.

पुढ या भयंकर प्रतिकूलतेशीं व कालाशीं झगडता झगडतां, प्राणी तारुण्य-अवस्थेस पोचतो. तारुण्याचा मद अनिवार्य असतो. तो अनेक

अपराध करवितो व त्या बरोबरच मनुष्याच्या ससारातील भावी दुःखाचे बी पेरून ठेवितो. अनेक विषयाचा लोभ, अनेक इच्छा पूर्ण करून घेण्याचे सामर्थ्य, रगेल चित्तवृत्ति व स्त्रियाविषयींची असह्य कामना याच्या योगाने तरुण पुरुष व्याकुळ होऊन जातो. अशा प्रसगी कुमारावस्थेत कष्टाने सपादन केलेल्या सद्विद्येचा चागला उपयोग होतो. पण दुर्दैवामुळे तिचा लाभ झालेला नसल्यास अज्ञान, अविवेक, दारिद्र्य, अनेक व्यसने व पशु-बल याच्या तावडीत सापडलेल्या प्राण्याची फार दैना होते. या अवस्थेतमनास आपल्या अधीन ठेवणे व सहज दोषास थारा न देणें या सारिखें परम पवित्र कृत्यच नाही. तें करणाऱ्या पुरुषास किंवा स्त्रीसच धीर हे नाव शोभते. या तारुण्यामुळे जे नष्ट होत नाहीत तेच चिरजीव होत. ही अवस्था फार दिवस रहात नाही हे खरे, पण थोड्याशा अवकाशातही ती अनर्थ करू शकते. ह्मणून मी तिचा इतका तिरस्कार करितो. अभिमानादि सर्व दोषाची यौवनावस्था ही सुपीक भूमि आहे. या प्रसगी रजोगुणाचेच प्राधान्य असते, व त्यामुळे अनेक चिता व सकल्प क्षणोक्षणी उद्भवतात. पण जे मूढ अशा या तारुण्याचे अभिनदन करितात त्यास पुढे मोठा पश्चात्ताप होतो. या यौवनरूपी अरण्यातून जे सुखाने पार पडतात तेच महात्मे या लोकी पूज्य होत, असे माझे निश्चित मत आहे. विनयादि सात्त्विक–शीलसपन्न पुरुषास त्याचे सहज व सुखाने उल्लघन करिता येते, हे खरे; पण सात्त्विक पुरुष जगामध्ये फार निपजत नाहीत. ह्मणून मी या दोषाने भरलेल्या तारुण्याची इतकी निदा करीत आहे २०.

**सर्ग २१**—पुरुषास प्रत्यक्ष नरक देणाऱ्या स्त्रियाची निदा, या सर्गात रामाने केली आहे

भगवन्, मी आताच ज्याचे वर्णन केले त्या तारुण्यामध्ये, स्त्री हा पदार्थ, अति प्रिय वाटतो. पण त्यात काय काय भरलेले असते याचा कोणी लपट पुरुष विचार करितो काय ? नाही. देहाचे वर्णन करिताना त्यातील अमगल पदार्थांचा नामनिर्देश मी केलाच आहे. पण विषयाधास विष्ठाही अमृत असल्याचा भास कसा होतो याचे—स्त्री वरील प्रेम—हे उदाहरण आहे. मासाच्या गोळ्यावर लुब्ध होणाऱ्या व आपल्या स्वार्थास विसरणाऱ्या मनुष्यास, मनुष्य हे नांव तरी कसे योजावें, ह्मणून मोठा विचार पडतो. तरुण स्त्रीच्या पुष्ट अवयवांस पाहून ज्याच्या शरीरात

मद सचार करितो व त्यामुळे जो मांसाशी क्रीडा करण्यास उद्युक्त होतो त्याचे पौरुष कितपतसें टिकते हा प्रश्नच आहे. तरी पण एवढी गोष्ट निःसशय आहे कीं स्त्री हा पदार्थ पुरुषाचा परिणामी घात करणारा आहे. कारण तो त्यास पशु बनविण्यास, त्याला नरकात लोटण्यास व त्याच्या सर्व पुरुषार्थांचा नाश करण्यास साक्षात्कारण होतो. अविचारामुळे पुरुष स्त्रीच्या नेत्र-मुखादि ज्या ज्या अवयवाकडे पाहून इतका मोहित होत असतो तो तो अवयव अनेक दोषांनी भरलेला आहे, हे त्याच्या त्यावेळी ध्यानात येत नाही. हर, हर, स्वामिन्, मोहाचे केवढे बल हे ? नव्या रक्तमासामुळे जे शरीर काल मऊ, तुळतुळित, सुदर व भोग्य वाटत होते तेच आज प्राणवायूच्या अभावी लाकडासारखे कठिण, खडबडीत, कुरूप व स्पर्श करण्यासही अयोग्य वाटते. पण यात खरे रहस्य काय आहे याचा, या मोहामुळेच मोठ्या विचारी पडितासही प्रसगी बोध होत नाही. छी', छी., धिक्कार असो या स्त्रीला ही पुरुषाची वैरीण आहे, पुरुषार्थाचा भयकर प्रतिबध आहे व दुःखाचे निमित्त आहे. मला अशा त्या स्त्रीचें दर्शनही नको. [महाराज, मी स्त्री या वस्तूचा द्वेष करितो, असे आपण समजू नये. तर स्त्री या पुरुषाच्या भोग्य पदार्थाचा मी तिरस्कार करीत आहे, असे समजावे. कारण पुरुषाप्रमाणे तीही या सृष्टींतीलच एक पदार्थ आहे व ईश्वराने निर्मिलेल्या वस्तूचा निष्कारण तिरस्कार करणे चागले नव्हे. पण तो पदार्थ पुरुषाच्या मनास विकार उत्पन्न करणारा व त्यामुळेच परिणामी दुःख देणारा असल्यामुळे त्या भोग्य वस्तूची निंदा करावी लागते. खरोखर पहाता अमुक वस्तु भोगाच्या उपयोगी आहे किंवा नाही, हे ठरविणे त्या वस्तूच्या अधीन नसते, तर तें या ठरविणाऱ्या पुरुषाच्या( भोक्त्याच्या )च हातीं असते. यास्तव भोग्य वस्तु जरी पुरुषाच्या अनर्थास कारण होत असली तरी त्यात तिचा काही एक दोष नसतो. पण आह्मा व्यवहारी लोकास आपला दोष दुसऱ्याच्या माथीं मारण्याची सवयच लागलेली असते व त्यामुळे हा असा प्रमाद घडतो. किंवा आह्मी मूर्ख आहो, हे तर ठरलेलेच आहे, पण स्त्री–इत्यादि पदार्थ आमच्या मूर्खपणाच्या अतिरेकास कारण होतात ह्मणून आह्मी त्याची इतकी निंदा करितो, असें समजावे. साराश येथील स्त्रीनिन्दा स्त्री या व्यक्तीस उद्देशून केलेली नाहीं. तर स्त्री हा एक भोग्य-

पदार्थ, या दृष्टीने तिची निंदा केलेली आहे. अर्थात् स्त्रियांच्या दृष्टीनें उलट पाहू लागल्यास पुरुषाची अशीच निंदा होणे शक्य व योग्य आहे. पण पुरुष जितक्या लवकर विषयासक्त होतो तितक्या लवकर स्त्री होत नाहीं, हे स्वभाववैचित्र्यही ध्यानात ठेवण्यासारिखे आहे असो, ] अशा या स्त्रीच्या ठायीं मुळीच आसक्त न होता मी आपला उद्धार करून घेण्याचा निश्चय केला आहे २१.

**सर्ग २२**— शोक, मोह, इष्टवियोग, क्लेश, विषाद व रोग यानीं व्याप्त असलेल्या वृद्धावस्थेची येथे निंदा केली आहे

पण तरुण स्त्री इत्यादि पदार्थाचे ठायी दोषदृष्टि न ठेवता जे त्याचा उपभोगाकडे उपयोग करितात व आपल्या तारुण्याचा दुरुपयोग करितात त्यास थोड्याच कालात जरा म्हणजे वृद्धावस्था येते ( तारुण्याचा सदुपयोग करणाऱ्या व विषयोपभोगाने शरीर क्षीण न करणाऱ्या पुरुषास व स्त्रियासही जरा येत नाही, असे नाही. जराहा देहधर्म आहे. यास्तव काही अल्पायु प्राण्यास सोडून बाकी सर्वास तिचा अनुभव घ्यावा लागतोच. पण दुराचरणी व विषयी लोकाच्या जरेचा काल व परिणाम सदाचरणी लोकाच्या जरेच्या कालाहून व परिणामाहून भिन्न असतो. बाकी कोणतीही व कोणाचीही वृद्धावस्था क्लेशकारक असते, याविषयी मतभेद होणे शक्य नाही. ) ही अवस्था देहास जर्जर, कुरूप, अशक्त व परतत्र करून सोडते. तरुण स्त्रिया वृद्ध पुरुषाकडे मोठ्या तिरस्काराने पहातात. त्याना तो पाठीस पोक आलेल्या उटासारिखा भासतो. म्हाताऱ्याची बुद्धि नाहीशी होते. वार्द्धक्यामुळे कापू लागलेल्या जीर्ण देहाकडे पाहून त्याचेच दास, पुत्र, स्त्रिया, आप्त व बाधव त्यास हसू लागतात. वृद्ध प्राणी एकाद्या दीनासारिखा निःसहाय होतो. त्याची इच्छा मात्र वाढत असते. आता काय करावे ? परलोक कसा साधेल ? अरेरे, इतके आयुष्य व्यर्थ गेले, काही पुण्यसाधन केले नाहीं, पापाचे मात्र ढीग घातले; आता माझे कसे होईल ? यमराजाचे दूत माझे हाल करतील, इत्यादि विचार व भीति ह्यांचा त्याच्या मनात प्रादुर्भाव होतो. असामर्थ्यामुळे प्रत्यही वाढणारे रोग तर त्याच्या शरीरास आंतून तोडित असतात. खरोखर तारुण्यांतील सर्व सामर्थ्यास व उत्साहास नामशेष करून टाकणारी ही जरा शत्रूसही प्राप्त होऊं नये २२.

**सर्ग २३, २४, २५—या सर्गात काल आणि त्याचे दैव, कृतांत व नियति हे भेद याचे वर्णन केलें आहे.**

मुनिराज यावरील अवस्थांचा शुद्ध चित्तानें व तात्त्विक दृष्टीने चांगला विचार केला असतां शहाण्याच्या मनात त्या अवस्थाविषयीं व जन्माविषयी वैराग्य उत्पन्न झाल्यावाचून रहात नाही. जन्म, मरण, जगातील पदार्थ व सुखदुःखभोग हा सर्व भ्रम आहे. पण प्राण्याचे संकल्प, विकल्प व मनोरथ यांच्या योगाने तो दीर्घायु व त्यामुळेच सत्य असल्यासारखा झाला आहे. सत्पुरुष मात्र त्याला चांगले ओळखून आहेत. त्यामुळेच ते विषय व देह याच्या पाशात अडकून पडत नाहीत. या भ्रमास न ओळखणारे अज्ञ आरशात दिसणाऱ्या किंवा चित्रात काढलेल्या फळाचा स्वाद घेऊ पहातात. पण त्याचा गुरु काल त्यास वठणीस आणित असतो. या सृष्टीत अशी एकही वस्तु नाहीं की, जी या कालाच्या पोटात उतरत नाहीं. हा महेश्वर सर्वास सारखाच भयंकर वाटतो. हे जेवढें ह्मणून काही दिसत आहे, ते सर्व गट्ट करून टाकण्याकरिताच तो निर्माण झाला आहे. आजपर्यंत अनंत विश्वे त्याने पचवून सोडली आहेत व यापुढेही तो अनंत विश्वास पचविणार आहे. लहान, मोठे, शूर, भीरु, पुण्यशील, पापी, राजे, रंक इत्यादि सर्व त्या सर्व भक्षकाचे भक्ष्य झाले आहेत व होत आहेत. वर्ष, युग, कल्प इत्यादि नावानी तो काहींसा प्रकट होतो, पण त्याचे रूप मुळींच अनुभवास येत नाही. तो सर्वास आपल्या वश करून घेतो. रम्य, शुभ व मेरूसारख्या भारी वस्तूचाही तो घास घेतो. हा निर्दय, कठिण, क्रूर, तीक्ष्ण, कृपण व अधम काल एका मागून एक अशा क्रमानें किंवा सर्वास एकदम गिळून टाकितो; पण त्याची तृप्ति होत नाहीं. संहाराच्या कामाचा त्याला कधीं कंटाळा येत नाहीं व तो त्यामुळें कधीं थकत नाहीं. यास नाहीसे करावें, असें कोणी मनात आणिल्यास तो अच्छेद्य व अदाह्य आहे. एका क्षणात एकाद्या वस्तूची उन्नति करून लागलाच नाश कसा करावा, याचें त्यास काहींच वाटत नाही. तो प्रत्येक पदार्थाचा परिणाम करीत राहिला आहे. सृष्टींतील सर्व क्रूरता, लोभ, दुर्भाग्य, व चापल्य त्याच्यामध्यें भरलें आहे. हा महा कृपण काळ गवताची काडी व धुळीचा कणही सोडील नाहीं. सूर्य, चंद्र इत्यादि ज्योतींस हा चेंडू [illegible] अमर्याद हें त्याचें अंगण आहे, असें सम

जल्यास सूर्यादि गोल हीं त्याचीं नाना प्रकारचीं खेळणीं आहेत, असा भास होतो. कल्पांतीं हा भयंकर राक्षसच होतो. हा कृपण, रात्र हीच जुनी केरसुणी घेऊन प्राण्याचीं आयुष्ये झाडून नेतो व पुनरपि दिवसां सूर्यरूपी दिवली हातात घेऊन कोनाकोपऱ्यात काही राहिले तर नाहीं ! म्हणून मोठ्या काळजीने हुडकतो. साराश, सर्वांचे चूर्ण करणारा हा काल, कर्ता, भोक्ता, सहर्ता, स्मर्ता, इत्यादि अनेक नावास पात्र झाला आहे. या सृष्टिरूपी अरण्यात मृगया करणारा हा कोणीएक व्याधच आहे, असा भास होतो. प्रत्येक प्राण्यास दोन काल अनुभवावे लागतात. त्यातील क्रियाकाल प्रथम येतो व फलकाल मागाहून येतो. या फलकालासच दैव ह्मणतात. फलसिद्धि हैंच त्याचे रूप आहे. या दैवरूप कालाच्या पाशात सापडून सर्व प्राणिसृष्टि क्लेश भोगीत राहिली आहे. हे विस्तीर्ण जग हीच त्याची नृत्यशाला आहे व त्यात ते (दैव) सतत नृत्य करीत असते. कृतात हे त्याचे तिसरे नाव आहे. नियति ( ह्मणजे कृतकर्माचे फल अवश्य मिळणे ) ही त्याची पत्नी असून तिच्या ठायी हा अतिशय आसक्त होतो. शेप, चंद्रकला, शुभ्र गगाप्रवाह, सूर्यादि मडले, ब्रह्माडे, ताराचक्र, सागर इत्यादि सर्व तिच्या अंगावरील भूषणें आहेत. ती आपल्या कृतातसज्ञक पतीबरोबर मोठ्या हर्षाने नानाप्रकारचे नृत्य करीत असते. कल्पातसमयी तर त्याच्या नृत्यास फारच रग चढतो. पण पुढे ती दोघेही आपले श्रमदायी नृत्य बद करितात. काही कालानतर पुन. सृष्टि-समारभ होतो व नियति पुनरपि सुदर नाच करू लागते, साराश या कालाचे वारवार तेच ते कृत्य चालते २३, २४, २५.

**सर्ग २६**—या सर्गात वैराग्य उत्पन्न व्हावे ह्मणून कालादिकाच्या अधीन असणाऱ्या या ससाराची दुर्दशा वर्णिली आहे.

तेव्हा, हे महामुने, अशाप्रकारच्या या काललीलेमध्ये माझ्या सारिख्यानी आस्था कशी ठेवावी ? या दैवादि कालभेदानी जणु काय आम्हास विकतच घेतले आहे, असे वाटते. या सृष्टिरचनेकडे पाहून आम्ही चकित होऊन रहातो. हा दुराचारी काल आह्मास आपत्तींत पाडितो; दैव आमच्या अतराल्यास होरपळून सोडतें; नियति आमचे धैर्य हरण करिते; कृतात आमच्या शरीराचा नाश करितो व निर्दय यमराज "हा आर्त आहे" असें समजून दया करीत नाहीं. गुरुराज, सर्व भूतवर्ग तुच्छ आहे, विषय भयंकर

दु ख देणारे आहेत; आयुष्य अति चपल आहे; तारुण्याची योग्यता काय आहे, याचे वर्णन मी मागे ( सर्ग २० ) केलेंच आहे, बाळपण तर अज्ञानात जातें, सर्व प्राणिवर्ग विषयचिंतनाने कलंकित झाला आहे; व इंद्रियेंच शत्रु झाले आहेत. आत्मा सत्य असतांना तो असत्य वाटतो व देह असत्य असताना तो सत्य वाटतो. मन हा शत्रु आपलाच घात करीत असतो अहंकार आपल्या स्वरूपासच काजळ फासतो; बुद्धिवृत्ति निर्जीव झाल्या आहेत, शरीराच्या क्रिया व्यर्थ होतात, मनोरथ विषयमय झाले आहेत, मन स्त्रीच्या चिंतेत पडले आहे, आत्म्याचे चमत्कार दिसेनातसे झाले आहेत, स्त्रीया दोषाचे ध्वज आहेत व सर्व पदार्थ नाशग्रस्त झाले आहेत. हे साधो, स्वभावत च प्राण्याचे अतःकरण व्याकुल होते; विषयासक्ति वाढते, वैराग्य दुर्लभ होते, दृष्टि रजोगुणाने आच्छादित होते, अविवेक वाढतो, सत्त्वगुण पारखा होतो व आत्मतत्त्व तर अत्यंत दूर होते. जीवन अस्थिर ठरते, मरण जवळ आले आहे, असें वाटू लागते, धैर्य सुटतें, स्वल्प फल देणाऱ्या वस्तूवर प्रेम बसतें व बुद्धि मूर्ख होते, हे खरे, पण शरीरादि सर्व अनित्य आहे व प्रसंगीं कोणी कोणाचा नाही, हे विवेकाने चागले समजते. मुनिराज, पर्वत, नद्या, पृथ्वी, सूर्य, चंद्र, तारागण, सिद्ध, गंधर्व, देव, दानव, यम, शुक्र, वायु, ब्रह्मा, विष्णु, महेश, शंकर इत्यादि महा वस्तूचाही जेथे चूर होऊन जातो तेथे माझी किंवा माझ्या सारख्या दुसऱ्या क्षुद्राची काय कथा ? ज्याचा शब्द कधी ऐकू येत नाही, ज्याच्या विषयीं काही बोलता येत नाही, जे कधीं दिसत नाही व ज्याला आकार नाहीं अशा कोणत्याशा एका भ्रमदायी तत्त्वानें ही सर्व भुवने खोटीच रचिली आहेत; व त्यात अहंकाररूपाने राहून तेच तत्त्व सर्वांचे नियमन करितें. त्यानें ज्यास आपल्या वश करून घेतले नाही, असा एकही पदार्थ या त्रिभुवनात नाही. सूर्य, भूलोक, वायु, देव, असुर, मनुष्यें इत्यादि सर्वांस ते तत्त्व आपापल्या कामात नियुक्त करितें व त्याच्याकडून सर्व कर्मे बरोबर करवून घेतें. सर्व 'मी, मी' ह्मणणाऱ्यांनीं त्या सर्व शक्तिमानापुढें हात टेंकिले आहेत. या जीवस्थितींतील अनर्थांचें किती वर्णन करावें. सर्वत्र असुख पसरलें आहे. पण अज्ञ प्राण्यास हें समजत नाहीं; व त्यामुळें तो आज हा उत्सव आला; उद्या यात्रा आहे; हे आमचे आप्त आहेत; हे वैरी

आहेत; हा इष्ट पदार्थ आहे; हा अनिष्ट आहे; इत्यादि उगीच अनेक कल्पना करून त्यातच मग्न होऊन रहातो २६.

**सर्ग २७**—मोक्षाच्या विरोधी असलेल्या सर्व वस्तूंतील दोषाचे वर्णन, वैराग्य उत्पन्न व्हावे ह्मणून, येथे पुन केलें आहे.

महाराज, दुसरे असे की, या जगात मनास विश्राति देईल असे काही नाही. प्रत्येक वस्तु तृष्णेच्या द्वारा सताप देते. तृष्णा व समाधान याचे वैर आहे. त्यामुळे जेथे तृष्णा असते तेथे समाधानाचे नावही घ्यावयास नको, व समाधानाच्या अभावी सुखाचा लेशही प्राप्त होणे अति दुर्घट आहे. मोठमोठ्या लढाया करून, अनेक शत्रूस पादाक्रात करणारास मी शूर समजत नाही, तर देह, इद्रिये व मन यास आपल्या अधीन ठेवणारास मी शूर समजतो. पण अशा प्रकारचा शूर या जगात क्वचित् निपजतो. कारण देहादिकास आधीन ठेवण्याचे वैराग्यादि उपाय सुलभ नाहीत. सामान्य जन तर कर्मासारिख्या बाह्य उपायानीच ही मोठी मजल मारण्याची आशा करितात पण कर्मानुष्ठानाच्या योगाने सकाम कर्मठाच्या चित्तास विश्राति मिळत नाही कीर्तीच्या योगाने जग, प्रतापाच्या योगाने दश दिशा, सपत्तीच्या योगाने याचकाचे गृह व क्षमा, विनय, औदार्य इत्यादि सात्त्विक गुणाच्या योगाने सपत्ति जे भरून सोडितात ( सुशोभित करितात ) ते महात्मे सुलभ नव्हेत. कारण कीर्ति, प्रताप, दातृत्व व क्षमाविनयादि वस्तूच अलभ्य आहेत, व अशा अल्पफलदायी वस्तूही जर दुर्लभ्य झाल्या आहेत तर मग परम फलदायी मोक्षाविषयी काय सागावे? प्राणी कितीही जरी एकातात जाऊन लपून बसला, तरी त्याच्या भाग्याप्रमाणे, आपत्ति व ऐश्वर्य त्यास हुडकून काढितात. आरभी पुत्रादि सर्व विषय आनददायी वाटतात खरे, पण परिणामी तेच महा शत्रु होतात. अत—समयी, सर्व पापाचरणाचे स्मरण होते व धर्माचरण न केल्याविषयी मोठा पश्चात्ताप होतो काम व अर्थ याचे सपादन करण्यातच सर्व काल गेल्यामुळे धर्माचरणास अवकाशच रहात नाहीं. अथवा प्रत्यक्ष सुख देणाऱ्या या कामार्थापुढे अप्रत्यक्ष, परपरेने किवा मरणोत्तर सुख देणाऱ्या, धर्माची योग्यताच मनुष्याच्या ध्यानात येत नाहीं. तेव्हा त्याच्या चित्तास समाधान कोठून व कसें होणार? अगोदर हीं कर्तव्ये करू या; मग ही करू; पुढे या कर्तव्याची

पाळी येईल, अशा मनोरथांमध्यें व तदनुरूप कर्मामध्येच मनुष्याचा काळ जातो. स्त्री व इतर जन याचें मनोरंजन करण्यांतच आयुष्य सपते. वृक्षास पाने येतात व काहीं दिवसानी ती पिकून गळून पडतात. त्याच-प्रमाणे आत्मविवेकशून्य प्राणी जन्म घेतात व काहीं कालाने फुकट मरून जातात. सर्व दिवस इकडून तिकडून फिरून सायकाळी पुरुष घरी येतो व विवेकी लोकाचा समागम व सत्कर्म यांचा गधही लावून न घेता, निजून आयुष्याचा प्रत्येक दिवस घालवितो. शत्रूंचा नाश करून आणि संपत्ति व इतर सुखसाधने मिळवून आता सुखोपभोग घ्यावा, असे जो तो ह्मणत आहे तोच काळ त्यास उचलून नेतो तात्पर्य जीवाला कष्ट देऊन द्रव्यादि पदार्थ जरी मिळविले तरी त्याचा उपभोग घ्यावयास मिळत नाही. मृत्यूच्या तोडातील भक्ष्य घास होण्याकरिताच प्राणी शरीरास पोशीत असतो हे सर्व पुत्रमित्रादि प्राणी कोठून तरी येतात, कोठे तरी जातात, काही तरी करितात व काही तरी होते मनुष्याचा एकही नियम चालत नाही. ससारात निर्दोष दृष्टि कोठे आहे? दु खरहित स्थळ कोठे आहे? शाश्वत वस्तु कोठे आहे? व कपटरहित कर्म कोणते आहे? साराश कितीही जरी विचार केला, तरी या सृष्टीत पाच भूताचाच सर्व प्रपच आढळतो. हे जग विकारमय आहे, हे असत्य आहे व यात सर्वत्र दु:ख भरले आहे. ऐहिक भोगाचा काहीसा चमत्कार आहे, हे खरे, पण त्या चम-त्काराच्या मागें लागल्यास आत्म्याचें भानही नाहीसे होते. कड्यावर किंवा विहिरीच्या काटावर उगवलेले हिरवे गवत पाहून लोभाने ते खाण्या-करिता पुढे गेलेला पशु जसा त्या कड्यावरून किवा विहिरीच्या काटा-वरून खाली पडून मरतो, तशीच या विषयासक्त लोभी पुरुषाची स्थिति होते. धार्मिक जन कोठें कोठे आढळतात. त्याचा अगदीच अभाव नसतो. पण विवेकी जन प्राय: दुर्लभ असतात. कारण परिणामी भयकर असलेलीं कर्मे प्रत्यही करविणाऱ्या या जड दैवानें सर्व प्राण्याची दुर्दशा करून सोडली आहे. हर ! हर ! केवढा चमत्कार हा ! ! २७.

**सर्ग २८–३१**—येथें सर्व भोग्य पदार्थाविषयी वैराग्य उत्पन्न व्हावें ह्मणून सर्व पदार्थ भ्रामक आहेत, असे वर्णन करून सर्व पदार्थामध्यें दोष आहेत. असें जाणूनच मी त्याविषयीं विरक्त झालों आहे. यास्तव मला आतां शाति प्राप्त होईल असा उपदेश करा; अशी प्रार्थना केल्यावर रामानें आनदपदप्राप्तीचा उपाय विचारिला आहे.

अहो सिद्ध, मी आता आपला निश्चय थोडक्यात सागतो. अस्थिर भोगाची मला गरज नाही. क्षणोक्षणीं बदलणाऱ्या वस्तूवर विश्वास टेवणे शुद्ध वेडेपण आहे. राजाचा रंक व रंकाचा राजा होतो, नगराचे अरण्य व अरण्याचे नगर होते, आज तेजस्वी असतो तो उद्या निस्तेज होतो व जो निस्तेज असतो तो सतेज होतो. जेथे अगाध जल असते तेथे कोरडी ठणठणीत भूमि होते, अपवित्र स्थल पवित्र भूमि होते व पवित्र भूमि काही दिवसानीं अमगळ स्थळ होते, इत्यादि गोष्टीचा विचार केल्यावर माझे मन ससारात आसक्त होत नाहीं. माझे ह्मणणें आपणास पटत नसेल तर आपण मला या जगातील एकादी तरी वस्तु काही काळ एकसारखी रहाणारी दाखवा. कालाच्या या खेळास पाहून मी कटाळलो आहे. मी जितका अधिक विचार करू लागतो तितकी माझी विरक्ति दृढ होत जाते मला सुदर उपवन पहावेसें वाटत नाही, स्त्रियाशी पशूप्रमाणे व्यवहार करीत रहावे, असे मनात येत नाही व द्रव्याची आशा मला हर्ष देत नाही. मला एकात पाहिजे. माझें चित्त शात कसे होईल ? ही विवचना मी करीत आहे. मरण व जीवित या दोन्ही अवस्था मला एकसारख्याच वाटतात. मी हल्लीं जसा आहे, तसाच आमृत्यु राहणार. मला राज्य नको, भोग नकोत, ऐश्वर्य नको व क्षणिक सुख नको. कारण माझा सर्व अहकार नाहीसा झाला आहे. त्यामुळे हे विषय मला विषासारिखे भयकर वाटतात. इंद्रिये हीच दावी आहेत. त्यातून आपणास सोडवून घेण्यातच मोठा पुरुषार्थ आहे. हे मुनींद्र, स्वच्छ बुद्धीने चित्ताची चिकित्सा करण्यास हाच अनुकूल काल आहे. यास्तव, भो भगवन्, आत्मज्ञाप्रमाणे मी शोक, भय व आयास यानी रहित कसा होईन, मला सागा. वासनासमूह, दुःख, तृष्णा, अभिमान इत्यादिकास निर्माण करणारे अज्ञान मला व्याकुळ करीत आहे. त्याचे परिणाम करवताप्रमाणे मला असह्य वाटतात. मी कोणत्या विज्ञानदीपाने यास नाहीसे करू, ते मला सागा. सज्जनाच्या समागमाने व त्याच्या उपदेशाने ज्याचा नाश होत नाही अशा व्याधिच या सृष्टीत नाहीत, हे मला माहीत आहे. पण कृपानिधे, माझे मन एकसारखे भ्रमण करीत आहे; मला काही सुचत नाही, ससारभयामुळे माझे शरीर कांपत आहे; संतोष पार नाहीसा झाला, अंतःकरणांत अनत विकल्प उठत आहेत. व नेत्रादि इंद्रिये

फार दिवसाच्या परिचित विषयास सोडून परत फिरत नाहींत. आता मी काय करूं ? मला आपल्यावाचून कोणाचा आधार नाही. शोकशून्य निरुपद्रव व नित्य स्थान कोणतें ते मला सांगा. सर्व व्यवहार व सर्व लौकिक-शास्त्रीय कर्में करीत असतांना जनकादि तत्त्ववेत्ते उत्तम अवस्थेस कसे प्राप्त झाले ? संसारांत राहून त्यांतील पुण्यपापरूप मळानें पुरुष मळिन कसा होत नाही ? कोणत्या दृष्टीचा आश्रय केल्यामुळे आपण निष्पाप झालां, व आतां या लोकीं जीवन्मुक्त महाशय होऊन राहिलां आहां ? विषय अनुकूल कसे होतात ? क्षणभंगुर वैभव शुभ कसें होतें ? मोहानें कलु-पित केलेली व कामादि कलकानें भरलेली बुद्धि प्रसन्न कशी होते. संसा-रांत यथेच्छ व्यवहार करीत असतांना मनुष्य बद्ध कसा होत नाही ? पर दुःखास स्वदुःख मानणारा व स्वदुःखास तृणासारिखें गणणारा पुरुष उत्तमतेस प्राप्त होतो, हे मला ठाऊक आहे. पण कोणत्या महापुरुषाचें स्मरण केले असतां दुःख सह्य होतें, कल्याण कशांत आहे ? उचित फल कोणतें ? या संसारांत कसें वागावें ? कोणती वस्तु संग्राह्य आहे व त्याज्य काय आहे ? आनंद कसा होईल ? निजसुखाचा लाभ करून देणारा दिव्य मंत्र कोणता ? सारांश, मी कृतकृत्य होऊन या शोकांतून कसा पार पडेन, ते मला सांगा. आपण संत व तत्त्वज्ञ महात्मे आहां. यास्तव मला उपदेश द्या. निर्जन अरण्यांत निर्बल प्राण्यास हिंस्र पशु जसे चोहोंकडून तोडितात त्याप्रमाणे आत्मानंदरहित अशा या दीनाला विकल्प तोडीत आहेत. सर्व अनर्थ करणारें मन क्षीण कसें होईल ? को-णत्या युक्तीनें त्यास आपलेसें करून घेतां येणें शक्य आहे, ते मला अगो-दर सांगा. कारण मन शांत झाल्यावाचून काहीएक होणार नाही, हे मला ठाऊक आहे. करितां माझा मोह घालवून साधूंची आनंदी-स्थिति मला प्राप्त करून देण्याकरितां कांही उपाय सांगा. अशी जर एकादी युक्ति नसेल व ती असूनही मला कोणी न सांगेल तर मी सर्वस्वाचा त्याग करणार! अहंकार तर पूर्वीच सोडिला आहे. आतां राहिलेले अन्न, पान, वस्त्र, आभरण, स्नान, दान, शयन इत्यादिकही सोडणार. मला संपत्ति व आपत्ति भिन्न वाटतच नाहींत. मुनिराज, देहत्यागावाचून दुसरा उपायच नाही. निःशंक, निर्मम व निर्मत्सर होऊन, आणि मौन धारण करून चित्राप्रमाणें निश्चल रहावें, असा माझा निश्चय झाला आहे. कांहीं काळानें श्वासोच्छ्वासही सोडून मी या अनर्थकर शरीरास फेकून देईन.

माझें कोणी नाही व मी कोणाचा नाहीं. तैलरहित दीपाप्रमाणें मी शात होणार. याप्रमाणे बोलून दशरथसुत रामचद्र स्वस्थ बसला. २८–३१.

**सर्ग ३२, ३३**—या सर्गात, रामाचें भाषण ऐकणारास आश्चर्य वाटलें; देवादिकांनीं आनदाने पुष्पवृष्टि केली; सर्व आकाशगामी सिद्ध दशरथाच्या सभेंत उतरले व उचित स्थानी बसल्यावर त्यानीं रामाच्या भाषणाची प्रशसा केली. इतका कथाभाग आला आहे.

त्या राजकुमाराचे हें प्रवाहासारखे चाललेलें भाषण ऐकून सभेतील सर्व लोक आश्चर्यचकित झाले. त्याना हर्ष झाला. त्यान्या अगावर रोमाच आले. वसिष्ठविश्वामित्रादि मुनि, जयत–धृष्टि, इत्यादि मत्री, दशरथ व इतर राजे, अयोध्यावासी जन, माडलिक राजाचे पुत्र, वेदवेत्ते ब्राह्मण, सेवक वर्ग, पिजऱ्यातील पक्षी, खेळावयाचे हरिणादि पशु, घोडे, जाळीच्या पडद्यात बसलेल्या कौसल्यादि स्त्रिया व तेथील इतर सर्व प्राणिमात्र यानी दुसरे सर्व व्यापार सोडून, डोळ्याचीं पातीही न हालविता व श्वास मोठ्याने न सोडता चित्राप्रमाणे निश्चल होऊन ते मनोहर व मोहनाशक भाषण ऐकले. आकाशातून फिरणाऱ्या सिद्धादिकानींही ती उदार वाणी ऐकली. रामाचे भाषण सपताच आनदित झालेल्या विद्याधरादिकानी त्या भाग्यवान् कौसल्यानदनावर पुष्पवृष्टि केली. सभेतील लोक तोंडे वर करून पुष्पवृष्टि कोण करीत आहे, ह्मणून पाहू लागले. पण त्यास कोणी दिसले नाही अलौकिक पुष्पानी ते सभास्थान मात्र भरून गेले. हा चमत्कार पाहून तर त्याच्या आश्चर्यास सीमाच राहिली नाही. याप्रमाणे अर्धी घटिका वृष्टि होऊन, ती शात झाली असता, सभेतील लोकास हे पुढिल आलाप ऐकू आले. आम्ही सिद्धगण आज जवळ जवळ कल्पभर या अंतरिक्षात चोहोकडे फिरत आहों, पण असलें, कर्णास तृप्त करणारे भाषण आजपर्यंत आमच्या कानावर कधीं आले नाही. रघुकुलातील या रमणीय बालकाने विरक्त मनाने उच्चारलेली ही वाणी बृहस्पतीसही बोलता येणार नाही. खरोखर आमचे महद्भाग्य उदयास आल्यामुळेच आम्हास हे वागमृत प्राप्त झाले. रामाच्या या सतोष देणाऱ्या वाणीने आम्हास एकदम बोध झाला. वसिष्ठादी महर्षि राघवाच्या पवित्र प्रश्नाचा निर्णय करतील व तो ऐकणे अति अवश्य आहे. यास्तव अहो नारद, व्यास, पुलह, इत्यादि मुनिवर्य, सर्व मुनिसघास घेऊन सत्वर

या. आपण आज दशरथाच्या सुदर सभेस भूषित करू या: आकाशचरांचे हे भाषण सपत आहे तोच अतरिक्षातून मुनीची परपरा उतरली त्यात सर्वांच्या अग्रभागी नारद होते व शेवटी व्यास होते. भृगु, अगिरा, पुलस्त्य च्यवन, उद्दालक, इत्यादि तेजःपुज मुनीची त्या सभेत दाटी झाली प्रत्येक मनीच्या अगावर मृगचर्म, एका हातात स्मरणी व दुसऱ्या हातात कमडलु होता. ते मुनि, हारातील मौतिकाप्रमाणे किवा गुरु-शुक्रादि ग्रहाप्रमाणे एकमेकास सुशोभित करीत होते. हा सर्व मुनिसघ भूतळी उतरला असता दशरथाची सर्व सभा एकदम उठून उभी राहिली. त्यावेळी ते स्थान नभश्चर व भूचर भाग्यवानाच्या योगाने भरून गेले. सर्वाचा मुखकमले आनदाने प्रफुल्लित झाली. दड, कमडलु, स्मरण्या, भस्म, जटा, चर्मे, माळा, वल्कले, पादुका इत्यादि धारण केलेल्या त्या ऋषींच्या पक्तीचे वसिष्ठ व विश्वामित्र या महिर्षींनी स्वागत केले. राजाने अर्घ्य, पाद्य, इत्यादि उपचारानीं क्रमाने त्या सर्वांचे पूजन केले व करविले. परस्पर कुशल प्रश्न विचारिले व सर्व सभा पूर्ववत् स्थिर झाली. रामाने सर्व दिव्य मुनीस नमस्कार करिताच ते सर्वही धन्यवाद देऊन त्याची स्तुति करू लागले. सर्वांस नमस्कार केल्यावर राम विश्वामित्र, वसिष्ठ, वामदेव, नारद, व्यास, मरीचि, दुर्वासा, अगिरा इत्यादि श्रेष्ठ मुनी जेथे बसले होते, तेथे जाऊन नम्रपणे मस्तक लववून बसला. तेव्हा त्याच्याकडे पाहून ते सर्व वेदवेत्ते ज्ञानी महात्मे म्हणाले, “ या बालकाने रमणीय व अति हितकर भाषण केले. त्यात उत्तम वाणीचे सर्व गुण होते. ऐकणाऱ्याच्या चित्तवृत्ति तल्लीन होऊन गेल्या होत्या. शेकडो मनुष्यातील एकाद्यासच आपल्या मनातील भाव वाणीने व्यक्त करिता येतो. रामा, तुजवाचून अशी अस्खलित व वैराग्यरसाने भरलेली वाणी उच्चारण्यास दुसरा कोण समर्थ होणार ? त्यातूनही परमार्थाविषयीं बोलणारे वक्ते क्वचित्च आढळतात. आत्म्याच्या स्वरूपाकडे तिचा ओघ वळणे हे तर दुर्घटच होऊन राहिले आहे. मोठमोठे विचारीही रक्तमासादिमलिन धातूच्या या गोळ्यास आत्मा समजून त्याच्या उपासनेत आपले आयुष्य घालवितात, आणि त्यामुळें जन्म, मृत्यु, जरा, आधि व व्याधि याच्या परपरेत पडतात. अहो, हे मूर्ख ससाराविषयीं विचार करीत नाहीत. पशूप्रमाणें जन्माचे जन्म व्यर्थ घालवितात. रामा, तुजसारखा सत्पुरुष क्वचित् एकादाच निपजतो. कांटेरीं झाडे हवीं तेथे व हवीं तितकी

उगवतात, व त्याची जोपासना कोणी न केली तरी ती आपोआप वाढतात. पण उत्तम आम्रवृक्ष, चदन इत्यादि जेथे तेथे उगवत नाहींत व उगवले तरी पुष्कळ जोपासनेनेही फळास येत नाहीत. या ससारातील सार अति दुर्लभ आहे. त्याच्या प्राप्तीकरिता जे यशस्वी व बुद्धिसपन्न सत्पुरुप प्रयत्न करितात ते धन्य होत. दशरथनदना, तुजसारखा उदार व विवेकी पुरुप आजपर्यंत कोणी झाला नाही व पुढेही होईल की नाही, याची शका आहे. असो, हे मुनिवर्य, आता सर्वांच्या चित्तास आनद देणाऱ्या व विनयादि गुणानी परिपूर्ण असलेल्या या रामचद्राच्या प्रश्नाचे उत्तर देऊन आह्मास त्याच्या चित्ताचे समाधान केले पाहिजे, आणि हे सत्कार्य जर आमच्या हातून झाले नाही, तर आमचे ज्ञान व सिद्धि व्यर्थ आहेत, असे होईल." ३२, ३३.

इति श्रीमच्छकराचार्यभक्तविष्णुकृत बृहद्योगवासिष्ठसारातील पहिले वैराग्यप्रकरण समाप्त झाले.

## अथ २ मुमुक्षुव्यवहारप्रकरणम् ।

**सर्ग १**—शुकाचार्यास आपल्यापाशी विचार केल्यानेंच तत्त्वज्ञान झाले पण त्याचा त्यावर विश्वास बसेना, ह्मणून त्याना पित्यास विचारिले. त्यानेंही तसेच सांगितलें. पण त्यावरही विश्वास बसेना; ह्मणून ते जनकाकडे गेले व त्यानेही तसेच सांगितल्यावर त्याच चित्त सत्त्वात लीन झाले; इतका कथाभाग या सर्गात आहे

श्रीगणेशाय नम । श्रीसरस्वत्यै नम । श्रीमच्छकराचार्यचरणारविंदाभ्या नमः । श्रीवाल्मीकि ह्मणतात —याप्रमाणे त्या सभेत आलेल्या श्रेष्ठ पुरुषानी मोठ्या धीर व गभीर वाणीनें सर्व मुनीस उद्देशून भाषण केले असता विश्वामित्र मुनि पुढे बसलेल्या रामास मोठ्या प्रेमाने ह्मणाले—हे ज्ञानी पुरुषातील श्रेष्ठा, तुला जाणावयाचे असे काही राहिलेले नाही. आपल्या अलौकिक सूक्ष्म बुद्धीनेच तू सर्व रहस्य जाणले आहेस. अविश्वास, सदेह इत्यादि दोषामुळे तुझ्या बुद्धीवर जो थोडासा मळ बसला आहे, तेवढा मात्र आतां काढून टाकिला पाहिजे. कारण त्यामुळेच सच्चिदानद परमात्म्यास जाणूनही तुझ्या चित्तास समाधान होत नाही.

पूर्व कल्पातील द्वापर युगाच्या अंती झालेल्या व्यासपुत्र शुकाप्रमाणे तुझ्या चित्तास आता केवळ विश्रांतीचीच अपेक्षा आहे.

श्रीराम-भगवन् व्यासपुत्रास तत्त्वज्ञान झालें असून त्याच्या चित्तास समाधान का झाले नाही? व ते पुढे कसे झाले? ते मला सांगा.

विश्वामित्र-रामचंद्रा, तुझ्या वृत्तांताप्रमाणेच शुकाचाही वृत्तांत आहे. मी तो तुला सांगतो, ऐक. तुझ्या पित्याच्या बाजूस सुवर्णाच्या आसनावर जो हा कृष्णवर्ण मुनि बसला आहे त्यासच व्यास ह्मणतात यास शुक नामक ज्ञानी पुत्र झाला या संसारस्थितीचा विचार करिता करिता त्याच्या चित्तातही असाच विवेक उद्भवला. त्या महाबुद्धिमानाने आपल्याशींच विचार करून तत्त्वनिश्चय केला. त्याला सत्यप्राप्ति झाली. पण पर वस्तूचा लाभ झाला तरी, त्यामुळे त्याचे चित्त स्थिर व शांत होईना. व-मला जे तत्त्व समजले आहे, तेच सत्य आहे-असा त्यास विश्वास येईना. तत्त्वविचारामुळे इतके मात्र झाले की, त्याची विषयासक्ति पार नाहींशी झाली. भोगाविषयी तो अत्यंत विरक्त झाला असो, एकदा तो महात्मा मेरु पर्वतावर एकांतात बसलेल्या आपल्या पित्याजवळ गेला व त्यास मोठ्या भक्तीने ह्मणाला-प्रभो, संसाराची ही खोटी रचना कशी झाली? याचा लय केव्हा व कसा होणार? ही केवढी मोठी आहे? हिला उत्पन्न होऊन किती दिवस झाले? व हा संसार कोणाचा? देहाचा, की इंद्रियाचा, की मनाचा, की प्राणाचा, कीं या सर्वांच्या समूहाचा? अथवा याहून निराळ्याच कोणाचा? आपल्या प्रिय बाळकाचा हा सर्वोत्तम प्रश्न ऐकून त्या धन्य पित्यास फार आनंद वाटला. व त्या ज्ञानी व्यासाने शुकास सर्व तत्त्वार्थ सांगितला. तो ऐकून शुक ह्मणाला "हे तर मी पूर्वीच समजलो होतो आपण यापेक्षा काही निराळेच सांगाल, या आशेने मी आपल्या जवळ आलो." पुत्राचे हे शब्द कानीं पडताच अनुभवी व्यासाने-याचे समाधान अज्ञाने होणार नाही याला चांगलाच अनुभव आला पाहिजे-असे जाणले व त्यास उलट ह्मटले, "बाळा, मी बरोबर जाणत नाही भूलोकी मिथिलानगरात जनक या नावाचा राजा आहे. तो हे तत्त्व चांगले जाणतो. त्याच्याकडे तू जा, ह्मणजे तुझे समाधान होईल पित्याचे हे ह्मणणे ऐकून शुक जनकाकडे गेला त्या विदेहाधिपतीच्या द्वारपालांनी शुकाचे आगमन त्यास कळविले. पण त्याची परीक्षा पहाण्या-

कारिता " बरे आहे, आला तर येऊ दे, " इतकेच बोलून जनक मुकाट्याने बसला. सात दिवस त्याने त्याची विचारपूस केली नाहीं. आठव्या दिवशीं त्याने त्यास अगण्यात येण्यास सांगितले तेथेही तो व्यासपुत्र गंभीर मनाने सात दिवस राहिला. त्यानंतर जनकाने त्यास अंतःपुरात पाठविले. त्या सुंदर व तरुण व्याससुतास तेथे तरुण व सुंदर स्त्रियांच्या हातून नानाप्रकारचे भोजन घातले व अनेक मनोहर भोग्य पदार्थ देवविले. पण ते भोग व पहिल्या चवदा दिवसात झालेले ते कष्ट यातील एकानेही त्याच्या मनास विकारयुक्त केले नाही ते पर्वताप्रमाणे अचल होते. सर्व प्रसंगी मौन धरून तो प्रसन्न चित्ताने राहिला. हा त्याचा प्रभाव पाहून जनकास आनंद झाला. त्याने त्या पूर्ण चंद्राप्रमाणे आपल्या तेजाने आल्हाद देणाऱ्या ब्राह्मणास जवळ आणविले व मनोभावाने वंदन केले, आणि " हे दयासागरा, कृतकृत्य व निःस्पृह अशा आपले आगमन कसे झाले ? आपल्या मनात काय आहे ? " असे विचारिले त्याबरोबर शुकाने वरील प्रश्नच त्यास केले जनकानेही व्यासाप्रमाणेच उत्तर दिले ते ऐकून शुक म्हणाला—राजन्, मी पुष्कळ विचार करून हेच पूर्वी ठरविले होते. पित्याला जेव्हा विचारिले तेव्हा त्यानेही असेच सांगितले आणि आता आपल्याकडूनही मी तेच एकत आहे. शास्त्रामध्येही असेच वर्णन आढळते हा दुष्ट संसार आपल्या विकल्पामुळेच उत्पन्न झालेला असून तो विकल्पाचा त्याग केल्यानेच क्षीण होतो अर्थात् हा निःसार आहे, असा सर्व तत्त्वज्ञाचा अभिप्राय आहे. अनंत मनोरथ व कर्मे याच्या वासना हेच या संसाराचे बीज आहे. या बीजाने भरलेले अंतःकरण अव्याकृत नामक ईशशक्तीत लीन होते. व्यष्टीचे अंतःकरण लीन झाले असता सुषुप्ति होते व समष्टीचे अंतःकरण लीन झाले असता प्रलय होतो. अशा प्रकारच्या त्या बीजापासून अपंचीकृत पंचभूते, हिरण्यगर्भ, पंचीकरणानंतर विराट्, त्यानंतर अन्नादि, त्यापासून व्यष्टि स्थूलदेह व व्यष्टि लिंगदेह अशा रूपाने हा मोठा अनर्थ उद्भवतो. तो—कर्म व उपासना याचे एकाचकाली अनुष्ठान केले असता केवल व्यष्टिभावाचा नाश होत असल्यामुळे—समष्टि हिरण्यगर्भरूपाने रहातो. श्रवणादि साधनाचा परिपाक होऊन तत्त्वाचा साक्षात्कार झाला असता वासना व अविद्या याचा नाश होतो व मूळाचाच

नाश झाल्यामुळे अतःकरण सर्वथैव नाश पावतें. थोडक्यात सागावयाचें झाल्यास अत.करणाचा उदय हीच ससाराची उत्पत्ति किवा बध व त्याचा अत्यत नाश ह्मणजेच ससाराचा क्षय किवा मोक्ष होय व अनेक वासना हे त्याचे बीज आहे. हा सिद्धात मी जरी पूर्वीच ठरविला आहे तरी खरे काय आहे, ते आपल्या तोडून ऐकावे अशी माझी इच्छा आहे. अनेक कल्पना करून व्याकुळ झालेले हे माझें चित्त स्थिर होईल व मला परम शाति मिळेल, असे करा.

हे ऐकून जनक ह्मणाला—मुने, तुला जे समजले आहे तेच तत्त्व आहे, त्यापेक्षा दुसरा काही निश्चय राहिलेला नाहीं. ते तू स्वतःच जाणले आहेस व गुरूपासूनही त्याचेच श्रवण केले आहेस. पण तोच तुझा निश्चय दृढ होण्याकरिता मीही तुला पुनः सागतों—अखड चैतन्यरूप पुरुषावाचून या सृष्टींत दुसरे काहीएक नाहीं. प्राणी आपल्या सकल्पाने बद्ध झाला आहे व तो आपल्या सकल्पानेच मुक्त होणार आहे. सर्व दृश्य पदार्थाविषयी तू पूर्ण विरक्त झाला आहेस, आणि त्यामुळेच ते दुर्ज्ञेय ज्ञेय तुला आपोआप समजले. तू जरी अल्पवयस्क आहेस तरी या भोगरूपी दीर्घ रोगापासून आपली सुटका करून घेतली आहेस. आता यापेक्षा आणखी काय पाहिजे ? तुझा पिता ज्ञानाचा निधि आहे, तो दीर्घ व कष्टकर तपश्चर्येमध्ये तत्पर आहे. तरी तुझ्याप्रमाणे त्याला पूर्णता आलेली नाही. पूर्णतेच्या दृष्टीने व्यासापेक्षा मी जरा अधिक आहे. तूं त्याचा पुत्र व शिष्य आहेस तरी मजपेक्षाही अधिक आहेस. कारण तुझी भोगेच्छा जितकी क्षीण झालेली आहे तितकी माझी झालेली नाही. प्राप्त करून घेण्यास योग्य असलेले सर्व काही तुला प्राप्त झाले आहे. तुझे चित्त परिपूर्ण झाले आहे. या दृश्य वस्तूमध्ये ते आसक्त होत नाही. आता तू आपली सर्व भ्राति सोड व निभ्रात होऊन सुखाने रहा.

जनकाने याप्रमाणे उपदेश केला असता शुक परम वस्तूमध्ये स्थिर होऊन राहिला. त्याचा शोक, सशय, आयास, इच्छा, भय इत्यादि सर्व नाहीसे झाले, व तो महात्मा चित्ताच्या ऐकाग्र्याचा अभ्यास करण्याकरिता मेरूपर्वतावर गेला. निर्विकल्प समाधीने तेथे दीर्घकाल राहून शेवटी ते तत्त्वामध्ये लीन झाला १.

**सर्ग २**--या सर्गात, बुद्धिमान् विश्वामित्रमुनींनीं ' रामास उपदेश करा ' अशी वसिष्ठाची प्रार्थना केली व तेही उपदेश करण्यास तयार झाले, असें वर्णन केलें आहे

**श्रीविश्वामित्र**—बा राघवा ! शुकाप्रमाणेच तुझ्याही चित्तावरील मळ काढून टाकिला पाहिजे. अहो मुनिवर्य, हा दशरथपुत्र भोगाविषयीं अत्यत विरक्त झाला आहे. ज्ञानी पुरुषाचे हेच पहिले लक्षण आहे. विषयाचा भोग घ्यावा, ही वासनाच बध दृढ करिते व ती शात झाली असता तो क्षीण होतो. रामा, तत्त्वज्ञ वासना नाहीशा होणे यासच मोक्ष म्हणतात व त्या होत रहाणे यास बध समजतात. आत्म्याचे शाब्दिक ज्ञान होणे फारसे कठिण नाही थोड्याशा प्रयत्नानेही ते होतें पण विषयाविषयीं विरक्त होणे फार कठिण आहे ज्या महात्म्याच्या चित्तास भोग बलात्काराने ओढून नेत नाहीत तोच आत्मज्ञ व पडित होय. आपली कीर्ति व्हावी, लोकानीं आपला सत्कार करावा, आपणास लाभ व्हावा इत्यादि उद्देश जेथें आले तेथें ज्ञानाचा गधही नसणें अगदी साहजिक आहे व तत्त्वाचे यथार्थ ज्ञान झाल्यावर भोगाची तृष्णा अवशिष्ट राहणेंही अशक्य आहे अहो मुनिश्रेष्ठ, या राघवाचे ठायी वैराग्य किती आले आहे, हे तुह्मी स्पष्ट पहाताच आहा. आता " तू जे जाणत आहेस, तेच तत्त्व होय " इतके याच्या अनुभवास आणून दिले म्हणजे यास परमानदाचा लाभ होईल. यास्तव हा भगवान् वसिष्ठ मुनि या महात्म्या रामाच्या चित्तास विश्राति मिळेल अशी काही युक्ति सागू दे. कारण हा या कुळाचा गुरु आहे. शिवाय हा सर्वज्ञ सर्व पदार्थास तात्त्विक दृष्टीने व योग–सामर्थ्याने साक्षात् पहाणारा व त्रिकालदर्शी आहे. भो भगवन् वसिष्ठ, पूर्वी आपलें वैर शात व्हावे म्हणून ब्रह्मदेवाने आह्मा उभयतास केलेला उपदेश ध्यानात असेलच. त्याच्या अनुरोधानेच या आपल्या शिष्यास उत्तम युक्ति सागा. म्हणजे हा रघुवशज परम शातीस प्राप्त होईल. हा पूर्ण अधिकारी असल्यामुळे याला उपदेश करिताना काहीं क्लेश होणार नाहीत. उलट उत्तरोत्तर अधिक आनद होईल. पाप्याना उपदेश करण्याचा प्रसग मात्र कोणावर येऊ नये. स्वच्छ आरशात जसें प्रतिबिंब सहज पडते त्याप्रमाणे निष्पाप व त्यामुळेच निर्मळ अत:करणात उपदेश स्थिर होऊन रहातो. विरक्त सच्छिष्य मिळणे हे तरी एक मोठें

भाग्यच आहे व अशा पुरुषास उपदेश केल्यानेंच ज्ञान, शास्त्रार्थ व शिक्षकाची कुशलता ही सफल होतात.

असे बोलून गाधिपुत्र विश्वामित्र स्वस्थ बसला असता व्यास, नारद इत्यादि मुनी "ठीक, ठीक फार उत्तम, फार चागले," असे म्हणून त्याच्या म्हणण्यास अनुमोदन देऊ लागले तेव्हा राजाच्या अगदी जवळ बसलेला ब्रह्मपुत्र वसिष्ठ म्हणाला—हे मुने, मला जे करण्याविषयी सागत अहा ते मी निर्विघ्नपणें करीन. कारण सज्जनाच्या आज्ञेचे उल्लघन करण्यास कोण समर्थ आहे ? मी रामचद्रादी राजपुत्राच्या अंत करणातील मोहास ज्ञानाच्या प्रकाशाने नाहीसें करून सोडितो पूर्वी निषध पर्वतावर ब्रह्मदेवाने जे काहीं सागितले होते ते सर्व माझ्या ध्यानात आहे असे बोलून जेव्हा तो महात्मा वसिष्ट मुनि मांडी घालून उपदेश करण्यास तयार झाला त्यावेळी त्याच्या मुखावर वक्त्याचें एकप्रकारचे तेज चमकू लागले, आणि सर्व सभा शांत होऊन आपले भाषण ऐकण्यास उत्सुक झाली आहे, असे पाहून त्याने बोलण्यास आरभ केला २.

सर्ग ३—या सर्गात, रामाच्या शकेचें निरसन करण्याच्या मिषाने, स्थूल-सूक्ष्म जगाचा आरोप व अपवाद याच्या द्वारा श्रीवसिष्ट प्रत्यक्-चिदात्मा हा या ग्रथाचा प्रतिपाद्य विषय आहे, असें सुचवितात

श्रीवसिष्ठ—बा रामा लोकास शातीचा लाभ व्हावा या उद्देशाने सृष्टीच्या आरंभी भगवान् कमलोद्भवाने जे ज्ञान सागितलें होतें, तेच मी आतां तुला सागतो. चित्त स्थिर करून माझे ह्मणणे ऐक. किंवा तुला काही विचारावयाचे असल्यास ते तू अगोदर विचार. ब्रह्मनिष्ठ गुरूचे हे प्रेमळ शब्द ऐकून रामभद्र विनयानें हात जोडून ह्मणाला–गुरुवर्य, आपण अगोदर माझ्या एका सशयाचे निवारण करा. सर्वज्ञ व अति बुद्धिमान् असे व्यासमुनि शुकाचे गुरु व जनक असूनही ते विदेह मुक्त झाले नाहीत व त्याचा पुत्र विदेह मुक्त झाला याचे कारण काय ?

हा प्रश्न ऐकताच,–जोपर्यंत याला बध, अविद्येमुळें उत्पन्न झालेला आहे हे, व अविद्येचें आणि साक्षी चैतन्याचे स्वरूप समजलेले नाही; तोंपर्यंत जीवन्मुक्तीवर याची श्रद्धा बसणार नाहीं. यास्तव अगोदर त्यास त्याचे ज्ञान करून देऊन नतर या प्रश्नाचे उत्तर दिले पाहिजे.–असा विचार करून श्रीवसिष्ठ ह्मणाले–बा सज्जना, या परमात्म्यामध्ये अणुरेणूसारखी भास-

णारी त्रिभुवने आजपर्यंत किती होऊन गेली आहेत, हल्ली किती आहेत व अशी आणखी किती होतील याचा काही नेम नाही. मोठमोठ्या गणकासही त्याची गणना करिता येत नाही.

गुरूचे हे वचन कानी पडताच स्वभावत च ग्रहणधारणपटु रामाने त्याचा अभिप्राय ओळखला व तो मध्येच ह्मणाला, "गुरुमहाराज, भूत, भविष्य व वर्तमान या तिन्ही काली होणाऱ्या जगास परमात्म्याचाच आधार आहे व त्याच्या स्वरूपावर त्याचा आरोप झाला आहे. हा आपल्या या गूढ वचनाचा मतितार्थ मी ताडला. वर्तमानकाली असणाऱ्या वस्तु जरी अनेक आहेत तरी त्या मागे होऊन गेलेल्या व पुढे होणाऱ्या वस्तूंच्या किंवा सृष्टींच्या मानाने थोडक्याच आहेत त्याचा विचार करीत बसण्यात फारसे तात्पर्य नाही आत्मतत्त्व एक, स्वतंत्र व चिद्रूप असल्यामुळे त्याचा विचार करणे मात्र अति अवश्य आहे" रामाचे हे शहाणपणाचे बोलणे आटपताच ते मुनिराज ह्मणाले–पशु, पक्षी, मनुष्य, देव इत्यादि प्राणिसमूहातील जो ज्या वेळी मरण पावतो तो त्याच वेळी हे सर्व त्रिभुवन पहातो. पण मेल्यावर किंवा मरणसमयी तो कोणत्या साधनानी व कोणत्या रूपाने ते पहातो ह्मणून विचारशील तर सांगतो. आतिवाहिक नावाच्या, चित, अहंकार, मन, बुद्धि, दहा इंद्रिये व प्राण यानी बनलेल्या, वासनामयसूक्ष्म-शरीराने हृदयातील स्वल्प आकाशात प्राणी भ्रांतीने वासनामय त्रिभुवन पाहतो. पण वस्तुत तो चिदाकाशरूप आत्मा जन्मादि–विकारशून्य आहे. धूमादि व अर्चिरादि असे परलोकास जाण्याचे दोन मार्ग आहेत. त्यातून देवतानी मृतास परलोकी पोचविणे यास अतिवाह ह्मणतात व त्या कर्मात जो कुशल असतो त्यास आतिवाहिक ह्मणतात श्रुति व स्मृति यामध्ये जीव शरीरातून निघून परलोकी जातो, असे सांगितले आहे, हे खरे, पण ते कर्म व उपासना यांच्या अनुरोधाने सांगितले आहे; व येथे, परमार्थ दृष्टीने हृदयाकाशातच परलोकाची कल्पना होते, असे मी तुला सांगत आहे कारण सर्व व्यापी आत्म्याचे निष्क्रियत्व व प्रपंचाचे केवळ वासनामयत्व सिद्ध करण्याकरिता परलोकाप्रमाणे शरीर सोडून जाणे, इत्यादिकही कल्पनामयच आहे, असे सांगणे अवश्य आहे त्याच-प्रमाणे प्राण्यांच्या अनंत कोटी मेल्या आहेत, मरत आहेत व मरतील. अंत्यकाली पुण्यपापानुरूप अनेक वासनातील जी वासना

उद्भवेल त्याप्रमाणे प्राणी देव, मनुष्य, पशु इत्यादि योनीतील कोणत्या तरी एका योनीत उत्पन्न होतो. अर्थात् हे जग मनोराज्याप्रमाणे, कल्पनेने बनविलेल्या वस्तूप्रमाणे, किंवा गारुडाप्रमाणे. भ्रमरूप आहे. भोवळ आलेल्या मनुष्यास जसे हे सर्व जग भ्रमण करीत असल्याप्रमाणे दिसते त्याप्रमाणे, बालकास भिवविण्याकरिता दाखविलेल्या बाऊलबुवा-प्रमाणे, आकाशातील मोत्यांच्या समूहाप्रमाणे, नावेत किंवा गाडीत बसून जाणारास जसे बाजूचे वृक्ष चालत आहेत. असे दिसते त्याप्रमाणे व स्वप्नात पाहिलेल्या नगराप्रमाणे, मृत पुरुष आपल्या कल्पनेने जग बनवितो व जन्मास आलेला जीवही अशाच रीतीने त्याचा अनुभव घेतो तर मग ते नित्य आहे, असा भास कसा होतो? म्हणून म्हणशील तर सांगतो. दीर्घकाल परिचय झाल्यामुळे ते कल्पनामय जग-दृढ होऊन बसले आहे. साराश इहलोक, परलोक, जन्म, मरण, जन्मान्तर होणाऱ्या क्रिया इत्यादि सर्व वासनामय व कल्पनामय आहे. पण मूळाचा उच्छेद झाल्यावाचून या दीर्घ कल्पनेचा उच्छेद होणे शक्य नाही अविद्या ह्मणजे आत्म्याचे अज्ञान हेच याचे कारण—मूळ—आहे रामा, या परमात्म्याचे ठायी हे जन्म—सृष्टिरूप तरंग वारंवार उठत आहेत. त्यातील काही पुनः जसेच्या तसेच उठतात, काही अर्धे किंवा अर्धे अधिक पूर्वी प्रमाणे असून बाकीचे अगदी नवीन असतात व काही तर अगदीच अपूर्व असतात. यावेळी जो हा व्यास येथे बसला आहे तो बत्तिसावा आहे, असे मला आठवते. पण ते मागचे सर्वच व्यास सारख्या योग्यतेचे नव्हते. त्यातील बारा केवल ब्रह्मज्ञ होते व त्या सर्वांनीही आपले नियत काम एकसारिखेच बजाविले. दहा व्यास एकमेकाहून अगदी भिन्न झाले व बाकीचे आपल्या कुलाहून अगदीं भिन्न स्वभावाचे निपजले. अजूनही अनेक व्यास, वाल्मीकि, भृगु, अंगिरा इत्यादि मुनी, देवर्षी, देवांचे समूह, मनुष्य इत्यादि होऊन जाणार आहेत. आज असलेले हे त्रेतायुग आजपर्यंत कितीदा तरी होऊन गेले आहे व या पुढेही अनेकदा होऊन जाईल. या व्यासाचा हा दहावा अवतार आहे अजून याला आठ वेळा द्वापरयुगाच्या अंती जन्म घेऊन वेदाचे विभाग व महाभारत करावयाचे आहे हे नेमलेले काम संपलें ह्मणजे आपले कुल प्रख्यात करून तो हिरण्यगर्भ होईल व तोही सर्वोत्तम अधिकार समाप्त झाला ह्मणजे विदेहमुक्त होईल.

सांप्रतकाळीं जो शोक व भय यांस सोडून, शांत चित्ताने, मोहरहित व कल्पनाशून्य होऊन राहिला आहे यास्तव तो जीवन्मुक्तच आहे. द्रव्य, बंधु, वय, कर्म, विद्या, ज्ञान, इत्यादिकांच्या योगाने सर्वच भूतें सारखीं नसतात. कांहीं शेकडों जन्मानंतर ज्ञानी होतात तर कोणी होत नाहीत. या सृष्टींत सर्वत्र विलक्षणता दिसते. एक वस्तु दुसऱ्या वस्तूसारखी नाहीं व एकाचा स्वभाव दुसऱ्याच्या स्वभावासारखा नाहीं. या ईशशक्तीचा कसा चमत्कार आहे तो पहा. वस्तूसारखी वस्तु बनविणारे शिल्पी पुष्कळ आहेत. पण असंख्य वस्तु निर्माण करून त्यांत परस्पर विलक्षणता ठेवणे, हे विश्वकर्म्यावाचून इतरांस साध्य होणे नाहीं. तात्पर्य कालसमुद्रामध्यें हे असे अनंत तरंग उठणारच. त्याच्याकडे दुर्लक्ष्य करून अंतःकरणास धीर द्यावा, विकल्प सोडावा, आत्म्याच्या स्वरूपाकडे दृष्टि लावावी, परमशांतिरूप अमृताने तृप्त व्हावें आणि अविद्येचें आवरण नाहींसे करून जीवन्मुक्त व्हावें ३.

**सर्ग ४**—मुक्ताच्या दृष्टीनें दोन्हीं (जीवन्मुक्ति व विदेह) मुक्ती एकसारख्याच असतात, असें वर्णन करून मूळ दृढ होण्याकरितां शास्त्रीय पौरुषाची येथें प्रशंसा करितात.

**श्रीवसिष्ठ**—नित्य मुक्तता हाच आत्म्याचा स्वभाव आहे. पण त्याच्या या स्वरूपाचें ज्ञान न होणें, या अज्ञानामुळे त्यास बंध होतो. तो त्याच्या ज्ञानानेच नाहींसा होणार, इतकें वर सुचविले आहे. अज्ञानाचें पटल निघून गेलें ह्मणजे हा व्यवहार जरी दिसत असला तरी तो चित्रांत काढलेल्या वाघाप्रमाणें करमणुकीच्या उपयोगी पडतो चित्रांतील वाघाप्रमाणेंच तो पीडा करूं शकत नाहीं मग असा जर खरा प्रकार आहे तर विदेहमुक्ति व जीवन्मुक्ति यांत अंतर कोणतें राहिलें? बा प्रिय राघवा, जल व तरंग हे नाममात्र भेद आहेत. तरंग हा कांहीं वस्तुतः जलाहून भिन्न पदार्थ नाहीं. त्याचप्रमाणें देहयुक्त व्यासमुनि व देहरहित शुक याच्यामध्यें नाममात्र अंतर आहे वस्तुतः कांहीं भेद नाहीं. कोणतीही मुक्ति विषयाच्या अधीन नसते. हे सत्य आहेत, असें समजून विषयांचा जो स्वादच घेत नाहीं त्यास देहाचा किंवा दुसऱ्या कशाचाही अनुभव कसा येणार? तो असंग व उदासीन होऊन सर्वत्र आत्म्यासच पहात रहाणार! हा मुनिश्रेष्ठ व्यास, आमच्या कल्पनेमुळे, देहयुक्त आहे व तो

या इतर पदार्थाप्रमाणे आमच्या पुढे बसला आहे, असे आह्मास वाटते. पण त्याचा अतर्गत अभिप्राय अगदी निराळा आहे मी देहरहित आहे, हा त्याचा निश्चय कोणत्याही अवस्थेत ढळत नाही. मग त्याच्यामध्ये व विदेहमुक्त शुकामध्ये अतर कोणते राहिले? ते दोघेही बोधस्वरूप आहेत वायु मोठ्याने वाहत असो की अगदी मद चालो. तो जसा नेहमी वायुच असतो त्याप्रमाणे हे दोघेही मुक्तच आहेत एकाचे प्रारब्ध कर्म सपल्यामुळे तो विदेह मुक्त झाला व दुसऱ्याचे न सपल्यामुळे तो सदेह मुक्त झाला.

असो, रामा, आता मी तुला मुख्य गोष्ट सागतो ती तू एकाग्रमनाने ऐक या ससारात कोणत्याही पुरुषास कोणतीही गोष्ट निश्चयाने केलेल्या पुरुषार्थाच्या योगाने प्राप्त होते. आपला इष्ट मनोरथ साध्य करून घेण्याकरिता सतत प्रयत्न करणे अति अवश्य आहे. शास्त्राने ज्याचे विधान केले आहे अशी शारीरिक. वाचिक व मानसिक कर्मे केल्याने चित्तशुद्धि हे फळ मिळते चित्तशुद्धीच्या द्वारा आत्म्याचा साक्षात्कार होतो आत्मसाक्षात्कार झाला असता हृदयात आह्लाद उद्भवतो. काम–क्रोधादि सताप देणाऱ्या दोषाचा नाश झाला असता चित्तात परमानद होणे ही काही अशक्य गोष्ट नव्हे. या परम–आह्लादासच जीवन्मुक्तिसुख ह्मणतात. पण ते मिळणे केवळ प्रयत्नाधीन आहे. यास्तव प्रयत्नावरच सर्व भार टाकिला पाहिजे.—दैव अनुकूल नसल्यास प्रयत्न व्यर्थ होतो, असे आपण नेहमी पहातो, व “ चागल्या कामात विघ्ने फार ” असे व्यवहारातही ह्मणतात. तेव्हा नुसत्या प्रयत्नाने काय होणार?—असे कदाचित् तू ह्मणशील, पण विचार करून पाहिल्यावर तुझ्या ध्यानात येईल की, हे ह्मणणे बरोबर नाहीं कारण प्राण्याची कोणतीही क्रिया प्रयत्नावाचून होत नाहीं, व आपला कोणताही मनोरथ सिद्ध करून घ्यावयाचा झाल्यास तो कोणालाही न विचारिता स्वाभाविकपणेच प्रयत्न करू लागतो. इष्ट प्राप्तीकरिता दैवावर हवाला ठेवून कोणी बसत नाही दैव जर इष्टप्राप्तीचे खरोखरच साधन असते तर या अनत प्राण्यातील एकाद्याने तरी त्याच्या द्वारा आपले साध्य सिद्ध केलें असते. पण दैवाच्या विश्वासावर रहाणारे निःसीम दैववादीही भोजनादिकाकरिता प्रयत्न करीत असतात. तेव्हा दैव ही एक मूर्खाची

कल्पना आहे, असे नाही का ठरत ? पण मी प्रयत्न कशाला ह्मणतो ते एकदा सांगितले पाहिजे शास्त्रज्ञ गुरु व शास्त्र यांनी सांगितलेल्या मार्गाने कायिक, वाचिक व मानसिक व्यवहार करणे यास मी प्रयत्न किंवा पौरुष म्हणतों अशा प्रकारच्या पौरुषानेच इष्टप्राप्ति व अनिष्टनिवृत्ति होते. एकाद्या इष्ट वस्तूची इच्छा धरून जो कोणी शास्त्रीय मार्गाने यथासांग प्रयत्न करू लागतो व इष्ट सिद्धि होईतो तो सोडित नाही, त्यास त्याचें फळ मिळालेच पाहिजे या प्रयत्नानेच एकादा सामान्य प्राणी त्रिभुवनाचा धनी ( इंद्र ) होतो, जगास निर्माण करणारा ब्रह्मदेव होतो, साक्षात् गरुडध्वज बनतो, व जगत्संहर्ता कैलासवासी शंकर होतो प्राक्तन व ऐहिक असे दोन प्रकारचे पौरुष आहे. त्यातील प्राक्तन पौरुष वर्तमान पौरुषापुढे दुर्बळ ठरत. प्रयत्नशील व दृढ अभ्यास करणाऱ्या पुरुषास काय पाहिजे ते करिता येते. कालपुरुष या प्रयत्नानेच मेरूसारख्या अवाढव्य पर्वतास व त्याच्याच बरोबर या सर्व सृष्टीस गट्ट करून टाकण्यास समर्थ होतो. मग या क्षुद्र प्राक्तनाची काय कथा ? यास्तव दीनाप्रमाणे हताश न होता शास्त्रीय प्रयत्न केल्यास इष्ट सिद्धि झाल्यावाचून रहाणार नाही, असा तू दृढ निश्चय कर अशास्त्रीय प्रवृत्तीपासून मात्र अनर्थ ओढवल्यावाचून रहाणार नाहीत. मजजवळ धन नाही, माझ्या अंगात सामर्थ्य नाहीं, मला ईश्वराने बुद्धि दिली नाही, तेव्हा अशा माझ्या हातून काय होणार ? असे म्हणून प्रयत्न न करणें चांगले नव्हे कारण पुरुषाची कोणतीही दशा एकसारखीच रहात नसते. तर ती प्रयत्नानुरूप वारंवार बदलते, हे ध्यानात धरून शास्त्रीय प्रयत्न उत्तरोत्तर अधिक अधिक करावा त्यास शिथिल होऊ देऊ नये. कारण आपल्याच अशास्त्रीय दुराचरणामुळे प्राप्त होणाऱ्या—दारिद्र्य, रोग, बंधन इत्यादि—प्रसंगी जो थोडासा लाभही पुष्कळ वाटत असतो, तोच शास्त्रीय सदाचरणामुळे प्राप्त होणाऱ्या उत्तम व संपन्न स्थितींत क्षुद्र वाटतो. प्रियव्रत राजास सर्व पृथ्वीही पुरेशी वाटेना, असे पुराणात वर्णन आहे ४.

**सर्ग ५**—पौरुष ( प्रयत्न ) प्रबल आहे व दैव त्याहून भिन्न नाहीं, याविषयीं या सर्गात दृष्टांत व युक्ति सांगतात.

**श्रीवसिष्ठ**—राघवा, दैव ह्मणून पौरुषाहून भिन्न वस्तूच नाहीं. प्राक्तन प्रयत्नासच कोणी दैव ह्मणून समजतात. पण असल्या त्या दैवाहून पौरुष

प्रबल आहे. या पौरुषाच्या योगाने सर्व पुरुषार्थ प्राप्त होतात. शास्त्राने जसे विधान केले असेल त्याप्रमाणे आचरण करणाऱ्या अधिकारी पुरुषास सर्व पुरुषार्थ प्रवृत्तीमुळेच प्राप्त होतात. काळा, लाल, पाढरा, इत्यादि रग जसे प्रकाशावाचून स्पष्ट दिसत नाहींत त्याप्रमाणे पुरुषार्थ प्रवृत्तीवाचून सिद्ध होत नाहोत यास्तव शास्त्रीय प्रवृत्ति सर्व सुखाचे कारण आहे, हे तू विसरू नकोस. शास्त्रीय विधींचें उल्लंघन करून मन मानेल तसे वर्तन करणारे पुरुष नानाप्रकारचे कष्ट भोगितात. शाति हा अलौकिक पदार्थ त्यास पारखा होतो. ईश्वराने जरी हे मायिक जग निर्मिले आहे, तरी त्याच्या स्थितीकरिता काही अबाधित नियमही केले आहेत. जो शास्त्रीय व्यवहार करितो त्यास सुख हे फल मिळावे व जो अशास्त्रीय व्यवहार करितो त्यास दु:ख हे फल मिळावे, हाही एक त्यातीलच अबाधित नियम आहे दैवावर विश्वास ठेवणाऱ्या सज्जनासही आमची एवढीच पृच्छा आहे की, बाबानो, या मृगजळाच्या मागे उगीच का लागता? फल देण्याच्या अवस्थेत आलेले प्राक्तन कर्म व दैव यात काही भेद नसताना एका प्रकारच्या प्रयत्नासच दैव हे नाव देऊन व्यर्थ का फसता? व दुसऱ्याना का फसविता? हे तुमचे काल्पनिक दैव वरील नियमास बाध करू शकत नाही. असो, या दोन प्रकारच्या पौरुषातील शास्त्रीय पौरुषाचे परम पुरुषार्थ हे फल मिळते व अशास्त्रीय पौरुषाचे अनर्थ हे फल प्राप्त होते. प्राक्तन व वर्तमान पौरुष हे दोन मत्त बकरे आहेत ते आपापले फळ देण्याकरिता, दुसऱ्यास हटविण्याचा प्रयत्न एकसारिखा करीत असतात त्याच्या या लढाईत अधिक बलवान् असेल त्याचा विजय होतो. कधी कधी दोघाचीही बरोबरी होते पण येथे एक गोष्ट ध्यानात ठवण्यासारखी आहे. ती ही की, प्राक्तन पौरुषाची वाढ खुटलेली असते. त्यास अधिक पुष्टि किंवा अधिक बल येणे शक्य नसते. वर्तमान पौरुषाची गति कुंठित झालेली नसते. शुभ किंवा अशुभ प्रवृत्तीच्या योगाने त्यास पाहिजे तितके बलाढ्य किंवा अत्यत दुर्बल करिता येते प्राक्तनाने पौरुषाचा कदाचित् पराजय केल्यास शास्त्रीय मार्गाने प्रवृत्ति करून पौरुषास बलाढ्य करावे. म्हणजे त्याच्या शत्रूचा नाश होण्यास विलब लागणार नाहीं. वर्तमान पौरुषास पुष्ट होण्यास जरी बराच अवकाश लागला तरी प्राक्तन कोणत्याही रीतीने पुष्ट होणे शक्य नसल्यामुळे त्याची भीति बाळगू नये.

किंवा उतावीळ होऊ नये. अथवा कटाळून शुभ प्रवृत्ति सोडू नये. शुभाच्या योगाने अशुभाचा नाश होतो; हे त्रिकाल सत्य आहे यास्तव सर्व आपत्ति सहन करून, देहदंडास न जुमानिता, इष्टसिद्धि करून घ्यावी. दृढ निश्चयापुढे देवादिकही हात टेकितात. निश्चयी पुरुषास ते विघ्न करू शकत नाहींत. आपल्या उत्कर्षाकरिता प्रयत्न करणाऱ्या पुरुषामध्ये जोपर्यंत शैथिल्यादि दोष असतात तोपर्यंतच विघ्ने त्यास भिववितात. दोषाभावीं तीं बिचारी तोंडें काळीं करून कोठे जातात ते समजतही नाही. शास्त्रीय पौरुष करीत असतानाही कधी कधी अनर्थ ओढवतो. पण तो प्राक्तन बलाढ्य पौरुषाचे फल आहे, असे समजावे. काल घडलेला दोष आपणास आज प्रयत्नाने घालवित। येतो कालच्या बहु भोजनाने अजीर्ण झाल्यास आज लंघन करून त्यास हटविता येते. हेच—प्राक्तनास वर्तमान प्रयत्नाने हटविता येते, असे ह्मणण्यास—पुरेसे कारण आहे. करिता आत्म्यास संसारातून सोडविण्याकरिता शम, दम, श्रवण इत्यादि उपाय योजावेत. सतत उद्यम करून पुरुषानीं आपले पुरुष हे नाव सार्थ करावे. शैवाच्या परिभाषेप्रमाणे पशु होऊ नये. स्वर्ग व मोक्ष या दोन्ही परम सुखाची प्राप्ति यथाशास्त्र उद्यम केल्याने होतेच होते सिंह आपल्या अंग—सामर्थ्याने, मानसिक धैर्याने व सतत यत्न करून जसा पिंजऱ्यातून निघून जातो त्याप्रमाणे, बा रामा, मनुष्यानेही या संसाररूपी पिंजऱ्यातून निसटून जावें. आपला हा देह नाश पावणारा आहे, हे कधीही विसरू नये. पशुवृत्ति टाकून द्यावी. स्वतंत्र होण्याची इच्छा धरावी व त्याकरिता सत्समागम व सच्छास्त्र याचा आश्रय करावा. विषयोपभोगामध्ये आसक्त होऊन, आपलेपणा विसरून, पुढे ओढवणाऱ्या अनर्थाकडे दुर्लक्ष्य करून, आपल्या सोन्यासारिख्या तारुण्याची माती करून घेऊ नये. त्याचा ऐहिक व पारलौकिक हिताकडे उपयोग करावा. तारुण्य हाच सर्व आयुष्यातील उत्तम काल आहे प्रत्यक्ष प्रमाणाचा त्याग करून जो अनुमानाचा आश्रय करितो तो मूर्ख आपले हात हेच सर्प आहेत, असे अनुमानाने ठरवून त्यास तोडून टाकण्यासही कमी करणार नाहीं. लक्ष्मी दैववाद्याचे तोंडही पाहण्याची इच्छा करीत नाही. यास्तव अगोदर विवेक करावा. नंतर अध्यात्मशास्त्राचा विचार करावा. त्याच्या अर्थाकडे अनुसंधान ठेवावे. आत्म्याचा साक्षा-

त्कार होईतो अशाप्रकारे यत्न करीत असावे पूर्व किंवा वर्तमा पापामुळेच आत्म–साक्षात्कार होण्यास विलंब लागतो, व त्यास हटवि ण्याकरिताच " दीर्घ प्रयत्न करावा, " असे संत सांगतात. आत्मज्ञाना प्रतिबंध करणारी पापे जर नसती तर आत्मसाक्षात्कार ही एक सह वस्तु होऊन राहिली असती. पण दुर्दैवामुळे तसा प्रकार नाहीं. ह्मणू दृढनिश्चयाने दीर्घोद्योग करावा लागतो. सदाचार हा त्या उद्योगाचा सह यक आहे ते दोघे मिळाले की इष्ट फल प्राप्त झाल्यावाचून कधीं रहाणार नाही. दारिद्य, दैन्य, दुःख इत्यादिकांनी व्याकुळ झालेले लोक या मार्गाचे अवलंबन करून श्रेष्ठ झाल्याची उदाहरणे आहेत. तस्मा बाल्यावस्थेपासूनच शास्त्राभ्यास करावा, सत्संग धरावा; व उत्तमोत्त दैवी गुण आपल्या स्वभावात आणावेत. ह्मणजे कल्याण होते या गोष्टीच आह्मी प्रत्यक्ष अनुभव घेतला आहे, व शास्त्रही हेच सत्य सांगत आहे पण हे राघवा, आळसाने व अविश्वासाने या त्रिभुवनातील प्राण्याचा नाश केला आहे या जगात ते जर नसते तर एकही अनर्थ झाला नसता कोणी एकादाच अधिक धनी व अधिक ज्ञानी नसता व ही भूतमात ( पृथ्वी ) पशुतुल्य आळसी, दुःखी व दरिद्री प्राण्यांनी भरून गेली नसती. असो, वाल्मीकिमुनि भरद्वाजास असे सांगत आहेत तो सूर्य भग वान् अस्त पावला त्याबरोबर तेथील सर्व श्रोत्यांनी त्या त्रिकालज्ञास नम स्कार करून स्नान, संध्योपासना, होम इत्यादि कर्मे करण्याकरिता गमन केले व दुसऱ्या दिवशी प्रातःकाळी ते सर्व सज्जन पुढचा उपदेश ऐक ण्याकरिता वाल्मीकीच्या आश्रमात आले ९.

**सर्ग ८—प्रबळ दैव ह्मणून ज्याला ह्मणतात तेही वस्तु आपलेच प्राक्तन पौरुष आहे, असे येथे वर्णन करितात.**

तेव्हा वाल्मीकि ह्मणाले–भरद्वाजा, नंतर श्रीवसिष्ठ ह्मणतात–रामा, य प्रयत्नाचे जितके वर्णन करावे तितके थोडेच आहे पुरुषास प्रयत्न हा एक कल्पवृक्षच लाधला आहे, असे समज. पण अज्ञ प्राणी हे परम सत्य जाणत नाही व त्यामुळे आपल्या सुखदुःखाविषयी परतंत्र होऊन रहातो. ह्मणजे मी सुखच मिळवीन व दुःखाचा नाश करून सोडीन, असे ह्मणण्याचे धैर्य त्याच्या मध्ये नसते " काय करावे ? आपले दैवच खोटे, आपणास सुख कोठून मिळणार ? " असे दीनमुख

करून म्हणणे, एवढेच आपल्या हाती आहे, असे त्यास वाटते. पण असला पुरुष ग्राम्यपशुच होय. कारण पशूस धनी जेथे बांधील तेथे तो रहातो, जे खाऊ घालील ते खातो, प्यावयास पाणी देईल तेव्हा तो ते पितो व गळ्यात, नाकात, किंवा तोंडात दोरी बांधून जिकडे नेईल तिकडे जातो. याचीही तीच अवस्था असते. ईश्वराने नरकात पाठविले तरी वाहवा, इंद्रपद दिले तरी वाहवा. स्वतःचा यत्न व तदनुरूप इच्छा यास मुळीच महत्त्व नाही अशा मनुष्य–जन्मापेक्षा पश्वादि तिर्यक् योनीतील जन्म फार चांगला. ईश्वर कर्मानुरूप फल देत असतो. त्यामुळे जीव जरी त्याच्या अधीन असला तरी त्याच्यावर बलात्कार होणे किंवा त्यास न केलेल्या कर्माचा भोग भोगावा लागणे, मुळीच शक्य नाही, हे जरी खरे आहे, तरी दैववादी आपणास अत्यंत परतंत्र मानितात. प्रयत्न केल्यास आह्मी स्वतः इंद्रही होऊ, हे तत्त्व ते अगदी विसरतात. ह्मणून त्यास वर पशूची उपमा दिली आहे. बाकी आज जरी दैववशात् आपणास वाईट दिवस आलेले आहेत तरी स्वप्रयत्नाने आह्मी आमची स्थिति सुधारू, असे जे समजत असतील ते नरकातचसे काय, पण याहूनही जरी अधोगतीस गेले असले तरी त्यात काही दोष नाही तस्मात् शास्त्रमर्यादा न सोडता सदाचरण करावे, ह्मणजे शम–दम–श्रवणादि रत्ने आपोआप मिळतात. त्याच्या प्राप्तीवाचून आत्म्याचा उद्धार कधीही होणार नाही. या सृष्टीत एकच अखंड तत्त्व भरले आहे. त्यास सूक्ष्मदृष्टीने पहाणे यासारिखा पुरुषार्थ नाही हे गुह्य ज्याच्या योगाने समजते त्या शास्त्राची व साधूंची योग्यता अमर्याद आहे अनेक जन्माची परंपरा हा एक दुःसाध्य रोग आहे. तो सर्व जीवास झालेला असून त्याच्यावर शास्त्रीय प्रयत्न हेच एक उत्तम औषध आहे व आत्मज्ञ संत हे ते देणारे वैद्य आहेत यास्तव ज्यास या रोगाचा कंटाळा आला असेल त्यांनी त्या सज्जनाचे सेवन करून त्याच्या उपदेशामृताने अज, अजर व अमर व्हावे ६

**सर्ग ७**—या सर्गातही पौरुषाचेच प्राधान्य दृष्टांत देऊन सिद्ध केले आहे

**श्रीवसिष्ठ**—दाशरथे, मानसिक आणि शारीरिक पीडा यांनी रहित असलेले पुष्ट शरीर हे पुरुषार्थाचे पहिले साधन आहे. धनादि इतर सर्व साधने त्याच्यापुढे तुच्छ आहेत. यास्तव प्रथम शरीर सुदृढ कसे होईल, याचे चिंतन करावे. चांगला आचार, चांगला विचार व ब्रह्मचर्य ही तीन

त्याचीं मुख्य साधनें आहेत. वेद, स्मृति इत्यादि सच्छास्त्राचे अध्ययन केल्याने या वरील तीन साधनाचे अनुष्ठान व रक्षण कसे करावे, ते समजते. अर्थात् सच्छास्त्राचे अध्ययन हे पुरुपार्थाचे पहिले कारण आहे. याच्या योगाने सदाचारादिकाचा लाभ होतो. सदाचारादिकाच्या योगाने शरीर सुदृढ झाल्यावर चित्ताचे समाधान होईल, असा प्रयत्न करावा. त्यास सर्व बाह्य विपयापासून परतवून आणून आत्म्यामध्ये स्थिर केल्याने त्याचे परम समाधान होते, आणि असे केल्यानेंच उत्तर जन्म घ्यावा लागत नाहीं. पण पौरुषावाचून चित्ताचे समाधान होत नाही. दैवाला हटविण्याकरिताच पौरुपाची गरज लागते. कारण विरुद्ध दैवाने प्रतिबध न केल्यास आत्मसाक्षात्कार होणे फारसे अवघड नाही, हे मी आताच सांगितले आहे. दैव फारच प्रबल असल्यास त्याचा या जन्मी नाश नाहीं होणार, तरी धीर सोडू नये. या जन्मी केलेला प्रयत्न व्यर्थ जाणार नाही. तो उत्तर जन्मी आपला प्रभाव दाखवील. दैवपरायण होऊन जे उद्योग सोडितात ते आत्मशत्रु धर्म, अर्थ व काम याचा घात करितात. दैव प्रत्यक्ष नाही पण पौरुष प्रत्यक्ष आहे. कारण हा अमुक पुरुपार्थ आहे व हे याचे साधन आहे, अशी चित्तात स्फूर्ति होणे यास संवित्स्पद म्हणतात, याच्या योगाने आपण ते साधन करावे, अशी इच्छा होते. त्यास मनःस्पद म्हणतात. त्याच्या योगाने अनुकूल व्यापाराकरिता ( देहाची हालचाल करण्याकरिता ) कर्मेंद्रिये प्रवृत्त होतात. यास इंद्रियस्पद म्हणतात. त्याच्या योगाने शरीराची प्रवृत्ति सुरू होते ही सर्व पौरुपाची क्रमाने अनुभवास येणारी स्वरूपे आहेत, व बुद्धि, मन इत्यादिकाच्या सतत प्रवृत्तीमुळे इष्टसिद्धि होते, हे सुप्रसिद्ध आहे. पण दैव अशारीतीने कधीच कोणाच्या अनुभवास येत नाही तर आकस्मिक परिणामाकडे पाहून नतर हे दैवाचे फल आहे, असे आपण नेहमी अनुमानाने ठरवितो. यास्तव असल्या आनुमानिक दैवास सोडून प्रत्यक्ष प्रयत्नाचाच आश्रय करावा, हे चागले. कायिक, वाचिक व मानसिक असे त्रिविध पौरुप आहे. निरनिराळ्या प्रसगी त्यातील एकेकाचें प्राधान्य असते. ध्यानादि प्रसगी मानस पौरुषाचे, स्तवनादि प्रसंगी वाचिक पौरुपाचे व यात्रादि प्रसगी शारीरिक पौरुषाचे प्राधान्य असते. या त्रिविध शास्त्रीय पौरुषाच्या योगानें नर नारायण होतो. पण जे अविचारी मोठ्या योग्यतेस चढलेले असूनही निषिद्ध प्रयत्न करितात ते

त्या ( त्रिविध पौरुषा )मुळेंच अधोगतीस जातात. तात्पर्य पौरुष हेंच सर्व दशांचे कारण आहे. चित्त जरी अशुभामध्यें प्रवृत्त झालेलें असलें तरी त्यास शुभकर्मामध्यें प्रवृत्त करावें. या एका वाक्यांत सर्व शास्त्रांच्या अर्थाचा संग्रह झाला आहे. सर्व गुरु व सर्व श्रेष्ठ जनक आपल्या शिष्यास व पुत्रास सदां " शुभाचरण करा; त्यानेच तुमचे हित होईल," असा उपदेश करीत असतात. पौरुषापासून जर फल मिळणें शक्य नसते किंवा दैव पौरुषाहून श्रेष्ठ असते, तर असा उपदेश कोणीही केला नसता. शिवाय पौरुषाची सिद्धि प्रत्यक्ष आहे, हे मी नुक्तेच सांगितले आहे. तर मग दैव आलें कोठून व कसे ? ह्मणून विचारशील तर सांगतो. प्राक्तन पौरुष प्रबल झाल्यामुळें जेव्हा दु.ख होते तेव्हा त्या अस्वस्थतेच्या प्रसगी प्राण्याच्या चित्तास समाधान व्हावे ह्मणून सुज्ञ पुरुष हा दैवाचा उपाय योजितात कारण दु.खाच्या वेळी समाधान मानून घेण्यास काहींतरी निमित्त लागते. ते नसल्यास प्राणी अधिक व्याकुळ होण्याचा फार संभव असतो. यास्तव दुःख सहन करण्याचे धैर्य अगी येण्यास हा एक उत्तम उपाय आहे. अशा दृष्टीने या दैवाकडे पाहिल्यास त्यात कोणतीच हानि नाहीं. पण भोजन करणाराची तृप्ति होते, गमन करणारा इष्ट स्थळीं जाऊन पोचतो, भाषण करणारा भाषणानेच आपला अभिप्राय दुसऱ्यास कळवितो, इत्यादि प्रकार प्रत्यक्ष पहात असतानाही दैवावर विश्वास ठेवून आळशी होऊन रहाणाऱ्या लोकाचा दैव–हा भयकर रोग व प्रबळ शत्रु आहे, असे ह्मटल्यावाचून रहावत नाही. बुद्धिमान् पुरुष प्रयत्नानेच सकटातून पार पडतात. यास्तव प्रत्येकाने–आपल्या बऱ्या–वाईट प्रयत्नाप्रमाणे आपणास फल मिळणार–हा परम सिद्धात आपल्या हृदयावर खोदून ठेविला पाहिजे. दैव दैव ह्मणून आक्रोश करणाऱ्या लोकांस मी असे विचारितों कीं जन्म, बाल्य, यौवन, जरा, मरण इत्यादिकाप्रमाणे प्रत्यक्ष न दिसणाऱ्या दैवाची सिद्धि तुह्मी कशी करणार ? सुखदुःखादि फलाच्या प्राप्तीवरून जर तुह्मी त्याची सिद्धि करणार असाल तर त्यात आमचे काही वेचत नाही. कारण फलप्राप्तीनतर ज्याची सिद्धि होणार, ते आहे ह्मटले काय व नाहीं ह्मटले काय, सारखेच. कारण " ते आहे " ह्मटले तरी सुखदुःख होणार व नाही ह्मटले तरी होणार. वाघोबा ह्मटले तरी खाणार व वाघ्या ह्मटले तरी खाणार. मग वाघ्या ह्मणून त्याच्याविषयींचा तिटकारा

तरी का व्यक्त करू नये ? शिवाय दैव ही भूत वस्तु आहे. कोणतीही होऊन गेलेली गोष्ट पुरुषाच्या अधीन नसते. पौरुषाचा प्रकार याहून अगदी निराळा आहे. ते भविष्य व वर्तमानकालीच होणारे असल्यामुळे पुरुषाच्या हातात असते. यास्तव जे होऊन गेले आहे, त्याचे फल भोगण्यास तयार राहून जे होणार आहे ते मात्र अनुकूल परिणामीच होईल, प्रतिकूल परिणामी कधीही होणार नाही, असा प्रयत्न करावा. बा प्रिय कुमारा, तू गुरुशुश्रूषा, शास्त्राभ्यास व सदाचार यानी जसा जसा सपन्न होऊ लागशील तसे तसे तुझे ज्ञान अधिक स्पष्ट होऊ लागेल व जसे जसे तुझे ज्ञान वाढेल तसतशी तुझी श्रद्धा, तुझे समाधान व तुझे सुख ही वृद्धिगत होतील ७.

**सर्ग ८**—दैव मिथ्या आहे, असे जे वर ह्मटले आहे, त्याचेच प्रमाण-विरोधादि युक्तींनी समर्थन करितात.

**श्रीवसिष्ठ**—रामभद्रा, माझ्या या एवढ्या भाषणावरून तू समजलाच असशील की, दैव ही एक कल्पना आहे, दुःखिताच्या समाधानाचा उपाय आहे व ती एक पुरुषाच्या अधीन नसणारी भूत वस्तु आहे. तिला काही आकृति नाही, ती काही कर्मे करू शकत नाही, तिच्यामध्ये स्फुरण नाही व पराक्रमही नाही. पौरुष दैवाच्या अति उलट आहे. त्याच्या माहात्म्यानेच हे जगच्चक्र चालले आहे. ते जर नसते तर शास्त्रे, गुरु, त्याचे उपदेश, शाळा, दड, निग्रह, नियम इत्यादि सर्व व्यर्थ झाले असते. किंवा याची जगात उत्पत्ति व स्थितिच झाली नसती. कोणतेही कर्म प्रयत्नाने सिद्ध होत असते. स्नान, दान, आसन इत्यादिकातील एकही क्रिया दैव करीत नाही. न्यायाच्या दृष्टीने पाहिले तरी मी[1] वर सागितले आहे तेच सिद्ध होते. दैव अमूर्त ह्मणजे निराकार आहे. त्याचा मूर्त म्हणजे साकार पुरुषाशीं संयोग कसा होईल ? दोन मूर्त पदार्थाचाच सयोग होतो असा अनुभव व नियम आहे.

---

१ शारीरक भाष्यात परमपूज्य आचार्यांनीं आत्मा व मन याचा संयोग; परमाणूचा परस्पर संयोग; यज्ञानंतर उत्पन्न होणारें अपूर्व; कर्माभावापासून उत्पन्न होणारा भावरूप प्रत्यवाय इत्यादि असत्कल्पनांस कसें तुच्छ करून सोडलें आहे; हें प्रत्येक आचार्यभक्तास चांगलें अवगत आहे. ईश्वरानें सामर्थ्य दिल्यास मी मराठी वाचकासही त्याचा परिचय करून देईन.

तेव्हा मूर्त व अमूर्त याच्या संयोगाने जसे एकादे कार्य होते त्याप्रमाणे शरीरसंबद्ध दैवाच्या योगाने काही होईल, हें ह्मणणे व्यर्थ आहे. आजपर्यंत जेवढे शूर, पराक्रमी व ज्ञानी पुरुष झाले आहेत ते सर्व पौरुषानेंच झाले. त्यातील एकानेही दैवाची अपेक्षा केली नाहीं. कालवेत्त्या ज्योतिषानी दैवाचे देव्हारे माजविले आहेत. पण ते ज्यास चिरजीव ठरवितात त्याचा शिरश्छेद केल्यास थोड्याच कालात तो कालाचा अतिथि होतो. ते 'हा ज्ञानी होणार' ह्मणून ज्याचें फल वर्तवितात तो विद्याभ्यासावाचून साक्षर होत नाही. यावरून दैवाचा अगीकार करणाऱ्या लोकासही प्रयत्नाची अपेक्षा असते, असेच ठरते. हा विश्वामित्र मुनि प्रयत्नाचें मूर्तिमान् उदाहरण आहे. दैवास दूर फेकून देऊन या क्षत्रियाने प्रयत्नानेच ब्राह्मण्य मिळविलें. आह्मी व दुसरेही हे सर्व मुनी पौरुषानेच मुनित्वास प्राप्त झाले आहेत. काही योगी व हे सर्व सिद्ध आकाशातून यथेच्छ सचार करितात, हे तुला ठाऊक आहे. पण त्यास ही सिद्धि प्रयत्नावाचून का प्राप्त झाली आहे? साराश, या असत् दैवाचा लोभ सोड व तू प्रत्येक उत्कर्ष प्राप्त करून देणाऱ्या पौरुषाचा अगीकार कर ८.

**सर्ग ९—दैव मिथ्या आहे, हे ठरविण्याकरिता तें मनोमात्र आहे आणि मन व फलासह कर्म हीं चिदात्मरूप आहेत, असें येथें वर्णन करितात.**

**श्रीराम—**गुरुवर्य, आपण सागता तें मला मान्य आहे. मी आपल्या आज्ञेप्रमाणे पौरुषाचा स्वीकार करीन. पण या दैवाविषयीं दृढ झालेली भावना नाहींशी होत नाही. कारण, या व्यवहारात आपण नेहमी पहातों की, ज्याच्याकरिता आपण कधीं प्रयत्न केला नाहीं; किंबहुना इच्छाही केली नाही, अशीं काही फळे आपणास उगीचच्या उगीच भोगावीं लागतात. कधी कधी तर प्रयत्नाच्या व उद्देशाच्या अगदीं विरुद्ध परिणाम घडतो. पण कोणताही परिणाम ( कार्य ) निष्कारण होतो, असे ह्मणणे सयुक्तिक नव्हे. तेव्हा अशा अकस्मात् घडणाऱ्या गोष्टींचे कारण दैवावाचून दुसरे कोणते असणार? शिवाय आपणही प्राक्तन दैवाचा अगीकार करिताच. तेव्हा दैवाचा अपलाप करण्यांत आपला कोणता हेतु आहे ते मला नीटसे समजलें नाही.

**श्रीवसिष्ठ—**राघवा, दैव काल्पनिक आहे; वस्तुभूत नाहीं, ही गोष्ट मी आता तुझ्या अनुभवास आणून देतो. प्राण्याच्या मनामध्यें जी वासना उठते

तिचाच इंद्रियावर परिणाम होतो व त्याप्रमाणे त्याचे कायिक व वाचिक कर्म सुरू होते. त्याच्या मनांतील अभिप्राय एक व कर्म दुसरें; असें कधींही होत नाही. गांवीस जाण्याची ज्याची इच्छा असते तो तदनुकूल व्यापार करितो व गांवीस जातो आणि नगरास जाण्याची ज्याची इच्छा असते तो नगरास जातो, तात्पर्य ज्याची जशी वासना असते त्याप्रमाणे तो प्रयत्न करितो व फळ मिळवितो. तीव्रवेगामुळें म्हणजे एकाद्या फळाच्या अति अभिलाषामुळे पूर्वी जें कर्म केलेलें असतें, त्या कर्मासच दैव असें म्हणतात, हें मी मागेही एकदां सुचविलें आहे. तात्पर्य, एका प्रकारच्या कर्मासच दैव म्हणतात ते भिन्न तत्त्व नाहीं. घट, कलश, कुंभ या शब्दाप्रमाणे तो एक कर्माचाच पर्याय शब्द आहे. कारण, ते कर्माहून भिन्न आहे, असे म्हटल्यास प्रमाणाच्या योगाने त्याची सिद्धि करिता येत नाही. कर्त्या पुरुषाची कर्मे वर सांगितल्याप्रमाणे वासनामय असतात. वासना मनोमय असते. म्हणजे मनाचाच तो एक विकार असतो, आणि मन पुरुषाहून भिन्न नाहीं. कारण, ती त्याचीच शक्ति आहे व त्याचाच परिणाम आहे. कोणताही विवर्त परिणाम उपादान कारणाहून निराळा नसतो. पुरुष तर वस्तुतः निर्विकार चैतन्यरूप आहे. तेव्हा स्वतंत्र मनाच्या अभावी वासनेचा अभाव तिच्या अभावीं कर्माचा अभाव व कर्माच्या अभावीं कर्मरूप दैवाचाही अभाव सिद्ध होतो. यास्तव, बा रामा, सत्, असत्, चित्, जड, भेद, अभेद इत्यादि रूपानें तत्त्वत: निश्चय न करिता येण्यासारिख्य मनाशी तदात्म्य पावलेल्या पुरुषासच मन, चित्त, वासना, कर्म, दैव इत्यादि संज्ञा प्राप्त होतात. यावरून, पुरुष स्वतंत्र आहे; तो दैवाधीन नाही तो दृढ भावनेने जसा जसा प्रयत्न करतो तसे तसे फळ भोगितो, हे तुला चांगले समजेल. अकस्मात् एकादी गोष्ट घडते असे जे आपणास वाटत असते तो भ्रम आहे. सृष्टीत कारण व कार्य याचाच सर्व विलास चालला आहे. काही कार्याचे कारण जवळ असते व एकाद्याचें दूर असते संकुचित दृष्टीच्या लोकास दूरचे कारण दिसत नाहीं व त्यामुळें ते त्याच्या कार्यास अकस्मात् प्राप्त झालेले, असे म्हणतात. तात्पर्य हे समजावे, पौरुषानेच सर्व प्राप्त होते, असे तूं निःशंकपणे जाण.

श्रीवसिष्ठाचा हा अमृततुल्य उपदेश ऐकून रामचंद्र पुनः ह्मणतो— भगवन्, प्राक्तन वासनासमूह मला जशी प्रेरणा करितो, तसें मी वर्तन करितो. मज कृपणाच्या हातून अधिक काय होणार?

यावर भगवान् वसिष्ठ ह्मणतात—बरे आहे; प्राक्तन कर्माच्या अधीन असणाऱ्या तुला पूर्व प्रयत्नाच्या फळांत जरी बदल पाडता न आला, तरी उत्तर कालीं जे फळ तुला मिळवावयाचें आहे तदनुकूल व्यापार करण्यास तू स्वतंत्र आहेस. ह्मणजे त्याच्याकरिता योग्य प्रयत्न करिता येणे शक्य आहे शिवाय, तुला जो हा सद्विवेकाने युक्त असा जन्म प्राप्त झाला आहे, त्यावरूनच तुझ्या पूर्वीच्या सत्—प्रयत्नाचें अनुमान होते. तेव्हा प्राक्तन तुझ्या प्रयत्नाच्या आड येईल, अशी भीति बाळगणें व्यर्थ आहे. कारण, प्राक्तन वासनाचा समूह शुभ व अशुभ असा दोन प्रकारचा असतो. त्यातील शुभ वासनाच्या ओघातून जो जात असतो त्याला शुभाचरण करिता करिता नित्य पद प्राप्त होते. त्यास विशेष प्रयत्न करावा लागत नाहीं. पण ज्या दुर्भाग्यास अशुभ वासनासमूह अशुभ कर्मांत प्रवृत्त करीत असतो, त्यास मोठ्या धैर्याने व प्रयत्नानें प्राक्तन कर्म जिंकावे लागते. यास्तव रामा, तू असा कुकल्पना करीत बसू नकोस. तू सूज्ञ आहेस; केवल चैतन्य हेच तुझे सत्य—स्वरूप आहे; हा जड देह तू नव्हेस; मग तू कोणाच्या अधीन असणार? बाबारे, जड पदार्थ चेतनाच्या अधीन असतात. चेतन कोणाच्याही अधीन रहात नाहीं. पारतंत्र्य हा धर्म ब्रह्मदेवाने जडाच्या नशिबी लिहिला आहे. चेतनाच्या नाही पण तू जर असे ह्मणशील की, मी जरी चेतन आहे, तरी मला दुसरे चेतन प्रेरणा करिते, तेव्हा मी त्याच्या अधीन आहें. तर ते फार वेळ टिकणार नाहीं. कारण, चेतनालाही दुसरे चेतन आपल्या स्वाधीन ठेवते, असें एकदा ह्मटल्यावर त्याला स्वाधीन ठेवणारे तिसरें चेतन, त्याला स्वाधीन ठेवणारे चवथे, त्याला पाचवें, सहावें, सातवे, दहावे, शंभरावें; सहस्रावे इत्यादि प्रकारे अनवस्था प्राप्त होते. ह्मणजे कोणत्या चेतनास मूल समजावे त्याचा निर्णय होत नाही. यास्तव, ते स्वतंत्र आहे हा सिद्धांत ध्यानांत धर. तुज स्वतंत्र चेतनास प्रतिबंध करण्यास कोणी समर्थ होणार नाही. बा सत्पुत्रा, शुभ व अशुभ या दोन मार्गांनीं वासनारूपी नदी वाहत असते. तिला दीर्घ प्रयत्नाने शुभ

मार्गानेच वाहू द्यावे. बा शूरा, अशुभ मार्गांत गेलेल्या मनास मोठ्या धैर्यानें शुभ मार्गांत आणावे. कारण, ते बालकाप्रमाणें आहे. बालकास एकीकडे डिवचले असता ते जसें दुसरीकडे जातें, त्याचप्रमाणें मनास एकीकडून चाळविले असता तें दुसरीकडे जाते. हा एक त्याचा चागला स्वभाव आहे. त्याच्यापासून लाभच करून घेतला पाहिजे. अशुभात गढून गेलेल्या मनास शुभाकडेच वळवावें. या चित्तबालकास हळु हळु चुचकारून वश करून घ्यावें. शुभवासनाचा समूहच दृढ करावा. मागच्या वासनाचा समूह शुभ होता की, अशुभ या विचारात फारसा काल घालवू नये. प्राणी ज्याचा अभ्यास करितो त्यातच तो प्रविण होतो; हे तत्त्व विसरू नको. दृढ प्रयत्न कर. पच ज्ञानेंद्रियांस जिक. हींच महा दुष्ट आहेत. कर्मेंद्रिये बिचारी निरुपद्रवी व परतत्र असतात. त्यास प्रेरणा करणाऱ्या मनास भलभलत्या नादी लावणारीं हीं ज्ञानेंद्रियेच मोठीं घातकी आहेत. तत्त्वाचा साक्षात्कार होईपर्यंत तू गुरूचे व शास्त्राचे वचन हेच परम प्रमाण आहे, असें समजून या शुभ वासनाचा अभ्यास कर. पुढे तत्त्वसाक्षात्कार होऊन तुझ्या चित्तावरील वासनामल नाहींसा झाला कीं, मग तूं या शुभ वासनाचाही त्याग कर. याप्रमाणे चालल्यास कोणाचेंही परम कल्याण झाल्यावाचून रहाणार नाहीं ९.

**सर्ग १०**—*या सर्गांत, वसिष्ठ मुनि—धात्याचा व आपला जन्म, समस्त जनाच्या मुक्तीकरिता त्यानें आपणास केलेला उपदेश—इत्यादिकाचें वर्णन करितात.*

**श्रीवसिष्ठ**—राघवा, सच्चिदानद–स्वप्रकाशरूपाने पर–ब्रह्मच सर्वत्र सम व सर्वानुकूल होऊन राहिले आहे. त्याच्यायोगानेंच कालादि सर्व पदार्थ सत्ता( अस्तित्व )वान् झाले आहेत. अर्थात् काल, नियति, भवितव्यता इत्यादि सर्व त्या सत्तेचेच प्रकार आहेत. तेव्हा भवितव्यतेमुळे ह्मणजे भविष्यत्काली अवश्य होणाऱ्या गोष्टींमुळें तरी, पुरुष परतंत्र होऊन राहील हें ह्मणणे व्यर्थ आहे. कारण व कार्य यामध्यें अनुक्रमे नियामक व नियम्य अशी जी दोन प्रकारची शक्ति आहे, ती या ब्रह्मसत्तेहून भिन्न नाही. यास्तव, कारण असले कीं, कार्याने अवश्य निर्माण होणे व कार्य असले कीं, कारणाने त्यापूर्वीच अवश्य असणें ही नियति ( नियम ) ईश्वर व प्रयत्न याच्यावर सर्व भार टाकून रहाणाऱ्या पुरुषास कांहीं करू शकत नाही. उलट, ती त्यास अनुकूल होते.

करिता, बा धीरा, आता उगीच कल्पना व कुतर्क यात काल न घालविता अवश्य कल्याण करणाऱ्या पौरुषाचा आश्रय कर; व मी आणखी काय सागत आहे, ते चित्त एकाग्र करून ऐक. इद्रिये विषयांच्या अभिलाषावर आरूढ होऊन मोक्षाच्या अलीकडे असणाऱ्या—म्हणजे मोक्षा—पुढे तुच्छ असलेल्या-ऐहिक व स्वर्गादि पारलौकिक विनाशी सुखामध्ये जाऊन पडत असतात. यास्तव, त्याचा मनोरथरूपी रथच तोडून टाकण्याचा प्रयत्न केला पाहिजे. मनोरथ व विषयाभिलाष याचा एकच अर्थ आहे. तो नाहीसा झाल्यावर इद्रियाची गतिच खुटली, असे समज. मनाला स्थिर केले की, मनोरथ शात होतो. यास्तव, अगोदर तू मनाचा निग्रह कर. मनाचे नियमन करणे हे एक मोठे कठिण काम आहे खरें; पण दृढ प्रयत्नाने ते केल्यावाचून गत्यतर नाहीं. मन स्थिर झाले असता या लोकी जीवन्मुक्ति व परलोकी विदेहमुक्ति देणारी व मोक्षाचे अनेक उपाय सुचविणारी ही साररूप सहिता तू ऐक पण ही सहिता ऐकणारा उत्तम अधिकारी असेल तरच त्यास परमार्थप्राप्ति होईल. यास्तव श्रवणसमयी तू शाति व विरक्ति या दोन उत्तम गुणानी युक्त होऊन रहा. कारण त्यावाचून वक्त्याच्या पूर्वापर वाक्याचा सदर्भ, गर्भितार्थ, तात्पर्य इत्यादि श्रोत्याच्या ध्यानात येणार नाही, व मनाचे अनुसधान आत्म्याकडेच रहाणार नाही. सासारिक सुख व दु:ख या दोघाचाही क्षय करून महा आनद देणारा हा मोक्षाचा उपाय मी तुला सागतो. या सर्व विवेक्यासह ही मोक्षकथा ऐकल्याने तू दु:खरहित व क्षयशून्य स्थानी जाशील. चित्तास परम आह्लाद देणारे हे तत्त्वज्ञान पूर्वी परमेष्ठी पितामहाने सागितले. इतक्यात दशरथनदन हात जोडून ह्मणाला—स्वामिन्, त्या स्वयभू परमात्म्याने आपणास हे ज्ञान कोणत्या उद्देशानें सागितले? व आपण ते कसे प्राप्त करून घेतलेत, ते मला सागा. यावर वसिष्ठ ह्मणाले—रघुवीरा, मायेच्या अनत विलासाचा आधार, सर्वांतर्यामी, व सत्तारूप चैतन्यात्मा आहे. तोच सर्व जीवाच्या हृदयातील प्रदीप होय. चैतन्यरूपाने त्याचें सर्वास भान होत असते. मायाकार्याची उत्पत्ति व लय या दोन्ही काळीं तो निर्विकार असतो. सागरात जसा तरग उत्पन्न व्हावा .त्याप्रमाणे त्या चैतन्यात्म्यापासून सर्व कार्यास व्यापून रहाणारा विराट्, सूक्ष्मभूताच्या उत्पत्तीनतर उत्पन्न झाला. त्या विष्णूच्या—मेरु हीच

ज्याची कर्णिका आहे, दिशा ह्याच ज्याच्या पाकळ्या आहेत; व नक्षत्रा-सह तारागण हीच ज्याची केसरे आहेत अशा - हृदयकमळापासून वेद व वेदार्थ यास जाणणारा आणि देव व मुनि याच्या मंडलाने मंडित असलेला परमेष्ठी निर्माण झाला. त्यालाच ब्रह्मदेव किंवा पितामह ह्मणतात. मनुष्याचे मन ज्याप्रमाणे संकल्पविकल्पाचे ओघ निर्माण करिते त्याप्रमाणे त्याने ही सर्व सृष्टि निर्मिली. जंबू–द्वीपाच्या या भारतवर्षसंज्ञक एका कोनात आधिव्याधियुक्त, जरामरणसंपन्न, लाभ व अलाभ याच्यायोगाने खिन्न व नाना संकटानी व्याप्त अशा जीवास उत्पन्न केल्यावर त्याच्या त्या भयंकर यातना पाहून त्या स्रष्ट्यास दया आली. पुत्राचे क्लेश पाहिल्या-वर पित्याच्या मनाची जी अवस्था होते तीच त्याच्या मनाची झाली, व–या हताश झालेल्या दुःखी जीवाच्या दुःखाचा क्षय कसा बरे होईल–असे ह्मणून तो एक क्षणभर विचार करीत राहिला. त्याने प्रथम धर्म, तप, दान, सत्य व तीर्थे उत्पन्न केली, आणि नंतर पुनः विचार करून तो ह्मणाला; याच्या योगाने या सृष्टीतील जनाच्या दुःखाचा उच्छेद होणार नाही. ज्याच्या योगाने जनन–मरणादि क्लेशाचाही नाश होतो ते निर्वाण–नामक सुख केवळ ज्ञानानेच प्राप्त होणे शक्य आहे. या संसारातून पार होण्यास ज्ञान हाच एक उपाय आहे. धर्म, तप, दान इत्यादि सर्व त्या ज्ञानाची योग्यता देणारी आहेत. यास्तव मी आता त्या ज्ञाना-सच प्रकट करितो. असा विचार करून त्या सत्यसंकल्प ईश्वराने मला केवल संकल्पाने निर्माण केले. मी कसा व कोठून उत्पन्न झालो, याचे मला मुळीच भान नाही. पण ज्याच्याजवळ कमंडलु आहे व हातात स्मरणी आहे अशा त्या पित्यापुढे मी हातात कमंडलु व माळ घेऊन उभा आहें, असे मीं पाहिले. त्याबरोबर मीं त्या स्वामीस नमस्कार केला. तेव्हा “ पुत्रा, ये, ” असे ह्मणून त्याने मला आपल्या कमलरूप आसनाच्या उत्तरकडील दलावर बसविले, व तो मला ह्मणाला,–“ बा पुत्रा, वानराप्रमाणे चंचल व चेष्टा करणारे हे तुझे मन एक क्षणभर अज्ञानात प्रवेश करो. ” त्या-बरोबर मी विचारशून्य झालो, आपल्या निर्मल स्वरूपास विसरलो; पूर्वीचे माझे समाधान पार नाहीसे झाले; मी दीन होऊन राहिलो; व एकाद्या निष्कांचन मनुष्याप्रमाणे मी शोकसंतप्त झालो. “ अरेरे या दुष्ट

व कष्टकर संसारांत मी कसा आलो" असे शब्द माझ्या तोंडातून निघाले. ते ऐकून तो दयाळु पिता ह्मणाला–" बाळका, तू असा दुःखी का झाला आहेस ? दुःखाचे निवारण कसे होईल हीच चिंता असली तर मला विचार; ह्मणजे नित्य सुखी होशील, " हे ऐकताच " हे प्रभो, प्राण्यास हा महा दुःखमय संसार कसा प्राप्त झाला व तो क्षीण कसा होणार? " असा प्रश्न मी त्यास केला. तेंव्हा त्या लोककर्त्यानें संसार–व्याधीवरील अव्यभिचारी ( रामबाण ) औषध मला सांगितले. त्यानें सांगितलेले ते बहुत प्रकारचें ज्ञान अति पवित्र असून चित्तास तात्काल शांति देणारे आहे. असो, मला सर्व काही ज्ञात झाले आहे व मी कृतकृत्य झालो आहें, असे जाणून सृष्टिकर्ता मला पुन: ह्मणाला, " पुत्रा तुला शाप देऊन व अज्ञ बनवून मी पृच्छक तयार केला, व सर्व लोकांच्या उपयोगी पडणारें हे ज्ञान सांगितले. आता माझ्या कृपेनें तुला तुझे स्वाभाविक ज्ञान प्राप्त होईल. तू भूलोकी जा, व जंबूद्वीपातील भरतवर्षस्थ लोकांवर अनुग्रह कर. कारण तेथील लोक वैदिकमार्गावलंबी आहेत ते कर्मकांडात पूर्वीपासूनच तत्पर झालेले आहेत. पण त्यामुळे त्यांचे संसारदुःख नाहींसे होत नाही. यास्तव कर्मकांडाच्या अनुरोधानेच तू त्यास हे ज्ञान सांग. तुला जे कर्मकांडाचे अधिकारी आढळतील त्यास श्रद्धापूर्वक कर्मानुष्ठान करावयास लाव व जे विरक्त, आणि विचारी असतील त्यास ज्ञानाचा उपदेश कर. " राघवा, याप्रमाणे पित्याची आज्ञा झाली असता मी या लोकीं आलो, व त्याच्या इच्छेप्रमाणे मला, ही लोकपरंपरा असे पर्यंत, कोणत्याना कोणत्या तरी रूपाने अधिकाऱ्यास ज्ञानाचा उपदेश करीत येथें रहावयाचे आहे मला स्वत करिता काहीं करावयाचे नाही. तरी आपला नियोग पुरा करण्याकरिता मी उन्मनी–अवस्थेत सदा रहातो. माझे चित्त निजल्याप्रमाणे शांत असते व मी कोणतीही क्रिया करीत नाही. १०.

**सर्ग ११**—वर सांगितलेल्या ज्ञानावताराचा विस्तार, रामाच्या वैराग्याचा प्रशंसा आणि वक्ता व पृच्छक यांचीं लक्षणें यांचा या सर्गांत समावेश केला आहे.

**श्रीवसिष्ठ**—रामा, या लोकी ज्ञानाचा अवतार कसा झाला, तें मी तुला सांगितले. या माझ्या पित्याने मजप्रमाणेच सनत्कुमार, नारद इत्यादि दुसरेही अनेक मुनि या लोकीं पाठविले व त्यांच्या उपदेशाने कर्ममार्ग

व ज्ञानमार्ग सतत चालू झाले. हे दोन्ही मार्ग या सृष्टीत असेच चालू रहाणार. अज्ञान व मन याच्या योगानें हा संसाररोग वाढला आहे. त्यास नाहींसें करावयाचें झाल्यास निष्काम कर्मयोग व ज्ञानयोग या उपायाचाच क्रमाने आश्रय केला पाहिजे. असो, त्या मुनीनीं कर्मविभागार्थ व शास्त्रीय मर्यादेच्या पालनार्थ भिन्न भिन्न स्थळी राजे स्थापिले. त्याच्या करिता अनेक नीतिशास्त्रे निर्माण केली. स्मृत्या, पुराणे, यज्ञशास्त्र इत्यादि धर्मादि पुरुषार्थांचे उपाय सुचविणारे ग्रंथ रचिले; व येणेंप्रमाणे या लोकप्रवाहास सुव्यवस्थित केले. पण पुढे हे कालचक्र असेच चालले असता अनुष्ठानाचा क्रम शिथिल झाला लोक विषयासक्त झाले. सग्रह करण्याकडे त्याच्या चित्ताची प्रवृत्ति होऊ लागली. त्याबरोबर शीत-उष्ण, लाभ—अलाभ, इत्यादि द्वंद्वे त्याच्या बोकाडी येऊन बसली; प्रजाजन अनेक अपराध करून दड भोगू लागले जिकडे तिकडे क्लेशाच क्लेश माजला. राजास युद्धावाचून राज्य चालविणे अशक्य झाले. पण पुढे पुढे ते युद्धासही असमर्थ झाले व सर्व प्रजाजनासह दीन होऊन राहिले. हा सर्व अविवेकाचा विलास पाहून आमच्या चित्तात दया उद्भवली व आह्मी त्या राजास ज्ञानदृष्टीचा लाभ करून दिला ही अध्यात्मविद्या प्रथम राजास प्राप्त झाली. ह्मणून हिला राजविद्या व राजगुह्य असे ह्मणतात. या श्रेष्ट विद्येच्या योगाने राजे सुखी झाले साराश, बा रामा, याप्रमाणे अनेक राजे होऊन गेले असता आता तू या दशरथापासून उत्पन्न झाला आहेस. तुझ्या प्रसन्न चित्तात हें पवित्र व निर्निमित्त वैराग्य उत्पन्न झाले आहे. अनेक विवेकी पुरुषातील एकाद्या भाग्यवानासच वैराग्याचा लाभ होत असतो व तोही अनेक दुःखे भोगल्यावाचून होत नाही. ह्मणून त्यास राजस वैराग्य ह्मणतात. पण तुझें हें वैराग्य अशा प्रकारचे नाहीं. कांहींएक कारण नसतांना केवळ आपल्याच स्वाभाविक विवेकामुळे उत्पन्न झालेलें हे तुझें सात्त्विक वैराग्य आहे. या तुझ्या अपूर्व वैराग्याचे आह्मांस मोठें कौतुक वाटते. तुझ्यासारिख्या सज्जनास या घाणेरड्या विषयांकडे पाहून केवळ विवेकामुळेच उत्तम वैराग्य होतें. ज्या महात्म्यांस असे निष्कारण वैराग्य होते त्याचेच मन अति निर्मल असते. आपल्यापाशींच विचार करून या संसाररचनेचा निर्णय करणे, हे उत्तम पुरुषावाचून इतरास साध्य नाही.

आत्म्याचे स्वरूप ओळखून व हे जग मायिक आहे, असा निश्चय करून सर्व बाह्य पदार्थ, देह, इंद्रिये, मन, बुद्धि, अहंकार आणि अविद्या या सर्वांचा त्याग करावा. मरण, आपत्ति व दैन्य या दोषांचा पूर्ण विचार केल्यावर कोणाला वैराग्य होणार नाहीं? पण दुःखादि यातना सहन केल्यावर विरक्त होण्यापेक्षा केवळ विवेकाने आपोआप वैराग्य उद्भवणे अधिक प्रशस्त होय रामा, धन्य आहेस. परमेश्वराच्या प्रसादावाचून असे विचार सुचत नाहींत. त्या नाथाच्या कृपेमुळेंच तुझ्यासारख्या बालकाची शुभ बुद्धि विवेकाच्या मागे लागते. कर्मांचे अनुष्ठान, मोठे तप, नियम, दान, तीर्थयात्रा, इत्यादिकाच्या योगाने पूर्व दुष्कर्मांचा क्षय होतो व त्यामुळे प्राण्यास आत्मविचार सहज सुचतो. पण अनेक दुष्कर्मांचा क्षय होणेच फार कठिण आहे. कारण कर्मानुष्ठानादि साधने सर्वदाच शुद्ध भावनेने होत नाहींत. कधी काम तर कधीं लोभ, कधीं दंभ तर कधी मत्सर; त्यास दूषित करितात ह्मणून आत्मविचाराची इच्छा होणे हे मोठ्या भाग्याचे लक्षण आहे, असे तत्त्वज्ञ समजतात. त्या परम पदाचा साक्षात्कार जोवर झालेला नाही तोवर प्राणी या संसार–चक्रातून सुटत नाही. सकाम कर्मानुष्ठान या चक्रास एकसारखी गति देण्याच्याच उपयोगी पडतें. यास्तव निष्काम कर्मयोगाने व दानादि इतर साधनाच्या योगाने अगोदर चित्तशुद्धि करून घेऊन त्या परम पदाचे व संसाराचे यथार्थ स्वरूप जाणावें. देहादि मायिक वस्तूवरील अहं–मम–भाव सोडल्यावाचून चित्त वृत्ति आत्माभिमुख होत नाही. या संसार-सागरातून तरून जावयाचे झाल्यास ज्ञान हीच सुदृढ नौका सज्ज केली पाहिजे. आजपर्यंत जे महाजन यातून पार झाले त्या सर्वांनी याच युक्तीचा आश्रय केला, व पुढच्या लोकासही तिचाच आश्रय केला पाहिजे. राघवा, मी आता तुला ती युक्ति सांगतों. या जगात अनेक प्रकारची भीति आहे. उत्तम युक्तीचा आधार न धरिल्यास ती प्राण्यास व्याकुळ करून सोडते. थंडी, वारा, सूर्याची उष्णता इत्यादिकाच्या योगाने होणारे दुःख व वाणीचा वेग, काम–क्रोधादि मानस वेग, जिह्वा, उदर, उपस्थ इत्यादिकाचे वेग ज्ञानयुक्तीवांचून कसे सहन होणार? ते सर्व क्षणोक्षणीं प्राण्यांस अस्वस्थ व अधीर करून सोडतात. या शरीरास थोडेंसें अनिष्टही सोसत नाहीं. चिंता व दुःख यांवाचून प्राण्यांस दुसरे कामच नाहींसें होतें. तेव्हां अशा

या संकटातून पार पडावयाचे झाल्यास आत्मज्ञानावाचून दुसरा कोणता उपाय सफल होणार ? आत्मज्ञास ही संकटे काही करू शकत नाहीत. तत्त्वज्ञावाचून यास न जुमानणारा धीर दुसरा आढळत नाहीं. यास्तव, बा सत्पुत्रा, तत्त्वज्ञानाकरिता मोठ्या प्रयत्नाने योग्य ब्रह्मनिष्ठास शरण जावे. त्यास नम्रपणे प्रश्न करावा. तो हितकर्ता व सत्य-वक्ता जें सांगेल त्याच्यावर विश्वास ठेवावा. त्याचे प्रत्येक वचन हृदय कमलावर खोदून ठेवावे. अतत्त्वज्ञ व अनधिकारी पुरुषास जो असल्या गोष्टी विचारतो तो मूर्ख होय. प्रामाणिक तत्त्वज्ञास विचारून त्याच्या सांगण्याप्रमाणे जो वागत नाही त्याच्यासारिखा अधम पुरुष दुसरा कोणी नाही. वक्ता कसा आहे, याचा अनुभव घेतल्यावाचून जो मूर्ख प्रश्न करितो, तो अधम पृच्छक होय. त्यास गंभीर तत्त्वाचा लाभ कधीच होणार नाही. पूर्वापर विचार करून सांगितलेले तत्त्वज्ञान ग्रहण करण्यास ज्याची बुद्धि समर्थ असते त्यासच गूढ तत्त्व सांगावे. पशुधर्मी अधमास सांगू नये. प्रश्न करणारा प्रामाणिकपणे प्रश्न करीत आहे की, छल करीत आहे, याचा विचार न करिता जो तत्त्वार्थ सांगतो त्याची चांगल्या उपदेशकांत गणना होत नाही. बा रघुनंदना, तू अत्यंत गुणी पृच्छक आहेस व मी ही उपदेश कसा करावा हे जाणतों. यास्तव आजचा हा आमचा योग चांगला झाला आहे. बा सूक्ष्मार्थवेत्त्या, मी जे काही सांगेन ते चांगले समजून, तू आपल्या हृदयांत दृढ कर तू उदारचित्त, विरक्त व जनमर्यादेचे तत्त्व जाणणारा आहेस यास्तव तुला सांगितलेले काही-ही तुझ्या चित्तावर परिणाम केल्यावाचून रहाणार नाहीं. तुझे पूर्व अध्ययन मजजवळच झालेले असल्यामुळे तुझ्या बुद्धीचे गुण मला चांगले ठाऊक आहेत. निर्मल जलामध्ये जसे सूर्याचे बिंब प्रवेश करिते त्याप्रमाणे वक्त्याच्या प्रत्येक शब्दाकडे अवधान ठेवणारी व स्वभावतःच परमार्थाचा विवेक करणारी तुझी बुद्धि अर्थांत प्रवेश करीत असते. तरी मन अतिचंचल असल्यामुळे त्यास शुद्ध व स्थिर करून, मी काय सांगतो ते ऐक; असे सुचविल्यावा-चून रहावत नाही. अविवेकी, अज्ञ व असज्जन यांची संगति धरणारा जो पापी असेल त्याच्यापासून दूर राहून साधूंचा सत्कार करावा. सतत सज्जन–समागम केल्याने विवेक उत्पन्न होतो. भोग व मोक्ष हीं या विवेक-रूपी वृक्षाचींच फळें आहेत. शम, विचार, संतोष व साधु-समागम हे

चार मोक्षद्वारातील द्वारपाल आहेत. त्यांचे मोठ्या प्रयत्नाने सेवन करावे म्हणजे ते मोक्षरूपी राजगृहाचे द्वार उघडतात. प्राणाकडेही न महात यातील एकाचा तरी आश्रय न करणे यासारखे पाप नाही या चार द्वारपालांतील एक जरी वश झाला तरी हळु हळु इतर वश होण्याचा संभव असतो. विवेकी पुरुष शास्त्रार्थ श्रवण व मनन यास योग्य होतो तो सर्वांत श्रेष्ठ आहे, असे व्यवहारातही मानितात. अविवेक्याची मति उत्तरोत्तर मंद होऊ लागते व त्यास कोणी मान देत नाहींत, हे जगप्रसिद्ध आहे. यास्तव शास्त्र व सज्जन यांचा समागम, तप, दम, इत्यादिकांच्या योगाने अगोदर शुद्ध बुद्धि वाढवावी. चित्ताचे जाड्य घालविण्यास हेच उत्तम उपाय आहेत. श्रद्धेने शास्त्रावलोकन करणे यासारिखें तर बुद्धि, शुद्ध व वृद्धिंगत होण्यास औषधच नाही संसार हा विषवृक्ष आहे. सर्व दुःखांचा सांठा आहे. यास्तव मौर्ख्यास नाहींसे करून टाकण्यास विलंब लावू नये. दुराशाच्या योगाने चित्त संकुचित होतें. यास्तव त्याचा त्याग करावा ११.

**सर्ग १२**—या सर्गात, संसारगतीची अनर्थता, ज्ञानाचे उत्तम माहात्म्य, व रामाच्या ठायीं असलेली पूच्छकाच्या गुणांची समृद्धि याचे वर्णन केले आहे.

**श्रीवसिष्ठ**—चित्तातील रजोगुण व तमोगुण पुरुषास श्रेयोमार्गापासून हटवीत असतात यास्तव शुद्ध सात्त्विक वृत्ति धारण करून ज्ञान संपादन करावे. ब्रह्मसंज्ञक परमपदाचा साक्षात्कार झाला असता सर्वत्र शांतिच शांति अनुभवास येते. या विज्ञानाच्या योगाने चित्तास विश्रांति जर मिळाली नसती तर साधूंस या संसारातील अनिष्ट परिणाम कसे सहन करिता आले असते? या आत्म्याच्या साक्षात्कारामुळें सर्व मननवृत्ति नष्ट होतात. रामा, या संसारविषाच्या वेदना असह्य आहेत त्यास कमी (सह्य) करणारा, योग (चित्तैकाग्र्य) हाच पवित्र मंत्र आहे. पण तो सज्जनाबरोबर शास्त्रविचार केल्यावाचून प्राप्त होत नाही. शास्त्रीय पद्धतीनें विचार केला असता सर्व दुःखाचा क्षय अवश्य होतो. सर्प आपल्या शरीरावरील कात टाकून जसा नवा बनतो त्याप्रमाणे विवेकी पुरुष या आधिव्याधियुक्त शरीरास टाकून, म्हणजे "ते माझे आहे" असे न समजता, मी त्याच्याहून अगदीं निराळा व विलक्षण आहे, असे जाणून दुःखरहित व शांतचित्त होतो. गारुड्याच्या खेळातील वस्तूप्रमाणे ह्या मायिक जगाकडे

पाहून तो आपल्या चित्ताचे रंजन करून घेतो. त्यास या सृष्टीतील एकही पदार्थ बद्ध करू शकत नाही. पण असे यथार्थ ज्ञान ज्यास नसते त्यास सर्व बंध व सर्व दुःखें होतात. हा संसार अति कठीण आहे प्राण्यास हा सर्पाप्रमाणे दंश करितो, तरवारीच्या धारेप्रमाणे तोडतो, भाल्याप्रमाणें वेध करितो, दोरीप्रमाणे बांधतो, अग्नीप्रमाणे जाळतो, रात्रीप्रमाणे अंध करितो, निःशंकपणे घाला घालतो, उंचावरून मस्तकावर पडलेल्या पाषाणाप्रमाणे मोहित करितो; बुद्धीचे हरण करितो, मर्यादेचा नाश करवितो, मोहरूपी अंधकूपामध्ये पाडतो व तृष्णेच्या योगाने जर्जर करून सोडतो तात्पर्य, संसारी जीवास भोगावे लागत नाही, असे एकही दुःख नाही या भयंकर विषय–रोगाची चिकित्सा न केल्यास अनेक नरकाची प्राप्ति होते. त्यातील दुःखाचे वर्णन करवत नाही. पाट्यावर चटणी वाटतात त्याप्रमाणे यमदूत त्याच्या शरीरास वाटतात, विळीवर कापतात, अंगात खिळे बोचतात; करवतीने करवततात, तरवारीने तुकडे उडवितात; उंचावरून फेकून देतात, पाषाणांनी मस्तके फोडितात, डोळे काढितात, कान उपटतात; चंदनाच्या खोडाप्रमाणे घासतात, तरवारीच्या धारेवरून चालवितात; लोखंडाच्या तापवून लाल केलेल्या सांखळ्या अंगास बांधितात, सोलतात, व अशा प्रकारच्या अनेक यातना भोगाव्या लागतात. यास्तव, राघवा, सुज्ञ पुरुषाने अशा या चंचल व कष्टकर संसारचक्राकडे दुर्लक्ष्य करू नये. पुढे सांगितल्याप्रमाणें विचार करावा. शास्त्राचे चिंतन करावे. म्हणजे कल्याण होते. मग असे जर आहे, तर शास्त्रपरायण लोकासही अनेक अनर्थ का भोगावे लागतात ? म्हणून विचारशील तर सांगतो. मोठे ध्यानपरायण मुनी, मंत्र–जपपरायण ऋषी, कर्मठ ब्राह्मण, व जनकादि राजर्षी यास बाह्यतः जरी दुःख झाल्यासारिखें इतरास वाटत असले तरी ते अज्ञजनाप्रमाणे व्याकुळ होत नाहीत. कारण ते ज्ञानकवचाने आच्छादित झालेले असतात. दुःखाच्या प्रथम क्षणी ते किंचित् व्याकुळ होतात न होतात तोंच त्याचा विवेक जाग्रत् होतो. विवेक-जाग्रतीनंतर कितीही असह्य दुःख सहन करिता येणे फारसे कठिण नाहीं. संकट-प्रसंगी मूर्खाची अवस्था कशी होते, ते पहावे व विवेक्याची मुखचर्या कशी प्रसन्न असते, तेही सूक्ष्मदृष्टीने अवलोकन करावें. म्हणजे मी काय

म्हणतो त्याचा प्रत्यय येईल. रामा, फार काय सागू ? ब्रह्मा, विष्णु व महेश जसे तृप्त व विकल्पशून्य असतात त्याप्रमाणे आत्मज्ञ पुरुष तृप्त व कृतकृत्य होऊन रहातात. बाबारे, मनाचा मोह गेला, भ्राति नाहीशी झाली, शम हाती आला, चित्त प्रसन्न झालें; तत्त्व समजलें व व्यापक आत्म्याचा साक्षात्कार झाला म्हणजे हे जग रमणीय विहारस्थान होते. त्याच्यापासून पीडा होत नाहीं. तोडलेल्या वृक्षाप्रमाणे जड असलेला हा देह रथ आहे, इद्रिये घोडे आहेत, प्राणासह मन हा लगाम आहे, बुद्धि हा सारथि आहे व भोक्ता जीव रथात बसणारा रथी आहे, असे जो समजतो व आपल्या निरुपाधिक स्वरूपास ( उपाधिभूत अशा ) त्या सर्वाहून भिन्न जाणतो त्यास हे जग आनददायी होते १२.

**सर्ग १३**—वैराग्यादि गुण व जीवन्मुक्ति-फलानें युक्त असलेला शम याचे येथ विशेषत वर्णन करितात.

**श्रीवसिष्ठ**—रामा, या परमार्थदृष्टीचा आश्रय करून जे सुज्ञ आत्म्यास पाहतात ते महात्मे या ससारात आनद भोगितात. अनिष्ट अवस्था प्राप्त झाली तरी ते शोक करीत नाहींत; इष्ट अवस्था यावी अशी इच्छा करीत नाहीत, शुभ व अशुभ यास ते भिन्न पहातच नाहींत, असे ह्मटले तरी चालेल. ते लौकिक-दृष्ट्या सर्व करितात. पण स्वत च्या समजुतीप्रमाणे काही करीत नाहीत. कारण शरीरादिकाच्या हालचालीमुळे होणारे कर्म निर्विकार आत्म्याचे आहे, असे ते कधीच समजत नाहींत. ते निर्लेप होऊन रहातात. केवल शास्त्रीय कर्मच करितात. लौकिकातील सन्मार्गाने जातात जीवास नावडती वस्तु हेय ह्मणजे त्याज्य वाटते व आवडती वस्तु उपादेय ह्मणजे सग्राह्य वाटते, असा सामान्य नियम आहे पण आत्मज्ञ यातील एकाही पक्षाचा अगीकार करीत नाही. तर तो उदासीन होऊन आत्मस्वरूपातच तल्लीन होतो. आत्मसाक्षात्कार झाला असता मन सर्व चेष्टा सोडून व शात वृत्ति धारण करून सुखी होते. कारण विक्षेप हे दुःखाचे निमित्त आहे. आणि विषयाचे मनन व कौतुक हे विक्षेपाचे हेतु आहेत. यास्तव विषयमनन आणि कौतुक याच्या अभावीं विक्षेपाचा अभाव, विक्षेपाभावी दुःखाचा अभाव व दुःखाच्या अभावीं परमानदाचा भाव होणे युक्तच आहे. आत्मा हीच एक सत्य व आनदरूप वस्तु आहे आणि तदितर

सर्व पदार्थ अनित्य आहेत व दुःखरूप आहेत, असा निश्चय झाल्यावर विषयाविषयी मनन करण्याकडे किंवा त्याचे कौतुक करण्याकडे चित्ताची प्रवृत्ति होत नाहीं. आत्म्याच्या साक्षात्काराचे परम शांति व परम आनंद हे दृष्ट ( प्रत्यक्ष ) फल आहे. यास्तव पुरुषानें यावज्जीव आत्म्याचे श्रवण करावें, मननाचा अभ्यास करावा; त्याचे निदिध्यासन करावे व त्याचा साक्षात्कार करून घ्यावा. शास्त्र, गुरु व आपला अनुभव याची एकवाक्यता होईतो जो श्रवणादिसाधनांचे सतत अनुष्ठान करितो त्यास दृढ आत्मदर्शन होते. आत्मज्ञ पुरुष कोणत्याही कष्टकर अवस्थेंत जरी पडला तरी शास्त्राची अवहेलना करणाऱ्या व महाजनास तुच्छ मानणाऱ्या सुखी मूढांहून त्याची योग्यता कितीतरी श्रेष्ठ असते. कारण आपल्या शरीरातील मूर्खपणापासून जितके क्लेश होतात तितके व्याधीपासून, विषामुळे किंवा दुसऱ्या कोणत्याही आपत्तीच्या योगाने होत नाहीत. ज्याच्या चित्तास थोडासा तरी चांगुलपणाचा संस्कार झालेला आहे, त्याच्या मूर्खतेस हे अध्यात्मशास्त्र नाहींसे करून सोडते यास्तव त्याचे आदाराने श्रवण करावे. हातात खापर घेऊन चांडालाच्या दारोदार भिक्षा मागत फिरणेही एकवेळ पतकरेल ! पण मौर्ख्य पतकरणार नाही यास्तव राघवा, यातून सुटण्याकरिता माझ्यासारख्या आप्ताची संगति धरून स्वरूपास जाणून व जीवन्मुक्त होऊन जन्माचे सार्थक करून घ्यावे. या संसारयात्रेत दुःखे अनंत असून सुखाचा अगदी थोडा लेश आहे यास्तव त्यात आसक्त होऊ नये. अनंत व अनायास पद प्राप्त करून घ्यावे. ऐहिक विषयात आसक्त झालेले अज्ञ घोर नरकात पडतात हे कधींही विसरू नये. विरक्त महात्मे सर्व जगास पूज्य होतात. विवेक, वैराग्य व अभ्यास याच्या योगाने या घोर संसारनदीचे उल्लंघन करावे. या संसारात जो पुरुष आत्म्याविषयी निश्चित ( बेपर्वा ) होतो तो जळत्या घराच्या उंच माडीवर निजून रहातो, असे समजावे. अहो, ज्याची प्राप्ति झाली असता प्राणी या संसारात परत येत नाही व दुःखी होत नाही तें पद केवल ज्ञानाच्या योगानेच लभ्य आहे. ते नाहीच असे मूर्खपणाने म्हणू नये. कारण ते जर नसते तर हे सर्व जड जग ज्ञानशून्य व त्यामुळेच अंधतुल्य झाले असतें. शिवाय, जरी ते नसले तरी त्याचा नुस्ता विचार करण्यात

कोणती हानि आहे ? नसलेच तर तसा निर्णय होईल; व पुनः मनास रुखरुख रहाणार नाहीं, आणि असले तर त्याच्या विषयींचा संशय जाऊन चित्त स्थिर होईल; संसार क्षीण होईल व विचार न करितां, नास्तिकपणामुळे त्याचा अव्हेर केला, असे होणार नाहीं. पण या संसार-दुःखातून मुक्त होण्यास कोणता उत्तम उपाय आहे बरें ? असें म्हणून जेव्हां एकादा पुण्यवान् पुरुष त्याचा विचारच करूं लागतो तेव्हा थोड्याच कालात त्याचे सर्व संशय नाहीसे होऊन तो मोक्षास पात्र होतो. शुद्ध-आत्मभावासारखें स्वास्थ्य दुसऱ्या कशातही नाही. धन, मित्र, बांधव, नमस्कारादि–रूपाने हातापायाची चेष्टा, यात्राप्रसंगाने देशांतरगमन, उप-वासादिकाच्या योगाने शरीरास क्लेश देऊन बल, उत्साह, निद्रा इत्यादि-काचा क्षय, क्षेत्रनिवास इत्यादिकातील एकाही उपायानें तें स्वास्थ्य प्राप्त होत नाही. तर केवल श्रवणादि प्रयत्नानें साध्य होणारे जें मनाचें ऐकाग्र्य व त्यामुळे होणारा जो दृढ आत्मसाक्षात्कार त्याच्या योगाने तें साध्य आहे. एकांतात सुखकारक आसनावर बसून विचार करूं लागलें की असंभा-वना, असद्भावना, विपरीत–भावना इत्यादि दोषाचा क्षय होतो; चित्तवृत्ति ब्रह्माकार होते, अविद्येचा व विक्षेपादिकाचा नाश होतो व ते निरायास पद प्राप्त होते. ते स्थान म्हणजे सर्व असार सुखाची सीमा आहे. या-स्तव अगोदर मनास जिंकण्याचा प्रयत्न करावा. शम व संतोष याचें तेच साधन आहे. मनोजयामुळे अनंताशी दृढ तादात्म्य होते. हाच आनंद देणारा योग होय. त्या अवस्थेतील सौख्य अवर्णनीय आहे. शमाच्या योगाने कल्याण होते; शम हेच परम पद आहे, शम हाच शिव आहे; शम हीच शांति आहे व शम हेच भ्रांतिनिवारण आहे. जे शमाच्या योगानें तृप्त झाले आहेत, ज्याचा अंतरात्मा शीतल झाला आहे व ज्याचें चित्त शमाने भूषित झाले आहे त्याचे शत्रुही मित्र होतात. शमाच्या योगाने चित्त अति शुद्ध होते. शमाची शोभा मुखकमलावर चमकूं लागते. अहो, या शमाच्या ऐश्वर्यापुढे त्रैलोक्यातील ऐश्वर्य तुच्छ आहे. शांतचित्त पुरुषास दुःख होत नाहीं; तृष्णा व्याकुळ करीत नाहीत व मानसिक व्यथा पीडा देत नाहीत. शमाच्या योगानें शोभणाऱ्या पुरुषावर सर्व प्राण्याचा विश्वास बसतो. शांत चित्तात जे सुख होतें तें अमृतपानातही नाहीं. यास्तव, बा साधो, तृष्णारहित चित्तास शमा-

मृताच्या सेकाने टवटवीत कर. तू जें जे काही करशील ते ते शातचित्ताने कर. विषयोपभोग घेतानाही चित्ताच्या शातीस ढळू देऊ नये. शात व सम चित्ताचे तेज शरीरावरही व्यक्त होतें. असल्या पुरुषाकडे पाहून क्रूर प्राण्याच्या चित्तातही आदरभाव उत्पन्न होतो. पण अशा प्रकारचा शमसपन्न पुरुष कशावरून ओळखावा, ह्मणून म्हणशील तर सांगतों. शात साधूचे चित्त प्रमत्त नसते. त्याची प्रत्येक क्रिया विचारपूर्वक होते व त्यामुळे प्रत्येकजण त्याचे अभिनदन करितो. एकादी इष्ट किवा अनिष्ट वार्ता ऐकून त्यास हर्ष व शोक होत नाही. त्याचप्रमाणे इष्टानिष्ट स्पर्श, दर्शन, भोजन इत्यादिकाच्या योगानेही त्याच्या चित्तात चाचल्य उत्पन्न होत नाही. तो सर्व भूताचे ठायी समभाव ठेवितो. पुढे अमुक एक विषय आपणास मिळावा, अशी अगोदरच इच्छा करीत नाहीं अनिष्ट वस्तूचा वियोग व्हावा, असे मनात आणीत नाही. मरण, उत्सव, युद्ध इत्यादि प्रसगी त्याच्या मुखावर निजलेल्या पुरुषाप्रमाणे सदा प्रसन्नताच दिसते व कोणत्याही आपत्तीला तो भीत नाही. रामा या लक्षणानी युक्त असलेला शमसपन्न पुरुष सर्व तपस्वी, पडित, याज्ञिक व बलाढ्य राजे याहून श्रेष्ठ आहे. एवढ्याकरिता तूही दीर्घ प्रयत्नाने ही सिद्धि प्राप्त करून घे. महा प्रभावशाली साधूच्या या मार्गाचे परिपालन करण्यास तूच योग्य आहेस १३.

**सर्ग १४**—साधुसमागम, सच्छास्त्र व भावशुद्धि यानीं पुष्ट झालेला विचार, शम व सतोष यास कारण होत असतो यास्तव त्या(विचारा)चे येथे वर्णन करितात.

**श्रीवसिष्ठ**—शम, विचार, सतोष व साधुसमागम हे मोक्षाचे द्वारपाल आहेत, असे वर ह्मटले आहे. पण साधुसमागम, सच्छास्त्र व चित्तशुद्धि यानी पुष्ट झालेला विचारच शम—सतोषाचे कारण आहे. यास्तव अगोदर आत्म्याचा सतत विचार करावा. शम हा मोक्षाच्या चार द्वारपालातील पहिला द्वारपाल व विचार हा दुसरा द्वारपाल आहे. यास्तव शमाच्या वर्णनानतर विचाराचें स्वरूप, लक्षण, योग्यता इत्यादि सागितलें पाहिजे. परतु अर्थानर्थानुबधविचार, सारासारविचार, हेयोपादेयविचार, प्रमाणतात्पर्यविचार व आत्मतत्त्वपरीक्षा असे विचाराचे पाच प्रकार आहेत. स्वाभाविक प्रवृत्ति व विषय यास अनर्थानुबधिता आणि शास्त्रीयप्रवृत्ति व वैराग्य यास पुरुषार्थानुबधिता आहे, असें अन्वयव्यतिरेकादिकाच्या योगानें

जाणणे हा अर्थानर्थानुबंधविचार होय. जेथे स्वाभाविकप्रवृत्ति व विषय असतात तेथें अनर्थकारणत्व असतें, हा अन्वय व जेथे तीं दोन्हीं नसतात तेथें अनर्थकारणत्व नसतें, हा व्यतिरेक होय. शास्त्रीय प्रवृत्ति व वैराग्य आणि पुरुषार्थसंबंध याचे अन्वय-व्यतिरेकही असेच जाणावे. स्वदेह व स्त्री-पुत्र इत्यादिकांचे देह यांमध्ये शुद्धता मुळीच नाहीं. कारण त्याचे बीज, त्याचे—देह या अवस्थेतील रक्त-मास-मूत्र-विष्ठादियुक्त स्वरूप व त्याचा प्राण निघून गेल्यावर होणारा परिणाम याच्याकडे दृष्टि दिली असता त्यात शुद्धीचा गधही आढळत नाहीं. यास्तव सर्व शरीरे असार आहेत. त्याचप्रमाणें ब्रह्मलोकापर्यंत जितकी सुखें आहेत तीं सर्व अनित्य व दुःखमिश्रित आहेत. यास्तव त्यातही सार नाही, असा निश्चय करून शुद्ध, नित्य, व निरतिशय आत्मा हेच सार आहे, असा विचार करणें, हा सारासार-विचार होय. या दोन विचाराच्या योगाने मुमुक्षा ह्मणजे मुक्त होण्याची इच्छा होते. मुमुक्षेनतर मोक्षाचे साधन कर्म आहे कीं उपासना? कीं तीं दोन्हीं? की कर्म व ज्ञान? अथवा केवल ज्ञानच? या प्रश्नाचा निर्णय करणे हा तिसरा विचार होय. ज्ञानच मोक्षाचे साधन आहे, असे जरी ठरले तरी साख्य, वैशेषिक इत्यादि-शास्त्रजन्य ज्ञान मोक्षसाधन आहे की, वेदशास्त्रजन्य ज्ञान मोक्षसाधन आहे? वैदिकज्ञान जरी मोक्षाचे साधन असले तरी वेदाचे तात्पर्य द्वैतात आहे कीं अद्वैतात? सविशेष ईश्वरामध्ये की निर्विशेष ब्रह्मामध्ये? आत्म्यामध्ये कीं अनात्म्यामध्यें? याचा निश्चय करणे हा चवथा विचार होय. यासच श्रवण ह्मणतात. वेदादि प्रमाणाचे तात्पर्य अद्वितीय सच्चिदानद ब्रह्मामध्यें आहे, असा निश्चय जरी झाला तरी वस्तुतः आत्म्याच्या ठायी ते सर्व लक्षण सभवते की नाही, याचा निर्णय करण्याकरिता रत्न-परीक्षान्यायाने अनुभवनिष्ठ गुरु व सहाध्यायी याच्याशी सवाद करून जीव, ईश्वर व जगत् यांच्या तत्त्वाचा निश्चय करणे हा पाचवा विचार ह्मणजे आत्मतत्त्वपरीक्षा होय. या पाचातील पहिल्या तीन विचाराच्या योगानें नित्यानित्य-वस्तु-विवेक, इहामुत्रार्थ-फलभोगविराग ( वैराग्य ), शमादि-सपत्ति व मुमुक्षुत्व या चार साधनाची प्राप्ति होते, आणि शेवटच्या दोन विचाराच्या योगाने क्रमानें प्रमाणासंभावना ह्मणजे आत्मा व ब्रह्म यांच्या ऐक्याविषयी प्रमाणच नाहीं, ही शका व प्रमेयासंभवना ह्मणजे ऐक्याची असंभावना, निवृत्त होते.

पाहिले विचार भाग्यवानास आपोआप सुचतात. तरी पण आपला अनुभव दृढ करण्याकरितां त्यानीं गुरु व शास्त्र यांचें सहाय घ्यावे; व शेवटचे विचार गुरु व शास्त्र याच्या वाचून होतच नाहींत. यास्तव विचार करण्याकरिता गुरूस शरण जावें. विचाराच्या योगाने बुद्धि सूक्ष्मतत्त्वात प्रवेश करण्यास समर्थ होते. ससाराख्य दीर्घ रोगाचे, विचार हेच औषध आहे. चित्तसमाधान ( शम ) हे सर्व दुःखांतून पार जाण्याचें साधन आहे खरे; पण मोह समाधानास आच्छादित करून सोडीत असतो. यास्तव विचार करावा. विचाराच्या योगाने मोह जातो. सत्पुरुषांस विचारावाचून दुसरा उपाय सुचत नाही. विचाराच्या योगाने अशुभाची निवृत्ति व शुभप्राप्ति होते. बल, बुद्धि, तेज, प्रसगानुरूप स्फूर्ति, कर्मानुष्ठान व त्याचे फल ही सर्व विचाराने सिद्ध होतात. युक्त व अयुक्त यास व्यक्त करणारा विचार हा एक मोठा प्रदीप आहे. तो इष्ट वस्तूचा लाभ करून देतो. असल्या या श्रेष्ट व प्रचड विचाराचा आश्रय करून ससारसागरातून तरून जावे. याच्या योगाने मूढही कालातराने परमपदी लीन होतात. राज्य, सपत्ति, विपुल भोग, व नित्य मोक्ष ही या विचार कल्पवृक्षाचीच फळे आहेत, मनुष्यास केवल पशुच नव्हे तर राक्षस किंवा वेताळ बनविणारा अविवेक विवेकाच्या योगानेच नाहीसा होतो. सतप्त पुरुषास जल व चादणे ज्याप्रमाणे आह्लाद देते त्याप्रमाणे दुःखी प्राण्यास विवेक समाधान देतो. रात्री जसा पूर्ण चद्र शोभतो त्याप्रमाणे परमार्थ बुद्धींत विचार शोभतो. विचारी पुरुष सूर्याप्रमाणे दश दिशास प्रकाशित करितो. त्यास ससाराचे भय मुळीच वाटत नाहीं. विचार करी पर्यत या सृष्टीतील भाव (वस्तु) सुदर भासतात. शास्त्र व गुरु याच्या सहायाने विचार केला असता परमानदाचा अविर्भाव होतो. परमानदाच्या योगाने चित्त निःस्पृह होते. त्यास अचलत्व येते, व त्यामुळें प्राणी कृतकृत्य होतो. या अवस्थेत ज्ञानी पुरुषाचे चित्त नष्टही होत नाही व विक्षिप्तही होत नाही. तर तो या जगाकडे उदास वृत्तीनें पहात रहातो. गत वस्तूची उपेक्षा करितो. प्राप्त होईल त्याप्रमाणे व्यवहार करितो. कधी क्षुब्ध होत नाही व कधीं अक्षुब्ध असल्यासारखाही भासत नाही. चित्त स्थिर होणे, यातच सर्व कल्याण आहे. पूर्ण मनाच्या योगानेच महा उदार महात्मे जीवन्मुक्त होतात व पुढे दीर्घकाल त्याच अवस्थेत राहून शेवटी विदेह मुक्त होतात.

यास्तव विचार करावा. मी कोण ? व हा संसार कोणाचा ? असा विचार, कुटुंबभरणादिकाकरिता व्यवहार करीत असतांनाही, श्रवणादिद्वारा करावा. व्यवहारातही विचाराने अनेक कामे कशी होतात, हे सवास ठाऊकच आहे. कर्मकांड व ज्ञानकांड याच्या, क्रमाने, धर्म व ब्रह्मतत्त्व या सिद्धांतस्थिति आहेत व त्या विचारानेच ज्ञात होतात. नेत्रहीन पुरुषास अंध ह्मणण्यापेक्षा विवेकहीनास अंध ह्मणणेच युक्त आहे. अनेक प्रकारच्या रोगांनी जर्जर झालेल्या पुरुषास जितके दुःख होते, त्याच्या सहस्रपट दुःख अविवेक्यास होणार, असे समजावे. कारण रोग्याचे दुःख शरीरात प्राण असेपर्यंतच त्याच्या अनुभवास येणार, हे उघड आहे. पण अविवेक्याचे दुःख अनेक कल्पांनीही सपणे शक्य नाही. यास्तव विवेकी सत-चिखलात बेडूक होऊन रहाणे, विष्ठेत जंत होऊन लुवलुवणे व गुहेत सर्प होऊन पडणेही पतकरेल, पण मनुष्य होऊन अविवेकी रहाणे पतकरणार नाही, असे सतत ह्मणत असतात. विचाराच्या योगानेच तत्त्वज्ञान होते. तत्त्वज्ञानाने चित्त शांत होते व चित्ताच्या शांतीने सर्व दुःखाचा क्षय होतो. यास्तव, बा रामा, असे उत्तम फल देणारा हा विचार तुला आवडो व तो करण्याची सद्बुद्धि तुला होवो १४.

सर्ग १५—कल्पवृक्षाच्या छायेप्रमाणे अतिशय सुखशीतल असलेल्या मोक्षाच्या संतोष नामक तृतीय द्वाराचे येथे वर्णन करितात.

**श्रीवसिष्ठ**—मोक्षाचा तिसरा द्वारपाल संतोष आहे. त्याच्या सारखे दुसरे कल्याण नाही संतुष्ट पुरुषास श्रेष्ठ विश्रांति मिळते. त्यांना साम्राज्यही तृणासारिखे तुच्छ वाटते. रामा, संतोषाने भूषित झालेली बुद्धि संसारातील कठिण प्रसंगींही उद्विग्न होत नाही. संतोषरूपी अमृत पिऊन जे तृप्त होतात त्यास ही विपुल भोगश्री विषासारखी वाटते. मला वाटते की, अमृताच्या धाराही प्राण्यास संतोषाप्रमाणे समाधान देणार नाहीत. जें प्राप्त नसेल त्याच्या विषयींची वांछा सोडून व जे प्राप्त होईल त्याच्याविषयींही उदास राहून, आनंदात काल घालविणे, हे संतोषाचे लक्षण आहे. आत्म्यामध्येच प्रसन्न होऊन रहाण्याची सवय मनास जोपर्यंत् लागलेली नसते तोपर्यंतच सर्व आपत्ती व सर्व दुःखे अनुभवास येतात. संतोषामुळे शीतळ झालेले चित्त शुद्ध विज्ञानाच्या योगानें विस्तृत होते. पण आशाच्या योगाने अस्थिर व संतोषशून्य चित्तात

ज्ञानाचा उद्भवच होत नाही. ज्याचे मन चितारहित व त्यामुळे व सतुष्ट असते त्या दरिद्री पुरुषासही साम्राज्य-सुख मिळते. सतुष्ट पुरुषाचा व्यवहार फार शातपणें चालतो. यास्तव, राघवा, तृष्णेचा त्याग करून, या चितामणीचा अंगीकार करावा. राजापुढे सेवक जसे हात जोडून उभे असतात त्याप्रमाणे सतुष्टचित्त पुरुपापुढे सर्व ऋद्धि किकरी होऊन रहातात. सिद्ध, गंधर्व व देव, त्याच्याकडे मोठ्या आदराने पहातात व महामुनी त्यास पाहून माना डोलवितात. यास्तव तुझ्यासारख्या उत्तम साधकाने सतोषाचा अवश्य स्वीकार करावा १९.

**सर्ग १६**—मोक्षाच्या साधुसमागम नामक चवथ्या द्वाराचे वर्णन करून त्या चार उपायातील एकेकाचे अनुष्ठान केले तरी परम फल मिळते, असे येथें सागतात.

**श्रीवसिष्ठ**—आता राहिलेल्या साधुसमागमाचे थोडक्यात वर्णन करितो. तो सर्व अवस्थामध्ये उपकारक आहे. साधुसगनामक वृक्षाचेच विवेक हे पुष्प आहे. व त्यास शम आणि सतोष ही फळे लागतात. या साधु-समागमामुळे मनुष्य मोक्षास पात्र होतो. विद्वज्जनाच्या समागमामुळे शून्यस्थान परिपूर्ण असल्यासारिखे भासते, मृत्यु मोठा उत्सव वाटतो, व आपत्ति सपत्तीप्रमाणे आवडते. साधुसमागमाच्या योगाने बुद्धि वाढते, अज्ञान हळु हळु क्षीण होऊ लागते, वैराग्य बळावते, व सन्मार्ग दिसू लागतो. यास्तव कष्टकारक दशेतही साधुसमागम सोडू नये. साधुसमागम ही एक गगाच आहे. तिच्या पात्रात प्रवेश करून ज्यानीं स्नान केले आहे, त्यास दाने, तपश्चर्या, तीर्थे व यज्ञ काय अधिक देणार आहेत ? निरिच्छ, सशयरहित व हृदयग्रथिशून्य, असे साधु असल्यावर तप व तीर्थे करण्याचे काय प्रयोजन ? ज्याचे मन शात झाले आहे, अशा धन्य साधूचे दर्शन अवश्य घ्यावे. दारिद्र्य, मरण इत्यादिकाच्या योगाने होणारे दुःख साधुसमागमाने नाहीसे होते. जे मूर्ख साधूचा अपमान करितात ते नरकात पडतात व त्यास अनेक असह्य यातना होतात.

असो, रामा, या ससारसागरातून तरून जाण्यास शम, विचार, सतोष व साधुसमागम हे चारच उपाय आहेत. पण त्या सर्वाचा एकाच वेळी अभ्यास न करिता आल्यास त्यातील एका उपायाचा तरी पुरुषाने

सतत अभ्यास करावा. ह्मणजे कालांतरानें ते सर्व त्याच्या हातांत येतात; त्यामुळें त्यास सर्व वैभव प्राप्त होतें; त्याच्या ठायी सर्व गुण येतात; त्यास सर्व जय मिळतात व तो पूज्य होतो. यास्तव त्यातील एकाचा तरी सतत अभ्यास करावा. प्रयत्नावाचून ही गोष्ट साध्य होणार नाहीं. करितां दीर्घ प्रयत्न करावा. रामा, प्रयत्नाने वरील गुण सपादन करून घेण्याविषयीं जोपर्यंत तूं निश्चय केला नाहींस, तोपर्यंत तुझे वैराग्य निष्फळ आहे. देव, गधर्व, मुनी, मानव यांतील कोणालाही या उपायांवाचून गत्यतर नाही. शमादिकाच्या योगाने सर्व दोष क्षीण होतात. कारण एकादा जरी चागला गुण वाढला तरी त्यामुळे हळु हळु सर्व गुण वाढतात व दोष क्षीण होतात आणि एकादा जरी दोष वाढला तरी तो आपल्या सजातीयास हळु हळु आणितो व विजातीयास घालवितो, असा नियम आहे. चित्तातील मोहवनात वासना नावाची नदी मोठ्या वेगाने वहात असते. शुभ व अशुभ ही तिची दोन तीरे आहेत. प्राणी आपल्या सतत प्रयत्नाने तिला ज्या तीराकडून वाहू देईल त्याप्रमाणे त्याचे कल्याण किंवा अकल्याण होईल. यास्तव रामा, प्रयत्न कर. वासनानदीच्या प्रवाहास अशुभ तीराकडे जाऊ देऊ नको. ह्मणजे तुझे थोडेसेही अकल्याण होणार नाही १६.

**सर्ग १७**—या सर्गात, ग्रंथाची सख्या, प्रकरणे, प्रत्येक प्रकरणाचा विषय इत्यादिकाचे वर्णन करितात.

**श्रीवसिष्ठ**—राघवा, येथवर मी तुला ज्ञानसाधने व अधिकाऱ्याचे गुण सागितले यात विचार मुख्य आहे. त्यासह वर सागितलेले गुण ज्याच्यामध्ये असतील तोच या पुढच्या ज्ञानाच्या गोष्टी ऐकण्यास योग्य आहे. ज्याचे मन व विचार शुद्ध आहेत, तोच या शुद्ध ज्ञानाचे ग्रहण करू शकेल, हे निराळे सागावयास नको. तुझ्या ठायी श्रोत्याचे सर्व गुण आहेत. यास्तव तू ही पुढील ज्ञानसहिता ऐक. ज्याचा पुण्यरूपी कल्पवृक्ष फळास येतो त्यासच हे ज्ञान ऐकण्याची सदिच्छा होते. अतिशय कल्याण होण्याचा प्रसग आल्यावाचून या गोष्टी रुचत नसतात. म्हणूनच या आत्म्याचे श्रवण करणारे नेहमीं थोडे आढळतात या सहितेचे एकदर बत्तीस हजार श्लोक आहेत. मोक्षाचे उपाय सागणे हा हिचा मुख्य उद्देश आहे.

आपला पाय भाजावा अशी इच्छा नसतानाही, अग्नीवर तो पडला असतां जसा भाजतो, त्याप्रमाणे आपण मुक्त व्हावे अशी जरी कोणाची इच्छा नसली तरी ही सहिता नुसती कानावरून गेल्यास निर्वाण प्राप्त होते. ही अतिशय सुख व शाति देणारी आहे. यात अनेक युक्तियुक्त वाक्ये व दृष्टात आहेत. या सहितेची एकदर सहा प्रकरणे असून त्यातील वै-राग्यनामक पहिले प्रकरण आहे. त्यात तुझ्याच वैराग्याचे वर्णन करून, अधिकारी पुरुषास वैराग्य कसे प्राप्त झाले पाहिजे, ते सुचविले आहे. त्याच्या श्रवणाने श्रोत्याचे वैराग्य वाढते. त्याची ग्रथसख्या दीड सहस्र आहे. त्या सर्व प्रकरणाचे उत्तम प्रकारे मनन केल्यास चित्त शुद्ध होते. मुमुक्षुव्यवहारनामक दुसरे प्रकरण असून त्याची ग्रथसख्या एक सहस्रच आहे. या प्रकरणांत मुमुक्षूच्या स्वभावाचे वर्णन केले आहे. तिसरे उत्पत्तिप्रकरण अनेक दृष्टात व आख्यायिका यानी भरलेले आहे. त्याची ग्रंथसख्या सात सहस्र असून ते विज्ञानाचे प्रतिपादन करिते. हे—भोक्ता व भोग्यरूप—जग वस्तुत. उत्पन्न झालेले नसताना ते उत्पन्न झाल्यासारिखे भ्रमाने भासते, असे यात वर्णन केले आहे. याचे श्रवण केल्याने सर्व सृष्टि अतःकरणातच कशी साठविलेली आहे व सोने आणि कडे, जल आणि तरंग, इत्यादिकाप्रमाणे ब्रह्म व सृष्टि याचा सबध कसा आहे, हे चागले समजते चवथ्याचे नाव स्थितिप्रकरण आहे. त्यात तीन सहस्र श्लोक आहेत. प्रपच व त्याचे अधिष्ठान याच्या स्थितीचे वर्णन व कथा याचे त्यात बाहुल्य आहे. ब्रह्मच जगद्रूपाने व अहभावरूपाने स्थित आहे, असे प्रतिपादन करण्याचा त्यात मुख्य हेतु आहे पाचव्या उप-शम—प्रकरणाचे पाच सहस्र श्लोक आहेत. हे सुदर प्रकरण युक्तियुक्त व रमणीय आहे. याच्या श्रवणाने चित्त शात होते. कारण, हा जगद्-भ्रम शात कसा होईल, हें यांत चागल्या रीतीने स्पष्ट केले आहे. सर्व रचना काल्पनिक आहे, स्वप्नतुल्य किवा मनोराज्याप्रमाणे आहे, असत् आहे, हा परम सिद्धात या प्रकरणांत व्यक्त केला आहे. सहाव्या प्रकरणाचे निर्वाण असे नाव आहे. त्याची ग्रंथसख्या साडेचवदा सहस्र आहे. त्याच्या पठनाने अविद्येचा समूळ उच्छेद होतो; सर्व कल्पना शात होतात, मोठे कल्याण होते; चैतन्यात्मा निर्विषय, स्वयप्रकाश, निरुपद्रव, भ्रमशून्य व कृतकृत्य कसा आहे, याचा अनुभव येतो. जग प्रतिबिब आहे, असा निश्चय

होतो, मनोव्यापार बंद होतात, कार्य, कारण, कर्तृत्व, हेय, उपादेय इत्यादि कल्पना नाहींशा होतात, देहयुक्त असलेला मानव देहरहित असल्यासारिखा होतो, संसारात असूनही निःसंसार बनतो, मोठ्या पाषाणाप्रमाणे चैतन्यघन, चैतन्यसूर्य असूनही वृत्तिरहित झाल्यामुळे प्रकाशरहित असल्यासारिखा, अहंकारशून्य व ममतारहित असा तो अधिकारी जीवन्मुक्त होतो त्या महाबुद्धिमानाच्या हृदयाचा विस्तार हरि–हरादिकांच्या हृदयाहून इतका वाढतो की, त्याची लक्षपटीनेही तूलना करिता येत नाही. तात्पर्य, बा रामा, या प्रकरणाच्या योगाने, अनुभवास येणाऱ्या आत्मवस्तूचा विस्तार मर्यादारहित आहे, हे साक्षात् समजते १७.

**सर्ग १८**—येथे या ग्रंथाचे गुण, मुख्य गौण व आनुषंगिक फळ व उपमेंतील ग्राह्य अंश यांचे वर्णन करितात

**श्रीवसिष्ठ**—रघुनंदना, उत्तम क्षेत्रात योग्य समयी पेरलेल्या चांगल्या बीजापासून जसे विपुल फळ मिळते, त्याप्रमाणे ही संहिता वाचताच उत्तम बोध होतो आता-अनेक अपौरुषेय वेदवाक्ये व उपनिषदे आत्मबोध करीत असताना, त्यास सोडून या पुरुषाने केलेल्या संहितेचाच अभ्यास करण्याविषयी तुह्मी इतका आग्रह का करिता–ह्मणून तू विचारशील तर सांगतो–युक्तीच्या द्वारा बोध करून देणारे शास्त्र पुरुषप्रणीत जरी असले तरी ते स्वीकार करण्यास योग्य होते. यास्तव, पुरुषाने न्यायी व्हावे. वेदवाक्ये व उपनिषदे अपौरुषेय आहेत, ह्मणजे त्यास कोणी शरीरधारी मानवाने काव्यादिकाप्रमाणे रचलेले नाही, हे खरे, व त्यामुळेच ती पूज्य आहेत पण त्यांचा अभिप्राय अति गूढ आहे. त्यामुळे वाचकास त्यांच्या अर्थाचा यथार्थ बोध होत नाही ह्मणून आपल्या हिताकरिता, त्या प्रमाणभूत वैदिक श्रुतींचा त्याग करून या युक्तिपूर्ण व श्रुतिसारभूत ग्रंथाचे सेवन करावे. युक्तवचन बालकापासूनही ग्रहण करावे. अयुक्तवचन ब्रह्मदेवाने जरी सांगितले तरी त्याचा अव्हेर करावा. श्रुतिवचने अयुक्त नसली तरी ती सामान्य बुद्धीच्या मनुष्यास अग्राह्य आहेत व हा ग्रंथ श्रुतींचा अर्थ स्पष्ट करून सांगण्याकरिताच प्रवृत्त झाला आहे. यास्तव, त्याचा आदराने अभ्यास करावा. कोणी ह्मणेल की, आह्मीं, आमच्या वंशातील पूज्य लोकांनीं रचलेले ग्रंथच वाचू, पण तुमचा हा श्रुतिसारभूत ग्रंथ वाचणार नाही. तर त्यांस आमचे

एवढेच सांगणे आहे की, जवळच असलेल्या गगाजलाचा त्याग करूनही आमच्या या वडिलोपार्जित खाऱ्या विहिरीचेच पाणी आह्मी पिणार, असे आग्रहाने ह्मणणारे जे आहेत, त्यानी खुशाल आपल्या इच्छेप्रमाणे करावे. पण प्रातःकाल होताच जसा अधकार नष्ट होतो त्याप्रमाणे ही सहिता ऐकताच मोह नष्ट होतो व विवेक उद्भवतो. सुज्ञ वक्त्याच्या मुखाने हिचें श्रवण केले असता हळु हळु चित्तावर उत्तम सस्कार होतो. महत्त्व व गुण याच्या योगाने शोभणारी चतुरता येते. उत्तम शब्दार्थज्ञान होते. त्यामुळे तो श्रोता सभेचे भूषण होतो. त्यास लोक, विद्वान् समजून, देवाप्रमाणे पूजूं लागतात; त्यास पूर्वापर ज्ञान होते, त्याचे लोभ-मोहादि दोष नाहींसे होऊन बुद्धि स्वच्छ होते; मन प्रसन्न ह्मणजे सकल्प-विकल्परहित होते; चित्त अक्षुब्ध सागराप्रमाणे स्थिर होते, दैन्य-दारिद्र्यादि दोष त्याच्या मर्माचा भेद करीत नाहीत, ससाराची भीति त्याच्या चित्तास स्पर्श करीत नाही, दैव व प्रयत्न यातील कोणाचे केव्हा प्राधान्य असते याविषयी त्यास सशय रहात नाही, प्रज्ञेचा उदय झाल्यामुळे रागद्वेष नाहीसे होतात व परम शाति अनुभवास येते. विचारी पुरुषाच्या स्वभावात समुद्राप्रमाणे गाभीर्य, मेरूप्रमाणे धैर्य व चद्राप्रमाणे शीतलता येते. जीवन्मुक्ताची हीच लक्षणे आहेत. ही जीवन्मुक्तता हळु हळु वाढत जाते व शेवटी सर्व विशेष शात झाले असता त्या अवस्थेचे शब्दानी वर्णन करवत नाही. सर्व अनर्थ, सर्व क्लेश, सर्व दुःखे, सर्व चिता, सर्व तृष्णा, व सर्व भय एकदाच नष्ट होऊन तो स्वय नारायण-स्वरूप होतो या सहितेच्या पठनाने ज्ञानी झालेला अधिकारी विषयरूपी खड्ड्यात पडत नाही. त्याची ग्राम्यता नाहीशी होते. सदाचार व साधूचे शील यात त्याची बुद्धि आसक्त होते. मोक्षाचे उपाय समजल्यामुळे ज्याचे अत करण शुद्ध झाले आहे, अशा त्यास कोणतीही अवस्था व्याकुल करू शकत नाही. उत्पत्ति व नाश हा एक मायिक चमत्कार आहे, असे समजून तो त्याची उपेक्षा करू लागतो. या शास्त्राचा विचार केला असता, यात सागितलेल्या प्रत्येक अवस्थेचा अनुभव येतो. या सहितेत सर्व काव्यगुण असल्यामुळे ती रमणीय व मनोरजन करणारी झाली आहे. व्युत्पन्न पुरुषास हिच्या अवलोकनाने सहज ज्ञान होते. पण या सुबोध शास्त्राचाही ज्यास सहज बोध होण्यासारिखा नसेल, त्याने ज्ञानी पंडिताच्या मुखानेच याचे श्रवण

करावे. याचे श्रवण, मनन व निदिध्यासन केले असता तप, ध्यान, जप इत्यादिकाचे फल मिळते व मोक्षाचा मार्ग व्यक्त होतो. याच्या वारवार अभ्यासाने विलक्षण पाडित्य येते. "हा मी" व "हे जग" हा भ्रम आपोआप नाहीसा होतो. चित्रातील सर्प पाहून जसे कोणालाही भय वाटत नाही त्याप्रमाणे ज्ञानी पुरुषास या चित्रतुल्य जगाकडे पाहून व त्यातील अनेक अवस्थाचा अनुभव घेऊन सुखदु:खादि वाटत नाही. ज्ञानास प्रतिबध करणाऱ्या दोषाचे निरसन कसे करावे हे समजण्यास अध्यात्मशास्त्र हाच एक उत्तम उपाय आहे. झाडाचे फूल व पान तोडावयासही काही आयास लागत असतील; पण योग्य अधिकाऱ्यास या सहितेच्या अध्ययनानतर परम पदाच्या प्राप्त्यर्थ काही आयास करावे लागत नाहीत. कारण अत:करणालाही स्पदनरहित करून सोडावे, असा उपदेश यात केलेला आहे सुखदायी आसन घालून, मिळेल ते खाऊन, सदाचाराच्या विरुद्ध असलेला आचार सोडून आणि देश व काल यास अनुसरून विचार करून, जो धन्य पुरुष या अथवा दुसऱ्या सच्छास्त्राचा अभ्यास करितो व यथासभव सत्सग करितो, त्यास ससाराची शाति करणारा महाबोध होतो, व त्याच्या योगाने तो अपवित्र गर्भाशयातून व असह्य क्लेशातून मुक्त होतो. पण जे पापी अशा या घोर यातनेस व यातनामय ससारास भीत नाहीत व भोगामध्ये निमग्न होऊन रहातात त्या कृमितुल्य अधमाचे नावही घेऊ नये.

असो, राघवा, आता हे सुदर शास्त्र कसे श्रवण करावे ते सागतो. यात दृष्टाताचे प्राधान्य आहे. यास्तव दृष्टात ह्मणजे काय हे मी तुला सागतो. ज्या अनुभवास आलेल्या वस्तूचा निर्देश करून त्यावरून इष्ट अर्थाचे ज्ञान करून देतात, त्यास दृष्टात ह्मणतात. तो बोधद्वारा उपकारक आहे अपूर्व, ह्मणजे कधी अनुभवास न आलेली, वस्तु किवा स्थिति दृष्टाता-वाचून समजून देता येत नाही. पण रामा, मी जे दृष्टात देणार आहे, ते सर्व सकारण ह्मणजे जन्य व त्यामुळेच असत्य असणार, हे उघड आहे. पण त्यावरून ज्याचा बोध करून घ्यावयाचा ते परमार्थ सत्य व नित्य आहे. यास्तव मृत्तिका, सुवर्ण, इत्यादि असत् पदार्थांचे दृष्टात देऊन मी जरी तुला सत्य ब्रह्माचे ज्ञान करून देणार आहे, तरी जन्यत्व, मिथ्यात्व इत्यादि दृष्टाताचे इतर धर्म सोडून, जेवढ्या पुरता दृष्टात

दिला असेल तेवढ्याच पुरता ब्रह्म–बोध करून घ्यावा. जसे–'ब्रह्माच्या ठायी ई जग रज्जु–सर्पाप्रमाणे भ्रांतिकल्पित आहे, असे ह्मटल्यास दोरीच्या आश्रयाने सापाचा भ्रम होणे, एवढाच दृष्टांताचा भाग दार्ष्टांतिक ब्रह्माचे ठायी घ्यावा. दोरीप्रमाणे ते दृश्य असले पाहिजे, लांब असले पाहिजे, मंद अंधकारात पडलेले असले पाहिजे, इत्यादि दोरीचे अन्य धर्म घेण्याचे कारण नाही. त्याचप्रमाणे दार्ष्टांतिक ब्रह्माचे सत्यत्वादि धर्म दोरीचे ठायी असले पाहिजेत, असेही समजण्याचे कारण नाही. ब्रह्म सर्व सृष्ट पदार्थांहून विलक्षण आहे. तेव्हा त्याला सर्व प्रकारे सदृश दृष्टांत कसा मिळणार ? पण श्रोत्यास त्या निरुपम तत्त्वाची काही कल्पना करिता यावी ह्मणून या स्वप्नतुल्य मिथ्या जगातील पदार्थांचे एकदेशी दृष्टांत द्यावे लागतात व साक्षात्कार होई तोच त्याचे महत्त्व असते. कारण ब्रह्मात्मज्ञान झाले ह्मणजे हे सर्व दृष्टांत व शास्त्रे निरुपयोगी व खोटी भासू लागतात, व हे सर्व, मावकास मार्ग दाखविण्याकरिता योजिलेले उपाय आहेत, असे कळून येते. परंतु शास्त्राभ्यासाच्या योगाने ज्यांच्या चित्तावर उत्तम संस्कार झालेले नसतात त्यास " हे जग मिथ्या आहे, " असे एकाएकी समजत नाही. कारण " हे सर्व सत्य आहे " अशाप्रकारचा त्याचा दृढ व अनादी संस्कार लवकर जात नाही जगाला स्वप्नातील, मनोराज्यातील व ध्यानसमयी मानसपूजेकरिता कल्पनेने तयार केलेल्या नगराचा लौकिक दृष्टांत दिला आहे व तो मात्र जगाला सर्व प्रकारे लागू आहे, असे समजावे. कारण ब्रह्माप्रमाणे जग सृष्टीहून अत्यंत विलक्षण नाही. अथवा शास्त्रीय किंवा लौकिक कोणताही दृष्टांत एकदेशीच घ्यावा. कारण मणि ( रत्न ) दिव्याप्रमाणे दिसतो, असे ह्मटल्यास मण्यामध्ये दिव्याप्रमाणे तेल, वात इत्यादि सर्व आहे, असे कोणी समजत नाहीं. तर प्रकाश हा अंश त्या दोघांच्या ठिकाणी सारखाच आहे, एवढेच लोक समजतात. यास्तव दृष्टांताचा एक अंश घेऊन दार्ष्टांतिकाची कल्पना करावी. तिच्या योगाने ब्रह्माचे परोक्ष ज्ञान झाले असता, अविद्येचा नाश होण्याकरिता " मी ब्रह्म आहे " या महावाक्याच्या अर्थाचा निश्चय करावा. " जगांतील सर्व अनुभवाच्या विरुद्ध मी असे कसे समजूं, " असें ह्मणून आपली अश्रद्धा किंवा शुष्क तार्किकता व्यक्त करू नये. कारण " मी ब्रह्म आहे " अशी निरंतर भावना केल्यामुळे

ब्रह्मात्मसाक्षात्कार झाला की, जगांतील–मी गोरा आहे, मी ब्राह्मण आहे, मी विद्वान् आहे; मी कर्म–कर्ता आहें, मी फल–भोक्ता आहें;–इत्यादि अनुभव भ्रम ठरतात. ब्रह्म प्रमाणभूत आहे कीं, अप्रमाण आहे; जग प्रकृतीचा विकार आहे की परमाणूच्या योगाने बनलेलें आहे, इत्यादि संशय व तर्क नाहीसे होतात व अनर्थाची निःशेष निवृत्ति होते. आता–स्वभावतःच प्रिय असलेल्या भार्या–पुत्रादि सहज सुखदायक विषयात प्रवृत्त करणाऱ्या व त्यामुळेच हितकर वाटणाऱ्या भगवान् चार्वाकाच्या मताचें उल्लंघन करून जप–तप–नियमादिकाच्या योगानें अनेक क्लेशकारक, दारिद्र्यपूर्ण व भिकारी बनवून भार्यादिकाची तातातूट करविणारे हे तुमचे वैदिक मत कोण मानणार ? असे ह्मणशील; पण ते बरोबर नाही. कारण विचार करून पाहिला असता वैऱ्याप्रमाणे वाटणाऱ्या आह्मा ब्रह्मनिष्ठाचे, ऐकण्यास अगदी अप्रिय असलेले, वचनच परिणामी परमानंदरूप परब्रह्म–प्राप्ति करून देणारे आहे, असे कळून येईल; व केवल क्षणिक सुखदायी विषयामध्ये प्रवृत्त करणाऱ्या चार्वाकापेक्षा नित्यसुखाच्या साधनाचे अनुष्ठान करावयास लावणारे आह्मी वैदिकच अधिक हितकर आहो, अशी खात्री होईल. रामचद्रा, प्रियभार्येचे भाषण जरी कानास गोड लागले, तरी परिणामी फारसे हितकर नसल्यामुळे, ते ऐकल्याबरोबर कानास तृप्त न करणाऱ्या वेदवाक्याची बरोबरी करू शकणार नाही, हे तू ध्यानात धर. चार्वाकाप्रमाणे कापिल-कणादादि तत्त्ववेत्तेही खरे हितकर्ते नव्हेत, असे तूं निःसशय समज. कारण त्याचा उपदेश उपनिषदास धरून नसतो. ते आपल्या कल्पनेप्रमाणें उपदेश करीत सुटतात. शिवाय त्याना अनुभवाचा गधही नसतो आह्मीं जें सांगतो ते साक्षात् अनुभवास येणारे आहे. आह्मीं तसा अनुभव घेतला आहे आमच्या मार्गाने जो जाईल त्यासही आमच्याप्रमाणेच तो येईल. यास्तव अध्यात्मशास्त्राचा अगीकार करून प्रत्येकाने आपले हित करून घ्यावे १८.

**सर्ग १९**––*या सर्गात, सर्व साक्षी ब्रह्मच प्रमाण आहे, असे सागतात.*

**श्रीवसिष्ठ**––रामा, दृष्टातातील विशिष्ट व विवक्षित भाग मात्र घ्यावा. • कारण दृष्टात व दार्ष्टांतिक याचें सर्व साम्य झाल्यास ते भिन्न पदार्थ आहेत, असेही ह्मणता येणार नाही, असे मी वर सुचविले आहे;

ते विसरू नको. एक, अद्वितीय व ज्ञानस्वरूप आत्मतत्त्वच वेदाताचा विषय आहे व तोच शास्त्रार्थ आहे. त्याचा साक्षात्कार झाला असता महा-वाक्यार्थ सिद्ध होतो, अज्ञान व अज्ञानाचे "मी कर्ता, भोक्ता" इत्यादि कार्य नष्ट होते व त्यामुळे परम शाति अनुभवास येते. तेच निर्वाण होय. असल्या या निर्वाणाकडे सर्व लक्ष्य ठेवून उत्तम अधिकाऱ्याने या दृष्टातादिकाच्या भानगडीतही फारसें पडू नये. कोणत्या तरी युक्तीनें शाति देणाऱ्या महावाक्याच्या अर्थाचा आश्रय करावा. कारण शाति हेच परम श्रेय आहे. करिता तिच्या प्राप्तीविषयी प्रयत्न करावा. कारण तयार होऊन पुढे आलेल्या भाताने क्षुधाशाति करून घ्यावयाची सोडून त्याच्याविषयी व्यर्थ तर्क करीत बसण्यात फारसे भूषण व लाभही नसतो. मुलाने औषध घ्यावे ह्मणून त्यास त्याची आई किंवा आजीबाळा, हे औषध पी, ह्मणजे तुझी शेंडी तुझ्या मोठ्या भावाप्रमाणे लाब होईल,—असे सागते. त्यामुळे हे औषध आपले इष्ट कार्य करणारें आहे, असें त्या बालकास वाटतें व तो ते कडु असलें तरी घेतो. त्याप्रमाणेच साधकाची रुचि वाढविण्याकरिता किंवा हे इष्ट साधन आहे, असे त्यास समजावे ह्मणून शास्त्रात दृष्टात व युक्त्या योजिलेल्या असतात. त्याचा योग्य उपयोग करून घ्यावा व परम पद मिळवावे. अविवेकी होऊन भोगामध्ये गढून जाऊ नये. विचारी होऊन शाति देणाऱ्या शास्त्राचे सतत अध्ययन करावें. शास्त्राचा उपदेश, सौजन्य, सात्त्विक बुद्धि व आत्मसाक्षात्कार यानी अधिक अधिक सपन्न होऊन धर्मक्रिया कराव्या. परम शाति प्राप्त होई तो शास्त्रार्थाचा विचार करीत रहावे. आत्म्याच्या स्वरूपामध्ये स्थिर झाल्यामुळे भवसागरातून पार निघून गेलेल्या गृहस्थास व यतीस ऐहिक व पारलौकिक फलाची आशा नसते. त्यामुळे तो कृतकृत्य होतो. अशा पुरुषाने शात व गभीर होऊन रहावें. आत्म्याचा बोध आपल्या हिताकरिता करून घ्यावा. "मी ज्ञानी आहे, मी वेदाती आहे, तुह्मी सर्व अज्ञ आहा, पामर आहा, ससारी आहा" इत्यादि आसुरी शब्द तोडातून उच्चारून, स्वस्तुति व परनिंदा ही महा पापे करण्याकरिता, केवल शाब्द बोध करून घेऊन, तेवढयानेच आपणास धन्य मानून घेऊ नये. काही विद्वान् खडन-मडनादि विक्षेप उत्पन्न करणाऱ्या व वाद-विवादात्मक कर्मामध्ये मोठया रुचीने प्रवृत्त

होतात. पण त्यामुळे त्याची मोठी हानि होते, हे त्याच्या ध्यानात येत नाहीं. आत्मतत्त्व सर्वत्र सम आहे. ते वादाचा विषय नव्हे. पण अभिमानी पंडितास हें परम सत्य कळत नाहीं; किंवा कळत असूनही त्याप्रमाणे त्याचें आचरण होत नाही. आत्मवस्तु एका प्रकारची असताना केवल अभिमानाने ती भलत्याच प्रकारची आहे, असे ते प्रतिपादितात. पण त्यामुळे आपलाच आत्मा मलिन होतो हे त्याच्या ध्यानात येत नाहीं. अनेक वादी अनेक प्रमाणाची कल्पना करीत असतात, पण त्या सर्वांचे प्रत्यक्–आत्मतत्त्व हेच एक प्रमाण आहे. सर्व प्रमाणाचें सार इंद्रिये आहेत व सर्व इंद्रियाचे सार अपरोक्ष ज्ञान आहे. अपरोक्ष ज्ञानच मुख्य प्रत्यक्ष होय. अनुभव, प्रतिपत्ति, वेदन ही त्या साक्षी चैतन्याची यथार्थ नावें आहेत. प्राणधारण केल्यामुळे साक्षीसच जीव ह्मणतात. बुद्धि–वृत्ति–युक्त साक्षिचैतन्यास संवित् ह्मणतात. तीच बुद्धि-वृत्तिद्वारा बाह्य पदार्थाशी संगत होऊन तदाकार झाली असता, विषय होते. साराश कर्ता, करण, कार्य, भोक्ता, भोगसाधन, भोग्य, ज्ञाता, ज्ञानसाधन, ज्ञेय इत्यादि त्रिपुट्या या साक्षिचैतन्याहून भिन्न नाहीत. अथवा साक्षिचैतन्याचींच तीं भिन्न भिन्न अवस्थेतील नावे आहेत. पाणीच जसे तरंगरूपाने दिसतें त्याप्रमाणे हे चैतन्यच जगद्रूपाने भासते. ते साक्षिप्रत्यक्ष सृष्टीच्या आरंभीं निष्कारण असते. पण पुढे स्वतःच सर्ग–लीलेने स्फुरण पाऊन आपलें आपणच कारण होते. पण एकच वस्तु अज्ञानावाचून आपलेच आपण कारण व कार्य होऊ शकत नाही. आत्म्याच्या अज्ञानामुळेच जीवभाव येऊन, जग सत्य आहे, असा भास होतो. तस्मात् हे जग आरोपित आहे. विचार सुद्धा आत्म्याचेच रूप आहे. तेव्हां तो जगद्भ्रम दूर करून परम पुरुषार्थरूप प्रत्यक्ष करितो, हे ह्मणणे सुद्धा बरोबर नाही. कारण विचार, प्रत्यक्ष किंवा आणखी काहींही या साक्षिचैतन्याहून निराळे नाही, असे वर सांगितलेच आहे. यास्तव विचारी पुरुष जेव्हा आत्मरूप होऊन जातो तेव्हा त्याच्याविषयी काहींच बोलता येत नाही तो सत् आहे, असेही ह्मणता येत नाहीं व असत् आहे, असेही ह्मणवत नाही. असल्या विचाराने मन अति शात होते, देह व इंद्रिये याची प्रवृत्तिही बंद होते, व जग सत्य आहे, असे पुनरपि वाटत नाही. मन हेच सर्व प्रवृत्तीचे कारण आहे. तेव्हा तें निश्चल

झाल्यावर सर्व शून्य होणे साहजिकच आहे. मनोरूपी यंत्र चालू लागलें की, इंद्रियादि इतर यंत्रे प्रवृत्त होतात व ज्ञानादि क्रिया होतात, हें सर्वांस ठाऊक आहेच. पण विषयसंस्कार किंवा मागे सांगितलेल्या वासना मनास गति देत असतात त्यांस अडवून धरिले पाहिजे. पण दीर्घ प्रयत्नावाचून हे महत्कृत्य घडत नाहीं. यास्तव, बा रघुनंदना, तूं वासनांचा उद्भवच न होईल, असा मोठ्या शौर्यानें यत्न कर. शूर पुरुषावाचून परम पदास जिंकण्याचें हें अवघड काम होणार नाही. विचार हें या विजयातील मुख्य अस्त्र आहे. आचारसंपन्न शुद्धचित्त पुरुषास या परमास्त्रानेच परमानंदाचा लाभ होतो १९.

**सर्ग २०**—प्रज्ञावृद्धीचा प्रकार, महापुरुषाचें लक्षण व सदाचार याचें या सर्गांत वर्णन केले आहे

**श्रीवसिष्ठ**—रामा, प्रथम साधूची संगति धरावी. त्याच्या उपदेशाप्रमाणे युक्तीने बुद्धि वाढवावी. त्यानंतर महापुरुषांच्या लक्षणानी आपणामध्यें महापुरुषता आणावी. सर्व उत्तम गुण एकाच पुरुषाचे ठायीं नसतात. यास्तव ज्या ज्या पुरुषामध्ये जो जो विशेष गुण आढळेल तो तो आपणामध्ये आणण्याचा प्रयत्न करावा. सर्व गुणसंपन्न होणे हीच महापुरुषता होय. ती शमादिगुणाच्या योगानें तर फारच शोभते. पण आत्म्याच्या यथार्थ ज्ञानावाचून कोणतीही सिद्धि मिळत नाही. ज्ञानाच्या योगाने शमादिकाची वृद्धि होते व शमादि उपायांच्या योगाने ज्ञानाची वृद्धि होते. वृष्टीमुळे जसे धान्यास अंकुर येतात त्याप्रमाणे सदाचरणामुळे शमादि गुणाचा उद्भव होतो. यास्तव सदाचरण सर्वांत अधिक प्रशस्त होय. पण ते ज्ञानावाचून संभवत नाही. सारांश सदाचार, ज्ञान व शमादि गुण एकमेकांच्या वृद्धीस कारण होतात. यास्तव त्यांचा एकाच काळी व सारख्याच आदरानें अभ्यास करावा. शेतास राखणाऱ्या स्त्रिया, पक्ष्यांनीं उडून जावे म्हणून टाळ्या वाजवितात व त्याबरोबर गाणी गावून आपले चित्तरंजनही करून घेत असतात. त्याप्रमाणे आसक्ति, क्रोध, लोभ, इत्यादिकाचें निवारण करण्याकरिता शमादिकाचा अभ्यास करूं लागलें असतां, ज्ञानादिकाची वृद्धि हे फल सहज मिळते. असो, दशरथनंदना, मी तुला येथवर ज्ञानाची सदाचारादि साधने पुनः पुनः प्रसंग आणून सांगितलीं.

आतां यापुढे ज्ञानक्रम ऐक. तो तज्ज्ञ व सत्यभाषण करणाऱ्या ब्रह्मनिष्ठाच्या तोंडूनच ऐकावा; म्हणजे श्रोत्याची इच्छा नसली तरी तो परम पदास प्राप्त होतो २०.

इति श्रीशंकराचार्यभक्त विष्णुकृत बृहद्योगवासिष्ठसारांतील
दुसरें मुमुक्षुव्यवहार प्रकरण समाप्त झालें.
श्रीकृष्णार्पणमस्तु.

---

## अथ तृतीयमुत्पत्तिप्रकरणम् ।

**सर्ग १**--या सर्गांत, ज्ञानच मोक्षाचें साधन आहे, कर्मादि दुसरें कांहीं नाहीं, असें सांगून बंधाच्या कारणाचेंही वर्णन केलें आहे.

श्रीगणेशाय नमः । श्रीशंकराचार्यचरणारविंदाभ्यां नमः । **श्रीवसिष्ठ**— रामराया, विवेक, वैराग्य इत्यादि साधनांनीं संपन्न असलेल्या पुरुषानें अथवा स्त्रीनें तत्त्वाचा अपरोक्ष साक्षात्कार होईपर्यंत विचार करावा, असें मी तुला मागच्या प्रकरणांत सांगितलें. आतां या प्रकरणांत सृष्टि कशी झाली, हें सांगून मला अद्वैत ब्रह्माचें प्रतिपादन करावयाचें आहे. उपनिषदांतील महावाक्याच्या श्रवणानें चित्तांत अखंडाकार वृत्ति उत्पन्न होते. तिच्या योगानें ब्रह्मवेत्ता स्वतत्त्वास साक्षात् जाणतो व पारमार्थिक–नित्यमुक्त–पूर्णरूपानें प्रकाशमान होतो. तात्पर्य, स्वमुक्तीस महावाक्यापासून उत्पन्न होणाऱ्या वृत्तीवांचून दुसऱ्या कशाचीही अपेक्षा नसते. कारण हें–देह, इंद्रियें इत्यादि व आकाशादि बंधरूप–दृश्यजात प्रत्यगात्मभूत ब्रह्मामध्यें स्वप्नाप्रमाणें भासत असतें त्यामुळें स्वप्नांतील सुखदुःखादि बंधाच्या निवृत्तीस जागें होणें यावांचून दुसऱ्या कशाचीही जशी अपेक्षा नसते त्याप्रमाणें या जाग्रत्–बंधापासून सुटण्यास पूर्वोक्त वृत्तीवांचून दुसरें कांहीं लागत नाहीं, असा त्रिकालाबाधित नियम आहे. यास्तव सांप्रतकालींही जो कोणी अधिकारी श्रवणादि उपायाच्या योगानें त्या तत्त्वास यथार्थपणें ( म्हणजे मीच तें परम तत्त्व आहें, असें साक्षात् ) जाणतो त्यास पूर्ण व नित्यमुक्त ब्रह्मभावरूप फलही मिळतें. जीवतपणींच त्याला परमानंदाचा साक्षात्कार होतो. अध्यस्त वस्तु अधिष्ठानाहून पृथक् नसते हा, अथवा अध्यारोपापवाद

हा, न्याय आह्मी येथे सक्षेपतः सुचविला आहे. पुढे याचेच विस्तारपूर्वक वर्णन करणार आहो. या न्यायाने ब्रह्माकाशामध्ये अध्यासक्रमाने हा सर्व दृश्यप्रपच आहे किंवा या सृष्टीत अपवादक्रमाने ब्रह्मावाचून दुसरे काही नाही, असा निश्चय झाला असता "भगवन्, हे नाश पावणारे काय आहे? उत्पन्न कोण होते व वृद्धि कोणाची होते?" इत्यादि जे प्रश्न तू मागे केले होतेस त्याचे आपोआप निरसन होते. कारण सत् वस्तूचा नाश होत नाही व असत् वस्तु उत्पन्न होऊन वाढत नाही, हा सिद्धात समजल्यावर नाश पावणे, उत्पन्न होणे व वृद्धि पावणे हे धर्म कोणाचे आहेत, असा प्रश्नच करिता येत नाही. असो, तर, हे रघुवीरा, आता मी तुला हेच तत्त्व, प्रमाण व अनुभव याच्या द्वारा मला जसे समजले आहे, परीक्षण करून पाहिल्यावर जसे त्याचे वस्तुत्व सिद्ध झाले आहे, साधन व युक्ति याच्या योगाने ज्या क्रमाने त्याचे निरूपण करिता येते व श्रोत्याच्या बुद्धीचा जसा परिपाक झाला असेल त्याप्रमाणे, सागतो.

चैतन्याकाश जीवभावास प्राप्त होऊन स्वप्नामध्ये हे जग पहाते. स्वप्नात पाहिलेले विषय जागे होताच नाहींसे होतात. पण त्याचे ज्ञान नाहीसे होत नाही. त्याप्रमाणे जगाचा बाध झाला तरी त्याचे ज्ञान बाधित होत नाहीं. यावरून ज्ञानशक्ति नित्य असल्याचे ठरते. त्याचप्रमाणे 'अह' ह्मणजे मी, असे प्रत्यक्–आत्म्याशी तादात्म्य पावून आतरभावाने व त्व ह्मणजे तूं असे पराक्–बाह्य–भावाने अनुभवास येणारें जग स्वप्नातील ससाराप्रमाणेच अगदी पूर्णपणे आहे. ह्मणजे ते मिथ्या आहे, यात काही सशय नाहीं.

असो, मी आता हे तुला तिसरे जगदुत्पत्ति–प्रकरण सागतो. याच्या श्रवणाने तुझा बध नाहीसा होईल. कारण दृश्य जगत् आहे, असे वाटल्यामुळेच बध होतो. पण दृश्य प्रपच नाही. तो भासत असला तरी मिथ्या आहे, असें एकदा निश्चयपूर्वक समजले कीं, बध नाहीसा होतो. आता दृश्य जगाच्या अस्तित्वाचाच असभव कसा आहे, तें क्रमानें ऐक. उत्पत्ति, वृद्धि, नाश, स्वर्ग, नरक, इत्यादि बध हा द्रष्टयाचा (आत्म्याचा) धर्म आहे, असा अनुभव येत असल्यामुळे त्यास दृश्य कोटींत न घालता द्रष्टृ–कोटींतच घेतले पाहिजे, असे सकृद्दर्शनी वाटते. पण तें अक्षरशः खरे नाहीं. कारण जो उत्पन्न होतो त्याचीच वृद्धि होते; तोच नाश

पावतो, तोच धर्माचरणाने स्वर्गास जातो, तोच अधर्म करून नरकात पडतो व आत्मसाक्षात्काराने तोच मुक्त होतो हे खरे, पण आत्मा उत्पन्नच होत नाही. स्वस्वरूपाचे ज्ञान न झाल्यामुळे तो उत्पन्न होतो, इत्यादि भ्रम होतो. आत्म्याच्या यथार्थ स्वरूपाचे ज्ञान नसल्यामुळेच त्यास बध असल्यासारिखे वाटते. यास्तव आत्म्याच्या बोधाकरिता दृश्य जगाचा असभव आहे, असे आता अगोदर मी तुला सागतो. उत्पत्ति, वृद्धि इत्यादि विकाराचा सबध या दृश्य ससाराशीच असतो. आत्मा त्रिकाली निर्विकार असल्यामुळे त्याच्याशीं, त्या किवा दुसऱ्या कोणत्याही विकाराचा मुळीच सबध नसतो. उपनिपदातही अक्षरशः असेच सागितले आहे. यास्तव बध द्रष्टृ–कोटींत येत नाहीं. तो दृश्यकोटींतच रहातो. या प्रथम सर्गात मी तुला हा सिद्धातच सक्षेपत सागतो व पुढें त्याचाच विस्तार करीन. आत्मा त्रिकाली निर्विकार आहे, असा जो वर उल्लेख केला आहे, तो सत्य कसा ते आता तू पहा. हे जे चराचर जग दिसत आहे तें सर्व, स्वप्न जसे गाढ निद्रेत लीन होते त्याप्रमाणे, प्रलयात नष्ट होते. ह्मणजे साख्याची प्रकृति, व नैयायिकाचे परमाणुही त्यावेळीं अवशिष्ट रहात नाहीत सर्व दृश्य जगाचा लय झाला असता, अमूर्त असल्यामुळे क्रियारहित, त्रिविध परिच्छेदशून्य असल्यामुळे गभीर, रूपरहित असल्यामुळे जे तेजही नव्हे व स्वयप्रकाशरूप असल्यामुळे जे तम( अंधकार )ही नव्हे, सर्व धर्मरहित असल्यामुळे जे अवर्णनीय आहे, अज्ञानाने आच्छादित झाल्यामुळे किवा प्रपचाच्या अनेक सस्काराचे आधाररूप असल्यामुळे जे विशेषतः व्यक्त नाहीं, असे काहीं सत् अवशिष्ट रहाते. त्या सत् वस्तूचा अधिकाऱ्यास उपदेश करिता यावा ह्मणून ऋत, आत्मा, पर, ब्रह्म, सत्य इत्यादि सज्ञा विद्वानानी कल्पिल्या आहेत. श्रुतीसारख्या उत्कृष्ट प्रमाणावरून त्याचे ज्ञान होत असल्यामुळे त्यास ऋत ह्मणतात. ते सर्वास व्यापून रहात असल्यामुळे, सर्वाचे ज्ञानद्वारा ग्रहण करीत असल्यामुळे, विषयाचा उपभोग घेत असल्यामुळे व सर्व वस्तूमध्यें त्याची अनुवृत्ति झाल्यामुळे ह्मणजे ते अखड असल्यामुळे त्यास आत्मा ह्मणतात. त्याच्या ठायीं सत्यतेची परमावधि असल्यामुळे त्यास पर ह्मणतात. सर्वाहून मोठें असल्यामुळे किवा जगदाकारास पुष्टि देत असल्यामुळे ते ब्रह्म होय.

विद्वानास त्याचा यथाशास्त्र अनुभव येत असल्यामुळें त्याला सत्य ह्मणतात. सृष्टीच्या आरंभीं तो आत्मा चैतन्यस्वभावानें जशाचा तसाच असतो. पण मोहामुळें आकाशादि क्रमाने उत्पन्न झालेला जो दुसरा लिंग–समष्टिरूप जड समूह तो त्याच्या प्रवेशामुळे व 'हाच मी आहे' असा त्यानें अभिमान धरिल्यामुळें, त्याच्यासारिखाच सचेतन भासतो व त्यांतील प्राणांस धारण करणे या उपाधीमुळें तो (आत्मा) जीव या भावी निद्य नावास पात्र होतो. ते नाव देहोत्पत्तीनतर व्यक्त होणाऱ्या वाणीच्या अधीन असल्यामुळे त्यास देहोत्पत्तीनतर प्राप्त होत असते. ह्मणून त्यास 'भावी' असें ह्मटले आहे हा त्याचा जीवभाव अति भ्रातीमुळे संपादन झालेला असतो, वस्तुत. नव्हे. सारांश सृष्टीच्या आरभी मोहामुळें त्यास असत्य समष्टि–जीवभाव प्राप्त होतो. पण तो केवळ ज्ञानशक्तिसाध्य असतो. ह्मणजे नुसत्या ज्ञानशक्तीच्या योगानेंच समष्टि–जीवाची उत्पत्ति होते. नंतर या समष्टि–जीवाच्या ठिकाणची क्रिया शक्ति व त्या सत्‌ची ज्ञानशक्ति या दोन शक्तींच्या योगाने मन ही वस्तु निर्माण होते. प्राग धारण करणे या शक्तीस प्राप्त झालेला तो भौतिक लिगात्माच मन होतो, असा याच भावार्थ समजावा. मन या स्वरूपास प्राप्त होताना तो भूतात्मा सकल्प विकल्पाचे मनन केल्यामुळे जरा मद होतो. तात्पर्य आपल्या परमात्म भावास विसरून जाऊन तो जीव, सकल्प व विकल्प हे आत्मधर्म आहेत असें समजतो. अति स्थिर समुद्रापासून जसे अस्थिर तरग उत्पन्न व्हा तशातलाच हा मनाच्या उत्पत्तीचा प्रकार आहे. याप्रमाणे समष्टि मन भावास प्राप्त झालेले हिरण्यगर्भसज्ञक तत्त्व दुसऱ्या कोणाच्या बोधावा नच पूर्व वासनेप्रमाणे विराड्भाव, भुवनादिभाव, जरायुजादि चार भू समुदाय इत्यादि सर्व निर्माण करिते. त्याचा प्रत्येक सकल्प सत्य असल्य मुळे सकल्पाबरोबर तत्काल तसेच घडते. प्रथम स्वयप्रकाश सत् अस पुढे त्यासच भ्रातीने प्राण धारण करण्याची शक्ति येणे, ह्मणजे त्य भावी समष्टि जीव होणे, त्यानतर समष्टि–मन उत्पन्न होणे ह्मणजे हिरण्य गर्भाचा जन्म होणे व त्याने स्वतः सर्व स्थूल सृष्टि केवल संकल्पाने रच हा ब्रह्माचे ठायीं जगाचा अध्यारोप आहे. पण अशा शेकडो अध्यारो नींही अधिष्ठानभूत ब्रह्माच्या पारमार्थिक स्थितींत काहीं अंतर पडत ना कारण सोन्याचें कडें सोन्याहून जसें भिन्न नसते त्याप्रमाणे ब्रह्म

ठिकाणी भ्रातीनें भासणारे जग ब्रह्माहून निराळे नाही. ब्रह्म व जग याची सत्ता एकच आहे. पण ती ( सत्ता ) स्वयसिद्ध ब्रह्माचे ठायी स्वाभाविकपणे असते व जगाचे ठायी स्वाभाविकपणे नसते. कारण जगाची सत्ता ब्रह्माच्या अधीन आहे. सोन्याच्या कड्याची सत्ता सोन्याच्या सत्तेहून निराळी नाही व सोन्याच्या सत्तेनेच कडे सत्तावान् असते, हे प्रसिद्ध आहे. जगाला जर स्वतःची सत्ता नाहीं तर त्याच्याठायीं ती भासते कशी ? ह्मणून ह्मणशील तर सागतो. खोट्या मृगजळाच्या सत्तेप्रमाणे किंवा गारुड्याच्या गारुडी सत्तेप्रमाणें ती भ्रमाने भासते. ह्मणूनच त्या भासणाऱ्या जगाच्या सत्तेला सर्वज्ञानी अविद्या, ससृति, बध, माया, मोह, महत्, तम इत्यादि नावे योजिलीं आहेत. आत्मज्ञानाच्या योगाने तिचा नाश होतो. ह्मणून तिला अविद्या ह्मणतात. देवलोक, मनुष्यलोक, पशुपक्ष्यादि तिर्यक् प्राणी व वृक्ष–पाषाणादि नारकी योनी यात जन्मादिरूप ससरण करण्यास ही कारण होत असल्यामुळे या सत्तेला ससृति ह्मणतात. ही चैतन्याच्या पारतत्र्यास कारण होते, ह्मणून हिला बध ह्मणतात. ही मिथ्या असल्यामुळे हिला माया हे नाव दिले आहे. भ्रमाला कारण होत असल्यामुळें हिला मोह हे यथार्थ नाव योजिले आहे. ही दुस्तर असल्यामुळें हिला महत् ह्मटले आहे व आत्मस्वरूपास ही आच्छादित करीत असल्यामुळे हिला तम ही सज्ञा दिली आहे रामा, मी तुला अगोदर बधाचे स्वरूप सागतों. ह्मणजे मोक्षाचे स्वरूपही सहज समजेल. द्रष्ट्यास दृश्याची सत्ता सत्य वाटणे, हाच बध होय. दृश्य जगाच्या योगानेच द्रष्टा बद्ध झाला आहे. दृश्याच्या अभावीं तो मुक्त होतो. जग, मी, तू इत्यादि मिथ्या आत्म्यास दृश्य ह्मणतात. याचा जोपर्यत सभव असतो तोपर्यत मोक्ष होत नाही. पण हे दृश्य, नाही, नाही, नाहीं; अशा सकल्पोत्पादक व्यर्थ प्रलापानी नाहीसे होत नाही तर उलट आत्मज्ञानावांचून जिह्वेनें उच्चारिलेल्या या शब्दाच्या योगानें दृश्य–व्याधि अधिक वाढते. अनेक तर्क, तीर्थाटन, नियम इत्यादिकाच्या योगानेही या रोगाचा क्षय होणार नाही. दृश्याच्या अस्तित्वाची अनादरानें उपेक्षा करून चालत नाहीं; तर विचाराने तिचा बाधच करावा लागतो. दृश्याची स्वतःसत्ता जर मानली तर तिचा बाध होणे अशक्य होणार व मग मोक्षाची आशाही करावयास नको. कारण–असत् वस्तूचा कधीं भाव ( अस्तित्व ) नसतो व सत्

वस्तूचा कधी अभाव होत नाहीं–असा नियम आहे. तपादि दुसऱ्या कोणत्याही साधनाच्या योगानें आत्मसाक्षात्कार होत नाहीं व तो होई तों द्रष्टा कोणत्याही जरी अवस्थेत जाऊन राहिला तरी त्याला तेथें दृश्याचा भास झाल्यावाचून रहात नाही. यास्तव एका गावातून किंवा घरातून उठून दुसरीकडे जाऊन बसल्यावर, मी देशत्याग किंवा गृहत्याग केला, असे नुस्ते समजल्यानेच जसा खरोखर देशादि–त्याग होत नाही, ( कारण दुसरीकडे गेल्यावर सुद्धा त्याला तेथील गावाची व घराची गरज असते ) त्याप्रमाणे जप, ध्यान इत्यादिकाच्या योगानें मनास व्यवहारापासून हटवून अंतःकरणातील उपास्य किंवा ध्येय वस्तूकडे जरी ते लाविले तरी त्यामुळे दृश्याचा खरा त्याग होत नाहीं. जप, ध्यान, अध्ययन इत्यादिकाच्या योगानेच कित्येक तृप्ति मानून रहात असतात, पण ती त्याची तृप्ति भुकेने व्याकुळ झालेल्या पुरुषास पेज प्याल्यामुळे होणाऱ्या तृप्तीप्रमाणें क्षुद्र होय. पड्रस अन्नाच्या भोजनामुळे होणाऱ्या तृप्तीसारखी ती परम तृप्ति नव्हे. अरे राघवा, परमाणुरूप आत्म्यामध्येही ब्रह्मांडाचा समावेश होणे शक्य आहे. कारण आत्मज्ञानाच्या योगाने जगाचा बाध होईतों चित्परमाणूच्या पोटात सुद्धा त्याचा आभास पडल्यवाचून रहाणार नाहीं. आरसा कोठेही जरी असला तरी त्याच्या समोर आलेला पर्वत, समुद्र, पृथ्वी, नदी इत्यादिकाचे प्रतिबिंब जसे त्यात पडते, त्याप्रमाणे चिदाकाशरूपी आरशात दृश्य प्रतिबिंबित होते, आणि त्यामुळे दुःख, जन्म, जरामरणें, स्थूल-सूक्ष्म अस्थिर पदार्थांचे ग्रहण इत्यादि सर्व होते. आत्मज्ञानावाचून सविकल्प समाधीच्या योगानेच दृश्याचे परिमार्जन करिता येईल, अशी आशा करणेही व्यर्थ आहे. कारण त्या(दृश्या)चे स्मरण केल्यावाचून परिमार्जन करिता येणार नाहीं व त्याचे स्मरण केल्यास समाधीचा भंग होणार. त्याचप्रमाणे निर्विकल्पसमाधीच्या योगानेही दृश्य जगाचा बाध होणें अशक्य आहे. कारण दृश्य असेपर्यंत निर्विकल्प समाधीच्या योगानेंही त्याचा बाध होणें अशक्य आहे. कारण दृश्य असे पर्यंत निर्विकल्पसमाधीच प्राप्त होणार नाहीं. समाधीमध्ये चित्त आहे, असें मानल्यास चेतनत्वही अवश्य असणार व त्याचा बाध होतो, असें मानल्यास तीच तुरीय–अवस्था होणार. समाधीमध्यें दृश्याचें स्मरण किंवा भानही होत नाहीं हें खरें पण त्याचे विस्मरण होणे किंवा अनुभव

न येणे, हा दृश्याचा बाध नव्हे. तर ते मिथ्या आहे, असे आत्मसाक्षात्कारानतर समजणें हा बाध आहे. त्यामुळे समाधीमध्ये असे पर्यंत जरी योग्याला जगाचा प्रत्यय न आला तरी समाधी सोडून उठल्यावर म्हणजे व्युत्थान दशेत, झोपेतून उठल्यावर जसे हे जग पूर्वीप्रमाणेच दु खरूपानें भासते त्याप्रमाणे, भासल्यावाचून रहात नाहीं. तेव्हा, हे रामा, अनेक कष्ट सोसून सपादन केलेल्या समाधीपासून तरी क्षणिक समाधान-सुखाच्या पलीकडे काही लाभ होतो का ? मुळीच नाही. आता-नेहमी समाधीतच रहावे व्युत्थान पावूच नये म्हणजे तरी ज्ञानावाचून अक्षय सुख मिळेल की नाही ?—म्हणून म्हणशील, तर त्यात काही अर्थ नाही. कारण अक्षय निद्रेप्रमाणे ती अवस्था होणार. म्हणजे अज्ञानाचा उच्छेद झाला नाहीं तो नाहीच. शिवाय अक्षय समाधि दुर्लभ आहे. त्यामुळे जेव्हा जेव्हा चित्ताचा उदय होईल तेव्हा तेव्हा दृश्यभ्रम झाल्यावाचून रहाणार नाहीं. कारण हे मनोरूपी दृश्य असताना समाधीविषयी प्रयत्न करणाऱ्या पुरुषालाही त्याचे निरसन करिता येणे अशक्य आहे. आता हा द्रष्टा अज्ञ असल्यामुळे तो पाषाणादि अनात्मवस्तूचीच समाधीत भावना करील व त्यामुळे तद्रूप होईल म्हणून म्हणावे तर त्या योग्यास फलकालीही तो अनात्म पदार्थच अनुभावास येणे शक्य असल्यामुळे दृश्यतेचा बाध होणार नाही. केवल दृक्-शक्ति ( ज्ञान ) अवशिष्ट राहणे हा हेतु सिद्ध होणार नाही. शिवाय समाधिबलाने दुःखशून्य पाषाणभावाची जरी प्राप्ति झाली, तरी तोच भाव सतत कायम राहील, असे समजणे व्यर्थ आहे. कारण पाषाणतुल्य निर्विकल्पसमाधि अक्षय रहाते, असा कोणाही समाधिनिष्ठाचा अनुभव नाहीं. असल्या समाधी आजपर्यंत रूढ झालेल्या नाहीत, व दीर्घ प्रयत्नानतर रूढ होतील, असे जरी क्षणभर समजले, तरी त्या सर्व ससारशातिरूप मोक्षप्रद नव्हेत, हें उघड आहे. तस्मात् विद्यमान असल्यासारिखे भासणारे हें जग तप, जप, ध्यान, समाधि इत्यादि उपायाच्या योगाने बाधित होईल ही अज्ञकल्पना आहे. कमलाच्या फुलांतील एका लहानशा छिद्रात ज्याप्रमाणे पुढें होणाऱ्या कमलाच्या वेलींचे बीज असतें त्याप्रमाणें द्रष्ट्याच्या ठायीं दृश्यबुद्धि असते. ह्मणजे बीजामध्यें नसलेला वृक्ष त्याच्यापासून उत्पन्न होतो, असे समजणे जसें चुकीचे आहे, त्याप्रमाणे द्रष्ट्याच्या ठिकाणी दृश्य नसतें, असे सम-

जणें चूक आहे. पदार्थामध्यें जसा रस असतो, तिलादिकांच्या ठायीं जसे तेल असतें व पुष्पामध्ये जसा सुगध असतो तशी द्रष्ट्याचे ठायीं दृश्यबुद्धि असते; ह्मणजे ती त्यास सोडून राहू शकत नाहीं. कापूर कोठेंही जरी असला तरी त्याचा सुगध जसा चोहोंकडे पसरतोच त्याप्रमाणें जेथे जेथें हा चैतन्यधातु असतो तेथे तेथें दृश्य जग अनुभवास येतेच. अर्थात् वस्तु विद्यमान असल्यावर तिचे कार्य झाल्यावाचून रहात नाहीं. हृदयासारख्या अति सूक्ष्म प्रदेशातही मनोराज्य, स्वप्न, सकल्प इत्यादि विकाराचा उद्भव होतो व त्याचा प्राण्यास अनुभवही येतो. तेव्हां हृदयातही दृश्यास अवकाश मिळतो, हे उघड आहे. ज्याप्रमाणे मनःकल्पित पिशाचे अज्ञास मारून टाकितात त्याप्रमाणें दृश्य वस्तु द्रष्ट्याचा घात करितात. अकुर लहानशा बीजात असतो, पण अनुकूल देश व काल मिळेल तेव्हाच जसा तो मोठ्या वृक्षाकाराने परिणाम पावतो त्याप्रमाणें सर्व दृश्य हृदयामध्ये बीजरूपानें जरी असले तरी त्याचा एकाच वेळी अनुभव येत नाहीं. तर देश, काल, निमित्त इत्यादिकाचे जसे जसे आनुकूल्य होईल तसें तसे तें व्यक्त होते. साराश, बीजादि द्रव्यामध्ये जशी विचित्र कार्ये उत्पन्न करण्याची अतर्क्य शक्ति असते त्याप्रमाणें चैतन्यरूप आत्मवस्तूच्या उदरातही असख्य चराचर जगें निर्माण करण्याची शक्ति आहे १.

**सर्ग २**—देहच आत्मा आहे, असे समजणारा अज्ञ मृत्यूचे भक्ष्य होतो, तत्त्वज्ञ होत नाहीं, असें आकाशज ब्राह्मणाच्या आख्यायिकेनें व्यक्त करितात.

**श्रीवसिष्ठ**—( काम, कर्म व त्याची वासना यान्च्या योगाने पुष्ट झालेल्या अविद्यासज्ञक उपाधीने युक्त असलेला आत्मा जगाचे बीज आहे. आत्मविद्येच्या योगानें त्या बीजातील अविद्या-शक्तीस भाजून टाकिले असता प्राणी मृत्युवश होत नाहीं, असे वर सुचविलें आहे, पण त्याविषयींच काहीं विशेष सुचविण्याकरितां श्रीवसिष्ठ एक आख्यायिका सागतात- ) रामा, मी तुला आता आकाशजाचे रमणीय आख्यान सागतो, तें ऐक. त्यामुळे हें प्रकरण तुला चागलें समजेल. आकाशज नामक कोणी एक द्विज होता; तो अति धार्मिक, केवल ध्याननिष्ठ व सतत प्राण्यांच्या हितामध्ये रत असे. ते पुष्कळ काल जीवंत राहिला. तेव्हां याचें आयुष्य अजून

कसें सपत नाहीं, असें म्हणून मृत्यु चिंताकुल झाला. मी सर्व प्राण्यास व भूतमात्रास क्रमाने खाऊन टाकितो. मीच एक अक्षय आहें. पण या आकाशजास मी का भक्षण करू शकत नाहीं? काळ्या पाषाणावर जशी तरवारीची धारा कुंठित होते त्याप्रमाणें माझी सर्व शक्ति याच्यापुढे कुंठित होते. तरी पण अजून प्रयत्न करून पहावा, असा विचार करून तो मेरूवरील त्याच्या गृहात गेला. कारण उद्योगी लोक आपला उद्यम कधींही सोडीत नाहीत. पण गृहामध्ये पाय ठेवितांच भयकर अग्नि त्यास जाळू लागला. तरी सुद्धा मृत्यु भ्याला नाही. त्या शूराने अग्नीच्या ज्वालाचे निवारण करून गृहात प्रवेश केला. तेव्हां तो द्विज त्याच्या दृष्टी पडला व त्यास हाताने धरून न्यावे असाही त्याने सकल्प केला. पण पुढे बसलेल्या ब्राह्मणास स्पर्श करण्याचें धैर्य त्यास होईना. तेव्हा खिन्न झालेला तो मृत्यु यमाकडे आला, व म्हणाला, "मी या आकाशज ब्राह्मणास भक्षण करण्यास का बरे समर्थ होत नाही?" हे ऐकून यम उलट बोलला—बा मृत्यो, तू एकटाच कोणालाही मारू शकत नाहीस. तर ज्याला मारावयाचे असते त्याच्या कर्माचे सहाय तुला अवश्य घ्यावें लागते. यास्तव त्या ब्राह्मणाची कर्में तू हुडकून काढ. त्याच्या सहायाने तू त्यास खावू शकशील. यमाचे हे भाषण ऐकून मृत्यु त्याची कर्मे कोठें आहेत, याचा शोध करीत लहान–मोठीं गावें, अरण्ये, पर्वत, नद्याचे व समुद्राचे तीर इत्यादि स्थळांतून भटकू लागला. त्यानें सर्व त्रिभुवन शोधले. पण त्यास आकाशजाची कर्में सापडलीं नाहीत. तेव्हा तो श्रात झालेला मृत्यु पुनः यमाकडे आला. कारण सेवकास कठिण प्रसगी स्वामीचाच आश्रय करावा लागतो. "महाराज, त्या ब्राह्मणाची कर्में मला आढळत नाहीत. तीं कोठे आहेत, ते आपणच कृपा करून सागा," असा मृत्युने प्रश्न केला असता यम, पुष्कळ विचार करून म्हणाला—मृत्यो, केवळ आकाशापासून उत्पन्न झालेल्या त्या विप्राची कर्मेंच नाहीत. आकाशापासून झालेला तो शुद्ध आकाशच असणार, हे उघड आहे. त्यामुळे त्यास सहाय करणारीं कोणतीही कर्में नसतात. वाझेच्या मुलाप्रमाणे त्याचा प्राक्तन कर्माशीं थोडासाही सबध नसतो. तो कारणरहित आहे. त्यामुळेच तो आकाश होय. आकाशात मोठा वृक्ष असणें शक्य नाहीं. त्याचप्रमाणें त्याचें पूर्व कर्म असणेंही अशक्य आहे. पूर्व कर्मांच्या आभावामुळेंच त्याचें चित्त कर्मपरतत्र

नाही. तुझ्या भक्ष्यस्थानी पडण्यासारखे त्याने जन्मानतरही काहीं कर्म केलें नाहीं. साराश तो परब्रह्मस्वरूप आहे. दृश्यस्वरूपी नाहीं. आता प्राणस्पदन करणे, हे त्याचे कर्म आमच्या दृष्टीस पडते खरे, पण ते आपले कर्म आहे, असे तो मानीत नाहीं. तर मग त्याची देहादि–बुद्धि कशी अनुभवास येते, म्हणून म्हणशील, तर बाबारे, ती केवळ भावना आहे. "मी देह आहे" ही भावना सत्य आहे, असे तो कधीही मानीत नाही. जलामध्ये जसे द्रवत्व असते, आकाशात जसे शून्यत्व आढळते व वायूचे ठायीं जसा स्पद असतो त्याप्रमाणे परम पदी तो आकाशज आहे. कारणामुळे तो उत्पन्न होत नाही. म्हणूनच त्यास स्वयभव म्हणतात. तो पूर्वीही कर्ता नव्हता व आताही कर्ता नाही. तेव्हा त्याचे आक्रमण तू कसे करणार ? जेव्हा तो आपल्या बुद्धीने मरणाची कल्पना करील व पृथिव्यादि भूतयुक्त मी आहे, असे निश्चयाने समजेल, तेव्हा तो तुझ्या तडाक्यात सापडेल, पण मी पृथ्व्यादि भूतरूप आहे, असे तो मानीतच नाही. त्यामुळेच तो रूपशून्य ( निराकार ) आहे. तात्पर्य दोरीनें आकाशास बाधता येणे जसे अशक्य आहे, तसेच त्याला मारणे अशक्य आहे, असे तू जाण.

हें ऐकून मृत्यु ह्मणतो–भगवन्, विकाररहित शून्यापासून त्या जन्मरहित ( अज ) द्विजाचा जन्म कसा झाला, ते मला साग. त्याचप्रमाणे विद्यमान असलेल्या पृथिव्यादि भूतास तुम्ही असत् कसे ह्मणता ? ते मला समजले नाही. यम ह्मणतो–पर ब्रह्मास आकाश ह्मणून जे ह्मटले आहे व पृथिवी, आप इत्यादि भूतास असत् ह्मणून जे ह्मटले आहे ते ती शून्य आहेत या अभिप्रायाने ह्मटलेले नाही. तर कार्य-कारणाहून पृथक्सत्तायुक्त नसते, त्या दोघाची सत्ता एकच असते, अर्थात् कार्य व कारण याचे ऐक्य असते, या अभिप्रायानें ह्मटलें आहे. त्याचप्रमाणे जन्मरहिताचा जन्म, असे जे ह्मटले आहे, ते विवर्ताच्या अभिप्रायाने ह्मटलें आहे. परिणामाच्या अभिप्रायाने ह्मटलेले नाही. ह्मणजे अज आत्म्याचा जन्म झाल्यासारखा वाटतो. खरोखरी तो होत नाही. साराश, हा द्विज वस्तुतः कधी झाला नाही, व तो नाही असही नाहीं. तो सदा विज्ञान–प्रकाशरूप आहे. महा प्रलय झाला असता सृष्टींतील काहीं रहात नाही, पण शात, निर्गुण, अनत, केवल,

नित्य, व निरुपाधिक आत्मरूप ब्रह्म असते, व तेच या द्विजाचें स्वाभाविक सत्य रूप आहे. सृष्टीच्या उत्पत्तीचा काल आला असता वासनारूप बीजामुळे विराट्–शरीररूपी तेज त्याच्या पुढे भासू लागते. अविद्येमुळे तो त्यासच 'मी' असे मानतो. याप्रमाणे हा ब्राह्मण सृष्टीच्या आरंभी अबरोदरात चिदाकाशरूप धारण करून राहिला खरा, पण तो नाम, जाति इत्यादि विकल्पानी रहित आहे, त्याला वस्तुत· देह नाही, कर्मे नाहीत, कर्तृत्व नाहीं व वासना नाहींत. हा शुद्ध चिदाकाश आहे. विज्ञानरूपानेच व्यापून राहिलेला आहे. याचे प्राक्तन वासनाजाल मुळीच नाही. सर्व बहिर्मुख चित्तप्रवृत्ति शात झाली की, मग त्याचे असले रूपही अनुभवास येत नाही. तर अधिष्ठानरूप तत्त्वाचा परिचय झाला असता विषयाचा बाध होऊन त्याचे ज्ञानही जसे चिदाकाशरूप होऊन रहाते त्याप्रमाणे प्रस्तुत प्रसगीही होते. साराश, चैतन्य हाच त्याचा स्वभाव आहे, असे ज्ञानही ज्यास सहन होत नाही त्याच्या ठायी पृथिवी, आप इत्यादि तत्त्वे कशी सहन होतील? यास्तव, बा मृत्यो, त्यास मारण्याचा व्यर्थ प्रयत्न करू नको. कारण आकाशास कधी तरी कोणी बाधू शकेल काय? यमाचें हे भाषण ऐकून आश्चर्यचकित झालेला मृत्यु आपल्या मदिरी गेला.

**राम**—गुरुराज, तुम्ही मला सागितलेला हा आकाशज प्रपितामह ब्रह्मदेव असावा असे मला वाटते. **श्रीवसिष्ठ**—होय. रामा, तू अगदी बरोबर ओळखिलेस. पूर्वी मृत्यूने यमाशी या ब्रह्मदेवाकरिताच वाद केला. मन्वतराच्या शेवटी सर्व—भक्षक मृत्यु इतर प्राण्याचा सहार करीत ब्रह्मदेवापर्यत जाऊन पोचला व तो व्यसनी काळ त्यासही खाण्यास तयार झाला. पण यमाने त्यास उपदेश करून त्या साहसापासून परत फिरविले ब्रह्मदेव मनोमात्र आहे. आकाशाचे ठायी आकार नसतानाही, केवल भ्रमाने, उपडया निळ्या कढयीप्रमाणे जसा त्याचा आकार दिसतो तसाच या ब्रह्मदेवाच्या शरीराचा प्रकार आहे. खरोखर पाहता केवल परमात्म्याचे ठायी दृश्य नाही व द्रष्टाही नाही. तर केवल चैतन्य—स्वभावता आहे. पण अनादि अविद्येमुळे त्याच्याठायी हा पद्मज उत्पन्न होतो. सकल्प—मात्र मनालाच ब्रह्मा ह्मणतात. ( पण हा ब्रह्मा पुराणातील विष्णु व शिव याच्या बरोबरीचा तिसरा देव नव्हे. तर त्या तिघाचाही समुदाय हिरण्यगर्भ

आहे. अर्थात् विष्णु, शिव, व ब्रह्मा हे तीन त्याचे अवयव आहेत. यालाच कार्य-ब्रह्म ह्मणतात. सहस्रशीर्षा पुरुष व प्रथम शरीरी हाच होय. ) असे जर आहे तर निराकार, सकल्परूप ब्रह्मदेवाला पुरुषाकारता कोठून आली ? असे तुला वाटेल ह्मणून त्याचे उत्तर सागतो. राघवा, चित्रे काढणारे चितारी अगोदर मनामध्ये चित्राचा आकार कल्पितात व नतर तसेच ते बाहेर काढितात. पण त्याच्या मनातील चित्राच्या प्रतिमेला देह ह्मणता येईल का ? नाहीं. पण ती आत देहाकार भासते. त्याचप्रमाणे चिदाकाशाचे स्वच्छ प्रतिबिब घेणारे जे मन तेंच ब्रह्मा होय. ह्मणजे तेंच प्रजापतीच्या शरीराच्या आकाराने भासते. साराश मनाचा प्रजापति-शरीराकार परिणाम वास्तविक नव्हे, तर तो भ्रम आहे. केवल, अनत व आदि-मध्यावसानशून्य चिदाकाशच मूळ अज्ञानामुळें तदाकाराने भासते असे तू समज २.

**सर्ग ३**—ब्रह्मा मनोमय आहे. जग त्याच्या संकल्पमय आहे. वास्तव ते मनोराज्याप्रमाणे असत् आहे, असें येथें वर्णन करितात.

**श्रीराम**—गुरुवर्य, ब्रह्मा मनोमय आहे, असे मानल्यास एक मोठी अडचण येते. ती कोणती ह्मणून ह्मणाल तर सागतो. मन वासनासमूहरूप असतें, असे आपणच मला सागितले आहे. तेव्हा ब्रह्मा मनोरूप आहे, असे ह्मटल्यावर "याचे प्राक्तन वासनाजाल मुळींच नसते" या आपल्या ह्मणण्याशीं विरोध नाही का येत ? शिवाय आपले, माझे, किंवा पशु, पक्षी इत्यादि कोणाही प्राण्याचे शरीर पूर्वजन्मातील अन्त्यमतीप्रमाणे जसे उद्भवते तसे त्याचेही शरीर, पूर्व शरीर सोडताना झालेल्या कर्मानुरूप स्मृतीप्रमाणे उत्पन्न होते, असे ह्मणण्यास कोणता प्रत्यवाय आहे ? व पूर्व स्मृतीप्रमाणेच ब्रह्मदेवाचा हा देह उत्पन्न झाला, असे ह्मटल्यावर त्याचा पूर्वजन्म, कर्मे, वासना, मरण इत्यादि सर्वाची प्राप्ति नाही का होत ?

**वसिष्ठ**—रामा, तू ह्मणतोस ते खरें, ज्याला शुभाशुभ कर्मासह पूर्व देह असतो त्यास पूर्वशरीर सोडताना कर्मानुरूप अत्यमति उद्भवणे व त्या अंत्य स्मृतीप्रमाणे उत्तर देह प्राप्त होणे, अगदीं न्याय्य आहे. पण ब्रह्मदेवाला पूर्व देहच नव्हता. मग प्राक्तन कर्म व तदनुरूप स्मृति कोठून होणार ? "कर्म व उपासना यांच्या अनुष्ठानाने हिरण्यगर्भ-पदप्राप्ति होते, असें; व "मन अन्नमय आहे" असें; उपनिषदात सागितलें आहे. तेव्हां ब्रह्मदेवाचेह

पूर्वे कर्मे असले पाहिजे; त्यावाचून त्याला या पदाची प्राप्ति होणार नाही व मनोमय शरीरालाही कांहीं आकार असला पाहिजे; त्यावाचून ते अन्न-कार्य आहे, असे म्हणता येणार नाहीं; म्हणून ह्मणशील तर ते खरे आहे. पण उपनिषदातील ते सर्व वर्णन अज्ञ मनुष्याची समजूत पाडण्याकरिता केलेले आहे. तत्त्वज्ञाच्या दृष्टीने त्यातील एकही गोष्ट खरी नाही.—हा प्रपंच पूर्वीं नव्हता, आता नाही व पुढें नसणारच—असें तो निःशंकपणे जाणतो. तर मग हे सर्व जग व्यवस्थित रीतीने चालले आहे व यात पुष्कळ नियमित प्रकार होत आहेत, असा सर्व प्राण्याना जो अनुभव येतो तो का? असे विचारशील तर सागतो. तो अनुभव ज्या अवस्थेत येतो, त्या अवस्थे पुरता, हा प्रपचही सत्य आहे. पण ती अवस्था सोडून दुसऱ्या अवस्थेत गेले की, तो मिथ्या ठरतो. स्वप्नामध्ये स्वप्नप्रपच जसा सत्य असतो, त्याप्रमाणे जाग्रतीत जाग्रत्प्रपच सत्य आहे. पण पहिला प्रप्रच दुसऱ्या अव-स्थेत जसा मिथ्या तसाच दुसऱ्या प्रकारचा प्रपच पहिल्या अवस्थेत मिथ्या ठरतो उपनिषदे अज्ञ पुरुषाना परमात्म्याचे ज्ञान करून देण्याकरिता प्रवृत्त झालीं आहेत यास्तव, त्याच्या भाषेत व त्याच्याच समजुतीप्रमाणे प्रतिपादन करणे, त्यास अवश्य आहे. पण परमार्थ दृष्ट्या किंवा ज्ञानि—दृष्ट्या पाहिल्यास प्रपच त्रिकाली नाही, असेच म्हणावे लागते. या परमार्थ—दृष्टीस अनुस-रूनच मी येथे ब्रह्माच्या पूर्वजन्माविषयी तुला सागत आहे. जग मिथ्या कसे, हे चागल्यारीतीने कळण्यास त्याचा फार उपयोग होईल. साराश, रामा, ब्रह्मदेवाला एक आतिवाहिक म्हणजे सूक्ष्म देहच असतो. त्या अज स्वयभूस इतर प्राण्याप्रमाणे आधिभौतिक देह नसतो. जन्म आधि-भौतिकाचाच होणे शक्य आहे. जगातील प्राण्याची उत्पत्ति म्हणजे काय? तर आधिभौतिक देहाची उत्पत्तिच होय. कारण सर्वव्यापी व नित्य आत्म्याप्रमाणे सूक्ष्मदेहही उत्पत्तिशून्य व नाशशून्य आहे. त्याचा नाश मुक्तीच्या वेळी मात्र होतो. अथवा आतिवाहिक देहाचा नाश ह्मणजेच मोक्ष होय. वस्तुस्थिति अशी असल्यामुळेच मृत्यु ब्रह्म-देवास मारू शकला नाही.

असो, राघवा यावरून एक गोष्ट तुझ्या ध्यानात आली असेल, ती ही की, कर्म, वासना इत्यादि कारणापासून होणाऱ्या भूतास दोन देह असतात व अज स्वयभूस पूर्वोक्त कारणांच्या अभावीं

एकच देह असतो. अथवा हा एक अजच सर्व भूतांचें परम कारण आहे. याचे मात्र काही कारण नाही. ह्मणून याला एक देह असतो व इतरास दोन असतात. या प्रथम प्रजापतीला भौतिक देह नाहीं, हाही आरोपित आहे. आरोपिताचे स्वरूप अधिष्ठानाहून भिन्न नसते. यास्तव, तो चैतन्यरूप आहे. पृथ्वी, आप इत्यादि भूतरूप नाहीं. हा प्रजापतीच प्रजेचा विस्तार करितो. त्यामुळे सर्व प्रजाही चैतन्यरूप आहे. कारण, कार्य कारणरूप असते, असा न्याय आहे, व सुवर्णाची–कडे, सरी, गोप इत्यादि–सर्व कार्ये सुवर्णरूप असतात, हें सर्वास ठाऊक आहे. चित्तमय अशा त्याच्या ठायी " अह " हा पहिला परिस्पद झाला. तोच या सर्व स्थूल भूताचे कारण आहे. वायूपासून जसा स्पद ( चलन ) त्याप्रमाणे याच्यापासून तद्रूप अशी ही सृष्टि झाली. स्वतः ब्रह्मदेवच अध्यस्त असल्यामुळे ही सृष्टीही अध्यस्त आहे. अध्यस्त ह्मणजे आरोपित. पण हा ससार जरी आरोपित आहे तरी तो सत्य असल्यासारिखा व तो जरी चिद्रूप असला तरी अचिद्रूप असल्यासारिखा भासतो. ह्मणजे एका स्वप्नात जसे दुसरे स्वप्न दिसावे किवा त्यात जसा स्त्रीसमागम घडावा, तसा हा सर्व प्रकार आहे.

असो, असा हा केवळ चित्तरूप ब्रह्मा या त्रिभुवनाच्या स्थितीचे कारण आहे. या स्वयभूचा सकल्प प्राण्याच्या कर्माप्रमाणे जसा जसा विकास पावतो त्या त्या प्रमाणे प्रपच भासू लागतो, आणि स्वरूप व आतिवाहिक देह यास विसरल्यामुळे सर्व प्राणी यथास्थित व्यवहार करू लागतात. काल्पनिक पिशाचाप्रमाणे त्याना हा सर्व संसार सत्य भासतो. ब्रह्मदेवाला मात्र आपल्या आतिवाहिक शरीराची व स्वरूपाची विस्मृति होत नाही. कारण त्याचे रूप सर्व स्थूल प्रपचापूर्वी मायाशबल ब्रह्मापासून झालेले असते, व त्याची प्रकृति शुद्ध असते. त्यामुळेच त्याचा सकल्प सत्य असतो. त्याच्या प्रकृतीत तमोगुणाचा अश नसतो. ह्मणून त्याचे ज्ञान इतराप्रमाणे लुप्त होत नाहीं. त्यामुळेंच त्याला जाड्यभ्रमही होत नाहीं. ब्रह्मा मनोमय असल्यामुळे जगही मनोमय आहे. त्या अजाच्या उत्पत्तीला जशी सहकारी कारणाची गरज नसते तशीच सृष्टीच्या उत्पत्तीलाही सहकारी कारणाची गरज नाहीं. कार्य उत्पन्न करावयाचे झाल्यास कर्त्याला ज्या दुसऱ्या अनेक कारणाचे सहाय घ्यावे लागते त्यास सहाकारी का-

रणे ह्मणतात. पण या संकल्पमात्र सृष्टीस रचताना ब्रह्मदेवास सुताराद-काप्रमाणे तासणी, करवत, हातोडा, इत्यादिकांचे सहाय घ्यावे लागत नाही. त्यामुळे कारणाहून कार्य भिन्नस्वरूपाचे आहे, असें येथे ह्मणता येत नाही. फार काय पण जग व ब्रह्म यामध्ये कार्य-कारणताही सिद्ध होत नाही. कारण खरोखरच जर एकादे कार्य कारणापासून उत्पन्न झाले असले तर ते, या अमुक कारणाचे हे कार्य आहे, असे सांगता येणार. पण सर्वच जेथे मनोमय व संकल्पजन्य कारभार आहे तेथे कार्य–कारणभाव कसा दाखविता येणार? सारांश, जसे पर ब्रह्म तसेच हे त्रिभुवन आहे. अनादि अविद्येमुळे जरी जगाचे स्वरूप अगदी विलक्षण भासत असले तरी तो भ्रमाचा खेळ आहे. दृश्य, दर्शन व द्रष्टा यांचे परमार्थतः ऐक्य आहे, हे जोपर्यंत मोठ्या पुण्यप्रभावामुळे समजलेले नसते तोपर्यंतच हा सर्व प्रपंच-बाजार भरलेला असतो. सर्व दृश्य, मनातच भासते. मनाच्या बाहेर कोठेही भासत नाही. याला स्वप्न व मनोराज्य हे दोन उत्तम दृष्टांत आहेत. स्वप्नातील व मनोराज्यातील सर्व पदार्थ मनोमय असतात, हे प्रत्येकास स्वानुभावावरून समजण्यासारिखे आहे. काल्पनिक पिशाच जसे लहान मुलास व्याकुल करून सोडते व प्रसंगी त्याचा प्राणही घेते त्याप्रमाणे ही मयोमय सृष्टि अगोदर द्रष्ट्यास आच्छादित करून सोडते व नंतर बीजांत गुप्त असलेला वृक्ष जसा अनुकूल अवस्था मिळताच फोफावतो ( विस्तार पावतो ) त्याप्रमाणे दृश्यबुद्धि विस्तार पावते. त्यामुळे जग सत्य होऊन बसते. पण वस्तुतः ते सत्य नाही. आह्मी मोठ्या आग्रहाने जग मिथ्या आहे, असे कां सांगतो ह्मणून तू ह्मणशील तर त्याचे उत्तर असे–दृश्य जग सत्य आहे, असे ह्मटल्यास दृश्यामुळे होणारे दुःख व बंध कधीही नाश पावणार नाहीत, व त्याचा नाश झाला नाहीं तर बोद्धा जो आत्मा त्याला केवल–अवस्था कधीही प्राप्त होणार नाही. पण दृश्य मिथ्या आहे, वस्तुतः ते असणे संभवत नाही, असे ह्मटल्यावर बोद्धयाचे बोद्धृत्व सत्य आहे, असें जरी क्षणभर मानले तरी त्याचा नाश झाल्यावाचून रहाणार नाही. मग मिथ्या सृष्टीमुळे त्याच्याकडे आलेले मिथ्या बोद्धृत्व नाश पावेल हें निराळे सांगावयास नकोच, आणि मी या जगास जाणतो, असे म्हणणारा बोद्धाच जगाच्या मिथ्यात्वामुळे नाहीसा झाला की, राहिलेलें जें शुद्ध व निर्विकार चैतन्य तोच मोक्ष, निर्वाण, व पर ब्रह्म होय. तात्पर्य येणें-

प्रमाणें जग मिथ्या आहे; आणि त्याकरितांच आम्ही त्यांविषयीं इतका आग्रह धरितो ३.

**सर्ग ४**—वसिष्ठ मुनि उपदेश करीत आहेत तों सायंकाळ झाला. त्यामुळें सभा विसर्जन करून उठलेल्या लोकाचा निशाक्रम व प्रातःकाळीं पुनः सभेत येऊन बसणे व उपदेशारंभ याचे वर्णन येथें केलें आहे.

**श्रीवाल्मीकि**—याप्रमाणे मुनिवसिष्ठ उपदेश करीत असताना तेथील सर्व जन एकाग्र चित्त करून व मौन धारण करून बसले होते. त्यावेळी त्या राजसभेत सर्वत्र शातता पसरली होती. कोठे लहानसहानही ध्वनि होत नव्हता. फार काय पण पिजऱ्यातील पोपट, मैना इत्यादि पक्षीही कान वाकडे करून वसिष्ठाचे भाषण ऐकत होते. त्यानी आपली सर्व हालचाल बद केली. स्त्रिया आपले हावभाव विसरल्या. साराश त्याप्रसगी ती राजसभा चित्रासारखी निश्चल होती. इतक्यात सायंकाळ झाला. उन्हे लाल दिसू लागली. सूर्यकिरणाप्रमाणेच प्राण्याचे व्यवहार कमी कमी होत चालले. शीत, मद व मुगध वायु राजसभेकडे येऊ लागला. हा जणु काय श्रवणाकरिताच येत आहे, असे त्यावेळीं कित्येक कल्पकास वाटले. इतक्यात वसिष्ठानीं सर्व दिवसभर जे सागितले होते त्याचे चितन करण्याकरिताच जणु काय भगवान् सूर्य प्रपचास सोडून अस्ताचलाच्या निर्जन शिखराकडे चालला. विज्ञानश्रवणानतर चित्तात जसा हळु हळु शाततेचा प्रादुर्भाव होतो त्याप्रमाणे सध्याकाळच्या शाततेस आरभ झाला. दाही दिशेत प्राण्याचा अवर्णनीय सचार होऊ लागला. श्रोते जसे आपल्या माना वर उचलून वसिष्ठाच्या मुखारविंदाकडे पहात होते त्याचप्रमाणेच जणु काय सर्व वस्तूच्या सावल्या दूर दूर पसरल्या. इतक्यात राजाचा द्वारपाल आला व नम्र होऊन, त्याने "सध्यावदनादि कर्माचा समय झाला," असे निवेदन केले. त्याबरोबर वसिष्ठानी आपले मधुर भाषण आटोपिले

"महाराज, मी आज जे सागितले आहे त्याचा सर्वांनीं आपल्यापाशीच अधिक विचार करावा. आता या पुढे जें काहीं मला सागावयाचे आहे ते मी उद्यां सागेन." असे बोलून, ते मुनिवर्य स्वस्थ बसले. तें ऐकून राजा "बरे आहे" असे ह्मणाला व त्याने आपल्या कल्याणाकरिता पुष्पे पाद्य, अर्घ्य, सत्कार व दक्षिणा इत्यादि देऊन देव, ऋषि, मुनी व ब्राह्मण यांचे आदराने पूजन केले. नतर ती सर्व सभा उठली; त्या वेळ

लोकाची मोठी गर्दी झाली. एकमेकांचे अंग एकमेकांस लागलें. राजगृहाच्या बाहेर पडेपर्यंत सर्वांनाच मोठी अडचण झाली. पण बाहेर पडल्यावर लोक इतस्ततः आपापल्या स्थानाकडे जावयास निघाले. त्यामुळें त्या राजगृहाच्या चारी बाजूचे मार्ग त्या श्रोत्यांनीं भरून गेले. मार्गाने जात असतानाही, त्याच्या मनात मुनींनीं सागितलेला उपदेश घोळत असल्यामुळें त्यांच्या इंद्रियवृत्ति शात होत्या. त्यातील जे नभश्चर होते ते विमानात बसून अतरिक्षात गेले व जे भूचर होते ते भूलोकीं राहिले. त्या सर्वांनीं आपापल्या स्थानीं जाऊन संध्यावदनादि क्रिया आरभिल्या. इतक्यात कृष्णवर्ण रात्र दिसू लागली. दिनमणी ( सूर्य ) दुसऱ्या लोकास प्रकाशित करण्याकरिता गेला होता. कारण सर्वास प्रकाश देणे, हेच सत्पुरुषाचें मुख्य कर्तव्य असतें. पण तो तेजोनिधि गेल्यामुळें रात्रीस वृद्धि पावण्यास व क्षुद्र नक्षत्रास चमकण्यास अवकाश मिळाला. अंतरिक्ष एकाद्या प्रफुल्लित वृक्षाप्रमाणे दिसू लागलें. लहान मोठ्या नक्षत्राकडे पाहून विचारी लोकाच्या चित्तात अनेक सात्विक तरग उठू लागले. निर्मळ चित्तवृत्ति जशा गाढ निद्रासमयीं चित्तात लीन होतात त्याप्रमाणे, दिवाभीतास सोडून, इतर सर्व पक्षी आपापल्या घरात जाऊन पूर्वीच बसले होते, पश्चिम दिशा आरक्तवर्ण दिसत होती, ती हळु हळु कृष्णवर्ण झाली. त्रैवर्णिक सध्यावंदनात निमग्न झाले होते. पण त्याच्या पूजेचा स्वीकार करून सध्या गेली असता चारी दिशात गाढ अंधकार पसरला. विधवा स्त्रियाप्रमाणे पूर्वादि दिशाचीं मुखें काळीं ठिक्कर पडलीं. पण अशा अवस्थेत काहीं काल जात आहे तोंच निशापति ( चद्र ) आपल्या दुःखी स्त्रीचे जणु काय सात्वन करण्याकरिताच पूर्व दिशेंत क्षितिजावर चमकू लागला. त्यामुळे पूर्व दिशेच्या सुखास तर पारच राहिला नाही, पण तिच्या प्रफुल्लित मुखाकडे पाहून दक्षिण, पश्चिम इत्यादि दिशा मनात अति मत्सर करू लागल्या. पण तो भगवान् ओषधिपति पक्षपाती नव्हता. त्या सज्जनाने थोडक्याच वेळात भूलोकच्या सर्व चराचरांस आनदित केले. सज्जनाचा अभ्युदय झाला की, दुर्जनाचा नाश आपोआप होत असतो. त्याच न्यायानें चद्रोदय होतांच सर्व जगास आपल्या भयंकर आकारानीं अच्छादित करणारे दुष्ट अंधकार पार नाहींसे झाले. दिवसां श्रीवसिष्ठांचा उपदेश ऐकून श्रोत्याच्या चित्तांतील अज्ञतेची

जी अवस्था झाली होती तीच त्या बिचाऱ्यां( अंधकारां )ची झाली. उपहारादि केल्यावर ऋषि, राजे व इतर जन दिवसां ऐकलेल्या अपूर्व वाणीचा विचार करीत निजले; व त्यांनीं स्वप्नांतही दिवसां घडलेला प्रकारच पाहिला. पुढें त्याचें चित्त सद्रूप परमात्म्याशीं मिळून गेल्यामुळें त्यांस जगाचें भान राहिले नाही. ते सर्व आनंदसागरांत व एकमेवाद्वितीय-स्थितींत निमग्न झाले होते. त्याची तीच स्थिति जर त्रिकालीं तशीच रहाती तर श्रीवासिष्ठाना अधिक उपदेश करण्याचा प्रसंग आला नसता. पण त्यांचीं दुष्ट कर्मे त्यांस कोठलीं सोडणार ? तीं पुनः फलोन्मुख झालीं. त्याबरोबर सर्व हळु हळु जागे झाले. तो पहाट झाली होती. चद्रमा पश्चिमार्धात चमकत होता. पूर्वदिशेत अरुणाचे तेज पसरूं लागले होते. कोंबड्यांनीं ओरडून एकच गोगाट करून सोडिला होता. राजाचे स्तुति-पाठक आपल्या स्वामीची स्तुति करीत होते. धार्मिक भगवद्भक्त भगवानाचे गुणानुवाद गात होते इतक्यांत हळु हळु रात्रीची शोभा कमी होऊन नक्षत्रे मावळू लागलीं. वस्तु सर्वदा सारख्याच अवस्थेत रहात नाहीं, असें चंद्रमा आपल्या निस्तेज मंडलाने लोकांस सुचवू लागला. सच्छील ब्राह्म-णादि, शौचादी आटोपून, संध्येचा मुख्य काल जाऊं नये ह्मणून स्नान करण्याच्या गडबडींत लागले. प्रहर रात्र असतानाच उठून, आपल्या शिष्यांस पाठ सांगू लागलेले श्रोत्रिय, सध्याकाली अध्ययनाचा निषेध असल्यामुळे, ते सपवून इतर नित्य कर्मांच्या अनुष्ठानास प्रवृत्त झाले. शिष्यवर्ग गुरूच्या कचाट्यातून सुटल्यामुळें थोडासा आनदित होऊन इतस्ततः स्वैर हिंडूं लागला. शुश्रूषु आपल्या विद्यागुरूंच्या सेवेंत तत्पर रहाण्याकरिता गुरूच्या पूर्वी स्नानादि करून होमशाळेत अनुष्ठानाचें साहित्य जमवू लागले. इतक्यात चागले उजाडले. एकही नक्षत्र दिसेनासें झाले. चद्राचा प्रभाव ज्याच्यापुढे मुळींच पडला नाहीं, असा अतर्गृहांतील अंधकारही चार प्रहर तेथें सुखानें राहून, आतां मात्र आपला येथें निभाव लागत नाहीं, असें पाहून, एकाद्या भ्याड क्षत्रियाप्रमाणें पळून जाण्याच्या तयारीस लागला. राजाच्या प्रतिबधातून सुटलेल्या राजकीय कैद्यांप्रमाणें पक्षी पुनरपि पूर्वीप्रमाणेच लोकांस प्रिय वाटतील, असे मंजुळ ध्वनि करूं लागले. सारांश कालाच्या नियमाप्रमाणें, जाण्याकरितांच आलेली रात्र सपली व भास्कराचा पुनः उदय झाला. तो नारायण आपल्या

रमणीय मंडलांच्या द्वारा "बाबानों, जरी आपत्ति आली तरी धीर सोडूं नका. ती जशी आली आहे तशीच मुकाट्यानें जाईल" असें प्रत्येक कर्मवश असलेल्या प्राण्यास सांगत होता. असो; महात्म्यांच्या चित्तांत विवेकवृत्ति जशी उद्भवते त्याप्रमाणे या ब्रह्मांडोदरांत उदय पावलेल्या त्या भगवानास नमस्कार करून सर्व जन आपापल्या नित्य व्यवहारास लागले. राजाच्या सभेंतील सभासद सभास्थानाकडे त्वरेने येऊं लागले. थोड्याशाच अवकाशात सभास्थान भरून गेलें. राजा दशरथ, त्याचे पुत्र, त्याच्या स्त्रिया, ऋषिवर्ग, मंत्रीसमूह इत्यादि सर्व स्व—स्वस्थानीं विराजमान झाले असता व सर्व लोक स्वस्थ बसले असता राघव मधुर वाणीनें आपल्या कुलगुरूंस ह्मणाला—भगवन्, मन संकल्पाने हे सर्व निर्माण करिते, असें तुह्मी मला काल सांगितलेत. पण त्या मनाचे स्वरूप कसें काय आहे, ते मला आता अगोदर सांगा.

**श्रीवसिष्ठ**—रामा, शून्य व जड अशा या आकाशाप्रमाणेंच मनालाही रूप मुळींच नसतें. ते केवळ शब्दमात्र आहे. मन या शब्दापलीकडे त्याचें स्वरूप काहीं नाहीं. देहाच्या बाहेर किंवा हृदयांत त्याचे सद्रूप आढळत नाहीं. तरिपण हे रामा, तें आकाशाप्रमाणें सर्वत्र आहे, असें समज. असल्या या स्वरूपशून्य मनापासून मृगजळाप्रमाणें हें जग निर्माण झालें आहे. पुढे प्रत्यक्ष असलेल्या अथवा पुढें नसलेल्या (परोक्ष) पदार्थाचे जे हें तदाकार भान होते तेंच मन होय. ह्मणजे निराकार चैतन्याचे ठायी होणारा जो हा विषयांचा अध्यास त्यासच मन ह्मणतात. संकल्प हेच मन आहे. जेथें द्रवत्व तेथें जल व जेथे स्पंदन तेथे वायु त्याप्रमाणेच जेथे संकल्प तेथें मन. अर्थात् मन व संकल्पहीं एकच होत. आता तू कदाचित् ह्मणशील कीं, चैतन्ययुक्त वृत्तिच पदार्थास प्रकाशित करिते व चैतन्य तर सत्य आहे. तेव्हां चैतन्याचेच बनलेले मन मिथ्या कसे होईल? तर याचें उत्तर असे. विषय मिथ्या असल्यामुळे तदाकार झालेले मन मिथ्या असो कीं, ते सत्य चैतन्याचेंच बनलेले असल्यामुळे सत्य असो; त्याविषयीं आमचें काहीं ह्मणणें नाहीं; ज्याने त्याने आपापल्या समजुतीप्रमाणे त्यास जाणावे. आमचें तूर्त एवढेंच ह्मणणे आहे कीं, मन जसे असेल तशीच त्याची समष्टि असणार व ती समष्टिच ब्रह्मदेव आहे. समष्टि ह्मणजे समूह. वन

ही वृक्षांची समष्टि आहे. ब्रह्म जर सर्व समष्टिरूप आहे तर त्याला दुसरें आणखी काय उत्पन्न करावयाचे असतें? ह्मणून विचारशील तर सांगतो. दीर्घकाल सूक्ष्म अवस्थेंत असलेल्या मनांतील विशेष तत्त्वाचें मिश्रण करावे ह्मणजे पचीकरणाने त्यांस स्थूल करावे, असे त्याच्या मनांत येते. या इच्छेमुळेच तो स्रष्टा होतो, व पृथिवी, आप इत्यादि स्थूल भूते उत्पन्न करावयाचे (स्रष्टव्य) पदार्थ होतात. पण मन, अहकार इत्यादि हा सर्व दृश्य प्रपच अविद्येचा विलास असल्यामुळे अविद्यामय आहे व ससृति, चित्त, मन, बध, मल, तम इत्यादि ही सर्व तिचींच नावें आहेत दृश्य मनोमय असतें व ते उत्पन्नच झाले नाहीं, असें मी पुनः एकदा सागून ठेवितों. तात्पर्य चैतन्याचे ठायी अविद्येची स्थिति होणें, हीच जगाची स्थिति होय. वायूच्या चाचल्याप्रमाणें किंवा जलाच्या द्रवत्वाप्रमाणें दृश्य हा अविद्यायुक्त चैतन्याचा स्वभावच आहे. त्यामुळे सोन्याचें कडें जसें सोन्यास सोडून कधीही राहूं शकत नाहीं त्याप्रमाणे दृश्य द्रष्ट्यास सोडून रहात नाही. तर द्रष्ट्याच्या सत्तेनेच ते सत्तावान् होतें. पण याप्रमाणे द्रष्ट्याच्या ठायी अनन्य-(अपृथक्, ऐक्य)रूपाने राहिलेलें जें हें दृश्य त्याचेंही मी आता पुढें आरशावरील मळाप्रमाणे मार्जन करणार आहें. ते नाहींसे झालें की चैतन्याचें द्रष्टृत्वही आपोआप क्षीण होईल. कारण दृश्यामुळेंच ते द्रष्टृ होत असतें. पण याप्रमाणें असत्-दृश्याचा बाध झाल्यावर केवळ सच्चित्-रूपानें रहाणारा आत्मा केवळ अवस्थेंत रहातो. वायु शात झाला असता जलाशयांतील क्षुब्धता जशी शात होते त्याप्रमाणेंच चित्तात अशा प्रकारचें हें कैवल्य प्रादुर्भूत झालें असता राग-द्वेषादिवासना शात होतात. पण विषयावाचून ज्ञान राहील कसे? म्हणून म्हणशील तर त्यात फारसा अर्थ नाहीं. कारण दिशा, भूमि, वृक्ष इत्यादि सर्व प्रकाश्य वस्तु नसल्या तरी सूर्याचा प्रकाश जसा त्या नाहींत, असे दाखवीत रहातो; त्याप्रमाणे दृश्य नसले तरी ज्ञान राहूं शकते. एकाद्या नाटक शाळेत लाविलेला दीप तेथे नटादि असल्यास त्यास प्रकाशित करतो व कोणी नसलें तरी स्वतः तेवत रहातो. मोठ्या रस्त्यावर टागलेला मोठा आरसा रस्त्यातून गाडी, घोडा, मनुष्य, गाय इत्यादि जे जें कांहीं जाईल त्यास आपणामध्ये व्यक्त करितो व मार्गांत काहीं नसलें तरी तो स्वरूपाने असतो. त्याप्रमाणे ज्ञानही मी, तू, हें जग,

इत्यादि दृश्य अविद्येमुळे जोवर असतें तोंपर्यंत त्यास व्यक्त करिते व अविद्येच्या नाशामुळें त्याचा नाश झाला म्हणजे केवल अवस्थेत रहाते.

**श्रीराम**–गुरुराज, पण हें दृश्य असत् आहे, असें आम्हांस वाटत नाहीं आणि तें सत् असल्यास त्याचा बाध होणें कधींही शक्य नाहीं. तेव्हा याचा नाश कसा होणार ?

**श्रीवसिष्ठ**––या दृश्य पिशाच्याचा नाश कसा होईल, त मी तुला सागतों. आतां मी जो हा मंत्र तुला सागत आहे त्याच्या योगानें तें नाहींसे होईल. येथें जरा विचार केला पाहिजे. आम्हीं वैदिक विवर्तवादी आहो. म्हणजे जग मिथ्या आहे, रज्जूचे ठायी जसा सर्पाचा भ्रम होतो त्याप्रमाणे अविद्यायुक्त चैतन्याच्या ठायीं जगाचा भ्रम झाला आहे. त्यामुळे ही दोरी आहे, असे समजले की सर्पभ्रम जसा बाधित होतो त्याप्रमाणे चैतन्याचा साक्षात्कार झाला की, जग बाधित होतें; असा आमचा सिद्धात आहे. म्हणूनच "जग मिथ्या आहे, अशी भावना करा." असे आम्हीं आमच्या शिष्यवर्गास प्रथम सागतो. कारण तें मिथ्या आहे, असें समजल्यावाचून त्यातील पदार्थाविषयीं असलेली आसक्ति कमी होत नाही. ती असे पर्यंत वैराग्य, विवेक व शमादि साधने यास संपादन करिता येत नाही. त्याच्या अभावी ब्रह्मविचाराची योग्यता अथवा अधिकार येत नाहीं; व त्यामुळें ज्ञान व ज्ञानप्राप्य मोक्ष ( केवळभाव ) ही दुर्लभ होतात. पण या वैदिक तत्त्वाचा अनादर करून अवैदिक परिणामवादाचा अगीकार केल्यास कशी अडचण येते ती पहा–परिणाम–वादात वस्तूच्या उत्तरोत्तर अवस्थाच्या योगानें तिच्या पूर्व अवस्थाचा केवळ लय होतो, अत्यत उच्छेद ( नाश ) होत नाहीं. कारण ती वस्तु सत् असते व सत्चा अभाव होणे न्यायविरुद्ध आहे. उदाहरणार्थ–दूध ही वस्तु घेऊ या. तिचे दही झाल की पूर्व अवस्था नाहीशी होते, हे खरे, पण त्यामुळें त्या वस्तूचा अत्यत नाश होत नाहीं. दह्यापासून लोणी व ताक, लोण्यापासून तूप इत्यादि उत्तरोत्तर अवस्थेतही दूधाचा अत्यत नाश होत नाही. त्याचप्रमाणे जग हा चैतन्याचा परिणाम आहे, असें समजल्यास, नाश या सहाव्या भावविकाराच्या योगानें गुप्त झालेलें द्वैत चित्तांत किंवा प्रकृतींत काम, कर्म व वासना या रूपानें

राहील; व त्या बीजापासून पुनः त्याचा उद्भव होईल; आणि येणेंप्रमाणें मोक्ष कधींही होणार नाहीं.

यावर कोणी ह्मणतील कीं, परिणाम–वादी साख्य शास्त्राची परिभाषा अशी आहे.—हा चिदात्मा, आपल्या बाह्य ( विलक्षण ) असलेल्या प्रधानांतच असलेले हे दृश्य, बुद्धीहून मी भिन्न आहें, असा विवेक न झाल्यामुळें, आपल्या ठायींच आहे, असे पाहतो ( समजतो ). हाच ससार होय, पण विवेक–ज्ञानाचा उदय झाल्यामुळें अविवेकजन्य आभिमान निवृत्त होतो व त्यामुळे बाह्य दृश्य जसेच्या तसेच असतानाही तो मुक्त होतो. यास्तव तुह्मी ह्मणता त्याहून परिणाम-वाद्याची मोक्षाची कल्पना भिन्न आहे. अर्थात् वर सागितलेली अडचण येत नाहीं. पण तें बरोबर नाहीं. कारण जीवन्मुक्त देव, ऋषि व मुनि–" जर हें जग खरोखर असतें तर मोक्ष कोणालाही मिळाला नसता, पण आम्ही मुक्तावस्थेचा अनुभव घेत आहो, व त्यावरून आमचा असा निश्चय झाला आहे कीं, हें दृश्य, मग तें बाह्य असो कीं आतर असो, केवल क्षणभंगुर ( मिथ्या ) आहे," असे ह्मणतात; ह्मणजे हा त्या अनुभवी लोकाचा सिद्धांत आहे यास्तव राघवा, विषयी व केवळ तार्किक यांस भयप्रद वाटणारी ही माझी प्रतिज्ञा तू ऐक. " सर्व दृश्य नाममात्र आहे. तें प्रत्यक्ष दिसत असले तरी अक्षर-ब्रह्मरूप आहे घटाकाश जसें महाकाशात असते व त्यास सोडून त्याला जाता येत नाहीं त्याप्रमाणे प्रत्यक्–आत्मा पूर्ण ब्रह्मामध्यें असतो. त्याचा वियोग कधींही होत नाहीं. खरोखर पहातां दृश्य, द्रष्टा, दर्शन, शून्य व जड, इत्यादि त्याच्यामध्यें काही नाहीं. तर तें अति शात तत्त्वच सर्वत्र पसरलें आहे."

**श्रीराम**–गुरुराज, आपण मजवर रागावाल हे मला ठाऊक आहे. पण मनात आलें आहे ते मी स्पष्ट सागतो. आपले हें भाषण, वाझेच्या मुलानें पर्वताचें चूर्ण केलें; सशाचें शिंग गात आहे, शिला भुजा पसरून व हावभाव करून तांडवनृत्य करीत आहे; वाळूंतून तेल गळत आहे; दगडी बाहुल्या वेदपठण करीत आहेत; चित्रातील मेघ गर्जना करीत आहेत, इत्यादि वाक्यांप्रमाणें चमत्कारिक वाटतें. जरा, मरण, दुःख, पर्वत, वृक्ष, आकाश, चतुर्विध प्राणी इत्यादिकांनीं युक्त असलेलें हें जग नाहीं, असें जें आपण मला सांगत आहां त्याचा अर्थ काय? महाराज,

'आहे' असें प्रत्यक्ष भासणारें हे जग उत्पन्नच झालें नाहीं व 'ते नाही' हे मला निश्चयपूर्वक कळलें पाहिजे. त्याशिवाय मी " होय " म्हणणार नाहीं.

**श्रीवसिष्ठ**—राघवा, तुझे द्वैतसंस्कार दृढ झालेले आहेत. यास्तव एकाएकीं तुझे किंवा दुसऱ्या कोणाचेंही समाधान होणार नाही, हें मला ठाऊक आहे. दृश्य सत्य आहे, असा आग्रह धरून भाडणाऱ्या अज्ञावर आम्ही कधीं रागावत नाही. तर उलट त्याची कींव करून त्यास वारंवार तत्त्वोपदेश करित असतो. असो, मी जे वर सांगितले आहे ते अगदी सत्य आहे. बाबारे, दृश्य मिथ्या आहे, हे आमचे ह्मणणें त्रिकाल–सत्य आहे. तर मग ते सत्य असल्यासारिखे कसें भासते, ह्मणून म्हणशील तर–स्वप्नांतील विषय स्वप्नकालीं जसे सत्य भासतात त्याप्रमाणे हें जाग्रतींतील दृश्य जाग्रत्कालीं सत्य भासतें–असे वर सांगितलेंच आहे. सारांश हा सर्व मनाचा खेळ आहे. या भ्रमाचे कारण मन आहे, व तेच या संसारवृक्षाचे मूळ आहे. चांचल्य ही त्याची स्वाभाविक शक्ति असल्यामुळें तें हें सर्व गारुड रचण्यास समर्थ होते ४.

**सर्ग ५**—विश्वाचें मूळ मन आहे. मनाचे मूळ आत्मतत्त्व आहे, इत्यादि तत्त्वज्ञान येथे सांगतात

**श्रीराम**—भगवन्, या मनोभ्रमाचें परमार्थभूत मूळ काय आहे. ह्मणजे मन या भ्रमाचें सत्य ( अबाधित ) अधिष्ठान काय आहे ? तें कसें उत्पन्न झाले. ह्मणजे त्याच्या आरोपाचा प्रकार कसा आहे ? व तें मायामय ( मिथ्या ) असण्याचे काय कारण ? मन हे सृष्टींतील पहिलें कार्य आहे. यास्तव अगोदर संक्षेपतः त्याच्या मूळाचें ज्ञान झालें ह्मणजे मग सर्व जगाचें मूळ काय आहे, तें सहज समजेल, असें मनात आणून मी हे तीन प्रश्न करीत आहे.

**श्रीवसिष्ठ**—राघवा, तुझ्या या प्रश्नांतील पहिल्या प्रश्नाचें उत्तर मी अगोदर देतो, तें ऐक. महाप्रलयसमयीं सर्व दृश्य प्रपंच नाहींसा होऊन तो बीजरूप होऊन राहिला असतां केवल शांत तत्त्व राहतें. तोच परमात्मा होय. तो सर्वशक्तिमान् परमात्मा केव्हांही नाहीसा होत नाहीं. त्याचें वर्णन करण्याचें सामर्थ्य वाणीमध्यें नाहीं. पण जीवन्मुक्त त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेतात. आत्मा, ब्रह्म, पुरुष इत्यादि त्याचीं नांवें कल्पित

आहेत; स्वाभाविक नव्हेत. सांख्य शास्त्रात ज्यास पुरुष ह्मणतात; वेदान्ती ज्याला ब्रह्म समजतात; विज्ञान–वादी बौद्ध ज्यास केवल क्षणिक विज्ञान ह्मणतात, शून्यवादी बौद्ध ज्यास शून्य ह्मणतात; सूर्य, चंद्र इत्यादि तेजाचाही जो प्रकाशक, जो बोलणारा, मनन करणारा, कर्मफल भोगणारा, अनुभव घेणारा व कर्ता आहे; जो सद्रूप असतानाही अज्ञांस या जगांत असत् असल्यासारिखा भासतो, जो शरीरात साक्षि–रूपानें असतांनाही मूढांस कोठे तरी लांब आहे, असे वाटते; सूर्याच्या प्रकाशाप्रमाणें ज्याचा चैतन्यप्रकाश सर्वत्र पसरला आहे; सूर्यापासून जसे किरण त्याप्रमाणे ज्याच्यापासून विष्णु, इंद्र इत्यादि देवता उत्पन्न होतात; सागरात जसे बुडबुडे त्याप्रमाणे ज्याच्यापासून अनंत जगे निर्माण होतात, भूमीवरील सर्व जल जसें समुद्राकडे जाते त्याप्रमाणे हा सर्व दृश्यसमूह ज्यास जाऊन मिळतो, जो दिव्याप्रमाणे आपल्या स्वरूपास व इतर अनात्म–पदार्थांसही प्रकाशित करितो, जो आकाशात, शरीरामध्यें, पाषाणात, जलात,मातीच्या सूक्ष्म कणात, पर्वतामध्ये, वायूचे ठायी व पातालांतही स्थित आहे; जो आपल्या चैतन्यानें आपापला व्यापार करण्यास उद्युक्त असलेल्या पुर्यष्टकास[1] अंतर्बहिः व्यापून सोडतो, अर्थात देहादिकामध्यें आढळणारी चेतनता ज्याच्यामुळे असते; ज्याने मोठमोठ्या शिळांस मुक्त केलें आहे; व त्यामुळें त्या ध्यानस्थ असल्यासारिख्या दिसतात; आकाशास ज्यानें शून्य केले; पर्वतास ज्याने घन केले. जलास ज्याने द्रवयुक्त निर्मिलें; व सूर्यास ज्यानें आपल्या स्वाधीन असलेला दीप केलें आहे, ज्याच्यापासून विचित्र सृष्टि उद्भवतात; कोरड्या ठणठणीत माळ भूमीवरील जल प्रवाहा(मृगजळा)प्रमाणे ज्याच्यापासून उत्पत्ति–विनाशयुक्त त्रिभुवन-लहरी उठत आहेत; जो प्रपंचरूपानें नाशरूप, स्वरूपतः अविनाशी, अतिसूक्ष्म असल्यामुळे सर्वांमध्यें गुप्त असणारा आणि अति महान् असल्यामुळें सर्वांहून निराळा ( प्रपचशून्य ) आहे; तोच या असत् मनाचे मूळ आहे. शुद्ध चैतन्यामध्यें उत्पन्न झालेली; ब्रह्मांड हेंच जिचे उत्तम फल आहे; चित्त हें जिचें मूळ आहे व इंद्रियें हींच जिचीं पाने आहेत अशी प्रकृतिरूपी

---

१ कर्मेंद्रियपंचक, ज्ञानेंद्रियपंचक, प्राणपंचक, सूक्ष्म भूतपंचक, अंतःकरणचतुष्टय, अविद्या, काम व कर्म या आठांस पुर्यष्टक ( आठ पुरें ) ह्मणतात.

लता ( वेल ) त्या परमात्म्यामुळेच नाचत असते. ( ह्मणजे त्या प्रकृतिलतेस हालविणारा वायु हा परमात्माच आहे. ) प्रत्येक शरीररूपी करंडींत हा चिन्मणि चमकत असतो. त्याच्या प्रकाशानें प्रकाशित होऊनच जगांतील वस्तु परस्पर अनेक चमत्कार करीत असतात. त्याच्या योगानेंच असत्, असत् झालें आहे व सत्, सत् झाले आहे. या निरिच्छ व असंग परमात्म्याच्या सांनिध्यामुळेंच हा देहादिजडवर्ग कार्यें करितो. पारमार्थिक सत्तेनें युक्त असलेल्या या देवाच्या सत्तेनेच नियति, देश, काल, चलन, स्पंदन, क्रिया इत्यादि सर्व सत्तायुक्त झालें आहे. अथवा तोच शुद्ध सविद्रूप मायिक परमात्मा आकाशादि पदार्थांचे चिंतन केल्यामुळे आकाशादिरूप झाला आहे. पण मोठमोठ्या अनत सृष्टींची घडामोड करीत असूनही हा कांहीं करीत नाहीं. तर तो एकटाच सर्वदा अस्तोदयरहित, ज्ञानमय, व निर्विकार अशा आपल्या स्वरूपामध्यें स्थित असतो आणि तोच मनोभ्रमाचें मूळ आहे ५.

**सर्ग ६**—मोक्ष देणाऱ्या ज्ञानाच्या उपायांचें अनुष्ठान कोणत्या क्रमानें करावें तें येथें सागितलें आहे.

**श्रीवसिष्ठ**—रामचंद्रा, तो परमात्मा केवळ मनाचेंच नव्हे तर या सर्व सृष्टीचे निदान आहे. त्याची प्राप्ति करून घेणें हाच परम पुरुषार्थ आहे. पण या परात्पर देवाची प्राप्ति ज्ञानाच्या योगानेच होते. कर्मानुष्ठान करून देहाला व मनाला कितीही जरी शिणविलें तरी त्याच्या योगाने तो परमात्मा मिळत नाही. त्याच्या प्राप्तीकरिता प्रयत्नसाध्य ज्ञान हेच उक्त अनुष्ठान आहे, असें जाणावे. कारण मृगजलाची भ्राति झालेली असल्यास ती घालविण्यास त्याच्या अधिष्ठानाच्या ज्ञानावाचून इतर शेकडो उपायही निरुयोगीं ठरतात, हे अनुभवसिद्ध आहे. आपल्याजवळ, अगदीं डोळ्यासमोर असलेली वस्तुही एकादेवेळी विस्मृतीमुळे आपणास नाहींशी वाटते व तिच्या प्राप्तीकरिता आपण कितीही जरी दुसरीं लौकीक व वैदिक अनुष्ठानें केलीं तरी त्याचा काहीं उपयोग होत नाही. पण ती विस्मृत वस्तु आपल्याच हातात, किंवा गळ्यांत आहे, असे प्रत्यक्ष दिसले कीं–ती नाहीं, साडली, कोणी नेली–हा भ्रम लागलाच नाहींसा होतो व ती वस्तु पुनरपि मिळाल्यासारिखी होते. त्याप्रमाणेंच या स्वानंदरूप देवाचा साक्षात्कार झाला असतां तो संसारी, दुःखी, कर्ता, भोक्ता इत्यादि आहे,

असो; याप्रमाणे मुख्य वस्तूच्या ( अन्नाच्या ) प्राप्तीचा उपाय शोधून नतर लागलेच सच्छास्त्राचें अध्ययन सुरू करावें; व साधूची संगति धरावी. या दोन उत्तमोत्तम साधनांचा जो आश्रय करितो तो शीघ्र मुक्त होतो. जी बरी-वाईट स्थिति प्राप्त होईल तींत सतुष्ट रहावें. निंद्य कर्मांची उपेक्षा करावी. ज्यास आत्मतत्त्वाचा साक्षात्कार झालेला असतो त्या पुरुषश्रेष्ठाला ब्रह्मा, विष्णु, महेश्वर, इंद्र इत्यादि ईश्वराचीही करुणा येते. कारण आत्मज्ञानाच्या अभावीं ते मोठ्या अवस्थेत असूनही ईर्षा, द्वेष, क्रोध इत्यादि दोषांमुळे क्लेश भोगीत असतात, असे पाहून या कृतार्थ पुरुषाचें चित्त द्रवणे साहजिक आहे. आता साधु पुरुषास कसे ओळखावे, ह्मणून ह्मणशील तर सांगतों. कोणत्याही देशातील, प्रातातील, अथवा ग्रामातील शिष्ट ( ह्मणजे श्रौत-स्मार्त-आचारसंपन्न लोक ) ज्यास साधु ह्मणत असतील तो जर विशिष्ट ज्ञान, वैराग्य इत्यादि श्रेष्ठ गुणानीं युक्त असेल तर तो खरा साधु आहे, असें ओळखावें, व त्याचा समागम करावा. सर्व विद्यांमध्ये अध्यात्मविद्या श्रेष्ठ आहे. यास्तव त्या विद्येचे ज्या शास्त्रात प्रतिपादन केलेलें असतें तें सच्छास्त्र, असें समजावे. आत्म्यास उद्देशून प्रवृत्त झालेली जी विद्या ( म्हणजे ज्ञान ) ती अध्यात्मविद्या होय. उपनिषदें, शारीरक मीमासा इत्यादि शास्त्रात तिचाच विचार केलेला आहे. यास्तव त्यास सच्छास्त्र म्हणावे. पावसाळ्यात नद्याचे पाणी प्रायः गढुळ असते. ते तसेंच प्याल्यास पोटात माती जाते व त्यामुळे विकार होतो. यास्तव लोक त्या पाण्यास निवळीची बी उगाळून लावितात. किंवा त्यातून तुरटीचा खडा तीन चार वेळ फिरवितात. म्हणजे त्याच्या योगाने पाण्यातील माती तळीं बसून भाड्यातील पाणी निर्मळ होतें. अथवा योगाभ्यासाने चित्तवृत्ति शुद्ध होते. त्याप्रमाणें वरील दोन उपयांचा आश्रय करून सतत विवेक केला असता अविद्या नाहींशी होते. तिचा क्षय होताच मोह, राग, लोभ, क्रोध इत्यादि तिच्या दुष्ट सततीचाही आपोआप क्षय होतो. पण या सर्वांच्य मुळाशीं मुमुक्षूचा प्रयत्न आहे. त्यावाचून कांहीं होणें शक्य नाहीं ६.

सर्ग ७— सर्व प्रपंचाचें मूळ व सर्व उपाधिरहित परमात्म्याचें तत्त्व या सर्गात इष्ट सांगतात.

**श्रीराम**–महाराज, आपण जो हा देव सांगितलात व ज्याचें ज्ञान झालें असतां प्राणी मुक्त होतो, तो रहातो कोठें ? व मला त्याचा लाभ कसा होईल ?

**श्रीवसिष्ठ**–रामा, ब्रह्मदेवादिकांचे कारण व प्रत्यगात्मभूत असा हा देव काहीं कोठें दूर नाहीं. तर तो चैतन्यात्मा प्रत्येक प्राण्याच्या हृदयकमलांत व्यक्त होऊन राहिलेला आहे. पण तो केवल या शरीरांतच आहे, असें नाहीं. तर तो या सर्व दृश्य विश्वाकार आहे. पण तो या दृश्य विश्वा-एवढाच आहे, असे समजूं नकोस. तर तो या विश्वाच्याही पलीकडे एका अखड रूपानें पसरला आहे. त्यास मर्यादा नाहीं. तो सर्व सृष्ट वस्तूंचें अधिष्ठान असल्यामुळे सर्वगत आहे, असें सागतां यावे म्हणून त्यास विश्वाकार म्हणतात. पण खरोखर पहाता तोच एक असतो. त्याच्याहून विश्व म्हणून निराळे तत्त्व नाहीं. रामा, हें कार्यरूप विश्वच कायते त्या ब्रह्माहून भिन्न नाही, असे समजू नको. तर त्या(विश्वा)चे कारण माया व सर्व देवही तद्रूप आहेत. कारण ब्रह्मा, विष्णु, महेश, सूर्य, इद्र इत्यादि सर्व चिन्मात्र आहेत, असे समज.

**श्रीराम**–पण, गुरुराज, हे तत्त्व आबाल–गोपालास ठाऊक असते. आबालवृद्ध हे विश्व चिन्मात्र आहे, चेतन जीवावाचून बाकी सर्व व्यर्थ आहे, असें जाणतात. तेव्हा त्या प्रसिद्ध गोष्टीचा उपदेश करण्यांत काय अर्थ आहे ?

**श्रीवसिष्ठ**–सुज्ञ राजपुत्रा, हे विश्व चेतनमय जीवानी भरलेलें आहे; त्याच्यावाचून यात दुसरे काही नाही व जे पदार्थ जड आहेतसे वाटतात तेही याच्यामुळेच व यासच वाटतात. यास्तव विश्वाचें प्राधान्य याच्याकडेच आहे, एवढे ज्ञान प्रायः सर्वांना असतें, हें खरें; पण त्या ज्ञानाचा काहीं उपयोग नसतो. त्याच्या योगानें संसाराचा क्षय होणार नाहीं. कारण ते खरे ज्ञानच नव्हे. तें कां ? ह्मणून म्हणशील तर सागतो. चेतन ह्मणजे चित्कर्ता. पण नित्य चैतन्याचा कर्ता सभवत नाहीं. यास्तव अनित्य चित्–ला करणारा, असाच त्याचा अर्थ होणार. चित्तवृत्तीमध्ये प्रतिबिंबित झालेल्या चैतन्यास अनित्य म्हणतात. कारण तें वृत्तीबरोबर उत्पन्न होणारे व वृत्तीबरोबर नाश पावणारें असते. तें अनित्य चैतन्य आपल्या आश्रयास ह्मणजे अंतःकरणास आ

पला आत्मा समजतें व अशा रीतीने अंतःकरणाशीं तादात्म्य पावून तें जीव होतें. पण हा चेतन जीव बहिर्मुख असतो. तो विषयच या जगातील सार आहे, असें जाणतो. यास्तव तो पशु होय. याच्यापासूनच देह, इंद्रियें, वासना इत्यादिकांच्या अनुरोधाने जरा, मरण इत्यादिकांविषयींच्या भीत्या उद्भवतात. मी स्थूल शरीराहून भिन्न आहें, एवढें ज्ञान त्यास जरी झाले तरी तो कृतार्थ होत नाहीं. मरणोत्तर काहीं काल त्याला स्थूल शरीर नसतें. तरी पण त्यामुळे त्याचा दुःखभोग संपत नाहीं. कारण साक्षीचैतन्याचा विषय होणारे जें जड मन तद्रूप तो आपणास समजत असतो; आणि त्यामुळे तो दुःखाचेच भाजन होऊन रहातो. स्थूल, सूक्ष्म व कारण या तीन शरीराचा जेव्हा क्षय होतो तेव्हा चैतन्यास प्रिय व अप्रिय यांचा स्पर्श होत नाही. पण त्या तिन्ही शरीराचा क्षय वासनाक्षय, मनोनाश व तत्त्वज्ञान यांच्या दृढतेवाचून होत नाहीं. या तीन उपायाच्या योगाने चैतन्य विषयरहित होते. तीच त्याची मुक्तस्थिति होय. ती अवस्था ज्या धन्य पुरुषास अनेक जन्मांतील पुण्यपुजपरिपाकामुळें प्राप्त होते त्याची हृदयग्रंथी तुटते, सर्व सशय नाहींसे होतात व सर्व कर्में क्षीण होतात. पण हृदयकमलस्थ चैतन्याला योगाभ्यासानें केवळ मनोनिग्रह केला असता विषयशून्य करिता येते, ह्मणून ह्मणशील तर ती आशा व्यर्थ आहे. कारण दृश्य मिथ्या आहे, ते उत्पन्न होणेंच शक्य नाहीं, असे निश्चयाने समजल्यावाचून त्याचा निरोध कसा होणार? त्याचप्रमाणें नित्य चैतन्य चैतन्याचा विषय नाहीं, तर तें स्वयंप्रकाश आहे, असे ज्ञान, पूर्वोक्त दृश्य मिथ्या आहे, असें कळल्यावाचून कसें होणार? साराश, राघवा, जन्ममरण–परपरेंत पडलेल्या या चेतन जीवास जे आत्मा समजतात ते केवढेही जरी शास्त्रज्ञ पडित असले तरी वस्तुतः अज्ञ आहेत. कारण जीव हाच ससार, चेतना व दुःखपरपरा आहे. तेव्हा त्याला जाणल्यानें काय होणार? परमात्म्यास जाणल्यानें मात्र दुःखपरंपरा क्षीण होते. दाशरथे, मी आता तुला त्या परमात्म्याचें स्वरूप सांगतों.

निर्विषय, अखंड व अपरोक्षचैतन्य हें त्याचें स्वरूप आहे. पण व्यावहारिक जनांस त्याचा अनुभव येत नाहीं. ह्मणून तेंच स्वरूप सर्वांस समजेल अशा शब्दांनीं सांगतों. शुक्लद्वितीयेच्या चंद्राची कोर एकाएकीं

दिसत नाहीं. ' ह्मणून ज्याला ती प्रथम दिसली असेल तो इतरांस ' या झाडाच्या शाखेवर पहा, ह्मणजे ती दिसेल " असें सांगतो; व त्याप्रमाणें पाहिल्यास ती इतरासही दिसते. पण त्यावेळी अत:करणांत अभिव्यक्त झालेलें अपरोक्ष चैतन्य नेत्राच्या द्वारा प्रथम वृक्षशाखेकडे व नतर त्या शाखाग्रापासून हजारो कोस दूर असलेल्या चद्राच्या कोरीकडे एका निमिषांत जातें. पाहणारास चंद्र व शाखाग्र हीं दोन्ही दिसत असतात. यास्तव शाखाग्रापासून दूरवर असलेल्या चंद्रापर्यंत मध्येंही चैतन्याची धारा असली पाहिजे, यात काही सशय नाहीं; कारण मध्यें जर ज्ञान(संवित्)–धारा नसती तर शाखाग्र व चद्र हीं दोन्हीं एकाच कालीं दिसलीं नसतीं. आतां शाखाग्र व चंद्र याचे जें ज्ञान आहे त्याचे शाखाग्र व चद्र हे विषय आहेत. यास्तव ते सविषय आहे. पण त्या दोघांच्यामध्यें जी ज्ञान–धारा आहे तिचा विषय काय आहे ? काही नाहीं. यास्तव तेंच परमात्म्याचें निर्विषय व अपरोक्ष चिद्रूप आहे, असे जाणावे. द्रष्टा, दृश्य इत्यादिकाची स्थिति ज्याच्यामध्ये होते व त्याचा लयही ज्यांत होतो तें, आणि जे आकाशाहूनही सूक्ष्म व आकाशासही व्यापून रहात तें परमात्मरूप होय. जग स्वभावत:च शून्य आहे; पण तेही ज्याच्या योगाने अशून्य ह्मणजे सत् झालें आहे, व त्यातील अणुरेणूही ज्याच्यावाचून नाहीं ते परमात्म तत्त्व होय. जे महाचिन्मय असूनही अज्ञास स्थूल, जड इत्यादि रूपाने दिसतें; ज्याने सर्व वस्तूस अतर्बाह्य व्यापून सोडिले आहे; व त्यामुळेंच हे सर्व " आहे, आहे " असे भासत आहे तें ब्रह्म होय. साराश, तें महा तत्त्वच या सर्व भ्रमाचे मूळ आहे.

**श्रीराम**—प्रभो, ब्रह्म सत् आहे, असे कोणत्या प्रमाणानें समजते; व या एवढया मोठ्या प्रत्यक्षादि–प्रमाणासिद्ध व अगदीं व्यवस्थित जगरूपी दृश्याचा असंभव आपण कसा ह्मणता ?

**श्रीवसिष्ठ**—राघवा, शब्दसंज्ञक तिसऱ्या प्रमाणावरून ब्रह्म सत् आहे, असे समजते. ज्ञानप्रतिबंधक दोषांचा क्षय झाला असता वेदां महावाक्याच्या योगाने त्याचे साक्षात् ज्ञान होतें; पण त्यास करणारे दोष द्वैत मिथ्या आहे, असें समजल्यावाचून जा यास्तव आकाशाच्या नीलवर्णाप्रमाणे भासणारे हे जग अत्यंत अशी भावना अगोदर दृढ केली पाहिजे. कारण अग्रभागीं दिस

चकीत पदार्थ रुपें नव्हे, असें अगोदर निश्चयानें जाणल्यावाचून ती शिंप आहे, असें कळत नाहीं. नंतर हें जग आपणास जसें दिसत आहे तसें मुळींच नाहीं, असें जाणून त्याचा परिहार केल्यावर जें कांहीं तत्त्व रहातें तोच त्या ज्ञात्याचा आत्मा ठरतो.

आता, बा दशरथतनया, तुझ्या दुसऱ्या प्रश्नाचें उत्तर देतों. तूं जर आपलें चित्त उद्विग्न न करिता काहीं दिवस साधुसमागम व सच्छास्त्रावलोकन करीत रहाशील तर थोड्याच अवकाशांत दृश्य सत्य आहे हा तुझा भ्रम जाईल. द्वित्वाच्या अपेक्षेनें एकत्व असते. व एकत्वाच्या अपेक्षेने द्वित्व उद्भवतें. पण त्यातील एक नाहींसें झालें की दोघाचीही असिद्धि होते. त्याप्रमाणे दृश्य असल्यास द्रष्टा असतो व द्रष्टा असला तर दृश्य असतें. पण त्यातील कोणी एक नाहींसे झालें कीं, ती दोन्हीं नाहींशीं होतात आणि शेवटी सत् रहातें. अहता इत्यादि सर्व दृश्य हाच तुझ्या चित्तदर्पणावर मळ बसला आहे. त्याला मी आता घालवितो मुळींच असत् असलेल्या वस्तूचे निरसन करण्यात काहीं क्लेश नाहीत कारण असत्–वस्तूची सत्ता हा तिचा विकार आहे किंवा विवर्त आहे अथवा स्वरूप आहे, असें ह्मणताच येत नाहीं. मनुष्याचें शिंग ही असत् वस्तु आहे व तिच्या ठायी या तिन्हीपैकीं एकाही प्रकाराने सत्ता दाखवित येत नाहीं. त्याचप्रमाणे सत् वस्तु असत् होते, असें ह्मणणेंही जुळत नाहीं. कारण त्याच्यावर व्याघात हा दोष येतो. तशीच सद्वस्तूची उत्पत्ति होणेही व्यर्थ आहे. असत्‌ची उत्पत्ति तर अशक्यच आहे. सुवर्णाला कड्याचा आकार जरी दिला तरी हे सुवर्ण आहे, अशा दृष्टीने त्याच्याकडे पाहू लागलें की, तो आकार बाधित होतो. यास्तव जग उत्पन्न झालें नाहीं. हें जे कांहीं दिसत आहे तो शुद्ध ब्रह्माच्या आधारा भासणारा जगदाभास आहे, असें समजलें पाहिजे. पण मी काय ह्मणतों तुला चागले समजावे, ह्मणून मी अनेक उत्तम उत्तम युक्ति योजून विस्तारपूर्वक सागणार आहे. त्याच्या योगानें ते अबाधित तत्त्व स्वतः तुझ्या अनुभवास येईल. अरे खुळ्या, हे जर मुळी उत्पन्नच झालेले नाही त ...गचे "हें आहे" असे ग्रहण तरी कसें होणार? कोरड्या ठणठणी ...वर जलप्रवाह कोठून असणार? वाझेचा पुत्र जसा नाही, माळ... ...तल जसे नाहीं, व आकाशांत झाड जसें नाहीं तसा हा जगभ्र...

नाहीं. तर हें जें कांहीं दिसत आहे तें सर्व ब्रह्म आहे. हाच सिद्धांत मी तुला पुढे अधिक चांगल्या रीतीनें सांगेन. बा राजसुता, आत्मज्ञ पुरुष जें युक्तिपूर्वक सांगत असतात त्याची अवहेलना करणें अयोग्य आहे. कारण जो युक्तियुक्त वचनही न ऐकतां उगीच आग्रह धरून बसतो तो अज्ञ आहे, असें सुज्ञ समजतात ७.

**सर्ग ८**—त्या तत्वाचें ज्ञान या शास्त्रासारिख्या सच्छास्त्राच्या अभ्यासानेंच होणें शक्य आहे, असें वर्णन करितात.

**श्रीराम**—दिसणारें हे सर्व ब्रह्मच आहे, हें तत्त्व कोणत्या युक्तीनें समजतें ?

**श्रीवसिष्ठ**—लक्ष्मणाग्रजा, जगत् या नावाची ही महामारी दीर्घ-कालापासून रूढ झाली आहे. ही मिथ्या ज्ञान व अविचार याच्या योगानेंच उद्भवलेली असल्यामुळें ज्ञानावाचून तिचा क्षय होत नाहीं. तुला बोध व्हावा एवढ्यासाठीं मी ज्या कथा सागणार आहे, त्या जर तू लक्ष्य देऊन ऐकशील तर, बा साधो, तू ज्ञानी व मुक्त होशील. पण तसे न करिता उद्विग्न होऊन जर तू मध्येंच उठून जाशील तर सच्छास्त्र-श्रवणास अयोग्य असलेल्या पशु-पक्ष्याप्रमाणें तुला काहीं लाभ होणार नाहीं. जो ज्याची इच्छा करितो व त्याकरिता प्रयत्न करितो त्यास ते अवश्य प्राप्त होते. पण थोडासा प्रयत्न करून जर तो कटाळला व त्याने प्रयत्न सोडिला तर त्यास इष्ट वस्तूचा लाभ होत नाहीं. यास्तव इष्ट-प्राप्तिपर्यंत प्रयत्न केला पाहिजे. रामा, तुझी अवस्था तर अगदींच निराळी आहे. तूं जर या दोन ( साधुसगम व सच्छास्त्र ) साधनाचा आश्रय केलास तर तुला तें परमपद थोड्याशा दिवसातच प्राप्त होईल. ह्मणजे तुला काहीं महिने प्रयत्न करण्याचीही आवश्यकता नाहीं.

**श्रीराम**—असें जर असेल तर, महाराज, मला एकादें उत्तम शास्त्र सांगा. ह्मणजे मी त्याचा अभ्यास करून आत्मज्ञ होईन.

**श्रीवसिष्ठ**—रामा, अध्यात्मशास्त्रांत हें महा-रामायणसंज्ञक शा[illegible] सर्वोत्तम आहे. हा उत्तम इतिहास आहे. इतर सर्व इतिहासाचें [illegible] आहे. याचें श्रवण केल्यानें अक्षय जीवन्मुक्तत्व आपोआप प्राप्त हो[illegible] हें अति पवित्र शास्त्र आहे. स्वप्नावस्थेत असतांनाच हें स्वप्न[illegible]

वाटल्यास त्यातील पदार्थ जसे मिथ्या आहेत, असे वाटतें त्याप्रमाणे याचे मनन केलें असतां जगात असतानाच त्यातील नाना वस्तु मिथ्या वाटूं लागतात. या शास्त्रात जें सागितले आहे तेच इतरत्र असून येथे जें नाही तें दुसऱ्या कोणत्याही शास्त्रात मिळणार नाहीं. ज्ञानी यास समस्त विज्ञान-शास्त्राचा कोश ( भाडार, खजिना ) असे ह्मणतात. याचे श्रवण नित्य करावे. ह्मणजे बुद्धीमध्यें ज्ञानोदय होतो. पण पापाच्या दुष्प-रिणामामुळें पुष्कळास हे रुचत नाहीं. त्यानीं पाहिजे असल्यास दुसऱ्या शास्त्राचा अभ्यास करावा. किंवा पशुतुल्य विद्याहीन होऊन रहावे. त्याबद्दल आमचें काहींच ह्मणणें किंवा आग्रह नाहीं. पण ज्यास अध्या-त्मशास्त्राची चर्चा आवडत असेल त्यानें याचा आदराने अभ्यास करावा. ह्मणजे औषधपानानतर जसं आरोग्य हे प्रत्यक्ष फळ मिळते त्याप्रमाणे जीवन्मुक्ति अनुभवास येते. आह्मी हें वराप्रमाणे किंवा शापा-प्रमाणे सागत आहों. अर्थात् वर-शापाप्रमाणें हे आमचे सागणे असत्य कधीं होणार नाहीं.

असो, दशरथतनया, या शास्त्राचें श्रवण करून तदनुरूप मनन केल्यास संसारदुःखांचा तात्काल नाश होतो. धनदान, तप, अर्थरहित व आचाररहित वेदाध्ययन इत्यादिकाच्या योगाने त्याचा आत्यतिक नाश होत नाहीं ८.

**सर्ग ९**—जीवन्मुक्ताचीं लक्षणें, त्याची सर्वोत्तमता, व जगत्प्रलयानंतर अवशिष्ट रहाणाऱ्या आत्म्याचें स्वरूप याचें येथे निरूपण केलें आहे.

**श्रीवसिष्ठ**—बा उदारमते, जे आपले चित्त आत्म्यामध्येच लावितात, आत्म्याच्या ज्ञानाकरिताच जे जीवत असतात; जे परस्पर आत्म्याचाच बोध करितात; व त्याचें वर्णन करीत असतानाच ज्यांस अति सतोष होतो त्या केवल ज्ञाननिष्ठ पुरुषास विदेहमुक्तीच्या तोडीचीच ( ह्मणजे दृढ ) जीवन्मुक्ति मिळते. ह्मणजे त्या पुरुषाचा सबध शरीराशीं जरी असला तरी त्याच्या सुखदुःखादिकानी तो सुखदुःखी होत नाही. फार काय पण त्याचें चित्त आत्म्यामध्येंच निमग्न झाल्यामुळें त्यास या तुच्छ शरीराचे भानही रहात नाहीं.

**श्रीराम**—सद्गुरो, मला जीवन्मुक्ताचे व विदेहमुक्ताचें लक्षण सांगा. ह्मणजे मीही त्याप्रमाणें प्रयत्न करीन.

श्रीवसिष्ठ—शास्त्रविहित व्यवहार करीत असतांनाही ज्याला हें दृश्य विश्व अस्त पावल्याप्रमाणें, शून्य असल्यासारिखें वाटतें तो जीवन्मुक्त होय. म्हणजे तो जरी जगांतील वस्तूशीं व्यवहार करीत असला तरी परमार्थ दृष्टीने हे जग मिथ्या आहे, तें मुळीं नाहींच, असे त्यास वाटत असल्यामुळे आरशातील चित्राप्रमाणे भासते. तो केवळ ज्ञाननिष्ठ असतो. त्यामुळे "मी हें अमुक करितो" असें त्यास वाटत नाही. तर तो जाग्रतींतही निजलेल्या पुरुषाप्रमाणे अह–ममभावरहित असतो. सुख झालें असतां त्याचे मुख प्रसन्न होत नाहीं व दुःख झालें असता त्याची मुख-प्रभा मावळत नाहीं, तर जी अनुकूल किंवा प्रतिकूल स्थिति प्राप्त होईल त्यात तो सतोषाने रहातो. तो निर्विकार आत्म्याचे ठायीं गाढ झोपीं गेलेल्या पुरुषाप्रमाणें रहातो. त्याची अविद्यालक्षण निद्रा नाहींशी झालेली असल्यामुळे तो स्वात्म्याचे ठायीं सतत जागत असतो. त्याला इतर प्राण्याप्रमाणें जाग्रत् व स्वप्न या अवस्था कधीही प्राप्त होत नाहीत. कारण प्राणी ज्या अवस्थेत बाह्य इद्रियाच्या योगाने विषयाचे ग्रहण करितो त्या अवस्थेस जाग्रत् ह्मणतात व स्वप्न–अवस्था जाग्रद्वासनेमुळे उद्भवते. पण जीवन्मुक्त बाह्य इद्रियानीं विषयग्रहण कधींच करीत नाहीं व त्यास त्याची वासनाही नसते. त्यामुळे त्याला या दोन्ही अवस्था नसतात. राग, द्वेष, भय इत्यादि विकारास साजेल असे जरी तो एकाद्या नटाप्रमाणे वर्तन करीत असला तरी चित्तात अगदी निर्मल असतो. ह्मणजे त्याने बाहेरून तृष्णा, द्वेष इत्यादि विकाराचा कितीही जरी आव आणिला तरी त्याचा चित्तात गधही नसतो तर तो त्यावेळींही आपल्या नित्य व आनदरूप स्वरूपातच स्थित असतो. मी हे अमुक करीत आहे, असें तो कधींही ह्मणत नाही व तसे त्याला वाटतही नाहीं. त्याच्या बुद्धीला कार्याचा अथवा अकार्याचा कधींही लेप होत नाहीं. तो आत्मज्ञ जीवन्मुक्त, चिद्रूप आत्म्याच्या साक्षात्कारानें जगाचा प्रलय ( बाध ) होतो व त्याच्या अज्ञानामुळेंच जगाचा भ्रम होतो, असे स्वानुभवानें जाणत असतो. त्याला कोणी भीत नाही व तो कोणाला भीत नाहीं. कारण हर्ष, भय, क्रोध इत्यादि अज्ञानजन्य विकारापासून तो मुक्त असले तो सचेतन असतो. पण त्याच्या मनाचा लय झालेला असल्या हा ससार सत्य आहे, याची भावना लीन होते. दुसऱ्यांच

तो जरी शरीरावयवसंपन्न असला तरी त्याच्या दृष्टीनें तद्रहित असतो. आत्मा पूर्वीच प्राप्त आहे. यास्तव तो विषादि अनिष्ट पदार्थाप्रमाणें हेय (त्याज्य) किंवा द्रव्यादि इष्ट पदार्थांप्रमाणें उपादेय ( ग्राह्य ) नाहीं; त्याच प्रमाणें जग त्याच्याठायीं आरोपित असल्यामुळें तें मिथ्या आहे, असें त्यास निश्चयपूर्वक कळलेले असतें. त्यामुळे तो व्यवहार करीत असतांनाही अति शांत असतो शेवटीं प्रारब्ध कर्माचा क्षय झाल्यामुळें देह कालवश झाला असता तो धन्य पुरुष हें जीवन्मुक्त पद सोडून विदेहमुक्त–अवस्थेस प्राप्त होतो. त्यानतर त्याची कधीं वृद्धि होत नाहीं व क्षय होत नाहीं; तो शात होत नाहीं; तो व्यक्त होऊन पुनः अव्यक्त होत नाही; तो कोठें दूर जातो, असें नाहीं; तो मी, तू, तो इत्यादि व्यवहारास योग्य नसतो; तो सूर्यरूप होऊन सर्वांस ताप देतो; विष्णुरूपानें त्रिभुवनाचें पालन करितो; रुद्र होऊन सर्वांचा संहार करितो; ब्रह्मा होऊन सृष्टीस निर्माण करितो; आकाश होऊन वायूस धारण करितो; मेरुपर्वत होऊन ऋषि, देव इत्यादिकाचे वसति–स्थान होतो, भूमिरूपाने या अखंडित लोक-स्थितीचे तो धारण करितो, तृण, वृक्ष इत्यादिरूप होऊन पुष्पे व फळें देतो; मेघरूपानें वृष्टि करितो, विद्युत् होऊन चकचकतो; चद्र होऊन अमृताचा वर्षाव करितो; हालाहल विष होऊन प्राण्यास मारतो; तेजो-रूप होऊन दश दिशांस प्रकाशित करितो व अंधकार होऊन त्यांस आच्छादित करून सोडितो. साराश तो स्वय पर–ब्रह्म झाल्यामुळें सर्व चराचर सृष्टि ही त्याची विभूति होते. अशा अवस्थेस प्राप्त होणें हीच मुक्ति, किंवा निर्वाण होय.

**श्रीराम**—पण, सद्गुरो, आपल्या ह्मणण्याप्रमाणें विदेहमुक्त जर त्रैलो-क्यरूप होतात, असें समजलें तर ते उत्पन्न झाले, असेंच ह्मटलें पाहिजे. मग त्याची मुक्तता कोठें राहिली ?

**श्रीवसिष्ठ**—होय तूं म्हणतोस तें खरें. पण त्रैलोक्य म्हणून जर कांहीं सत्य वस्तु असती तर तसें झालें असतें. पण ज्याच्या ठायीं त्रैलोक्य या शब्दाचा अर्थच संभवत नाहीं तें ब्रह्म त्रैलोक्य झालें, अशी भावनाच कशी होणार? एकरूप, शांत, स्वयंज्योति व आकाशाप्रमाणें निर्मल ब्रह्मच जग आहे. कारण त्यांत तरी ब्रह्माच्या सत्तेवाचून दुसरें काय आहे? यास्तव त्याच्या सत्तेचा बाध झाला असतां सर्व ब्रह्ममय होतें. मला तर सुवर्णाच्य

कथ्यामध्यें शुद्ध सोन्यावाचून कडें म्हणून आणखीं कांहीं दिसतच नाहीं. जलतरंगामध्यें मला जलावाचून दुसरें कांहीं आढळत नाहीं. सारांश स्पंदत्व जसें वायूहून निराळे नाहीं; शून्यत्व आकाशाहून भिन्न नाहीं व प्रकाश तेजाहून पृथक् नाही त्याप्रमाणे जग ब्रह्माहून निराळे नाहीं. तर ते ब्रह्मच आहे.

**श्रीराम**—पण महाराज, हें परमतत्त्व माझ्या अनुभवास कसें येईल, ते सांगा.

**श्रीवसिष्ठ**—रामा, दीर्घ कालापासून प्रवृत्त झालेलें व अति रूढ झालेलें हें मिथ्या अज्ञान झटदिशीं नाहींसें होणे शक्य नाहीं. यास्तव दीर्घ अभ्यास व युक्तियुक्त विचार यांच्या योगानें हा जगद्भ्रम कसा नाहींसा होतो ते मी तुला सांगतो. मी आता अगोदर तुला एक अपूर्व वार्ता सांगतो, ती ऐक. म्हणजे तुला पुष्कळ बोध होईल. देव, गंधर्व, मनुष्य, पशु, पक्षी, वृक्ष, पाषाण इत्यादि रूप जेवढे म्हणून हे चराचर जग दिसत आहे ते सर्व, रुद्रादिकांसही गुप्त करून सोडणाऱ्या महाप्रलयांत, नाहींसे होते. ते कोठे जाते याचा कांहीं पत्ता लागत नाही. पण त्यावेळीं स्तिमित, गंभीर, तेजही नव्हे व तमही नव्हे असें व नामरूपरहित असें कांहीं अवशिष्ट रहाते. त्याला शून्य ह्मणता येत नाहीं, ते दृश्य नाहीं व दर्शनही नव्हे, भूतें व पदार्थ यांचा हा एक गोळा आहे, असेंही म्हणवत नाहीं; पण ते अनंत, पूर्ण, केवल चित् व सर्व कल्पनारहित असें सत् असते. त्या सद्रूप आत्मतत्त्वामध्ये हा जगद्भ्रम होतो. अध्यारोप-दृष्टीनें तो परमात्माच हे सर्व आहे; पण पारमार्थिक दृष्ट्या म्हणजे अपवाद-दृष्ट्या तो हें नव्हे. त्याला कर्ण नाहींत, पण शब्द श्रवण करण्याची शक्ति त्याच्यामध्ये आहे. तसेंच तो जिव्हारहित असूनही [illegible] घेतो, घ्राणेंद्रियावांचून वास घेतो; त्वगिंद्रियावाचून स्पर्श जाण[illegible] नेत्रांवाचूनच पहातो. तोच व्यक्त व अव्यक्त आहे. त्याच्या स्व[illegible] प्रकाशाच्या योगानेंच हे जगच्चित्र दिसतें. त्या प्रभूचे दुसरें कांहीं नसतें. पण तरंगाचा समूह हें जसे जलाचें कार्य तसें जग हे त्या[illegible] आहे. सामान्यतः सर्वतः प्रकाशित होणारा तो देव या हृदयांत [illegible] प्रकाशित होत रहातो. त्या चिन्मात्रदीपाच्या प्रकाशानेंच हें [illegible] भासत असतें. त्याच्या वांचून हे सूर्यादि प्रकाशही अंधका[illegible]

त्याच्या अस्तित्वामुळेच हे त्रिभुवनरूपी मृगजळ प्रवृत्त होते. मनोरूपाने स्पदन पावणाऱ्या त्याच्या ठायींच ही सर्व जगत्‌–लक्ष्मी उदय पावते. जळके कोलीत फिरवू लागले असता जशा वर्तुलादि आकृति दिसतात त्याप्रमाणे त्याच्या ठायीं हें जग आहे. सृष्टीस निर्माण करणे, तिचा सहार करणे इत्यादि सर्व खेळ त्या स्पदास्पदात्मक व व्यापक महादेवाचाच आहे. पण त्याचे पारमार्थिक रूप निर्मल व अक्षय्य आहे. सत्ता हेच त्याचे स्वरूप आहे. पण व्यवहारांत " त्याची सत्ता " असे ह्मणून ती त्याच्याहून भिन्न आहे, असे समजतात. ज्ञानी लोक तो सदा जागाच आहे, असे समजतात, अज्ञ तो निजला आहे, असे ह्मणतात व मुक्तास तो केव्हाही व कोठेही निजलेला नाही व जागाही नाहीं असे वाटते. अस्पंद अवस्थेत तो शिव ( कल्याणरूप ) व शातरूप असतो. पण स्पदावस्थेत त्रिभुवन-मय होतो. ह्मणूनच त्यास वर स्पदास्पदात्मक ह्मटले आहे. पुष्पामध्ये सुवास हे सार असते त्याप्रमाणे सर्व नाशवत पदार्थामध्ये तो सार आहे. त्यामुळे त्या पदार्थाबरोबर तो नाश पावत नाहीं. आपल्याला प्रतिक्षणी जे अनेक वस्तूचे प्रत्यक्षज्ञान होत असते त्यात ज्ञानरूपाने तोच असतो. पण वस्त्राच्या वर्णाप्रमाणे तो कधीही दिसत नाही. ह्मणजेच तो बाह्य इंद्रियाचा विषय होत नाहीं. त्याला वागिंद्रिय नसल्यामुळे तो मुक्यासारिखा असतो खरा, पण कोणत्याही वाणीची प्रवृत्ति त्याच्याच मुळे होत अस-ल्यामुळे तो अमूक आहे. त्याच्या ठिकाणी मनन हा विकार नसल्यामुळे तो पाषाणासारिखा जड आहे, असे वाटते पण मनामध्ये मनन करण्याची शक्ति त्याच्यामुळेच येते. तो वस्तुतः नित्यतृप्त असूनही भोक्ता होतो, क्रियाशून्य असूनही कर्ता बनतो व अवयवरहित असूनही अनेक नेत्रादि अवयवानी युक्त होतो. ह्मणूनच त्यास सहस्रनयन, सहस्र-शीर्षा, सहस्रपाद, अनेक बाहूदर–वक्त्र इत्यादि नांवें श्रुति–स्मृतींतून दिलीं आहेत. तो कोठेंही नाही, पण सर्वव्यापी आहे. त्याला इंद्रिय-[illegible]ल नाहीं. पण सर्व इंद्रियांच्या क्रिया त्याच्यामुळेच होतात. मनन न कर[illegible]ऱ्या त्याच्यामुळेंच ह्या जगत्कल्पना झाल्या आहेत. त्याच्या अज्ञाना[illegible]च या ससाराची भीति वाटते. पण त्याचें दर्शन झाले असता सर्व [illegible]त्र आशा पळून जातात. दीप असला तरच जशा नटांच्या हावभा-[illegible]क्रिया चालतात त्याप्रमाणे या अपरिच्छिन्न ( मर्यादाशून्य ) स्वय

प्रकाश साक्षीच्या अस्तित्वामुळेच चित्ताच्या सर्व क्रिया चालतात. समुद्रापासून जसा लाटाचा उद्भव होत असतो त्याप्रमाणें हें वस्त्र, हे पुस्तक, हे लाकुड इत्यादि अनेक पदार्थांच्या पक्ति त्याच्या पासूनच उद्भवतात. सुवर्णाचे जसे–कडीं, आगठ्या, गोट, पाटल्या, सरी, कुडलें इत्यादि–अनेक पदार्थ होतात त्याचप्रमाणे या परमात्म्यापासून शेकडों पदार्थांचे भ्रम होतात. रामा, तू त्या स्वहृदयस्थ देवास जाणतोस, मीहि जाणतो व हे सर्व लोकही जाणतात. कारण तो अहं या रूपाने सर्व शरीरांत प्रकाशमान होत असतो. ह्मणून तो एक आहे. पण अनात्म पदार्थ अशारीतीने कोणाच्याही अनुभवास येत नाहीत. तर ते सर्व स्वभिन्न ( माझ्याहून निराळे ) आहेत असेच प्रत्येकास वाटत असते.

असो, कालाचे विकार, दृश्य जगाच्या ठिकाणी असलेली दृश्यता व इष्ट वस्तूची प्राप्ति व्हावी, अनिष्टाचा परिहार व्हावा इत्यादि मानसिक विकल्प त्याच्यापासूनच उद्भवतात. देह, प्राण व कर्मेंद्रिये याच्या क्रिया, ज्ञानेंद्रियांचे रूपादि विषय आणि अतःकरणस्थ जीवत्व यास जाणाराही तोच व ज्याच्या द्वारा त्यास जाणतो ते वृत्तिज्ञानही तोच आहे. तात्पर्य द्रष्टा जीव, दृश्य विषय व दर्शन वृत्तिज्ञान या सर्वांचा ह्मणजे त्रिपुटीचा तो साक्षी आहे त्यास एकाग्र मनाने त्रिपुटीहून भिन्न करून पहा. तेंच अज, अजर, अनादि, शाश्वत, नित्य, शिव, निर्मल, जगद्वद्य, अनिद्य, सर्वविकारशून्य, सर्व कारणाचेही कारण, सर्वव्यापि, स्वयप्रकाश, व निर्विषय ब्रह्म आहे ९.

**सर्ग १०**—पूर्वोक्त ब्रह्मलक्षणावर येणाऱ्या विरोधाचे निरसन या सर्गात केले आहे.

**श्रीराम**—गुरुराज, महाप्रलयसमयी सर्व दृश्याचा नाश झाल्यावर जें कांहीं अवशिष्ट रहाते ते आकाररहित असते, हे आपलें ह्मणणे मला मान्य आहे पण ते शून्यही नाही, प्रकाशहीनाहीं, तमोरूपही नव्हे; भास्वरही नव्हे, चिद्रूप नव्हे, जीव नव्हे, बुद्धितत्त्व नव्हे, मन नव्हे; इत्यादि जे आपले ह्मणणे आहे ते मला घोटाळ्यात घालितें. यास्तव त्याची मला चागली फोड करून सांगा.

**श्रीवसिष्ठ**—रामा, तुझा हा प्रश्न व्यर्थ आहे. माझ्या बोलण्याचा अभिप्राय न समजल्यामुळे तू असे विचारीत आहेस. यास्तव मी आतां त्याचा निर्णय सागतो. महाप्रलय झाल्यानंतर अवशिष्ट रहाणारें सत्

शून्य कसें नाही ते मी अगोदर सांगतों. एकाद्या स्तंभावर चित्र खोदावयाचें असल्यास तें खोदावयाच्या पूर्वी त्या स्तंभावर अव्यक्तरूपाने जसें असते तसेच जग सत्–सज्ञक तत्त्वावर असतें. ह्मणून जगाच्या त्या प्रागभावास अत्यंताभाव किंवा शून्य ह्मणता येत नाहीं. पण स्तंभावर तरी चित्र खोदण्यापूर्वी असते कोठे? ह्मणून ह्मणशील तर सांगतो. जी वस्तु जिच्या सत्तेनेच सत्तावान् होते ती तिच्या ठायीं ( ह्मणजे सत्ता देणाऱ्या वस्तूच्या ठायीं) त्रिकाली असते, असा न्याय आहे. उदाहरणार्थ पाण्याची लाट ही वस्तु घेऊ या. ती पाण्याच्या सत्तेनेच सत्तावाली होते. ह्मणजे पाण्याच्या अस्तित्वावर अथवा नास्तित्वावर तिचें अस्तित्व अथवा नास्तित्व अवलबून असते. ह्मणून लाट त्रिकालीं ह्मणजे उत्पत्तीपूर्वी, उत्पत्तीनंतर व नाशानंतर पाणी या आपल्या कारणरूपानें असते. लाट हें तिचे व्यक्त स्वरूप आहे, व तें उत्पत्तीनंतर नाशापर्यंतच असतें, हें उघड आहे. पण त्यामुळे तें बीजरूपानेंही पूर्वी नव्हते किंवा मागून नसेल, असे ह्मणता येत नाही. कारण उत्पत्तीपूर्वी लाट पाण्यामध्ये जर मुळींच नसती तर ती कधींच उद्भवली नसती. बीजावाचून अंकुर किंवा कारणावाचून कार्य कधी होत नाही. एवढ्याकरिताच आह्मी वैदिक कारणाची एक प्रकारची रचना ह्मणजेच कार्य व त्यामुळेच कार्य आणि कारण याचे ऐक्य मानीत असतो. या न्यायाने खोदावयाचे चित्रही बीजरूपाने स्तंभावर असते व तेच पुढे खोदल्यावर व्यक्त होत, असे ठरतें.

हें विश्वही सत्–मध्यें तसेंच अव्यक्त असतें. ह्मणून त्या तत्त्वास शून्य ह्मणता येत नाहीं. हा जगत्संज्ञक प्रपच वस्तुतः सत्य असो कीं, असत्य असो. पण तो जेथें असतो ते त्याचे अधिष्ठान शून्य नाहीं. स्थिर जलामध्ये लाटा नाहींत, असेही ह्मणवत नाहीं व आहेत, असेंही ह्मणता यत नाहीं. त्याप्रमाणें ब्रह्माचे ठायीं हें जग शून्याशून्यतेस ह्मणजे अनिर्वचनीयत्वास प्राप्त झालें आहे. पण असें जर आहे तर वादी याच्याविषयींच मात्र वाद का करितात? ह्मणून विचारशील तर सांगतों. स्तंभावर चित्र काढावयाचें असल्यास स्तभ हा योग्य आधार, चित्र खोदणारा कारागीर, खोदण्याचीं साधनें, योग्य काल, देश इत्यादि प्रत्यक्ष दिसत असल्यामुळें स्तंभावरील चित्राविषयीं कोणालाही सशय घेण्यास अवकाश रहात नाहीं; पण अनंत व निरवयव ब्रह्माचे ठायीं हें जग

त्याच न्यायानें झाले आहे व तें त्यामुळें ब्रह्मरूप आहे, असें मानण्यास योग्य कर्ता, देश, काल, साधने इत्यादि सामग्री दिसत नाहीं. ह्मणून वादी विवाद करितात. त्यांना हा अपूव सिद्धात ऐकून मोहच पडतो. यास्तव, स्तभावरील चित्राचा जो हा आम्ही दृष्टात दिला आहे तो एकदेशी समजावा. विकार सर्वकाल कारणरूपाने सत् कसा असतो एवढे समजाविण्याकरिताच त्याचा येथें उपयोग केला आहे. हें जग वस्तुतः ब्रह्माहून भिन्न सत्तेने युक्त नसतें. यास्तव तें प्रलयसमयींही सद्ब्रह्मस्वरूपी असतें. शून्यता व अशून्यता परस्पर सापेक्ष असतात. ह्मणजे चागला या शब्दाच्या अपेक्षेनें जसा वाईट हा शब्द प्रवृत्त होतो व वाईट या शब्दाच्या अपेक्षेने चागला प्रवृत्त होतो त्याप्रमाणे शून्याच्या अपेक्षेने अशून्य व अशून्याच्या अपेक्षेने शून्य, असे ह्मणता येते. पण असले परस्पर सापेक्ष पदार्थ त्रिकालीं रहाणारे नसतात. कारण यातील एक नाहीसा झाला कीं दुसराही आपोआप नाहींसा होतो. उदाहरणार्थ—असे समज कीं, जगातून चागला हा शब्द व त्याचा अर्थ निघून गेला तर वाईट या शब्दाचा व त्याच्या अर्थाचा उपयोग कोणाला तरी करिता येईल का? नाही त्याचप्रमाणे शून्यता व अशून्यता याची स्थिति आहे. त्यातील एकही तत्त्व नव्हे. तर तीं दोन्ही काल्पनिक आहेत.

असो; येथवर मी तुला—महाप्रलयानतर अवशिष्ट रहाणारे तत्त्व शून्य कसे नसते ते सागितले. आता ते प्रकाश कसे नसते ते सागतो. येथील प्रकाश या शब्दाचा, भूतप्रकाश असा अर्थ समजल्यास तो ब्रह्माच्या ठिकाणी असणे सभवत नाही. कारण भूतप्रकाश ह्मणजे पंचमहाभूतातील तेज या नावाच्या तिसऱ्या भूताचा प्रकाश. तो निर्गुण, निरवयव व त्रिविधभेदशून्य ब्रह्माचे ठायी असू शकत नाहीं. सूर्य, चद्र, नक्षत्रे, अग्नि इत्यादि भौतिक तेजानीं ते प्रकाशित होत नाहीं, असें उपनिषदांतही म्हटले आहे. यास्तव ते तत्त्व प्रकाशही नव्हे व ते भास्वरही नसते, असें तू समज.

आतां ते तमही कसें नव्हे तें पहा. वर सांगितलेल्या भौतिक प्रकाशाच्या अभावाला तम, असें ह्मणतात. पण हें सद्ब्रह्म स्वयंप्रकाश असल्यामुळे प्रलयसमयीं तम असणें शक्य नाही. शिवाय तम हा शब्द प्रकाशशब्दाच्या अपेक्षेनें उपयोगांत आलेला आहे.

यास्तव प्रकाशाच्या अभावीं त्याचाही अभाव होतो. आता महा-प्रलयानतर रहाणारें तत्त्व स्वयप्रकाश असते याविषयीं प्रमाण काय ह्मणून ह्मणशील तर, स्वानुभवच त्याविषयी प्रमाण आहे. आपल्या या हृदयांत जो हा देव बसला आहे त्यास जाणणारा दुसरा कोणी नाहीं. तो आपणच आपल्याला जाणत असतो. ज्याचे ज्ञान मन, इद्रिये इत्यादि साधनांच्या योगाने होत असतें त्यास परप्रकाश ह्मणतात, व ज्याच्या ज्ञानास दुसऱ्या साधनाची गरज नसते, तर तो आपणच आपणास दीपाप्रमाणे प्रकाशित करीत असतो त्यास स्वप्रकाश ह्मणतात. दगड, लाकुड इत्यादि जड पदार्थास दीप प्रकाशित करितो. त्याच्या प्रकाशा-वाचून ते प्रकाशित होत नाहीत. यास्तव ते जड किंवा परप्रकाश असतात. पण दीपाच्या ज्योतीला ती ज्योतीच प्रकाशित करीत असते. ह्मणून ती स्वप्रकाश आहे. सर्व स्थूल व सूक्ष्म कार्याचा नाश झाला तरी सर्वाधार ब्रह्माचा नाश होत नाही. ब्रह्मच आत्मा आहे, व तो स्वानुभवसिद्ध आहे. यास्तव प्रलयसमयी रहाणारे तत्त्व स्वयप्रकाश असतें असे ह्मणण्यास काही प्रत्यवाय नाही. साराश, ते अजर पद प्रकाश व तम या दोन्ही गुणानी रहित आहे. ते जगरूपी धनास साठवून ठेवावयाचें भाडागार अति स्वच्छ आहे, यात काही शका नाहीं. बेलफळ व त्याच्या आतील भाग यांत जसें काहीं अंतर नाही त्याचप्रमाणे ब्रह्म व जग यामध्ये काही भेद नाही. पाण्यातील लाटेप्रमाणें किंवा मृत्तिकेतील बोळक्याप्रमाणे ज्याच्यामध्यें जगाची सत्ता आहे त्याला शून्य कसे ह्मणता येईल ? बेलफळाचा दृष्टात दिल्यावर मला—ते शून्य नसते—अशाविषयीं हे दोन दृष्टात आठवले व त्यामुळे मी त्याचा येथे प्रसग नसताही उल्लेख केला आहे.

पण वरील बेलफळाचा दृष्टात ऐकून कदाचित् तू ह्मणशील कीं, आधार व आधेय याचा स्वभाव एकसारिखा नसतो. ( कारण एकाद्या दौतींत आम्ही शाई भरून ठेवितो. तेव्हा दौत आधार व शाई आधेय असते. कारण आधेय ह्मणजे आधाराने रहाणारी वस्तु. दौतीच्या आधा-राने शाई रहाते. ह्मणून दौत आधार व शाई आधेय आहे. पण त्याचा स्वभाव एकसारखा नसतो. ) कारण त्यांतील एक पदार्थ घन ( घट्ट ) असतो व दुसरा द्रवरूप ( पातळ ) असतो. त्याचप्रमाणे समु-

द्रादि जलाशयांच्या पोटात मोठे मोठे डोंगर, झाडे इत्यादि असतात. येथे जल आधार व पर्वतादि पदार्थ आधेय असतात. पण त्यांचा स्वभावही एकसारखा नसतो. याच न्यायाने महाप्रलयसमयी ब्रह्मामध्ये रहाणारे जग ब्रह्माच्या स्वभावाचे असू शकणार नाहीं. कारण त्याच्यामध्ये आधार–आधेयभाव आहे. तेव्हा बेलफळ व त्याच्या आतील भाग याच्याप्रमाणें ब्रह्म व त्यात लीन झालेले जग याचे ऐक्य आहे, असे कसे ह्मणता येईल?

पण हा तुझा आक्षेप बरोबर नाही. कारण तू जे वर दोन दृष्टात दिले आहेस त्यातील आधार व आधेय हीं दोन्हीं साकार आहेत, व निराकार ब्रह्मामध्ये असणारे जग, लीन झालेले असल्यामुळे, निराकार आहे. यास्तव ते येथे लागू पडत नाहीत. तस्मात् या प्रसिद्ध आकाशाहूनही सूक्ष्म व निर्मल असणारे चिदाकाश जशा प्रकारचे असते तशाच प्रकारचे त्यात लीन झालेले जग असते. अर्थात् जग या शब्दास व त्याच्या प्रसिद्ध अर्थास ते जरी पात्र असले तरी त्याचा स्वभाव आधाराच्या स्वभाहून भिन्न नसतो.

आता ते सत् चैतन्य कसे नव्हे ते सागतो. लाल किंवा हिरवी मिरची तोंडात घालून व चावून खाऊ लागल्याशिवाय तिचे तिखटपण समजत नाही. त्याचप्रमाणे दृश्यावाचून चिदाकाशाचें चैतन्य व्यक्त होत नाहीं. ह्मणूनच कूटस्थाचे ठायी चित्, आत्मा इत्यादि शब्द लक्षणेनें प्रवृत्त होतात. मुख्य वृत्तीने प्रवृत्त होत नाहींत. ह्मणजे कूटस्थास चैतन्य ह्मणणे हा गौण शब्दव्यवहार आहे. खरोखर पहाता त्यास चैतन्यही ह्मणता येत नाही. कारण वर ह्मटल्याप्रमाणे तो दृश्याच्या अपेक्षेनें चिदाकाशाचे ठायी येणारा धर्म आहे.

असो; जगाचा लय झाला असता दृश्याचा अभाव झाल्यामुळे चैतन्याची ज्याप्रमाणे निवृत्ति होते त्याचप्रमाणें जगाच्या जगत्वाचीहं निवृत्ति होते. कारण जग हा धर्मीच लीन झाल्यावर जगत्व त्याचा धर्म कसा रहाणार? धर्मी ह्मणजे द्रव्य व धर्म ह्मणजे त्य आश्रयानें रहाणारा गुण. ‘ पांढरे वस्त्र ’ या वाक्यात वस्त्र हे द्रव्य त्याच्या आश्रयानें रहाणारा शुभ्र वर्ण हा त्याचा धर्म सारांश प्रलयसमयीं सर्वांचा लय झाल्यामुळे रूपादि बाह्य व णादि आतर भाव ब्रह्ममय झालेले असतात. यास्तव त्यावेळीं हे वि

षुप्त किंवा तुर्य अवस्थेंत असतें. योग्याच्या एकदर सात भूमिका असतात. त्याचे वर्णन याच प्रकरणांत पुढें येईल. त्यांतील पहिल्या पांच भूमींस सुषुप्त व पुढच्या दोन भूमिकांस तुर्य ह्मणतात. त्यामुळे व्यवहार करणारा योगीही सुषुप्तात्मा व शातचित्त असतो व सर्व सस्काराचें जणु काय सपुष्टच असें ब्रह्म सर्व आभासशून्य असते.

पण साकार जग ब्रह्मरूप निराकार कसें होऊन रहातें, ह्मणून ह्मणशील तर सागतो. एकाद्या अगाध जलाने भरलेल्या सरोवराकडे पहावें. वारा जोराने चालू लागला कीं त्यांत अनेक आकाराच्या लहान मोठ्या लाटा दिसतात. पण वारा अगदीं वाहीनासा झाला कीं ते जल संथ ( निश्चल ) होऊन रहाते. ह्मणजे त्या पूर्वीच्या अनेक–आकाराच्या लहरी त्या एकाकार जलात लीन होतात, त्या एकाकार जलरूप होऊन रहातात. त्याचप्रमाणे साकार जग निराकार ब्रह्मरूप होऊन रहाते, असे तू समज.

असो; आता प्रलयसमयीं अवशिष्ट रहाणारें सत् जीवही कसे नव्हे तें ऐक. जग ही जीवाची उपाधि आहे. पण ते ( जग ) आपल्या कारणाहून भिन्न नाहीं, हे वर सागितलेच आहे. ब्रह्म पूर्ण आहे. यास्तव त्याच्यापासून औपाधिक भेदाने जीवरूप होऊन व्यक्त होणारें तत्त्वही पूर्ण असते. पूर्ण वस्तु निराकारच असली पाहिजे. कारण वस्त्र, पुस्तक इत्यादि साकार वस्तु पूर्ण नसतात. तर त्या परिच्छिन्न, ( मर्यादित, आपल्या आकाराप्रमाणें थोड्या फार अवकाशास व्यापणाऱ्या ) असतात, हे जगप्रसिद्ध आहे. ब्रह्म व जीव याचा गाय व घोडा याच्याप्रमाणे स्वाभाविक भेद नाहीं. तर तो महाकाश व घटातील आकाश याच्याप्रमाणे औपाधिक भेद आहे, हेंही सुज्ञास ठाऊक आहेच.

आता कदाचित् तू ह्मणशील कीं, ब्रह्म जर वस्तुतः पूर्ण आहे तर तें विश्वरूपाने व जीवरूपानें का भासते? तर त्याचे उत्तर असें–अनेक योनींतून ( जन्म-मरणद्वारा ) हिंडत असता क्रमाने ब्राह्मणादि अधिकारी शरीरास प्राप्त होऊन व स्वतत्त्वाचा साक्षात्कार करून घेऊन, अज्ञानाचा नाश करावा व स्वात्मलाभ साधावा ह्मणून तें ( ब्रह्म ) जग व जीव या भावानें परिणाम पावलें आहे. अर्थात् त्याचा हा सर्व खेळ आहे. ह्मणूनच आह्मी ा जगास उत्पन्न न झालेलें समजतों. कारण सामान्य जन ज्याला पन्न झालेला किंवा उत्पन्न होणारें ह्मणून समजतात तें हें ब्रह्मच आहे.

अर्थात् जीवाचा असंभव आहे. त्यामुळे मिरची खाणारा नसला म्हणजे तिचें तिखटपण जसें मिरचींत रहातें याप्रमाणें जीव नसल्यामुळें जग आपल्या अधिष्ठानांत रहातें. म्हणजे तें ब्रह्म एकरस होतें; आणि एकरस झाल्यामुळेंच चित्त, चित्ताचा विषय इत्यादि नानारसता, व्युत्थित दशेंत जरी अनुभवास येत असली तरी, मिथ्या ठरते. पण त्या नानारसतेचें अधिष्ठान ( ब्रह्म ) सत्य असल्यामुळें अज्ञांस ती सत्य असल्यासारखी भासते. ( एकरस म्हणजे एक–स्वभाव, एकरूप, व नाना रस म्हणजे अनेक–स्वभाव; अनेकाकार. ) महाप्रलयसमयीं जग एकरस झाल्यामुळे जीवाची उपाधि नाहींशी होते. ती नाहींशी झाल्यामुळें औपाधिक ( उपाधीमुळे प्राप्त होणारा ) जीवभाव नष्ट होतो. तेव्हा अवशिष्ट रहाणाऱ्या सत्–तत्त्वास जीव कसे म्हणतां येईल ? शिवाय जीवास कोणी अणु–परिमाण मानितात, कोणी मध्यम–परिमाण समजतात. तो पुण्य, पाप इत्यादिकानीं दूषित झालेला असल्यामुळे अशुद्ध असतो, व आपल्याच चैतन्याभासाने प्रकाशित होणाऱ्या विषयाचा भोग घेतो. पण सत्–तत्त्व त्याच्या अगदीं विपरीत स्वभावाचें असतें. ते अणूहूनही अणु, अति शुद्ध, अति शांत व आकाशाहूनही अति सूक्ष्म, दिशा, काल इत्यादिकाच्या योगाने परिच्छिन्न न होणारे, सर्वव्यापी, अनादि व अनंत आणि विषयशून्य आहे. तस्मात् ज्याला विषयास व्यक्त करणें, या लक्षणाचें चैतन्यही म्हणता येणार नाहीं, त्यास अनुकूल व प्रतिकूल विषयाचा भोक्ता जीव कसे म्हणता येईल ?

राघवा, याच न्यायानें त्या सद्रूप ब्रह्मास बुद्धि, मन इत्यादिकातील कोणतीही संज्ञा देतां येणें शक्य नाहीं, असें तू जाण. आम्ही तर त्याला, पूर्वी सांगितल्याप्रमाणे, अनिर्वचनीय समजतों. कारण ते पूर्ण, अजर, अव्यय, शांत व आकाशाहूनही अधिक शून्य आहे, असा आम्हास अनुभव येतो.

**श्रीराम**—महाराज, आपल्या या युक्तिपूर्ण उत्तरानें माझे पूर्ण समाधान झालें. आतां समाहित ( शांत, वृत्तिरहित, एकाग्र ) चित्तामध्यें ज्या रूपानें त्या चिद्रूप सत्तत्त्वाचे अपरोक्ष ज्ञान होणें शक्य आहे तें त्याचें स्वरूप मला सांगा. म्हणजे मी त्याचा अभ्यास करीन.

**श्रीवसिष्ठ**--बा प्रिय शिष्या, महा प्रलय झाला असतां जे सर्व कारणाचें कारण परब्रह्म अवशिष्ट रहातें त्याचेंच मी आता वर्णन करितो. चित्ताचा पूर्णपणे निरोध केल्यामुळे वृत्तींचा क्षय झाला असतां इंधन-(काष्ठ)रहित अग्नीप्रमाणे चित्त अगदीं उपराम पावते. ह्मणजे मन अमन होतें. त्यावेळी जे अनिर्वचनीय, स्वप्रकाश, सद्रूप अवशिष्ट रहातें तच त्या वस्तूचें खर रूप आहे. चित्तवृत्तींचा क्षय झाल्यामुळे त्यावेळीं दृश्य नसतें. दृश्याच्या अभावीं द्रष्टयाचा अभाव होतो. अर्थात् त्रिपुटीचा लय झल्यासारिखा होतो. या त्रिपुटीलयाचा जो साक्षी तेंच सत् ब्रह्म होय. जीव हाच जिचा स्वभाव आहे अशी चिति (चैतन्य) विषयापासून पराङ्मुख झाली असता तिचे जे रूप अनुभवास येते तेच परमात्म्याचे शुद्ध, शात व चिन्मात्र रूप होय. गाढ समाधिसमयीही त्या परात्पर देवाचेंच साक्षात्स्वरूप अनुभवास येत असतें. पण अभ्यास-अवस्थेत असलेल्या व योगारूढ न झालेल्या आरुरुक्षूस त्या स्वरूपाचा अनुभव येणे शक्य नसते. ह्मणून अभ्यास कालीच अनुभवास येणाऱ्या अवस्थाचा वर निर्देश केला आहे. आता योगारूढ पुरुषाच्या अनुभवाचा निर्देश करून त्याचें स्वरूप सागतो. वायु, अग्नि इत्यादिकाचा अगास स्पर्श झाला तरी त्याच्या शीतोष्णादि धर्माचें ज्ञान न होता जीवत पुरुषाचे जे स्वरूप असतें, तेच या परब्रह्माचे रूप आहे. आता जे योगाभ्यासी नाहीत त्यास या रूपाचा अनुभव कसा घेता येईल ते सागतों. शात चित्त करून बराच वेळ बसावे. किंवा हांतरुणावर पडावे. ह्मणजे झोप लागण्यापूर्वी एक दोन क्षण त्या स्वरूपाचें भान होते. कारण स्वप्नशून्य, डास, ढेकूण इत्यादिकाकडून विच्छिन्न न होणारी व चित्त-जाड्यरहित अशी चित्तविश्रांति ह्मणजे एकप्रकारची समाधीच होय. झोप लागता लागता व चागले जागें होण्यापूर्वी केव्हां केव्हां या अवस्थेचा अनुभव येतो. केव्हां केव्हा ह्मणण्याचें कारण असें कीं, प्रायः त्यावेळीं स्वप्ने पडतात. असो, अशा ह्या अवस्थेचा दीर्घकाल अभ्यास करावा. ह्मणजे त्यावेळीं त्या परमात्म्याचे स्वरूप साक्षात् अनुभवास येईल. आकाशाचें शून्यत्व, वायूचें अतर्बहिःपूर्णत्व, व शिळेचें घनत्व हेंच त्या निर्विषय चिदाकाश पर ब्रह्माचें रूप आहे. जितके ह्मणून जिवंत प्राणी आहेत त्यांनीं चित्त व चित्ताचे विषय यांचा परित्याग केला

असतां जे स्वरूप रहाते तेच महाप्रलयसमयी रहाणारे सद्रूप होय. द्रष्टा, दृश्य व दर्शन या त्रिपुटीत रहाणारे जें चैतन्य तेच ब्रह्म आहे. बुद्धिवृत्ति, विषयस्फुरण व अज्ञान याचे साक्षि ज्ञान जन्म–नाशरहित आहे व तेंच परमात्म्याचे रूप होय. मायिक व्यवहार करण्यात गुतलेला तो ईश्वर पाषाणाप्रमाणे निश्चल असतो. वस्तुतः तो ज्ञानघन आहे. पण सर्व जगास अवकाश देणारे आकाश त्याच्यापासून होत असते. वेत्ता, वेद्य, वेदन या त्रिपुटीचे निमित्त तोच सच्चिदानदरूप परमात्मा आहे. पण तो स्वतः परिणाम पावून त्याचे निमित्त होत नाही. तर बुद्ध्यादि उपाधीत प्रतिबिंबित होऊन तो त्याचे निमित्त होतो. स्वप्न व जाग्रत् या दोन अवस्थानीं रहित असे जे महाचैतन्याचें स्वरूप ( ह्मणजे निजलेल्या पुरुषाच्या आत्म्याचे जे स्वरूप ) तेच, या दृश्याचा प्रलय झाला असता, स्थावर जगम पदार्थातून अवशिष्ट रहाते. पाषाणादि स्थावर वस्तूचें अचलत्व हे स्वाभाविक स्वरूप आहे. पण तेच जर ज्ञान युक्त व मन, बुद्धि इत्यादिकानी रहित असते तर त्याची या परमात्म्याच्या रूपास उपमा देता आली असती. साराश ब्रह्मा, विष्णु, सूर्य, शंकर, इद्र इत्यादिकांची शाति होऊन सर्व उपाधींचा क्षय झाला असता हे एक, परम शिव, विकल्पशून्य, विश्वसगरहित व केवल चैतन्यरूप तत्त्व रहातें १०.

**सर्ग ११**—जग अधिष्ठानसत्तेनें प्रलय–समयींही सत् असतें; पण स्वत च्या सत्तेनें ते सृष्टि–कालींही असत् आहे, असें येथें सागतात.

**श्रीराम**—अहो गुरुवर्य, प्रलयसमयीं जग ब्रह्मरूप होते, हे आपले ह्मणणे मला समजले. पण चतुर्दश भुवनें; देव, दानव, मानव इत्यादि अनेक जातींचे अनेक प्राणी; पर्वत, नद्या, सागर, वृक्ष इत्यादि अनेक स्थावर पदार्थ इत्यादिकानीं भरलेलें हे अवाढव्य जग महाप्रलय झाला असता कोठे रहाते. ह्मणजे हा एवढा स्थूल प्रपच जातो कोठे?

**श्रीवसिष्ठ**—राघवा तुझ्या या प्रश्नाचे उत्तर मी मग देईन. पण अगोदर तू माझ्या एका प्रश्नाचे उत्तर दे. वाझेचा पुत्र किंवा आकाशांत दिसणारे वन अथवा मनुष्याचे शिग इत्यादि पदार्थ कोठून येतात; कसे असतात व कोठें जातात?

**श्रीराम**—ते मुळीं उत्पन्नच होत नाहींत व त्यांची उत्पत्ति होणेंही शक्य नाही. तेव्हा त्यांचें अस्तित्व किंवा नास्तित्व यांचा निर्णय कसा करिता येईल?

**श्रीवसिष्ठ**—झालें तर, वाझेचा पुत्र, आकाशातील वन इत्यादि पदार्थ जसे कधीं उत्पन्न झालेले नाहीत व ते उत्पन्न होणे शक्य नाहीं तसेंच पारमार्थिक स्वसत्तेनें रहित असलेलें हें जग उत्पन्नही होत नाहीं व त्याचा नाशही होत नाहीं.

**श्रीराम**—पण जगातील काहीं पदार्थ उत्पन्न होतात व नाश पावतात असे आपण प्रत्यक्ष पहातों आणि त्यावरून इतर सर्व पदार्थ उत्पत्ति–विनाशशील आहेत, असे अनुमान होते. पण वाझेचा पुत्र इत्यादि अत्यत असत् पदार्थ उत्पन्न झाल्याचे कोणास ठाऊक नाहीं. यास्तव जगाची त्या असत् पदार्थाशीं तुलना करणे योग्य नाहीं पण ज्याअर्थी शास्त्रात जगाला वध्यापुत्राचा दृष्टात दिलेला आढळतो त्याअर्थी मला असें वाटतें कीं, वध्यापुत्र, आकाशवन इत्यादिकाच्या कल्पनेशीं जगाची तुलना करावी. कारण ते शब्द ऐकताच आमच्या मनांत एक प्रकारची कल्पना उद्भवते व ती उत्पत्ति–विनाशशील असते. तसेंच हें जगही उत्पत्ति-विनाशशील आहे.

**श्रीवसिष्ठ**—रामा, तूं ह्मणतोस ती कल्पना जर जगातच अंतर्भूत झाली नसती, ह्मणजे ती जगाहून जर निराळी असती, तर तिची उपमा जगास देतां आली असती. पण ज्याला उपमा द्यावयाची तें हें उपमेय दृश्य असें आहे कीं, त्याला त्याच्या बाहेरच्या वस्तूची उपमाच देतां येत नाहीं. पण उपमेय कोटींत येणाऱ्या एकाद्या वस्तूचीच त्यास उपमा देऊ लागल्यास तें उपमा–वचन अलकारशास्त्रांत सांगितलेल्या अनन्वय–अलंकाराचेंच उदाहरण होईल. “ गगनं गगनाकारं सागरः सागरोपमः । ह्मणजे गगन गगनाकार आहे व समुद्र समुद्रासारिखा आहे” " अनन्वय–अलंकाराचें प्रसिद्ध उदाहरण आहे. यांत गगनच गगनाची व समुद्र समुद्राची उपमा होऊं शकत नाहीं. त्या प्रमाणच या तुझ्या वाक्याची अवस्था होणार. यास्तव वंध्यापुत्राला जशी स्वसत्ता नाहीं तशाच जगालाही पृथक स्वसत्ता नाहीं. असाच या दृष्टांताचा अर्थ

समजला पाहिजे. कारण असत्–वस्तूला सद्वस्तूचा दृष्टांत जरी देता न आला तरी दुसऱ्या असत्–वस्तूचाच दृष्टांत देता येणें शक्य आहे.

आता प्रत्यक्ष दिसणाऱ्या या व्यवस्थित जगाला असत् कसे ह्मणावें ह्मणून तूं ह्मणशील; (कारण ते सत्य आहे, असे समजणारास नेहमी हीच मोठी भीति असते,) तर सागतो. अज्ञान–अवस्थेत ते जरी प्रत्यक्ष दिसत असले तरी आत्म्याचे यथार्थ ज्ञान झाल्यावर त्याचा बाध होत असतो व कोणत्याही वस्तूचे यथार्थ ज्ञान झाले असता त्याच्या सबधाने झालेल्या भ्रमाची निवृत्ति होणे अगदी साहाजिक आहे. याविषयी अनेक दृष्टात देता येतात. त्यातील कित्येक पूर्वी दिले आहेत. तरी पण ते तुझ्या चित्तात चागले ठसावे ह्मणून पुन: देतो. सोन्याच्या कड्यात कड्याचा आकार प्रत्यक्ष दिसत असतो. पण ते कडे पृथक्–स्वसत्तेने युक्त नसते. सोन्याच्या दृष्टीने पाहिल्यास त्याचे भानच होत नाही; अर्थात् तो आकार मिथ्या ठरतो ह्मणजे त्याचा बाध होतो. ब्रह्माच्या ठायी भासणाऱ्या जगाचीही तीच स्थिति आहे. आकाशाहून शून्य (अवकाश) भिन्न नाही. तसेच प्रत्यक्ष दिसणारेही हें जग ब्रह्माहून भिन्न नाहीं. काजळाहून काळेपणा भिन्न नाहीं; व बर्फाहून शैत्य निराळे नाही; त्याचप्रमाणे त्या परम पदाहून जग पृथक् नाहीं. शैत्य चद्र किंवा बर्फ यास जसे सोडून रहात नाही त्याप्रमाणे सृष्टि ब्रह्मास सोडून रहात नाहीं. माळजमिनीवर भ्रमाने भासणाऱ्या नदीत जसे पाणी नसतें; किंवा नेत्र–दोषामुळे दिसणाऱ्या दुसऱ्या चद्रामध्ये वास्तविक चद्रत्व नसतें त्याप्रमाणे प्रत्यक्ष अनुभवास येणारे असेही हे जग त्या शुद्ध आत्म्यामध्ये नसतें. कारणाचाच सभव नसल्यामुळें उत्पत्तिसमयींच जे नसते ते वर्तमानकालीं ह्मणजे स्थितिकालीं तरी कसे असणार? व त्याचा नाश कसा होणार? आता कारणसभव का नाही ह्मणून ह्मणशील तर सागतो. विरुद्ध स्वभावाच्या वस्तूमध्ये परस्पर कार्यकारणभाव नसतो. उदाहरणार्थ–आपण प्रकाश व छाया घेऊं. या दोन्ही पदार्थांचा स्वभाव परस्पर विरुद्ध असतो. यास्तव प्रकाश छायेचे किंवा छाया प्रकाशाचे कारण होऊं शकत नाही. त्याचप्रमाणें चेतन ब्रह्म जड जगाचे कारण होऊं शकत नाही. तस्मात् कारणाचा असभव असल्यामुळे या दृश्य कार्याचा असंभव होणे न्याय्यच आहे. सारांश जग हे ब्रह्माचा परिणाम आहे;

ह्मणजे दूध जसे दहीं होते त्याप्रमाणे ब्रह्म जग झालें आहे, असे ह्मटल्यास कारणाचा असभव होतो आणि त्यामुळें परिणाम–दृष्ट्या हें उत्पन्न झालें नाही, असे मान्य करावे लागते.

आता विवर्तवादाच्या दृष्टीनें पाहिल्यास विरुद्ध स्वभावाचे पदार्थ परस्पर कारण होऊं शकतात. पण त्यांत कारणच कार्यरूप होत असतें. यास्तव विवर्तदृष्ट्या कारण ब्रह्मच कार्य–जगद्रूप झाले आहे. अर्थात् त्याला पृथक् सत्ता नाही. आता तू ह्मणशील कीं, चेतन ब्रह्म जरी जड जगाचें परिणामी कारण होणें शक्य नसले तरी अज्ञान त्याचें परिणामी कारण आहे, असे मानावे ह्मणजे झालें. पण ते बरोबर नाही. कारण जें अज्ञान जगाच्या आकारानें परिणाम पावलें आहे, असे भासते, ह्मणून तू समजतोस तेंच वृत्तिज्ञानास जगद्रूपाने भासविते. ह्मणजे ते अज्ञानच ज्ञानास जगाच्या आकाराने विवर्त करिते. कारण अज्ञानाचा परिणाम ह्मणजे ज्ञानाचा विवर्तच होय, हें स्वप्नात आपल्या चागले अनुभवास येते. कारण त्या अवस्थेंत अज्ञानाचे कार्य जे अतःकरण त्याचा स्वाप्न ( स्वप्नांत दिसणाऱ्या ) पदार्थाप्रमाणें आकार होतो. अथवा तेच स्वतः पदार्थाकार परिणाम पावते. अतःकरणाच्या वृत्तीत चिदाभास भरलेला असतो. तो त्या वृत्तीच्या आकारास जाणतो, व त्यामुळे त्याच्यावर स्वाप्निक पदार्थाचा आरोप होतो, असा नियम आहे. जाग्रतीतही असेच होत असते. पण त्यावेळीं अत.करणाच्या आकारास कारण होणारे बाह्य पदार्थ प्रत्यक्षपणे बाहेर असल्यासारिखे दिसत असल्यामुळे व इद्रियादि इतर साधनाचे त्यावेळीं अस्तित्व असल्यामुळें प्रत्यक्ष, अनुमिति इत्यादि ज्ञान हा वृत्तिज्ञानाचा विवर्त आहे, हे ध्यानात येत नाही.

असो; तात्पर्य स्वप्नातील जगाचा भ्रम जसा सविद्रूप असतो तसाच हा प्रपंचभ्रम ब्रह्मरूप आहे. आपणास हे जे काही दिसत आहे, म्हणजे आपणास ज्याचा ज्याचा अनुभव येत आहे ते ते सर्व सर्वदा आत्म्यामध्ये स्थित आहे. यांतील कांहींही कधीं उत्पन्न होत नाहीं व नाश पावत नाही. तर जसें द्रवत्व म्हणजे जल, स्पंदन म्हणजे वायु व प्रकाश म्हणजे तेज तसेंच जग म्हणजे ब्रह्म होय. स्वप्नांत आपण एकादे नगर पाहतो. पण तें जसें स्वप्न पहाणाऱ्या द्रष्टृ–चैतन्याच्या बाहेर नसतें तर तें त्या चैतन्याच्या

आतच असतें अथवा ते चैतन्यच नगररूप होतें त्याप्रमाणें परमात्म्याचा आत्मा( स्वरूपभूत चैतन्य )च जगद्रूप भासतो.

**श्रीराम**—महाराज हें दृश्यविष जर असे स्वप्नतुल्य मिथ्या आहे तर तें कल्पपर्यंत रहाणारें आहे; त्यातील सर्व व्यवहार अगदीं बरोबर व नियमितपणे चालला आहे इत्यादि अनुभव कसा येतो ? द्रष्टा ( पहाणारा जीव ) असला तर दृश्य असणार व ते असलें तर तो असणार हें जर खरें आहे तर त्यातील कोणी तरी एक असले तरी दोघास बध होणार व एकाचा क्षय झाला की दोघे मुक्त होणार. पण तसे होणे दुर्घट आहे. कारण मूल अविद्येचा अत्यत बाध झाल्यास दृश्याचा बाध होणार. पण तिचा अत्यंत बाध होणे अशक्य आहे. त्यामुळे दृश्याचाही क्षय सभवत नाहीं. दृश्याच्या अस्तित्वामुळे द्रष्टाही विद्यमान असतो व त्यामुळे मोक्षाचा असंभव होतो. तुह्मी दृश्याचा असंभव आहे, असे म्हणता व खरोखरच तसे असल्यास द्रष्टा दृश्यस्वभावापासून मुक्त होऊ शकेल. पण ते माझ्या चित्तावर अजून आरूढ होत नाही. कारण जे उत्पन्नच झालेले नाही त्याचा अनुभव कसा येतो ? हें मला अजून समजलें नाही. यास्तव दृश्याचा अत्यत असभव कसा आहे, तें मला चागले समजवून सागा.

**श्रीवसिष्ठ**—बरें आहे, रामा, तुझ्या इच्छेप्रमाणें मी आता हे तत्त्वज्ञान तुला सागतों. तुझ्या हृदयातील हा संशयरूपी मळ थोड्याशा उपायाने नाहींसा होणार नाहीं. यास्तव मी आता व्यावहारिक गोष्टीच्या द्वारा हें परम तत्त्व तुझ्या चित्तांत दृढ करण्याचा प्रयत्न करितो. अश्रद्धा, संशय, अज्ञान, विपरीत ग्रह, अशुद्ध सस्कार इत्यादि दोषांमुळे तत्त्वज्ञान एकाएकीं चित्तावर आरूढ होत नाहीं. तूं पूर्ण विरक्त व परम बुद्धिमान् आहेस. तरी तुला हे दोष सोडीत नाहीत. मग बिचाऱ्या विषयासक्त व पापाचरणामुळे बुद्धिहीन झालेल्या पुरुषास ते पशुवृत्ति करून टाकीत असल्यास त्यात नवल तें कोणते ?

असो; ह्या जगद्रूपी भ्रमाची स्थिति अत्यंत असत् आहे, हें मी तुझ्या अनुभवास आणून देणार आहे व त्याचा तुला चागला अनुभव आला ह्मणजे तू स्वरूपध्यानांत तल्लीन होऊन यदृच्छेनें घडणारा हा मिथ्या व्यवहारही करशील. हे तत्त्वज्ञान रूढ झाल्यावर हें सत्य आहे, हें असत्य आहे; हे उपयोगी व त्यामुळेंच ग्राह्य आहे व हें निरुपयोगी व

त्यामुळेच त्याज्य आहे; हे सूक्ष्म आहे; हे स्थूल आहे; हें स्थिर आहे; हें अस्थिर आहे इत्यादि व्यावहारिक दृष्टि तुझ्या चित्तास व्याकुल करणार नाहींत. अरे दशरथाच्या लाडक्या रामा, एक आत्मा सत्य आहे, दुसरें काहींएक सत्य नाही, हे तू ध्यानात धर. त्याच्या ठायी हे जग कसे झाले हें तुला समजून सागावयाचे आहे, ते मी सागेनच. पण तू अगोदर हें परम तत्त्व विसरू नकोस, आत्म्यापासून ही सर्व भूते प्रकट झाली आहेत. तो ईश्वर कोठे दूर नाही. तो महात्मा या सर्व स्थूल-सूक्ष्म सृष्टीत समष्टि-व्यष्टिरूपाने व्यापून राहिला आहे. तोच उदय व लय या भावाने भ्रांतीने भासतो ११.

**सर्ग १२**—या सर्गात जगाचा अत्यंत असंभव आहे, असें सुचविण्याकरिता आरोपाचे वर्णन करितात.

**श्रीवसिष्ठ**—परम शात व पावन अशा या आत्मतत्त्वापासून हे कसे निर्माण झाले, ते ऐक. ज्याप्रमाणे प्रत्येक शरीरातील सुषुप्त ( ह्मणजे गाढ निद्रा–अस्थेतील ) आत्मरूप स्वप्नरूपाने विवर्त पावते त्याप्रमाणे ब्रह्म जगद्रूपाने विवर्त पावते. विवर्त ह्मणजे भ्रामक परिणाम. स्वप्न एका पुरुषाच्या वासनेमुळें झालेले असते. ह्मणून ते व्यवस्थित व चिरकाल रहाणारें, असे वाटत नाही. पण जग सर्व प्राण्याच्या वासनाचे कार्य आहे, ह्मणून हा प्रपच व्यवस्थित, स्थिर, कार्य–कारणभावयुक्त इत्यादि वाटतो. महाप्रलय झाला असता सर्व प्राणी त्या सद्रूप ब्रह्मामध्ये लीन होतात. निद्रासमयी आपण जीव जसे अविद्यामय होऊन कूटस्थ–आत्मरूपाने रहातों त्याचप्रमाणे प्रलयकालीन जीवाच्या लयाचा हा प्रकार आहे. अर्थात् सर्व जीवाच्या वासना त्या परमात्म्यामध्ये अविद्येच्या आश्रयाने असतात, असे ह्मणणें अगदीं योग्य आहे, व त्यामुळे परमात्ममय झालेल्या सर्व जीवाच्या वासनाचे हे जगद्रूपी कार्य ( विवर्त ) होतें. एवढ्याकरितांच त्या सद्रूप स्थानास सर्वात्मक ह्मणतात. असो, आता त्या प्रलयावस्थ ब्रह्मापासून हे सर्व कसे व कोणत्या क्रमाने होते ते सागतों, ऐक. ज्याअर्थी हे विश्व त्रिकालीं त्या परमात्म्याच्या केवल सत्तारूप आहे त्याअर्थी त्या आत्म्यामध्येच तें स्वतः चेत्यतेस प्राप्त झाल्यासारिखें होते. चेत्य ह्मणजे चेतनाचा विषय, व चेत्यतेस ह्मणजे चेतनाच्या विषयतेस. अर्थात् ते चैतन्याचा विषय होतें. त्या सद्रूप ब्रह्मामध्यें प्रथम अह अशी वृत्ति

उठते. त्या वेळी त्या कूटस्थ ब्रह्माच्या ठायी अहंकाराचा अध्यास झालेला नसतो; पण त्या वृत्तींत पुढे उत्पन्न करावयाच्या सृष्टीचे अनुसंधान असते. अशा त्या आकाशाहूनही सूक्ष्म व शुद्ध बोधासच ईक्षण ह्मणतात. ती ईक्षणरूप वृत्ति त्यात व्यक्त झालेल्या चैतन्याने भरलेली असते. त्यामुळे ती चित् सर्वज्ञ, ईश्वर इत्यादि नावास योग्य होते. नतर ते ईक्षण दीर्घकाल अनुवृत्त झाल्यामुळे दृढ होते. त्यामध्ये मीच सूक्ष्म प्रपचरूप आहे, अशी भावना होते. त्यामुळे चैतन्याने भरलेली ती ईक्षणवृत्ति आपल्या परम पदास विसरते. त्या विस्मरणामुळेच तिला हिरण्यगर्भ-सज्ञा प्राप्त होते. या हिरण्यगर्भास पुढे जीव असेही ह्मणू लागतात. कारण त्यामध्ये प्राण व इद्रिये यास धारण करण्याची शक्ति असते. जीव ह्मणजे प्राणधारण करणे, असा जीव या शब्दात मूळ धातु आहे; पण ही सज्ञा त्यास वायूच्या उत्पत्तीनतर येते. साराश, वर सागितलेली ईक्षणवृत्तीच आपल्या परम पदास सोडून सूक्ष्म प्रपचरूप झाली की, हिरण्यगर्भ होते.

पण त्या अवस्थेतही ब्रह्मसत्ताच केवल भावनामय होऊन ससारोन्मुख होते. तिच्यामध्ये कोणत्याही प्रकारचा विकार नसतो अर्थात् हिरण्य-गर्भ झाल्यावरही ब्रह्मसत्तेत काही अतर पडत नाही ती जशीच्या तशीच असते. कारण त्या सत्तेचा स्वभावच तसा आहे. तर मग तिला जीवभाव कसा येतो ह्मणून ह्मणशील तर सागतो. त्या सत्तेलाच अनुसरून रज्जुसर्प–न्यायाने पुढे जीवभाव उद्भवतो. या जीवसत्तेच्या उत्पत्तीनतर लागलीच आकाश–सत्ता उद्भवते इतर भूतास अवकाश देणें, हे तिचे प्रयोजन असल्यामुळे ती शून्यप्राय असते. ती शब्दादि गुणाचे बीज आहे. सूर्यादि तेजाची उत्पत्ति झाल्यानतर प्राप्त होणाऱ्या आकाश, वायु, इत्यादि सज्ञास ही आकाश सत्ताच व्यक्त करिते. पुढें त्या जीवाचे ठायी अभिमान उत्पन्न होतो व त्याबरोबरच कालाचाही उद्भव होतो. हेच मुख्य जगत्स्थितीचे बीज होय. पण ही–आकाश, अहकार व काल–याची उत्पत्ति केवळ हिरण्यगर्भापासूनच होते, असें समजूं नकोस. तर हिरण्यगर्भरूप परमात्मसत्तेपासून होते, असें समज. कारण ती परसत्ताच या सर्व विकारांचें कारण आहे.

असो, आकाशच मी आहे, असे समजणारं तें आकांशरूपी ज्ञान आकाशाचे कार्य जो वायु त्याच्या सकल्पाचें बीज होतें. अर्थात् त्या आकाशरूपी अहकाराच्या एका परिमित अशापासून वायु उत्पन्न होतो. त्याच्यामध्यें प्राधान्येंकरून स्पदशक्ति असते. स्पद ह्मणजे किंचित् चलन. आकाश व अहकार या उपाधींनीं युक्त असलेल्या पर सत्तेपासूनच सर्व शब्दबीजभूत शब्दतन्मात्र उत्पन्न होते. पण पूर्वीच्या कार्याप्रमाणे तेही त्या परसत्तेच्या भावनेनेच होते, हे विसरता कामा नये. साख्य शास्त्र, व काही पुराणे यात तन्मात्रापासून भूताची उत्पत्ति झाली, असे सांगितलें आहे. पण ते उपनिषदातील वर्णनाच्या विरुद्ध आहे शिवाय शब्दसामान्य ह्मणजे शब्दत्व हेच शब्दतन्मात्र आहे. ते विशेषशब्दाचे उपादान आहे. यास्तव आकाशापासून शब्दसामान्यरूप शब्दतन्मात्र झाले, असे ह्मणण्यास काही प्रत्यवाय नाही. हे शब्दतन्मात्रच वेद-शास्त्रादि सर्व प्रमाण व अप्रमाण शब्दाचे उपादान कारण आहे. पुढे वेदभावास प्राप्त झालेल्या परमात्म्यापासून ही सर्व जगत्-श्री उद्भवते

वायूची उत्पत्ति झाल्यानतर हिरण्यगर्भास जीव हे नाव प्राप्त होते. कारण त्यापूर्वी प्राणाची उत्पत्ति झालेली नसते. प्राण हे वायूचे कार्य आहे. यास्तव प्राणधारणेमुळे प्राप्त होणारी सज्ञा प्राणोत्पत्तीनतरच प्राप्त होणे योग्य आहे. ईक्षणापासून वायूपर्यंत उत्पन्न झालेली ही परिणामपरपराच सर्व साकार सृष्टीचे कारण आहे

असो, प्रत्येक शरीरात प्राणरूपाने रहाणारा हा वायु सर्व क्रियाचे कारण आहे. ह्मणजे त्याच्या योगानेच शरीराच्या, इद्रियाच्या व मनाच्या क्रिया होत असतात. चतुर्दश भुवनातील सर्व प्राण्याच्या सचारास हाच कारण होतो वायुरूप झालेल्या त्या चैतन्यापासून भावनेमुळे तात्काल स्पर्शतन्मात्र उत्पन्न होते. प्रत्यही प्रत्येक प्राण्याच्या अनुभवास येणाऱ्या नानाप्रकारच्या स्पर्शांचे तेच उपादान आहे. सृष्टीच्या मर्यादेचे रक्षण करणारे आवह, प्रवह इत्यादि एकूणपन्नास वायूही त्या मुख्य वायुतत्त्वाच्याच कार्यरूप आहेत.

असो; वायुभावापन्न चैतन्याच्या सकल्पाने तेज हें भूत उत्पन्न होते. त्याच्यापासून रूपतन्मात्र उद्भवते. लाल, शुभ्र, पीत, नील इत्यादि सर्व

प्रकारच्या रूपांचे ते कारण आहे. या तेजापासूनच सूर्य, चद्र, नक्षत्रें, ग्रह, विद्युत्, अग्नि इत्यादि ज्योति उद्भवतात. पुढे तो तेजोभूत आत्मा मी जलाचा रसस्कध आहे, अशी भावना करीत जलरूप होतो. त्याच्या पासून रसतन्मात्र उद्भवते. जलतत्त्वाचा मूर्त ( साकार ) समूह ह्मणजेच पाणी होय. त्याचा स्वाद घेतला असता त्यातील ज्या मधुर रसाचा अनुभव येतो त्याचे उपादान कारण हे रसतन्मात्रच आहे. रसच इद्रिय व विषय या रूपाने परिणाम पावतो. नतर रसनेद्रिय विषयरसाचे ग्रहण करिते व विषयरस त्यास आपणामध्ये आसक्त करितो. ह्यामुळे प्राणी पुनः पुनः विषयसपादन करावयाच्या खटपटींत पडतो व तीच त्याची प्रवृत्ति ससार बनते. शब्द-स्पर्शादि इतर चार विषयाचीही हीच स्थिति आहे.

असो, हा जलरूप झालेला परमात्मा “ पृथ्वीच मी आहे ” या सकल्परूप होऊन पुढे होणाऱ्या पृथ्वीचे रूप व नाव याचे निमित्त होतो व गधसंकल्पाने मी स्वतः गधतन्मात्र झालो आहे, असे पाहतो. पुढे होणाऱ्या भूगोलाचे ते बीज होय. खरी खरी आकृति त्या भूगोलासच असते. मनुष्यादि आकार त्या भूतामध्येच उद्भवतात भावनेने पृथ्वीरूप झालेल्या त्या सर्वाधार परमेश्वरापासून सर्व ससार पसरतो.

याप्रमाणे आकाशादि सूक्ष्म भूते उत्पन्न होतात, नव्हे—स्वत तो परमात्मा केवल सकल्पाने आकाशादि सूक्ष्म भूतरूप होतो. नतर त्या सूक्ष्मभूतापासून शब्दादि पचतन्मात्रे उद्भवतात. त्यापासून शब्दादि विशेष प्रकारचे विषय जन्मास येतात, व त्या त्या विषयाची ग्राहक इंद्रिये उत्पन्न होतात. येथवर सागितलेली ही सर्व सूक्ष्म सृष्टि होय. ती पुढे होणाऱ्या सर्व स्थूल सृष्टीचे बीज आहे.

आता येणेप्रमाणे उत्पन्न झालेल्या या भूताच्या मिश्रणाने ब्रह्माडाकार कसा होतो; ते सागतो. वर सागितलेली “ भूतेच मी आहे ” या भावास प्राप्त झालेल्या चितीने ( परमात्म्याने ) पुनः भावना केली असता तन्मात्रे एकमेकात मिसळून जलातील बुडबुड्याप्रमाणे स्वतः ब्रह्माडाकार होतात, व तीं एकमेकात अशीं मिसळून जातात की, सर्व नाश होई तो तीं परस्पर पृथक् व शुद्ध आहेत, असे वाटत नाहीं. पण हा त्याचा स्थूल परिणाम होण्यापूर्वी तीं अव्याकृतामध्ये ब्रह्मसत्तेनेच

रहात होती. पुढे होणाऱ्या मोठ्या थोरल्या वडाच्या झाडाचा अवाढव्य विस्तार जसा मोहरीहूनही सूक्ष्म असलेल्या आपल्या बीजामध्यें, बीजाच्या सत्तेनेंच, असतो तसाच या ब्रह्माडाचा प्रकार समज. तूं कदाचित् म्हणशील की, ज्यामध्ये थोडासाही अवकाश नाही या तन्मात्रामध्ये स्थूल भूताची सृष्टि कशी रहाणार ? तर त्याचे उत्तर सागतो; ऐक.

स्थूल सृष्टि खरोखरच काही तेथे रहात नाही. तर तिची भ्रामक उत्पत्ति त्याच्यापासून होते, असे भासते व असली काल्पनिक उत्पत्ति परमाणूपासूनही होणे शक्य आहे. स्वप्नामध्ये अतिसूक्ष्म नाडीच्या छिद्रात हें अवाढव्य जग दिसते की नाही ? तशीच ही स्थूल सृष्टि सूक्ष्म बीजात असते, असे समज. फार काय पण ती तन्मात्रे जरी स्थूलभावास प्राप्त झालेली असलीं तरी त्याच्या सूक्ष्मतेची हानि होत नाही. कारण त्याचा स्थूलभाव हा एक विवर्त आहे. विवर्त असल्यामुळेच त्याच्या परिणामास अगदी वेळ लागत नाही. तर एका क्षणात कल्पाचे कामही होऊन जाते. क्षणभर पडलेल्या स्वप्नात एकादे वेळी शभर वर्षाच्या इतिहासाचा अनुभव येतो, हे प्रसिद्ध आहे.

ही सर्व भूते विकाररहित चैतन्याने अनुविद्ध असतात. अनुविद्ध म्हणजे व्याप्त. या भूताच्या परिणामाचे वेळी विवर्त-वादाचा स्वीकार न केल्यास झाडाच्या एकाद्या फळाप्रमाणे अथवा कोन्हाळा, काकडी इत्यादिकाप्रमाणे हळु हळु वाढणाऱ्या या जगाच्या उद्भवास अनत काल लागणार, हे उघड आहे. साराश याप्रमाणे ते चैतन्य सकल्पाच्या योगाने तन्मात्रगणरूप होते व सकल्पामुळेच त्याचा मिथ्या ब्रह्माडाकार बनतो. म्हणजे ब्रह्मच जगदाकार होते, हे आमचे म्हणणे सिद्ध झाले. कारण जगाचे बीज शब्दादि तन्मात्रपचक आहे. त्या तन्मात्रपचकाचे बीज परमात्म्याशीं साक्षात् सबध ठेवणारी मायाशक्ति आहे. तीच जगाच्या स्थितीचें कारण होते. याप्रमाणे ते अज, आद्य व चिन्मात्र परमात्मतत्त्वच मायाशक्तीच्या योगाने जगाचे बीज होत असून मायाशक्ति नाहींशी झाली असता ते अनिर्वाच्य ब्रह्म होते १२.

**सर्ग १३**--ब्रह्मास मिथ्याजीवभाव कसा येतो व त्याला देहप्राप्ति कशी होते त्याचें येथे निरूपण केलें आहे.

**श्रीवसिष्ठ**—रामा, वरच्या सर्गात ब्रह्मापासून मिथ्या जगद्भाव कसा उद्भवतो ते सांगितले. आता या सर्गात त्या ब्रह्मालाच जीवभाव कसा प्राप्त होतो व त्या जीवास देहादिकाची प्राप्ति कशी होते ते मला सांगावयाचे आहे. पण अगोदर सुषुप्तीप्रमाणे प्रलय काली लीन होऊन मायाशबल–ब्रह्मभावास प्राप्त झालेल्या जीवाच्या अंतःकरणादि उपाधीचा पुनः कोणत्या क्रमाने आविर्भाव होतो तें सकारण सांगितलें पाहिजे. सर्वव्यापी, सम, मायाशबल, अधिष्ठानभूत, व उत्पन्न न झालेल्या आकाश–तेज–तम इत्यादि भूतान्या कारण-सत्तारूप चिदात्म्याचे ठायी विषय, चित्त, जीवभाव व अहभाव क्रमाने उत्पन्न होतात. त्या सद्रूप परमात्म्यास प्रथम चेत्य–विषय–मय सृष्टीस निर्माण करावे, असे स्फुरण होते. ह्मणून विषयकल्पना सर्वाच्या पूर्वी होते, असे ह्मणावे लागते. नतर चित्तरूप इद्रियाची कल्पना होते. कारण त्यावाचून विषयाची सिद्धि होत नाहीं. प्रत्येक अनुभव अत करणाच्या अधीन असल्यामुळे कोणत्याही अनुभवाऱ्या पूर्वी त्याची सिद्धि मानावीच लागते. त्यानतर चेत्याच्या सयोगाचा प्रकाश करणारा जीवभाव उत्पन्न होतो आणि शेवटी, मी विषयमय आहे, असे मानल्यामुळे अहभावाची सिद्धि होते. अहतेच्या परिणामामुळे बुद्धीची कल्पना होते. ते बुद्धितत्त्वच वासनारूपाने चित्तात लीन होऊन राहिलेल्या विषयाचे मनन केल्यामुळे मन होते. त्यानंतर वासनात्मक शब्द–तन्मात्राचे स्पर्शादि–तन्मात्राशी मिश्रण झाल्यामुळे स्थूल भावास प्राप्त झालेल्या मनापासून हा असला विस्तीर्ण प्रपच प्रकट होतो. याप्रमाणे एका क्षणात हा सर्व कार्यवर्ग उत्पन्न होऊन स्वप्नातील नगराप्रमाणे वारवार नाहीसा होतो. हे जगद्बीज वस्तुत पृथ्वी, जल, अग्नि इत्यादिकातील कशाचीही अपेक्षा करीत नाही. कारण त्या चिन्मात्रामध्यें सकल्पाने काय पाहिजे ते करण्याची शक्ति असते. तात्पर्य या सर्व प्रपंचाचे कारण तेच एक परम तत्त्व आहे. त्याचे जे बीज तेच फल आहे, असे तू जाण. ह्मणजे जग ब्रह्ममय कसे ते तुझ्या ध्यानात येईल

असो; विषयास प्रकाशित करणाऱ्या चिच्छक्तीने सृष्टीच्या आरभीं महाकाशामध्ये हा अशा प्रकारचा भूतपचकसमूह कल्पिला. तो त्या चिच्छक्तीच्या शरीररूपच असतो. तिच्याहून निराळा नसतो आणि त्यामुळेंच तो मिथ्या आहे. त्या भूतपंचकापासून हें स्थूल जग होतें. पण

तेंही आकाशाप्रमाणे आपल्या कल्पनेचे अधिष्ठान जो आत्मा त्यामध्येंच त्रिकाली स्थित असल्यामुळे त्याच्या सत्तेने सत्तायुक्त होते. आपल्या पृथक् सत्तेने सत्तावान् होत नाही. कारण स्वतःसिद्ध नसलेल्या वस्तूच्या योगाने जे सिद्ध करावयाचे असते ते केव्हाही स्वतः सिद्ध नसते. कारण स्वतःच जे मिथ्या ते दुसऱ्यास ह्मणजे आपल्या कार्यास सत्य कसे करील. तस्मात् ब्रह्माच्या ठिकाणी आरोपित असलेलें हे भूतपचक व त्याचे कार्य स्थूल भूतपंचक ही दोन्हीं चिद्ब्रह्मरूप आहेत. त्यामुळे हा रूढ झालेला त्रिजगत्क्रमही ब्रह्मच आहे. असे जर आहे तर हे याचे कारण आहे व हे याचे कार्य आहे, असा व्यवहार कसा होतो ? ह्मणून ह्मणशील तर सागतो. या भूतपचकाचा उद्भव पूर्वीप्रमाणेच आताही होतो. त्याच्या उत्पत्तीत किंवा स्थितीत केव्हाही अतर पडत नाही. पण भूतकालिक वस्तूस वर्तमान कालीन वस्तूचे कारण व त्यास त्याचे कार्य, असे ह्मणण्याचा परिपाठ, व्यवहाराकरिता, पडला आहे साराश याप्रमाणे या सृष्टीत काहीएक उत्पन्न होत नाही कारण जर काही खरोखरच उत्पन्न झाले असते तर त्याच्या उत्पत्तीची सगति लावता आली असती पण तसे करिता येत नाही. हा जीवभावही असत् आहे स्वप्नातील नगरादिकाप्रमाणे ब्रह्माकाशसज्ञक परम-आकाशात - (परम प्रकाशात) हे जीवाकाशत्व खोटेच उद्भवले आहे. ते वस्तुतः खोटे असून खरे असल्यासारखे भासते

असो, येथवर सामान्य अभिमानाच्या योगाने व प्राणसज्ञक वायूस धारण करण्याच्या सामर्थ्यामुळे ब्रह्मास समष्टि–जीवत्व कसे प्राप्त होते ते सागितले. आता विशेष अभिमानामुळे व प्रत्येक शरीरातील प्राणास धारण करण्याच्या सामर्थ्यामुळे व्यष्टि–जीवत्व कसे प्राप्त होते, ते सागतो. समष्टि ह्मणजे समूह व व्यष्टि ह्मणजे त्यातील प्रत्येक. हिरण्यगर्भ सृष्टीत जितके ह्मणून चराचर प्राणी आहेत त्या सर्वांचे ठायी "हा मी" असा अभिमान धरितो व प्रत्येक प्राणी आपापल्या शरीरावर मात्र " मी " असा अभिमान ठेवितो. सृष्टीचा प्राण महा वायु आहे व प्रत्येक प्राण्याचा प्राण श्वासोच्छ्वासादि करताना अनुभवास येणारा व शरीराने मर्यादित होणारा वायु आहे अशा या द्विविध प्राणास धारण करण्याचे सामर्थ्य त्या दोघामध्येही असते ह्मणून त्यास जीव असे ह्मणतात.

असो; आंता जीव अतःकरण, श्रोत्रादि बहिरिंद्रियें, स्थूल देह इत्यादि-कांशी आपले तादात्म्य कसे करून घेतो तें सागावयाचे आहे. पण अगो-दर समष्टि–जीवाच्या उपाधीपासून भावनेनेच व्यष्टीच्या अतःकरणाचा अकुर कसा उगवतो ते सागतो. त्या परमात्म्याच्या ठिकाणी कल्पनेने उद्भवलेलें समष्टि–जीवाकाश आपले स्वरूप विस्तृत असतानाही आपण अग्नीच्या ठि-णगीप्रमाणे अगदीं अल्प आहो, असे चिंतन करून तसेच होते. ह्मणजे त्याला मी अगदीं अल्प आहे, असा अनुभव येतो एवढ्याकरिताच श्रुतीमध्ये–जसे प्रदीप्त अग्नीपासून क्षुद्र विस्फुलिंग ( किटाळे, ठिणग्या ) निघतात त्याप्रमाणे आत्म्यापासून हे सर्व प्राणी उद्भवतात,–असे ह्मटले आहे. असो, तात्पर्य त्याच्या भावनेमुळेच तो असा विकार पावतो. तो जी जी भावना करितो तसा तसाच त्याला अनुभव येतो. पण अशा सकल्पामुळे अनुभवास येणाऱ्या वस्तु खऱ्या नसतात. तर त्या कल्पित, मिथ्या, असत् असतात याप्रमाणे त्या अल्प स्वरूपाची भावना करीत असतानाच तो द्रष्टा व दृश्य होतो. कारण अणुरूप भावनेने अणुरूप होताच त्याला आपल्याच स्वरूपाचा अति मोठा भाग आपल्याहून भिन्न वाटू लागतो. ज्यास तो भिन्न वाटतो तो द्रष्टा व जो भिन्न वाटतो तो सर्व भाग दृश्य होतो ह्मणजे वस्तुतः तो एकच असताना, स्वप्नात जसे आपण मेलो आहो, असे पहावे त्याप्रमाणे तो द्विरूप होतो पण या द्रष्टृ–दृश्यभावामुळे त्याच्या मूळ अणुतेजःस्वरूप–आकृतीत थोडीशी भर पडून तो एकाद्या नक्षत्रासारिखा जणु काय स्थूल होतो. हाच त्याचा भूतमात्रानी परिवेष्टित झालेला लिंग देह आहे. त्यास तो 'अह' असे समजतो. पण हा लिंगदेह–प्रत्यय व पुढे होणारा स्थूल–देह–प्रत्यय हे दोन्ही चित्ताच्या कल्पनेमुळेच होत असतात ह्मणजे स्वप्नात ज्याप्रमाणे एकाद्यास मी वाटसरु असून वाटेने चालत आहे, असे चित्ताच्या कल्पने-मुळे वाटावे त्याप्रमाणे हा सर्व प्रकार होतो. पुढे तोच नक्षत्राकार ( लिंगशरीराकार ) जीव पुढील देहाची भावना करितो. ( पुढील देहाच्या आकाराचे चिंतन करितो. ) ह्मणजे चित्त जसे विषयाच्या आकाराची भावना करिते त्याप्रमाणेच तो देहाकाराची भावना करितो. या भावना करणाऱ्या जीवाच्या नक्षत्रतुल्य शरीरात त्या भावि स्थूल देहाच्या आकाराचे भान मोहामुळे होते आरशांत जसे पर्वताचें प्रतिबिंब पडावे त्या-

प्रमाणे हा प्रकार घडतो. किंवा स्वप्न, संकल्प, इत्यादि प्रसंगीं बाहेरचा विषय जसा सूक्ष्म नाडीत जसाच्या तसाच भासतो त्याप्रमाणे भावि देह त्या सूक्ष्म शरीरातील कल्पित सूक्ष्म आकाशात भासतो हा वासना देह व्यवहारदृष्ट्या चित्तरूप आहे. कारण तो त्याचा परिणाम आहे, पण परमार्थदृष्ट्या तो ज्ञान, सत्ता व आनंदरूप आहे. असो, स्थूल देहाच्या भावनेने तो जीव तद्रूप होतो. नंतर मी आता पहातो, असा संकल्प करून तो दोन रंध्रातून जणुकाय या महा आकाशात पसरतो. त्यामुळे त्यास रूपयुक्त वस्तूचे ज्ञान होऊ लागते. ज्याच्या योगाने तो बाहेर पसरून पदार्थास पहातो त्यास नेत्र ह्मणतात. ज्याच्या योगाने तो स्पर्शास जाणतो ती त्वक्, ज्याच्या योगाने तो ऐकतो ते श्रवणेंद्रिय, ज्याच्या योगाने तो वास घेतो ते घ्राण व ज्याच्या योगाने तो रसास्वाद घेतो ते रसनेंद्रिय होय. स्पंदन हाच वायु, चेष्टा हीच कर्मेंद्रिये इत्यादि सर्व सामग्री केवल त्याच्या भावनेने निर्माण होते, व त्याला तो स्वकल्पित आकार अंडामध्येच दिसू लागतो. याप्रमाणे स्फुलिंगाप्रमाणे केवल कल्पनेने हिरण्यगर्भापासून भिन्न झालेल्या असंख्य जीवातील कोणी जलात असलेल्या ब्रह्मांड–शरीरावर अहंभाव ठेवितो व कोणी त्याच्या आतील चतुर्मुखादि शरीरावर अहंभाव ठेवितो. याप्रमाणे तो भावि ब्रह्मांडाची कल्पना करितो व त्याचा अनुभवही घेतो. संकल्प हेच त्याच्या गर्भवासाचे निमित्त आहे. तो ईश्वर अमुक देशात, अमुक समयी, अमुक जातीत, अमुक प्रकारे माझा जन्म व्हावा, मी अमुक अमुक कर्मे करावी इत्यादि भावना करूनच त्या त्या विषयास व आपणास बद्ध करून घेतो. साराश, असा हा असत्य भ्रम उद्भवतो.

आता पूर्वी सांगितल्याप्रमाणे आहिवाहिक शरीराने युक्त असलेला स्वयंभू वस्तुतः कसा उत्पन्न होत नाही व त्यामुळेच तो स्वतःच भ्रमाने कसा उत्पन्न झाला आहे, हे तुला चांगले समजेल. तो प्रभु आद्य प्रजापति आहे; पण तो आद्य कर्ताच भ्रामक असल्यामुळे व त्याच्या उत्पत्तीची व्यवस्था लागत नसल्यामुळे या ब्रह्मांडाकार भ्रमात काहींएक उत्पन्न झालेलें नाहीं. भ्रामक दृष्टि सोडून पारमार्थिक दृष्टीने पाहिल्यास एका शुद्ध ब्रह्मावाचून दुसरे काहींएक सत् नाहीं, असा अनुभव येतो. ह्मणूनच आह्मी या जगास स्वप्नांतील नगर ह्मणून ह्मणतों. जग हे एक

कोणीही न काढलेलें व रंगावाचूनच विचित्र दिसणारें चित्र आहे. कोणत्याही बाह्य सामग्रीवाचून व कोणच्याही आंतर प्रयत्नावाचून उत्पन्न झालेले हें असत्य असताना सत्य असल्यासारखे वाटतें. हिरण्यगर्भाचा पूर्व संस्कार, पुण्य इत्यादि सामग्रीच्या योगाने तें उत्पन्न होते, असे समजल्यास काय प्रत्यवाय आहे? म्हणून म्हणशील तर सांगतों. ज्यावेळी महा प्रलय होतो त्यावेळी हिरण्यगर्भ व त्याच्या लोकी विशेष प्रकारची उपासना करून आलेले अतिपुण्यवान् लोक मुक्त होत असतात. त्यामुळे पुढच्या सृष्टीला कारण होणारे हिरण्यगर्भाचे पूर्व संस्कारादि असणे शक्य नाही. पण जो कोणी हिरण्यगर्भाच्या पदाची मला प्राप्ति व्हावी म्हणून सकाम उपासना करून पूर्व कल्पाच्या अतीच उत्तर सृष्टीच्या आरंभी हिरण्यगर्भ होण्यास योग्य झालेला असेल त्यास पुढील सृष्टीच्या आरंभी हिरण्यगर्भत्व प्राप्त होते. पण त्याने पूर्वी कधी सृष्टि रचलेली नसते. यास्तव त्यास पूर्व–अनुभव व अनुभवजन्य संस्कार असणे शक्य नाही. तस्मात् हे जग योग्य सामग्रीवाचूनच निर्माण झालेले आहे, असे म्हटल्यावाचून गत्यंतर नाही व योग्य कारणजन्य नसल्यामुळेच ते असत्य आहे. त्याच्या उत्पत्तीचा असंभव आहे. जग सत्य आहे, असे म्हणणारे कित्येक वादी आहेत, त्यातील कोणी हा प्रकृतीचा सत्य विकार आहे, असे समजतात व कोणी ईश्वराच्या इच्छेने परमाणूचे परस्पर मिश्रण होऊन त्याचा आरंभ झाला आहे, असे प्रतिपादन करितात. पण त्याच्या त्या म्हणण्याचें परीक्षण करू लागल्यास ते फार वेळ टिकत नाही. यास्तव त्या मताचा त्याग करून वेदोक्त विवर्त–वादाचाच अंगीकार केला पाहिजे. पृथ्वी, आप् इत्यादि मिथ्या वस्तूंचा अनादि साक्षीस अनुभव येतो, त्यामुळे त्याच्या ठायी झालेले संस्कार प्रपंचास कारण होतात, म्हणून म्हणावे तर साक्षीस ज्ञात होणारे स्वप्नादि मिथ्या असते, असा नियम असल्यामुळे त्याच्या संस्कारापासून होणारे जगही मिथ्या आहे, असे–आम्हास इष्ट आहे तसेंच–सिद्ध होते. तस्मात् कारण काल्पनिक असल्यामुळे कार्य जगही कल्पनामय आहे. कल्पनेचा आधार मात्र सत्य आहे. नित्य व निरंजन चैतन्य ( ब्रह्म ) सर्व कल्पनाचा आधार आहे. यास्तव तेच सत्य व आनंद आहे. जगाच्या दृष्टीने त्याला आधार तरी म्हणावे लागते. पण वस्तुतः ते परम प्रकाशमय सूक्ष्मतर तत्त्व अधारही नव्हे. आधार

आधेय, द्रष्टा, दृश्य, ब्रह्मा, ब्रह्मांड, जगत्, जन इत्यादि सर्व शब्द खोटे आहेत. व्यवहाराकरिता त्याची कल्पना केलेली आहे. पण खरे पहाता एक, शांत व स्थिर ब्रह्मच सर्वत्र भरून राहिलें आहे. जग खरे आहे व त्यातील व्यवहार व्यवस्थितपणे चालले आहेत असे जे वाटत असते तें त्या वेळे पुरते जरी खरें असले, तरी स्वप्नातील आपल्या खरोखर भासणाऱ्या मरणाप्रमाणे, ती अवस्था सोडून दुसऱ्या अवस्थेत जाताच मिथ्या ठरते व्यावहारिक व स्वाप्निक पदार्थ सत्य आहेत, असा जो अनुभव येतो तो तरी या सत्य परमात्म्याचाच प्रभाव आहे, हे तू विसरू नकोस. साराश परमात्म्याचे ठायी होणारा पहिला प्रजापति वस्तुतः आकाशरूप आहे. सर्वत्र सम असणारा परमात्माच या–शून्य, प्रजापति, इत्यादिकाच्या रूपाने प्रसिद्ध होतो. तो मनोमय आहे. ह्मणजे मन हेच त्याचे शरीर आहे. त्याचे शरीर पचमहाभूतापासून झालेले नसते. त्यामुळें त्याच्या सकल्पापासून झालेले हे सर्व ब्रह्मांड व त्यातील अनेक शक्ति नरशृंगादि इतर असत् वस्तूप्रमाणेच असत्, मिथ्या, भ्रामक व काल्पनिक आहेत १३.

**सर्ग १४**––जीवभावामुळे ब्रह्म मर्यादित होतें कीं काय इत्यादि शंकाचे निरसन करून ब्रह्मैक्याचा उपदेश करितात.

**श्रीवसिष्ठ**—राघवा, एवढा वेळ मी जे तुला सांगितले त्यावरून जगत्, अहंता इत्यादि कांहींएक दृश्य उत्पन्न झालेले नाही व तें उत्पन्न झालेले नसल्यामुळेच वस्तुतः नाही. तर जे काही आहे ते पर ब्रह्मच आहे. निश्चल समुद्रात जशी लाट येते त्याप्रमाणे पर ब्रह्माकाशांतच जीवभाव येतो व त्याचेही परमाकाशाप्रमाणेच रूप असते, इत्यादि तुला समजले असेल. ही जगद्रचना विचित्र आहे. तिच्या विचित्रतेची तुला काही कल्पना करिता यावी ह्मणून मी मागे पुष्कळ दृष्टात दिले आहेत. आद्य प्रजापतीच्या उत्पत्तीचेही युक्त कारण दिसत नाही. त्याच्या आधिभौतिकरूपाप्रमाणेच आधिदैविकरूपही मिथ्या आहे. अर्थात् हे सर्व जगज्जाल आरशात भासणाऱ्या भितीप्रमाणे असत्य आहे. असग व निर्विकार चैतन्याचे ठायीं, द्रष्टा, दृश्य, दर्शन; स्रष्टा, सृष्टि, सर्जन; भोक्ता, भोग्य, भोग; ज्ञाता, ज्ञेय, ज्ञान; इत्यादि सर्व त्रिपुट्यांचा असंभव आहे. तर मग या सर्व शब्दाची प्रवृत्ति कशी होते, ह्मणून ह्मणशील

तर सांगतों–या शब्दाचा वाच्य अर्थ व्यवहारापुरता खरा असतो. पण त्याचा लक्ष्य अर्थ हा परमात्माच आहे. त्याच्यापासूनच–एका दिव्यावर जसे अनेक दिवे लावून घ्यावे त्याप्रमाणे–ही जीवांची पंक्ति उद्भवली आहे. पण हा सर्व संकल्पाचा खेळ आहे. पहिल्या मिथ्या हिरण्यगर्भापासून जसा अत्यंत शून्य विराट् उत्पन्न झाला त्याप्रमाणे विराडात्म्यापासून व्यष्टि जीव झाला. ह्मणजे एका स्वप्नात जसें दुसरें स्वप्न पडावे तशातलाच हा एक प्रकार आहे. वृक्षापासून जशा अनेक शाखा निघतात त्याप्रमाणे विराडात्म्यापासून अनेक जीव निघाले आहेत. पण त्यास जीवाच्या उत्पत्तिसमयीं सहकारी कारणाचे काहीं-एक सहाय नसते. ह्मणून त्या एकट्यासच त्या( जीवा )स उत्पन्न करावें लागते आणि वृक्ष–शाखान्यायाने ते उत्पन्न होणारे जीव त्या विराट्–पुरुषाहून भिन्न नसतात. सारांश ब्रह्मच आद्य प्रजापति होते; आद्य प्रजापतिच विराडात्मा होतो आणि विराडात्माच सृष्टि बनतो. जीवही तोच होय. अर्थात् परमात्माच या सर्व प्रपंचरूपानें स्थित आहे. तस्मात् पृथिव्यादि आकार असत् आहेत.

**श्रीराम**–महाराज, मला एक शंका आली आहे. आपण ह्मणता कीं व्यष्टि, समष्टि व त्याचे मूळ ( ब्रह्म ) याचे ऐक्य आहे, व यातील मूळ मात्र सत्य असून समष्टि व व्यष्टि असत्य आहेत. पण मी यावर असे ह्मणतो कीं, त्या तिघांचे जर ऐक्य आहे ह्मणजे तीं जर परस्पर भिन्न नाहींत तर मूळ व समष्टि यास असत्य समजून प्रत्यक्षादि प्रमाणसिद्ध व्यष्टि भागासच सत्य का मानू नये? सेना, समाज इत्यादिकांतील समष्टित्व गेले तरी व्यष्टित्व रहाते, असे सेनेतील लोक आपापल्या घरीं गेले असता आमच्या अनुभवास येते. यास्तव आपण कृपा करून मला अगोदर या पुढच्या प्रश्नाचे उत्तर द्या. मला आपल्या भाषणाचा आशय समजला आहे. पण आपला सिद्धांत अधिक स्पष्ट व्हावा ह्मणून मी हे प्रश्न विचारीत आहे. हा जीव परिमित आहे? कीं अनंत जीवाची रास आहे? की पर्वताप्रमाणे त्याचा एक व अनंत पिंड ( गोळा ) आहे? मेघातून जशा पावसाच्या धारा पडतात, समुद्रातून जसे बिंदू उसळतात किंवा तापलेल्या लोखंडाच्या गोळ्यावर घणाचे प्रहार करू लागले असतां जशा ठिणग्या उडतात त्याप्रमाणे हे अनेक क्षुद्र जीव कोणापासून उद्भ-

वतात ? समष्टीपासून वरील दृष्टांताप्रमाणेच याचा उद्भव होतो, अ समजल्यास ते अनित्य आहेत, असे होणार व जीव अनित्य आहेत, अ ठरले की कृतप्रणाश व अकृत–अभ्यागम हे दोष अनिवार्य होण केलेल्या कर्मांचे फल न मिळणे हा कृतप्रणाश व न केलेल्या कर्मा फल भोगावे लागणे हा अकृत–अभ्यागम होय. जीव शरीराबरो नवीन उत्पन्न होतो व शरीराबरोबर नाहीसा होतो, असे म्हण जीवाचे अनित्यत्व मानिले म्हणजे १ पूर्वी कधी न केलेल्या कर्मा सुखदुःखादि-फलभोग या जन्मी भोगावा लागणे व २ या जन्मीं केले कर्मे जीव शरीराबरोबर नष्ट होत असल्यामुळे, फळ भोक्त्याच्या अभावं फळ दिल्यावाचून, नाहीशी होणे, हे पूर्वोक्त दोष अपरिहार्य होतात शिवाय त्या समष्टीची सभावनाच करिता येत नाही. म्हणजे जिच्यापासू जीव उद्भवतात असे कदाचित् म्हणता येणे शक्य आहे, ती समष्टि आ असे प्रबल प्रमाणानी ठरत नाही.

**श्रीवसिष्ठ**—रामा, जीव एक आहे, एवढे सुद्धा जर आम्हास मान्य नाही तर त्याच्या राशीचे नाव कशाला घेतोस ? "सशाचे शिंग उडून गेले" या म्हणण्याप्रमाणेच तुझे हे वचन मला आश्चर्यकारक वाटते वस्तुतः जीव एक नाही, त्याची रास नाही व तो पर्वताप्रमाणे एक गोळाहं नाहीं. तर एका ब्रह्मतत्त्वावर अनेक कल्पना झाल्या आहेत. समष्टि, व्यष्टि इत्यादि कल्पनांचे अधिष्ठान ब्रह्म आहे व तेच आत्मा आहे, असें साक्षात जाणल्याने सर्व संसारधर्मापासून मुक्त होणे हे परम फळ मिळते. यास्तव समष्टि, व्यष्टि इत्यादि ही सर्व कल्पना मी रचली आहे. कारण तशी कल्पना केल्या वाचून वर सांगितलेला साक्षात्कार होत नाही. अर्थात ही कल्पना म्हणजे तो ब्रह्मात्मसाक्षात्काराचा उपाय आहे. समष्टि, व्यष्टि, जीवाची उत्पत्ति इत्यादि सर्व सत्य आहे, अशा अभिप्रायाने मी त्याचे वर्णन केलेले नाहीं. तेव्हा तुझ्या प्रश्नास अवकाशच कोठे राहिला ? रामा, जीव हा शब्द, त्या शब्दाचा अर्थ, त्याचे अवांतर प्रकार, सृष्टीचा उद्भव इत्यादि सर्व मिथ्या आहे; सत्य नाही, असे तू निश्चयाने जाण व हा आपला निश्चय ढळू देऊ नकोस. शुद्ध, चिन्मात्र, व अमल ब्रह्मच सर्वगामी आहे. ते सर्व–शक्तियुक्त असल्यामुळें त्याचा कोणता-ही संकल्प व्यर्थ जात नाही. ते ज्या ज्या वस्तूविषयी कल्पना करितें

तीं ती मूर्त किंवा अमूर्त वस्तु निर्माण झाली आहे, असेच त्याच्या अनुभवास येते. आपल्या सत्तेच्या आधारानेच भासणाऱ्या–जीव, बुद्धि, क्रिया, स्पद, मन, द्वित्व, ऐक्य इत्यादि–सर्व भावास तें विषय करते. ह्मणजे त्याचा अनुभव घेते. पण या जीवादिकाचा भास अविद्येमुळे होतो व ती नाहींशी झाली की, ब्रह्महीं निर्विक्षेप अवस्थेत असते. ब्रह्मात्मसाक्षात्कार हेच तिच्या नाशाचे कारण आहे. त्या साक्षात्कारासच विद्या असे ह्मणतात. विद्येचा उदय होताच अविद्येचा अस्त होणे युक्तच आहे. आता निवृत्त झालेली ती आत्म्याची अविद्या ह्मणजे आत्म्याचे अज्ञान कोणत्या रूपाने रहाते ह्मणून विचारशील तर सागतो. दीप लावताच अंधकार जसा लुप्त होतो व तो दिव्याच्या प्रकाशात जाऊन मिळाला की, आणखी कोठे जाऊन राहिला हे कळत नाही, त्याप्रमाणे विद्येच्या उदयाबरोबर नाहींशी होणारी, अविद्या कोठे जाते किंवा कोणत्या रूपाने रहाते ते कळत नाहीं. साराश, ब्रह्मच जीवात्मा आहे. त्याचा नित्य अभेद आहे, ह्मणजे त्याच्यामध्ये भेद केव्हाहीं नसतो. ब्रह्म निराळे व जीवतत्त्व निराळे असे कधीही होत नाही. सर्वशक्ति, अनादि, अनत व केव्हाही बाधित न होणारी, ह्मणजे केव्हाही मिथ्या न ठरणारी, अशी एक महा चितिच आहे. चिति, चैतन्य, ब्रह्म इत्यादि सर्व त्या परम तत्त्वाचीच व्यावहारिक नावे आहेत. तें तत्त्व सर्वतः अमर्यादित आहे. "ते येथून येथपर्यंत आहे" असा त्याचा परिच्छेद करिता येत नाही. ते सर्वव्यापी आहे; त्यामुळे जगातील कोणताही भेद त्याच्या बाहेर त्यास सोडून राहू शकत नाही.

**श्रीराम**—गुरुराज, आपले हे ह्मणणे मला मान्य आहे; पण समष्टि व व्यष्टि याचे ऐक्य मानिल्यास व्यष्टि जीवाचे सकल्पादिक सत्य होऊ लागतील. कारण, त्याचे सकल्प व समष्टि जीवाचे सकल्प यामध्ये, त्यास एक मानिल्यावर, काहीं भेद उरत नाही आणि असे झाल्यास भोग व मोक्ष यांची व्यवस्था लागत नाहीं.

**श्रीवसिष्ठ**—प्रथम ब्रह्म समष्टि जीवभावास प्राप्त होतें. तो समष्टि जीव सत्यसंकल्प व सर्व शक्तिमान् असतो. जगाची व्यवस्था योग्य रीतीने लागावी अशीच त्याची इच्छा (सत्यसकल्प) असते व त्यामुळे व्यष्टि जीवभावास प्राप्त होण्यापूर्वीच या व्यष्टि जीवांनीं

मजप्रमाणे सत्यसंकल्प होऊ नये. कारण, तेही सत्यसंकल्प झाल्यास जगाची व्यवस्था करणे कठिण होईल, असा तो संकल्प करितो व त्यामुळे सर्व जीव सत्यसंकल्प होत नाहीत. ते त्या समष्टि-ईश्वराच्या अधीन राहूनच आपापले ईश्वराने नेमून दिलेले काम करीत असतात असे जर आहे, तर काही ऋषि सत्यसंकल्प होते, असे जे पुराणात वर्णन आढळते, त्याची उपपत्ति कशी लावावयाची ? ह्मणून विचारशील, तर सांगतो त्या हिरण्यगर्भाने "हा अमुक ऋषि अमुक अमुक निग्रहानुग्रह सामर्थ्याने युक्त होवो" अशी इच्छा करूनच त्यास निर्माण केलेले असल्यामुळे तेही त्याच्या इच्छेचेच फल होय तात्पर्य, जीवाची कोणतीही शक्ति, ईश्वरानुग्रहामुळेच त्यास प्राप्त झालेली असते, हे तू चांगले ध्यानात ठेव जगात जो नियम, जो सिद्धांत, जो कार्यकारणादिभाव, जी क्रिया, जे सुखादि फल किंवा जे जे ह्मणून काही प्रतिक्षणी होत आहे, ते त्या नियामक अंतर्यामीच्या सत्यसंकल्पानुरूपच होत आहे हा एक परम सिद्धांत तू ध्यानात धरिलास ह्मणजे तुला कशाचीही चिंता उरणार नाही, कोणताही भ्रम रहाणार नाही व तू-हे परम रहस्य न जाणणाऱ्या पामराप्रमाणे या सृष्टीतील कोणत्याही अवस्थेत-व्याकुल होणार नाहीस. असो, सारांश, ब्रह्म हाच महाजीव आहे. त्याला आदि नाही व अंत नाही. तोच केवळ कल्पनेने समष्टि व व्यष्टि होतो. विपर्यास जाणल्यामुळे ब्रह्मच जीव होते व संसारभ्रमणात पडते, आणि विपर्यज्ञानाच्या अभावी तेच पुनरपि आपल्या समरूपास प्राप्त होते, पण एकदा संसारात पडल्यावर पुनः समरूपास प्राप्त होणे फार कठिण आहे पुष्कळ प्रयत्नावाचून ती स्थिति प्राप्त होत नाही कर्म, उपासना व ज्ञान हे त्या प्रयत्नाचेच प्रकार आहेत. निष्काम कर्मयोगाचे अनुष्ठान केल्याने चित्त शुद्ध होते व चित्त शुद्धीच्या योगाने ज्ञानप्राप्तीची योग्यता येते आणि शेवटी ज्ञान ( आत्मसाक्षात्कार ) होऊन जीव आपल्या समस्वरूपास प्राप्त होतो अथवा कनिष्ठ जीव ज्येष्ठ जीवाची ह्मणजे हिरण्यगर्भाची उपासना करून अगोदर त्यास प्राप्त होतो व नंतर महा प्रलयसमयी त्याच्याबरोबर मुक्त होतो. असे हे मुक्तीचे दोन प्रकार आहेत. त्यातील पहिल्या प्रतीची मुक्ति साक्षात् ह्मणजे या जन्मीच प्रत्यक्ष अनुभवास येणारी असते व दुसऱ्या प्रकारची

मुक्ति, क्रममुक्ति ह्मणजे प्रथम हिरण्यगर्भाची प्राप्ति व नंतर समब्रह्माची प्राप्ति अशी क्रमाने मिळणारी असते. तांबे, लोखंड इत्यादि धातूंचे सोने करावयाचे असल्यास तेही असेच साक्षात् किंवा परंपरेच्या उपायाने करिता येते. परीसाचा स्पर्श होताच हीन धातूंचे सोने होते (असे सांगतात ) हा साक्षात् उपाय आहे व काही औषधांची योजना करून ताम्रादि धातूंस तापविल्यानेही त्याचे सोने होते, असे किमया करणारे लोक सांगतात. हा क्रमोपाय आहे. किंवा या द्विविध मुक्तीस आणखी एक प्रसिद्ध दृष्टान्त आहे पक्षी झाडावरील फलास एकदम जाऊन गांठतो व मनुष्य हळू हळू वर चढून अगोदर झाडाच्या मुख्य शाखेवर, नंतर ते फळ ज्या टाळीवर असेल त्या किंवा तिच्या जवळच्या दुसऱ्या दृढ शाखेवर सावधानपणे जातो व शेवटी मोठ्या प्रयासाने ते फळ काढतो. असो; तात्पर्य. याप्रमाणे विचार केला असता, जीव व जगत् हे दोन्ही भाव शुद्ध चैतन्याचे चमत्कार आहेत, असे कळते. अहंकारपूर्वक हे सर्व चमत्कार उद्भवतात. अहंकार चैतन्याच्या अधीन असतो व तो काल्पनिक आहे अर्थात् हे सर्व काल्पनिक चमत्कारजाल ज्याच्या अधीन राहूनच उद्भवते, तो सर्वात्माच सदा सत्य असतो, हे उघड आहे. जीव व जीवभाव प्राप्त होण्याचे कारण याचा त्याग केला ह्मणजे कल्पना करणाराच कोणी रहात नसल्यामुळे एक सन्मात्र आत्मा अवशिष्ट रहातो. मग तू, मी, हा, तो इत्यादि कोणताही व्यवहार होत नाही अविद्या, काम ( वासना ) व कर्म ही जीवभावाची निमित्ते आहेत. मेघ नाहीसे झाले असता निर्मळ आकाश जसे दिसू लागते–त्याप्रमाणे ( आत्मसाक्षात्कारसंज्ञक ) ज्ञानाच्या योगाने सर्व दृश्य, त्याची सत्ता व अविद्या काम–कर्म याचा नाश झाला असता पूर्वीच सिद्ध असलेली अधिष्ठान–सत्ता व्यक्त होते.

आता हाच सिद्धान्त अनुमानानेही कसा सिद्ध करिता येतो तो पहा. हे स्थूल–सूक्ष्म जग शून्य आहे कारण. तो सर्व चैतन्याचा चमत्कार आहे. चमत्कार ह्मणजे विलास किंवा विकार. जो ज्याचा चमत्कार असतो तो त्याच्याहून भिन्न नसतो. तरंग, बुडबुडे इत्यादि जळाचा 'चमत्कार आहे, त्यामुळे तो जळाहून भिन्न नाही. तसाच जग हा चैतन्याचा चमत्कार असल्यामुळे त्याहून निराळा नाहीं. जो

पदार्थ ज्याच्याहून निराळा नसतो, तो स्वतः शून्य असून वस्तुतः त्या पदार्थाच्या स्वरूपाचाच असतो. जलादि सावयव पदार्थांचे सावयव विकारही जर आपल्या कारणाहून भिन्न नसतात तर निरवयव चैतन्याचे विकार त्याच्याहून निराळे नसतात, हे काय सांगावे ? एवं च नाम, रूप, क्रिया, कार्य, कारण इत्यादि सर्व धर्मशून्य चैतन्यच या भ्रामक जगाचे तात्त्विक स्वरूप आहे. मन, बुद्धि, अहंकार, महाभूते, पर्वत, नद्या, समुद्र, वृक्ष, पाषाण इत्यादि अनेक प्रकारचे अनेक भिन्न पदार्थ जरी अनुभवास आले तरी ते सर्व त्या शुद्ध चैतन्याचेच विवर्त आहेत. त्या परा देवतेचेच ते धर्म आहेत. घटाच्या घटत्वाप्रमाणे, मनुष्याच्या मनुष्यत्वाप्रमाणे, ब्राह्मणाच्या ब्राह्मण्याप्रमाणे चित्चे चित्त्व केवल कल्पनेने भिन्न आहे. वस्तुतः ( चित्हून चित्त्व ) भिन्न नाही. चित्त्व हेच जग आहे. कारण चित्पणा जगास सोडून राहत नाही व जग त्यास सोडून रहात नाही जग नाहीसे झाले की चित्त्वही गेले. ह्मणजेच हा केवळ काल्पनिक भेद आहे, वास्तविक नव्हे. पण तो भ्रामक भेद असतो कसा व परिणाम, विकार इत्यादि शब्दांनी त्याचा व्यवहार होतो कसा ? ह्मणून विचारशील तर सांगतो. हा सर्व त्या परमात्म्याच्या शक्तीचा प्रभाव आहे. चैतन्याची विषयास प्रकाशित करणारी शक्तिच जीव व त्याची उपाधि ( भूततन्मात्रे ) होऊन जग या स्वरूपाने व्यक्त होते. चितीपासूनच अहंकाराचे स्फुरण होते. तेच स्पंदनकर्म करणाऱ्या प्राणाने युक्त झाले असता, जीव होते. पण इतके झाले तरी चैतन्याच्या स्वभावात काही अंतर पडत नाही. आतां कदाचित् तूं ह्मणशील की, चिच्छक्ति व स्पंदनशक्ति यामध्ये भेद असल्यामुळे अहंकार व प्राण या उपाधींनीं युक्त असलेला जीवही भिन्न आहे. पण ते बरोबर नाही. कारण चित् ही शक्ति ज्याच्यामध्ये प्रधान ( मुख्य ) आहे तो अहंकार कर्ता असतो व स्पंद ही शक्ति ज्याच्यामध्ये मुख्य आहे तो प्राण क्रिया आहे. कोणताही कर्ता आपल्या क्रियेच्या योगाने कधीही भिन्न होत नसतो. यास्तव सत्, चित् व स्पंद यांनी युक्त असलेला पुरुषच जीव होय. याचप्रमाणे चित्त, मन, इंद्रिये इत्यादिकांच्या अस्तित्वामुळेही जीवाच्या स्वरूपात काहीं भेद पडत नाही. इंद्रिये हा मनाचाच विकार आहे. ह्मणजे मनच कर्ण, नेत्र, इत्यादि गोलकांत प्रविष्ट होऊन श्रोत्र,

नेत्र इत्यादि ज्ञानेंद्रिये होत असते. साराश, येणेप्रमाणे जीव व जग हे मुख्य तत्त्वाहून पृथक् पदार्थ नाहीत. तर सर्व–विशेषशून्य चैतन्याच्या प्रकाशाचीच ही छटा आहे. कार्य, कारण इत्यादि काहीही त्याहून भिन्न नाही. ते चैतन्य अच्छेद्य, अदाह्य, अक्लेद्य, अशोष्य, नित्य, सर्वगत, निर्विकार, अचल व अप्रमेय आहे.

परंतु हे परम रहस्य ज्यास कळत नाही ते द्वैतवादी आपापल्या भ्रमानीं दुसऱ्यास भ्रमयुक्त करीत असतात व आपसात उगीच कलह करीत रहातात. आम्ही अद्वैतनिष्ठ झाल्यापासून भ्रमशून्य झालो आहो. आह्माला आता तत्त्वाविषयी सशय मुळीच राहिला नाही व त्यामुळे आह्मास त्या भ्रमिष्ठाप्रमाणे कधी कोणाशी वाद करण्याचा प्रसगही येत नाही. ज्ञानी व अज्ञानी याच्या समजुतीत जो भेद असल्यासारखा भासतो त्याचे खरे बीज असे आहे की, ज्ञानी अमूर्त तत्त्वास सत्य समजतो व मूर्त तत्त्वास असत्य समजतो आणि अज्ञानी मूर्तास सत्य मानितो व अमूर्तास असत्य समजतो. द्वैत व अद्वैत हा भेदही या असल्या भिन्न समजुतीमुळेच उद्भवतो. कारण मूर्तास जे सत्य मानितात त्यास प्रत्येक वस्तु इतर वस्तूहून पृथक् वाटते. त्यामुळे ते द्वैताचा अगीकार करितात. पण अमूर्तास सत्य समजणाऱ्या ज्ञान्यास एका अमूर्तावाचून काही भासत नाही व अमूर्त वस्तूमध्ये भेद आहे, असा अनुभव येणेही शक्य नाही. त्यामुळे ते अद्वैताचा अगीकार करितात. आम्ही मूर्तास असत्य मानून एकरस व नित्य अमूर्तास तत्त्व समजणारे अद्वैतवादी आहो. द्वैत हा आमच्या अद्वैताचाच एक प्रकार आहे. या सृष्टींत इंद्रिये, मन इत्यादि साधनाच्या द्वारा ज्ञान होणारे सर्व वस्तुजात चैतन्याच्या आधाराने असते. प्रत्येक वस्तूतील शक्ति त्या महात्म्याच्या मायासज्ञक शक्तीचाच एक भाग आहे. सत्ता हेंच त्या प्रभूचें शरीर आहे. जगाची सत्ता त्याच्या स्वरूपभूत सत्तेहून भिन्न नाही. त्याच्या सत्तेचेच हे सर्व विकार आहेत. यास्तव, बा रघुवीरा, तू आता असा निश्चय कर कीं, हे सर्व त्रिभुवन त्या महा चितीमध्यें शून्यरूप आहे व हें सर्व दृश्य त्या परम––पदमय आहे. मी एवढा वेळ जे काहीं सागितले आहे त्याचा चागला विचार करून जर तूं आपला अनुभव पहाशील तर तुला माझ्या ह्मणण्याची सत्यता कळून येईल.

असो, वसिष्ठ मुनि इतके बोलत आहेत तोच भगवान् सूर्यनारायण अस्ताचलाच्या शिखरी गेला. ते पाहून सर्व सभासदही घाईघाईनें पूज्य मर्हाप वदन करून सध्या-वदनादि नित्य कर्मे करावयास गेले व दुसऱ्या दिवशी सूर्योदय होताच सर्व अवश्य क्रिया आटोपून कथामृत प्राशनाकरिता सभास्थानी येऊन बसले १४.

येणेप्रमाणे राम व श्रीवसिष्ठ यांच्या सवादास आरभ होऊन तीन दिवस झाले.

**सर्ग १५**—पूर्वोक्त अथच दृष्टाताने श्रोत्यांच्या चित्तावर आरूढ करण्याकरिता या सर्गात विस्तृत मडपाख्यानास आरंभ करितात

**श्रीवसिष्ठ**— राघवा, चित्स्तभावर कोणी कधीही न खोदलेली अशी ही जगत्–रूपी बाहुली दिसत आहे समुद्रातील लाटाप्रमाणे हे सर्व दृश्य वस्तूंचे अनुभव परमात्म्यामध्ये भासत आहेत राई व पर्वत यामध्ये जेवढे अतर असते तेवढेच अतर सूक्ष्म व निरवयव आत्मा आणि घरात पडलेल्या उन्हाच्या कवडशात तरगणारा प्रत्येक कण यामध्ये आहे. सृष्टीत सर्वत्र पसरलेले त्रसरेणु सूर्याच्या किरणावाचून ( कवडशावाचून ) जसे दिसत नाहीत त्याप्रमाणे जगाचे भान ब्रह्मावाचून होत नाही ज्ञानहीन पुरुषास केवळ जगाचा अनुभव येत असतो, असे वाटते हे खरे, पण तो अनुभव स्वप्नातील अनुभवाप्रमाणे मिथ्या असल्यामुळे तो केवळ सकल्प ( मनोरथ, कल्पना ) होय. तात्पर्य अविवेकी पुरुषाच्या दृष्टीनेच जग व ब्रह्म या वस्तु भिन्न असतात ज्ञानी पुरुषाच्या दृष्टीने नव्हेत. ते जगत् व ब्रह्म या शब्दाचा भिन्न अर्थ समजतच नाहीत. तर मग ते त्याचे साक्षी तरी कसे होतात? ह्मणून विचारशील तर सागतो. प्रकाशामुळे वर्णरहित आकाशाच्या ठायीही भासणाऱ्या नीलवर्णाचे जसे आह्मी सर्व साक्षी होतो तशातला तो प्रकार आहे साराश या सृष्टीतील एकही वस्तु खरोखर उत्पन्न झालेली नाही हे सर्व दृश्य ब्रह्ममय आहे. आता हाच सिद्धात दृढ व्हावा व तुजप्रमाणेच इतर अधिकाऱ्यासही सहज बोध व्हावा ह्मणून मी हे मडपाख्यान तुला सागतो.

पूर्वी या भूमडळी पद्म नामक एक श्रीमान् व विवेकी राजा होऊन गेला. तो धन, धान्य, पुत्र, पौत्र इत्यादि सर्व ऐहिक

मुखसाधनानी सपन्न होता. तरी पण त्याने शास्त्र व वर्णाश्रमधर्म याची मर्यादा कधीही उल्लघिली नाही. शत्रुरूपी अधकाराचा तर तो प्रखर सूर्यच होता. त्याच्यामध्ये एकादा क्षुद्र दोपही नव्हता. तो देवानाही मोठे सहाय करीत असे. या भूलोकी तर त्याची कीर्ति सर्वत्र पसरली होती. तो मोठा गुणग्राही असून आपल्या मनास व इद्रियास त्याने स्वाधीन ठेविले होते. त्याला वेदविद्येप्रमाणेच इतर सर्व विद्याही अतिशय आवडत असत. सर्व चमत्कारिक गुण त्याच्या ठिकाणी होते. देवशत्रु राक्षसाचा तर तो मूर्तिमान् काळ होता. तो मोठा विलासी, सौभाग्यसपन्न, सौजन्याने परिपूर्ण व उत्साही असे. त्याच्याप्रमाणेच त्याची लीलानामक भार्या सर्व स्त्रीगुणसपन्न असे. त्या पतिव्रतेच्या गुणाचे तर वर्णनच करवत नाही. तिचे ते सौदर्य, तिचे ते मनोहर भापण, तिचे ते पतिप्रेम, तिचा तो पूज्यभाव, तिची ती आनदी वृत्ति व धर्मावरील प्रेम ही सर्वच अलौकिक होती. ती साध्वी सतत आपल्या पतीच्या सेवेत निमग्न असे खरोखर त्या जोडप्यास पाहून रतिमदनाचीच आठवण होत असे. पति उद्विग्न आहे असे पाहताच तिचे चित्त उद्विग्न होत असे, त्याची आनदी वृत्ति पाहून ही मनात आनदित होई व तो शारीरिक पीडेने व्याकुल झाला असता तीहि व्याकुळ होई. साराश त्या उभयताची वृत्ति बिब–प्रतिबिबाप्रमाणे होती १९

**सर्ग १६, १७**—विपयोपभोगाने तृप्ति होत नाही तर ते जसे जसे अधिक भोगावे तशी तशी अतृप्ति वाढत जाते त्यामुळे अतिशय दु ख भोगावे लागते व त्याचा प्रतीकार कोणालाही करिता येत नाही. तसेच लीलेचे तप, राजाचा मृत्यु व स्वप्नदर्शन याचे येथे वर्णन केले आहे

**श्रीवसिष्ठ**—राघवा, भूलोकची जणु काय अप्सराच अशा त्या लीलेबरोबर त्या राजाने वने, उपवने, जलमदिरे, लतामडप, पर्वत, नदी-तीर, गुहागृहे, सरोवरे, लतागृहातील पुष्प–पल्लवादि शय्या इत्यादि निर-निराळ्या प्रदेशी नानाप्रकारचे विलास केले. या जगातील एकही भोग व एकही भोगसाधन त्याने उपभोग घेतल्यावाचून ठेविले नाही नृत्य, गायन, खान, पान, क्रीडा, विलास, विद्या, शास्त्रे, इत्यादि सर्वाचा त्याने यथेच्छ आस्वाद घेतला. त्यामुळे आसक्ति वाढली. विपयोपभोगावाचून त्यास काही सुचेनासे झाले. तो विपयाचा व आपल्या विचित्र इच्छाचा

दास झाला. अति विषयासक्तीमुळे त्याचा विवेक व पूर्वीचे गुण हळु हळु क्षीण होऊ लागले. त्याचे स्थान दोष भरून काढूं लागले व तो सतत अतृप्त असल्याचा भास होऊ लागला. त्याच्या वृत्तीवर घडलेला हा परिणाम त्याच्या प्राणप्रियेच्या ध्यानात आला. त्याबरोबर तिचे मन खिन्न झाले व ती असा विचार करू लागली की, हा माझा प्राणाहूनही प्रिय असलेला पति आज सार्वभौम राजा आहे, तरुण आहे, श्रीमान् व सामर्थ्यवान् आहे आणि त्याची आज्ञा भूमीवरील सर्व प्राणी शिरसा मान्य करीत आहेत, हे खरे, पण याची ही अवस्था सतत अशीच राहील की, पुढे तिचा ह्रास होणार आहे? पुष्कळ वेळ विचार केल्यावर तिच्या ध्यानात आले की, मृत्यूचे उल्लंघन कोणालाही करिता येत नाही. या सृष्टीतील प्रत्येक वस्तु मृत्यूच्या जणु काय विस्तृत मुखातच पडलेली आहे. त्रिभुवनात असा एकही प्राणी नाही की, जो या मृत्यूस प्रतिबंध करील. ही परम सत्य गोष्ट तिच्या मनात येताच ती दीन व खिन्न झाली. माझा हा सुंदर व सामर्थ्यवान पति मृत्यूच्या दाढेतून कसा सुटेल? तो अजरामर कसा होईल? त्याच्या बरोबर मला असाच दीर्घ काल विलास करावयास कसा सापडेल? ही चिंता तिला लागली. जप तप, दाने इत्यादिकांच्या योगाने मृत्यूस जिंकलेच पाहिजे. त्यावाचून आपणास दीर्घ काल सुख भोगावयास सापडणार नाही, असा तिच्या मनाचा ग्रह झाला तिने ज्ञानवृद्ध, तपोवृद्ध व विद्यावृद्ध ब्राह्मणास आपल्या भव्य वसति-स्थानी बोलावून आणविले. त्याची मोठ्या सत्काराने पूजा केली व त्यास संतुष्ट करून ती मोठ्या विनयाने ह्मणाली, "अहो भूदेव, मनुष्ये अमर कशी होतील? माझी इच्छा आहे की, सर्व मनुष्यांनी दीर्घ प्रयत्न करून या घातक मरणास जिंकावे. कारण या मृत्यूमुळेच जगात किती अनर्थ होत आहेत, हे तुह्मास विदित आहेच. एकादे अति कठिण तप किंवा जप अथवा एकादा यज्ञ असल्यास मला सांगा, ह्मणजे मी त्याचे अनुष्ठान करून मृत्यूस जिंकीन."

हे तिचें अश्रुतपूर्व भाषण ऐकून सर्व विद्वान् ब्राह्मण चकित झाले. त्यातील कित्येकास तर या वेड्या बाईला आता काय उत्तर द्यावे तेच समजेना! पण त्यात जे कित्येक धीर व तत्त्वज्ञ होते ते

ह्मणाले–राज्ञि, तप, जप, यम, नियम इत्यादिकाच्या योगाने इतर सर्व सिद्धि प्राप्त होतात, पण अमरत्व प्राप्त होत नाही. शास्त्रात असा एकही उपाय सांगितलेला नाही कीं, ज्याच्या योगाने उत्पन्न झालेली वस्तु नाश पावणार नाही. शिवाय साकार वस्तु मृत्युमुखात पडणार नाही, असे होईल तरी कसे ?

हे त्याचे निराशेचे उत्तर ऐकून खिन्न झालेल्या त्या राणीने दक्षिणादि देऊन ब्राह्मणाचे विसर्जन केले व आपल्या समजुतीप्रमाणेच पति–वियोगास भिणाऱ्या तिनें असा विचार केला माझ्या या प्रिय पतीच्या डोळ्या देखतच जर मला मरण आले तर बरेच झालें. कारण मी परलोकी गेल्यावर मागे त्याचे काही जरी झाले तरी त्यामुळे मला तेथें दु ख भोगावें लागणार नाही. कारण परलोकी गेल्यावर या जन्माचे स्मरण रहात नाहीं, असे शास्त्रात सांगितले आहे व या जन्मी ज्याअर्थी आह्मास पूर्व जन्माचे व त्यातील आप्तजनाचे स्मरण नाहीं त्या अर्थी ते अगदी सत्य आहे, असेही स्वानुभवावरून ठरते. पण दैव-वशात् असे न होता जर विपरीत प्रकार घडला ह्मणजे माझ्या देखत माझा पति परलोकी गेला तर त्याचा जीव या गृहातून बाहेर जाऊ नये, अशी काहीं युक्ति मी योजून ठेवीन. ह्मणजे तो या अत:पुरातच कोठे तरी असेल व मी सतत त्याच्या दृष्टीं पडेन. मला पाहिल्यावर त्याला अतिशय आनद होईल व त्याचा आनद तोच माझा आनद असल्यामुळे मीही सुखी होईन. असो; तर आता आजच या कृत्यास आरभ केला पाहिजे. जप, उप-वास व नियम याच्या योगाने मी अगोदर देवी सरस्वतीस प्रसन्न करून घेते, असा निश्चय करून ती श्रेष्ठ व साध्वी स्त्री पति कदाचित् अनु-मोदन देणार नाही या भीतीनें त्याला न कळविताच व्रतास आरभ करिती झाली. हे व्रत पतीच्या हिताकरिताच तिने आरभिलें असल्यामुळें "पतीच्या आज्ञेवाचून व्रताचरणादि केल्यास स्त्री महा दोषी होते" या धर्मशास्त्रोक्त प्रत्यवायास ती पात्र होत नाही. कारण धर्मशास्त्रातच तसे स्पष्ट ह्मटले आहे

असो; तिनें ते उग्र व्रत यथाशास्त्र चालविले. तिनें आपला शुद्ध आचार व नियम याचें दृढ संकल्पाने पालन केलें. तीन दिवस उपवास करून चवथ्या दिवशीं ती पारणें सोडीत असे. देव, ब्राह्मण, गुरु व

विद्वान् यांच्या पूजनात ती तत्पर असे. स्नान दान, तप, ध्यान इत्यादिकांमध्ये ती सतत उद्युक्त राही शास्त्रात सांगितल्याप्रमाणे उपवासादि अनुष्ठानाचे फल मिळालेच पाहिजे, असा तिचा दृढ विश्वास असे. त्यामुळे व्रतानुष्ठान-समयी होणारे क्लेश ती आनंदाने सहन करी इकडे ती शहाणी स्त्री यथाकाल, यथाशास्त्र व यथाक्रम आपल्या पतीसही प्रसन्न करीत असे आपला उद्योग त्याला कळू नये अशीही तिने व्यवस्था केली होती.

असो, याप्रमाणे त्या सुकुमार राणीने तीनशे दिवस एकसारखे कष्टकर अनुष्ठान केले दहा महिने एकसारिखी अशी कडकडीत उपासना केल्यावर त्या भगवतीस तिची दया आली व ती सरस्वती देवी तिच्या सन्मुख प्रकट होऊन तिला ह्मणाली, " वत्से, मी तुझ्या या निरंतर तपाने व पतिप्रेमाने संतुष्ट झाले आहे तुला जो वर पाहिजे असेल तो माग " हे ऐकून ती राज्ञी ह्मणाली-" जन्म, जरा, मरण इत्यादि दोषांचे निवारण करणारे देवि, तुझा जयजयकार असो. प्राण्यांच्या हृदयातील अंधकारास आपल्या अनुपम प्रभेने नष्ट करणारे माते, तुझा विजय असो हे अंबे, अगे जननि, त्रिभुवनास जन्म देणारे आई, या दीन दासीचे रक्षण कर. मला हे दोन वर दे एक माझ्या पतीस माझ्या जिवंतपणी मरण आल्यास त्याचा जीव या माझ्या अंतःपुराच्या मंडपाबाहेर जाऊ नये व दुसरा, हे अंबे, मी एकांतसमयी जेव्हा जेव्हा तुझे स्मरण करीन तेव्हा तू मला दर्शन दे " हे तिचे ह्मणणे ऐकून घेऊन ती जगन्माता "तथास्तु" असे ह्मणून समुद्रातील मोठ्या लाटेप्रमाणे गुप्त झाली.

इकडे इष्ट वर मिळाल्याकारणाने त्या लीलाराणीच्या आनंदास पारावार नाहीसा झाला पुढे पुष्कळ दिवसांनी तो विषयी राजा मरण पावला त्यामुळे तिला अतिशय दुःख झाले. प्रिय पतीच्या मरणासारखी साध्वी स्त्रीला दुसरी कोणतीही आपत्ति असह्य वाटत नाही ती सुंदरी मरणोन्मुख होऊन पडली. तिला देहभान नाहीसे झाले. राजाची प्राणचेष्टा होत नाही, असे पहाताच त्या भीरूची एका क्षणात अशी अवस्था झाली आहे, हे पाहून, तेथील सेवकवर्ग अतिशय भिऊन गेला. आपल्या स्वामीच्या जीविताबरोबर ह्या आपल्या गुणी स्वामिनीचाही अस्त होतो की काय ? अशी त्यास शंका आली. पण

इतक्यात त्या अतिशय विह्वल झालेल्या लीलेच्या अनेक जन्मार्जित पुण्य-परिपाकामुळे आकाशवाणी झाली सरोवर सुकून जाऊन त्यातील मीन अगदीं मरावयास टेकले असता एकाएकी जशी वृष्टि व्हावी तसाच सरस्वतीच्या या दयापूर्ण आकाश वाणीचा अकल्पित लाभ झाला. सरस्वती ह्मणते–वत्से, या आपल्या पतीच्या प्रेतास तू पुष्पाच्या ढिगात आच्छादित करून ठेव. त्या ढिगातील पुष्पे सुकणार नाहीत व याचा देहही कुजून नष्ट होणार नाही. पुन लवकरच हा तुझा पति होईल. आकाशासारिखा स्वच्छ असलेला याचा जीव या अत पुर–मडपातून बाहेर जाणार नाही.

ही अपूर्व वाणी ऐकून तेथे असलेले लीलेचे सर्व आप्तम-बधी स्त्रीपुरुप चकित झाले त्यानीं तिचे समाधान केले व त्या वाणीवर विश्वास ठेवून तिच्या सागण्याप्रमाणे करावयास सागितले. तेव्हा लीलेनेही पुष्पाचा मोठा ढीग करून त्यात आपल्या पतीचे शव पुष्पाच्छादित करून ठेविले, आणि काहीसे समाधान मानून ती राहिली पण तिचे चित्त तिला स्वास्थ्याचा अनुभव घेऊ देईना पूर्वी मोठी श्रीमती असून पुढे दारिद्र्य आले असता जशी एकादीची अवस्था होते तशी तिची दशा झाली. तो दिवस कसाबसा गेला पण रात्री तिला झोप येईना जलरहित शफरीप्रमाणे ती तळमळूं लागली शेवटी मध्यरात्रीच्या सुमारास अत:-पुरातील सर्व सेवकवर्ग स्वस्थ झोप घेत आहे, असे पाहून त्या परम पुण्यवतीने शुद्ध ध्यानाच्या योगाने ज्ञप्तिसज्ञक सरस्वती देवीचे ध्यान केले. त्याबरोबर ती जगन्माता तिच्या पुढे येऊन ह्मणाली– वत्से, तू माझे स्मरण का केलेस ? तू दु:खीकष्टी का होत आहेस ? या ससार-भ्राती मृगजळाप्रमाणे व्यर्थ भासत असतात.

**लीला**—माझा पति कोठे आहे ? तो काय करीत आहे व कसा आहे ? मला त्याच्या जवळ ने. त्याच्यावाचून मी एकटी जीवत राहण्यास समर्थ नाही.

**श्रीदेवी**—चित्ताकाश, चिदाकाश व सर्व प्राण्यास दिसणारे हे पोकळ महाकाश अशी तीन आकाशे आहेत. पण त्यातील चिदाकाश या दुसऱ्या दोन्ही आकाशावाचून असते. वासनामय शरीरास चित्ताकाश ह्मणतात. चित्ताकाश व महाकाश चिदा-

काशाच्या आधाराने रहातात. पण चिदाकाश त्याच्या वाचूनच राहण्यास समर्थ आहे, इतकेच नव्हे, तर ते ती दोन्ही नसतात तेव्हाच शुद्ध असते व त्या अवस्थेतच त्याचा स्पष्ट अनुभव येतो. तेंच तुझ्या पतीचे रहाण्याचे स्थान आहे. तो तेथे गेला आहे व त्याच्या रूपानेच राहिला आहे. वस्तुत. त्याचे स्वरूप पृथक् नाही पण केवळ भावनेने तें पृथक् आहे, असे वाटते. त्या चिदाकाशाचा तुला अनुभव कसा येईल, ते सागते. तुझे वृत्तिज्ञान एका पदार्थास सोडून दुसऱ्या पदार्थाकडे जाऊं लागले असता मध्ये जो थोडासा काल जातो ह्मणजे पूर्व पदार्थाचा सकल्प सोडल्यापासून पुढच्या पदार्थाचा सकल्प करीपर्यत जी अवस्था असते त्यात त्या चिदाकाशाचा चागला अनुभव येतो. त्या सर्व विशेष-रहित व सर्व सकल्पशून्य वस्तूजवळ जर तू गेलीस तर तुझ्या पतीचें वसति-स्थान तुला सापडेल त्या वेळी तू सर्वात्मक पदास अथवा परम तत्त्वासच पोचशील, यात सशय नाही तत्त्वदर्शनामुळे अविद्येचा क्षय होऊन द्वताचे भान नाहीसे होणे, याला जगत्-अत्यताभावसपत्ति ह्मणतात. त्या अत्यताभाव-सपत्तीच्या योगानेच त्याची प्राप्ति होते. दुसऱ्या कोण-त्याही उपायाने होत नाही. हे सुदरि, माझ्या वरामुळे तू त्या पदास निर्विघ्नपणे प्राप्त होशील.

**श्रीवसिष्ठ**—असे सागून ती ज्ञप्तिदेवी आपल्या दिव्यस्थानी गेली व लीलाही वरप्रभावामुळे फारसा अभ्यास न करिताच निर्विकल्प समाधि लावून बसली. समाधीचा लाभ होताच तिचा देहाभिमान सुटला. घरट्यातून निघालेली चिमणी जशी अतरिक्षात भुर्कन उडून जाते त्या-प्रमाणे ती अतःकरण व देहपजर यास सोडून चिदाकाशात शिरली. त्याच आकाशात वासना-कर्मानुरूप देह, गृह, राजसमूह इत्यादिकानीं युक्त असलेल्या आपल्या पतीस तिने पाहिले. तो त्या वेळी सिहासनावर बसला होता. “ जय जीव, ” असें ह्मणून बदिजन त्याची स्तुति करीत होते. मांडलिक राजे व सैन्यातील मुख्य वीर यास बोलावून आणून उपस्थित कार्य कसे सपादन करावे याचा तो विचार करीत होता. अनेक ध्वजानीं सुशोभित केलेल्या राजधानीत मुख्य राजगृहामध्यें तो त्या वेळीं होता. त्या राजगृहाच्या पूर्व द्वारावर अनेक मुनि व ब्राह्मण याचे थवेच्या थवे उभे होते. दक्षिण द्वारीं अनेक

राजाचा समूह तिष्ठत उभा होता. पश्चिमद्वाराबाहेर असख्य कलाकुशल स्त्रिया वाट पहात होत्या व उत्तरद्वाराच्या बाहेर असख्य हत्ती, घोडे, रथ इत्यादिकाची एकच गर्दी होऊन राहिली होती. त्या राजाने एका मान्य सेवकाच्या सागण्यावरून दक्षिणापथी युद्ध करण्याचा निश्चय केला. सर्व राजे त्याच्या अधीन असल्यामुळे त्यानी त्याच्या इच्छेप्रमाणे सर्व व्यवस्था केली. कर्णाटनाथाने पूर्व देशाची मर्यादा स्थापिली, सुराष्ट् देशाच्या स्वामीने म्लेच्छान्या उत्तरापथास आपल्या स्वाधीन करून घेतले, व मालव देशच्या राजाने पश्चिमेतील तगण प्रदेशस्थ सर्व लोकास व्यापिले. चारी दिशातील समुद्राच्या तीरापर्यंत जाऊन आलेले दूत तेथील नाना प्रकारचे चमत्कार सागून त्याचे मनोरजन करीत होते. ओळीने उभे राहिलेले असख्य राजे त्याच्या सभागृहास आपल्या कातीने सुशोभित करीत होते. यज्ञमडपात ब्राह्मण वेदघोष करीत होते. त्याच्या ध्वनीपुढे वाद्याचा ध्वनीही तुच्छ झाला होता. स्तुतिपाठकाच्या कोलाहलाने दिशा दुमदुमून गेल्या. गायन, वादन, नृत्य इत्यादिकाचा ध्वनि आकाशास व्यापून टाकीत होता. त्या राजगृहात पुष्पे, कर्पूर, धूप, अगुरु, चदन, इत्यादिकाचा सुवास पसरला होता. त्या भाग्यवान् राजाचे अनेक सेवक अनेक देशातून आलेल्या भेटी राजवाड्यात व्यवस्थेने माडून ठेवीत होते. त्याचे माडलिक अनेक कार्यांमध्ये व्यग्र होते व त्याने अनेक शिल्पशास्त्रज्ञाकडून जी अनेक उत्तम उत्तम नगरे निर्माण करविणेस आरंभ केला होता त्याचाही तेथे विचार चालला होता. साराश येणेप्रमाणे एका भव्य नगरातील भव्य राजगृहात तो आपला पति अनेक कार्यामध्ये आसक्त झाला आहे, असे तिच्या दृष्टी पडले. तेव्हा ती वासनारूपी लीला त्या वासनारूपी राजगृहात शिरली. ती केवळ सकल्पमय लीला त्या सभेत चोहोकडे फिरत होती. पण कामी पुरुषानी आपल्या सकल्पाने निर्मिलेली स्त्री जशी त्यास दिसत नाहीं त्याप्रमाणे ती कोणाच्या दृष्टीं पडली नाही. एकाच्या मनातील सकल्प जसा दुसऱ्यास कळत नाही तसाच तिचा देह त्या सभेतील एकालाही दिसला नाही. ती मात्र प्रत्येकाच्या अगदी समीप जाऊन त्यास पहात असे. पण जवळ जाऊन पाहतांच तिला ते सर्व पूर्वीचेच लोक दिसले. राजा, त्याचे साचिव, सेनापति, माडलिक, न्यायाधीश, विद्वान् ब्राह्मण, सेवक इत्यादि ते सर्व पूर्वी-

चेच होते. त्याची भाषा, वेष, योग्यता, इत्यादि कशातही काडीइतके सुद्धा अंतर नव्हते. काही काही स्थळी तिला पूर्वी न पाहिलेल्या वस्तूंचे व प्राण्यांचेही दर्शन झाले.

तो सर्व चमत्कार पाहून तिला वाटले की, आपल्या नगरातील सर्वच लोक मेले की काय? ही शंका येताच तिला त्या नव्या नगरात राहावेसे वाटेना. ती त्या ज्ञप्तीच्या कृपेने लागलीच आपल्या अंतःपुरात आली. ह्मणजे समाधि सोडून देहभानावर आली. तो तिला तें पूर्वीप्रमाणेच सुरक्षित आहे, असे दिसले. आपले सर्व सेवक स्वस्थ झोप घेत आहेत, पुष्पाच्या राशीमध्ये पतीचे शव जसेच्या तसेच आहे; वाड्या बाहेर रक्षकगण नगराचे व राजगृहाचे नेहमीप्रमाणेच संरक्षण करीत आहेत व श्वानादि पशू मधून मधून ओरडत आहेत, असा तिला अनुभव आला. तेव्हा तिने आपल्या सख्यास जागे केले, व ह्मटले–सख्यांनो, मला अतिशय दुःख होत आहे. यास्तव आपण राजसभेत जाऊ चला. मी या माझ्या स्वामीच्या सिंहासनाच्या एका बाजूस बसून सर्व सभासदास एकदा आपल्या डोळ्यांनी पाहते, ह्मणजे माझें दुःख जरा कमी होईल. सभेतील पूर्वीच्या सर्व लोकास पाहिल्यावाचून मी जीवत राहू शकणार नाही. हे तिचे भाषण ऐकून सख्यानी अंतःपुरातील सर्व सेवकास उठविले व त्या राणीची इच्छा त्यास कळविली. त्याबरोबर नगरातील सर्व सभासदास बोलावून आणण्याकरिता भालदार व चोपदार नगरात गेले. इतर सेवकांनी सभास्थान झाडून व धुवून निर्मळ केले. चोहोकडे दीप लाविले. त्या बरोबर अंधकार कोठे पळून गेला त्याचा पत्ताही लागेना. इतक्यात राणीची इच्छा ऐकून सर्व पौरजन सभास्थानी आले. ते सभास्थान लोकांच्या समूहांनी भरून गेले. त्यावेळी रात्र असल्यामुळे अंतरिक्षात अनेक लहान-मोठी नक्षत्रे चमकत होती. त्याच्याकडे पहाणारास असे वाटे की, हा चमत्कार पहाण्याकरिताच ती आली आहेत. सभासद आपल्या स्थानी आरूढ झाले; शुभ्र वस्त्रे परिधान करणारे द्वारपाल द्वारात उभे राहिले व चोहोंकडून सिंहासनावर पुष्पवृष्टि सुरू झाली. त्यानंतर मुख्य सिंहासनाच्या जवळच असलेल्या सुवर्णाच्या चित्रविचित्र व नूतन आसनावर लीला बसली. पूर्वीचे सर्व राजे व सर्व पौरजन तिच्या दृष्टी पडले. राजाच्या सभेंत जे

जे गुरु, श्रेष्ठ ब्राह्मण, मित्र, आप्त, सबधी इत्यादि येत होते ते सर्व तिला नेहमीप्रमाणेच त्या सभेत दिसले. तेव्हा पूर्वीप्रमाणेच ते सर्व सभास्थान गजबजलेले पाहून लीलेला परम आनद झाला. राजाप्रमाणे आपले सर्व राष्ट्रच मृत झाले की काय? अशी जी तिला शका आली होती ती निवृत्त झाली, व त्यामुळे तिच्या मुखावर समाधानाची छाया पसरली १६, १७.

**सर्ग** १८—समाधीत पाहिलेली सृष्टि व आता जाग्रतीत पाहिलेला सृष्टि या दोन्हा सारख्याच मिथ्या आहेत पण त्यास पाहणारी चैतन्य–शक्ति सत्य आहे, असे या सर्गात सागतात

**श्रीवसिष्ठ**—'माझ्या या दु खी चित्तास सभादर्शनाने तरी थोडेसे समाधान वाटले तर पहावे, ह्मणून मी तुह्मास बोलाविले. तरी त्याचा तुह्मी त्रास मानू नये,' असे नम्रपणे सुचवून लीलेने सभेचे विसर्जन केले. ती पुन आपल्या अत:पुरात गेली व पुष्पामध्ये ठेविलेल्या आपल्या पतीच्या शवाजवळ बसून मनातल्या मनात असा विचार करू लागली अरे भगवाना, काय ही तुझी विचित्र माया आहे? हे आमचे नगरवासी जन चिदाकाशातही मला दिसले व या आमच्या नगरातही दिसत आहेत. सभा, नगरातील गृहे, वृक्ष, वने, उपवने, पशु, पक्षी, दास, दासी, इत्यादि जे जे येथे आहे ते ते सर्व व थोडेसे त्याहून अधिकही मला तेथे दिसले. पण यातील खरे कोणते व खोटे कोणते? आरशात दिसणारे मुख खरे की, आरशाच्या बाहेर असलेले मुख खरे? मला तर हे गौडबगाल समजत नाही आता याचा निर्णय माझ्यावर दया करणाऱ्या देवीला मी विचारिते.' असा निश्चय करून तिने ज्ञप्ति देवीचे मानसिक पूजन केले. त्याबरोबर ती देवी कुमारीचे रूप धारण करून तिच्या समोर येऊन उभी राहिली. तिचे साक्षात् दर्शन होताच लीला आदराने उठली व तिच्या चरणावर मस्तक ठेवून तिने तिला भद्रासनावर बसविले व आपण तिच्यापुढे भूमीवर बसली. थोडा वेळ गेल्यावर लीला हात जोडून तिला ह्मणाली—माते, उत्तम जन दया करण्यास योग्य असलेल्या अज्ञ बालकाचे सर्व अपराध विसरत असतात. तूच सृष्टीच्या आरभी ही मर्यादा करून ठेविली आहेस. ह्मणून वारंवार अपराध करणाऱ्या या आपल्या दीन पुत्रीचे अपराध विसरून तूं दया कर. मी काही विचारिते ते साग.

तुझ्या कृपेवाचून माझे मनोरथ सफल होणार नाहीत. चिदाकाशात गेल्यावर मला एक भूताकाशाहून अति निर्मल, अखंड, एकाकार, अनिर्वचनीय, मर्यादाशून्य व निर्विकल्प ज्योति दिसली. तो जणु काय या जगास पहाण्याचा आरसाच होता, असें मला वाटते. कारण सृष्टीतील सर्व वस्तु व कालादि सर्व भाव त्यात प्रतिबिंबित झाल्यासारखे दिसत होते. या त्रिभुवनाची सर्व शोभा मला त्या माझ्या चिदाकाशातही दिसली व आता बाहेरही दिसत आहे. हे प्रतिबिंब आतही आहे व बाहेरही आहे. पण यातील खरे कोणते व खोटे कोणत ? बाहेर दिसणाऱ्या त्रिभुवनास कृत्रिम समजावयाचे की आतल्या ? कीं दोन्ही अकृत्रिम आहेत ?

**श्रीदेवि**—मुलि, तू कृत्रिम व अकृत्रिम कशास ह्मणतेस ? ह्मणजे कृत्रिम या शब्दाचा अर्थ तू काय समजतेस व अकृत्रिम या शब्दाचा काय समजतेस ? ते अगोदर मला सांग.

**लीला**—मी येथे बसले आहे व तूं देवी आसनावर बसली आहेस. हें खरें आहे. हा अकृत्रिम सर्ग आहे, असें मी समजते. कारण आह्मा उभयतास बसण्यास, बोलण्यास, उठण्यास व जाण्यास योग्य काल, योग्य देश इत्यादि येथे आहे. पण ज्या अवस्थेत मी आपल्या पतीस पाहिले ती अवस्था कृत्रिम आहे. कारण त्या अवस्थेचें स्थान अल्पहृदय असल्यामुळे त्यात दिसलेले ते सर्व पदार्थ तेथे रहाणें शक्य नाही व त्यास रहाण्यास उचित स्थान व काल नसल्यामुळें तो कृत्रिम सर्ग आहे. लहानशा आरशीत मोठा पर्वत दिसतो. पण तो पर्वत त्यात रहाणे अशक्य असल्यामुळे व्यवहारात त्या आरशातील पर्वतास काल्पनिक, मिथ्या, कृत्रिम भ्रामक, असत् इत्यादि ह्मणत असतात. तशातला हा प्रकार आहे, असें मी समजते.

**श्रीदेवी**—तुझ्या भर्त्याचा सर्ग ( सृष्टि ) सहेतुक आहे कीं निर्हेतुक आहे. ह्मणजे त्याच्या उत्पत्तीचे काही कारण आहे की, तो कारणावाचूनच उत्पन्न झाला आहे ? कारणावाचूनच उत्पन्न झाला, असे ह्मणता येत नाही. कारण कोणतीही उत्पत्ति ( कार्य ) कारणावाचून होत नसते. यास्तव तुझ्या भर्त्याच्या कृत्रिम सर्गाचेही काहीं कारण असलेच पाहिजे. पण तें कारण कृत्रिम आहे कीं अकृत्रिम ? अकृत्रिम आहे, असे तुला ह्मणतां येणार

नाहीं. कारणं अकृत्रिम ( सत्य ) कारणापासून कृत्रिम कार्य होणें शक्य नाही. कारण, कार्य-कारणांमध्ये सादृश्यच असावे लागते. ह्मणजे कारणाहून कार्य विलक्षण नसतें. तर तें कारणसलक्षणच उत्पन्न होते, असा नियम आहे.

**लीला**—पण जननि, कारणाहून कार्य विलक्षण असते, असाही अनुभव येतो. केवळ माती पाण्यास धारण करू शकत नाही. पण तिचे कार्य जो घट ( घागर ) त्यात पाणी ठेविता येते व तोही त्यास आपल्यामध्ये हवे तितके दिवस धारण करू शकतो.

**देवी**—खरे आहे. उपादान कारणामध्ये किंवा सहकारी कारणामध्ये विलक्षणता असल्यास तदनुरूप कार्यामध्येही विचित्रता दिसते; पण ‘ कार्य-कारणामध्ये विचित्रता नसते ’ ह्मणून जे मी वर ह्मटले आहे ते समान (सलक्षण, अविलक्षण) उपादान कारणाच्या कार्यास अनुलक्षून ह्मटले आहे. एका दिव्यावर लाविलेले दुसरे अनेक दिवे आपल्या कारणाहून विलक्षण नसतात. तू वर ज्या सर्गाचा निर्देश केला आहेस तोही या दिव्याच्या दृष्टांताप्रमाणेच समान उपादान कारणापासून उद्भवलेला आहे. ह्मणजे तुझ्या पतीचा सर्ग या अवस्थेतील सर्गाचे कार्य आहे. तो कृत्रिम आहे, असे तूच ह्मणतेस. तेव्हा त्याचे कारण जो हा सर्ग तोही त्याच्या प्रमाणेच ह्मणजे कृत्रिमच असला पाहिजे. पण तू कदाचित् ह्मणशील की—असे नाही. माझ्या पतीच्या सर्गाहून हा सर्ग विलक्षण आहे.—पण ते बरोबर नाहीं. कारण त्या दोन्ही सर्गाचे कारण माया, काम व कर्मवासना हे एकच आहे. अर्थात् तें विलक्षण नाहीं, असें मी समजतें. पण तुला जर ते पटत नसेल तर मला सांग पाहूं की, या सर्गातील पृथ्वी, जल, वृक्ष, पाषाण इत्यादिकातील कोणती वस्तु तुझ्या भर्त्याच्या सर्गातील पृथ्व्यादिकाचे कारण आहे? कोणतीच नाहीं. जर आहे ह्मणून ह्मणावे तर या सृष्टीतील पृथ्वी उठून त्या सृष्टींत गेल्यावर ही सृष्टि पृथ्वीरहित झाल्यावाचून कशी राहील? बरे येथील पृथ्वी येथें राहूनच त्या पृथ्वीचें कारण होते ह्मणून ह्मणावे तर एका अवस्थेतील वस्तु दुसऱ्या अवस्थेत न जाता तेथील कार्याचें कारण कशी होईल? तस्मात् वस्तुतः येथील सहकारी कारणांच्या अभावीही कार्याच्या उत्पत्तीकरिता सामग्रीलक्षण सहकारिता अवश्य कल्पावी लागते व ती पूर्वसर्गाचें

कारण जे काम-कर्मवासना व अविद्या त्याहून भिन्न नसते. अर्थात् तुझ्या पतीच्या सर्गाचे मुख्य कारण, मृत्तिका व घट याच्याप्रमाणे विचित्र नाही. तर दीपाप्रमाणे सलक्षणच आहे.

**लीला**—देवि, मला असे वाटते की, माझ्या पतीचा सर्ग ही केवळ स्मृति आहे. ती या सत्य सर्गाच्या अनुभवापासून उत्पन्न झालेल्या संस्काराच्या योगाने झाली असावी. कारण कोणतीही स्मृति अनुभवजन्य संस्कारामुळेंच होत असते. मला या सत्य सर्गाचा अनुभव पूर्वीच आलेला होता. त्या अनुभवाचे सूक्ष्म संस्कार चित्तात राहून मिथ्या स्वप्नाप्रमाणे त्याचे स्मरणामध्ये पर्यवसान झालेले असावे आणि त्यामुळे हा सत्य सर्ग त्या असत्य सर्गाचें कारण नसून सत्य सर्गाची स्मृति त्याचे कारण आहे, असे मी समजते.

**श्रीदेवी**—पण असे जरी ह्मटले तरी हा सर्ग सत्य ठरत नाही कारण पूर्वदृष्ट सर्गाच्या अनुभवामुळे तो मिथ्या सर्ग स्मृतिरूपाने भासला, असे मानल्यास हा सर्गही अवश्य मिथ्या ठरतो. स्मरणकाली विषय पुढे नसतो. यास्तव स्मृति आकाशरूप आहे, असे ह्मणावे लागते, हे तुलाही मान्य आहे. ह्मणूनच तू भर्त्याच्या सर्गाला कृत्रिम व स्मृतिरूप ह्मणत आहेस पण यावर मी आणखी असे ह्मणते की, केवल तोच स्मृतिरूप आहे, असे नाही. तर त्याच्या स्मृतीस कारण होणारा हा पूर्वसर्गही तसाच मिथ्या किंवा स्मृतिरूप आहे. कारण हा सुद्धा त्या मिथ्यासर्गाप्रमाणेच पूर्वीच्या अनुभवामुळे तुला यावेळी भासत आहे. कारण तू ज्याला हा ह्मणून यावेळी ह्मणत आहेस तो सर्ग तरी तुझ्या पुढे कोठे आहे? पूर्व-अनुभवापासून संस्कार उत्पन्न होतो व संस्कारापासून स्मृति होते, हे जगप्रसिद्ध आहे. यास्तव जसा तो सर्ग स्मृतिरूप तसाच हाही स्मृतिरूप होय.

**लीला**—होय. सर्वज्ञ ईश्वरि, तुझे ह्मणणे खरे आहे माझ्या भर्त्याचा सर्ग जसा स्मृतिरूप स्वप्नासारिखा आहे, असे मी ह्मणत होते तसाच हाही स्मृतिरूप स्वप्नसारिखाच आहे, हे माझ्या आता ध्यानात आले. कारण मला जेव्हा तो सर्ग भासला त्यावेळी जसा हा सर्ग तेथे माझ्या डोळ्यासमोर नव्हता तसाच ज्यावेळीं (आता) मी यास हा असे ह्मणत आहे त्या

या समयीही तो माझ्या समोर नाही. अर्थात् हे सुद्धा त्याच्याप्रमाणे स्मरणच आहे.

**श्रीदेवी**—वा, फार चागले समजलीस. मुलि, आत्म्यामध्येच हा सर्व असत् सर्ग त्या त्या निरनिराळ्या वस्तूच्या स्वरूपाने भासतो. मला, हें परम सत्य स्पष्ट दिसत आहे

**लीला**—आई, माझ्या पतीचा असत्सर्ग या सर्गापासून कसा झाला ते मला साग. ह्मणजे माझा हा जगद्भ्रम नाहीसा होईल.

**श्रीदेवी**—बरे आहे. वत्से, मी तुझ्या इच्छेप्रमाणे अगोदर तुला, हा सर्ग पूर्वसर्गविषयक अनुभवजन्य भ्राति आहे, (ह्मणजे जगाच्या पूर्वी आलेल्या अनुभवापासून झालेली स्मृतिरूप भ्राति आहे,) हे समजावून देते. ( ससार हा एक जुना मडप आहे, असे आता देवी वर्णन करीत आहे.) चिदाकाशाच्या एका लहानशा भागात एक ससारसज्ञक मडप आहे. त्याची आकृति काचेसारख्या स्वच्छ व नीलवर्ण आकाशाने आच्छादित केलेली आहे. मेरु हा त्याचा सुदर स्तभ (धारण) आहे. त्याच्यावर इद्रादि लोकपाल व त्याच्या इद्राणी इत्यादि स्त्रिया ही बाहुलीं खोदली आहेत. चवदा भुवने ह्या त्यातील खोल्या आहेत. स्वर्गलोक, मर्त्यलोक व पाताललोक हे त्यास तीन मजले आहेत. सूर्य हा त्या मंडपात दिवा लाविला आहे. त्या मडपाच्या मध्यभागी मुग्याच्या वारुळासारिख्या नगरादिकानी व्याप्त असलेले पर्वतादि—दगडामातीचे ढीग आहेत. (ह्मणजे पर्वत हेच त्यातील ढीग असून त्याच्या पायथ्याशीं, मध्ये व वर लहान-मोठी गावे हीच मुग्याची वारुळे आहेत ) तो मडप प्रजापतिसज्ञक एका अनेक पुत्र-पौत्रसपन्न ह्यातार्‍या ब्राह्मणाचे रहाण्याचे स्थळ आहे त्यात जीवसमूह हेच असख्य कोशकार आहेत. ( कोशकार हे एका जातीचे कोळी आहेत. ते आपल्या अगाभोवती, जाळे करून आपणच आपल्यास बाधून घेतात. ) त्याला वर निळें गुळगुळीत छत लाविले आहे. आकाशगामी सिद्धाचा सघ हीच त्यात चिलटे घुमघुमत आहेत. मेघ हेच त्यातील धुराचे लोट असून त्यानी कोठें कोठे त्याचा मध्यभाग व्यापिला आहे. वायूचे वाहण्याचे मार्ग हेच त्यातील मोठे मोठे वासे असून विमानात बसून जाणारे सिद्ध हेच त्याच्यावरून फिरणारे किडे आहेत. देव, दानव इत्यादि दुष्ट पोराच्या लीला त्यात एकसारिख्या चालल्या असून

त्यामुळे मोठा कोलाहल होत आहे. भूर्लोक, भुवर्लोक इत्यादि खोऱ्यातून गावे व नगरे हीच लहान लहान उपकरणी व मोठमोठी पात्रे आहेत. समुद्र, सरोवरे व विहिरी हेच त्यातील लहानमोठे पाण्याचे हौद आहेत. नद्या हेच पाण्याचे पाट वहात जाऊन त्यातील एका मोठ्या जलाशयास भरून टाकीत आहेत. प्रसगी मेघ त्यातील भूमीवर पाणी शिंपडीत असतात. असो, अशा त्या मडपातील एका कोपऱ्यात एका पर्वतरूपी मातीच्या ढिगावर एक ब्राह्मण रहात होता. तो अग्निहोत्री, स्त्री-पुत्र-पौत्र-सपन्न, नीरोगी, व राजभयरहित असे. वर्णी व आश्रमी लोकाचे परम आतिथ्य करणाऱ्या त्या द्विजोत्तमाजवळ पुष्कळ गायी असून दूधही विपुल असे. तो ज्या मातीच्या ढिगावर राहत होता त्या ढीगावरून पाण्याचे पाट वहात असून झाडे–झुडपेही उगवली होती १८.

**सर्ग १९**—वसिष्ठ नामक ब्राह्मणास एका राजाचे दर्शन झाले; त्यामुळें त्याला राज्याची इच्छा झाली व त्याच दृढ सकल्पामुळे तो राजा झाला, असें या पद्मराजाच्या पूर्वजन्माचे वर्णन येथे केलें आहे.

**श्रीदेवी**—तो द्विज वित्त, वेष, वय, कर्म, विद्या, वैभव व आचरण याच्या योगाने अगदी वसिष्ठासारखा होता. पण वसिष्ठाप्रमाणे तो कोणाचाही पुरोहित झाला नव्हता व त्याला राजपुत्रास शिकवावेही लागत नसे त्या ब्राह्मणाचेही वसिष्ठ असेच नाव होते. त्याच्या भार्येचें नावही अरुधती होते. पण ही भूमिस्थ आकाशात होती व ती प्रसिद्ध अरुधती अतरिक्षात होती, एवढेच त्याच्यामध्ये अतर होते. वित्त, वेष, वय, कर्म, विद्या इत्यादिकानी तीही अरुधतीसारखीच होती खरी; पण तिच्यासारिखी ज्ञानी मात्र नव्हती. ती गजगामिनी स्वभावत:च प्रेमळ असे. तिचे मुख सदा आनदचिह्नयुक्त दिसे. तीच त्या ब्राह्मणाचे सर्वस्व होते. असो; एकदा तो ब्राह्मण त्या ढिगाच्या शिखरावर कोवळ्या व हिरव्या गवतावर बसला असता त्याच्या पायथ्याशीं एक राजा आपल्या सर्व परिवारासह मृगया करीत करीत आला. तो मार्गाने मोठ्या थाटाने चालला असता त्या ब्राह्मणाची दृष्टी त्याच्याकडे गेली. त्याच्या सैन्यातील लोक जणु काय मेरु पर्वतास दुभंगून टाकण्याच्या इच्छेनेंच मोठा घोष करीत होते. तो राजा चामरे व पताका याच्या योगाने लता-वनास चद्रकिरणानीं व्याप्त असल्याप्रमाणें व शुभ्र छत्राच्या समूहाने अंतरिक्षास रुप्याने मढविल्याप्रमाणे करीत होता.

त्याच्या घोड्याच्या नालानीं तेथील ढिसूळ भूमि उखळून धुरळा वर उडत होता व त्याच्या योगाने अंतरिक्ष आच्छादित होऊन गेले होते. पण स्वत राजा व त्याचा सुकुमार परिवार हत्तीवरील सोन्या-रुप्याच्या अबारीत बसलेला असल्यामुळे त्यातील कोणालाही धूळ, वारा व ऊन याची पीडा होत नव्हती. त्या राजाचे ते अवर्णनीय वैभव पाहून ब्राह्मणाच्या मनात अशी कामना उद्भवली.

तो ह्मणाला - अहाहा, काय हो हे राजाचे अवर्णनीय सुख ? याच्या भाग्याला उपमाच नाही. मीही या राजासारिखाच हत्ती, घोडे, रथ, पायदळ, पताका, छत्र, चामरे, सेवक, दास, दासी, इत्यादिकानी युक्त असा राजा केव्हा बरे होईन ? या राजाप्रमाणेच मलाही विषय कधी भोगावयास सापडतील ? या धन्य व परम सुखी पुरुषाप्रमाणे मला पुष्पे, चदनाच्या उट्या, इतर सुवासिक व चित्तरजक पदार्थ, रमणीय स्त्रिया इत्यादिकाचा यथेच्छ उपभोग कधी मिळेल ? असे बोलून त्या दिवसापासून तो त्याच गोष्टीचा विचार करू लागला. तो यावज्जीव स्वधर्माचे आचरण करीत असे पण त्याला या सकल्पाने मरेपर्यंत सोडिले नाही. शेवटी तो ब्राह्मण ह्मातारा झाला. त्याचा मरणकाल जवळ आला असता उपवनातील लता जशी म्लान होते त्याप्रमाणे त्याची अरुंधतीनामक पत्नी म्लान झाली अमरत्व दुर्लभ आहे, असे ऐकून तिने तुजप्रमाणेच माझी आराधना केली व दोन वर मागितले. पुढे काही दिवसानी तो ब्राह्मण मरण पावला व त्याच गृहाकाशामध्ये जीवाकाश होऊन राहिला. ( अतःकरण व वासना याच्या योगाने मर्यादित झालेल्या ब्रह्मास जीवाकाश ह्मणतात ) तो प्राक्तन दृढ सकल्पामुळे पद्म राजा झाला. त्याने आपल्या प्रभावाने सर्व भूमडल जिंकून टाकिले व आपल्या प्रतापाने देवलोकासही आपलेसे केले. त्याने कृपालुपणे पातालाचेही पालन केले. तात्पर्य तो ब्राह्मण आपल्याच सकल्पामुळे त्रैलोक्य—विजयी व परम शक्तिमान् राजा बनला. शत्रुरूपी वृक्षाचा तो कल्पाग्नि झाला. स्त्रियास तो मदनासारिखा वाटू लागला. विषयरूपी वायूचा तो मेरुच होय. ( ह्मणजे शब्दादि विषयाच्या योगानें तो कंपायमान होत नाही.) साधुरूपी सूर्यविकासी कमलाचा तो सूर्य ( ह्मणजे साधुपुरुषांस आनंदित करणारा ) होता. तो राजा सर्व

शास्त्राचा जणु आदर्शच होऊन राहिला. ( आदर्श ह्मणजे आरसा. ) तो याचकाचा जणु काय कल्पवृक्ष व श्रेष्ठ ब्राह्मणाचा मुख्य आधार झाला, व धर्मरूपी चंद्राचा तो पौर्णिमाच बनला असो, इकडे तो ब्राह्मण स्वगृहातील आकाशात चित्तसंस्कारावच्छिन्न आकाशरूप झाला असता त्याचे भूताकाशशरीर मृत झाले तेव्हा त्याची अरुंधती भार्या अतिशय दु खी झाली शोकाग्नीने ती साध्वी पोळून गेली सुकलेल्या उडदाच्या शेंगेप्रमाणे तिचे हृदय दुभंगले व ती पुण्यवती स्त्री स्थूल देहास टाकून देऊन आतिवाहिक ( सूक्ष्म ) देहाने पतीजवळ गेली. नदी जशी उतरत्या प्रदेशाकडे जाते त्याप्रमाणे ती पतीच्या मागोमाग जाऊन वसंत ऋतूंत आलेल्या मंजरीप्रमाणे आनंदाने टवटवीत झाली. असो, त्या पर्वतावरील ग्रामामध्ये अजून त्या ब्राह्मणाचे गृह आहे, स्थावर-जंगम धन आहे व भूमि आहे. त्यास मरून आज आठ दिवस झाले. त्याचा जीव मात्र गृहाकाशात राहिला आहे १९.

**सर्ग २०**—पतीचा पूर्व जन्म व आचरण ऐकूनही, असे होणे संभवनीय नाही, असे समजणाऱ्या लीलेला ज्ञप्तिदेवी दृष्टांत व युक्ति यांच्या योगाने या सर्गात बोध करिते.

**श्रीदेवी**—लीले, तोच ब्राह्मण या जन्मी राजा होऊन तुझा पति झाला व अरुंधती नावाची जी त्याची स्त्री तीच तू आहेस. तुमचा जोडा फार चांगला आहे. तरुण चक्रवाक पक्ष्याच्या जोडप्याप्रमाणेच तुमचे एकमेकावर प्रेम आहे. तुह्माकडे पाहून कोणाही आस्तिकाला, ही शंकरपार्वतीच भूलोकी अवतार घेऊन आली आहेत की काय, असा भास होतो. असो, हा मी तुला पूर्व संसारक्रम सांगितला. त्याव-रून वरील दोन सर्गाप्रमाणे हा पूर्वसर्गही भ्रमच आहे, हे तुझ्या ध्यानात आले असेल. चिदाकाशास 'मी जीव आहे' असा भ्रम होणे, हेच या भ्रांत सर्गाचे कारण आहे. या एका भ्रमापासून उत्तरोत्तर दुसरा, तिसरा इत्यादि भ्रमाची परंपरा लागते, पण जीवदृष्ट्या हा असत्य आहे. अधिष्ठान जे ब्रह्म त्याच्या दृष्टीने पाहिल्यास मात्र त्यात सत्‌ची अनुवृत्ति होत असल्यामुळे तो सत्य आहे. तेव्हा आता तू यातील कोणत्या सर्गास सत्य समजणार ? व यातील असत्य सर्ग कोणता ? मला तर असे ठाऊक आहे की, सर्व सर्ग एकसारखेच काल्पनिक आहेत.

**श्रीवसिष्ठ**—त्या, कृपाळु देवीचें ते भाषण ऐकून लीलेस आश्चर्य वाटले व ती ह्मणाली—देवी तू हे मला काय सागत आहेस ? तो आपल्या गृहातील आकाशात असलेला ब्राह्मण कोठे व आह्मी येथे असलेली दोघेजणे कोठे ? त्याचा प्रदेश निराळा व आमचें हे स्थान अगदीं निराळे. त्याचप्रमाणें मी समाधीमध्ये पाहिलेला तो पतीचा भव्य सर्गही आपल्या या गृहामध्ये मावणे शक्य नाही. यास्तव तुझे हे भाषण–मत्त ऐरावताला मोहरीच्या उदरात बाधून ठेविले; परमाणूच्या उदरात मशकाने अनेक सिहाशी युद्ध केले, कमलाच्या मण्यामध्ये मेरु पर्वत ठेविलेला होता, त्याला मुग्याच्या पोराने खाऊन टाकिलें, स्वप्नातील मेघाची गर्जना ऐकून चित्रातील मोर नाचू लागला–इत्यादि वाक्याप्रमाणे–मला असभाव्य वाटते. जननि, कृपा करून मला हेच पुनः चागले समजाऊन साग.

**श्रीदेवी**––लीले, मी तुला काहीतरी सागून फसवीत आहे, असे समजू नकोस. अनृत भाषण करू नये, इत्यादि वैदिक विधीचे आह्मी कधींही उल्लघन करीत नाहीं. कारण वैदिक मर्यादेचा कोणी भग करू लागल्यास आह्मी त्यास शासन करून तिचे पालन करीत असतो. तेव्हा आह्मींच तिचा भग कसा करू ? आणि जर कदाचित् आह्मींच त्या मर्यादेचा भग केला तर तिचे रक्षण कोण करणार ?

असो, तो आपल्या ग्रामात असलेलाच ब्राह्मणाचा जीवात्मा त्याच आपल्या गृहामध्ये हे सर्व महा राष्ट्र पहातो. राजवासनेने युक्त असलेल्या चिदात्म्याचाच हा सर्व खेळ आहे.

**लीला**––पूर्वी वसिष्ठ व अरुधति असून तीच आह्मीं आता जर पद्म व लीला झालो आहो तर आह्मास पूर्व जन्माचे स्मरण का नाही ? व मरणाचे स्वरूप काय आहे ?

**देवी**––बाळे, ती तुमची पूर्व स्मृति लुप्त झाली व आता ही नवी स्मृति उत्पन्न झाली आहे. ह्मणजे स्वप्न पडू लागले असता जसे जाग्रतीचे विस्मरण होते तसेच हे झाले आहे व हेच मरण होय. पूर्व अवस्थेचे विस्मरण होणे हेच मरणाचें स्वरूप आहे. स्वप्नामध्ये किवा मनोराज्य करीत असताना जसे त्रिभुवन भासते त्याप्रमाणें त्या ब्राह्मणाच्या गृहामध्येंच ही विस्तीर्ण भूमि भासत आहे.

**लीला**--पण याप्रमाणे जर हे असत्य आहे तर सत्य असल्यासारखें कसें भासते ?

**श्रीदेवी**--पंच कोशाच्या आंत असलेल्या चिदाकाशाच्या सत्यत्वामुळें ही भ्रामक सृष्टीही सत्य भासते. तात्पर्य पूर्व सर्ग असत् आहे. त्यामुळे त्याच्या पासून केवल स्मृतीच्या योगानें उत्पन्न झालेला हा सर्गही असत्च असला पाहिजे. कारण मृगजळावरील लाटही असत् असते, असे आपण नेहमीं पहातों हे तुझें गृहही त्याच्या गृहाकाशामध्येच आहे. तू, मी, व हें सर्व दृश्य त्याच्या चिदाकाशरूपच आहे, असे तू जाण. पण सर्व प्रपंच मिथ्या आहे व चिन्मात्र सत्य आहे, याविषयीं प्रमाण काय ह्मणून विचारशील तर स्वप्न, भ्रम, संकल्प इत्यादि दृष्टांतावरून सिद्ध होणारीं अनुमानेंच त्याविषयीं प्रमाण आहेत. कारण स्वप्नादि मिथ्या आहेत व त्यांचा द्रष्टा ( साक्षि चित् ) सत्य आहे हे आह्मा सर्वांस आमच्या अनुभवावरूनच ठाऊक आहे हा सर्ग फार मोठा आहे, तेव्हां तो ब्राह्मणाच्या गृहाकाशांत कसा राहील, असे तुला वाटत असेल, पण तो त्या ब्राह्मणाच्या गृहाकाशांतील त्या ब्राह्मणाच्याच जीवाकाशाच्या एका कोपऱ्यांत रहात असतो, हे तू ध्यानांत धर. ह्मणजे समुद्र, वनें, अनेक पर्वत, नद्या, नगरें, ग्राम, असंख्य प्राणी इत्यादिकांनी भरलेला हा अबाढव्य भूलोक त्या द्विजाच्या जीवाकाशांतही कोठें एका कोपऱ्यांत असतो. ब्राह्मणाच्या गृहाकाशापेक्षां किती तरी लहान असलेल्या जीवाकाशासही तो भरून टाकू शकत नाही. मग त्याच्या गृहाकाशाची गोष्ट तर दूरच राहू दे. तेव्हां आतां हें तुझें भव्य नगर त्या जीवाकाशांत राहील कीं नाही, याचा तूच विचार कर अग खुळे, तू कोणत्या भ्रमांत आहेस ? जीवाकाशांत हें तुझें विस्तीर्ण नगर ह्मणजे एक कुरळा केस आहे. तुझ्या नगरासारखीं सहस्रावधि नगरें ज्या देवीच्या पाठीवर नांदत आहेत ती भगवती वसुंधराही जर त्या आकाशास व्यापू शकत नाहीं तर तुझ्या या एका टिंबासारिख्या नगराची कथा काय ? असो; त्या ब्राह्मणाच्या गृहामध्यें ही सर्व सृष्टि व तुझें हें नगर जरी उद्भवलें आहे तरी तें गृह आहेच. त्याचा नाश झालेला नाही. मातेच्या उदरांत गर्भाचा उद्भव झाला तरी माता जशी नष्ट होत नाहीं त्याप्रमाणेच जगदुत्पत्तीमुळें त्या गृहाचा नाश होत नाहीं. मुलि, त्या गृहाच्या एका सूक्ष्म

अशामध्ये जणुं काय जगाचा समुदाय रहात असतो. यास्तव याहून अधिक आश्चर्य ते कोणते? चिदात्म्यामध्ये एकेका परमाणूत आंत आंत अनेक जगे भरली आहेत. तेव्हा आता तू शका कसची ठेवतेस? या मायिक बाजारात शक्य व अशक्य याचा मुळी विचारच रहात नाही.

**लीला**—माते, त्या ब्राह्मणाला मरून आज आठवा दिवस ह्मणून तूं ह्मणतेस पण आह्माला येथे जन्म घेऊन किती तरी वर्षे झालों आहेत. तेव्हा तीच आम्ही, असे कसे ह्मणता येईल?

**श्रीदेवी**—बाळे, या मायिक सृष्टीत देशाचे दीर्घत्व जसे नाही तसेच कालाचेही नाही. जगाची उत्पत्ति जशी कल्पनामात्र आहे तशीच क्षण, घटिका, दिवस, पक्ष, मास, ऋतु, अयन, वर्ष, युग इत्यादि सर्व कालाची कल्पना आहे. कारण क्षण, कल्प, इत्यादि सर्वजग, मी–तू इत्यादि अभ्यासामुळे ज्यास जन्माचा भ्रम झाला आहे त्यासच भासत असते.

आता त्याना ते कोणत्या क्रमाने भासते ह्मणून विचारशील तर सागते. जीव एक क्षणभर मिथ्या मरणाचा अनुभव घेऊन पूर्व देहास विसरतो व उत्तर देहास पहातो. पूर्व देहास विसरता क्षणी त्यास ज्या देहाचे दर्शन होते तोच आपला आधार आहे व मी त्या आधारात स्थित आहे, असा तो आकाशरूपी जीव पहातो. पुढे आपला तो आधार हात, पाय, तोड, मस्तक इत्यादि सर्व अवयवानी युक्त आहे, असे त्याच्या अनुभवास येते. काही वेळाने हा माझा पिता, ही माझी माता, हा मी, हे माझे गृह, हे माझे बधु, मला आज इतकीं वर्षे झाली, पूर्वी मी लहान होतो, पण आता मोठा झालो आहें, पूर्वी मी अज्ञ होतो, पण आता ज्ञानी झालों आहे, मागे मी दुर्बळ होतो, आता बलाढ्य झालो आहे, हे माझे आप्त आहेत, हे मित्र आहेत, हे शत्रु आहेत, इत्यादि त्याच्या कल्पना दृढ होतात. बधु, मित्र इत्यादिकाचा याच्या देहाशी काही सबध नसतो, पण देहभावास प्राप्त झालेल्या चित्ताचा व आत्माकाशाचा अति दृढ ऐक्याध्यास झाल्यामुळे ते आपल्या देहाशीं सबद्ध आहेत, असा भ्रम होतो. परंतु त्याच्या चित्तामध्ये असा ससार जरी उद्भवला तरी वस्तुत ते निर्मल आकाशच असते. ह्मणजे त्यात काहीं उद्भवत नाहीं. कारण स्वप्नामध्यें केवल दृक्–शक्तिच पदार्थरूप व इद्रियरूप होऊन अनुभव घेते, हे आपणास ठाऊक आहे. त्याचप्रमाणे जाग्रत्, परलोक, इहलोक इत्यादिकांतील

विषय व इंद्रियादि अनुभवाचीं साधनेही ती दृक्–शक्तिच होते, असे तू समज. सर्व लाटा पाण्यापासून उद्भवतात. मग त्या समुद्रातल्या असोत, तळ्यातल्या असोत कीं, लहानशा डबक्यातल्या असोत. त्याप्रमाणेच द्रष्टा, दर्शन व दृश्य हा सर्व त्या एका दृक्शक्तीचा विलास आहे. मग तो विलास परलोकचा असो, इहलोकचा असो कीं, स्वप्नातला असो, साराश चैतन्यरूप आत्मा हेच या जगाचे खरे रूप आहे. त्याला स्वतःचे ह्मणून खरं रूप मुळीच नाही. प्रत्यक्ष, अनुमान, उपमान, इत्यादि प्रमाणाच्या रूपाने ने अधिष्ठान चैतन्यच भासते. कारण अज्ञात व अबाध्य जे असते तेच प्रमाणाचा विषय होते, असा नियम आहे. जे ज्ञात असते त्याच्या ठायीं प्रमाण प्रवृत्त होत नाही व जें बाधित होणारे असतें त्याच्या ठायींही प्रमाण प्रवृत्त नाही, असा अनुभवही आहे. जड वस्तूचे ठायीं आवरणाच्या कृत्याचा अभाव असतो. त्यामुळे त्याच्या ठायीं प्रमाण जरी प्रवृत्त झाले तरी त्याचा उपयोग होत नाही. तस्मात् प्रमाणाच्या प्रवृत्तीस चैतन्यच योग्य आहे, जड नाहीं, असे समजण्यास काहीं हरकत नाहीं.

आता तू कदाचित् ह्मणशील कीं, लाटाच्या योगाने पाणी जसे चचल व वेगयुक्त होते त्याप्रमाणे दृक्–शक्ति विषययुक्त झाल्याने दूषित होईल. तर ते बरोबर नाही कारण कोणत्याही अरोपित भावामुळे अधिष्ठान दूषित होत नाही. कापसाच्या ढिगावर ठेविलेला गुंजेचा पुजका निखाऱ्यासारिखा जरी एकाद्यास दुरून दिसला तरी तो कापसास जाळू शकत नाही. त्याचप्रमाणे चैतन्य शक्ति जरी विषयाकार झाली तरी ती दूषित होत नाहीं. तरग हा पाण्याचा स्वाभाविक धर्म नव्हे. तसाच विषयाकार हा चैतन्याचा स्वाभाविक धर्म नव्हे. जळ आपला जलभाव न सोडिता जसे तरग रूपाने काही काळ भासते व लाटेचे निमित्त नाहीसे झाले असता पुनः आपल्या स्वाभाविक रूपाने रहाते त्याचप्रमाणे चैतन्यही आपल्या चित्त्वास न सोडता विषयाकार भासते व विषयरूप निमित्त ( उपाधि ) निवृत्त झाले की, आपल्या स्वाभाविक स्वरूपाने रहाते. एवढ्याकरिताच आह्मी या विकाररूप दृश्यास असत् ह्मणतो. दृश्यच जर नाही तर द्रष्टा व दर्शन यास तरी आहे, असे कसें ह्मणता येईल? सारांश केवल एक दृक आहे. बाकी काहीं नाहीं.

असो, जीवास मरणरूपी मूर्च्छा आली असता एका निमिषात त्रिभुवनात्मक दृश्याची शोभा भासते. त्याच्या वर सांगितलेल्या अत्य वासनेप्रमाणे देश, काल, आरंभ, क्रम, उत्पत्ति, माता, पिता, वय, वित्त, ज्ञान, स्थान, बंधु, इत्यादिकांची त्यास प्राप्ति झाली आहे, असे भासते. वस्तुतः तो चैतन्यरूपी व त्यामुळेच अज असतानाही "मी उत्पन्न झालो" असे समजतो. मरणानंतर योग्य समयी तो आपल्या मातेच्या उदरांत शरीर धारण करण्याकरिता जातो. तेथे तो आपल्या मातेच्या हस्तपादादि अवयवाप्रमाणेच तिच्या शरीराचा एक भाग होऊन रहातो. त्यावेळी ती तरुण असते. तिच्या शरीरातील रक्ताच्या योगाने तिचे इतर अवयव जसे पुष्ट व बळकट होत असतात तसाच हाही उत्तरोत्तर पुष्ट व बळकट होतो. त्यामुळे वस्तुतः विचार करिता मरणानंतर मातेच्या शरीराशी तादात्म्य पावणारा हा, प्रथम तरुणच होतो, असे वाटते पुढे फुलामागून फळ या न्यायाने त्यास मातेच्या उदरातून बाहेर आल्यावर बाल्य, तारुण्य इत्यादि अवस्था क्रमाने प्राप्त होतात. ही माझी माता, हा पिता, हा मी इत्यादि त्यास स्मरण होते. त्याचे आयुष्य हा हा ह्मणता जाऊ लागते. त्याचे सर्व आयुष्य ह्मणजे या अनादि कालाचा अगदीच स्वल्प भाग आहे, पण त्या तेवढ्याशा भागातही हा आपल्या अनेक वर्षांची कल्पना करितो. भ्रमामुळे असे होणे साहजिक आहे. तुह्मी मनुष्ये स्वप्नावस्थेतील थोड्याशा कालात अनेक वर्षांचा अनुभव घेत नाही का? आनंदाचा काल लवकर जातो; पण चिंतेचा व दुःखाचा काल लवकर जात नाहीं. जन्म हे दुःखाचे घर आहे. (पुष्कळ अज्ञास ते सुखाचे आगर आहे, असे वाटते हे खरे, पण शेवटी त्यानाही ते दुःखरूप वाटल्यावाचून रहाणार नाही.) त्यामुळे प्राण्यास अनेक वर्षांचा भ्रम होतो. प्रिय स्त्री दूर गेली की, विषयी जनास एक दिवस वर्षाप्रमाणे वाटतो व ती जवळ असली की तिच्याशीं गोड गोड गोष्टी बोलताना रात्री व दिवस क्षणाप्रमाणे निघून जातात. सारांश, या मायिक जगातील सर्व व्यवहार स्वप्नातील व्यवहाराप्रमाणे आहे. त्यात भोग घेतल्यावाचूनच आमक्याचा मी भोग घेतला, असें वाटतें ? व ज्याचा तो खरोखर भोग घेत असतो त्या आत्म्याचे त्याला भानही नसतें. वस्तुत शून्य स्थान त्यास लोकानीं भरलेले आहे, असे वाटते, संकटप्रसंगीही त्यास उत्सवाचा भ्रम होतो व हानीलाही तो

लाभ समजतो. मिऱ्यामध्ये जसे तिखटपण असते किंवा न खोदलेलीं चित्रे स्तंभामध्ये असतात त्याप्रमाणे ज्या परमात्म्यामध्ये हे दृश्य जग अनन्य असते त्या परमेश्वरास सत्य बंध व सत्य मोक्ष का व कसा असणार ? २०.

**सर्ग २१**—विचार करून पाहिले असता हे स्थूल सूक्ष्मरूप आहे, सूक्ष्म अविद्यारूप आहे व अविद्या चिन्मात्र आहे, असा अनुभव येतो, असे या सर्गात सांगितले आहे

**श्रीदेवी**—लीले, मिटलेले डोळे उघडले असता ज्याप्रमाणें अनेक रूपवान् पदार्थ प्रत्यक्ष दिसतात त्याप्रमाणे जीवास मरणरूपी मोहानंतर दिशा, काल, आकाश, स्वर्गादि धर्ममय स्थाने, गृहादि कर्ममय स्थानें, पृथ्वी, जल इत्यादि कल्पातापर्यंत रहाणारी स्थाने इत्यादिकांचे भान होते. स्वप्नात जसे आपले मरण अनुभवास यावे त्याप्रमाणे पूर्वी कधी न पाहिलेलेही हे दृश्य माझे आहे, मी यास केलें आहे, असे स्मरण त्यास तात्काल होते. पण ही मायाकाशातील भ्रांति आहे. यातील उद्भव, स्थिति, क्षय, नाश इत्यादि सर्व विकार वासनामय आहेत. सृष्टीतील ही सर्व विचित्रता जरी दुर्निरूपणीय आहे, ह्मणजे तिचें जरी बरोबर निरूपण करिता येत नाही तरी ती ( सृष्टि ) चित्तमय आहे, काल्पनिक आहे, असा निर्णय करिता येतो. चित्त ह्मणजे अनेक वासनांचा पुंजका, हे तुला ठाऊक असेलच. यास्तव शुद्ध मनाने चांगला विचार करून चित्ताचे चित्तत्व नाहीसे केले पाहिजे. वासनांचा क्षय करणे व चित्तत्वाचा नाश करणे यांत अर्थतः कांहीं भेद नाहीं. यास्तव वासनाक्षय अथवा चित्तनाश झाला असता जगाचे अत्यंत विस्मरण होते व ते विस्मरण ह्मणजेच मोक्ष होय.

जगाचे विस्मरण झाल्यावर हे अमुक मला प्रिय आहे व हे अप्रिय आहे, असे वाटत नाही. कारण त्या विस्मरणानंतर रहाणारे चैतन्य भोक्ता व भोग्य यावाचून स्वाभाविक स्वरूपाने स्थित असतें. अहंता व जग याच्या स्थितीचे कारण आत्म्याचें अज्ञान आहे. त्यालाच अविद्या असेही ह्मणतात. तिचा बाध झाला असता स्वाभाविक मुक्तावस्था आपोआप व्यक्त होते. दोरीच्या ठायीं सर्पाचा भ्रम झाला असता दोरीचे ज्ञान हेंच त्याच्या

निवृत्तीचे मुख्य साधन आहे. दोरीच्या साक्षात्कारावाचून दुसऱ्या हजारों उपयांनींही सर्पभ्रम नष्ट होणार नाही. त्याचप्रमाणे अविद्येचा बाध होऊन आत्म्याचा साक्षात्कार झाल्यावाचून जगद्भ्रम जाणार नाही. भ्रमामुळें भासलेल्या सर्पाकडे दुर्लक्ष्य केले असता त्याची तेवढ्यावेळेपुरती निवृत्ति होते; ह्मणजे त्याचे विस्मरण होते; पण पुनः तिकडे लक्ष्य गेलें असता तो पूर्वीप्रमाणेच भासतो; हे तुला ठाऊक आहे. त्याचप्रमाणे योगाभ्यास करून चित्त शांत केल्यानेही काहीकाल जगाचे विस्मरण होते. पण ते समाधि सोडून विक्षिप्त झाले की, पुनः पूर्ववत् जग अनुभवास येतें. यास्तव समाधि, निद्रा व मूर्छा या अवस्थेतील विस्मरणाप्रमाणे जगाचें अर्धे विस्मरण होऊन काही लाभ होणार नाही. तर अविद्येच्या बाधानंतर होणारे जगाचे पूर्ण विस्मरणच झाले पाहिजे. तेच मुक्तिरूप आहे. यास्तव हा सर्व अवाढव्य संसार परमात्मरूप आहे, असा तू निश्चय कर. अविद्येचा बाध झाल्यावरही हे भासेल, नाही असे मी ह्मणत नाही. पण ते भासले तरी मिथ्यारूपाने भासेल. पूर्वीप्रमाणे सत्यरूपाने भासणार नाही. भांड्यातले तूप किंवा तेल ओतून घेतलें असता त्या भांड्यास जसा त्याचा अंश ( बुळबुळीतपणा ) रहातो त्याप्रमाणे आत्मसाक्षात्कारानें अविद्यानिवृत्ति झाली तरी देह असेपर्यंत तिचा अंश अवशिष्ट रहातो. त्यामुळे साक्षात्कारानंतर व अविद्यानिवृत्ति झाल्यावरही जगाचा अस्पष्ट अनुभव येणे शक्य आहे- पण तो जरी आला तरी त्याच्या योगाने मुक्तीस बाध येत नाही. कारण तो अस्पष्ट अनुभव आत्म्यास आच्छादित करण्यास समर्थ होत नाही.

**लीला**––जननि, तू मगाशी असे ह्मटलेस की, या आमच्या सर्गाचें कारण त्या ब्राह्मण–ब्राह्मणीच्या सर्गातील परिचित वासना आहे. पण ते मला बरोबर दिसत नाही. कारण स्मरणरूप अशा या सर्गास कारण होणारे संस्कार या वेळीं दिसणाऱ्या या सर्गाच्या अनुभवावाचून होणे अशक्य आहे व हा सर्ग तर पूर्वी नव्हता. तेव्हा या सर्गाच्या अनुभवावाचून त्याच्या स्मरणास कारण होणारी संस्काररूप वासना कशी उद्भवणार?

**श्रीदेवी**––मुलि, ही तुझी समजूत बरोबर नाही. वासना ह्मणजे काय हें तुला पुढें चांगले समजेल. तूतें वासना ह्मणजे संस्कार इतकेच तूं

ध्यानात धर पण या सर्गाच्या स्मरणास संस्काराचीही अगदी आवश्यकता आहे, असे जरी तू समजत असलीस तरी काहीं बिघडले नाहीं. कारण पितामह सर्वज्ञ असल्यामुळे त्याला पुढच्या सर्गाचाही अनुभव येणे शक्य आहे. यास्तव त्याचे संस्कार या सर्गाचे कारण आहे, असे तू समज. पण त्याच्या देहादिकाच्या उत्पत्तीस मात्र त्याचे संस्कार कारण नाहीत. कारण तो पूर्वी हिरण्यगर्भ नव्हता. त्यामुळे त्यास त्याचा अनुभवद्वारा संस्कार होणेही अयोग्य आहे, (असे मीं पूर्वी सांगितले आहे). असो; लीले, वस्तुत असल्या शंकेत व समाधानातही फारसे तात्पर्य नाहीं. कारण सर्वसाक्षि चैतन्यास सर्व सर्गाचा अनुभव सदा आहेच. कारण तें स्वय अनुभवरूप आहे. तुम्ही या विशेष सर्गाचा जरी पूर्वी अनुभव घेतलेला नसला तरी सामान्यतः सर्गाचा अनुभव कसा घ्यावा हे तुह्मास अपरिचित नाही. तर तुह्मा सर्वांस पूर्वी अनेकदा अनुभव घेऊन, त्याची सवयच लागून गेली आहे. यास्तव तुम्ही ज्या ज्या शरीरात जाल तेथे तेथे "हा मी व हे माझें" हे तुह्मास कोणी न शिकवितांच समजेल. अस्तु.

एवं च पूर्व–अनुभवाच्या द्वारा उत्पन्न होणाऱ्या संस्कारामुळे होणाऱ्या स्मृतीचे व अनादि अविद्यारूप वासनाजन्य स्मृतीचे कारण शबल ब्रह्म आहे. सर्व कार्य–कारणभाव त्या चिदाकाशात एकवटला आहे. अविवेकरूप अविद्येमुळे हा कार्य–कारणभाव विकल्प उद्भवतो पण विवेक केला असता त्याचा बाध होतो विकल्पाचा बाध झाला की, कारण व कार्य हा भेद उरत नाही. तर एक, सर्व विकल्पशून्य व शुद्ध अधिष्ठान रहाते.

आता हेच युक्तिसिद्ध तत्त्व अनुभवारूढ कसे होईल ते सांगते. चैतन्याच्या आभासा(प्रतिबिंबा)ने युक्त असलेल्या समष्टीच्या व व्यष्टीच्या अंतःकरणास स्मरण किंवा वेदना ह्मणतात. ते शबल ईश्वराचे कार्य आहे. (मायायुक्त ब्रह्मास शबल ईश्वर ह्मणतात) व्यवहाराकरिता ईश्वराच्या उपाधीस माया व जीवाच्या उपाधीस अंतःकरण ह्मणतात. या उपाधींच्या भेदामुळे अधिष्ठानभूत सन्मात्र चैतन्यामध्येही भेदाची कल्पना होते. त्यामुळे कार्याचे अस्तित्व कारणाच्या अस्तित्वावर अवलंबून असते, असा भ्रम होतो व पूर्वी असलेले कारण आणि मागून असलेले कार्य, असा सामान्य जनाचा निश्चय होतो. पण तो बरोबर नाहीं. कारण माया

व तिचे कार्य या दोघांचीही उपेक्षा करून त्या उभयतामध्ये अनुगत असणारे सन्मात्ररूप महा चैतन्यच स्मरण ( अंतःकरण, वेदन, ) आहे. यास्तव तूही तसेच समज. अशा ज्ञानालाच प्रत्यग्दर्शन ह्मणतात. अशा प्रकारच्या या ज्ञानाच्या योगाने वर सांगितलेली कार्य-कारणता बाधित होते व कार्य-कारणता हा शब्द मात्र रहातो. पण तो खरा नव्हे. कारण अर्थावाचून केवल शब्द व्यर्थ आहे.

हेच तत्त्व तुला अधिक चांगले समजावें ह्मणून मी आणखीं एक व्यावहारिक दृष्टांत देतें—कुंभार माती कालवून व तिचे गोळे करून नंतर प्रत्येक गोळ्याचें एकेक भांडे करितो, हे तुला ठाऊक असेलच. मातीचा गोळा व त्याचे केलेलें भांडे या दोघांचा विचार मनांत आणिला ह्मणजे भांड्याच्या पूर्वी असलेली मातीची अवस्था ( गोळा ) हे कारण व मागून झालेली अवस्था ( भांडे ) हे कार्य अशी कल्पना होते. पण केवल माती याच दृष्टीने पाहिल्यास भांडे, गोळा व सुकी माती यांचे एकच स्पष्ट तत्त्व दिसते त्या तिन्ही अवस्थेत मातीवाचून दुसरें कांही आढळत नाही. हे कार्य व हे त्याचे कारण अशी भावना त्यावेळीं होत नाही. त्याचप्रमाणे मायावी ईश्वर व प्रपंच या दोघांचा विचार करूं लागले असता एक कारण व दुसरें ( प्रपंच ) कार्य अशी बुद्धि होते. पण केवल एकरूप चिन्मात्राकडे दृष्टि देऊन विचार करूं लागले की, मायावी ईश्वर नाही व प्रपंचही नाही, असें होतें. तस्मात्, बाई लीले, हा सर्व संसार प्रत्यगात्म्याचे ठायीं केवल कल्पनामय आहे. या माझ्या सांगण्यावर तुझा विश्वास बसत नसेल, तर प्रत्यग्दृष्टीने अधिक विचार कर

असो, याप्रमाणे हे दृश्य जगत् किंवा यांतील दुसरें कांहीही उत्पन्न झाले नाही. तर हे एक चिदाकाशच आहे. त्याला स्वतःच्या अस्तित्वाकरितां दुसऱ्या कोणाचीही गरज नाहीं.

**लीला**—देवि, तू मला ही एक परम दृष्टि दिलीस. तिच्या योगाने आता तुझे ह्मणणे माझ्या अनुभवास येऊं लागले. प्रातःकालच्या प्रभेच्या योगाने जशी जगाची शोभा स्पष्ट दिसावी त्याप्रमाणे तुझा सिद्धांत मला आतां स्पष्ट दिसत आहे. मी आतां अगोदर अभ्यासाच्या योगाने हें तत्त्वज्ञान दृढ करितें. तोपर्यंत, हे माते, तू मला त्या ब्राह्मणाच्या पर्वतावरील ग्रामाकडे घेऊन चल. मला तो सर्ग पहावासा वाटतो.

**श्रीदेवी**—बरे आहे. लीले, पूर्वीप्रमाणेंच अचेत्याचिद्रूपमयी दृष्टि करून ह्मणजे कारणब्रह्मरूपतेस प्राप्त होऊन व अहंममभाव सोडून ह्मणजे देहाध्यासास विसरून शुद्ध हो. ह्मणजे भूमीवर स्थित असलेल्या पुरुषाचा संकल्प जसा आकाशातील गधर्व नगरास प्राप्त होतो त्याप्रमाणें मायाकाशात असलेल्या त्या सर्गास तू निःसशय प्राप्त होशील व असे झाले असता तू व मी अशा दोघी मिळून निर्विघ्नपणें त्या सर्गास पाहू शकू. हा देह हाच त्याचे दर्शनास मोठा प्रतिबध आहे.

**लीला**—देवि, याच देहाने दुसऱ्या सर्गात का जाता येत नाही? मजवर सर्वथा अनुग्रह करण्यास तू सज्ज आहेस, ह्मणूनच मी तुला हा त्रास देत आहे.

**श्रीदेवी**—हीं अनेक जगे मायामात्र असल्यामुळे वस्तुतः अमूर्त आहेत, पण मिथ्या अज्ञानाच्या प्रभावाने तुह्मास तीं सोन्याच्या मुद्रिकेप्रमाणे भासतात. सोने मुद्रिकेचे रूप धारण करिते खरे, पण ते मुद्रिकात्व सोन्याहून निराळे नसते. त्याचप्रमाणे ब्रह्म जगद्रूप होते, पण ते जगत्त्व ब्रह्माहून निराळे नाही. वस्तुत जगत् शून्य आहे. जे दिसते ह्मणजे अनुभवास येते ते ब्रह्म आहे. नदीच्या काठची धूळ जशी नदीच्या पाण्यात प्रतिबिंबित झालेली दिसते त्याप्रमाणे ब्रह्मामध्यें ही अवर्णनीय माया दिसते. प्रपच मायेचे कार्य आहे; ह्मणून तो मिथ्या आहे. ब्रह्म मात्र सत्य आहे. तुझा प्रत्यगात्माही ब्रह्म आहे. प्रत्यगात्मा व ब्रह्म याचे ऐक्य आहे. ह्मणूनच ब्रह्मास अद्वय ह्मणतात. जग मिथ्या आहे, ब्रह्म सत्य आहे व सर्व शरीरात साक्षि—चैतन्यरूपाने असणारा प्रत्यगात्मा व ब्रह्म याचे ऐक्य आहे. याविषयी प्रमाण काय ह्मणून विचारशील तर सागते. त्याविषयी वेदान्त ह्मणजे सर्व उपनिषदे व ब्रह्ममीमासाशास्त्र हे मुख्य प्रमाण आहे. त्यांचा तात्पर्यार्थ अनुभवास आणून देण्याकरिता गुरु हे दुसरे प्रमाण आहे व आपला अनुभव हे फलीभूत तिसरे प्रमाण आहे. लीले, ब्रह्मच ब्रह्माला पाहू शकते. जे ब्रह्म नव्हे ते अब्रह्म त्यास पाहूं शकत नाहीं. सर्गादि नावाचा जो हा प्रपच पसरला आहे तो त्या परमात्म्याचा स्वभाव आहे. स्वभाव ह्मणजे आच्छादित झालेली सत्ता. ह्मणजेच आवरणशक्तियुक्त माया. वस्तुतः ब्रह्म व जग यामध्ये कारण-

कार्यभाव नाहीं, हे मी वर सांगितलेंच आहे. माती व मडकें यांच्यामध्यें कारण–कार्यभाव येण्यास कुंभार, त्याचें चाक, ते फिरवावयाचा दंड इत्यादि सहकारी कारणाची गरज असते व त्याच्यामुळेच कोणतेही द्रव्य ( प्रकृति ) व त्याचा विकार यांच्यामध्ये कारण–कार्यभाव भासतो. पण ब्रह्म व जग यांच्यामध्यें तो भाव असण्यास कोणचेच सहकारी कारण नाहीं. हे तत्त्व समजण्यास पुष्कळ दिवस चित्तैकाग्र्याचा अभ्यास केला पाहिजे. मोठ्या वेगाने बाहेर धावणाऱ्या चित्तवृत्तीस आवरून वळून आत्म्याच्या सन्मुख नेले पाहिजे. वृत्ति आत्मोन्मुख होऊन भेददृष्टि अगदीं शांत झाल्यावाचून तुला ब्रह्म दिसणार नाहीं. कारण तू जोंपर्यंत देहावर अभिमान ठेवून " ही मी व हे सर्व मजहून भिन्न " असे मानीत आहेस तोंपर्यंत तू अब्रह्मरूप आहेस. ह्मणूनच–या देहावरील अहंकार सोडून चैतन्यांत मिळून जा, ह्मणजे तुला ते ब्राह्मणगृह दिसेल–असे मी वर सांगितलें. " मी, तू, " इत्यादि जे हे भाव तुह्मा जीवांच्या अगदीं अंगवळणी पडले आहेत तेच आह्मास, ब्रह्मरूप झाल्यामुळे, ब्रह्मरूप आहेत, असे वाटते. संकल्पनगररूप अशा या माझेही हे शरीर शुद्ध चित्ताकाशमय आहे. त्यामुळे मी त्याच्या आंत असलेले सूक्ष्म व पूर्ण ब्रह्म या शरीराने पहाते. ब्रह्मदेवादी जे हे सर्व शक्तिमान् देव आहेत तेही मजप्रमाणेच विशुद्ध चित्ताच्या योगाने सदा त्या ब्राह्मणाचें दर्शन घेण्यास समर्थ आहेत. ते ब्राह्मणरूप अशा या जगाची व त्यांतील सर्व व्यवहाराची स्थिति त्या पूर्ण ब्रह्माच्या एका अंशांत होते, असें पहातात. पण लीले, तू चित्ताच्या ऐकाग्र्याचा अभ्यास केलेला नाहींस. त्यामुळे तुझा आकार ब्रह्मरूप न होतां चिदाभासरूप होऊन राहिला आहे. ह्मणून तुला या देहानें ते ब्रह्म व तो ब्राह्मणाचा गिरिग्राम दिसत नाही. याच शरीरांत असतांना तूंच स्व-संकल्पानें रचलेले नगरही जर तुला या शरीराने दिसत नाही तर दुसऱ्याच्या संकल्पाने रचलेले नगर तुला या शरीराने कसे दिसणार ? तात्पर्य तो गिरिग्राम सांकल्पिक असल्यामुळे तुला या शरीराने दिसत नाही. यास्तव या देहाचा त्याग करून तू चिदाकाशरूप हो.

संकल्पानें ( मनोराज्याच्या योगानें ) चित्तांत बनविलेले नगर जसे त्या संकल्पकर्त्याच्या दृष्टीनें त्या वेळेपुरते सत्य असतें, ह्मणजे ते देहसाध्य

असो की नसो, पण त्याच्यायोगाने संकल्पकर्त्यास क्षणिक सुखदुःखादिकाचा अनुभव होतो तसा दुसऱ्यास होत नाहीं, हें खरे, पण हे जग ब्रह्मदेवाच्या संकल्पामुळे जरी उद्भवलेले आहे तरी ईश्वराच्या अनादि नियतिरूप व मायासंज्ञक इच्छेच्या प्रभावामुळे त्याचा प्रादुर्भाव होत असल्यामुळें आमच्या सांकल्पिक नगरादिकाहून त्यामध्ये विशेष आढळतो. ह्मणजे ते कल्पाच्या आरंभापासून कल्पांतापर्यंत सर्व प्राण्याच्या अनुभवास येते व ते सत्य आहे, असा सर्व जीवास भास होतो.

**लीला**—बरे देवि, आपण बरोबरच जाऊन तो ग्राम पाहू, असे तू मला ह्मटलेस. पण माझ्या प्रमाणे तुलाही हा देह येथे ठेऊन केवल शुद्ध अंतःकरणाने का जावे लागत नाही? तुला मात्र याच देहाने मजबरोबर कसे येता येते?

**श्रीदेवी**—लीले, तू आपल्या संकल्पाने आकाशात कल्पिलेला वृक्ष तुझ्या दृष्टीने जरी सत्य असला तरी इतराच्या दृष्टीने तो असत् ( शून्य ) आहे. आमचे देह तुझ्या शरीराप्रमाणे तमोगुणापासून झालेले नाहीत, तर ते शुद्ध सत्त्वगुणापासून झालेले आहेत. यास्तव ते चिद्रूपच आहेत मुख्य परमात्म्यामध्ये व या आमच्या शुद्ध-सत्त्व-कार्यरूप देहामध्ये फारसे अंतर नसते. ह्मणून मला हा देह न सोडिताच तेथे जाता येते. ह्मणजे वायु जसा गंधाशी ( सुवासाशी ) मिळून जातो त्याप्रमाणे मी या माझ्या शुद्ध सात्त्विक देहास त्या सूक्ष्म तत्त्वाशी मिळवून पाहिजे तेथे जाईन ज्याप्रमाणे वायु वायूशी, जल जलाशी, व अग्नि अग्नीशीं मिळून जातो त्याप्रमाणे हा माझा देह अन्य मनोमय देहाशी व वस्तूशी मिळून जातो त्यामुळेच तुझ्या भर्त्याच्या सांकल्पिक सर्गाशी याचा योग होऊ शकेल

**लीला**—असे जर आहे तर माझा देहही, वस्तुतः मनोमात्र असल्यामुळे तुझ्या देहाच्या जातीचाच आहे. यास्तव तुझ्या देहाशी तादात्म्य पावू किंवा संयुक्त होऊन ( मिळून ) तो तेथे जाऊ दे. त्याच्यावरील अहंकार सोडून व त्याला येथे झोपेत ठेवून जाण्याचे काय कारण?

**श्रीदेवी**—माझा देह पृथ्वीचा विकार आहे, असे तू समजतेस व माझा चिन्मात्र आहे, असे मी समजते. त्यामुळे तुझ्या पार्थिव देहाचें माझ्या देहाशीं तादात्म्य किंवा संयोग होणे शक्य नाही कल्पित पर्वत

व्यावहारिक सत्य पर्वत याचे ऐक्य होईल का ? कधीच नाही. तू म्हणशील की, मी याला मनोमय समजते. पण नुस्ते समजून काय उपयोग? तसा अनुभव आला पाहिजे. तुम्ही अज्ञ मानव या आतिवाहिक (सूक्ष्म) चित्तदेहासच आधिभौतिक स्थूल देह समजता. नुसते समजतच नाही, तर दीर्घ कालापासून तशी तुमची भावना दृढ झाली आहे नी समाधीच्या अभ्यासावाचून क्षीण होणार नाही. दीर्घकाल समाधीचा अभ्यास केल्यावर हा स्थूल देह आतिवाहिक–भावास प्राप्त होईल.

**लीला**—समाधीच्या अभ्यासाने–माझा देह आतिवाहिक आहे, हा प्रत्यय दृढ झाला असता या देहाची काय वाट होते ? इतर सर्व प्राण्याचे स्थूल देह तर नाश पावतात. त्याप्रमाणेच जीवन्मुक्त योग्याचा देहही नाश पावत असल्यास त्याला आतिवाहिक–भाव कसा प्राप्त होणार ?

**श्रीदेवी**—तत्त्ववेत्याचा देह ज्ञानाच्या योगाने बाधित होत असतो. त्यामुळे जळलेल्या वस्त्राप्रमाणें तो वस्तुतः नसतोच. पण वस्त्र जळल्यावरही जसा त्याचा भास होत असतो त्याप्रमाणे तत्त्वज्ञानानतर पूर्वीच्या वासनेमुळे त्याचा काही काल भास होतो. पण दीर्घ समाधि–अभ्यासाने वासना क्षीण झाली की, तो उत्तरोत्तर सूक्ष्म होत जाऊन आतिवाहिक बनतो. त्याचा नाश होत नाही. कारण जे खरोखर असतें त्याचा नाश होतो किंवा होत नाही, असे व्यावहारिक दृष्ट्या तरी म्हणता येते, पण वस्तुत जे मुळी नाहीच त्याचा नाश कसा होणार ? मुलि, दोरीच्या ठिकाणी झालेला सर्पभ्रम दोरीच्या ज्ञानामुळे बाधित झाला असता सर्प नष्ट झाला की नाही, याची चर्चा कशी करिता येईल ? सत्य अधिष्ठानाचा साक्षात्कार होऊन असत्य भ्रम नाहीसा झाला असता भ्रमाने भासणारा पदार्थ जसा दिसत नाही त्याचप्रमाणे ब्रह्मज्ञान झाले असता स्थूल देह दिसत नाही. हा कल्पित प्रपच पूर्वी होता, पण तो आता ज्ञानाच्या योगाने बाधित झाला आहे, असे ह्मणणे सुद्धा तात्त्विकदृष्ट्या बरोबर नाही कारण तत्त्वतः प्रपचाची असभवनाच आहे. ह्मणजे वस्तुत' तो सभवत नाही. तर तुह्मी आपल्या देहादिकास कसे पहाता ? ह्मणून विचारशील तर सागते. परब्रह्माच्या योगाने अतर्बाह्य व्याप्त व एकात एक असलेले हे कोशपचक परब्रह्मच आहे. ते आपल्या परम महिम्यामध्ये स्थिर आहे या मिथ्या कार्य समूहात ते मुळींच राहत नाही, असे समजून आह्मी त्या सत्य

( अबाधित ) वस्तूस पहातों. पण तूं त्यास पहात नाहींस. कारण तुझा बोध चांगला रूढ झालेला नाहीं.

**लीला**—पण अदृश्य चित् दृश्यसत्त्वरूपतेस कशी प्राप्त झाली ?

**श्रीदेवी**—लिंगात्म्याच्या सर्गामध्यें त्यास विषय करणाऱ्या चैतन्याचा चित्त्व हा धर्म उद्भवतो व पंचीकरणकल्पनेने जेव्हा स्थूलरूपी कल्पना होते तेव्हापासून त्यात अनुगत असलेले सत्त्व दृश्याप्रमाणे होऊन आपणच आपल्यास भ्रांतीने पहातें.

**लीला**—पण एक, अत्यंत शांत व सर्व विभागशून्य असे पर तत्त्व असताना त्यांत कल्पनेस अवकाशच कसा मिळाला ? कारण पूर्वी जे दूध असते तेंच पुढें दहीं होतें व ते एकदा दहीं झालें कीं मग दुधाचे आस्तित्व नसते. पण ब्रह्म एक व सत्य ह्मणजे कालत्रयसंबंधशून्य आहे. तेव्हा त्याचे ठायीं प्रथम विकार कसा होणार ?

**श्रीदेवी**—ब्रह्माच्या ठिकाणीं होणारा हा विकार जर सत्य असता तर तू ह्मणतेस तसा दोष आला असता. पण सोन्याचे ठायीं जसे कडे, जलामध्यें जसे तरंग, स्वप्न, मनोराज्य इत्यादिकांतील विषयाचे ठायीं जसें सत्यत्व तसें ब्रह्माचे ठायीं हे प्रपंचत्व मिथ्या आहे. जलादिकाचा अनुभव आला असता तरंगादि विकार जसे लुप्त होतात त्याप्रमाणे ब्रह्मानुभव आला असता प्रपंचाचा लय होतो. आकाशांत धूळ जशी नसते तसा ब्रह्माचे ठायीं एकही विषय नाही. जें काहीं भासत आहे तें सर्व ब्रह्म आहे.

**लीला**—देवि, इतके दिवस आह्माला या भ्रमांत कोणी पाडिले होते ?

**श्रीदेवी**—अग खुळे, अविचाराने तुला या भ्रमांत पाडिले आहे व त्यामुळेच तू फार दिवसापासून अनर्थांत पडून व्याकुळ झाली आहेस. हा अविचार स्वाभाविक आहे. ह्मणजे तो कोणाच्या उपदेशावाचून आपोआप प्राण्याचे ठायीं प्रवृत्त होत असतो. पण विचाराच्या योगाने तो नाहीसा होतो. विचारानें जिला बाधित करून सोडिले आहे अशी अविचाररूपी अविद्या ब्रह्मसत्ताच बनते. त्यानंतर अविचार रहात नाहीं; अविद्येचें नांव ऐकू येत नाहीं; बंधन व मोक्ष याची वार्ता उरत नाहीं आणि सर्व जग शुद्ध व आनंदस्वरूप बोधमय होऊन जाते. इतके दिवस

तू या तात्त्विक गोष्टींचा विचार केला नव्हतास व त्यामुळें तुझी द्वैत-वासना दृढ व पुष्ट होऊन राहिली होती. तुझ्या दु:खाचें व व्याकुळ होण्याचे कारण ती वासनाच आहे. आता तुला मी या तात्त्विक दृष्टीचा उपदेश केला आहे. त्यामुळे तुझी द्वैतवासना शिथिल होऊन तत्त्ववासना दृढ होईल व अतीं तीच मुक्ति देईल. तुझ्या चित्तात विवेकाचे बीज पडलें आहे. हें ससारसज्ञक दृश्य आरंभींच मुळी उत्पन्न झालेलें नाही, असे समजल्यावर त्याच्या विषयी तुझ्या चित्तांत वासना कशा उद्भवतील? द्रष्टा, दृश्य व दर्शन याचा अत्यत अभाव झाल्यावर मन एकाच वस्तूच्या ध्यानात तत्पर होऊन क्रमाने तुला निर्विकल्प समाधीचा अनुभव घडेल. त्यामुळें वासनाचा सर्वस्वी क्षय होऊन राग (तृष्णा), द्वेष इत्यादि वृत्ती उदय पावणार नाहीत. या ससाराचा सभव निर्मूल होईल व येणे-प्रमाणें वरील समाधि प्रतिष्ठित होईल माया व मायेची कार्यें याच्या अधिष्ठानभूत आत्म्याचा तुला अवलब करिता येईल. आत्मावलबन केल्याने तुझा भ्रातिरूपी मळ निघून जाईल. भ्रातीच्या अभावीं तिचे कारण अविद्या व कार्य वासना याचा बाध होऊन मोक्षाख्य परम पुरुषार्थ तूच स्वत. होशील २१.

सर्ग २२—या सर्गात तुर्यावस्थेचे लक्षण, जीवन्मुक्ताची स्थिति, वासना क्षीण होण्याचा उपाय व त्याचा अभ्यास याचें वर्णन केलें आहे

**श्रीदेवी**—लीले, ज्ञान दृढ झाले असता स्थूल देहभावाची निवृत्ति व आतिवाहिक देहभावाची प्राप्ति होते, असें जे मीं तुला आताच सागितले आहे तेच चागल्या रीतीने समजावें ह्मणून मी अनेक दृष्टात देते.—स्वप्नातील व्यवहार करिताना स्वाप्न देह खरा वाटतो पण तो खरा नसतो. त्याचप्रमाणे जाग्रत्कालीं सत्य वाटणारा हा देह खरा नव्हे. त्याच्या विषयींची वासना क्षीण झाली कीं, तो असत्य ठरतो. हा स्थूल देहच मी आहें, असे समजणें हीच त्याच्या विषयींची वासना होय. जाग्रत्समयीं मनोराज्यातील किंवा स्वप्नातील देह मिथ्या ठरून हा देह जसा भासू लागतो त्याप्रमाणें या देहाची वासना क्षीण झाली असता आतिवाहिक देह स्पष्ट अनुभवास येतो. निजल्यावर वासनाबीज उदय न पावल्यास जशी गाढ झोंप लागते त्याप्रमाणें जाग्रतींत सर्व वासनाबीज बाधीत झालें असतां जीवन्मुक्तीचा उदय होतो. आता तू ह्मणशील कीं, जीव-

न्मुक्तानाही वासना असते. कारण तिच्या वाचून त्याचा अन्नपानादि व्यवहार होणें अशक्य आहे. पण त्याची जी वासना असते ती खरी वासनाच नव्हे तर खऱ्या वासनेचा बाध झाल्यावर राहणाऱ्या वासनेच्या अधिष्ठानाच्या सत्त्वाचेच ते शुद्ध वासना हे नाव आहे. ह्मणजे जळून भस्म झालेल्या वस्त्राच्या भस्मास जसे वस्त्र ह्मणावे तशातलाच हा प्रकार आहे. ( सामान्य सत्ता सर्व वासनामध्यें अनुगत असते. व शुद्ध वासना हें तिचेच नाव आहे, असा त्याचा भावार्थ. ) मूर्च्छा व सुषुप्ति या दोन अवस्थामध्ये थोडे अतर आहे. वासनाचा उद्भव होणे व त्याचा काही निमित्ताने पराभव होणे, अशा दोन रीतींनी वासना निद्रित होतात. सुषुप्तिसमयीं वासनाचा उद्भव होत नाही व जाग्रतींत मुर्च्छा येते तेव्हा त्या काही निमित्ताने पराभूत होतात. सुषुप्तीत वासनाचा उदय होत नाही व अत करणाच्या विशेष रूपाचा लय झाल्यामुळे त्या अवस्थेत त्याचा उदय होणे शक्यही नाही, हे प्राय सर्व व्यावहारिकास ठाऊक आहे. निद्राकाली वासनाचा उदय होणे ह्मणजे तीच स्वप्नावस्था होय. ही जाग्रत् व सुषुप्ति याच्या मधली अवस्था आहे. जाग्रतीत वासनाचा दुःखातिशयामुळे पराभव होतो, व त्या अवस्थेस मूर्च्छा ह्मणतात, हेही तुला ठाऊक आहे. आता तुर्या ह्मणजे काय ते तुला मी सागते. वासनाचा समूळ क्षय होणे हीच तुर्यावस्था आहे. परमपदाचा साक्षात्कार झाला असता जाग्रतीतही ही अवस्था प्राप्त होते. तीच जिवत मनुष्याची जीवन्मुक्ति होय. पण या अवस्थेचा अनुभव सामान्य जनास येत नाही. कारण ज्या अवस्थेत सर्व वासनाचा क्षय होणे अवश्य आहे अशी ती अवस्था दीर्घकाल अभ्यास व पुण्याचा प्रचड साठा यावाचून प्राप्त होत नाही. बर्फ उष्णतेमुळे जसे वितळून जाते व त्याचे पाणी होते त्याप्रमाणे शुद्ध सत्त्वाच्या अनुरोधानें रहाणारे ( म्हणजे समाधीच्या योगाने एकाग्र झालेले ) व त्यामुळे वासनारहित झालेले चित्त आतिवाहिकतेस प्राप्त होते. त्यानतर ते व्युत्थान-व्यवहारसमयीही ( म्हणजे समाधि सोडून उठल्यावर व्यवहार करीत असतानाही ) दुसऱ्या सर्गातील व दुसऱ्या जन्मातील चित्ताशी आणि सिद्ध, देव, योगी इत्यादिकाच्या शरीराशी ऐक्य पावते. दीर्घ अभ्यासाच्या योगानें जेव्हा तुझा हा अहभाव शात होईल तेव्हा तुला स्वाभाविक चिद्रूपतेचा अनुभव येईल. तो अनुभव म्हणजे दृश्य प्रपचाची परमावधीच

होय. ( त्यानंतर दृश्याचा भास होणार नाही, असा त्याचा भाव. ) जेव्हा तुझा आतिवाहिक भाव अत्यंत स्थिर होईल तेव्हा तुला संकल्पाने दूषित न झालेले ( नित्य ) पवित्र लोक दिसतील. यास्तव, प्रिय लीले, वासना क्षीण होण्याकरिता प्रयत्न कर. त्या क्षीण झाल्या म्हणजे तू जीवन्मुक्त होशील. पण यावेळी तुझे चित्त–तो गिरिग्राम पहावा–या इच्छेने प्रतिबद्ध झाले आहे. त्यामुळे याक्षणीं तुझ्या हातून वासना–क्षयाकरिता अभ्यासही होणार नाही व चांगलासा आत्मबोधही होणार नाही. यास्तव तो बोधचंद्र परिपूर्ण व शीतल होईतो तू या देहास येथेच ठेवून दुसरा लोक पहा.

**लीला**—माझ्या या देहास आपल्या आतिवाहिक देहाशीं मिळवून तू कां नेत नाहीस ?

**श्रीदेवी**—अग खुळे, तसे जर करिता आले असते तर मी एवढा वेळ तुझी उपेक्षा कां केली असती ? पण मांस–देह मांस–देहाशींच मिळू शकतो. आई, आपल्या मांस देहाच्या कंबरेवर आपल्या मुलीच्या मांस देहास उचलून घेते. व्यावहारिक कर्मांमध्ये चित्तदेहाशीं त्याचा संबंध होऊं शकत नाही. ज्ञानी व अज्ञानी या दोन्ही प्रकारच्या लोकांच्या अनुभवाने सिद्ध झालेली वस्तुस्थितिच मी तुला सांगत आहे. हा वर किंवा शाप नव्हे.

**लीला**– लोकसिद्ध वस्तुस्वभाव जर बदलणे शक्य नाही तर वासना क्षीण झाल्यावर आतिवाहिक भाव तरी कसा होईल ?

**श्रीदेवी**—ज्ञानाचा दृढ अभ्यास झाला असता संसारवासना क्षीण होतात व त्यामुळे हा देहच आतिवाहिक होतो.

**लीला**—जीव आतिवाहिक देहाने परलोकीं जातो व त्याचा मेलेला स्थूल देह येथे रहातो, हे सर्वांस ठाऊक आहे. तेव्हा एकाच देहाचे आतिवाहिकभावाने जीवंत असणे व स्थूलभावाने मरणे एकाच वेळी कसे संभवते ?

**श्रीदेवी**—मरणसमयीं याच शरीरांत उत्पन्न होणारी ती आतिवाहिकता कोणाच्याही अनुभवास येत नाही. फार काय पण त्या मरणोन्मुख प्राण्यासही तिचे ज्ञान होत नाही ( पण ज्ञानाच्या दृढतेमुळे प्राप्त होणारी ही आतिवाहिकता ज्ञात्याच्या अनुभवास येते. ) अज्ञानी पारलौकिक देह घेण्याकरिता मरत असतो. यास्तव तो आपल्या अज्ञानानें

कल्पिलेल्या देहाच्या आरंभास उपयोगी असलेल्या भूतमात्रांनीं परिवेष्टित होत्साता परलोकीं जातो. पण त्या मात्राचा त्यास अनुभव येत नाही. त्यामुळें त्याची ती आतिवाहिकता त्याच्या दृष्टीनें असून नसून सारखीच त्याचा अज्ञानानें कल्पिलेला भूतमात्राश ( स्थूल अज्ञानदेह ) मरून पडतो, असें जवळच्या लोकांस दिसते वस्तुतः पाहिल्यास हा देह मरत नाहीं व जीवतही कधीं नसतो. मरण व जीवन ह्या स्वप्नाप्रमाणे भ्राति होत. यास्तव तू ह्मणतेस तशी शका घेण्याचे काही कारण नाही. सकल्पाने बनविलेल्या पुरुषाचें मरण व जीवन जसे असत्य तसेच त्या शरीराचे मरण—जीवन असत्य भासते, असे तू समज.

**लीला**—देवि, तू मला जे हे निर्मल ज्ञान सागितलेस ते ऐकून माझ्या चित्तास मोठी शाति प्राप्त झाली आहे. दृश्य खरे आहे अशी जी माझी इतके दिवस समजूत होती ती शिथिल झाली. आता माझ्यावर उपकार करून तत्त्वाचा अभ्यास ह्मणजे काय ? तो कसा करावा ? त्याची पुष्टि कशी होईल व तो पुष्ट ह्मणजे दृढ झाल्याने कोणता लाभ होईल, ते मला साग.

**श्रीदेवी**—लीले, अभ्यासावाचून काहीं सिद्ध होत नाही व अभ्यासाच्या योगाने सिद्ध होत नाही असेही काही नाही. आता अगोदर अभ्यासाचे स्वरूप तुला सागतें. श्रवणाच्या व मननाच्या योगाने निश्चित झालेले तत्त्व आपल्या बुद्धीवर आरूढ व्हावे ह्मणून त्याचेच सतत चितन करणे, दुसऱ्या ज्ञानी पुरुषाच्या अनुभवाशीं आपला अनुभव जुळतो की नाही हे पहाण्याकरिता त्यास आपले तत्त्वज्ञान सागणे, न कळलेला ज्ञानाश कळावा ह्मणून बरोबरीच्या योग्यास आपला अनुभव सागून त्याचा ऐकणे व अशा रीतीने त्या एका तत्त्वामध्येच तल्लीन होऊन रहाणे यास अभ्यास ह्मणतात. यातील पहिल्या तीन उपायानी "तत्त्वाचा असभव आहे" अशा स्वरूपाची जी असभावना ती निवृत्त होते व शेवटच्या उपायाने ह्मणजे तदेकपरायण झाल्याने—मी देह आहे; कर्ता आहें; ब्राह्मण, मनुष्य, ज्ञानी, काळा, गोरा आहे—इत्यादि विपरीतभावना नष्ट होते. दृढ वैराग्य हेच त्याचे लक्षण आहे. यास्तव जे विरक्त महात्मे पुनर्जन्म घेण्याचा प्रसग न यावा ह्मणून मोठ्या प्रयत्नानें विषयवासनाचा क्षय करितात ते या लोकीं धन्य होत. सर्व परिग्रहाचा ( ह्मणजे

स्त्री, पुत्र, धन, गृह, इत्यादिकांचा ) त्याग करणे, या सौंदर्यानें व वैराग्य-रसानें युक्त असणाऱ्या ज्याची मति आनंदाचा अनुभव घेत असते ते उत्कृष्ट अभ्यासी होत. ( श्रवण, मनन इत्यादिकात तत्पर होणें हेंही तत्त्वाभ्यासाचे लक्षण आहे, असें आता देवी सागते—) ज्ञाता व ज्ञेय याचा अत्यत अभाव व्हावा ह्मणून युक्ति व शास्त्र याच्या योगाने जे प्रयत्न करितात तेही ब्रह्माभ्यासीच होत. ( येथे युक्ति या शब्दानें केवळ प्रमाणाच्या व प्रमेयाच्या तत्त्वनिश्चयास अनुकूल असलेली युक्ति घ्यावी व शास्त्र या शब्दाने केवळ अध्यात्मशास्त्र घ्यावे. ) हे दृश्य त्रिकालीही सत्य नाहीं, तर ते सदा ह्मणजे वर्तमान कालींही मिथ्या ( बाधित होणारें ) आहे, असें वारवार चितन करणे हाही ब्रह्माभ्यास आहे. हे दृश्य सत्य असणे संभवत नाही, असा बोध झाल्यामुळे राग—द्वेषादि दोष क्षीण होतात व मननाच्या योगाने विद्यावासना दृढ होते. नंतर त्यामुळे उत्पन्न होणारी जी आत्मप्रीति तोच ब्रह्माभ्यास आहे. दृश्य मिथ्या आहे, ही भावना दृढ झाल्यामुळे जो रागादिकाचा क्षय होतो तोच ज्ञानाच्या उपयोगी असतो. पण केवळ बलात्काराने राग-द्वेषाचा निरोध करणे याला तप ह्मणतात. तो निरोध ज्ञानाच्या मुळींच उपयोगी नसून दुःख मात्र देतो. कारण अत्यसाक्षात्काररूप ज्ञान व ज्ञेय ब्रह्म यासच दृश्यासभव—बोध ह्मणतात. ( कारण तशा बोधाच्या योगाने दृश्याचा असभव आहे, असें निश्चित होते. ) त्याच्या अभ्यासाने निर्वाण प्राप्ति होते. यास्तव अभ्यास मोठे फल देणारा आहे. असो, याप्रमाणे चित्तात विवेक सतत जाग्रत् ठेविल्याने अविद्या आपल्या मोहसज्ञक कार्यासह निवृत्त होते.

**वाल्मिकि**—राजा, मुनिवसिष्ठ रामचद्रास असे सागत आहेत तों भगवान् दिनकर अस्ताचलाच्या शिखरावर गेला व ते पहाताच सर्व सभासद सायंकालीन नित्य कर्मानुष्ठानाकरिता आपापल्या स्थानी गेले. दुसऱ्या दिवशी प्रातःकालच्या सर्व अवश्य क्रिया सपवून त्या गुरु—शिष्यांचा रमणीय सवाद ऐकण्याकरिता ते मोठ्या उत्कठेने राजसभेत आले २२. येथे चवथा दिवस सपला.

**सर्ग २३**—लीलेनें गिरिग्राम पाहण्याच्या इच्छेनें, योगाच्या योगानें, स्थूल शरीराचा त्याग केला व नंतर त्या दोघीजणी त्या विस्तृत मंडपाकाशात गेल्या, असें वर्णन या सर्गात केलें आहे.

**श्रीवसिष्ठ**—इतके संभाषण करून त्या दोघीजणी समाधिस्थानीं जाऊन बसल्या. त्यावेळी तेथील सर्व सेवकवर्ग स्वस्थ झोप घेत होता अंतःपुराचे सर्व दरवाजे घट्ट बंद करून टाकिले होते. त्या गृहांत चोहो-कडे सुवास सुटला होता, शवाच्या अंगावरील पुष्पे जशीच्या तशीच टव-टवीत होती व बाहेरील सेवकवर्ग नगररक्षणाच्या कामात दक्ष होता. असो, लीला व देवी यांनी शवाजवळच आसनावर बसल्यावर चित्ताचे ऐकाग्र्य करण्याकरिता आपले अंग निश्चल केले व त्या चित्राप्रमाणें स्तब्ध होऊन राहिल्या. त्यांनी सर्व चिंता सोडिल्या व इंद्रियांचा निरोध केला. त्याबरोबर त्या अत्यंत शांत, शुद्ध व स्पंदरहित झाल्या. त्यास निर्विकल्प-समाधीची प्राप्ति होताच बाह्य ज्ञान होईनासे झाले त्या देहादि अनात्मव-स्तूस विसरल्या. ऋतु बदलला असता वेली पूर्व रसास सोडून नव्या रसाने जशा भरून जातात त्याप्रमाणे त्या पूर्व वासनांचा त्याग करून अगदी नव्या व शुद्ध झाल्या मी व हे जग, यांचा असंभव आहे, असे त्यास स्वानुभवाने समजताच त्यांच्या मागचे दृश्य-पिशाच सुटले. निष्पाप रामा, आह्मा अनुभवज्ञानानें युक्त असलेल्या पुरुषांना जसे दृश्य मृगजलासारिखे दिसते तसे ते त्या समाधीत असलेल्या स्त्रियांना सशाच्या शिंगाप्रमाणे असत् दिसले. ( अर्थात् आह्मी दृश्यास पहात असूनही ते त्रिकाली असत् आहे, असें जाग्रतीतही विवेकाने जाणतो. पण त्यांना समाधीत गेल्यावर मात्र ते असत् आहे, ते मुळीच नाही, असा अनुभव आला, असा याचा भाव ) कारण उत्पत्तीपूर्वी व नाशानंतर जे नसते ते वर्त-मानसमयीही नसते. यास्तव ते भासले तरी व न भासले तरी असत्च होय

असो. त्यानंतर त्या दोघीही सूर्य, चंद्र इत्यादि सर्व साकार वस्तु व पृथ्वी, जल, तेज आणि वायु यांचा नाश झाल्यावर राहणाऱ्या एका शुद्ध आकाशाप्रमाणे अगदी शांत व शुद्ध झाल्या. पण पुढील आकाशात जातांना देवीचा केवल ज्ञानदेह होता व लीलेचा तिच्या ध्यान-ज्ञानानुरूप अज्ञा-नमिश्रित ज्ञानदेह होता. ह्मणजे त्यांच्या ज्ञानाप्रमाणे त्यांच्या शरीरांत न्यूना-धिक ज्ञान-सामर्थ्य होते. पण त्या दूर आकाशात गेल्या अशी जी त्यांची कल्पना झाली आहे ती खरोखरीच त्या, त्या देहांतून निघून, कोठे दूर गेल्या होत्या, ह्मणून नव्हे, तर त्या शरीरांतील हृदयापासून कंठापर्यंत टीचभर प्रदेशांत जो नाडीमार्ग आहे त्यांत आरूढ होऊन पूर्व संक-

त्यांच्या जाग्रत् झालेल्या संस्काराच्या द्वारा त्याची तशी कल्पना झाली. अर्थात् त्या टीचभर प्रदेशातच त्याना ते सर्व दिसलें. असो, त्या दोघी चिदाकाशरूपी झाल्या. त्यांची शरीरें आकाशांत फिरू लागलीं. त्या सुदर स्त्रियास पुढे फार मोठे आकाश दिसले. कारण विषयानुरूप व्यवहार करविणे हा विषयज्ञानाचा स्वभावच आहे. आपण आता कोटि योजनें दूर उडून जाऊ या, असा चित्प्रधान-मानस-सकल्पवृत्तीने त्यानी बेत केला व त्याप्रमाणें वस्तुत त्या आपल्या अत:पुरातच असताना पूर्व सकल्पाप्रमाणे त्या विस्तृत आकाशात चिदाकाश शरीराने गेल्या व तेथे एकमेकीस पहाताच त्या पूर्वीप्रमाणे मैत्रिणी झाल्या. ( अर्थात् या पूर्वीचे त्याचे सर्व ज्ञान व सकल्प स्वतत्रपणे होत होते. पण ते एकसारखेच होत असल्यामुळे दोघीचा एकदम निर्देश केला आहे. वस्तुत· आकाशात दूर उडून गेल्यावर त्याची गाठ पडली ) २३

**सर्ग २४**—अनत विश्वाचे वैचित्र्य ज्यात्त्यामध्यें साठविले आहे, अशा आकाशाचें व त्यातील त्या दोघोंच्या मार्गाचे या सर्गात वर्णन केले आहे.

**श्रीवसिष्ठ**—एकमेकीचा हात धरून त्या दोघीजणी आणखी वर गेल्या व त्यानी चागले निरीक्षण केले. तेव्हा ज्याचा अतर्भाग अतिशय निर्मल आहे असे, गभीर, एका सागरासारिखे अतिशय वाढलेले, जणु काय कोमल, मद वायूच्या स्पर्शाने सुख देणारे, शून्यतारूपीजलात निमज्जन केल्यामुळे ( बुडी मारिल्याकारणाने ) अतिशय आह्लाद देणारे, सज्जनाच्या चित्ताहूनही शुद्ध व प्रसन्न आणि स्वत भव्य आकाश त्याना दिसलें. चारी दिशातील मेरु-मदारादि पर्वताच्या शिखरावर असलेल्या निर्मल मेघाच्या उदरातील ( ह्मणजे मध्यभागी असलेल्या ) गच्चीवर त्या दोघीनीं जरा विश्राति घेतली. गधर्व व सिद्ध याच्या गळ्यातील मदारादि पुष्पमाळाच्या सुवासाने मनोहर आणि जवळच्या चद्रमडालातून निघाल्यामुळे अति शीतल व मद वायूमध्ये त्या रममाण झाल्या. एकाद्या कमलयुक्त सरोवरात जसे स्नान करावे त्याप्रमाणे वीजेने युक्त असलेल्या व जलाने भरलेल्या मेघामध्ये त्यानी स्नान केले. अनेक भूतलावरील हिमालय, विंध्यादि इत्यादि पर्वत हेच ज्यातील कमलाच्या कांद्यापासून निघालेले अंकुर आहेत अशा दिशामध्ये त्या यथेच्छ फिरल्या. वायूच्या वेगामुळे गंगेच्या प्रवाहातून जे असख्य बिंदु उडत होते त्यात, ही कारंजानी युक्त असी

धारागृहेच आहेत, अशा समजुतीनें त्या भ्रमण करूं लागल्या. त्यावेळीं त्यांच्या मस्तकावरील मेघमंडल, हा धारागृहाचा मंडपच आहे, असा त्यास भास होणें अगदी साहजिक होतें. असो, याप्रमाणें त्या विश्रांति घेत घेत आपल्या शक्तीप्रमाणे जात असताना, एका शून्य प्रदेशीं, भुवने व त्यांतील जन यास उत्पन्न करण्याचें काम जेथे चालले होते, असे एक आकाश त्यास दिसले. एकव्या ज्ञप्तीने हे आकाश पूर्वीं पाहिले होते. पण त्या दोघींनीं मिळून ते आताच पाहिले. अर्थात् त्याना ते अपूर्व आकाश दिसले. अनेक संकटानी युक्त असलेल्या गर्भाशयादि असंख्य छिद्रानी तें भरलेले होते अर्थात् तें आकाश (सर्व प्राण्याच्या संसारदु खाचें आश्रयस्थान) या जगासारख्या अनंत कोटी जगानीही भरणार नाही, इतके मोठे होतें. एकावर एक व उंच उंच अशा अनेक व पृथक् पृथक् भूतलरूपी विचित्र अलंकाराकार विमानानीं ते युक्त होते चोहोकडून अंतरिक्षास भरून सोडणाऱ्या मेरु इत्यादि पर्वताच्या पद्मराग–मणिमय तटाच्या प्रकाशामुळे त्याचे उदर कल्पांतीच्या ज्वालेसारिखे दिसत होते. त्याच पर्वताच्या मुक्तामय ( मोत्याच्या ) शिखराच्या प्रभेमुळे ते हिमालयाच्या सपाट भूमीप्रमाणें दिसत होते सुवर्ण पर्वताच्या कांतीमुळे ते सुवर्ण स्थलाप्रमाणें चमकत होते. त्याच पर्वताच्या हिरव्या रंगाच्या मरकत मण्याच्या प्रकाशाने ते आकाश दूर्वानी युक्त असलेल्या भूमीप्रमाणे हिरवें झाले होते. कोठे कोठे तर पहाणाऱ्याच्या नेत्रापुढील रूपाचा क्षय करण्यास सवकलेल्या अंधकाराच्या योगाने ते काळे दिसत होते. क्वचित् स्थळी पारिजात कल्पलतेच्या वनावर चंचल विमानाचे स्थान असल्यामुळे जवळून पहाणारास मंजरीच्या आकाराचा देखावा दिसे व दुरून पहाणारास ते वैडूर्यमणिमय भूतल आहे, असा भास होई. त्या आकाशात मनोवेगानें जाणाऱ्या महासिद्धानीं वायूच्या गतीस तुच्छ करून सोडिले होते. विमानातील देवस्त्रियाच्या गानवाद्यादिकामुळे ते घुमघुमत होते. त्रैलोक्यातील श्रेष्ठ भूताच्या अनेक समूहाचा त्यात एकसारिखा संचार चालला होता. त्यामुळें त्यात एकच गर्दी उडाली होती. पण त्यातील देव राक्षसास दिसत नव्हते व राक्षस देवास दिसत नव्हते. आवह, प्रवह इत्यादि वातभेद ( भिन्न भिन्न वायु ) विमानाच्या समूहास वाहून नेत होते. वेगानें चालणाऱ्या विमानाचा ध्वनि मेघध्वनीस अगदीं तुच्छ करून सोडीत होता. ग्रह, नक्षत्रें

मेघ याच्या प्रचारामुळे ज्योतिश्चक्र फिरत होते. कोठे कोठें सूर्याच्या अगदीं जवळ असलेल्या सामान्य योग्यास सूर्यकिरणाच्या योगानें संताप झाल्यामुळे ते तें स्थान सोडीत होते. त्या आकाशात अल्पस्वल्प विमानास सूर्य जाळीत आहे व त्याच्या घोड्याच्या तोंडातून निघणाऱ्या वाऱ्याच्या योगानें तीं उडत आहेत, असें त्या दोघीजणींस आढळले. ( म्हणजे सामान्य पुण्यसंचयामुळे प्राप्त झालेल्या विमानादि वस्तूची तेथे फारशी दाद लागत नसे व त्याचा इतर बलाढ्य शक्तींच्या योगानें नाश होई. ) इद्रादि लोकपाल व अप्सरासमूह याच्या हातापायाच्या हालचालीमुळे ते चंचल असल्यासारिखा भास होत असे. देवींच्या अत:पुरांत जाळलेल्या धूपाच्या योगाने देवलोकचा ऊर्ध्वभाग मेघाच्छादित अतरिक्षाप्रमाणे दिसत होता. इद्र, चद्र, इत्यादि देवाच्या लोकात ( ह्मणजे त्याच्या त्याच्या स्वर्गात ) बोलाविल्यामुळे मोठ्या गडबडीने जाणाऱ्या अप्सराच्या शरीरावरील भूषणे गळून त्या आकाशात कोठल्या कोठे जात होतीं. पण इद्रादिकाचे पाचरण येताच आपल्या प्रिय अप्सराही आपणास सोडून तिकडे गडबडीनें जात आहेत, असें पाहून इद्रादिकाप्रमाणे पूर्ण ऐश्वर्याने युक्त नसलेले स्वर्गवासी सिद्ध क्रोध व असूया यानी युक्त होत व त्यामुळें त्याचे असलेले तेजही नष्ट होई. पुढे तेजोनाशामुळें ते सिद्धही आकाशाप्रमाणेच कृष्णवर्ण झाले आहेत, असें त्याच्या अनुभवास आले. ( तेजोनाशक तमोगुणाच्या प्राबल्याप्रमाणें तें आकाश अधकारमय होते, असा याचा शब्दश: भावार्थ आहे. ) बलाढ्य सिद्धाच्या समूहाच्या जाण्यायेण्यानें छिन्न भिन्न झालेल्या व त्यामुळें भीतीने जवळच असलेल्या हिमालयादिकाच्या शिखराचा आश्रय करणाऱ्या मेघाच्या योगानें त्या आकाशातील पर्वत वस्त्रयुक्त असल्यासारिखे दिसत होते. कावळे, घुबडे, गिधाडें, भास इत्यादि पक्षी त्यातून सैरावरा उडत होते. तरगाच्या योगानें समुद्र जसा नाच करीत असल्यासारिखा भास होतो त्याचप्रमाणे नाचणाऱ्या डाकिणींच्या योगाने ते आकाशही नाच करीत आहे, असे त्यास वाटले. ज्याचीं तोंडें कुत्रीं, कावळे, उट, गर्दभ इत्यादिकाच्या तोडासारिखी आहेत अशा योगिनी अणिमादि अष्टसिद्धींनीं सपन्न होत्या. त्यामुळे त्यास पाहिजे ती वस्तु बसल्या ठिकाणींच मिळत असे. तरी सुद्धा त्या उगीच दूर जाऊन परत येत होत्या व अशा

त्या योगिनींच्या योगानेही ते भरून गेले होते. लोकपालाच्या पुढेच असलेल्या व अधकाराप्रमाणे पहाणाऱ्याच्या दृष्टीस निरोध करणाऱ्या धुरासारिख्या धूम्रवर्ण मेघरूपी मंदिरात सिद्ध, गंधर्व इत्यादिकांच्या जोडप्यानीं सुरतोत्सवास प्रारंभ केला आहे, तसे त्यास दिसले. त्या आकाशातून जाणारे प्राणी स्वर्गातील दिव्य गायन व दिव्य स्तुतिपाठ ऐकून मदनाकुल होत होते. एकसारिखे चालत असलेल्या ज्योतिश्चक्रातील सूर्य व चंद्र याच्या गतीवरून त्यातील प्राणी शुक्ल-कृष्णपक्षादि कालविभागाचा निर्णय करीत होते. त्याच चक्राच्या एका सखल भागातून गंगेचा प्रवाह वहात होता. देवाची लहान लहान अर्भके हा सर्व चमत्कार पहाण्यात अगदी गढून गेली होती. त्या आकाशात कोठे वज्र, चक्र इत्यादि शस्त्राच्या देवता देहयुक्त होऊन संचार करीत आहेत, कोठे नारद, तुंबुरु गात आहेत; कोठे मोठमोठे मेघ वर्षाव करण्याकरिता जलाच्या योगाने स्वशरीर पुष्ट करीत आहेत, कोठे प्रलयमेघ गर्जना न करिता अगदी मुके होऊन राहिले आहेत, कोठे उडणाऱ्या कज्जलपर्वताप्रमाणे काळेकुट्ट पण सुंदर मेघ पसरले आहेत; कोठे मेघामध्ये विद्युत् चमकत आहे, कोठे ते वर्षाव करीत आहेत; कोठे निश्चल सागराप्रमाणे शून्यतारूपी जल शांत आहे, कोठे वायूरूपी नदीच्या प्रवाहात मोठमोठी विमाने हेच वाहणारे गवत व पाने आहेत कोठे त्या आकाशाचा काही भाग चंचल भ्रमरसमूहाच्या पृष्ठभागाप्रमाणे रमणीय दिसत आहे, कोठे ते पावसाळ्यातील नद्याच्या पाण्याप्रमाणे वायूच्या योगाने उडलेल्या धुळीमुळे धूसर दिसत आहे व कोठे त्याचे अंग विमानस्थ देवाच्या प्रभेमुळे चित्रविचित्र झाले आहे, असे त्यास दिसले कोठे मातृदेवताचा समूह त्यात अंतराळी नृत्य करीत होता, कोठे मद्यप्राशनामुळे योगीश्वरीचा गण मत्त होऊन गेला होता, कोठे शांत समाधि लावून चित्तविश्रांतीचा अनुभव घेणाऱ्या मुनिजनाच्या योगाने ते व्याप्त होते, काम-क्रोधादि वेगाचा ज्याने त्याग केला आहे अशा साधुचित्ताप्रमाणे ते कोठे सम व मनोहर दिसत होते कोठे तर गायन करणाऱ्या किन्नर, गंधर्व व देव याच्या स्त्रियाच्या योगाने ते व्याप्त होते, कोठे ते निश्चल नगरानी व्याप्त होते व क्वचित् त्यात चालणारी नगरे दिसत होती. कोठे ते रुद्रपुरानीं भरून गेले होते, कोठे मोठी ब्रह्मपुरे होती, कोठे मायाकृत नगरे व कोठे भविष्यत् नगरे होती. कोठे भ्रमण करणारे

अमृतपूर्ण चद्ररूपी सरोवर होतें व कोठे देवाच्या शक्तीनें घनीभूत झालेले जलमय सरोवर होते. तें आकाश क्वचित् उदय पावणाऱ्या चद्राने युक्त होते, कोठे सूर्योदयमय होतें; कोठे तर त्यात रात्र पसरली होती. कोठे ते सायकालीन सूर्य किरणाच्या योगाने कपिलवर्ण दिसत होते, क्वचित् धुक्याच्या योगाने धूसुर झाले होते व क्वचित् ते बर्फाच्छादित मेघयुक्त होते. त्यात क्वचित् स्थलप्रमाणेच लोकपाल विश्राति घेत होते. कोठें कोठे देव–दानवादि प्राणी खालींवर जाण्या–येण्यात व्यग्र होते. साराश येणेप्रमाणे ते आकाश अनेक प्राणी, अनेक क्रिया, अनेक पदार्थ, अनेक देखावे, असख्य चमत्कार व अवर्णनीय शोभा यानी भरलेले होते. उंबराच्या फळातील किड्याप्रमाणे ज्यातील प्राण्याचा सर्व व्यवहार चालला आहे अशा त्या चमत्कारिक आकाशास पाहून व त्यातील वैभवास तुच्छ लेखून त्या दोघीजणी पुनरपि भूलोकी जाण्यास तयार झाल्या २४.

**सर्ग २५**—सप्त सागर, द्वीपें, आणि ब्रह्माडावरणें यानीं युक्त असलेले एक अपूर्व भुवन त्यानीं पाहिलें, असें येथे वर्णन केले आहे.

**श्रीवसिष्ठ**—राघवा, ज्ञप्तिदेवीच्या मनात लीलेला जे भुवन दाखवावयाचे होते त्या अपूर्व भुवनास ( अर्थात् त्या इष्ट गिरिग्रामास ) त्या दोघीजणी येऊन पोचल्या व आकाशातून खाली उतरून त्यानी ते भूतल पाहिले. ( ते ब्रह्माड–पुरुषाचें हृदयकमल होते, असे आता वर्णन करितात. ) ते भूतल ह्मणजे ब्रह्माड–पुरुषाचे हृदयकमलच होते. अष्ट दिशा ह्याच त्याच्या आठ मोठ्या पाकळ्या होत्या. पर्वत हीच त्याची केसरे असून स्वसुवासाने ते भरलेले होते. नद्या हीच त्याची उपकेसरे असून हिमकण हेच त्यातील मकरद–बिंदु होते. भोग्यवस्तूतील गुण हेच त्याच्या देठातील ततु होत. ज्यातून पाण्याचे पूर वहात आहेत अशी पातालादि अधोभुवनें हीच ज्याच्या नालातील छिद्रे आहेत, असे ते कमल सूर्याच्या प्रकाशाने शोभायमान होत होते. ते मधुरादि अनेक रसानी भरलेले होते. त्याच्यावरून हस (सूर्य) भ्रमण करीत असे. रात्री त्याचा सकोच होत असे. पातालरूपी पका( चिखला )मध्ये निमग्न होऊन राहिलेला सर्पराज हेच त्याचे मृणाल ( बिस ) होते. जलापासून उत्पत्ति झालेली असल्यामुळे त्याचे आस्पद असा जो महासागर त्याच्या कपामुळे त्याचींही दिशारूपी दले कपायमान होत असत. दैत्य व दानव हेच त्यातील

कंटक होते. असो, अशा त्या कमलाची जंबुद्वीपसंज्ञक विस्तृत कर्णिका होती. नद्या हीच तिचीं मुख्य केसरें असून नगरें व ग्राम हीं गौण केंसरे होतीं. सात कुलपर्वत हींच तिचीं सुंदर बीजें असून त्याच्या मध्यभागी असलेल्या उच्च महामेरुनामक बीजानें तर तिचे अंतरिक्ष व्यापून टाकिलें होतें. अनेक सरोवरें हेच त्याच्या वरील दवाचे बिंदु होते. वन व इतर स्थल यांतील धूळ हाच त्या कमलाचा पराग होय. त्या कर्णिकेच्या चारी बाजूस ठिकठिकाणी मंडलें करून त्यात रहाणारे लोक हेच त्यावरील किडे होते. शेकडो योजने लांब असलेल्या व प्रति चंद्रोदयास वृद्धिंगत होणाऱ्या चारी दिशेंतील अष्टदिक्पालासह चार समुद्ररूपी मोठ्या भ्रमरानी ते व्याप्त असून नऊ भावानीं त्याचे नऊ विभाग करून तें वाटून घेतलें होतें. ते अनेक योजने विस्तीर्ण असून धुळीनें भरलेले होतें. साराश येणेंप्रमाणे ते भूमंडल अनेक देश, अनेक लोक, अनेक स्थावर पदार्थ व अनेक चमत्कारिक देखावे यानी भरून गेलें होतें. ते क्षीरसागरानें चोहो बाजूनीं परिवेष्टित असून त्याचें प्रमाण जंबूद्वीपाच्या दुप्पट होते. त्याच्या पलीकडे ( सभोंवार ) कंकणाकृति शाकाख्य द्वीप होते. त्यास नूतन, मधुर व शीत क्षीरसागराने व्यापिलें होतें. त्याच्या पलीकडे कुशद्वीप असून त्यासही पूर्व समुद्राप्रमाणेच कंकणाकृति दधिसमुद्राने वेष्टिलें होते. त्याच्या पलीकडे क्रौंचद्वीप असून ते घृतसागराने परिवेष्टित होते. त्याच्या पुढे शाल्मली द्वीप असून ते पापपूर्ण व सुरासागराने वेष्टित होते. त्याच्या पलीकडे गोमेदद्वीप असून ते इक्षु-इस सागराने परिवेष्टित होते व शेवटीं मधुर जलाच्या सागराने परिवेष्टीत असलेलें पुष्करद्वीप होते. त्याच्यापुढें भयंकर पातालादि लोक लागतात. सर्वांच्या मध्यभागीं असणाऱ्या जंबुद्वीपामध्ये चाललेले अनेक चमत्कार त्याच्या दृष्टीस पडले. त्यात कोठे काजळासारिखे काळे कुट्ट मेघ दिसत असून त्यातूनच क्षणप्रभा (वीज) चमकत आहे, कोठें उष्णता मी ह्मणत आहे व त्यामुळें नदी, नाले इत्यादिकांतील जल सुकून गेले आहे; कोठे असह्य वर्षाव होत असून नद्या भरून वहात आहेत; कोणी हसत आहेत, कोणी रडत आहेत; कोणी उदासीन होऊन शांतमनाने परमेश्वराचे ध्यान करीत आहेत; कोणी विक्षिप्त मनाने प्रवृत्तींत गुंग झाले आहेत; कोणी कलह करीत आहेत तर कोणी प्रत्यक्ष हिंसेसा

रखीं भयकर राक्षसी कामें करीत आहेत; कोणी भोजन करीत आहे; कोणी ते मिळविण्याच्या उद्योगात आहे; कोणी मोठ्या प्रयत्नाने भक्ष्य मिळवून त्याचा उपभोग घेणार, इतक्यात दुसरा कोणी बलाढ्य त्याच्या तोंडातून ते हिसकून घेत आहे व त्यामुळे तो निर्बल प्राणी आक्रोश करीत आहे; कोठे मोठमोठीं अरण्ये आहेत व त्यातील प्राणी आपापल्या स्वभावानुरूप चेष्टा करीत आहेत, कोठे खरी व कोठे मृगजळाचीं मोठमोठी सरोवरे आहेत; कोठे दिवस आहे; कोठे रात्र आहे, कोटे चद्राचा प्रकाश भुवनास प्रकाशित करीत आहे; कोठे अधकाराने त्यास आपल्या पोटात साठविले आहे; कोठे सायकाळ होत असून त्यावेळची शोभा नेत्रास आनद देत आहे, तर कोठे प्रातः-काल होत आहे, कोठे मोठमोठी नगरे आहेत, कोठे लहान ग्राम आहेत, कोठे पर्वताच्या रागा लागलेल्या असून त्यातून अनेक नद्या वहात जाऊन समुद्रास मिळत आहेत आणि कोठे शात व गभीर देखावा दिसत असून क्वचित् अगदी त्याच्या उलट प्रकार अनुभवास येत आहे. साराश, येणेप्रमाणे समुद्र, पर्वत, अरण्ये, लोकपाल, आपापल्या अविद्या-काम–कर्माप्रमाणे सुख–दु खादि फलभोग घेणारे नानाप्रकारचे असख्य स्थावर, जगम, स्थलचर व जलचर जीव यानीं व्याप्त असलेले ते भूतल पाहून लीला लागलीच त्या भूलोकीं असलेल्या आपल्या मदिराधारास ह्मणजे गिरिग्रामास पाहती झाली २५.

**सर्ग २६**—लीलेनें आपल्या गृहात आपल्या लोकास पाहिलें; त्याचा विलाप ऐकिला व त्याच्यावर अनुग्रह केला, असे आता वर्णन करितात.

**श्रीवसिष्ठ**—रामा, त्या दोघी सुदर स्त्रिया पद्मराज्याच्या आधारभूत ब्रह्माडमडलातून निघून वर वर्णन केल्याप्रमाणे दुसऱ्या ब्रह्माडमडलास येऊन पोचल्या. त्यातच त्या वसिष्ठ ब्राह्मणाचे स्थान होते. नतर त्या दोघी सिद्ध स्त्रियास त्याचे इष्ट गृह दिसले. तेथील कोणाही प्राण्याच्या दृष्टीं न पडता त्यानीं त्या ब्राह्मणास्पदाचे निरीक्षण चालविले. त्यातील सर्व दासी चितातुर होत्या. स्त्रियाचीं मुखें अश्रूनीं भिजून गेलीं होती. त्या सर्वाचीं वदनें निस्तेज दिसत होतीं. स्त्रियाच्या मुखचद्रावर हळद, कुकू, काजळ, इत्यादिकातील एकही शुभ लक्षण नव्हतें. तें अगस्त्यमुनीनें पिऊन टाकिलेल्या समुद्राप्रमाणे व उत्सवशून्य नगराप्रमाणें शून्य दिसत

होतें. ग्रीष्म ऋतूतील उष्णतेने वाळून गेलेल्या उपवनाप्रमाणे; वीज पडल्यामुळें जळलेल्या वृक्षाप्रमाणें; वायूने उडविलेल्या मेघाप्रमाणें, दवाच्या योगाने म्लान झालेल्या कमलाप्रमाणें किंवा तेल-वात संपलेल्या दीपाप्रमाणें ते गृह दुर्दर्श ( ज्याच्याकडे पाहवत नाहीं असें ) झालें होते. गृह-स्वामीच्या वियोगामुळें मेल्यासारखेंच झालेले ते गृह पाहून लीलेच्या चित्तात दयेचा प्रादुर्भाव झाला. प्रत्यक्ष दर्शन देऊन आपण या दीन व दुःखी प्राण्यावर अनुग्रह करावा; असें तिच्या मनात आले. शुद्ध ज्ञानाचा थोडासा अभ्यास केल्याकारणानें व ज्ञप्तिदेवीच्या कृपेमुळे ती देवाप्रमाणे सत्यसंकल्प व सत्यकाम झाली होती, ह्मणजे तिचा प्रत्येक संकल्प व इच्छा सफल होत असे. पापी प्राण्याचे संकल्प व इच्छा केवल सफल होत नाहीत, इतकेंच नव्हे; तर त्याच्या उलट फल मिळत असतें. असो, सत्यसंकल्प लीलेने मला व या माझ्या प्रिय देवीला हे माझे बांधव सामान्य स्त्रीस्वरूपाने पाहोत, असे मनात आणताच त्या गृहातील सर्व लोक त्यास लक्ष्मी व गौरीप्रमाणें पाहू लागले. त्यांच्या तेजानें त्या मृततुल्य गृहास शोभा आली. त्यानीं आपल्या गळ्यात पायापर्यंत लोंबणाऱ्या नानाप्रकारच्या ताज्या फुलाच्या माळा घातल्या आहेत, असें तेथील लोकास दिसलें. त्यामुळे सर्व उपवनास सुवासित करून सोडणाऱ्या या दोघी वसंतलक्ष्मीच तर नसतील, अशी त्यास शंका आली. सर्व औषधिवनें व ग्राम यास रसायनाच्या योगाने भरून सोडणाऱ्या व सर्वांस आह्लाद देणाऱ्या या दोन चंद्रकलाच असाव्यात, असा कित्येकानीं तर्क केला. त्यांचे केस काळेभोर व लांब होते, नेत्र हरिणींच्या नेत्राप्रमाणे गरगरीत व पाणीदार होते; त्यांची अंगकांति सुवर्णरसाप्रमाणे होती. त्या लावण्याच्या जणु काय खाणीच होत्या. त्यांचे तळहात रक्तकमलाप्रमाणे लाल होते. तळपाय कोमल पल्लवाप्रमाणें होते व त्यांच्या प्रेमपूर्ण दृष्टीनेच तेथील लोक अमृत-वृष्टीप्रमाणे तृप्त होत होते. असो; अशा प्रकारच्या त्या दिव्य स्त्रियास पाहताच, दुःखाने व्याकुळ झालेला त्या ब्राह्मणाचा ज्येष्ठशर्मानामक पुत्र गृहातील सर्व लोकासह उठून उभा राहिला व " तुह्मा वनदेवतांस नमस्कार असो, " असें ह्मणून त्याने त्यांच्यावर पुष्पें उधळलीं व त्यांच्या चरणावर पुष्पांजलि वाहिली. नंतर ज्येष्ठशर्मादि ते सर्व ह्मणाले-अहो वनदेवींनो, आमच्या दुःखनाशार्थ आलेल्या तुमचा जय-जयकार असो,

परदुःखनिवारण करणे हेच प्रायः सज्जनांचें स्वकर्म अथवा ब्रीद असतें. त्यावर त्या देवी मोठ्या आदरानें ह्मणाल्या–तुमच्या दुःखाचे कारण काय आहे? तुह्मी सर्व अशीं दुःखी का? ते ऐकून ज्येष्ठशर्मादिकानी आपल्या दुःखाचें कारण, असें सागितलें.—

जननी, काय सांगावें ? या गृहांत एक ब्राह्मणाचें प्रेमळ दापत्य होतें. ते सर्व अतिथींचें आतिथ्य करणारें, कुलाची वृद्धि करणारें व द्विजमर्यादेचें आधारभूत, असें होतें. पण पुत्र, पशु, बांधव इत्यादि सर्वांचा त्याग करून तीं दोघेंहीं आमचीं आईबापें स्वर्गास गेलीं. त्याच्या वाचून आह्मास हें त्रिभुवन शून्य वाटत आहे. ( प्रत्येक प्राणी आपल्या चित्ताप्रमाणें जगास पहातो. आनदी सर्व जग आनदपूर्ण आहे, असे पहातो, दुःखी सर्व जगास दुःखी समजतो; व लोभ्यास सर्व प्राणी लोभी दिसतात; या न्यायानें आता ज्येष्ठशर्मा वर्णन करीत आहे. ) अहो, हे पक्षी या घरावर बसतात व त्यांस आमच्या पित्याची आठवण झाली कीं, ते आपलीं शरीरे आकाशात फेकून देतात आणि पंखांच्या योगानें आपल्या चित्ताची तळमळ व्यक्त करून मधुर स्वरानें त्यांच्या करिता रडतात. हा पर्वत त्याच्या करिता रडू लागला ह्मणजे त्याच्या गुहारूपी मुखातून गुरगुर असा मोठा ध्वनि निघू लागतो. केव्हा केव्हां त्याच्या नेत्रातून निघालेले अश्रु–प्रवाह नदीरूपानें त्याच्या अंगावरून खळखळ वाहू लागतात. त्याच्या आपत्तीमुळें दिशा धूसुर झाल्या आहेत. हा सर्व ग्राम आक्रोश करून मस्तक ताडणादिकाच्या योगानें शरीरास छिन्न भिन्न करून घेत आहे व त्यातील सर्व लोक उपवासानें व्याकुळ होऊन मरणोन्मुख दिसत आहेत. प्रात काळीं येथील वृक्षही अश्रु ढाळित असतात व त्याचा टप–टप असा ध्वनि कोणालाही सहज ऐकू येतो. रात्रिसमयी लोकाची रहदारी कमी झाली कीं, रथ्याही ( राजमार्गही ) एकाद्या आनंदरहित व शून्यचित्त विधवेप्रमाणें होऊन जाते. या उपवनातील वेलींही कोकिळ, भ्रमर इत्यादिकाच्या द्वारा आक्रोश करितात व आपल्या पल्लवरूपी हस्तानीं स्वशरीरास ताडण करितात. आमच्या मातापितरांच्या मरणानें दुःखी झालेले हे जलप्रवाहही आपल्या शरीरास शतधा छिन्न भिन्न करण्याकरिता पर्वताच्या कड्यावरून खालीं घालवून घेत आहेत. नद्या समुद्रात जीव देण्याकरिता मोठ्या वेगानें निघाल्या आहेत. साराश

आमच्या आईबापाकरिता या लोकच्या प्रत्येक वस्तूस दुःख झालेले असून त्यान्या गमनाने देवलोकी मात्र मोठा उत्सव होत आहे. कारण तेथे गायन, नृत्य, वादन इत्यादि सर्व मोठ्या प्रमाणावर चालले आहे. यास्तव, अहो देवीनो, आमचा शोक नष्ट होईल, असा काहीं उपाय करा मोठ्या शक्तींचें दर्शन कधींही निष्फळ होत नसते. ज्येष्ठशर्म्याचें हें भाषण ऐकून लीलेस फार दया आली व तिने मोठ्या प्रेमाने त्याच्या शरीरावरून हात फिरविला. त्या बरोबर त्याचे दुःख, दुर्भाग्य व सकट नाहींसे झाले त्याच्या प्रमाणेच त्या गिरिग्रामातील इतर सर्व जनही दुःखादिरहित व देवाप्रमाणे तृप्त झाले.

**श्रीराम**—महाराज, पण त्या लीलेने ह्मणजेच त्या ज्येष्ठशर्म्यान्या आईने त्याला पूर्वरूपाने दर्शन का दिले नाहीं ? ज्ञानाभ्यासाच्या योगाने सत्यसकल्प झालेल्या तिला तसे करिता येणे अशक्य नव्हते.

**श्रीवसिष्ठ**—होय. तिला तसे करिता आले असते. पण प्रपच मिथ्या कसा ह्याचा निर्णय करण्याकरिता ती तेथे आलेली होती. पुत्रस्नेहामुळे तिचे तेथे आगमन झालेलें नव्हते. हा पुत्रादि प्रपच मिथ्या आहे, असा निश्चय झाल्यावर, हा आपला पुत्र आहे, असे वाटून त्याच्याविषयी प्रेम असणेही शक्य नव्हते. तत्त्वज्ञानाच्या योगाने मूलाज्ञानाचा बाध झाल्यावर वर्तमान शरीराहून निराळे भौतिक शरीर घ्यावे लागत नाहीं, असा नियम आहे. ह्मणून तिने पूर्व शरीर घेतले नाही. जो कोणी अज्ञानाच्या योगाने मिथ्या पृथ्व्यादि सवातास सत्य समजतो त्याचें अद्वितीय व शुद्ध चैतन्याकाश पिडरूपतेस धारण करितें. पण जो तत्त्वज्ञ असतो त्याचे चिदाकाश देहरूप होत नाहीं. बालकास अधारात असलेला पुरुषच वेताळ आहे, असा भ्रम होतो. हे स्वप्न आहे, असें समजताच स्वप्नातील सर्व पदार्थ जसे असत्य ठरतात त्याप्रमाणे तत्त्वज्ञान झाले असता पूर्वी जाग्रतीत सत्य वाटणारे पदार्थही असत्य आहेत, असा निश्चय होतो. ज्याचे मस्तक फिरले आहे अशा मूर्खास पृथ्वीही आकाशासारखी भासते. फार काय, पण शहाण्याना सुद्धा भींतीवर दरवाज्याचे चित्र काढून त्यात उघड्या दरवाजाची छाया चागल्या रीतीने दाखविलेली असल्यास द्वाराचा भ्रम होऊन ते त्यात शिरू लागतात. स्फटिकाच्या भिंतीकडे पाहून तर आम्ही सुद्धा पुष्कळ वेळां फसलेले आहों. स्वप्नात, जें नगर असतें तें

भयकर अरण्य अथवा शून्य स्थळ भासते. स्वप्नातील मिथ्या स्त्रिया पाद–सवाहनादि सर्व क्रिया बरोबर करितात, असा अनुभव येतो; सारांश प्राण्याच्या चित्ताप्रमाणे वस्तु भासतात. जी सत्य असते ती असत्य वाटते व जी असत्य असते ती सत्य आहे, असा त्यास भ्रम होतो. आकाशात "तो पहा पर्वत, हा पहा हत्ती" इत्यादि जी जी कल्पना अज्ञ करितो त्या त्या प्रमाणे त्याला तेथे आकार भासू लागतात. मूर्च्छेत परलोकही प्रत्यक्ष अनुभवास येतो भ्यालेले लोक, मत्त झालेले लोक, अर्धे निद्रित व अर्धे जाग्रत् लोक व नौकेत बसलेले उतारु प्रायः वस्तुस्थितीच्या उलट प्रकार पहात असतात. त्याच्या वासनेप्रमाणे व दृढ अभ्यासाप्रमाणे त्यास अनेक आकार भासतात. परमार्थत एक वस्तु मुळीच नाही, असा त्याचा दृढ निश्चय झालेला असतो. पण लीलेला पृथ्वी इत्यादि वस्तु सत्य नाहीत, अज्ञानामुळे चिदाकाशच त्या त्या आकाराने भासते, असे साक्षात् ज्ञान झाले होते. ज्याला सर्व ब्रह्ममय दिसू लागले आहे, त्या मुनिवर्यास हा माझा पुत्र, हा माझा आप्त, ही माझी स्त्री, ही माझी सपत्ति इत्यादि विकल्प कसे, केव्हा व का होतील ? आरभी दृश्य उत्पन्न झालेले नाही, ते उत्पन्न न होताच व्यर्थ भासत आहे, असे ज्यास समजले आहे त्याला इष्ट वस्तूविषयी इच्छा व अनिष्टाविषयी द्वेष कसा वाटणार ? असे जर आहे, तर लीलेने ज्येष्ठशर्म्याच्या अगावरून हात का फिरविला ? म्हणून विचारशील तर सागतो–तिने जो त्यास हस्तस्पर्श केला तो पुत्रप्रेमामुळे नव्हे. तर त्या ज्येष्ठशर्म्याच्या भावी कल्याणाकरिता उन्मुख झालेले त्याचे पूर्व पुण्य व फलदात्या ईश्वराचे ज्ञान यानी युक्त असलेल्या सर्वाधार चितिशक्तीचेच ते विवर्तरूप फल होय. साराश वस्तुत. आकाशाहूनही अति सूक्ष्म व अति शुद्ध असलेला हा बोध पूर्वी जसे चितन करितो तसाच तो तात्काळ होतो. राघवा, सर्वत्र तोच पदार्थसमूहरूप होत असतो व स्वप्नामध्ये भासणाऱ्या नगरात या सिद्धाताचा उत्तम अनुभव येतो २६.

**सर्ग—२७** विस्मित झालेली लीला पुनरपि पतीच्या दर्शनाकरिता उत्सुक झाली, **ज्ञप्तीने तिला बोध केला, तेव्हा मागच्या अनेक जन्माचें स्मरण होऊन तिनें त्याचें वर्णन केलें, असें येथे सागितले आहे.**

**श्रीवसिष्ठ**—रामा, वर सांगितल्याप्रमाणे ज्येष्ठशर्म्यावर अनुग्रह करून त्या दोघी दिव्य स्त्रिया त्या ब्राह्मणाच्या गृहांतील मंडपाकाशांत जेथें होत्या तेथेंच गुप्त झाल्या. तो चमत्कार पाहून आम्हांवर वनदेवींनीं मोठी कृपा केली, असें समजून तेथील आबाल-स्त्रीपुरुषानी शोकाचा त्याग केला, चित्त शात केलें व तीं सर्वजणे आपापल्या गृह-कृत्यांत निमग्न झालीं. ( लीलेच्या नूतन सर्गाप्रमाणे ब्राह्मणास मरून जरी अनेक वर्षे झालीं होतीं तरी मागे देवीनें सांगितल्याप्रमाणे त्या दांपत्यांस मरून यावेळीं आठच दिवस झाले होते. त्यामुळे लीलेला तेथील सर्वांचे दु:ख ताजेच होते, असा अनुभव आला व तिच्या अनुग्रहामुळे शात चित्त होऊन गृहस्वामीच्या मरणानतर एक आठवड्याने ते सर्व पुनरपि आपापल्या धद्यास लागले. ) नतर इतर जनाच्या दृष्टीने अतर्धान पावलेल्या व आश्चर्याने स्तब्ध झालेल्या आकाशरूपी लीलेस आकाशरूपी देवी असे म्हणाली.

**श्रीराम**—पण गुरुराज, त्या दोघींचे देह साकल्पिक होतेना? मग त्या साकल्पिक वस्तूचे त्या दोघीस परस्पर ज्ञान कसें झाले? व त्या एकमेकीशीं कशा बोलू लागल्या? मी आपल्या सकल्पाने एकादा आकार बनविल्यास त्याचें दुसऱ्या कोणास ज्ञान होत नाहीं व दुसऱ्याच्या साकल्पिक आकाराचे मला कधी ज्ञान होत नाहीं !

**श्रीवसिष्ठ**—व्यवहारामध्ये सर्वदाच असे होत नाही, हे खरे, पण ज्याच्यावर देवताचा अनुग्रह होतो त्या दोघाचा स्वप्नामध्ये परस्पर सवाद होतो व तो खराही ठरतो. पुराणात उषा व अनिरुद्ध याच्या स्वप्नातील सभाषणाचें वर्णन आहे व तेच पुढे सत्य ठरले आहे. लौकिकातही उत्तम भक्तास स्वप्नात अनेकदा साक्षात्कार होतात व ते पुढे खरे ठरतात, असेंही आपण पहातो. त्याप्रमाणेच समानसकल्पामुळे त्याचा परस्पर वार्तालाप होणें अगदींच अशक्य नाहीं. शिवाय त्याच्यामध्ये दैवी सामर्थ्य आलेलें असल्यामुळें स्थूल देह, इद्रिये, इत्यादिकाच्या सहायावाचून स्वप्नाप्रमाणें त्या सभाषणादि करू शकल्या. असो;

**श्रीदेवी**—लीले, तुला जें समजावयास पाहिजे होतें तें समजलें आहे व जें पहावयाचे होतें त्याचेंही तुला दर्शन झाले आहे. अशाप्रकारची ही ब्रह्मसत्ता आहे. आतां आणखीं तुला कांहीं सशय राहिला आहे का?

लीला—देवि, माझ्या मृत पतीचा जीव जेथें राज्य करीत आहे त्या नूतन राज्यात मी पूर्वी गेले होतें. पण तेथे मला कोणी पाहिलें नाहीं व या सृष्टीत सर्वांनीं पाहिले, याचे कारण काय ?

श्रीदेवी—वत्से, त्यावेळीं तुला अभ्यासाचें बळ नव्हतें. त्यामुळे तुझा द्वैताविषयींचा निश्चय नाहीसा झाला नव्हता. अद्वैत तत्त्वामध्ये भेद पाडणाऱ्या अविद्येचा उच्छेद होऊन द्वैतसंकल्प जोपर्यंत अद्वैतरूप झालेला नसतो तोपर्यंत सत्यसंकल्पत्वादि अद्वैत कर्में कशीं होणार ? त्यावेळीं लीलेचा देहच मी आहे, असा तुझा दृढनिश्चय होता. त्यामुळे तुला सत्यसंकल्पत्वाची प्राप्ति झालेली नव्हती. आतां तो निश्चय समूल नाहींसा झाल्यामुळे तू सत्यसंकल्प झाली आहेस. त्याच्याच प्रभावाने ' मला हा ज्येष्ठशर्मा पाहू दे,' असे तुझ्या मनात येताच त्यानें तुला पाहिले. आता जर तू आपल्या पतीच्या जीवाच्या त्या नव्या राज्यात गेलीस व 'मला हे पहोत' असा संकल्प केलास तर तुझा त्याच्याशीं पूर्वीप्रमाणेंच व्यवहार होईल.

लीला—जननि, या प्रत्यक्ष दर्शनाच्या योगाने व तुझ्या उपदेशाने मला जे पूर्वी ' असे कसे संभवेल ' ह्मणून वाटत होते ते आता वाटेनासे झाले आहे. मला आता त्याविषयीं शंका मुळींच राहिलेली नाही. याच मंदिराकाशात माझा पति ब्राह्मण होता. यातच तो मरून पद्मसंज्ञक राजा झाला. याच आकाशातील त्याच्या संसारामध्ये त्या भूमंडलातील प्रसिद्ध राजधानींत मी त्याची राणी होते. यातीलच त्या अंतःपुरांत तो मरण पावला व याच आकाशातील त्या अंतःपुराकाशात तो पुनः भूपाल झाला तात्पर्य सर्व वस्तूचें आधिष्ठानभूत जें पारमार्थिक व कूटस्थ ( निर्विकार ) ब्रह्म त्याच्या ठायीं हा सर्व विकार कल्पित आहे. वर सांगितल्याप्रमाणे खरोखरच तो या मंडपाकाशात राहिलेला आहे एकाद्या करंड्यामध्यें जसे मोहरीचे अनेक दाणे असावेत त्याप्रमाणें याच गृहाकाशात सर्व ब्रह्मांडभूमी आहेत. माझ्या पतीचें तें मंडळ सदा माझ्या अगदीं जवळच आहे, असें मला वाटतें. पण वस्तुतः तें एका बाजूस असावे, असे माझें अनुमान आहे. करिता, हे देवि, तें मला समोर दिसेल असे कर.

श्रीदेवी—( हंसून ) लीले, या मंडपाकाशात तुझ्या पतीचीं तीनच मंडले ( शरीरे ) आहेत, असें तू समजू नकोस. तर मागच्या व पुढच्या

असख्य पतीची शरीरे या आकाशात आहेत व त्यानी अनेक भूतले व्यापिली आहेत. तेव्हा त्यातील तुला कोणतें दाखवू, ते साग. (ह्मणजे ब्राह्मण, पद्म व त्याचा जीव यातील एकाद्याचे शरीर पहावे, असे तुला वाटते की, त्याच्या मागील–पुढील पतीच्या शरीरातील एकादे पहाण्याची तुझी इच्छा आहे ?) जवळच्या या तिघातील ब्राह्मण शरीराचे भस्म झाले आहे. पद्माचे शरीर अतःपुरातील पुष्पाच्या टिगाखाली शवरूपाने राहिले आहे व त्याच्या जीवाचे नवे शरीर या ससार मडलात राजा झाले आहे. तो मोठ्या ससार–सागरात पडून त्यातील भोवऱ्यात गरगर फिरत आहे भोगरूपी लाटामध्ये सापडून व्याकुळ होत आहे. त्यामुळे त्याची बुद्धि मलिन झाली आहे. बुद्धीच्या कालुष्यामुळे त्यात प्रतिबिबित झालेले चैतन्यही जाड्याने शिथिल झाले आहे नाना प्रकारची विचित्र व अतिकठिण राजकार्ये करीत असूनही तो जडतेमुळे ससार–भ्रमात निजून राहिला आहे तो त्यातून मुळीच जागा होत नाही उलट मी ईश्वर आहे. मी भोगी आहे, मी सिद्ध आहे, मी बलवान् आहे, मी सुखी आहे, असे तो बरळत असतो पण त्याच सकल्परज्जूच्या योगाने आपण अधिकाधिक बाधले जात आहो, हे त्याच्या ध्यानात येत नाही. तात्पर्य तो अविद्या–परतत्र झाला आहे. वास्तव, हे सुदरि, वाऱ्या ( वावटळ ) जशी एका उपवनातील मनोहर गधास दुसरीकडे क्षणार्धात नेते त्याप्रमाणे मी तुला कोणत्या पतीकडे नेऊ ते साग कारण, वत्से, तो अन्य ससार व अन्य ब्रह्माडमडप आहे ह्या सर्व व्यवहार–परपरा निरनिराळ्या पसरल्या आहेत. या मडपाकाशात ही ससार–मडले अगदी आपल्या जवळ ( बाजूस ) आहेत, असे जरी वाटले तरी त्यात अनेक कोटी योजने अतर आहे. ( पति, स्त्री, पुत्र इत्यादि ससारातील माणसाची शरीरे अगदी जवळ जवळ असतात पण पतीस पत्नीच्या व पुत्राच्या शरीरात, पत्नीस पतीच्या व पुत्राच्या शरीरात आणि पुत्रास त्याच्या शरीरात जावयाचे झाल्यास ते किति कठिण आहे, याची कल्पना करावी. म्हणजे देवीचे हे भाषण चागले लक्षात येईल. ) पारमार्थिक दृष्टीने जर तू पाहिलेस तर या सर्व ससार–मडलाचे पारमार्थिक स्वरूप हे मडपात असलेले चिदाकाशच आहे, असे तुला समजेल. त्या मडलामध्ये कोट्यवधि मेरु व मदार पर्वत राहिले आहेत. सूर्याच्या किरणामध्यें ( झरो-

क्यातून पडलेल्या कवडशामध्ये ) जसे असख्य त्रसरेणु ( परमाणूसारखे तरगत असलेले कण ) असतात त्याप्रमाणे या महा चैतन्याच्या एकेका अत्यत अत्यत–सूक्ष्म अशामध्ये ससारसमूह सहज रहातो. तुला प्रत्यक्ष दाखविलेल्या या ब्रह्माडाप्रमाणेच जरी ही दुसरी सर्व ब्रह्माडे अनेक समुद्र, द्वीपे, पर्वत, चतुर्दश भुवने इत्यादि मोठमोठ्या पदार्थांच्या योगाने फार मोठी झाली आहेत तरी या चैतन्याशी त्याची तुलना करून पाहू लागले असता त्यातील प्रत्येक ब्रह्माड वडाच्या लाल फळातील अगदी सूक्ष्म बीजा एवढेही आहेसे वाटत नाही. अतरिक्षात नानाप्रकारच्या रत्नाची प्रतिबिबे पाडिली असता जसा तेथे वनाचा भास होतो त्याप्रमाणे अविद्या-प्रयुक्त दृढवासनेमुळे, वस्तुत. पृथ्यादि–भूतरहित चैतन्य, जगद्रूप भासते. ज्ञप्तिच, "हे जग" असा भाव, आपल्या स्वरूपात धारण करिते. पण ज्ञप्तीने तसे जरी भासत असले तरी ब्रह्मसज्ञक परमार्थ वस्तूमध्ये मुळीच कधी काही झालेले नाही. ज्याप्रमाणे सरोवरात तरग पुन· पुन. उठतात व लीन होतात त्याप्रमाणे या महा चतन्यामध्ये विचित्र आकार, दिन–रात्र, पक्ष, मास इत्यादि कालाची अगे व ब्रह्माडादि देश वारवार होऊन लय पावतात.

**लीला**––जगज्जननि, तू सागतेस ते अगदी बरोबर आहे. मला आता सर्व आठवले मनुष्यजन्म रजोगुणाचे फल आहे यास्तव माझा हा जन्म राजस आहे. तामस किंवा सात्त्विक नव्हे. या कल्पाच्या आरभी हिरण्यगर्भापासून अत करण–उपाधि उत्पन्न झाल्यामुळे त्यात प्रतिबिब रूपाने अवतीर्ण झालेल्या माझे आजपर्यत आठशे जन्म झाले. मी अनेक योनींचा अनुभव घेतलेला असून त्या सर्वांस मी या वेळी जणु काय पुनः प्रत्यक्ष पहात आहे. देवि, मी विद्याधराच्या लोकी एका श्रेष्ठ विद्याधराची स्त्री होऊन पूर्वी एका ससार–मडलात रहात होते नतर दुर्वासनेने कलुषित होऊन मी दुसऱ्या ससार-मंडलात मानुषी झाले. त्यानतर नागराजाची पत्नी झाले व कदब, कुद, जबीर, करंज इत्यादिकाच्या वनात राहू लागले. त्यानतर मी ढुगणास पाने गुडाळून लज्जा रक्षण करून घेणारी काळीकुट्ट शबरी झाले आणि अरण्यवासामुळे मी मूर्ख व उद्धट बनले. त्या उद्धटपणामुळे मला स्थावर–योनींत जावे लागले. मी एका तपोवनात पुष्पलता

झालें. पण दैवयोगानें मला तेथे एका महा तपस्व्याचा समागम झाला. काहीं दिवसानी त्या उपवनास वणवा ( आग ) लागला व त्यात मी जळून गेले. पण त्या मुनीच्या समागमानें मी पवित्र होऊन त्याचीच कन्या झाले. तेथे माझ्या हातून अनेक पुण्य कर्मे झाली व त्यामुळें मी स्त्रीजन्मांतून मुक्त झाले. पुढच्या जन्मीं मी एका उत्तम देशाचा श्रीमान् राजा झालें. पण वैभव, तारुण्य, रूप व अज्ञान याच्या अतिरेकामुळें माझ्या हातून त्या जन्मी अनेक दुष्कृत्ये घडलीं. त्याचे फल भोगण्याकरिता मी पुनः तिर्यक् योनीत गेलें. मी नऊ वर्षे मुगुस ( स्त्री ) झाले. त्यानतर आठ वर्षे मी रोगी व सडक्या अगाची गाय झालें. त्या जन्मात मला फार कष्ट भोगावे लागले. दुष्ट, अज्ञ व अधार्मिक गोपालाचे बालक मला ताडण करीत व एकसारखे माझ्या मागे लागत असत. पुढे मी पक्षीण झाले. पण एकदा, पक्ष्याशी निष्कारण वैर करणाऱ्या व्याधाच्या पाशा( जाळ्या )त मी सापडले. यमाच्या पाशाप्रमाणे त्या पाशातून सुटणेही अशक्यच होतें. पण शरीरावरील अध्यास मला त्या पाशातही स्वस्थ बसू देईना. मी आपल्या शक्तीप्रमाणे पुष्कळ धडपड व फडफड केली. पण दुर्दैवी पुरुषाच्या प्रयत्नाप्रमाणे ती सर्व व्यर्थ गेली व शरीरास श्रम मात्र झाले. शेवटीं माझा अतकाळ जवळ आल्याकारणाने त्या निर्दय व्याधानें माझी मानगुटी धरली व माझा गळा चिरिला. त्यानतर मी भ्रमरी झाले पुढे हरिग झाले. आपल्या प्रिय पतीसह वनात फिरत असताना मला एका किरातानें पाहिले. मग काय विचारता ! तो दुष्ट माझ्या मागें लागला. जीव वाचविण्याकरिता मी आपली होती तितकी शिकस्त करून पाहिली पण व्यर्थ. मृत्यूपुढे कोण कितीसा पळणार ? शेवटीं त्या मनुष्यरूपी यमाने एका बाणानेच माझे ते रमणीय शरीर भूमीवर लोळविले. पुढच्या जन्मीं मी मत्स्यी झाले. समुद्राच्या लाटाबरोबर मी कोठे तरी वहात जात असे. आज येथे तर उद्या आणखीं दहा कोसावर. एक स्थान नाही, एकाचा समागम नाही व एकच भक्ष्य नाहीं. पूर्ण विरक्त सन्याशाप्रमाणेच माझी त्यावेळीं अवस्था होती. पण तेथेही मृत्यूनें मला फार दिवस राहू दिलें नाहीं. मीं खाण्याच्या लोभात गुतून कोळ्याच्या गळास आपली मान अडकविली व त्याने जलातून वर काढताच

थोडीशी तडफड करून राम झटले. पुढें मी पुलिंद जातीची नीच स्त्री झाले. सुस्वर गायन करून मी वनांत इकडे तिकडे फिरत असे; तान लागली ह्मणजे चर्मण्वती नदीचे जल पीत असे व पतीशी सुरतसुखानुभव घेऊन थकवा आला ह्मणजे तो घालविण्याकरितां माडी पीत असे. पुढें मी सारसी झाले व आपल्या रमणीय सारस पक्ष्यास उपभोगानें रिझवूं लागलें. त्यानतर पुनः मानुषी झालें. तेथे कांहीं पुण्यसचय केल्यामुळें व पूर्व पुण्याचाही त्याचवेळी उदय झाल्यामुळे मी अप्सरा होऊन देवाच्या उपयोगी पडूं लागलें. त्या जन्मीं नदनवनात मी जे जे उपभोग घेतले आहेत व जे जे विलास केले आहेत त्या सर्वाचें वर्णन करिता येणेंही अशक्य आहे. पुढे मी कच्छपी ( कासवीण ) झाले. त्यानतर राज-हंसी बनले. तेथ वाऱ्याने हालणाऱ्या सावरीच्या पानावर बसलेला मश-काचा समूह मी पाहिला. त्यातील एक मशक खालीं पडले. पण त्यास पुन वर येता येईना. ते पाहून माझे मन द्रवले. त्या सस्कारामुळे मलाही उत्तर जन्मी मशक व्हावें लागलें कारण मरणसमयींही मला त्याचेंच स्मरण झाले. पुढे मी वेत होऊन पुष्कळ दिवस नदीच्या तीरीं एकाद्या तपस्व्याप्रमाणे राहिले. पुढे मी विद्याधरी झाल्यें. माझ्या शरीरकातीकडे पाहून कामसतप्त झालेले तरुण विद्याधर अनेकदा माझ्या पाया पडत असत. पण तेथेंही मला प्रिय–वियोगाचे असह्य दुःख अनुभवावे लागलें. सुदर शय्येवर मला अनेक रात्री तडफडत व दीर्घ श्वास सोडीत पडावें लागे. साराश याप्रमाणें मी रहाटगाडग्याच्या मोघ्याप्रमाणे किंवा तागडीच्या दाडीप्रमाणें खालीं, वर, पुनः खाली, पुनः वर, अशा अनेक फेऱ्या केल्या. त्यामुळे माझें चित्त अतिशय व्याकुळ झाले. या ससारसज्ञक दीर्घनदींतील मी एक लाटच होऊन राहिल्यें. अथवा जसा वारा वाहील त्याप्रमाणें वनातील उच्चनीच प्रदेशीं भटकणाऱ्या वातहरणीप्रमाणे माझी स्थिति झाली २७.

**सर्ग २८**—या सर्गात दृष्टप्रपंच मिथ्या असल्यामुळे चिदाकाश सत्य आहे, असें सागून पर्वत व गिरिग्राम याचें विस्तृत वर्णन केले आहे.

**श्रीराम**—अति दृढ व अनेक योजनें दीर्घ अशा त्या ब्रह्मांडरूपी भिंतींचें त्यांनीं कसे उलघन केलें. कारण स्वप्नातील मिथ्या भिंतही स्वप्न असे पर्यंत प्राण्याच्या गतीस निरोध करीत असते.

**श्रीवसिष्ठ**—( हसून ) रामा, कोठले ब्रह्मांड, कोठली भिंत व कोठली तिची दृढता ? त्या देवी, त्या अंतःपुरातच होत्या. त्याच गिरिग्रामातील त्याच गृहाकाशांत तो वसिष्ठ ब्राह्मण सांप्रत राजत्वाचा अनुभव घेत आहे. त्या मंडपाकाशाच्या केवळ शून्यरूप अशा एका कोपऱ्यातच पद्मराजास चतुःसमुद्र–वलयांकित पृथ्वीचा अनुभव आला. त्या आकाशरूपामध्येच भूपीठाचा प्रादुर्भाव झाला, भूपीठाचे ठायीं राजाचें नगर भासलें व त्यांत त्यास व त्याच्या राणीस ( ह्मणजे लीलेस ) त्याचें राजगृह भासलें वसिष्ठ ब्राह्मणाची अरुंधती नामक स्त्रीच पद्माची लीलानामक राणी झाली. तिनें ज्ञप्ति देवीची पूजा केली पुढें त्या ज्ञप्तीबरोबर तिनें आश्चर्यांनीं मनोहर झालेल्या आकाशाचें उल्लंघन करून दुसरें ब्रह्मांड पाहिलें पण तें ब्रह्मांड त्या गिरिग्रामांतील मंदिरांतच होतें व तिनें जें कांहीं पाहिलें तेंही हृदयांतील टीचभर आकाशांत राहूनच पाहिलें आणि पुनरपि त्या ब्रह्मांडांतून परत येऊन ती आपल्या घरीं राहिली. ह्मणजे हांतरुणावर निजलेला पुरुष एका स्वप्नांतून दुसऱ्या स्वप्नांत जाऊन जसा पुनः परत यावा त्याप्रमाणेंच लीलेचें हें जाणें व येणें होतें तें सर्व केवळ प्रतिभास व केवळ आकाश होतें वस्तुतः ब्रह्मांड नाहीं, संसार नाहीं, भींत नाहीं व दृढता नाहीं त्या दोघींचें चित्तच तसें तसें विकार पावलें. केवळ वासनेमुळें त्यांना त्या त्या वस्तूचा भास झाला. त्यांनीं आपल्या चित्तानें अनंत चिदाकाशाच्या स्वल्प भागासच " हें ब्रह्मांड " असें कल्पिलें. ह्मणजे महाकाशच स्पंदामुळें जसें वायुरूप होतें तसाच हा सर्व प्रकार झाला चिदाकाश जन्मरहित व शांत आहे तें सदा सर्वत्र असतें. पण ज्याला त्याचें ज्ञान नसतें अशा पुरुषाच्या दृष्टीनें त्याच्यामध्यें चित्त्व हा धर्म येतो व त्यामुळें तें आपणच आपल्यामध्यें जगत् पहातें. पण ज्यानें त्यास जाणलें आहे त्यास तें आकाशाहूनही शून्य वाटतें. मग असें जर आहे तर सर्वच प्राणी या ब्रह्मांडरूप भिंतीचें उल्लंघन करून कां जात नाहींत ? ह्मणून विचारशील तर सांगतो. ज्याला हें तत्त्व समजलेलें नसतें त्याच्या दृष्टीनें हें ब्रह्मांड वज्राच्या पर्वताप्रमाणें कठिण असतें. स्वप्नामध्यें लहानशा गृहांतच जसें लाखो मनुष्यांनीं गजबजलेलें नगर दिसतें त्याप्रमाणें या चैतन्यमात्र तत्त्वामध्यें हें असत् पण अबाढव्य

जग दिसते. मरुभूमीवर जसे जल भासते, सुवर्णाचे ठायीं जसें कडे भासतें, त्याप्रमाणे आत्म्याचे ठायी हें असत् दृश्य सत् असल्यासरखे भासते.

असो; आता त्याच्या पुढे काय झाले ते ऐक. वर सांगितल्याप्रमाणे परस्पर भाषण करीत त्या दोघी सुंदर स्त्रिया त्या ब्राह्मणाच्या गृहातून बाहेर पडल्या व त्या गावातील कोणींही आपणास पाहू नये, या हेतूने गुप्त राहूनच त्या दोघीजणी त्या अवाढव्य पर्वताचे निरीक्षण करू लागल्या. त्या पर्वताचे शिखर अंतरिक्षाच्या मध्यभागी जाऊन पोचले होतें. तो पर्वत सूर्यासच स्पर्श करीत आहे की काय, असा त्यास भास झाला. अनेक रंगी बेरंगी वृक्षादिकांमुळे चित्र विचित्र झालेल्या वनाच्या योगाने तो फार रमणीय दिसत होता. त्याच्या वरून अनेक नद्या मोठ्या वेगाने वहात खाली जात होत्या. पण ज्याच्या जवळ थोडें ज्ञान असते तो ज्ञानाच्या गोष्टी फार सांगतो, हे सुचविण्याकरिताच जणु काय त्या मोठमोठ्याने ध्वनि करीत होत्या. पण जल फारसे नसताना उगीच मोठा ध्वनि करणाऱ्या त्यास भ्यालेले पक्षी नाना प्रकारचे शब्द करीत त्या पर्वतावरील वृक्षांवर इतस्ततः पळत होते. तथापि त्यात जे शहाणे ( पक्षी ) होते ते एखाद्या गंभीर व शांत धार्मिक माहात्म्याप्रमाणे, याच्या या व्यर्थ ओरडीला कोण भितें, असे समजून आपल्या मधुर ध्वनीने आपल्या चित्ताचे व प्रेमाने आणि आदराने ऐकणाऱ्याच्या चित्ताचे रंजन करीत होते. त्या पर्वतावरील वृक्षांच्या मंजिऱ्या मेघमंडलास चित्रविचित्र करीत होत्या व शुद्ध अकाशातही त्या वेलींवरून बसलेले पक्षी दिसत होते. त्या पर्वतावरील नद्यांच्या तीरास, त्यावर वाढलेले बळकट वेत, आधारच देत आहेत व तो त्यांनी दिल्यामुळेच ते उभे आहेत, असें त्यास वाटले. असो, अशा प्रकारच्या त्या अवाढव्य पर्वतावर वसलेला तो ग्रामही त्यास दिसला. आकाशातून तो एक स्वर्गाचा तुकडाच खाली पडला आहे, असा त्यास भास झाला. कारण तो फार समृद्ध होता. चारी वर्णांचे लोक त्यात आपापल्या धर्माचरणाने रहात होते. पशू, पक्षी, इत्यादिकांचीही त्यात न्यूनता नव्हती. मोठमोठे मार्ग सर्वदा वहात होते. गायींची सेवा सर्व लोक मोठ्या आनंदाने व आस्थेने करीत होते. त्यांत आपापल्या पूर्व कर्मांची फळें भोगणारे दरिद्री व रोगी स्त्री—पुरुष मुळींच नव्हते, असें नाहीं. त्यांचीही तेथें समृद्धि होती. पण त्या देवींचे सर्व लक्ष

त्यातील पुण्यवानांकडेच गेल्यामुळें त्यास तसले लोक फारसे आढळ नाहींत. त्या गावाच्या सभोंवतीं उपवनें होतीं. कित्येक धार्मिका आपल्या गृहाजवळच काहीं उपयोगी वृक्ष व पुष्पलता लाविल्या होत्या त्याचीं पुष्पे, पाने व फळें त्यांच्या धार्मिक कर्मांच्या फार उपयोगीं पड असत. साराश तेथील धार्मिक धर्माचरण करीत होते; श्रीमान् विलास भोगीत होते; दरिद्री व रोगी कष्टकर आयुष्य कसे तरी घालवीत होते, सेवक सेवाकर्म करीत होते; धनी त्यांच्या कडून तें करवीत होते व येणेप्रमाणे त्य ग्रामात सर्व व्यवहार चालला होता. वापी, कूप, तडाग इत्यादिकाचीही ते कमतरता नव्हती. प्रातःकाल, मध्याह्नसमय, सायकाल, रात्रीचा पूर्वभा इत्यादि समयीं कोणत्याही ग्रामात सामान्यतः जशा सर्व क्रिया घडतात तशाच तेथेंही होत होत्या. त्यांतील मोठमोठी मदिरे खरोखर प्रेक्षणीय होतीं त्या सर्वांचें वर्णन करूं लागल्यास एक मोठा ग्रथच होईल यास्तव, एकाद्या अतिशय सुखी, विस्तृत, उद्योगधद्यांनीं व सर्व प्रकारच्या वैचित्र्यांनीं भरलेल्या रमणीय नगराप्रमाणें तो गिरिग्राम होता, असे तू समज २८.

**सर्ग २९**—या सर्गात लीलेला तिच्या मागच्या चरित्राची आठवण झाली व लोकाच्या समूहानीं भूषित झालेल्या आकाशात त्या परत गेल्या, असे वर्णन केले आहे.

**श्रीवसिष्ठ**—राघवा, अगोदर दुरूनच त्या गिरिग्रामाची शोभा पाहून त्या दोघी दिव्य स्त्रिया, शम–दमादि साधनसपन्न व तत्त्वज्ञ पुरुषामध्ये भोगश्री व मोक्षश्री जशा प्रवेश करितात त्याप्रमाणें, त्या शात ग्रामात प्रवेश करित्या झाल्या. लीलेला समाधि लावून बराच काल झाला होता. त्यामुळे तिचे ज्ञान अति शुद्ध होऊन ती स्वतः शुद्धज्ञानरूप व त्रिकालदर्शी झाली. तिला पूर्वजन्मातील सर्व व्यवहारांचें व जन्ममरणादि अवस्थाचें स्मरण आपोआप झाले व ती देवीस म्हणाली—देवि, तुझ्या प्रसादामुळे हा प्रदेश पाहून मला येथील मागच्या व्यवहाराची आठवण झाली. मी येथें पूर्वी, वृद्ध, जिच्या अगास सुरकुत्या पडल्या आहेत, जिच्या अगातील शिरा स्पष्ट दिसत आहेत आणि जिचे तळ हात दर्भांच्या अग्राच्या क्षतानीं रूक्ष झाले आहेत अशी कृश व कृष्णवर्ण ब्राह्मणी होते. मी आपल्या पतीचे कुल वाढविले. मी येथे असताना प्रत्यहीं प्रातःकाली दहीं घुसळीत असे. मला पुष्कळ पुत्र होते. अतिथींना मी फार

आवडत असें. देव, ब्राह्मण व संत यांची मी सदा अनन्य मनानें भक्ति करीत असें. घृत व गोरस यांच्या योगाने माझे अंग पाढरें होत असे. ( ह्मणजे आमच्या घरीं तीं दोन्हीं विपुल असून मी तीं सर्वांस वांटीत असें, ) उपकरणीं व यज्ञाचीं पात्रें मीं आपल्या हातानीं घाशीत असें. कांचेच्या बांगड्या पुष्कळ घातल्यास काम करितांना त्या वारवार वाढवतात, असें पाहून मी एकच बांगडी घालीत असे; पण तिलाही पानें वाढतांना अन्नाचीं पुटें बसत असत. जावई, कन्या, पतीचे व आपले भ्राते, पिता, माता इत्यादिकांची सेवा करण्यातच मी निमग्न असे. मरेपर्यंत अहोरात्र पुत्र, स्नुषा, सेवक इत्यादिकांस ' आटपा, आटपा; उशीर झाला; स्नानाला किती वेळ लाविलास, पाण्याची एक घागर आणायला गेलीस ती किती वेळाने परत आलीस ? अरे बाबा, इतक्या उशीराने का आलास ? ' इत्यादि ह्मणण्यांत माझा काल जात असे. मी कोण व हा संसार ह्मणजे काय ? याची वार्ता स्वप्नातही माझ्या कानी पडली नाहीं. कारण मी एका कर्मठ श्रोत्रियाची पत्नी होतें व तत्त्वज्ञानाच्या अभावीं तोही मजप्रमाणेंच गृहकर्मांत व विधि–निषेधात आसक्त होता. एक निष्ठेने समिधा, दूर्वा, पलाशादिकांचीं पानें, दर्भ, गायीच्या शेणाच्या शेणी ( गोवऱ्या ) इत्यादिकांस आणणे, त्यांचा संचय करून ठेवणें इत्यादि कामापुढें त्यासही इतर विचार करण्यास फारसा अवकाश मिळत नसे. डोक्याला धाबळी बांधून, मस्तकाला व अंगाला भस्म फासून तो अर्थ-रहित वेदाक्षरे ह्मणत व आपणास जेवढें अवगत आहे तेवढें दुसऱ्यास शिकवित त्याचे आयुष्य जात असे. प्रात:कालचा होमादि विधि आटोपल्यावर शिष्याना वेदाक्षराचा पाठ सांगताना उन्हात बसून गायींच्या वासराच्या कानातील गोचिड्या काढून टाकण्याचा त्याचा परिपाठ असे. माझ्या पायास थारा ह्मणून कसा तो मुळींच नसे. मी आपल्या परसांत भाजी पेरिली होती. ती सुकून जात आहे, असें मला किंवा माझ्या त्या पतीला दिसलें की, आह्मी पाणी घालणाऱ्या नोकराना हाका मार-मारून व रागें भरून लवकर पाणी घेऊन या, ह्मणून ओरडून सांगत असों. आमच्या आगरातून पाण्याचे पाट वहात असत. त्याच्या कडेला कोवळें व हिरवें चार गवत उगलेले असे. तेथें लहान लहान गायींच्या वासरांना नेऊन मी स्वत: चरवीत असें. घरांत व दारात केर पडलेला दिसला कीं, लाग-

लाच तो झाडून दारात सडा व रागोळ्या मी घालीत असे. गृहातील पुत्र, स्नुषा इत्यादिकाना रीत लागावी ह्मणून मी त्यास नेहमी बोलत असे. अमुक अमुक ह्मणतो की, त्या अमक्याचा पुत्र चागला नाही; लबाड आहे, चोर आहे, त्याची सून उद्धट आहे, भाडखोर आहे, इत्यादि खरे-खोटे सागून मी त्यास नीतीचे शिक्षण देत असे ( या शिक्षणाचेच पुढे जाचात कसें पर्यवसान होते व त्यामुळेच आमच्या कित्येक मूर्ख व दुष्ट सासूच्या हाताखाली वागणाऱ्या सुनाचे कसे जन्माचे मातेरे होते, ते प्रसिद्धच आहे. ) मी आपली मर्यादा कधी सोडीत नसे. शेवटीं मला जरा आली. माझ्या अगाचा वर्ण पिकलेल्या पानासारिखा झाला. माझे कान बहिरे झाले, डोळ्यानीं दिसेनासे झाले. मस्तक कापू लागले, हातात काठी घेतल्यावाचून एक पाऊलही टाकवेना. पाठीस पोक आले. दातानी तर कधीच प्रयाण केले होते. त्यामुळे तोडातून लाळ पडत असे. पण इतके सर्व झाले तरी " हे माझे " ही भावना जशीच्या तशीच किंबहुना अधिक बळकट होती. मी मरू नये, आणखी काहीं दिवस जीवत असावे ही आशा काहीं केल्या कमी होईना. असो, असे बोलत त्या गिरिग्रा-माच्या आकाशातून फिरणाऱ्या लीलेने आपल्या बरोबर फिरणाऱ्या सर-स्वतीस बोटाने मोठ्या आश्चर्याने दाखवून म्हटले—देवि, ही पहा एकसारखी लाल पुष्पानी भूषित झालेली माझी पुष्पवाटिका. ही फुललेल्या अशोकानी युक्त असलेली अशोकवाटिका. ही पहा माझी पुष्करिणी. तिच्या काठी तीं पहा लहान लहान वासरे संल बाधलेली आहेत. तिच्या तीरावर सुदर वृक्ष कसे लाविले आहेत ते तू पाहिलेस ना ? त्याच्यावर वेली कशा चढल्या आहेत ? अरेरे ! ही कर्णिका नावाची वेल जणु काय माझ्या वियोगा-मुळेच सुकून गेली आहे. तिच्यावर एकही पान राहिलेले नाही. ही ती बिचारी माझी पाणी आणून देणारी दासी, माझ्या करिता आज आठ दिवस रडून रडून तिचे डोळे सुजले आहेत. देवि, मी येथे भोजन करीत होते, येथे रहात होते. येथे निजत होत्ये. येथे बसून देवधेव करीत होते व या ठिकाणीं मी दानें देत होते. हा पहा माझा ज्येष्ठशर्मा नामक पुत्र माझ्या करिता रडत आहे. ती पहा माझी दुभती गाय आगरात कोवळें गवत खात आहे. माझ्या घराचे हे पुढचें दार पहा. तो पहा माझ्या स्वयपाक गृहावर चढलेला भोपळीचा वेल. त्याच्यावर किती तरी

भोपळे लागले आहेत. या भूलोकचे प्रत्यक्ष बधच, असे हे आमचे बाधव जाळण्याकरिता वाळलेलीं लाकडें आणीत आहेत. रडून रडून त्याचे डोळे लाल झाले आहेत व त्याच्या दंडात रुद्राक्षाच्या माळा आहेत. टवटवीत व हिरव्या पानानी सुशोभित झालेले वृक्ष ज्याच्या तीरी रागेंने उभे आहेत, असा सगळ्या ग्रामातील लोकाच्या उपयोगी पडणारा हा मोठा पाण्याचा पाट या गृहमडपास परिवेष्टित करीत आहे. त्याच्या काठावरील कोवळे गवत व वेली, वेगाने वाहणाऱ्या त्याच्या पाण्याच्या शितोड्यानी सदा भिजलेल्या असतात. पलाशादि वृक्ष प्रफुल्लित झालेले असून त्याचे पाटाच्या प्रवाहात पडलेलें प्रतिबिब विद्रुम-रत्नजडित अलकाराचे स्मरण करवीत आहे पाटाच्या पाण्यातून वहात जाणारीं आम्रादि फळे धरण्याकरिता पोराची कशी धादल झाली आहे, पहा! अहाहा देवि, किती रमणीय स्थान आहे हे! येथील गार छायेचा उपभोग घ्यावयास मिळणे हे काही सामान्य भाग्याचे चिह्न नव्हे. असो, वर्णनीय वस्तूचे वर्णन कितीही जरी केले तरी तें थोडेच होते. येथे माझा पति वस्तुत· अक्रिय असूनही जीवाकाश झाल्यामुळे भूपति बनून चतु:समुद्र—वलयाकित पृथ्वीचे राज्य करीत होता. बरोबर, आता मला आठवले. “ मी लवकर राजा व्हावे ” अशी त्याला पूर्वी इच्छा झाली होती. शेवटीं शेवटीं तर त्याला त्याचाच ध्यास लागला होता. त्या दृढ—भावनेमुळे, हे परमेश्वरि, आठ दिवसात दीर्घकाल राज्योपभोगाचा अनुभव देणारे राज्य त्यास प्राप्त झाले. आता येथे माझ्या पतीचा हा जीव राजा झाला आहे. आकाशातील वायूप्रमाणे किवा वायूतील सुवासाप्रमाणे तो अदृश्य आहे. पण त्याचें ते अनेक योजने विस्तीर्ण असलेले स्थान या अंगुष्ठमात्र आकाशातच आहे, त्याच्या बाहेर नाही, हे मला समजलें. ईश्वरि, आम्ही दोघे चिदाकाशच आहो व माझ्या पतीचें राज्यही चिदाकाशच आहे. पण असे असूनही पर्वत, नद्या, वृक्ष, प्राणी इत्यादि सहस्रावधि भिन्न भिन्न पदार्थानीं भरलेले हे जग भासतें. परंतु ती माया परसली आहे. यास्तव हे देवि, पुनरपि पतीच्या नगरास जावें, असें मला वाटतें. तर चल. आपण आता तेथे जाऊ. ते स्थान येथून जरी दूर असलें, तरी उद्योग्याना दूर किवा असाध्य काय आहे?

**श्रीवसिष्ठ**—असें बोलून देवीस जिने नमस्कार केला आहे अशी ती लीला मंडपात प्रविष्ट झाली व एकाद्या पक्ष्याप्रमाणे देवीसह मंडपांतर्गत आकाशात उडाली. काजळाच्या ढिगाप्रमाणें, निश्चल समुद्राप्रमाणे, नारायणाच्या अंगकांतीप्रमाणे किंवा भ्रमराच्या पाठीप्रमाणे ते आकाश रमणीय व नीलवर्ण होतें. मेघमार्गाचें व वातस्कंधाचे उल्लंघन करून चंद्र, सूर्य, नक्षत्रें इत्यादिकांच्या पलीकडे असलेल्या ध्रुवमार्गांत त्या पोंचल्या. साध्यांचें स्थान, सिद्धांची भूमि, स्वर्गमंडल, ब्रह्मलोक, तुषितांचा लोक, गोलोक (वैकुंठ), शिवलोक, पितृलोक आणि विदेहमुक्त व सदेहमुक्त यांचे लोक यांच्यापुढें फार दूर एका क्षणात गेल्यावर तिला मागें पहावेंसे वाटले. आपण किती दूर आलो, हे जाणण्याकरिता ती जों फिरून पहाते तों खाली चंद्र, सूर्य, तारा, भुवनें यांतील कांही दिसत नाही, तर नुस्ता अंधकार पसरला आहे, असे तिच्या अनुभवास आले. तेंव्हा—

**लीला**—देवि, खाली सूर्यादि कांही दिसत नाही! ती सर्व तेजें कोठे गेली व हा दाट अंधकार कोठून आला?

**श्रीदेवी**—लीले, तू एका क्षणार्धात इतकी दूर आली आहेस कीं, सूर्यादि तेजोगोलही दिसत नाहीत ज्याप्रमाणे अतिशय खोल विहिरींत अगदी तळाशीं असलेला कांजवा दिसत नाहीं त्याप्रमाणे या महा-आकाशांत सूर्याच्या अतिशय पलीकडे गेलेल्या तुला सूर्य दिसत नाहीं.

**लीला**—अहाहा! देवि, आह्मीं आकाशांत इतक्या दूर आलों आहों काय की, जेथून अनेक योजनें विस्तीर्ण असलेला भगवान् भास्कर आह्मास खालीं अणु-रेणु एवढाही दिसत नाहीं! माते, आता यापुढील मार्ग कसा काय आहे, व त्यातून आह्मास कसे जावे लागणार? ते सांग. कारण तो मागच्या मार्गाहून निराळ्या प्रकारचा असावा, असें मला वाटतें.

**श्रीदेवी**—वत्से. यापुढें तुला ब्रह्मांडसंज्ञक संपुटाचें वरचें शकल दिसेल. चंद्र-सूर्यादि हे सर्व त्याच्याच धुळीचे अंश आहेत. (ह्मणजे पृथ्वीच्या मानानें जेवढा धुळीचा एक कण तेवढेही त्या संपुटाच्या मानानें ते नाहींत.)

श्रीवसिष्ठ—यात्रमाणें ती बोलत आहे तोंच त्या दोघी ब्रह्मांडाच्या वरील शकलास येऊन पोंचल्या. पर्वताच्या कड्यावरील दाट मंडपात जशा भ्रमरी सहज प्रवेश करितात व पुनः त्यातून बाहेर निघतात त्याप्रमाणे, किंवा अवकाशरूप आकाशात पक्ष्याचा जसा निष्प्रतिबंध संचार होतो त्याप्रमाणें त्याही, त्या ब्रह्मांडावरणातून सहज बाहेर पडल्या. ठीकच आहे. सत्य निश्चयाने युक्त असलेली वस्तु जशी वज्रासारखी दृढ असते तशी मिथ्या वस्तु नसते.

असो; जिच्या अनुभवज्ञानास आवरण मुळींच राहिलेले नाही, अशी ती लीला, त्याच्यापुढे, ब्रह्मांडाहून दशगुण अधिक जलावरण पाहती झाली. तें फार भयानक होतें. अक्रोडादि फळांना त्याच्यावरील साल जशी आच्छादित करून रहाते त्याप्रमाणे ते ब्रह्मांडास सर्वतः वेष्टून राहिले होते. त्या जलावरणाच्या पुढें जलाहून दसपट अधिक वह्नि; त्याच्या पलीकडे दसपट वायु, वायूच्या पलीकडे वायूहून दसपट अधिक आकाश व त्या आकाशाच्या पलीकडे अमर्याद परम शुद्ध चिदाकाश होते. त्या परम आकाशामध्ये उत्पत्ति, स्थिति, नाश इत्यादि कल्पना कधींही उद्भवत नाहीत. किंबहुना वंध्यापुत्राच्या इतिहासाप्रमाणे त्याचा तेथे असंभवच असतो. ते केवल, अनंत, शांत, निर्विकल्प, आदि–अंत–मध्यरहित व स्वतःच्या स्वरूपात स्वतःच्या आधाराने रहाणारे आहे. त्या शुद्ध चिदाकाशात, एक कल्पभर, एकसारिखी वरून एकादी शिला अति वेगाने जरी पडत राहिली, त्याचा ठाव काढण्याकरिता गरुड जरी कल्पभर उडत राहिला अथवा वायु जरी वहात सुटला तरी त्याचें परिमाण मिळणार नाहीं. तेव्हा, बा राघवा, ते चिदाकाश किती दृढ अपरिच्छिन्न ( अनंत ) आहे याचा तूंच विचार कर २९.

**सर्ग ३०—**वर वर्णन केलेल्या ब्रह्मांडासारखीं व त्याच्याहून विचित्र अशीं अनेक कोटि ब्रह्मांडें लीलेनें चैतन्याकाशात अणु–रेणूंसारिखीं पाहिलीं, असे या सर्गांत वर्णन केले आहे.

श्रीवसिष्ठ—रघुवीरा, याप्रमाणें उत्तरोत्तर दसपट अधिक प्रमाणाचीं पृथिव्यादि भूताचीं आवरणें ओलांडून त्या दोघी एका क्षणात पुढें गेल्या. लीलेनें तें परमाकाश ह्मणजे अविद्याशबल ब्रह्म पाहिलें. त्या आकाशांत वर वर्णिलेल्या ब्रह्मांडासारखींच जगत्संज्ञक असंख्य ब्रह्मांडें

पसरलीं होतीं. त्यातील प्रत्येक ब्रह्मांडास वर सांगितलेलीं आवरणें होतीं व अशीं कोट्यनुकोटी ब्रह्मांडे त्या आकाशांत वाळवटावरील रेतीच्या कणाप्रमाणें अथवा कवडशात तरगणाऱ्या त्रसरेणूप्रमाणें पसरलीं होतीं त्या महाकाशसज्ञक महासागरात अविद्या हेच अगाध जल असून त्याच्या महाचिद्रूपी द्रवापासून ब्रह्मांडरूपी असख्य बुडबुडे उठले आहेत त्यातील काही त्या त्या ब्रह्मांडावर अभिमान ठेवणाऱ्या जीवाच्या ज्ञानाप्रमाणें खाली जात आहेत, काही वर येत आहेत; काही तीर्यक् ( तिरकस ) जात आहेत व कित्येक स्तब्ध आहेत, असे तिला आढळलें. ज्याची ज्याची जेथे जेथें जशी जशी प्राक्तन उपासना—सवित ( ज्ञान ) होती त्याचे त्याचे तेथे तेथें त्या त्याप्रमाणे स्वरूप उत्पन्न झाले होते. ( अर्थात् साप्रतकाळी सृष्टीत दिसणारी विचित्रता पूर्व ज्ञानकर्मादिकाचे फल आहे व ते सर्व अनुभव घेणाऱ्या जीवाच्या दृष्टीने आहे. ) पण वस्तुतः पाहिल्यास त्या चिदाकाशात व या ब्रह्माडदेशातही ऊर्ध्व, अधः, तीर्यक्, इत्यादि काही नसते. जाणे, येणे, याही केवळ कल्पना आहेत. ते चित्—तत्त्व या सर्वांहून निराळेच काही आहे. ते काय आहे व कसे आहे, याचे वाणीने वर्णन करवत नाही व मनाने चिंतन करवत नाहीं. शास्त्रात देहाच्या उत्पत्तीचे जे वर्णन केलेले असते ते अज्ञानी लोकास समजाविण्याकरिताच केवळ असते. आता तू ह्मणशील कीं, धर्मीच जर नाही तर उत्पत्ति व नाश या कल्पना कोणत्या अधिष्ठानावर होतात ? तर त्याचे उत्तर सागतो ऐक. आत्म्याविषयीचे जे स्वाविद्यानामक अज्ञान त्याच्यायोगाने उत्पन्न होणाऱ्या सकल्पामुळे सवितूच्या अधिष्ठानावर व्यक्त होऊन सकल्पाबरोबरच पदार्थ नाश पावतात. ( नाशपावतात ह्मणजे स्वयप्रकाश सवितूमध्यें जलतरंग—न्यायाने लीन होतात. त्यामुळे त्याची उत्पत्ति व नाश या दोन्हीं कल्पना आहेत. )

**श्रीराम**—पण, महाराज, अधिष्ठानभूत ब्रह्मामध्ये जर दिशांचें नाव सुद्धा नाहीं तर अध्यस्तामध्यें ( ह्मणजे आरोपित वस्तूमध्ये ) त्या कशा असणार ? व दिशाचाच जर पत्ता नाहीं तर अधः, ऊर्ध्व, तीर्यक् इत्यादि व्यवहार, या काल्पनिक जगामध्यें, कसे होणार ? अधिष्ठानात असलेले धर्मच आरोपित वस्तूत येतात, असा नियम नाहीं का ?

**श्रीवसिष्ठ**—रामा, हा प्रपंच मायिक आहे. यास्तव त्यांत वरील नियम जरी राहिला नाहीं तरी त्यात काही दोष नाही. ज्याची दृष्टि मद झाली आहे अशा पुरुषास, उजेडाकडे पाहू लागले असता, डोळ्यापुढे अंतराळीं जसे कुरळ्या केसाचे आकार दिसतात, त्याप्रमाणे या सर्वव्यापी अनंतात्म्यामध्ये अवरणासह ही सर्व ब्रह्मांडे भासतात. किंवा सर्व वस्तु ईश्वराच्या इच्छेच्या अधीन आहेत. यास्तव त्याच्या इच्छेप्रमाणे सर्व व्यवहार होत असताना आह्मी मनुष्यानी ठरविलेला एकादा नियम जरी बाधित झाला तरी त्यात काही दोष नाही. शिवाय अधः, ऊर्ध्व इत्यादि कल्पना सापेक्ष आहेत. ह्मणजे फुलाच्या अपेक्षेने देठ खाली असते, देठाच्या अपेक्षेनें फुल वर असते, इत्यादि व्यवहार जसा आपण नेहमीं करितो त्याप्रमाणे महापृथ्वीरूप जो हा ब्रह्मांडाचा भाग तो अधोभाग व त्याहून निराळा जो नभोभाग तो ऊर्ध्व भाग, अशी कल्पना केलेली आहे. पण यावर तू ह्मणशील की, खरोखरच जर अधोभाग नाही, ती केवळ सापेक्ष कल्पना आहे, तर देठापासून सुटलेले फळ जे नियमाने खाली येते ते का? गुरुत्वामुळे होणारे फल–पतन अधर–दिशेच्या अस्तित्वावाचून होणें अशक्य आहे तर त्याचे कारण सांगतो. गुरुत्व ह्मणजे काय हे तुला बरोबर समजले ह्मणजे असली शंका येणार नाही. शब्द–स्पर्शादि विषयांमध्यें जशी आपापल्या इंद्रियास आपणाकडे आकर्षण करून घेण्याची शक्ति असते त्याप्रमाणे पृथिव्यादि पदार्थांमध्ये आपापल्या अंशास आपणाकडे ओढून घेण्याची शक्ति आहे. तिलाच गुरुत्व असे ह्मणतात. फळे, फुले इत्यादि पृथ्वीचे अंश आहेत त्यामुळें ते देठावरून निघताच आपल्या मूळ जननीकडे येतात व ती ही त्यांना आपल्याकडे ओढून घेते. तस्मात् गुरुत्वाच्या सिद्धीकरिता दिशा मानिल्या पाहिजेत हे ह्मणणे व्यर्थ आहे. वास्तविक दिशा नसल्यामुळेंच अतिशय गुरु ( जड ) असलेले हे ब्रह्मांडगोलक खाली पडत नाहीत व त्यांच्या जलादि आवरणाचा आणि त्यांचा वियोग होत नाही. यास्तव अध्यस्त जगातील दिशांची उपपत्ति लागावी ह्मणून अधिष्ठानचैतन्यामध्यें दिशा आहेत, असे मानण्याचे काहीं कारण नाहीं. हा आमचा सिद्धांत, भूगोलास खगोलाने ( ह्मणजे ज्योतिश्चक्राच्या आधारभूत गोलानें ) सर्व बाजूनीं वेष्टिलें आहे, असे मानणाऱ्या ज्योतिःशास्त्रज्ञासही मान्य

आहे. कारण ते आपल्या ग्रथात असा दृष्टात देत असतात—अतराळी धरलेल्या मातीच्या वर्तुळ गोळ्यावरून मुगी फिरू लागली असता ती खालीं, वर, पूर्वेस, पश्चिमेस इत्यादि कोणत्याहि दिशेत जरी गेली व तिचे शरीर खाली, वर कसेंही जरी झाले तरी तिचे पाय लागतात तो अधोभाग व पाठ हा ऊर्ध्व भाग होय. याच न्यायाने सूर्यादि हा ऊर्ध्व व पृथ्वी हा अधोभाग आहे. (आता प्रस्तुत ब्रह्माडाचे वैचित्र्य दाखविण्याकरिता त्याचें वर्णन करितात.) असो; काहीं ब्रह्माडातील भूतले वृक्ष व वारुळे यानीं वेष्टित असतात. त्यात मनुष्ये नसतात व ती अतरिक्षे देव, किन्नर, दैत्य यानीं भरलेलीं असतात. काही ब्रह्माडे तात्कालिक सकल्परूप चतुर्विध प्राणिसमूहासहवर्तमानच पिकलेल्या अक्रोडाप्रमाणें उत्पन्न होतात. ज्याप्रमाणे विंध्यपर्वतावरील अरण्यात गज असतात त्याप्रमाणें या पर ब्रह्मामध्ये ब्रह्माडत्रसरेणू आहेत.

**श्रीराम**—जशीं ही ब्रह्माडे चिदाकाशाच्या अपेक्षेनें त्रसरेणु तसेच ते चिदाकाशही दुसऱ्या एकाद्या वस्तूच्या अपेक्षेने सूक्ष्म आहे की काय?

**श्रीवसिष्ठ**—नाहीं. त्याच्याहून अधिक काहीं नाहीं. कारण स्थितिसमयी हे सर्व त्याच्याठायीं असतें, उत्पत्तिसमयीं हे सर्व त्याच्यापासून उत्पन्न होते व प्रलयकाली हे सर्व तद्रूप होते. यास्तव सर्व दिशामध्ये, सर्वकालीं व सर्व वस्तूमध्यें तेच परम तत्त्व आहे. तेच हा सर्वमय आत्मा आहे. तेव्हा ते दुसऱ्या कोणाच्या अपेक्षेने सूक्ष्म असणार? त्या शुद्ध बोधमय परम प्रकाशरूप सागरामध्ये हे ब्रह्माडसज्ञक तरग एकसारिखे येऊन नाहींसे होत असतात. त्यातील काही ब्रह्माडें अतःशून्य होऊन राहिली आहेत. ह्मणजे तीं अव्याकृत आहेत. अर्थात् पूर्व कल्पातील सर्व सकल्पबीजभूत लिंगोपाधींचा क्षय झाला असता तमोरूप होऊन राहिलीं आहेत. निजलेल्या प्राण्याप्रमाणे त्याची स्थिति आहे. ("पूर्वी असत् असून त्याच्यापासून सत् झाले" असे जे यजुर्वेदाच्या उपनिषदाचे वचन आहे त्यातील असत्–शब्दाप्रमाणेंच शून्यता–शब्दानेंही अव्याकृताचाच निर्देश करितात.) पण त्या शून्यसागरात, प्रसिद्ध सागरातील तरगाप्रमाणे, तीं आहेत, अशी कल्पना होते. कारण व्यावहारिक समुद्राच्या पाण्यावर एकादे वेळीं तरग जरी न दिसले तरी त्या पाण्यात ते बीजरूपाने आहेत अशीच कल्पना करावी लागते व ती न केल्यास तरगांच्या उत्पत्तीची

उपपत्ति लागत नाहीं. त्याप्रमाणेंच काहीं ब्रह्मांडे जरी शून्यरूप (अव्याकृत, अव्यक्त) असलीं तरी तीं आहेत असाच तर्क होतो. असो; कित्येक ब्रह्मांडामध्ये कल्पात होण्याचा प्रसग आलेला असून तेथे भयकर बर्बर ध्वनि प्रवृत्त झाला आहे. पण स्वभावतःच विषयरसात दग झालेल्या दुसऱ्या दुर्भाग्यास तो ऐकू येत नाहीं व त्याना त्याचे भानही नाहीं. दुसऱ्या कित्येक ब्रह्मांडास नुक्ता आरभ झाला आहे. त्यामुळें ज्यांतील भुवने अगदीं प्रारंभी उत्पन्न झालेल्या प्राण्यानीं दूषित झालेलीं नाहीत अशा त्या अति शुद्ध भुवनात भूमीत बीं पेरून त्यावर पाणी शिपले असता जशी अकुरकला उद्भवते तशी सृष्टि उत्पन्न होऊ लागली आहे. कित्येक ब्रह्मांडात महाप्रलय होण्याच्या वेळी सर्व भुवनास जाळून स्वतः सूर्यही स्वकारणात शात होत होता. कित्येक ब्रह्मांडास स्थिर होण्यास कोठे आधारच मिळेना, त्यामुळे आपल्या पूर्व सवित्–प्रमाणे तीं सर्व कल्पभर पतन पावत राहिली होती कित्येक ब्रह्मांडें स्थिर होती व कित्येक आपल्या पूर्व ज्ञानाप्रमाणे स्पदरूप होती.

**श्रीराम**—पण गुरुवर्य, धात्याने पूर्वीप्रमाणें या सर्व सृष्टीची पुनरपि रचना केली, असे वेदवचन आहे. तेव्हा त्याच्या विरुद्ध आपण मला हे जगाचे वैचित्र्य कसे सागता?

**श्रीवसिष्ठ**—ते वेदवचन पूर्वकल्पीं जशी धात्याची सृष्टि होती तशाच पुढच्या सर्व सृष्टि झाल्या, असे सागत आहे. पूर्वजन्मीं केलेल्या वेदशास्त्रोक्त आचारामुळे धातृभावास प्राप्त झालेल्या प्रजापतीने, पहिल्याच सर्गामध्ये, इतर प्रजापतींच्या सर्गाहून वेगळी सृष्टि जशी निर्माण केली होती तशीच ती पुढेही कल्प समाप्त होई तो होत राहिली. कल्पाच्या आरभीं जसें सृष्टीचें स्वरूप असतें तसेच ते तो कल्प सपेपर्यत रहातें. मध्यें कितीही जरी उत्पत्ती व प्रलय झाले तरी ते बदलत नाहीं, असा याचा भावार्थ आहे. अर्थात् एका धात्याच्या सृष्टीप्रमाणेच दुसऱ्या धात्यानें सृष्टि रचली पाहिजे, असा नियम नाहीं. त्यामुळें प्रत्येक प्रजापतीच्या सृष्टींत वैचित्र्य असल्यास त्यात काहीं विरोध, हानि किंवा दोष नाहीं. शिवाय "तपश्चर्येच्या योगानें पित्या परमेश्वरास सतुष्ट करून एकमेकास जिंकण्याची इच्छा करणारे ते एकमेकापासून उत्पन्न होतात." असे पुराणात सांगितले आहे. त्यावरून ब्रह्मा, विष्णु व महेश हे कल्पभेदानें एकमेकांपासून उत्पन्न होतात;

असें ठरतें. जो त्याचा उत्पादक असेल तोच त्या कल्पाचा मुख्य असणार हे निर्विवाद आहे. विष्णु सत्त्वगुणी, ब्रह्मा रजोगुणी व शिव तमोगुणी आहे. ह्मणजे ते ते गुण त्याच्यामध्ये प्रधान आहेत. त्यामुळे त्यानीं रचलेल्या सृष्टींत सारखेपणा असणें शक्य नाही. अर्थात् कल्पाच्या आरंभी जी देवता हिरण्यगर्भ झाली असेल, तिच्या स्वभावाप्रमाणें आद्य सृष्टि निर्माण होऊन त्या कल्पभर, प्रत्येक प्रलयाच्या शेवटीं, तशाच प्रकारची सृष्टि होत रहाते. पण प्रत्येक कल्पाच्या आरभीं हिरण्यगर्भाच्या स्वभावाप्रमाणे होणारी सृष्टि भिन्न भिन्न प्रकारची असणेच अगदीं सभवनीय व युक्त आहे. यास्तव त्यातील काही ब्रह्माडात विष्णु अधिपति होता. काहीत चतुर्मुख ब्रह्मा मुख्य होता. कित्येकाचा स्वामी रुद्र होता व त्याचप्रमाणे भैरव, दुर्गा, विनायक, इत्यादि भिन्न भिन्न देवता भिन्न भिन्न ब्रह्माडाचे नियमन करीत होत्या. काहीं ब्रह्माडें तर नियामकरहित होती. कित्येकात तिर्यक् प्राण्याचेच प्राबल्य होते. साराश प्राण्याच्या विचित्र कर्मवासनाप्रमाणे स्रष्टयासही विचित्र इच्छा होऊन विचित्र ब्रह्माडाचा उद्भव होणे अगदी साहजिक आहे. अशा विचित्र अनत सृष्टींनी, अनत प्राण्यानीं, अनत व्यवहारानी व सर्व प्रकारच्या अनततेनें भरलेले हे महाप्रकाश चैतन्य इतके विस्तृत होऊन राहिले आहे कीं, विष्णु, शिव इत्यादि महाशक्तिमान् देव आपल्या जन्मभर जरी धावत राहिले तरी त्यास त्याचा अत लागणे शक्य नाही. भूमीमध्ये स्वाभाविकपणाच इतर भूतास आकर्षण करून घेण्याची शक्ति आहे, असे वर सागितलेच आहे त्या शक्तीमुळे पृथ्वीच्या सभोवार असलेली जल, तेज, इत्यादि आवरणे पृथ्वीस सोडून दूर जात नाहीत. रामा, आता आणखीं या मायिक जगाचे वर्णन मी किती करू ? अथवा ते कितीही केले ह्मणून काय होणार ? बाबारे, आमची बुद्धि या विषयात याच्यापुढे जाऊ शकत नाहीं. पण आह्मास सृष्टीचें याहून अधिक वर्णन करिता येत नाहीं ह्मणून ती एवढीच आहे, असे समजू नकोस. आह्मास किंवा दुसऱ्याही सर्व आत्मनिष्ठास माहीत नाहीं अशी आणखीं कितीतरी सृष्टि असण्याचा सभव आहे. कारण मायेच्या ठायीं असलेली सर्गशक्ति अनत आहे. यास्तव भयकर अधकारानें भरलेल्या महा-अरण्यात जसे मदोन्मत्त यक्ष एकमेकास न दिसतांच नाचत असतात त्याप्रमाणें

या परमाकाशांत हीं अनत ब्रह्मांडें एकमेकांस न दिसतां आपापला व्यवहार करीत राहतात ३०.

**सर्ग—३१.** अत पुरदर्शन, दुसरें ब्रह्माडदर्शन शूराच्या चिह्नांनीं सज्ज झालेल्या सैन्याचें दर्शन व धर्माधर्म युद्ध याचे वर्णन या सर्गात करितात

**श्रीवसिष्ठ**—याप्रमाणे आपल्या पूर्व जन्मींच्या जगातून निघून ब्रच्या सर्गात वर्णन केल्याप्रमाणे अनेक ब्रह्माडाची विचित्रता पहात त्या दोघी त्यातील एका ब्रह्माडात झटकर प्रविष्ट झाल्या व तेथील अत.पुरास पाहून तेथूनही झटकन बाहेर आल्या. त्या अत:पुरात राजाचें शव तसेच पुष्पाच्या राशीत होतें. त्या शवाच्या जवळच समाधि लावून बसलेले लीलेचे शरीर होते. शोकामुळे दीर्घ झालेल्या त्या रात्रीं तेथील सर्व लोक निद्रा घेत होते व तें अत पुर पूर्वीप्रमाणेच धूप, चदन, कापूर इत्यादिकाच्या सुवासाने भरून गेले होते. त्या सर्गास पाहून आपल्या पतीच्या पुढच्या नव्या सर्गास पहाण्याच्या इच्छेने लीला सकल्प देहाने त्या अत.पुरातील मडपाकाशात उडून गेली व त्या ससाराचे आवरण आणि ब्रह्माडाचे सपुट याचे उल्लघन करून किंचित् विस्तृत अशा पतीच्या सकल्प–ससारांत शिरली. ती देवी-सह पुनरपि मोठ्या वेगाने आवरणयुक्त व विस्तृत अशा ब्रह्माडमंडपात शिरून भर्त्याचे सकल्प–जग पाहती झाली. साराश पिकलेल्या फळात ज्याप्रमाणे दोन मुग्या प्रवेश करितात त्याप्रमाणे आकारूपी देवी त्या आकाशरूपी ब्रह्माडात शिरून आकाशरूपी जग पहात्या झाल्या. त्यातील निरनिराळे लोक, पर्वत व अतरिक्ष, याचे उल्लघन करून त्या दोघी पर्वत, नद्या, समुद्र, वृक्ष इत्यादिकानीं मडित व मेरूच्या योगाने अलकृत झालेल्या नवद्वीपयुक्त जबू–द्वीपास येऊन पोंचल्या. त्यातील भारतवर्षामध्यें जाऊन लीला आपल्या पतीचें राज्य पहाती झाली. पण इतक्यात त्यातील एक मत्त ( सिधू देशाचा ) राजा, आपल्या सर्व माडलिकासह, तिच्या पतीच्या राज्यांत घुसून आपल्या सैन्याकडून त्याचा देश उद्ध्वस्त करून टाकू लागला. तेव्हा लीलेच्या पतीलाही शस्त्र उचलणे भाग पडले. त्याच्याशीं या राजाचा संग्राम सुरू झाला असता तो पहाण्या करिता आलेल्या त्रैलो-क्यातील प्राण्यानीं आकाश गच्च भरून गेलें होतें. पण हे सर्व मिथ्या.

आहे, असा त्या दोघींचा निश्चय असल्यामुळें व अंतर्धानादिकांत फार कुशल असल्यामुळें त्याही निःशंकपणें अंतरिक्षांत शिरल्या. तेथे मेघमंडलानीं जसें आकाशास आच्छादित करून सोडावें त्याप्रमाणे नभश्वराच्या गणानीं ते व्याप्त होतें. सिद्ध, चारण, गंधर्व, विद्याधर, शूरांचे ग्रहण करण्याकरिता आलेल्या अप्सरा, रक्तमांसादिकाच्या लोभाने जमलेलीं व आनंदाने नाचरणारीं भूते, राक्षस, पिशाचे, पुष्पांचा वर्षाव करण्याकरितां हातांतून पुष्कळ पुष्पे घेऊन आलेल्या विद्याधरांच्या स्त्रिया, इत्यादिकांची तेथे एकच गर्दी झाली होती. योध्यांच्या शस्त्रास्त्रांपासून आपणास त्रास होऊ नये ह्मणून वेतालादिकांनीं पर्वतांच्या शिखरांचा आश्रय केला होता. खालीं संग्राम करीत असलेल्या लोकांचीं शस्त्रास्त्रे येथपर्यंत येण्याचा संभव आहे, असे पाहून अंतरिक्षांत अगदीं पुढे गेलेले नभश्चर मागें पळत होते. अभिमानानें भरलेल्या लोकांच्या आरोळ्यांनी ते (अंतरिक्ष) भरून गेले होते. त्यांतील प्राणी पुढे होणाऱ्या या भयंकर संग्रामाविषयी नाना प्रकारच्या वार्ता आपसांत बोलत होते त्यांतील, सहज हास्य व विलास याविषयीं उत्कंठित झालेल्या सुंदर स्त्रियांनी आपल्या हातांत चामरें धारण केली होती. अतिशय धर्माचरणामुळे दुसऱ्यास न दिसणारे व योगसामर्थ्यामुळे श्रेष्ठ झालेले मुनि त्या अंतरिक्षांत उभे राहून जगाच्या स्वास्थ्याकरिता देवतांचा स्तव करीत होते. गंधर्वादि लोकपाल आपल्या अप्सरा-प्रभृति स्त्रियांनी आपली उपेक्षा करून खालून नवीन येणाऱ्या वीरांशीं संबंध करू नये ह्मणून त्यांची त्या कालास अनुरूप अशी स्तुति करीत होते. स्वर्गास योग्य असलेल्या शूरास आणण्याकरिता इंद्राचे भट तेथें व्यग्र होते. त्या अंतरिक्षांत शूरांचा सन्मान करण्याकरिता लोकपालांचें ऐरावतादि हत्ती अलंकृत करून उभे केले होते. येणाऱ्या शूरांचा सन्मान करण्याकरिता तेथील गंधर्व व चारण अगदीं सज्ज होऊन राहिले होते. शूरास वरण्याविषयीं उत्कंठित झालेल्या अनेक देवस्त्रिया सैन्यांतील शूरांकडे वक्र दृष्टीने पहात होत्या. लंपट झालेल्या स्त्रिया वीरांच्या भुजदंडास घट्ट धरून ठेवित होत्या. तेथील शूरांच्या यशानें दिवाकर (सूर्य)ही चंद्रतुल्य शीतल झाला होता. (ह्मणजे त्यांच्या यशापुढे सूर्याचें तेजही मंद झाले.)

**श्रीराम**—भगवन्, आपण कशाप्रकारच्या योद्धयास उद्देशून येथे शूर-शब्दाचा उपयोग करीत आहा? कोणता योद्धा स्वर्गाचे भूषण होत असतो व डिंभाहव कशास ह्मणतात?

**श्रीवसिष्ठ**—शास्त्रोक्त आचाराने युक्त असलेल्या प्रभूकरिता समरांगणामध्ये जो लढता लढता मरतो, किंवा विजयी होतो तो शूराच्या उत्तम लोकास पात्र होतो. पण अशा रीतीने न मरता इतर प्राण्यानी ज्याचे हात, पाय इत्यादि तोडले आहेत व त्यामुळें जो मेला आहे, त्यास डिंभाहवहत ह्मणतात. अशा प्रकारे संग्रामात मरण पावलेला क्षत्रिय नरकाचा भागी होतो. (आता हेच अधिक स्पष्ट करितात.) शास्त्राप्रमाणें ज्याचे आचरण नसते अशा पुरुषाकरिता लढून जो पुरुष संग्रामात मरतो तो अक्षय्य नरकास जातो. शास्त्राचार व लोकाचार याप्रमाणे यथाशक्ति आचरण करणारा जो क्षत्रिय, हा स्वधर्म आहे, असे समजून लढतो तोच खरा भक्त व शूर होय. गायींच्या संरक्षणाकरिता, ब्राह्मणाच्या स्वास्थ्याकरिता, सज्जनास मान्य होणाऱ्या मित्राकरिता व शरणागताचें रक्षण करण्याकरिता युद्ध करून जो मरण पावतो तो पुरुष स्वर्गाचें भूषण आहे. ज्याचें परिपालन करणे अगदीं अवश्य आहे अशा स्वदेशाचे रक्षण करण्याकरिता जो राजा युद्धास प्रवृत्त झालेला असतो त्याच्याकरिता समरांगणीं मरणारा योद्धा वीरलोकास जातो. पण प्रजेस उपद्रव देण्यामध्येंचें जे तत्पर असतात त्या राजाकरिता अथवा राजा नसलेल्या आपल्या स्वामीकरिता जे युद्धात मरतात ते अधोगतीस जातात. शास्त्राच्या आज्ञेप्रमाणे आचरण न करणाऱ्या राजाकरिता किंवा दुसऱ्या एकाद्या धन्याकरिता लढाई करीत असताना शत्रूच्या शस्त्रानीं अंगाचे तुकडे तुकडे होऊन मेलेला क्षत्रीय निःसंशय नरकास जातो. धार्मिक धन्याकरिता जें युद्ध करावयाचे तेंही धर्मयुद्धच केलें पाहिजे. कारण तसे न केल्यास त्यास स्वर्गलोकात थारा मिळत नाहीं. कारण अधर्मयुद्धाने मरणारालाही जर स्वर्ग मिळू लागला तर सर्वच सशस्त्र लोक परलोकाविषयीं निर्भय होऊन जगात अनर्थ करून सोडतील. यास्तव समरांगणात सन्मुख मरणारास पदोपदीं स्वर्ग मिळतो, असें जें धर्मशास्त्रात ह्मटलेले आहे त्याचा अर्थ–धर्मयोद्धयासच स्वर्ग मिळतो; अधर्मयुद्धानें सन्मुख मरणारासही तो मिळत नाहीं;–असा समजावा. कारण न्यायान्याय,

धर्माधर्म इत्यादिकांचा विचार न करिता केवळ युद्धात मेल्यानेच स्वर्ग मिळतो, असें ह्मणणे हा मोठा अन्याय होईल. तस्मात् सदाचरणी व न्यायी स्वामीकरिता जे तरवारीच्या धारा सहन करितात तेच शूर असून बाकीचे सर्व डिंभयुद्धामध्ये मेलेले होत. अशा शूराकरिताच उत्सुक होऊन देवस्त्रिया महा बलाढ्य वीराच्या आम्ही दयिता ( स्त्रिया ) आहोत, असे ह्मणत अंतरिक्षात उभ्या रहातात. असो, वर सांगितल्याप्रमाणे ते अंतरिक्ष अनेक प्रकारच्या भूतसमूहानी भरून गेले होते ३१.

**सर्ग—३२** त्या दोघीनी युद्धाच्या इच्छेनें सज्ज झालेल्या त्या दोन्ही सेना पाहिल्या, असे येथें वर्णन करितात

**श्रीवसिष्ठ**—श्रेष्ठ वीराकरिता उत्सुक होऊन नाचू लागलेल्या अप्सराच्या समूहात उभी राहून लीला सरस्वतीसह खालची दोन्ही सैन्ये पाहू लागली. तिच्या पतीने ज्याचे पालन केले आहे अशा त्या प्रदेशात तीं दोन्हीं सैन्ये जलचराच्या वेगामुळे क्षुब्ध झालेल्या दोन महासमुद्राप्रमाणे ओळीने उभीं होती त्यातील सेनापति नानाप्रकारच्या व्यूहाची रचना व शस्त्रास्त्राची व्यवस्था करण्यात तत्पर झाले होते. दोन्ही सैन्याच्या मध्यभागी, शूरासह दोघे राजे उभे होते. कवचादि चढवून आणि शस्त्रास्त्रे घेऊन युद्धाकरिता सज्ज झालेले तें सर्व सैन्य पेटलेल्या अग्नीप्रमाणे अद्भुत दिसत होते. त्यातील कित्येकानी चकचकित खड्ग कोशातून बाहेर काढिलीं होतीं. कित्येक ढाला सावरीत होते कित्येक शूल, भिंदिपाल, परशु इत्यादिकास उठवून शत्रूवर पहिला प्रहार करण्याचा प्रसंग केव्हा येतो ह्मणून वाट पहात होते. त्या भयंकर युद्धाच्या चिंतेने कित्येकाचे नेत्र स्थिर व उग्र झालेले होते. शत्रुविषयी चित्तात अतिशय क्रोध उद्भवल्यामुळें कित्येकाच्या भुवया वर चढल्या होत्या. झंझावाताने जसे वनातील वृक्ष कंपायमान होतात त्याप्रमाणे त्या दोन्ही सैन्यातील लोक नानाप्रकारच्या निमित्तानीं चंचल झाल्यासारिखे दिसत होते. त्यातील श्रीमान् योद्धयाच्या अंगातील सोन्याची चिलखतें उदय पावणाऱ्या सूर्याच्या प्रकाशानें चकचकत होतीं. सैन्याच्या अगदी पुढच्या रांगेतील लोक एकमेकाकडे पाहून शस्त्रे उगारून एकमेकास मारण्याच्या खुणा करीत होते. कित्येक योद्धे एकमेकाकडे नेत्र वटारून एकसारिखे पाहू लागल्यामुळें चित्रासारिखे दिसत होते. सेनापतींनी दोन्ही सैन्यातील लोकास

एकमेकाच्या समोर, थोड्या अतरावर, लाबच लाब ओळीने उभे केल्यामुळें, तो एक मोठा सागर असून, त्याच्या मधील पाच–दहा हात अतर हाच एक त्यावरील मोठा सेतु आहे, असा भास होत होता. सैनिकाच्या कोलाहलामुळें कोणाचे बोलणे कोणालाही ऐकू येईनासे झाले. प्रथम आपणासच मार बसेल या भीतीनें दुदुभी, ढोल इत्यादि वाद्ये वाजविणारे लोक आपला वाद्य–व्यवहार बद करून एकीकडे होण्याच्या तयारीस लागले. दोन्ही सैन्यामध्यें जे थोडेंसे, पण लाबच लाब अतर होते ह्मणून वर ह्मटलें आहे त्याच्याकडे पाहून कल्पातवायूने आपल्या वेगानें त्या महासागरास दुभगून सोडलें आहे की काय, असा भास होत असे. दोन्हीं सेनातील राजास युद्धाच्या परिणामाविषयीं सशय वाटत असल्यामुळे त्याची मने जरा चितायुक्त झालीं आहेत, असे त्याच्या आकारादिकावरूनच अनुमान होत होते. त्यावेळी तेथे जे भीरु ( भितरे ) होते त्याचीं हृदये बेडकाच्या गळ्याखालच्या कातडीप्रमाणे कापत होती. दोन्ही पक्षातील असख्य वीर आपले प्राणरूपी सर्वस्व रणागणीं समर्पण करण्यास सिद्ध झाले होते. त्यातील धनुर्धर धनुष्यावर प्रत्यचा चढवून व तिला आकर्ण ओढून शर–वर्षाव करण्यास उद्युक्त झाले होते. आता शस्त्रप्रहार सुरू होणार, असें समजून सर्व युद्धकुशल वीर त्याचा प्रतीकार करण्याच्या तयारीनें निश्चल होऊन राहिले. सेनापतीची आज्ञा होताच शत्रूवर सारखा मारा करावयाचा अशा निश्चयाने प्रत्येक वीर निर्दयपणें भुवया चढवून उभा होता. जवळ जवळ उभ्या राहिलेल्या सैनिकाचीं कवचें एकमेकास लागून खटखट असा मोठा ध्वनि होत होता. वीराचे उग्र स्वरूप पाहून तेथील भीरूंनीं पळ काढण्यास जेव्हा आरभ केला त्यावेळीं त्यातील प्रत्येकाचे जीवित सशयात पडले होते. चतुरग सैन्याच्या हालचालीमुळे अतरिक्षात उडालेली धूळ मेघापर्यत येऊन पोचली. शूराच्या अंगात वीररसाचा संचार व्हावा म्हणून राजाच्या आज्ञेनें धम, धम, धम, असा वाद्य ध्वनि चोंहोंकडे पुनः सुरू झाला व त्यामुळे अतरिक्षही दुमदुमून गेले. पातकाच्या योगाने व हत्तीवर बसलेल्या लोकाच्या वर उचललेल्या हातांमुळें आकाशभागालाही अपूर्व शोभा आली होती. चक्रव्यूह, गरुडव्यूह, श्येनव्यूह इत्यादि व्यूहाची रचना करण्यांत सेनापतींनीं आपापलें चातुर्य पुष्कळ खर्च केल्याचे आढळून येत होतें. तात्पर्य अनेक शस्त्रें, अस्त्रें,

व्यवहार, ध्वनी, रचना, देखावे, आश्चर्यें इत्यादिकांचें तेथें एकाच वेळीं दर्शन होत होतें ३२.

**सर्ग—३३.** या सर्गांत वरील दोन्ही सैन्याच्या संग्रामास आरंभ झाला व तो त्या दोघी अलौकिक स्त्रियानीं पाहिला असे वर्णन करितात.

**श्रीराम**—महाराज, त्या दोन्हीं सैन्याच्या संग्रामाचा वृत्तात मला थोडक्यात सागा. कारण असल्या कथानकाच्या योगानें तत्त्वज्ञान–श्रवणाविषयीं आलेला आळस नाहींसा होऊन पुनः तात्त्विक उपदेश ग्रहण करण्यास बाद्धि सज्ज होते.

**श्रीवसिष्ठ**—रामा, नतर त्या दोघी स्त्रिया सकल्पाने तयार केलेल्या व अतरिक्षात स्थिर झालेल्या विमानात बसल्या. इतक्यात खालचे वीर एकमेकाशी भिडू लागले. दोन्ही दळे मिळून गेली व जिकडे तिकडे मारहाण सुरू झाली. लीलेच्या विदूरथ नामक पतीनें प्रतिपक्षातील लोक आपणावर प्रहार करण्याच्या विचारात आहेत, असें पाहून त्यातील एका निर्भय योद्धयावर आपला मुद्गर फेकिला. तो त्याच्या उरःस्थळीं आपटला व त्यामुळें तो वीर व्याकुळ झाला. पण त्याचे इतर अनुयायी राजावर चाल करून येऊ लागले. ते पाहून विदूरथाचें रक्षण करण्याकरितां ज्यानीं पूर्वी प्रतिज्ञा केल्या होत्या ते वीरही पुढे सरसावले. मग काय विचारता! चकचकीत खड्ग सूर्य–प्रकाशात चमकून शत्रूवर पडू लागली. त्याचा एकमेकावर आघात होऊन खणखण असा ध्वनि निघू लागला. अस्त्राचा कवचादि कठीण पदार्थावर प्रहार झाल्यामुळें अग्नीच्या ठिणग्या उसळू लागल्या. वीर पुरुष मोठमोठ्याने सिंहनाद करूं लागले. धनुष्याच्या गुणाचा टणत्कार श्रोत्याच्या कानटाळ्या बसवू लागला. मेघधाराप्रमाणें बाणाचा वर्षाव होऊ लागला. तीक्ष्ण शस्त्रधारानीं अगें छिन्न–भिन्न झाल्या कारणानें ओरडत व तडफडत पडलेल्या लोकास पाहून दैवी प्रकृतीच्या लोकाच्या मनात दयेचा प्रादुर्भाव झाला. त्यावेळीं त्या समरभूमींत एकसारखा सहार चालला होता. कोणी हत्तीवर बसून, कोणी घोड्यावर बसून, कोणी रथात बसून व पुष्कळसे पायानींच यथाशक्ति मारामारी करीत होते. ( मी वाचावें व दुसऱ्यानीं मरावें, ही प्रत्येकाची इच्छा. मला सर्व चागले हवे, दुसऱ्यास नसलें तरी चालेल, ही प्रत्येकाची भावना व त्याकरिताच हे एवढें रण. या सृष्टींत मनुष्यजन्म

घेऊन हेच पशुकृत्य करावयाचें; दुसरें काय!! ईश्वरा, धन्य आहे तुझ्या मायेची. पहा, तिनें शहाण्यानाही कसें मूर्ख बनविले आहे!) कोणी कोणाचा हात तोडीत होता; कोणी कोणाच्या पायावरच शस्त्रप्रहार करीत होता; कोणी कोणाच्या मस्तकास तोडून भूमीवर धुळींत पाडीत होता, कोणी कोणाच्या उरात आपल्या भाल्याचे तीक्ष्ण अग्र खुपशीत होता; कोणी ओरडत होते; कोणी हाहाकार करीत होते; कोणी मारीत होते; कोणी मरत होते, कोणी भिऊन प्राण वाचविण्याकरिता पळत होते; व कोणी त्याच्या प्राणाचा बळी घेण्याकरिता त्याच्या मागे लागले होते. कोणी आपले शौर्य व युद्धकौशल्य व्यक्त करीत होते. कोणी आपला धर्म समजून आपल्या स्वामीकरिता प्राण जाण्याचा प्रसग आला तरी आपल्या जाग्यावरून थोडेसेही हालत नव्हते. आपला हत्ती शत्रूच्या हत्तीवर सोडून कित्येक मौज पहात होते. कित्येक आपल्या हत्तीस शत्रूतील पायदळावर सोडून त्यातील लोकास त्या भयकर प्राण्याच्या पायाखालीं तुडवून मरावयास लावीत होते. कित्येक नानाप्रकारच्या युक्त्या योजून शत्रूस व्याकुळ करून सोडण्यात तत्पर झाले होते. कोणी सेनाध्यक्ष आपल्या सैन्यसमूहास, शत्रूचे बलाबल पाहून त्याप्रमाणे, निरनिराळ्या जागीं नेत होते. कोणी व्यूह—भग होऊ नये म्हणून आपली पराकाष्ठा करीत होते सारांश येणेप्रमाणें यमाच्याही अगावर रोमाच उभे करणारे ते युद्ध अनेक आयुधे, अनेक वाहने, अनेक पुरुष, अनेक छिन्न—भिन्न देह, अनेक शवे, असख्य नाचणारीं कबधे, रक्तपात, आक्रोश, हाहाकार, जयापजयाच्या आशेने निष्ठुरपणे केलेलीं कृत्ये इत्यादिकाच्या योगाने भयानक, वीर, बीभत्स व शोक या राजस व तामस रसानी परिपूर्ण होते आणि त्या कोमल मनाच्या सात्त्विक स्त्रिया ते साकल्पिक विमानातून लक्ष्यपूर्वक पहात होत्या १३.

सर्ग—१४ या सर्गात प्रेक्षकाच्या तोडून युद्धचमत्काराचें विचित्र वर्णन करविनात.

**श्रीवसिष्ठ**—राघवा, याप्रमाणे ते राजे, मत्री, सेनापती व योद्धे वीर प्राणाचा पण करून परस्पर लढत असताना अतरिक्षातून तो युद्धचमत्कार पहाणाऱ्याच्या व युद्ध करणाराच्या तोडातून असे शब्द निघू लागले.—शूराच्या धडापासून तुटून वर उडणाऱ्या मस्तकाच्या योगाने हें खालचे आकाश ज्यातील कमलें हालत आहेत अशा सरोवराप्रमाणे किंवा ज्याच्यामध्ये

पक्षी उडत आहेत अशा आकाशाप्रमाणे ( अथवा सरोवराप्रमाणे ) अथवा तारागणानीं भरून गेलेल्या अंतरिक्षाप्रमाणें दिसत आहे. तुटलेल्या अंगातून रक्ताच्या धारा उडत असून त्याचे तुषार सोसाट्याच्या वाऱ्यामुळे वर उडत आहेत व त्या रक्ततुषारामुळे हे मध्याह्न समयींचे मेघ व सूर्य किरण, संध्याकाळच्या मेघासारिखे व किरणासारिखे कसे लाल भडक दिसत आहेत, पहा. आकाशात दूर असलेला कोणी एक रक्ताने भरलेल्या बाणाच्या समूहास पाहून हा मांसाचाच ढीग आहे, असा भ्रम झाल्यामुळे, दुसऱ्या कोणास ह्मणतो–भगवन्, हे आकाश असे मांसाने का भरून गेले आहे? त्यास दुसरा उत्तर देतो–अरे वेड्या, ते मांस नव्हे. खालील वीराच्या बाणानी भरलेले ते मेघ आहेत. रक्ताच्या योगाने भूमीवरील जितके रेणु भिजतात तितकी सहस्र वर्षे तो वीर स्वर्गलोकी रहातो, असे शास्त्रात सांगितलेले असल्यामुळे, हे वीर आपला देह तीक्ष्ण बाणाच्या मार्गात उभा करीत आहेत व त्याच्या रक्ताने लाल भडक झालेले हे बाण वेगाने मेघात येऊन रहात आहेत. अरे, असा भिऊ नको. हे नीलकमलाच्या पत्राप्रमाणे दिसणारे निस्त्रिंश ( तरवारी ) नव्हेत, तर वीराकडे पहाणाऱ्या स्वर्गलक्ष्मीचे (अथवा विजयलक्ष्मीचे) हे कटाक्ष आहेत वीरास आलिंगन देण्याविषयीं उत्सुक असलेल्या देव–स्त्रियावर अनुग्रह करण्याकरिताच हा संग्राम प्रवृत्त झाला आहे. ( एक वीर दुसऱ्या वीरास ह्मणतो, ) अरे गड्या, तू आता मरून वर येत आहेस, असे समजून ऱ्या पहा नंदनवनातील अतिरमणीय देवता कशा नाचू व गावू लागल्या आहेत ! ग्राम्य स्त्री आपल्या नेत्रविलासाच्या योगाने जशी आपल्या प्रियास व्याकुळ करून सोडिते त्याप्रमाणे ही सेना आपापल्या शत्रूची हृदये कठिण कुठारीं( कुऱ्हाडी )नीं छिन्नभिन्न करीत आहे सूर्यग्रहण–काल राहूस जसा सूर्या–समीप नेतो त्याप्रमाणे, अरे माझ्या पित्या, माझे सुवर्ण–कुंडलानी भूषित झालेले मस्तक, या शत्रूच्या बाणाने, सूर्यापर्यंत नेऊन पोंचविले. ( एक भितरा दुसऱ्या भित्ऱ्यास ह्मणतो– ) पायापर्यंत लोंबणाऱ्या यंत्राच्या साखळ्यात ओवलेले व गरगर फिरणारे दोन पाषाण ज्याच्यामध्ये आहेत अशा चक्रदंडसंज्ञक चक्रास, वर हात धरून, वेगाने फिरविणारा हा योद्धा यमदूताप्रमाणे सर्वत. सैन्याचा संहार करीत इकडेच येत आहे. यास्तव चल. आपण आपल्या मार्गानें परत जाऊ. अरे, हीं पहा

कबंधे रणवाद्याच्या तालावर मोठ्या उल्हासाने व वेगानें नाचत आहेत व त्याच्या नुकत्याच तुटलेल्या मानेच्या छिद्रावर कंकादि पक्षी आसक्त होऊन रक्तमांसाचा यथेच्छ उपभोग घेत आहेत. देवांच्या समूहामध्ये गोष्टी चालल्या असून त्यांत कोणते धीर पुरुष केव्हां, कोणत्याप्रकारें, व कोणत्या निमित्तानें लोकांतरास प्राप्त होतात याविषयीं परस्पर चर्चा चालली आहे. अरे, हा योद्धा तर कोणी भयंकरच आहे. कारण समुद्राकडे अनेक लहान-मोठ्या जलजंतूंनीं भरलेल्या नद्या कितीही जरी आल्या तरी तो जसा त्यांस आपल्या उदरांत साठवितो त्याप्रमाणे याच्यावर कितीही लोकांचे समूह चालून आले तरी तो त्यांतील एकालाही जीवंत ठेवीत नाहीं. हत्तीच्या गंडस्थळावर बाणांचा वर्षाव एकसारखा होत आहे व त्यामुळे मेघवृष्टि होत असलेल्या मोठ्या पर्वत–शिखराप्रमाणें ते शोभत आहेत. एके ठिकाणी दोघे वीर लढत होते. त्यांतील एकाने मोठ्या शौर्यानें दुसऱ्याच्या मानेवर भाला फेकला. तेव्हां आतां आपण वांचत नाहीं, असें समजून तो दुसरा " मेलोरे मेलो " असे ओरडून ह्मणणार होता, पण इतक्यांत मानच तुटल्यामुळे त्याचे ते शब्द बाहेर उमटले नाहींत. तथापि तो रणांगणीं शत्रूच्या सन्मुख लढतां लढतां मेल्यामुळे स्वर्गलोकीं जाऊं लागला. त्याबरोबर " वांचलोंरे वांचलो " असा ध्वनि याच्या तोंडातून निघाला आणि तो खालच्या व वर विमानांत असलेल्या लोकांस पक्ष्याच्या ओरडण्याप्रमाणे ऐकूं आला. सैन्यांतील कोणी एक अधिकारी आपल्या हाताखालच्या असंख्य शूरांस ह्मणतो–अरे ही शत्रूची सेना आपल्यावर यंत्राच्या योगानें पाषाणाचा वर्षाव करीत आहे. यास्तव तिला अनुष्टखलासमूहाने वेष्टित करून सोडा. कोणी देव ह्मणतो–अरे ही अप्सरा पूर्वी याची भार्या होती. पण तो वृद्ध झाल्यामुळें त्यास सोडून ( ह्म. मरून ) अप्सरा होऊन राहिली व आतां तो रणांगणांत मरून तरुण देव झाला आहे, असें जाणून पुनः त्याची प्रिया बनली. भाल्याच्या चकचकीत पात्याचीं किरणे अंतरिक्षांत पडत होतीं. त्याच्याकडे पाहून रणांत देहत्याग करणारास स्वर्गलोकीं येण्याकरितां हा जिनाच केला आहे कीं काय, असा भास होतो. एक भितरा ह्मणतो–अरे, अरे, या शत्रूच्या लोकांनीं आमच्या वीरांचा एकसारखा संहार चालविला आहे. काय करावें ? मला तर हा प्रलय–कालच आला आहे, असें

वाटते. कोणी एक मुख्य ह्मणतो—अरे मूर्खांनो, पुढें व्हा. एक पाऊल-भरही मागे सरू नका. अरे, शस्त्रप्रहाराच्या योगाने व्याकुळ होऊन भूमीवर पडलेल्या या आपल्याच लोकाच्या अगावर पाय देऊन पुढे जाऊ नका, तर रिकाम्या लोकास त्याना एकीकडे उचलून नेण्यास सागा. देव ह्मणतो—मित्रा, या अप्सरा बुचडा बा-धण्यात व्यग्र झाल्या आहेत व इतक्यात हा शूर दिव्यशरीराने त्याच्याजवळ येऊन उभा राहिला आहे, पहा. एक अप्सरा आपल्या सखीस ह्मणते,अग सखे, हा बिचारा फार दुरून व थकून-भागून आला आहे. यास्तव शीतल, मद व सुगध वायु जेथे वहात आहे व जेथे दाट छायाही आहे अशा ( स्वर्गातील ) मदाकिनीच्या तीरीं याला घेऊन जा व त्याचे चित्तरजन कर. नानाप्रकारच्या आयुधाच्या आघातानी अनेक प्राण्याच्या शरीरातील हाडे मोडून त्याचे शतशः तुकडे अतरिक्षात उडत आहेत. साराश याप्रमाणे अनेक प्रेक्षक मन मानेल तसे भाषण करात होते सैन्यातील वीरही प्रसगास अनुरूप असे भाषण करीत होते कोणी हसत होते, कोणी खेद करीत होते कोणी आपला अमोघ प्रहार व्यर्थ झाला ह्मणून हळहळत होते, तर कोणी अजून आपले आयुष्य सपलें नाही, असे ह्मणून अधिक उत्साहाने शत्रूशी झुजत होते. कोणी तर वीर-धर्मास विसरून प्राणवायूच्या लोभाने रणागणातून पळ काढ-ण्याच्या विचारात असून आपल्या मित्रासही तशीच प्रेरणा क-रीत होते ३४.

**सर्ग ३५-४०**—आता या सर्गात श्रीवसिष्ठ त्या सग्रामाचे समुद्र, वन, उत्पात इत्यादि अनेक रूपकानी वर्णन करून सारख्या आयुधाच्या वीराचें द्वद्व-युद्ध, दोन्ही पक्षातील राजास सर्व देशातील लोकानीं कलल साह्य, जय व पराजय याचा अनिश्चय, सायकाळा युद्ध समाप्त करण्याचा दोन्ही पक्षाचा निश्चय, रात्र पडताच पश्वादिकानी व निशाचरानीं तेथे केलेलें बीभत्स आचरण, राजा विदूरथाचे शयन व दोघी देवीनी त्याच्या गृहात केलेला प्रवेश याचें वर्णन केले आहे

**श्रीवसिष्ठ**—राघवा, तो सग्राम ह्मणजे एक समुद्रच होता उड्या मारणारे घोडे हेच त्यातील तरग होते. त्याच्या योगानें तो रणसागर मोठें ताडव-नृत्यच करीत आहे, असें वाटे. त्यातील छत्रे हाच फेस असून

त्यात अडकून राहिलेले चकचकीत बाण ह्याच शफरी ( क्षुद्र मासे ) होत्या. घोड्यावर बसलेले स्वार, घोड्याच्या उडत चालण्यामुळे, त्यातील कल्लोल आहेत, असे भासत होते. नानाप्रकारचीं आयुधे याच त्यास येऊन मिळणाऱ्या नद्या असून त्याच्या समागमामुळे भ्रमण करणारे सैन्य हेच त्यातील मोठमोठे आवर्त ( भोवरे ) होते. मत्त गजाचा समूह हेच त्यातील समूल चचल झालेले मदारादि पर्वत होत. शेकडो गरगर फिरणारी चक्रे हेच क्षुद्र आवर्तभ्रम असून त्यात भ्रमण करणारी मस्तके हेच तृण आहे वर उडालेली धूळ हेच त्यात पाणी पिणारे मेघ असून खड्गाची प्रभा हेच मेघ जल होय. मकर-व्यूह हेच त्यातील मकर, वीराचा ध्वनि हाच वर्वर ध्वनि, वीराच्या शरीरातून पार निघून जाणारे बाण हीच त्यातील कमलवे आणि शस्त्रे ह्याच त्यातील मोठ्या लाटा असून त्याच्या योगाने तुटणाऱ्या पताका ह्याच लहान लाटा व सैन्याचे, क्रोधाने होणारे सचार हेच त्यातील तिमिगल नावाचे महामत्स्य होत. पोलादाची कवचे अगात घालून इतस्तत फिरणारे सैन्य हेच त्यातील जल, बाण हेच त्यातील तुषार, व इतर सर्व ध्वनीस तुच्छ करून सोडणारा सैन्याचा सिहनाद हाच त्यातील मोठा ध्वनि होय ज्याच्या मस्तकाचे तुकडे उडून गेले आहेत अशी कबधे हींच त्यातील लाटाबरोबर वहात जाणारी काष्ठे होती. वहाणारे रक्ताचे पूर ह्याच त्यास येऊन मिळणाऱ्या महानद्या असून रथ हेच त्याच्या काठचे नानाप्रकारचे वृक्ष होत. साराश येणेप्रमाणे तो रणप्रदेश सागराप्रमाणे दिसत होता अथवा तो गधर्वनगराप्रमाणे ( आकाशात दिसणाऱ्या खोट्या नगराकाराप्रमाणे ) मनुष्यास अतिशय आश्चर्यकारक वाटत होता ( आता त्याचे कल्पातरूपाने वर्णन करितात. ) अथवा तो कल्पातच होता कारण तेथील प्रदेश प्रलयकालच्या भूकपामुळे हालणाऱ्या पर्वताप्रमाणे चचल दिसत असे. मासाच्या व रक्ताच्या आशेने वेगाने उडणारे असख्य पक्षी ह्याच त्यातील भयकर लाटा होत्या शस्त्राच्या प्रखर प्रहारामुळे छिन्न भिन्न होऊन पडणारे अनेक गज हेच प्रलयसमयीं उलथून पडणारे पर्वताचे कडे होत. भ्यालेल्या लोकाचा आक्रोश हाच प्रलयकालचा पशूंचा घुरघुर ध्वनि, बाणपक्ति हीच टोळाची राग, काळे गज हेच मेघ; रक्ताचे पाट ह्याच नद्या; तुटून पडलेल्या हातापायावरील रेखाचिह्ने हीच

वाऱ्याच्या सोसाट्याने पडलेली पुष्पे, व मृत शरीरे हेच मोडून पडलेले वृक्ष होत. साराश येणेप्रमाणे तो सर्व जगाचा ग्रास करण्यास तयार झालेला युद्धकल्पात चालला होता. त्यातील रथरूपी नगरे ध्वज, छत्र व पाताका यासह अस्ताव्यस्त होऊन पडली होती. एकमेकावर पडणारी चकचकीत शस्त्रे हेच त्यावेळीं जगाचा नाश करण्याकरिता उगवलेले प्रखर सूर्य आहेत, असा भास होत असे. त्यानी कठीण प्राण-सतापाने सर्वाच्या मनास सतप्त केले. त्या रणागणातील धनुष्ये हेच प्रलयसमयी मुसळधारानी वर्षाव करण्याकरिता अतरिक्षात आलेले पुष्करावर्तादि मेघ असून ते शरधाराचा एकसारखा वर्षाव करीत होते व त्या( मेघा )मध्ये, शाणेवर घासून तीक्ष्ण केलेल्या खड्गाच्या धारा हेच, विजेचे चमकणे असून ते सर्व आकाशास चकचकीत करीत होते रक्तमय भूमीवर मरून पडलेले गज हेच कल्पातसमयीं समुद्रात उलथून पडणारे कुलपर्वत होते. आकाशात उडणारे रक्ताचे थेब ह्याच त्यावेळीं अशुभ सुचविण्याकरिता उगवलेल्या तारा होत. रामा, त्या भयकर युद्धप्रसगाचे वर्णन करावे तितके थोडेच होणार आहे. यास्तव मी आता अधिक विस्तार करीत नाही.

त्या दोन्हीसैन्यातील लोक एकमेकाशीं भिडून एकमेकाची शरीरे छिन्न भिन्न करून मोडू लागले. हत्तीवरील लोक हत्तीवरील लोकाशीं; रथी रथ्याशी, घोडेस्वार घोडेस्वराशी व पायदळातील वीर पायाने चालणाऱ्या लोकाशी लढत होते. त्याचा तो भयकर सग्राम सर्व दिवसभर चालला. त्यात कित्येकदा एका पक्षाचा विजय होतो, असे वाटे व कित्येकदा दुसऱ्या पक्षाचा जय झाला असा भास होई. पण तीं दोन्ही सैन्ये सारखीच राक्षसी असल्यामुळे, निश्चित जय-पराजय कोणा-चाच होईना. यमराजास मनापासून साह्य करण्याकरिता त्यातील प्रत्येक जीव प्रयत्न करीत होता. त्याना जणु काय आज आपण त्या सर्व भक्षकाची नित्य तृप्तिच करून सोडणार, असे वाटत होते. पण त्या खुळ्याना काय ठाऊक की, तो अनत विश्वे पचविणारा अधाशी देव या थोड्याशा चटणीने मुळीच तृप्त होणार नाही ! पूर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर व मध्यप्रदेश यातील सर्व देशचे व सर्व जातीचे सर्व वीर पुरुष त्यावेळीं तेथें गोळा झाले होते व त्यांनीं विद्येच्या नावानें सपादन केलेली ही हिंसकांची

कला सर्व त्रिभुवनास दाखविली. इतक्यात ईश्वरी नियमाप्रमाणे श्रीसूर्यनारायण त्या रणभूमीप्रमाणे व योध्यांच्या शरीराप्रमाणे लाल भडक झाला व मरणोन्मुखाच्या चेतनाशक्तीप्रमाणे अस्त पावला. त्यामुळे वीररसाने ज्यांचे शरीर भरून गेले होते अशा कित्येक क्षत्रियास आपला मोठा घात झाला, असे वाटले. गृध्रादि मांसभक्षक दिवाचरास आपल्या यथेच्छ आहारसुखात ही मोठीच अडचण आली, असे भासले रामा, आहाराकरिता ते पक्षीही त्या रणांगणात वीरांचे अनुकरण करीत होते. तेही एकमेकाशी लढून दुर्बळाच्या तोंडातील मांसाचा तुकडा ओढून घेऊन, आपला जठराग्नि अथवा राक्षसी तृष्णारूपी अग्नि शांत करीत होते मनुष्येही जर एकमेकाचीं शरीरे कृत्रिम शस्त्रास्त्रांनी फाडीत आहेत तर आह्मा तिर्यक्–प्राण्यांना ईश्वरदत्तनखादि–आयुधांनी आपल्यापेक्षा दुर्बल असलेल्या प्राण्यावर यथेच्छ प्रहार करण्यास कोणता प्रत्यवाय आहे? असेच जणु काय मनात आणून कावळे, गिधाडे, घारी, कोल्हे, भालु, तरसे इत्यादिकानीं त्याच रणभूमीस धारातीर्थ बनविले होते पण वर ह्मटल्याप्रमाणे भगवान् जगच्चक्षू अस्त पावल्यामुळे त्यांचा हिरमोड झाला आता रात्रभर आपणास आपल्या घरव्यात किंवा झाडाच्या खांद्या, मंदिरांचे उच्च भाग इत्यादिकांवर बसून एखाद्या विरक्त तपस्व्याप्रमाणे अथवा एखाद्या दांभिकाप्रमाणे सूर्योदय केव्हा होतो ह्मणून ध्यान करावे लागणार व आशेने चित्त विक्षिप्त झाल्यामुळे निद्रासुखाचाही लाभ न मिळता ही रात्र काळरात्रीसारखी दीर्घ भासणार, असे मनात आल्यामुळे जणु काय ते पक्षीही भूमीवरील योद्ध्याप्रमाणेच चिंताग्रस्त झाले असावेत, असे विमानातून पहाणाऱ्या विद्याधरादिकास वाटले. पण काल प्राण्यांच्या सुखदुःखाकडे थोडेंच लक्ष्य देतो आहे. त्याने पश्चिमेकडील आकाशास लाल करून सोडलें. तेव्हा त्या आरक्त व अनेक भ्रामक आकाराने युक्त अशा आकाशाकडे पाहाणारास त्यात खालच्या रणांगणाचे प्रतिबिंबच पडले आहे, असा भास होई अस्थिर कालाने त्या रक्ततेलाही फार वेळ राहू दिले नाहीं. तेव्हा मात्र भूस्थ योद्ध्यांची व अंतरिक्षात उडणाऱ्या पूर्वोक्त पक्ष्यांची निराशा झाली. वीरानीं आपला युद्धोद्योग परस्पराच्या संमतीने सोडिला. सैन्य शिबीराकडे जाऊ लागलें व पक्ष्यानीं आपापल्या वसतीस्थानाचा मार्ग धरिला. जगास भ्रम ह्मणणाऱ्या वेदान्त्यावर जणु काय

उपकार करण्याकरिताच आकाश अवर्णनीय नीलवर्ण झाले दूरची मोठी वस्तूही लहान दिसते, अस्थिर पदार्थही स्थिर भासतो, पुष्कळ अंतरावर असलेले पदार्थही दूरून पहाणारास ते एकमेकास लागलेले आहेत, असे भासते इत्यादि सर्वसामान्य सिद्धांत जगाच्या अनुभवास आणून देण्याकरिता लहान-मोठी नक्षत्रे त्यात रत्नाप्रमाणे चमकू लागली रणांगणात छिन्न-भिन्न होऊन पडलेल्या व अर्धवट जीवंत असलेल्या प्राण्याची योग्य व्यवस्था लावण्याकरिता दोन्ही पक्षातील राजाचे सेवक हातात दिवट्या घेऊन त्या भयंकर भूमीत फिरू लागले वारातीर्थी मरण पावलेल्या लोकाच्या स्त्रिया, माता व इतर आप्त शवास ओळखून व त्यास कवटाळून धरून मोठ्याने रडू लागल्या व त्यामुळे त्या मृत्युभूमीस अवर्णनीय भयंकर स्वरूप प्राप्त झाले प्रकार तेजाच्या अभावी सज्जनास लपून बसावे लागते व अशा प्रसंगी दुर्जनास आपला प्रभाव गाजविण्यास चांगला अवसर मिळतो हे सुचविण्याकरिता अंधकाराने सर्व भूगोलास व्यापून सोडले व दिवसभर चार प्रहर लपून राहिलेल्या भूत-प्रेत-पिशाच-यक्ष-राक्षस-उन्माद इत्यादिकानी निर्भयपणे संचार करून दिवसा मनुष्यानी केलेल्या क्रूरपणातील न्यूनता भरून काढण्यास आरंभ केला. मृत प्राण्याची हृदये कशी संकुचित होतात ते दाखविण्याकरिता सूर्यविकासी कमळे संकुचित झाली योद्ध्याच्या शरीरातील बाणाप्रमाणे पक्षी आपापल्या घरट्यात मान चोंचीशी पर काढून बसले. इतक्यात वर सांगितलेल्या रात्रिचराची गर्दी त्या भयंकर भूमीत येऊन पोचली. कुत्री, तरसे कोल्ही, व्याघ्र, सिंह इत्यादि मासाहारी प्राणी तर दिवसापेक्षा आता अधिक निर्भयपणे जठराग्नि विझवू लागले त्याचे पाय रणभूमीतील चिखलात रुतत होते एखादे वेळी तुटून पडलेल्या तरवारीचे पाते, बाणाचे अग्र, भाल्याचे टोक, इत्यादिकावर पाय पडल्यास त्यानाही रणांगणातील शस्त्रप्रहाराचा अनुभव घ्यावा लागत असे. पण एका इंद्रियाच्या द्वारा तृप्ति होत असताना दुसऱ्या इंद्रियाच्या द्वारा झालेल्या दुःखाचे भान होऊ नये व जरी त्याचे थोडेसें भान झालें तरी ते सहन करिता यावे अशी नियंत्यानेच व्यवस्था केलेली असल्यामुळे त्यास त्यामुळे फारसे दुःख होत नसे. त्या भयंकर प्रेतभूमीत ज्याची कोणी विचारपूसही केली नाही असेही अनेक व्याकुळ झालेले लोक

आपल्या आयुष्याचा काल मोजित पडले होते. त्यातील कित्येकास असह्य वेदना होत असल्यामुळे " ते हाय, हाय " " ही, ही, ही, ही, " " अरे रे रे रे " इत्यादि दुःखोद्गार काढून केविलवाणे ओरडत व शरीरातील शक्ति क्षीण होऊ लागल्यामुळे तडफडत होते. पण मनुष्यान्च्या तेवढ्या हालचालीमुळेही मास व रक्त यान्यावर यथेच्छ निर्वाह करणाऱ्या त्या पशूस उद्वेग वाटत असे कारण या मनुष्य प्राण्यास भीत नाही, अगा प्राणीच या जगात विरळा असो, मध्यरात्र जशी जशी जवळ येत चालली तशा तशा वर सांगितलेल्या भूतादिकाच्या चेष्टा अधिकाधिक होऊ लागल्या प्रथम त्यानीं त्या समरांगणातील मृत शरीरावर यथेच्छ हात मारून पुष्कळ दिवसाची क्षुधा भागवून घेतली. रक्तप्राशनाने तहानेचेही निवारण केले. त्यानतर ती मनमोक्त नाचू लागली, गाऊ लागली; मारामारी करू लागली, मोठ्या मोठ्याने हसू लागली व कित्येक तर रडूही लागली. ऐन मध्यरात्री तर त्याच्या या लीलाचा कळस झाला. वेताळाचे नानाप्रकारचे विलास, डाकिणीची बीभत्स क्रिये व पिशाचाचे चाळे उत्तरोत्तर अधिक होत चालले व्याघ्रादि हिंस्र पशूही नानाप्रकारच्या रक्तमासानी तृप्त होऊ लागले. ते स्थान सोडून विश्रांतिस्थळी जावे असे त्यांच्या मनातही येईना कुत्र्यानी व कोल्ह्यानी आपल्या ओरडीने त्या स्थानास अधिक भयंकर करून सोडण्याचा उद्यम चालविला. तात्पर्य दिवसाप्रमाणेच रात्रीही त्या भूमीवर घोर प्रसंग चालले असता, चोहोकडे भयकर अधकार पसरला असता, इतर दिवाचर प्राण्यास निद्रेने घेरले असता व सर्व दिवसभर लढाईचे श्रम झाल्यामुळे थकलेले व क्षुधेने व्याकूळ झालेले योद्धे, सायकालीन अवश्य क्रिया आटोपून व कशीबशी भूक भागवून स्वस्थ विश्रांति घेत पडले असता लीलेचा पति अति खिन्न मनाने प्रातःकाली युद्धसबधी कोणकोणत्या विशेष गोष्टी करावयाच्या याविषयी आपल्या मत्र्याशीं सकेत करून निजावयास गेला व सर्व इंद्रिये आणि मन शात झाल्यामुळे त्याला आपल्या थडगार शिबिरातील सुदर शय्येवर लागलीच झोप लागली. ते पाहून त्या दोघी स्त्रियाही त्या आकाशातून निघून सूक्ष्म रंध्रातून त्याच्या गृहाकाशात शिरल्या.

श्रीराम—प्रभो, हे शरीर तीन–चार हात लांब आहे. तेव्हा तंतूसारख्या सूक्ष्म रध्रातून त्या त्याच्या गृहात मत्त्वर कशा जाऊ शकल्या? (रामानें पूर्वीही असाच प्रश्न केला होता पण येथे आणखी काहीं अधिक सागण्याकरिता पुनः तोच प्रश्न केला आहे.)

श्रीवसिष्ठ—निष्पाप रामा, हा आधिभौतिक (स्थूल) देहच, मी आहे, असा भ्रम ज्यास झाला असेल त्याचा तो देह अतिसूक्ष्म रध्रातून जाणें शक्य नाहीं. मी या शरीराच्या योगाने प्रतिबद्ध झालो आहे, त्यामुळे मी यात मावत नाही, असे ज्याच्या बुद्धीस वाटत असते त्याची बुद्धि पूर्वी शतशः अनुभवलेले देहतादात्म्यच पुनरपि अनुभविते. म्हणजे 'मी देह आहे' असे तिच्या अनुभवास येते व त्यामुळे, स्थूल शरीराचा प्रवेश सूक्ष्म रध्रात होत नाही, असे पाहून, मी यातून जाऊ शकणार नाही, असे ती समजते. पण देहतादात्म्यबुद्धि क्षीण झाल्यामुळे मी सूक्ष्म (आतिवाहिक) शरीरमात्र आहे, असा ज्याच्या मनाचा निश्चय झाला आहे व त्याप्रमाणे पूर्वी शतशः अनुभव घेतल्यामुळे मी अतिसूक्ष्म छिद्रातूनही जाण्या–येण्यास समर्थ आहे, अशी ज्याची वासना दृढ झाली आहे, तो पुरुष पुढे तरी स्थूल शरीराच्या योगाने प्रतिबद्ध कसा होणार? कारण विचाराच्या योगाने एकदा व्यक्त झालेली नित्य व स्वाभाविक शक्ति प्रतिबद्ध होणे शक्य नाही. व्यवहारातही वस्तूचे स्वाभाविक धर्म कधीही बदलत नाहीत, असेच आपण पहातो. पाण्याचा स्वभाव सखल प्रदेशाकडे वहात जाणे, हा आहे. तसाच अग्नीच्या ज्वालेचा स्वभाव वर जाण्याचा आहे व तो जगाच्या आरंभापासून प्रलयापर्यंत बदलणे शक्य नाहीं. कारण पाणी स्वभावत च उचवट्याकडे वहात जाईल व अग्निशिखा अधोमुख कधींतरी होईल, अशी आशा करणे व्यर्थ आहे. जलादिकाच्या स्वभावानें चित् जशी प्रवृत्त झाली आहे तशीच ती रहाणार, यात सशय नाही. स्थूल देहास आत्मा न समजणाऱ्या–योगी, पिशाच, इत्यादि प्राण्यासही जर स्थूल शरीराच्या निरोधामुळें दुःख होत नाही तर द्वैताध्यासरहित तत्त्वज्ञान्यास त्याच्या योगाने दुःख होणार नाहीं, हे काय सागावे! कारण जो दाट शीतळ छायेमध्ये बसला आहे त्यास सूर्याचा ताप कसा होणार? तात्पर्य परमात्म्याचा साक्षात्कार झाला असता दुसऱ्या कोणत्याही पदार्थाचा सत्यरूपाने अनुभव येत नाही व मिथ्या पदार्थांचा अनुभव जरी

आला तरी त्यांमुळे सत्य वस्तूस प्रतिबध होत नाही. आता तूं म्हणशील की, अधिष्ठानभूत सविद्च्या ठायी स्थौल्य, सौक्ष्म्य इत्यादि शक्तीचा जरी आविर्भाव झाला तरी चित्त त्या त्या शक्तीप्रमाणे कसे होते ? तर सांगतों. जशी सवित् शक्तिरूप होते तसेच चित्तही शक्तिरूप बनते. पण योग ( चित्तनिरोध ) व ज्ञान ( विचार ) यान्या योगाने दीर्घ प्रयत्न केला, असता ते पुनः स्वाभाविक अवस्थेस प्राप्त होते. ( आता ज्ञानप्रयत्नानें भ्रमाचा क्षय कसा होतो, तें उदाहरण देऊन सागतात.–) पुढे दोरी असतांना भ्रमाने हा सर्प आहे, असा प्रत्यय येतो. पण त्याच्या यथार्थ ज्ञानाकरिता प्रयत्न केला असता ही दोरी आहे, असा निर्णय होऊन भ्रात सर्प आपोआप निवृत्त होतो. परतु तत्त्वज्ञानाकरिता प्रमाणाच्या सहायाने प्रयत्न न केल्याम तो भ्रम जशाच्या तसाच रहातो साराश जशी सवित् तसे चित्त व जसे चित्त तशी क्रिया. ह्मणजे चित्त जसे सवित्–शक्त्यनुसारि असते तशीच प्राण्याची चेष्टा चित्तानुसारी असते, हे आबालवृद्धास ठाऊक आहे. आता–स्थूल शरीराप्रमाणे आतिवाहिक चित्तशरीरही प्रतिबद्ध का होत नाही ?–ह्मणून ह्मणशील, तर सागतो. स्वप्नातील व सकल्पाने कल्पिलेला पुरुष चित्राच्या आकाराप्रमाणे काल्पनिक असतो. त्यामुळे केवल आकाश हाच त्याचा आकार असतो. तेव्हां त्याला प्रतिबध कोण करणार ? पण या स्थूलशरीराला, ज्ञानबलानें तरी, चित्तशरीरत्वाची प्राप्ति कशी होणार ? असे ह्मणू नये. कारण सर्वाचें शरीर सर्वप्रकारें चित्तमात्र असते हृदयगत ज्ञानाच्या बळानें तें भासत असल्यासारखे वाटते. यास्तव प्राणी चित्ताहून पृथक् नाहींत. त्याची सत्ता ( अस्तित्व ) चित्ताच्या सत्तेहून निराळी नाहीं. परमात्म्याच्या चित्तवृत्तीप्रमाणेच या भूतमात्राचा ( सर्व भूताचा ) उदय व अस्त होत असतो. सृष्टीच्या आरभी स्वाभाविक अज्ञान ( किंवा कर्म ) याच्या योगाने हे सर्व उद्भवते. नतर–स्थूल भूतें व त्याचीं कार्ये–हे द्वैत; त्या सर्वाचा मिळून एक देह होणे, हें ऐक्य आणि त्या सर्वांचें कारण पचीकरण होतें. यास्तव चित्ताकाश, चिदाकाश व तिसरें भूताकाश हीं तिन्ही एकासत्तेनेंच सत्तायुक्त झालीं आहेत, असे तू जाण. कारण अधिष्ठानाच्या सत्तेहून त्याची सत्ता निराळी आहे, असे अनुभवास येत नाहीं. याच न्यायाने स्थूल व सूक्ष्म शरीरांची सत्ताही अधि-

ध्यानाच्या सत्तेच्या अधीन असते. पण त्यांतील एक प्रतिबद्ध होऊन रहाते व दुसरें यथेच्छ संचार करूं शकतें. कारण पाहिजे त्या पदार्थांत प्रकट होण्याची शक्ति चित्तशरीरांत असते. अशी शक्ति त्याच्यामध्यें कां व कशी येते ह्मणून विचारशील तर सांगतो पूर्ववासना व कर्म यांच्याप्रमाणें त्यास जसें पदार्थस्फुरण होईल त्याप्रमाणेंच ( अगदीं जसेंच्या तसें ) स्वतः होणें हा त्याचा स्वभाव आहे. बाह्य वस्तु, वस्तुतः जशी असेल, तसें होणें हा त्याचा स्वभाव नाहीं. ह्मणून पुढें खरोखर शिंप असतांना मनुष्य आपल्या चित्तगत स्फुरणाप्रमाणें तिला रुपें समजतो. पण स्थूल शरीर बाह्य वस्तूंच्या अनुरोधानें रहातें त्यामुळें त्याला छिद्रादि बाह्य वस्तूंकडून निरोध होतो आणि सूक्ष्म चित्तशरीर स्वतंत्रपणें बाह्य वस्तूंस बनवीत असल्यामुळें कोठेंही निरुद्ध होत नाहीं. तें त्रसरेणूंमध्यें रहातें, आकाशास व्यापून सोडतें. अंकुराच्या कोशांत (कोंबांत) रहातें, कोंवळ्या पानाच्या आकाराचें होतें, पाण्याच्या लाटेंत बसतें, शिळेच्या उदरांत प्रवेश करितें, मेघ होऊन वर्षाव करितें व स्वयं शिला होतें. तें आपल्या इच्छेप्रमाणें आकाशांत जातें. पर्वताच्या उदरांत शिरतें व ज्याच्यामध्यें आकाश मुळींच नाहीं अशा परवस्तूंसही तें धारण करितें. तें स्वतः आकाश होऊन त्यांत (ह्मणजे स्वरूपांतच) पद्मरागाच्या गृहासारख्या कोशामधें गृहरूप बनतें. सारांश कधींही भिन्न न होणारा असा विशेष बोध ज्यास आहे, असें हें चित्तशरीर आकाशादि क्रमानें ब्रह्मांडरूप होऊन प्रस्तुत कर्मानुसारी प्रवृत्तीस प्राप्त झालें आहे. पण ही सर्व प्रवृत्ति मृगजळाप्रमाणें, वंध्यापुत्राप्रमाणें व स्वप्नांतील वस्तूंप्रमाणें असत्य आहे.

**श्रीराम**—महाराज, हें आमचें चित्तहि आपण सांगतां तशाप्रकारच्या शक्तीनें युक्त होऊं शकेल कीं नाहीं ? जर होईल असें ह्मटलें तर प्रत्येक चित्तानें भिन्न भिन्न आकारानें कल्पिलेलें प्रत्येक जग सद्रूप कसें नाहीं ? व आमचें चित्त त्या शक्तीनें युक्त होऊं शकणार नाहीं असें जर ह्मटलें तर तें जग आमच्या चित्ताहून निराळें कसें नाहीं ? अर्थात् निराळें असलें पाहिजे.

**श्रीवसिष्ठ**—प्रत्येक प्राण्याचें चित्त अशा प्रकारच्या शक्तीनें युक्त आहे. प्रत्येक चित्तास निरनिराळ्या जगाचा भ्रम झालेला आहे.

काही चित्तास क्षणभंगुर जगाच्या समूहाचे उदयास्त एका निमेषात असंख्य भासतात व कित्येकांच्या चित्तास ते एका कल्पात अनेक भासतात. हे महापराक्रमी रामा, आता महाप्रलयानंतर पुन सृष्टि होते असे जे शास्त्रात सांगितले आहे त्याचे रहस्य मी तुला सांगतो जी ही मरणमय मूर्च्छा प्रत्येक प्राण्याच्या अनुभवास येत असते तीच यांची महाप्रलय निद्रा होय ( ह्मणजे व्यष्टीने केलेल्या सर्गात त्याचे पूर्व मरण हाच महाप्रलय आहे ), असे तू समज. त्या महाप्रलयानंतर प्रत्येक प्राणी, स्वाभाविक अविद्येमुळे उद्भवलेल्या स्वप्नाप्रमाणे अथवा भ्रमामुळे भासणाऱ्या पर्वताच्या नृत्याप्रमाणे निरनिराळा सर्ग उत्पन्न करितो महाप्रलयरूपी रात्र संपली असता ज्याप्रमाणे समष्टि–मनो–वपु हिरण्यगर्भ ( ह्मणजे समष्टि मन हेच ज्याचे शरीर आहे असा हिरण्यगर्भ ) आपल्या सत्य संकल्पाच्या योगाने समष्टि–भोग्य ( ह्म समष्टि जीवास भोग घेण्यास योग्य असा ) प्रपंच बनवितो त्याप्रमाणे व्यष्टि–मनोमात्र जीवही आपापल्या भोग्य स्वप्नादि व्यष्टि–प्रपंच स्वसंकल्पाने कल्पितो सत्य–संकल्प हिरण्यगर्भाने बनविलेल्या जाग्रत् बाह्य प्रपंचामध्ये जरी जीवाच्या भिन्न भिन्न संकल्पामुळे वस्तुतः काही भेद ( फरक ) न दिसला तरी त्यांच्या संकल्पाप्रमाणे मानसिक प्रपंचाचा आकार जाग्रतीतही बदलत असतो. ह्मणूनच–एकाच स्त्रीला कोणी आपली पत्नी समजतो, कोणी आई समजतो, कोणी बहिण समजतो व कोणी जाऊ किंवा सवत समजते ( आता–प्राणी मनाने ज्याचें चिंतन करितो तेच वाणीने बोलून दाखवितो व तेच शरीराने करितो–अशी श्रुति व सर्वांचा अनुभवही आहे. त्यामुळे जशी स्मृति ( चिंतन ) असेल त्याप्रमाणेच कर्म होते, हे निश्चित आहे पण स्मृतीचे कारण जो अनुभव तो सत्य असल्यास त्याच्यामुळे होणारी स्मृति यथार्थ आहे व तो अयथार्थ असल्यास तीही अयथार्थ आहे, असे ह्मणतात. वास्तव आह्मा जीवास भ्रांति ज्ञान विपुल होत असल्यामुळे व आह्मी असत्य–संकल्प असल्यामुळे आमची स्मृति अयथार्थ असून तिच्यामुळे भासणारे स्वप्नादि काही प्रपंचही असत्य आहेत, असे ह्मणता येणे शक्य आहे पण सत्यसंकल्प हिरण्यगर्भ सर्वज्ञ असल्यामुळे त्याला आमच्याप्रमाणे भ्रांति होणें शक्य नाहीं व तो सत्यसंकल्पही आहे. तेव्हा त्याची स्मृति अयथार्थ असणे शक्य नाहीं.

अर्थात् त्याने कल्पिलेल्या प्रपचास मिथ्या ह्मणता येत नाहीं. या आशयाने राम विचारितो.–)

**श्रीराम**––ज्याप्रमाणें व्यष्टि जीव मरणानन्तर लागलाच उत्तर काली स्वस्मृतीनें उत्पन्न केलेला देह पहातो त्याचप्रमाणे समष्टिही महाप्रलयानतर आपल्या यथार्थ स्मृतीच्या योगाने उत्पन्न केलेल्या प्रपचाचा अनुभव घेतो. तेव्हा त्याच्या स्मृतीवर आरूढ झालेले पूर्वीचे सत्य पदार्थच या कल्पातील सत्य विश्वाचे कारण आहेत, असे ह्मणता येणे शक्य असताना, विश्व ब्रह्मातिरिक्त सत्य–कारणता–शून्य आहे. ह्मणजे ब्रह्मावाचून त्याचे दुसरे काहीं सत्य कारण नाही, असे कसे ह्मणता येईल ?

**श्रीवसिष्ठ**––रामा, आदिसर्गास हिरण्यगर्भाची यथार्थ अनुभवजन्य स्मृति जर कारण झाली असती तर तू ह्मणतोस तसा आमच्या सिद्धातावर दोष आला असता पण अगदी प्रथमच उपासनेमुळे जो हिरण्यगर्भपदास प्राप्त झाला आहे त्याला तू म्हणतोस तसली स्मृति होणे शक्य नाही. कारण त्याचे स्मरण पूर्व उपासनेप्रमाणे चित्तात दृढ झालेल्या सस्कारामुळे उत्पन्न होत असल्याकारणाने ते यथार्थ अनुभवजन्य आहे, असे ह्मणता येत नाही. कारण पूर्वी व्यष्टि–अवस्थेत असताना मीच समष्टि जीव ( हिरण्यगर्भ ) आहे, अशी भावना करणे हीच त्याची पूर्व उपासना होय कोणतीही भावना काल्पनिक (अयथार्थ) असते. त्या भावनामुळेच तो उपासक या कल्पाच्या आरभी हिरण्यगर्भ होतो व त्याला त्या अयथार्थ उपासनेमुळेच कल्पाची स्मृति होते यास्तव आदि सर्गास सत्य ह्मणता येत नाहीं त्यावेळीं पूर्वीच्या सर्वज्ञापैकीं कोणीही नसतो. कारण ते सर्व पूर्व प्रलयसमयीं हिरण्यगर्भाबरोबर मुक्त होऊन गेलेले असतात, इत्यादि मागे सागितलेच आहे. तेव्हा कोणत्याही युक्तीनें आदि सर्ग सत्य आहे, असें सिद्ध करिता येत नाही कल्पाच्या अगदीं आरंभीं उत्पन्न होणाराही सर्ग जर मिथ्या आहे तर त्याच्या सस्कारापासून होणाऱ्या स्मृतीमुळे पुढे होणारे अनेक सर्ग तरी सत्य कसे असतील ! यास्तव, बा उत्तम शिष्या, जीवकृत सृष्टीप्रमाणे ईशनिर्मित सृष्टिही मिथ्या आहे, असेच तूं जाण.

**श्रीराम**—गुरुराज, हिरण्यगर्भाची सृष्टि प्रधानापासून महत्तत्त्व, महत्तत्त्वापासून अहंकार इत्यादि क्रमाने उत्पन्न होते, असे पुराणादि

प्रमाणग्रथात सांगितले आहे व जीवाची सृष्टि तर एकाएकी ( क्रमाची अपेक्षा न धरिता ) उद्भवते, असे आपण पहातों. तेव्हा दोन्ही सृष्टी एकसारख्याच कशा असतील ?

श्रीवसिष्ठ— राघवा, जीवाच्या सृष्टीतही तसाच क्रम आहे. ह्मणजे जीवाची सृष्टिही ईशसृष्टीच्या क्रमानेच उद्भवते. कशी ह्मणून विचारशील तर सांगतो. जीव मरण व मूर्च्छा यांच्या शेवटी आतल्या आत स्फुरण-युक्त असल्यासारिखा व बाहेर स्फुरणयुक्त नसल्यासारिखा असतो. तेच प्रधान होय त्या अवस्थेत असणारे ते प्रधानच मूल प्रकृति आहे. त्याला आकाश व अव्यक्त असेही ह्मणतात. चैतन्याच्या प्रतिबिंबाचे ग्रहण केल्यामुळे ते जडाजड ह्मणजे स्वांशतः जड व चैतन्याच्या अंशाने अजड असते. हीच सर्गाच्या आरंभाची व प्रलयाची अवधि आहे. ह्मणजे संसाराचा उद्भव याच्यापासून होतो व त्याचा लयही यातच होतो. असो, हे प्रधान जेव्हा बोधोन्मुख होते, ह्मणजे बोधास तयार होते तेव्हा त्यास महत्तत्त्व ह्मण-तात. तेच प्रबुद्ध ( बोधयुक्त ) झाले की, अहंकार बनते. त्या अहंकार-अवस्थेतील आकाशापासून पंचतन्मात्रे, दिशा, काल, क्रिया, भूते इत्यादि उद्भवतात. ते प्रधानच सूक्ष्मावस्थेतील ज्ञानेंद्रियपंचक, ( कर्मेंद्रियपंचक, प्राणपंचक व अंतःकरण ) होते. तेच स्वप्न व जाग्रत् या अवस्थांत देहास जाणते व तो सूक्ष्मसमूहच आतिवाहिक देह आहे. दीर्घकाल अनुभव आल्यामुळे तो अतिशय पुष्ट झालो आहे. तो बालकाप्रमाणे भौतिक स्थूल देहास ' मी ' असे समजतो. त्यामुळे त्या स्थूलदेहाचा आश्रय करून राहिलेल्या नेत्रादि साधनांच्या अधीन अस-लेले दिशा-काल इत्यादिकांविषयींचे संकल्प उद्भवतात. पण स्पंद-रूप वायूच्या स्पंदाप्रमाणे ते मनोमय असल्यामुळे वस्तुत अनुदित-( ह्मणजे उत्पन्न न झालेले )च असतात. तात्पर्य येणेप्रमाणे हा भुवनभ्रम व्यर्थ वृद्धिंगत झाला आहे. तो असत् असूनही स्वप्नातील स्त्रीच्या आलिंगनाप्रमाणे अनुभवास येतो. चित्त आगंतुक देहादिरूप होते आणि " हा मी " व " हे जग " असा त्यास भ्रम होतो. इंद्रादि देव, अमरावती इत्यादि त्यांची नगरे, मेरु इत्यादि त्या नगरांचे आधार-भूत पर्वत व त्यास प्रदक्षिणा करणारे सूर्य, नक्षत्रे इत्यादि ज्योतीरूप पदार्थ

यानीं ते भासमान जग सुदर झाले आहे. जरा, मरण, विकलता, व्याधि इत्यादिकानी भरलेलीं मर्त्यलोकादि छिद्रे त्यात आहेत त्यातील चराचर प्राणी आपल्यास अनुकूल असेल ते सपादन करण्याचा व प्रतिकूल असेल त्याचा परिहार करण्याचा प्रयत्न करीत आहेत ( येथें चर ह्मणजे एक स्थळ सोडून दुसऱ्या स्थळीं जाणारे मनुष्य–पशु–पक्ष्यादि प्राणी व अचर ह्मणजे स्वस्थल सोडून न जाता तेथेच इष्ट–प्राप्ति व अनिष्ट–परिहार करण्याचा प्रयत्न करणारे वृक्ष, वेली इत्यादि प्राणी, असे समजावे. वृक्ष, लता इत्यादिकास अतःसज्ञा असते. ह्मणजे त्यास आतल्या आत सुखदुःखादिकाचे ज्ञान होते. त्याची जेव्हा वाढ होत असते तेव्हा त्यास पुढे काही प्रतिकूळ आढळल्यास त्याचा परिहार करून ती पुढे वाढतात, हे पुष्कळास ठाऊक आहेच. उष्णतेच्या योगाने कोमेजणे, पाण्याचा सेक झाला असता टवटवित होणे, इत्यादिकावरून त्याचे सजीवत्व व सेंद्रियत्व सिद्ध होते. ) त्या काल्पनिक जगात समुद्र, लहान पर्वत, भूमि, नद्या, लोकपाल, दिवस, रात्र, क्षण, कल्प, इत्यादि भास होतात. " हा मी अमक्याचा पुत्र, ही माझी माता, हें धन, " अशी त्यातील मनुष्यादिकाची वासना असते. हे माझे सुकृत व हे दुष्कृत, असे त्यातील सुज्ञ जन कल्पितात मी मागे लहान होतो, आता मोठा झालो आहे, असे त्यातील बुद्धिमान् जीवाच्या अत.करणात स्फुरण होते. तात्पर्य अशाप्रकारे हा प्रत्येक जीवाचा ससाररूपी वनप्रदेश उद्भवला आहे. या ससार–वनात नक्षत्रे हीच पुष्पे, नील–वर्ण मेघ हीच चचल पालवी, नर हेच पशुसमूह, देव व दानव हेच पक्षी, प्रकाशमय दिवस हीच पुष्पातील धूळ ( रज ), रात्री याच दुष्प्रवेश्य ( प्रवेश न करिता येण्यासारिख्या ) जाळ्या ( कुज, लतागृहे ), समुद्र हिच तळी, मेरु इत्यादि पर्वत ह्याच शिला व चित्तरूपी कमलबीजात सस्काररूपाने असणारे अनुभव ( चित्तवृत्ति ) हेच अकुर आहेत. एव च हा जीव मरताक्षणीच हें जगरूपी वन जेथल्या तेथेच पहातो. याप्रमाणे प्रत्येक प्राण्याच्या सकल्पाने निरनिराळे जग उत्पन्न होते व अशी अनेक प्राण्याचीं अनेक विश्वे निर्माण झालीं असता ब्रह्माडात असलेल्या–पर्वत, समुद्र, द्वीपे, लोकातर–इत्यादिकास पहाणाऱ्या ब्रह्मा, विष्णु, महेश, इद्र, देव, रुद्र, सूर्य इत्यादिकांच्या कोटीच्या कोटी निघून जातात. याप्रमाणे असख्य

ब्रह्मादि आजपर्यंत होऊन गेले आहेत, जात आहेत व पुढे जातील. ब्रह्माच्या ठायी असत्स्वरूप भासणाऱ्या त्या( ब्रह्मादिका )च्या कल्पनाची गणना करण्यास कोण समर्थ आहे? ( येथवर ब्रह्माच्या ठायी जगाच्या आरोपाचा क्रम सांगून आता अपवाद सांगतात. ) याप्रमाणे भिंतीसारखे स्थूल असलेले हे जग संकल्प–संज्ञक सूक्ष्म मननाहून निराळे नाही.

**श्रीराम**—गुरुवर्य, पण हें स्थूल जग स्थिरस्वभाव आहे. म्हणजे त्याचा स्वभाव कधी बदलत नाही व मन तर अति चंचल. तऱ्हा स्थिरस्वभाव जग अस्थिरस्वभाव मनोमात्र कसे असेल?

**श्रीवसिष्ठ**—राघवा, बाह्य विश्व जरी स्थिरस्वभाव असल्यासारखें वाटले तरी मनाच्या योगाने त्याची यथेच्छ कल्पना करिता येत असल्यामुळे, तें अस्थिरस्वभाव आहे, असाच अनुभव येतो. मन भ्रमण करीत असले तर ते भ्रमण करीत असल्यासारखे, मन प्रसन्न असले तर ते प्रसन्न असल्यासारखे, मन मलिन असले तर ते मलिन असल्यासारखे वाटते व मनोरथादिकामध्ये ते उत्पन्न करून अन्यत्र आरोपित केल्याप्रमाणे सर्वास अनुभव येतो. यास्तव तूही आता आपल्या अनुभवानेच विचार कर. ह्मणजे मन चिदाकाशरूप असून साक्षि चिदाकाशच परम पद आहे, असे तुला समजेल. जसे जलच आवर्त ह्मणजे भोवरा असून भोवरा ही काही सत् वस्तु नव्हे, त्याप्रमाणे द्रष्टाच दृश्याच्या आकाराने भासत असून दृश्य ही सत् वस्तु नव्हे असत्य किंवा अनादि मायाकाशात अथवा चित्ताकाशात जीवभावाने झालेले जे स्फुरण तेच नाम व रूप या आकाराने होणारे द्वैत होय. नाना आकारांनी विकार पावणे हेच ज्याचे शील आहे अशा त्या द्वैतासच जगत् ह्मणतात. पण ते आकाशात भासणाऱ्या गन्धर्वनगराप्रमाणे असून अधिष्ठानभूत चिदाकाशच तत्त्व अथवा परमार्थ आहे अधिष्ठानसत्ता सत्य असून आरोपित सत्ता असत्य आहे मी, तू इत्यादि ह्मणणारा जगाचा प्रमाताही साक्षि चिन्मात्रस्वभाव आहे. जीवस्वभाव नाही लीला व सरस्वती या दोघीही आकाशशरीरी ह्मणजे केवळ सत्यसंकल्प–चित्ताकाशशरीर आहेत. त्या सर्वगामी परमात्म्याप्रमाणें स्वच्छ असल्यामुळे त्याना अत्यंत सूक्ष्म छिद्रातही प्रतिबंध होत नाही. आकाशात त्यांच्या इच्छेप्रमाणे त्याना पाहिजे तेथे आविर्भूत होता येते. त्यामुळेच त्यास त्या विदूरथाच्या गृहातही प्रवेश करिता आला. तात्पर्य चिदाकाश

सर्वत्र संभवते ह्मणजे त्यास कोठेंच प्रतिबंध होत नाही. तेंच स्फुरणरूप होऊन मानस विषयाच्या निश्चयापर्यंत परिणाम पावते व वेदन ह्मणजे यथार्थज्ञान होते. तेच आतिवाहिक शरीर असून त्यालाच सूक्ष्म देह ह्मणतात. तेव्हा अशा त्या देहास कोण कसा प्रतिबंध करणार ? ३५–४०.

**सर्ग ४१**—या सर्गात–निजून उठलेल्या राजानें आपल्या गृहात प्रविष्ट झालेल्या त्या दोघींचे केलेले पूजन, राजाचा वंश, स्मृति व ज्ञप्तीने केलेला आत्मोपदेश–याचें वर्णन केले आहे.

**श्रीवसिष्ठ**—त्या दोघी देवी प्रविष्ट झाल्या असता ते शय्यागृह, दोन चंद्राचा उदय झाला असता अंतरिक्ष व भूभागही जसा शोभायमान होतो त्याप्रमाणे, सुशोभित झाले. त्यात मंदारपुष्पावरून येणारा मंद, सुगंध व शीतल वायु वहात होता. त्याच्या प्रभावाने त्या गृहातील इतर सर्व स्त्री–पुरुष निद्रित झाले होते. ते गृह त्यावेळी नंदनवनाप्रमाणे सौभाग्यसंपन्न झालेले असून त्यातील सर्व प्रकारची व्याधि नष्ट झाली होती. असो, त्या दिव्य स्त्रियांच्या चंद्रतुल्य प्रभेचा स्पर्श शरीरास होताच अमृताच्या सेकाप्रमाणे आनंदित झालेला तो राजा जागा झाला. तो साकल्पिक दोन आसनांवर बसलेल्या त्या दोघी त्याच्या दृष्टीं पडल्या. त्यास पहाताच मेरूच्या दोन शिखरांवर उगवलेली ही दोन चंद्रबिंबेच आहेत, असा त्यास भास झाला पण क्षणभर विचार करून तो विस्मित झालेला भूपाल, शेषावरून उठणाऱ्या चक्रगदाधराप्रमाणे, शय्येवरून उठला. त्याने आपले परिधानीय वस्त्र, गळ्यातील भूषणे व माळा नीट सावरून अस्ताव्यस्त झालेले केस गोळा केले आणि मोठ्या आदराने जवळच्याच पुष्पाच्या करंडीतील ओंझळभर फुले घेऊन व त्यांच्यापुढे येऊन "जन्म, त्रिविध ताप व भक्ताचा मोह, याचा नाश करणाऱ्या तुह्मा देवींचा जय–जयकार असो" असें ह्मणून ती पुष्पांजलि त्यांच्या चरणी समर्पण केली. नंतर तो वीर त्यांच्यापुढे पद्मासन घालून बसला. तेव्हा लीलेस त्या राजाच्या जन्मादिकाचा वृत्तांत कळावा म्हणून देवीने आपल्या प्रभावानें जवळच्या त्याच्या एका मंत्र्यास जागें केलें. त्यानेंही जागे होताच त्या दिव्य स्त्रियांस पाहून त्यांची प्रेमपूर्वक पूजा केली व तो त्यांच्या पुढें बसला. तेव्हां ज्ञप्ति देवी ह्मणाली–राजा तू कोण, कोणाचा पुत्र व येथें कधीं जन्म

घेतलास ? हा प्रश्न ऐकून तो मंत्री ह्मणतो–देवि, तुमच्याच कृपाकटाक्षाने तुह्मापुढेही बोलण्यास समर्थ होऊन मी या माझ्या स्वामीचा वृत्तांत सांगतो. इक्ष्वाकुवंशांत कुंदरथ नावाचा एक महाबलाढ्य राजा होऊन गेला. त्यास भद्ररथ ह्मणून पुत्र होता. त्यास विश्वरथ झाला. त्याच्यापासून बृहद्रथ, बृहद्रथापासून सिंधुरथ, सिंधुरथापासून शैलरथ, शैलरथाचा कामरथ, कामरथाचा विष्णुरथ, व विष्णुरथाचा पुत्र नभोरथ झाला. त्या महात्म्या नभोरथाच्या उदरी आह्मा सर्व प्रजाजनाच्या मोठ्या भाग्याने हा आमचा विदूरथ नामक स्वामी जन्मला. याच्या मातेचे सुमित्रा असे नाव आहे. या आमच्या राजाचा पिता फार विरक्त होता. त्यामुळे, हा पुत्र दहा वर्षांचा होताच, राज्य त्याच्या स्वाधीन करून स्वतः वनात जाऊन राहिला तेवढ्या अल्पवयापासून हा आमचा देव आमचे रक्षण करीत आहे. दीर्घकाल कष्टकर तपश्चर्या करूनही ज्याचे दर्शन होणे अशक्य अशा तुह्मी दोघी दिव्य देवी आमच्या आज दृष्टी पडला; यावरून आमचे अनेक जन्मीचे सुकृतच आज फळास आले, असे आह्मी समजतो आपल्या या अनुग्रहामुळे आह्मी सर्व व विशेषतः हा आमचा राजा आज कृतकृत्य झाला आहे. याच्या जन्माचे आज साफल्य झाले–असे बोलून तो मंत्री स्तब्ध बसला असता आपल्या समोर पद्मासन घालून विनयाने हात जोडून बसलेल्या राजाच्या मस्तकावर हात ठेवून ती देवी ह्मणाली, "राजा, विवेकाच्या योगाने तुला पूर्वजन्माचे स्मरण होऊ दे" त्याबरोबर राजाच्या हृदयातील जीवास आच्छादित करणारे तम क्षीण झाले व सूर्योदय होताच भूमंडल जसे प्रकाशयुक्त होतें त्याप्रमाणे त्याचे अंतःकरण प्रकाशयुक्त व निर्मल झाले. त्यास सर्व पूर्व वृत्तांत आठवला. देह व साम्राज्य याच्यावरील अभिनिवेश नाहीसा झाला. त्याने लीलेस ओळखिलें. फार काय पण त्या देवीच्या अनुग्रहामुळें अनुभव न घेतलेल्या गोष्टींचेही प्रत्यक्ष स्फुरण त्याच्या चित्तात झाले त्यामुळे विस्मित झालेला तो आपल्या मनात ह्मणाला. "हर हर, या संसारात कशी माया पसरली आहे, पहा. मला आज या देवीच्या प्रसादानें हें सर्व गौडबंगाल समजलें." इतकें मनात आणून तो त्या देवीस उघड ह्मणला—हा काय चमत्कार आहे ? मी पद्म या नावाचें शरीर सोडले त्यास अजून एक दिवसही झाला नाहीं; पण येथें जन्म घेऊन

मला यावेळीं सत्तर वर्षें झालीं आहेत. पूर्वी केलेल्या अनेक कार्यांचे मला यावेळी स्मरण होत आहे. मला पितामहाचें स्मरण आहे. माझें मागच्या जन्मींचें बालपण, तारुण्य, मित्रवर्ग, बंधुसमूह व इतर परिवार यांचे मला स्मरण होत आहे. पण या माझ्या स्मरणास काय ह्मणावें ? ( अधिष्ठान चिन्मात्रच या सर्व प्रपचाचें तत्त्व आहे व त्यावाचून इतर सर्व मायामात्र आहे, हें परम रहस्य सागण्याच्या उद्देशानें प्रथम ज्ञप्ति देवी लोकातरगमन ह्मणजे पुष्कळ कालानतर दूरदेशी होणारें गमन हा भ्रम घालविते— )

**ज्ञप्ति**—राजा, मरणसज्ञक महामूर्च्छेनतर याच तुझ्या गृहात—ह्मणजे त्याच्या अधिष्ठान—चिदाकाशातील मागच्या ( ह्म. मायावरणानें आवृत्त झालेल्या ) गिरिग्रामातील ब्राह्मणाच्या गृहामध्ये—असलेल्या त्या पद्मराजाचा लोकातर असून त्यांतील मुख्य राजगृहाच्या आंतील आकाशातच हा ब्रह्माडमडप आहे. ( तात्पर्य चिदाकाशातच मागच्या सर्व जन्मातील ब्रह्मांडें होतीं व तीं त्याच्या बाहेर कधींही नसतात. ) त्या ब्रह्माडमडपातच हा तुझा प्रतीत होणारा जन्म भासतो. तर मग काय, तेच ब्राह्मणाचें जग मला आज असें दिसत आहे ? असे विचारशील तर सागते. बाबारे, असें नाही. प्रत्येकास जगद्गृह भिन्न भिन्न भासत असते ब्राह्मणाच्या गृहांत असताना तुझा जीव माझा भक्त होता. त्याचे भूपीठ तेथेंच राहिले. पण त्याच्या मडपामध्ये व त्याच्याच गृहामध्ये हें पद्माचे ससार-मडल झाले. पुढे त्याच पद्मगृह—मडपात हे तुझें, अनेक क्रिया करण्यात गुतलेले, गृह झालें. त्यातील निर्मल आकाशाप्रमाणे निर्मल असलेल्या तुझ्या चित्तात हा मी अमुक दिवशी या इक्ष्वाकु कुलात जन्मास आलो. माझे अमक्या अमक्या नावाचे पूर्वज होते. मी पूर्वी बालक होतो. दहाव्या वर्षीच माझ्या पित्याने मला राज्य दिले व तो वानप्रस्थ झाला. तेव्हा पासून मी अनेक पुरुषार्थ करून हें राज्य राखिलें, त्याची वृद्धि केली, त्यातील प्रजेचें पुत्राप्रमाणे प्रतिपालन केले, यज्ञादि धर्मकृत्ये केलीं, यावेळीं मला सत्तर वर्षे आहेत, हें सैन्य चालून आले आहे, त्याच्याशी माझे सैन्य दारुण सग्राम करीत आहे, मी आताच युद्ध करून परत गृही आलो आहे, या देवी येथें आल्या आहेत, मी आता यांची पूजा करितो, कारण देवताचे पूजन केलें असता त्या आपला मनोरथ पूर्ण करीत असतात, त्यांतील एका

देवीने मला पूर्वजन्मीचे ज्ञान दिले आहे, आता मी कृतकृत्य झालों आहे, मला आता कोणत्याहि प्रकारचा सशय नाहीं, मी शांत झालों आहें, मला परम आनद प्राप्त झाला आहे, मी केवळ सुखस्वरूप आहें इत्यादि प्रकारची ही भ्राति झाली आहे. ज्या क्षणीं तू पूर्वी मरण पावलास त्याचक्षणीं तुझ्या हृदयात ही प्रतिभा उदय पावली. ज्याप्रमाणे नदीतील भोवऱ्यामध्ये जलाचा प्रवाह वारवार फिरत रहातो त्याप्रमाणे चित्तप्रवाह अशा अनेक भ्रमाच्या द्वारा वारवार फिरतो. ज्याप्रमाणें भोवऱ्यामध्यें एकदाच दोन तीन आवर्त ( भ्रमणे ) सुरू होतात त्याप्रमाणें केव्हां केव्हां ( जाग्रतींत ) मिश्र ( ह्म. दुसऱ्या जीवाच्या सर्गाशीं सबद्ध होऊन ) व क्वचित् ( स्वप्नात ) अमिश्र सर्गशोभा उत्पन्न होते. चैतन्य–सूर्य असा जो तू त्या तुजपासून मरणसमयींच ही प्रतिभा उद्भवली. स्वप्नभ्रमामध्ये ज्याप्रमाणे शभरवर्षे झाल्याचाही केव्हा केव्हा भास होतो त्याप्रमाणे तुझा हा सर्व कालाचा भास आहे. नावेतून बसून जात असताना तीरावरील वृक्ष चालत आहेत, असे वाटते, मेघ धावत असताना चद्रच धावत आहे, असा भ्रम होतो, भोंवळ ( घेरी ) आली असता घर व त्यातील सर्व पदार्थ गरगर फिरत आहेत, असे दिसते, पित्तप्रकोप झाला असतां रात्री डोळ्यापुढे नानाप्रकारच्या आकृति व तेजे दिसतात; स्वप्नामध्ये आपण आपलेच मस्तक कापिले आहे, असा भास होतो. त्याप्रमाणेच तुला ही मिथ्या ससारभ्राति झाली व दीर्घ वासनेमुळे ती दृढ झाली. पण वस्तुत. तू कधी जन्मास आला नाहींस व मरणही पावला नाहींस. तू शुद्ध विज्ञानरूप आहेस, शात आहेस व निर्विकार आहेस. दृश्य मिथ्या असल्यामुळें त्याने युक्त असलेलें चिदाभासलक्षण दर्शनही मिथ्या ठरतें. शेवटीं विषयरहित केवल चैतन्य रहातें. तें मात्र सत्य आहे. यास्तव वस्तुतः काहींएक नसताच अनात्मज्ञ प्राणी जग पहातो पण आत्मा सर्वरूप असल्यामुळें, त्याच्याच आश्रयाने हा सर्व भास होतो, हे त्यास कळत नाहीं खरोखर पाहिल्यास भूपीठ नाहीं, हा तुज विदूरथाचा देह नाहीं, हे पर्वत नाहीत, ग्राम नाहींत, हे लोक नाहींत व आह्मी नाहीं. तर गिरिग्रामातील ब्राह्मणाच्या मडपाकाशात तें लीलेच्या पतीचें विस्तृत जग भासले, त्यातच अनेक उत्तमोत्तम गृहादिकानीं भरलेली लीलेची राजधानी भासली, त्यातील आकाशातच हे जग भासलें व त्या

जगातच यावेळी आह्मी असलेले हे गृह भासत आहे. येणेप्रमाणे त्या मंडपात असलेलें आकाश, आकाशादिरहित व अत्यंत निर्मल ब्रह्मच होय. त्याचप्रमाणे त्या मंडपामध्ये पृथ्वी नाही, नगरे नाहीत, वने नाहींत, पर्वत नाहीत, मेघ नाहीत, नद्या नाहीत व समुद्रही नाहीत. तर चिन्मात्र-पूर्ण ब्रह्मामध्ये मिथ्या गृहांतून मिथ्या जन विहार करीत आहेत पण ते एक दुसऱ्यास पाहत नाहीत.

**विदूरथ**—देवी, असे जर आहे तर हे माझे प्रधानादि अनुचर कसे आहेत? सत्य की असत्य? ते स्वप्नातील पदार्थांप्रमाणें मिथ्या आहेत, असे ह्मणावे तर ते संभवत नाही. कारण तेही मजप्रमाणेच जीवाने युक्त आहेत. तेव्हा सत्स्वभाव आत्म्यामध्ये भासणारे हे मिथ्या जगातील जीव मिथ्या नसून सत्य आहेत, असे ह्मणावयास नको का?

**श्रीदेवी**—अज्ञदृष्टीचा आश्रय करून, केवळ जीवभावास उद्देशून, मजप्रमाणेच ते सत्य आहेत, असे जर तू ह्मणत असशील तर जीव-भावाने तूही सत्य नाहीस. पण तत्त्वदृष्टीचा आश्रय करून अधिष्ठान-चिन्मात्रभावाने पाहिल्यास तेही सत्य आहेत. राजा, तत्त्वज्ञास या जगातील एकही भाव सत् वाटत नाही. तर सद्रूप चिदा-काशात, हे सर्व भाव, जलतरंग-न्यायाने भासत आहेत, असे ते समजतात. यास्तव तूही त्यांच्या दृष्टीचा आश्रय करून हा भ्रम टाक. एकदा तुझा भ्रम गेला ह्मणजे मी व इतर ज्ञानी काय ह्मणतात, ते तुला चांगले समजेल. (असो; श्रीवसिष्ठ देवी व राजा यांचा संवाद येथवर सांगत आहेत तो, सूर्यास्त झाला. त्यामुळें सभेतील धर्मपरायण लोक पूज्य मुनींस नमस्कार करून स्नानसंध्यादि नित्य कृत्ये करण्या-करिता अभीष्टस्थानीं गेले व दुसऱ्या दिवशीं प्रात:कालचे नित्यकर्म आटोपून पुनरपि सभेंत येऊन बसले. येथे पांचवा दिवस समाप्त झाला) ४१.

**सर्ग ४२—अज्ञानावस्थेंत जग व स्वप्न या दोघांसही सत्यत्व आहे. असे येथें अगोदर सांगून शेवटीं वरप्रार्थनेपर्यंत कथाभाग वर्णिला आहे.**

**श्रीवसिष्ठ**—रामा, नंतर देवी ह्मणाली, "विद्वानाच्या दृष्टीनें जग असत्य आहे, हें मीं तुला एवढावेळ सांगितलें. आतां तेंच दृढ करण्या-

करिता अज्ञ पुरुषांच्या दृष्टीने जग अत्यत-दृढ-सत्य कसे आहे, ते सागते. त्या सर्वव्यापी पदाचा ज्यास बोध झालेला नसतो त्यास हे जग वज्रासारखे दृढ आहे, असे भासते. कारण व्यवहारात अर्थक्रियाकारित्वासच सत्य ह्मणत असतात. ( पाणी प्याले असता तहान भागणे, जेवले असता क्षुधानिवृत्ति होणें, एकाद्या गावाकडे गेले असता तेथे पोचून तो पूर्वीप्रमाणे तेथे आहे, असा अनुभव येणे, इत्यादि काही नियमित सफल क्रिया होणें हेच अर्थक्रियाकारित्व होय. ) भ्रमिष्टास वेताल मरणापर्यत जसा क्लेश देतो, हरिणास सूर्यकिरणेच जलरूपाने जशी भासतात, स्वप्नातील मिथ्या मरणही जसे दु:खादि अर्थक्रिया करविणारे व ह्मणूनच सत्य वाटते, अविवेक्यास सोन्याचे कडेच जसे मोहित करिते ( ह्मणजे सोन्याकडे त्याचे लक्षही जात नाही ), त्याप्रमाणे अनात्मज्ञास जग सत्य भासते. पण ते असत्य आहे अहता इत्यादिकानी युक्त असलेले हे विश्व ह्मणजे एक दीर्घ स्वप्न आहे, असे तू समज. त्यात अनुभवास येणारे सर्व पुरुष लौकिक स्वप्नात दिसणाऱ्या इतर पुरुषाप्रमाणे मिथ्या आहेत यावर तू कदाचित् ह्मणशील कीं, असे जर आहे तर याजन, प्रतिग्रह, उपदेश इत्यादि अर्थक्रिया करण्यास ते समर्थ कसे होतात ? तर त्याचे कारण सागते. सर्वाचे अधिष्ठान, शात, निरतिशय सत्य, पवित्र, विषयरहित व चिन्मात्रस्वरूप असे परमाकाश पसरलेले आहे. (देवी आता त्याचे मायशबल स्वरूप सागते ) ते सर्वव्यापी, सर्वशक्ति, सर्व व सर्वात्मक असून मायेच्या योगाने जेथे जेथे जशाप्रकारच्या अर्थक्रियेस योग्य होत्साते व्यक्त होते तेथे तेथे तसेच असते. आता जाग्रतीत शास्त्रीय अर्थक्रिया करण्यास योग्य होऊन व्यक्त झालेले रूप स्वप्नात नसते व स्वप्नातील जाग्रतीत नसते, हे खरे, पण त्याच्या विशेष रूपात जरी असा फरक असला तरी सद्रूपात काही विशेष नसतो. स्वप्नात द्रष्टा जशी कल्पना करितो तसे त्यास भासते द्रष्ट्याचे चित्स्वरूप स्वप्नाच्या विकाशात ( ह्मणजे अति सूक्ष्म नाडीछिद्रात ) राहून स्वप्नात उद्भवलेल्या चित्त-वासनेप्रमाणे विकार पावल्यासारखे भासते व अधिष्ठानाच्या सत्यतेमुळें अध्यस्त वस्तू व त्याचे धर्म सत्य आहेत, असा अनुभव येतो. तात्पर्य जाग्रत् व स्वप्न या दोन्ही अवस्थात ह्मा पुरुष आहे, हे झाड आहे, ही गाय आहे, इत्यादि प्रकारच्या

ज्या ज्या वासना उद्भवतात त्या त्या सर्व चैतन्याच्या बळानेच सत्य आहेत, असे वाटते. चैतन्यानें त्या त्या विषयाच्या आकारचे होणे हाच त्याचा विवर्त होय. पण तें पुरुषरूप होऊन हा पुरुष आहे, असें ज्ञान होणें व तो ज्ञात पुरुष सत्य आहे, असे वाटणे या दोन्ही ज्ञानाचें कारण तादात्म्याध्यास व संसर्गाध्यास आहे." ( तादात्म्याध्यास ह्मणजे तदैक्यरूप अध्यास व संसर्गाध्यास ह्मणजे त्याच्या धर्माचा अध्यास, असे येथे थोडक्यात समजावें. चैतन्य व आरोपित पुरुष याचे ऐक्य हा तादात्म्याध्यास असून त्यामुळें पुरुष सत्य आहे इत्यादि हा संसर्गाध्यास आहे. )

**श्रीराम**—मुनिवर्य, देवीच्या या सांगण्यावरून मला आलेली शंका मी आपणास विचारितो. स्वप्न व जाग्रत् या अवस्थांमध्ये अनुभवास येणाऱ्या प्रत्येक पदार्थात अधिष्ठानाचा सत्यांश व मायेचा असत्यांश असतो व त्यामुळे तो सत्यानृतरूप आहे, असे आपण ह्मणता. पण त्या-विषयीं मला काही विचारावयाचे आहे. जाग्रतींत भासणारे पुरुष सत्य नाहीत, असे ह्मटल्यास व्यवहार कसा होतो हे सांगता येत नाहीं व कर्मकांड अप्रमाण होते. यास्तव त्याच्यामध्ये चैतन्याच्या सत्तेमुळे सत्ता येते, असे ह्मणावे लागते. पण केवळ मायिक स्वप्नामध्यें भासणारे पुरुष सत्य नसून असत्य आहेत, असे ह्मणण्यास काय प्रत्यवाय आहे ? ( उत्तर मीमांसेत भगवान् व्यासांनी स्वप्न मायामात्र आहे. कारण त्यातील पदार्थांचे स्वरूप अभिव्यक्त नसते, असे ह्मटले आहे. असो, तात्पर्य जाग्रत्-विषय स्वप्नाप्रमाणे मिथ्या आहेत, असें कसें ह्मणता येईल ? )

**श्रीवसिष्ठ**—रामा, स्वप्नात दिसणारे पदार्थ ब्रह्माप्रमाणे वस्तुत सत्य नाहीत, इतकेच ह्मणता येणे शक्य आहे. पण ते अधिष्ठानरहित अस-ल्यामुळे अधिष्ठानाच्या सत्तेनेही सत्तायुक्त नाहीत, असे ह्मणता येत नाही. कारण जाग्रतींतील पदार्थांप्रमाणे स्वाप्न पदार्थही कल्पित असल्यामुळें साधिष्ठान असतात व त्यामुळे तेही अधिष्ठानाच्या सत्तेनें सत्तावान् असतात. याविषयी प्रत्यक्ष हेच प्रमाण आहे. ( ह्मणजे स्वाप्न पदार्थ जर असत् असते तर त्याचे प्रत्यक्ष ज्ञानही झाले नसतें. कारण वंध्या-पुत्राचे प्रत्यक्षज्ञान कधींच होत नाही. पण स्वप्नातील पदार्थ प्रत्यक्ष

अनुभवास येत असतात, हे सर्वांस ठाऊक आहे. तेव्हा त्यांच्यामध्यें कोणाची तरी सत्य सत्ता असलीच पाहिजे. यांत काही संशय नाहीं.) शिवाय स्वाप्न पदार्थांस अत्यंत असत् समजल्यास जाग्रतींतील प्रपंचासही अत्यंत असत् ह्मणण्याचा प्रसंग येणार. कारण तोही हिरण्यगर्भाचें स्वप्नच आहे. तस्मात् वर ह्मटल्याप्रमाणे जग व स्वप्न यांचे साम्य व त्यांची अधिष्ठानदृष्ट्या सत्यता, ही सिद्ध झालीं आणि या विपुल संसारांत मी जसा तुला सत्य भासतो तसाच तूही मला सत्य भासतोस.

**श्रीराम**—महाराज, असे जर आहे तर स्वप्न पाहाणारा पुरुष जागा झाल्यावरही त्याने पाहिलेला स्वाप्न प्रपंच, जाग्रत्प्रपंचाप्रमाणे, जशाचा तसाच राहील, असे मला वाटते.

**श्रीवसिष्ठ**—होय. तू ह्मणतोस ते खरे आहे. स्वप्नद्रष्टा जरी जागा झाला तरी त्याने पाहिलेला स्वाप्न प्रपंच अधिष्ठान—सन्मात्र—स्वभाव असल्यामुळे सत्य आहे.

**श्रीराम**—पण जाग्रत्प्रपंच जसा जन्मभर दिसतो तसा स्वाप्नप्रपंच दिसत नाही एका स्वप्नातील वस्तु दुसऱ्या स्वप्नात कधींच कोणाच्या अनुभवास येत नाही.

**श्रीवसिष्ठ**—जाग्रतीत तरी तोच पदार्थ व तोच काल याचा अनुभव जन्मभर कोठे येतो? प्रतिपदेस पाहिलेली वस्तूच द्वितीयेस दिसते, असें आपण ह्मणतो खरे, पण त्या क्षणोक्षणी परिणाम पावणाऱ्या वस्तूत केवढा फरक पडलेला असतो, हे सूक्ष्म विचारावाचून समजणे शक्य नाहीं. त्याचप्रमाणे कालचा काल आज नसतो व आजचा उद्या नसतो, हेही विसरता कामा नये. आता आकारासारिखा आकार दिसतो व वारवार पहात राहिल्याने वस्तूमध्ये प्रत्येक क्षणीं होत असलेला सूक्ष्म परिणाम दृष्टोत्पत्तीस येत नाही. त्यामुळे ‘ तोच हा ’ असा आह्मास भ्रम होतो. पण पाच वर्षांपासून आपल्यास सोडून दूर गेलेल्या पोटच्या लेंकरास, वीस वर्षांनीं, त्याच्या प्रत्यक्ष जननीने जरी पाहिले तरी तिला तोच हा माझा प्रिय बाळक, असे पाहताक्षणीं ओळखता येत नाहीं. यावरून काय सिद्ध होतें बरें? प्रत्येक क्षणीं आपण निरनिराळा पदार्थच पहातो. पण दृढ भ्रम—परिचयामुळें तोच पदार्थ मी जन्मभर पहात आहे, असा आपणास

भ्रम होतो, असे नाहीका ठरत ? स्वप्नामध्येही आह्मास वारवार तीच पृथिवी, तेच आकाश, तीच आमची जाति, तेच नाव इत्यादि प्रत्यक्ष भासते. तेव्हा एका दिवसाच्या जाग्रतीतील पदार्थ दुसऱ्या दिवसाच्या जाग्रतीत न भासणे व एका स्वप्नातील पदार्थ दुसऱ्या स्वप्नात न भासणे या दृष्टीने पाहिले तरी जाग्रत् व स्वप्न याचे साम्यच ठरते. यास्तव तुला जी जाग्रत्–अवस्था वाटत आहे ती स्वप्नतुल्य आहे, असेच तू निःशकपणे समज आता तू कदाचित् ह्मणशील कीं, स्वप्नातील पदार्थ जर सत्य आहेत तर ते जाग्रतींत का दिसत नाहीत ? तर त्यावर मी तुला उलट असे विचारितो–स्वप्नातील पदार्थ जाग्रतीत दिसत नाहींत ह्मणूनच जर त्यास मिथ्या समजावयाचे असले तर जाग्रतीतील पदार्थ स्वप्नात दिसत नाहीत, ह्मणून त्याच न्यायानें, तेही मिथ्या नाहीं का ठरत ? तात्पर्य अधिष्ठानाच्या सत्तेने ते दोन्ही प्रपच सत्य असून स्वतः दोन्ही असत्य आहेत. पण असत्य असले तरी ते दोघेही प्राण्यास एकसारखाच मोह पाडित असतात. संवित् सर्व देश, सर्व काल व सर्व अवस्थामध्ये राहते. ह्मणजे माळेतील दोऱ्याप्रमाणे तिची सर्वत्र अनुवृत्ति होते. ह्मणूनच ती सत्य आहे व देश, काल आणि अवस्था मालेतील मण्याप्रमाणे सर्वत्र अनुवृत्त नसतात तर त्याची सदा व्यावृत्ति होत असते. यास्तव ते सर्व मिथ्या आहेत. चिदाकाशात चैतन्याच्या प्रभावाने हे सर्व दिसते. चैतन्याचाच हा सर्व विवर्त आहे. चैतन्याच्या आधारानेच या सर्वांची स्थिति होते. यास्तव एक चैतन्यच कायते सत्य आहे.

असो, रामा, लीलेचे समाधान व्हावे ह्मणून ज्ञप्ति देवीने याप्रमाणें विदूरथास उपदेशामृताने तृप्त करून "स्वस्त्यस्तु" असा आशीर्वाद दिला व ह्मटले–राजा, जग मिथ्या कसे हें चागले समजावे ह्मणून दृष्टाताचा अनुभव घेण्याकरिता आह्मी या मडपातील तुझ्या ब्रह्माड कल्पनेत आलो होतो. आमचे कार्य आता झाले आहे. यास्तव आह्मी आता परत जातो. रामा, देवीचे हें मधुर वचन ऐकून तो बुद्धिमान् विदूरथ राजा ह्मणाला, " देवि, मला तुझे हे अचिंत्य दर्शन झाल्यामुळे मी आज धन्य झालों आहे. महात्म्याचे दर्शन कधीही निष्फळ होत नसते. एका स्वप्नातून जसें दुसऱ्या स्वप्नात जावे त्याप्रमाणे मी आता लवकरच हा देह सोडून निजधामास येईन. या दीनाकडे कृपादृष्टीनें पहा. मी तुला शरण आलों

आहे. मी जी आता प्रार्थना करीत आहे, त्याचे उत्तर दे. भक्ताची अवहेलना करणे महात्म्यास शोभत नाही. मी जेथे जाईन तेथे हा माझा मंत्री व ही अविवाहित कुमारी येईल, एवढी मजवर कृपा कर. राघवा, ही त्याची प्रार्थना ऐकून घेऊन देवी ह्मणाली—"राजा, तू आपल्या इच्छेप्रमाणे पूर्व जन्मीच्या राज्यात ये व तेथे लीलेच्या भक्तीप्रमाणें व भाग्याप्रमाणे विलास कर. आह्मी आमच्या भक्ताचें मन कधींही दुखवीत नाही." ४२.

**सर्ग ४३**—या सर्गात अभीष्ट वरदान, नगरदाह व त्यात जळणाऱ्या नगरवासियाच्या चेष्टा याचे वर्णन केले आहे

**श्रीसरस्वती**—राजा, या रणागणात तू आज मरण पावशील व तुला पुनरपि प्राक्तन राज्य प्राप्त होईल पुष्पाच्या राशीत ठेवलेल्या पद्माच्या शवात तू पुन प्रवेश करशील व मंत्री आणि कुमारी तुजबरोबर येतील. आह्मी दोघीजणी पुढे जातो. तूही मरून आतिवाहिक देहाने मंत्री व कुमारी यासह तेथे ये. अश्व, गज, खर, उष्ट्र इत्यादिकाची गति निराळी असते व सूक्ष्म देहाची गति निराळी आहे. ( ह्मणजे अश्वादिकाच्या गतीस विस्तृत मार्गादिकाची अपेक्षा जशी असते तशी या अतिवाहिक गतीस नसते. कारण, मनोरथाप्रमाणे, याचा संचार मंडपाऱ्या आतील अति संकुचित आकाशातही फार दूरवर होऊ शकतो. )

**श्रीवसिष्ठ**—राघवा, त्याचे इतके जो भाषण होत आहे, तों राजगृहावरील उंच प्रदेशी चढून चोहोकडे टेहळणी करणारा राजाचा सेवक मोठ्या गडबडीने येऊन राजास ह्मणाला, "राजाधिराज, शत्रूची सागरासारखी फार मोठी सेना आपल्या या नगरावर अनेक शस्त्रास्त्राचा एकसारखा भडिमार करीत अगदी जवळ येऊन पोचली आहे. त्यातील काहीं दुष्ट सैनिकानी तर तटावर चढून या नगराच्या एका भागास आग लाविली आहे. त्यामुळे आकाशात धुराचे लोट चाललेले स्पष्ट दिसत असून चटचट शब्द येथेही सहज ऐकू येत आहे. जळलेली गृहे भराभर भूमीवर कोसळून पडत आहेत." रघुवीरा, तो इतके सागत आहे तों नगरात मोठा कोलाहल झाला. लोकाचा आक्रोश, वीराचा सिंहनाद, धनुष्याचा टणत्कार, मत्त गजाचे बृंहित

( गुड गुड ध्वनि ) जळणाऱ्या लांकडाचा व वेळूचा चटचटाकार, नगरात जळणाऱ्या—बाल, वृद्ध व स्त्रिया—यांचा हाहाकार, अतरिक्षात उडणारी किटाळें आणि सर्व शहरास सतप्त करणाऱ्या धक् धक् ध्वनियुक्त ज्वाला याच्या योगानें राजास व त्या दोघी देवींस नगरातील संकटाचें व लोकावरील अरिष्टाचे यथार्थ ज्ञान झाले. तो भयकर प्रसग स्वत: पहावा या हेतूनें त्या देवी, राजा विदूरथ व मंत्री खिडक्यापाशी गेले. तेव्हा नगरातील कल्पात त्याच्या प्रत्यक्ष दृष्टी पडला. त्यावेळी तेथे चाललेल्या दुर्धर अतिप्रसगाचे कोठवर वर्णन करावे. प्रलयसमयी प्राणिसमूहाची काय अवस्था होत असेल याची कल्पना त्यास चागली झाली. राजगृहाच्या त्या उच्च खिडक्यातून नगरातील व नगराबाहेरील सर्व प्रकार स्पष्ट दिसत होता. शत्रूचे यमस्वरूपी वीर शहरात घुसण्याचा प्रयत्न करीत होते व नगरातील सैनिक तटावर स्थिर राहून व नगराच्या बाहेर पडूनही त्यास मागे हटवीत होते. त्याच्या शस्त्रास्त्राचे प्रहार, त्यानी अगोदरच तृणतुल्य मानिलेल्या त्याच्या स्थूल भौतिक पिडास छिन्न भिन्न करून, त्यांना त्या ऐहिक दुर्गतीतून सोडवीत होते द्रव्याच्या, मानाच्या व कीर्तीच्या लोभानें किंवा दुरभिमानाने आपले शरीर ज्यानी आपल्या स्वामीस विकले आहे, असे ते योद्धे मनुष्याकार असतानाही राक्षसी आचरण करून स्थूल आकार व सूक्ष्म भाव याचे प्राय ऐक्य नसते, असे विचारी पुरुषाच्या मनात भरवीत होते इकडे नगरात अग्नीच्या मुखात पडलेले आबाल—वृद्ध, सकटावाचून ईश्वराचे स्मरण होत नाही, यास्तव ईश्वरा आह्मावर अशीच घोर सकटे आणून अनुग्रह कर. ह्मणजे आह्मी आतुर होऊन एकाद्या परम भक्ताप्रमाणे तुझे स्मरण करू, असे सुचवीतच जणु काय " हाय, हाय, अरे देवा, भवसागराप्रमाणे या सकट—सागरात बुडत असलेल्या आम्हास यातून सोडीव " असे ओरडून दयाळु सात्त्विकाच्या चित्तास पाझर फोडीत होते. परोपकारी व साहसी पुरुषानीं, स्वशरीराकडे न पहाता, जळक्या घरात शिरून, पाशातून सोडविलेले पशु व पक्षी—सुखमय ससारासही अनेक दुर्भावनांच्या योगाने दुःखमय करून सोडणाऱ्या मनुष्याच्या सहवासाचें हे फळ आहे, असे सर्वांस कळविण्याकरिताच जणुकाय दीन स्वराने आक्रोश करूनसैरा वैरा धावत होते. प्रेमामुळें दृढ बद्ध झालेला कामी पुरुष पटलेल्या गृहातून आपली प्रिया बाहेर येणे शक्य नाही, असे पाहून आपल्या शरी-

र्चांही आहुति देण्याकरितां पुनः जळत्या गृहात मुद्दाम शिरत होते. काही अबला "अहो या प्रखर अग्नींत माझी माता, पिता, पति, पुत्र, कन्या, जामाता इत्यादि जळून भस्म झालीं; आता मी काय करू व कोठें जाऊ ?" असे म्हणत व आक्रोश करीत स्त्रियाचे जीवित किती परावलंबी आहे, हें व्यक्त करीत होत्या. धन, धान्य, वस्त्र, पात्र इत्यादि सर्वांचीच एकसारखी होळी होऊ लागल्या कारणाने जग किती अनित्य आहे, आकार किती क्षणभगुर आहे, सपत्ति कशी विपत्तीचें मूळ आहे आशा कशी भयकर आहे, सग्रह कसा अनर्थावह आहे व काल कसा निर्दय आहे हे सुज्ञाच्या ध्यानात सहज आलें. त्या नगरात जे बरेचसे सच्छील, धार्मिक, विचारी व सात्त्विक भागवत जन होते त्याचीही इतराप्रमाणेच दैना होत असलेली पाहून प्रारब्ध कर्म दुर्लंघ्य आहे, ते ऐहिक (वर्तमान) सदाचरणादिकाच्या योगाने हटणे शक्य नाहीं, असे कोणाच्याही ध्यानात तेव्हाच येत असे. धुराच्या भयकर लोटामुळे अतरिक्षात विमानातून जात असलेले सिद्धादि खे–चरही अविवेक्याप्रमाणे अध व व्याकुळ झाले असावेत, असे अनुमान होत असे. शरीरावरील वस्त्रास अग्नि लागल्यामुळे 'देह हाच मी' असे समजणारे स्त्री–पुरुष अगावरील वस्त्रें टाकून देऊन कामातुराप्रमाणे निर्लज्ज होत असल्याचे त्याच्या दृष्टोत्पत्तीस आले. कोणाचे लाब केस भुरभुर जळत आहेत, कोणाची दाढी पेट घेत आहे, कोणाची वेणी धुमसत आहे, कोणाचे अग पोळत आहे, कोणाचे हातपाय पेट्र लागले आहेत, कोणी असह्य यातना सहन न झाल्याकारणाने 'हाय हाय, मेलोरे मेलों, अरे मला कोणी सोडवा' इत्यादि ओरडत व अस्ताव्यस्त नाचत आहेत, कोणी आपल्या दैवाला दोष देत आहे तर कोणी राजास शिव्या देत आहेत, कोणी नगररक्षकाची व सैन्यातील शूराची निंदा करीत आहे तर कोणी शत्रूच्या लोकास शापीत आहेत; इत्यादि अनेक प्रकार तेथे चालले होते. इतक्यात नगराच्या बाहेरचे लोक राजाच्या सैन्याचा पराभव करून नगरात शिरले. त्यानीं अगोदरच नरकयातना भोगीत असलेल्या लोकावर अनेक अत्याचार केले. यमदूताचें कर्म प्रत्यक्ष करून दाखविले. स्त्रियावर बलात्कार केले. संपत्ति लुटली. बाल व वृद्ध याचे हाल हाल केले आणि नगराचा अवशिष्ट भागही उद्ध्वस्त करून टाकिला. रामा, सज्ज-

नावरील सकट ह्मणजे दुर्जनाचा उत्सवच होय. लोक अशा घोर प्रसगात गुतले आहेत, असे पाहून कित्येक शठ सज्जनाचा वेष घेऊन व त्या दुःखितास आपत्तीतून सोडविण्याचे मिप करून त्याची धन–धान्यादि सपत्ति सापडेल तितकी लाबवीत होते. एवढ्या निराशेच्या प्रसगीही नगरातील राजाचे कृतज्ञ वीर आपल्या व शत्रूच्या रक्ताचे सडे, नगरभूदेवीस तृप्त करण्याकरिता, घालीत होते असो, शेवटी तो कहर राजवाड्यापर्यत आला व राजगृहात चोहोकडे हाहाकार उडाला ४३.

**सर्ग ४४**—आपली पट्टराणी भ्याली आहे व अत पुरवर्गास शत्रूनीं पीडिले आहे, असें पाहून राजा युद्धाकरिता बाहेर पडला, असें सागून या सर्गात लीलेचे तत्त्व वर्णिलें आहे

**श्रीवसिष्ठ**—रामा, इतक्यात राजाची तरुण महिषी (अभिषिक्त राणी) लक्ष्मीप्रमाणे त्या स्थानी आली. तिची वस्त्रे, केस, माळा व अलकार अस्ताव्यस्त झाले होते. भीतीने तिची बोबडी वळली होती. श्रमाने सर्वांगास घाम आला होता. तिच्या आवडत्या दासी तिच्या मागोमाग येत होत्या तिचे मुख चद्रासारखें असून भीतीमुळे ओष्ठपुट थरथर कापत होते काळेभोर नेत्र अश्रूमुळे अधिकच पाणीदार दिसत होते. नाकपुड्या लाल झाल्या होत्या व श्वास लागल्यामुळे उर स्थळ वेगाने हालत होते. आपल्या प्रिय पत्नीची अशी पूर्वी कधी न पाहिलेली अवस्था पाहून राजाच्या चित्तात एकाच वेळीं अनेक विकार उत्पन्न झाले. इतक्यात तिच्या दासीतील एक शहाणी व बोलकी दासी पुढे होऊन व नम्रपणे हात जोडून त्या आपल्या स्वामीस ह्मणाली—राजन्, या आमच्या देवीसह आम्ही अतःपुरातून येथे पळून आलो आहो. वायूच्या सोसाट्याने व्याकुळ झालेली वेल जशी आपल्या आश्रयभूत वृक्षाजवळ येऊन सुरक्षित होऊन रहाते त्याप्रमाणे ही आमची देवी आता निर्भय होईल, यात काही सशय नाहीं. पण, प्रजानाथ, मी आपल्यास काय सागू? शत्रूच्या सशस्त्र, बलाढ्य व दुष्ट लोकानीं अतःपुरातील आपल्या इतर भोग्य स्त्रियास बलात्काराने हरण करून नेले आहे. क्षुब्ध समुद्राच्या लाटा तीरावरील वृक्षाचा व वेलीचा जसा विध्वस करितात त्याप्रमाणे त्या उद्धटानी अत पुरातील रक्षक पुरुषाचा व स्त्रियाचा चूर उडविला आहे. एकाएकी आलेल्या वावटळीने जसे उत्तम उत्तम वृक्षाचे उन्मूलन करावे

त्याप्रमाणे दुरून एकाएकीं नगरावर येऊन कोसळणाऱ्या या शत्रूच्या वीरांनी नगरातील सर्वस्वाचा नाश केला राजगृहात शिरून, अनाथाप्रमाणे आक्रोश करणाऱ्या आपल्या अंतःपुरवर्गास, केस व वस्त्रे धरून फराफर ओढून नेले. आमच्या या स्वामिणीची काहीं पूर्व–पुण्याई होती ह्मणून तिने व आह्मी हे पाय पाहिले. आता या आपत्तीतून आह्मास सोडविण्यास आपणच समर्थ अहा. असो, इंद्राशी भाषण करणाऱ्या अप्सरेप्रमाणे तिचे हें मंजुळ भाषण ऐकून व त्या दोघी देवींकडे पाहून राजा ह्मणाला, " जननी, मी आता युद्ध करण्याकरिता जातों. मला क्षमा करा. ही माझी पत्नी तुमची दासी आहे, असे समजा " इतकें बोलून, तो कोपाविष्ट झालेला राजा, नेत्र लाल करून सिंहाप्रमाणें बाहेर पडला. नंतर देवीबरोबर आलेली प्रबुद्ध लीला आरशातील प्रतिबिंबाप्रमाणे, अगदी आपल्या आकारासारखाच जिचा आकार व भाषणादि सर्व आहे अशा त्या राजाच्या पत्नीस पाहून देवीस ह्मणाली–जननि, हा काय चमत्कार आहे? जी मी तीच ही स्त्री कशी झाली? तरुणपणी मी जशी होते तशीच ही कशी झाली? मंत्री, नगरवासी, योद्धे, सैन्यातील लोक, अश्वादि वाहनें इत्यादि हे सर्व पूर्वीचेच आहेत, असे मला वाटते ते सर्व येथे व तेथेही कसे रहातात आरशात दिसणारे प्रतिबिंब व त्याच्या बाहेर असलेला पुरुष हे दोन्ही सचेतन कसे असतील !

**श्रीदेवी**—( चिति–शक्ति अतर्क्य आहेत. त्यामुळे तुल्य कर्मामुळे उद्बोधित झालेल्या त्याचा आविर्भावही केव्हा केव्हा तुल्यच होतो. अशा अभिप्रायाने दृष्टिसृष्टिवादाचा आश्रय करून देवि समाधान करिते.–) आत जशी ज्ञप्ति उत्पन्न होते तसाच तत्क्षणी प्राणी अनुभव घेतो. जसे मन, स्वप्नादिकामध्ये, जाग्रतीत अनुभव घेतलेल्या पदार्थाच्या आकाराचे होते त्याप्रमाणें चिति अभ्यासाच्या योगानें विषयाकार बनते. संस्कारात्मक जगाचें स्वरूप जसें चित्तात व चितींत असतें तसेंच ते, संस्कार जाग्रत् झाले असता, उदय पावतें. ( भोक्त्याच्या अदृष्टाप्रमाणें उद्बुद्ध झालेली मायायुक्त चितिशक्ति अघटित घटना करण्यास समर्थ आहे, असा याचा भावार्थ समजावा. ) त्यामुळें अल्पदेश, अल्पकाळ, विपुलदेश, विपुलकाल इत्यादिकाचा विरोध रहात नाहीं. ह्मणजे हा सर्व

भास चितिशक्तीमुळे न होता खरोखर पदार्थामुळेंच जर झाला असता तर त्यास योग्य देश योग्य काल इत्यादिकांची आवश्यकता असती. पण वस्तुस्थिति तशी नसल्यामुळे योग्य देशादिकांवाचूनच हे सर्व भास होऊ शकतात. स्वप्नात भासणाऱ्या पदार्थांप्रमाणे, चैतन्याचे ठायीं अध्यस्त असल्यामुळें वस्तुतः आंत असलेलें जग, बाहेर असल्यासारखें भासते. पण आत अगदीं सूक्ष्म नाडीमध्ये असलेलेंही ते, दीर्घ अभ्यासामुळे, बाहेर व्यक्त व सत्य असल्यासारिखे होऊन राहिले आहे. त्या तुझ्या नगरामध्यें तुझा भर्ता जशा तऱ्हेच्या वासनेने युक्त होऊन मरण पावला त्या वासनेप्रमाणे त्या त्या वस्तु त्यास तेथेच प्राप्त झाल्या. पण समान कर्मवासनेमुळें उद्बोधित झाल्याकारणानें येथील मंत्र्यादिकाचे आकार जरी त्याच्या आकारासारखे असले तरी त्याचे जीव तेच नाहीत, तर ते निराळे आहेत. तेच हे आहेत असा तुला जरी वारवार अनुभव आला तरी ते हे नव्हेत. तर त्याच्यासारखे, त्याच्या आकाराचे आहेत एवढेंच काय ते. स्वप्नांतील साकल्पिक सैन्याप्रमाणे या राजाच्या चित्सत्तेमुळे ते तद्रूप झाले आहेत. स्वप्न व जाग्रत् यातील पदार्थामध्यें जर काहीं अतर असेल तर तें हेच कीं, स्वप्नातील पदार्थ स्वप्न-द्रष्टयावाचून दुसऱ्या कोणाच्या अनुभवास येत नाहीत व जागृतीतील पदार्थ जसेच्या तसेच सर्वांच्या अनुभवास येतात. पण तेवढ्यावरून त्यास सत्य कसे ह्मणता येईल ? कारण चद्रही सर्वास एकसारिखाच टी-चभर व भाकरीसारिखा गोल दिसतो; गारुड्याने बनविलेला मातीचा रुपायाही सर्वांस एकसारिखा दिसतो; आकाशाचे नीलत्वही आबाल—वृद्धास दिसते. स्वप्नातील पदार्थ उठताक्षणीं बाधित होतात ( मिथ्या ठरतात ) ह्मणून ह्मणावें तर जाग्रतींतील पदार्थही जाग्रदवस्था सोडताच मिथ्या ठरतात. ह्मणजे हे सर्वच अशाप्रकारचें आहे ! मग जाग्रत्पदार्थांतच अशी कोणती अधिकता आहे कीं, जिच्याकरिता ते स्वाप्न पदार्थांहून विलक्षण आहेत, असे ह्मणता येईल ? जाग्रतीत स्वप्न मिथ्या ठरते व स्वप्नात जाग्रत् मिथ्या ठरते, हे सर्वांस ठाऊक आहे. त्याचप्रमाणें जन्म झाला असता मरण असत् ठरते व मरणसमयी जन्म असत् ठरतो. आता नाश व बाध यामध्ये जो काही थोडासा विशेष आहे तो एवढाच कीं, नाशप्रसगीं, अवयव विनाशी असल्याकारणाने त्यानीं बन-

लेले द्रव्य विशीर्ण होतें ( म्ह. त्याचे अवयव निरनिराळे हो-ऊन क्षय पावतात ) व बाधप्रसगीं अधिष्ठानभूत वस्तूचा साक्षात्कार ( अनुभव ) आला असता त्या अनुभवाच्या बळानेंच आरोपित वस्तु क्षीण होते. पण याप्रमाणे नाश व बाध याचीं निमित्तें जरी भिन्न भिन्न असलीं तरी याच्या क्षयामध्ये मुळीच अंतर नसते. ( पूर्वी अधिष्ठानाच्या दृष्टीने जाग्रत व स्वप्न यातील वस्तूस सत्यता कशी असते ते सागितलें आणि आता येथवर त्याची असत्यता वर्णिली. त्यामुळें त्या दोन्ही अवस्थांची अनिर्वचनीयता समानच आहे, असें म्हणण्यास काहीं अडचण नाहीं, असें आतां देवी सागते. ) लीले, याप्रमाणें हे दृश्य सत् नाहीं व असत्ही नाहीं. तर तें केवळ भ्रांतिमात्र आहे. तस्मात् महा कल्पात झाला असता, सृष्टिसमयीं व पुढे होणाऱ्या अनेक युगामध्ये अशा या तीन कालातील कोणत्याही कालीं आपणास जें नाहीं म्हणून वाटतें तें खरोखर स्वरूपत. जरी नसले तरी त्याची कल्पना होण्यास अधिष्ठान असलेलें जे ब्रह्म तें असतेच. ( त्याच्या स्वभावात व स्वरूपात कधींही अतर पडत नाहीं. ) यास्तव तेच जग होय. हें भासणारें अब्रह्मरूप ( अनात्मरूप ) जग, खरे जग नव्हे. जल-तरंगन्यायाने ब्रह्मामध्ये या अनेक सृष्टि उत्पन्न होऊन लय पावतात. तेव्हां दग्धपटाप्रमाणे असलेल्या या भस्मरूप प्रपचामध्ये काय आस्था ठेवावयाची आहे ? ( आता विषयाचा जरी बाध होत असला तरी मिथ्या ज्ञानाचा बाध होत नसतो. तेव्हा त्याच्यामुळे द्वैताची सिद्धि होईल, असे कोणी म्हणेल म्हणून देवी म्हणते—) विषयरहित ज्ञान परस्पर भिन्न आहे किंवा ते ब्रह्माहून भिन्न आहे, असे समजण्यास काहींच सबल कारण नसल्यामुळें कोणतेंही ज्ञान ब्रह्ममात्रच आहे, असें म्हणावें लागतें. गाढ अधकारात बालकास जसें भूत दिसते त्याप्रमाणें आत्माज्ञानात अविवेक्यास जन्म-मरणादि मोह होतो. आत्म्याच्या अज्ञानास व्यामोह म्हणतात. त्याच्या आवरण व विक्षेप अशा ज्या दोन शक्ति आहेत त्यास व्यामोहत्व म्हणतात व ते व्यामोहत्वच जगद्रूपाने पसरले आहे ब्रह्मज्ञानाने सर्व दृश्याचा बाध होणे यास वैज्ञानिक प्रलय म्हणतात. या महाप्रलयासह सर्व बाध्य आहे. यास्तव सर्वांचा बाध झाल्यावर जे अवशिष्ट रहाते ते ब्रह्म होय. तेच सर्व बाध्याचे अधिष्ठान आहे. त्याची सत्ता दृश्याचे सत्त्व, असत्त्व इत्यादि सर्व

पक्षास निरोध करिते. ब्रह्माच्या ठिकाणी सर्व विकल्प संभवतात. पण नुसत्या जगाविषयी ते सत्य आहे, की असत्य आहे, की सत्यासत्यरूप आहे याचा निर्णय करिता येत नाही. ब्रह्म आकाश, द्रव्य–गुणादि पदार्थांचे परमाणु इत्यादि सर्व लहान–मोठ्या वस्तूंत ( अगदीं अंतर्भागीं ) राहूं शकते. पण जग तसे राहू शकत नाही. जेथे जेथे जीवसंज्ञक अणु–चिद्रूप असतें तेथे तेथें जगाचे अस्तित्व भासते. ( वासना ही एक मोठी चमत्कारिक शक्ति आहे. तिच्या बलाने आत्म्याचे ठायीं अनात्म्याचा कसा अध्यास होतो याविषयी देवी एक दृष्टान्त देते–) पूर्वी अग्नि नसलेला उपासक मी अग्नि आहें, अशी दीर्घकाल उपासना करून भावना–बलाने अग्निरूप होतो व त्यावेळीं त्याला आपल्या उष्णतेचा साक्षात्कार होतो त्याचप्रमाणे आत्मा दृढ व दीर्घ अभ्यासामुळे स्वत:च्या शुद्धचैतन्यावर जगाचा आरोप करितो व त्याच्या अनात्मरूपाचा व जाड्य, दुःख इत्यादि दोषाचा अनुभव घेतो सूर्योदय होऊन घरात किरणें पडलीं असता त्यातून जसे अनेक त्रसरेणु फिरत असलेले दिसतात त्याप्रमाणे परमाकाशात हे ब्रह्मांडरूपी त्रसरेणुच फिरत आहेत, असे तू जाण. वायूमध्ये जसा वास व स्पंद रहातो अथवा आकाशात शून्यत्व रहाते त्याप्रमाणे परात्पर तत्त्वामध्ये, ज्याने आपला स्थूलभाव सोडिला आहे, असे जग रहाते. आविर्भाव–तिरोभाव, ग्रहण–त्याग, स्थूल–सूक्ष्म, चर–अचर, इत्यादि अशाप्रकारचे हे सर्व कल्पित भाव अवयवरहित ब्रह्माचे काल्पित भाग आहेत, असे समज. पण साकार जगाचे निराकारत्व समजून देण्याकरिता त्याची कल्पना केलेली असून वस्तुतः ते स्वात्मभूत ब्रह्माहून अनन्य, ( अभिन्न, निराळे नसलेले ) आहेत, हेही तुला विसरता कामा नये जगाच्या सावयवत्वाप्रमाणे निरवयवत्वही मिथ्या आहे येणेप्रमाणे ब्रह्माच्या ठायीं अनन्य होऊन राहिलेले जग, विश्व असे त्या(ब्रह्मा)चे नाव व सर्व, पूर्ण इत्यादि त्याचा अर्थ या दोहोंनींही रहित नसते. (ह्मणजे ज्ञानानंतर ब्रह्मरूप झालेल्या जगासच विश्व हें नाव बरोबर लागू पडते. ) असें जर आहे तर या भासणाऱ्या सावयव जगाची वाट काय करावयाची? ते असें का भासतें? ह्मणून विचारशील तर सांगतें. लीले, जरी ते भासले तरी रज्जुसर्पभ्रमाप्रमाणें, तें सत्य आहे कीं, असत्य आहे, याचा

निर्णय करिता येत नाहीं. ह्मणजेच तें अनिर्वचनीय आहे. कारण भ्रातीमुळें ज्याचा अनुभव येतो त्यास सत्य ह्मणता येत नाही व वस्तुतत्त्व—परीक्षणात्मक बाधक—ज्ञान सत्याचा अपलाप करू शकत नाहीं. ( ह्मणजे आरोपित वस्तु मिथ्या आहे, असें ज्ञान झालें असता ती वस्तु जरी बाधित होत असली तरी त्या ज्ञानामुळें अधिष्ठान असत्य ठरत नाही.) परम कारण ब्रह्मच मायापिहित झाल्यामुळें चित्त्वास अथवा जीवत्वास प्राप्त होतें व दीर्घ अभ्यासामुळें तें आपणासच स्पष्टपणे जीव समजते. जीवाची भोगेच्छाच समाराचें कारण आहे. त्यामुळें जग सत्य असलें तरी व असत्य असले तरी जीव स्वेच्छेनें त्यास भोग्य बनवितो. जीव पूर्वानुभवामुळें काहीं पदार्थ पहातो ( ह्मणजे काहीं वस्तु त्यास पूर्वी अनुभव घेतलेल्या वस्तूसारख्या दिसतात ) व काही अगदीं अपूर्व पहातो. कित्येक पदार्थ तर त्यास थोडे अनुभाविलेले व थोडे न अनुभविलेले अशा स्वरूपाचे दिसतात. तात्पर्य वासनेप्रमाणें जीवाकाशामध्ये असत्य अनुभव सत्य असल्यासारखे दिसतात. तेंच कुल, तेच आचार, तेच जन्म, तेच व्यवहार, तेच मत्री व तेच नगरवासी जन अनुभवास येतात. पण अधिष्ठानाच्या दृष्टीने पाहिल्यास परमार्थतः ते पूर्वीच्याहून भिन्न नसतात व आरोपित दृश्याच्या दृष्टीने पाहिल्यास ते त्याच्या सारिखे असतात. ( सर्वत्र अशीच चैतन्याची स्थिति आहे, असें आतां देवी सागते—) लीले, सर्वगामी आत्मस्वरूप प्रतिभेची ही अशीच स्थिति आहे. ( यावर कोणी ह्मणेल कीं, ईश्वर आपल्या प्रतिभेप्रमाणे पदार्थास निर्माण करितो व जीवाची प्रतिभा ईश्वरनिर्मित पदार्थ जसा असेल तशी उद्भवते, असे शास्त्रांत सागितले आहे व ते बरोबरही दिसतें. कारण तसे न मानिल्यास सकल्पानें कल्पिलेला पदार्थही सत्य व सर्वप्राणि—साधारण होऊ लागेल. पण तसा अनुभव येत नाहीं तेव्हा केवल राजाच्या प्रतिभेनें पदार्थाची सिद्धि कशी झाली व इतर जीवाच्या साधारण व्यवहारास ते पात्र कसे झाले? यास्तव देवी ह्मणते— ) राजाच्या आत्म्यामध्यें जशा प्रकारची सन्मयी व सर्वसाधारण प्रतिभा उत्पन्न होते तशीच भोक्त्याच्या अदृष्ट-वशात् मत्सज्ञक आकाशात ( ह्म. अव्याकृताकाशरूप ईश्वरामध्यें ) सत्यसकल्परूप प्रतिभा उत्पन्न होते. ( त्यामुळें वरील दोष येत नाहींत. ) या नियमाप्रमाणेंच ही प्रतिभा--प्रतिबिंबापासून उत्पन्न झालेली लीला

भासत आहे. याच रीतीने सर्वत्र सर्वगामी संवित्–आदर्शामध्ये ( ह्म. ज्ञानरूपी आरशांत ) प्रतिभा प्रतिबिंबित होते. ती जेथे जशी असते तशीच तेथें निरंतर उदय पावते. जीवाकाशाच्या आंत असलेली जी अतर्यामी–ईश्वराची प्रतिभा ती स्वतः बाह्य वस्तु निर्माण करिते व त्यामुळें बाह्य पदार्थ सर्वसाधारण होतात. साराश, वत्से, हें आकाश, त्यातील हें भुवन, त्या भुवनांतील ही पृथ्वी, त्या पृथ्वींत असलेली तू, मी, हा राजा, इत्यादि सर्व चिन्मात्ररूप आहे. दुसरे तत्त्वज्ञ असेंच समजतात. यास्तव तूंही तसेंच समजून स्वस्थ व विक्षेपरहित हो ४४.

**सर्ग ४५.**—या सर्गात दुसऱ्या लीलेस देवीनें दिलेला वर, तिला होणारी पद्म-राजाची प्राप्ति व स्वसकल्पानुसार जीवास फललाभ होतो, हा परम सिद्धांत, यांचें वर्णन करितात.

**श्रीसरस्वती**—लीले, हा विदूरथ आतां या रणांगणांत शरीरत्याग करून त्या तुझ्या अत:पुरात जाईल व पद्मराजा होईल.

**श्रीवसिष्ठ**—राघवा, देवींचे हें भाषण ऐकून त्या नगरातील लीला ( ह्म. विदूरथाची पट्टराणी ) हात जोडून व अति नम्र होऊन देवींस ह्मणाली, " हे देवेशि, मी भगवती ज्ञप्ति–देवीची सतत पूजा करीत असते. ती दयाळु देवी मला स्वप्नामध्यें दर्शन देते. पण त्या माझ्या इष्ट व पूज्य देवीसारखीच तू मला अगदीं हुबेहूब दिसतेस. यास्तव मला वाटते कीं मज दीनावर प्रसन्न होऊन मला कृतार्थ करण्या-कारिताच तू येथे आली आहेस. जननि, मला वर दे. " रामा, तिचे हें मधुर भाषण ऐकून देवींस फार आनद झाला व तिची परम भक्ति पाहून ती ह्मणाली, " बाळे, तुझ्या अनन्य व अविच्छिन्न दीर्घ भक्तीनें मी प्रसन्न झाले आहे. यास्तव तुला जो वर इष्ट असेल तो माग. " देवीचे हे कृपापूर्ण भाषण ऐकून ती दुसरी लीला ह्मणाली, " रणात देहत्याग केल्यावर माझा पति जेथे जाऊन राहील तेथे याच शरीराने मी त्याची पत्नी होईन, असा मला वर दे " ते ऐकून देवी ह्मणाली, " बरें आहे तू माझी दीर्घकाल अनन्यभक्तीने, सर्व-उपचार समर्पण करून, पूजा केली आहेस, यास्तव तुझ्या इच्छेप्रमाणे होईल. " ज्ञप्तीच्या मुखकमलातून निघालेले हे शब्द ऐकतांच त्या लीलेचें मुख आनंदानें प्रफुल्लित झाले. पण इकडे त्या पूर्व लीलेच्या मनात मोठा विकल्प आला. हिल

स्थूलशरीरानें भर्तृ–लोकाची प्राप्ति झाली. पण मला मात्र दुसऱ्या शरीरानें येथें यावें लागलें. हें मनात येतांच तिला फार वाईट वाटलें व ती देवीस ह्मणाली, “ देवि, जे तुझ्यासारखे सत्यकाम, सत्यसकल्प व ब्रह्मस्वरूपी असतात त्याचें इष्ट तात्काल सिद्ध होत असते, असें असतांना माते, तू मला त्याच माझ्या शरीरानें या लोकांतरांत व त्या गिरिग्रामांत का आणिलें नाहींस ? ” लीलेचा हा प्रश्न ऐकून देवी ह्मणाली, “ सुंदरि, मी कोणाचें काहीं करीत नाहीं. जीव आपलें इष्ट स्वय सपादन करीत असतो. मी केवल त्याचें पुढें होणारें कल्याण अगोदर वरदानाने प्रकाशित करितें. इष्ट फल उत्पन्न करणारी प्रत्येक प्राण्याची प्राक्तन काम–कर्म-वासनावछिन्न चिद्रूप जीवशक्ति ( त्या त्या कार्याच्या बीजरूप मायायुक्त चिच्छक्ति ) असते. त्या शक्तीप्रमाणें मी फल देतें. माझ्या पदरचें मी काहीं देत नाहीं. माझी आराधना करणाऱ्या तुला ‘ मी मुक्त व्हावे ’ अशी इच्छा होऊन दीर्घकाल चिंतनानें तीच दृढ झाली. ह्मणून मला तुझ्या भावनेप्रमाणें निरनिराळ्या युक्तया योजून तुला बोध करावा लागला. आता तू निर्मल भावास प्राप्त झाली आहेस. तुझे अज्ञानावरण क्षीण होऊन आता तुझे स्वरूप स्वाभाविक शुद्धीनें सपन्न झालें आहे. जशी भावना तसें फल. जशी आपली बीजभूत चितिशक्ति तसें कार्य. लीले, हा अबाधित नियम आहे. त्यामुळे ज्या ज्या प्राण्याची दीर्घ अभ्यासानें जी जी भावना दृढ झाली असेल त्या त्याप्रमाणे त्याला योग्य कालीं फल मिळते. आपली चितिच तपोरूप किंवा देवतारूप होऊन दीर्घ व दृढ सकल्पाप्रमाणे अकस्मात् फल देते. तात्पर्य प्राण्याच्या सवित्–पुरुषार्थावाचून दुसरें कोणीही फल देणारे नाहीं. यास्तव ज्याला ज्या फलाची इच्छा असेल त्याने तसा सवित्–प्रयत्न ( भावना, संकल्प ) व कर्म करावें. लीले, चित्सत्ताच सृष्टीमध्यें अतरात्मा होऊन पूर्वी जसे विहित किंवा निषिद्ध करिते त्याप्रमाणे तिला पुढें फलानुभव घ्यावा लागतो. ह्या परम सिद्धांताचा विचार करून परम पावन पदास ओळख व अतःकरणात तद्रूप होऊन रहा ४९.

**सर्ग ४६**—या सर्गांत–आपल्या सर्व सैन्यासह विदूरथ रणभूमींत जाऊन शत्रूंशीं लढूं लागला–असे सागतात.

**श्रीराम**—गुरुराज, त्या देवी विदूरथाच्या गृहांत, असें भाषण करीत असताना रागावून तेथून निघून गेलेल्या त्या राजाने पुढें काय केलें ?

**श्रीवसिष्ठ**—रामा, विदूरथ आपल्या सर्व परिवारासह त्या राजगृहातून एकाएकीं निघाला. त्यावेळीं तो नक्षत्रयुक्त निशापतीप्रमाणें दिमत होता. त्याने अगात कवच घालून आपलीं सर्व शस्त्रास्त्रे आपल्या जवळ घेतलीं. तो जेव्हा त्या भव्य गृहातून बाहेर पडला तेव्हा त्याच्या लोकांनीं मोठ्या धैर्यानें त्याचा जय-जयकार केला. योद्धयास पुढें काय करावयाचे ते सागून व मत्र्यानीं व्यूहादिकाची रचना कशी काय केली आहे आणि नगरावामी जनाची व्यवस्था कशी करण्याचा त्याचा विचार आहे, हें समजून घेऊन तो वीरश्रीने भरलेला राजा आपल्या अलकृत रथावर चढला. त्याच्यावर पाच पताका फडफडत होत्या. सर्व शस्त्रास्त्रे होतीं. वाऱ्यासारखे वेगाने चालणारे आठ घोडे त्यास जोडिले होते. मातलीसारिखा कुशल सारथि त्याच्या अग्रभागीं बसला होता. चागल्या सस्कारानीं युक्त असलेला बुद्धि-सारथि जसा इद्रियरूपी अश्वाचे मनोरूपी प्रग्रह ( लगाम ) आपल्या अधीन ठेवितो व त्या इद्रियाश्वास आपल्या इच्छेप्रमाणे, मन—प्रग्रहास ओढून किंवा सैल सोडून, सन्मार्गानेच जाऊ देतो त्याप्रमाणें त्या सारथ्या-नेही घोड्याचे प्रग्रह ( लगाम ) आपल्या हातात धरिले होते व त्यास इष्ट मार्गानेच चालविण्यास तो सज्ज होऊन राहिला होता. शरीररूपी रथात बसलेल्या जीवरूपी रथीने बुद्धिसारथ्यास सस्कारद्वारा प्रेरणा केली असता जसा शरीररथ चालू लागतो ( ह्मणजे चेष्टा—हालचाल करितो, ) त्याप्रमाणें रथी विदूरथाने त्या सारथ्यास प्रेरणा केली असता तो रथ शत्रुसैन्यावर चालून जाऊ लागला. त्याबरोबर रथास लाविलेल्या शेकडो क्षुद्र घटाचा मजुळ ध्वनि होऊ लागला. अश्वानीं आपल्या खेखाळण्यानें आपल्या सजातीयास जणु काय प्रोत्साहन दिलें. रणवाद्याचा गजर सुरू झाला. सैनिक सिहनाद करू लागले. धनुष्याचे टणत्कार होऊ लागले. बाणाचे सू—सण्ण्ण् असे ध्वनी ऐकू येऊ लागले. राजा शत्रूशीं युद्ध करण्याकरिता निघाला, असें समजताच पूर्वी परत फिरलेले वीरही पुनरपि नव्या उत्साहानें सैन्यास येऊन मिळाले. योद्धयांची मोठी गर्दी झाली. त्यांचीं कठिण कवचें व शस्त्रें एकमेकांच्या कव-चास व शस्त्रास लागून त्यांचा खण—खण ध्वनि होऊं लगला.

सेनापती 'आपल्या हाताखालच्या लोकांची स्तुति करून त्यास क्षत्रियाच्या धर्माचें स्मरण करून देऊ लागले. गर्दीतून चालणाऱ्या अनेक प्राण्याच्या पायांपासून व रथचक्रापासून उडालेली धूळ अंतरिक्षास व्यापून टाकू लागली. त्यावेळीं या लोभी व अभिमानी क्षत्रियाच्या हातून निर्दयपणें घडणाऱ्या संहारास व रक्तपातास कंटाळलेली भूदेवी आपले स्थान सोडून आकाशांत स्थानांतर करण्याकरिताच निघाली आहे की काय, असा भास होत असे. लोकानीं आग विझविल्यामुळे अनेक प्रकारच्या क्लेशांत पडलेल्या त्या नगरातील लोकास गर्भवासातील यातनाप्रमाणे असह्य यातना भोगाव्या लागल्या. तारुण्यात अविवेकाचें जसे प्राबल्य असतें त्याप्रमाणें त्या नगरात अंधकाराचें प्राबल्य झाले. नगरात रस्त्यावरून दिवे लाविले होते, पण दिवसा नक्षत्राची जशी अवस्था होते तशी त्या उडालेल्या धूळीमुळे त्याची अवस्था झाली. तेव्हा देवीने त्या विदूरथाच्या कुमारिकेस दिव्य दृष्टि दिली व त्या तिघीजणी युद्ध चमत्कार पाहू लागल्या. शत्रूच्या सैन्याशी राजाचे सैन्य जाऊन भिडलें. जसा एकाद्याच्या अंगात भूतसंचार व्हावा त्याप्रमाणे त्या सर्वांच्या अंगात वीररसाचा संचार झाला होता. झालें; काय पुढें विचारिता! हाणमार सुरू झाली. जिकडेतिकडे रक्त, छिन्न भिन्न कलेवरें, हाहाकार, सिंहनाद व मरण यांचा सुकाळ झाला. उडणारी धूळ रक्ताच्या योगाने खाली बसली, शस्त्रापासून निघालेल्या अग्नीच्या योगाने अंधकार क्षणभर नष्ट झाला, युद्धामध्ये गढून गेल्यामुळें वीराचे शब्द फारसे ऐकू येईनातसे झाले, रणांगणात देह-त्याग करावयाचा, या निश्चयामुळें मरणाची भीति पळाली; व व्यवस्थितपणें युद्ध सुरू झालें. पण वेगानें सुटणाऱ्या सशब्द बाणाऱ्यायोगानें, एकमेकावर हापटणाऱ्या व त्यामुळे खट् खट् व खण् खण् असा ध्वनि करणाऱ्या तरवारींच्या योगानें आणि झण् झण् असा शब्द करणाऱ्या महास्त्राच्या योगानें तें दुःसह दुष्प्रेक्ष्य व दुस्तर वाटत होते ४६

**सर्ग ४७**—या सर्गांत सिंधुराजास जय मिळण्याचें कारण सांगून सूर्योदयानंतरही युद्ध चाललें व मंत्रयुक्त अस्त्रांनीं दोन्ही राजानीं द्वैरथ युद्ध केलें, असें वर्णन करितात.

**श्रीवसिष्ठ**—राघवा, अशारीतीनें तें घोर युद्ध चाललें असता राजवाड्यातून युद्धप्रसंग पहाणाऱ्या त्या दोघी लीला देवीस म्हणाल्या, " जननि

आजच्या संग्रामात आमच्या स्वामीस विजय न मिळण्याचें कारण काय ? तू त्याच्यावर प्रसन्न झाली आहेस. तेव्हां तुझ्या प्रभावानें त्यास यश मिळणें फारसें कठिण आहे, असें आम्हांस वाटत नाहीं." हें ऐकून देवी म्हणाली, "होय तुम्ही म्हणता तें खरें. पण या सिंधुराजानें विजय प्राप्त्यर्थ माझी फार दिवसांपासून आराधना चालविली आहे व या तुमच्या पतीनें त्याकरिता माझी मुळींच आराधना केलेली नाहीं. त्यामुळें त्यास जय मिळेल व विदूरथाचा पराजय होईल. कर्माप्रमाणें फळ. ज्ञप्ति ह्मणजे सर्व प्राण्याच्या मनोतर्गत सवित् ( अह असें सवेदन, भान, ज्ञान, ). त्या मज सवित्–सज्ञक ज्ञप्तीला जो जेव्हा जशी प्रेरणा करितो ( ह्म. काम–कर्म–वासनाबलात् फल देण्यास उन्मुख करितो ) त्यास तात्काल मी तसे फल सपादन करून देते. ( ह्म. त्या फलरूपाने विवर्त होते ) साराश प्रत्येक बरें वाईट फल प्रत्येकाच्या अधीन आहे. जो जशी प्रेरणा करील त्याप्रमाणें त्याच्या फलरूप होऊन रहाणे हा माझा स्वभाव अग्नीच्या उष्णतेप्रमाणें कधींही बदलत नाहीं. विदूरथाने " मी मुक्त व्हावे " या इच्छेनें माझी आराधना केली आहे. त्यामुळे मी त्याच्या प्रतिभारूप झाले आहे. तस्मात् तो मुक्त होईल व त्याच्या शत्रूच्या प्रतिभेप्रमाणे त्याला विजय मिळेल. विदूरथ या भार्येसह त्या देहास प्राप्त होईल व योग्य समयीं तुह्मा दोघीसह तो मुक्त होईल. या राजास समरागणीं मारल्यावर सिधुराजा या भूमीचा स्वामी होणार, हें ठरलेलेंच आहे. असो, रामभद्रा देवी असे बोलत आहे व दोन्ही सैन्ये युद्ध करीत आहेत इतक्यात जणु काय हा चमत्कार पाहण्याकरिताच सूर्य–भगवान् उदयाचलावर आला. त्याबरोबर विपत्तींतून मुक्त झालेल्या सज्जनाप्रमाणे भूलोक चमकू लागला. सकटप्रसगींही सत्त्वापासून न ढळलेल्या साध्वी स्त्रियाप्रमाणें दिशाचीं मुखें प्रसन्न झालीं. सद्गुणाचा उदय झाला असतां दुर्गुण जसे आपलीं तोडें काळीं करून निघून जातात त्याप्रमाणें अधकारानें पळ काढिला. वेदातनिष्ठ पडिता-पुढे जसे इतर शास्त्रज्ञ निस्तेज होतात त्याप्रमाणे शुक्र, गुरु इत्यादि तर राहू देतच, पण चद्रही तेजोहीन झाला. सूर्याचे रक्तवर्ण किरण भूमीवर पसरले. कोवळ्या उन्हामुळें लालभडक झालेले पर्वत, अनेक शस्त्रप्रहार सहन करून रक्तबंबाळ अंगानें शत्रुसंहार करण्याच्या इच्छेनें

रणांगणात स्थिर असलेल्या वीराप्रमाणे दिसत होते. असो; सूर्य जसजसा वर येऊ लागला तसतसा त्या दोन्ही सैन्यांतील लोकांचा उत्साहही वाढू लागला. अंतरिक्षांत जसे चंद्र-सूर्य दिसतात त्याप्रमाणें त्या रणांगणात विदूरथ व सिंधु यांचे असख्य वीरांनीं परिवेष्टित झालेले देदीप्यमान रथ दिसत होते. त्यांचे सारथी नानाप्रकारच्या चित्रविचित्र गतींनी अश्वास चालवून एकमेकास चकित करीत होते. अनेक शस्त्रास्त्राचा उपयोग करून प्रत्येकवीर व ते दोघे राजे आपला विजय व्हावा ह्मणून दीर्घ प्रयत्न करीत होते. शेवटीं त्या दोन्ही राजाचे रथ एकमेकाजवळ आले. दोघानींही आपलीं तीक्ष्ण शस्त्रास्त्रें परस्पराच्या शरीरावर टाकलीं. एकमेकाचा प्राण घेण्याकरिता त्यातील प्रत्येकजण आपली शक्ति क्षीण करू लागला. बाण, खड्ग शक्ति, शतघ्नी, मुद्गर, पाषाण, मुसल, तीक्ष्ण अग्राचे भाले व दुसरींही अनेक शस्त्रे याचा त्यांनीं उपयोग केला व येणेंप्रमाणे खवळलेल्या समुद्रा-प्रमाणें ते दोघेही मारीन किंवा मरेन या दृढ निश्चयानें समरदेवतेची आराधना करू लागले ४७.

**सर्ग ४८—५१**—या सर्गांत त्या दोघा राजाचें घोर युद्ध, अनेक अस्त्राचा प्रयोग व प्रतीकार, शेवटीं राजा विदूरथास आलेली भयकर मूर्च्छा, राजा रणभूमींत पडला, हें ऐकून नगरात झालेला कोलाहल, सिंधुराजाची राज्यप्राप्ति व त्यानें भूमंडळीं पुन स्थापिलेली स्वस्थता याचें वर्णन केलें आहे.

**श्रीवसिष्ठ**—दाशरथे, हा आपला शत्रु सिंधुराज मोठ्या गर्वाने आज आपल्या पुढें आला आहे व आपल्यावर शस्त्रप्रहार करण्यासही तयार झाला आहे, असें पाहून विदूरथास फार कोप आला. त्याने आपलें विशाल धनुष्य आकर्ण ओढून त्याच्यावर बाणांचा वर्षाव सुरू केला. अति क्रोध आल्यामुळें त्याला तेव्हां देहभानही राहिलें नव्हतें. तिकडे सिंधुराजानेंही त्याच्या त्या भयकर वर्षावास प्रतिबंध करण्याचा सकल्प करून वेगानें शरसंधान करण्यास आरभ केला. विदूरथाप्रमाणेंच तोही मोठा शूर व भगवान् विष्णूचा पूर्ण भक्त असल्यामुळें त्या दोघांचें युद्ध प्रेक्षणीय हो[illegible] व कौशल्य अपूर्व होतें. त्याचे ते बाण ह्मणजे मुसळेंच होतीं, असें ह्मण-ण्यास काहीं प्रत्यवाय नाहीं. त्यांनीं एकमेकाच्या शस्त्रांस अंतरिक्षांतच तोड

टाकण्याचा सपाटा चालविला. विदूरथाचें युद्ध-कौशल्य विलक्षण होते. समुद्रापासून जलप्रवाह, सूर्यापासून किरण, सोसाट्याचा वारा चालला असता वृक्षापासून पुष्पे, तापवून लाल केलेल्या लोखडावर घणाचे प्रहार केले असता त्यापासून ठिणग्या, मेघापासून धारा व निर्झरापासून तुषार जसे निघतात त्याप्रमाणें त्याच्या धनुष्यापासून बाण एकसारखे निघत होते. त्या वीराचे तें हस्तलाघव पाहण्याकारिता दोन्ही सैन्यातील लोक चित्रासारिखे स्थिर राहिले. त्याचे अतरिक्षात वेगानें जाणारे बाण उल्केप्रमाणे देदीप्यमान दिसत होते. त्याच्या धनुष्यापासून निघणारा तो बाणप्रवाह राजमदिरातून पाहून त्या नगरांतील लीला, देवीस मोठ्या आनदाने ह्मणाली, "देवि, तुझा जय–जयकार असो. माझ्या स्वामीचा पराक्रम पाहिलास का? या त्याच्या बाणवृष्टीने मेरूचेंही चूर्ण होईल. मग या क्षुद्र मनुष्याची काय कथा? आमच्या स्वामीचा आज खाचित जय होणार, असे मला वाटते" रामा, जिने पूर्वी कधीं असले युद्ध पाहिले नव्हते त्या लीलेचे हे भाषण ऐकून त्या दोघी देवी मनात हसू लागल्या. पण त्यानी तिला काहीं उत्तर दिले नाहीं. त्या दोघीही युद्धचमत्कार पहाण्यात गुग झाल्या होत्या, असे दिसलें. इतक्यात सिधुराजानेंही आपला प्रभाव दाखविला. विदूरथाची ती सर्व बाणवृष्टि आपल्या अमोघ शरसधानाने निष्फळ करून सोडिली. अगस्त्यमुनींनीं सागराची किवा जह्नूने मदांकिनीची जी अवस्था केली तशीच त्यानें त्याच्या असख्य बाणसमूहाची वाट लावली. राजाच्या दिव्य शराचेही त्यानें बारिक बारिक तुकडे करून टाकिले. त्यामुळें दिवा विझला असता तो जसा कोठे गेला हे समजत नाही त्याप्रमाणें त्याचे ते बाण कोठें गेले हे कळेना नंतर सिधूने मेघास्त्राने आकाश अभ्राच्छादित केलें. विदूरथाने त्याचें निवारण केलें. एक प्रहरभर त्या दोघाचा काल एकमेकाच्या घातुक बाणाचे निवारण करण्यातच गेला. हे दोघे समानबल आहेत, अशी सर्व प्रेक्षकाची खात्री झाली. इतक्यात सधि साधून सिधूनें गधर्वाच्या प्रेमामुळें प्राप्त झालेलें मोहनास्त्र आपल्या प्रबल शत्रूवर सोडिलें. त्या अस्त्राच्या योगाने एका विदूरथावाचून त्याचे इतर सर्व योद्धे मूर्च्छित झाले. त्यांना आपल्या शरीराचेंही भान राहिलें नाहीं. ते मेल्यासारखे किंवा चित्रासारखे निश्चेष्ट झाले. तें पाहून विदूरथानें प्रबोधास्त्राचा प्रयोग केला. त्यामुळे ते पुनः सावध झाले.

आपले अस्त्र व्यर्थ गेले, ह्मणून कोपयुक्त झालेल्या सिंधूनें भयकर नागास्त्र सोडलें. तेव्हां गरुडास्त्राचा प्रयोग करून विदूरथाने त्या विषारी प्राण्याच्या भीतीपासून तेथील लोकांस सोडविले. त्यानतर सिंधूने तमोऽस्त्र सोडून शत्रूच्या परिवारास जणुकाय अंधकुपातच लोटिले. पण मत्रवेत्त्या विदूरथानें मार्तंडास्त्राचा प्रयोग करून, ब्रह्मनिष्ठ गुरु अनन्य शिष्याचे अज्ञान ज्ञानाच्या योगाने जसे घालवितो त्याप्रमाणे, त्या क्लेशकारक अधकारास नाहींसे केले पुढे त्याच्या शत्रूने भयकर राक्षसास्त्र सोडले. त्यामुळें रणागणातील वीरास व युद्धचमत्कार पाहणाऱ्या लोकास असख्य विक्राळ राक्षस दिसू लागले. आपले सर्व लोक भयभीत झाले आहेत, असें पाहून लीलेच्या पतीने राक्षसाचा सहार करणारे नारायणास्त्र जपले. तेव्हा त्या भयकर व दुष्ट प्राण्याचा मागमूस नाहींसा झाला. तात्पर्य येणेंप्रमाणे त्यानीं एकमेकावर अनेक दिव्य अस्त्रे सोडिलीं व दोघानींही त्याचे निवारण केले. फार काय पण त्यानी वैष्णवास्त्राचाही प्रयोग केला. पण दोघेही समबल व सारखेच तपस्वी आणि पुरुषार्थी असल्यामुळें त्यातील एकही हटेना. दोघाचाही युद्धोद्योग तेथील सर्व प्राण्यास, मूर्खाच्या क्रोधाप्रमाणें, त्रासदायक झाला. इतक्यात विदूरथाने मोठ्या त्वरेने शत्रूचें अस्त्र निष्फळ करून अग्न्यस्त्र पुनः सोडिले. त्याच्या योगानें सिंधूचा रथ जळून गेला. तेव्हा तो वीर, वारवार विघ्नें आली तरी अगीकृत कार्य न सोडणाऱ्या सज्जनाप्रमाणे मनात यत्किंचित्‌ही खिन्न न होता, हातात ढालतरवार घेऊन आपल्या रिपूच्या रथावर धावला. त्यानें अगोदर मोठ्या चपलतेने विदूरथाच्या रथास जोडलेल्या घोडयाचे खूर तोडून टाकिले. तेव्हा विदूरथासही त्याच्याप्रमाणेंच ढाल–तरवार घेऊन रथाखाली उतरावे लागले. त्यानतर त्याचें भूमीवरील द्वद्वयुद्ध सुरू झाले. ते दोघेही एकाच प्रकारचीं आयुधें उचलून तुल्य–उत्साहाने एकमेकास मारण्याकरितां प्रयत्न करू लागले त्याच्या तरवारींचे अनेक घाव एकमेकाच्या तरवारीवर पडून त्या करवतीसारख्या झाल्या. तेव्हा विदूरथानें हातातील खड्ग टाकून एक तीक्ष्ण शक्ति सिंधूवर फेंकिली. तिच्या योगानें सिधूचे हृदय विदीर्ण झालें व तो रक्त ओकून भूमीवर निश्चेष्ट होऊन पडला. विदूरथाचें हें अद्भुत कर्म पाहून त्याच्या योद्ध्यांनीं त्याचा जयघोष केला व सिंधूचे

अनुयायी ' हाय, हाय ' करू लागले. इकडे विदूरथाची स्त्रीही आनदाने देवीस ह्मणाली, " भगवति, पहा, पहा; माझ्या प्रिय पतीनें नृसिंहाप्रमाणें आचरण करून आपल्या शत्रूस भूमीवर लोळविलें आहे. याचा उर फुटून त्यातून रक्त वहात आहे. तो पहा त्याच्या हितकर्त्यांनीं त्याच्याकरिता दुसरा रथ आणिला आहे. अरे हा तर राक्षस अजून जिवत आहे. मीं ह्मटलें कीं, तो अगदी मरणोन्मुख झाला असेल. त्याला हातपाय हालविण्याचीही शक्ति नसेल. पण पहातें तों रथ जवळ येतांच तो आपल्या पायानीं उठून वर चढू लागला. धन्य आहे बाई याच्या वीर्याची ! ! देवि, पाहिलेंस का ? माझ्या प्रिय पतीने काय केलें तें ? आपल्या मुद्गराच्या आघातानें त्यानें तो रथ मोडून टाकिला. वा ! फार चागलें झाले आमच्या वीरानींही राजाकरिता दुसरा सुदर रथ आणला ! तो पहा, माझा प्राणनाथ त्यात चढत आहे. पण दुर्दैवी पुरुषाच्या मनोरथाप्रमाणें त्यास तोडून टाकण्याकरिता सिंधु त्याच्यावर मुसळ फेकीत आहे. ओ, हो. माझ्या धन्याने त्याच्या मुसळास एकीकडे उडवून आपल्या रथावर आरोहण तर केले. अरेरे, मोठा कठिण प्रसग ओढवला. या दुष्टाने माझ्या प्रियावर भयकर शरवर्षाव करण्यास आरभ केला आहे. हर हर, आमच्या रथाचा ध्वज मोडला, घोडे मेले, सारथि पडला, चाके तुटली व तीक्ष्ण बाणाच्या योगानें माझा स्वामी व्याकुळ झाला. आता काय करू ? शिळेसारख्या कठिण छातीस भोकें पाडून त्याच्या विशाल मस्तकावरही त्याने निष्ठुरपणाने बाण मारिले आहेत. वज्रासारख्या असह्य बाणाच्या प्रहारामुळे व्याकुळ होऊन माझा पति भूमीवर पडला. अरे दैवा, काय हा घोर प्रसग! देवि, राजा सावध होत आहेसें वाटते होय, तो पहा, पुनः सावध होऊन दुसऱ्या रथावर चढत आहे. हाय हाय, सिंधूने त्याच्या स्कधावर तीक्ष्ण घाव घातला. त्यामुळे त्याच्या अगातून रक्ताच्या धारा वहात आहेत अरे देवा, आता तर पुरा घात झाला नको नको, मला आता हे युद्ध पाहणे नको. या निर्दयानें माझ्या प्राणाचे पाय कींहो तोडले ! ! आता करवतीं कापलेल्या वृक्षाप्रमाणें तो धाडकन् खालीं पडला तर त्यांत आश्चर्य काय आहे ? हाय हाय ईश्वरा, तुझा सकल्प कोणालाही समजणें शक्य नाहीं व त्याच्या विरुद्ध जाण्याचीही कोणाची शक्ति नाहीं. वस्तुतः तुझा सकल्प प्राण्याच्या पूर्व कर्मांप्रमाणेंच होत असतो, हें जरी खरें आहे, त

यास त्या पूर्व कर्मांचें स्मरण नसल्यामुळे ते सर्वस्वी तुझ्या संकल्पावर सर्व भार टाकितात. पण विचार करून पाहिल्यास तुझ्या संकल्पास दोष देतां येत नाहीं. तर आपल्या पूर्व कर्माचाच हा सर्व विपाक आहे, असा निश्चय होतो. पण देवि, मी आतां काय करूं ? झालें; माझें सर्वस्व नष्ट झालें. मी आता जीवंत असूनही मृततुल्य झाले. हर हर! हें दुःखही नको व तें राज्यही नको आणि हे दुःखदायी प्राणही नकोत, असे ह्मणून ती कोमल राजपत्नी भूमीवर मूर्च्छित होऊन पडली. इकडे विदूरथही पाय तुटले होते तरी मोठ्या धैर्यानें शत्रूवर तीक्ष्ण शस्त्राचा प्रहार करीतच होता. पण त्याच्या हातून आता काय होणार, हें समजलेंच होते. रामा, शेवटीं तो दुर्दैवी राजा, ज्याचीं मूळे तोडलीं आहेत अशा वृक्षाप्रमाणें, रथांतच पडला. तेव्हा त्याच्या कृतज्ञ व चतुर सारथ्यानें त्याचा रथ रणांगणातून काढून एकीकडे नेला पण त्या उद्धट सिंधूने त्या विन्मुख रथाच्या मागोमाग जाऊन विदूरथाच्या कंठावरही तीक्ष्ण प्रहार केला. तेव्हा ज्याचा गळा अर्धवट तुटला आहे अशा त्या राजाची सर्वांनीं आशा सोडिली. सारथ्यानें रथ वेगानें चालविला सिंधूही त्याच्या मागून येतच होता. पण सुदैवानें तो राजगृहात येऊन पोंचला. देवीच्या विलक्षण प्रभावामुळे सिंधूला राजमंदिरात प्रवेश करिता आला नाहीं असो, याप्रमाणें विदूरथाने युद्धसंबंधी सर्व पौरुष करून रणांगणीं उत्तम क्षत्रियास शोभेल, असे वर्तन केलें. पण दैव प्रतिकूल असल्यास पौरुष जसे व्यर्थ होतें त्याप्रमाणें त्याचे सर्व युद्ध-चातुर्य व्यर्थ झाले. गळा तुटल्यामुळे त्याचा मरणकाल जवळ आला. त्याचे सर्व अंग व वस्त्रें रक्ताने भिजून गेली होतीं. सूताच्या महत्कृत्यामुळें तो प्राण सोडण्यास आपल्या सुंदर गृहात आला व शेवटीं पवित्र मृदु शय्येवर भगवती ज्ञप्ति देवीच्या सन्मुख मृत्यूची वाट पहात पडला आणि या भव्य व दैवीशक्तीने सुरक्षित असलेल्या गृहात आपला प्रवेश होत नाहीं, असें जाणून, सिंधुही परत गेला.

इकडे नगरामध्ये सैन्यांतील लोकात "आमचा राजा मेला, आमचा राजा पडला" अशी एकच हाकाटी झाली "राजाधिराज सिंधुमहाराजांचा जय-जयकार असो." असें ह्मणून प्रतिपक्षांतील लोकही गर्जना करूं लागले. तेथल्या लोकांत पूर्व रात्रीप्रमाणें पुनः अत्याचार सुरू झाले. धन, स्त्रिया व इतर मूल्यवान् भोग्य वस्तु यांची शत्रूंनीं

मनमुराद लूट केली. राजाचा निधि ( खजीना ), सिंधूच्या लोकानीं अनेक रक्षक-वीरास केळीच्या खांबांप्रमाणे सटासट कांपून, आपल्या अधीन करून घेतला. आपल्या राजाचे शासन (आज्ञा) मान्य करणाऱ्या लोकास अभय देऊन, त्यास प्रतिबध करणाऱ्या व राजाशीं द्रोह करणाऱ्या काहीं प्रतिपक्षियांस त्यानी राज्याच्या आज्ञेनें देहात शासन केलें. केवळ तीक्ष्ण उपायानीं प्रजा शात होणें शक्य नाही, असें बऱ्याच अनुभवानें सिधु राजास पूर्वीच समजलेले असल्यामुळें त्यानें पुष्कळ गुणी लोकास, त्याचे अपराध विसरून, क्षमा केली व क्षमा, दया, औदार्य, इत्यादि सात्त्विक व निरुपद्रवी भावाचा आश्रय केल्यामुळे सर्व राष्ट्र त्याच्या अधीन झालें तेव्हा त्या नूतन राजानेही सर्व प्रजाजनास पुत्राप्रमाणें पाळण्याचें अभिवचन दिलें. येणेप्रमाणें सर्वत्र स्वस्थता होऊन भूलोकास मनुष्य लोकाचे स्वरूप पुनः प्राप्त झाले आणि सिंधु सार्वभौम राजा झाला ४८, ४९, ५०, ५१.

**सर्ग ५२.**—*या सर्गात विदूरथाच्या ससाराचे मिथ्यात्व व त्या नगरातील लीलेचे वासनारूपता याचें वर्णन केले आहे.*

**श्रीवसिष्ठ**—राघवा, आता, विदूरथाची काय अवस्था झाली आणखीं पुढे काय काय घडलें ते मी तुला सागतो. सिधु परत फिरत असता व राजाचा अतकाल अगदी समीप आला असता ज्याचे केवळ श्वासमात्र अवशिष्ट राहिले आहेत अशा आपल्यापुढे असलेल्या भर्त्याकडे पाहून लीला देवीस म्हणाली, “ जननि, हा माझा प्राणनाथ देहत्याग करण्यास प्रवृत्त झाला आहे.” तें ऐकून ज्ञप्ति देवी म्हणाली-वत्से, घोर रण, हा नगरदाह, ही तुझ्या पतीची विपत्ति, ही आतां होत असलेली अथवा पुढें होणारी राजक्राति, इत्यादि सर्व जरी खरोखर झालें असें तुला व दुसऱ्या सर्वांनाही वाटले तरी यातील एकही गोष्ट झालेली नाही हे राष्ट्रही नाहीं व हे भूतल नाही. त्यांची उत्पत्ति, स्थिति व लय सर्व भ्रम आहे. हें जग स्वप्नात्मक आहे. पूर्वी पाहिलेल्या मडपाकाशात पद्मराजाचे शव असून त्याच्या निकटाकाशात तुझ्या पतीच्या जीवात हे भूतलगत राष्ट्र भासत आहे. म्हणजे विदूरथाचें ब्रह्माड पद्माच्या अंत पुरात स्थित आहे व ज्याचा अतर्भाग राष्ट्रानें युक्त आहे, असें तें पद्माचे ब्रह्माड वसिष्ठ ब्राह्मणाच्या गृहांत आहे ( आता हीच गोष्ट उलटून सांग

गात ) विंध्य पर्वतावरील ग्रामात वसिष्ठ ब्राह्मणाचे आकाश आहे. तेच मंडपाकाश होय. त्यात पद्माचें जग व अंतःपुर आहे व त्याच्याच एका भागात हें विदूरथाचे राष्ट्र स्थित आहे. सारांश अशा प्रकारचा हा अवाढव्य जगत्त्रयमय भ्रम झाला आहे. एकात दुसरें, दुसऱ्यात तिसरें अशा प्रकारे होणारी याची उत्पत्ति काल्पनिक आहे. चैतन्यामध्ये आकाशासह हे सर्व भासतें. पण विषय मिथ्या आहेत, असें निश्चयाने समजले ह्मणजे चितियुक्त रूपच रहात नाही. त्यामुळें निर्विषय चिन्मात्र अवशिष्ट रहातें व तेंच उत्पत्ति–विनाशरहित परम पद अथवा मुख्य ज्ञेय आहे, असें तू समज. ते स्वयप्रकाश तत्त्वच मडप-गेहामध्यें, आपल्या चिन्मात्र स्वभावानें व्यक्त झालेल्या आत्मस्वरूपात, अनुभवास येते. अग वेडे, मडपातील भूताकाशातही जर जगत् खरोखर नाही तर शुद्ध चिदाकाशात तें नाही, हे काय सागावे? आता–अल्प वस्तूमध्यें मोठ्या वस्तूचा समावेश होणे शक्य नसल्यामुळें मडपाकाशात ( ह्मणजे हृदयस्थ सूक्ष्म भूताकाशात ) प्रतीत होणारें जग भ्रम आहे, असे ह्मटल्यास त्यातच प्रतीत होणारे सर्वव्यापी ब्रह्महीभ्रमरूप आहे, असे ह्मणावे लागेल, असें कदाचित् तू, शास्त्र व आचार्य याच्या उपदेशानें, ह्मणशील, पण तें बरोबर नाहीं. कारण भ्रमाला पहाणारा कोणीतरी पाहिजे, त्यावाचून भ्रमाची सिद्धि होत नाहीं. ब्रह्म भ्रम आहे, असें ह्मटल्यास त्यास पाहणारा कोण तें सागितले पाहिजे. ब्रह्माहून दुसरा कोणी त्यास पहातो, असें ह्मटल्यास अनेक चैतन्याची कल्पना व्यर्थ केल्यासारखे होते. अद्वैतसिद्धांतात सोपाधिक चैतन्यच द्रष्टा, असे मानिलेले आहे. यास्तव शास्त्र व आचार्य याच्या उपदेशानें, वस्तुत॰ तो(द्रष्टा)च निरुपाधिक ब्रह्म आहे, असें साक्षात् जाणिल्यानेंही ब्रह्मप्रतीति भ्रम होऊ शकत नाहीं. शिवाय वस्तुतः ब्रह्म निर्विशेष आहे व तें सर्वांचा आधार आहे. यास्तव अल्प, महत, मध्यम इत्यादि सर्व कल्पनामध्ये तें असतें. जगाची स्थिति तशी नाहीं. तें ब्रह्माप्रमाणें अपरिछिन्न नाहीं. तर परिछिन्न आहे. एका परिछिन्न पदार्थास दुसऱ्या परिछिन्न पदार्थात रहावयाचें झाल्यास त्या आधारभूत पदार्थाचें परिमाण योग्य आहे कीं नाहीं ह्मणजे आधेया( ठेवावयाच्या पदार्था )पेक्षा आधार ( ज्यात तो ठेवावयाचा तो पदार्थ ) मोठा आहे कीं लहान हा विचार उद्भवतो व मोठ्या आधारात प्रतीत होणारा लहान

आधेय ( पदार्थ ) सत्य आहे आणि आरशासारिख्या लहान आधारांत प्रतीत होणारा पर्वतासारिखा किंवा राजासारिखा मोठा पदार्थ असत्य आहे, असें ह्मणतात. त्यामुळें परिछिन्न जग परिछिन्न ( अल्प ) हृदयाकाशात रहाणें शक्य नसल्यामुळे तें मिथ्या आहे, हें जसें निःशंकपणें ह्मणता येतें, तसें सर्वव्यापी व सर्वाधार ब्रह्माविषयीं ह्मणतां येत नाहीं. द्रष्टा व दृश्य या दोन्ही भावानीं रहित आणि त्या दोघांचेंही आधारभूत असें ब्रह्म स्वभावतःच अद्वय आहे, शात आहे, शुद्ध आहे, आनंदस्वभाव आहे व स्वप्रकाश आहे. जगात दिसणारा हा सर्व व्यापार मूर्त ( साकार ) वस्तूंचा आहे. मंडपाकाशांत आपापल्यास अनुकूल असलेली व्यवस्था कल्पून हे सर्व प्राणी व्यवहार करीत असतात. पण तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनें पाहिल्यास त्या परब्रह्माचे ठायीं जग नाहीं, उत्पत्ति नाहीं व त्यातील प्राणी नाहीत आणि वस्तुस्थिति अशी असल्यामुळें अनुभवात्मक–प्रत्यक्ष प्रमाणाने सिद्ध होणारें जें अहकाराचेंही साक्षिभूत चिदाकाश तेंच अज्ञाच्या दृष्टीने जगद्रूप होतें, असा तूं निश्चय कर. विद्वानाच्या अनुभवाने जगाचें मिथ्यात्व सिद्ध होणें, हें त्याविषयीं प्रत्यक्ष प्रमाण असून “ हें सर्व दृश्य आत्मस्वरूप ज्ञानमात्र आहे. आपणास जसे दिसतें तसे तें स्थूलाकार नाहीं. कारण एवढें स्थूल ब्रह्माड व त्यातील पर्वत–समुद्रादि स्थूल पदार्थ जेथें रहाणें शक्य नाहीं अशा सकुचित प्रदेशीं त्याची प्रतीति येत असते. देहाच्या आत पाहिलेल्या स्वप्नातील नगराप्रमाणे. ” हें अनुमान प्रमाण आहे. ( आता स्वप्नामध्ये सर्वानुभव सिद्ध व्याप्ति दाखवितात. ) स्वप्नामध्ये आत्म्याचा चैतन्याभास कठ प्रदेश असतो. ह्मणजे जाग्रतीचे जसे नेत्र हे स्थान आहे तसे स्वप्नाचें क स्थान आहे. यास्तव हृदयापासून कठापर्यंत जो टीचभर प्रदेश आ त्यात असलेलें चैतन्यच पर्वतादिमय अनेक जगद्रूप झालें आहे, अ सर्वजण स्वप्नात पहातात. त्याचप्रमाणे अणु आत्म्यामध्ये असख्य जगें सभ तात. तात्पर्य स्वप्नसृष्टीप्रमाणे चैतन्याच्या अणूमध्यें त्रिभुवन रहातें. त्य अनेक चैतन्याणु असतात व त्या प्रत्येकात एकेक जग असतें. तशा प्रव रच्या जगातील ज्या एका जगात हा पद्म शव होऊन राहिला आहे तेथें तुझी सवत लीला या राज–जीवाच्या पूर्वीच जाऊन पोंचली, आहे. हि

तुझ्या समोर जेव्हां मूर्च्छा आली तेव्हाच ही आपल्या पद्मसंज्ञक पतीच्या शवाजवळ गेली.

**लीला**—देवि, ही तेथें पूर्वी कशी गेली ? सपत्नीकभावास प्राप्त होत्साती तेथें कशी राहिली ? त्या श्रेष्ठ गृहात रहाणारे सेवकजन तिला कोणत्या रूपानें पहातात ? व तिच्याशीं कसे बोलतात, तें मला संक्षेपतः सांग.

**श्रीदेवी**—लीले, दुसरी लीला झालेल्या तुझाच सर्व वृत्तात तूं ऐक. त्याच्या योगाने सर्व गूढें उकलतील व मरण, परलोकगमन इत्यादि दुर्दशा चागल्या तऱ्हेनें पाहणें शक्य होईल. हें नगर, राष्ट्र, लोक इत्यादि रूपानें दिसणारी ही जगन्मय भ्राति विदूरथ झालेल्या या तुझ्या पद्मसज्ञक पतीस त्याच्या शवाश्रय–गृहात दिसत आहे. हें तू पाहिलेलें युद्ध स्वप्नयुद्धाप्रमाणें भ्रातिमय आहे. ही लीलाही भ्रातीनें भासत आहे. हा सर्व जनसमूह जन्म-मरणादि भावशून्य आत्माच आहे. त्यामुळे या सर्वांचें मरण भ्रातिकल्पित आहे. हा ससारही काल्पनिक आहे. ही लीला याची दयिता भ्रमानेंच झाली. तुझा व पद्माचा विवाह हें सुद्धां स्वप्नच. हा तुम्हा दोघींचा भर्ता, ही कल्पना होय. फार काय पण मी स्वतः सुद्धा स्वप्नातील पदार्थाप्रमाणें आहे वसे, जगाची शोभा ही अशी आहे. हिलाच दृश्य ह्मणतात. पण हें गूढ समजले ह्मणजे ते दृशीचें कर्मच होत नाहीं. ह्मणजे दृश्य या शब्दाचा अर्थ नाहींसा होतो. दृक्शक्तीचें कर्म होणे, विषय होणें, हाच दृश्य या शब्दाचा अर्थ आहे. आत्मा सर्वरूप ( पूर्ण ) असल्यामुळें ही ससारस्थिति व तू, मी, हा, ती इत्यादि भाव त्याचे ठायीच कल्पित आहेत व त्याच्या सत्यत्वामुळेंच सत्य भासतात. हे आपण सर्व जसे परस्पर अनुग्राह्य–अनुग्राहकभावानें बद्ध होऊन याप्रमाणें चैतन्याच्या मिथ्या कल्पनास्थितीमुळें अशा तऱ्हेचे झालों आहों तशीच ही राणी झाली. ती अति सुदर व सर्व गुणसपन्न निपजली, तुझ्या विषयी सकल्प करणाऱ्या तुझ्या या पतीची जेव्हा मनोवृत्ति व वासना उद्भवली तेव्हाच ही तुझ्या आकाराची लीला चिच्चमत्कारामध्यें उत्पन्न झाली. ह्मणजे तुझा पति मेल्यावर लागलींच तुझ्याविषयीं सकल्प करणाऱ्या त्यानें हिला पुढे पाहिलें. ( ह्मणजे ही त्याच्या वासनामय आहे. तर मग अशा त्या वासनामय स्त्रीचा त्याला अनुभव कसा आला ? ह्मणून ह्मणशील तर सांगतें.–)

आतिवाहिकाची कल्पना वस्तुतः प्रातिभासिकच असते. पण चित्त जेव्हा दृढवासनेमुळे व्यावहारिक भावाचा अनुभव घेतें तेव्हा त्या अनुभवाच्या बलानेच चेत्य ( दृश्य ) सत्य होतें. पण विवेकजन्य ज्ञानाच्या अभ्यासानें जेव्हां आधिभौतिक ( व्यावहारिक ) भाव असत् ( मिथ्या ) आहे, असें चित्त जाणतें तेव्हा त्या दृढवासनेमुळें प्रपचाविषयींचा आतिवाहिक सकल्प प्रातिभासिक आहे, असा निर्णय होतो. असो; पुढे मरणाचा अनुभव घेऊन पुनर्जन्ममय भ्रम झाला असतां याने तुला जाणिलें व वासनामय दुसऱ्या लीलारूपी तुझ्याशी त्याचा समागम झाला. तूही आपल्या वासनामय अशा याला पाहिलेंस. चिदात्मा सर्व वासनामध्यें अनुगत असल्यामुळे तूही आत्म्यामध्येच विवर्त रूपाने झाली आहेस. साराश ब्रह्म सर्वशक्तिमय असल्यामुळे जेथे ज्या शक्तीची कल्पना करावी तेथें त्याप्रमाणे दृढवासनेच्या बलानें अनुभव येतो. अर्थात् आपली वासना हेच सर्व अनुकूल किंवा प्रतिकूल अवस्थेचें कारण आहे. या दोघास जेव्हा आपापल्या मरणानुकूल मूर्च्छा आली तेव्हा त्याक्षणीच याना हें सर्व चित्तात भासले. ह्मणजे आमचा हा पिता, ही माता, हा देश, हे धन, हें कर्म, आमचा असा विवाह झाला, आम्हीं असे एकतेस प्राप्त झालों इत्यादि सर्व त्यास त्या क्षणींच भासले. या सर्वाविषयी स्वप्न हाच एक उत्तम दृष्टात आहे. लीले, " मी विधवा होऊ नये " या उद्देशाने हिने माझी उपासना केली व त्याप्रमाणे मीही तिला वर दिला. त्यामुळे ही बालिका याच्या पूर्वी मरण पावली. तुह्मी व्यष्टिचेतनाश आहा व मी तुमचा समूह आहे. (म्हणजे समष्टिरूप हिरण्यगर्भ चेतना आहे ) मी तुम्हा सर्व जीवाची कुल देवता असून सर्वांस पूज्य आहे. मी प्राण्याच्या कर्माप्रमाणें घडामोड स्वतः करीत असते. ( असो, येथवर तेथें पूर्वी कशी गेली ? या प्रश्नाचें उत्तर देऊन आता ती देहयुक्त कशी झाली, ते देवी सागते.—) आता या देहात रहाणें अशक्य आहे, असें असह्य पीडा सहन केल्यावर, जेव्हा जीवास वाटते तेव्हा तो शरीरास सोडण्याची इच्छा करितो. शस्त्रादिकांच्या प्रहारानें एकाएकीं प्राण जातो, असें पुष्कळदां अनुभवास येतें. पण एका क्षणातही असह्य दुःख होणें व त्यामुळें देहाचा कटाळा येणें, हीं होऊ शकतात. मूर्च्छा हा जीवांस असह्य दुःख भासूं नये म्हणून ईश्वरानें योजिलेला उत्तम उपाय आहे व मूर्च्छा हें मरणद्वार

आहे. · देहसबधामुळे दु:ख होते, हे प्राण्यास स्वभावत:च म्हणजे कोणी न शिकविता समजत असते व शरीराच्या वेदाना असह्य झाल्यास किंवा त्याचें निमित्त झाल्यास, त्याच्याशी असलेला आपला सबध सोडण्यास जीव सर्वदा तयार असतो. आणि म्हणूनच मर्मस्थानी प्रहारादि होताच जीव मूर्च्छित होत असल्याचे आपण पहातों. सारांश, सुखाच्याच आशेने शरीर हवेसे वाटतें. दु:खाकरिता तें कोणालाही नको असतें. त्यामुळे क्षणभर झालेल्या असह्य दु.खानेही जीव शरीरत्याग करण्यास तयार होतो. आता ही गोष्ट खरी आहे कीं, दु.खे सहन कर–करून निगरगट्ट बनलेला जीव सामान्य दु खास किवा चित्ताच्या आधीस दु:ख समजतच नाहीं. पण नियामक शक्तीने उत्तरोत्तर अधिक असह्य दु:खें व त्याचे उपाय सृष्टीत योजून ठेविलेले असल्यामुळे त्यात अति दु.खे भोगणाऱ्या जीवासही या शरीराचा त्याग करावा, असे वाटण्यासाठी खीं असह्य दु:खे असतात व त्यामुळे त्याला अती " आता मला मरण येईल तर बरे " असे वाटते. देहाभिनिवेश मोठा कठिण आहे. अनेकदा मरणाचे दु ख सहन केलेले असल्यामुळें कीड–मुगीपासून व्यावहारिक विद्वानापर्यंत प्रत्येक जीवास आपल्या शरीराचा नाश होऊ नये, या शरीराची व प्राणाची ताटातूट होऊ नये तर त्याचा सबध सदा असावा, असे उपजत ज्ञान असते. हाच अभिनिवेश होय. याच्या योगाने जीव अगदीं शेवटपर्यंत शरीरत्याग करण्यास तयार होत नाहीं पण शवटीं एकदां अनेक क्लेश सहन करूनही बाळगलेले व पोशिलेले हे शरीर सोडावे लागते. असो, याप्रमाणे जीवास शरीरत्याग करण्याचा जेव्हा निरुपायास्तव, प्रसग येतो तेव्हा त्याचा अगुष्ठ परिमाण लिंगदेह प्राण वं उत्तर जन्माचा सकल्प यानी युक्त होत्साता परलोकास जातो. प्राण गतिमान् असल्यामुळे जीवाचे उत्क्रमण ( देहास सोडून जाणे ) त्याच्या अधीन असते. अगोदर वाणी, श्रोत्र इत्यादि सर्व करणें प्राणात लीन होतात. नतर त्यास जन्मभर अभ्यासाने दृढ झालेल्या सकल्पाप्रमाणें अत्य मति होते. तिलाच हृदयाग्र–प्रद्योतन ह्मणतात व इतकी पूर्व तयारी झाली ह्मणजे जीव नेत्र, कर्ण इत्यादि शरीरद्वारातील कोणत्या तरी एका द्वारातून निघून आपल्या सकल्पित स्थानीं जातो, असा नियम आहे. त्याप्रमाणे हिचा सूक्ष्म देहमय जीवही प्राणरूप होऊन व साक-

लिपक स्थानीं जाण्याविषयीं उत्सुक होऊन सूक्ष्म नाडीमार्गाने स्थूल शरीरास सोडून गेला. पुढें जीवात्मरूपानें हिने चित्तानें केलेला ( अर्थात् उत्तरशरीर–गमनरूप ) सकल्प याच ब्रह्माकाशात पाहिला. साराश, याप्रमाणें ती कामिनी असल्याच रमणीय शरीरानें युक्त होत्साती पद्माच्या ब्रह्माडामध्यें जाऊन पतियुक्त झाली आहे ५२.

**सर्ग ५३**—लीलेच्या गमनाचा मार्ग व तिला झालेली पतीची प्राप्ति याचें येथें वर्णन करून अज्ञानी प्राण्याची गति अतःरिक्षातून होत नाहीं, असें सागतात.

**श्रीवासिष्ठ**—रामा, जिला देवीचा वर मिळाला आहे अशी ही येथील लीला वर वर्णिलेल्या वासनामय देहानेंच, ' मी आपल्या पतीस मिळण्याकरिता नभोमार्गानें पुढे सागितलेल्या भुवनास जात आहे ' अशा स्मरणाने देहादि भावास प्राप्त होऊन मोठ्या उत्साहानें पक्षीणीसारिखी अतरिक्षात उडाली. तेव्हा तेथे आपल्याच सकल्परूपी महा आरशाच्या पुढे आल्यासारखी ज्ञप्तीनेंच पाठविलेली एक कुमारी तिला भेटली व ह्मणाली, " हे ज्ञप्तीचे मैत्रिणि, मी तुझी कन्या आहें. सुदरि, तुझे स्वागत असो. मी तुझीच वाट पहात येथे ( नभोमार्गात ) उभी आहे. ', त्यावर लीला ह्मणते–हे देवि, मला पतीजवळ घेऊन चल. कारण तुझ्यासारख्या मोठ्याचे दर्शन कधी व्यर्थ होत नसते. रामा, तें ऐकून ती कुमारी " बरें आहे. चल आपण जाऊ " असें बोलून आकाशात मार्ग दाखविण्याकरिता तिच्या पुढे झाली. तिच्या मागोमाग जाणारी लीला ब्रह्माडछिद्रात शिरली. मेघमार्ग, वातस्कध, सूर्यमार्ग, तारामार्ग, आणि वायु, इद्र, देव, सिद्ध, ब्रह्मा, विष्णु, व महेश याचे लोक या सर्वांचें उल्लघन करून ब्रह्मांडाच्या बाहेरील आवरणास येऊन पोंचली घटातील जलाचा गारठा घट फुटका नसला तरी बाहेरच्या बाजूस हात लाविताच अनुभवास येतो. त्यामुळे तो बाहेर आला असें ह्मणता येतें त्याप्रमाणेंच सकल्पानें सिद्ध असलेली ती ब्रह्माडाच्या बाहेर आली. पण हें तिचे गमन चित्तकल्पनामात्र होते, हे विसरता कामा नये. ब्रह्मांडाच्या बाहेरील जलादि आवरणाचे उल्लघन करून ती मायायुक्त चिदाकाशा आली. ( तें चिदाकाश किती अपार आहे, याची कल्पना व्हावी ह्मणू वर एकदां " गरुड एकसारिखा एक कल्पभर जरी धावत असला त

त्याचा अंत लागत नाहीं. " असे ह्मटलेंच आहे. ) त्या चिदाकाशांत, महावनांतील फलाप्रमाणें, एकमेकांस न दिसणारीं असंख्य ब्रह्मांडें होतीं. त्यांतील पुढच्या एका आवरणयुक्त ब्रह्मांडामध्यें बोरांत जशी कीड शिरते त्याप्रमाणें ती शिरली व त्यांतील ब्रह्मादिकांच्या लोकांचें उल्लंघन करून तारामार्गाच्या व मेघमार्गाच्या खालीं असलेल्या भूमंडलावर उतरली आणि त्यांतील त्या अंतःपुर मंडपांत शिरून पुष्पांच्या राशींत ठेवलेल्या पद्माच्या शवाजवळ जाऊन उभी राहिली. इतक्यांत तिला ती कुमारी दिसेनाशी झाली. ही माया आहे, भ्रम आहे, असें समजताच माया किंवा भ्रम जसा पार नाहींसा होतो त्याप्रमाणें ती कोठें नाहींशी झाली पुढें तिनें आपल्या प्रेतरूपी पतीचें मुख पाहिलें व त्याबरोबर संग्रामांत सिंधूनें ज्याला मारिलें तोच हा माझा पति आहे, असें तिला वाटलें व हें आपलें वाटणें खरें आहे, असाही तिचा निश्चय झाला. आपला हा प्राणनाथ शत्रूशीं युद्ध करीत असतांना सन्मुख मरण पावल्यामुळें या वीरलोकास प्राप्त झालेला असून यावेळीं सुखानें निजला आहे व मी देवीच्या कृपेनें येथें शरीरासह आल्ये, असा तिनें तर्क केला. मी धन्य आहे, माझ्यासारखी भाग्यवती दुसरी कोणी नसेल इत्यादि मनोराज्य करून ती पंख्यानें पतीस वारा घालूं लागली.

( आतां सेवकादि जन तिच्या विषयीं काय बोलतात ह्मणजे ही आज नवीन कोण व कोठून आली ? राजानें हिला कसें ठेवून घेतलें ? इत्यादि भाषणें ते आपसांत करितात कीं नाहीं ? असा लीलेनें वर प्रश्न केला होता, त्याचें उत्तर देवी देते.– )

**श्रीदेवी**—लीले ही कोणी अपूर्व स्त्री आली आहे, असें जर त्यांस वाटतें तर ते तिच्याविषयीं व राजाविषयीं असे कुतर्क काढते. पण आमच्या प्रभावानें त्यांना ही कोणी नवीन स्त्री आली आहे, असें मुळीं वाटलेंच नाहीं. तर ब्रह्मचैतन्य भोक्त्याच्या अदृष्टाप्रमाणें विवर्त पावत असल्यामुळें, प्रत्येक जीव " यानें असें व्हावें " " यानें असेंच व्हावें " इत्यादि नियति–नामक ईश्वरसंकेताच्या अधीन असल्यामुळें आणि साक्षि चिदाकाश त्यांतील प्रत्येकाच्या बुद्धींत एकसारिखेंच प्रतिबिंबित झाल्यामुळें राजा, प्रजा, त्याचे सेवक इत्यादि सर्वांस परस्पर पूर्वीप्रमाणेंच प्रतिभास होत आहे. राजा म्हणतो–

ही माझी भार्या आहे. ही माझी सहज सखी आहे. ही माझी राणी आहे. हा माझा सेवकवर्ग आहे. हे माझे राज्य. सेवकादिकही उलट हा आमचा राजा, ही आमची राणी इत्यादि जाणतात. पण यातील गुप्त रहस्य व इतके वेळ तू पाहिलेला चमत्कार मला, तुला व हिला मात्र ठाऊक आहे. ही स्थूल शरीराने पतीजवळ गेली नाही व माझ्या वरानेही जाऊ शकली नसती. कारण अति पुण्याच्या योगानेच प्राप्त होणाऱ्या लोकास आत्मबोधशून्य जीव जात नाहींत. स्वदेहाने तेथे जाण्यास ते असमर्थ असतात. हिरण्यगर्भादि जगाच्या अधिकाऱ्यानी ही नियतीच ठरवून सोडिली आहे त्यामुळें सत्य लोकाशीं स्थूल शरीरादि असत्य पदार्थाचा सबध होऊ शकत नाही. बालकाच्या मनात वेताला-विषयीचा सकल्प असेपर्यत भीतीचा नाश होत नाहीं. चित्तात अवि-वेकरूपी ज्वर असेपर्यत विवेक—चद्रमा शितलता उत्पन्न करण्यास समर्थ होत नाही. त्याचप्रमाणे मी पार्थिव शरीररूप आहें, माझी अतरिक्षात गति होणे शक्य नाही असा ज्याच्या मनात निश्चय असतो त्यास त्याच्या विपरीत कार्य करिता येत नाहीं. यास्तव ज्ञान, विवेक, पुण्य व वर याच्या योगाने पुण्यकारक अशा या तुझ्या देहासारिख्या सूक्ष्म देहाने जीव परलोकी जातात. पेटलेल्या अग्नींत वाळलेले पान टाकिले असता ते जसे लागलेच जळून जाते त्याप्रमाणे ‘ हा स्थूल देह मी आहे ’ हा अहकार सोडून मोठ्या पुण्याच्या प्रभावाने जीव आतिवाहिक देहरूप झाला की स्थूल भावाची निवृत्ति होते. वर व शाप सुद्धा प्राक्तन वासनाकर्मानुसारीच असतात म्हणजे वराप्रमाणे आपलें इष्ट होणे अथवा शापाप्रमाणें अनिष्ट होणें ही दोन्ही पूर्व कर्माचीच फळें आहेत. मग असे जर आहे तर देवादिकाच्या वराची किंवा शापाची काय आवश्यकता आहे ? म्हणून म्हणशील तर सागते. वर व शाप हे केवल त्या त्या फळाचे स्मरण करून देणारे आहेत. एकाद्या बालकानें एकादा अनुवाक किंवा श्लोक तोंडपाठ केलेला असला तरी तो त्याला कोणी विचारला असता एकाएकी आठवत नाहीं. पण एकाद्या अधिक जाणत्याने त्याचे मूळ त्याला आठवून दिले म्हणजे त्याला स्मरण होऊन तो पुढे बिनचुक सर्व म्हणतो त्याप्रमाणे कर्म व वासना याच्या अनुरूप प्राप्त होणारे फळ, वर किंवा शाप देणारे अधिक ज्ञानी देव किंवा ब्राह्मण, आठवून देतात व त्याप्रमाणे भोक्त्यास

पुढें ते मिळते आता अर्थक्रिया करणारा स्थूल देह तत्त्वज्ञानाच्या योगाने बाधित कसा होतो म्हणून म्हणशील तर सागते. तत्त्वदृष्टीने पाहिल्यास अर्थक्रियाच भासत नाही भ्रामक वस्तु तात्त्विक अर्थक्रिया काय करणार? हा देह मेला, हा जन्मास आला इत्यादि हे सर्व पूर्व दृढ अभ्यासाचे विलास आहेत. जीवाच्या सकल्पावाचून त्यास कोणतेही फल भोगावे लागत नाही. सत्य सकल्प ईश्वर जे काही आह्मास देतो ते आमच्याच प्रयत्नाचे फल आहे, हे तू चागले ध्यानात धर. सर्व ससार वासनामय आहे. त्याचा चित्तातच अनुभव येत असतो. ज्याना तत्त्वज्ञान झालेले नसते त्यानाही, दुसऱ्या चद्राप्रमाणे, पदार्थ जरी देहाच्या बाहेर भासत असले तरी ते आत असतात. बाहेर चद्र एक आहे पण ज्याच्या नेत्रास रोग झालेला असतो त्यास दोन चद्र दिसतात. त्यातील दुसरा चद्र जरी पहिल्याप्रमाणेच फार दूर दिसला तरी तो कल्पनामय असल्यामुळे आत ( मनात ) असतो, हे उघड आहे त्याप्रमाणेच बाह्य पदार्थ आत आहेत, असें समजावे ५३.

**सर्ग ५४**—सर्व पदार्थांची नियति, मरणक्रम, दुःखभोग आणि कर्म, गुण व आचार याच्या योगाने प्राप्त होणारे आयु प्रमाण याचे येथे वर्णन करितात.

**श्रीदेवी**—लीले, जे श्रेष्ठ धर्माचा आश्रय करितात व वेद्य तत्त्वास जाणतात तेच आतिवाहिक लोकास प्राप्त होतात. दुसरे कोणी प्राप्त होत नाहींत कारण आधिभौतिक देहत्व हा मिथ्या भ्रम आहे तेव्हा सत्यामध्ये तो कसा राहील? प्रकाशामध्यें अधकार कधी तरी राहील काय? असो, ही आमची लीला तत्त्वज्ञ व परम धर्म–सपन्न होती. ह्मणून ती पतीच्या कल्पित नगरास गेली. ( वस्तुत. सूक्ष्म भाव प्राप्त होणे हा सुद्धा खरा पुरुषार्थ नव्हे कारण ब्रह्माच्या अपेक्षेने तोही मिथ्या आहे. पण स्थूलाच्या अपेक्षेने त्याचें कारण सूक्ष्म सत्य असल्यामुळे व पुण्यप्रभावाने त्याची प्राप्ति झाली असता ब्रह्मलोकादि उत्तम लोकात जाण्याचे सामर्थ्य येत असल्यामुळें त्याची येथें स्तुति केली आहे )

**प्रबुद्ध लीला**—देवि, बरे असो, ती अशाप्रकारें गेली तर जाऊं दे. पण अबे, हा माझा भर्ता माझ्या समोर प्राणत्याग करण्यास प्रवृत्त झाला आहे. आता काय करावे? ( ह्मणजे याच्या या मरणाची उपपत्ति कशी लावावयाची? या सृष्टींत काहीं नियम दिसतो व काही अनियम आढळतो.

तेव्हा त्याचा निर्णय कसा करावयाचा? असा लीलेच्या प्रश्नाचा भाव आहे ) देहादिकाच्या जीवन, सौख्य, इत्यादि भावामध्ये व दुःख, दुर्भाग्य इत्यादि अभावामध्ये पूर्वी नियति कशी आली व पुनः अनियति कशी प्राप्त झाली ? नियति कोठेंच नसून सर्वत्र अनियतिच आहे, असे ह्मणावे तर जलाचें शीतलत्व, अग्नीचे उष्णत्व इत्यादि स्वभाव कसे उद्भवले. घटादि पदार्थामध्ये सत्ता ( भावरूपता-नियम ) कशी आली. सत्य रजतादि भावाचा संग्रह व असत्य शुक्तिरूप्य इत्यादि अभावाचा त्याग लोक का करितात? भूमि, आप् इत्यादि स्थूल आहेत, मन, इंद्रियें इत्यादि सूक्ष्म आहेत इत्यादि विचार कसे उद्भवतात? तृण, गुल्म, वृक्ष पुरुष इत्यादिकामध्ये उंची कोठून आली? सर्वत्र अनियमच जर आहे तर पदार्थाविषयीं प्राण्याचा अविश्वास का दिसत नाही? व जगात विश्वासाने जीं सर्व कार्ये एकसारखी होत असतात त्याची वाट काय?

श्रीदेवी—लीले, मी तुला याचे उत्तर मागेच दिले आहे पण पूर्व संस्कार अति दृढ असल्यामुळे ते तू विसरलीस! तुह्मी मानव तत्त्वार्थ असाच वारवार विसरता व त्यामुळे आह्मास एकदा सांगितलेलाच सिद्धांत वारवार सांगून दृढ करावा लागतो. असो, हे जग जर केवळ सत्य-स्वभाव असते तर त्यामध्यें एकसारिखी नियतिच आढळती व ते जर केवळ असत्स्वभाव असते तर अनियतिच अनुभवास येती. पण केवल ब्रह्म किंवा केवल माया ही त्याची प्रकृति नसून सत्य व अनृत यानी मिश्र असलेले जें अव्यक्त ती त्याची प्रकृति आहे. त्यामुळे सत्यानृत–स्वभाव व भोक्त्याच्या अदृष्टाप्रमाणे वागणारी चित् या सृष्टीत विवर्त-रूपानें रहाते, त्यामुळे सृष्टींत काहीं सत्यांश भासतो व काही असत्यांश अनुभवास येतो.

असो, आता शुद्ध चैतन्याचा विवर्त कोणत्या क्रमाने होतो ते पुनः सांगत्ये, महाप्रलय होऊन सर्वाचा अस्त झाला असता अत्यंत शांत, अनंत. निरवयव व सत्स्वरूप ब्रह्म अवशिष्ट रहाते. ते चिद्रूप असल्याकारणाने. मी तेजःकण ( ह्मणजे तेजानें व्याप्त झालेलीं सूक्ष्म भूतें ) आहें, असा अनुभव घेते. स्वप्नातील अनुभवाप्रमाणेंच तो त्याचा अनुभव मिथ्या असतो. पुढे केवळ मिथ्या अभिनिवेशामुळे तेजःकण–भावास प्राप्त झालेला हा आत्मा आपल्याहून भिन्न रूपानें कल्पिलेल्या जलादि आवरणा-मध्यें "मी स्थूल झालो आहे" असें खोटेच जाणतो. हे जे त्याचे स्थूल

होणे तेच हे ब्रह्माड होय. त्यात असलेले हिरण्यगर्भसंज्ञक ब्रह्म, मी चतुर्मुख ब्रह्मा आहे. असे जाणते व प्राण्याच्या कर्माप्रमाणे मनोराज्य करिते तेच सत्यसकल्प मनोराज्य हे जगत् होय प्रथम त्याने जसा जसा सकल्प करून ठेविला आहे त्या त्याप्रमाणे अद्यापि सर्व चालले आहे. मन नानाप्रकारच्या विचित्र वासनामय आहे. त्यामुळे त्याचा जरी विचित्र सकल्परूपाने परिणाम होत असला तरी चैतन्याचा तदनुसारी विवर्त का व्हावा? ह्मणून ह्मणशील तर सागते. आपली स्वच्छ उपाधि जशी होईल त्याप्रमाणे स्वत होणे हा आत्मचैतन्याचा स्वभाव आहे. त्यामुळे चित्त जसे स्फुरण पावेल त्याप्रमाणे आत्मचैतन्य होते. यात अस्वभाविक किंवा अनियत असे काहीच नाही शिवाय मायाशबल ब्रह्ममध्ये अनादि नियतरूपाने स्थित असलेल्या विश्वाचाच आविर्भाव होत असल्याकारणाने नियतीचीच सिद्धि होत आहे. ह्मणजे प्रलयकाळीही सर्व वस्तुशून्यत्व सभवत नाही. कारण त्या वेळी जर या जगाचा अत्यत अभाव झाला असता तर ही प्रस्तुत सृष्टि, बीजाचाच अभाव झाल्यामुळे, उद्भवली नसती. सोने—कडे, कुडल, मोहोर, पुतळी, गोप इत्यादि आकारातील—कोणत्या तरी व्यक्त किंवा अव्यक्त आकारावाचून —स राहील? अर्थात् सोन्याचे जेवढे ह्मणून आकार होणे शक्य आहे, तितके सर्व आकार त्यात आहेतच त्यातील एकादाच जरी एकादे वेळी व्यक्त असला तरी इतर ( आकार ) त्यात शक्तिरूपाने असतात व ते जर तसे नसते तर त्यात कधींच उद्भवले नसते मातीमध्ये तरग शक्तिरूपाने नसतात. ह्मणून मातीपासून ते उद्भवत नाहीत असो, तस्मात् प्रलयसमयींही जगाचा अत्यत अभाव नसतो. तर ते शबल ब्रह्ममध्ये अव्यक्तरूपानें किंवा बीजरूपाने अथवा शक्तिरूपाने रहाते व सृष्टीच्या आरभीं चित् जशी जल, अग्नि इत्यादि पदार्थाच्या शैत्य, उष्ण, इत्यादि स्वभावाने व्यक्त होते तशीच ती त्या त्या पदार्थाचा तो तो स्वभाव होऊन कल्पात होई तो रहाते. शिवाय मायाशबल ब्रह्माने जर आपली स्वरूपभूत सत्ता टाकिली असती तर मायेच्या अतर्गत असलेल्या नियतीस असत् ह्मणता आले असते. पण तसे होणें शक्य नाही तस्मात् नियतीचा अपह्नव ( निषेध ) करिता येत नाही. तिचे अस्तित्व मानावेच लागते. पृथिवी, जल इत्यादि पदार्थाची सतत समान स्थिति होणे,

ह्याच नियतीचा विपर्यास होत नाही, हे ठरविण्यास, योग्य दृष्टांत आहे. जीवन-नियतीचा मरणनियतीच्या योगाने बाध होतो, असे तू ह्मणशील तर त्याचे कारण असे आहे की, जीवन व मरण हे परस्पर विरोधी भाव आहेत त्यामुळे त्यातील एकाचा विपर्यास झाल्यावाचून दुसऱ्याचा उद्भव होऊ शकत नाही पण ज्या पदार्थामध्ये असा प्रतिपक्षभाव नसतो ते सतत एकसारिखे असतात पण एवढावेळ नियतीविषयी जे मी तुला सांगितले ते सुद्धा मायिक दृष्टीने सांगितले आहे. परमार्थ दृष्टीने जग मुळी उत्पन्नच झालेले नसल्यामुळे जे हे सर्व आपल्या अनुभवास येत आहे ते सर्व चिदाकाश आहे व स्वप्नातील स्त्रीसुखाप्रमाणेच ते असत् आहे तेव्हा त्यातील नियतीविषयी किंवा अनियतीविषयी वाद करणे व्यर्थ होय हे असत्य जगच सत्य असल्यासारिखे भासत आहे, असे निश्चयपूर्वक जाणणे हीच स्वरूप प्राप्ति आहे व हाच बोध आहे नियति या शब्दाचा अर्थ जरी पाहिला तरी हीच गोष्ठ सिद्ध होते. कारण सर्गाच्या आरंभी हिरण्यगर्भाच्या माया वृत्तींत जसा भाव उद्भवला तसाच तो अद्यापि अबाधितपणे चालणे यासच नियति ह्मणतात सृष्टीत काही विरोधी भावही आहेत जसे–जन्म(जीवन) व मरण शीत व उष्ण, क्रिया व कारक इत्यादि पण त्यामध्येही विरोधित्वाचा नियम अबाधित आहेच ( सृष्टीच्या आरंभी चिदाकाश केवळ संकल्पाने आकाशादिरूप कसे होते, हे वर सांगितलेच आहे ) तात्पर्य हा सर्व चिदाकाशाचा विवर्त आहे व त्यामुळे जगाचा भास ह्मणजे शुद्ध स्वप्नभासच होय ( या प्रमाणे इतर नियतीची सिद्धि करून जीवननियतिही कर्म, युगभेद व ईश्वरसंकल्प याच्या योगाने निश्चित आहे. त्यामुळे मरणाच्या योगानें जीवननियतीचा भंग होत नाहीं, असे सांगण्याकरिता आता अगोदर कर्मफलाच्या अनुभवाचा क्रम देवी सांगते.–) मरणापर्यंत प्रारब्ध कर्माचे प्राबल्य असतें. ह्या जन्मास व त्यातील सुखदु:खादिकास कारण झालेले जे कर्म ते प्रारब्ध कर्म होय. त्याचा क्षय होताच देहपात होतो. ( ह्मणजे मरण येते. ) त्याचें प्राबल्य असेपर्यंत वर्तमान देहानें केलेली साधारण कर्मे आपले फल देण्यास समर्थ नसतात. कारण प्रबल प्रारब्ध त्याच्या फलास प्रतिबंध करिते. पण मरण येताच प्रारब्धाचा प्रतिबंध रहात नाही व त्यामुळे अनेक जन्मातील संचित कर्मापैकी प्रबळ

कर्मे ( ह्मणजे सतत अभ्यास व दृढ वासना याचा योगाने प्रबल झालेली कर्मे ) आपले फल देण्यास उत्सुक होतात. यास्तव, वत्से, मी तुला मरणानंतर कर्मफलाचा अनुभव कोणत्या क्रमाने येतो ते सांगतें. ह्मणजे तुझे सर्व संदेह नाहींसे होईल व तुझ्या द्वारा इतर लोकानाही या गूढ तत्त्वाचे ज्ञान होइल. त्यामुळे त्याची आस्तिक बुद्धि वाढेल व सर्वांचेंच कल्याण होईल पुष्कळांचे कल्याण होईल, असे कृत्य सर्वदा करीत असावे कृत, त्रेता, द्वापर व कलि या युगामध्ये क्रमाने चारशे, तीनशे, दोनशे व शभर वर्षे पुरुषाचे आयुष्य असावे अशी नियति आदि-सृष्टीत ठरली पण ही आयुर्मर्यादा दुसऱ्या काही निमित्तानी वाढावी किंवा क्षीण व्हावी अशीही एक नियति आहे. कर्मे आयुष्याचे निमित्त आहे, व ती शुद्ध देश, काल, क्रिया व द्रव्य यांच्या योगानें अधिक सामर्थ्ययुक्त होऊन मनुष्याच्या आयुष्यास वाढवितात आणि अशुद्ध देशादिकांच्या योगाने त्यास क्षीण करितात. त्याचप्रमाणे शास्त्रविहित कर्मांचे अनुष्ठान न केल्याने आयुष्य कमी होतें. शास्त्रानें जेवढे सांगितले असेल तेवढेच केल्याने ते प्रत्येक युगाची जी आयुर्मर्यादा सांगितली आहे तितकेच रहाते व शास्त्रानें सांगितलें असेल त्याहून अधिक आस्थेने व श्रद्धेने अधिक अनुष्ठान केले असता आयुष्य युगमर्यादेहूनही अधिक वाढते. शास्त्रविहित कर्मे न करिता शास्त्रनिषिद्ध कर्मे केल्यानेही आयुष्याचा क्षय होतो. शास्त्रोक्त स्वधर्माचरणाने केवळ आयुष्य वाढते इतकेच नव्हे तर त्याचा इतर गोष्टींतही ऐहिक व पारलौकिक उत्कर्ष होतो.

असो, येणेप्रमाणे ज्या प्राण्याचे आयुष्य कर्मानुरोधाने समाप्त होते त्यास अंत्यसमयीं मर्मच्छेदक वेदना होतात. ( मरणाऱ्या प्राण्यास किती असह्य वेदना होत असतात याचा साक्षात् अनुभव त्यास पाहणाऱ्या जवळच्या लोकास येणें शक्य नाहीं. तरी पण त्याच्या धडपडीवरून व इतर चिह्नावरून त्या अति असह्य असाव्यात, असे सहज अनुमान होते ह्मणूनच पुराणात–शरीरातील सर्व नाड्यामध्ये पसरलेली प्राणशक्ति हृदयामध्यें लीन होऊ लागली ह्मणजे सहस्र विंचू चावल्या सारिख्या वेदना होतात–असें सांगितलें आहे.)

**लीला**—जननि, हें मरणकालचे दुःख सर्वांस सारखेच होते कीं, काहीं भाग्यवानांना सुखही होते ? त्याचप्रमाणे मरणानतर सर्वांची एकसारखीच गति होते कीं, योग्याची काहीं विशिष्ट गति आहे ?

**श्रीदेवी**—वत्से, मरणारे पुरुष तीन प्रकारचे असतात. मूर्ख, धारणाभ्यासी व युक्तिमान् असे ते तीन प्रकार होत त्यातील धारणाभ्यासी व युक्तियुक्त पुरुष अनायासाने देहत्याग करून जातो. नाभिकमल, हृदय, कंठ, भ्रूमध्य, व ब्रह्मरध्र यामध्ये काही नियमित कालपर्यंत मन व प्राण याचा निरोध करणारा पुरुष धारणाभ्यासी होय आणि योगाभ्यास करून स्वेच्छेने प्राणवायूस पाहिजे तेथे सचार करावयास लावण्याइतके कौशल्य ज्याने सपादन केले आहे तो युक्तिमान् किंवा युक्तियुक्त. त्यातील धारणाभ्यासी मध्यम साधक असून तो क्रमानें युक्तीचा अभ्यास करीत सुखी होतो व उत्तम युक्तियुक्त, असेल त्या स्थितींत सुख भोगतो. आता ज्याने धारणेचाही अभ्यास केलेला नाही व युक्तीचेही सपादन केले नाही, तो मूर्ख होय त्याचे मन त्याच्या स्वाधीन नसते व त्यामुळे त्यास असह्य दुःख होते त्याची विषयवासना अतिशय दृढ असते. त्यामुळे त्याचे चित्त विषयाकडे जाते परमार्थाकडे त्याचे चित्त लागत नाही. विषयास सोडताना, तोडलेल्या कमलाप्रमाणे, त्याचे मुख म्लान होते व तो दीन होतो. ही झाली सामान्य मूर्खाची गोष्ट शास्त्रनिषिद्ध कर्म करणाराविषयी तर विचारूच नकोस. धगधगीत अग्नीमध्ये पडलेल्या प्राण्याना जसे क्लेश होतात तसे क्लेश त्यास आतल्या आत अनुभवावे लागतात. त्यावेळी अति दुःख झाल्या कारणानें कठ घुर–घर वाजू लागतो, डोळे पाढरे होतात (म्हणजे बुबुळे वर चढून नेत्राचा वर्ण जरा भयप्रद होतो ) मुख निस्तेज होते, अधकाराचा अनुभव येतो; भलभलतेच आकार डोळ्यापुढे दिसू लागतात, मर्मच्छेद होऊ लागतो; सर्व भुवन गरगर फिरत आहे, असा भ्रम होतो, नानाप्रकारचे भय वाटू लागते; वाणी बद झाल्यामुळे मनातील अभिप्राय कोणास सागता येत नाहीं; तोंडे वेडी वाकडी करून, डोळे फिरवून, हातपाय ताठवून व वेगाने झाडून, फेस, लाळ इत्यादिकास तोंडाबाहेर काढून व अशाच अनेक प्रकारानी तो मरणोन्मुख मूर्ख जवळच्या आप्त-इष्टास संसार किति कष्टकर आहे हे प्रत्यक्ष दाखवीत असतो. शेवटी तो मूर्च्छित होऊ लागतो

नेत्रादि इंद्रियाचा मनामध्ये लय होऊ लागणे, हाच अत्यकाळच्या मूर्च्छेचा आरभ होय. मरण ही एक महानिद्राच असल्या कारणाने निद्रासमयी इंद्रियवृत्ती जशा लीन होऊ लागतात तशाच त्या मरणसमयीही मनात लय पावू लागतात त्यावेळी नेत्रादि गोलक शून्य होतात. सूर्य अस्त पावू लागला असता किरण जसे चोहोकडून एकाच काळी नाहीसे होऊ लागतात त्याप्रमाणेच जीव-सूर्याचा अस्त होऊ लागला की, त्याचे शक्तिरूपी किरणही क्षय पावतात नतर त्याची स्मृति अगदी शिथिल होते. जवळचे लोक "मला ओळखलेस का ? मी कोण" इत्यादि विचारतात; पण तो कोणालाही ओळखीत नाही व ते काय ह्मणतात हेही जाणत नाही पुढे पूर्णपणे मोहित झाल्यामुळे त्याच्या मनाची कल्पनाशक्ति क्षय पावते. त्या अविवेकामुळे तो महामोहात निमग्न होतो. श्वासोच्छ्वास करण्याचीही त्यास शक्ति रहात नाही. मोह, विषयवासना व भ्रम ( भलभलते भास ) ही तिन्ही ऐकमेकामुळे पुष्ट होऊन शेवटी प्राणी पाषाणासारिखा निश्चेष्ट होतो ( त्याचा जड देह, त्यातील चालक व ज्ञान-क्रियाशक्तिमान् जीव प्राणवायूच्या द्वारा निघून गेला ह्मणजे, आपल्या स्वाभाविक जडतेस प्राप्त होतो. अर्थात् देहाची क्रिया औपाधिक असून त्याचा प्रवर्तक, रथ-प्रवर्तकाप्रमाणे, त्याहून निराळा आहे. ) लीले हा क्रम आदिसर्गापासून असाच चालला आहे.

**प्रबुद्ध लीला**—देवि, हा देह मस्तक, दोन हात, दोन पाय, गुह्य, नाभि व हृदय या आठ अगानीं युक्त असताना तू आता सांगितल्याप्रमाणे तो व्यथा, मोह, महामोह, भ्रम व जडता यास का प्राप्त होतो ?

**श्रीदेवी**—लीले, क्रियाशक्तिप्रधान ईश्वराने " जीवाहून भिन्न नसलेल्या मीं बाल्य, यौवन, वार्द्धक्य, इत्यादि समयी इतके दिवस, अमुक दुःख, अमुक शरीराने भोगावे " असा सकल्प करून ठेविलेला असतो त्यामुळें त्यास आपल्याच सकल्पापासून उत्पन्न झालेल्या चित्ताच्या द्वारा चित्तसकल्पमय दुःख, शरीररूपी उपाधींत जीवभावाने शिरून, भोगावें लागते. ( अर्थात् व्यथा, मोह, इत्यादि भाव देहास अनुभवावे लागत नाहींत, तर ते त्यातील मिथ्या सकल्पामुळे जीवभावास प्राप्त झालेल्या चैतन्यासच पूर्व कर्मानुरूप भोगावे लागतात. ) असो, वर सांगितल्याप्रमाणे असह्य

व्यथा झाल्या असता शरीरातील नाड्या अन्नपानादि रस सम प्रमाणाने घेत नाहीत. कारण त्या अतिशय तापलेल्या पित्तादि रसांनीं भरून जातात. त्यामुळे व्यथा असह्य होते व त्या कारणाने प्राणी आपले शरीर पिळगटून टाकू लागला असता काही नाड्या अगदी संकुचित होतात व काही फाटून जातात त्यामुळे समान वायुही अन्न–पानादिकास सर्व शरीरांत सम–प्रमाणाने पोचविण्यास असमर्थ होतो नंतर नाडीद्वारामध्ये शिरलेला वायु बाहेर पडत नाही व बाहेरचा वायु आंत जात नाही. अशी अवस्था झाली ह्मणजे नाड्याचा सर्व व्यापार बंद पडतो. त्यामुळे इंद्रियाच्या क्रियाही होत नाहीत व शेवटीं आतल्या आंत कृतकर्माचे स्मरण होणे मात्र अवशिष्ट रहाते नाड्याचा व्यापार खुंटणे ह्मणजे प्राणाच्या संचारास प्रतिबंध होणेच होय व प्राणनिरोधच मरणाचे निमित्त आहे. ( अर्थात् नाड्या बंद होऊन प्राणाचा निरोध झाला ह्मणजे हा मेला, असें ह्मणतात. कारण अपानवायूने आंत शिरणे व प्राणवायूने निःश्वासद्वारा बाहेर पडणे, यावर लिंगशरीराची स्थिति अवलंबून असते. पण त्याची गति कुंठित झाली ह्मणजे सूक्ष्म शरीरास त्याची इच्छा नसली तरी, स्थूल देहास सोडावेंच लागते ) पण त्याचेही कारण प्राक्तन चित्संकल्परूप नियतिच आहे ह्मणजे मला इतक्या कालाने मृत्यु यावा अशी जी त्याला पूर्वी संकल्पमय संवित् झाली होती तिचेच हे त्यास फळ मिळते. आता या नियतीचा काही कारणानें भंग झाल्यास जगाची व्यवस्था बिघडण्याचा संभव आहे, असे कदाचित तुला वाटेल पण ते व्यर्थ आहे कारण "मी असे असे व्हावे" अशी आदिसर्गामध्ये उत्पन्न झालेली जी संवत् ती सत्य असल्याकारणाने तिच्या संस्काराने युक्त असलेली माया कोणत्याही काली नाहीशी होत नाहीं ( जेव्हा मुक्ति होते तेव्हा कालासह तिचा क्षय होत असल्यामुळें, काल असेपर्यंत तिचा क्षय होत नाही, असा याचा भावार्थ समजावा. ) अविद्यायुक्त जीवाच्या संवित्चे पर्यालोचन केले असताही मोक्षापर्यंत जन्ममरणाची निवृत्ति होणे शक्य नाहीं, असें समजतें. संवेदन हा जीवाचा नित्य स्वभाव आहे. त्यामुळे जीवस्वभावभूत संवित्तीहून जन्म–मरण भिन्न नाहीत. नदीचे जल जसे दूरवर पसरलेले असून कोठे कोठे तें स्थ व निर्मल असते आणि कोठें कोठे क्षुब्ध ( तरंगमय ) व मलिन असतें त्याप्रमाणे हें चेतन केव्हा केव्हां सौम्य

असतें व कधीं कधी राग—द्वेषादि—जीवधर्मांनी मलिन होते. दूर्वा, जाई, कुंद इत्यादिकांच्या वेलास जसे मध्ये मध्ये फाटे फुटलेले असतात व थोड-थोड्या अंतराने दुसऱ्या शाखाही फुटतात त्याप्रमाणे चेतनसत्तेस अनेक जन्म व मरण या शाखा फुटतात. पण हे सर्व अविद्या दृष्टीने खरे आहे. परमार्थ दृष्टीने पाहिल्यास चेतन पुरुष कधीही उत्पन्न होत नाही व मर-तही नाही. तर स्वप्नभ्रमाप्रमाणें हा केवळ भ्रम आहे, असे अनुभवास येतें. तो मरणधर्मी नाहीं, हा सिद्धांत युक्तीनेही सिद्ध करिता येतो. तो कसा ह्मणून विचारशील तर सांगत्यें. सर्व प्राण्यामध्ये चेतन व जड असे दोन भाग आढळतात. तेव्हा त्यांतील पुरुष कोण? चेतन—व्यतिरिक्त पुरुष आहे, असे ह्मटल्यास देह, इंद्रिये, मन, बुद्धि, अहंकार, चित्त, त्यांच्या अधिष्ठात्री देवता, व अविद्या हीं सर्व चेतनभिन्न असल्यामुळे त्यांतील कोणाला पुरुष ह्मणावयाचे तें समजले पाहिजे. पण कोणालाही जरी पुरुष मानिले तरी तीं सर्व जड असल्यामुळे त्यांचा व्यवहार स्वतंत्रपणे होत नाही तर त्यांना नेहमीं चेतनाच्या आश्रयानेच सर्व व्यवहार करावा लागतो. तेव्हा असत्या परप्रकाश पदार्थांतील कोणालाही पुरुष ह्मणता येत नाहीं. यास्तव अवशिष्ट राहिलेल्या प्राण्याच्या चेतनामात्र भागासच पुरुष ह्मणावे लागते. पण पुरुष चेतन आहे, असे ह्मटल्यावर तो केव्हा व कोठे नाश पावतो ते सांगितले पाहिजे. त्यावाचून त्याचा नाश सिद्ध होत नाही. त्याचा नाश पाहणारा कोणी तरी पाहिजे. पाहणाराच जर नाहीं तर कोणत्याही क्रियेची अथवा विकाराची सिद्धि होत नाही, हें सर्वांस ठाऊकच आहे. कारण एकादे काही झाले. पण त्याला कोणी पाहिलेच नाहीं तर त्याचे होणे काय कामाचे? ते झाले असे कशावरून ठरणार? समजा की, आकाशातून एक फळ पडले, किंवा एक मोठा ध्वनि झाला पण त्याला कोणी पाहिलें किंवा ऐकिले नाहीं तर त्या फळाची अथवा ध्वनीची सिद्धि होईल काय? नाहीं त्याचप्रमाणे चेतन पुरुष मरतो, असे ह्मटल्यास त्याचे मरण कोणी पाहिले, हे सांगितले पाहिजे. पण या अनादि संसारात आजपर्यंत कोणीही ते पाहिलेले नाहीं व जरी त्याचा नाश झाला तरी चेतनाच्या नाशानंतर सर्वच जड रहात अस-ल्यामुळे तो अनुभवास येणे शक्य नाही. शिवाय मरण ह्मणजे काय हेंही एकदा स्पष्ट कळले पाहिजे. मरण ह्मणजे विनाश की, एक देह

सोडून दुसरा घेणे ? मरण ह्मणजे विनाश, असे ह्मटल्यास पुरुषाचा विनाश पुरुषच स्वत करितो कीं, दुसऱ्या काहीं निमित्ताने त्याचा विनाश होतो ? तो स्वत:च आपल्या विनाशाचे निमित्त होतो, असे ह्मणणे युक्त नव्हे. कारण कोणीही आपला आपणच नाश करून घेणार नाही व त्याचें निमित्तही होणार नाहीं. कारण आपल्याशीच आपण विरोध करणें, हे युक्तिशून्य आहे. बरे दुसऱ्या काहीं निमित्तानें त्याचा विनाश होतो, ह्मणून ह्मणावे तर आकाशाप्रमाणे निरवयव असल्यामुळे असग चेतनाचा परत: विनाशही सभवत नाहीं. कारण असग वस्तूचा ससर्ग दुसऱ्या कोणाशींही होत नसतो. यास्तव मरण ह्मणजे दुसऱ्या देहाची प्राप्ति असेच समजलें पाहिजे. पण लक्षावधि शरीरें मेलीं तरी चेतन जसेंच्या तसेच स्थित असते. तेव्हा चेतनास मरण नाहीं, ते देहासच आहे, असें ह्मटल्यावाचून गत्यतर नाही. शिवाय चेतन मरते, असे मानिल्यास आणखी एक मोठा दोष येतो तो कोणता ह्मणून ह्मणशील तर सागत्यें. प्रत्येक शरीरात असलेले चैतन्य भिन्न भिन्न आहे, असे समजण्यास काहीएक प्रमाण नाही कारण सर्व ठिकाणी जडवर्गास प्रकाशित करणे या एकच स्वरूपानें त्याचे भान होत असते व ते निराकार आहे तेव्हा एकाच प्रकारच्या निराकार वस्तूस भिन्न कसे ह्मणता येईल ? भिन्न भिन्न आकाराप्रमाणे भिन्न भिन्न नावावरूनही वस्तूचा भेद सिद्ध होत असतो. पण सर्व शरीरातील या प्रकाशक शक्तीस चेतन पुरुष हे एकच नाव आहे. परमात्मा, ब्रह्म, कूटस्थ, अतर्यामी, प्रत्यक्, साक्षी, इत्यादि त्याचेच पर्याय शब्द आहेत. अर्थात् चेतन प्रतिशरीरात निरनिराळें आहे, असें समजणे प्रमाणसिद्ध नाहीं. " एकच देव सर्व भूताच्या बुद्धींत गूढ आहे " असे श्रुतिही सागते. तेव्हा एकच असलेले चेतन मेल्यास त्याच्याच अधीन ज्याची सत्ता व स्फूर्ति आहे, तें समष्टि–व्यष्टिचित्तही मरणार नाहीं का ? व तें मेल्यावर उपादानरहित जगाचें अस्तित्वच अशक्य असल्यामुळे एका चेतनाच्या मरणानें सर्व भाव पदार्थ मेल्यासारिखे नाहीं का होणार ? अर्थात् चेतन मरतें असें ह्मटल्यास एकाच्या मरणाने सर्वांचे मरण हा दोष येतो. तर मग हे प्रत्यहीं अनुभवास येणारे जन्म–मरणभाव ह्मणजे काय ? तें आतां सागतें. जन्म–मरण ह्मणजे केवळ वासना–वैचित्र्य आहे. व्यवहारात

अनेक वासनाना जशी अनेक नावे कल्पिलेलीं आहेत तशींच जन्म व मरण हीं दोन नावें कल्पित आहेत. . एव च कोणी जन्मास येत नाहीं व कोणी मरत नाहीं. तर वासनापरपरेच्या गर्तेमध्यें ( खड्यात ) जीव केवळ लोळत आहे. यास्तव दृश्याचा असभव आहे व त्यामुळें त्या विषयींची ही वासनाही मिथ्या आहे. हा विचार दीर्घकाल अभ्यासानें दृढ झाला असता अतःकरणाचा क्षय होतो आणि त्याचा क्षय होणे हाच परम पुरुषार्थ आहे.

असो, हे लीले, ससारातील मरणासारिख्या या असंख्य भयांविषयीं चागला विचार केल्यावर वैराग्यादिकाचा प्रादुर्भाव होतो. नंतर त्या साधनानीं सपन्न झालेला अधिकारी जीव गुरुमुखाने श्रवणादि अंतरग साधनाचा दीर्घकाल सतत अभ्यास करितो. त्यामुळे भ्रातीने भासणारें हें जग परमार्थतः अनुत्पन्नच ( म्हणजे उत्पन्न न झालेलेच ) आहे, असें तो यथार्थ तत्त्वदृष्टया पाहतो. नतर या तत्त्वविवेकामुळे मूळ अज्ञानाचा उच्छेद होऊन त्याची द्वैतवासना अत्यत नष्ट होते आणि त्यामुळे तो धन्य पुरुष मुक्त होतो. लीले, विमुक्त आत्म्याचे स्वरूप हीच सत्य वस्तु आहे. त्यावाचून दुसरे काहींएक सत्य नाहीं. ५४.

**सर्ग—५५.** या सर्गात जीवाच्या ससारगतीचें वैचित्र्य व ईश्वराची त्याच्या कर्मानुरूप आदि सर्गापासून स्थिति त्याचें वर्णन केलें आहे

**प्रबुद्ध लीला**—हे देवेशि, प्राणी कसा मरतो व पुन: कसा जन्मास येतो, ते तू सक्षेपत सागितलेस. पण तेच पुनरपि विस्तारपूर्वक साग. कारण त्याच्या श्रवणाने दृढ वैराग्य उत्पन्न होऊन त्याच्या योगाने बोधाचीही वृद्धि होईल.

**श्रीदेवी**—बाळे, तुझ्या व तुजसारख्या इतर भक्ताच्या इच्छेप्रमाणें वागण्याचा माझा स्वभावच आहे यास्तव मीं तुला पुनः वर सागितलेलेंच तत्त्व विस्तारानें सागतें. लीले वर म्हटल्याप्रमाणे नाडी–प्रवाह बद होऊन वायूची विसस्थिति झाली असता म्हणजे त्याची स्वाभाविक चलन स्थिति प्रतिबद्ध झाली असतां चेतनेस व्यक्त करणारी अत करणोपाधि विलीन होते. व तिच्या विलयामुळें चेतनाही शात होते, असे वाटते. पण वस्तुतः ती कधीं उत्पन्न होत नाहीं व शातही होत नाहीं. कारण शुद्ध चैतन्य नित्य आहे. रात्रीं एकाद्या भाड्यांत स्वच्छ पाणी घालून ते उघड्या जागीं ठेविल्यास

व आकाशही स्वच्छ असल्यास त्यात वरील चांदण्या, चंद्र इत्यादि दिसतात. पण ती त्याची उत्पत्ति झाली, असे कोणी ह्मणत किंवा समजत नाहीं. तसेंच ते पाणी ओतून टाकिले असता भाड्यात चांदण्या वगैरे दिसेनातशा होतात पण त्याचा नाश झाला, असेही कोणी शहाणा ह्मणत नाहीं. त्याचप्रमाणे अंत:करण व्यंजक आहे. ते दृष्टांतातील पाण्याप्रमाणे चैतन्यास व्यक्त करीत असते व त्याचा लय झाला असता, व्यंजकाच्या अभावीं व्यंग्याचाही अभाव होतो, या न्यायाने, किंवा दृष्टांतातील नक्षत्राप्रमाणे, व्यक्त होत नाही. पण त्यामुळे त्याचा नाश झाला, असें ह्मणता येत नाही. असो, हे शुद्ध व नित्य चेतन आकाश, पर्वत, अग्नि, वायु, वृक्ष, इत्यादि सर्व स्थावर व जंगम पदार्थांत व्यापून असते. जेथे अंत:करण असतें तेथे ते व्यक्त होते. जेथे ते नसते तेथे ते व्यक्त होत नाही तसेंच अंत:करण जसे मलिन, अतिमलिन, शुद्ध, अतिशुद्ध, स्थिर, चंचल इत्यादि प्रकारचे असेल तसे ते त्यात व्यक्त होते. त्यामुळे वायूचा निरोध होऊन ( प्राण व अपान याची गति कुंठित होऊन ) त्याचे स्पंदन जेव्हा थांबते तेव्हा, हा अमुक मरण पावला, असे ह्मणतात अर्थात् मरण हा देहधर्म आहे, आत्म्याचा धर्म नव्हे. त्यानंतर शरीर जड होते. येणेप्रमाणे देह शव झाले असता, शरीरातील वायु आपल्या कारणामध्ये ह्मणजे महावायूमध्ये जाऊन मिळाला असता व प्राण प्राज्ञात्म्यामध्ये लीन झाला असता अंत:करण–उपाधीचा नाश झाल्याकारणाने जीवही वासनासह परमात्म–तत्त्वामध्ये रहातो आता तू ह्मणशील की, परमात्म्यामध्ये राहिल्याकारणाने तो मुक्तच झाला पण तसे नाही कारण पुनर्जन्मास कारण होणारी बीजभूत वासना रहाते. त्या वासनेने मर्यादित झालेला ह्मणजे मुख्य शुद्ध चैतन्याहून निराळा राहिलेला चैतन्याचा अतिसूक्ष्म भागच जीव होय. अर्थात् वासनायुक्त चेतनांश हाच जीव असून जीव ह्मणून कोणी ब्रह्माहून भिन्न तत्त्व नाही ( त्यामुळेच त्याला स्वस्थानी असतानाच वासनावशात् परलोकगमनादि अध्यास ( भ्रम ) होतो. त्याला वास्तविक गमनादि नाही, या अभिप्रायाने देवी आता पूर्वोक्त मंडपाकाशन्यायाचे स्मरण देते. ) यास्तव तो शवगृहातील आकाशातच असतो. देह मेल्यामुळे व्यवहारी लोक त्या प्राण्यास प्रेत ह्मणतात. आता तू विचारशील कीं, असंग चेतनामध्ये वासना कशी रहाते, तर त्याचे उत्तर सांगते. फुलझाडापासून

दूर काहीं अतरावर बसलें असता वाऱ्याच्या झुळुकीबरोबर सुवासिक पुष्पाचा वास येतो, हे प्रायः सर्वास ठाऊक आहे. पण तो कसा येतो? पुष्पाच्या अतिसूक्ष्म रेणूमध्यें वास असतो व वायूचा त्याच्याशीं तादात्म्य-ससर्गाध्यास झाल्याकारणाने वायु आमोदमिश्र होऊन रहातो व त्यामुळें वायू-बरोबर वास येतो. त्याचप्रमाणें चैतन्य वासनामिश्र होऊन रहाते. (ह्मणजे मूळ अविद्येच्या योगानें वासना व चैतन्य याचा अनिर्वचनीय तादात्म्या-ध्यास होऊन त्याचें मिश्रण होतें.) हे प्राक्तन (पूर्वीचें) देहादि दृश्य सोडून दुसरा देह इत्यादिकाच्या दर्शनामध्ये जेव्हा जीव गुततो तेव्हा तो स्वप्नाप्रमाणें स्वत च स्ववासनामय गमन, परलोक, तेथील भोग्य पदार्थ इत्यादि नाना आकाराचा होतो. त्याला त्याच प्रदेशीं पूर्व जन्माप्रमाणे स्मृति होते व मरणमूर्च्छेच्या नतर तेव्हाच त्यास अन्य शरीर दिसते.

**लीला**—देवि, अतिअल्प मरण–प्रदेशीं दुसऱ्या देहाची कल्पना होणे जरी सभवत असले तरी तेथे दूर गमन, विस्तृत परलोक इत्यादिकाची स्थिति कशी होईल? (त्या स्वल्पप्रदेशात त्या विस्तृताचा समावेश कसा होईल?)

**श्रीदेवी**—लीले, केवल आकाश, किंवा आकाश व भूतल अथवा चद्र, सूर्य, आकाश इत्यादिकासह कोट्यवधि ब्रह्माडे आत्म्यामध्यें जरी एकदांच शिरली तरी त्यात दुसऱ्या सर्व प्रपचाचा अतर्भाव होऊ शकतो. कारण आत्मा अनत आहे ^ मायेमध्ये अघटित घटना करण्याचे सामर्थ्य आहे. यास्तव आत्म्याच्या स्वरूपाचे पर्यालोचन करून ह्मणजे आत्म-स्वरूपाकडे दृष्टि देऊन, अल्पप्रदेशात दुसऱ्या जगाचा अतर्भाव होतो, असे वर ह्मटले आहे. केवल त्या प्रदेशाकडे दृष्टि देऊन ह्मटलेले नाहीं. आता तू ह्मणशील की, त्या अल्पप्रदेशात मार्ग, परलोक इत्यादि जर आहे तर दुसऱ्या कोणास याचा अनुभव का येत नाहीं? त्याचे उत्तर सागते. आकाश व भूतल आणि हे सर्व जग मृत पुरुषाच्या आत्म्यात, मेघसमूहा-प्रमाणे, पुष्ट आहे पण दुसऱ्याच्या दृष्टीने ते केवल आकाशच आहे यास्तव ते कोणास दिसत नाही. (आता मृतप्राण्याचे मार्ग भिन्न भिन्न असतात, हे सागण्याकरिता प्रेताचे प्रकार सागते.—) लीले, सामान्यपापी, मध्यम पापी, स्थूल पापी, सामान्य धार्मिक, मध्यम धार्मिक व उत्तम धार्मिक असे सहा प्रकारचे प्रेत (मृत प्राणी) असतात. त्यातील काहीं केवल

पापी तर जन्मभर पापीच राहिलेले असतात. काहीं प्रथम पापी असले तरी पुढें पाप कमी करून थोडेसे पुण्यवान् होतात. ह्मणजे मध्यम पापी होतात व कोणी तर पहिल्यापेक्षा अधिक पापी होतात. यास्तव मी आता अगोदर अति पाप्याची गति सागते. महापातकी प्रेत एक वर्षभर विमूढ अवस्थेंत राहून मरणमूर्च्छेचा अनुभव घेतो. पाषाणाच्या मध्यभागाप्रमाणें त्याचे हृदय आतल्या आत शून्य असते. त्यानतर तो सावध होऊन वासनेमध्ये उद्भवलेलें अक्षय नरकातील दुःख दीर्घ काल भोगतो. नाना प्रकारच्या क्षुद्र व दु.खदायक योनींत जन्म घेऊन एका दु.खातून दुसऱ्या दु.खात, दुसऱ्यातून तिसऱ्यात अशा क्रमाने तो असख्य दुःखाचा उपभोग घेतो व अशा रीतीने सतत क्लेश भोगून शेवटी एकदा तो त्यातून मुक्त होतो. किंवा मरणमोहाच्या शेवटीं एका क्षणात तो वृक्षादि भावास प्राप्त होऊन शेकडो दु खे भोगतो, असें वाटते. पुढें तो पापी आपल्या वासनेप्रमाणें नरकयातनाचा अनुभव घेतो व शेवटीं अनेक योनींमध्ये फिरता फिरता दीर्घकालानें भूलोकीं उत्पन्न होतो. आता जो मध्यम पापी असतो तो मरणमूर्च्छेनतर थोडा वेळ पाषाणासारखें जाड्य अनुभवितो व काहीं कालाने अथवा तात्काल सज्ञान होऊन पक्षी, पशु इत्यादि योनींतून फिरत फिरत मानव योनींत येतो. सामान्य पातकी जो असतो तो मरताक्षणीच स्वप्नाप्रमाणे किंवा सकल्पाप्रमाणें स्ववासनानुरूप मनुष्यशरीर प्राप्त झाले आहे, असे पाहतो. ह्मणजे वर सागितल्याप्रमाणे त्यास तात्काल स्मृति होते. आता पूर्वोक्त सहा प्रकारातील सहाव्या प्रकारच्या उत्तम धार्मिकाची गति सागते. महा पुण्यवान् पुरुष मरण पावताच. पुण्यवासना उद्भूत झाल्यामुळे, तात्काल स्वर्गातील विद्याधराच्या नगराचा अनुभव घेतात. तेथें त्याना त्याच्या महापुण्याचे सुखमय फल मिळते. त्याचा उपभोग घेतल्यानतर अवशिष्ट राहिलेल्या पुण्यपापाप्रमाणे ते इलावृत्त, किंपुरुषवर्ष इत्यादि स्थानीं जन्म घेतात व शेवटीं पुनरपि अति सपन्न व गुणशील मनुष्याच्या कुलात त्याचा उद्भव होतो. जे मध्यम पुण्यवान् असतात ते मरणमोहानतर आकाशवायुयुक्त होत्साते ओषधि व पल्लव याचें ज्यामध्ये प्राधान्य आहे अशा नदनवन, कुबेराचे चैत्ररथवन इत्यादि वनात किन्नर, यक्ष, इत्यादिकाच्या शरीराने जातात. तेथे आपल्या पुण्यकर्माचें रमणीय फल भो-

गून वायु, वृष्टि इत्यादिकांच्या द्वारा भूमीवर येऊन व्रीही, यव, इत्यादिरूप होतात. नतर ज्या कुलात स्वकर्मानुरूप जन्म घ्यावयाचा असेल त्यातील पुरुषाच्या शरीरात अन्नरूपाने प्रवेश करून रेतोरूप होऊन रहातात पुढे आईबापाच्या ग्राम्य धर्माने मातेच्या उदरात जाऊन तेथे सशरीरी होतात. चवथ्या प्रकारच्या सामान्य पुण्यवानाचीही प्रायः अशीच, पण किंचित् न्यून प्रमाणानें सुखरूप गति होते. साराश मृत पुरुष मरणमूर्च्छेनतर क्रमानें किंवा अक्रमाने ( क्रमाची अपेक्षा न करिता एकदम ) आपल्या वासने-प्रमाणे या अवस्थाचा अनुभव घेतात. ( आता मरणापुढे ते कोणत्या क्रमानें आरोप करितात तें विशेषण देऊन देवी दाखविते. ) प्रथमत आह्मी मेलों, असे त्यास वाटते. नतर क्रमाने पुत्रादि अधिकारी पुरुषानी बारा दिवसापर्यंत पिंडदानादि क्रिया केली असता आह्मी आता शरीरयुक्त झालों आहो, असे ते समजतात. नतर पुत्रादिकानी तेराव्या दिवशी केलेल्या पाथेय श्राद्धाने तृप्त होऊन आता आह्मी यमपुरास जात आहो. कालपाशानीं युक्त असलेले यमदूत आह्मास नेत आहेत, असे त्यास वाटते. त्यात जे उत्तम पुण्यवान् असतात त्यास जाताना मार्गात स्वकर्मोपात्त उत्तमोत्तम विमानें, उद्यानें इत्यादि आनददायी वस्तु प्राप्त होतात व जे पापी असतात त्यास अति असह्य थडीने युक्त असलेले प्रदेश, काटे, खळगे, शस्त्रासारख्या तीक्ष्ण पानानीं युक्त असलेल्या वृक्षाचीं अरण्ये इत्यादि स्वकर्मानुरूप प्राप्त होतात व त्यातून पुढे जाताना त्यास अतिशय दु ख सहन करावे लागते. जो मध्यम पुण्यवान् असतो त्यास " हा माझा मार्ग सुखावह आहे; याच्या दोन्ही बाजूस हिरवे गवत उगवलें आहे, मध्ये शीतल छाया आहे, ठिकठिकाणीं सुदर जलाशय आहेत " इत्यादि सामान्य सुखदायक वस्तू आढळतात. मी आता यमपुरास आलों आहे. हा तो सर्वलोकास ठाऊक असलेला येथील यमराज होय. याच्यापुढे माझ्या कर्माचा विचार होत आहे, इत्यादि त्यास अनुभव येतो. पण हा आरो-पाचा क्रम सर्वांचा एकसारखाच नसतो. कारण प्रत्येकाचें कर्म भिन्न भिन्न असल्यामुळें कर्माप्रमाणे होणारा तो आरोपही भिन्न भिन्न प्रकारचा होतो. प्रत्येकाचें स्वप्न जसे निरनिराळें तसाच प्रत्येकाचा हा भासुर आरोप—क्रमही निराळा. पण स्वरूपदृष्ट्या पाहिल्यास आत्म्याहून भिन्न कांहीं नाहीं, असे अनुभवास येते. असो; नतर—आतां यमानें मला

या अमुक दिशेत अमुक स्थळीं जाऊन आपल्या कर्माचा फलभोग घेण्याची आज्ञा केली आहे. यास्तव आतां मी सत्वर स्वर्गास किंवा नरकास जातो, असा त्यास भास होतो. पुढें—यमानें कर्माप्रमाणें नेमून दिलेल्या स्वर्गात किंवा नरकात मी हे उत्तम सुख अथवा असह्य नरकयातना आजपर्यंत भोगिल्या. पशु, पक्षी इत्यादिकाच्या योनीतही जन्म घेतले. आता मी मनुष्य—संसारात पुनः उत्पन्न होतो. असा संकल्प करून ते मृत पुरुष वायु, वृष्टि इत्यादिकांच्या द्वारा भूलोकीं येतात. नंतर स्वकर्माप्रमाणेच त्यातील काही शालींचे, काहीं गव्हांचे, काहीं जोंधळ्याचे, काही बाजरींचे, कित्येक मुगाचे, काही चण्याचे इत्यादि अंकुर होतात. काही कालाने त्या अंकुरांचींच चांगलीं जून झाडे होऊन ते फलरूप बनतात. पण त्या वेळी त्यास आह्मी अमुक यावेळीं अमुक अंकुररूप अथवा अमुक फलरूप झालो आहों, असे भान होत नाही. कारण त्यावेळी ते जडरूप असतात. त्याचीं इंद्रिये त्यावेळीं सुप्तावस्थेत असल्यासारखी असतात. पण पुढे योग्य अधिकारी पुरुष होऊन ते जेव्हा शास्त्रादिकाचे अवलोकन करितात तेव्हा त्यास आह्मीही या शरीरात येण्यापूर्वी व्रीहि-यवरूप होतो, असें भान होते. असो, येणेप्रमाणे ते बीजरूप होऊन पित्याच्या शरीरात, वर सांगितल्याप्रमाणे, अन्नरूपानें प्रवेश करितात तेथें पुरुषाच्या वीर्यभावास प्राप्त होऊन ते जड अवस्थेंतच मातेच्या गर्भाशयात प्रवेश करितात. तेथे त्याच्या शरीरास आरंभ होतो. पूर्व कर्माप्रमाणे त्याची तीं शरीरे चांगलीं किंवा वाईट बनतात. कारण सुख, दुःख, सौभाग्य, दुर्भाग्य आरोग्य, रोगिता, सद्वृत्त, दुर्वृत्त इत्यादि सर्व प्राक्तन कर्मावर अवलंबून असते असो, पुढे त्यातील प्रत्येकाचें ते शरीर मोठ्या कष्टाने मातेच्या संकुचित व अमंगल स्थानातून बाहेर पडल्यावर तो रमणीय आकाराच्या बालपणाचा अनुभव घेतो पुढें त्यास चंचल व सुंदर यौवन प्राप्त होते. त्या अवस्थेत तो मदनातुर होऊन अविवेकाने अनेक निषिद्ध व्यापार करितो. लीले, तारुण्याचा मद ज्यास विवेकभ्रष्ट करीत नाहीं, असा भाग्यवान् एकादाच. असो, पण ती अवस्था तरी स्थिर रहाते का ? नाही थोड्याच दिवसानी विषयसेवनादि अहित आचरणामुळे व कालमानाप्रमाणे जरा त्याची मुखशोभा घालविते. जरेने शरीर खिळखिळे झाले कीं, व्याधींना त्यात यथेच्छ संचार करण्यास मोकळीक झालीच. व्याधीच्या योगानें जन्मास

कटाळलेला तो जीव शेवटीं शरीरत्याग करितो. पुन त्यांस स्वप्नाप्रमाणे पुत्रादिकानीं द्वादशाहात क्रिया केल्यावर शरीर प्राप्त होते पुन तो कर्मानुरूप सुखदुःखादिकाचा अनुभव घेत यमपुरास जातो तेथे चित्रगुप्ताच्या हिशोबाप्रमाणे कृतकर्माचा झाडा देतो. यमराजाच्या आज्ञेप्रमाणे पुन स्वर्गात किंवा नरकात जातो. दीर्घकालाने त्यातून सुटल्यावर पुन. नानाप्रकारच्या हीन योनींत जन्म घेतो व शेवटी मोठ्या कष्टाने पुन मनुष्ययोनींत येतो. साराश मोक्ष होईतो प्राण्यास अशा या भयकर चक्रात पडावे लागतें व एका आत्मज्ञानावाचून त्याची त्यातून कधींही मुक्ति होत नाही. जनन व मरण पुन जनन, व पुन मरण याचा प्रवाह एकसारखा चालतो.

**प्र. लीला**—देवि, महावाक्यातील 'त्व' या पदाचा अर्थ जो जीव त्यास भ्राति होण्याचा सभव असल्यामुळे त्याच्या अध्यारोपाचा हा तू सागितलेला क्रम ठीक आहे. पण 'तत्' पदार्थ जो ईश्वर ( हिरण्यगर्भ ) त्याच्या ठायीं भ्रातीचा सभवच नसल्यामुळें तो स्वत च्या स्वरूपावर जगाचा आरोप कसा करितो ? तें मला साग. माझा बोध वाढावा ह्मणून मी असे विचारीत आहें.

**श्रीदेवी**—मुलि, ईश्वर जीवाप्रमाणे भ्रातीनें जगाचा अध्यारोप करीत नाहीं. तर स्वतः परमार्थघन असतानाच त्याच्या मायेने आरोपित रूपाने विवर्त होतो. अज्ञानानें आच्छादित न झालेल्या स्वचैतन्याच्या द्वारा अध्यस्त जगाचें भान होणें ( त्याचा अनुभव घेणे ) हा भ्रम नव्हे तर असत्य वस्तु सत्य आहे, असा प्रतिभास होणे हा भ्रम आहे. ईश्वर सर्वदा सर्वज्ञ असल्यामुळे त्यास सर्व वस्तूचे भान होतें. पण तो त्यामुळे स्वरूपापासून च्युत होत नाही व त्यामुळे भासणारे हें जग सत्य आहे, असा त्यास भ्रमही होत नाहीं. लीले, शैल, वृक्ष, पृथ्वी, आकाश इत्यादि सर्व परमार्थघन आहे. कारण तो ईश्वर सर्वात्मक असल्याकारणाने जेथें जसा विवर्त पावतो तेथे तो परमाकाशतुल्य शुद्धात्मा तसाच झाला आहे, असें आह्मास भासतें. तो ईश्वरच स्वप्नाची कल्पना करणाऱ्या पुरुषाप्रमाणें जीवसमष्टिरूप आद्य प्रजापति होऊन–उत्पन्न करावयाच्या वस्तूविषयीं सकल्प करणें–या रूपानें जसा भूर्लोक, भुवर्लोक, इत्यादि आकारानें विवर्त पावतो तशाच प्रकारची स्थिति कल्पपर्यंत राहते.

त्याचा सत्यसंकल्पच जगाच्या स्थितीचे कारण आहे. त्यामुळें त्याच्या संकल्पाच्या सत्तेनेच जगाची सत्ता बनली आहे. त्या आद्य प्रजापतीचा पहिला सांकल्पिक परिस्पंद ( विवर्त ) हे पदार्थाचें बिंब आहे व त्याचें हे प्रतिबिंबच अद्यापि स्थित आहे आता या पदार्थामध्यें स्थावर—जंगम भेद कसा होतो, तें सांगत्ये. देहामध्यें जे छिद्रमय स्थान आहे त्यात वायु प्रवेश करितो व शरीराकडून हालचाल करवितो. त्यामुळे हा प्राणी जीवत आहे, असे व्यवहारचतुर ह्मणतात. सृष्टीच्या आरंभीं परमात्म्याने जंगमप्राण्याविषयीं ही अशी स्थिति नियत केली आहे. त्यामुळें हे वृक्षादिक प्राणी चेतन असूनही स्पंदरहित ( निश्चेष्ट ) असतात. आता चेतन व अचेतन अशी कल्पना करण्याचे कारण सांगतें. हा चिदाकाश ईश्वरच अंतःकरणरूप उपाधीमध्यें प्रतिबिंबित झाल्या कारणाने जणुं काय अंशरूपाने व्यक्त झाला आहे, असे वाटते. तोच त्याचा औपाधिक जीवभाव होय (ह्मणजे ईश्वर अंतःकरणात जीवरूपाने व्यक्त होतो.) अशा रीतीने तो ज्यात व्यक्त होतो त्या पदार्थास चेतन ह्मणतात व अंतःकरणाच्या अभावीं तो ज्यात व्यक्त होत नाहीं त्यास अचेतन समजतात. ( तो परमात्मा बुद्धीच्या द्वारा स्थूल शरीरात प्रवेश करून नेत्रादि इंद्रियांच्या द्वारा बाह्य व्यवहार करण्यास समर्थ होतो. असें आता देवी सांगत्ये.—) बुद्धीमध्ये प्रतिबिंब रूपाने प्रविष्ट झालेलें चैतन्य नरशरीरादिरूप दुसऱ्या नगरात प्रवेश करून चिदाभासयुक्त बुद्धीस नेत्रादि इंद्रियगोलाकडे नेतें व त्यातून बाहेर पडून बुद्धिवृत्तीस विषयापर्यंत पसरावयास लावितें व अंतःकरणापासून, इंद्रियांच्या द्वारा, विषयापर्यंत पसरलेल्या बुद्धीवृत्तीच्या योगाने बाह्य विषयाचा अनुभव घेतें. आता तूं कदाचित् ह्मणशील की, नेत्रादि इंद्रिये साक्षात् चैतन्याचे ठायीं आरोपित असल्यामुळे स्वतः चैतन्यमय असतात व तीच जीवरूपानें शरीरात बसून व्यवहार करितात. असे ह्मटल्यानेही बाह्यव्यवहाराची व्यवस्था लागत असल्यामुळे निराळ्या जीवाची कल्पना करण्याचे काहीं प्रयोजन नाहीं. पण ते बरोबर नाही. कारण इंद्रियें स्वतःच जीवभूत नसतात. केवल चैतन्याचे ठायीं अध्यारोप झाल्यानेंच जीवभाव येत नसतो. कारण तसे जर असते तर सर्वच जग चैतन्याचे ठायीं आरोपित असल्यामुळें सर्वच सचेतन ( जीव ) झाले असते. घट, वस्त्र

इत्यादि अचेतन काहींच नसते. यास्तव ईश्वराचे ठायीं जीवभाव आणणारी बुद्धि आहे. पण बुद्धीनेच जीवाची उपाधि व्हावें, असा नियम असण्याचे कारण काय ? म्हणून म्हणशील तर आकाशाने शून्यशक्तियुक्त असावें; वायूने स्पदशक्तियुक्त असावे, पृथ्वीने सर्वास धारण करण्याच्या सामर्थ्यानें सपन्न असावे इत्यादि सर्ववस्तुशक्ति–व्यवस्थापक ( सर्व वस्तूच्या शक्तीची व्यवस्था करणारा ) चित्मकल्पच त्याचे कारण आहे, असे मी सागेन. कारण त्याच्या सकल्पाप्रमाणे सर्व होत असतें. तात्पर्य अशारीतीने तो परमात्मा सर्व शरीररूप होऊन जगमाची जगमरूपाने व स्थावराची स्थावररूपानें भावना करीत तात्काल त्या त्या रूपाने विवृत्त होतो व तेच त्याचे साकल्पिक रूप तसेच सदा रहाते. पण वस्तुत. जड व चेतन हे भिन्न पदार्थ नाहींत. कारण त्यांचा तो भेद बुद्धि या उपाधीमुळे होत असतो. त्याची वृक्ष पाषाण इत्यादि नावेंही बुद्धि--कल्पित आहेत. तो सर्व प्रत्यक्–सवित्‌चा विलास आहे. त्याचप्रमाणे कृमि, कीट, पतग इत्यादिकाच्या आत असलेली जी सवित् तीच बुद्धि, शब्द, त्याचा अर्थ इत्यादि सर्व होते. कारण उत्तरसमुद्राच्या तीरी असलेल्या प्राण्यास दक्षिण समुद्राच्या तीरावरील स्थावर–जगम पदार्थ, त्याच्याविषयींची संवत् उत्पन्न न झाल्याकारणाने, तेथून दिसत नाहीत. पण त्यानी आपल्या चित्तात त्याची कल्पना केल्यास त्यास तेथूनच त्याचा अनुभव येतो. पण दक्षिणतीरस्थ लोकास उत्तरतीरस्थाचा त्याच वेळीं अनुभव येत नाहीं. कारण त्याचे चित्त दुसऱ्या व्यवहारात गुतलेले असते. तात्पर्य सर्व स्थावर-जगम पदार्थ ज्याच्या त्याच्या प्रत्यक् साक्षी अनुभवात साठविलेले आहेत. एकाच्या बुद्धीने कल्पिलेलें दुसऱ्यास कळत नाहीं. एवढ्या साठींच पुष्कळानीं मिळून एकादें कार्य करावयाचें असल्यास पूर्वी सकेत करून परस्परास परस्पराचा अभिप्राय कळवावा लागतो. त्यावाचून सर्वांची एकसारखी क्रिया होत नाहीं माराश मच्चिदानदरूप ब्रह्माचे ठायीं असत्त्व, जाडय, वायु, आकाश इत्यादिकाची कल्पना होणेंही अयोग्य आहे. तस्मात् हें सर्व भान चित्ताच्या अधीन आहे, असें तू समज. प्रलय कालीं मायेमध्यें लीन झालेले सर्वात्मक व सर्वगत समष्टि चित्त सृष्टीच्या आरभीं सर्व प्रत्यक्–भूत चिदाकाशाच्या आराधानें जसे जसें विकसित होतें तसेच ते कल्पाच्या अंतापर्यंत रहातें. प्रथम

सर्गात जे जसे झालें असेल तसेच ते महाप्रलयापर्यंत पुनः पुनः होत रहाते. स्थावर व जगम या दोन्ही प्रकारच्या पदार्थांमध्ये चित्त असतें. पण स्थावरात चेष्टा करविणारा प्राण वायु नसतो. त्यामुळे त्याचा भेद झाला आहे. असो; लीले, हे सर्व सत्य असल्यासारखे दिसणारें विश्व स्वप्नतुल्य असत्य कसें आहे, तें मीं तुला सागितलें. हा पहा राजा विदूरथ मरून पुष्पाच्या राशींत असलेल्या पद्माच्या शवात शिरण्याकरितां जात आहे, असें वाटतें.

प्र. लीला—हे देवेशि, हा शवमडपास कोणत्या मार्गानें जातो तें आपण याच्या मागोमाग जाऊन पाहू या, चल.

श्रीदेवी—पद्मशरीरच मी आहें, अशी वासना धरून व तिच्या अनु-रोधाने, हा मी कोठें दूर असलेल्या परलोकास जात आहें, असें सम-जून तो स्वकल्पित मार्गाने जाईल. आह्मास त्याच्याच मार्गानें गेलें पाहिजे, असें नाही. पण तुझ्या इच्छेप्रमाणे मला केलें पाहिजे. कारण परस्पर मनोभग केल्यावर स्नेह टिकत नाहीं. यास्तव तू ह्मणशील तिकडून मी येण्यास तयार आहें.

श्रीवसिष्ठ—राघवा, याप्रमाणे सभाषण करून लीला सदेहरहित ज्ञानयुक्त झाली. इतक्यात विदूरथाचे चित्त प्राज्ञात्म्यामध्यें लीन झाल्या कारणाने तोही देहरूपानें जड होऊन पडला ५५

**सर्ग ५६**—या सर्गामध्ये राजाचे वासनामय यमपुरास गमन व त्या दोघी सुंदर स्त्रियाचें त्याच्या मागोमाग आपल्या पूर्व नगरास आगमन याचे वर्णन केले आहे

श्रीवसिष्ठ—राघवा, प्राणवायु असेपर्यंत या शरीरास सर्व शोभा असते. तो एकदा गेला ह्मणजे तें अति पापी, अति भ्रष्ट, अति अमगल व अति कुरूप बनतें राजा विदूरथाच्या शरीराचीही तीच अवस्था झाली. त्याचे डोळे पाढरे झाले. मुख निस्तेज झाले. महामरणमूर्च्छा-रूपी अधकूपामध्यें पडल्याप्रमाणें त्याचें चित्त विवेकशून्य झालें त्यामुळें चित्रातील देहाप्रमाणे त्याचा देह निश्चेष्ट झाला. असो; उगीच फार बोलून काय करावयाचे आहे ? एकादा वृक्ष मोडून पडत आहे, असें कळतांच त्यावरील पक्षी जसे आकाशांत उडून जातात त्याप्रमाणें त्याच्या

शरीरांतील प्राणवायु शरीराच्या अल्प प्रदेशांतून निघून गेला. तेव्हां घ्राणें-द्रियास वायूंतील सुवास जसा दिसतो (प्रतीत होतो) त्याप्रमाणे त्या दिव्यदृष्टि दोघी स्त्रियास त्याचा जीव अंतरिक्षात दिसला. पुढे वासनेप्रमाणे जाणारी ती जीवसंवित् तेथें आतिवाहिक प्राणानें युक्त होत्साती आकाशात दूर जाऊ लागली. तेव्हा वायूमध्ये असलेल्या गंधकलेच्या मागोमाग जशा दोघी भ्रमरी जातात त्याप्रमाणें त्या दोघीजणी त्या जीवसंवित्च्या मागोमाग चालल्या. पुढें थोड्याच वेळाने मरणमूर्च्छा शांत झाली असता ती संवित् स्वप्नाप्रमाणें जाग्रत् झाली. तिने यमदूत पाहिले. ते आपल्या वासनामय शरीरास नेत आहेत, असें तिला वाटलें. आपल्या आप्तानीं दिलेल्या पिंडादिकाच्या योगानें आपले स्थूल शरीर उत्पन्न झाले, असे तिला भासलें. एक वर्षभर चालल्यावर प्राप्त होणारे अर्थात् अतिदूर असलेले व प्राण्याच्या कर्मफलास व्यक्त करणारें यमाचे नगर त्यास दिसले. तो तेथे पोंचला. दूतानीं त्यास यमसभेत उभें केले. तेव्हा यमराज म्हणाला, याचीं पापकर्में मुळींच नाहींत. तो सदा पुण्यवानाचीं कर्मेंच करीत होता. हा भगवती सरस्वती देवीच्या वराने वाढला आहे. याचा प्राक्तन शव झालेला देह कुसुमाकाशात आहे. त्यात याला प्रवेश करू दे. ( लीला व सरस्वती यमपुरात सूक्ष्म रूपानें गेल्या व त्यानीं हा सर्व सभेतील न्यायाचा प्रकार प्रत्यक्ष पाहिला अशी कल्पना करावी किंवा राजाची वाट पहात त्या यमपुरीच्या बाहेर होत्या असें समजावें. ) यमाचें हें आज्ञावचन ऐकताच दूतानीं त्यास गोफणीनें फेंकलेल्या पाषाणाप्रमाणें आकाशात फेंकून दिलें. तेव्हा त्याची ती जीवकला, लीला व देवी अशीं तीं तिघेंजणे आकाशातून जाऊ लागलीं. जीवकलेस त्या दोघी रूपयुक्त स्त्रिया दिसल्या नाहींत. पण त्या तिला पहात होत्या. जीवकलेच्या मागोमाग त्या चालल्या. भुवर् इत्यादि लोकांतराचें उल्लंघन करून जीव-कला त्या ब्रह्मांडातून बाहेर पडली व दुसऱ्या एका ब्रह्मांडात शिरून त्यातील भूलोकीं येऊन पोंचली. त्या दोघी तिच्या मागोमाग होत्याच. शेवटीं जीवकला पद्मराजाच्या राजधानींत आली व लीलेच्या अंतःपुर-मंडपात एका क्षणात शिरली.

**श्रीराम**—भगवन् विदूरथाच्या लीलेस ( ह्म. तिच्या जीवास ) पूर्वी तिच्या कन्येनें मार्ग दाखविला. पण विदूरथाच्या जीवास येथे मार्ग दाखविणारें कोणी नव्हते. तेव्हां त्याला परत येण्याचा मार्ग कसा समजला ?

**श्रीवसिष्ठ**—राघवा, पूर्वशरीरवासना क्षीण झालेली नसतानाच बलाढ्य प्रारब्धामुळें त्यास जन्मांतराची भावना झाली व भोगाच्या योगानें त्या प्रारब्धाचा क्षय झाल्याकारणाने ती पूर्व वासना पुनः उद्भवली. त्यामुळे त्याला पूर्वशरीरात येण्याचा मार्ग सागणारा कोणी लागला नाही. त्याला तो पूर्व गमनागमनाच्या अभ्यासामुळे ठाऊक होता. अर्थात् पद्मशरीरच मी आहे, अशा तऱ्हेच्या अहंभावरूप जीवाच्या हृदयात त्या शरीराकडे येण्याचा मार्ग आपोआप स्फुरण पावला. जीवाच्या सूक्ष्म अंतःकरणोपाधींत व्यक्त झालेल्या वासनारूपाने स्थित असलेलें जगच त्यास प्रत्यक्ष दिसत असते ज्याप्रमाणे वटबीजास भूमि, जल, इत्यादि अंकुराच्या सामग्रीची प्राप्ति झाली असता, आपोआप अंकुररूपाने उत्पन्न होणाऱ्या वटतरूचा अनुभव जीवास आतल्याआत येतो त्याप्रमाणें स्वभावभूत चित्–अणु त्रैलोक्यसमूहाचा अनुभव अंतःकरणातच घेतो. (ज्ञान किंवा अज्ञान याच्या द्वारा सर्व जग साक्षिभास्य आहे ह्मणजे साक्षि चेतनात्म्यास जगाचा जो भाग ज्ञात असतो त्यास ते ज्ञात या रूपानें प्रकाशित करिते व जो अज्ञात असतो त्यास अज्ञात या रूपाने तें व्यक्त करिते, असा याचा भावार्थ. ) पुरुष जरी दूर कोठे असला तरी भूमीमध्यें स्वतः पुरून ठेविलेलें आपले धन तो मनाने सदा पहात असतो. अथवा एकादा विषयी पुरुष आपल्या दूर असलेल्या कामीनीचें चिंतन करीत असताना तन्मय झालेल्या त्याला तिचें साक्षात् दर्शन झाल्याचेंही भान होते. त्याप्रमाणेच जीवाने शेकडो जन्म घेऊन नानाप्रकारचे भ्रम जरी अनुभविले तरी त्यास आपल्या वासनेत असलेलें अभीष्ट दिसतें.

**श्रीराम**—भगवन्, आप्तांनीं पिंडप्रदानादि क्रिया केल्यामुळें, विदूरथाच्या जीवास, आपलें शरीर बनले आहे, असे दिसलें, असे आपण मला आता सांगितलेंत. पण सर्वांचेच आप्त सर्वांस उद्देशून पिंडादि देत असतात, असें आढळत नाहीं व ज्याला पिंड दिलेले नसतात त्याला

त्याच्या विषयीं वासना होणेही शक्य नसते. तेव्हा त्याचे शरीर कसें उद्भवतें ?

श्रीवसिष्ठ—आप्त पिंड देवोत, की न देवोत. मृताच्या अंतःकरणांत असलेली वासनाच शरीरास उत्पन्न करिते. पिंडदान करावें, इत्यादि शास्त्रीय विधि मृताच्या आप्ताचे कृत्य सांगत असतात. पिंडदानादि कृत्याचें फल वस्तुत. दान करणाऱ्या आप्तासच मिळत असतें पण मृताच्या वासनेच्या फलाशीं विधीची एकवाक्यता होत असल्यामुळे क्रियेचे फल कर्त्यास व मृतासही मिळते, असे शास्त्रमत आहे. चित्तच संसार आहे. यास्तव चित्ताचे शोधन करा. प्राणी चित्ताप्रमाणे होत असतो. इत्यादि श्रुतिवचने व विद्वानाचा अनुभव हेच गुह्य सांगत आहे. तस्मात् सर्व चित्तमय आहे; चित्तरूप आहे व चित्ताधीन आहे, हा नियम जीवत अथवा मृत जीवामध्यें अबाधित रहातो. मी शरीर आहे, अशा भावनेने युक्त असलेल्या ज्याला आप्तानी पिंड दिलेले नाहीत, असेही मृत जीव शरीर-संपन्न होतात व मी सशरीर नाही, तर मी असंग आत्मा आहे, असें ज्याचे दृढ मत झालेले असते त्याच्या आप्ताने मरणोत्तर कितीही जरी पिंड दिले तरी त्यामुळे त्यास सशरीरी व्हावे लागत नाहीं. पण शास्त्रमताप्रमाणें चालण्यात इतका लाभ आहे. मृताच्या पुत्रादि–अधिकारी आप्तानें शास्त्राज्ञेप्रमाणे पिंडादि–दान दिले असता मृतास त्याविषयींची वासना अवश्य उत्पन्न होते व ज्यास उद्देशून ते दिलेले नसते त्यासही शरीराविषयींची वासना अवश्य होतेच, पण ती अमुक वेळींच होत, असा नियम नाहीं. तर ती जेव्हा होईल तेव्हा होईल. सारांश पुत्रादिकानीं दिलेले पिंडदान हें वासनेस जाग्रत् करणारें आहे. कारणावाचून काहीं होत नसतें. प्रत्येक भावनेस कारण अवश्य लागतेच वासनेप्रमाणे पदार्थ सत्य किंवा असत्य होतो. मी गरुड आहें, अशी गरुडोपासना करणाराला सर्पाचें विष बाधत नाहीं. तर उलट तें त्याला अमृततुल्य मानवतें. कांटा लागला असतांही मला सर्पदंश झाला अशी दृढभावना झाल्यास प्राण्याला मरणही येतें. सारांश सर्व वासनेच्या व वासनारूप भावनेच्या अधीन आहे व कारणावाचून कोणतीही भावना कोणाला होत नाही, हें तू लक्षात ठेव. पण भावना सत्य नव्हे. तेव्हा तिच्या योगानें होणारें व्यावहारिक ( सत्य किंवा असत्य ) कार्य तरी सत्य कसें असणार ? तस्मात् भावनेचें अधिष्ठान जें

शुद्ध ब्रह्म तेच सत्य आहे. असा तू निश्चय कर. आता कारणावांचूनच कार्य होते, असें ह्मणण्यास काय प्रत्यवाय आहे ह्मणून तू विचारशील, पण सृष्टीच्या आरंभापासून महाप्रलयापर्यंत तसें झाल्याचा कोणालाही कधीं अनुभव येत नाही व तसे होणे शक्यही नाही. कारण एका नित्य ब्रह्मसत्तेवाचून इतर सर्व कार्यसत्ता कारणसत्तेच्या अधीन असल्याचाच अनुभव येत असतो. तस्मात् शुद्ध चिन्मात्रच भ्रांतीनें वासनादि जगद्रूपाने भासते, हा आमचा सिद्धांत अबाधित ठरला.

**श्रीराम**—गुरुराज, माझ्या हातून काहींएक धर्म घडला नाहीं, अशी ज्या प्रेताची वासना असते त्याच्या आप्तानीं त्यास उद्देशून पुष्कळ धर्म केला असता त्याचा काहीं उपयोग होतो कीं नाही ? प्रेताच्या वासनेच्या विरुद्ध असलेला तो धर्म निष्फळ होतो कीं, आप्ताच्या वासना–प्राबल्यामुळे सफल होतो ? त्यातील सुहृद्वासना सत्य आहे. कारण त्याने मृतास उद्देशून खरोखरीच धर्म केला आहे व प्रेताची वासना असत्य आहे. कारण तिचा विषय सत्य नाहीं. तेव्हा त्यातील सफल वासना कोणती व निष्फळ कोणती ? ते मला सांगा.

**श्रीवसिष्ठ**—शास्त्रोक्त देश, काल, क्रिया, द्रव्य, इत्यादिकाच्या संपत्तीने यथाविधि अनुष्ठान केल्याकारणाने उद्भवणारी शास्त्रानुसारिणी सुहृद्वासना, शास्त्रप्रामाण्यामुळेंच, प्रबल आहे. यास्तव ती ज्याच्याविषयी उत्पन्न होते तें तसेच होते. प्रेताची वासना केवल लौकिक असल्यामुळें ती दुर्बल असते. तस्मात् शास्त्रच वासनेस प्रबल करणारे आहे. विषयाचें सत्यत्व किंवा असत्यत्व काहीं करू शकत नाहीं. धर्म–दानादिकाचे विधान करणारे शास्त्र लौकिक प्रमाणाहून प्रबल आहे. त्यामुळे पुत्रादिकानीं धर्मदानादि यथाशास्त्र केल्यास नास्तिक मृताच्याही अंतःकरणात तात्काल 'मी असा असा धर्मवान् आहे' अशी वासना उद्भवते, अशी कल्पना करावी लागते. आता मृत जीवही आस्तिक व धार्मिक असला आणि त्याच्या आस्तिक, धार्मिक व उदार पुत्राने त्याचें उत्तरकार्येही श्रद्धाभक्ति–पुरःसर केलें तर त्यांचा परस्पर उपयोग होऊन कर्म अति वीर्यवान् बनतें व त्याचें फळही तसेंच मिळते. राघवा, एवढ्यासाठींच मी पूर्वी पुरुषाच्या प्रयत्नाचे प्राबल्य सिद्ध करून सर्वदा शुभकार्याचाच अभ्यास करावा, असें तुला सांगितलें.

**श्रीराम**— पण, सद्गुरो, देश–कालादि सहकारि कारणाच्या साह्यानें धर्मादिकाची वासना उदय पावते, असें मानल्यास महाप्रलय, सर्गाचा प्रारंभ इत्यादि समयी देशकालादि कांहीं एक नसल्यामुळे वासनेचा उद्भव होणे शक्य नाही. तेव्हा वासनामय कार्य–जग तरी कसें उत्पन्न होणार ? कारण, कारण असले तरच वासनादि हे सर्व उत्पन्न होणार !

**श्रीवसिष्ठ**—दाशरथे, तू अगदीं बरोबर बोलत आहेस. महाप्रलय व आरंभ या वेळीं सत्य आत्म्यामध्ये देश–काल इत्यादि कोठून असणार व तीं सहाकारी कारणे जर नाहीत तर कारणाभावीं दृश्याविषयींची बुद्धि कशी उत्पन्न होणार ? तस्मात् परमार्थतः दृश्यबुद्धि मिथ्या आहे. ती कधीं उत्पन्न झालेली नाहीं व तिचे खरोखरी स्फुरणही होत नाहीं आणि याप्रमाणें दृश्याचाच असंभव असल्यामुळे हे जे कांहीं दिसत आहे ते आत्मरूप चैतन्यमय ब्रह्मच आहे व तेंच हे अशा रीतीनें पसरले आहे. सहस्रावधि उपनिषद्वचनें हाच परम सिद्धांत सांगत आहेत. वेद व शास्त्रे याच परमरहस्याचा बोध करण्याकरिता प्रवृत्त झालीं आहेत व मीही तुला हेच महत् तत्त्व पुढें शेंकडो युक्ती योजून सांगणार आहे. असो, आता अगोदर चाललेली कथा ऐक. वर वर्णन केल्याप्रमाणें पद्मनगरास प्राप्त झालेल्या त्या दोघीजणीस पद्माचे सुंदर मंदिर दिसलें. त्याच्या आंतील भाग फार रमणीय होता. मंदार, कुंद, जाई, मोगरीं, इत्यादि पुरुषाचे नानाप्रकारचे उपहार त्यांत होते. सर्व राजधानींतील व विशेषतः त्या मंदिरातील निद्राग्रस्त लोकांचे सर्व व्यापार प्रायः बंद झाले होते. त्यामुळे सर्वत्र शांतता पसरली होती. पुष्पाच्या ढिगांत शव जसेच्या तसेंच होते, शवाच्या शिरोभागीं जलपूर्ण घट ठेविला होता. त्या राजमंदिराचीं सर्व कपाटें बंद केलेली होती. फार काय पण खिडक्यांचीं झटपें लावून त्यांसही कड्या घातल्या होत्या. ती पहाटेची वेळ होती. त्यामुळे रात्रभर जळलेले दिवे त्यावेळीं मंद होऊं लागल्यामुळे मंदिरातील वस्तु चांगल्याशा दिसत नव्हत्या. स्वच्छ व शुभ्र भिंतीवरही काळोखी आली होती. त्यांतील भिन्न भिन्न स्थळीं गाढ झोंप घेणाऱ्या लोकांचे श्वासोच्छ्वास सारख्या प्रमाणानें चालले होते. सारांश तें गृह चंद्रतुल्य आल्हादकारक, आपल्या सौंदर्यानें इंद्राच्या राजधानीस तुच्छ करून

सोडणारे, व ब्रह्मदेवाच्या उत्पत्तिस्थानाप्रमाणे म्हणजे नारायणाच्या नाभिकमलाप्रमाणे सुशोभित होते ५६.

सर्ग ५७ - दुसऱ्या लीलेचे दर्शन, लीलेच्या देहाचें मिथ्यात्व व योग्याच्या शरीराच्या आतिवाहिकतेचा उदय, याचे येथे वर्णन करितात.

**श्रीवसिष्ठ**—राघवा, पूर्वोक्त सुंदर गृहात सूक्ष्मछिद्रातून प्रवेश करिताच त्यास त्याच्याही पूर्वी स्वशरीराने आलेली दुसरी लीला दिसली. ती पद्मशवाच्या जवळच बसली होती. तिचा वेष, आचार, देह, वासना, आकार, रूप, सौंदर्य, वस्त्रे, भूषणें, इत्यादि सर्व अगदी पूर्वी प्रमाणेच होते. विदूरथाच्या गृहामध्ये पाहिलेल्या लीलेहून हिच्यामध्ये जे काहीं अधिक होते ते हेंच की, ती या समयीं पद्माच्या मंदिरात होती. आपल्या हातात चामर घेऊन ती साध्वी आपल्या पतीस हळु हळु वारा घालीत होती. उदय पावणारा रजनीनाथ अंतरिक्षास जसा भूषित करितो त्याप्रमाणें ती त्या मंदिरास भूषित करीत होती. मौन धारण केलेल्या तिने आपले मुख डाव्या तळहातावर टेकिलें होते. त्यामुळे तिचे मस्तक बरेच नम्र झाले होते. भूषणाच्या किरणानी तिला, प्रफुल्लित वेलींनी युक्त असलेल्या वनस्थलीची शोभा आली होती. आपल्या नेत्रकटाक्षानी ती जणुकाय दिशा दिशेंत मालतीपुष्पाचाच वर्षाव करीत आहे, असा पहाणारास भास होत असे. आपल्या लावण्याने ती सुंदरी आकाशात क्षीण झालेल्या चंद्रास पुनः वृद्धिंगत करीत होती. त्या नगरपालरूपी विष्णूस ती जणु काय लक्ष्मीच येऊन मिळाली आहे, असें वाटे. असो, साराश येणें प्रमाणें आपल्या पतीच्या मुखाकडे दृष्टि लावून तदेकचित्त झालेल्या त्या रमणीला त्या दोघींनीं पाहिलें. पण तिने त्याना पाहिले नाहीं. कारण त्या जशा पुण्य प्रभावामुळे सत्य-संकल्प झाल्या होत्या, तशी ती झाली नव्हती.

**श्रीराम**—गुरुराज, लीला पूर्वी तेथे आपले शरीर ठेवून ध्यानानें ज्ञप्तीबरोबर गेली, असें आपण सांगितलेंत. तेव्हा तिनें मंदिरात येताच आपलें शरीर शोधावयास पाहिजे होतें. पण ते न करिता ती विदूरथाच्या लीलेसच अगोदर पाहू लागली. याचे कारण काय ? तिचा तो देह कोठें गेला ? त्याचें काय झालें ? ते मला सांगा.

**श्रीवसिष्ठ**—( आतिवाहिकता-बुद्धीचा उदय झाल्याकारणानें व तत्त्वबोधानें तिच्या शरीराचा बाध झाला होता. त्यामुळेच तिला स्वदेह दिसला, असें येथे सांगितलें नाहीं. आता ज्या अज्ञाच्या दृष्टीनें त्याचा बाध झाला नव्हता त्याच्या दृष्टीने त्याचे काय झाले ते पुढच्या सर्गात समजेल. अशा अभिप्रायाने वसिष्ठ उत्तर देतात- ) रामा, लीलेचे शरीर होतें कोठे? त्याला अस्तित्व कोठून असणार? मृगजळाप्रमाणे ती केवळ भ्रांतीच होय. हे सर्व जग आत्माच आहे. त्यात सत्य देहादिकाचा उद्भव कोठून होणार? ब्रह्मच आनंदरूप आत्मा असून जे दिसते ते सर्व चित् आहे. लीला ज्या क्रमानें बोधमय झाली त्याच क्रमाने व त्याच बोधाच्या योगाने तिचे शरीर बर्फाप्रमाणे वितळून परब्रह्मामध्ये मिळून गेले. ( ह्मणजे शरीरविषयक ज्ञान ज्ञानमय ब्रह्मामध्ये मिळून जाऊन असत् शरीर मिथ्या ठरलें. ) मी अति सूक्ष्म समष्टि-मनोमात्र आहे, अशा बुद्धीनें व तत्त्वदृष्टीने तिने जे दृश्य आता पाहिले त्यालाच पूर्वी भ्रांतीनें ही भूमि, ते झाड इत्यादि नावे दिलीं. अर्थात् ज्ञानाने केवळ देहाचाच नव्हे तर भूम्यादि इतर स्थूल पदार्थांचाहीं बाध झाला. यास्तव वस्तुत आधिभौतिक ह्मणून काहीं नाहींच. त्यामुळे बाधित शरीराचा शोध लीलेने केला नाहीं, तें योग्यच झाले. भ्रांतिकटाला जसे भ्रमानें नानाप्रकारचे भ्रामक आकार दिसतात तसे भ्रांतिरहिताला ते दिसतील का? कधींही नाहीं. तस्मात् अज्ञाच्या मनाच्या समष्टीनें या स्थूल प्रपचाची कल्पना केली आहे व ती निर्बीज असल्यामुळें मिथ्या आहे.

**श्रीराम**—गुरुराज, योग्याच्या देहास आधिभौतिकता नसते ह्मणजे योग्याच्या देह स्थूल नसतो, असें जर ह्मटले तर त्याच्या जीवतपणीं व तो मृत होऊन पडला असता त्याचा देह जो लोकास दिसतो तो कसा? कारण आतिवाहिक ( सूक्ष्म ) देह लोकास दिसणे शक्य नाहीं व तो मरून स्वस्वरूपी मिळाल्यावरही त्याचें सूक्ष्म शरीर अवशिष्ट रहात नसल्यामुळे ते दिसण्याचा संभव नाहीं.

**श्रीवसिष्ठ**—राघवा, योग्यास दोन प्रकारचें मरण येतें. एक-प्रारब्ध भोगाकरिता त्यानें आपल्या इच्छेनें नाना देहाची कल्पना केली असतां व दुसरे-सर्व प्रारब्धाचा क्षय झाला असता विदेह कैवल्य प्राप्त होतें

तेव्हा. पण त्यातील पहिल्या प्रकारच्या मरणात पूर्व देहातील काहीं रहात नाही. कारण स्वप्नातील आतिवाहिक देहामध्ये, एक मृगादि भाव सोडून दुसऱ्या मनुष्यादि भावाची कल्पना केली असता त्यात जसा पूर्व मृगादि शरीराचा अल्प भागही येत नाही व ती दुसरी मनुष्यादि कल्पनाही अनित्य असते त्याप्रमाणेंच योग्याने प्रारब्ध भोगांकरिता एक शरीर सोडून दुसरे घेतले असता पूर्व शरीराचा थोडासाही भाग त्या दुसऱ्या शरीरात येत नाहीं व तीं सर्व शरीरें अनित्य असतात. दुसऱ्या प्रकारच्या मरणातही स्थूल शरीराची अनुवृत्ति होत नाहीं. यास्तव व योग्याचा देह जरी दिसत असला तरी तो शरदृतूतील मेघाप्रमाणे अगदीं थोडा वेळ दिसतो शिवाय योग्याचा देह अवश्य दुसऱ्यास दिसतोच असा काहीं नियम नाहीं. कारण काही योग्याची इच्छा तो तात्काल क्षीण व्हावा अशी असल्यास त्याच्या सकल्पाप्रमाणें घडते. तात्पर्य योग्याचा देह योग्यास दिसणेही जर फारसे शक्य नाही तर सामान्य स्थूल दृष्टीच्या लोकास तो दिसेल ही आशा करणे व्यर्थ आहे. आता जीवतसमयीं काहीं योग्याचीं शरीरे लोकास दिसतात. हें खरें, पण "हे लोक अशाप्रकारच्या मला पाहू देत" अशा योग्याच्या सत्य-सकल्पामुळेच तीं दिसत असतात. तीं आधिभौतिक असतात ह्मणून दिसतात. असे तू समजू नकोस. किंवा तुझ्या प्रश्नाचे समाधान दुसऱ्या रीतीनेही करिता येण्यासारखें आहे. ते असें-योग्यास त्याच्या दृष्टीने आपला देह आतिवाहिक आहे, असाच अनुभव येत असतो. पण त्याच्या स्थूल शरीराच्या सबधाने ज्याना ज्याना आपल्या कर्माचा उपभोग घ्यावयाचा असतो त्या त्या अज्ञाच्या दृष्टीने तें स्थूल आहे; ते मेले आहे, ते आता व्याधिग्रस्त आहे इत्यादि कल्पना संभवते. (त्यामुळेच पूर्वी विदेह मुक्त झालेल्या शुकाचे दर्शन परिक्षित राजाच्या सभेतील लोकास, त्याच्या वासनारूप, झाले व त्याने त्यास भागवताचा उपदेश केला) योगी पुरुषास जेव्हा आत्मसाक्षात्कार होतो तेव्हाच त्यांचे देहादिक बाधित होऊन जातात. त्यामुळे जीवतपणीही त्याच्या दृष्टीनें देहादि सत्यरूपाने असत नाहीत तर ते भ्रांतिमात्र आहेत, असा त्याचा निश्चय झालेला असतो. ते म्हणतात की, देह कोण? सत्ता कोणाची? व नाश कोणाचा आणि कसा होणार? परमार्थत पूर्वी जे होतें तेच आता(ज्ञानकाली)ही आहे. अज्ञान मात्र गेल आहे.

**श्रीराम**—प्रभो, योग्याचा आधिभौतिक देहच आतिवाहिकतेस प्राप्त होतो कीं, ज्ञानानंतर दुसराच आतिवाहिक देह उत्पन्न होतो? स्थूल देहच ज्ञानानंतर सूक्ष्म होतो, असे म्हटल्यास मिथ्या ठरलेल्या स्थूल देहाचा सूक्ष्मदेहरूपाने परिणाम होणे शक्य नाही. बरें दुसरा नवीनच आतिवाहिक देह उद्भवतो म्हणून म्हटल्यास ज्ञानाने मुक्ति मिळते या श्रुतिवचनाचा बाध होतो. तेव्हा या अडचणीतून कसे पार पडावयाचे, ते सांगा.

**श्रीवसिष्ठ**—उत्तम पुरुषा रामचंद्रा, मी तुला याचे समाधान पुष्कळदा सांगितले असताना अजून तुझ्या मनाचा संशय कसा जात नाहीं? अरे बाबा, आत्मज्ञानाने स्थूल देह मिथ्या आहे, असे समजल्यावर पूर्वीच सिद्ध असलेला सूक्ष्म देह अवशिष्ट रहातो. कारण सूक्ष्म शरीर हीच ज्याची उपाधि आहे, अशा ब्रह्माच्या ठायीं स्थूल शरीराचा अध्यारोप होत असल्यामुळें, स्थूलाचा ज्ञानाने बाध झाल्यावर, सूक्ष्म रहाणे हे साहजिक आहे. अर्थात् आतिवाहिकता खरी आहे व आधिभौतिकता कल्पित आहे. वासनावशात् सूक्ष्मच स्थूल भासते व जेव्हा ती वासना क्षीण होते तेव्हा पूर्वीचे सूक्ष्म रहाते. स्वप्नात "मी कठिण दगडावर पडलो आहे" असे मऊ गादीवर निजलेल्या पुरुषास वाटते. पण स्वप्न सोडून जाग्रतीत आले की, पूर्वीच्या मऊ गादीचाच अनुभव येतो. आता तू ह्मणशील कीं, योगी पुरुषाच्या स्थूल शरीराचा परिणाम होत नाहीं, असें जर मानिले तर त्याचा जड देह अगदी हलका होऊन आकाशादिकातून कसा जातो? तर त्याचे कारण सांगतो. स्वप्नामध्ये स्वाप्नभावाने पक्षी होऊन आपण जसे आकाशात उडून जातो त्याप्रमाणें आत्मज्ञानानें हा स्थूलरूपाने भासणारा देह आकाश–गमनादि करण्यास समर्थ होतो. अर्थात् हा सर्व भावनेचा प्रभाव आहे अरे लक्ष्मणाग्रजा, स्थूल देह हाच मी आहे, अशी ज्याची वासना दीर्घ अभ्यासामुळें दृढ झालेली असते त्या अज्ञानाही मरणोत्तर स्थूल देहाचा नाश झाल्याकारणाने सूक्ष्म देहाची प्राप्ति जर अनायासाने व इच्छा नसताना होते तर वासनाशून्य ज्ञानी पुरुषास अज्ञान नाशामुळे स्थूल शरीर मी नाहीं; तर मी त्याहून भिन्न नित्य–शुद्ध–बुद्ध–मुक्तस्वभाव आहे, असा अबाधित अनुभव येऊन स्थूलाचा बाध झाल्यावर स्वाभाविकपणेच सूक्ष्मभावाची प्राप्ति होणें अगदी अशक्य नाही. आत्मज्ञानाच्या योगाने प्रिय शरीराचा नाश होतो, हे खरे.

पण त्यामुळे ज्ञान अनर्थावह आहे, असें ह्मणतां येत नाही. कारण स्थूल शरीर ही सत्य वस्तु नव्हे. तर तो पाण्यावरील बुडबुड्याप्रमाणे क्षणभर भासणारा भ्रामक आकार आहे.

श्रीराम—बरें, ते असो, पण प्रभो, पद्माच्या गृहात आता दोन लीला आल्या आहेत. त्यातील देवीबरोबर आलेल्या व सूक्ष्म शरीराने युक्त असलेल्या लीलेस तेथील लोक पहाणार नाहींत, हें खरें. पण ती आता ज्ञानाच्या योगानें सत्यसंकल्प झाली आहे. तेव्हा गिरिग्रामाप्रमाणें येथेही जर तिनें, हे येथील सर्व लोक मला पाहोत, असा संकल्प केला तर ते तिला कसे पहातील? ही पूर्वीचीच आमची स्वामिणी आहे, असे ह्मणून तिला ओळखतील की, वसिष्ठ ब्राह्मणाच्या ज्येष्ठशर्म्याप्रमाणे ही कोणी अद्भुत देवी आहे, असे समजून आश्चर्यचकित होतील?

श्रीवसिष्ठ—ते पहिल्या लीलेला ही आमची राणी येथे दुःखी–कष्टी होऊन बसली आहे, असे समजून ही कोणी तिची सखी कोठून तरी आली आहे, असे जाणतील. कारण ते अविवेकी लोक पशुतुल्य असतात. तेव्हा ही दुसरी नवीनच दिसत आहे ही कोण, कोठून आली, ही चागली आहे की दुराचारिणी आहे इत्यादि संदेह त्यास कसे येणार? पूर्वी पाहिलेल्या पदार्थाच्या अनुरोधाने ते अधासारखे व्यवहार करीत असतात. त्यांना विचार करिता येत नाही. कारण ते स्थूलबुद्धि असतात. त्यामुळे मातीचें कोरडे ढेकूळ वृक्षावर फेकले असता ते जसें बाणाप्रमाणें त्यात प्रवेश करू शकत नाही, चिखलाच्या गोळ्याप्रमाणें त्यास चिकटून राहू शकत नाही अथवा दगडाप्रमाणे त्यास क्षतही करू शकत नाहीं तर आपण फुटून छिन्नभिन्न होऊन जाते त्याप्रमाणे आत्मज्ञानरहित असल्यामुळें पशूप्रमाणे असलेले ते जन विचार करण्यास असमर्थ असतात आणि त्यामुळे ते तत्त्वामध्यें प्रवेश करून किंवा तदेकरूप होऊन अथवा थोडासा तरी त्याच्याशीं संसर्ग पावून त्याचे यथार्थ ज्ञान करून घेऊ शकत नाहींत. उलट त्या तत्त्वाकडे त्याची प्रवृत्ति झाल्यास भयरहित अशाही त्याला भिऊन ते स्वतःच नष्ट होतात. ( अनात्म्यामध्ये आसक्त होऊन आत्म्यास विसरणे हाच त्याचा नाश होय. ) केवल आत्म्याच्या अज्ञानामुळेंच त्याना विचार करितां येत नाहीं. असें नाहीं; तर स्थूल शरीरें, काम, कर्म, वासना इत्यादि त्याचें सर्व

पशुतुल्य असतें व त्यामुळे त्याच्या चित्तांत विचाराचा उद्भव होत नाही. पण वरील कारणाच्या अभावामुळे जे विचार करितात त्याना चित्तशुद्धि, शुद्ध धर्माचा उदय इत्यादिकाच्या द्वारा तत्त्वसाक्षात्कार होतो. त्यामुळे शरीरादि स्थूल भाव मिथ्या आहेत, असा अनुभव येतो व पूर्वोक्त संदेहादिकाना अवकाशच रहात नाही. जागे होताच, स्वप्नात पाहिलेले व "हेच मी" असा ज्याच्याविषयी अभिमान धरिला होता ते शरीर कोठे जाते काही कळत नाही. आत्मज्ञानानतरही ज्ञानी पुरुषाच्या स्थूल शरीराची तीच गति होते.

श्रीराम—पण ब्राह्मणश्रेष्ठ, जागे होताच स्वप्नात पाहिलेले विषय कोठे जाऊन रहातात? मूळ अज्ञानाच्या बाधावाचून त्याचा आत्यंतिक नाश होणे शक्य नाही. तेव्हा ते असतात कोठे?

श्रीवसिष्ठ—रामचद्रा, स्वप्नातील किंवा मनोराज्यातील कल्पित पदार्थ जाग्रत् वासनेमुळे बनलेली जी अविद्या–उपाधि तिने युक्त असलेल्या जीवाच्या संवित्चे कार्य असतात. त्यामुळे वायूचे स्पदन जसे वायूमध्ये मिळून जाते त्याप्रमाणे ते पदार्थही संवित्मध्ये मिळून जातात. कारण ते पदार्थ जीवसंवित्–हून वस्तुतः भिन्न नसतात. (अर्थात् स्वप्नातील पर्वत, झाडे, देह, नद्या इत्यादि सर्व जीवाच्या ज्ञानास आच्छादित करणाऱ्या अज्ञानात मिळून रहातात.) साराश अज्ञात संवित्च केव्हा केव्हा स्वाप्न पदार्थांच्या आकाराने स्फुरण पावते व जेव्हा ती अशारीतीने स्फुरण पावत नाहीं तेव्हा ती त्या पदार्थरूप होऊन रहाते विवेक झाला असता स्वाप्नादि साकल्पिक पदार्थ, जळ व द्रवत्व यांच्या प्रमाणें, संवित्हून निराळे आहेत, असे कधींच वाटत नाही. मग भिन्नत्वाने भासणारें कोण? ह्मणून विचारशील तर बाबारे, ती केवळ अविद्या आहे व तिलाच संसार ह्मणतात, असे तू जाण कुंभाराला मडकें घडावयाचें झाल्यास चक्र, दंड इत्यादि सहकारी कारणाची जशी आवश्यकता असते तशी स्वप्न, मनोराज्य इत्यादि काली भासणाऱ्या पदार्थास तसल्या सहकारी कारणांची गरज लागत नाहीं. तर ते त्यावाचूनच उत्पन्न होतात. तेव्हा योग्य कारणाच्या साह्यावाचूनच उत्पन्न होणाऱ्या त्यास सत्य कसे ह्मणता येईल? जाग्रतींत भासणाऱ्या पदार्थांचीही तीच अवस्था आहे. स्वप्नात एकादे नगरच खोटें भासतें. पण सृष्टीच्या आरंभीं सर्व जग खोटें भासतें. (अर्थात् जाग्रत्प्रपचही

सहकारी कारणाच्या सहायावाचून उत्पन्न झाला आहे. तेव्हा, त्यातील कार्यें कारण–सहायानेच उद्भवतात, असे आता जरी आमच्या अनुभवास येत असले तरी तो आरंभी असद्रूप असल्यामुळें हा जाग्रत्प्रपंचही हिरण्यगर्भाच्या संवितीहून भिन्न नाही. ) शिवाय त्यास सत्य समजल्यास दुसरा एक मोठा दोष येतो सत् व चित् हे शब्द एकमेकास सोडून कधींही रहात नाहीत. त्यामुळें जे सत् तेच चित् व जे चित् तेच सत् या न्यायाने सत्य जगही चित् होणार. पण ते चिद्रूप आहे, असे ह्मटल्यावर चित्चा विषय होणार नाही. बरें चित्चा ते विषय नाहीच, असे समजावे तर “ हे जग ” असा जो त्याचा अनुभव येतो त्याला बाध येणार ! तस्मात् संवित् नित्य व सत्य आणि तिचे स्वप्नातील व जाग्रतीतील विषय अनित्य व असत्य असे तू निश्चयाने जाण अरे वेड्या, स्वप्नात पाहिलेला विशाल पर्वत जागे होताच शून्य होऊन जातो, हे स्वानुभवाने ठाऊक आहे. मग त्याचप्रमाणे ज्ञानाभ्यासाच्या योगाने व ईश्वराच्या अनुग्रहाने हा स्थूल जाग्रत् प्रपंचही शून्य होणे व तो असत् आहे, असे वाटणें शक्य आहे. हे तुला कसे समजत नाही ? तू ह्मणशील की, असे जर आहे तर आकाशात उड्डाण करून शुक्राचार्य सूर्यमंडलास गेले, असे जवळच्या लोकांनी पाहिले व दधीचिप्रभृतींच्या मृत शरीराचें इतरास दर्शन झाले, असे जे पुराणात वर्णन आहे त्याची काय वाट ? तर त्याचे उत्तर सांगतो. स्वाभाविक अज्ञानामुळे विवेकशून्य झालेले जन, ज्यांच्या भौतिक शरीराचा बाध झाला आहे, अशा तत्त्वज्ञास वस्तुतः पाहूच शकत नाहीत. पण आपल्या अज्ञानाने कल्पिलेल्या देहाचे त्यास भान होते. सारांश या सर्व द्वैतदृष्टी मिथ्या आहेत. कारण त्या अविवेकामुळे भासत असतात ५७.

**सर्ग ५८**—या सर्गात काल, समाधिस्थ लीलेच्या देहाचा विनाश, लीलेचें संभाषण व राजाचे जीवन यांचे वर्णन करितात.

**श्रीवसिष्ठ**—राघवा, मनाच्या चांचल्यास जसा निरोध करावा त्याप्रमाणे ज्ञप्ति देवीने आपल्या सत्यसंकल्पाने विदूरथाच्या जीवास निरोध केला. इतक्यात तिला लीला ह्मणाली, “ देवि, मी समाधीत लीन झाले व राजा शव होऊन पडला, तेव्हापासून या पद्मसृष्टीतील किति काल लोटला ( ह्मणजे त्या गोष्टीस आज किती दिवस [illegible] ? ) ” त्यावर देवीने उत्तर दिले, “ वत्से, तुला समाधिस्थ [illegible] सृष्टींतील एक

मास झाला. तुझ्या देहाच्या रक्षणाकरिता ठेविलेल्या या दोघी दासी निजल्या आहेत, पहा आता दुसऱ्यानी अज्ञानाने कल्पिलेल्या तुझ्या देहाची काय अवस्था झाली, ते सांगते ऐक. पधरा दिवसानी तुझे ते शरीर प्राण निरोधामुळे शुष्क व निर्जीव होऊन सुकलेल्या पल्लवाप्रमाणे भूमीवर पडले. काष्ठाप्रमाणे किंवा भित्तीप्रमाणे जड व थंडगार होऊन गेलेल्या त्या तुझ्या देहाचे परीक्षण करून मंत्र्यानी तू मेलीस असा निर्णय केला व कुजलेल्या आणि त्यामुळे दुर्गंधयुक्त झालेल्या त्याचे त्यानी चदन काष्ठानी दहन केले. नतर आमची राणी मेली, असे समजून तुझा सर्व परिवार 'हाय हाय' करून मोठ्याने आक्रोश करू लागला. तुझ्या अधिकारी आप्तानी तुला उद्देशून पिंडदानपूर्वक और्ध्वदेहिक केले. पण आता तू सशरीर येथे आली आहेस, असे पाहून ते हीं आमची राणी परलोकातून आली आहे. असे वाटून ते सर्व आश्चर्यचकित होतील. बाळे, तुझे शरीर आता फारच निर्मल झाले आहे त्यामुळे तुझ्या सत्य—सकल्पाच्या योगाने जेव्हा जेव्हा तू त्यांच्या दृष्टी पडशील तेव्हा तेव्हा, हिचे शरीर आता दिव्य झाले आहे, असे वाटून तर त्याना अधिकच आश्चर्य वाटेल. तुझ्या पूर्ववासनेप्रमाणे तुझे दिव्य शरीरही त्या स्थूल शरीराच्या आकाराचेच त्याना दिसेल. कारण प्राणी आपापल्या वासनेप्रमाणे सर्व पहात असतो. राजाप्रमाणे मलाही तो पूर्व देहच का प्राप्त झाला नाही? म्हणून विचारशील तर त्याचे कारण असे आहे की, तू आता आतिवाहिक देहाने युक्त झाली आहेस व तत्त्वज्ञानामध्ये परिनिष्ठित आहेस. यामुळे तुला त्या देहाचे विस्मरण झाले आहे पण त्याच्याविषयीची वासना अत्यंत नष्ट झालेली नाही. त्या देहवासनेमुळेच तुझे दिव्य शरीर याना तुझ्या पूर्व शरीराच्या आकाराचे दिसेल पण परमार्थतः ते आधिभौतिक होणार नाही. कारण ज्यास आतिवाहिक दृष्टि प्राप्त झालेली असते त्याचा स्थूलभाव शांत होतो. त्यामुळे ज्ञानीपुरुषाचा आधिभौतिकभाव दुसऱ्याच्या अनुभवास जरी येत असला तरी तो आकाशात दिसणाऱ्या शरदृतूतील मेघाप्रमाणे भासमान आहे. पण देहवासनेचा अत्यंत उच्छेद झाला असता आतिवाहिक देहाचीही कल्पना पार नाहीशी होते. कारण तारुण्यामध्ये गर्भावस्थेतील यातनांचे जसे पूर्णपणे विस्मरण होते त्याप्रमाणे सच्चिदानदवासना रूढ झाली असता सर्व वासना निःशेष क्षय पावतात.

असो; लीले, आम्ही येथून निघाल्यापासून आज एकतिसाव्या दिवशी या येथे परत आलो आहों. या प्रभातसमयींही मी या दोघी दासींस निद्रावश करून सोडले आहे. तर चल आता अगोदर आपण आपल्या सत्यसंकल्पाने या लीलेस दर्शन देऊं या.

**श्रीवसिष्ठ**—रामभद्रा, "ही लीला आम्हांस पाहो," असा ज्ञप्ति देवीने संकल्प करिताच त्या दोघी तेथे प्रकाशमान झाल्या व तिच्या दृष्टीं पडल्या. प्रथम चकित झालेल्या तिने त्यांना ओळखिलेच नाही. चंद्राच्या प्रकाशासारखा आपल्या या अंतःपुरांत हा प्रकाश कसला पडला आहे, ह्मणून जेव्हा ती विशेष लक्ष देऊन पाहूं लागली तेव्हा तीला दोघींचे साक्षात् दर्शन झाले. त्यांना पहाताच ती श्रद्धाळु लीला आपल्या आसनावरून उठली व त्यांच्या चरणावर तिने आपलें मस्तक नम्र केले. नंतर हर्षाने जिचे वदन प्रफुल्लित झालें आहे अशी ती लीला त्यांस ह्मणाली, "माझ्या कल्याणाकरिताच येथे आलेल्या तुमचा जय-जयकार असो. तुमच्या परिचारिकेप्रमाणें मी तुमच्या मार्गाचे शोधन करीत ( मार्ग झाडीत ) येथे अगोदर आले" त्यानंतर ज्ञप्तीच्या इच्छे-प्रमाणे त्या तिघीही उत्तम आसनावर बसल्या व ती देवी तिला ह्मणाली. "वत्से, तू आमच्या पूर्वी येथे कशी आलीस? येतांना मार्गामध्ये तू कोठें कोठें काय काय पाहिलेंस? ते पहिल्यापासून सांग." यावर ती ह्मणाली, "देवि, मी विदूरथराजाच्या गृहांत, तो राजावरील भयंकर प्रसंग पाहून मूर्च्छित झाले व त्यानंतर मला काहींएक भासलें नाही. मी गाढ अंधकारांत बुडल्यासारखी झाले. पुढे काही वेळाने, माझी मरण-मूर्च्छा गेली असतां, पूर्वदेहतुल्य वासनापरिकल्पित देहाने मी युक्त झाल्ये व लागलीच आकाशांत उडाल्ये आणि त्या भूताकाशांत प्राणवायु-रूपी रथावर आरूढ होऊन मी या घरांत आले. येथें मला हे रमणीय गृह दिसले. यांत हा माझा विदूरथ पति संग्रामांतील व्यवसायानें श्रांत होत्साता स्वस्थ निजला आहे. त्याच्या श्रमाचा परिहार व्हावा ह्मणून सेव-कांनीं त्याचा हा देह पुष्पांनीं आच्छादित करून ठेविला आहे. देवेश्वरि, मी या माझ्या प्राणनाथाला उठविलें असतें, पण श्रांत झालेल्या त्याला, झोंप पुरी होण्यापूर्वी, जागें करणें मला बरें वाटत नाहीं व त्यामुळें मी त्याच्या जाग्रतीची वाट पहात व त्याच्या सुंदर शरीरावर वारा घालीत बसले होतें.

इतक्यात तुह्मी आला. " राघवा, त्या सुंदरीचे ते भाषण ऐकून देवी थोडेंसें हसून सिद्ध लीलेस ह्मणाली, "बाळे मी आता या राजाचा प्राण सोडते ह्मणजे त्याचा देह पुनः सजीव होईल." असें बोलून तिनें, पूर्वी प्रतिबद्ध करून ठेविलेला, त्याचा प्राण सोडताच तो त्या राजाच्या नासिकेपाशीं गेला व वेळूच्या रंध्रात जसा वायु शिरतो त्याप्रमाणे त्याच्या नासारंध्रात शिरला. समुद्रात जशी असंख्य रत्नें असतात त्याप्रमाणे त्या प्राणरूपी जीवतत्त्वात असंख्य वासना गुप्त होत्या. दाशरथे, काय चमत्कार सांगावा! पाणी न मिळाल्यामुळे सुकलेले लहानसें ( तुळसीचे ) झाड पाणी मिळताच जसे टवटवीत होते त्याप्रमाणे त्याचा जीव वायुरूपाने शरीरात शिरताच त्याच्या मुखावर टवटवी आली. वायूच्या योगाने वृक्षाच्या शाखा जशा हालू लागतात त्याप्रमाणे तो आपले अवयव हालवू लागला त्याच्या शरीरात रस खेळू लागले, चैतन्य संचरलें, व तो कुशीस वळला. काही वेळानें त्याने आपले तेजस्वी डोळे उघडले, जांभई दिली, व त्या पुष्पशय्येवर उठून बसून " कोण आहेरे येथे " असे गंभीर ध्वनीने ह्मटलें. त्याबरोबर त्या दोघी लीला पुढे होऊन, " महाराज, काय आज्ञा आहे ? " असे ह्मणाल्या. तेव्हा आपल्यापुढे अगदी सारख्या आकाराच्या, सारख्या सुंदर, सारख्या तरुण, व एकसारखेच भाषण करणाऱ्या दोन स्त्रिया नम्र होऊन उभ्या आहेत, असे पाहून तो ह्मणाला. " तू कोण ? व ही कोण ? कोठून आली ?" तेव्हा लीला त्यास ह्मणाली, " देव, ऐका. मी आपली लीला नामक पत्नी आहे. शब्द व अर्थ यांचा जसा नित्य संबंध असतो त्याप्रमाणे आपल्याशी नित्य–संबद्ध असलेली मी आपली सहधर्मचारिणी आहे. मी (लीलेने) ही दुसरी लीला आपल्या उपभोगाकरिता उत्पन्न केली आहे. महाराज, आपल्या उशाशीं सुवर्णाच्या आसनावर बसलेल्या या ज्ञप्ति देवीस वंदन करावे. आह्मा उभयताच्या पुण्यसंचयामुळे ती देवी येथे साक्षात् आली आहे. ही सरस्वती त्रैलोक्याची जननी आहे. हिनेच आह्मा उभयतास दुसऱ्या ब्रह्मांडातून येथें परत आणिलें. " कौसल्यानंदना, तिचे हें भाषण ऐकून राजास परम आनंद झाला. तो लागलाच आपल्या शय्येवरून उठला व गळ्यातील माळा, हार, अंगावरील वस्त्रे, विखुरलेले केस इत्यादिकास सावरून मोठ्या आदरानें तिच्या चरणकमलीं लीन झाला व म्हणाला

" हे सरस्वति देवि, तुला नमस्कार असो. हे सर्व–हितप्रदे, मला विद्या व परमार्थ यास धारण करणारी बुद्धि, दीर्घ आयुष्य, व धन दे." तें ऐकताच देवीने त्याच्या मस्तकावर हात ठेविला व ह्मटले, " पुत्रा, तुला ऐहिक व पारलौकिक इष्ट अर्थ प्राप्त होवोत. तुझ्या सर्व आपत्ति व पापबुद्धि नष्ट होवोत. तुझा अनेक प्रकारे अभ्युदय होवो, तुझ्या राज्यातील लोक सुखी राहोत व तुझ्या या गृहामध्ये सपत्ति सदा वास करो ५८.

**सर्ग ५९**—या सर्गात–राजा जिवत झाला, असे ऐकून नगरातील लोकानीं केलेला उत्सव, त्या जीवन्मुक्ताचे चिरकाल राज्य व मुक्ति याचे वर्णन करितात.

**श्रीवसिष्ठ**—रामचद्रा, असा वर देऊन ती देवी तेथेच गुप्त झाली व इतक्यात प्रभात झाल्याकारणाने पद्माच्या नगरातील सर्व लोक जागे झाले. लीला मोठ्या आनदाने त्या नूतन लीलेस व मरून पुन जिवत झालेल्या आपल्या प्राणनाथास पुन पुन' आलिगन देऊ लागली राजाच्या मदिरात मोटा आनदोत्सव सुरू झाला नृत्य, गायन, वाद्य–वादन, स्तुतिपाठ, पुष्पवर्षाव, मगलकृत्ये, दाने, देणग्या, इत्यादिकाची त्या राजमदिरात व नगरात एकच गर्दी झाली पद्माची कीर्ति सर्वत्र पसरली. सरस्वती देवीच्या कृपेने तो पुन' जीवत झाला, ही वार्ता आबाल वृद्धाच्या तोडी झाली सर्व आनन्दसागरात निमग्न झाले. राजानेही लीलेच्या मुखाने सर्व वृत्तात ऐकिला व त्यालाही वर वर पाहणारास अतिरमणीय वाटणाऱ्या ससाराचे तत्त्व समजले. ब्राह्मणानी राजास व त्याच्या पत्नीस शुभ आशीर्वाद दिले. नतर चारी समुद्रातून व तीर्थातून आणलेल्या जलाने मत्री, ब्राह्मण, माडलिक राजे व सेनापती या सर्वानी त्यास सिहासनावर पुन अभिषेक केला. नतर परलोकातून परत आलेला महा बुद्धिमान् जीवन्मुक्त राजा पद्म व दोघी लीला अशी ती पूर्व वृत्तात सागत राममाण झाली. सरस्वतीच्या प्रसादानें व देवीची आराधना करणें इत्यादि स्वपौरुषाने त्या राजास येणेप्रमाणे परम प्रशस्त जीवितं, राज्य, व ज्ञान प्राप्त झाले. ज्ञप्तीच्या उपदेशामुळे ज्याला आत्मतत्त्व समजलें आहे असा तो राजा ऐशीं सहस्रवर्षे राज्याचा उपभोग घेता झाला. ते त्याचे राज्य प्रजेच्या अभ्युदयानी निर्दोष होते. त्यातील विद्वान् शास्त्रानुरूप वर्तन करीत असल्यामुळे ते रमणीय होते; कुलपरपरेनें युक्त होतें;

भोग, यश व धर्म यास कारण होणारे ते सर्वांस हितकर होते व जन-मनोरंजक असलेले ते सर्वांस संतोष देणारे होतें. सारांश अशाप्रकारच्या त्या स्वाराज्याचा दीर्घकाल उपभोग घेऊन ती दोघे विदेह कैवल्यास प्राप्त झाली. ( दुसरी लीला पहिल्या लीलेच्या प्रतिबिंबरूप असल्यामुळे येथें दोघे असे ह्मटले आहे ) ५९.

**सर्ग ६०** --या सर्गांत अगोदर लीलाख्यानाचे प्रयोजन सांगून कालादिकांच्या साम्य-वैषम्याचे कारण सांगतात.

**श्रीवसिष्ठ**--राघवा, " दृश्य आहे, " असा जो तुला भ्रम झाला आहे त्याचे निवारण करण्याकरितां मी हे सुंदर लीलोपाख्यान सांगितले. आतां त्याचा चांगला विचार करून जगाची सत्यता टाक. जगत्सत्ता शांत झाली की, दृश्यनिवृत्ति आपोआप होते. कारण सत्यवस्तूचे मार्जन ( निवृत्ति ) जसे अशक्य व दुर्घट असते तसे असत्य वस्तूचे नसते. तत्त्वज्ञ दृश्य व द्रष्टा यांचे ऐक्य जाणतो. कारण सृष्टीच्या आरंभींही हिरण्यगर्भाने आपल्या चिच्छक्तीच्या कल्पनेनेच हे पृथिव्यादि पदार्थ निर्माण केले, हे तो विसरत नाही. ( गारा व बर्फाचे तुकडे वस्तुतः जरी द्रवरूप असले तरी कांहीं कारणानें ते घनरूप दिसतात पण त्यांच्या त्या औपाधिक घनरूपतेमुळे स्वाभाविक द्रवरूपत्व नष्ट होत नाही. त्याचप्रमाणे हे घन दृश्य संविद्रूप आहे. त्याचे घनत्व औपाधिक असून संविद्रूपत्व स्वाभाविक आहे. ) सारांश, दृश्य ही भ्रांति आहे. तिला स्वतंत्र सत्ता नाही. तिला कांहीं नियम नाही व तिच्याविषयीं आस्था बाळगणेंही फारसे योग्य नाही. मायादृष्टि असेपर्यंत ते असते व मायापटल जाऊन परमार्थ-दृष्टि प्राप्त झाली की, ते नाहीसे होते.

**श्रीराम**--अहाहा ! विप्रवर्य, आपण मला या आख्यानाच्या द्वारा परम दृष्टि दिलीत. पुष्कळ दिवसांनी हे ज्ञातव्य आज मला कळलें. गुरुराज, या आख्यानश्रवणाने माझे चित्त शांत झाले. आपल्या वाणीनें या श्रोत्रेंद्रियास पवित्र करण्याचा हा योग फारच मोठ्या पुण्यसंचयामुळें आला, यांत संशय नाही. पण श्रवणाविषयीं माझी उत्सुकता वाढत चालली आहे. यास्तव गुरुवर्य--माझ्या या संशयाची निवृत्ति करावी. वसिष्ठ ब्राह्मण, पद्म व विदूरथ यांचे तीन सर्ग आपण मला सांगितलेत. पण त्यांत गेलेला काळ कोठें आठ दिवस, तर कोठें मास; कोठे अनेक वर्षे, तर कोठें क्षण;

असा भिन्न भिन्न प्रमाणाचा आपण सांगितलात. त्याचे कारण काय? सर्व सर्गांत कालाचे एकच प्रमाण का नाही? पूर्वी आपण या प्रश्नाचे उत्तर थोडक्यात दिले आहे पण वाळलेल्या मातीच्या ढेकळावर दहा पाच जलबिंदु सोडले तरी ते जसे कोरडे ठणठणीतच रहाते त्याप्रमाणे माझे चित्त अतृप्त आहे. ह्मणून मी पुनरपि तोच प्रश्न विचारीत आहें.

**श्रीवसिष्ठ**—रामा, विषयाची प्रतीति, विषयाची सत्ता असेल त्याप्रमाणे येत नाही. ह्मणजे ती विषयसत्तानुसारिणी नाही तर विषयसत्ता प्रतीतीच्या अनुरोधाने रहाणारी आहे त्यामुळे प्रत्येक द्रष्ट्याच्या प्रतीतीप्रमाणे विषय-सत्ता निरनिराळ्या प्रकारची भासते. सर्व काही द्रष्ट्या जीवाच्या हातात आहे व त्याच्या कल्पनेप्रमाणे सर्व स्थिर किंवा अस्थिर अनुकूल किंवा प्रतिकूल होते विषही "हे अमृत आहे" अशी सतत भावना केल्यास अमृत होते. "हा माझा शत्रु नसून मित्र आहे" अशी दीर्घकाल भावना केल्यास शत्रुही मित्र होतो.

**श्रीराम**—गुरुराज, एकाद्याने न कळत विष खाल्यास त्याचा परिणाम अनिष्ट होतो की नाही? केवळ भावनेनेच जर विषाच्या विषत्वाची व अमृताच्या अमृतत्वाची सिद्धि झाली असती तर न कळत खाल्लेल्या विषाचे ठायी, खाणाऱ्याची हे विष आहे अशी भावनाच नसल्यामुळे, विषत्व नसते व विषत्वाच्या अभावीं त्याच्या शरीरावर त्या विषभक्षणाचा अनिष्ट परिणाम घडला नसता. पण तसे होत नाही. याचे कारण काय?

**श्रीवसिष्ठ**—प्रिय रामा, त्याचेही कारण त्या पिणाराची भावनाच. त्याने जर हें लौकिक विष आहे, असे समजून "ते विष नसून अमृत आहे" अशी ध्यानाने दृढ भावना केली असती तर त्याला त्याच्यामुळे मरण आलें नसते. पण न कळत पोटात गेलेल्या विषाविषयी त्याने तशी भावना केलेली नसल्यामुळे व लौकिक विष मारक आहे, अशीच त्याची दृढ भावना असल्यामुळे त्यास त्याच्या योगानें मरण येणे अगदी साहजिक व न्याय्यच आहे. तस्मात् एकाद्या पदार्थाविषयीं दीर्घकाल सतत अभ्यासाने एकादी भावना दृढ केली असतां तीच त्याची नियति बनते. आपण जी जी कल्पना करितों ती ती चैतन्याच्या ठायीं आरोपित असल्यामुळें स्वतः चैतन्यच कल्पनारूप होते. कल्पना सदा कल्पकाच्या अधीन असते. चैतन्याच्या अधीन ती केव्हाही नसते. त्यामुळे चैत-

त्याचे ठायी कल्पक जीव आपल्या संस्काराप्रमाणे जशी जशी कल्पना करितात तसा तसा अनुभव येतो. कोणी एकादा ज्या चैतन्यास निमेष समजतो त्यालाच दुसरा कल्प मानतो चार प्रहर प्रमाणाची रात्र दुःखितास वर्षासारखी वाटते व सुखितास क्षणासारखी भासते. रामा, याविषयी अधिक सांगण्याची आवश्यकताच नाही. कारण, आपणाला स्वप्न अनुभव, पुराणातील हरिश्चंद्रादिकांच्या कथा इत्यादिकावरून ते सहज समजण्यासारखे आहे. मनूचे जे आयुष्य तोच प्रजापतीचा एक क्षण. प्रजापतीचा आयुःकाल ह्मणजे चक्रपाणीचा एक दिवस. विष्णूची आयुर्मर्यादा ह्मणजे शंकराचा एक वार व ध्यानामध्ये लीन झाल्याकारणाने ज्याचे चित्तच क्षीण होऊन गेले आहे त्याला दिवसही नाहींत व रात्रीही नाहीत आत्म्यामध्ये निमग्न झालेल्या योग्यास तर हे पदार्थ व हे जगही नाही. तेव्हा आता तू या कालाविषयी काय समजणार? तो सत्य आहे असे ह्मणणार की असत्य आहे, काल्पनिक आहे, इत्यादि समजणार? रामा आपल्या या भूलोकीच पाहिनास! एके ठिकाणी जेव्हा दिवस असतो तेव्हा दुसऱ्या ठिकाणीं रात्र असते, एके ठिकाणचे लोक आता मध्याह्न काल झाला आहे, असे समजतात व त्याचवेळी दुसऱ्या ठिकाणीं लोक सायकाल झाला ह्मणून दीपादिकास प्रकाशित करू लागतात. कोणी आज आमचा पाडवा आहे, दिवाळी आहे, दसरा आहे ह्मणून आनंद करितात तर दुसरे त्याच दिवशीं उदासीन किंवा दुःखी असतात सारांश, काल कल्पनामय आहे. पशु, पक्षी, मत्स्य, कीट, इत्यादिकांच्या कालाविषयीं तर बोलावयासच नको. त्याना कल्पना करण्याचेंच सामर्थ्य नसल्यामुळें त्याना क्षणही नाहीं व कल्पही नाही अथवा त्याना नेहमींच कल्प व नेहमीच क्षण आहेत. बाबारे, कल्पनावशात् प्रिय वस्तुही अप्रिय होते व अप्रियवस्तु प्रिय होते. इंद्रिये, मन, प्राण इत्यादिकांचा निरोध करावयास जेव्हा आपण प्रथम आरंभ करितो तेव्हा किती कष्ट होतात बरें? पण अभ्यासाने त्यापासूनच पुढे आनंद होतो. विषयलंपट पुरुषास गुरु, शास्त्र, त्यानीं सांगितलेले अनुष्ठान, जप इत्यादि सर्व प्रथम दुःखदायी वाटतात; पण पुढें सवयीनें त्याच्या पासूनच परम सुख मिळते. आईबापे बालकाची शेंडी ठेवण्याचा उत्सव करितात. पण तें अर्भक मोठमोठ्याने आक्रोश करितें. तात्पर्य सर्व काहीं भावनेच्या अधीन आहे.

प्रतीतीच्या अधीन पदार्थाची सत्ता, पदार्थसत्तेच्या अधीन प्रतीति नाहीं. प्रतीतिच्या योगानेच भासणाऱ्या पदार्थांच्या द्वाराही, मागे म्हटल्याप्रमाणें अर्थक्रिया होऊ शकते. अर्थात् पाणी प्याले असता तहान भागणे, चालून गेले असता उद्दिष्टस्थळी पोचणे इत्यादि व्यवहार, स्वप्नातील व्यवहाराप्रमाणे, मिथ्या प्रपचाच्या द्वारा होऊ शकतात यास्तव सर्व दृश्य असत् आहे, असे तू जाण. तो मायेचा विलास आहे हे तू विसरू नको. सर्व जग समष्टि-व्यष्टि मनाचे कार्य आहे. त्यामुळेच ते मनोमय व मिथ्या आहे. बाळकास किंवा भितऱ्या व खुळ्या माणसास अधकारामध्ये भूत दिसते, त्याच्या कल्पनेप्रमाणेच त्यास त्याचा आकारही भासतो, व आपल्या कल्पनेनेच तो शेवटी भूतबाधा होऊन मरतो जगाचीही अगदी तशीच अवस्था आहे. जगातील पदार्थ निरनिराळ्या आकाराचे दिसतात, हे खरे पण तो आकार मध्य-अवस्थेतच भासणारा असून आदि व अंत या अवस्थामध्ये मुळीच अनुभवास येणारा नसल्यामुळे असत् आहे. ब्रह्मदेवाच्या सकल्पाप्रमाणें इष्ट अथवा अनिष्ट जाणतो. सृष्टीच्या पूर्वी, सोन्यातील द्रवाप्रमाणे, जग त्या परमात्म्यामध्ये असते अथवा वसत ऋतु लागताच व्यक्त होणारी झाडाची शोभा शिशिरात्र्ये असती जशी झाडामध्ये अव्यक्त असते, व वृक्षाच्या आधारानेच ती रहाते त्याप्रमाणे हे जग त्या महा-तत्त्वामध्ये अव्यक्त व तद्रूप व तदाधार असते जीव हा त्या परमात्म्याचा अतिसूक्ष्म कल्पित भाग आहे अशा असख्य भागात एकेक जीवभोग्य सर्ग रहातो. पण त्या सर्गास त्रिकाळी त्या परमात्म्याचाच आधार आहे. कारण अगी आत्मा व अगे ( अवयव, भाग ) जीव यामध्ये वास्तविक भेद नाही त्याची सत्ता अभिन्न ( एक ) आहे. ह्मणजे अगीच्या सत्तेनेच अगे सत्तावान् आहेत स्वप्नामध्ये एक मनुष्य दुसऱ्याशी भाडते त्यावेळी ज्याला ते स्वप्न दिसते त्याच्या दृष्टीने जरी ते भाडण सत्य असले तरी इतराच्या व ज्याच्याशी तो भाडत असतो त्याच्याही दृष्टीने ते जसे असत् असते त्याच प्रमाणे हे मायाकाशातील जगही, मायेच्या योगाने ज्याची दृष्टि आवृत झालेली असते त्याच्या दृष्टीने जरी सत्य असले तरी आत्मज्ञानी पुरुषाच्या शुद्ध दृष्टीने ते असत्च असते. कारण त्याच्या उत्पत्तीचा पूर्वकाल व नाशानतरचा काल यामध्ये ते केवल ब्रह्मभावानेच अवशिष्ट रहातें आणि

ह्मणूनच त्यास चिन्मात्रस्वभावना असते ( ह्म. केवल चैतन्यरूपत्व हा त्याचा स्वभाव असतो. ) ब्रह्म कारण व जगत् कार्य हा जो भेद आहे तो उत्पत्तीनंतर, कार्य भिन्न झाल्यावर, त्याच्या अपेक्षेने होणारा आहे. त्यामुळे तो सत्य ( त्रैकालिक ) नव्हे. तर केवल मध्य–अवस्थेत ( ह्म. वर्तमानकाली, कार्याच्या उत्पत्तीपासून नाशापर्यंत ) अनुभवास येणारा आहे. एक हिरण्यगर्भ आपला अधिकार सपवून ब्रह्ममय झाला असता, पुढच्या सर्गाच्या आरभीं, पूर्व सर्गात हिरण्यगर्भच मी आहे, अशी ज्याने उपासना केलेली असून ती परिपूर्ण झालेली असते त्यास त्या उपासनेच्या सस्कारामुळे मी हिरण्यगर्भ आहे, अशी स्मृति होते. स्मृति वृत्तिरूप असते. वृत्ति अतःकरणावाचून उत्पन्न होत नाहीं व अतःकरण हा आत्मा नव्हे, तर अनात्मा आहे. अर्थात् चैतन्याच्या सामर्थ्याने अतःकरणात उद्भवणारी ती स्मृति कल्पित होय. तेव्हा अशा कल्पित हिरण्यगर्भाच्या सकल्पामुळे निर्माण होणारे हे जग अधिष्ठानाच्या सत्तेने सत्तायुक्त झालें आहे त्याला स्वतःची सत्ता नाही.

**श्रीराम**—पण गुरुराज, भिन्न भिन्न ब्रह्मांडात असलेल्या प्राण्याच्या वासनादिकाप्रमाणेच एका नगरात असलेल्या प्राण्याच्याही वासना, कर्में इत्यादि विचित्र ( परस्पर असदृश, भिन्न भिन्न ) असली पाहिजेत व तीं तशी असल्यास स्वप्नाप्रमाणे जागरातही क्रमवैचित्र्य असावयास पाहिजे. पण ते अनुभवास येत नाहीं कारण तसे असतें तर नगरातील लोक व मुख्य मत्री यास विदूरथाचा कुलक्रम एकसारखाच कसा प्रतीत झाला असता ? त्यातील प्रत्येकाची वासना व कर्मे भिन्न भिन्न असल्या-कारणाने स्वप्नाप्रमाणे प्रत्येकाला अगदीं निरानिराळा अनुभव येणेंच उचित होते.

**श्रीवसिष्ठ**—स्रष्ट्याच्या सकल्पाप्रमाणे सर्व काही होतें. इतर जीवाच्या सविदानी मुख्य जीवाच्या सविदेच्या अनुरोधानें रहावे, असा त्याने सकल्प केलेला असल्यास तीच नियति होते व त्याप्रमाणें जीवाचा परस्पर व्यवहार होत रहातो लहानशी वाऱ्याची झुळुक जशी मोठ्या वाऱ्याच्या अतर्गत असून त्याच्या अनुरोधाने रहाते तसाच हा प्रकार आहे. प्राण्याचीं विचित्र कर्मेही कर्मकालाप्रमाणेच फलसमयीही दुसऱ्याच्या कर्मांशीं व फलांशीं मिश्रित झालेलीं असतात. स्वप्नातील कर्में व

फल याचा संबंध केवल अंतःकरणाशीं असतो. पण जागरांतील कर्मे व फलें एकमेकाच्या कर्माशीं व फलाशीं संबद्ध असतात, हे प्रसिद्ध आहे. ह्मणजेच जागराला व्यावहारिक सत्ता आहे व स्वप्नाला तीही नाही. पण हा त्या अवस्थांचा अवांतर भेद आहे बाकी मनोमयत्व, काल्पनिकत्व, संकल्पमात्रत्व हे धर्म त्या दोन्हींच्या ठायीं एकसारखेच असल्यामुळे त्यांचा वास्तविक व मुख्य भेद नाही प्रजा व मंत्री हा आमचा राजा, तो अमुक कुळांत उत्पन्न झाला, त्याचे हे राज्य इत्यादि आणि राजा, हा मी विदूरथ राजा, हे माझे राज्य, हे मंत्री, ही प्रजा इत्यादि कल्पना करीत होता ती त्यांची कल्पना फार दिवसांच्या अभ्यासाने सुदृढ झाली होती व तिच्या अनुरोधाने त्यांचा व्यवहार होत होता पण तो काल्पनिक व त्यामुळेच असत्य होय. आता तू ह्मणशील की, उदासीन संवित् आरोपित ( काल्पनिक, भ्रामक ) विषयाच्या आकाराची कशी होते ? पण त्याचे कारण शोधून काढण्यासाठी फार प्रयास करण्याची आवश्यकताच नाहीं. कारण चिंतामणि ( चिंतिलेले देणारा मणि ) जरी उदासीन असला तरी त्याचे चोहोकडे पसरणारे तेज स्वाभाविक असल्यामुळे “ ते का पसरते ” असा ज्याप्रमाणें प्रश्न करिता येत नाही त्याप्रमाणेच विषयाकार होणे हा संवित्-स्वभाव असल्याकारणाने त्याविषयीं प्रश्न करणे अनुचित होय. चिंतामणी-जवळ प्रार्थना करणारे लोक आपल्या भिन्न भिन्न मनोरथाप्रमाणे निरनिराळ्या वस्तूविषयीं प्रार्थना करितात व प्रार्थनेप्रमाणे तो प्रत्येकास भिन्न भिन्न विषय देतो. पण त्यामुळें त्याच्याकडे कोणत्याही प्रकारचा दोष न येता विचित्र फल प्राप्त होण्यास जसा चिंतकाचा मनोरथच कारण होतो त्याप्रमाणें विषयवैचित्र्याचेही खरे कारण संवित् नसून विषयच आहेत. जीवाच्या विचित्र संकल्पाप्रमाणे विचित्र फल. हा चिन्मणिही मनोरथा-प्रमाणे विषयास प्रसवतो. ज्या सर्गांत जेव्हा जेव्हा जे व जितके जंतु असतात ते सर्व, चिद्धातु सर्वगत असल्यामुळे परस्पराचे आदर्श ( आरसे, प्रतिबिंब पडण्यास योग्य असे स्थान ) होतात व व्यवहार करू लागतात.

**श्रीराम**—पण सद्गुरो, बिंब असेपर्यंत प्रतिबिंब अवश्य पडणारच, असा जर नियम आहे तर निर्विषयतारूप मोक्ष कसा मिळणार ?

**श्रीवासिष्ठ**—बाबारे, अनेक जीवसंवित्–पैकीं जी जीवसंवित् ( ह्मणजे ब्रह्माकारवृत्ति ) तीव्रवेगवाली व त्यामुळेच विषयरूपी दोषानीं कषायमान

न होणारी असते आणि त्याच स्थिर अवस्थेत जी मोक्षापर्यंत एकरूपानें रहाते तीच मोक्षास प्राप्त होते. ( ब्रह्मभावाने अत्यंत स्थिर होणे हाच मोक्ष होय. ) अर्थात् जीवचैतन्यात जगदाकाराचे अथवा ब्रह्माकाराचे प्रतिबिंब पडण्यास तीव्र वेगामुळे प्राप्त होणारे चिद्विलासच कारण होतात. सामान्यतः पाहिल्यास दीर्घकालापासून ज्याचा अभ्यास झाला आहे अशा जगाविषयी तीव्रवेग असणे युक्त आहे, असे दिसते व प्रायः प्राणी जगदुन्मुख असतात; विषयोन्मुख असतात, ब्रह्मोन्मुख नसतात, असेच आढळते. त्यामुळे मोक्षाची आशा करणेंही व्यर्थ आहे, असें मनात येते. पण स्वाभाविक वेगाहून यत्नाने उत्पन्न केलेला वेग अधिक बलवान् असतो, असें आपण नेहमी पहातों व त्यामुळे थोडासा धीर येतो. अति प्रयत्नाने ब्रह्माकार वेग संपादन केल्यास तो स्वाभाविक जगदाकार चिद्विलासाच्या वेगास जिंकू शकतो. शिवाय सत्यज्ञान मिथ्याज्ञानाहून अतिशय प्रबल असतें, हें आह्मास ठाऊक आहे. त्यामुळें महानदी संगम पावलेल्या इतर क्षुद्र नद्यास जशी आपल्या उदरात साठविते त्याप्रमाणे सत्य ब्रह्माकार ज्ञान इतर मिथ्या ज्ञानास स्वाधीन करून सोडिते. पण सर्वच अधिकारी सारख्या योग्यतेचे नसतात. कित्येकाचा विषयवेग प्रबल असतो, कित्येकाचा परमात्मविषयक वेग प्रबल असतो व कित्येकांचे दोन्ही वेग समबल असतात. त्यातील प्रबल वेग दुर्बलास आपल्या स्वाधीन करून घेतो, हे वर सांगितलेच आहे. आता दोन्ही वेग समबल असल्यास त्यातील आपणास इष्ट असलेला वेग अधिक बलाढ्य करण्याकरिता काय करावें तें सांगतों. प्रयत्न हेच त्याचें औषध आहे. त्याच्या योगानें हवें तें करिता येतें. सृष्टींतील प्रत्येक वस्तु प्रयत्नसाध्य आहे. पण अशुभ वेगाचा सर्वथैव त्याग करून अथवा त्यास प्रतिबंध करून शुभ वेगच वाढविण्याची बुद्धि पूर्वपुण्य—परिपाकावाचून होत नाहीं पण ज्या कित्येक भाग्यवानास ती होते त्याचा विषयवेग कांहीं काल जरी ब्रह्मात्मवेगा—प्रमाणेंच बलवान् असला तरी ते त्यास फार वेळ टिकू देत नाहींत. तर ब्रह्माकार वेग उत्कर्षाच्या पराकाष्ठेस पोचेपर्यंत व तो दुसरा ह्मणजे विषयवेग सर्व बाह्याकारांसह ब्रह्मज्ञानात मिळून जाईपर्यंत श्रवण, मनन व निदिध्यास याच्या योगानें यत्न करितात. तात्पर्य तीव्रवेगाचा उदय

झाला असता दुर्लभ मोक्षही सुलभ होतो. प्रयत्नाने व्यावहारिक नियमाचा भग व अव्यावहारिक मोक्षाचा उदय होणे शक्य आहे. असो, तस्मात् जीवरूपी चैतन्य–कणास सहस्रावधि सम–विषम भ्रात सर्ग जरी भासले तरी परमार्थत त्यास त्याची प्राप्ति होत नाही. कारण जी सत्य वस्तूच नसते तिची प्राप्ति अथवा अप्राप्ति होणे शक्य नाही. यास्तव रामा, कोणी कोणाला व्यापिले नाही व कोणी कोणाच्या आधारानें स्थित नाही. तर जे काही अनुभवास येत आहे ते सर्व अस्थूल व शात चिदाकाशच आहे, असे त समज. निद्रेवाचूनच विवेकदृष्टिरहितास भासणारे हे स्वप्न आहे. हे सर्व सत्य आहे, असे ज्यास भ्रातीने भासत असते त्यासही अधिष्ठानभूत चैतन्याचा साक्षात्कार झाला असता ते सर्व असत् वाटू लागते. केवळ वाटू लागते इतकेच नव्हें तर तें असत् आहे, असा दृढ निश्चय होतो. राघवा एवढ्या या माझ्या सागण्यावरून, शुद्ध ब्रह्म दृष्ट्या प्रपचास भिन्न सत्ता नाही. तर तो अधिष्ठानाच्या सत्तेनेच सत्तावान् आहे, हे तुला समजले असेल. आता माया शबल दृष्टीनेही त्यास स्वतत्र सत्ता कशी नाही, ते सागतो. पाने, फुले, फळें इत्यादि अशानी युक्त असलेल्या वृक्षास 'हा एक वृक्ष' असेच ह्मणतात. त्याप्रमाणे अनत शक्ती हे ज्याचे अश आहेत अशा प्रभूला एक ह्मणणे उचित आहे. नुस्त्या पानाना किवा फुलाना, अथवा फळाना जसें कोणी वृक्ष ह्मणत नाही, अथवा ती पर्णादिक त्याच्या वाचून स्वतत्रपणें उत्पन्न होऊन राहू शकत नाहीत त्याप्रमाणे ईश्वराच्या प्रत्येक शक्तीला ईश्वर ह्मणणे योग्य नाही व त्या शक्ती त्याच्या वाचून स्वतत्रपणे राहू शकणार नाहीत. जगात अनुभवास येणारा प्रत्येक आकार, प्रत्येक नाव व प्रत्येक शक्ति उक्तरीत्या जरी परमात्मरूप असली तरी आत्म्याच्या अज्ञानाने ज्याची दृष्टि आच्छादित झाली आहे, अशा जीवास आत्मसाक्षात्कार होईतो त्यातील प्रत्येक वस्तु भिन्न भासते. पण साक्षात्कारानतर त्यास पुन तसा भ्रम होत नाही. तर नित्य, एक, सर्वसाक्षी, सदा शुद्ध, सर्व विकाररहित, आद्यतमध्यरहित अशा आत्मतत्त्वाचाच अनुभव येतो. यास्तव हे राघवा, मी, तू हे जग इत्यादि या सर्व कल्पना व्यर्थ आहेत ६०.

**सर्ग ६१—मोक्षरूप प्रयोजन सिद्ध होण्याकरितां व वैराग्य उत्पन्न होण्याकरितां संसार असत् आहे व असार आहे, असें अनेक युक्तींनीं या सर्गांत वर्णन करितात.**

**श्रीराम**—भगवन् " मी " असा अहंभाव करण्यास कांहीं कारण नसतांना व जीव–परमाणूंमध्ये विपुल सृष्टीचा समावेश होण्यास फारसें निमित्त नसतांना "हा मी" व " हें विस्तृत जग" अशी भ्रांति का होते? पूर्वी एकदा आपण याचे कारण थोडक्यात सागितले आहे. पण ते माझ्या बुद्धीवर चागले आरूढ झाले नाहीं. यास्तव चांगल्या चांगल्या दृष्टांतांनीं तें मला समजावून सागा.

**श्रीवसिष्ठ**—बा सच्छिष्या, ज्याअर्थी बोद्धा ( जीव ) सर्व प्रकारच्या समस्त भ्रातींस स्वरूप चैतन्याच्या आत सर्वदा जाणतो, त्याच्या बाहेर असलेल्या कोणत्याही भ्रातीस तो कधीच जाणत नाहीं त्याअर्थी हें सर्व सर्वदा सर्वरूप आहे. ह्मणजे सर्व सम आहे. कारण सर्वच सर्वात्मक झाल्यावर वैषम्य रहात नाहीं. त्यामुळें जन्म, मरण, वृद्धि, क्षय इत्यादि विक्रियाही वस्तुतः युक्त नव्हेत. तस्मात् एक अज परमात्माच आहे व जगद्भ्राति कारणशून्य आहे. आता–विषयाशीं तादात्म्य पावल्यामुळें घटज्ञान, पटज्ञान, पुस्तकज्ञान, इत्यादि ज्ञानामध्यें भेद उत्पन्न होतो व अनुभवही तसाच ( भेदरूपाने ) येतो. तेव्हा, चैतन्यात अनुभव येतो, एवढ्याच कारणाने सर्व सर्वात्मक ( चैतन्यात्मरूप ) आहे, असें कसें ह्मणतां येईल? ह्मणून ह्मणशील तर सागतों. घट, पट, पुस्तक इत्यादि उपाधींमुळें घटज्ञान, पटज्ञान इत्यादि जरी शब्दव्यवहार व अर्थव्यवहार होत असला तरी चैतन्यात काहीं भेद पडत नाहीं. कारण सर्व शब्दबोध व सर्व अर्थ-बोध ब्रह्मरूप आहेत व चैतन्यधातु ब्रह्माहून निराळा नाहीं. विषयसबद्ध झाल्या कारणानें चैतन्याचे ठायीं भेद असल्यासारखा भासतो. पण तो खरा नव्हे. कारण विवेकदृष्टीने चैतन्यास विषयापासून भिन्न केलें ह्मणजे त्यात भेद मुळींच आढळत नाहीं. आता–चैतन्य विषयाकार झालें आहे, असा अनुभव येतो हें खरें; पण वस्तुतः चैतन्य निरंश, निराकार व सूक्ष्म असल्यामुळें तो त्याचा अनुभूत आकारही भ्रामक आहे. चैतन्याचा तो स्वाभाविक धर्म नव्हे. शिवाय जडाच्या अगदीं विरुद्ध असलेल्या चैतन्यात जडाचा आकार असतो, असे सिद्ध करावयाचे झाल्यास एकही अनुकूल युक्ति

सापडत नाहीं. तर मग अनुभवास येणारा विषय—आकार कोणाचा ? ह्मणून ह्मणशील तर सांगतों. तो वृत्तीचा होय. वृत्ति ह्मणजे अंतःकरणापासून विषयापर्यंत इंद्रियाच्या द्वारा प्रवाहासारखा चालणारा एकप्रकारचा सूक्ष्म चित्तपरिणाम. सारांश चैतन्याचा भेद असिद्ध आहे. त्याचप्रमाणें जडाच्या भेदाचेंही निरसन करितां येतें. तें कसें ह्मणून विचारशील तर सांगतों. हा घट, हें पुस्तक, ही लेखणी इत्यादि भिन्न पदार्थांचा अनुभव चैतन्यावाचून येत नाहीं. त्यामुळें चैतन्याच्या सत्तेनेंच सत्तायुक्त होणारे ते वस्तुतः भिन्न कसे ? हें मोठ्या तार्किकालाही सांगतां येणें शक्य नाहीं. एवढ्याकरितांच आह्मी वेदान्ती—सोन्याहून कटकत्व ( कडेपणा ) व जलाहून तरंगत्व जसें भिन्न संभवत नाहीं त्याप्रमाणें जग ईश्वराहून भिन्न असणें संभवत नाहीं—असें नेहमीं ह्मणत असतों.

**श्रीराम**—पण, विद्वद्वर्य यावरून कड्याचें जसें सोनें कारण आहे त्याप्रमाणेंच जगाचें चैतन्यात्मरूप ब्रह्म कारण आहे ? असें नाहींका होत. मग तें कारणावाचून उत्पन्न झालें आहे, असें आपण सांगत असतां त्याची काय वाट ?

**श्रीवासिष्ठ**—अरे वेड्या, जग जर त्याच्याहून भिन्न असतें तर त्यांतील पूर्वी असणारें ब्रह्म कारण व नंतर असणारें जग त्याचें कार्य, असें ह्मणतां आलें असतें. पण तें त्याच्याहून अगदीं अभिन्न आहे. एकच वस्तु आपलेंच कारण किंवा कार्य कसें होणार ? तस्मात् हा आत्माच जगद्रूप झाला आहे; असें तूं जाण. पण त्या ईश्वरामध्यें जगद्रूप नसतें. सोनेंच कडें, कुंडल इत्यादि होतें पण सोन्यांत कटकत्वादि नसतें. कारण विवर्त अधिष्ठानाच्या आश्रयानें असतो. पण त्याहून भिन्न नसतो. असें जर आहे तर एकास अनेकरूपता कशी आली ? ह्मणून ह्मणशील तर त्याचें उत्तर असें—व्यावहारिक सत्तेनें युक्त असलेल्या शाखा, पानें, हात, पाय इत्यादि अनेक अवयवांशीं व्यावहारिक सत्तायुक्त वृक्ष, देह इत्यादि अवयवीचें तादात्म्य होत असल्याचें जर आह्मी व्यवहारांत प्रत्यहीं पहात आहों तर कल्पित अनेक वस्तूंशीं वास्तविक ब्रह्माचें तादात्म्य होतें ह्मणून निःशंकपणें ह्मणण्यास कोणती भीति आहे ? अर्थात् व्यवहारांत वृक्ष अवयवदृष्ट्या जसा खरोखरीच अनेकरूप होतो त्याप्रमाणें एक ब्रह्म काल्पनिक अनेकरूप होतें. तर मग सर्वानुभव-

सिद्ध जगत्, मी इत्यादि नानात्व कसें व का आलें? या प्रश्नाचे आतां उत्तर दिले पाहिजे. ब्रह्मरूप आत्मस्वरूपास न जाणणे (ह्मणजे आत्माज्ञान) हेच जग व अहं आहे. स्फटिक मण्याच्या मध्यभागीं रेघाचा लवलेशही नसतो, पण त्यात जसें अनेक रेघाचे प्रतिबिंब दिसते त्याचप्रमाणें चिद्धन आकाशात आकाशरूप जग व अहं भासतें. पण लीन झालेले तरंग महाजलात जसे अवयवरूपाने रहातात अथवा अवयवी (अवयववान् देह, वृक्ष, इत्यादि पदार्थ) अवयवाचे ठायी जसे समवायाने ह्मणजे नित्यसंबधाने असतात, असें नैयायिक ह्मणतात त्याप्रमाणे ब्रह्माचे ठायीं जगाची स्थिति होते, असे तू समजू नकोस, तर वस्तुतः तरंगरहित जलामध्ये जसे औपाधिक तरंग रहातात त्याप्रमाणे वस्तुतः जगद्रहित ब्रह्मामध्ये औपाधिक जगत् रहाते. त्याचप्रमाणे अवयवी अवयवामध्ये रहातो हे ह्मणणेच अयुक्त आहे. कारण ते दोघे एकमेकाच्या आधाराने रहातात हा सिद्धांत युक्तीनें सिद्ध होत नाहीं. तो कसा ह्मणून विचारशील तर सांगतो. प्रस्तुत सिद्धांत मानणाऱ्या नैयायिकास असा प्रश्न करावा कीं कायरे बाबा अवयवाच्या ठायीं रहाणारा अवयवी प्रत्येक अवयवात संपूर्णपणें रहातो कीं, अवयवशःच रहातो? संपूर्णपणे रहातो, असे ह्मणशील तर प्रत्येक अवयवामध्ये पूर्णपणें रहाणारे अवयवी अनेक आहेत, असे होणार व त्यामुळे गायीच्या कानामध्ये रहाणाऱ्या संपूर्ण गायीचें दूध कानातूनही निघाले पाहिजे. पण तसा अतिप्रसंग होत असल्याचा अनुभव नाही. शिवाय अवयव तुटून निराळे होऊन पडले तरी अवयवीचा नाश होणार नाहीं. कारण प्रत्येक अवयवात अवयवी पूर्णपणे असतो, असे तुह्मीच ह्मणता. बरें अवयवशः तो अवयवात असतो ह्मणून ह्मणाल तर आह्मी असें विचारतों कीं, अवयवाच्या ठायीं अवयवशः रहाणारा अवयवी त्या अवयवाच्या काहीं भागात रहातो कीं, सर्व अवयवात रहातो? काहीं भागात रहातो ह्मणून ह्मणाल तर त्याच्या एका भागात रहाणारा दुसरा अवयव; त्याच्या एक देशांत रहाणारा तिसरा इत्यादि प्रकारें अनवस्था येते. यास्तव अवयवाच्या सर्व प्रदेशात अवयवी अवयवशः रहातो ह्मणून ह्मणाल तर एका अवयवांत अवयवीच्या दुसऱ्या अवयवाचा समावेश होणें शक्य नसल्याकारणानें अशी कल्पना करणेंही व्यर्थ आहे. तस्मात् अवयव व अवयवी या

दोघांच्याही काल्पनिक सत्तेस अवयवैरहित ब्रह्मसत्तेचाच आधार आहे आणि त्याच न्यायानें सर्गामध्यें पर रहात नाहीं व परतत्त्वामध्यें सर्ग रहात नाहीं. तर त्यांचा आधार-आधेयभाव काल्पनिक आहे. चैतन्य जरी निष्क्रिय आहे तरी अविद्येमध्यें प्रतिबिंबित झालेल्या स्वसवित्तीच्या (म्ह. ज्ञानशक्तीच्या) योगानें तें स्वचिन्मात्ररूप प्रपचरहस्य पहातें. ह्मणजे तोंडापुढें आरसा धरिला असतां, दृष्टि आरशावर कुंठित होऊन, व परत फिरून जसें मुखच पहाते त्याप्रमाणें अविद्यारूपी आरशावर कुंठित झालेलें चैतन्य परत फिरून आपणास जगद्रूपानें पहाते. त्याबरोबर कारणांत लीन झालेलें शब्दतन्मात्र आकाशरूपानें व्यक्त होते. ह्मणजे ते अविद्यावृत ब्रह्मच आकाशरूप भासतें. नतर त्या आकाशभूत ब्रह्मामध्यें स्पर्शतन्मात्राचा अनुभव येतो व याच क्रमानें पूर्वोक्तरीत्या सर्व जगाचा आरोप होतो. पण—आपण जेव्हां जेव्हा नेत्र उघडून बाहेर पहातों तेव्हा तेव्हा एकदम (ह्मणजे तुह्मीं सागता तशा क्रमावाचून) आह्मास जग दिसते—असें ह्मणशील तर सागतों—बाबारे, अति सूक्ष्म कालात ज्याची प्रतीति येते तो चैतन्याचा जगदाकार परिणामच अनत कालपर्यंत रहाणाऱ्या सर्गसमूहाची परपरा बनतो व असें होणें हाच तर चिच्चमत्कार आहे. चैतन्यात्म्याची शक्ति अघटितघटना करणारी असल्यामुळें चैतन्याचा अविद्येशीं जेव्हां जेव्हा सयोग होतो तेव्हा तेव्हा एका क्षणातही त्यास अनेक युगातील अनुभव ती करून देते. तात्पर्य कालाची गणना मायिक आहे; खरी नव्हे. कारण अशुद्ध, जड, परतंत्र, देशतः व कालतः परिछिन्न (मर्यादित) इत्यादि जे असतें त्याच्या कालाचें परिमाण सागता येतें. पण ब्रह्म शुद्ध, स्वयंप्रकाश, उत्पत्त्यादिकाचा आधार, ज्ञानरूप, उत्पत्तिविनाशरहित, सर्वत्र सम, व परमार्थतः सर्गशून्य आहे. मायिक बोद्धे जीव आपल्या कल्पनेनें ज्या ज्याप्रमाणे ब्रह्मास कल्पितात तसे तसें तें मायेने भासतें. शास्त्रीय दृष्टीने पाहिले असता जगत्—ही परमार्थ सत्य आहे, असा अनुभव येतो व बहिर्मुख चक्षुरादि पाच ज्ञानेंद्रियें व मन याच्या योगाने पाहिलें असता ब्रह्मही मिथ्या जग आहे, असें भासतें. कारण इंद्रियाचा विषय न होणें हाच ज्याचा स्वभाव आहे त्या चैतन्यानें विषयाकार होऊन अनुभवास येणें हें सत्य कसें असेल? तात्पर्य मायिक दृष्ट्या जग सत्य आहे. पण ब्रह्मदृष्ट्या तें असत्य आहे. तेजामध्यें असलेली भास्वरता तेजाहून भिन्न आहे, असें पाहिल्यास ती असत्य असते. पण

तजोरूप आहे, असें पाहिल्यास ती सत्य असते. मातीची बाहुली मातीहून भिन्न आहे, असें समजल्यास ती असत् आहे. लाकडावर कोरलेलें चित्र लाकडाहून निराळें आहे, असें समजल्यास तें असत्य असतें. पण काष्ठरूप आहे, असें जाणल्यास तें सत्य असते. त्याप्रमाणेंच जग ब्रह्मरूप आहे, असें समजल्यास तें सत्य होतें. ब्रह्माहून निराळें आहे, असें समजल्यास तें असत्य ठरतें. चिन्मय ब्रह्मच अविद्येमुळें जगद्रूप भासते. ज्ञानाच्या योगानें, ( विवेकानें ) जग ब्रह्मरूप आहे, असे जाणलें ह्मणजे बीजांतील वृक्षाप्रमाणे तें भिन्न दिसत नाहीं. साराश हें जग कारणावाचून उत्पन्न झाले आहे व त्यामुळेंच तें वस्तुतः उत्पन्नच झालें नाहीं. पण वासनासमूहरूप मनाच्या योगाने अनुत्पन्न अशाही त्याचा उदय होतो. यास्तव त्या असत्–जगाचा उदयच होऊ नये, असे वाटत असल्यास मनोनाश सपादन केला पाहिजे. पण तो ज्ञानयोगाच्या दृढ अभ्यासावाचून सपादन करिता येत नाहीं, व ज्ञानयोगाभ्यास हाच पुरुषप्रयत्न आहे. करिता त्याचा आश्रय करून मनोनाशाच्या द्वारा जगाचा उदयच होणार नाहीं. तर आत्मतत्त्व ब्रह्मरूप होऊन राहील, असें प्रत्येक मानवानें करावे. असो; आता ज्ञानयोग कशाप्रकारचा असतो तें सागतो. कांहींही केव्हांही व कोठेंही उत्पन्न होत नाही व नाश पावत नाहीं, तर सर्व शांत, अज व चिद्रूप ब्रह्म आहे. पण चित्त असेपर्यंत परमाणूच्या उदरांतही सर्गपरपरा दुर्वार आहे. तथापि ती सत्य नव्हे. कारण चित्परमाणूच्या आंत अवाढव्य सर्गाची परपरा कशी रहाणार ? यास्तव जलामध्यें तरगादि जसे गुप्त रीतीनें रहातात त्याप्रमाणें जीवतत्त्वात जाग्रत्, स्वप्न, सुषुप्ति इत्यादि अवस्था व त्याचे विषय अनिर्वचनीय मायाशक्तिरूपानें रहातात, असा सतत विचार करणे हाच ज्ञानयोग होय. पण वैराग्यावांचून त्याचा उद्भव होत नाहीं. वैराग्य जसजसें वाढू लागतें तसतसा दुःखक्षय होऊन शाति वाढू लागते व ज्ञानवैराग्याच्या दृढतेमुळें ‘ देह हाच मी,’ असा भ्रम होईनासा झाला कीं, जन्ममरणभ्रमही आपोआप क्षीण होतो. तात्पर्य चैतन्य एक, अखड व निरुपाधिक आहे, असें गुरु, शास्त्र व स्वानुभव याच्या योगानें जे जाणतात ते या संसारास जिंकितात. ब्रह्मदेवाची अहंमयी भावना-चित् निरनिराळ्या संकल्पांमुळें या विश्वाचा विस्तार

करिते व ती अंतर्मुख असूनचे विष्णूच्या एका निमेषाच्या कोट्यंश कालांत सहस्रावधि युगरूप आपल्या आयुष्याचा अनुभव घेते ६१.

**सर्ग ६२**—हें विश्व भ्रांतिमात्र उत्पन्न झालें आहे, असें अगोदर सांगून नंतर जीवमुक्ति-सिद्धयर्थ महानियतिशक्तीचें वर्णन येथे करितात.

**श्रीवसिष्ठ**—राघवा, परमाणूच्या अति अति सूक्ष्म भागांत सहस्रावधि ब्रह्मांडें व निमेषाच्या अति अति सूक्ष्म भागात सहस्रावधि युगें, या प्रत्यक्ष दिसणाऱ्या ब्रह्मांडाप्रमाणेंच, सत्य भासतात. पण अनंत जीव-परमाणूंतील प्रत्येकामध्यें अशा प्रकारची कल्पना संभवते. यास्तव तिचा स्वभाव अवस्थित नाही. तर तो व्यभिचारी आहे, असे होते; व त्यामुळेच ती भ्रांति होय. जलाच्या द्रवत्वाप्रमाणे या भूत-भविष्य-वर्तमान-सर्गपरंपरा प्रातीतिक सत्तेच्या आधाराने क्रमानें वहात आहेत. पण त्या सर्व, जलांतील पुष्पित वृक्षाच्या प्रतिबिंबाप्रमाणें, स्वप्नांतील विषयाप्रमाणे, मनोराज्यातील मगराप्रमाणे किंवा गारुड्याने केलेल्या रुपयाप्रमाणे असत्य आहेत.

**श्रीराम**—अहो ब्रह्मनिष्ठ, तत्त्वज्ञानाचा उदय होऊन सर्व भ्रांतींचा नाश झाला असता त्या विद्वानाच्या देहाची स्थिति कशी होणार? कारण ब्रह्म व आत्मा यांचे ऐक्य आहे, असे साक्षात् अनुभवास आल्यावर दैवाच्या अधीन असलेल्या बलि-प्रभृति पुरुषाप्रमाणे, त्यानेही दैवपरतंत्र रहाणें संभवत नाहीं तत्त्वज्ञ, प्राणिमात्राचा आत्मा होत असतो. त्यामुळें देवही त्याची काही हानि करू शकत नाहीत, असे श्रुतीतही ह्मटले आहे.

**श्रीवसिष्ठ**—रामा, प्राण्याऱ्या अदृष्ट शक्तीचे जिला सहाय आहे अशा ईश्वरसंकल्परूप महा नियतीच्या योगानेंच सर्व व्यवहाराची व्यवस्था जशी होते त्याप्रमाणे विद्वानाच्या शरीराचेही धारण त्या नियतीच्या योगानें होऊं शकते. त्या ब्रह्मदेवाच्या नियतीला महा सत्ता, महा चिति, महाशक्ति, महादृष्टि, महा क्रिया, महोद्भव, महास्पंद इत्यादि ह्मणतात. प्रत्येक पदार्थाच्या स्वभावाचा नियम करणारी ती स्पंदरूपी असून आदि सर्गांत ह्मणजे सृष्टीच्या अगदी प्रारंभी उत्पन्न झाली. तिच्या विरुद्ध या जगातील एकही कार्य होत नाहीं. ती तृणाप्रमाणे जगाची उलटापालट करीत असते. दैत्य, देव, हत्ती, पर्वत इत्यादिकांनी अशा अशा प्रकारे अमुक वेळी, अमुक स्थळी व्हावे; अमुक कार्यें करावी; इत्यादि कल्पांतापर्यंतचे सर्व

भविष्य तीं प्राण्याच्या कर्मानुरूप ठरवून ठेविते. सारांश परमार्थ दृष्टीने ब्रह्मसत्ता जशी अव्यभिचरित असते त्याप्रमाणे व्यवहारदृष्ट्या ही नियति अव्यभिचारिणी आहे. ह्मणजे व्यवहारदशेंत तिचा बाध होत नाहीं. पण हें सुद्धा मी व्यावहारिक दृष्टीने सांगितले आहे. परमार्थदृष्ट्या तर ब्रह्म, नियति व सर्ग या शब्दाचा अर्थ मुळीच भिन्न नाहीं. तर ते सर्व एकाच अर्थाचे वाचक आहेत. तत्त्वज्ञानी अतत्त्वज्ञाच्या बोधाकरिता त्याची कल्पना केली आहे. ब्रह्म अचल आहे व सर्ग चल आहे. तेव्हा त्याचे ऐक्य कसें असेल ? ह्मणून ह्मणशील तर सांगतो. वृक्षरहित आकाशात दिसणाऱ्या वृक्षाप्रमाणे अज्ञदृष्ट्या अचल ब्रह्मच चल सर्ग आहे, असे भ्रमाने दिसते. ह्मणजे त्याचा वास्तविक भेद नाहीं. स्फटिकाच्या आत रेघांचे प्रतिबिंब जसे दिसावे त्याप्रमाणें मायाशबल ब्रह्माचे ठायी असणाऱ्या हिरण्यगर्भाने, ( निजलेल्या पुरुषानें आपल्या ठायीं जसे स्वप्नातील आकाश पहावें त्याप्रमाणें ) या नियति सञ्ज्ञक भावि सर्गास जाणले. जीव, चैतन्यस्वभाव असल्यामुळें, शरीराचे अवयव जसे त्याच्या साक्षात् अनुभवास येतात त्याप्रमाणे पद्मज ब्रह्मदेवानें नियति इत्यादि सर्व सर्गास आपल्या अवयवरूपाने पाहिले. चितूलाच दैव असे ह्मणतात. ही ईश्वरसंकल्परूप चित् त्रिकालातील सर्व पदार्थाचे आक्रमण करून राहिली आहे. या पदार्थानें असे स्पंदित व्हावे, असे असावे; अशा रीतीने भोक्तृतेस प्राप्त व्हावे इत्यादि दैवसंकल्प हाच पुरुषस्पंद, हेंच तृणगुल्मादि स्थावरजात, हेंच सर्वभूतमय जगत्, तोच काल, तीच क्रिया व तेच सर्व काही आहे. प्राण्याचे अदृष्ट या नियतीस साहाय्य करितें व नियति अदृष्टास साह्य करिते. याप्रमाणें या दोन सत्ता एकरूप होऊन रहातात. पण त्या दोन्ही सत्ता पुरुषाच्या प्रयत्नाधीन असतात. कारण नियतीची तशीच मर्यादा आहे. फार काय पण रामा, तू शिष्यभावाने मला प्रश्न करावास व मी उपदेश करीन त्याप्रमाणे आचरण करावेस, ही सुद्धा नियतीच होय. दैवपरायण पुरुष दैवाचा आश्रय धरून पौरुष प्रयत्न न करिता आजगर व्रत धारण करून रहातो. पण तेही त्याच्या प्राक्तन कर्मानुरूप बनलेल्या नियतीचेच फल होय. पूर्वी जर पुरुष क्रियारहित व केवळ अवस्थेत असता तर बुद्धि, बुद्धिप्रयुक्त कर्म, कर्मप्रयुक्त भूत—भौतिक विकार व गाय, पुरुष इत्यादि विकाराच्या आकृति यातील कोणीएक झाले नसते. बर तो ( पुरुष )

आपल्या केवल अवस्थेंतच असती. पण त्यानें क्रिया केली व त्या क्रियेमुळेंच कल्पपर्यंत टिकणारी ही व्यवहारस्थिति नियतिरूपानें परिणाम पावली. या अवश्यभावि नियतीचें उल्लंघन ब्रह्मा—विष्णु—महेशादि ईश्वरासही करिता येत नाहीं. यास्तव या नियतीचा आश्रय करून बुद्धिमानानें पौरुषाचा त्याग करू नये. नियति पौरुषरूपानेच नियामिका होते. वस्तुतः पौरुष व नियति यांचा भेद नाहीं. तर पौरुषप्रयत्न यारूपानें उल्लेख न करितां केवल ईश्वरसंकल्प या रूपाने जेव्हा त्याचा निर्देश कारितात तेव्हा ती नियति होते व ती नियति पौरुषरूपानें जेव्हा सृष्टींत व्यक्त होऊ लागते तेव्हा तिला पौरुष ह्मणतात. पौरुष प्रयत्नाच्या आकारानें परिणत न झालेली नियति निष्फल असून पौरुषात्मक नियति सफल आहे. ह्मणजे पौरुषापासून पुरुषार्थाचा लाभ होणार. आतां आळसी व अजगर-वृत्ति लोकासही भोजनोत्तर तृप्त्यादि फलाचा लाभ होतो, हें खरे, पण तेही घास घेणे, चावणे, गिळणे इत्यादि पौरुष प्रयत्नाचेंच फळ होय. कारण नियतीच्या योगानेच माझी तृप्ति होईल, असें ह्मणून जो पाषाणासारखा निश्चल होऊन बसतो व घास तोंडात घालणें व तो गिळणें इतकाही प्रयत्न करीत नाहीं, त्यास तृप्ति हे फळ मिळत नाहीं. तर मग क्षुधित झाल्यावरही क्षुधा निवारणार्थ प्रयत्न न करणारा तो आळशी जिवत कसा रहातो, ह्मणून ह्मणशील तर सांगतों. अन्नाच्या अभावींही तो काहीकाल जीवंत रहातो. पण तेंही प्राणाच्या चलनास अनुकूल असलेल्या पौरुष यत्नाचेंच फल आहे. कारण श्वासोच्छ्वासही न करिता कोणाही मर्त्याला रहातां येणें शक्य नाहीं. चित्तास विश्रांति देणाऱ्या प्राणनिरोधाचा अभ्यास करून व तो सिद्ध झाल्यावर प्राणवायूस अति निरुद्ध करून जर कोणी तत्त्ववित् मुक्त झाला तर तेंही प्राणायामादि पौरुषाचेच फल होय. सारांश केवल नियतीचें ह्मणजेच अपौरुषाचेंच काहींएक फल नाहीं. तर सर्वप्रकारचें फल पौरुषसाध्यच आहे. तस्मात् शास्त्रीय पौरुषैकपरायण होणें हें साधनांतील परम श्रेयस्कर साधन आहे व नैष्कर्म्यलक्षण मोक्ष हें फलतः श्रेय आहे. या दोन प्रकारच्या श्रेयांच्या योगानें ज्ञानी पुरुषांचा पक्ष सबल होतो. ह्मणजे तो कार्यासह अविद्येचा नाश करण्यास समर्थ असतो. निर्दुःखित्व हीच त्याची स्थिति असते. ती ब्रह्मसत्तेची स्फूर्ति

आहे. मोठ्या यत्नाने तिच्या ठायीं जर स्थैर्यसंपादन केले तर तेंच परम शुद्ध पद व तीच परा गति होय. असो; दाशरथे, पृथ्वीवरील तृण–तरु–गुल्मादि परिणाम जसे पृथ्वींतील सत्तेपासून स्फुरण पावतात त्याप्रमाणें सर्व व्यापी ब्रह्मच या नियत्यादि महा विलासानीं स्फुरण पावलें आहे ६२.

**सर्ग ६३**—ब्रह्म मायाशक्तीच्या विलासानें सर्वत· सर्वरूपानें कसें स्फुरण पावतें त्याचें येथें वर्णन करितात.

**श्रीवसिष्ठ**—नियत्यादि विलासांच्या योगानें ब्रह्मच स्फुरण पावतें, असें वर सांगितलें आहे. पण तें कशामुळें असें स्फुरण पावतें, ह्मणून विचारशील तर सागतों. बा रामा, हें ब्रह्मतत्त्व सर्व वस्तु, सर्वकाल, सर्व देश व सर्वशक्तिरूप आहे. त्यामुळेंच ते सर्वाकार आहे. सर्वज्ञ असल्यामुळें तें सर्वांचे नियमन करण्यास समर्थ आहे. ह्मणूनच ते सर्वेश्वर होय. तें तत्त्व कोठें दूर असेल असेही तू समजू नकोस. कारण तें सर्वग ह्मणजे सर्वांत असणारें, सर्व व्यापि आहे. बरें तें एकीकडे कोठें असेल किंवा तें उदासीन असेल असेंही मनात आणू नकोस. कारण तेंच सर्व आहे. तें कोठें फार दूर अथवा तटस्थ नाहीं, असें ह्मणण्यास आणखींही सबल कारण आहे. ते कोणतें ह्मणून विचारशील तर सांगतो. तें ब्रह्मच आत्मा आहे. तेव्हा आत्मा दूर किंवा तटस्थ कसा असणार ? पण असें जरी आहे तरी तो सर्व शक्तिमान् असल्या कारणाने क्वचित् ह्मणजे अत:करणोपाधींत जीवरूपाने प्रविष्ट होऊन चिच्छक्तीस प्रकट करितो; क्वचित् (ह्मणजे सात्त्विक बुद्धिवृत्तींत शातीस) व्यक्त करितो, क्वचित् (तामस उपाधींत ) जडशक्तीस व्यक्त करितो, क्वचित् ( राजस उपाधींत ) राग–लोभादिकास उत्पन्न करितो; क्वचित् ( मिश्रगुणाच्या कार्यांत ) विशेषत: ज्याचें वर्णन करिता येत नाहीं अशा मिश्रशक्तीस प्रकट करितो व क्वचित् ( सुषुप्ति व प्रलय–मरण–यांत ) काहींच प्रकट करीत नाहीं. कारण तो सत्यसकल्प असल्यामुळें जेव्हां जेथें जसा सकल्प करितो तेव्हां तेथें तसाच अनुभव घेतो तसाच तो सर्वशक्तिसंपन्न असल्यामुळें जी जी शक्ति जशी जशी उत्पन्न होते तशी तशीच तिची स्थिति होते व अनेक शक्तींत विलक्षणता रहाते. पण सागरांतील लाटा, लहान तरंग व जल यांची भेदकल्पना जशी मिथ्या, अथवा सुवर्णाचें कडें, कुंडल, मुकुट इत्यादिकाची भेदकल्पना जशी व्यावहारिक, [illegible] अथवा

सुवर्णदृष्ट्या खरी नव्हे, तशीच या सर्व शक्ति व त्यांचा आधार याच्यामधील भेदकल्पनाही व्यावहारिक आहे. पारमार्थिक नव्हे. कारण रज्जु, शिप इत्यादि जें जें कांही जसें रजतादि रूपानें अनुभवास येतें तें तसेच विवर्तरूपानें होतें; परमार्थतः नव्हे. कारण ते सर्प, इत्यादि पदार्थ रज्जु इत्यादिकांच्या आत उत्पन्न होत नसतात व बाहेरही उत्पन्न होत नसतात. सर्वसाधारण प्रकाशरूप साक्षि चैतन्य जीवाच्या अदृष्टवशात् उद्बुद्ध होऊन क्वचित् किंचित् भ्रांतीने पहाते. पण वस्तुतः पसरलेलें हें सर्व ब्रह्मच आहे. साराश शक्ति–शक्तिमान्, अवयव–अवयवी इत्यादि सर्व, मिथ्याज्ञानयुक्त पुरुषानीं कल्पिले आहे. मिथ्याज्ञान या उपाधीनें युक्त असलेली चित् शास्त्रानुगुण अथवा शास्त्रप्रतिषिद्ध असें जें कांही आपलें कर्तव्य म्हणून समजते, त्याविषयी अभिमान धरिते व त्याप्रमाणेच विहित अथवा निषिद्ध आचरण करून फलभोगसमयींही तेच अनुभविते. तात्पर्य आद्यसर्गसंकल्पापासून पुरुषभोगापर्यंत सर्व प्रपचरूप ब्रह्मच होतें. दुसरें काहीं नाहीं ६३.

**सर्ग ६४**—भोक्ता जीव कोणत्या क्रमानें होतो तें या सर्गांत सागतात

**श्रीवसिष्ठ**—रामा, जो हा सर्वगत, प्रकाशमय, परमात्मा, शुद्ध, स्वानुभवानदरूप, अतादिरहित, महेश्वर त्या शुद्ध चिन्मात्ररूपी परमानंदापासून जीव उत्पन्न होतो. ( नामरूपाची व्यक्ति, एतद्रूप जगाच्या उत्पत्तीपूर्वी जीवोपाधिलिंगसमष्टीची उत्पत्ति होऊन जीव उत्पन्न होतो. ) पुढे तो जीवच उपाधीच्या प्रधान्याने चित्त होतो व चित्तापासून जग व्यक्त होतें.

**श्रीराम**—अखड, अद्वितीय व स्वप्रकाश ब्रह्माचे ठायीं सखड, सद्वितीय व परप्रकाश जीवाचा उद्भव कसा होतो ?

**श्रीवसिष्ठ**— सत्य ( अविद्यारहित ) ब्रह्माचे ठायीं परमार्थदृष्ट्या जीवसत्तेचा सभव नाही. पण अविद्यायुक्त ब्रह्माचे ठायी त्याचा संभव आहे. कारण मोक्ष होईतो जीवबीज विद्यमान असल्यामुळे त्याचे उपाधिस्वभावाच्या योगाने होणारे जे स्पदन ( चलनशक्तिरूप प्राणधारण ) तोच जीव होय. त्या जीवरूप ब्रह्मस्पदनामध्येंच ( ह्मणजे चिदाकाशरूप पत्र–आदर्शामध्येच ) अनुभवात्मक अशा या असख्य जगत्परपरा प्रतिबिंबित होतात. ( जगाच्या वैचित्र्याची कल्पना करणाऱ्यास अनुकूल असलेली क्रियाशक्तिच ज्यामध्ये प्राधान्ये करून असते अशा चैतन्याचा प्राणभाव हाच

जीवभाव आहे. याविषयीं श्रीवसिष्ठ दृष्टांत देतात– ) राघवा, वायु जेव्हा मुळींच वहात नसतो त्यावेळीं समुद्राचें किंवा दीपज्योतीचे जसें थोडेसें स्फुरण होत असते त्याप्रमाणें ब्रह्माचे किंचित् स्फुरण हाच जीव होय. स्वभावतःच अति स्वच्छ असलेल्या ब्रह्माचे ठायीं प्राणाधीन चलनाचा अध्यास झाला असता व त्यामुळे त्याच्या शांतत्वाचा ( ह्म. निष्क्रियत्वाचा ) भंग झाला असता व्यक्त होणारे जे त्याचें अल्प संवेदन ( ज्ञान ) तोच जीव होय. ह्मणजेच वायूच्या चलनाप्रमाणें, अग्नीच्या उष्णतेप्रमाणे, व तुषाराच्या शीततेप्रमाणें आत्म्याचे हे जीवत्व आहे. अर्थात् मोक्षापर्यंत तें त्याच्या स्वभावरूप आहे. ज्ञानरूपाने, चैतन्यरूप आत्मविषयक अज्ञानाच्या योगाने, मर्यादित झाल्यासारिखे होणें, हाच जीवभाव होय. ( अर्थात् ज्ञानरूप आत्मा सर्व व्यापी आहे. पण त्याच्या सर्व व्यापि स्वभावाचा अनुभव त्याच्या अनादिसिद्ध अज्ञानामुळे येत नाही व त्यामुळें चैतन्य अंतःकरणाने मर्यादित झाल्यासारखे होऊन तें जीवरूप होतें. ) पुढें त्याच जीवभावाचा ( ह्मणजे चैतन्याच्या मर्यादित स्वरूपाचा ) संस्कार दृढ झाला असता क्रमाने तोच अहंकार बनतो. अग्नीच्या अल्प ठिणगीचा इंधनाशीं (तृण-घृत-तैलादि दाह्य पदार्थाशीं) संबंध झाला असता ती ठिणगी जशी क्रमाने वाढते व मोठा थोरला अग्नि बनते त्याप्रमाणेच अल्प जीवभावाचा घन अहंकार होतो. पहाणाऱ्या पुरुषाची दृष्टि आकाशात जेथपर्यंत जाऊ शकते तेथपर्यंत तिला आकाशाचा नील वर्ण दिसत नाहीं. पण जेथें गेल्यावर ती कुंठित होऊन पुढें जाण्यास असमर्थ होते त्याच्यापुढें, वस्तुत. नीलता नसतानाही, तिला ती दिसते. त्याप्रमाणे अहंताशून्य अशा आत्म्याचे ठायी जीवाची गति न झाल्यामुळे ( ह्मणजे अज्ञानानें त्यास प्रतिबंध करून स्वरूपापर्यंत न जाऊ दिल्यामुळे ) त्याला अहंभाव दिसतो. ( अहं–मी असा अनुभव येतो. ) पूर्व संकल्पाच्या संस्कारामुळे उद्बुद्ध ( जाग्रत् ) झालेल्या व आपल्याच ठिकाणीं आरोपित केलेल्या या प्रत्यक्ष, पण आकाशातील नीलतेप्रमाणें भ्रामक कल्पनेच्या योगाने जीव अहंकारास धारण करितो. हा अहंकारच संकल्पाच्या योगाने, वायुस्पंदाप्रमाणे देहाद्याकाराने स्फुरण पावून, आत्म्यास देशत', कालतः, व वस्तुतः परिच्छिन्न ( मर्यादित ) करितो. त्या अहंकारास रुद्र असे ह्मणावे. कारण तोच या सर्व प्राण्यास पाप-

फलादिकाच्याद्वारा रडवीत असतो. असो; तो रुद्रसंज्ञक अहंकार संकल्प करण्यास उद्युक्त होत्साता चित्त, जीव, मन, माया, प्रकृति इत्यादि नांवें धारण करितो. ( येथे चित्त ह्मणजे विष्णु, जीव ह्मणजे ब्रह्मा व मन, माया इत्यादि त्यांच्या क्रिया असे जाणावें ) त्यांतील संकल्पात्मक चित्त संकल्पानेंच भूततन्मात्रांची कल्पना करीत आपल्या पूर्व चेतनात्मक अवस्थेपासून भ्रष्ट होतो व जड पंचतेस प्राप्त होतो. पंचतेचे ( ह्म. पंच-तन्मात्रांचें ) पंचीकरण केलें असतां ते तन्मात्रपंचकाकार चित्तच सुवर्णां-डाची प्रकृति होतें. ब्रह्मभावदृष्ट्या ती प्रकृति अतिशय अल्प असल्याकारणानें तिला तेजःकण असें ह्मटलें आहे. तात्पर्य बीज जसें हळु हळु अंकुर बनते त्याप्रमाणें तन्मात्रकल्पनेने चित्त तेजःकणत्वास प्राप्त होतें. ( आतां पूर्वकल्पात विराडात्म्याची उपासना करून तोच मी आहें, असा संस्कार ज्याचा दृढ झालेला असतो त्याला समष्टि–विराड्भाव प्राप्त होतो व व्यष्टि-स्थूल देहच मी आहे, असा ज्याचा संस्कार दृढ असतो तो व्यष्टिस्थूल देहभावास प्राप्त होतो, असें सांगतात. ) नंतर जल जसें गारा, बर्फ इत्यादि रूपानें घनाकारास प्राप्त होतें त्याप्रमाणे अनेक जीवातील कोणी एकादा जीव आपल्या पूर्व संकल्पाप्रमाणे ब्रह्मा ( हिरण्यगर्भ ) होतो; ज्यानीं विराडुपासना केलेली नसते असे कित्येक पुण्याचरणी जीव आपा-पल्या पूर्व संकल्पाप्रमाणेंच देवादि देहाचे ठायीं अहंभाव ठेवून अमरावत्यादि योग्यस्थानीं प्रकट होतात. पुष्कळसे पापी स्थावर होतात. कित्येक पशु–पक्ष्यादिभावास प्राप्त होतात व कांहीं आकाशगामी जलचर, स्थलचर, इत्यादि होतात. सारांश येणेप्रमाणें ब्रह्मांड–देहांतच आपापल्या संकल्पा-प्रमाणे सर्व अनुभव घेतात. सूक्ष्मदेहसमष्टि–उपाधिक जीवच क्रमानें विरंची होऊन अंड्यांत सर्व जग संकल्पानें उत्पन्न करितो. पूर्वोक्त विराडोपासना केल्याकारणानें तो सत्यसंकल्प झालेला असतो आणि त्यामुळेंच तो जो जो संकल्प करितो तें तें स्वभावतःच पुढे प्राप्त झालें आहे, असें तो होतो. प्रथा व चलन या दोन धर्मांनीं युक्त असलेल्या जगाच्या प्रथेचें कारण प्रथम असलेला चिदात्मा आहे व चलनादिरूप विकारांचे कारण प्रगून होणारें कर्म आहे. ( ह्मणजे ज्ञान हा चिदात्म्याचा धर्म आहे व विकार हें कर्माचें फल आहे. ) तात्पर्य जलापासून जसा फेंस उद्भवतो त्याप्रमाणें चित्–पासून स्वभावतःच चित्त स्फुरण पावतें. नंतर नौकेस

बांधलेल्या दोऱ्यांनीं फेंसाच्या गोळ्यास जसें बांधितात त्याप्रमाणे तें चित्त कर्मांच्या योगानें बद्ध होतें. फेंसाला बांधता येते पण त्याचें कारण जे जल त्याला बांधतां येत नाहीं. त्याचप्रमाणे कर्में चित्तास बद्ध करितात. पण चित्ताच्या कारणभूत चितीस बद्ध करू शकत नाहींत. संकल्प सर्व विकारांचें बीज आहे. व्यवहारांतही–सर्व कामे किंवा घट, चित्र, गृह, वस्त्र इत्यादि वस्तू संकल्पपूर्वक होत असतात. ह्मणजे संकल्प पूर्वी व त्याचें कार्य नंतर–असाच क्रम आढळतो. जीव संकल्परूप आहे व तो कर्मशून्य आत्म्याच्या सांनिध्यामुळें उत्पन्न होऊन कर्में करितो. पण हीं कर्में जरी मागून होत असलीं तरी तीं सर्वथैव नूतन असतात, असे नाहीं. तर बीजात असणाऱ्या अंकुराप्रमाणें पूर्वींच जीवामध्यें वासनारूपाने असणारीं तीं मागून केवळ व्यक्त होतात. बीजात अंकुर, कांड, शाखा, पर्णें, पुष्पें व फळे सूक्ष्मरूपानें पूर्वी असतात व तींच कालांतरानें योग्य स्थिति मिळाली असता व्यक्त होतात, हे प्रसिद्ध आहे. बीजस्थ जीवाचा जसा हा विलक्षण विस्तार होतो व तो नानात्वास प्राप्त होतो त्याप्रमाणें हिरण्यगर्भ जीवही विलक्षण विस्तारास व नानात्वास प्राप्त होतो. व्यष्टि जीवही याच रीतीने आपल्यामध्यें वासनारूपाने स्थित असलेल्या देहादि आकारांस प्राप्त झाले आहेत. पण त्यात विशेष इतकाच आहे की, हिरण्यगर्भ–जीवसंकल्पापासून पूर्वीच उत्पन्न झालेल्या जगातील माता व पिता याच्या द्वारा ते देहयुक्त होतात. नंतर जन्ममरणास कारण होणाऱ्या कर्मांच्या योगानें ते उच्च नीच योनींत जातात. कर्म ह्मणजे चित्स्पंद. सारांश, वृक्षाच्या–शाखा, पानें, पुष्पे. फळे इत्यादि एकदा होऊन पुन पुनः जशीं तीं होतात त्याप्रमाणें आद्य कारण ब्रह्मापासून चित्स्पंदलक्षण शुभाशुभ कर्मांच्या योगानें भोक्त्याचे देह भोग्य वस्तु व भुवनें वारवार होतात व वृक्षाच्या फळापासून जसे तसलेच दुसरे वृक्ष होतात त्याप्रमाणे एका कल्पातील प्राणिवासनारूप फळापासून दुसरीं ब्रह्मांडें उद्भवतात ६४.

**सर्ग ६५**—आता या सर्गांत मन, भोग्यवर्ग, भोक्ता व अनर्थांचे मूल–याचे तत्त्व चिन्मात्रच आहे, असें विचारपूर्वक सिद्ध करितात.

**श्रीवसिष्ठ**—परम कारणापासूनच मन प्रथम उत्पन्न झालें. ते मननरूप आहे व तें त्या कारणाच्या आधारानेंच रहाते. पूर्वी कधीं अनुभविलेल्या सुगंधाचें स्मरण झालें असतां ज्याप्रमाणें मनोरथरूप असल्या-

कारणानें असत् अशाही त्याचें भान होतें त्याप्रमाणें हें मन या सर्गाचा अनुभव घेतें. अर्थात् या द्वैताचा भास मनाच्या अधीन आहे. त्यामुळें मनाचा क्षय झाला असतां मनःकल्पित भेदही नाहींसा होतो व भेद नाहींसा झाला कीं, केवल शुद्ध व सत् आत्मतत्त्व अवशिष्ट रहातें. पण चित व जगत् या दोघांचाही क्षय झाल्यावर सत् कोठून रहाणार? ह्मणून विचारशील तर सांगतों. जग नित्य व अनित्य अशा द्विविध अंशानीं युक्त आहे. त्यांतील स्थिर नित्य अंश मनाच्या उत्पत्तीपूर्वीही असतो. अस्थिर अंश मात्र त्याच्या चलनानंतर अनुभवास येतो. यास्तव मनाचें स्फुरण नष्ट झालें कीं, त्याच्या कार्याचें ह्मणजे जगांतील असत्य अंशाचें भान न होणें हें साहजिकच आहे. पण त्यामुळें सत्यांशाचाही बाध होतो, असें ह्मणतां येत नाहीं. स्वप्नांत पाहिलेला पदार्थ मनोमात्र असल्याकारणानें मन दुसऱ्या अवस्थेत गेलें कीं, तो बाधित होतो. पण त्यामुळें त्यास पहाणारा द्रष्टा कधीं बाधित होत नाहीं. तस्मात् मनोनाशानें जगाच्या अस्थिर अंशाचा बाध झाला असतां स्थिरांश अवशिष्ट रहाणें अगदीं योग्य आहे. जगाचा अस्थिर अथवा असत्य अंश ह्मणून ज्याला आम्हीं म्हणतों तो वस्तुतः मनुष्याच्या शिंगाप्रमाणें अत्यंत असत् नसून केवळ अनिर्वचनीय आहे. ह्मणजे तो सत् आहे कीं असत् आहे याचा निर्णय करितां येत नाहीं. पण तो बाधित होत असतो. बाधित होणें ह्मणजे जागें झाल्यावर स्वप्न जसें खोटें आहे, असें निश्चयपूर्वक समजतें त्याप्रमाणें अधिष्ठानाचें ज्ञान झालें असतां आरोपित खोटें आहे, असा निश्चय होणें, अथवा निमित्ताचा अभाव झाला असतां त्या नैमित्तिकाचा अनुभव न येणें. आतां तूं ह्मणशील कीं, जग जर मिथ्या आहे तर असंख्य प्राण्यांस त्याचा एकसारखाच भास कसा होतो? तर त्याचें उत्तर एवढेंच कीं गारुड्यानें उत्पन्न केलेल्या आंब्याच्या मिथ्या झाडाचा पहाणाऱ्या सर्वांस एकसारखाच जसा भास होतो तसाच या असत् ह्मणजे अनिर्वचनीय जगास पहाणाऱ्या अनेकांस तें एकाच आकाराचें दिसतें. असें जर आहे तर हा प्रपंच दीर्घकाल एकसारखाच कसा भासतो ह्मणून विचारशील तर त्याचें उत्तर मागें दिलेंच आहे. तें कोणतें ह्मणून ह्मणशील तर सांगतों. चांगल्या रीतीनें न पाहिल्याकारणानें पुढचा खांब जसा चोर आहे, असा भास व्हावा त्याप्रमाणें मनाच्या आसक्तीमुळें संसाराख्य दीर्घ स्वप्न अस्तित्वांत आलें

आहे. वस्तुतः मन हेच सर्व अनर्थांचें कारण आहे. पण अनात्मपदार्थांमध्येंच अत्यंत आसक्त झाल्याकारणानें जीवास तें कळत नाहीं. ह्मणजे आपल्या मनानेंच वेताळाची अगोदर कल्पना करून भयभीत झालेल्या एकाद्या मूर्खाला हा वेताळ मीच मनानें कल्पिला आहे हे जसे कळत नाहीं त्याचप्रमाणे हा प्रकार होतो. सारांश सर्व व्यापी चित्–तत्त्वानें–विषयोन्मुख होणें–हा स्वभाव धारण करणें, हेंच अनर्थ–परंपरेचे मूळ आहे. तेंच चित्त होय. चित्तामुळेंच जीवत्वाची कल्पना होते. जीवत्वाच्या योगानें अहंभाव, अहंभावामुळे चित्तत्व, चित्तत्वामुळे इंद्रियादित्व, इंद्रियादिकाच्या योगाने देहच मी आहे असा भ्रम आणि देहादि भ्रमामुळे स्वर्ग, नरक, बंध, व मोक्ष. पण ही सर्व अनर्थपरंपरा जीव व ब्रह्म याचा भेद आहे, अशाप्रकारच्या भ्रमामुळें होते. तो भ्रमच तिचें मूळ आहे. यास्तव ब्रह्म व जीव याचा जसा भेद नाहीं त्याचप्रमाणें जीव व चित्त याचाही भेद नाहीं आणि जीव–चित्ताच्या अभेदाप्रमाणेच देह व कर्म याचाही भेद नाही; असा निश्चय करावा. कारण त्याच्या ऐक्यज्ञानाने त्याच्याविषयींचा भ्रम बाधित झाला असता जगाचाही बाध होतो. सर्व शास्त्राचे रहस्य एकाच वाक्यात सांगावयाचे असल्यास ते असे सांगावे–कर्मच देह आहे. देहच चित्त आहे. त्यासच "मी" असे ह्मणून चित्त जीव होते. पण तो जीव ईश्वराचें चैतन्यच आहे व तोच सदा शिव आत्मा होय ६५.

**सर्ग ६६**—या सर्गांत द्वैत मनोमात्र आहे व इष्टत्याग आणि प्रबोध याच्या योगानें मनाचा क्षय होतो, असें वर्णन करितात.

**श्रीवसिष्ठ**—राघवा, वर वर्णन केल्याप्रमाणे एक पर वस्तुच नानात्वास प्राप्त होते. ह्मणजे एका दिव्यापासून जसे उपाधिभेदामुळे अनेक दिवे प्रवृत्त होतात त्याप्रमाणें हा प्रकार होतो. चित्ताच्या अधीन असलेल्या जीवत्वाच्या कल्पनेने जसा बंध उत्पन्न होतो त्याचप्रमाणें चित्ताधीन असणाऱ्या विचार व तत्त्वबोध याच्या योगाने मुक्ति मिळते. यास्तव पुरुषानें नामरूपशून्य आत्म्याचें जर दर्शन घेतलें तर त्यास शोक करण्याचा प्रसंगच येत नाहीं. कारण हा नर चित्तमात्र आहे त्यामुळें विचारानें चित्त शांत झाले कीं, सर्व द्वैताचाहि उपशम होतो. कारण चालणाराने आपले तळपाय चर्माच्या जोड्यानीं झांकून घेतले कीं, त्याला सर्व पृथ्वी चर्माच्छादित आहे, असे भासतें. जगाचा अनुभव

चित्तावांचून व चित्ताच्या बाहेर कधींही येत नाहीं. तर तो चित्ताच्याच योगानें व चित्तांतच येत असतो. यास्तव जग चित्तमात्र आहे व त्यामुळेंच चित्ताचा क्षय झाला असतां जगाचा क्षय होतो. केळीच्या झाडाचें स्वरूप पानांहून भिन्न नाहीं. तिचा स्तंभही एकावर एक गुंडाळलेल्या सोपटांचाच झालेला असतो. त्याचप्रमाणे जगद्भ्रम चित्त-तंत्र आहे. चित्तच भ्रमानें उत्पन्न होतें; बाल्यावस्थेस प्राप्त होते; क्रमाने यौवन व वार्धक्य यांचा अनुभव घेतें; मरणाचा सोहाळा पहाते व स्वर्गांत अथवा नरकांत जातें. तात्पर्य हा सर्व नाच तेंच करिते. मदिरेमध्यें खोटेंच अनेक भ्रम दाखविण्याचे जसे सामर्थ्य असतें तसें या चित्तात जग भासविण्याचें सामर्थ्य आहे. नेत्रांस रोग झाला असतां जसे दोन चंद्र दिसतात त्याप्रमाणें चित्ताची भ्रांतिजननशक्ति जीवचैतन्यास परतंत्र करून जग दाखविते. ह्मणजे चित्तशक्तीनें युक्त असलेला जीव जग पहातो. घेरी आलेल्या पुरुषास सभोंवारचे वृक्ष फिरत आहेत, असा भ्रम होतो. त्याप्रमाणेंच जीव चित्ताच्या योगानें क्षुब्ध झालेल्या संसारास पहातो. जेव्हा चित्तयुक्त जीवास द्वित्वाचा म्हणजे आपल्याहून निराळ्या द्वैतमय जगाचा अनुभव येतो तेव्हा द्वैत व ऐक्य याचा भ्रम होतो. पण जेव्हा चित्तरहित झालेल्या त्यास द्वित्वाचा अनुभवच येत नाहीं तेव्हा द्वैत व ऐक्य याचाही क्षय होतो. ज्याचा अनुभव येतो ते चित्-हून भिन्न, ह्मणजे जडच, असलें पाहिजे. पण जड व परतंत्र वस्तूला स्वतः सत्ता नसते. तें अनुभवसमयींही चैतन्याच्या सत्तेनेच सत्तायुक्त होत असते. ह्मणून आह्मीं त्याला चित्-हून भिन्न नसणारे ह्मणून ह्मणतो. याप्रमाणे विवेक करून विषयांचा वस्तुतः अभाव आहे, असा दृढ निश्चय झाला असतां इंधनरहित अग्नीप्रमाणें चित्त आपोआप शांत होतें. ( इंधन ह्मणजे काष्ठादि दाह्य पदार्थ. ते नसले कीं, अग्नि आपोआप शांत होऊं लागतो. त्याप्रमाणेंच बाह्य व आंतर विषय असत् आहेत, असें कळून आले की, त्याच्या विषयींचे संकल्पादि क्षीण होऊन शेवटीं स्वतः चित्तही क्षीण होतें, असा याचा भावार्थ. ) असो; आता जीवन्मुक्त केव्हा होतो ते सांगतों. चैतन्यघन परमात्म्याशीं ऐक्य पावून जेव्हां पुरुष निश्चल होऊन रहातो तेव्हां तो समाधिस्थ असला तरी किंवा भिक्षाटनादि शरीरनिर्वाहोपयोगीं अवश्य कर्में करीत असला तरी, संशांतच असतो. कारण केवल चैतन्य सविषय ( विषय

युक्त) असतें. तर ते अविद्येच्या योगानें विक्षिप्त झाले कीं त्या विक्षिप्तत्वामुळें तें सविषय होतें, असा नियम आहे. त्यामुळें ज्ञान—समाधीच्या दार्ढ्याच्या योगानें चिद्‌ब्रह्मैक्य अभिव्यक्त झाले ह्मणजे अविद्याविक्षेप नाहींसा होतो व त्याच्या अभावीं चैतन्याचें औपाधिक सविषयत्वही पार नाहींसें होतें. ईश्वरादिकाची सर्वज्ञताही मायिक आहे. तो चैतन्याचा स्वाभाविक धर्म नव्हे. हा अमुक विषय, मी पहात आहे; मी जिवत आहें; मी ससार करीत आहें इत्यादि कल्पनाही चित्त—निमित्तक आहेत. ( ह्मणजे चित्त हेंच त्याचें निमित्त आहे. ) चित्ताचा क्षय झाला असतां त्याचा क्षय होणें अगदीं उचित आहे. आतां तूं कदाचित् ह्मणशील कीं, चेतन ह्मणजे चित्ताचा व्यापार. ज्ञान व समाधि याच्या अभ्यासाने त्याचा निरोध होतो; हें खरें, पण व्यापाराचा निरोध होतांच चित्ताचाही निरोध झालाच पाहिजे, असें कांहीं ह्मणतां येत नाहीं. कारण शरीराच्या व्यापाराचा निरोध केल्यावरही शरीर अनिरुद्ध असूं शकतें. पण त्याचें समाधान असें—वायूहून स्पंद जसा निराळा नाहीं त्याप्रमाणे चित्ताहून चित्ताचा व्यापार स्वभावतः भिन्न नाहीं. त्यामुळें चित्तव्यापार निरुद्ध झाला की, चित्तही निरुद्ध झालेच, असें समजावें. शरीराचा व्यापार बद केल्यावर त्या-( शरीरा— )चा निरोध होण्याचें आणखीं काय रहातें, तेंच मला समजत नाहीं. अग्नीतील उष्णता गेल्यावर अग्नीचे काय रहाते कोण जाणें ! असो; याप्रमाणें चित्तक्षय झाला असता चैतन्यात विषयाची प्रथा होत नाहीं व ज्याची प्रथाच होत नाहीं त्याची सिद्धि होणें अशक्य आहे. तस्मात् चित्तक्षयानें विषयानुभवाचा क्षय होतो. तर मग पूर्वी ह्मणजे चित्त होतें तेव्हा त्याचा अनुभव कसा येत होता? ह्मणून विचारशील तर सागतों. रज्जु—सर्पभ्रमाप्रमाणें तो अविद्याभ्रम आहे, असे तत्वज्ञ जाणतात. एवं च रज्जुसर्पस्पंदाप्रमाणें, चित्तस्पदात्मक अशा या ससाराचीही चिकित्सा केवळ बोधानेंच करितां येणें शक्य आहे व ती करिताना कोणत्याही प्रकारचा आयसही नाहीं. सर्वस्वाचा परित्याग करून जर तू वासनामय—चित्तशून्य होऊन राहिलास तर तात्काल मुक्तच होशील, यात सशय नाहीं. रज्जूस पहातांच सर्पभ्रम जसा तात्काल नाहींसा होतो त्याप्रमाणें सर्व ज्ञानशक्तीस अंतर्मुख करून स्वतःस्वाचें दर्शन घेतलें असता तात्काल ससार नाहींसा होतो. पण इंद्रियनिग्रहावाचून ज्ञानशक्ति अतर्मुख होत नाहीं व विषयाभिलाषाचा त्याग

केल्यावाचून इंद्रियनिग्रह करितां येत नाहीं, असा सामान्य नियम आहे. वास्तव, राघवा, तुला ज्या ज्या विषयाचा अभिलाष असेल त्याचा त्याचा मनापासून त्याग करून जर तूं स्वरूपांत स्थिर झालास तर तुला मोक्ष मिळालाच ह्मणून समज. यांत दुष्कर तें काय आहे ? अरे बा क्षत्रिया, तुह्मी महावीर आपल्या अमूल्य प्राणानाही तृणाप्रमाणें तुच्छ समजून त्याचा त्याग करितां कीं नाहीं ? मग इष्ट विषयांविषयींचा अति तुच्छ अभिलाष सोडण्याचीच तुह्माला इतकी भीति कां वाटावी ? तस्मात् बा साधो, ज्याच्याविषयीं अभिलाष असेल त्या विषयातील आसक्ति सर्वथैव तोडून, यदृच्छेनें जें प्राप्त होईल त्याचा कर्मेंद्रियांनीं स्वीकार कर व त्यावर निर्वाह करून नष्ट झालेल्या वस्तूविषयी शोक न करितां शांत चित्तानें रहा. अशा तऱ्हेचा जो तत्त्ववेत्ता असतो त्याचे अजत्व ह्मणजे जन्मादि विक्रिया-शून्य ब्रह्मत्व तळहातावरील आवळ्याप्रमाणें अथवा पुढच्या पर्वताप्रमाणें अगदीं प्रत्यक्ष आहे. या सर्व विवेचनाचा साराश असा—ज्याप्रमाणें कल्पांत-समयीं एकरूप झालेला समुद्र तरगाच्या योगानें भेदयुक्त दिसतो त्याप्रमाणे आ-माच जगत्—रूपानें आविर्भूत झाला आहे, असे भासतें. पण तो ज्ञानाच्या योगानें अभिव्यक्त झाला असता मोक्षनामक पुरुषार्थ देतो व अज्ञानानें आवृत झाला असता प्रथम सर्व अनर्थाचें आदिकरण जें मन त्याच्या अवस्थेस ह्मणजे मनस्त्वास व नतर मनःप्रयुक्त दीर्घबधनास कारण होतो ६६.

सर्ग ६७—भोक्ता जो जीव त्याचें व्यष्टिप्राधान्यतः स्वरूप व इंद्रियादिकांचा संभव या सर्गात सागतात.

श्रीराम—गुरुराज, मनास सकल्पाने उत्पन्न करून समष्टि जीव आपल्या ठायीं त्याचा तादात्म्य—अध्यास करितो व मनस्त्वयोग्य जीव होतो, पण याचा व परमात्म्याचा काय सबंध आहे ? तो त्याचा अश आहे कीं, कार्य आहे ? कीं स्वतः तो परमात्माच आहे. जर तोच असेल तर त्याच्या ठायीं उत्पन्न कसा झाला ? ह्मणजे परिणाम पावून उत्पन्न झाला कीं विवर्तरूपानें ? जीव परमात्म्याचा परिणाम आहे ह्मणून ह्मणाल तर दुधाचा दहीं हा परिणाम झाला असतां, दूध नष्ट होत असल्याचे अनुभवास येत असल्यामुळें परमात्मा अनित्य आहे, असें होणार व जीव परमात्म्याचे ठायीं रज्जूसर्पाप्रमाणे विवर्तरूपानें उत्पन्न झाला आहे असे ह्मणाल तर

रज्जुसर्पाप्रमाणेंच तो बाधित होईल. बरें जीव मुळीं उत्पन्नच झाला नाही ह्मणून ह्मणावें तर भोक्त्याची असिद्धि होते. ह्मणजे सुखदुःखांचा भोग घेणाराच कोणी नाहीं, असें झाल्याकारणानें अनुभवास येणाऱ्या दुखदुःखभोक्त्याची सिद्धि होत नाहीं. कारण ब्रह्म तर क्षुधा, पिपासा (तहान) इत्यादि धर्मांनी रहित आहे, असें श्रुतींत सांगितलें आहे. बरें तो परमात्म्याहून निराळा आहे ह्मणून ह्मणावे तर त्याच्या सजातीय आहे कीं विजातीय आहे? इत्यादि विकल्प उठतात. यास्तव जीव व परमात्मा यांचा काय संबध आहे, तें मला अगोदर सांगा.

श्रीवसिष्ठ—राघवा, अनेक अचित्य शक्तींनीं युक्त असलेल्या मायाशक्तीनें शबल (मलिन) झालेलें ब्रह्म परमार्थतः अभिन्न असलें तरी त्या मायेच्या योगाने जणुकाय भिन्नत्वास प्राप्त झाल्यासारखें होऊन व औपाधिक विकाराचा आपल्या ठायी आरोप करून अनत जीवाच्या रूपानें व सर्वज्ञ ईश्वरभावानें क्रीडा करण्यास समर्थ आहे व त्यामुळें वरील आक्षेपातील एकही आक्षेप टिकत नाहीं. मी मागेंही एकदा सागितलेंच आहे कीं, सर्वशक्ति ब्रह्म ज्या शक्तीनें स्फुरण पावते, त्याच शक्तीस तें स्वतः प्राप्त झालें आहे, असे तें पहातें. तो सर्वात्मा स्वतः अनादिकालापासून ज्या चित्तसस्कारोपहित चिद्रूपास पहातो त्यालाच जीव ह्मणतात. तेंच संकल्प करणारें होय. तस्मात् आत्म्याच्या ठायीं मायेमुळें प्राप्त होणारें द्वितीयत्व हेंच उत्तर संसारप्रवृत्तीचें मुख्य कारण, व पूर्व पूर्व सकल्पवासनेनें वासित झालेलें जीवचैतन्य हें मागून होणाऱ्या प्रत्येक वैचित्र्याचें कारण आहे.

श्रीराम—मुनिवर्य, जीवस्वरूप माझ्या बुद्धीवर आरूढ झालें. (मला तें समजलें.) पण या जीवाच्या जन्मादिकास कारण होणारे दैव, कर्म व कारण ह्मणजे काय, तें मला सागा.

श्रीवसिष्ठ—रामा, एवढा वेळ मीं जे काहीं सांगितलें त्यावरून तुला समजलेंच असेल कीं, चिन्मात्र ब्रह्म स्पदस्वभाव व अस्पंदस्वभाव, असें दोन प्रकारचें आहे. स्पंदस्वभाव ह्मणजे रजःप्रधान—मायोपहित (रजोगुण जिच्यामध्यें प्रधान आहे, अशी माया हीच ज्याची उपाधि आहे असें अथवा शबल), व अस्पंदस्वभाव ह्मणजे शुद्ध (उपाधिरहित). आकाशांतील वायूप्रमाणें, तें स्पंदामुळें सृष्ट्युन्मुख होतें व स्पंदाच्या

अभावीं ते शांत रहाते. स्वाभाविक चित्त हेंच चित्त होय. त्याची आत्म्याच्या अज्ञानानें विषयाकार कल्पना केल्यास तें तदाकार होतें. ह्या त्याच्या विषयाकारासच स्पंद ह्मणतात. पण तेंच जेव्हां विषयाकाररहित होतें तेव्हां त्यास अस्पंद ह्मणतात. एवं च स्पंद व अस्पंद यांच्या योगानेंच चैतन्यास प्रपंचरूपता व अप्रपंचरूपता प्राप्त होते. अर्थात् स्पंदालाच जीव, कारण, कर्म, दैव, इत्यादि ह्मणतात. ह्मणजे प्राणस्पंदास जीव, आपल्यांतील कार्यास व्यक्त करणाऱ्या स्पंदास कारण, शरीर, इंद्रियें, इत्यादिकांच्या स्पंदास कर्म व सूक्ष्मावस्थेंत चिरकाल राहून फलोन्मुख झालेल्या स्पंदास दैव ह्मणतात. पण अनुभवसत्तेचा अवलंब केल्यावाचून त्या जीवादिकांस आपापलें कार्य करितां येत नाहीं. यास्तव जो हा अनुभवात्मक चित्स्पंद आहे तोच जीव, कारण, कर्म, दैव, इत्यादि होय व तेंच संसाराचें बीज आहे. रामा, आतां 'तो त्याच्याठायीं उत्पन्न कसा झाला?' असा जो तूं वर ( सर्गाच्या आरंभीं ) प्रश्न केला आहेस त्याचें उत्तर सांगतो. हा अनुभवात्मक चित्स्पंद पूर्वमरणसमयीं कृतकर्माप्रमाणें बुद्धीमध्यें जसा संकल्प करितो त्याप्रमाणें पुढच्या जन्मीं तो होतो. अनेक अनुभवात्मक चित्स्पंदांतील ( चिदाभासांतील ) जे कांहीं चित्स्पंद मंद शास्त्रीय प्रवृत्ति करणारे असतात ते सहस्रावधि योनींत जातात व दीर्घकालानें या संसारांतून सुटतात. पण जे तीव्र शास्त्रीय प्रवृत्ति करणारे व त्यामुळेंच ज्ञानाचे अधिकारी असतात ते एकाच जन्मानें मुक्त होतात. सारांश परमात्म्यानेंच संसारांत जीवरूपानें उत्पन्न होणें हें चित्ताच्या अधीन आहे व त्यामुळेंच त्याचा जन्म वास्तविक नव्हे. उपाधीप्रमाणें होणें हा केवल चैतन्याचाच नव्हे तर सर्व प्रकाशांचा स्वभाव आहे. सूर्याचा किंवा दिव्याचा प्रकाश पांढऱ्या वस्त्रावर पांढरा होतो; तांबड्या शालीवर लाल होतो; पिवळ्या पितांबरावर पिंवळा होतो; काळ्यावर काळा होतो हें सर्वास ठाऊक आहेच. या स्वभावामुळेंच चैतन्य देहाच्या उत्पत्तीस कारण होणाऱ्या अन्नरसानें परिणत होतें. नंतर पिता व माता यांच्या शरीरांतील शुक्रशोणितरूपानें परिणाम पावतें व त्यांचा गर्भाशयांत संसर्ग झाला ह्मणजे हळु हळु देहरूप होतें. तो देहच शास्त्रीय किंवा अशास्त्रिय कर्मानुष्ठानाच्या द्वारा स्वर्ग, मोक्ष, नरक, वध, बंध इत्यादिकांस कारण होतो. हा सर्व चैतन्याचाच विकार आहे. पित्याच्या

मातेच्या व मुलाच्या शरीरांतील चैतन्य निरनिराळें आहे, असें जें वाटतें तें त्याच्या शरीरामुळें होय. शरीरादिकावांचून चैतन्यांतील भेद जाणता येणें शक्य नाहीं अर्थात् चैतन्याचा भेद हा औपाधिक भेद आहे. वास्तविक नव्हे हें कोणालाही थोड्याशाच विचारानें समजण्यासारखें आहे. प्रतिशरीरातील जीवाचा भेदही याच न्यायानें असत्य ठरतो. उपाधिभूत शरीरेंही आपापल्या कारणाहून वस्तुत भिन्न नसल्यामुळे पच-भूतमय आहेत, असे ह्मणावें लागतें व भूताचें आद्यविवर्त कारण चित् आहे. त्यामुळें हे सर्व चिन्मय आहे, असा विवेकबुद्धीने निश्चय करावा. पण याप्रमाणें भेद असत् आहे, असें जरी ठरत असलें तरी मनोभ्रम असेपर्यंत त्याचा अनुभव आल्यावाचून रहात नाही. अर्थात् अमुक जन्मास आला, अमुक मेला इत्यादि प्रतीति हा मनोविलास आहे. त्याचा अनुभवच येऊं नये असे वाटत असल्यास तू अनुभवाचे निमित्त ( मन ) नाहींसे कर. मन अगोदर "मी व माझें" असे पहातें व तेंच भेदकल्पनेचे मूळ आहे. आत्मस्वरूपाचें अज्ञान व भोगाच्या त्रिविध आशांचे सस्कार, हें " मी व माझें " या कल्पनेचें मूळ आहे. तात्पर्य मथुरेच्या लवण राजास स्वप्नात जसा " मी चाडाळ आहें " असा भ्रम झाला होता त्याप्रमाणेच चित्तास या जगत्स्थितीचा भ्रम होतो. राघवा, हें सर्व मनोमात्र आहे. यास्तव वर सांगितलेलाच आरोपक्रम ध्यानात रहावा ह्मणून मी तो पुनः सांगतों. अगदीं सौम्य सागरात जसा अति अल्प जलस्पंद उठावा त्याप्रमाणें शात ब्रह्मरूप चित् विषयोन्मुख होते तीच विषयविचारोन्मुख चित् चित्तरूपी ऊर्मि धारण करीत होत्साती स्पंद पावल्यामुळें जीवरूपास प्राप्त होते. नतर ब्रह्मसागरात चित्–जल, जगत्–रूपी बुडबुडे निर्माण करितें. यास्तव हे प्रिय रामा, जीव हा मायाविलासामुळें, ब्रह्माच्या आधारानेंच होणारा, ब्रह्माच्या स्वरूपभूत चैतन्याचा आभास आहे, हे कधींही विसरू नको. चिदाभासरूप ब्रह्मास जीव ह्मणतात. निश्चयरूप उपाधीमुळें त्यासच बुद्धि हें नांव देतात. स्मरण या कार्यामुळें त्यास चित्त समजतात. अभिमानामुळें तें अहंकार होतें. विक्षेपशक्तीच्या योगानें ते मायास्वरूपी बनतें. श्वासोच्छ्वासाच्या योगानें तें प्राण होतें. पाहूं लागतें तेव्हा तें नेत्र होतें व येणेंप्रमाणें सर्व तेंच आहे. पण निरनिराळ्या उपाधींमुळें त्यास निरनिराळीं नांवें प्राप्त झालीं आहेत. मी तुला मागें सांगितलेंच आहे कीं, संकल्पप्रधान समष्टि–मन

शब्दादि तन्मात्रपूर्वक संकल्पानेंच हें सर्व जग निर्मितें व हें मनःकल्पित असल्यामुळेंच मिथ्या आहे. याचा साक्षी आत्मा नित्य शुद्ध आहे. तो आपल्या स्वाभाविक प्रकाशामुळें हे चित्तस्वप्न पहात असतो, असें जरी वाटलें तरी वस्तुतः तो तें पहातही नाहीं. कारण जीवानें इंद्रियांच्या द्वारा बाह्य संसार पहाणें ही जाग्रत्–अवस्था; हृदयापासून कंठापर्यंत जेवढा आंत अवकाश आहे त्यांत अहंभावयुक्त झालेल्या प्राणें वासनामय संसार पहाणें हे स्वप्न; स्मृतीस कारण होणाऱ्या वासनारूपी बीजाने मात्र अवशिष्ट राहून हृदयांत स्थिति होणें ही सुषुप्ति व त्या वासनारूप बीजावस्थेचेही उल्लंघन करून चिन्मात्र होऊन रहाणें ही जीवाची तुर्या–अवस्था होय. याप्रमाणे शोधित( उपाधिरहित ) प्रत्यक तत्त्वास ब्रह्मस्वरूपांत लीन करून शांत स्थितीत रहाणें हेंच तुर्यातीत पद होय. त्या पदीं आरूढ झालेला धीर पुरुष पुनरपि संसार–दुःखांत पडत नाहीं. त्या तुर्यातीत पदामध्येच हे मायिक जग उत्पन्न झाले आहे व त्याच्यामध्येंच ते लीन होतें. त्याच्याच आधाराने हें रहाते. पण याचें त्या शुद्ध तत्त्वाशी तादात्म्य होत नाही. तर कसें तरी त्याच्या अचिंत्य सामर्थ्यामुळे त्याच्या आधाराने हें रहाते. ह्मणजे शुद्ध ब्रह्म व जग यांचा कोणत्याच प्रकारचा संबध नाहीं. तर मग ते त्याचे कारण कसे, ह्मणून ह्मणशील तर सांगतो. वृक्षाच्या वाढीस प्रतिबंध करीत नसल्यामुळे आकाश जसे वृक्षाच्या उंचीचें कारण, त्याच न्यायाने मायाकृत सर्गास प्रतिबंध न केल्यामुळेंच हें तत्त्व त्याचा ( वस्तुतः कर्ता नसताना ) कर्ता. केवल सांनिध्यामुळे आरसा जसा प्रतिबिंबाचें कारण होतो त्याप्रमाणें हा चिन्मय परमात्मा केवळ सानिध्यामळें विषयस्फुरणाचें कारण होतो. असें जर आहे तर हें सर्व एकदम कां होत नाहीं.? या शंकेचें समाधान असें—बीज अंकुर, शाखा, पर्णे, इत्यादिकांच्या रूपानें परिणाम पावतां पावतां जसें फळ होतें त्याप्रमाणें चिन्मात्रही चित्त, जीव इत्यादि क्रमानें मन होते. आतां तूं ह्मणशील कीं, प्रलय समयीं चित्तादि सर्व विकारांचा ब्रह्मामध्यें लय झाला असतां ती चित् सदाच तशी कां रहात नाहीं. पुनः प्रपंचरूप कां होते ? तर त्याचें कारण सांगतों. स्वर्गादि लोकांत जाऊन तेथील पुण्यादि फलभोग भोगिल्यावर उत्तर जन्मांस कारण होणारें पुण्य–पापादि संचित कर्म बरोबर घेऊन पुनः . या किंवा असल्या दुसऱ्याच एखाद्या लोकास

येण्याकरितां निघालेला जो जीव त्यानें युक्त असलेला वृष्टीचा बिंदु वृक्ष, धान्याचा अंकुर इत्यादिकांमध्यें प्रवेश करून पुनः जसा बीजरूप होतो त्याप्रमाणे जीववासनांनीं वासित झालेली चित्–ही चित्त, चित्ताचे विषय इत्यादि सर्गरूपानें पुनः होते. जीववासनांचा त्याग करून स्वस्थ रहात नाहीं. पण बीजामध्यें सूक्ष्मरूपानें असलेला वृक्ष व त्याचे बीज यांचे ज्ञान झालें तरी व ते नसलें तरी त्यांतील वृक्षास उत्पन्न करण्याची शक्ति जशी नाहींशीं होत नाहीं त्याप्रमाणें चित्तरूप झालेले जग व ब्रह्म यांमध्येंही ज्ञान व अज्ञानकालीं कांहीं विशेष असणार नाहीं; ह्मणून ह्मणशील, तर तें बरोबर नाहीं. कारण बीज व तरु यांचें ज्ञान अथवा अज्ञान हें व्यावहारिक आहे. त्यामुळें त्याच्या ज्ञानानें तात्त्विक अखंडितरूप व्यक्त होत नाहीं. पण ब्रह्म व जग याचें ज्ञान पारमार्थिक असल्यामुळें त्यांचें तात्त्विक ज्ञान झालें असतां, दीपाच्या योगानें रूपाचा प्रकार जसा व्यक्त होतो त्याप्रमाणें अखंडित चिन्मात्राचा साक्षात्कार होतो. भूमीमध्यें जसें जसें खोल खणित जावें तसें तसें तेथें आकाश व्यक्त होतें. त्याप्रमाणे गृह वस्त्र, क्षेत्र, पुत्र–इत्यादि, अविद्येमुळें आपलेसे झालेल्या, पदार्थांचा जसा जसा विचार करावा तसे तसे ते अधिष्ठान ब्रह्मसत्ता मात्र होतात. स्फटिकांत दिसणारा वनादिकांचा आकार ज्ञानापूर्वी सत्यसा भासत असला तरी हा स्फटिक वनाच्या आकारावाचून ह्मणजेच निर्विकार आहे, असें समजले असता तो जसा मिथ्या किंवा स्फटिकरूप आहे, असा निश्चय होतो त्याप्रमाणें नाना या भावानें रहित असलेल्या ब्रह्माचे ठायी नानारूपानें भासणारें हें जग ब्रह्माच्या तात्त्विक स्वरूपज्ञानानें बाधित होतें. अर्थात् त्यांची भास अज्ञान–प्रयुक्त आहे. एक व अखंडित स्फटिक जसा त्यात दिसणाऱ्या फल, पत्र, लता, गुल्म, भूमि, मूळें इत्यादिकानीं युक्त असलेल्या वनाच्या आकाराचा होतो तसें एक व अखंडित ब्रह्म सर्व जगरूप झालें आहे, असें भासतें.

श्रीराम—गुरुराज, केवढा हा चमत्कार आपण मला आज सांगितलात ! हें जग ह्मणजे एक अवर्णनीय चमत्कारच नाहीं तर काय ? हें वस्तुतः असत् असतांनाच केवढें मोठें भासतें, किती सत्य वाटतें व किती स्पष्ट दिसतें. पण हें सर्व मायामात्र आहे, हें मला समजलें. आतां त्या स्वभावसिद्ध वस्तूपासून हा सर्व विपुल प्रपंच कसा उद्भवतो तें मला

सांगा. ह्मणजे तन्मात्रे, इंद्रियें, समष्टि व व्यष्टि—स्थूल शरीर यांच्या उत्पत्तीचा क्रम ऐकण्याची माझी फार इच्छा आहे व ती पूर्ण करण्यास आपणच समर्थ आहां.

**श्रीवसिष्ठ**—राघवा, जीवस्वरूप अत्यत असंभवनीय आहे. तें आपल्या शुद्ध कारणाहून भिन्न नाहीं. पण भितऱ्या मुलाच्या हृदयांत लहू राक्षसाचा किंवा भूताचा आकार जसा उत्पन्न होतो त्याप्रमाणे ब्रह्मामध्ये ही जीवता उत्पन्न होते. ती वस्तुतः शुद्ध, मानमेयात्मक (प्रमाण-प्रमेयरूप) व सत्य असूनही असत्याप्रमाणें स्थित असणारी व भिन्न नसतांना भिन्न असल्यासारखी आहे. ती ब्रह्माच्या वृद्धिरूप आहे. (जीवतेमुळेंच ब्रह्माला ब्रह्मत्व आलें आहे तिच्या अभावीं तें ब्रह्मही नव्हे.) ज्याचा अनुभव आला असेल त्यांचेंच मनन करिता येतें. पण अनुभव, मन व मेय ह्मणजे इंद्रियें व विषय यांवाचून येत नाहीं. यास्तव मान—मेय—वासनेचा उद्भव होणें हेंच ब्रह्माच्या मनोभावाचें निमित्त आहे. " जीववासनेमुळें ब्रह्म जसें जीव होतें त्याचप्रमाणें मनन वासना उत्पन्न झाल्यामुळे तो जीवच अथवा जीवभावापन्न (जीव—भावास प्राप्त झालेलें) ब्रह्मच मन होते. ते मन तन्मात्राविषयीं मनन करून लागलेच स्वतः तद्रूप झाले आहे, असे पहातें. तो अतिसूक्ष्म तन्मात्रात्मा, चिदाकाश प्रकाशमान होऊ लागलें असता, त्याच्या स्फूर्तीनें स्वतः स्फूर्तिमान् (ज्ञानात्मक) होऊन सृष्टिकाल आल्याकारणाने पंचीकरणाच्या द्वारा सकल्पानेच उत्पन्न केलेले रमणीय ब्रह्माडरूप व मनुष्यादि देहांचें रूप आपल्यामध्येच पहातो. त्यात प्रथम शब्द व अर्थ याच्या विभागाची स्फूर्ति होत नाहीं. (ह्मणजे मी तत्त्वरूप आहें की, मनुष्यादि आकाररूप आहें, हें त्यास कळत नाहीं) त्यामुळें तें रूप जड असल्यासारखें असतें. पण पुढें तें " अहं " ह्मणजे मी असा देहावर अध्यास करितें; त्यानंतर त्यास संसारतत्त्वाचें स्मरण होतें. देहाभिमानामुळें तो देहमय होतो. पुढें आपल्याच ह्मणजे शरीराच्याच मुखादि भागामध्यें क्रमानें रसना, चक्षु, घ्राण, इत्यादिकांची कल्पना करून सर्व इंद्रियांनीं संपन्न होतो. याप्रमाणें तो जीववासनेप्रमाणें विशिष्ट देहयुक्त होतो व बाह्य विषयादिकांस पहातो. सारांश, राघवा, याप्रमाणें समष्टि व व्यष्टि जीवाचा संकल्पमय आतिवाहिक देह उत्पन्न होतो. ब्रह्माच्या अज्ञानामुळें हा विविध देहभाव

प्राप्त होत असून त्याच्या यथार्थ ज्ञानानें त्याचा क्षय होतो. आतिवाहिक देहादिकांच्या द्वारा अध्यारोप व अपवाद याची कल्पना करणें हें सुद्धां आत्म्याच्या व्युत्पत्ती करितांच होय. परमार्थदृष्ट्या तिचा कांहीं उपयोग नाहीं. कारण प्रमाता, प्रमाण व प्रमेय ही त्रिपुटी व तद्रूप जग ब्रह्मच आहे, असें साक्षात् जाणल्यावर आतिवाहिकादिकाचें वर्णन करण्यास अवकाशच रहात नाहीं. परब्रह्माहून मी भिन्न आहे, असें मानल्यानें अथवा तशा सस्कारामुळे हा दुसरा आतिवाहिक भाव प्राप्त होतो. पण ' मी ब्रह्म आहे ' असे जाणल्यानें ब्रह्मच होणें योग्य आहे व तें ( ब्रह्मत्व– )ज्ञान भ्रमजन्यही नाहीं, तर सत्य आहे.

**श्रीराम**––पण गुरुराज, चिदेकरस ब्रह्माचे ठायीं अज्ञानाचाच असंभव आहे. तेव्हां त्याच्या अभावीं जीवभेद–कल्पना कशी होणार ! तसेंच ब्रह्म व आत्मा यांचें स्वभावतःच ऐक्य आहे. तेव्हां मोक्षफल देणाऱ्या विचाराची तरी प्रवृत्ति कशी होणार ?

**श्रीवसिष्ठ**––राघवा, हा प्रश्न तू तत्त्व जाणून करीत आहेस कीं, त्यास न जाणता ? तत्त्वाचा साक्षात्कार केल्यावर जर तू हा प्रश्न करीत असशील तर तुझें ह्मणणें अगदीं बरोबर आहे. कारण तत्त्वज्ञानानतर विचार निरुपयोगी आहे. पण त्यास न जाणतां जर तू हा प्रश्न करीत असलास तर असा प्रश्न करावयाचा काल अजून आला नाहीं, एवढेंच मी तुला सुचवितो. कारण हा प्रश्न सिद्धात–कालींच शोभतो. अकालीं केलेलें कोणतेंही कार्य निरर्थक ठरते. श्रावणात कुदावर फुलें जरी आलीं तरी तीं उत्पातसूचक असतात. अकालीं केलेलें उत्तम भाषणही मूर्खाच्या वल्गनेप्रमाणें उपहास्य होतें. सर्व पदार्थ आपापल्या योग्य कालीं योग्य फल देत असतात. असो, आता अगोदर मी तुला प्रस्तुत तत्त्वच अधिक स्पष्ट करून सागतों. अशा रीतीनें तो स्वप्नसमष्ट्यात्मा योग्य काल आला असता समष्टिरूपानें उत्पन्न होतो. प्रणवाचा उच्चार व त्याच्या अर्थाचें ज्ञान याच्या योगानें तो जें मनोराज्य करितो तें तें तात्काल तसेंच झालें आहे, असें पहातो. ह्मणजे हें सर्व आकाशादि जग समष्टीच्या मनोराज्यापासून झालें आहे. त्यामुळें व्यष्टि मनोराज्याप्रमाणें तेंही असत् आहे. आकाशांत दिसणाऱ्या नीलवर्णाप्रमाणें हें जग भ्रामक आहे. फार काय पण मेरु पर्वताची अनुभवास येणारी उंचीही आकाश-

रूप आहे. यास्तव वस्तुतः कांहीं उत्पन्न होत नाहीं व कांहीं नष्ट होत नाही. सृष्टि अशा अशा क्रमाने उत्पन्न होते, असें जे शास्त्रांत सांगितलेलें असते तेंही प्रपंचमिथ्या आहे हे समजून देण्याकरितांच होय. ब्रह्मदेवादि जीवाची सत्ता जशी सदसन्मयी ( ह्मणजे विचाराच्या कसोटीस न उतरणारी ) असते तशीच ती देवापासून कीडमुंगीपर्यंत सदसन्मयीच असते. अर्थात् जीवत्वही जगत्कोटींतच येतें. त्यामुळे तेंही मिथ्या आहे. ब्रह्मदेवापासून कीटापर्यंत प्रसिद्ध असलेलें ज्ञान ( सवेदन, सुखदुःखादि-जाणीव ) जरी अनुभवापासून उत्पन्न झालेले असलें तरी ब्रह्मज्ञानानें या सर्वांचा बाध होतो. जसा ब्रह्मदेव निर्माण होतो तसाच कीटही निर्माण होतो. ब्रह्मदेवाचें चित्त मलिनतेनें मुळिच आच्छादित झालेलें नसते. ह्मणून तो जगत्कर्ता होतो व कीटाचे चित्त चित्तदोषानी अतिशय मलिन झालेलें असतें ह्मणून तो क्षुद्रकर्मे करणारा होतो. ह्मणजे कोणत्याही जीवाच्या जाणिवेंत भेद नाहीं. पण त्याची जीवता उपाधीच्या अनुरोधानें रहाणारी असल्यामुळें तिच्या पौरुषात ( कर्मात व शक्तींत ) अतर असतें. पुण्यकर्माच्या अत्यंत उत्कर्षामुळे ब्रह्मता प्राप्त होते व पापाच्या आधिक्यामुळें जीवास कीटता प्राप्त होते. ते दोन्ही भाव हें सर्व चिन्मात्र आहे असे न जाणल्यामुळें येतात. पण तसें एकदा ज्ञान झालें कीं, अशाप्रकारच्या सर्व भ्राति क्षीण होतात. कारण प्रमाता, प्रमाण, प्रमेय इत्यादि सर्व चिन्मात्र ब्रह्मतत्त्वाहून भिन्न नाहीं. त्यामुळे सर्व द्वैतवाद व अद्वैतवाद मिथ्या आहेत. ते केवल भावनेच्या दृढतेमुळें भासत असतात. आपण जशी भावना करावी तसा आपणास अनुभव येतो. जे पृथ्वी, आप, इत्यादि भूतांच्या विकारांनी भरलेल्या जगाची भावना दृढ करितात त्यांस जगाचा अनुभव येतो. तेंच सत्य आहे, असें वाटतें व जे त्रिपुटींचा क्षय करून ब्रह्ममय होतात, ब्रह्माची भावना दृढ करितात ते ब्रह्ममय होतात, असा नियम आहे. हा सर्व स्वभावाचा विलास आहे. ब्रह्मदेव मनानें प्राण्याच्या कर्माप्रमाणें जें जे जसे व्हावें ह्मणून कल्पना करितो ते तें तसेंच होते. हा स्वभावसंज्ञक नियतीचा धर्म आहे. साराश जग मनःकल्पित आहे. ह्मणून तें असत्य आहे व चेतन मनोरथमात्र नसून स्वाभाविक स्वसत्तेनें युक्त आहे. ह्मणूनच ते सत्य आहे ६७.

**सर्ग ६८—या सर्गात कर्कटीनामक राक्षसीचें व सर्व भूतास खाण्याच्या इच्छेनें तिनें केलेल्या उग्र तपाचें वर्णन करितात.**

**श्रीवसिष्ठ**—रामा, याविषयीं एक पुरातन इतिहास सांगत असतात. त्यात एका राक्षसीनें तत्त्वार्थानें भरलेले अनेक प्रश्न केले आहेत. हिमालयाच्या उत्तरेस एक कर्कटीनामक राक्षसी रहात असे. तिला विषूचिका व अन्यायबाधिका अशीं आणखी दोन नावें होतीं. तिचा वर्ण काजळासारखा होता. ग्रीष्मर्तूत सुकलेल्या विंध्य–अरण्याप्रमाणें ती शुष्क व कृश झाली होती. तिचे उदर अंतरिक्षाच्या उदराप्रमाणें अतिशय विस्तीर्ण होतें. तिचे नेत्र अग्नीच्या निखाऱ्यासारखे लाल होते. ती काळें वस्त्र नेशीत असे. तिचे केंस नेहमीं वर उच उभारलेले असत. तिचे गुडघे तमालवृक्षासारखे कठिण होते. तिचीं नखें लालवर्णाचीं व सुपाच्या आकाराचीं होतीं. ती आपल्या गळ्यात मनुष्याच्या शुष्क अस्थिपंजराच्या माळा घालीत असे. एकादा शिवभक्त बाहु, कंठ, इत्यादि स्थळी रुद्राक्ष जसे धारण करितो त्याप्रमाणे ती सर्व शरीरावर शवांच्या माळा धारण करीत असे. सुकलेल्या कपालास्थींचीं कुंडले ती आपल्या कानात घालीत असे व तीं एकसारखीं लडलडा हालत असत. तिचे हातही फारच लांब होते. पण तिचें शरीर फारच मोठें असल्यामुळे व जठराग्निही अतिशय प्रज्वलित असल्याकारणानें तिला अन्न मिळेना आणि त्यामुळें तिची तृप्ति होईना. वडवाग्नीच्या ज्वालेप्रमाणे त्या महोदरीची जेव्हा तृप्ति होईनाशी झाली तेव्हा तिनें मनांत असा विचार केला—समुद्र जसा नद्यांतून येणाऱ्या जलास एकसारखा आपल्या उदरात साठवीत असतो त्याप्रमाणें या जंबुद्वीपांतील सर्व प्राण्यांस जर मी प्रत्येक श्वासाबरोबर गिळून टाकण्यास समर्थ झालें तरच माझी तृप्ति होईल. पण त्याला कोणती युक्ति योजावी ? कारण आपत्कालींही ज्या युक्तीनें प्राण वांचतील तीच युक्ति उत्तम होय. पण मंत्र, औषधि, तप, दान, देवपूजा इत्यादि उपायांनीं सुरक्षित झालेल्या सर्व प्राण्यास एकदम खातां येणें शक्य नाहीं. यास्तव मी आतां न कंटाळतां व खिन्न न होतां घोर तप करितें. कारण अति उग्र तपानें दुर्लभ वस्तूंचाही लाभ होतो, असा पुष्कळांस अनुभव आला आहे. असा विचार करून यावत् प्राणिमात्रांस खाऊन टाकण्याच्या इच्छेने ती इतर भूतांस दुर्गम असलेल्या हिमालयावर गेली. त्या पर्वत-

राजाच्या शिखरावर जाऊन बसलेली ती एकाद्या काळ्याकुट्ट मेघासारखीच दुरून पाहणारास दिसत असे. तेथें गेल्यावर स्नान करून ती विक्राळ राक्षसी एका पायावर उभी राहिली. पूर्णिमेचा चंद्र व सूर्य यांप्रमाणें तिचे नेत्र कधीं मिटत नसत. याप्रमाणे निश्चयानें ती तेथें उभी राहिली असता क्रमानें तिचे दिवस, पक्ष, मास, ऋतु, अयनें, व वर्षें जाऊं लागलीं. शीत, उष्ण इत्यादि सहन करीत स्थिर होऊन राहिलेली ती त्या पर्वताच्या शिखराचाच एक भाग आहे, असे वाटे. असो; शेवटीं याप्रमाणें दीर्घकाल एकनिष्ठेनें तप करणाऱ्या तिच्यावर अनुग्रह करण्याकरिता कमलोद्भव ब्रह्मा तेथें आला ६८.

**सर्ग ६९**—या सर्गांत, ब्रह्मदेव तिला इष्ट वर व गुणी पुरुषाचें रक्षण व्हावें ह्मणून एक मंत्र देऊन स्वलोकी गेला, असें वर्णन करितात.

**श्रीवसिष्ठ**—राघवा, सहस्रवर्षें तप केल्यावर अनुग्रहास पात्र झालेल्या व स्वप्रयत्नानें अनुग्रह करण्यास भाग पाडणाऱ्या तिच्या जवळ ब्रह्मदेव आला. कारण तप हवी ती सिद्धि देऊ शकते व तपःसिद्धि झाली असता विषासह अग्निही शीतल होतो. असो, तेव्हा मनानेंच त्यास प्रणाम करून ती तशीच स्थिर राहिली. आता याच्याजवळ क्षुधाशात्यर्थ कोणता वर मागावा, ह्मणून ती मनात विचार करू लागली. विचाराती काय मागावयाचें ते तिला आठवले. मी रोगयुक्त लोखडी जीवसूचिका ( सुई ) होते. या ब्रह्मदेवाच्या वराने मी दोन प्रकारची सूची झाले ह्मणजे कोणास न दिसता एकाद्या सुगधाप्रमाणे मला सर्व प्राण्यांच्या हृदयांत प्रवेश करिता येईल व या उपायाने माझ्या इच्छेप्रमाणे मला सर्व जग ग्रासता येईल आणि माझी क्षुधा शात होईल. कारण क्षुधाशातीहून अधिक सुख कोणतेही नाहीं. असा मनातल्यामनात विचार करीत असलेल्या तिला, तिचा दुष्ट अभिप्राय जाणूनच, ब्रह्मदेव ह्मणाला, “ राक्षसाच्या कुलाचें भूषण होणारे पुत्रि कर्कटिके, या घोर तपाचा त्याग कर. मी तुझ्या या आश्चर्यकारक तपाने सतुष्ट झालो आहें. तुला जो वर पाहिजे असेल तो मागून घे. ” राघवा, हे ऐकून ती निशाचरी ह्मणते, “ भगवन्, हे भूत-भव्येश ( मागे झालेल्या, पुढे होणाऱ्या व वर्तमानकालीं असणाऱ्या वस्तुमात्राच्या नियामक ), तुला जर वर द्यावयाचाच असेल तर मी रोगयुक्त सूची जीवसूचिका व्हावे हा वर दे. ” तेव्हां ब्रह्मदेव ‘ तथास्तु ’

असें ह्मणून पुन: तिला ह्मणाला, “ तू विषूचिका या नांवाची उपसर्गयुक्त सूचिका होशील. आपल्या सूक्ष्म मायेनें तू सर्व लोकांची हिंसा करशील. निषिद्ध भोजन करणारे, अपक्व अन्न भक्षण करणारे, मध्यरात्र, ग्रहणसमय इत्यादि अकालीं भोजन करणारे व अशाचप्रकारचे जे दुसरेही अनेक दुर्भोजन करणारे असतील, त्याचप्रमाणे दुसऱ्याचें अनिष्ट करणारे, दुष्ट प्रदेशांत वास करणारे व अशास्त्रीय मार्गानें जाणारे जे असतील त्या दुष्टाच्या हृदयात प्राणवायूबरोबर प्रवेश करून हृदय कमल, प्लीहा, बस्ति, शिरा इत्यादिकांस पीडा देऊन त्याची तू हिंसा करशील. तूं वायूच्या सूक्ष्म लेखेप्रमाणें विषूचिका नामक व्याधि होऊन शास्त्रसदाचारनिष्ठ व उन्मार्गी अशा दोन्ही प्रकारच्या लोकास त्राहि त्राहि करून सोडशील. पण त्यातील सदाचारसपन्न लोकास तुझा प्रतीकार करिता यावा, ह्मणून मी हा “ ॐ र्‍हीं र्‍हा रीं रा० ” इत्यादि मत्र उत्पन्न करून ठेविला आहे. ( त्याचा भावार्थ असा. हे र्‍हीं र्‍हा इत्यादि विष्णुशक्तिरूप देवि, तुला नमस्कार असो. हे भगवति, आद्य विष्णुशक्ते, रोगात्मक अशा या आपल्या अशभूत दुसऱ्या विष्णुशक्तीचें निवारण कर. तिला स्वस्थानीं ने. तिला पक्व तदुलाप्रमाणें मृदुकर. तिचें दह्याप्रमाणें विलोडन कर. तिला नाहींशी करून टाक अथवा कोठें तरी दूर नेऊन सोड इत्यादि. भगवानाची दोन प्रकारची शक्ति आहे. त्यातील पहिली माया व दुसरी तिच्या अधीन असलेली अपरा. तिच्यामध्ये सर्व शक्तींचा अतर्भाव होतो. सात्त्विक, राजस व तामस अशाप्रकारचे तिचे अनेक भेद होत असतात. तामसी अपरा शक्ति हीच सहार–शक्ति असून प्राण्याच्या दुष्कर्मापासून फल-रूपानें परिणत होणारे रोग हे तिचेच अश होत व त्यांचे निवारण करण्याकरिता आद्यशक्तीची प्रार्थना या मत्रात केली आहे. ) असो; याप्रमाणें सज्जनावर उपकार करण्याकरिता विषूचिका–निवारक मत्र व त्याचें शौच, समाधान इत्यादिकासह करावयाचें सर्व विधान सागून तो देवाधिदेव स्वस्थानीं गेला ६९.

**सर्ग**—७० ती राक्षसी क्रमानें सूक्ष्म होता होतां द्विविध सूचीरूप झाली व त्यांतील एकीनें प्राण्याच्या शरीरात प्रवेश केला, असें वर्णन करितात.

**श्रीवसिष्ठ**—राघवा, त्यानतर पर्वताच्या शृंगासारखी असलेली ती विकराल व कृष्णवर्ण राक्षसी सूक्ष्म होऊ लागली. प्रथम ती अभ्रासारखी झाली.

नतर वृक्षाच्या शाखे एवढा तिचा आकार झाला. पुढें ती पुरुष–प्रमाण ह्मणजे साडे तीन हात झाली. कांहीं कालानें तिचें शरीर हस्तप्रमाण झाले. पुढें ती टीचभर झाली. नंतर हाताच्या अगुळा-एवढा तिचा आकार झाला. बऱ्याच वेळानें ती उडदाच्या शेंगेसारखी झाली. त्यानंतर तिचें शरीर मोठ्याशा सूयीसारखें दिसूं लागलें. होतां होतां ती रेशमी वस्त्रें शिवण्याच्या सूक्ष्म सूयीच्या आकाराची बनली व शेवटीं तर पुष्पांतील सूक्ष्म ततूसारखा तिचा देह झाला. तात्पर्य तिचें तें भयंकर शरीर तिच्या संकल्पाच्या प्रभावाने सूक्ष्म झालें व येणेंप्रमाणें ती सूक्ष्म लोखंडाच्या सुयीसारिखी होऊन शोभू लागली. आकाशात रहाणारी ती, पूर्वोक्त ( पृष्ट ) पुर्यष्टकाने चलनयुक्त होत्साती आकाशात गेली. ती सुयीसारखी दिसते खरी पण तिच्यामध्यें लोखंड असतें, असे तू समजू नकोस. कारण तिचा तो सूच्याकारही इतर दृश्याप्रमाणेंच भ्रम–कल्पित आहे. सृष्टीत जे अनेक सविभ्रम आहेत त्यातीलच तो एक भ्रम आहे. सूर्याचे किरण आत शिरले असता रत्नसूची ( रत्नाची सुयी ) जशी सुदर दिसावी त्याप्रमाणेच ती सुंदर दिसत असून शिवाय तिच्यामध्यें मननशक्ति हा एक दुसऱ्या कोठेंही नसणारा विशेष होता. फार दुरून पाहिल्यास ती एका दिव्यासारखी दिसत असे. तिचें सूचीशरीर दिसत नाहीं ह्मणून त्यावेळीं ती आकाशरूप झाली आहे, असे वाटे. पण तिचें हे सूक्ष्मरूप सर्वांना कधींच दिसत नसे. तर एकाग्र दृष्टीनें पहाण्याचा ज्यानीं दीर्घ काल अभ्यास केला असेल त्यासच तिचें ते चकचकित स्वरूप दिसत असे. नुकत्याच स्नान केलेल्या बालकाच्या, वाऱ्यानें हलणाऱ्या कुरळ्या केसाप्रमाणे, ती चचल असून प्राण्याच्या हृदयांत अनेक विलास करीत असे. हृत्कमलनालातून वर निघून ब्रह्मरंध्रातून बाहेर पडून ती सूर्यमंडलाकडे जाण्यास उद्यत आहेसें वाटे. इंद्रियादि नियमित स्थानीं असलेल्या शक्ति त्या तिच्याच दासी अथवा अश होत. सूच्याकार झालेल्या लिंगदेहानें ती बाहेर स्थित होती. बौद्धांचे " अह " या आकाराचे विज्ञान ज्याचें त्यास समजत असलें तरी तें जसें अन्यांस न समजण्यासारखें असतें अथवा तार्किकांचें धारावाहिक ( धारेप्रमाणें सतत वाहणारे ) ज्ञान, त्यास साक्षी आत्मा मान्य नसल्यामुळें, जसें दुसऱ्यांस न समजण्यासारखें असतें त्याप्रमाणें प्रत्येकाच्या शरीरात असणारी ती दुसऱ्या कोणास न समजण्यासारखी होती व ती विषूचि-

काराक्षसी अशी असल्यामुळेंच शून्यवादी बौद्धाची जननी झाली आहे. ती आकाशाच्या नीळवर्णासारखीच होती, यात काहीं सशय नाहीं. ( येथवर आयसीसूचीचें वर्णन करून आता अनायसी जीवसूचीचें वर्णन करितात ) असो; दुसरी जीवयुक्त सूची. ती चिदाभासकलनधर्मिणी ( चिदाभासास व्यक्त करण्याचें जिचे शील आहे अशी ) असून केवल वासना हेंच तिचें सार आहे. ती पाहू गेल्यास दिसत तर नाहीं, पण नुकत्याच विझलेल्या दीपाच्या वातीस हात लाविला असता ती जसा हातास चटका देते त्याप्रमाणे ही सूचीही नेत्रानीं न दिसली तरी तीक्ष्ण आहे. राघवा, अविवेकी पुरुष कार्य करितात एका उद्देशाने व त्याचा परिणाम होतो भलताच, असें ह्मणतात ते काहीं खोटें नव्हे. ह्या खुळ्या कर्कटीने आपल्या विस्तृत शरीराचे पोषण व्हावें ह्मणून सहस्र वर्षे कष्टकर तप केले. पण विवेकाच्या अभावीं ती सूक्ष्म सूयी एवढी झाली. आता जिला उदरच नाहीं ती खाणार काय ? त्या मूर्ख निशाचरीने उपायाचे चिंतन केले हे खरें, पण पुढील अपायाकडे लक्ष्य पोचविलें नाहीं. बरोबरच आहे निरर्थक बुद्धिमानास पूर्वापर ( मागचा पुढचा ) विचार कोठून सुचणार ? श्वासाच्या योगाने तोंडापुढे धरिलेला आरसा जसा मलिन होतो त्याप्रमाणे स्वार्थपरायण लोकाची बुद्धि, विचार करण्यास सामर्थ्य असूनही, मलिन होते असा अनुभव येतो. त्या राक्षसीच्या चित्तात स्वार्थाविषयीं दृढ अनुराग उद्भवल्यामुळें, विशाल स्वरूप सोडून सूचीच्या आकाराचे होणें, यासारखे महामरणही तिला सुखरूप वाटलें. एका वस्तूमध्यें अतिशय आसक्त झाल्याकारणानेंही प्राण्यास जर इतकी विषमगति भोगावी लागते तर अनेक विषयासक्ताची काय दुर्दशा होत असेल याविषयीं केवल अनुमानच केलें पाहिजे अहो या राक्षसी तृष्णेच्या अधीन होऊन या राक्षसीने आपला अत्यत प्रिय देहही कसपटाप्रमाणें टाकिला. एकाच वस्तूचा अतिशय ध्यास लागला ह्मणजे सर्व सद्बुद्धि व विवेक नष्ट होतात. त्या कर्कटीस एका जिह्वेची तृप्ति करण्याची इच्छा होऊन तिचें सर्व लक्ष्य तिकडेच वेधल्याकारणानें तिला आपल्या देहाचा नाशही कळला नाहीं. साराश एका वस्तूत आसक्त झालेल्या प्राण्यास नाशही सुख देतो. या न्यायानें शरीररहित व सूच्याकार राक्षसीही सतुष्ट झाली. असो; ती दुसरी जीवसूचिका–आयसी सूचीशीं सलग्न ( अगदीं मिळा-

लेली ) होती. ती आकाशरूप व निराकार असून तिचें सूक्ष्मशरीर आकाशाप्रमाणें सूक्ष्मस्वभाव होतें. तेजाच्या सूक्ष्म प्रवाहाप्रमाणें तिची कांति होती. ती प्राणतुतुमय होती. कुंडलिनीशक्ति हाच तिचा आकार आहे, एवढेंच फार तर तिच्या आकाराविषयीं अधिक सांगतां येणे शक्य होतें. सूर्य व चंद्र याच्या सूक्ष्म किरणांप्रमाणे ती सुदर होती. सारांश त्या कर्कटीची पापात्मिका व त्यामुळेंच तरवारीच्या धारेसारखी अतिक्रूर मनोवृत्ति प्रति लोखंडी सूचीप्रमाणें असून ती जीवरूपाने स्थित होती. पुष्पाच्या गधलेखेप्रमाणें असणारी ती, अतिसूक्ष्मरूपाने प्राण्याच्या शरीरात प्रवेश करून हिंसादि कलेंतील चातुर्यानें प्रकट होऊन राहिली. ( ह्मणजे प्राण्यांस पीडा देणाऱ्या ज्या हिंसादि कला त्यांत ती फार चतुर असून त्यांतील चातुर्य हेंच तिचे प्रकटरूप होय. ) दुसऱ्याच्या प्राणांस अनुसरून आपला मनोरथ सिद्ध करून घेण्यास ती उद्युक्त असे. असो; येणेंप्रमाणे ती राक्षसी कृश झाली. ती दोन सूचीमय बनली. ती जोंधळा, गहु इत्यादि धान्य–कणाच्या अति सूक्ष्म अग्राप्रमाणे पातळ व कापसाच्या अति सूक्ष्म ततूप्रमाणे कोमल झाली. त्या द्विविध शरीराने प्राण्याच्या हृदयात प्रवेश करून त्यास वेध करणारी ती क्रूर राक्षसी चोंहोकडे भ्रमण करू लागली. राघवा, संकल्पाचे ठायीं अघटित प्रकार घडवून आणण्याचें सामर्थ्य असते, याविषयीं जर कोणास निदर्शन ( दृष्टात ) पाहिजे असेल तर हे या राक्षसीचें निदर्शन चांगलें आहे. प्रत्येक प्राणी सकल्पावशात् लघु किवा गुरु होतो. ज्यांचें मन क्षुद्र असते ते क्षुद्र फलाचीच कशी इच्छा करितात ते या राक्षसीच्या वृत्तातावरून चागले समजते. तिने इतके तीव्र तप केले व त्यामुळें तिचे शरीरही पवित्र झाले. पण तिची जातीच्या अनुरूप असलेली वासना नष्ट झाली नाही. सहस्र वर्षें घोर तप करून व असह्य क्लेश सोसून तिने सिद्धि मिळविली खरी, पण तिचा उपयोग परपीडेंत केला. “ पुण्य शरीराने जरी एकादा सपन्न झाला तरी त्याचा जातिस्वभाव जात नाही ” ह्मणून जे ह्मणतात, ते खरे आहे. फार काय पण दुर्जन आपली अतोनात हानि करून घेऊनही दुसऱ्यास दु:ख देण्यास तयार होतात. या नियमास अनुसरूनच ती वाऱ्याबरोबर दश–दिशेंत भटकू लागली असता तिचे ते स्थूल शरीर सुकलेल्या वृक्षाच्या पानाप्रमाणे

भूमीवर पडलें व कांहीं कालानें त्याचे भौतिक भाग भूतांत मिळून गेले. इकडे ती द्विविध सूक्ष्म सूचिरूप राक्षसी वाऱ्याबरोबर प्राण्यांच्या शरीरांत प्रवेश करून त्यांस पीडा देऊं लागली. रोगानीं क्षीण झालेल्या लोकांस, दुर्बल प्राण्यांस, व वायूनें स्थूल झालेल्या निरुद्योग्यांस तर तिनें फारच त्रास दिला. प्राणी "हाय हाय" करून तळमळूं लागले कीं, हिला मोठें समाधान वाटत असे. पुष्कळ वेळां हिला यश मिळत असे, हें जरी खरें आहे तरी कोठें कोठें पूर्वोक्त मंत्र, सदाचरण, परमात्मभजन, अध्ययन, इत्यादिकांच्या योगानें तिला पराभूत होऊन परतावेंही लागे. रामा, त्या दुष्ट सूचीभूत राक्षसीच्या व्यवहारांचें फार वर्णन करीत बसण्यात कांहीं अर्थ नाहीं. थोडक्यांत मी आतां इतकेंच सांगतों कीं, ती बया त्रिभुवनांतील सर्व क्षुद्र, अमंगल, दोषी व पापी वस्तूंमध्यें राहून व्यवहारांतील सुयीप्रमाणेंच सर्वत्र संचार करीत राहिली. तिला अगम्य असें काहीं नसून अकार्य असेंही कांहीं नव्हतें. ती दुःखशक्ति होती. सर्व क्लेश हीं तिचींच अपत्यें होत. तिला प्राण्याच्या हृदयासारख्या अति सूक्ष्म स्थानींही सहज प्रवेश करितां व रहातां येत असे.

**श्रीवाल्मीकि**—मुनि वसिष्ठ इतकें सांगत आहेत तों सायंकाळ झाला. त्याबरोबर सभेंतील सर्व लोक संध्यावंदनादिकांकरितां व रात्रौ परमात्मचिंतनानंतर सुषुप्तींतील आत्मानंद भोगण्याकरितां आपापल्या गृहीं गेले व दुसऱ्या दिवशीं योग्य वेळीं सर्व नित्य कर्में आटोपून पुढचा रमणीय उपदेश ऐकण्याकरितां ते सभेंतील आपापल्या स्थानीं विराजमान झाले. इति षष्ठं दिनं. ७०.

**सर्ग ७१**—या सर्गांत कर्कटीला पूर्व देहाचें स्मरण होऊन मोठा पश्चात्ताप झाल्यामुळें तिनें शोक कसा केला, याचें वर्णन करितात.

**श्रीवसिष्ठ**—दशरथतनया, काल सांगितल्याप्रमाणें ती राक्षसी दीर्घकाल प्राण्यांस पीडा देत राहिली. पण तिची सर्व प्राण्यांस खाऊन त्यांच्या मांसानें तृप्त होण्याची इच्छा पूर्ण होण्याचें कांहींच चिह्न तिला दिसेना. प्रत्येक प्राण्याच्या हृदयांत प्रवेश करून ती त्यांच्या शरीरांतील रक्तमांसादि धातूंस शोषून टाकीत असे, हें खरें. पण तेवढ्या मांसास्वादानें तिची तृप्ति होणें शक्य नव्हतें. म्हणूनच म्हणत असतात कीं, हृदयांत तीक्ष्ण बाणाचें शल्य शिरून, त्याच्या योगानें तें विदीर्ण झालें तरी पत-

करते, पण तृष्णारूपी सूक्ष्म व अदृश्य सूची पतकरत नाहीं. कारण बाणाचे अग्र औषधोपचारानें काढून टाकून हृदय पुनः पूर्ववत् करितां येते. पण तृष्णासूचीनें विद्ध हृदय असाध्य होते. सर्वांची पूर्ति होते पण तृष्णेची पूर्ति होत नाही. असो; ती निशाचारी तृप्त न झाल्यामुळें मनात विचार करू लागली कीं, अरेरे मी मूर्खपणाने काय करून घेतले हें ? मी सूची का झाल्ये ? सूक्ष्म झाल्याकारणानें माझ्या सर्व शक्ती क्षीण झाल्या आहेत. त्यामुळे माझ्या उदरात एक ग्रासही मावत नाहीं. मग सर्व जबूद्वीपातील प्राणी कसे मावणार ? माझे ते विशाल व काळे भार शरीर कोठें आहे ? या माझ्या सूक्ष्म शरीराने मला काहींच करिता येत नाही, मासरसाचे घोट घेता येत नाहीत. एके ठिकाणी रहाता येत नाही, क्षुद्र व अपमानास्पद अवस्थेत रहावे लागते. हाय हाय कोणही माझी दुर्दशा ! मी आपल्याच अविचाराने पहा कशी अनाथ झाले आहे ! मला एक क्षणभर सुद्धा एके ठिकाणी रहाता येत नाही. वाऱ्याबरोबर कोणीकडच्या कोणीकडे जावे लागते. मी आता निराधार झाले आहे. अति असह्य दुःखात व भयकर सकटात मी पडले आहे. मला सखी नाही, दासी नाहीं, माता नाही, पिता नाहीं; बधु नाही, पुत्र नाही; देह नाही व नियत स्थान नाही. वनातील शुष्क पर्णाप्रमाणे मी भ्रमण करीत राहिले आहे. या भयकर आपत्तीतून माझी सुटका कशी होईल ? मला मरण आलें असते तरी बरें होतं, पण तेही येत नाही. काचेच्या मण्यास भुलून आपल्या हातातील चिंतामणि जसा एकाद्या अभाग्याने टाकावा त्याप्रमाणे मी या सूक्ष्म सूचीभावास भुलून आपला पुष्ट व विशाल देह व्यर्थ टाकिला. मोहित ( मूढ ) झालेले मन प्राण्यास अगोदर आपत्तीत ढकलते. नतर त्याच्यावर अनेक अनर्थाचे आघात करिते. सूची झाल्याकारणानें व्यावहारिक सूयीप्रमाणेच मला धुरात रहावे लागते, मार्गात पडून रहाण्याचा प्रसंग येतो व कुशल लोक मला गवताच्या काडीत घालतात. मी नेहमीं दुसऱ्याची चाकर झालें आहे. सूय जशी दोऱ्याच्या सचारास कारण होते त्याप्रमाणें मी दुसऱ्यांच्या सचारास कारण होते. अरेरे, कोण हे दैन्य ! मी परतत्र झाले. रक्तासारखा तुच्छ पदार्थही मला खावयास मिळत नाहीं. कारण मला पोट कोठें आहे ? माझा सर्वस्वीं नाश झाला. आतां मी काय करूं ? शातिक कर्म करीत असताना त्यातूनच जसा वेताळाचा उद्भव व्हावा

तशी माझ्या त्या तपाची स्थिति झाली विनाश काल आल्याकारणानेंच मला ती दुर्बुद्धि सुचली, असे मी समजते. आता अगदीं एकीकडे पडलेल्या व अतिसूक्ष्म किड्याच्या शरीराहून सूक्ष्म असलेल्या माझा या दुःखातून कोण उद्धार करणार ? स्थूलदृष्टि व्यवहारी तर धूळींत लोळणाऱ्या मला पाहूच शकणार नाहींत. बरे सूक्ष्म दृष्टि योगी माझा उद्धार करतील ह्मणून ह्मणावे तर त्याच्या एकाग्रचित्तात माझ्यासारख्या दुर्भाग्यास थारा कोठून मिळणार ? एव च पर्वतावर राहणारास ग्रामातील तृण दिसणें जसे असभवनीय त्याप्रमाणे त्याचे चित्त मजकडे वळणे असभवनीय आहे. बरें, मीच आपला उद्धार करावा तर अशा या हीन व दीन अवस्थेंत पडलेल्या माझ्या हातून कोणता पुरुषार्थ होणार ? हर हर ! देवा, प्राण्याच्या सहाराने व आपल्या मस्तकादि अगाच्या आधाराने अतरिक्षाचा भार उतरणारी मी केव्हा होईन ? माझ्या काळ्या कुट्ट लाब उदरास पाहून मेघाच्या भ्रातीने मयूर नाचू लागले आहेत, असें या नेत्रानीं पाहण्याचा सुदिन कधी उगवेल ? मोठ्या थोरल्या गुहेसारखें ते माझे पूर्व उदर मला केव्हा मिळेल ? माझीं तीं मेणचट व तीक्ष्ण नखें माझ्या नेत्रास पुनः कधीं आनद देऊ लागतील ? माझे हळु हसणेंही मोठमोठ्या राक्षसाची हृदये भयानें कधीं विदीर्ण करील ? भयकर अरण्यात मी आपले ढुगण बडवीत मोठ्या आनदानें केव्हा नाचू लागेन ? वसारूपी आसवाच्या घागरींनी व मेलेल्या चतुर्विध प्राण्याच्या-मास, अस्थि-इत्यादिकानी मी आपल्या या पोटाची पूर्ति एकसारखी कधीं करू लागेन ? मोठमोठ्या प्राण्याच्या शरीरातून चळचळ वाहणारे व कारज्याप्रमाणें उडणारें रक्त घटाघट पिऊन मी मत्त होऊन केव्हा निद्रा घेऊ लागेन ? अरे दुर्दैवा. मीच त्या दुष्ट तपोरूपी अग्नींत आपल्या शरीराचा होम केला. तें माझें धिप्पाड शरीर कोठे व हें क्षुद्र सूचीत्व कोठें ? माझ्या त्या स्थूल शरीराने मी पृथ्वीवरून चालत असताना एका पर्वत शिखरावरून दुसऱ्या पर्वतशिखरावर, असे पाय ठेवीत झराझर चालत असें. पण आता मला दुसऱ्याच्या सहायावाचून काहीं करिता येत नाहीं. अरेरे, परतत्रता फार कष्ट देते. सर्वस्वीं दुसऱ्याच्या अधीन रहाण्यापेक्षां सहसा मरून जाणेंही बरें ! दुसरे वागवितील त्याप्रमाणें वागणाऱ्या मला सुख कोठून होणार ? माझी सर्व प्रवृत्ति इतरावर अवलंबून राहिल्यामुळें मला

त्या माझ्या हृष्ट, पुष्ट, स्वतत्र व बलाढ्य शरीराची वारंवार आठवण
विंध्याद्रीच्या गुहेसारख्या माझ्या उदरा, आज तूं सिंहाप्रमाणें माझ्य
व्यक्त होऊन गजाप्रमाणें या माझ्या दुःखाचा नाश कसें करीत ना
आपल्या भारानें पर्वतांच्या शिखरांस कोसळून पाडणाऱ्या म
हातानों, आज तुह्मी आपल्या चंद्राकार नखांनीं देवभोग्य असल्य
पुरोडाशाप्रमाणें असलेल्या चद्रास बाधा का करीत नाहीं? का
मण्याची माळा नसली तरी स्वभावतःच सुदर दिसणाऱ्या हे माझ्या
स्थळा, उवा हेच ज्याच्यातील अनेक सिंह आहेत, असे रोमांचें वन आ
कसे धारण करीत नाहींस? सुकलेल्या काष्ठांस जसा अग्नि त्याप्रमाणें,
पक्षातील गाढ अंधकारासही प्रदीप्त करणाऱ्या या माझ्या नेत्रांनों,
तुह्मी आपल्या दर्शन–ज्वालांनीं दिशास भूषित करीत नाहीं हें काय?
हे माझ्या प्रिय बधो, स्कधा, तूं नष्ट झालास. धुळीस मिळालास,
कालानें तुला शिलातलावर चदनासारखें घासून काढिलें आहे. कल
दावाग्नीनें जाळून टाकिलेल्या चद्रबिबाप्रमाणे सुंदर दिसणाऱ्या अरे म
मुखा, तू कोठें गेलेस? अहो महा-आकारसंपन्न हस्तांनों, मी अली
माशीच्या पायानीं ही इकडून तिकडे उडून जात असतें, हें तुह
ठाऊक नाहीं का? अथवा आता रडून काय होणार! मींच आप
क्षयाकरितां स्वहस्तानें हें नाटक रचिलें आहे ७१.

**सर्ग ७२**—या सर्गात सूचीच्या उग्रतपाचें वर्णन करितात व तिच्या तप.प्रभा चकित झालेला इंद्र त्याविषयीं विचारपूस करूं लागला, असें सांगतात.

**श्रीवसिष्ठ**—लक्ष्मणाग्रजा, असा पुष्कळ विलाप करून श्रांत झाले ती राक्षसी काहींवेळ स्वस्थचित्तानें बसली. चित्त स्थिर होतांच तिला सद्बुद्धि आठवली. ( अर्थात् चित्तस्थैर्य ही एक परम कल्याण करणा अवस्था आहे. तिच्या अभावीं प्राण्यांस अनेक दुर्गुण जडतात व त अनेक अनर्थांची परपरा अनुभवावी लागते. ) पुनः तप केल्यावांचून देह प्राप्त होणें शक्य नाहीं. असें जाणून तिनें घोर तप करण्याचा नि केला. प्रथम तिनें आपल्या मानासिक संकल्पानें लोहसूचित्वाचा अनु घेतला पुढें ती सकल्पानेंच जीवसूचीरूप झाली. आणि लोह-सूची जीवसूची यांचें तादात्म्य झालें असतां तिच्या ठायीं क्रियाशक्ति अ व त्यामुळें ती ( गृध्रशरीरांत प्रवेश करून ) हिमालयाच्या त्या

शिखरावरच गेली. तेथें एकांत व उपसर्गशून्य स्थान पाहून ती घोर तप करू लागली. आपल्या सूक्ष्म पादतलानें पृथ्वीच्या रेणूस पीडा देणारी ती समोर किंवा इकडे तिकडे न पाहतां मोठ्या यत्नानें ऊर्ध्वमुख होऊन राहिली. ती काळ्या लोखंडाची असल्यामुळें व तोंडानें वायुभक्षण करीत असल्यामुळें त्या पर्वतावरील पाषाणमय प्रदेशीं मोठ्या यत्नानें स्थिर राहू शकली. अरण्यांत मार्गाजवळच एकाद्या पानाच्या अग्रावर, तृण-जळु जशी जाणाऱ्या येणाऱ्या लोकांच्या अंगास डांस मारण्याकरिता शेंपटीवर उभी राहून टपून बसलेली असते तशी ती त्यावेळीं भासत होती तिच्या नेढ्यांतन पलीकडे पडलेलें ऊन व तिची छाया ह्या तिच्या रक्षक दासीच आहेत कीं काय, असे वाटे. राघवा, निग्रहावाचून कोणत्याही प्रकारची सिद्धि मिळत नाहीं दुर्जनांमध्यें कितीही जरी दुसरे दुर्गुण असले तरी निग्रह हा एक त्याच्यामध्यें मोठा गुण असतो. अकार्यच का होईना पण तें सुद्धां ते एकदा आरंभिल्यावर सोडीत नाहीत. या सूचीनेंही आपलें इष्ट साधण्याकरिता झंझावात, महावृष्टि, मेघगर्जना, विद्युत्पात, इत्यादिकास न भीता व त्यांचे असह्य उपसर्ग सहन करून घोर तप चालविलें. तिच्यावर मातीचे, पानाचे, गवताचे व वेलींचे थर बसले. पण ती निग्रही कर्कटी आपल्या निश्चयापासून ढळली नाहीं. तिने आपल्या चित्तास स्थिर केलें बाह्य स्पदापासून ती निवृत्त झाली व आतल्याआत तिनें आत्म्याचा विचार आरंभिला. विचारात फार काळ निघून गेल्यावर, तपाच्या योगानें पाप क्षीण झालें असता, तिला आत्मसा-क्षात्कार झाला. तिला तत्त्वज्ञान झालें चित्तैकाग्र्य व निग्रह याचें हें फळ तिला तिच्या इच्छेवाचून मिळालें. असो; याप्रमाणें तिनें त्या पर्वतावर सात सहस्र वर्षें घोर तप केलें. त्यामुळें चवदा लोक संतप्त झाले. कल्पांतीं सृष्टीस जाळण्या करिता उत्पन्न झालेल्या अग्नीप्रमाणें भयकर असलेल्या तिच्या तापानें तो पर्वत पेटूं लागला. त्यामुळें आता सर्व जग जळतें कीं काय, अशी सर्व प्राण्यांस भीति वाटली. इंद्रानें नारदास विचारलें कीं, हा काय प्रकार आहे ? तेव्हा नारद म्हणाला, " देवराजा, सूची आज सात सहस्र वष घोर तप करीत आहे. ती महा विज्ञानी झाली असून तिच्या तपःसामर्थ्यानें हें जग अशा सकटात पडलें आहे." ७२.

सर्ग ७३—इंद्रानें प्रश्न केला असतां नारद जीवसूचीचा भोग व तप यांचें येथें वर्णन करितात.

श्रीवसिष्ठ—रामा, कर्कटीचा तो अप्रिय वृत्तात ऐकून इद्राला मोठें कौतुक वाटलें व तो नारदास ह्मणाला, "देवर्षे, त्या मूर्ख राक्षसीने घोर तप करून सूचीत्व प्राप्त करून घेतलें. पण तिला त्यापासून कोणते वैभव भोगावयास सापडलें" तें ऐकून नारद ह्मणाला, "देवेंद्रा, पिशाचभावास प्राप्त झालेल्या जीवसूचीने लोखडाच्या सुकुमार सूचीचा आश्रम केला. पण पुढें त्या लोहसूचीचाही आश्रय सोडून ती आकाशांतील वायु-रथावर आरूढ झाली प्राणवायूच्या मार्गाने ती देहात प्रविष्ट झाली व पक्षी जसा आपल्या घरट्यात लपून रहातो त्याप्रमाणे ती पाप्यांच्या शरीरांत आंतडीं, शिरा इत्यादिकाच्या द्वारा शिरून दीर्घकाल गुप्तपणे लीन होऊन राहिली. ती जरी अति सूक्ष्म होती तरी तिचा प्रभाव फार मोठा होता. त्यामुळे नाडीमध्ये राहूनही ती प्राण्यास अतिशय पीडा देत असे. तिनें अनेक प्राण्याच्या शरीरात प्रवेश करून त्या त्या शरीरास उचित असलेले भोज्य पदार्थ खाले व अनेक भोग भोगिले. तरुण स्त्रियांच्या रमणीय शरीरात प्रवेश करून तिने तारुण्यानें अधिकच सुंदर दिसणाऱ्या विलासी पुरुषाचा उपभोग घेतला. त्याप्रमाणे तरुण पुरुषाच्या शरीरात शिरून तरुणींचाही भोग तिनें यथेच्छ घेतला भ्रमरीच्या शरीरांत घुसून तिनें नाना तऱ्हेच्या पुष्परसाचा आस्वाद घेतला. गृध्रीच्या शरीरात जाऊन तिने प्रेताची शरीरें फाडून खाल्लीं. कोठे सग्राम चालला असतां त्यातील वीराच्या तरवारीच्या धारामध्ये शिरून तिने मनुष्याचें ताजें व ऊन रक्त प्राशन केलें पशूच्या शरीरात जाऊन तिनें तृणादिकाची रुचि पाहिली. जलचराच्या देहात प्रवेश करून तिने विष्ठा--श्लेष्मा इत्यादिकाची चव घेतली. साराश याप्रमाणें प्रत्येक शरीरात जाऊन त्या त्या शरीराच्या द्वारा तिने खाणे, पिणे, निजणे, उठणें, बसणे, जाणे, येणें, खेळणें, देणें, देविवणें, नाचणें, गाणे इत्यादि सर्व केलें. मनोरूप व वायुरूप अशा तिनें या सृष्टींतील सर्व शरीरात सूक्ष्मपणे शिरून त्या त्या शरीरानें घडणारी प्रत्येक क्रिया केली. साराश जें जें काहीं शरीरद्वारा होत होतें तें तें सर्व तीच अदृश्य सूची करीत होती. पण वस्तुस्थिति अशी होती तरी नियतीने नियमित झालेली ती सूची पूर्व मनोरथाप्रमाणें सर्व प्राण्याची हिंसा

करण्यास समर्थ झाली नाहीं. तर नाचणारी स्त्री जशी आपल्या स्वाधीन असलेल्या हस्तपादादिकासच आपल्या इच्छेप्रमाणे नाचवू शकते त्याप्रमाणें ती सूचीही पापादि कर्मांच्या योगानें पीडेस पात्र झालेल्या प्राण्यासच हवें तसें नाचवीत असे. ती वायुगतीच्या अधीन होती. ह्मणजे स्वतत्रपणें तिला कधीं कोठेंही जाता येत नव्हतें. त्यामुळें ती बाहेरील व प्राणसंज्ञक आतील वायूच्या आधारानें दुर्बल होऊन रहात असे. मत्र, औषधि, तप दान, देवपूजा इत्यादिकाच्या योगाने तिला फार कष्ट होत. ह्मणून जेथे हे प्रकार होते तेथें ती क्षणभरही रहात नसे. दिवा विझविला की, त्याची प्रभा कोठे जाते हे जसे कळत नाही त्याप्रमाणे ती सूची पुण्यवानापासून कशी व केव्हा जाई ते कळत नसे. असो, आपल्या वासनेप्रमाणें राक्षसीस हें सूचीत्व प्राप्त झाले होते पण दशदिशेंत व सर्व प्राणिशरीरात विहार करीत असूनही तिची तृप्ति झाली नाहीं. कारण अनेक शरीरातील सूक्ष्म क्रियाच्या योगानें तिची मानसिक तृप्ति मात्र होत होती. पण शारीरिक तृप्ति होईना. त्यामुळे तिला पूर्व शरीराचे स्मरण होऊन फार दुःख झाले व पुनः त्या विशाल शरीराच्या प्राप्तीकरिता तप करण्याचा तिनें निश्चय केला. तपश्चर्येस योग्य प्रदेश कोणता, तें ठरवून आकाशांतून जाणाऱ्या एका तरुण गृध्राच्या हृदयात प्राणवायूबरोबर प्रवेश करून तिनें त्यास इष्ट स्थळीं जाण्याची प्रेरणा केली व त्याप्रमाणें त्याने तिला तेथें नेऊन सोडिले इद्रा, त्या पर्वत शिखरावर निर्जन प्रदेशात ती सूची आज अनेक वर्षे तप करीत आहे. आता तिच्या तपःप्रभावानें या त्रैलोक्याचा दाह होऊं नये ह्मणून तू तिला वर देण्याची काहीं योजना कर" राघवा, नारदानें असें सागितलें असता इद्राने ती कोठे आहे, ते पहाण्याकरिता वायूस पाठविलें. तेव्हा तो मरुत् ज्ञानरूपानें तिला शोधून काढण्याकरितां दश दिशेंत फिरू लागला. अनेक लोक, अनेक भू-वलयें व अनेक द्वीपें ओलांडून तो वायु जेथे ती उग्र तप करीत होती त्या हिमालय पर्वताच्या शिखरावर आला व तेथें तप करणाऱ्या त्या विचित्र सूचीस पाहिल्यावर त्याच्या मनास समाधान वाटलें ७३.

**सर्ग ७४.**—त्या तापसी सूचीस पाहून वायु इंद्राकडे परत गेला; व इंद्रानें तिला वर देण्याविषयीं ब्रह्मदेवाची प्रार्थना केली असें सागून या सर्गांत सूचीच्या ज्ञानाचें वर्णन करितात.

श्रीवसिष्ठ—राघवा, महा अरण्यानें परिवेष्टित असलेल्या त्या हिमालयाच्या शिखरावर घोर तप करणाऱ्या सूचीचें दर्शन वायूस सकृद्दर्शनीं समाधानकारक वाटलें खरें, पण जवळ जाताच तिच्या तेजानें तो देव दीपून गेला. त्याने त्या तपोमयी देवीला साष्टांग प्रणाम केला. बराच वेळ तिच्याकडे त्यानें पाहिलें. तिच्याशीं काहीं भाषण करावें, असेंही त्याच्या मनात होतें. पण पुण्याच्या तेजापुढें इतर सर्व तेजें न्यून ठरतात, असा सामान्य नियम व अनुभवही असल्यामुळे तिच्या तपस्तेजानें गलितधैर्य झालेल्या वायूच्या तोंडातून एक अक्षरही निघालें नाहीं. तेव्हां "हे महासूचि, तू असलें हें दुर्धर तप कां करितेस?" असेंही तिला न विचारिता "कायहो हें या अबलेचें विचित्र महातप" असे मनांतल्या मनात ह्मणत तो मारुत आकाशात उडाला. मेघमार्ग, विविध वातस्कंध, सिद्धसंघ व सूर्यमार्ग यांचें उल्लंघन करून विमानाच्याही वर गेल्यावर तो सदागति इंद्रलोकास पोंचला. तेव्हा महातपस्विनी जी सूची तिच्या पुण्यदर्शनानें स्वतः पावन झालेल्या वायूस इंद्रानें आलिंगन दिलें व सूचीचा वृत्तांत विचारला. त्यावर वायु ह्मणाला—देवेंद्रा, जंबू-द्वीपात हिमवान् या नावाचा एक अतिशय उच्च पर्वत आहे व साक्षात् शंकर त्याचा जामाता आहे, हें तुला ठाऊक आहेच. त्या पर्वताच्या उत्तरशिखरावर सूची दारुण तप करीत आहे. तिचें तेज असह्य असून ती स्वप्रभावाने त्रिभुवनास भयभीत करून सोडीत आहे. शीत वायूसही भक्षण करण्याचा प्रसंग येऊ नये ह्मणून तिने आपलें उदर संकुचित करून घेतलें आहे व त्याचें द्वार धुळीच्या एका कणानें बंद करून ठेविलें आहे. तिच्या तीव्र तपाच्या योगानें हिमालय उष्णालय झाला आहे व त्यामुळें तेथें आता यापुढें देवाचें व इतर सात्त्विक प्राण्याचें वास्तव्य होणें अशक्य झालें आहे. यास्तव हे देवा, आता आपण पितामहाकडे जाऊं या व तिला वर देण्याविषयीं त्याची प्रार्थना करूं या; चल. कारण दुर्लक्ष्य केल्यास तिचें तें तप अनर्थावह होईल. वायूचें हें सत्य व हितकर वचन ऐकून देवांचा नायक देवांसह पितामहाकडे गेला व त्यास, सूचीस वर देण्याविषयीं नम्रपणें सांगून, त्यानें आपलें ह्मणणें मान्य केलें असतां, तो स्वपुरास परत आला. इकडे सात सहस्र वर्षें तप केल्यामुळें सूचीस दिव्य दृष्टि प्राप्त झाली. तिला तत्त्वज्ञान आपोआप झालें. तिला ब्रह्माचा साक्षात्कार झाला. राघवा,

शुद्धचित्ताने विचार करणे यासारखें तत्त्वज्ञानाचें दुसरें कोणतेंही साधन नाही निग्रहानें मननात्मक विचार करण्यास लौकिक बाह्य गुरूचीही अपेक्षा नसते ७४.

**सर्ग ७५.**—ब्रह्मदेव प्रसन्न झाला असतांही आत्मज्ञानामुळे सूची मुकाट्यानें बसली. तथापि त्यानें तिला वर दिला व त्यामुळें तिला शरीराची प्राप्ति झाली, असें या सर्गांत सांगतात.

**श्रीवसिष्ठ**—सात सहस्र वर्षें तप केल्यावर सूचीस आत्मज्ञान झाले. त्यानंतर एक सहस्र वर्षांनीं पितामह तिच्याकडे आला व ह्मणाला, " हे पुत्रि वर माग. " पण सूचीस कर्मेंद्रिये नसल्यामुळे व ती केवल जीवकलेनें युक्त असल्या कारणाने कांहीं बोलली नाही. तिने असा विचार केला—मी पूर्ण आहें. मला कोणत्याही प्रकारचा संशय नाहीं. तेव्हां मी आता वर कोणता मागू ? मी शांत झालें आहें. मला परम आनंद झाला आहे फार काय पण मी केवल सुखमय आहे. मला जें कांहीं ज्ञातव्य होतें तें मी जाणलें आहे व आता त्याविषयी संदेहही राहिलेला नाहीं. माझा आत्मविवेक विकसित झाला आहे. आता मला आणखी काय पाहिजे ? मला आता आणखीं कशाचेंही प्रयोजन नाहीं. मी आता जशी आहे तशीच यापुढेही रहाणार. परमार्थरूप जी सत्यकला तिला सोडून मला दुसरें काय संपादन करावयाचें आहे ? इतके दिवस मला अविवेकानें ग्रासले होतें. पण आता विवेकाच्या योगानें मी त्याच्या प्रतिबंधातून मुक्त झाले आहे. तस्मात् मला कोणताही वर मागावयाचा नाही, असा विचार करून स्तब्ध बसलेल्या तिला, नियतीनें बद्ध झालेला व तिचा निश्चय आणि वैराग्य पाहून प्रसन्न झालेला तो देव ह्मणाला—हे पुत्रि, तू वर मागून घे. कांहीं काळ भूतलीं राहून व भोग भोगून नंतर तू परमपदास प्राप्त होशील. कारण कधींही न बदलणाऱ्या नियतीचा हा असा निश्चय आहे. यास्तव कर्कटि, ज्या उद्देशानें तू तप केलेंस तो तुझा उद्देश सफल होवो. तू पुनः आपल्या त्या भयंकर शरीरानें युक्त हो. सूक्ष्म बीजापासून जसा मोठा वृक्ष होतो त्याप्रमाणें तुझ्या सूक्ष्म शरीरापासून स्थूल शरीर उद्भवेल. तू आतां आत्मज्ञानी झाली आहेस. यास्तव तू कोणाला पीडा देणार नाहींस. तुझें चित्त सदा शुद्ध असेल. तूं सतत ध्याननिरत असशील एकादेवेळीं

तू जरी सहज बाह्यवृत्ति झालीस तरी तुला सर्वत्र आत्मध्यानच घडेल. तू आपल्या क्षुधेची बाधा नाहींशी करण्याकरितांही अन्यायाचरण करणार नाहींस. लोकांतील अन्यायास नाहींसे करून तू आपल्या प्रमाणे इतरासही न्यायवृत्ति करिशील व केवल विवेकप्रधान होऊन तू आपल्या नवद्वारयुक्त देहसञ्ज्ञक नगरात काहींएक न करिता व न करविता राहशील. ह्मणजेच जीवन्मुक्त होशील. असें बोलून तो देव आकाशमार्गाने गेला. इकडे ती राक्षसीही " बरें आहे. तुमच्या इच्छेप्रमाणें का होईना, माझें त्यांत काय जातें ? " असे ह्मणाली. त्यानतर ब्रह्मदेवाच्या वराप्रमाणें तिच्या मनात भावी देहाची कल्पना उद्भवली व तिच्या अनुरोधानेंच बीज-वृक्ष-न्यायानें उत्तरोत्तर वृद्धि पावता पावता तिचे शरीर हृष्ट, पुष्ट, व सर्व इद्रियें, अवयव, शक्ति इत्यादिकानी युक्त झाले ७९.

**सर्ग ७६**—देह प्राप्त झाल्यावरही सहा महिने समाधिस्थ राहून क्षुधित झालेली कर्कटी उठली व वायूच्या सागण्यावरून किराताच्या प्रदेशात गेली, असें या सर्गात वर्णन करितात.

**श्रीवसिष्ठ**—रामा, लहानसा मेघ जसा अनुकूल स्थिति मिळाली असता एका घटिकेत सर्व अतरिक्षास व्यापून टाकितो त्याप्रमाणें ती सूचीच्या आकाराची कर्कटी सर्व अवयवसपन्न झाली. तिला तिचे ते पुष्ट व विशाल शरीर पुनः प्राप्त झाले. पण ज्ञानाचा प्रभावच काहीं विलक्षण असल्यामुळे स्थूलशरीराच्या प्राप्तीनतरही तिने ब्रह्माकाशाचेंच अनुसधान केलें व ब्रह्मसाक्षात्कार दीर्घकालापासून अत्यत दृढ झालेला असल्या कारणानें तिनें शरीराचा राक्षसभाव सोडिला. ह्मणजे हे शरीरच मी आहे, असें ती समजली नाहीं. त्यामुळें त्या भव्य शरीराची प्राप्ति झाल्या-वरही तिला कोठें जावें व शरीरास साजेल असे काहीं कृत्य करावें, असें वाटले नाही. पद्मासन घालून ती तेथेंच ध्यान करीत राहिली. आपल्या चित्तवृत्तीस शुद्ध चैतन्यमय करून ती पर्वताच्या शिखराप्रमाणेंच निश्चल होऊन तेथें राहिली. याप्रमाणे सहा महिने लोटले. त्यानतर ती एकदां देहभानावर आली. वर्षाकाळीं मेघगर्जना ऐकून मयूरी जशी जागी होते त्याप्रमाणे सावध झालेल्या तिला क्षुधा लागली आहे, असें भासलें. कारण देह असेपर्यत क्षुधा, तृषा, इत्यादि देहस्वभाव नाहींसे कसे होणार ?

आपण काय खावें ? ही तिला मोठी चिंता पडली.

जठराग्नीचा ताप दुसऱ्या सर्व तापाहून असह्य असतो व त्याच्या शांती-करिता प्राणी काय हवे ते करण्यास कसा उद्युक्त होतो हें सर्व शरीर धारण करणारास ठाऊक आहेच सहा महिन्यात ज्याची एकदाही तृप्ति झाली नव्हती त्या कर्कटीच्या जठराग्नीने तिला किती क्लेश देण्यास आरंभ केला असेल याची नुस्ती कल्पनाच केली पाहिजे. (कारण कलियुगात अन्नमय प्राण असल्यामुळें सहा महिने काही न खाता रहाणे, आम्हास शक्य नाहीं. यास्तव या साराच्या लेखकास व वाचकास त्याविषयीं कल्पना करण्यावाचून गत्यंतर नाही. असो,) पण ज्ञानाचे शैत्य इतके प्रभावशाली आहे की, ते असल्या शेकडो संतापां-नाही सह्य करिते, असा नियम आहे. त्याप्रमाणे कर्कटीनेही त्या जठ-राग्नीच्या तापास ज्ञानशैत्याने शांत करून असा विचार केला.–एकाद्या जीवास खाल्यावाचून या जठराग्नीची तृप्ति होणें शक्य नाहीं. पण तसें करणे न्याय्य आहे का? महात्मे लोक ज्याची निंदा करितात व जे न्यायाने संपादन केलेलें नाहीं ते खाऊन प्राण वाचविण्यापेक्षा जठराग्नींत त्याचीच आहुति देणे काय वाईट? न्यायाने ग्रास न मिळाल्यामुळें जर माझा हा विशाल देह जड होऊन पडला तर त्यात कोणता अन्याय आहे? पण न्यायाने मिळविलेल्या ग्रासावर निर्वाह केल्यास तो ग्रास विषाप्रमाणें अनर्थ करील. तस्मात् शिष्टास मान्य नसलेल्या उपायाने क्षुधेचे निवा-रण करणें उचित नव्हे. मला जीवित व मरण यातील कशाचीही अपेक्षा नाही. कारण ते देहाच्या अपेक्षेनें होणारे भ्रम आहेत, हे मी पूर्णपणें जाणलें आहे. ज्ञानाच्या योगानें माझ्या मनाचे सर्व संकल्प आता क्षीण झाले आहेत. ते आता अत्यंत शांत होऊन राहिले आहेत व त्यामुळें देह व अदेह किंवा जीवित व मरण याचे भान मला होत नाहीं. राघवा, असा विचार करून ती ज्ञानी राक्षसी शांत चित्ताने क्षुधेस सहन करण्याचा निश्चय करून तेथेंच राहिली. तेव्हा तिनें आपल्या राक्षसी देहावरील अभिमान सोडून दिला आहे, असें पाहून संतुष्ट झालेला वायु तिला म्हणाला "हे कर्कटि, तू आता येथून उठ व लोकामध्यें मिळसून अज्ञांस सत्वर बोध कर. कारण मूढांचा उद्धार करणें, हेंच महात्म्यांचें शील असतें. पण तू बोध केल्यावरही जो त्याचा अंगीकार करणार नाहीं तो मूर्ख आपला नाश करून घेण्याकरितांच उत्पन्न झाला आहे, असें तूं जाण व तो तुझा न्याय्य ग्रास आहे, असें समजून तूं त्यास खा." वायूचें

हें भाषण ऐकून "बरें आहे. वायुदेवा, मी तुझ्या आज्ञेप्रमाणे करितें. तू मजवर हा मोठाच अनुग्रह केला आहेस." असें बोलून ती उठली व हळु हळु त्या शिखरावरून खालीं उतरून, त्या पर्वताच्या सपाटीचें उल्लंघन केल्यावर काहीं वेळानें ती ज्ञानी स्त्री त्याच्या पायथ्याशीं येऊन पोंचली. तेथें किरातांचा एक ग्राम होता. तो क्षेत्रफळाच्या मानानें जरी फार मोठा नव्हता, तरी त्यांतील जन फार कष्ट करणारे असल्यामुळें विपुल अन्न, पशु, मनुष्यें, द्रव्य, कोमल तृण, औषधि, मांस, मुळें, फळें, पक्षी, कीट इत्यादिकांची तेथें समृद्धि होती. त्या रमणीय ग्रामांत चालत्या बोलत्या अंजन पर्वताप्रमाणें असलेली ती राक्षसी शिरली ७६.

सर्ग—७७. या सर्गांत काळोखी रात्र, राक्षसीस झालेलें राजा व मंत्री यांचें दर्शन व ते गुणी आहेत कीं मूढ आहेत हे जाणण्याकरितां त्यांस प्रश्न करण्याचा कर्कटीनें केलेला निश्चय याचें वर्णन करितात.

**श्रीवसिष्ठ**—पण, बा कौसल्यानंदना, ती राक्षसी ग्रामात शिरत आहे तों रात्र पडली. त्यावेळीं शुक्लपक्ष असल्यामुळे, अंतरिक्षात चंद्रमा सर्व भूलोकावर उपकार करण्याच्या उद्देशानेंच जरी उगवला होता तरी दुर्जनाप्रमाणें ज्यांचा अंतर्भाग काळाकुट्ट आहे अशा मेघानीं अंतरिक्षास चोहोंकडून व्यापिल्यामुळे त्याचा एकादा सूक्ष्म किरणही पृथ्वीपर्यंत येत नव्हता. ज्ञानाच्या अभावीं जसा अज्ञानाचा निष्प्रतिबंध अधिकार चालतो त्याप्रमाणेंच प्रकाशाच्या अभावीं अप्रकाशाचाच ह्मणजे अंधकाराचाच सर्वत्र प्रादुर्भाव होणें अगदीं साहजिक होतें. तात्पर्य त्या ग्रामात क्षणोक्षणीं अंधकार वाढू लागला. नील वर्ण आकाशात संध्याकाळीं जसें एकाद-दुसरें नक्षत्र चमकत आहेसें दिसावे त्याप्रमाणे त्या ग्रामात क्वचित् दीपज्योती दिसत होत्या. ग्रामस्थांच्या घरातून दिवे लावलेले होते; पण कृपणाच्या द्रव्याचा जसा दुसऱ्या कोणाला कधीं उपयोग होत नाहीं त्याप्रमाणें त्यांचा प्रकाश बाहेर येत नसल्यामुळे ते मार्गाने जाणाऱ्या येणाऱ्या लोकांच्या निरुपयोगीं होते. जशी जशी रात्र व काळोख वाढू लागला तसा तसा लोकांचा व्यवहार कमी झाला व चित्ताचा विक्षेप कमी झाला असतां जसा शांतीचा प्रादुर्भाव होतो त्याप्रमाणें त्या ग्रामांत चोहोंकडे सामसूम झालें. लोकांचा बाहेरील सुळसुळाट कमी होऊन त्यांतील बरेच निश्चित लोक निद्रावश झाले असतां, काहीं विलासी तरुणींसह

रममाण होऊं लागले असतां, कांहीं मद्यपी मद्यपानानें मत्त होऊन यथेच्छ लीला करून थकून भागून शय्येवर पडले असतां व चोर, जा चेटकी, नाटकी, इत्यादि दुराचरणी लोक आपापल्या इष्ट कार्यास तत् झाले असतां कर्कटीलाही त्या सर्व ग्रामाचें सावकाश व सूक्ष्मपणें निरीक्ष करण्यास चांगलें फावलें. मध्यरात्रीच्या सुमारास तर निशाचर व निशा चराचें कर्म करणारे कांहीं थोडे मानव यावाचून त्या ग्रामाच्या मार्गांत कोणीही जात येत नव्हतें. पर्वताच्या पायथ्याशींच असलेल्या त्या ग्रा माच्या चारी बाजूस भयकर अरण्य होतें. त्यांतून मधून मधून हिंस्र पशूच्य गर्जना ऐकूं येत. केव्हा केव्हां तर व्याघ्रादिकांच्या भक्ष्यस्थानीं पडलेल्य मृगादि दुर्बळ प्राण्याचे आक्रोशही कानीं पडत. पक्षी आपल्या घरट्यांत गपचीप बसून झोंप घेत होते. गायी, बैल, म्हशी, रेडे, घोडे इत्यादि ग्राम्य पशु मधून मधून जरी थोडी हालचाल करीत होते तरी तेही प्राय निद्रावशच झाले होते. असो, अशा त्या भयकर रात्रीं त्या सर्व गांवभ हिंडून ती राक्षसी गावाच्या बाहेर आली. तों तिला नगररक्षा करण्या करितां भर मध्यरात्रीं निघालेला त्या ग्रामाचा राजा व मंत्री दिसला. ते दोघे सशस्त्र व धैर्ययुक्त वीर गांवाबाहेरील मारुतीच्या दर्शनाकरित जात होते. त्यांस पहाताच ती मनात ह्मणाली—बरें झालें. मला हा आता फा चागला आहार मिळाला आहे. मध्यरात्रीं गावाबाहेर फिरणारे हे दोघे मूढ व अनात्मज्ञ असावेत. याचा देह हा त्यांच्यावर लादलेला भारच आहे, असें वाटतें. कारण मूढ पुरुष या लोकीं व परलोकींही केवल दुःख भोगण्याकरिताच जीवत रहात असतो. यास्तव अशा मूर्खांस देहापासून सोडविण्यात कांहीं पाप नाहीं. कारण अनर्थकारक वस्तूचें परिपालन करावें, असें कोठेंही सागितलेलें नाहीं. आपल्या प्रत्यगात्म्यास न जाणाणाऱ्या मूर्खाचें मरण ह्मणजे जीवितच होय. (कारण त्याच्या जिण्याहून मरणच अधिक श्रेयस्कर असतें.) तस्मात् हे दोघे आज माझें भक्ष्य होणार, यांत सशय नाहीं. अनायासानें प्राप्त झालेली दोष-रहित वस्तु टाकून देणें हा मोठा अन्याय आहे. दुर्दैव्यावांचून दुसरा कोणीही असें करणार नाहीं. पण यांना खाण्यापूर्वी हे सद्गुणी आहेत कीं काय, याचा चांगला निर्णय केला पाहिजे. कारण केवल अनुमानानेंच एकादा सिद्धांत ठरविल्यास तो अनुभवानें मिथ्या होण्याचाही फार संभव

असतो. गुणी महात्म्यास तर मी खाणार नाही. स्वाभाविक सुख, कीर्ति व आयुष्य, याची इच्छा करणाऱ्या मानवानें आपणास इष्ट असलेल्या सर्व वस्तूच्या दानाने गुणी पुरुषाचा सन्मान करावा, असें ज्ञानी सागतात. यास्तव माझा हा देह मरून पडला तरी चालेल पण मी गुणी प्राण्यास खाणार नाही. जीवित–दानानेंही गुणी पुरुषाचे परिपालन करणें उचित होय. कारण त्याच्या समागमाने मृत्यूही मित्र होतो. मी राक्षसी आहें. पण माझ्याही मनांत ज्याअर्थी गुणी पुरुषाविषयीं इतकें प्रेम आहे त्याअर्थी तो प्राणिमात्रास प्रिय असावा यांत मुळींच संशय नाहीं. गुणी प्राणी या लोकची भूषणें आहेत. त्याचा तिरस्कार करणे हेंच मरण व त्याचा समागम करणें हेंच जीवित आहे. कारण गुणि–समागमरूप जीविता-पासून स्वर्ग, मोक्ष इत्यादि उत्तमोत्तम फळे उत्पन्न होतात. असो, तर आता अगोदर मी यास काहीं प्रश्न करून याचे परीक्षण करिते. प्रश्नो-त्तरावरून त्याचे ज्ञान किती आहे, हें तेव्हाच समजेल ७७.

**सर्ग ७८**—कर्कटीचें भयंकर भाषण, पण त्यास न भ्यालेल्या राजास तिचे दर्शन व मंत्र्याच्या वाक्यानें समाधान पावलेल्या तिचा प्रश्नारंभ. यांचें या सर्गात वर्णन करितात.

**श्रीवसिष्ठ**—राघवा, त्या राक्षसीने जरी त्याना पाहिले होते तरी त्यांनीं त्या गाढ अधःकारात असलेल्या व गुप्तपणे सचार करणाऱ्या तिला पाहिले नव्हतें. ते उद्दिष्ट मदिराकडे चालले असता ती एकाएकीं मोठ्यानें ओरडली व त्या मेघगर्जनेसारख्या भयकर गर्जनेनतर त्यास ह्मणाली, "अरे सुकुमार व अति सूक्ष्म मानवानो, तुह्मी कोठे जाता व कोण आहा? तुह्मी दिसण्यात तर मोठे बुद्धिमान् दिसता पण या वेळीं अशा भयकर स्थानीं येऊन माझ्या भक्ष्यस्थानीं का पडला?" रामा, तिचे हें घोर भाषण ऐकून राजा उलट ह्मणाला, "अरे क्षुद्र भूता, तू कोठे आहेस? तुझे शरीर कोठे आहे तें तर मला पाहू दे घुघुरख्यासारिख्या तुझ्या या आक्रोशास कोण भिते आहे? तुझ्या सारख्या दुष्टाच्या चेष्टा आमच्यापुढें फारशा चालणार नाहींत. यास्तव तुझ्या ठायीं काय सामर्थ्य आहे ते दाखीव. व्यर्थ बडबड करण्यात काहीं अर्थ नाहीं तुला काय हवे आहे तें साग. मी तुला काय देऊ? कोप व आक्रोश न करिता व न भीता स्पष्ट बोल. आपल्या प्रकट होण्याच्या

शक्तीनें सशरीरी होऊन तू आपले स्वरूप आह्मास दाखीव. चेंगट प्राण्यास काहीं मिळत नाही. उलट योग्य कर्म सत्वर न केल्यामुळें त्याची हानि होते." राजाचे हे गभीर व शहाणपणाचे भाषण ऐकून प्रकट होण्याकरिता ती राक्षसी मोठ्याने हसली व ओरडली. काही वेळाने त्याना तिचें तें भयकर शरीरही दिसलें. अधकारास लाजविणारी ती तिची अग काति, अग्नीशीं स्पर्धा करणारे ते नेत्र, उभारलेले ते तिचे राठ केंस, भाल्याच्या अग्रासारखे तीक्ष्ण दात, सुपासारखे कान व नारळीच्या झाडासारखे उच शरीर पाहून त्या दोघा वीराना आश्चर्य वाटले. यक्ष, राक्षस, पिशाच यासही तिचें भय वाटणे अगदी साहजिक होते. पण राजा व मत्री याना तिचे यत्किंचित्‌ही भय वाटले नाही. ते पूर्वीप्रमाणेच तिच्यापुढे निर्भयपणे उभे राहिले. त्याचें चित्त मुळीच क्षुब्ध झाले नाहीं. कारण सत्य व मिथ्या याचें परीक्षण करण्याची ज्यास सवय लागली आहे त्या चित्तास कधी मोह होत नाही. असो, स्वशरीरानें प्रकट झालेल्या त्या कर्कटीस मत्री ह्मणाला–अगे राक्षसि, तूं खरोखरच जर मोठी असशील तर तुला नुसत्या एका शब्दानेच प्राप्त होणाऱ्या आहाराविषयीं इतका क्रोध करणें व आव घालणे शोभत नाहीं. कारण अशा उसन्या अवसानावरून तू मोठी आहेस, असें आह्मीं मुळींच समजणार नाही. शाति हे मोठेपणाचें लक्षण आहे, असे आह्मास आमच्या शिक्षकानी सागितलें आहे. बरें तू क्षुद्र आहेस व त्यामुळे हा एवढा खटाटोप करीत असलीस तर त्याला आह्मी मुळीच जुमानणार नाहीं, हे तू लक्षात धर. कारण क्षुद्राच्या क्रोधाला किंवा शिव्याशापाना भीक न घालण्याइतके धैर्य आमच्या ठायी आहे. यास्तव तू आपली ही सर्व गडबड सोड व आपला स्वार्थ साधून घे. सुज्ञ लोक आपला इष्ट विषय टाकून इतरत्र प्रवृत्त होत नाहीत. हे अबले, तुझ्यासारख्या शेकडों मशकापुढेही आमचें धैर्य डगमगणार नाहीं. तू जर व्यवहारचतुर असशील तर स्वच्छ बुद्धि व युक्ति याच्या योगानें आपले हित करून घेशील. यास्तव मी तुला आणखीं एकदा सागतों कीं, तुला काय पाहिजे तें साग. याचकाची प्रार्थना आह्मी स्वप्नामध्येंही अमान्य करीत नाहीं. राघवा, राजाप्रमाणेंच मंत्र्यांचेंही तें धैर्यशाली भाषण ऐकून ती निशाचरी मनात विचार करू लागली कीं, कायहो हा यांचा शुद्ध आचार व त्यामुळें केवढें हें याचें धैर्य. हे आपले

सामान्य पुरुष आहेत, असें समजणें ह्मणजे मोठाच प्रमाद करणें होय. मीं हा एक आज मोठा चमत्कारच पाहिला. याचें वचन, मुख व नेत्र यांवरून याच्या मनांतील निश्चय व्यक्त होत आहे. कारण सुज्ञांचा आशय व्यक्त करणारीं हीं तीन द्वारेंच आहेत. बहुतकरून माझा अभिप्राय यांस कळला असावा. यास्तव स्वतः अविनाशी असलेल्या यांना मारणें उचित नाही, हे आत्मज्ञ असावेत. कारण अनात्मज्ञांस अशी मति नसते. जीवन व मरण हे मिथ्याभाव आहेत, असे कळल्यावांचून मृत्यूविषयीं कोणालाही निर्भय होतां येत नाहीं. असो; तर आतां मला आलेला संशय मी यांस विचारतें. कारण ज्ञानी पुरुषाचा समागम झाला असता त्यांस जे आपल्या सशयनिवृत्त्यर्थ प्रश्न करीत नाहींत ते मूर्ख होत. असा विचार करून व आपलें तें हसणे आवरून ती त्यास ह्मणाली, "तुह्मी दोघे कोण अहां ? तुमचें धैर्य व पुण्यप्रभाव याचा प्रत्यय तुमच्या चर्येवरूनच येत आहे, ज्याचें चित्त शुद्ध असतें अशा पुरुषाची मैत्री प्रथमदर्शनींच होते, असा नियम असल्यामुळें मी मित्रभावानें हा तुह्मास प्रश्न करीत आहे. तें ऐकून मत्री ह्मणाला, "हा महापुरुष किराताचा राजा आहे व मी त्याचा मत्री आहें. प्रजाजनास विनाकारण त्रास देणाऱ्या तुजसारख्या दुष्टाचा निग्रह करण्याकरिता आह्मी या काळोख्या रात्रीं बाहेर पडलो आहो. दुष्ट प्राण्याचा अहोरात्र निग्रह करणें हेंच राजाचें कर्म आहे व तें जो करीत नाहीं तो राजा लवकरच नाश पावतो." हें मत्र्याचें भाषण ऐकून राक्षसी ह्मणते, "राजन्, तुझा मत्री दुष्ट आहे. पण चांगल्या राजाचा चागलाच मत्री असणें उचित होय. चागल्या मत्र्याचे पहिलें कर्तव्य राजास विवेक शिकविणें हें आहे. कारण विवेकाच्या योगानें राजा आर्यत्वास प्राप्त होतो व जसा राजा तशी प्रजाही होते. सर्व गुणसमूहात अध्यात्मज्ञान उत्तम आहे. तें ज्यास असतें तोच खरा राजा व तें ज्यास असेल तोच खरा मत्री होय. अध्यात्मविद्येच्या योगानें प्रभुत्व प्राप्त होतें. प्रभुत्व ह्मणजे समदृष्टित्व. ( सर्व भूतांमध्यें सम ब्रह्म पहाणें ) व त्या विद्येच्या अभावीं ते दोघेही ( राजा व मत्री ) नामधारक होतात. यास्तव तुह्मी दोघे जर आत्मज्ञ असलां तरच आज येथून जीवंत परत जाल व तसे नसाल तर आपल्या मूर्खतेनें प्रजेस मूर्ख करणाऱ्या तुह्मांस मी आतां भक्षण केल्यावांचून रहाणार नाहीं. बाळांनों, मी जे आतां प्रश्न करीतः आहे त्यांचीं बरोबर उत्तरें देणें हाच एक

तुमच्या सुटकेचा उपाय आहे. मी याचक आहें, असें जरी तुह्मी समजलात तरी सुद्धां मला माझ्या या प्रश्नाचीं उत्तरे हीच भीक पाहिजे आहे. ती तुह्मां दोघापैकीं कोणीही जरी घातली तरी मी घेईन ७८.

**सर्ग ७९**—या सर्गात अनात्मवेत्त्यास वज्रासारखे कठिण वाटणारे पण आत्मज्ञाच्या हृदयास आह्लाद देणारे बाहात्तर प्रश्न कर्कटीनें विचारले आहेत.

**श्रीवसिष्ठ**—रामभद्रा, राक्षसीचें ते जरा चमत्कारिक भाषण ऐकून राजा ह्मणाला "निशाचरि, तुला काय विचारावयाचे असेल तें विचार." ते ऐकून ती असें विचारू लागली—उपाधीच्या योगाने ज्याचे असख्य भेद झाले आहेत अशा कोणत्या एका अणूमध्ये, समुद्रातील बुडबुड्याप्रमाणें, लक्षावधि ब्रह्मांडे लीन होतात ? आकाश ( शून्य ) व अनाकाश ( अशून्य ) काय आहे ? लोकप्रसिद्धीने काहीं नाही व विद्वानाच्या दृष्टीने काहींसे आहे असें काय ? मी तू झालें आहे व तू मीं झाला आहेस. पण ते कशामुळें ? जात नसतानाही जाणारा कोण ? उभा नसतानाही उभा आहे, असे कोणाविषयी बोलतात ? चेतन असूनही पाषाणाप्रमाणे चैतन्याचा आश्रय न होणारा असा कोण ? चिदाकाशात विचित्र कार्ये करणारा कोण ? वह्निभावाचा त्याग करून दाह न करणारा वह्नि कोण ? राजा, जो वस्तुतः वह्नि नाहीं अशा कोणापासून निरंतर वह्नि उत्पन्न होतो. चद्र, सूर्य, अग्नि व तारा यातील एकही नसताना नित्य प्रकाश करणारा असा कोण ? नेत्राचा विषय न होणाऱ्या अशा कोणापासून प्रकाश प्रवृत्त होतो. लता, वृक्ष, अकुर, जन्माध प्राणी, दुसरेही अनेक निरिंद्रिय जीव याचा उत्तम प्रकाश कोण आहे ? आकाशादिकांचा जनक कोण ? सत्तेलाही सत्ता कोणापासून प्राप्त होते ? जगद्रूपी रत्नाचा ( निधि, खजिना ) कोण ? कोणत्या मण्याचा जगत् हा कोश आहे ? कोणता अणु तमःप्रकाश आहे ? कोणता अणु आहे व नाहीं ? कोणता अणु दूरही व जवळही आहे ? कोणता अणु महापर्वत आहे ? निमेष असूनही कल्प व कल्प असूनही निमेष कोण होतो ? प्रत्यक्ष असूनही असत् कोण ? व चेतन असूनही अचेतन कोण ? अवायु असून वायु कोण ? शब्दरहित शब्द कोण ? सर्व कोण ? न किंचित् कोण ? अहं व नाहं कोण ? पूर्वी अनेक जन्मामध्यें आत्मरूपानें प्राप्त असूनही अज्ञानानें आवृत झाल्यामुळें शेंकडो प्रयत्नानीं प्राप्त करून घेण्यास योग्य काय आहे ?

पूर्णपणें प्राप्त न होणारे काय ? आपल्या आत्म्याचाच नाश कोणी केला आहे ? कोणता अणु मेरूस आपल्या उदरात सांठवितो ? कोणत्या तत्त्वाने त्रिभुवनास तृण करून सोडिले आहे ? कोणत्या परमाणूने शेंकडों योजनें भरून सोडलीं आहेत ? स्वतः अणुरूप असूनही शेकडों योजनातही न मावणारा असा कोण ? कोणाच्या केवल दृष्टिक्षेपानें जगद्रूपी बालक नाचू लागतें ? कोणत्या अणूच्या पोटात पर्वताचे ढीग साठविले आहेत ? मेरूहूनही ज्याची आकृति अधिक स्थूल आहे अशा कोणत्या अणूनें आपलें अणुत्व सोडिले आहे ? केंसाच्या टोंकाच्या शभराव्या भागाएवढा ज्याचा आकार आहे असा कोणता अणु पर्वततुल्य आहे ? प्रकाश व अंधकार या दोघासही प्रकाशित करणारा दीप कोणता ? सर्व अनुभव कोणाच्या आश्रयानें रहतात ? स्वतः मधुरादि रसशून्य असून रसाचा स्वाद घेणारा कोण ? सर्वांचा त्याग करणाऱ्या कोणी सर्वांचा आश्रय केला आहे ? आपल्या स्वरूपास आच्छादित करण्यास असमर्थ असलेल्या कोणीं हे जग आच्छादित केलें आहे ? महाप्रलयसमयी लीन झालेले जग कोणत्या अणूच्या सत्तेने तद्रूप होऊन सृष्टिसमयीं पुनः जीवंतही होते ? ज्याचे अवयव उत्पन्न झालेले नाहींत अशा कोणाचा सूर्य हा नेत्र आहे ? बीजातील वृक्षाप्रमाणे अनत जगें कोणत्या अणूमध्ये रहातात ? निरवयव व अव्यक्त असे तत्त्व ज्याच्या परपरेची परमावधि आहे अशी बीजें सृष्टिकालीं जगद्रूपानें स्पष्ट असूनही तीं सर्व कोणाच्या ठायीं वस्तुतः अनुत्पन्न आहेत ? अनत काल कोणत्या सूक्ष्म तत्त्वात राहिला आहे ? कोणालाही कोणत्याही क्रियेमध्यें प्रवृत्त न करणारा असा कोण करविता आहे ? भोगसिद्ध्यर्थ कोणता द्रष्टा स्वतःस दृश्य करितो ? बाह्य दृष्टीनें दृश्यास पहात असताना, नेत्रशून्य अशा आपणा स्वतःस कोण पहातो ? ज्ञानाच्या योगानें दृश्याचा जणूकाय नाशच झाला आहे, असे पहाणाऱ्या कोणास पुढील दृश्याचाही अनुभव येत नाही ? नेत्र जसे दृश्यास दाखवितात त्याप्रमाणे द्रष्टा ( जीव ) दर्शन ( वृत्ति ) व दृश्य ( पदार्थ ) यास कोण साक्षात् प्रकट करितो. जलाहून तरगादि जसे पृथक् नसतात त्याप्रमाणे कोणाहून हे काहींही पृथक् नाही ? जलाहून तरगत्वादि जसे पृथक् त्याप्रमाणे कोणाच्या इच्छेने हे सर्व पृथक् झाले आहे ? जलाहून जसे द्रवत्व निराळे नाहीं त्याप्रमाणे

दिशा, काल इत्यादिकांनीं मर्यादित न झालेल्या, एक व सूक्ष्म अशा कोणत्या सत्-हून हें द्वैत निराळें नाहीं? द्रष्टा, दर्शन, दृश्य, सत्, असत्, जगत्-त्रय इत्यादि सर्व करून त्रिकालातीत व अकर्ता कोण आहे? भूत, वर्तमान, भविष्य या त्रिकालीं होणारा जगाचा समूह, बीजवृक्षन्यायानें, कशात रहातो? बीजापासून वृक्ष होतो व वृक्षापासून पुन: बीजे उद्भवतात असें आपण पहातों. पण एक व विकारशून्य अशा कोणापासून हें सर्व जग निर्माण होतें? हे राजा, ज्याच्या दृढतेपुढें महामेरु कमलाच्या देंठांतील सूक्ष्म तंतूप्रमाणें निर्बल ठरतो अशा कोणाच्या उदरात असंख्य ब्रह्मांडें रहात असतात? साराश हे राजा, अनेक चेतनांनीं युक्त असलेलें हें विश्व कोणी रचिलें? तू कोणत्या सारभूत तत्त्वाचा आश्रय करून सर्व व्यवहार करितोस? व तुझें स्वरूप काय आहे, तें मला साग. माझ्या या प्रश्नांचीं उत्तरें देऊन जर तू माझ्या सशयाचें निरसन केलेंस तरच तू पंडित आहेस व खरा राजा आहेस, असें मी समजेन. पण तुह्मा दोघांपैकीं कोणीही जर माझ्या या प्रश्नाचीं समाधानकारक उत्तरें न देईल तर मी तुह्मास आपल्या उदरात साठविल्यावाचून रहाणार नाहीं. अगोदर तुमच्या शरीरानीं जठराग्नीस तृप्त करून नतर तुमच्या प्रजेसही मी गट्ट करून सोडीन ७९.

**सर्ग ८०**—या सर्गात अगोदर मंत्र्यानें राक्षसीच्या प्रश्नांचीं उत्तरें सूक्ष्म युक्तिपूर्वक दिलीं आहेत. पण उत्तराचा क्रम प्रश्नाच्या क्रमास धरूनच नाहीं. तर तो यथासंभव आहे.

**श्रीवसिष्ठ**—दाशरथे, याप्रमाणें महारात्रीं त्या महा अरण्यांत महाराक्षसीनें महा प्रश्न विचारले असतां महा मत्री त्याचीं उत्तरें देण्यास उद्युक्त झाला.

**मंत्री**—राक्षसि, मी आता तुझ्या या उत्तम प्रश्नाचीं सयुक्तिक उत्तरें देऊन तुझें सामाधान करितो. या सर्व निरनिराळ्या प्रश्नाच्या मिषाने मोठ्या युक्तीनें व चातुर्यानें तू परमात्म्याविषयींच विचारीत आहेस. ज्याचे शब्दानीं वर्णन करिता येत नाहीं व जो कोणत्याही प्रमाणाचा विषय होत नाहीं असा ज्ञानेंद्रियें व मन याचा आधार आत्मा केवळ चैतन्यरूप असून तोच आकाशाहूनही सूक्ष्म अणु आहे. चैतन्यरूप परम-अणूमध्यें बीजात जशी अनिर्वचनीय वृक्षसत्ता असते त्याप्रमाणें लक्षावधि जगाची स्थिति होते. (या उत्तरानें कोणत्या अणूमध्यें जग रहातात या प्रश्नाचें

उत्तरही दिल्या सारखें झालें आहे. ) सर्व वस्तूंची सत्ता अनुभवसत्तेच्या अधीन आहे. तस्मात् ती सत्ताच मुख्य असून तिच्या योगाने इतर सर्व वस्तु सत्तायुक्त झाल्या आहेत. तें परमात्मतत्त्वच बाह्यदृष्टीने पाहिल्यास आकाश (शून्य) व सर्व भूताच्या आत रहाणाऱ्या चैतन्याच्या दृष्टीने पाहिल्यास अनाकाश (अशून्य) आहे. तें तत्त्व अतींद्रिय असल्यामुळें ह्मणजे इंद्रिय—गोचर होणारें नसल्यामुळे स्थूलबुद्धि लोकास काहीं नाही, असें वाटत असतें व तोच अनत परमाणु होय. तो सर्वात्मक असल्यामुळें साक्षात्कार झाला असता विद्वानास आत्म्याहून भिन्न असें काहीं वाटत नाहीं व ते काय आहे हेंही सागता येत नाही. यास्तव विद्वानाच्या दृष्टीने काहींसें हा आत्माच आहे. पहिल्या प्रश्नात उपाधीच्या योगानें ज्याचे अनत भेद झाले आहेत, असें तू ह्मटले आहेस. पण ती चिदणूची अनेकता सोन्याच्या कटकतेप्रमाणें असत्य आहे. वास्तवीक नव्हे. त्याचप्रमाणें तुझ्या प्रश्नात पुष्कळ वेळा अणु हा शब्द आला आहे. त्याचा अर्थही परम आकाश (आत्माच) आहे. व तो अति सूक्ष्म आणि सर्वातर्यामी असल्यामुळे सहज अनुभवास येत नाहीं. पाच ज्ञानेंद्रियें व सहावें मन याच्या पलीकडे असलेला हाच सर्वाचा आत्मा आहे. तो सर्वाचा आत्मा असल्यामुळेंच तो केव्हाही शून्य नाहीं. एकादे तत्त्व आहे किंवा नाहीं इत्यादि सागणारा व समजणारा तो आत्मच होय. यास्तव आपल्या आत्म्याचाच अपलाप करून 'तो नाहीं' असें ह्मणणें अयोग्य आहे. सत् वस्तूस असत् ह्मणणें हें कोणत्याही युक्तीने जमत नाहीं. तर मग तो इतर वस्तूप्रमाणें दिसत का नाहीं ? ह्मणून विचारशील तर सागतों तो निराकार व सूक्ष्म असल्यामुळे आपल्या शुद्ध स्वरूपानें जरी न दिसला तरी झाकून ठेविलेला कापूर किंवा कस्तुरी याचे अस्तित्व वासावरून जसे सिद्ध होतें त्याप्रमाणें सर्व प्राण्याच्या चेष्टावरून व अनुभवावरून त्याच्या सामान्य सत्तेचें भान होतें. जो सर्व आहे व काहीही नाही असा कोण ? ह्मणून तू विचारलें आहेस. त्याचे उत्तर सागतों. तो चिन्मात्र-अणुच हें सर्व आहे. मन व इंद्रिये याच्या वृत्तीमुळेंच नानात्मतेचा प्रत्यय येत असतो व त्यामुळें हे सर्व किंचित् या नांवास पात्र झालें आहे. पण चैतन्याणु मन, इंद्रियें याच्या वृत्तींनीं परिच्छिन्न होणारा नसल्यामुळें तोच 'न किंचित्' (ह्म. कांहीं नाहीं) आहे. तोच एक व अनेक आहे. तोच या सर्व जगास धारण करितो.

तोच जगत्कोश आहे. चित्तरूपी महासागरांत त्रिजगत्-रूपी अनेक लाटा उठत असतात. चिदणु चित्त व इंद्रियें यांस अलभ्य आहे. त्यामुळें तो शून्य असल्यासारखा वाटतो. पण आपल्याच अनुभवरूप ज्ञानाच्या योगानें लभ्य असल्यामुळें दिक्कालादिकानी मर्यादित न होणारा तो अशून्य आहे. मी अद्वैत दर्शनामुळे तो आत्माच होऊन सर्व शरीरात रहात असतो. यास्तव मी तू व तू मीच आहे. पण मी, तू इत्यादि हा सर्व व्यवहार आहे. परमार्थतः मीही नाहीं व तूही नाहींस. लोकसमूहाच्या अतर्भागीं असणारा हा त्याच्याबरोबर जात येत असल्यासारखा जरी वाटला तरी स्वतः सर्वव्यापी असल्यामुळे कोठेही जात नाहीं. स्वप्नाप्रमाणे, कल्पनेनें ह्या अणूमध्ये असख्य योजनेंही रहातात. त्याचें उभें असणें अथवा जाणें हे शरीररूपी उपाधीच्या अधीन असून वस्तुतः तो जात नाही; उभा असत नाहीं, व कोठे पोंचतही नाहीं. कारण मर्यादित वस्तूमध्ये या सर्व क्रिया असू शकतात. अमर्याद आत्म्यामध्यें त्यातील काहीं असू शकत नाही. कारण देश व काल यास तो आपल्या सत्तेमध्यें साठवितो. शिवाय जेथे जाऊन पोचावयाचे ते जर आपल्या शरीरात असले तर कोण कोठें जाणार? स्तन पीत असलेल्या बाळकाला माता, ते कोठें आहे, ह्मणून कधी हुडकू लागते का? तस्मात् व्यापी आकाश घटाबरोबर घटाकाशरूपाने जसें जातें–येतेंसें वाटतें तसाच तो चिदणु शरीराबरोबर जात येत असल्याचा भास होतो. जडदेहादिकाचे ठायीं चेतन आत्म्याचा अध्यास केल्यामुळें प्रकाश–स्वभावता व जडता यांचा अनुभव येतो. आदि-अतरहित अशा या चिदाकाशांत चिन्मात्र परमात्मा त्रिजगद्रूपी विचित्र चित्र काढितो. आत्मसत्तेनेच अग्नि सत्तावान् झाला आहे. सर्व जगांतील द्रव्यांस पावन करणारा तो सर्वव्यापी असूनही अग्नीप्रमाणें कोणास जाळीत नाहीं. प्रकाशरूप, भास्वर, आकाशाहूनही निर्मल अशा त्या परमतेजापासूनच वह्नि उत्पन्न होतो ज्ञानाच्या योगानें तो सूर्यादि प्रकाशमय गोलासही प्रकाशित करितो व आत्मचैतन्यरूप असा तो सूर्य महाकल्परूपी मेघांनींही नाहींसा होत नाहीं तो नेत्रांस अलभ्य आहे. अनुभव हेंच त्याचें रूप आहे. तो हृदयगृहातील दीप आहे. सर्वांस सत्ता देणारा, अनंत व परम प्रकाश असें त्यास ह्मटलें आहे. 'मी' ही भावना मन व ज्ञानेंद्रियें याच्या पलीकडे असलेल्या व यांस गोचर न

होणाऱ्या आत्म्यापासूनच प्रवृत्त झाली आहे. गाढ अधकारात असलेल्या पुरुषासही बाहेरच्या प्रकाशकावाचून,हा मी येथें आहे,असें स्पष्टपणे समजत असते. त्याचप्रमाणें हृदयात स्फुरण पावणाऱ्या सर्व चमत्कृति त्या नित्य प्रकाशामुळेच अनुभवास येत असतात. लता, वृक्ष, अकुर इत्यादिकाच्या वृद्धीचे निमित्त हाच आहे. तो वेदनाकार प्रकाश स्वानुभवसिद्ध आहे काल, आकाश, क्रिया, सत्ता, स्वामी, भोक्ता, कर्ता, पिता इत्यादि सर्व जगत् व्यवहार–दृष्टीनें त्याच वेदनात आहे. पण परमार्थ–दृष्टीने हें सर्व आत्मा आहे. आपल्या अणुत्वास न सोडताच तो या जगद्रूपी रत्नांचा करडा झाला आहे. केवळ चेतनामध्यें माता, मान, मेय, इत्यादि त्रिपुटीरूप जग नाही. पण तोच आपल्या विचित्र माया शक्तीने हें सर्व जग निर्माण करून त्यात करड्यातील मण्याप्रमाणें एक सारखा चमकत रहातो. तो अणु दुर्बोध असल्यामुळे त्यास तम, व चिन्मात्र असल्यामुळे प्रकाश ह्मणतात. तो अनुभवरूप असल्यामुळे ' अस्ति ' व इद्रियातीत असल्यामुळे ' नास्ति ' असा भास होतो. इद्रियास गोचर न झाल्यामुळेच तो दूर आहे, असे ह्मणतात व चिद्रूप असल्यामुळेच तो अगदीं समीप आहे, असे ह्मणावे लागते. इद्रियादिकावाचून " मी, मी " असा त्याचा अनुभव येत असल्यामुळे तो अणुही समोरच्या महागिरीप्रमाणे अति स्पष्ट आहे. या जगातील जे जे काही भासतें ते ते सर्व त्या अणूच्या केवल सवेदनरूप आहे. भासणारे पर्वतादिक सत्य नाहींत. यास्तव या अणूमध्येच मेरुता साठविलेली आहे. निमेष, कल्प इत्यादि सर्व कल्पना आहेत व त्या सर्वाचा आधार हा चैतन्य अणुच आहे ज्या अणूत अनत निमेष, असख्य कल्प, अनेक सृष्टी व त्यातील पदार्थ भरून राहिले आहेत त्यात द्वैत किंवा अद्वैत याचा थाग कसा लागणार? मी पूर्वी असे केले, त्यानतर हें केले, पुढे असे करावे लागले इत्यादि सत्य व असत्य अनेक कल्पना एका क्षणात चित्तात उद्भवतात. दुःखात काल लाबतो व सुखाचे वेळीं तो केव्हा जातो हे समजतही नाही. चित्तात सत्य किंवा असत्य असा जो निश्चय उत्पन्न होतो तोच चैतन्यात व्यक्त होतो, असा नियम आहे. तस्मात् वस्तुत निमेष नाहीं, कल्प नाहीं, दूर नाहीं; अदूर नाहीं; तर ही सर्व त्या चिदणूचीच प्रतिभा आहे व प्रकाश-तम, दूर-अदूर, क्षण-कल्प इत्यादिकाप्रमाणेंच इतर सर्व विरोधी पदार्थाचेही एकचित्च

अधिष्ठान असल्यामुळें त्यांच्यामध्यें थोडासुद्धां वास्तविक भेद नाहीं. ज्ञानेंद्रियांस ज्ञानशक्ति व कर्मेंद्रियांस कर्मशक्ति देणारें तें चैतन्य प्रत्यक्ष आहे व त्यांचा विषय न होणारें तें अप्रत्यक्षही आहे सद्रूप चेता ह्मणजे द्रष्टाच दृश्याच्या आकाराचा होतो. पण कड्याचा भास होत असेपर्यंत सोन्याचा भास जसा जणुं काय काही होतच नाहीं त्याप्रमाणे दृश्याचा भास जोंवर होत असतो तोंवर त्या परमात्म–कलेचे जणु काय भानच होत नाहीं. एवढ्यासाठींच दृश्यरूपाने त्याची कल्पना न केल्यास किंवा कल्पिलेल्या त्या दृश्यास न पाहिल्यास केवल निर्मल, व शुद्ध ब्रह्मच अवशिष्ट रहातें. तो अणु चिदश सर्वरूप असल्यामुळें सद्रूप, दुर्लक्ष्य असल्यामुळें असत्–रूप, चेतनरूप असल्यामुळें चेतन व चैतन्याचा अविषय असल्यामुळें अचित् आहे. हे जग मृगजळाप्रमाणे, आकाशात भासणाऱ्या नगराप्रमाणें किंवा स्वप्नातील हत्तीप्रमाणे मिथ्या आहे. तेव्हा त्यात वास्तविक विषयता कोठून असणार? जग हें दीर्घ स्वप्न आहे. त्यामुळेंच स्वप्नात पाहिलेल्या पदार्थाप्रमाणे त्याला सत्, किंवा असत् यातील काहींच ह्मणता येत नाही. तस्मात् जगाच्या मिथ्यात्वाचा वारवार व दीर्घ अभ्यास करावा. ह्मणजे त्याच्या मिथ्यात्वाची भावना दृढ होऊन अविद्येचा नाश झाल्यावर पारमार्थिक ब्रह्माचा साक्षात्कार होईल व त्यामुळे पुनरपि ससारात पडावे लागणार नाहीं. स्वात्मचमत्कारामुळेच बुद्धीस भासणारे पदार्थ पृथक् असल्यासारखे वाटतात. पण आत्मसत्ता सर्वव्यापी असल्यामुळें वस्तुतः तिच्याहून काहीं भिन्न नाहीं. एकच बीज वृक्षाहून पृथक्ही आहे व अपृथक्ही आहे. त्याचप्रमाणें ब्रह्म जगाहून पृथक्ही आहे व अपृथक्ही आहे. अर्थात् वस्तुतः "एकमेवाद्वितीय" असताना भिन्न दृष्टि व भिन्न अवस्था याच्या योगानें तें पृथक् व अपृथक् भासतें. बीजात असलेला वृक्ष अगदींच अल्प (सूक्ष्म) असतो. यास्तव त्याची तेथील स्थिति आकाशतुल्य असते. त्याचप्रमाणें ब्रह्ममध्यें असणारें जग अतिसूक्ष्म असतें. पण त्याला आत्मा पहातो व त्या साक्षीच्या रूपाहून त्याचे निराळे भान होत नाहीं. यास्तव त्याची स्थिति चैतन्यरूप आहे असो, हे राक्षसि, तुझ्या सर्व प्रश्नाचें थोडक्यांत एकच उत्तर असें आहे. शात, समस्त, एक, अज, अनादि, अनत, निष्कल, निरिच्छ, माया व मायाकार्य यानीं रहित, वस्तुतः एक

या धर्मांनेंही रहित, निर्विकार व त्रिकाल सत्य असें जें तत्व तेंच हें सर्व आहे ८०.

**सर्ग ८१**—या सर्गांत मंत्र्यानें, राजाचा अधिकारही तिला समजावा ह्मणून, मुद्दाम राखून ठेविलेल्या प्रश्नांचें उत्तर राजा देत आहे.

**राक्षसी**—भो मन्त्रिन्, तुझी बुद्धि फार सूक्ष्म आहे व तुझी उक्ति परम पवित्र आहे. आता राहिलेल्या प्रश्नाचीं उत्तरे हा राजा देऊं दे.

**राजा**—जगाच्या अनुभवाचा ज्ञानानें अभाव होणें, हाच ज्याचा उत्कृष्ट अनुभव आहे, मनापासून सर्व संकल्प-त्याग केल्यामुळेच ज्याचा साक्षात्कार होतो, ज्याचा सकोच व विकास याच्या योगानें क्रमानें जगाचा प्रलय व उद्भव होतात, वेदांतवाक्याची जी परमावधि, जो वाणीचा अविषय, जें अस्ति-नास्ति, भाति-न भाति इत्यादि दोन्ही कोटींच्या अतरालीं रहाणारें ह्मणजे अनिर्वचनीय आहे; हे चराचर जगही ज्याच्या चित्ताची लीला आहे, व विश्वरूप असूनही ज्याची अखडता खडित होत नाहीं त्या सन्मात्र शाश्वत ब्रह्माविषयीं तू प्रश्न विचारीत आहेस. हा ब्रह्माणु आपल्यामध्येच वायूची कल्पना करीत असल्यामुळे वायु आहे व शब्दकल्पना करीत असल्यामुळे शब्द आहे, पण वस्तुतः तो वायुही नाहीं व शब्दही नाहीं. तोच हे सर्व आहे व तो कांही नाही. तोच अह आहे व तोच नाह आहे. ह्मणजे सर्व शक्तिसपन्न आत्म्याची प्रतिभाच या सर्व सत्यासत्य पदार्थांच्या प्रतिभानाचें कारण आहे. हा आत्माच शेंकडों यत्नानी प्राप्त करून घेण्यास योग्य आहे; पण तो एकदां प्राप्त झाला ह्मणजे मग त्याच्याहून अधिक काही नाहीं. अज्ञानरूपी मूळास तोडून टाकणारें बोधशस्त्र मिळेपर्यंतच जन्मरूपी वसंतऋतूत दीर्घकाल संसार-वेल वाढत असते. हा चिदणुच मेरूस आपल्या उदरांत सांठवितो व त्रिभुवनास तृणतुल्य करून सोडितो या अणूत जें स्फुरतें तेंच बाहेर दिसतें. आदि सर्गांत प्रवृत्त झालेली सर्व शक्तिरूप नियतिच या सर्व नियमाचें कारण आहे, आणि त्यामुळें व्यक्त झालेल्या चित्तांत जे जसें स्फुरते, तें तसेच बाहेर दिसतें. हा अणु सर्वग, अनादि, अरूप व निराकार असल्यामुळें शेंकडों योजनातही मावत नाहीं. धूर्त व कामी जार नेत्राच्या मनोहर कटाक्षानीं साध्याभोळ्या स्त्रियांचें मन जसें आकर्षण करून घेतात त्याप्रमाणें हा आत्मा आपल्या शुद्ध ज्ञानाच्या योगानें

आब्रह्मस्तंभपर्यंत जगास आपल्या अधीन करून घेऊन पाहिजे तसें नाचावयास लावितो. वस्त्रानें जसें एकाद्या पदार्थास झांकावें त्याप्रमाणें या अणूनेंच सर्वांस आच्छादित केलें आहे. दिशा, काल इत्यादिकांनीं मर्यादित न होणारा हा मेरूहूनही मोठा आहे. केंसाच्या अग्राच्या शभराव्या भागाहूनही सूक्ष्म असाही हाच होय. हे राक्षसि, तू या शुद्ध ज्ञानस्वरूप आत्म्यास अणु ह्मणून ह्मटलेंस, व त्या तुझ्या शब्दाचाच आह्मी येथें अनुवाद केला आहे, पण ते चिदाकाश सूक्ष्म आहे, एवढ्याच करिता अणु होऊं शकत नाहीं, हें तू विसरू नकोस. वेदांतही त्यास “अणूहून अणु” असे ह्मटले आहे, पण ते त्याचें परम सूक्ष्मत्व दाखविण्याकरिताच होय. या आत्मदीपावाचून कोणताही प्रकाश किंवा अप्रकाशमय पदार्थ व्यक्त होऊ शकत नाही. यास्तव हाच तम व प्रकाश याचा प्रकाश आहे. शिवाय हा जर मुळीं नसताच तर सर्व जग असत् व ज्ञानशून्य झालें असतें. या चिदणुमध्येच सर्व अनुभवाचा उद्भव होतो. हा परमात्मा अति सूक्ष्म असल्यामुळे स्वतः स्वादरहित आहे, पण इंद्रियाच्या द्वारा सर्व विषयाचा स्वाद घेतो. जलात रस असतो पण त्याची रुचि घेणारा हा, जल नव्हे. हा ज्याचा ज्याचा त्याग करितो तें तें मरते ( असत्, जड होते ). दूर्वाच्या वनात गज जसा लपून राहू शकत नाहीं त्याप्रमाणे हा आत्माही आपणास या जगात कोठेही छपवूं शकत नाहीं. कारण याचे चैतन्य जेथें तेथे व्यक्त झालेलें दिसतें. चैतन्यरहित जग सत्य नाहीं. तर ते चैतन्ययुक्त असतानाच सत्य आहे. या सूक्ष्म चिदात्म्यात असंख्य जगें असतात. सर्व चिन्मय आहे. मागचीं भूतें चैतन्यातच होतीं. वर्तमान भूतेंही चैतन्यातच आहेत, व पुढे होणारीं भूतेंही त्यातच बीजरूपानें रहातात. निमेष, कल्प इत्यादि सर्व न्यूनाधिक काल–परिमाणास यानेच झाकून टाकिलें आहे. पण याप्रमाणें हा आत्मा जगात स्थित असूनही कर्तृत्व, भोक्तृत्व इत्यादिकाचा लेप त्याला होत नाहीं. कारण तो उदासीनाप्रमाणें असतो. जग हा एक मोठा चमत्कार आहे. पण त्याला कोणी केव्हांही केलें नाहीं व ते कधीं लीनही होत नाहीं. मग असें जर आहे तर वेदांतशास्त्रात दृश्याचें खंडन कां केलेलें असतें ह्मणून ह्मणशील तर सांगतों. व्यावहारिक युक्तींच्या दृष्टीनें तें त्याचें खंडन केलें आहे. पारमार्थिक दृष्टीनें

मुळींच नसलेल्या त्याचे खंडन कसें कोण करणार ? सारांश हे निशाचरि, त्या एका महा अणूनेच हें सर्व व्यापिलें आहे, रचिले आहे, उत्पन्न केलें आहे, रक्षिलें आहे, पुनः आपल्यामध्ये लीन केलें आहे, सुदर करून दाखविले आहे; व सर्वास तुच्छ करून सोडिले आहे. चिदणुवाचून काही नाहीं व तोच एक सत्य आहे. या वाक्यात तुझ्या सर्व प्रश्नाचे उत्तर आहे ८१.

**सर्ग ८२, ८३**—वरील उत्तर ऐकून राक्षसी प्रसन्न झाली. तिने त्या दोघास मत्र दिला व त्यानीं समाधि मोडून उठलेल्या तिला सतत भोजन दिले, असे येथें वर्णन करितात.

**श्रीवसिष्ठ**--राघवा, राजाच्या तोंडातून निघालेला हा तत्त्वार्थ ऐकून कर्कटी प्रसन्न झाली. त्याच्या विषयींचा तिचा मत्सर कमी झाला व तिचें चित्त शात झाले. ती ह्मणाली—तुह्मा उभयताची अमृततुल्य वाणी ऐकून माझें समाधान झाले. तुमचा बोध अति उज्ज्वल असून तुमची बुद्धिही अति पवित्र आहे. चद्रमडलापासून निघालेल्या चद्रिकेप्रमाणें तुमच्या हृदयातून निघालेला हा ज्ञानप्रकाश मला फारच आनद देत आहे. तुमच्यासारखे विवेकी जन जगत्पूज्य व सेव्य आहेत. चद्राच्या सहवासाने चद्रविकासी कमल जसे फुलते त्याप्रमाणें तुमच्या या सत्सगाने माझें हृदय प्रफुल्लित झाले आहे. पुष्पाच्या सगाने जसा मातीसही वास लागतो त्याप्रमाणे या सत्सगाने माझे शुभ झाले आहे. महात्म्याच्या समागमानें दुःख नाहींसे होते. या अरण्यात तुह्मी मला भूलोकचे सूर्यच लाधला, यात सशय नाही. आता मला तुमचा सत्कार केला पाहिजे मी तुमचे कोणते शुभ करूं ते सागा. हें ऐकून राजा ह्मणाला—हे राक्षसकुलभूषणे, या देशातील लोकाच्या हृदयात शूलादिकाची पीडा सदा होत असते. माझ्या राष्ट्रातील सर्व लोक विषूचिकेच्या विकारानें सतप्त झाले आहेत. त्याच्या सर्व पीडाचें निवारण करणें हें माझे कर्तव्य आहे. पण या दीर्घ कालापासून त्राहि त्राहि करून सोडणाऱ्या उपद्रवाचे निवारण कसे करावे, हे मला पुष्कळ विचार केल्यावरही समजेना. औषधोपचारादि लौकिक उपाय करून पाहिले. पण काहीं उपयोग झाला नाहीं. तेव्हा तुजसारख्या एकाद्या सिद्धापासून यावर एकादा मत्र किंवा तोटगा मिळाल्यास पहावा ह्मणून आह्मी दोघे या मध्यरात्रीं अशा

भयकर व शून्य मार्गांत आलों आहों. कारण दीन व दुर्बळांस पीडा देणाऱ्या दुष्टाचा जर आह्मी निग्रह केला नाहीं तर आमचे राजत्व काय कामाचे ? असो, आह्मास पाहिजे आहे तसला मत्र तुजपासून मिळेल असें दिसत नाहीं. यास्तव तू आता आह्मावर एवढा तरी अनुग्रह कर कीं, आजपासून कोणाचे प्राण घेऊ नकोस. कारण हिंसेसारखें पाप दुसरे कोणतेंही नाहीं व प्राणनाश–इतके दुःख प्राण्यास दुसऱ्या कशानेही होत नाहीं. इतर अज्ञ व अविवेकी हिंसेवरच आपला निर्वाह करीत असतात, हे खरे, पण आह्मा ज्ञानी व विवेकी ह्मणविणारांस तेच कृत्य शोभत नाही.

रामभद्रा, त्या दयाळु राजाचे हे भाषण ऐकून कर्कटीने "मी आजपासून कोणालाही मारणार नाहीं" अशी सत्य प्रतिज्ञा केली ती ऐकून राजास मोठा आनद झाला व तो पुन· तिला ह्मणाला, "पण हे देवि, तुझी शरीरस्थिति कशी होणार ? तू माझे इष्ट सपादन केलेस हें खरें, पण त्याकरिता तुलाही पीडा व्हावी अशी माझी मुळीच इच्छा नाही. अन्नाने होणारी तृप्ति व त्याच्या अभावी होणारे दु ख ही दोन्ही अवर्णनीय आहेत. यास्तव मी तुझ्या तृप्तीचा उपाय कोणता योजू, ते तूच मला साग. त्यावर राक्षसी ह्मणते—राजन्, मी या पर्वताच्या शिखरावर सहा महिने समाधिस्थ होते व ती सोडून उठताच मला पूर्व दृढ सकल्पामुळे क्षुधा लागली. तेव्हा तिची शाति करावी ह्मणून मी प्राण्यानी भरलेल्या या तुमच्या राष्ट्रात आले. पण आता पुन पूर्वस्थळी जाऊन मी ध्यान लावून बसते. चित्ताचे ऐकाग्र्य झाले असता तहान–भूक इत्यादि सर्व शरीरधर्माचा विसर पडून मोठे सुख होते. यास्तव मरेपर्यत मी धारणा धरून शरीराचे रक्षण करीन पुढें त्याच्या नाशाचा काल जेव्हा यदृच्छेने येईल तेव्हां मी त्याचा परित्याग करून परम आनदात मिळेन. इत उत्तर प्राण असेपर्यत निरपराधी प्राण्याची हिसा करावयाची नाहीं, हा माझा निश्चय दृढ झाला आहे. या उत्तर दिशेंतील प्रसिद्ध हिमालयाच्या एका शिखरावरील कदरेमध्यें मी असते. माझें नाव कर्कटी आहे. सर्व जनसमूहास मारण्याच्या इच्छेनें मीं तपाच्या योगाने ब्रह्मदेवास सतुष्ट केलें. प्राण हरण करणारी विषूचिका नामक सूची मी व्हावे, अशी माझी फार इच्छा होती. ब्रह्मदेवानेंही मला अनुकूल वर दिला. मीं पुष्कळ वर्षे विषूचिका होऊन

जीवास पीडा दिली व त्यांना पिडून खालें. पण ब्रह्मदेवानें वर देतानाच "तू गुणी पुरुषास पीडा देऊं नकोस" असें सागून माझ्या नियमनार्थ एक मत्रही योजून ठेविला आहे सर्व हृदयशूलाचा नाश करणारा तो महामत्र मी तुह्मास देतें. मी फार दिवसापासून या हिसा कर्मात प्रवृत्त झालें आहे व त्यामुळें हृदय-व्यथेनें पीडलेले लोक प्रत्यहीं क्षीण होत चालले आहेत. असो; बा सज्जना, तुला हवा असलेला मत्र मीच देतें. कारण प्रयत्नशील सामर्थ्यवानास असाध्य असे काहींएक नसतें. आपण आता या नदीच्या तीरी जाऊ चला. तेथे शुचिर्भुत होऊन ब्रह्म-देवाने सागितलेला मत्र मी तुह्मास देईन. दशरथसुता, हे तिचे भापण ऐकून मनात थोडेसे साशक झालेले ते दोघे मोठ्या सावधपणें तिच्या बरोबर नदीतिरी गेले. तिच्या शुद्धभावाविषयीं त्यानीं चागलेच परीक्षण केले व नतर तिच्यावर शुद्ध प्रेम व विश्वास ठेविला. तिने त्यास तो दिव्य मत्र दिला व आपल्या पूर्वस्थळीं जाण्याचा निश्चय केला. पण इतक्यात राजा ह्मणाला-महादेहे, तू आता आमची पूज्य गुरू झाली आहेस. यास्तव तुला उपाशीं पाठविणे आह्मास शोभत नाही. तू काहींतरी खावेस अशी आमची फार इच्छा आहे. तिचा भग तू करू नयेस. सुजनाचें प्रेम एकमेकास पहाता क्षणींच जडते, असा अनुभव आहे व त्यानतर ते एकमेकाचा मनोरथ पूर्ण केल्यावाचून रहात नाहींत. यास्तव तूं आतां सुंदर व लहानसें रूप घेऊन आमच्या येथे चल. तेथे तू मोठ्या आनदानें रहाशील.

त्यावर ती ह्मणते-राजा, तूं सौम्यरूप व सौम्य स्वभाव धारण करणाऱ्या मानुषीचे सगोपन करण्यास समर्थ आहेस, हें मी जाणते, पण मज राक्षसीच्या क्षुधेची शाति तू कशी करणार? कारण राक्षसांच्या अन्नानेंच माझ्या या जठराची तृप्ति होणें शक्य आहे. शरीर असे पर्यंत त्याचा पूर्वसिद्ध स्वभाव बदलत नसतो, हे तुलाही ठाऊक असेलच.

**राजा**-होय, हे देवि, वस्तुस्थिति अशी आहे, हें मी जाणतों. पण तू मनुष्य-स्त्रीस्वरूपाने आमच्या येथे काहीं दिवस रहा. इतक्यात माझ्या राष्ट्रात दुष्कर्में करणारे, चोर, इत्यादि जेवढे ह्मणून वध्य आहेत त्या सर्वांस आणवून मी तुझ्या स्वाधीन करीन. त्या सहस्रावधी प्राण्यास तूं हिमालयाच्या शिखरावर घेऊन जा व तेथे एकांतांत बसून त्यास आनंदानें

खा. त्यानंतर थोडिशी वामकुक्षी करून तू पुनः समाधिस्थ हो. आतां प्राण्यांची हिंसा करणें तुला व मलाही इष्ट नाहीं व त्याप्रमाणे तू प्रतिज्ञा-ही केली आहेस. पण वध्य क्रूरांस मारणें ही हिंसाच नव्हे. कारण अशा थोड्याशा दुष्टास निर्दयपणें मारल्याने सहस्रावधि प्राण्यांवर उपकार व दया केल्याचे श्रेय मिळत असतें.

असो, रामा, राजाच्या ह्मणण्याप्रमाणे शेवटीं ती सौम्य झाली व त्याच्या मागोमाग राजगृहात गेली. तेथे तिच्या राहण्याची योग्य व्यवस्था लावून प्रातःकाल होताच आपल्या सर्व राष्ट्रांतून सर्व वध्य पुरुप आण-ण्याकरिता त्यानीं शेंकडो सैनिक पाठविले. त्यानी सहा दिवसात तीन सहस्र वध्य मानव धरून आणिले. तेव्हा सहाव्या दिवशीं रात्री ती राक्षसी राजाच्या इच्छेप्रमाणें भयकर होऊन त्या सर्वास दोन्ही हातांत व वेगेंत धरून स्वस्थळीं गेली. जाताना " पुनरपि समाधींतून उठल्यावर तू येथे ये. तोपर्यंत सर्व वध्य आह्मीं येथे साठवून ठेवितों. " असें राजानें तिला आग्रहानें सागितले होतें. असो, हिमालयाच्या शिखरावर पोचल्यावर केल्याप्रमाणे तिने त्याचा आहार केला व पाणी पिऊन तीन दिवस स्वस्थ झोंप घेतली. उठल्यावर पुनरपि समाधि लावावी अशी तिला इच्छा झाली व त्याप्रमाणें तिने लागलेच केले. पुढे प्रत्येक चार–पाच वर्षांनीं ती समाधि सोडून उठे व राजाच्या ग्रामात येई आणि साठविलेल्या वध्यांस घेऊन त्या शिखरावर जाई. तेथे त्यांस खाऊन व झोंप घेऊन ती पुनः समाधिस्थ होई. काहीं दिवसांनीं तो राजा मरण पावला. तरी त्याच्या सिंहासनावर बसणाऱ्या पुढच्या राजानींही तिला तृप्त करण्याचा क्रम तसाच चालविला. फार काय पण तिचें त्यांनीं आपल्या नगरात मदिर बाधलें. त्यात कदरा भगवतीची स्थापना केली व जो नराधम तिची पूजा करणार नाहीं त्याला ती अतिशय पीडील अशी कल्पना लोकात रूढ झाली. साराश येणेंप्रमाणें ती कर्कटी वध्यजनाचे बळी घेऊन तृप्त होऊं लागली व त्या परम–तत्त्वज्ञानीं राक्ष-सीचा सर्वत्र जय–जयकार सुरू झाला, हें येथें निराळें सागावयास नकोच ८२, ८३.

सर्ग ८४— त्या राक्षसीस कर्कटी हें नाव पडण्याचें कारण, उपदेशाकरितां या गोष्टीची केलेली योजना व दृष्टाताचा उपयोग याचें वर्णन येथें करितात.

श्रीवसिष्ठ—असो; रामा, कर्कटीचें हें विचित्र चरित्र मीं तुला सांगितलें. राक्षसांचीं अनेक कुळें असतात व त्यांच्या अंगाची कांतिही लाल, काळी, पिंवळी, हिरवी इत्यादि नानाप्रकारची असते. त्याप्रमाणें हिचा वर्ण काळा होता व आकार खेकड्याच्या आकारासारखा असल्या कारणानें तिला कर्कटी ( म्ह. खेंकडी ) हें नाव पडलें. जगत्तत्त्वाचें निरूपण करीत असतांना मला तिच्या त्या प्रश्नांचें स्मरण झालें व त्यामुळें मी ही आख्यायिका येथें सांगितली. आदि व अंत यांनीं रहित अशा एका परम कारणापासून हें जग झालें आहे. त्या परम कारणांत भूत, वर्तमान व भविष्य सृष्टी अनंत आहेत. बीजच जसें फल होतें व त्यामुळे फल आणि बीज यांच्यामध्यें तात्त्विक भेद नसतो त्याप्रमाणें ब्रह्मच जग झाले आहे व त्यामुळें जग व ब्रह्म यात तात्त्विक भेद नाहीं. भेद केवळ भासमान आहे. पण तो तात्त्विक अभेदास नाहींसें करूं शकत नाहीं. चित्त व चित्तविषय याचा भेद अविवेका-मुळें भासत असल्यामुळें तो विवेकानें नष्ट होतो. भेद ही भ्रांति आहे. विवेक केला असता ती जशी येते तशीच जाते. यास्तव रामभद्रा, विवेक कर. म्हणजे तुझी ही द्वैतभ्रांति जाईल व त्यामुळे तुला अखंड बोधाचा लाभ होईल. अखंड बोध हेंच ब्रह्म आहे. माझ्या या उपदेशानें तुझी भ्रांति–ग्रंथि सुटली म्हणजे शब्द व अर्थ याचा भेद जरी तुला न भासला तरी त्याच्या वरून ज्ञात होणारें तत्त्व तुला प्रत्यक्ष दिसेल. तत्त्वसाक्षात्कार झाला असता अनर्थास कारण होणारें चित्त, स्वतः अनर्थ व चित्ताचेही कारण अविद्या याचा निःसंशय नाश होईल. ब्रह्मापासून हें सर्व निर्माण झाले आहे व ब्रह्मामध्येंच तें लीन होणार, हें माझ्या तोंडून ऐकून तू स्वतः जवळ विचार करून पाहिलास कीं, तुला पूर्ण ब्रह्म साक्षात् दिसेल. आता ब्रह्मापासून हे सर्व झालें, असे माझें वचन ऐकून ज्याच्यापासून हें झालें ते याच्याहून निराळें असेल, अशी तुला शंका येईल. पण बाबारे, ‘ ब्रह्मापासून ’ इत्यादि सर्व भेद–व्यवहार वास्तविक नसून तो केवल जिज्ञासूस तत्त्वार्थ समजविण्याचा उपाय आहे. हें याचें कारण, हे याचें कार्य इत्यादि सर्व व्यवहार, व्यावहारिक अवस्थेपुरताच आहे. वस्तुतः ती सर्व मिथ्यादृष्टि आहे. कारण तात्त्विक दृष्टीनें पाहूं लागलें म्हणजे कार्य व कारण याचा निर्णयच करिता येत नाहीं. यास्तव

अज्ञ जनाच्या बोधाकरिता ही सर्व कल्पना केलेली आहे व तिच्या योगानें व्यवहारास बराच लाभ होतो. यास्तव तिला व्यावहारिक सत्यत्व आहे, असें तू जाण. या विलक्षण सृष्टीचें तत्त्व जाणलें कीं, द्वैत रहात नाहीं. ह्मणजे अज्ञास जरी तें भासलें व त्याचा व्यवहारही यथास्थितपणें चालला तरी प्रज्ञास तें ब्रह्माहून निराळे भासत नाहीं. मौन हेंच ज्ञानाचें लक्षण आहे. हें जग असें आहे; त्याचे कारण अमुक आहे; त्याची उत्पत्ति अशा अशा रीतीनें झाली आहे इत्यादि कोणी कितीही जरी आक्रोश करून सांगू लागला तरी ज्ञानी तिकडे लक्ष्य देत नाहीं व स्वत: तें असें आहे किंवा नाहीं याविषयीं चकार शब्दही बोलत नाहीं. बोलण्यास आरंभ केला कीं तत्त्वास आपण मुकलों, हे तो पूर्णपणे जाणून असतो. कारण द्वैतावाचून शब्द व अर्थ यांचा बोध होत नाही व त्याचा उपयोगही करिता येत नाहीं अर्थात् तत्त्वार्थाकरिता ह्मणून आपापल्या समजुतीप्रमाणे तर्क करून विवाद करणारे सर्व तत्त्वज्ञानशून्य आहेत, असें समजण्यास कोणत्याही प्रकारचा प्रत्यवाय नाहीं. असो, हे रघूत्तमा, हें ब्रह्म आहे. त्याच्यापासून झालेलें हें जग आहे. ब्रह्म कारण आहे जग त्याचें कार्य आहे. इत्यादि कथन करणें हा सर्व तत्त्वोपदेशाचा उपाय आहे. ज्ञान झाल्यावर द्वैत उरत नाही यास्तव तू आपल्या शुद्ध मतीची निष्ठा महावाक्यात स्थिर करून व माझ्या उपदेशांतील किंवा दुसऱ्या प्रमाण वाक्यातील निरनिराळ्या शब्दाकडे लक्ष न देता तत्त्वार्थाकडे ध्यान दे. आकाशात दिसणाऱ्या खोट्या गंधर्वनगराप्रमाणे अनिर्वाच्य कारणापासून व्यक्त झालेले मन भ्रांतिमात्र अशा या जगास भासवितें. आतां ते हा सर्व चमत्कार कसे करितें तें दृष्टांत देऊन सांगतों. ते ऐकल्यानें हे सर्व भ्रांतिमात्र आहे, असा तुझा आपोआप निश्चय होईल. तू वासनेचा त्याग करशील. केवल मन:कल्पित जगाचा त्याग केल्यामुळें तूं शांतात्मा होशील व माझ्या उपदेशाकडे ध्यान देऊन मनोव्याधीचा नाश करण्याकरिता विवेकरूपी औषधीच्या योगाने यत्न करशील. मी आता या पुढें जी आख्यायिका (कथा) सांगणार आहे तिच्यावरून तुला हें पुढील तत्त्व समजेल. चित्तच जगाच्यारूपानें व्यक्त होते. वाळूमध्ये जसें तेल नसतें त्याप्रमाणें या सृष्टीत शरीरादि कांहीं नाहीं. राग, द्वेष, इत्यादि क्लेशानीं दूषित झालेले चित्तच संसार आहे. रागादिकानीं रहित असलेलें चित्त हाच

संसाराचा नाश होय. साध्य, पालनीय, विचार्य, कार्य, आहार्य ( एके ठिकाणची वस्तु दुसऱ्या ठिकाणीं नेणें ) व्यवहार्य, संचार्य, भूषणादि धार्य इत्यादि सर्व हे चित्त आहे. कारण चित्त नाहीं तर यांतील कांहींएक नाहीं. हें एवढेंसें चित्त आपल्यामध्यें सर्व जग धारण करिते. त्याचे चित् व जड असे दोन भाग आहेत. त्यांतील पहिला भाग हेंच सर्व अर्थांचें बीज आहे व दुसरा भागच हें सर्व जग आहे. त्यांतील पहिल्यास द्रष्टृत्व व दुसऱ्यास दृश्यत्व आहे, असे ह्मटलें तरी चालेल. असो; राघवा, चित्त हें बालक असून तें जग हें भूत पहात असते. विवेक हा त्यास नाहींसे करण्याचा मंत्र आहे. त्याच्या योगाने भूत पळून गेले कीं, तें चित्तबालक आपले निरुपद्रवी स्वरूप पाहूं लागते. यास्तव मी आता उपमा देऊन सांगतो तें ऐक. दृष्टांताची योग्यता फार मोठी आहे युक्त व मधुर वाणीनें त्याचा निर्देश करून सांगितलेलें दुर्बोध तत्त्वही श्रोत्याच्या, जलांत टाकिलेल्या तैलबिंदूप्रमाणे विकास पावलेल्या, हृदयांत प्रवेश करिते, पण दृष्टांतावाचून तत्त्वार्थ सांगूं लागल्यास तो श्रोत्यांच्या हृदयांत प्रवेश करीत नाहीं. तर राखेंत ओतलेल्या घृताप्रमाणे तो व्यर्थ जातो. या भूलोकीं जेवढी आख्याने व कथा आहेत त्या सर्वांचा उपयोग प्रमेय-ज्ञानाकरिताच करावा लागतो. कारण सूर्याच्या प्रकाशाने जसें जग व्यक्त होतें त्याप्रमाणे दृष्टांतादिकाच्या योगाने प्रमेय व्यक्त होऊन श्रोत्याच्या चित्तावर आरूढ होतें ८४.

**सर्ग ८५.**—सृष्टि करण्याची इच्छा करणाऱ्या ब्रह्मदेवास दहा ब्रह्मांडे दिसलीं व त्यांतील एका सूर्यानें त्यास त्याचे तत्त्व सांगितलें, असें येथें वर्णन करितात.

**श्रीवसिष्ठ**—राघवा, पूर्वी एकदा मी ब्रह्मदेवास विचारलें कीं, हे सर्व सर्ग कसे होतात. तेव्हां त्यानें मला हे उत्तम ऐंदवाख्यान सांगितलें. तो ह्मणाला—बा पुत्रा, जगास धारण करण्याच्या शक्तीनें युक्त असलेलें मनच हे सर्व करिते. पूर्वी एकदां दिवस उजाडला असता मी जेव्हां संसार निर्माण करण्याची इच्छा केली तेव्हा काय झाले ते ऐक. एकदा दिवस सपला ( मावळला ) असतां सर्व सर्गाचा संहार करून मीं एकट्यानेंच ती रात्र स्वस्थ चित्तानें घालविली. नंतर दिवसाच्या आरभीं यथाविधि संध्या करून प्रजा उत्पन्न करण्याकरितां आपले नेत्र आकाशात

लाविले. तेव्हां तें गगन तम व तेज यांतील एकानेंही व्याप्त नसून विस्तृत, शून्य व अंतरहित आहे, असें मला आढळलें; पण मी आतां यांत सर्ग उत्पन्न करितों, असा निश्चय करून जेव्हां सूक्ष्म चित्तानें पाहूं लागलों तेव्हा मला मोठमोठे दहा सर्ग दिसले. त्यांत माझ्यासारखेच दहा ब्रह्मदेव हंसावर आरूढ झाले होते. त्या प्रत्येक सर्गाची रचना प्रायः एकसारखीच होती. नद्या वाहत होत्या, समुद्र आपल्या उदरात जलसंचय करीत होते; सूर्य दिवस व रात्र करीत होता; अग्नि पाकादि क्रिया करीत होता; वायु वहात होता; पर्वत पृथ्वीस धारण करीत होते; वृक्ष, वनस्पती, औषधी आपापल्या स्वभावाप्रमाणें नियमित कामे करीत होत्या; देव स्वर्गलोकीं क्रीडा करून सुख भोगीत होते; मनुष्य भूलोकीं कर्में करून बरेच दुःख व थोडेंसें सुख भोगीत होतीं; दानव व सर्प पातालात आपल्या योग्यतेप्रमाणें व्यवहार करीत होते; काल व त्याचे वर्षादि विभाग आपापलें कालपरिमाणाचें कृत्य थोडासाही प्रमाद न करिता करीत होते; वेद, स्मृत्या, पुराणें, इत्यादि शब्दराशी शुभाशुभ आचाराचा उपदेश करण्यास तत्पर होता; कर्माप्रमाणें प्राण्यास स्वर्ग अथवा नरक देणाऱ्या ईश्वरशक्ती आपलें नियत कर्तव्य सतत करीत होत्या व प्राणी भोग किंवा मोक्ष यातील कोणत्या तरी एका पुरुषार्थाची इच्छा धरून प्रयत्न करीत होते. सारांश याप्रमाणें त्यांतील प्रत्येक सर्गात सात ऊर्ध्व व अधो लोक, सात द्वीपें, सात समुद्र, सात पर्वत, चार प्रकारचे प्राणी, देवादि अनेक योनी इत्यादि सर्व असून त्यांतील प्रत्येक प्राण्याचे, इष्टप्राप्ति व अनिष्ट निवृत्ति या एका उद्देशानें, निरनिराळे अनेक उद्योग चालले होते. कोणी मरत आहे; कोणी उत्पन्न होत आहे; कोणी यमयातना भोगीत आहे; कोणी नंदनवनांत विलास करीत आहे; कोणी रडत आहे; कोणी हसत आहे; कोणी जात आहे; कोणी येत आहे, एव च प्रत्येक ब्रह्मांडात प्रत्येक प्राण्याची धडपड चालली आहे. उंबराच्या फळांतील किड्याची व त्याची अवस्था अगदीं एकसारखीच आहे, असा मला त्यावेळीं भास झाला. इकडे युग, कल्प, वर्ष इत्यादि प्रमाणानीं काल त्यांचा गुपचूप समाचार घेतच होता. पण त्याचें भान त्याना त्या गडबडींत कोठून होणार ? पण हे सर्व शुद्ध चित्ताने पाहून मी आश्चर्यचकित झालों. हे काय आहे व कसें झाले ? मांसमय नेत्रानी कधींही न दिसणारें हें मायाजाळ

मला मनाच्या योगानें दिसतें. याचा अर्थ काय? असा विचार करीत मी बराच वेळ पहात राहिलों. नंतर त्या जगज्जालांतून एका भास्करास मनानें बोलावून आणून मीं ह्मटलें, " हे देवा, ये. हे महा तेजस्विन्, तुझें स्वागत असो; मी विचारतों त्याचें मला उत्तर दे. तूं कोण आहेस? हें जग व त्या पलीकडे दिसणाऱ्या दुसऱ्या सृष्टया कशा झाल्या ?" हा माझा प्रश्न ऐकून आश्चर्यचकित झालेला भानु ह्मणाला, "प्रभो, या दृश्य प्रपंचाचें कारण आपणच आहां. पण जणु काय ठाऊकच नसल्याप्रमाणें मला प्रश्न करितां, याचा अर्थ काय? कदाचित् माझी परीक्षा पहाण्या-करिता आपण हें मला विचारीत असाल. यास्तव मी आपली अचिंत्य उत्पत्ति सांगतों, ती ऐका. भो भगवन्, या सृष्टींत सत्, असत् इत्यादि कलांनीं जें जें सर्वत्र भासत असतें तें तें सर्व मन आहे ८५.

**सर्ग ८६, ८७—या सर्गांत भार्येसह इंदु ब्राह्मणानें पुत्रार्थ केलेलें तप, त्याच्या योगानें त्यास झालेले दहा ऐंदव व त्यांतील ज्येष्ठाच्या उपदेशानें सर्वांनीं केलेली ब्रह्मोपासना, याचें वर्णन करतात.**

**भानु**—हे महादेवा, तुझ्या कल्पनात्मक कालच्या दिवशीं कैलास पर्वताच्या खालीं असलेल्या जंबूद्वीपाच्या एका कोपऱ्यात सुवर्णजट नावाचा जो एक प्रदेश होता त्यात मरीचि-प्रभृति तुझ्या पुत्रांनीं प्रजा उत्पन्न करून तिच्या निवासार्थ एक सुंदर मोठें मंडल कल्पिलें. त्यात एक सोम या नावाचा अति धर्मात्मा ब्राह्मण होता. तो ब्रह्मविद् व शांतस्वभाव असून कश्यपाच्या कुलांत त्याचा जन्म झाला होता त्या महात्म्याची प्राणतुल्य प्रिय भार्याही महासाध्वी व पतिसेवापरायण होती. पण माळ-भूमीवर जसा एकही अंकुर उगवत नाहीं त्याप्रमाणें तिच्या ठायीं एकही अपत्य झालें नाही. तेव्हा त्या दोघानींही कैलास पर्वतावर जाऊन पुत्र-प्राप्त्यर्थ उग्र तप केलें. सर्व दिवसभर वृक्षाप्रमाणे निश्चल राहून सायंकाळीं एक चुळकाभर पाणी प्यावयाचे असा नियम करून, त्रेता व द्वापर या दोन युगात त्यानीं तें व्रत चालविलें. त्यानंतर शंकर प्रसन्न होऊन त्याच्या जवळ आला व आग्रहानें वर मागण्याविषयीं सांगू लागला. तेव्हा प्रणाम करून त्या उभयतानीं आह्मास कल्याण गुणानीं युक्त व अतिबुद्धिवान् असे दहा पुत्र व्हावे, हा वर द्या, असें सांगितलें. त्या बरोबर ' तथास्तु ' असें ह्मणून तो ईश्वर अंतर्धान पावला. पुढें इष्ट वर-प्राप्तीनें संतुष्ट

झालेलीं तीं दोघे आपल्या उत्तम गृहीं परत आलीं. कांहीं दिवसांनीं ती ब्राह्मणी गर्भवती झाली. दहाव्या मासीं निर्विघ्नपणें प्रसूत झालेल्या तिला दहा सुदर पुत्र झाले. ज्यांचे ब्राह्मणसंस्कार झाले आहेत, असे ते तेजस्वी सुत प्रत्यहीं वाढूं लागले. सात वर्षांचे होतात तो ते सर्व वाङ्मयांत निष्णात झाले आणि उदय पावलेल्या शुक्राप्रमाणें ते उत्तरोत्तर अधिक तेजस्वी दिसूं लागले. पुढें बऱ्याच दिवसांनीं त्यांचीं आईबापें मरण पावून देव-लोकीं गेलीं. पण त्यामुळें त्या दहाही ब्राह्मणास अतिशय दुःख झालें. ते घरदार सोडून विरक्त होऊन कैलास पर्वतावर गेले व उद्विग्न झालेले ते सर्व बांधव आपसांत असा विचार करूं लागले—या जगांत कल्याण कोणतें आहे? सुखाचें साधन काय आहे व दुःखाचें साधन काय आहे? महत्त्व कोणतें? ऐश्वर्य कोणतें? शुभ महावैभव कोणतें? लोकाधिपति होणें, ग्रामाधिपति बनणें, सामंत चक्राचा मुख्य होणें, राजाधिराज होणें, फार काय, पण इंद्रत्व प्राप्त करून घेणें हे सर्व व्यर्थ व तुच्छ आहे. कारण त्यांतील शेवटचें इंद्रत्व सुद्धां जर प्रजापतीच्या दोन घटिकाच रहातें तर या लोकच्या इतर ऐश्वर्यांची कथा काय? इत्यादि प्रकारें ते सर्व विचार करीत असता त्यातील वडील भाऊ इतरास मोठ्या गभीर वाणीने ह्मणाला—“ माझ्या प्रिय बांधवानों, या सर्व ऐश्वर्यांहून मला हिरण्यगर्भाचे ऐश्वर्य अधिक आवडतें. कारण तें कल्प संपेपर्यंत नष्ट होत नाहीं. ” ते त्याचें योग्य भाषण ऐकून इतर नऊ ऐंदव ( इंदुपुत्र ) “फार उत्तम, फार उत्तम ” असें ह्मणून त्याची स्तुति करूं लागले. त्यानीं दुर्लभ ब्रह्मत्वाच्या प्राप्तीचा उपाय त्यास विचारिला. तेव्हा तो ह्मणाला—तुमच्यापैकीं प्रत्येकानें मी कमलासन ब्रह्मा आहें, मीच सृष्टीची उत्पत्ति व संहार करितों, अशी सतत भावना करावी. ह्मणजे ईश्वराच्या अबाधित नियतीप्रमाणे प्रत्येकास ब्रह्मत्व प्राप्त होईल.

ज्येष्ठ भ्रात्याचा हा उपदेश ऐकून ते नऊ जण एकाग्र चित्तानें तशीच भावना करीत चित्रासारखे स्थिर बसले. त्याच्या बरोबर तो वडील ऐंदवही उपासना करूं लागला. त्या दहा भावातील प्रत्येकजण—मी जगास उत्पन्न करणारा, त्याचें पालन करणारा व त्याचा संहार करणारा महेश्वर ब्रह्मा आहें; वेद, सरस्वती, गायत्री, मुनि, देव इत्यादि सर्व माझ्या आजुबाजूस बसले आहेत; हा मी उत्पन्न केलेला स्वर्ग आहे; हे इतर

लोक आहेत; हे लोकपाल आहेत; हा दिवस गेला; ही माझी महा रात्र आली; हा मी भुवनेश्वरस्वरूपांत शांतपणें स्थित आहें;–इत्यादि भावना करीत राहिला त्यांची ती परम उपासना दीर्घ काल चालली त्यांचें मन ब्रह्मदेवाच्या आकृतींत व कृतींत गढून गेलें; त्याना त्याच्या शरीराचें भानही राहिलें नाहीं; मग बाह्य तुच्छ विषयांची आठवण कोठून होणार ? पुढें काहीं कालानें वायु व तेज यांनीं त्यांच्या शरीरास सुकवून सोडिलें, पण त्याना त्याचें भानच राहिलें नाहीं. तीं शरीरें श्वासादिरहित व शुष्क आहेत, असें पाहून कोल्हीं, लांडगे इत्यादि हिंस्र पशूंनीं त्यास तोडतोडून खाऊन टाकिलें. पण त्याच्या मनांत चाललेली भावना प्रतिबद्ध झाली नाहीं. तो कल्प क्षीण होईतों ते तसेच ब्रह्मभावना करीत राहिले. कल्पक्षय झाल्यावर बारा सूर्य उगवले; पुष्करावर्तादि मेघ वर्षाव करूं लागले; कल्पवात वाहूं लागले; सर्व भूतसमूह मरून गेले; त्रिभुवन जलमय झालें; व त्या ब्रह्मांडाच्या अधिपतीने सर्व सृष्टीचा सहार केला. पण हे प्रभो, येणेंप्रमाणें सृष्टीचा सहार करून तू जरी निद्रित झालास तरी ते दहा ब्राह्मण तसेच चिंतन करीत होते. त्यानीं तुझ्या संसाराप्रमाणेच आपल्या चित्ताकाशात दहा संसार उत्पन्न केले व तेच हे ससार आज तू आपल्या सूक्ष्म दृष्टीने पहात आहेस. मी त्याच्या त्या दहा सर्गातील एका सर्गाचा आदित्य आहे. पण हे जरी दहा सर्ग आहेत तरी तुला आपला स्वतंत्र सर्ग उत्पन्न करिता येण्यासारखा आहे. कारण जगत् हा मनाचा खेळ आहे. आसक्तीमुळे आपल्या चित्तात तो एक भ्रम उत्पन्न होत असतो. अर्थात् त्याच्या प्रमाणेच तुझी सृष्टिही भ्रममात्र असून, वास्तविक नसल्यामुळे, तुलाही आपली सृष्टि करिता येण्यासारखी आहे ८६, ८७.

**सर्ग ८८**—मानसिक निश्चय हाच सर्व उत्कर्षाचा उत्तम उपाय आहे, असें येथें सागतात.

**श्रीवसिष्ठ**—रामभद्रा, त्यानतर तो पितामह ब्रह्मा त्या भानूस पुनः आदरानें ह्मणाला, "सूर्या, हे दहा सर्ग असताना मी आणखी निराळा सर्ग कशाला उत्पन्न करूं ?" ते ऐकून तो ज्ञानी सूर्यही त्या पूज्य देवास उलट असें बोलला—खरें आहे; हे प्रभो, निरिच्छ व निष्क्रिय अशा तुला मिथ्या सर्ग करून काय करावयाचें आहे? जगत्पते, ही सृष्टि तुझ्या विनोदाच्याच उपयोगीं आहे. जलादि स्वच्छ उपाधींत सूर्याचें प्रतिबिंब

जसें पडतें त्याप्रमाणें तुझी इच्छा नसतांनाही तुजपासून सृष्टि उद्भवते. सूर्य जसा वारवार तोच तो दिवस करितो त्याप्रमाणे तूही वारंवार आपलें कर्तव्य समजून सृष्टि रचितोस व तिचा संहार करितोस. तूं उद्यमाच्या इच्छेनें यांतील काहींच करीत नाहींस. तेव्हां तू सृष्टि जर न केलीस तर आपल्या नित्यकर्मपरित्यागाहून दुसरें कोणतें अदृष्ट तुला प्राप्त होणार आहे ? यास्तव स्वच्छ आरशात जें पुढें येईल त्याचे जसे प्रतिबिंब पडते त्याप्रमाणे सज्जनानें प्राप्त कर्तव्य करावें. बुद्धिमान् पुरुष अप्राप्त कर्मे करण्याची जशी इच्छा करीत नाहींत त्याप्रमाणे प्राप्त कर्मांचा त्याग करण्याचीही इच्छा करीत नाहींत. यास्तव सुषुप्त पुरुषाच्या निष्काम बुद्धीप्रमाणें तू प्राप्त कर्तव्य कर. या ऐंदवाच्या सर्गांनीच तू संतुष्ट होत असलास तर बरेंच झालें. कारण पुत्र, पौत्र, प्रपौत्र इत्यादिकाचा उत्कर्ष पाहून सतुष्ट होणें हा वडिलाचा धर्मच आहे. पण हे सर्व सर्ग तुला मनानेंच (ह्मणजे अतर्दृष्टीनेंच) दिसणें शक्य आहे. कारण ज्यानें आपल्या मनानें सर्ग कल्पिलेला असतो त्यासच तो बाह्य दृष्टीनें दिसतो, असा नियम आहे. या दहा सर्गांचा व त्यास निर्माण करणाऱ्या ब्रह्मदेवाचा नाशही कोणाला करिता येणार नाहीं. कारण त्याच्या दृढ चित्तामुळें हे सर्व सर्ग स्थिर झाले आहेत. प्राणी कर्मेंद्रियाच्या योगानें जें काहीं करितो त्याचा नाश इतरास करिता येतो. पण मनाच्या निश्चयाने बनविलेल्या वस्तूस दुसऱ्या कोणालाही रोध करिता येत नाहीं. मनानं दीर्घ काल अभ्यास करून जे निश्चित केलेलें असतें, तें देह नाशानतरही नष्ट होत नाहीं. तस्मात् मानसिक निश्चय हाच सर्व उत्कर्षाचा व सर्व नाशाचा उत्तम उपाय आहे व इतर सर्व साधनें त्याच्या मानानें तुच्छ आहेत ८८. (येथें ऐंदवांचें आख्यान समाप्त झालें.)

**सर्ग ८९**—इंद्र व अहल्या याच्या मनोवृत्तीचा वृत्तात सांगून दृढ निश्चय दुसऱ्याच्या शेंकडों प्रयत्नांनींही शिथिल होत नाहीं, हें येथें व्यक्त करितात.

**भानु**—मन हेंच जगाचें कर्तृ (कर्ता) आहे. समष्टिभावास प्राप्त झालेले मन हाच परम पुरुष (हिरण्यगर्भ) आहे. या लोकांत मनानें केलेलें कर्मच खरें कर्म असून केवळ शरीराने केलेलें कर्म खरें कृत-कर्म नव्हे. ऐंदव सामान्य ब्राह्मण होते. पण मानसिक दृढ भावनेनें

ते ब्रह्मदेव झाले. तेव्हा मनाची केवढी शक्ति आहे, ती पहा. मनानें देहाची व जन्म-मरणादि देह-धर्मांची जो भावना करितो तो त्या त्या देहास व त्याच्या धर्मास प्राप्त होतो. बाह्यदृष्टि पुरुषासच सुख-दु:खादिकाचा अनुभव येतो. अंतर्मुख योग्यास देहगत प्रिय व अप्रिय याचें भान होत नाहीं. यास्तव विविध भ्रमांनीं भरलेल्या या जगाचें कारण मनच आहे, यात कांहीं सशय नाही. इंद्र व अहल्या यांचा वृत्तांत याच सिद्धांताचें निदर्शन आहे. यास्तव मी तो तुला सांगतों. असले वृत्तात ठाऊक असले तरी ते ऐकल्यानें पवित्र दृष्टि प्राप्त होते. पूर्वी मागध देशांत इंद्रद्युम्न या नांवाचा एक राजा होता. त्याची चंद्रबिंबासारखी सुंदर भार्या होती. तिचे नांव अहल्या. चंद्राच्या रोहिणीप्रमाणें त्यास ती प्रिय असे. त्याच ग्रामांत इंद्र या नांवाचा एक बुद्धिमान् ब्रह्मपुत्र होता. तो परस्त्रीगामी असे. एकदां राजाच्या त्या अहल्या राणीनें "इंद्रास अहल्या अतिशय प्रिय होती व त्या दोघांचा पूर्वी समागम झाला," इत्यादि आख्यान ऐकले. तेव्हापासून तिची चित्तवृत्ति क्षुब्ध झाली. तिला वाटले कीं, मीही अहल्या आहे. मग मजवर इंद्र प्रेम का करीत नाहीं? त्या राणीला प्रिय, सर्व गुणसंपन्न व सार्वभौम पतीही शत्रूसारिखा दिसू लागला. तिचें चित्त एकक्षणभरही इंद्राच्या चिंतनावाचून राहिना. तिला वेड लागल्यासारखेंच झालें. "हा इंद्र आला, हा इंद्र बसला" इत्यादि भलभलतेच ती बडबडू लागली. पण तिच्या सखीनें ते ओळखिले व ती एकातांत तिला ह्मणाली, "तू जर असले वेडे चार केले नाहीस व सावधान होऊन राहिलीस तर मी तुझी व इंद्राची गाठ घालून देईन." त्याबरोबर ती तिच्या पायां पडली व 'इंद्राची लवकर भेट होईल, असें कर' असें ह्मणून तिला विनवू लागली. ती सखी फार शहाणी होती. तिनें राणीचे समाधान केलें व ह्मटले "मी आज रात्रीं त्याला घेऊन येईन. पण तू अशी वेडी होऊन काहीं तरी बरळू नकोस." नंतर ती गावांत त्या ब्राह्मणपुत्राकडे गेली. त्याला हा वृत्तांत सांगितला व त्यास रात्रीं राणीच्या अंत:पुरांत आणिलें. एका गुप्त गृहात त्याची परस्पर भेट झाली. अनेक अलंकारादिकानीं भूषित झालेल्या त्यांनीं एकमेकास संतुष्ट केलें व तीं दोघेंही एकमेकाच्या प्रेमपाशात अतिशय आसक्त झालीं. राणीस राजाचा कंटाळा आला. त्या इंद्रावाचून तिला एक क्षणभरही चैन पडेनासें झालें. तो

कृत्रिम जार इंद्रही तिला सोडून राहीनासा झाला. कांहीं दिवसांनी हे पाप कर्म राजास कळलें. तेव्हां त्या प्रजापालकानें त्या दोघांनाही असह्य देहदंड केले. त्याचें शरीर भाजून काढलें; तीक्ष्ण शस्त्रांनीं त्यांस तोडिलें; हत्तीच्या पायांशीं बांधिलें; तापलेल्या तेलाच्या कढईत टाकिलें व अशाच प्रकारच्या अनेक क्रूर शिक्षा केल्या. पण तीं दोघें मोठ्या आनंदात होतीं. एकमेकांच्या आकाराचें अनन्य चित्तानें स्मरण करणाऱ्या त्याना दुःखाचें भानही झालें नाहीं. शेवटीं हा सर्व चमत्कार पाहून राजा त्यास ह्मणाला, " तुह्मा दुष्ट व पापी स्त्रीपुरुषाचे तुकडे करावे, असें माझ्या मनात आहे. पण तुमच्या शरीरावर शस्त्रास्त्रें चालतच नाहींत, याचे कारण काय ? " त्यावर तो कृत्रिम इंद्र ह्मणाला, " राजा, मला हे सर्व जग या स्त्रीमय दिसत आहे. त्यामुळें मला हे शरीर-क्लेश मुळींच भासत नाहींत. हिची स्थितिही अशीच झाली आहे. हिचें चित्त माझ्यामध्यें गढून गेलें आहे व त्यामुळें हिला सर्व जग मन्मय दिसते. तुमच्या या असह्य प्रहारांचें हिला भानच नाहींसें झालें आहे. राजन्, या शरीरात रहाणारा पुरुष मनोमय आहे. आह्मी दोघेंही शरीरावरील अध्यास टाकून देऊन मनोमय झालों आहों. त्यामुळे आह्मांस भय, लज्जा, शोक इत्यादिकातील काही वाटत नाहीं. तुमच्या या दंडाचा संबध स्थूल देहाशी आहे. मनाशी नाहीं. या जगात मनाचा भेद करील असें काहीं नाही. देह क्षीण होवो कीं पुष्ट होवो. निश्चित मन कधींही बदलत नाहीं. मन ही एक विलक्षण वस्तु आहे. तिच्यावर विचारावाचून दुसऱ्या कोणाचाही अधिकार चालत नाहीं. फार काय, पण, वर, शाप इत्यादिकानींही मनाचें काहीं वाकडें होत नाहीं. आम्हीं दोघेंही मनः-प्रधान झालों आहों. यास्तव पर्वताप्रमाणें एका विषयात स्थिर झालेल्या आमच्या मनास चचल करण्यास कोणीही समर्थ नाहीं. व्यर्थ उत्पन्न झालेलीं हीं शरीरे मनाचीं कारणे नव्हेत. तर उलट मनेंच शरीराचीं कारणे आहेत. मन हेच आत्म्याचें प्रथम शरीर आहे. बाह्य स्थूल शरीर त्याच्या कल्पनेनें त्याच्या मागून होतें. अर्थात् मन हा ससाराचा प्रथम अंकुर असून त्याच्यापासून देहरूपी शाखा, पल्लव, इत्यादि झाले आहेत. अंकुर नाहींसा झाला तर पल्लवादिकांचा उद्भव होऊ शकत नाहीं. पण शाखा, पल्लव इत्यादिकाचा नाश झाला असता अंकुरापासून पुन-

रपि त्याचा उद्भव होऊ शकतो. यास्तव, राजा, आमच्या चित्तरत्नास हिरावून घेण्याचें सामर्थ्य तुझ्या ठायीं नसल्याकारणानें आह्मांस तुझ्या कोणत्याही दंडाची भीति वाटत नाहीं. प्रजानाथा, मला माझी ती प्रिया प्रत्येक दिशेत दिसत आहे. माझें मन तन्मय झालें आहे. त्यामुळें मला आनंदावाचून दुसऱ्या कशाचाही अनुभव येत नाहीं ८९.

**सर्ग ९०—भरत मुनींच्या शापानें त्यांचे देह नष्ट झाले, पण त्यांची मानसी तन्मयता नाहींशी झाली नाहीं, असे येथें सांगतात.**

**भानु**—देवाधिदेवा, त्या इंद्रसंज्ञक ब्राह्मणानें राजास असें उत्तर दिलें असता अधिकच रागावलेला राजा जवळच बसलेल्या भरत मुनींस ह्मणाला—भो भगवन्, आपण सर्वधर्मज्ञ आहां. या दुष्टाचें धाष्टर्य आपण पाहिलेंत ना! या पापी मूर्खास शाप देऊन आतां त्याचा निग्रह करा. अवध्य पुरुषाचा वध केल्याप्रमाणेच वध्याचा वध न केल्यास पाप लागतें. तेव्हा त्या मुनीनें त्या दोघाही दुराचरणी स्त्रीपुरुषांच्या अक्षय्य पापाचा विचार करून व पतिद्रोह करणाऱ्या त्या दुष्ट स्त्रीविषयीं तर फारच तिरस्कार व्यक्त करून "तुमचा नाश होवो" असा शाप दिला तो ऐकून तीं दोघेंही निर्लज्जपणें ह्मणालीं—तुह्मी दोघेही ( ह्म. राजा व भरतमुनि ) अविचारी आहां कारण तसे नसता तर आह्मास शाप देऊन आपलें तप क्षीण करून घेतलें नसतेंत. या शापानें आमचे देह नाहींसे होतील हें खरें; पण त्यामुळें आमची कोणती हानि होणार आहे? आह्मी सूक्ष्म, चिन्मय व दुर्लक्ष्य आहों व त्यामुळें आमच्या अंतःस्वरूपाचा नाश कोणालाही करिता येणार नाहीं. असो; हे प्रभो, तीं दोघें इतकें बोलत आहेत तों शापप्रभावानें त्याचीं शरीरें तुटलेल्या वृक्षशाखेप्रमाणे खालीं पडलीं. पुढें दृढ विषयरागानें बद्ध झालेलीं तीं मृगयोनींत उत्पन्न झालीं. त्यानंतर पक्ष्याचे जन्म त्यास मिळाले. आता तीं दोघेंहीं आमच्या स्वामीच्या ब्रह्मांडांत ब्राह्मणयोनींत उत्पन्न होऊन मोठ्या प्रेमानें रहात आहेत. या जन्मात पुण्याचरण करून तीं आपल्या ब्राह्मणजन्माचें सार्थक करीत आहेत. भरत मुनीचा शापही व्यर्थ गेला नाहीं. कारण त्यांच्या दुराचरण करणाऱ्या शरीराचा निग्रह करून त्याच्या योगानें इतरांस भय वाटावें ह्मणून त्यांनीं तो दिला होता व त्याचा उपयोग झाला. शापादिकांचा प्रभाव मनासारिख्या सूक्ष्म वस्तूवर होत नाहीं, हें त्यास माहीत

नव्हतें, असे नाहीं. तात्पर्य, प्रेम ही एक अशी वस्तु आहे कीं, तिच्या योगानें विद्ध झालेला प्राणी हवी ती ऐहिक हानि सहन करण्यास तयार होतो ९०.

**सर्ग ९१**—त्या भानूसच मनु करून त्या ब्रह्मदेवानें आपला सर्ग रचिला व तो मनोमात्र होता, असें येथें वर्णन करितात.

**भानु**—यास्तव, हे प्रभो, या कथेवरून आपणास एवढेंच घ्यावयाचें कीं, मनाचा निग्रह भयकर शापानींही करितां येत नाहीं आणि त्यामुळेच या ऐंदवाच्या सर्गाचा नाश होणें अशक्य आहे. शिवाय दुसऱ्यांच्या कार्यांचा नाश करण्यास उद्युक्त होणें, हें महात्म्यास शोभत नाहीं. आपल्या पौरुषानें जर आपला उत्कर्ष करून घेतला तर त्यांत इतरांची कोणती हानि आहे? व त्यामुळें त्यानीं दीन कां व्हावें? परमात्म्यानें प्रत्येक प्राण्यास ज्याचा त्याचा प्रयत्न हा मोठा थोरला चिंतामणि देऊन ठेविला आहे. त्यास जे उपयोगात आणितात त्याच्यावर "अरे, या अमक्याचें कल्याण झालें. आता मी काय करूं?" असें ह्मणून खेद करण्याचा प्रसंग येत नाहीं. मन हेंच सर्व बऱ्यावाईट कार्यांचें कारण आहे. प्राण्याच्या मानसिक निश्चयाचा घात कोणींही करू शकत नाहीं. यास्तव हे ऐंदवांचे सर्ग या आकाशात खुशाल असू देत. तूही आपली निराळी सृष्टि निर्माण कर. कारण बुद्ध्याकाश अनत आहे. तें असल्या अनत सृष्टींनींही भरणार नाहीं. चित्ताकाश, चिदाकाश व तिसरे हे भूताकाशहीं अनंत आहे. यास्तव हे प्रभो, तू एक, दोन, चार, दहा किंवा जितकीं हवीं असतील तितकीं ब्रह्मांडें रच.

**श्रीवसिष्ठ**—राघवा, भानूचें ते योग्य व ग्राह्य भाषण ऐकून ब्रह्मा ह्मणाला— भानो, तूं चांगली गोष्ट सांगितलीस. आकाश अनंत असल्यामुळें व मनही विलक्षण शक्तियुक्त असल्यामुळें मला माझा इष्ट सर्ग करिता येईल. माझें तें नित्य कर्म असल्या कारणानेंच मला या व्यवहारात पडावें लागत आहे. असो, तर, हे भानो, तूंच आतां माझा प्रथम मनु हो व माझ्या आज्ञेप्रमाणें सृष्टि कर. रामचंद्रा, ब्रह्मदेवाचें हें ह्मणणें भानूस मान्य झालें. त्यानें आपले दोन भाग केले. एका भागानें तो सूर्य होऊन आपल्या गतीनें दिवस करू लागला व दुसऱ्या भागानें तो मनु झाला. त्या मनुरूपी सूर्यानें ब्रह्मदेवास हवी होती तशी सृष्टि

रचली. तात्पर्य मनाचा असा अद्भुत प्रभाव आहे. चित्त जे जे चिंतन करितें तें तें सफल होतें. इंदुपुत्र सामान्य ब्राह्मण होते पण मनाच्या निग्रहानें ते हिरण्यगर्भ झाले. त्याच्याप्रमाणेच आह्मीही सर्व चित्तसंपन्न आहों. तेव्हां अनुकूल कामना, कर्म व वासना याच्या सहायानें प्रयत्न केल्यास आह्मीही हिरण्यगर्भ होऊं. सर्व मनाच्या अधीन आहे. सूक्ष्म वासनायुक्त चित्तच जीव असून स्थूलवासनामय चित्त देह आहे पण चित्तामुळें अनुभवास येणारे हे देहचमत्कार ज्ञात झाले कीं, या सर्वांचें आधारभूत चैतन्य ब्रह्म होतें. अर्थात् देह ही चित्ताहून भिन्न वस्तु नाहीं व चित्त चैतन्याहून निराळें नाहीं. चित्त जशी भावना करितें तसा पुरुष होतो. चित्तानें मी जीव आहें, असें ह्मटल्यास तो जीव होतो; मी देव आहे, असें ह्मटल्यास तो देव होतो; व पाषाण आहें अशी दृढभावना केल्यास तो पाषाण होतो. तस्मात् वस्तुतः देह नाहीं, अहंकार नाहीं, संसार नाहीं, जाति-गुणादिही नाहींत. तर जें काहीं आहे तें सर्व विज्ञान, आनंद, ब्रह्म आहे, असें जाणून तूं निरिच्छ होऊन रहा ९१.

सर्ग ९२—या सर्गात पुरुषयत्न करिता यावा ह्मणून मनाच्या अमोघ शक्तीचें वर्णन करितात.

**श्रीवसिष्ठ**—रघुवंशजा, त्या ब्रह्मदेवास मीं पुनः असें ह्मटलें—भगवन्, शाप, मंत्र इत्यादिकांच्या शक्ति अमोघ आहेत असें आपण सांगितलें आहे. तेव्हां आतां पुनरपि त्या निष्फळ आहेत, असें कसें म्हणतां? शाप व मंत्र यांच्या वीर्यानें प्राण्यांचे मन, बुद्धि, इंद्रियें इत्यादिकांचा नाश होतो, असें आम्ही पुष्कळदां पाहिलें व ऐकलेंही आहे. (नहुष, सौदास, धृतराष्ट्र यांस शापामुळें क्रमानें मोह, बुद्धिनाश, व चक्षुरिंद्रियाभाव हीं फळें भोगावीं लागलीं, हें प्रसिद्ध आहे.) मन व देह यांचें वायु व स्पंद किंवा तिळ व त्यांतील तेल याप्रमाणें ऐक्य असतें, असा सामान्यतः अनुभव येतो. अथवा देह नाहींच. केवळ मनानेंच प्राणी शापादिकांचें फल स्वप्नाप्रमाणें भोगितो, असें समजणें अधिक युक्त आहे. तस्मात देह किंवा मन यांतील एकाचा नाश झाला असतां दोघांचाही नाश होतो, असें समजणें प्रशस्त दिसतें. निदान मनाचा नाश झाला असतां देहाचा क्षय होणें तरी अति अवश्य आहे. वास्तव

हे प्रभो, शापादिकांचा प्रभाव मनावर होत नाहीं, असे जें वरील आख्यायिकेंत भानूने व आपण ठरविलेंत ते कसें?

**ब्रह्मदेव**—बा मुने, प्राण्यास शुद्ध व शुभकर्मयुक्त पौरुषानें प्राप्त करून घेता येत नाहीं, असें या जगात काहीं नाहीं. आब्रह्मस्तंभपर्यंत जेवढे प्राणी आहेत ते सर्व द्विशरीरी आहेत. त्यांतील मन हे एक शरीर आहे व दुसरें मासमय. पण पहिलें शरीर आपलें कार्य सत्वर करणारें व अतिशय चल आहे आणि दुसरें कांहीं न करणारें व जड आहे. स्थूल शरीर साकार असल्यामुळें त्याचा जगांतील इतर पदार्थांशीं संबंध होतो व त्यामुळें त्याच्यावरच शाप, शस्त्रें, विष, मंत्र इत्यादिकाचा परिणाम होतो. हा मांसाचा स्थूल गोळा मुक्यासारखा, अशक्त, दीन व क्षणभंगुर आहे. तो दैव, पिता, गुरु, राजा इत्यादिकांच्या अधीन असतो. परंतु मनाची स्थिति याहून अगदीं निराळी आहे. प्राण्याचा तो मनःसंज्ञक देह त्याच्या अधीन असल्यासारखा भासतो हे खरें; पण तो त्याच्या अधीन मुळींच नसतो. तर उलट तो स्वतंत्र असतो. कारण स्वपौरुषाचा आश्रय करून व शाश्वत धैर्य धरून जर तो राहिला तर दुःखाक्रांत होत नाहीं व दुःखाचीं कारणेही त्यास दूषित करीत नाहींत. देहवान् प्राण्याचा हा मनोदेह जसा जसा प्रयत्न करीतो तसा तसा तो आपल्या निश्चयानुरूप फळ भोगितो. मासदेहामध्यें हें सामर्थ्य नसतें. तो मात्र खरोखरच परतंत्र असतो. त्याला स्वतः कांहीं करितां येत नाहीं. यास्तव शापादिकाचीं फळें त्यास भोगावीं लागतात. मनोदेहाचें सर्व चेष्टित सफल होत असल्यामुळेंच तें सर्वदा पवित्र अनुसंधान करितें व त्याच्या ठिकाणीं शापादि निष्फळ होतात. सर्व दुर्बळाचे काळ. सबलाच्या वाटेस कोणीही जात नाहीं. स्थूल शरीर जळात बुडो, अग्नींत जळो, कीं चिखलांत रुतो. मन ज्याचें अनुसधान करितें तेंच त्याला तत्काल प्राप्त होते. देहादि इतर सर्व भावाचा नाश जरी झाला तरी शुभाशुभ प्रयत्न अनुरूप फळ दिल्यावाचून रहात नाहीं. प्रयत्नाच्या सामर्थ्यानें आपल्या चित्तास अहल्यामय करून कृत्रिम इंद्रानें कष्ट कसे सहन केले ते तू ऐकलेंसच आहेस. फार-काय पण त्याला, त्या, प्रियाप्रेमापुढें शारीरिक दुःखाचें भानही झालें नाहीं. दुष्कल्पानें दूषित झालेल्या मनाची दृढताही जर आपला एवढा प्रभाव दाखविते तर शुभ संकल्पाचा प्रभाव

केवढा असेल त्याचा तू विचार कर. दृढनिश्चयरूप प्रयत्नानें आपलें मन विरक्त व ज्वररहित करून शूलावर चढलेल्या मांडव्यानें क्लेश सहन केले (ही कथा महाभारतांत आहे). दीर्घतपा म्हणून एक मुनि होता. त्याला आपण यज्ञ करावा अशी इच्छा झाली व त्याकरितां तो सामग्री आणावयास गेला. पण दैवयोगानें मार्ग चुकून तो एका अति खोल कूपात पडला. तेव्हा यज्ञाचा काल निघून जातो असे पाहून त्यानें मनानेंच तेथें तो (यज्ञ) केला. त्यामुळें इंद्र प्रसन्न होऊन तेथे आला व त्यास कूपातून वर काढून स्वस्थानीं घेऊन गेला. अशी एक दीर्घतपामुनीची कथा सांगतात. इंदु-पुत्र निश्चयरूपी पौरुषानेंच ब्रह्मदेव कसे झाले, तें आताच सांगितलें आहे. असेच आणखीं अनेक देव व मुनी सावधान राहून आपल्या चित्ताचें अनुसंधान थोडे सुद्धा सोडीत नाहींत व दृढ अनुसंधानानें युक्त असलेल्या चित्तास आधि, व्याधि, शाप व पाप-दृष्टि काहीं करू शकत नाहींत. आता नहु-षादि काहीं लोकास शापादिकाचे फल भोगावें लागलें व अद्यापि कित्येकांस लागतें हें खरें, पण केवळ शाप हेच त्याचें कारण नसून प्रतिकूल कर्में अथवा शुभ अनुसंधानाचा अभाव हीं त्याचीं कारणें आहेत. कारण जो कोणी या संसारांत सावधान मनाने शुभ निश्चय व शुभ विवेक करीत रहातो त्यास स्वप्नातही अनिष्ट फल भोगावें लागत नाहीं. ही प्रत्येकाच्या अनुभवास येणारी गोष्ट आहे. यास्तव ज्यास आपल्या परम कल्याणाची इच्छा असेल त्यानें आपलें चित्त पवित्र मार्गाकडे लावावें. अनुसंधान हें परम साधन आहे व त्याच्याप्रमाणेंच चित्त सदा पुष्ट होत असते. चित-नाप्रमाणे आपण स्वतः होणें हा त्या मनाचा स्वभावच आहे. त्याच्या संक-ल्पाप्रमाणें त्याला सर्व जग दिसतें. संकल्पामुळे त्याला खारट किंवा मधुर वस्तु अमृतासारखी गोड लागते. तें आपल्या कल्पनाशक्तीने आकाशांतही महा अरण्य बनवू शकतें. तें कल्पनेनेंच त्याचा विध्वंस करि-तें व कल्पनेनेंच त्याचा पुनरपि आरोप करितें. तात्पर्य मन या सर्व इंद्रजालाची कल्पना करितें व कल्पनेप्रमाणेंच तें सर्व पहातें. यास्तव जग सत् नाहीं व असत्‌ही नाहीं, असें समजून तूं ही भेददृष्टि टाक ९२.

**सर्ग. ९३** ब्रह्मापासून प्रथम मन झालें, त्याच्यापासून तैजस पुरुष (हिरण्यगर्भ, ब्रह्मा). त्याच्यापासून अहंकार व अहंकारापासून विश्व, असें या सर्गांत सांगतात.

श्रीवसिष्ठ—रामभद्रा, याप्रमाणें ब्रह्मदेवानें पूर्वी मला सांगितलेलें वाग्मृत मी तुला निवेदन केलें. ज्याचें नाम व रूप व्यक्त नाहीं अशा ब्रह्मापासून सूक्ष्म असल्यामुळें, नामसंबंधशून्य, सर्व प्रपंचरूप, चलनात्मक व निर्विकल्प ज्ञानानें प्रकाशित असें एक तत्त्व होऊन तेंच पुढें घन झालें असता स्वतः मन होतें. तें तन्मात्राची ह्मणजे सूक्ष्म भूताची कल्पना करून, स्वप्नांतील शरीराप्रमाणें, वासनामय पुरुषाकार होतें. त्या उपाधीनें युक्त असलेला आत्मा तैजस पुरुष होतो. कारण तेज ज्यांत मुख्य आहे अशी लिंग-समष्टिच त्याची उपाधि असते. तो आपलें नाव 'ब्रह्मा' असें ठेवितो. साराश हे रामा, ज्यास परमेष्ठी ह्मणून ह्मणतात ते हें मनस्तत्त्वच होय. त्यामुळें तो संकल्पमय ब्रह्मा जी जी कल्पना करितो ती ती तत्काल फलद्रूप झाली आहे, असे पहातो. त्यानेंच ह्या अविद्येची कल्पना केली आहे. अनात्म वस्तूच्या ठायीं, हा आत्मा आहे, असा अभिमान धरणें हेंच त्या अविद्येचें स्वरूप आहे.

असो; पुढे त्या ब्रह्मदेवानें याच क्रमानें जगत्कल्पना केली. परतु वस्तुस्थिति अशी असताना ह्मणजे ब्रह्मतत्त्वापासूनच हें सर्व झालें असतांना तें दुसऱ्याच कोणापासून ह्मणजे जड प्रधानापासून, परमाणूंपासून, शून्यापासून, विज्ञानापासून झालें आहे, असें कित्येक ह्मणतात पण एकेका वस्तूचीं परमाणुरूप अनेक उपादान कारणें आहेत, अशी कल्पना करण्यांत गौरव हा दोष येत असल्यामुळे नैयायिकाचा परमाणु कारण—वाद ग्राह्य नाहीं. सचेतन कर्त्यावाचून जड प्रधानास विचित्र जग रचता येणे शक्य नाहीं व पुरुष तर असग व उदासीन असल्यामुळे कर्ता होऊ शकत नाही. अशी अडचण येत असल्यामुळें साख्याचा प्रधान—कारणवादही अयुक्त आहे. विज्ञानानें जडाकार परिणत होणे अयोग्य आहे. यास्तव विज्ञानवादी बौद्धाच्या विज्ञानापासून हें सर्व होतें, असें समजणें प्रशस्त नाहीं शून्य कधींही कोणाचे कारण झालेलें ऐकिवांतही नसल्यामुळे शून्यवादही त्याज्य आहे. शिवाय या सर्व वरील वादांस काहीं प्रमाण नसल्याकारणानेंही ते अग्राह्य ठरतात. आता बाकी राहिलेल्या विवर्तवादाविषयीं जर पाहिले तर त्याला श्रुतीचे प्रमाण आहे. शिवाय त्यात लाघव गुण आहे. यास्तव अनिर्वचनीय मायाशक्तियुक्त ब्रह्माचा प्रपंच हा विवर्त आहे, असे समजणेच युक्त होय. असो; येणेंप्रमाणें ब्रह्मच विवर्तरूपानें जग होऊन तेंच जीवरूप झाले आहे. कारण ब्रह्माची

चिच्छक्ति प्रथम समष्टि ब्रह्म—जीवरूपानें व्यक्त होऊन पुढें तीच व्यष्टि अहंकारानें मर्यादित होऊन व्यष्टि जीव बनते. अशीं अनंत जीवतत्त्वें या ब्रह्मांडांतील चतुर्दश लोकांत वावरत असतात. त्यांचें कर्मानुरूप ऊर्ध्व किंवा अधोगमन होत असतें. त्यांतील प्रत्येकाची भिन्न भिन्न क्रिया चालू असते. त्यांतील कित्येक दुराचारी असतात, कित्येक शुभ कर्में करितात, कांहीं मुक्त होऊन तत्त्वामध्यें मिळून जाण्याच्या तयारीस लागतात, कित्येक मिळून जातात, कांहीं पापाच्या प्राबल्यामुळे च्युत होऊन अधोमार्गास लागतात व कित्येक पुण्याच्या सामर्थ्यानें ऊर्ध्वगामी होतात. सारांश सर्व जीवांची उत्पत्ति ब्रह्मापासून झाली आहे. उत्पत्ति व नाश यांच्या द्वारा त्यांचें नियमन होत असतें. वासनारूपी विषामुळें त्यास नानाप्रकारच्या यातना सोसाव्या लागतात. हे सद्गुणी रामा, अशा प्रकारची ही जगत्संज्ञक जगलांतील जीर्ण वल्ली आहे. तिला तत्त्वसाक्षात्काररूपी कुठारीनें तोडून टाकिली असता ती मन, शरीर इत्यादि रूपानें पुनः वाढत नाहीं ९३.

**सर्ग ९४**—या सर्गांत भिन्न भिन्न उपाधींमुळें जीवांचे बारा प्रकार होतात व त्यांतील कित्येक सत्वर मुक्त होणारे असतात व कित्येक दीर्घ कालानें मुक्त होतात, असें वर्णन करितात.

**श्रीवसिष्ठ**—सात्विक, तामस व राजस भेदामुळे चवदा भुवनात इतस्ततः उत्पन्न होणाऱ्या जीवाच्या ज्या उत्तम, अधम व मध्यम उपाधी आहेत त्यांचा विभाग मी आतां तुला सांगतों. इदंप्रथमता हा त्यांतील पहिला भेद होय. असें समज कीं, एक जीव पूर्व कल्पांतील शेवटच्या जन्मीं शम—दमादि सर्व साधनगुणसंपन्न होता. पण त्यास श्रवणादिकांचा लाभ न झाल्यामुळें किंवा दुसऱ्या एकाद्या प्रबल प्रतिबंधामुळे ज्ञान झालें नाहीं. पण तो आता या कल्पांतील पहिल्याच जन्मीं शमादि—गुणसंपन्न व ज्ञानयोग्य होऊनच उत्पन्न झाला, तर त्याची ती जीवजाति (जन्म) इदंप्रथमता नामक होय. कारण ती पूर्वकल्पातील शुभ अभ्यासामुळें उद्भवलेली असते. अशा जीवास त्याच जन्मीं मुक्ति मिळणार, हे निर्विवाद आहे. पण तीच त्याची जीवजाति पूर्वकल्पांतील वैराग्यमांद्यामुळे, शुभ लोकाची इच्छा राहिलेली असून, तदर्थ केलेल्या उपासनेनें युक्त असल्यास गुणपीवरी या नावाची दुसरी उपाधि होते. कारण पूर्वकल्पांतील शेवटच्या जन्मीं त्यास पूर्ण वैराग्य झालेलें नसल्यास ह्मणजे तें मंद

असल्यास ब्रह्मादि लोकांची व त्यातील उत्तम भोगाची इच्छा त्यास अवश्य असते. त्यामुळें या कल्पांतील त्याचा प्रथम जन्म शमादि गुण व भोगवासना या दोन्ही परस्पर विरोधी गुणांनीं युक्त असतो व त्यामुळें त्याच जन्मांत तो पुरुष ज्ञानास योग्य होत नाहीं. तर दहा—पाच जन्म भोग भोगून त्यांच्या विषयीं पूर्ण वैराग्य उत्पन्न झाले ह्मणजे मग तो ज्ञानसंपन्न व मुक्त होतो. असो; आतां ससत्त्वा या नांवाची तिसरी जीवजाति सागतों. नानाप्रकारच्या सुखदुःखादि फलांवरून पूर्वकल्पातील पुण्यापुण्याचा तर्क करविणारी व क्रमाने सत्त्वोत्कर्ष होता होता शेंकडों जन्मानीं, मोक्षास पात्र होणारी अशी जी या कल्पातील जाति ( जन्म ) ती ससत्त्वा होय. चमत्कारिक संसार—वासनेनें व्यवहार करणारी, प्राक्तन कल्पातील संचित बहु दुष्कर्मामुळें उद्भवलेल्या दुर्वासनेनें युक्त व त्यामुळेंच सहस्र जन्मांनीं मोक्ष देणारी अशी जी जीवजाति ती अधमसत्त्वा या नावाची चवथी उपाधि आहे. पाचवी अत्यंत तामसी जातिही अधम सत्त्वेप्रमाणेंच संसारवासना व दुष्कर्मजन्य दुर्वासना यानी युक्त असून शिवाय या कल्पांत त्या प्राण्यास मोक्ष मिळणें शक्य नसतें. राजसी या नांवाची सहावी जाति आहे. ती पूर्वकल्पातील वासनानुसारी असते व तिच्या योगानें या कल्पात दोन तीन जन्मानींच मनुष्यादि जन्म प्राप्त होतो. पण त्यानंतरही कर्मानुरूप स्वर्ग—नरकादि फल प्राप्त होतें. व मोक्ष सदिग्ध असतो. या राजस जातीमध्येंच दुःखानुभव झाल्याकारणानें वैराग्यादि सपत्तीची प्राप्ति होऊन ज्ञानयोग्यता देणारा जन्म समीप आल्यास तिलाच मुमुक्षु मोक्ष—योग्या असें ह्मणतात. पण मीं तिला राजस—सात्त्विकी असें ह्मटलें आहे. पण तीच जर मानुषातिरिक्त थोडेसे यक्ष—गधर्वादिकाचे जन्म देऊन प्राण्यास मोक्षभाक् करणारी असेल तर तिला राजसराजसी ह्मणावें. आता नववी जीवजाति सागतों राजसतामसी हें तिचें नाव आहे. वरील राजसराजसीच जाति जर शभर जन्मानीं मोक्ष—भागिनी होणारी असेल तर तिला राजसतामसी ह्मणावें व तीच जर सहस्र जन्मानींही मोक्ष देण्यास समर्थ होणारी नसेल तर तिला राजसात्यततामसी हें नाव द्यावे. एकामागून दुसरा, दुसऱ्यामागून तिसरा अशारीतीनें अनेक जन्म घेऊन त्या कल्पात मुक्त होणाऱ्या प्राण्याच्या जन्मास तामसी जीवजाति ह्मणतात. दानव, राक्षस, पिशाच इत्यादि

तामस योनींत जन्म घेऊन प्रह्लाद, कर्कटी इत्यादिकांसारखे जे प्राणी मोक्षास योग्य होतात त्याच्या त्या जन्मास तामससत्त्वा जीवजाति असें मुज्ञ ह्मणतात. मागें अनेक जन्म अनुभवून पुढेंही अनेक जन्म ध्यावयास लागणारी जी जाति ती तमोराजसी होय. पण तिचा अतर्भाव वर सागितलेल्या राजसतामसींत होतो. मागील व पुढील लक्षावधि जन्मांनीं युक्त असून जिच्यामध्यें मोक्षाविषयीं सदेह असतो ती अत्यंत तामसी होय. तिचा, प्रकारांतरानें, वर निर्देश केलाच आहे. एकून या सर्व बारा जाति आहेत. त्या उपाधिद्वारा ब्रह्मापासून उद्भवतात. कारण वायूनें चलायमान केलेल्या जलराशींतून जशा लाटा उठतात दीपज्योतीपासून जसे किरण पसरतात, देदीप्यमान अग्नीपासून जशा ठिणग्या उडतात, चंद्रापासून जसे शीतांशु निघतात, वृक्षाच्या मुख्य स्कधापासून जशा अनेक लहान मोठ्या शाखा व प्रशाखा उद्भवतात, सुवर्णापासून जसे कटकादि आकार उत्पन्न होतात त्याप्रमाणें सर्व जीवराशी ब्रह्मापासून उत्पन्न होतात, असे मागें मीं सागितलेंच आहे. आणखींही असे अनेक दृष्टांत देतां येण्यासारखे आहेत. पण उगीच चर्वितचर्वण करण्यांत काय अर्थ आह ? तूं इतकेंच लक्षांत ठेव कीं ब्रह्म अशी असून जीव हे त्याचे कल्पित अश आहेत अर्थात त्याचे पारमार्थिक ऐक्य होणे शक्य आहे. प्राण्याच्या शरीरादि उपाधि मिथ्या आहेत. कारण त्या अज ब्रह्माचे ठायीं कल्पित आहेत. त्यामुळे त्याचाही अधिष्ठान ब्रह्माशीं अभेद आहे. या सर्व जाती ब्रह्मापासूनच उद्भवतात व त्यातच लीन होतात. त्यातील कित्येक एकेकाच जन्ममरणाचा अनुभव घेऊन आपल्या परम कारणात लीन होतात; कित्येकींस दहा–वीस, पाच–पंचवीस, हजार–पाचशे, जन्म घ्यावे लागतात व कित्येक जातींस तर एक कल्पभर अथवा अनेक कल्प जन्म–मरणपरंपरेत भ्रमण करावे लागते ९४.

**सर्ग ९५—या सर्गांत—** द्वयस्थिति तशी नसतानाही, अज्ञ जनांच्या बोधाकरिता **कर्म व** कर्ता **या दोघाचीही** उत्पत्ति परब्रह्मापासून होत, असें समर्थन करतात.

**श्रीवसिष्ठ**—रामचद्रा, वृक्षापासून पुष्प व सुवास याची जशी एकाच वेळीं उत्पत्ति होते त्याप्रमाणें कर्म व कर्ता याची उत्पत्ति परम पदापासून एकाच काळीं झाली आहे. त्याचें वस्तुतः ऐक्य असून सर्गाच्या

आरंभीं स्वभाववशात् तीं दोन्हीं प्रकट झाली आहेत. ( एवढ्याचसाठीं स्वतः भगवानांनींही " तो प्रभु, कर्तृत्व, कर्मे व कर्मफलसंयोग यांतील कांहीं उत्पन्न करीत नाहीं. तर केवळ स्वभाव प्रवृत्त होत असतो, असें ह्मटलें आहे. ) विस्तृत आकाशांत अज्ञदृष्टया जसा नीलवर्ण अनुभवास येतो त्याप्रमाणें निर्मल ब्रह्मामध्यें जीवांचा भास होतो. अर्थात् त्यांच्या आविर्भावास व तादात्म्य–अध्यासास स्वभावनामक जीवांचें अज्ञानच कारण होते. यास्तव सृष्टीविषयीं जें कांहीं बोलावयाचें असतें तें अज्ञांस संमत असलेल्या व्यवहारभूमींतच योग्य असतें. कारण परमावस्थेत सृष्टिवादास मुळींच अवकाश मिळत नाहीं आणि त्यामुळेंच ज्ञानी पुरुषाच्या दृष्टीनें " हें अमुक ब्रह्मापासून झालें आहे किंवा हें झालें नाहीं " असें ह्मणणें अगदीं शोभत नाही. राघवा, द्वैताची कल्पना केल्यावाचून उपदेश्य–उपदेशकभाव संभवत नाही. हें तुला माहीत आहेच. कारण हा उपदेश्य ( उपदेश करण्यास योग्य ) व मी उपदेशक असें ह्मटलें कीं द्वैतकल्पना झालीच. यास्तव भेददृष्टीने या व्यवहारकालीं शोचनीय द्वैतकल्पनेचा अंगीकार करूनच शास्त्रास हें ब्रह्म, हे त्याच्यापासून अशा अशा क्रमाने झालेले जीव इत्यादि प्रकारें उपदेश करावा लागतो. व्यवहारातही अशाप्रकारचा अभ्युपगम्यवाद पुष्कळदा स्वीकारितात. ( वस्तुस्थिति तशी नसताना विचाराकरिता एकादी कल्पना करणें, यासचें अभ्युपगम्यवाद ह्मणतात. उदाहरण—समजा कीं, रामा हा कृष्णाचा भाऊ आहे व त्यास कोणी पीडा दिली, इत्यादि. ) पण उपदेशाकरितां द्वैताचा आरोप केल्यावर त्याचा अपवाद करावा लागतो. तो कसा ह्मणून ह्मणशील तर सांगतों. हें जग असंग ब्रह्मापासून झालें आहे. ब्रह्म हेंच त्याचें उपादान कारण आहे व त्यामुळें तें ब्रह्मरूप आहे. उत्पत्तीपूर्वीही तें ब्रह्मच होतें व नंतरही ब्रह्ममयच आहे. पण भ्रांतिज्ञानामुळें तें त्याच्याहून भिन्न आहे, असें वाटतें. मेरु–मंदारासारिख्या अनेक जीवराशी वारंवार उत्पन्न होऊन त्याच परम पदीं पुनः पुनः लीन होतात ( येथें जीव–शब्दाने त्यांच्या उपाधी घ्याव्या ) वसंत ऋतूंत वनस्पतींस जशी पालवी फुटते त्याप्रमाणें सृष्टिसमयीं मायाशक्तियुक्त ब्रह्मापासून जीवांकुर उगवतात व ग्रीष्म-ऋतूंत, वसतरस जसे त्या त्या औषधिवनस्पतींतच जिरून जातात त्याप्रमाणें प्रलयकालीं ते सर्व त्यांतच लीन होतात. स्थितिकालींही तेच ते किंवा आणखीं नवीनही जीव, झाडाच्या

पानाप्रमाणेंच एकसारखे उत्पन्न होत असतात. साराश, हे राघवा, पुष्प व त्याचा सुवास हें जसे एकाच काली व एकरूपानें उद्भवतात त्याप्रमाणें पुरुष व त्याचें जन्मास कारण होणारे कर्म हीं दोन्हीं एका परेशापासून एकाच कालीं व अभिन्नरूपानें उद्भवून हळु हळु त्यातच लीन होतात. एकाच कालीं उत्पन्न होण्याची कल्पना प्रत्यक्षप्रमाण–सिद्धही आहे. कारण वस्तुत. असिद्ध असे हे दैत्य, उरग, नर, देव इत्यादि प्राणी केवल वासना व भूतें या उपाधींनी वारवार उत्पन्न होतात व ज्या भूतसमूहात उत्पन्न होतात त्यास ‘ हा मी ’ असे समजतात. पण त्याचे कारण काय ? पूर्व कर्मे त्याचें कारण आहे ह्मणून ह्मणावे तर पूर्व कर्त्यावाचून तीं होणें व असणे शक्य नाहीं. उत्पत्तीपूर्वी हाच संघात पूर्व कर्माचा कर्ता होता, असेही ह्मणता येत नाहीं. तेव्हा प्राण्याच्या या अव्याहत विहाराचे कारण आत्म्याला विसरणे यावाचून आणखीं काहीं दिसत नाहीं. आत्मविस्मरणच जन्मांतर फल देत असतें. (या सर्व विवेचनाचा गूढार्थ असा–कर्ता अनादि आहे, असें ह्मणता येत नाहीं. कारण कर्तृत्व हा जीवाचा स्वाभाविक धर्म आहे, असे मानिल्यास अग्नीच्या स्वाभाविक उष्णतेप्रमाणे सहस्र उपायांनींही त्याचा परिहार होणार नाहीं व त्याचा परिहार झाला नाहीं ह्मणजे जीवास मोक्ष मिळण्याचीही आशा करावयास नको. बरें कर्तृत्व औपाधिक आहे, असें ह्मणावे, तर उपाधि कोणती ? अविद्याच कीं दुसरी एकादी ? अविद्या हीच कर्तृत्वाची उपाधि असून तिच्यामुळेच आत्म्याचे ठायीं औपाधिक कर्तृत्व येतें असें ह्मटलें कीं, आमचा पक्ष सिद्ध झाला. पण अविद्याहीं स्वतत्रपणें–ह्मणजे दुसऱ्या कोणाची अपेक्षा न करितां–तें उत्पन्न करूं शकत नाहीं. कारण निद्रा, मूर्च्छा इत्यादि प्रसगीं कर्तृत्व नसतें. यास्तव तिलाही दुसऱ्या कोणाचें सहाय लागतेंच. बरें अविद्येहून दुसरेंच कांहीं कर्तृत्वाचें कारण आहे, असें ह्मणावें; तर त्यावर दोष येतात. करितां आत्मा जरी अनादी आहे तरी त्याच्याशीं कर्त्रुपाधींचा प्रतिकल्पीं व प्रतिदिनीं होणारा संबध निरनिराळा असल्यामुळे त्या सबंधाच्या अधीन असलेल्या कर्तृस्वरूपाची कर्माबरोबरच उत्पत्ति होते व तें स्वरूप कर्मशक्तियुक्त उपाधीशीं तादात्म्य पावतें. तस्मात् आत्मविस्मरण हेंच कर्तृत्वादिकांचे बीज आहे ).

श्रीराम—गुरुराज, अलौकिक धर्म व ब्रह्म याविषयीं मुख्य प्रमाण श्रुति ( वेद ) आहे. तिच्यापासून ज्याना ज्ञानदृष्टि प्राप्त झाली आहे त्यास प्रामाणिक दृष्टि असें ह्मणतात. अशा निष्काम प्रामाणिक-दृष्टी पुरुषानीं निर्णय करून सांगितलेला जो धर्म तेच शास्त्र होय. मनु, जैमिनी इत्यादि पुरुषाच्या वचनास शास्त्र ह्मणण्याचे हेच कारण आहे. ( साराश, श्रुति व श्रुतिमूलक स्मृति हीच अलौकिक अर्थाविषयीं प्रमाणे आहेत. ) त्याचप्रमाणे सदाचार हेही आणखी एक प्रमाण आहे. कारण ज्याचे आचरण प्रमाण मानावयाचे ते सत अत्यंत शुद्ध, सत्त्वगुणयुक्त, दु:खद विषयाच्या योगाने कपायमान न होणारे, समदृष्टि, रागद्वेषशून्य व शब्दानीं वर्णन न करिता येणाऱ्या ब्रह्माच्या साक्षात्काराने संपन्न असतात. तस्मात् ज्याना तत्त्वार्थ ज्ञान झालेला नसतो अशा शिष्टाना, धर्म व ब्रह्म याचे तत्त्व समजण्यास श्रुतिस्मृतिरूप शास्त्र व सदाचार हेच दोन मार्ग आहेत. अथवा हेच दोन त्याचे नेत्र आहेत. पण त्याचा आश्रय करून जर पाहिलें तर कर्म व कर्ता याच्या मध्यें हेतुफलभाव आहे, असे दिसते. ज्याच्यामध्यें हेतुफलभाव असतो ते पदार्थ एकाच कालीं सिद्ध होणारे नसतात. जसे बीज व अकुर. त्याचप्रमाणे कर्माच्या योगाने कर्ता सिद्ध होतो व कर्त्याच्या हातून कर्म घडते. ह्मणजे बीजापासून जसा नवा अकुर उद्भवतो त्याप्रमाणें कर्मापासून जतु उत्पन्न होतो व त्या अंकुरापासून पुनः जसें बीज उद्भवते त्याप्रमाणें त्याच्यापासून कर्म होतें. ज्या वासनेच्या योगाने प्राणी भवसागरात पडतो तिच्या अनुरूपच त्याला फल भोगावें लागतें. पण असे असतांना, प्रभो, आपण जन्मबीजभूत कर्मावाचूनच ब्रह्मपदापासून भूतांची उत्पत्ति होते असे कसें ह्मणता? कारण कर्ता व कर्म याची एकाच कालीं उत्पत्ति होते, असें ह्मणून आपण जगात रूढ झालेलें व अव्यभिचारी असें त्यांचें परस्पर कार्यकारणत्व तुच्छ करून सोडलें आहे. हिरण्यगर्भादि स्थूल-सूक्ष्म-उपाधि हींच कर्माचीं फलें आहेत व कोणतेंही कर्म निष्फळ नाहीं. तर प्रत्येक बरें-वाईट कर्म आपलें योग्य फल अवश्य देतेंच. या मनुष्यमात्राच्या दोन कल्पना आपल्या या ह्मणण्यानें पार नाहींशा झाल्या आहेत. शिवाय कर्माचें फलच नाहीं, असें ह्मटलें कीं नरकादिकांचें भयच राहिलें नाहीं. तेव्हा मुद्दाम शरीर, इद्रियें व मन या सर्वांस त्रास देऊन व

त्यांच्या स्वाभाविक प्रवृत्तीच्या विरुद्ध त्याचें नियमन करून, व्यर्थ सदाचरण करण्याचें कोणीही मान्य करणार नाहीं. त्यामुळें शहाण्या मानवाचीही पशुवृत्ति अनावर होईल. बलाढ्यानें दुर्बलाला नाहींसें करून आपलें पोट भरावयाचें, हा पशूचा न्याय प्राणीमात्राची नीति होऊन बसेल. यास्तव, अहो ब्राह्मणश्रेष्ठ, आपण मजवर दया करून कृत कर्माचें फल मिळतें कीं नाहीं, तें मला खरें सांगा.

**श्रीवसिष्ठ**—राघवा, तू मला हा फार चांगला प्रश्न केला आहेस. त्याचें उत्तर ऐकिल्यानें तुला उत्तम ज्ञान होईल. कर्म व कर्ता यांची एकाच कालीं उत्पत्ति होते, असें ह्मटल्यानेही तू सांगितलेल्या वरील लौकिक समजुतीशीं विरोध येत नाहीं. कारण "जीव मनानें ज्याचें ध्यान करितो तेंच तोंडानें बोलतो व हाताने करितो," अशा अर्थाचें श्रुतिवचन आहे. यास्तव मनाचा क्रियानुसंधानरूप विकास हेच कर्माचें बीज आहे. कर्म ह्मणजे देहाची चेष्टा. देहाचा व्यापार. पहिल्या सर्गा(सृष्टी)त जेव्हा परब्रह्मापासून मन उत्पन्न झाले तेव्हाच त्या त्या उपाधीमध्ये व्यक्त झालेल्या समष्टि व व्यष्टि जीवाचें कर्मही उद्भवलें आहे. पुष्प व वास याच्या प्रमाणेंच मन व कर्ता याच्यामध्यें भेद नाहीं. जीव प्राक्तन वासनेप्रमाणे देहच मी आहें, अशा देहाहंकारानें राहतो. यास्तव मनच कर्ता आहे. (आत्मा नव्हे.) व कर्मही मनच आहे. कारण त्याच्या प्रेरणेवांचून देहाची कोणतीही चेष्टा होत नसते. ह्मणून मी-कर्ता व मन-याची उत्पत्ति एकाच कालीं होते, असें ह्मटलें आहे. जीवभाव व कर्मभाव हे दोन्ही मनाचे धर्म आहेत. आत्म्याचे नव्हेत, हें सांगण्याचा माझा त्यांत उद्देश आहे. कर्म व त्याचे संस्कार यांच्या रूपानें मनात स्थित असलेली क्रियाच अदृष्ट होय व ती(क्रिया)च फलरूपानें आविर्भूत झाली असतां देह, स्वर्ग, नरक इत्यादिरूप होते. एवं च कर्माचा वास्तविक आश्रय जरी देह असला तरी त्याचें पूर्व निमित्त मन आहे. पुढें प्राप्त होणाऱ्या देहाच्या आकारावर जेव्हां मन अभिमान ठेवितें तेव्हा तें पूर्वदेह सोडून जातें व पूर्व देह सोडतांना त्यानें ज्याचा अभिमान धरिलेला असतो तोच देह त्यास नियमानें प्राप्त होतो. एवढ्यासाठींच पूर्वी मीं "आतिवाहिक देहच वासनाबलानें स्थूलभावास प्राप्त होतो" असें प्रतिपादन केलें आहे. अर्थात् कर्म व कर्ता यांची सहोत्पत्ति मानल्यास कर्म निष्फल होण्याचा प्रसंग येईल, अशी जी

तुला भीति पडली होती ती व्यर्थ आहे. कारण कोणतेंही आकाश, कोणताही लोक, कोणताही पर्वत, कोणताही समुद्र व या सृष्टींतील कोणताही पदार्थ मनावाचून नाहीं. प्रत्येक वस्तु मनाचें कार्य आहे व तेंच कर्माचें फळही आहे. सावधान चित्तानें केलेलें साग कर्म हाच पौरुष प्रयत्न होय व तो केव्हांही निष्फल होत नाहीं. या सर्व विवेचनाचा सारांश असा—अविद्येपासून उत्पन्न झालेलें मनच क्रियाशक्तियुक्त असल्यामुळें व चिदात्म्याची उपाधि असल्यामुळें कर्ता व भोक्ता आहे. आता प्रत्येक कल्पामध्यें व प्रतिदिवशीं तें जरी उत्पन्न होऊन लीन होत असलें तरी प्रत्येक दिवशीं सूर्योदयानंतर व्यक्त होऊन सूर्यास्तानंतर नष्ट होणाऱ्या भिंतीच्या छायेप्रमाणें अथवा आरसा पुढें धरिला असतां त्यांत व्यक्त होऊन तो दूर केला असतां नष्ट होणाऱ्या प्रतिबिंबाप्रमाणें तेच तें पुनः पुनः उपाधींबरोबर व्यक्त होऊन तिच्याबरोबर लीन होतें. कालचे तेंच हें माझे मन आहे, अशी मनुष्यमात्रास येणारी अबाधित प्रतीतीही तें एकच आहे, या आमच्या ह्मणण्यास पुष्टि देतें. प्रत्यहीं किंवा कल्पांतीं होणारा नाश ह्मणजे शून्यता नव्हे व उत्पत्ति ह्मणजे पूर्वी मुळींच नसलेल्या वस्तूचा उद्भव नव्हे. तर सत् वस्तूचाच, कांहीं निमित्त मिळालें असतां, विशेषप्रकारें आविर्भाव होणे ह्मणजे उत्पत्ति व निमित्ताभावीं तिचें तें विशेषरूप क्षीण होणें ह्मणजेच नाश, असे आमचें ह्मणणें आहे. त्यामुळें प्रत्येक सुषुप्तीच्या वेळीं मन नाश पावतें, असें झटल्यानें प्रत्येक दिवशींचें मन निरनिराळें असतें असें समजण्याचें काहीं कारण नाहीं. कार्य उत्पत्तीच्या पूर्वीही कारणरूपानें सत्च असतें. या सत्कार्यवादाचा आह्मीं अंगीकार केलेला असल्यामुळें अविद्याबीजरूपानें विद्यमान असलेल्या कर्त्यांची, कर्मांची व कर्मफलरूप आकाशादि प्रपचाची एकाच समयीं उत्पत्ति होते, असें मानिलें तरी कृतहान व अकृत-अभ्यागम प्रसंग येत नाहीं; शास्त्राचा बाध होण्याचा प्रसंग येत नाहीं; मनुष्यमात्र पशुवृत्ति होण्याचाही अनिष्ट प्रसंग येत नाहीं आणि जन्म व कर्म यांच्या व्याप्तीचाही भंग होत नाहीं. व्यक्त व अव्यक्त अवस्थेंत असणारें मनच अविद्या आहे, असाही आमचा सिद्धांत असल्यामुळें आत्मविस्मरण हेंच एक प्रपंच—कारण आहे, असें ह्मणणेंही उचितच होय. आतां कर्ता व कर्म यांची सहोत्पत्ती मानल्यापासून फल कोणतें मिळतें ह्मणून ह्मणाल तर सांगतों. काळेपणा

नाहींसा झाला असता काजळपणा जसा नष्ट होतो त्याप्रमाणें स्पदरूप कर्म क्षीण झाले असता मनही क्षीण होत असतें. यास्तव कर्म व मन यातील कोणा तरी एकाचा क्षय व्हावा असे ज्यास वाटत असेल त्यानें प्राणनिरोधलक्षण हठयोगाचा किंवा मनोनिरोधलक्षण राजयोगाचा अभ्यास करून प्राणाचा किंवा मनाचा क्षय करावा. कर्मनाश झाला तरी मनोनाश होतो व मनोनाश हीच अकर्मता आहे. योगजन्य साक्षात्कारानें अविद्येचा नाश झाला असता या दोघाचाही आत्यंतिक नाश होतो त्याच्या पुनरुत्पत्तीस कारण होणारा बीजभावही न रहाणें, हाच आत्यंतिक नाश होय. चित्त व कर्म हीं दोन्हीं अग्नि व त्याची उष्णता याप्रमाणे एकमेकास अगदी चिकटून राहिलेलीं आहेत. त्यामुळे त्यातील एकाचा क्षय झाला असता इतराचाही क्षय होणें अगदीं साहजिक आहे. तात्पर्य चित्तच विहित व प्रतिषिद्ध पुण्यपापात्मक अथवा धर्माधर्माकार होते व कर्मच फलभोगानुरूप होत्सातें स्पदरूप चित्त होते. येणेप्रमाणे एकमेकास निमित्त होऊनच चित्ताचे हे दोन स्पंद कर्म व धर्मसज्ञक झाले आहेत ९५.

**सर्ग ९६.**—कर्मवैचित्र्यामुळें नाना प्रकारच्या आकारास प्राप्त झालेल्या मनाचे भेद व तत्त्व यांचें येथें व्याख्यान करितात.

**श्रीवसिष्ठ**—राघवा, मन भावनामात्र आहे. भावना ह्मणजे अनुभव घेतलेल्या पदार्थांची कल्पना करणें. ती भावनाच स्पदधर्मिणी विहित व निषिद्ध क्रिया होते. सूक्ष्मतेमुळें अदृष्टभावास प्राप्त झालेल्या क्रियेचें जें जन्मातरादि भाविरूप तेंच तिचें फळ होय. प्रत्येक प्राणी त्याच्याच मागून जात असतो. ( साराश मनच कर्मभावास व फळभावास प्राप्त होतें. )

**श्रीराम**—गुरुवर्य, जड असूनही जड नसल्यासारखे भासणारे हे मन ह्मणजे आहे तरी काय? त्याचें स्वरूप मला चांगल्या रीतीनें समजेल असें सांगा.

**श्रीवसिष्ठ**—अनत व सर्वशक्ति ( मायाशबल ) अशा सर्वव्यापी आत्मतत्त्वाचें, संकल्पशक्तीनें प्रथम निर्माण केलेलें जें रूप तेंच मन होय. (मनुष्याच्या व्यवहारातही मन प्रसिद्धपणें अनुभवास येतें; कसें तें पहा–) हा खांब आहे कीं पुरुष? या विकल्पात सत् व असत् या दोन कोट्यांमध्यें जो भाव स्थीर न होता सचार करीत असतो ह्मणजे हें अमुक आहे व अमुक नाहीं, असा स्थिर निश्चय ज्याच्या योगानें होत नाहीं तें मन होय. ह्मणजे

अनिश्चित सकल्प हेंच मनाचे रूप आहे, सर्वदा चिद्रूपच असल्यामुळे सदा भासणाऱ्या आत्म्याविषयीं "मी त्यास जाणत नाही" असा प्रत्यय व जो कर्ता नव्हे, असा आत्मा कर्ता आहे, असा अनुभव ज्याच्या योगानें येतो ते मन होय. मन केव्हाही कल्पनामय कर्मशक्तीवाचून रहात नाही. ह्मणजे या सृष्टींत कोणताही गुणी गुणावाचून असणें जसें शक्य नाही त्याप्रमाणें मन कर्मशक्तीवाचून असणे अशक्य आहे. अग्नि व उष्णता यांची भिन्न भिन्न सत्ता असणे जसें शक्य नाहीं त्याप्रमाणे कर्म व मन आणि मन व जीव याची पृथक्—सत्ता अशक्य आहे. केवल सकल्पस्वरूपी, व नानाप्रकारें विस्तार पावणाऱ्या मनानेच हे विस्तृत जग पसरले आहे. जग हें वासना—वृक्षाचें फळ आहे. कर्म हें त्याचे बीज, मन स्पंद हें शरीर, व विविध क्रिया ह्या शाखा आहेत, असे शास्त्रात वर्णन केले आहे व त्याप्रमाणेंच अनुभवही येतो. व्यवहारात कर्मेंद्रियाच्या व्यापारास कर्म, असें ह्मणतात हे खरे, पण वस्तुस्थिति कशी आहे, याचा विचार कर. मन ज्याचे अनुसधान करितें तेच सर्व कर्मेंद्रिय—वृत्ती संपादन करितात. आणि खरा प्रकार असा असल्यामुळेंच कर्म व मन एक आहे, असें आह्मी ह्मणतो. राघवा, मन, बुद्धि, अहकार, चित्त, कर्म कल्पना, ससृति, वासना, विद्या, मल, स्मृति इदिये, प्रकृति, माया, क्रिया इत्यादि सर्व शब्द व त्याचे अर्थ ब्रह्माचे ठायीं कल्पिलेले असून संसारभ्रम हाच त्याचा हेतु आहे. अकस्मात आपल्या स्वरूपाचें विस्मरण झाल्यामुळें जिची अपरिच्छिन्न दृगाकृति ( केवल चैतन्याकार ) नाहींशी झाली आहे व त्यामुळें जी बाह्य ( ह्मणजे स्वेतर, जड ) वस्तूची कल्पना करण्यास ( तद्रूप होण्यास ) तयार झाली आहे अशा चितीचे हे सर्व पर्यायशब्द आहेत. आता पर सवित्चेच हे सर्व पर्याय शब्द कसे व ते कोणकोणत्या अर्थी रूढ झाले आहेत, ते सागतो. परा सवित् अविद्येमुळें जणुकाय कलंकयुक्त होत्साती केव्हा केव्हा विकास पावून "मी अशी आहें; किंवा अशी नाही;" अशा विकल्परूपानें नाना होते. तेव्हा तिला मन असें ह्मणतात. पण हा पहिला विकल्प झाल्यावर विशेष भावनेस प्राप्त होऊन पूर्वोक्त सत् व असत् या दोन कोटींतील एका कोटींत निश्चित होऊन ती जेव्हा सुस्थिर होऊन रहाते तेव्हा त्याच संविदेस बुद्धि असें ह्मणतात. ती "ही अशीच वस्तु आहे" असें यथार्थपणें जाणण्यास

समर्थ असते. जेव्हां संवित् मिथ्याभूत देहादि अभिमानानें स्वतः आपल्या सत्तेची कल्पना करून " अहं " अशी भावना करिते तेव्हां तिला अहंकार ह्मणतात. ही भावनाच सर्व अनर्थांचें बीज व त्यामुळें भवबंधनी ( संसारांत बांधून टाकणारी ) आहे. पूर्वापर प्रतिसंधान सोडून ( मागचा पुढचा विचार न करितां ) संवित् एका विषयाचा त्याग करून दुसऱ्याचें जेव्हां स्मरण करिते तेव्हां तिला चित्त हें नांव प्राप्त होतें. कर्त्याचा स्पंद हाच एक धर्म असल्यामुळें त्याच्या कडून तो असत् स्पंदच करवून त्याचें शरीर, अवयव इत्यादिकास दुसऱ्या स्थानीं पोंचविणें इत्यादि स्पंदफलास संपादन करण्याकरितां जेव्हा संवित् प्रवृत्त होते तेव्हां तिला कर्म ह्मणतात. अर्थात् शरीर, अवयव इत्यादिकांची संवित्–मुळे होणारी चेष्टा ( व्यापार, हालचाल ) ह्मणजेच कर्म होय. एक व अद्वितीय अशा आपल्या स्वरूपास विसरून व त्या आपल्या स्वरूपाविषयींच्या निश्चयापासून ढळून संवित् जेव्हां इष्ट वस्तूची कल्पना करूं लागते तेव्हा तिला कल्पना ह्मणतात. पूर्वी या पदार्थांचा मला अनुभव आलेला आहे अथवा आलेला नाहीं अशा रीतीनें जेव्हा संवित् निश्चय करिते, तेव्हा तिला स्मृति ह्मणतात. इतर सर्व कार्यें सोडून अनुभूत पदार्थांच्या सूक्ष्म संस्काररूपानें जेव्हा संवित् रहाते तेव्हां तिला वासना ह्मणतात. आत्मतत्त्व अति विमल आहे. पण अविद्यारूपी-कलंकामुळें प्रपचाची प्रतिभा ( ह्म. द्वैतदृष्टि ) होते. तस्मात् प्रपंचप्रतिभा त्रिकाळीं असत्य ( अविद्यमान ) आहे, असें ज्ञान झालें असतां पूर्वोक्त संवित् विद्या होते. आत्मतत्त्वास अगदीं आच्छादित करून सोडणारी जी संवित्–ची ( आवरण ) मायाशक्ति तीच मल व आत्मतत्त्वाचें विस्मरण करून त्याचें भलतेंच रूप दाखविणेंस कारण होणारी जी संवित्‌ची ( विक्षेप ) मायाशक्ति ती विस्मृति होय. ही मनोरूप संवित् ऐकून, स्पर्श करून, पाहून, खावून, वास घेऊन व विचार करून जेव्हां जीवभावास प्राप्त झालेल्या परमेश्वरास आनंद देऊं लागते तेव्हां तिला इंद्रिय हें नांव प्राप्त होतें. इंद्रास ह्मणजे आत्म्यास भोगाच्या योगानें जें सुख देतें तें इंद्रिय अशी या शब्दाची व्युत्पत्ति आहे, अज्ञात परमात्माच या सर्व दृश्य प्रपंचाचें उपादान व निमित्त कारण असल्यामुळें त्या मनोमयसंविद्रूप देवास व्यवहारांत प्रकृति ह्मणतात. सत् व असत्, यांतील एकाही पक्षांत ज्याचा साक्षात् अंतर्भाव करितां येत नाहीं अशा अनिर्वचनीय मनोमय संवित्–

शक्तीस माया ह्मणावें. दर्शन, स्पर्शन, श्रवण, रसन, व घ्राण घेणें या कर्मांच्या योगानें कार्य-कारणतेस प्राप्त झालेल्या संवित्-शक्तीस व्यवहारांत क्रिया असें ह्मणतात. तात्पर्य मी अज्ञ आहें; मला अमुक एक वस्तु ठाऊक नाहीं, किंवा मी कोण हें मला माहीत नाहीं, अशाप्रकारें साक्षात् अनुभवास येणारा जो अज्ञान-कलक अथवा विषयांच्या योगानें प्राप्त झालेला जो द्वैतकलंक त्याच्या सांनिध्यामुळे पूर्ण स्वरूपांत न्यूनता येऊन आकुल झालेली व देहादिकांच्या जाड्य-जाळ्यांत पडलेली जी मनोमय संवित् तिचींच हीं सर्व नांवें आहेत. चित्त या स्वरूपास प्राप्त झालेल्या तिनेंच आपल्या संकल्पानें हीं सर्व नांवें कल्पिलीं आहेत. रामा, परमात्म्यापासून (ह्मणजेच आपल्या परमात्मभावापासून) च्युत झालेल्या व कलंकयुक्त अशा या संवित्लाच जीव असें, मन असें, चित्त असें, व बुद्धि असें ह्मणतात.

**श्रीराम**—गुरुवर्य, मन जड आहे कीं चेतन ?

**श्रीवसिष्ठ**—ते केवळ जडही नाहीं व चेतनही नाहीं. तर उभयरूप आहे. कारण चितीलाच संसारदशेंत उपाधिमालिन्य आलें असतां मन ह्मणतात. त्याचप्रमाणें त्याला सत् किंवा असत्‌ही ह्मणतां येत नाहीं. प्रत्येक प्राण्यामध्यें तें भिन्न भिन्न आहे. हें चित्तच जगाचें कारण आहे. शाश्वत व निश्चित अशा एका रूपानें ज्याचें ज्ञान झालेलें नाहीं अशा आत्म्याची अज्ञात सत्ताच चित्त आहे. चैतन्याचा औपाधिक बाह्य चलभाव मलिन असतो व आंत साक्षिचैतन्यास आवरण नसल्यामुळें त्याचें आंतर स्वरूप कलंकरहित असतें. तेंच मन होय. सारांश अशारीतीनें त्याचें स्वरूप दोन प्रकारचें असल्यामुळें तें जडही नाहीं व चिन्मयही नाहीं. त्याचींच हीं सर्व नांवें आहेत. निरनिराळीं कार्यें करणाऱ्या या मनास, निरनिराळीं सोंगें घेणाऱ्या नटाप्रमाणें, भिन्न भिन्न नांवें प्राप्त होतात. पाक करणें, पाठ करणें, ग्रामाचा अधिकार चालविणें इत्यादि निरनिराळ्या अधिकारांमुळें एकाच मनुष्यास जसें पाचक, पाठक, ग्रामणी (पाटील) इत्यादि ह्मणतात त्याप्रमाणें भिन्न भिन्न कार्यांमुळें एकाच मनास निरनिराळीं नांवें प्राप्त होतात. राघवा, चित्ताच्या मी ज्या या संज्ञा सांगितल्या आहेत त्यांसच निरनिरनिराळे वादी शेंकडों कल्पना करून निरनिराळीं नांवें देतात. मूळ प्रमाणाची अपेक्षा न करितां ते आपापले तर्क लढवून मन हें द्रव्य आहे, तें अणु आहे इत्यादि कल्पना करितात व मन, बुद्धि,

इंद्रिये, इत्यादिकास विचित्र नावे स्वेच्छेनें देतात. कोणी मनास जड समजतात. कोणी तें जीवाहून निराळे आहे, असे मानितात. कोणी बुद्धि, अहंकार इत्यादिकाविषयींही अशीच काही तरी कल्पना करितात. मी तर तुला, एका अंतःकरणाचेच ते सर्व भेद आहेत, हे वर सांगितलेंच आहे. पण नैयायिक, सांख्य, चार्वाक, जैमिनेय, जैन, बौद्ध, वैशेषिक, पाचरात्रादिक, यांस तें आमचें ह्मणणें पटत नाहीं. त्यांतील प्रत्येक भिन्न भिन्न कल्पना करितो. त्याच्या कल्पनेची दिशा तुझ्या ध्यानात यावी ह्मणून काहीं उदाहरणे देतो. नैयायिक—अहंकार हे एक द्रव्य असून तोच विभु जीव आहे, मन अणु व त्याच्या साक्षात्काराचे करण आहे; बुद्धि हा त्या जीवात्म्याचा गुण असून ती त्रिक्षणावस्थायिनी ( तीन क्षण रहाणारी ) आहे,—असे समजतात. सांख्य—बुद्धि हेंच साक्षात् त्रिगुणात्मक प्रकृतीचे महत्तत्त्वनामक कार्य आहे; अहंकार हे त्या बुद्धीचे कार्य आहे; व तें महत्तत्त्वाहून भिन्न तत्त्व आहे, मन हें अकरा इंद्रियातील एक इंद्रिय व षोडशविकारातील एक विकार आहे,—असें ह्मणतात. चार्वाक—चैतन्य हा देहाचा गुण आहे. शरीर व बुद्धि याच्यामध्यें कांहीं भेद नाहीं. अहंकार हाच आत्मा, व त्याचे पूर्वापर प्रतिसंधान हेंच मन होय,—असे प्रतिपादन करितात. जैमिनेयातील काहीं मीमांसक मन हें विभु द्रव्य आहे, असें मानितात व काहीं तें अन्नमय आहे, असें समजतात. तसेच प्रकाश व अप्रकाश या दोन्ही रूपानी युक्त असलेल्या काजव्याप्रमाणे जड व बोधरूप अहंकार हाच आत्मा असून त्याचा चिदंश हीच बुद्धि आहे, असें ते मानितात. आर्हत् ह्मणजे जैन—शरीरा एवढेंच ज्याचें परिमाण आहे असा चिद्रूप जीवास्तिकाय हाच अहंकार आहे; त्याचा विषयाभिलाष हेंच मन व विषयज्ञान हीच बुद्धि आहे—असें आपल्या शिष्यास शिकवितात. बौद्ध—क्षणिक आलयविज्ञानसंज्ञक जी बुद्धीची ( अहं अशी ) धारा तोच आत्मा व अहंकार आहे. तो प्रवृत्तिविज्ञानरूप असतो. त्याचा बाह्य विषयाकार परिणाम ह्मणजेच बुद्धि होय व नुकताच आलेला अनुभव ह्मणजे मन—असें ठरवितात. वैशेषिक अहंकार व मन याची कल्पना नैयायिकांप्रमाणेंच करितात. पण बुद्धि—स्मृति, प्रत्यक्ष, अनुमान, तर्क व विपर्यय—या पांच भेदांनीं युक्त आहे, असें अधिक समजतात. पाचरात्र—वासुदेवाख्य परमात्म्यापासून संकर्षणाख्य जीव उत्पन्न होतो;

तोच अहंकार आहे. त्याच्यापासून प्रद्युम्नाख्य मन होतें. त्याच्यापासून अनिरुद्धनामक बुद्धि उद्भवते, असे ह्मणतात. सारांश, येणेप्रमाणें योगी, माहेश्वर, नाकुल इत्यादि वादी निरनिराळ्या कल्पना करतात. पण त्या सर्वांचा उद्देश एकच. आपापल्या बुद्धीप्रमाणे ते सर्व परमात्म—तत्त्वाचा निर्णय करण्याकरितांच प्रयत्न करीत असतात व त्यांच्या त्यांच्या निर्णयाप्रमाणे त्यास फलही मिळते. वस्तुत त्या सर्व विवेकी पुरुषाचे प्राप्य स्थान एकच आहे पण परमार्थाचे अज्ञान व विपरीत भावना यांच्या योगाने ते परस्पर विवाद करीत सुटतात. विचित्र कल्पनाशक्तीने ते सर्व आपापल्या मार्गाची रमणीय प्रशसा करितात. ह्मणजे निरनिराळ्या मार्गांनीं एकाच झाडाखालीं येऊन विश्रांति घेत असताना वाटसरू जसे आपापल्या मार्गाची प्रशसा करितात तसाच हा सर्व प्रकार आहे. पण त्यांच्या त्या कल्पना व्यर्थ आहेत. स्नान, दान, आदान (ग्रहण) इत्यादि करणारा पुरुष जसा भिन्न भिन्न क्रियाचा कर्ता होतो त्याप्रमाणे मनच मनन, स्मरण, अहकरण, दर्शन इत्यादि क्रिया करीत असतांना मन, चित्त, अहकार इत्यादि नावास पात्र होते. चित्तच हे सर्व आहे, असा थोड्या विचारातीं अनुभवही येतो. चित्तरहित पुरुष एकाद्या वस्तूस पहात असला तरी तो तिला पहात नाही. ह्मणजे अवधान नसल्यास डोळ्यापुढचा पदार्थही दिसत नाही. एकादा रम्य शब्द ऐकून, पुत्रादिकास आलिंगन देऊन, दर्शनीय वस्तु पाहून, व सुगधी पदार्थांचा वास घेऊन सचित्त पुरुषासच आनंद होतो आणि अनिष्ट वस्तूंचा अनुभव आला असतां मनासह असलेल्या पुरुषासच विषाद वाटतो. सर्व रूपांच्या ज्ञानाचें कारण प्रकाश आहे. त्याचप्रमाणें सर्व पदार्थांच्या अनुभवाचें कारण मन आहे. ज्याचें चित्त मी बद्ध आहे या भावनेनें युक्त असतें तो बद्ध होतो व ज्यास मी मुक्त आहे असा अनुभव येत असतो तो मुक्त होतो. एवढ्यासाठींच वाद्यास, आपापल्या वासनेप्रमाणें, मन जड आहे किंवा चेतन आहे, इत्यादि जो अनुभव येत असतो तो बरोबरच आहे. मन जेव्हां अद्वितीय ब्रह्माकार होतें तेव्हा ससार लीन होतो व तें जेव्हां चचल व त्यामुळेंच मलिन होतें तेव्हा संसाराचें कारण होतें. आणि असल्या विक्षिप्त व मलिन मनामुळेंच भ्रांतीनें जगाचा उद्भव होतो. सारांश, हे रामचद्रा, केवल चैतन्यमय मनही संसाराचें कारण होत नाहीं

व पाषणासारखें जड मनही त्याचे कारण नाहीं. तर उभयरूप मनच या प्रपचाचें कारण आहे. मन असेपर्यंत जग. त्याचा लय झाला कीं, जग संपलें. एकाच कालाचे ऋतूमुळें जसे विभाग होतात त्याप्रमाणें एकाच मनाचे कर्मामुळें विभाग होतात व त्यांस अनेक नांवें रूढ होतात. चित्तरहित शरीरास अहकार, इंद्रियें, इत्यादि इतर भाव जर क्षुब्ध करण्यास समर्थ झाले तर जीवादि पदार्थ चित्ताहून निराळे आहेत, असें आह्मीं ह्मणू. पण त्यांतील एकाही पदार्थांत तें सामर्थ्य नाहीं. ह्मणून सर्व जग मनोमय आहे व सर्वांचें कारण मनच आहे, असें आह्मी निःशकपणें ह्मणतो. निरनिराळे दर्शन(शास्त्र)कार भिन्न भिन्न तर्क करून आपापल्या बुद्धीप्रमाणे निर्णय करितात, हें खरें; पण त्यांचे ते निर्णय साप्रदायिक शिक्षेनें युक्त नसतात. त्यांचें अज्ञान व बुद्धीचे दोषही त्यांस यथार्थ निर्णय करू देत नाहींत व या मनोदेवाच्या स्वाभाविक कुतर्कशक्तीही त्यास अमार्गानें विचार करावयास लावितात, असा अनुभव आहे. त्यामुळेंच प्रत्येक पक्ष आपले आपलें मत ग्राह्य, शुद्ध व अबाधित आहे, असें निःशंकपणें मानितो व प्रत्येक पक्ष परस्पर विचित्र आहे. (ह्मणजे एकाचें मत दुसऱ्याशीं जुळत नाहीं; दुसऱ्याचें तिसऱ्याशीं जुळत नाहीं.) त्यामुळे श्रद्धाजड होऊन आपापल्या पक्षाविषयीं आग्रह धरणे यावाचून त्यांस गत्यंतर नसते. आमच्या मताचा प्रकार तसा नाहीं. आह्मीं तर्क करितों. नाहीं करीत असें नाहीं. पण तो श्रुतीस अनुसरून करितों. श्रुतीनें सचेतन कोळ्यापासून जड तंतु जसे उद्भवतात; जड पृथ्वीमध्ये सचेतन औषधी जशा उगवतात व जीवंत पुरुषापासून केंस व नखें जशीं वाढतात त्याप्रमाणें नित्य ज्ञानस्वरूप पुरुषापासून प्रकृति उत्पन्न होते, असें सांगितलें आहे (प्रकृति ह्मणजे मनच होय.) व त्यास अनुसरूनच आह्मीं हें सर्व जगत् पुरुषापासून उद्भवलें आहे, असा सिद्धांत ठरवितों. अर्थात् आमचें मत श्रुतिसंमत आहे. वस्तुतः विवादाचें कारणच नाहीं. पण जगाच्या स्वाभाविक वैचित्र्याबरोबर हें मतवैचित्र्यही रूढ झालें आहे ९६.

सर्ग ९७.—मनच सर्व पदार्थांच्या आकारानें स्थित आहे, असें सांगून या सगात चित्ताकाशादि तीन आकाशांचें वर्णन करितात.

**श्रीराम**—गुरुवर्य, आपल्या सांगण्यावरून हें सर्व ब्रह्मांडपटल मनापासूनच उत्पन्न झालें आहे व तें जगच मनाचें कर्म आहे, असें मी समजलों.

**श्रीवसिष्ठ**—होय, तूं अगदीं बरोबर समजला आहेस. प्रकाशस्वरूप आत्म्याचें ज्ञान न होण्याचें कारण त्याचें अज्ञान आहे व त्यामुळें ब्रह्मरूप अशा या जगात मनच जगद्रूप झाले आहे. तें कोठें मनुष्यरूपी, कोठें देवरूपी, कोठें दैत्यरूपी, कोठे यक्षरूपी, कोठें गधर्वरूपी, व कोठें किन्नररूपी झालें आहे. नाना आचार, नाना नभोभाग, नाना पुरें व नगरें इत्यादिकाच्या रूपानें मनच विस्तारले आहे, असें मला वाटतें. हा सर्व शरीर समूह पृथ्वीतील तृण, काष्ठे, लता याच्या सारिखाच आहे. यास्तव पृथिवीचें तत्त्व जाणण्याची ज्याची इच्छा असेल त्यास तृणादिकाचा विचार करून जसा काही लाभ होत नाही तर पृथ्वीचाच विचार करावा लागतो त्याप्रमाणें शरीराचा फारसा विचार न करिता आह्मांस मनाचाच विचार केला पाहिजे. दीर्घविचारानें कर्ता व कर्म याचें स्वरूप मनच आहे, असा दृढ निश्चय झाला ह्मणजे परमात्माच अवशिष्ट रहातो. तो सर्वांतर्यामी आत्मा सर्वाहून निराळा, सर्वत्र असणारा व सर्वांचा आधार आहे. त्याच्या कृपेनेंच मन इतस्ततः धावण्यास व अनत कल्पना करण्यास समर्थ होतें. मन जसें कर्म आहे तसेंच ते शरीराचें कारणही आहे. जन्म, मरण, वृद्धि, इत्यादि विकार मनालाच होतात. आत्म्याचे ते गुण नव्हेत. विचार करू लागलें असता ते ( मन ) लय पावतें व त्याच्या लयानेच परम कल्याण होतें. परम कल्याण ह्मणजे मोक्ष ( संसार बधातून सुटणे ) हें तुला ठाऊक आहेच. 'कर्मयुक्त मन' या नावाचा क्षय झाला असतां जीव मुक्त झाला असें ह्मणतात. तो पुनः जन्मास येत नाही.

**श्रीराम**—भगवन्, आपण सात्त्विक, राजस व तामस असे तीन प्रकारचे प्राणी व विशेषतः मानव असतात, असें सागता व सदसद्रूप मन हें त्यांचें मुख्य कारण आहे, असें ह्मणतां. पण कूटस्थ ( निर्विकार ) व चिन्मात्रस्वभाव अशा ब्रह्मापासून हें जगद्रूपी आश्चर्य निर्माण करणारें मन कसें उद्भवणार ? कारण ब्रह्म बुद्धिरहित आहे. विचारपूर्वकच सृष्टि होत असते व मननावाचून बुद्धीचा अध्यवसाय ( निश्चय ) हा व्यापार होत नाहीं, हें जगप्रसिद्ध आहे. ह्मणून मनाच्या पूर्वी बुद्धि झाली, असेंही ह्मणतां येत नाहीं. तेव्हां या आपल्या सिद्धांताची उपपत्ति कशी लागणार ?

**श्रीवसिष्ठ**—राघवा, ज्याचा अतर्भाग अतिशय विस्तृत आहे अशीं तीन आकाशें आहेत. एक चित्ताकाश, दुसरें चिदाकाश व तिसरें भूताकाश. आपल्या सर्व कार्यांशी याचा एकसारखाच सबध असतो. ह्मणून य.स सर्वसामान्य असे ह्मणतात. तीं तिन्हीं आकाशें आपल्या सर्व कार्यांमध्यें अनुगत असतात. ह्मणजे तीं ज्यात नाहीत असें त्याचें एकही कार्य नसतें. पण तीन आकाशें आहेत, असें ऐकताच अद्वैताची हानि झाली, असें कदाचित् तुझ्या मनात आले असेल. पण त्या तिन्ही आकाशाची सत्ता एक आहे. ह्मणजे एका शुद्ध चित्च्या सत्तेनेच तीं सत्तायुक्त झालीं आहेत व आमचा अद्वैत वाद एका सत्तेला उद्देशूनच आहे. तिघाची जर एकच सत्ता असली तर चिदाकाशात दुसऱ्या दोघाहून विशेष तो कोणता ? ह्मणून विचारशील तर सागतों. बुद्धि, मन, इत्यादि आतर पदार्थ व वस्त्र, लेखनी, इत्यादि बाह्य पदार्थ याची उत्पत्ति व नाश यास जाणणारा व सर्वांच्या अत करणात असणारा जो साक्षी तेच मायाशबल चिदाकाश होय. सर्व भूताच्या सर्व व्यवहारास कारण होत असल्यामुळें सर्व भूताचा हितकर, सर्व इद्रिये व शरीरे याचें नियमन करणारा असल्यामुळें श्रेष्ठ, व कालादिकाची कल्पना करणारा असा जो हा एक अदृश्य अवकाश आहे तेंच चित्ताकाश होय. त्यानें आपल्या कल्पना–शक्तीनें हे सर्व दृश्य जग व्यापून सोडिलें आहे. दश दिशेत सर्वत्र पसरलेले व पदार्थमात्रास अवकाश देणारें जें हें आकाश तेच प्रसिद्ध आकाश आहे. वायु, सूर्य, मेघ इत्यादि सर्वांचें तें आश्रयस्थान आहे. बाहेरचें हें भूताकाश व आतर चित्ताकाश याचा उद्भव चिदाकाशाच्या बलावर झाला आहे. सूर्य आपल्या अस्तित्वानें व सानिध्यानें ज्याप्रमाणें प्राण्याच्या सर्व व्यवहाराचें निमित्त होतो त्याप्रमाणें चिदश चिदाकाशाचें केवल सानिध्यामुळें निमित्त होतो. “ मी जग आहें व मी चेतन आहें ” असा जो चित्चा मलिन निश्चय तेंच मन आहे, असें तू जाण. त्याच्या योगानेंच आकाशादिकाचा अनुभव येतो. पण हा सर्व क्रम आत्मतत्त्व न जाणणाऱ्या अज्ञांस तत्त्वोपदेश करण्याकरिता कल्पिलेला आहे. वस्तुतः शुद्धचित्–पासून कांहीं उत्पन्न झालें नाहीं व कशाचा नाशही होत नाही. ह्मणून ज्ञानी पुरुषाच्या दृष्टीनें तुझ्या आक्षेपांस अवकाश रहात नाहीं. राघवा, तूं जोवर आत्मतत्त्वाविषयीं अज्ञ आहेस तोंवर उपदेशाकरिताच मी या तीन,

आकाशादिकाची कल्पना करीत आहे, हें तू विसरू नकोस. सारांश मायाशबल चिदाकाशापासून सर्व भूतें व भूतकार्ये झाली आहेत. चित्त या रूपास प्राप्त झालेलें चित्चें मलिन रूपच हें त्रिभुवनरूपी जग निर्मितें. (ह्मणजे चित्ताच्या कार्यामध्यें मालिन्य दिसत असल्यामुळें ते (चित्त) शुद्ध चित्चे कार्य आहे, असें ह्मणता येत नाही.) तसेंच चित्ताचा अनुभव अज्ञासच येत असल्यामुळें ते अज्ञानाचे कार्य आहे, असे ह्मणावे लागते. साराश मूर्खपणानें बध व ज्ञानबलाने मोक्ष प्राप्त होतो ९७.

**सर्ग ९८**—पूर्वोक्त तत्त्व चागल्या रीतीने समजावे ह्मणून या सर्गात चित्ताचें आख्यान व त्याच्या नाशाचा उपाय सागतात.

**श्रीवसिष्ठ**—रामा, जीवास, नित्य मुक्त अशा आत्म्याच्या अज्ञानामुळें, मनोभ्रातीनें बधाचा अनुभव येतो, असा निर्णय करण्याकरिता मन अज्ञात आत्म्यापासून उत्पन्न होते, असे येथवर सविस्तर सागितले. पण रोगाच्या तत्त्वाचा निर्णय व्हावा ह्मणून वैद्य रोगास कारण झालेल्या आहारविहारादिकांचें जसे वर्णन करितात त्याप्रमाणे इष्ट मनस्तत्त्वाचा निर्णय झाल्यावर त्याच्या उपायाविषयीं विचार करणेच उचित होय. ह्मणून, बा राघवा, सर्व अनर्थांचें व अर्थांचेंही कारण मन, कसेही व कोणापासूनही, जरी उत्पन्न झालेलें असलें तरी त्या विचारात फारसा काल न घालवितां त्यास आत्म्यामध्यें निरुद्ध करण्याकरिताच प्रयत्न करावा. कारण चित्त आत्म्यामध्यें समाहित झालें कीं आत्म्याचा नित्य मोक्ष होतो. समाहित चित्त शुद्ध व वासनारहित होतें. वासनाच्या अभावीं त्याच्या स्वाभाविक कल्पना पार निघून जातात व त्यामुळें तें आत्मरूप होतें. त्यानें आत्म्यामध्यें तादात्म्य पावणें हाच मोक्ष आहे. हें सर्व चराचर जग व बंधमोक्षही चित्ताच्या अधीन आहेत. आता मी तुला चित्ताख्यान सांगतों, तें चित्त लावून ऐक.

अति विस्तृत, शून्य, शात व अति भयकर असें एक अरण्य होतें. त्यांत शेंकडों योजनें लाब व रुंद असलेला प्रदेशही एका कणाएवढा दिसत होता. त्यात एकच पुरुष असून त्यास सहस्र हात व सहस्र नेत्र होते. त्याची मति अति व्याकुल झालेली असून तो भयंकर व विक्राळ आकाराचा दिसत असे. तो आपल्या सहस्र बाहूंमध्यें अनेक परिघ घेऊन आपल्याच पाठीवर प्रहार करीत भीतीनें इतस्ततः धांवत व

ओरडत होता. पण कांहीं वेळानें या असल्या आत्मघातकी कृत्यानें तो अगदीं थकून गेला. त्याचें शरीर विवश झालें. त्याचे हात–पाय मोडून गेल्यासारखे निर्बल झाले व शेवटीं तो एका मोठ्या थोरल्या अंधकूपामध्यें पडला. त्यात भयंकर अधकार पसरलेला होता. इतकेंच नव्हे तर त्याच्या विस्ताराचाही आकाशाप्रमाणें अत लागत नसे. त्यामुळें कांही न दिसणें, एकसारखें पडत रहाणे व त्यांतही कोठेंच आधार न मिळणें या तीन आपत्तींच्या योगानें अतिशय क्लेश भोगावे लागत होते. पुष्कळ काल लोटल्यावर तो त्यातून बाहेर पडला. पण पुन· पूर्वीप्रमाणेंच आपल्या हातानें आपणास मारून घेऊन तो पळत सुटला व काटे, दगड, कांटेरे वृक्ष, वेली, इत्यादिकानीं भरलेल्या वनात पडला. त्यास करज–वन ह्मणतात. त्यास तेथे फार दुःख झालें. तें त्याचे पडणें, हापटणें, ठेंचाळणें, रडणे, इत्यादिकास तर त्यावेळीं परिमितिच नव्हती. अंगात मोठमोठे काटे घुसल्यामुळें त्या दीन पुरुषास किती कष्ट सोसावे लागत होते याची नुस्ती कल्पनाच केली पाहिजे. असो, पण काल सर्वांवर उपकार करीत असतो. त्यामुळें बऱ्याच कालानतर तो त्यातूनही बाहेर पडला व एक क्षणभर समाधान मानीत आहे, तोच पुनः त्याला दुर्बुद्धि झाली. तो पुनरपि आपल्या पाठीवर आपल्याच हातांनीं प्रहार करू लागला. ते असह्य झाल्यामुळें त्यास पळत सुटणे भाग पडलें. तो पुनः दूर पळत गेला. तेव्हां दैववशात् त्याला एक शीतळ कदलीचे वन लागलें. त्यांत गेल्यावर त्याला आनंद झाला. पण आनदाचा काल लवकर संपतो, असा सामान्य नियम आहे. त्यास अनुसरून त्याचा तो आनंदही फार वेळ टिकला नाहीं. कालानें त्याला त्यातून बाहेर काढिले. कदलीवनांतून बाहेर आल्यावर त्याचें तें पूर्व कर्म पुनः सुरू झाले. त्यामुळे तो पहिल्याप्रमाणेंच पुनः सैरा वैरा धावत सुटला. फार दूरवर गेल्यावर तो पूर्वीच्याच अंधकूपांत पडला. पण त्यातून निघून आपल्याच कर्मामुळें तो पुनः त्या कदलीवनांत गेला. तेथून निघून पुनः त्यास करज–अरण्यात पडावें लागलें. त्याचा हा क्रम एकसारखा चालला होता. त्या पुरुषास विश्रांति कशी ती मुळींच मिळत नव्हती. तेव्हा रामा, त्या महा पुरुषाची ही आश्चर्यकारक चक्रतुल्य गति व दीर्घ काल चाललेला हा त्याचा उपन्याप पाहून मला दया आली व योगबलानें त्यास मार्गांत क्षणभर अडवून मी असें विचारलें.—अरे बा

पुरुषा, तू कोण आहेस ? हे तुझें काय चाललें आहे ? व हा सर्व दुःखदायी व्यवहार तूं कां करीत आहेस ? तुझें नांव काय व तूं असें खुळ्यासारखें आपलेंच अहित कां करतोस ? त्यावर तो ह्मणाला–मुने, मी कोणी नाहीं व कांहीं एक करीत नाहीं. तू माझ्या कर्मांत विघ्न आणिलेंस. यास्तव तूं माझा मोठा शत्रु आहेस. तूं मला पाहिलेंस व त्यामुळें माझें दुःख व सुख हीं दोन्हीं नाहींशीं झालीं. असें बोलून व आपलीं विकल अंगें पाहून तो अतिशय रडू लागला. काहीं वेळानें आपलें रडें आवरून त्यानें आपल्या अगांकडे पुनः पाहिलें व मोठ्यानें हास्य केलें. हंसून झाल्यावर त्यानें क्रमानें आपलीं अगें टाकिली. प्रथम त्यानें तें आपलें भयंकर मस्तक ( ह्मणजे सकल्प ) टाकिलें त्यानतर त्यानें बाहूचा ( विकल्पांचा ) त्याग केला. पुढें वक्षःस्थल ( विषयाभिमान ) व उदर ( तृष्णा ) याचाही त्याग करून नियतीच्या शक्तीनें तो कोठे तरी जाण्यास तयार झाला. पण पुढें तो कोठें गेला व काय झालें, तें मला समजलें नाहीं. रामा, दुसऱ्या एका एकातस्थळीं मी तसलाच आणखीं एक पुरुष पाहिला. तोही आपल्याच पाठीवर मारून घेऊन वर सांगितल्याप्रमाणेंच अधकूपादिकांत वारंवार पडत असे. त्याला काहीं वेळ सुखाचा अनुभव येत असे व कांहीं वेळ तो दुःख भोगीत असे. त्यालाही मी पूर्वीप्रमाणेंच अडवून विचारिलें; तेव्हा तोही प्रथम रडून, शेवटीं हंसून व अवयवाचा त्याग करून अदृश्य झाला. तसाच मी आणखीं एक पुरुष पाहिला. त्याही मूर्खानें आपल्याच हातानें आपला घात करून घेतला व तो अधकूपांत जाऊन पडला. तो त्यांतून बाहेर पडेल ह्मणून मी दीर्घ काल त्या कूपाच्या कांठावर बसून वाट पाहिली. पण तो शठ बाहेर पडलाच नाहीं. तेव्हां मी तेथून उठून दुसरीकडे जाऊ लागलों. इतक्यांत त्या कूपांत पडण्याकरितां पळत येणाऱ्या एका आत्मघातक्यास मीं पाहिलें. तेव्हां त्यास अडवून मीं पूर्वोक्त प्रश्न केला. पण त्यानें माझ्या बोलाण्याकडे लक्षच दिलें नाहीं. उलट तो माझा धिक्कार करून तसाच आपणास मारीत, ओरडत, रडत व पळत पुढें चालता झाला. बा राघवा, याप्रमाणें त्या भयंकर अरण्यांत फिरतांना मीं असे अनेक दुराचारी पाहिले. त्यांतील कित्येक माझ्या प्रश्नानें विचारयुक्त होऊन पूर्वोक्त प्रकारें स्वरूपनाशलक्षण शांतीस प्राप्त झाले. कित्येकांनीं माझें ह्मणणें न ऐकतां उलट माझी निंदा केली. कित्येक अंधकू-

पांतून कदलीवनांत, कदलीवनांतून काटेऱ्या खळग्यांत व त्या खळग्यातून पुनः कदलीवनांत किंवा अंधकूपांत असे एकसारखे फिरत होते. पण कित्येक एकदां जेथें जाऊन पडत तेथेंच गडप होऊन रहात. काम्य-धर्मामध्यें परायण असलेल्या कित्येकास तर कोठेंच स्थिर स्थिति मिळत नसे. रामभद्रा, अशाप्रकारचें तें विस्तृत महा अरण्य अजून विद्य-मान आहे व त्यांत मी वर्णन केल्याप्रमाणे व्यवहार करणारे अनेक पुरुषही आहेत. तुझ्याचमुळें ज्याच्यातील सर्व व्यवहार होत आहेत, असें तें अरण्य तूही पाहिलें आहेस. पण तुझा विवेक प्रगल्भ नसल्यामुळें तुला त्याचें स्मरण नाहीं. बाबारे, तें अरण्य अतिशय भयंकर आहे खरें; पण आत्मबोध नसल्यामुळें ज्यास शांतीचा लाभ झालेला नसतो त्यांस ते उत्तम पुष्पवाटिकेप्रमाणे रमणीय व आनंददायी वाटते ९८.

**सर्ग ९९.**—आतां या सर्गांत वरील चित्ताख्यानाचें तात्पर्य सांगतात.

**श्रीराम**—गुरुवर्य, आपण सागता तें अरण्य कोठे आहे ? मी तें केव्हा व कसें पाहिलें ? त्यांतील पुरुष कोण व ते काय करीत आहेत ? तें मला सांगा.

**श्रीवसिष्ठ**—रामा, ते अरण्य व पुरुष कोठें दूर नाहींत. हा अपार संसारच तें महा अरण्य आहे. तें परमार्थदृष्टीनें असत् असल्यामुळें त्यास शून्य असें ह्मटलें आहे. पण भ्रांतीनें तें अनेक विकारानीं भरलेलें आहे, असें वाटतें. ह्मणून त्यास अशांत असें ह्मणतात. विचाररूपी प्रकाशाच्या योगानें तें भयरहित व एका अद्वितीय वस्तूनें परिपूर्ण झाले असतां अशून्य होतें. त्यांत मनें हेच एकसारखे भ्रमण करणारे व महा आकारानीं युक्त असलेले पुरुष होत व ते मनोरूपी पुरुषच दुःखांत पडतात. त्यांची अवस्था पहाणारा जो मी तो विवेक असून विवेकरूपी मींच त्यांची ती दुर्दशा पाहिली. विवेकावांचून दुसऱ्या कोणीही नव्हे. विवेकच त्यांस बोध करितो. पण सर्वच पुरुष त्याचा उपदेश ऐकत नाहींत. त्यांतील जे विवेकाचे ऐकितात ते शांतरूप होऊन परम पदांत लीन होतात व पुनः त्या महारण्यात दिसत नाहींत. पण त्यांत मोहित झालेल्या अविवेक्यांचाच फार मोठा भरणा असल्यामुळें विवेकाचें न ऐक-णारे व त्यास तुच्छ समजणारेच फार. माझा तिरस्कार केल्याकारणानें त्यांतील बरेच अंधकूपांत पडतात. तेच नरकयातना भोगणारे पापी होत.

कदली–वनात प्रवेश करून सुख भोगणारे पुरुष ह्मणजे यज्ञयागादि काम्य कर्मे किंवा इतर शास्त्रीय आचरण करून स्वर्गी गेलेलीं मनेंच होत, असें तूं जाण. अंधकूपांत प्रवेश करून पुनः बाहेर न पडणारीं मनेंच ( पुरुष ) महापातकी असतात. कदलीवनातून परत न फिरणारे पुरुष ( मनें ) महा उपासक असतात व कटकादिकानीं भरलेल्या करंजवनांत पडून तेथून बाहेर न पडणारे पुरुष मानव होत. त्यांतील कित्येक विवेकी होऊन मुक्त होतात. पण पुष्कळसे अविवेकीच राहून जन्ममरण–परंपरेंत पडतात. त्यांतील कित्येक अधोगतीस जाऊन नरकात पडतात व कित्येक ऊर्ध्वगामी होऊन मनुष्यादि ऊर्ध्व लोकास जातात. रघुनदना, करंजवन कुटुबप्रेमानें परिपूर्ण असते. त्यामुळे त्यात पडलेल्या मनास दुःखरूपी कटकाची असह्य पीडा होते. आणि त्या कारणानें मानुष्य हें विविध इच्छांनीं युक्त आहे. त्या अरण्यात प्रविष्ट झालेल्या मनास मनुष्य हे सामान्यनाम प्राप्त होऊन तीं मोठीं रसिक ( विषयी ) बनतात. चद्राच्या किरणाप्रमाणें शीतल व मनास आनद देणारे कदलीवन ह्मणजे स्वर्गलोक होय, हें तुझ्या ध्यानात आलेंच असेल. त्यात गेलेल्या मनातील कित्येक मनें शास्त्रविहित पुण्याचरण व धारणा, ध्यान इत्यादिकाच्या योगानें स्थिर केलेली उपासना या किंवा अशाच दुसऱ्याही, कारणामुळें ग्रह, सप्तर्षी, ध्रुव इत्यादि शरीरें धारण करितात आणि त्या कारणानें इतराच्या अपेक्षेनें त्याचें तेज, भोग व आयुष्य अधिक असतें. जे अज्ञ माझा बुद्धि व चित्त याच्या योगानें तिरस्कार करितात ह्मणजे विवेकनिश्चय किंवा स्मरण करीत नाहींत तें मनोरूपी पुरुष विवेकाचाच तिरस्कार ( उपेक्षा ) करितात. " तू मला पाहिलेंस व त्यामुळें मी नष्ट झालों; तू माझा शत्रु आहेस" असें जें वर ह्मटलें आहे ते तत्त्वज्ञानानें क्षीण होणाऱ्या चित्ताचे दुखोद्गार होत. राघवा, पहिला पुरुष रडला ह्मणून मीं तुला सांगितलें आहे. तें भोगसमूह सोडणाऱ्या मनाचें रोदन होय. ज्याला थोडासा विवेक प्राप्त झाला असून परमपद लाभलेलें नसतें त्या मनास भोगांचा त्याग करितांना अतिशय दुःख होतें. रडणाऱ्या त्यानें आपलीं अंगें पाहिलीं, असें मी तुला सांगितलें होतें. तेंही मनाचेंच कर्म होय. कारण " अरेरे, मी हीं फार दिवसांचीं परिचित अंगें सोडून कसें जाऊं ?" असें ह्मणून तें रडूं लागलें. कारण पूर्ण विवेक प्राप्त होण्यापूर्वी स्नेह, लोभ, कुटुंब, पुत्र इत्यादि अंगांस सोडतांना

असे दुःख होणे साहजिक आहे. शेवटी तो पुरुष हसला ह्मणून मं ह्मटलें आहे. त्याचे कारण त्यास पूर्ण विवेक झाला, हे होय. विवेक प्राः झाल्यामुळें ज्याने ससार-स्थितीचा त्याग केला आहे त्यास पर आनद होणें व तो उत्तरोत्तर वाढणें उचितच होय. ज्ञानानतर मनाः आपल्या अगास तिरस्काराने पाहिलें. कारण तींच आपणास अनर्थाः पाडणारी आहेत, हे त्यास ज्ञानसामर्थ्याने कळून चुकले होते. मिथ्य विकल्पाने रचलेल्या यानी मला फार दिवस फसविले, असे वाटल्या वर हसू येणे योग्यच आहे. विवेकाने सपन्न झालेले मन अपरिच्छिन्न पदा मध्यें मिळून जाते व त्यानतर पूर्वीच्या दीनतेचा आधार असे जे विषयजात त्यास दुरूनच पहाते. त्या पुरुषास मी बलात्काराने अडवून धरून प्रश्न केला असें ह्मणून विवेक चित्तास बलात्काराने आपल्या स्वाधीन ठेवू शकतो असें सुचविले आहे. त्याचीं अगे गळून पडली व तो दिसेनासा झाला याचा अर्थ असा की, मनोनाश झाला असता विषयासह विषयतृष्ण शात होते चित्ताच्या अनत आकृति असल्यामुळे त्या पुरुषास सहस्र बाहु व सहस्र नेत्र होते, असे मीं ह्मटले आहे कुकल्पना हेच आपल्या हाताने आपल्य पाठीवर केलेले प्रहार होत. नानाप्रकारच्या वासनानीं अस्थिर होऊन अनेक कल्पना करीत सुटणे, हेंच मनोरूपी पुरुषाचे पलायन होय. चित्त आपल्याच इच्छेने आपणासच वासनारूपी मुद्गराचे प्रहार कसे करीत असते हे प्रत्येकाने आपापल्या चित्तभूमीत पहावे. राघवा, अज्ञानाचा हा खेळ कसा अचिंत्य आहे, त्याचाही तू विचार कर. वासनाच्या योगाने अत्यत सतप्त झालेली सर्व मने आपण होऊनच त्या ब्रह्मपदास जाणण्यास योग्य होऊन पळू लागतात. ह्मणजे हे विस्तृत दुःख मनाच्या योगानेच व्यक्त होते व तें मनच स्वतः खिन्न होऊन त्याच्यापासून दूर जाऊ लागतें. सकल्प व वासना त्याच्या समूहाने ते आपणच आपल्यास बाधून घेतें. पुढील दुःखाकडे दुर्लक्ष्य करून मूर्ख बालक ज्याप्रमाणें दुर्लीला करू लागतं त्याप्रमाणें मन चचल होऊन अनर्थ ओढवतील असेच वर्तन करू लागतें आपलें इंद्रिय लाकडाच्या फटींत गेले आहे हे न जाणता चिरकरानीं व ठोकून ठेविलेल्या खुटीस हलवून उपटणाऱ्या वानराप्रमाणें हें मन आप ल्याच कुकल्पनानीं अनर्थात पडते. त्याचा निरोध करण्याकरितां थोडास प्रयत्न करून काहीं लाभ होत नाहीं. कारण आपण जसा जसा प्रयत्न करं

लागावे तसतसें ते अधिक—अधिक विक्षिप्त होऊन पळूं लागते. पण त्यामुळे कंटाळा न करिता चिरकाल निरोध—अभ्यास करीत राहिल्यानें व असग आत्म्याची भावना केल्याने त्याचा निरोध होऊ लागतो व त्यानंतर पुनः त्यास शोक करण्याचा प्रसग येत नाहीं. मनाच्या प्रमादा( अनवधाना )मुळें पर्वत—शिखराप्रमाणे दुःखें वाढतात व तेंच विवेकवश झालें असतां त्याचा क्षय होतो. तात्पर्य जे चित्त यावज्जीव शास्त्रीय शुद्ध वासनेनें युक्त होऊन मुनीप्रमाणें निरोध—अभ्यासात रममाण होते ते शेवटीं तत्त्वबोधाच्या द्वारा अति पवित्र पर ब्रह्मास प्राप्त होते आणि जीवतपणींच ज्यास शात स्वरूपाचा साक्षात्कार झाला आहे, असा तो जीवन्मुक्त पुरुष मोठमोठ्या आपत्तींतही शोक करीत नाहीं ९९. चित्तोपाख्यान समाप्त झालें.

**सर्ग १००**—या मनाच्या शक्तीनेच ब्रह्म सर्वशक्ति झाले आहे, असें येथें सागतात.

**श्रीवसिष्ठ**—रामा, बधमोक्ष—कल्पना मनाच्याच अधीन आहे. याविषयी मी आता तुला युक्ति सागतों. समुद्रापासून उद्भवणाऱ्या तरंगाप्रमाणे ब्रह्मसज्ञक परम पदापासून हे तन्मय व अतन्मय चित्त उत्पन्न झालें आहे. ते अज्ञानाचा विकार आहे, ह्मणून ब्रह्ममय नव्हे. ( ह्म. अतन्मय ) व शुद्ध ब्रह्माचा विवर्त आहे ह्मणून ब्रह्ममय. ह्मणजे ज्याप्रमाणें तरग जलाचा विकार व त्याच्या सत्तेचा विवर्त त्याप्रमाणे चित्त अज्ञानाचा विकार व ब्रह्माचा विवर्त आहे जलाच्या सत्तेकडे लक्ष्य देणाऱ्या लोकास तरग समुद्राहून निराळा भासत नाहीं; त्याचप्रमाणें, रामराया, ज्ञानी पुरुषाचें मन ब्रह्मरूपच असते. त्याहून निराळे नसते समुद्राप्रमाणेंच तरंगातही जलसत्ता आहे, असें न जाणणाऱ्या मनुष्यास समुद्र व तरंग भिन्न वाटतात. त्याचप्रमाणें अज्ञानी पुरुषाचे मन ब्रह्माहून भिन्न भासतें व तेंच ससारभ्रमाचे कारण होते. एवढ्या करिता गुरु, शिष्य, शास्त्र इत्यादि सर्व कल्पना अज्ञाकरिता व अज्ञान अवस्थेच्या उपयोगीं आहेत, असें मीं मागें सागितलें आहे. अज्ञात ब्रह्मच सर्व जगाचें कारण होतें व तेंच सर्वशक्ति, नित्य, अव्यय, परिपूर्ण, इत्यादि आहे. तो भगवान् सर्वशक्तिसंपन्न असल्यामुळेंच आपल्या इच्छेप्रमाणें वाटेल तें करितो व सर्वगामी असल्यामुळें हवी ती आपली शक्ति वाटेल तेथें व्यक्त करितो. रामा, त्याची चिच्छक्तिच सर्व प्रकारच्या शरीरांमध्यें अभिव्यक्त होते. स्पंदशक्ति वायूंत, जडशक्ति पाषाणात, द्रवशक्ति जलांत, तेजःशक्ति अग्नींत,

शून्यशक्ति आकाशात, व अस्तित्व शक्ति सर्व भवस्थितींत आढळते. याप्रमाणे ब्रह्माच्या अनंत शक्ति दहाही दिशामध्यें अनुभवास येतात. फळें, पुष्पे, डाहळ्या, पाने, शाखा, स्कंध, मूळें इत्यादिकानीं युक्त असलेला वृक्ष आपल्या बीजात जसा सूक्ष्मरूपाने रहातो त्याप्रमाणे अज्ञात ब्रह्मांत जग रहातें. चित्त हें प्रथम कार्य आहे. ह्मणजे तो पहिला विकार अथवा परिणाम आहे व ते ( चित्त ) चिद्रूप व जडरूप असे उभयरूप आहे, असा अपणास अनुभवही येतो. त्यामुळें त्याचे कारण अज्ञात ब्रह्मच आहे, असें मानावे लागतें. कारण अज्ञानावाचून चित्तात जाड्य हा धर्म असणें शक्य नाही व ब्रह्मावाचून चित् हा धर्म असणे शक्य नाहीं. यास्तव, रामा, हें जग व हे जीवतत्त्व प्रत्यक्–चिद्रूप ब्रह्मच आहे, असे तू सतत जाण. मन हीच ब्राह्मी ( ब्रह्माची ) शक्ति आहे व तीच सर्व करिते. अविद्या, काम, कर्म इत्यादि सर्व ही शक्तिच आहे. हिच्या सर्व शक्ती ब्रह्माच्या शक्ती झाल्या आहेत. सर्व ऋतु–शक्ति सर्व वृक्षामध्यें एकसारिख्याच असल्या तरी त्यावर येणारी फळें, पुष्पें, इत्यादि जशीं नियमाने येतात ह्मणजे फणसाच्या झाडावर आंबे, आंब्याच्या झाडावर पेरु इत्यादि अव्यवस्था जशी होत नाहीं त्याप्रमाणे मनाच्या शक्तींचाही संकर होत नाहीं. तर त्या नियमानें व्यक्त व अव्यक्त होतात. पृथ्वीमध्ये अंकुर उत्पन्न करण्याची शक्ति असते. पण ती त्यास नेहमी उत्पन्न करीत नाहीं. तर कालादि सहायक साधनाची अपेक्षा करिते. त्याप्रमाणे मनाच्या द्वारा व्यक्त होणाऱ्या ब्रह्मशक्तीसही देश, काल, अवस्था इत्यादिकाचे सहाय लागते व त्यामुळें सर्व शक्ति एकाच मनात व एकाच वेळीं उद्भवत नाहींत. पण रामभद्रा, या शक्तीही काल्पनिक आहेत, हे तू विसरू नको. हे सर्व मनाचे प्रतिभास आहेत. त्याला जसे जसे संस्कार होतील तसे तसें तें कल्पना करील, हे महा तत्त्व न विसरतां त्याला सतत शुभ संस्कार करीत रहावें. सर्वत्र एक ब्रह्मसत्ता आहे. दुसरी सत्ता नाहीं. करण, कर्म, कर्ता, जनन, मरण, स्थिति इत्यादि सर्व ब्रह्म आहे व हें गूढ तत्त्व ज्यास कळतें त्याला लोभ नसतो, मोह होत नाहीं; तृष्णा नसते, व आसक्तिही नसते. कारण सर्व आत्मरूप आहे, असा निश्चय झाल्यावर लोभादि कसे होणार ? आत्माच अनात्म्यासारखा झाला ह्मणजे जीव होतो. मी बद्ध आहे, असें समजणें हीच त्याची कुकल्पना आहे,

आणि त्या कुकल्पनेमुळेंच मोक्ष व मोक्षाचे शास्त्रीय उपाय याची कल्पना करावी लागते. पण ज्ञान्याच्या दृष्टीने त्यातील काहीं सत्य नाही. साराश प्रथम मन, त्यानतर बंध व मोक्ष—दृष्टि, त्याच्या मागून भुवनसज्ञक प्रपंच-रचना, या क्रमानें ही जगत्स्थिति, हे साधो, बालकास दायीने सागितलेल्या गोष्टीप्रमाणें कल्पनेने प्रतिष्ठित झाली आहे १००.

**सर्ग १०१**—या सर्गात पूर्वोक्त आख्यायिका सागतात.

**श्रीराम**—हे मुनिश्रेष्ठ, दायीने बालकास सागितलेली ती गोष्ट आपण मला सागा. कारण तिच्या श्रवणाने सकल्पविकल्पात्मक मनाचे मूळ जो संकल्प त्याचा निरोध केला असता निर्विकल्पपदप्राप्ति कशी होते, तें चागलें समजेल, असें मला वाटते.

**श्रीवसिष्ठ**—होय. रामा, तू ह्मणतोस तें खरे आहे. शिवाय सकल्पापासूनच मिथ्या ससार कसा होतो, हेही तुला ती गोष्ट ऐकून समजेल. कोणी एक युक्तायुक्त—विचारशून्य बालक एकदा आपल्या दायीस ह्मणाला, “दायि, माझा वेळ जात नाहीं. मला कटाळा आल्यासारखा झाला आहे. यास्तव मला एकादी चागली गोष्ट साग. तेव्हा त्याच्या चित्तरजनाकरिता ती त्याला एक सुदर गोष्ट सागू लागली. बाळा, एक अत्यत असत् नगर होतें. त्यात तीन धार्मिक, शूर व महात्मे राजपुत्र होते. ह्मणजे विस्तीर्ण व शून्य आकाशात जशीं नक्षत्रे असतात त्याप्रमाणे त्या विस्तीर्ण व शून्य नगरात ते विराजमान होत असत. पण त्यातील दोघे जन्मास आले नव्हते व एक गर्भाशयातही आला नव्हता. पुढे दैववशात् त्याचे बाधव मरण पावले दुर्भिक्षादिकामुळें त्याचीं मुखें म्लान झालीं. तेव्हां दुसऱ्या एकाद्या उत्तम नगरास जाण्याच्या इच्छेनें ते तिघेही तेथून निघाले. पण त्या सुकुमार राजपुत्रास सूर्याच्या प्रखर तापाने फार कष्ट झाले. तापलेल्या वाळूत त्याचे पाय पोळू लागले. त्याना जन्मांत कधीं चालण्याची सवय नव्हती. त्यामुळें ते अतिशय थकले. त्याच्या पायात पुष्कळ काटे बोंचले; ठेंचा लागून बोटे फुटलीं; घेरी येऊन ते खडकाळ भूमीवर पडले. त्यामुळें त्याचीं अगें छिन्न भिन्न झालीं व असे हाल झाल्यामुळें ते तिघेही “ अहो बाबा, अगे आई ” असें ह्मणून रडू लागले. पण सुखाप्रमाणेंच दुःखही क्षणिक अथवा कांहींकाल रहाणारें असतें, असा नियम असल्यामुळे काहीं वेळानें त्याचें दुःखही

क्षीण होऊ लागले. त्यांना पर्णें व पुष्पें यांनीं व्याप्त असे तीन रमणीय वृक्ष दिसले. अनेक प्राणी त्याच्या आश्रयानें राहून आपला संताप कमी करीत होते. पण त्यातीलही दोन वृक्ष मुळीं जन्मासच आले नव्हते व तिसऱ्याचें बीजही भूमींत पडलें नव्हते. स्वर्गात वृक्षाखालीं बसून विश्रांति घेणाऱ्या–इंद्र, अग्नि, व यम–यांच्याप्रमाणे ते राजपुत्र त्यातील एका वृक्षाखालीं बसून, त्याचीं अमृतासारखीं गोड फळे खाऊन व त्याच्या पुष्पाच्या माळा गळ्यात घालून जरा ताजे झाले. त्यांचा तो संताप जरा कमी झाला. नंतर ते पुढें जाऊ लागले. मध्याह्नसमयी त्यास तीन नद्या लागल्या. त्यांतील एक अगदी शुष्क होती व दुसऱ्या दोन नद्यांत पाण्याचा थेंबही नव्हता. उन्हानें संतप्त झालेले जन अथवा ब्रह्मा, विष्णु व महेश जसे गंगेमध्ये स्नान करितात त्याप्रमाणें त्या तिघांनीं त्या नद्यात मोठ्या आदराने स्नान केले. अमृतप्राय जल प्याले व यथेच्छ जलक्रीडा केली. काहीं वेळानें ते पुढें निघाले व सायंकाळीं भविष्य नगरास पोंचले. ते नगर पताकाच्या योगानें सुशोभित केले होते. त्यात रमणीय व भव्य जलाशय होते. नगरस्थ जनांच्या गायनाचा ध्वनि त्यात चोहोंकडे ऐकू येत होता. त्यात त्यास तीन रत्नखचित सुवर्णाची गृहे दिसलीं. तीं अतिशय रम्य व पर्वतशिखरासारखीं उंच होती. पण त्यातील दोन बांधलींच नव्हतीं व तिसऱ्याच्या भीतीही अजून झाल्या नव्हत्या. ते तिघे त्यात शिरले व तेथे विहार करू लागले. काहीं वेळानें त्यास तेथें तीन स्थाल्या मिळाल्या. त्या उंची सोन्याच्या केलेल्या असून फार रमणीय होत्या. पण त्यातील दोघींचीं खापरेंही दिसत नव्हतीं व तिसरीचे चूर्ण झालें होतें. त्यानीं ती तिसरी स्थाली घेतली व त्यांत पुष्कळ अन्न शिजविलें. नंतर तीन ब्राह्मण सांगितले. त्यांतील दोघांना देहच नव्हते व तिसरा मुखरहित होता. बाळा, त्यातील त्या तोंडावांचून असलेल्या तिसऱ्या ब्राह्मणानें ते सर्व खाऊन टाकिलें. पण बाकीचें अन्न खाऊन ते राजपुत्रही तृप्त झाले व त्याच भविष्यन्नगरांत आनंदानें राहिले. ते अद्यापि तेथें मृगयादि विहार करीत सुखानें काल घालवीत असतात. पुत्रा ही सुंदर गोष्ट तूं ध्यानांत ठेव. म्हणजे मोठा शहाणा होशील.

रामा, त्या धात्रीने सांगितलेली ही शुभ कथा ऐकून त्या अज्ञ बालकास मोठा चमत्कार वाटला. चित्ताख्यानानंतर जगाचा अनुभव केवल विकल्पमात्र आहे, असें जें मी सांगत होतो तेंच दृढ करण्याकरितां दृष्टांतरूपानें मी ही कथा तुला सांगितली आहे. या धात्रीच्या कल्पित कथेप्रमाणेंच आपल्या उग्र संकल्पाच्या योगाने ही जगत्स्थिति दृढ झाली आहे. सर्व संकल्पाच्या अधीन आहे. राजपुत्र, नद्या, भविष्यन्नगर, वृक्ष इत्यादि जसे संकल्प ( कल्पना ) तसेंच बंध, मोक्ष, संसार, आकाश, वायु, पृथ्वी इत्यादि सर्व संकल्प होत. यास्तव हे सत्पुरुषा, तू आत्म्यापासून उद्भवणाऱ्या संकल्पाचा हा सर्व विलास आहे, असें निःसंशय जाणून व त्या सर्वांचा त्याग करून परमात्मरूप हो आणि शांतीचा अनुभव घे १०१.

**सर्ग १०२, १०३**—या सर्गांत अहंकारसंकल्पाच्या क्षयाचा उपाय, अनात्म्याचा विवेक, परमात्म्याची नित्यता व मूढ मनाची अनर्थावह यात्रा यांचें वर्णन करितात.

**श्रीवसिष्ठ**—रामा, मूढ आपल्या संकल्पाच्या योगानेच मोहांत पडतो. पण पंडित अक्षय वस्तूमध्ये उगीच क्षयाची कल्पना करून त्याच्याप्रमाणें मोहांत पडत नाहीं.

**श्रीराम**—पण, गुरुराज, संकल्प करणारा कोण ? व तो संकल्प कशाचा करितो ? तें मला सांगा.

**श्रीवसिष्ठ**—सिंह, व्याघ्र, इत्यादि प्राणीच मी आहें, अशी अहंवासना ज्यास आहे, असा अविद्योपहित परमात्माच संकल्प करितो. अहं हाच त्याच्या संकल्पाचा विषय आहे. पण तो अहंभाव आत्म्याचा स्वभाव नसल्यामुळें आत्म्याप्रमाणे नित्य नाहीं तर अनित्य आहे. कारण एक परिपूर्ण वस्तूच जर सर्वत्र स्थित आहे तर हा 'अहं' मध्येच कोठून आला, हें सांगता येत नाहीं. म्हणून तो मिथ्या आहे. सूर्याच्या प्रखर उन्हामध्यें अज्ञ मार्गस्थास जसा जलाचा भास होतो त्याप्रमाणें अखंड वस्तूस न जाणणाऱ्या अनात्मज्ञास या अहंकाराचा अनुभव येतो. मन हाच एक महा चिंतामणी असून संसार हें त्याचेंच कार्य आहे. यास्तव रामा, निराश्रय भ्रांतीचा त्याग करून साश्रय, सत्य व आनंदरूप अशा यथार्थ ज्ञानाचा आश्रय कर. मोहशून्य व विचारयुक्त अशा बुद्धीनें सत्याचा

निश्चय कर व असत्याचा त्याग कर. अनत आत्मतत्त्व बद्ध होणें मुळींच शक्य नाहीं. पण असे असूनही मी बद्ध आहे, असें खोटेंच समजून तू उगीच कष्टी का होतोस? नाना व अनाना ह्मणजे द्वैत व अद्वैत या दोन्ही प्रकारच्या कल्पना जेथें नाहींत अशा ब्रह्मामध्ये बद्ध काय असणार व मुक्त काय आहे? आरोग्य, व्याधि इत्यादि सर्व देहाचे धर्म आहेत. आत्म्याचे नव्हेत; असें समजल्यावर देह नाहींसा झाला, तुटला, क्षीण झाला किवा त्याचे आणखीं काहीं झालें तर त्यात आत्म्याची कोणती हानि आहे? लोहाराचा भाता जरी एकादे वेळीं जळला तरीं त्यामुळे त्यातील वायूची काहीं हानि होत नाहीं. त्याप्रमाणें हा देह पडो, उठो, आकाशात उडून जावो कीं, पृथ्वींत गडप होवो त्याच्याहून अगदी विलक्षण असलेल्या माझी त्यापासून काही हानि होणे शक्य नाहीं. रामा, मेघ व वायु अथवा भ्रमर व कमल याचा जसा सबध होतो त्याचप्रमाणे तुझे शरीर व तुझा आत्मा याचा सबध झाला आहे व भिन्न वस्तूंचा सयोग अनित्य असतो हेंही तुला ठाऊक आहे. शरीरादि सर्व जग मनोमात्र असल्यामुळेही शरीराचा नाश झाला तरी मन असे पर्यत त्याकरिता शोक करणें उचित नव्हे. मग ते आत्ममात्र असल्यामुळें शरीरनाशाकरिता शोक करणें युक्त नव्हे, हे काय सागावे? रामा, मन हे सर्व जगाचें सूक्ष्म शरीर आहे. कारण तें जगाची कारणभूत आद्य शक्ति आहे. तेव्हा जगाचा नाश झाल्यानें त्याचा नाश होणे शक्य नाहीं. मग मनाचेंही कारण अथवा त्याच्याही पलीकडे असलेला जो आत्मा त्याचा नाश कसा होणार? तस्मात् आत्म्याचा नाश होतो अशी भ्राति सर्वथा युक्त नव्हे. मेघ छिन्न भिन्न होऊन गेला ह्मणजे व वायु किंवा कमल सुकून गेलें ह्मणजे भ्रमर जसा आकाशात उडून जातो त्याप्रमाणें देहक्षय झाला असता मनउपाधियुक्त आत्मा अन्यत्र जातो. संसारात दीर्घकाल भ्रमण करणाऱ्या मनाचाही नाश ज्ञानावाचून होत नाहीं. मग आत्म्याचा कसा होणार? भाडे व त्यातील बोरे किंवा घट व त्यांतील आकाश यांचाच न्याय देह व आत्मा यासही लागू आहे. भांडें फुटलें असतां बोरें हातात घेतात व भाडें टाकितात. त्याप्रमाणें देह–पात झाला कीं, आत्मा अनंत आकाशांत जातो. कुभ फुटला तरी त्यांतील आकाश नाश न पावतां जसेंच्या तसेंच असतें. त्याप्रमाणें देह क्षीण झाला तरी देही अबाधित रहातो.

प्राण्याचा हा मनोदेह वारवार मरणरूपी वस्त्राने आच्छादित होत असतो तेव्हा या वंचकाविषयी उगीच का शोक करावा? पूर्व कालव पूर्व देश यास सोडून गेल्याने आत्म्याचा नाश होतो, असें कसे ह्मणता येईल ? देहा-प्रमाणें आत्म्याचा नाश होत असतो, असे कोणालाही प्रत्यक्ष दिसत नाही. किंवा कोणत्याही प्रमाणानें दाखवितां येणे शक्य नाहीं. यास्तव, बा रघु-राया, पख फुटल्यावर पक्ष्याचे लहान पिलु अतरिक्षात उडून जाण्याविषयी उत्सुक होऊन जसें आपलें घरटें सोडिते त्याप्रमाणे तू "अह"ही खोटी वासना टाक ही मानसी शक्तीच इष्ट व अनिष्ट विषयामध्ये क्रमानें प्रेम व द्वेष याच्या योगाने प्राण्यास बद्ध करीत असते. ही अविद्येच्या विलासरूप असल्यामुळें स्वतः अविद्या आहे. ही दुरत (कष्टाने नाश पावणारी) आहे. प्राण्यास दुःख देण्याकरिताच ही उत्तरोत्तर वृद्धि पावते. हिच्या रूपाचे ज्ञान होई पर्यंत ही हे असन्मय जग पसरून दाखवीत असते. भावना हेच हिचे स्वरूप आहे व त्या( स्वरूपा )चा क्षय विचाराने होत असतो. ही मानस-शक्ति दु खाचें मूळ असल्याकारणाने तिचा नाश सर्वास इष्टच आहे व एकदा महा प्रयासानें मनोनाश सपादिला ह्मणजे पुनः अनर्थाचा उद्भव होत नाहीं. कारण मनाचे यथार्थ स्वरूप जोवर समजलेले नसतें तोवर तें हे इद्रजाल पसरते व त्याचे स्वरूप समजले ह्मणजे त्याच्या हातून काहीं होत नाहीं. साराश याप्रमाणे मनच दीर्घकाल जगरूपाने नाचतें व शेवटीं आपणच विद्यारूप होऊन आपला नाश करून घेते. विद्येच्या योगाने आत्मवध नामक नाटक करण्यात ते मोठे चतुर आहे. अहो हें चित्त केवल आपल्या नाशाकारिताच आत्म्यास पहातें. कारण मूर्खास आपला प्राप्त झालेला नाश कसा समजणार? असो; मनोनाश कोणत्या उपायानें होईल असें ह्मणून उपाय शोधणाऱ्या विवेक्यास हें मनच आपल्या नाशाचा उपाय सुचविते. विवेकयुक्त मन आपला संकल्प-विकल्पात्मक स्वभाव सोडून ब्रह्माच्या आकाराचे ( ह्म. सर्वव्यापी, अति विस्तृत ) होतें. अर्थात् त्याचा आत्मसाक्षात्काररूप परिणाम होतो. मनो-नाश हाच परम पुरुषार्थाचा लाभ व सर्व दुःखाचा उच्छेद होय. यास्तव रघुनाथा, तूं मनोनाशाविषयीं प्रयत्न कर. त्याच्या बाह्य व्यापाराविषयीं मुळीच प्रयत्न करावयास नको. पण असें न करिता या मनाची उपेक्षा केल्यास मात्र मोठा अनर्थ ओढवेल.

श्रीवाल्मीकि—राजा, मुनि वसिष्ठ इतकें सांगत आहेत तो सूर्यास्त समय झाला आणि त्यामुळे मुनींचा अमृततुल्य उपदेश ऐकण्याची उत्कट इच्छा असतांनाही नित्यकर्माचा लोप होऊं नये ह्मणून सभासद स्वस्वस्थानीं गेले व दुसऱ्या दिवशीं सर्व प्रातःकृत्यें आटोपून ते पुनः सभेंत येऊन बसले. ( येथे आठवा दिवस समाप्त झाला )

श्रीवसिष्ठ—राघवा, हे मन परमात्म्यापासून अनर्थ करण्याकरितांच उत्पन्न झालें आहे. ते आपल्या अचिंत्य सामर्थ्यानें आत्म्यास अनात्मा व अनात्म्यास आत्मा करितें. टीचभर लांबरुंद पदार्थास केवळ कल्पनेनें तें मोठ्या पर्वताएवढा करितें. त्यामध्ये हे असें विचित्र सामर्थ्य कोठून आलें? ह्मणून ह्मणशील तर सांगतो. परम पदापासून तें लब्ध–प्रतिष्ठ झालें आहे. ह्मणजे ब्रह्माच्या सत्तेनें तें विचित्र शक्तियुक्त झालें आहे, व त्या कारणानेंच तें एका निमेषांत संसारास रचितें, व नाहींसें करितें. अनुभवास येणारें हे सर्व स्थिर–चर जग या मनामुळेच स्थित झालें आहे. ते एकाद्या नटाप्रमाणे क्षणोक्षणीं आपले आकार बदलतें प्राण्याचे हस्तपादादि सर्व अवयव या विलक्षण मनाच्याच अधीन असतात. त्यामुळे त्या( मना )स हवें असेल तेंच ते ( अवयव ) घेतात. व त्याला नको असेल त्याचा त्याग करितात. बालक आपल्या इच्छेप्रमाणे मातीचीं जशीं अनेक खेळणीं बनवितें त्याप्रमाणें मन जगांतील पदार्थांस बनवितें. यास्तव सोनें विकत घेणारा सोनार दागिन्याच्या आकाराकडे लक्ष न देतां सोन्याकडेच जसें तें देतो त्याप्रमाणे विवेकी पुरुषानें जग, भुवनें, वनें इत्यादि सर्व मनोमात्र आहे, असें पहावें. पदार्थांच्या निरनिराळ्या आकाराकडे लक्ष देऊं नये १०२, १०३.

**सर्ग १०४—या सर्गांत लवणाख्यानास आरंभ केला आहे. लवण राजाचे गुण, ऐंद्रजालिकाचें व अश्वपालकाचें आगमन, अश्वदर्शन व त्यामुळें झालेली चमत्कारिक स्थिति यांचें वर्णन करितात.**

श्रीवसिष्ठ—रामचंद्रा, याविषयीं मी तुला एक उत्तम वृत्तांत सांगतों. त्याच्या श्रवणानें जगाची चमत्कारिक स्थिति चित्ताच्याच अधीन कशी आहे तें तुला चांगलें समजेल. या पृथ्वीच्या पाठीवर उत्तरा–पांडव ह्मणून एक मोठा देश होता. तो पर्वत, वनें, नद्या, नगरें, पत्तनें, ग्राम, पशु, पक्षी, सर्व जातीचे व वर्णाश्रमसंपन्न लोक, यांनीं संपन्न होता. शेती,

व्यापार, नानाप्रकारच्या कला इत्यादिकांची तेथे अतिशय समृद्धि होती. पुष्पें, फळें, मूळें, इत्यादि उपभोग्य वस्तूची तेथे कधी वाण नसे. त्या देशात हरिश्चंद्राच्या कुलात उत्पन्न झालेला लवण नावाचा एक अति धार्मिक राजा होता. सूर्याच्या प्रकाशाप्रमाणें त्याचे यश सर्व भूमीवर पसरलें होतें. त्याच्या प्रभावामुळें त्यास कोणी शत्रुच नव्हता. भगवान् विष्णूच्या चरित्राप्रमाणें त्याचे प्रजापालनरूप चरित्र लोक मोठ्या आदराने ऐकत असत. फार काय, पण स्वर्गलोकीं अप्सराही त्याची कीर्ति गात असत. त्याचे औदार्य व अदैन्य हे गुण प्राय. दुसऱ्या कोणत्याही राजाचे ठायीं आढळत नव्हते. कपट ह्मणजे काय, हे तो जाणतही नसे. अनम्रता त्यास कधीं स्पर्शही करीत नसे.

असो, एकदा चार घटिका दिवस आला असता तो राजा आपल्या रम्य सभेत सिंहासनावर येऊन बसला. त्याबरोबर सभेतील इतर मान-करीही आपापल्या स्थानीं विराजमान झाले. स्त्रिया गावू लागल्या. मृदंग, वीणा, मुरली इत्यादिकाचे रमणीय ध्वनि श्रवणेंद्रियास सुख देऊ लागले. चामरे धारण करणाऱ्या स्त्रिया राजावर चवऱ्या वारू लागल्या. गुरु व शुक्र याच्यासारखे तेजस्वी व सुज्ञ मत्री राजाच्या बाजूस बसले. भाट त्या महाराजाची स्तुति करूं लागले व येणेंप्रमाणे त्या भव्य सभेत मोठें कौतुक चाललें. इतक्यात एक ऐंद्रजालिक ( मायावी, गारुडी ) चमत्का-रिक वेष धारण करून मोठ्या ऐटीनें सभेत आला. त्या धृष्ट पुरुषानें थेट राजाच्या समोर अगदीं समीप जाऊन त्यास मोठ्या नम्रपणे वदन केलें व हात जोडून ह्मटले, " राजन्, मी एक आपल्यास मिथ्या कौतुक क्रीडा ( जादूचा खेळ ) करून दाखवितों. ती आपण स्वस्थानीं बसूनच पहावी. " इतके बोलून त्यानें लागलाच आपल्या हातांतील मोरांच्या पिसाचा कुंचला आपल्या भोंवतीं फिरविला. परमात्म्याच्या माये-प्रमाणेंच ती पिच्छिका प्राण्यास भ्रम पाडणारी होती. त्यानें तिला फिरविताच ती तेजाने व्याप्त असल्यासारखी त्या राजास दिसली. इतक्यात एक अश्वपालक सभेत आला. त्याच्या मागून एक घोडा येत होता. तो अतिशय देखणा असून मोठा चपलही होता. त्याचे लगाम हातात धरून तो अश्वपालक राजास ह्मणाला, " राजा, इंद्राच्या उच्चैःश्रवासारिखा हा घोडा फार चपळ आहे. वायूसारिखा वेगवान्

आहे. आमच्या प्रभूने ह्मणजे सिंधुराजाने हें रत्न तुला मोठ्या आनंदाने अर्पण केलें आहे. कारण योग्य वस्तूचा समागम अतिशय शोभत असतो." अश्वपाल इतकें बोलत आहे तों ऐंद्रजालिक राजास ह्मणतो, " हे प्रभो, याच्यावर आरूढ होऊन सूर्याप्रमाणे तू सर्व भुवनात विहार कर." ते ऐकून राजा आपल्या आसनावरून त्या अश्वाकडे टक लावून पाहूं लागला. काहीं वेळानें तो अगदीं निश्चेष्ट होऊन चित्राप्रमाणे स्तब्ध बसला. बाह्य दृष्टीचा त्याग करून योगी जसा अतरगातील परमानदात निमग्न होऊन रहातो तशी त्याची अवस्था झाली. राजाची ती अपूर्व दशा पाहून सभेतील सर्व लोक भयभीत झाले. त्या सभेंतील स्वाभाविक कोलाहल आपोआप व एकाएकीं बद झाला. प्रत्येक लहान-थोर सभासद राजाच्या निश्चल स्थितीकडे आश्चर्याने पहात राहिला. कोणाला काहीं सुचेना. राजाच्या विलक्षण प्रभावामुळे त्यास स्पर्श करण्याचेही कोणास धैर्य होईना व त्या कारणानें जो तो किंकर्तव्यतामूढ होऊन श्वासोच्छ्वासही न करिता स्तब्ध होऊन बसला १०४.

**सर्ग १०५**—या सर्गात-राजा सावध होऊन मोह-अवस्थेंतील आपला अनुभव सागू लागला-असें वर्णन करितात.

**श्रीवसिष्ठ**—रामराया, तो राजा चार घटिका मोहावस्थेंत होता. व त्याचे मुख्य अधिकारी आता काय करावें, या चिंतेत निमग्न होते. पण त्यांतील अनुभवी वृद्ध आपापल्या मतीप्रमाणें उपाय योजीत आहेत तों तो भूपाल आपोआप सावध होऊन नेत्र, हात इत्यादि चाळवूं लागला. त्यामुळें सभेंतील सर्वांसच आनद झाला, हें सांगणें नलगे. पण त्या उत्तम वीराच्या अगांतील शक्ति त्यावेळीं क्षीण झाली होती. त्यामुळें त्याचे हात पाय कापू लागले व तो आपल्या उंच सिंहासनावरून एकाएकीं खालीं पडूं लागला. तेव्हा जवळच्या त्याच्या परिजनानीं त्याला धरिलें. त्याचें चित्त अजून भ्रमण करीत होते. मी आपल्या सभेंत बसलो आहें, याचेंही त्यास भान नव्हतें. आपल्यास कोणी तरी धरून बसविलें आहे, असे पाहून तो मंदस्वरानें ह्मणतो--मी कोठें आहें ? हे इतके लोक येथें का जमले आहेत. तें ऐकतांच मंत्री भयभीत झाले व त्याच्याजवळ जाऊन मोठ्या आदरानें ह्मणाले-महाराज, आपण हें असें काय विचारिता ! आपली एकाएकीं अशी अवस्था कां झाली ? आमचें चित्त अतिशय

व्याकुळ झालें आहे. आपण आपले सहज धैर्य का सोडितां? आपल्या चित्तास भ्रम झाला आहे, असें दिसते. पण आपल्यासारिख्या विवेक्यास भ्रमाची बाधा व्हावी हे मोठें आश्चर्य आहे. सामान्य पामर जनाचें चित्त सकृद्दर्शनीं रमणीय वाटणाऱ्या पण अनुभवातीं विरस ठरणाऱ्या विषयामध्ये जसे आसक्त होते तसें आपले उदार चित्त मोहयुक्त होणें चागले नव्हे. कारण त्याच्या व तुमच्या—ज्ञान, धैर्य, अभ्यास, अनुभव, प्रभाव, इत्यादिकात महत् अतर आहे. सतत विवेकसपन्न असलेल्या आपल्या अतरगास मोह स्पर्श करण्यास तरी कसा समर्थ झाला ? कारण मत्र, तत्र, इत्यादिकाचा प्रभाव असस्कृत चित्तावर घडत असतो. सस्कृत-चित्तावर त्याचा काहीं परिणाम होत नाहीं. तर महाराज, सावध व्हा व आमच्या सशयित जीवितास आधार द्या. राघवा, त्याचे हे उत्साह-जनक भाषण ऐकून तो राजा चागला शुद्धीवर आला. त्यामुळें त्याचें मुख पूर्वीप्रमाणें शोभू लागलें. शिशिर ऋतु सपून वसत लागला असतां वृक्षास जशी टवटवी येते त्याप्रमाणे राजाचे प्रसन्न मुख पाहून सभास-दाच्या तोंडावर टवटवी आली. पण समोर असलेल्या ऐंद्रजालिकास पाहून राजाचें मुख आश्चर्य व भय याच्या छटेनें युक्त झालें. तथापि मोठ्या धैर्यानें तो त्यास ह्मणाला, “ अरे अविचाराने काम करणाऱ्या गारुड्या, तू काय हें केलेंस ? विवेकाच्या योगाने अति बलवान्—झालेल्या माझ्या मनासही तू मोहात पाडिलेंस ? खरोखर परमात्म्याच्या प्रत्येक पदार्थामध्यें शेंकडों अद्भुत शक्ति असतात. लौकिक व्यवहारातील सिद्धा-तार्चे रहस्य जाणणारे आह्मी कोठें व आताच मी अनुभविलेल्या आपत्ती-प्रमाणें मनास भयकर मोह पाडणाऱ्या आपत्ती कोठें ? महाज्ञानाचा ज्यास परिचय झाला आहे असें मन जसें केव्हा केव्हा देहावर अहभाव ठेवितें त्याप्रमाणें बुद्धिमानाचें मनही केव्हा केव्हा मोहांत पडतें, यात सशय नाहीं. असो; सभासदानों, या मायावी पुरुषानें थोड्याशाच वेळात मला अनेक चंचल दशा दाखविल्या. पूर्वी एकदा एकट्याच इद्राला गांठून त्याचा पराभव करावा अशा उद्देशानें बलि पातालातून निघाला. तेव्हां दैववशात् त्यास इंद्र एकटाच भेटला. पण युद्ध करण्यास सज्ज झालेल्या बलीस इद्रानें आपल्या मायेनें नानाप्रकारची सेना निर्माण करून मोहित केलें व त्यास त्या मोह—पाशानेंच बांधले. तेव्हा बलीनें ब्रह्मदेवाची

प्रार्थना केली. दयाळु ब्रह्मदेव त्याच्यावर कृपा करण्याकरितां आला व इंद्राच्या मायिक सृष्टीचा ध्वंस करूं लागला. परंतु इंद्रानें प्रार्थना केल्यामुळें त्यानें जसें त्या मायिक सृष्टीचें थोडा वेळ कौतुक पाहिलें त्याप्रमाणें मीं याच्या मायिक सृष्टीचा चमत्कार पाहिला आहे, तो तुम्हांस सांगतों. असें बोलून व सर्व सभा तो ऐकण्याविषयीं अतिशय उत्सुक झाली आहे, असें पाहून राजा असें सांगूं लागला १०५.

**सर्ग १०६**—*या सर्गांत अश्वानें वनांत नेलेल्या आपला चांडाल कन्येशीं विवाह कसा झाला, ते राजा सांगेल.*

**राजा**—सभासदानों, विविध पदार्थ, नद्या, समुद्र, वनें, पर्वत इत्यादिकांनीं भरलेला व त्यामुळेंच या पृथ्वीमंडलाचा जणुं काय सख्खा धाकटा भाऊच, असा हा एक प्रदेश आहे. त्यांत हा मी पौरजनांच्या मनाप्रमाणें वागणारा राजा असून इंद्र जसा स्वर्गांत बसतो त्याप्रमाणें मी या तुमच्या सभेंत स्थित आहें. इतक्यांत रसातलांतून वर आलेल्या मयासुराप्रमाणें हा शांबरिक ( मायावी, गारुडी ) येथें आला. यानें ही ( पिसाची जुडी ) फिरविली व तिला इंद्रधनुष्याप्रमाणें तेजोमय केलें. नंतर मला एक घोडा दिसला. याच्या व त्या घोड्याच्या पालकाच्या सांगण्यावरून मी एकटाच त्याच्या पाठीवर आरूढ झालों. तो अश्व प्रलय कालच्या मेघाप्रमाणें चपळ होता. त्याच्यावर बसून मृगया करण्याकरितां म्हणून मी निघालों. सकृद्दर्शनीं रमणीय वाटणाऱ्या विषयाच्या अभ्यासानें जड झालेलें मन अज्ञास जसें स्वार्थापासून फार दूर नेतें त्याप्रमाणें त्या वायुतुल्य अश्वानें मला फार दूर नेलें. निष्कांचन यतीच्या मनाप्रमाणें शून्य, स्त्रीचित्ताप्रमाणें लघु, विषम ( कठिण ) प्रलयसमयीं जळलेल्या ब्रह्मांडाप्रमाणें भयंकर, पक्षिरहित, वृक्षरहित, जलरहित, अति शीतसंपन्न व अनंत अशा एका अरण्यांत मी पोंचलों. त्यावेळीं माझा तो घोडाही फार थकला होता. तें अरण्य ज्ञानी पुरुषाच्या ब्रह्ममय चित्ताप्रमाणें विस्तृत, मूर्खाच्या क्रोधाप्रमाणें दुर्गम, जनसंसर्गरहित व ज्यांत तृण आणि पल्लवही उगवलेले नाहींत, असें होतें. ते प्रति आकाशच आहे, अथवा आठवा सागर आहे, असें मला क्षणभर वाटलें. अन्न, फळें, मूळें यांसही महाग झालेल्या आप्त—इष्टरहित व अठरा विसवे दारिद्र्य भोगणाऱ्या ललनेप्रमाणें असलेलें तें अरण्य पाहून माझी मति खिन्न झाली.

त्यात जिकडे पहावें तिकडे मृगजल दिसत असे. पण खऱ्या जलाचा एक बिंदुही मला मिळेना! पण आता दिवस अगदीं थोडा उरला आहे, असें जाणून मी पुनः त्या घोड्यावर बसलों व विवेकाच्या सहायानें सुज्ञ जसा भयंकर ससारसागर तरण्यास सज्ज होतो, त्याप्रमाणें मी त्या अरण्यांतून पार जाण्यास तयार झालो. सर्व दिवसभर शून्य आकाशात फिरून सूर्याचा अश्व त्यास जसा शेवटीं अस्ताचलास पोचवितो त्याप्रमाणे त्या माझ्या अश्वानेंही मला त्या मोठ्या अरण्यातून पार नेऊन दुसऱ्या एका अरण्यात पोंचविलें. त्यात जबू ( जाबुळ ) व कदब वृक्ष फार होते. पक्ष्यांचे मधुर ध्वनी ऐकू येत असत. त्यात जलाचाही अगदीच अभाव नव्हता. त्यामुळें कोठे कोठ उगवलेले हिरवे गवतही आढळत असे. त्यामुळें माझ्या मनाला थोडेसे बरे वाटले कारण मरणाच्या असह्य दु:खाहून व्याधींचे दुःख जसे प्राण्यास पतकरते त्याप्रमाणे पूर्वींच्या त्या नीरस अरण्याहून मला हे दुसरे अरण्य बरे वाटले. माझा घोडा त्यातून वेगाने चाललाच होता. त्याला थाबविण्याकरिता मी पुष्कळ यत्न केला, पण दरिद्र्याच्या सेवकाप्रमाणे तो माझा अव्हेर करून वेगाने पुढेच चालला. तेव्हा आता काय करावे, या विचारात मी पडलो. तो मला जबीर वृक्षाचा समूह समोर दिसला व दैववशात् तो माझा उद्दाम घोडाही त्याच्या खालूनच चालला. तेव्हा मी मोठ्या धैर्याने त्यातील एका वृक्षाच्या शाखेस दोन्ही हातानी घट्ट धरिले. त्याबरोबर गंगास्नान करिताच सर्व दुरिते जशी पार निघून जातात त्याप्रमाणे तो चपल अश्व माझ्या खालून निघून गेला दीर्घ प्रवासाने थकून गेल्याकारणानें मी त्यावेळीं फारच खिन्न झालो होतो. म्हणून मला घोडा गेल्याचें मुळींच वाईट वाटलें नाही. मी अगोदर त्या वृक्षाखाली स्वस्थ बसलों. मला त्यावेळीं तो जबीरवृक्ष कल्पतरूप्रमाणें सुखकर वाटला. पण इतक्यांत सूर्यास्त होऊन सर्व प्राण्याचे पुण्यकारक व्यवहार बद झाले असतां अंधकारानें सर्व भूगोलास व्यापून टाकिले व त्याबरोबर त्या जगलात रात्रिंचराचे अशुद्ध व्यवहार सुरू झाले. त्यामुळे माझें हृदय अतिशय भयभीत झालें व कापू लागले. मी क्षत्रिय व राजा आहे, हे विसरून गेलों. आता या काळरात्रींतून मी कसा पार पडणार, ही चिंता माझ्या मनास जाळू लागली. रात्रिंचर हिंस्र प्राण्यापैकी कोणी मला पाहू नये म्हणून मी त्या वृक्षाच्या ढोलांत, घरव्यात लपून बसलेल्या

पक्ष्याप्रमाणें, लपून बसलों. मोहांत मग्न झालेल्या मला ती रात्र कल्पाएवढी मोठी वाटली. त्या दिवशीं स्नान नाहीं, पूजन नाहीं व भोजनही नाहीं. रात्री निद्रा नाहीं. जरा कोठें पानाचाहि जरी ध्वनि झाला तरी माझ्या उरात धस्स होत असे. पण कोणताही काल स्थिर रहाण्याकरिता येत नसतो; या न्यायानें पहाट झाल्याचा मला भास झाला. कारण दुष्ट प्राण्यांचा सुळसुळाट कमी होऊन तें अरण्य आता अगदीं शात झालें होतें. तेव्हां सुमारे चार प्रहर लपवून ठेविलेले व घामानें डवडवलेले मुख जरा वर करून मीं बाहेर डोकावलें तो पूर्वदिशा आरक्तवर्ण व उज्ज्वल झाली आहे असें माझ्या दृष्टोत्पत्तीस आले. शीतल वायूचाही स्पर्श मला सुखवू लागला. पुष्पसुगधानेही माझी योग्य सेवा केली. मी अगदी प्रथम जेव्हा सुप्रभात पूर्वदिग्वधूकडे पाहिले तेव्हा ती अबला माझ्या या भितऱ्या स्वभावास हसतच आहे, असे मला वाटले. असो, नतर थोड्याच अवकाशानें, अज्ञाला ज्ञान किंवा दरिद्र्याला सुवर्ण जसे मिळावें त्याप्रमाणें मला भगवान् सूर्याचें चिरकांक्षित दर्शन झाले. पापाची निवृत्ति झाली असता व पुण्य वाढले असता मानवाचे चित्त जसे निर्भय होतें त्याप्रमाणेच माझे मन त्यावेळीं निर्भय झालें. रात्रीची भीति पार निघून गेली व राहून राहून मला त्या माझ्या अवस्थेचें आश्चर्यही वाटलें. पण प्रसग पडल्याने मनुष्य अधिकाधिक सहिष्णु होतो, असें ह्मणतात तें खोटें नव्हे. ‘ मला आजन्म असा घोर प्रसग ठाऊक नव्हता व त्यामुळे तो काल दुःसह झाला. पण आज पुनः तसा प्रसग आल्यास भ्यावयांचे नाहीं ’ असा निश्चय करून मी वृक्षावरून खालीं उतरलों व त्या वनात पायानींच चोहोंकडे हिंडूं लागलों. तें अरण्यही अतिशय मोठें होतें. मी चारी दिशेत दूरवर चालून गेलों. पण मूर्खाच्या शरीरात उत्तम गुण जसे आढळत नाहींत त्याप्रमाणें मला तेथें कोणी भेटलें नाहीं. केवल या वृक्षावरून त्या वृक्षावर व त्या वृक्षावरून या वृक्षावर निर्भयपणें उडणारे व “ चीं चीं ” शब्द करणारे अनेक पक्षी आढळले. पण एक प्रहरभर दिवस येऊन दव सुकून गेला असतां व त्यामुळें त्या अरण्यातील वेली जणुकाय स्नान करून निर्मल झाल्या असतां त्याच्या बाजू बाजूनें एक कन्या एका हातात अन्नाचें परळ व दुसऱ्या हातात पाण्याचें मडकें घेऊन हळु हळु येत आहे, असे मला दिसलें.

खरोखर त्या रमणीस पाहून मला पुराणांतरीं ऐकिलेल्या मोहिनीच्या रूपाचेंच स्मरण झाले. मी त्या सुंदरीजवळ गेलो व ह्मटलें " हे कुमारि, मला अतिशय क्षुधा लागली आहे. दोन दिवस अन्न व जल यांचें दर्शनही न झाल्यामुळें माझे प्राण व्याकुळ झाले आहेत. यास्तव, बालिके, मला हे अन्न व जल दे. ( प्राण जाण्याचा प्रसंग आला असतां त्यांच्या रक्षणार्थ कोणाच्याही हातचें व अभक्ष्यही अन्न-जल घेतले तरी त्यांत दोष नाहीं, असें धर्मशास्त्रांत, उपनिषदांत व वेदांतसूत्रांत सांगितले आहे. ) मी दीन होऊन तुजजवळ ही याचना करीत आहे व दीनाचें दुःख नाहींसे केले असतां मोठे पुण्य लागून शिवाय ऐहिक उत्कर्षही होत असतो. क्षुधेसारिखे दुसरे दुःख नाहीं. नागीण क्षुधेनें व्याकुळ झाली असतां आपलीं अंडीही खाते, हे तुलाही ठाऊक असेलच. ( दुष्काळ पडला असतां मनुष्येंही आपल्या पोटच्या गोळ्यास विकून आपले दग्धोदर कसें भरीत असतात हे आह्मा दुर्दैवी भारतीयास तरी अलीकडे चांगले ठाऊक झाले आहे. ) सभासदानों, याप्रमाणे मी तिच्यापाशीं याचना केली. पण तिने मला कांहींएक उत्तर दिले नाही. पण मी तिच्या मागून चाललो. ती एका वनांतून दुसऱ्यांत, दुसऱ्यांतून तिसऱ्यांत अशा क्रमाने त्वरेनें जात होती व मीही छायेप्रमाणे तिच्या मागें होतों. पुष्कळ दूर गेल्यावर ती मला ह्मणाली, " अरे हारकेयूरयुक्त सत्पुरुषा, मी राक्षसी-सारखी क्रूर व मनुष्यें, अश्व, गज, इत्यादिकांसही खाणारी चांडाली आहें तेव्हां मी दिलेलें अन्न तुझ्या उपयोगाचें नाहीं. पण इतकें असूनही तू ते खाण्यास तयार असलास तरी सुद्धां नुस्त्या याचनेनें तें तुला मिळणार नाहीं. " इतकें बोलून ती कन्या जातां जातां माझ्याशीं विनोद करूं लागली; सरळ मार्गानें जावयाचेंच नाहीं; मध्यें उगीच उभें रहावयाचें; माझ्याकडे पाहून हंसावयाचेंच इत्यादि तिच्या चेष्टा पाहून मलाही थोडीशी अन्नाची आशा वाटली. बराच वेळ मी कांहीं बोलेन ह्मणून तिनें वाट पाहिली व शेवटीं ती आपण होऊनच मला ह्मणते, " तू जर माझा भर्ता झालास तर मी हें अन्न तुला देईन. कारण सामान्य जन स्नेहावाचून उपकार करीत नाहींत. माझा पिता या जवळच्याच शेतांत नांगर हांकीत आहे. त्यास भूक लागली असेल. वस्तुतः हें अन्न त्याचें आहे. पण तू जर माझा पति होत असशील तर

तें मी तुला देईन. कारण स्त्रियास पति प्राणाहूनही प्रिय असतो." तिचे हे चमत्कारिक भाषण ऐकून मी जरा चकित झालों. हा अधर्म मी कसा करू? असे माझ्या मनात आलें? पण काय करणार? आपत्तीमध्यें पडलेला प्राणी धर्म व अधर्म याच्याकडे फारसे पहात नाहीं. प्राण वाचविण्याकरिता मीं तिचें ह्मणणें मान्य केलें. तेव्हा तिने मोठ्या आनदानें मला त्यांतील अर्धे अन्न दिले. मी तें खावून व जबूफलाचा रस पिऊन तृप्त झालो. नतर मला तेथेच एका झाडाखालीं विश्राति घ्यावयास साग़ून ती काळीकुट्ट चाडाळकन्या, जणु काय आपले प्राण मुठीत धरून, जवळच्याच एका शेतात काम करीत असलेल्या भयकर आकाराच्या आपल्या पित्याकडे गेली. तिने मजविषयीचा वृत्तात व आपला मनोरथ त्यास सागितला. व " बाबा, तुह्मास आवडत असल्यास मी त्याच्याशी लग्न करीन " असे ती त्यास ह्मणाली तेव्हा त्याने तिला बरे आहे, असे ह्मटले. त्याने राहिलेले अन्न खाल्ले व दिवस मावळे तो शेत नागरिलें ती कन्याही तेथेच होती. मीही जरा विश्राति घेऊन ताजा तवाना झालों. सायकाल होताच त्या यमरूपी चाडालाने नागराचे बैल सोडिले व काळोख पडण्यापूर्वीच तो बैलास पुढे घालून तेथून निघाला. आह्मीं दोघेंही त्याच्या मागून चाललो व वेताळ जसे एका श्मशानातून दुसऱ्या श्मशानात जातात त्याप्रमाणे आह्मी सर्व दिवे लागताना चाडाळवाड्यात आलो. तेथील भूमि रक्ताने माखलेली असून त्या वाळलेल्या रक्तावर माशा घोगावत होत्या. वानर, कोंबडी व कावळे याची सोललेलीं शरीरे अर्धी मुर्धी कापून घेऊन बाकीची टागून ठेविली होती. नानाप्रकारचीं चामडी बाहेर वाळत घातलेलीं असून त्याचा दुर्गध दूरवर येत होता. रात्र पडली होती तरी घारी, गिधाडे, इत्यादि मासाहारी पक्षी घरावर बसून हाती लागलेल्या आमिषास चोचीने तोड-तोडून उदरात साठवीत होते. लहान लहान अर्भकें हातात मासाचा तुकडा घेऊन तो चाटीत व मिटक्या मारीत द्वारावरून उभी होती अगण्यात बसलेली वृद्ध खोडे आरडाओरड करणाऱ्या पोरास शिव्यागाळी देऊन कोलाहल न करण्याविषयी ओरडून सागत होती. ठिकठिकाणी हाडाचे ढीग पडले होते. असो, अशा त्या यमनगरीसारख्या चाडाळ वाड्यात आह्मीं सर्व शिरलों. आमच्या त्या नव्या श्वशुरगृहीं पोचताच तेथील एका मनुष्यानें

मला मोठ्या आदरानें आसन आणून दिलें. त्यावर मी बसलों. आमचे भावी श्वशुर व पत्नी घरांत गेलीं. त्याचे सेवक बैलांस बांधण्याकरितां गोठ्यांत घेऊन गेले व एक क्षणार्धांतच आमची सासू बाहेर आली. तिचे ते लाल व मोठे डोळे, काळाकुट्ट वर्ण, कर्कश ध्वनि, पिंजारलेले केस व अस्ताव्यस्त वस्त्र यास पाहताच माझें अंग थरथर कापू लागलें. पण मला पाहून तिला मोठे समाधान वाटले व ती आसपासच्या आपल्या मैत्रिणींना हाका मारमारून हा आमचा जामात पहा म्हणून मोठ्या कौतुकाने त्यास दाखवूं लागली. काही वेळाने भोजनाची वेळ झाली व एका चामड्यावर वाढलेलें अन्न मला खावयास दिले. पापी पुरुष आपलीं दुष्कर्में जशीं भोगतो त्याप्रमाणे मी ते अन्न फस्त केले. माझा—भावी श्वशुर, सासू व पत्नी—याचीं प्रेमाची वचने मी अगदीं अप्रसन्न मनाने ऐकत होतो. काही दिवसानी विवाह समारभ झाला. त्या चाडालांनी आपल्या पद्धती-प्रमाणे आमचा सर्व सोहळा केला व सापळ्यात पडलेला व्याघ्र जसा पोराची हवी ती चेष्टा मुकाट्याने सहन करतो त्याप्रमाणे मी तें सर्व सहनही केले. माझ्या श्वशुराचे भाऊबध मद्य प्राशन करून उन्मत्त झाले व त्यानीं गाणे, ढोल वाजविणे, नाचणे, अपशब्दाचा उच्चार करणें, व प्रसगीं एकमेकात मारामारीही करणें या निद्य कृत्यानीं आमच्या मंगलकार्यास शोभा आणिली १०६.

**सर्ग १०७**—या सर्गात राजा, आपले तेथें साठ वर्षे झालेले वास्तव्य व त्या जातीस उचित अशीं केलेलीं कर्मे याचे वर्णन करतो.

**राजा**—सभासदहो, फार काय सागू ? सात दिवस अहोरात्र चाल-लेल्या त्या विवाहोत्सवानें माझें चित्त सर्वस्वी त्याच्या अधीन झालें व मी पुष्ट चाडाल बनलों. पुढे आठ महिने लोटतात न लोटतात तों ती माझी भार्या गर्भवती झाली. विपत्तीपासून जशी दु खक्रिया उद्भवते त्याप्रमाणें तिला एक दुःखद कन्या झाली. मूर्खांच्या चिंतेप्रमाणें ती दिवसेंदिवस वाढूं लागली. तिला तीन वर्षे होत आहेत तों, दुर्बुद्धि जशी आशापाशात बाधून टाकणाऱ्या अनर्थास जन्म देते त्याप्रमाणें त्या चाडाल—कन्येस पुत्र झाला. पुनः आणखीं काहीं दिवसानीं दुसरी कन्या झाली. तिच्या पाठीवर आणखीं एक कन्या झाली. पुनः पुत्र झाला. याप्रमाणे मी त्या वनात मोठा कुटुबी बनलों. ब्रह्महत्या करणारा महापापी नरकांत चिंतेसह जशीं

अनेक संकटे घालवितो त्याप्रमाणे मी तेथे तिच्यासह अनेक वर्षें घालविलीं. त्या संसारात मी अनेक कष्ट सोशिले. पोरांना व स्त्रीला अन्न व वस्त्र कसे मिळेल या चिंतेने मला चांगली झोपही लागत नसे. मी डोक्यावर चुंबळ घेऊन त्यावरून, मूर्तिमत दुष्कर्माप्रमाणे, लाकडें वहात असे. मोठीशी फाटकी लंगोटी हेच काय ते माझें वस्त्र. पण तेही उवांनीं भरलेले असून, कित्येक दिवस त्यास जलाचा स्पर्शही होत नसल्यामुळे दुर्गंध येत असे. एका तृणाकरताही मी आपल्या शेजाऱ्याशी मोठा कलह करीत असे व प्रसंगी पशूप्रमाणे एकमेकाची मस्तके फोडण्यासही मी तयार होत असें. दारिद्र्य व अज्ञान या दोघाची जोडी जमली कीं, गुणाचा व ज्ञानाचा सर्वस्वी ऱ्हास होत असतो, असा नियम आहे. मी त्या अवस्थेंत दरिद्री तर होतोच. पण मोहित झालेल्या माझ्या मनात अज्ञानानेंही आपलें आसन स्थिर केलें तेव्हा औदार्यादि स्वाभाविक गुण व विद्या जर मला पारख्या झाल्या तर त्यात नवल ते कोणते ? ‘ क्षीण पुरुष निष्करुण होतात ’ या न्यायाने मी आपल्या स्त्रीस व अपत्यास क्रूरपणाने वागवीत असे. त्याना मी किती अवाच्य शिव्या दिल्या असतील याचे तर गणितच करता येत नाही. येथे माझा जरा कोणी अपमान केला तर तो मला असह्य होतो. पण तेथे मला प्रत्यक्ष माझी पत्नीही काय हवें ते ह्मणत असे; माझ्या अंगावर कर्कश वाणीने ओरडत असे. पण त्याचे मला कधींच काही वाटले नाही. रानडुकरास मारून, त्याचे मास खाऊन, उघड्या भूमीवर किंवा मोठ्या सपाट पाषाणावर पडून आह्मी रात्रीच्या रात्री घालविल्या. द्रव्याचे फारसे बल नसल्यामुळे मी आपल्या सासऱ्याच्या गृहातच एकीकडे रहात असें. पुष्कळवेळा सासरा व सासू याच्याशींही मला भांडण्याचा प्रसंग येई. कारण दुसऱ्याच्या गृहामध्यें राहिल्याने बराच उपसर्ग सोसावा लागतो व अपमानही वारंवार होतो. यास्तव कलहाने त्याचा प्रतीकार केल्यावाचून राहवत नाहीं. पण शेवटपर्यंत मला दुसऱ्याच्या घरातच आयुष्य घालवावे लागले. निग्रही तपस्व्या- प्रमाणे मला तेथें शीत, उष्ण व वर्षाव यास सहन करावें लागत असे. पाण्यात जाळें पसरून किंवा गळ टाकून मासे मारणे, वनांत फिरून शिकार करणे, जाळीं पसरून जीवंत पक्ष्यास धरणें, अवचित एकादा सधन वाटसरू भेटल्यास त्यास लुटणे इत्यादि कर्में, श्रोत्रियाच्या वेदाभ्यासा-

प्रमाणे अथवा शास्त्रज्ञाच्या शास्त्रापरिचयाप्रमाणे, माझ्या अंगवळणीं पडून गेली होतीं. प्राण्याच्या माना कापून, त्याच्या शरीरास सोलून, अवयवाचे तुकडे काढून ते शिजवून आपल्या दुष्ट उदरात कसे भरावे, हें मला चांगलें अवगत झाले होते व पर्वतातून फिरत असताना मी साक्षात् यमराजाचेच काम करीत असे. मोठमोठ्या अरण्यास आग लावून देऊन त्यातील हजारो प्राण्यास मी व्यर्थ मृत्युमुखी पाडीत असे. सभासदानों, मी राजाचा एकुलता एक समर्थ पुत्र असूनही काही प्रबल दोषामुळे साठ वर्षे अशा आपत्तीत पडलो होतो १०७.

**सर्ग १०८**—आता या सर्गात अनावृष्टीमुळे त्या देशात दुष्काळ पडून कशी दुर्दशा झाली तें राजा सागतो.

**राजा**—माझ्या प्रिय सभासदानो, अशा रीतीने कालाशीं कलह करिता करिता व सुखाचे किंवा दु.खाचे दिवस लोटता लोटतां मी वृद्ध झालो, माझे केस पिकले, मी राजा आहे, या गोष्टीचे पूर्णपणें विस्मरण होऊन मी चाडाल आहे, ही माझी भावना त्यावेळी दृढ झाली होती. इतक्यात आजपर्यंत भोगलेले दुःख पुरेसे नाही, असे समजूनच जणु काय दैवाने मला असह्य दुर्भिक्ष-दुःखही दाखविले. पावसाळ्यात एकदाही पाऊस न पडल्यामुळे आमच्या प्रातातील सर्व रान सुकून गेले. वृक्षावरील पानेही सुकून व कोमेजून जाऊन, वाऱ्याच्या झुळुकीबरोबर, निर्जीव शरीराप्रमाणें, पटापट खालीं पडू लागलीं. जगलास वणवा लागून अनेक औषधी, वनस्पती व प्राणी प्रत्यही जळून जात दोन दोन कोसातही पाण्याचा बिंदु आढळेनासा झाला. कारण भगवान् सूर्याच्या प्रखर किरणानीं प्राय सर्व जलाशय शुष्क करून सोडिले होते. सर्व दिवसभर सोसाट्याचा वारा सुटून त्याबरोबर जळलेल्या अरण्यातील राख व धूळ उडून येत असे व त्यामुळे प्राणिमात्राच्या अंगावर त्याचीं पुटे बसत. आदल्या वर्षाचें अन्न काहीं दिवस पुरलें. पण पुढे त्याचाही अभाव झाला. आह्माला भक्ष्याभक्ष्य विचार मुळीं नव्हताच. त्यामुळें काही दिवस आह्मीं दुसऱ्याच्या शरीरावर आपलीं शरीरें वाचविलीं. पण पुढे त्याचाही अभाव झाला. अरण्यात दिवसाचे दिवस फिरूनही एकादें श्वापद किंवा पक्षी मिळेनासा झाला. फार काय पण सिंहासारखे प्रबल व मानी प्राणीही दगड खात आहेत व मांसाच्या भ्रमानें पर्वतावरील गेरूचे लाल खडे चघळीत आहेत, असें आढळूं लागलें. लांकडें

खावीं तर त्यांची राख झालेली. माती खावी तर ती शुष्क, व दगड खावे तर ते चावत नाहींत, अशी सर्व बाजूनीं पंचाईत झाली. मनुष्यांस मनुष्यांनीं खाण्याचा प्रसंग आला. मुकलेल्या हाडांचें पीठ करून त्यान्यावरही आह्मीं काहीं दिवस काढले. पण अशानें किती दिवस निभाव लागणार ? पतीनें स्त्रीच्या मुखाकडे, स्त्रीने पोराच्या तोंडाकडे व पोरांनीं बापाच्या तोंडाकडे पाहून व हाय, हाय, अन्न, अन्न, पाणी पाणी असें ह्मणत आयुष्याचे राहिलेले दिवस काढणें आमच्या वाट्यास आले. ते स्थळ मूर्तिमान् यमगृहच झालें होते, एवढ्यावरून तुह्मी काय ते समजा १०८.

सर्ग १०९—या सर्गांत, स्त्रीसह मी तेथून निघालों, मार्गात माझ्या एका पुत्रास फार क्षुधा लागली. त्याचें दुःख माझ्यानें पाहवेना. तेव्हा मी जीवितास कटाळून चिता पेटवून त्यांत उडी घेऊ लागलों, इतक्यात देहभानावर आलों, असें वर्णन राजा करितो.

राजा—दैवाच्या प्रातिकूल्यामुळे तेथे अशाप्रकारचे असह्य कष्ट होऊं लागले असता ज्याच्या अंगात सामर्थ्य होतें असे लोक ते स्थान सोडून आपआपल्या कुटुंबासह अन्यत्र जाऊ लागले व कित्येक दुर्बळ एकमेकांच्या गळ्यास मिठ्या मारून तेथेच मरून पडले. घरातून बाहेर पडलेल्या कित्येकास मार्गामध्यें गाठून व्याघ्र–सिहानीं आपली क्षुधा शात करून घेतली. कित्येक वणव्यात सापडून जळून गेले व कित्येक पर्वतशिखरावरून मोठ्या शिळाप्रमाणें खालीं घसरून मेले. दहा पावले टाकण्यासही समर्थ नसलेल्या वृद्ध सासूस व श्वशुरास तेथेंच सोडून मी आपल्या कुटुंबासह तेथून निघालों. अग्नि, वायु, व्याघ्रादि पिसाळलेले हिंस्र पशु व नाग याच्या जवळ्यात पडूं नये ह्मणून भीत भीत, आह्मी मार्ग आक्रमूं लागलों. त्या देशाच्या सीमेवर येऊन पोचताच एका तालवृक्षाच्या खालीं, थोडीशी विश्राति घेण्याकरितां, खांद्यावरील पुत्रास खालीं उतरून मी जरा बसलो. त्यावेळीं रौरवातून निघाल्याप्रमाणेच मला समाधान वाटलें. चांडाल कन्याही त्या वृक्षाच्या छायेत विश्राति घेण्याकरिता भूमीवर पडली व तिचा डोळा लागला. त्यावेळीं तिच्या दोन्ही बाजूस दोन बालकेंही तिच्या अंगावर हात टाकून निजलीं होतीं. पृच्छक ह्मणून आणखीं एक पुत्र होता तो माझ्या पुढें येऊन, ‘ मला खावयास मांस व प्यावयास रक्त दे, असें ह्मणून मोठ्यानें रडूं लागला. तो आह्मां उभयतांनाही फार आव-

डत असल्यामुळें त्याचें ते रडणें मलाही रडवूं लागलें. मी त्या अर्भकास पुष्कळ समजाविलें. " बाळा आतां मास नाहीं आहे, तें मिळाले ह्मणजे अगोदर तुला देईन. " इत्यादि सागितले. पण ते सर्व व्यर्थ गेलें. " मला भूक लागली. मला आता मास पाहिजे " असें ह्मणून तो अधिकाधिक आक्रोश करूं लागला. तेव्हां मला मोठा क्रोध आला व दांत-ओंठ खाऊन आणि दोन अश्लील शिव्या देऊन, मोठ्यानें " आतां माझें मांस शिजवून खा." असे मीं त्यास ह्मटलें. पण त्याने तेंही मान्य केलें व " मला तुझें मांस दे. " असें ह्मणूनच वारंवार त्रास देण्यास आरंभ केला. त्यामुळें मला माझ्या त्या दरिद्री जिण्याचा कटाळा आला आणि सर्व दुःखातून सुटण्याकरिता मी आसपासची लाकडें गोळा करून तीं पेटविलीं व त्या चितेंत, चाडालकन्या निजली आहे तोंच, प्रवेश करावा ह्मणून मोठ्या धैर्यानें व वेगाने निघालों. चितेजवळ जाऊन, मी जो त्यांत उडी मारीत आहें तोच सावध होऊन या सिंहासनावरून खालीं पडत असून तुह्मीं मला धरिले आहे व जयशब्दाचा व वाद्यांचा घोष चालला आहे, असें मीं पाहिले. साराश, सभासदानों, या शाबरिकानें मला अशा भयकर मोहात एवढा वेळ पाडले होते.

**श्रीवासिष्ठ**— राघवा, लवण राजा इतके सागत आहे तों तो शाबरिक गुप्त झाला व हा सर्व वृत्तात ऐकून आश्चर्यचकित झालेले सभ्य असें ह्मणाले-देव, हा पोटभरू गारुडी नव्हे. कारण तसें असतें तर त्यानें धनाच्या आशेनें आपणास दुसराच काहीं चमत्कार करून दाखविला असता. यास्तव ससाराची स्थिति कशी आहे याविषयीं बोध करणारी ती कोणी दैवी माया आहे. या आपल्या वृत्तातावरून संसार ह्मणजे मनोविलास आहे, असें स्पष्टपणें कळते. सर्वशक्तिमान् विष्णूचें मन हेंच जगत् आहे. त्या परमात्म्याच्या अनेक शक्ति आहेत. त्या विवेकी पुरुषाच्या मनासही मोह पाडू शकतात. नाहीं तर ज्यास सर्व लोकवृत्तात माहीत आहे, असे आपण राजाधिराज कोठें व सामान्यजनाच्या मनोवृत्तींस योग्य असलेला हा भयकर भ्रम कोठें ? यास्तव हा भिकारी शाबरिक नसून ही मनास मोहित करणारी माया आहे, असें आपण समजा. तो जर सामान्य पोटभरू असता तर त्यानें गुप्त न होतां द्रव्याची याचना केली असती.

**श्रीवसिष्ठ**—रामभद्रा, त्यावेळी मी त्या सभेत होतो व हा सर्व खेळ मी प्रत्यक्ष पाहिला आहे. यास्तव मन वासनामय आहे व वासनाचा उच्छेद हाच त्याच्या शातीचा उपाय आहे, असे तू नि सशय जाण १०९.

**सर्ग ११०**—या सर्गात वसिष्ठ मुनि मनोनाशाचा उपाय सागण्याकरिता, त्याच्या वैभवाचे वर्णन करितात.

**श्रीवसिष्ठ**—प्रिय राजपुत्रा, परम कारणापासून मन या अवस्थेस प्राप्त झालेले सस्कार किंवा वासनाच सर्व सुखदु.खादिकाचे निमित्त आहे. भय अभय, दूर, समीप, शत्रु, मित्र, बरे, वाईट इत्यादि सर्व कल्पना या मनामुळें होतात. कलकित मन हितकर वस्तूही अहितकर आहे, असे दाखवितें. हें विष आहे अशी दृढ भावना करून अमृत प्राशन केले असताही प्राण्याच्या शरीरावर विषाचा परिणाम होतो. मानसिक वासनाच प्राण्यास मोहित करणारी आहे. वासना हे जाळे असून मनुष्याचे मन हे हरिण आहे. ससाररूपी वनातील त्या जाळ्यात मनोहरिण अडकले की. ते अत्यत परतत्र होते. यास्तव मूलोच्छेदपूर्वक मोठ्या प्रयत्नाने ती नाहींशी करावी. ज्यानें विचाराने जीवाची ज्ञेय-वासना नाहीशी करून टाकिली आहे त्याचें तेज निरभ्र सूर्याच्या तेजाप्रमाणे चमकत रहातें. यास्तव मन हाच पुरुष आहे, देह पुरुष नव्हे, असें तू समज. कारण देह केवळ जड आहे. पण मन जड व अजड आहे. करिता मनाने जें जे केले तेच पुरुषाने केले व त्याने जे सोडले ते पुरुषानें सोडिलें असेंच समजणे उचित होय. हे सर्व जग व त्यातील भूमि, आकाश, वायु-इत्यादि हे सर्व पदार्थ मनोमात्र आहेत. त्या त्या पदार्थाकडे आपलें मन जर न लाविले तर त्याचे ज्ञान आपणास होत नाही. सूर्याकडे मन लाविलें नाहीं तर तो असून नसून सारिखाच होतो. ज्याचे मन मोहित होतें त्यास मूढ ह्मणतात. ज्याचें शरीर मूढ ( ह्मणजे निश्चेष्ट ) होतें त्यास मूढ ह्मणत नाहीत. तर त्यास मृत ह्मणतात. पाहू लागलेले मनच नेत्र होतें; ऐकणारे मन श्रोत्रेंद्रिय होते व अशाच रीतीनें हे या शरीरात त्या त्या वृत्तीच्या योगानें नटाप्रमाणें अनेक वेष घेऊन नटते. ज्याचे चित्त स्वप्नानें आकुल झाले आहे अशा हरिश्चंद्रास चित्तप्रतिभासामुळे एक रात्र बारा वर्षांची भासली. ब्रह्मदेवाच्या नगरांत गेलेल्या इंद्रद्युम्नाच्या एका मुहूर्तात चित्तप्रभावामुळें एक युग गेलें. हरिस्मरणरूप शुभ मनोवृत्तींच्या योगानें पुरुष सुखी

होतो व अशुभ मनोवृत्तीने तो दुःखी होतो, असा नियम आहे. मन स्वाधीन झाले की, सर्व इंद्रियें स्वाधीन होतात. रामा, मनाच्या या विपरीत कल्पनासामर्थ्याविषयी आणखी अधिक काय सांगू ? पण ते, सर्वत्र सम, निर्विकार, स्वच्छ, सूक्ष्म, साक्षिभूत, चिन्मात्रस्वभाव व सर्व विक्रियारहित अशा ब्रह्मास स्वकल्पनेने देहाप्रमाणे जड बनवून ( देहाशी त्याचें तादात्म्य करून ) काम, संकल्प इत्यादि अंतर्भ्रांतीने व पर्वत, नद्या, आकाश, समुद्र, नगरे इत्यादि बाह्य लीलेने त्यास बद्ध करिते. आतां तू कदाचित् ह्मणशील की, मूढ जन जरी अशी विपरीत कल्पना करीत असले तरी विचारजागरूक मन तशी अन्यथा कल्पना करणार नाहीं. पण ते युक्त नव्हे. कारण विवेकजागरूक मनही स्त्रीच्या मधुर नसलेल्या व उष्टया अधरोष्ठादि वस्तूस आपल्या अभिलाषामुळे अमृताप्रमाणे मधुर व पवित्र करितें व अभिलाषाच्या अभावी ते अमृतासही विषासारखें त्याज्य समजते. विरक्त पुरुष अमृतासही त्याज्य समजतात, हे प्रसिद्ध आहे. तस्मात् केवल विवेकयुक्त मन काही उपयोगाचे नाही. सर्वात्मभावाचा साक्षात्कार होईतो लौकिक विद्वानाचेही मन आपणास अभिमत असलेला आकार अवश्य निर्माण करील तत्त्ववेत्याच्या मनाची स्थिति मात्र याहून निराळी आहे. आत्मसाक्षात्कार झालेला असल्यामुळे त्यास मनाचे सर्व विलास मिथ्या वाटतात व ते अशा रीतीने बाधित झाल्याकारणाने त्यात चमत्कार मुळीच रहात नाहीं. तात्पर्य चिच्छक्तीच्या योगाने स्फुरण पावणारे मन स्पंदामध्ये वायुत्वास, द्रवामध्यें द्रवत्वास, पृथ्वीमध्ये काठिनतेस व शून्यदृष्टीमध्यें शून्यत्वास ( ह्मणजे अमुक एक वस्तु नाही या भावास ) प्राप्त होते. तें आपल्या अनिर्वाच्य शक्तीनें शुभ्र वस्तूस कृष्णवर्ण करिते व कृष्णवर्ण वस्तूस शुक्लवर्ण भासवितें. या चित्ताच्या शक्तीस योग्य देश व काल याचीही गरज लागत नाही मन दुसरीकडे आसक्त झाले असता तोंडात मधुर घास घालून तो चघळून जरी गिळिला तरी त्याची गोडी कळत नाहीं. तेव्हा यावरून चित्त ज्याचा अनुभव घेते त्याचाच जीवास अनुभव येतो व तें ज्याचा अनुभव घेत नाहीं त्याचा, प्रत्यक्ष उपभोग घेतला तरी, स्पष्ट अनुभव येत नाहीं, असेंच नाहींका ठरत ? इंद्रियें व मन यास परस्पराचे सहाय घ्यावें लागतें, हें खरे; पण इंद्रिये मनापासून झालेलीं आहेत. मन इंद्रियापासून झालेलें नाहीं, हें

ध्यानांत धरिले पाहिजे. अर्थात् मन मुख्य आहे. इंद्रिये मुख्य नव्हेत. आत्मा व अनात्मा अशा दोन परस्पर विलक्षण कोटी आहेत. मूढ पुरुष मनास आत्मकोटींत घालून, " मी " असें ह्मणून, त्याचे आत्मत्वाने ग्रहण करितात. पण आत्मवेत्ते मनास अनात्म कोटींत घालून तें देहादिकांप्रमाणें जड आहे, असें समजतात. खरोखर असे समजणारे तत्त्ववेत्ते वद्य होत. कारण त्याचे मन अमन ( मननशक्तिरहित ) झाल्यामुळे अति सुंदर स्त्रियानीं जरी त्यास घट्ट आलिंगन दिले तरी ते काष्ठाच्या अथवा भितीच्या स्पर्शाप्रमाणे निर्विकार असतात. ह्मणजे सुखनिमित्त झाले असताही त्यास सुखानुभव घडत नाहीं. एक विरक्त ज्ञानी एकदा एका निर्जन अरण्यात बसून ध्यानात निमग्न झाला असता एका लाडग्यानें त्याचा माडीवर पसरून ठेविलेला तळ हात खाला. पण त्यास तें कळले नाहीं. ह्मणजे दु:खाचे निमित्त झालें असताही त्यास दु:खाचा अनुभव आला नाही. साराश मनाच्या अभ्यासाप्रमाणे सुखदु:खानुभव येतो. मन स्थिर नसल्यास शिक्षकाने सागितलेला पाठ विद्यार्थ्यास थोडासाही कळत नाहीं. मनुष्य आपल्या घरांतच असतो, पण त्याचे मन पर्वताच्या शिखरावर गेले असतां त्यास घराचें विस्मरण होऊन पर्वत, गुहा, तेथील अरण्य इत्यादिकाचेच भान होऊ लागते व त्याचप्रमाणें सुख किवा दु:खही होते. स्वप्नांत मनाच्या केवळ कल्पनेने केवढाले मोठ मोठे पदार्थ दिसतात, याचा तू जरा विचार कर बरे ! समुद्रगत जलात जसे अनेक तरंग त्याप्रमाणें शरीरगत मनात पदार्थ. अकुराची जशी पत्र–पुष्प–फलादि शोभा त्याप्रमाणें मनाची जाग्रत्–भ्रम व स्वप्न–भ्रम ही शोभा आहे. सोन्याची मूर्ति सोन्याहून जशी भिन्न नाहीं त्याप्रमाणे जाग्रत् व स्वप्नक्रिया चित्ताहून भिन्न नाहीं. फेंस, तरग इत्यादि जसे जलाचे विकार त्याप्रमाणें अनेक वस्तु हा मनाचा विकार आहे. लवणराजा केवल मानसिक कल्पनेनें जसा चाडाल झाला त्याप्रमाणे हें मननमात्र मनही विस्तृत जग होतें. तात्पर्य मन ज्या ज्या आकाराचे होते त्याचा त्याचा अनुभव येतो. हा सर्व मनाच्या मननाचा खेळ आहे. सकल्प हे याचें मूळ आहे. जीव संकल्पानेंच मरतो व पुन: उत्पन्न होतो. दीर्घ अभ्यासामुळें आकाररहित मनच जीवभावास प्राप्त होतें. तिळात जसें तेल असतें त्याप्रमाणें मनामध्यें सुखदु:ख असतें. देशकालानुरूप तेल पातळ होतें किवा थिजतें त्याप्रमाणेंच

सुखदु:खही देशकालवशात् विरल अथवा घन होते. तिळांस पाण्यांत घालून चिरडलें असता तेल व्यक्त होतें त्याप्रमाणे चित्तास मननाने चिरडलें असता सुखदु:ख घन होतें. देश व काल ह्मणजे सकल्पच होय. कारण त्याच्यामुळेंच ते अस्तित्वात आले आहेत. शरीरही मन:सकल्पाच्या अधीन असते. सकल्पाप्रमाणे ते नाचणे, उडणे, लोळणे, पळणे इत्यादि क्रिया करिते. यास्तव जो पुरुष आपल्या मनास आतल्या आत पसरूं देत नाहीं त्याचे मन त्याच्या अधीन होते. विषयाचे स्मरण करणे हेंच मनाचें पसरणे होय. ज्याचे मन चचल होत नाहीं तोच उत्तम पुरुष होय. बाकीचे सर्व चिखलातील किडे आहेत. ज्याचे मन निश्चल होऊन एक आत्मवस्तूमध्ये एकाग्र होऊन रहातें तो पुरुष ध्यानाच्या योगानें ब्रह्मभूतच झाला आहे, असे समजावे मनाचे नियमन केले असता ससारभ्रम शात होतो. विषयोपभोगाविषयींचे मानसिक सकल्प हीच ससारविषवृक्षाचीं बीजे आहेत ११०.

**सर्ग १११**—या सर्गात अहता, ममता, व इष्ट वस्तु याचा त्याग व ऐकाग्र्य हे चित्त जयाचे उपाय आहेत, असे सागतात

**श्रीवसिष्ठ**—राघवा, आता मी चित्तव्याधीचे महा—औषध तुला सागतों. तें प्रत्येक पुरुषाच्या स्वाधीन असून पुरुषार्थ अवश्य साधून देणारे आहे. चित्त हा एक मोठा वेताळ आहे. त्यास मोठ्या यत्नाने जिकावे लागतें. अत्यत इष्ट वाटणाऱ्या बाह्य विषयाचा त्याग करून केवळ आत्माकार चित्तवृत्ति, पाण्याच्या ओघाप्रमाणे अविच्छिन्न करणे, हाच प्रयत्न होय. ज्याने इष्ट वस्तूवरील प्रेम अगदीं कमी केले आहे त्याचे रागादि सर्व चित्तरोग शात झाले आहेत, असें समजावें. चित्त हे एक रोगी पोर आहे, असें समजून सतत आत्माकारवृत्तिरूप उपचाराने त्याचें आरोग्य राखावे. त्यास अनात्मवस्तूपासून परत फिरवून आत्मवस्तूकडे वळवावें व पुन: त्याच्या सगतीस लागू नकोस, असा बोध करावा. शास्त्र व सत्सग याच्या योगानें धीर झालेल्या व चिंतेचा त्याग केल्यामुळे शात बनलेल्या मनानेच विक्षिप्त चित्तास तोडावें. लाड, भीति इत्यादि उपायानीं बालकास जसें चागल्या कामांत प्रवृत्त करता येतें त्याचप्रमाणें चित्तासही तसल्याच उपायानीं चांगल्या मार्गांत सोडितां येतें. परिणामीं परम फल देणाऱ्या सत्कर्मामध्ये ( समाधि-अभ्या-

सामर्थ्यें ) गढून गेलेल्या चित्तास चिदात्म्यात मिळवून सोडावे. आपल्या स्वाधीन असलेलें व निश्चयानें हित करणारें वैराग्य ज्यास दुष्कर वाटतें त्या नराधमास धिक्कार असो. अरम्य असलेल्या सर्व विषयाची परमार्थतः रम्य असलेल्या ब्रह्मरूपाने भावना केली असता चित्तजय अगदी सुलभ होतो. ह्मणजे एकादा मल्ल, बालकास जसा सहज जिंकितो त्याप्रमाणे पुरुष त्या भावनेमुळें चित्तास अनायासें जिंकूं शकतो. यास्तव चित्तनाशाकरता प्रयत्न करून ब्रह्मरूप व्हावें. चित्तनिग्रह हाच परम पुरुषार्थाचा उपाय आहे. पण तो ज्याना असाध्य वाटतो त्यास धिक्कार असो. मनःप्रशातीवाचून दुसरी शुभ गति नाहीं व ती ( शाति ) पुरुषाच्या प्रयत्नानेंच साध्य होते. मनःशाति जर नाहीं तर गुरूपदेश, शास्त्रपरिचय, कर्मानुष्ठान इत्यादि सर्व युक्ति तृणतुल्य आहेत. असकल्पनरूप शस्त्राने तोडलेलें चित्त शात ब्रह्मच होते. राघवा, दैवाचा पूर्णपणे अनादर करून स्वपौरुषाने तू चित्तास अचित्त कर. चित्तास चिदात्म्याच्या तोंडी देऊन त्याच्याकडून त्यास खाववून तू चित्ताच्या पलीकडचा स्वतः परमात्मा हो. प्रथम चिन्मात्र भावना कर. पण ती भावना स्थिर व्हावी ह्मणून त्यापूर्वी तू सावधान बुद्धीने युक्त हो. असे केल्यानें चित्त आत्ममय होईल. नंतर अव्यग्र मनानें तू आत्म्याचा साक्षात्कार करून घे. चित्तनिग्रहास फार काल लागतो. पण उद्विग्न होऊन अभ्यास सोडू नये. कारण अनुद्वेग हेच सर्व सपत्तीचें मूळ आहे. जो मनास जिंकतो त्यास त्रैलोक्याचा विजय तृणासारखा तुच्छ वाटतो. या विजयात शस्त्रास्त्राचा उपयोग करून छिन्न भिन्न व्हावें लागत नाहीं. तर केवल चित्ताचा स्वभाव बदलावयाचा असतो. चित्ताच्या प्रवृत्तीसही जे आळा घालू शकत नाहींत ते सर्व पुरुषार्थविषयीं अयोग्य व असमर्थ आहेत. मोक्षापर्यत, अस्थिर मन इहलोक, परलोक, जन्म—मरण, सुखदुःख इत्यादिकात गुतलेले असतें. माझा भ्राता मरण पावला, माझा उपयोगी बैल गेला, माझे धन चोरानीं लुटले, माझी स्त्री मरणोन्मुख झाली इत्यादि—प्रकारचे क्लेशही चित्तधर्मच होत. आत्मधर्म नव्हेत. यास्तव सच्चिदानदरूप आत्म्यामध्यें मनास समूल मिळवून सोडणें यावाचून चित्तनाशाचा दुसरा उपाय नाहीं व चित्तनाशावाचून आत्मसाक्षात्कार होणें नाहीं. केवल मनाचा लय झाल्यानेंच विश्राति उत्पन्न होते. बा रामा, या आपल्या मनास क्रूरपणे मार. निःशकपणें

त्याचा घात केल्यावाचून तुझ्या या व्यथा नाहींशा होणार नाहींत. रम्य वाटणारे विषय अरम्य आहेत इतकें तूं जाणलेंस ह्मणजे चित्ताचीं अगेंच तोडलीस असें मी समजेन. हा, तो, मी, व माझें एवढेंच मनाचें स्वरूप आहे व त्याची भावना न करणें हीच त्यास कापून काढण्याची तीक्ष्ण सुरी आहे. शस्त्र, अग्नि, वायु इत्यादिकाचे भय वाटतें. पण मृदु व स्वच्छ अशा या असंकल्पामध्ये भय कसलें? कल्याण व अकल्याण आबालवृद्धास समजतें व पिता आपल्या पुत्रास कल्याणकारक मार्गांतच प्रवृत्त करितो. त्याप्रमाणेच या मनासही कल्याणामध्येच प्रत्येकानें प्रवृत्त करावें. अक्षय व फार मोठ्या अशा या चित्तसिंहास जे मारितात त्याचा जय–जयकार होतो. ते आपल्याप्रमाणे इतरासही परम पद मिळवून देऊं शकतात. संकल्पामुळे सर्व भयंकर आपत्ती येत असतात. पण ज्याचें मन संकल्पशून्य झालेलें असतें त्यास कल्पांत वायू वाहूं लागले तरी, सर्व समुद्र एक झाले तरी, व बारा आदित्य ताप देऊं लागले तरी कांहीं क्षति वाटत नाहीं. यास्तव, रघुनाथा, तूं निरिच्छ, शांत, सम व विचारी होऊन संकल्पत्यागपूर्वक मनोविजय संपादून अजपदीं लीन हो १११.

**सर्ग ११२**—वासनात्याग हा चित्ताच्या क्षयाचा उपाय आहे व तो चिन्मात्रवासनेच्या अभ्यासानें आणि त्याविषयींच्या दृढ निश्चयानें साध्य होतो, असें येथें सांगतात.

**श्रीवसिष्ठ**—रामा, मन ज्या ज्या पदार्थाविषयीं जशा जशा इच्छेनें जसा जसा तीव्र वेग धारण करितें तसें तसें आपलें इष्ट पहातें. मनाच्या या तीव्र वेगाची जर उपेक्षा केली तर तो अधिकाधिक वाढतो व त्याचा निरोध करण्याकरितां प्रयत्न केला तर तो शांत होतो. कारण वेग हा त्याचा स्वभाव आहे व त्यामुळें त्यास प्रतिबंध न केल्यास तो पाण्याच्या बुडबुड्याप्रमाणें एकसारखा उत्पन्न होत राहणार, हें उघड आहे. बर्फाचें शीतता व काजळाचें कृष्णता हें जसें रूप आहे त्याप्रमाणें मनाचें चंचलता हें रूप आहे.

**श्रीराम**—गुरुवर्य, या अति चंचल मनाचें चांचल्य बलात्कारानें कसें प्रतिबद्ध होईल?

**श्रीवसिष्ठ**—अग्नीच्या उष्णतेप्रमाणे मनाचे चाचल्य स्वाभाविक आहे. जगाचें कारण अशी जी माया तिने युक्त असलेल्या चैतन्यामध्यें असलेली जी ही क्रियाशक्ति तीच मानसी शक्ति आहे. स्पदावाचून वायूचे अस्तित्व कळत नाहीं. त्याप्रमाणे चाचल्यावाचून मनाचें अस्तित्व अनुभवास येत नाहीं. चचलतारहित मन ह्मणजे मृत मनच होय आणि मृत मन हाच शास्त्राचा सिद्धात किंवा मोक्ष होय. केवल मनाच्या विलयानेंच दुःखाची शाति होते. विक्षिप्त चित्त हाच महाराक्षस दुःख देत असतो. यास्तव नित्य व निरतिशय सुख भोगण्याकरिता दीर्घ प्रयत्नानें त्याचा नाश कर. विचाराच्या योगाने त्याचा नाश करिता येतो सत् व असत् किंवा चित् व जड याच्या मध्यभागी राहून जे त्या दोघास जोडतें ते मन होय. जाड्याच्या दीर्घ व दृढ अनुसधानाने चित्तही जडासारखेच भासू लागते. पण तेच, त्याला आत्मानुसधान करावयास लावून दीर्घ काल विवेकाभ्यास केल्यास दृढ अभ्यासामुळे ते चैतन्यरूप होते. पौरुष प्रयत्नानें मनास ज्याच्यामध्ये लावावे तद्रूप ते होते, असा अबाधित नियम आहे. यास्तव धैर्य व निश्चय करून अगोदर चित्तास आपल्या अधीन करून घे. नतर त्यास परमात्म्यामध्ये योजून तू निःशकपणे स्थिर हो. रामचद्रा, ससार-भावनेंत बुडून गेलेल्या मनास विवेकयुक्त मनानेच जर वर काढिले नाहीं, तर तें वर कसे येणार? मनाचा दृढ निग्रह करण्यास मनच समर्थ आहे. राजाचा निग्रह बलाढ्य राजावाचून दुसरा कोण करणार? ससार-समुद्रातील तृष्णारूपी मकर ज्यास दूर ओढून नेत आहेत त्या चचल मनास सुरक्षितपणे पलीकडे पोचविण्यास शुद्ध मन हीच एक दृढ नौका आहे. मन हाच दृढ पाश अथवा बधन आहे. त्याला विवेकयुक्त बुद्धीने तोडिले किंवा सोडविले पाहिजे व हे कठिण कृत्य ज्याचे त्यालाच करणें उचित व अवश्य आहे. ते दुसऱ्या कोणाकडूनही होणें शक्य नाहीं. बाह्य विषयाविषयीं मनःसज्ञक जी जी वासना उत्पन्न होईल तिचा प्रयत्नानें परित्याग करावा. सर्व बाह्य पदार्थ मिथ्या आहेत, असें अनुसधान केल्यानें वासनात्याग सहज सिद्ध होतो व औष्ण्याचा क्षय झाला असता अग्नि जसा शात होतो त्याप्रमाणें वासनाक्षय झाला असता मनासह अविद्या क्षीण होते. आता वासनात्यागाचा क्रम सागतों. तू अगोदर अनेक भोगाविषयींची वासना सोड. नतर भेदवासना

टाकून दे. ( मी निराळा, हे इतर प्राणी निराळे व जगातील प्रत्येक पदार्थ निरनिराळा, असें समजणें हीच भेदवासना होय. ) त्यानंतर संकल्पपूर्वक चित्त व चित्ताचे विषय याच्या वासनेचा त्याग कर. शेवटीं अज्ञान राहिलें. पण तत्त्वसाक्षात्काराच्या योगाने अविद्या–आवरणाचाही त्याग करून तू सुखी हो. हाच वासनाक्षय व मनोनाश होय. अविद्यानाश यालाच ह्मणतात चित्ताच्या द्वारा साक्षीस ज्याचे ज्याचे ज्ञान होते तें तें दुःखदायक असतें यास्तव चित्ताचा क्षय झाल्याकारणानें कोणत्याही ( बाह्य किंवा आतर ) ज्ञेयाचें ज्ञान न होणें व त्यामुळें स्वयंप्रकाश आत्म्याचा साक्षात् अनुभव येणे, हेच निर्वाण होय. पुरुषाच्या प्रयत्नानेंच तें लाभते. पदार्थांची भावना न करणे हा फार मोठा अभ्यास आहे. त्याच्यापासून निरतिशय कल्याण होत असते. यास्तव, बा प्रिय रामचद्रा, तुझ्या मनामध्यें मिथ्या रागादि जे दोष असतील त्यास अगोदर पूर्णपणें ओळखून त्याचा त्याग कर. नतर ते रागादि हेच ज्याचे अकुर आहेत अशा मनःसज्ञक त्याच्या बीजाचा अज्ञान व वासना यासह त्याग कर. आणि हर्ष–शोक मानू नकोस. ह्मणजे तू अत्यत तृप्त होशील ११२.

सर्ग ११३—सर्व दुर्वासनांचा उच्छेद करणाऱ्या, विविध विचारानीं युक्त असलेल्या व द्वैत मिथ्या आहे, या बुद्धीनें रूढ होणाऱ्या तत्त्वबोधाचें वर्णन येथें करितात.

श्रीवसिष्ठ—ज्याअर्थी ही वासना असत्यच उत्पन्न झाली आहे त्याअर्थी तिचा त्याग करिता येणें शक्य आहे. विवेकविज्ञानशून्य पुरुषाचे ठायीं अविद्या अत्यत दृढ व सत्य होऊन रहाते. पण विवेकी पुरुषांचे ठायीं तिला थारा मिळत नाहीं. यास्तव राघवा, तू अज्ञ होऊ नकोस. प्राज्ञ हो. चागला विचार कर. आकाशात एकच चद्र असताना भ्रातीनें दोन दिसतात. त्याप्रमाणे एकच तत्त्व असताना द्वैताचा अनुभव भ्रातीनें येतो. या सृष्टींत परमात्म्यावाचून कोणतीही वस्तु नाहीं. यास्तव नित्य, बंधरहित, सर्वव्यापी व शुद्ध आत्म्याचे ठायीं कशाचाही आरोप करूं नकोस. तू कर्ता नाहींस. मग तुझी या क्रियामध्यें ममता का ? एकच अद्वितीय वस्तु कोणतें कार्य कोणत्या साधनानें कसे करणार ? क्रिया एकच कारकाने साध्य होत नसते. तर तिला कर्ता, कर्म, करण, सप्रदान, अपादान व अधिकरण या सहा कारकांतील निदान दोन कारकाची तरी

आवश्यकता असते. अथवा बा माझ्या प्रिय शिष्या, मी अकर्ता आहें, असाही अभिमान तू धरूं नकोस. कारण तसा अभिमान धरून तरी तुला काय करावयाचे आहे? कारण आपल्या प्रयत्नाने प्राप्त करून घेण्यासारिखें तुला काहींच नाहीं. यास्तव तू स्वस्थ हो. मी अकर्ता आहें, असा अभिमान धरिल्यासही तू त्या अभिमानाचा कर्ता होशील, हें विसरूं नको. हें सर्व विश्वच जर इंद्रजालाप्रमाणे मायामय व असत् आहे तर त्यात आस्था काय ठेवावयाची आहे? व त्यातील कोणास त्याज्य व ग्राह्य समजावयाचे? रामा, ही अविद्याच ससारबीजकणिका आहे. वस्तुतः ती मिथ्या असूनही सत्य वाटते. ह्मणून आह्मी विश्वास इंद्रजाल ह्मणतों. अविद्याच ससारास आरभ करणारी चक्रिका आहे. तीच चित्तास मोहित करणारी वासना आहे. वेळूचा वासा जसा वरून दिसावयास फार मोठा व बळकट. पण आत पोंकळ त्याप्रमाणें ही अविद्या निःसार आहे. नदीच्या प्रवाहाप्रमाणें ही अविच्छिन्न जरी आहे तरी तिचा आत्मज्ञानानेंही नाश होत नाहीं, असें नाहीं. हिच्या प्रत्येक कार्याशीं आपण व्यवहार करीत असतों. पण तिचें ग्रहण करितां येत नाहीं. ह्मणजे ती प्रत्यक्ष दिसत नाहीं. ओढ्याच्या लाटांप्रमाणे ती अति मृदु असली तरी तीरावरील वृक्षादिकास पाडणाऱ्या त्या लाटाच्या अग्राप्रमाणे अति तीक्ष्ण आहे ती कार्य करण्यास समर्थ असलेल्या कारणसमूहाप्रमाणें दिसते खरी; पण एकही सत्य पुरुषार्थ तिच्या हातून होत नाहीं ती एकप्रकारची नदी आहे हे खरें; पण स्नानपानादि कार्यांच्या निरुपयोगीं असलेल्या मृगजलाची नदी आहे. अथवा स्वप्नातील स्नानादिकाच्या उपयोगीं असलेली स्वप्नगत नदी आहे. ती केवळ दिसण्यास मोठी सुंदर; पण एकही सत्य कार्य न करणारी आहे. कोठें वक्र, कोठें सरल, कोठें दीर्घ, कोठें ऱ्हस्व (आखुड), कोठें स्थिर, कोठे चल असे तिचे अनेक आकार आहेत. ती ज्याच्या प्रसादानें उत्पन्न झाली त्याच्यापासूनच वेगळी होऊन रहाते. तिच्या अतर्भागीं सौंदर्य मुळींच नाहीं; पण बाहेरून ती फार सुदर दिसते. वस्तुतः ती कोठेंही नसते. पण सर्वत्र अनुभवास येते. ती ससार-आरंभ-चक्रिका खरोखर जड आहे. परतु चैतन्ययुक्त असल्याचा भास होतो. मनाच्या चांचल्यावर आपला निर्वाह करण्याचें तिचें शील आहे. ती एक क्षणभरही स्थिर नसते. पण मी स्थिर आहें, अशी भ्रांति पाडते.

सत्त्वगुणाच्या योगानें ती ज्वालेप्रमाणें शुद्धवर्ण असली तरी तिचा अतर्भाग तमोगुणामुळे शाईप्रमाणें काळा असतो. आत्म्याच्या सांनिध्यानें ती चल होते व त्याचा साक्षात्कार झाला असता स्वतः नाश पावते. आत्मप्रकाशामध्ये ती म्लान दिसते व अज्ञान–अधकारात विराजमान होते ( चमकते, शोभते ) ही ससारारभचाक्रिका अनेक सकटास कारण होते, ह्मणूनच ती कर्कशा आहे. तरुण व सुदर स्त्रीप्रमाणें चचल आहे व लाभी तृष्णाही तीच आहे. स्नेहाचा क्षय होताच दीपशिखेप्रमाणें ती तात्काल क्षीण होते व स्नेहावाचूनच शेदुराच्या रेषेप्रमाणे आपोआप शोभायमान होते. ही अविवेक्यास भयभीत करिते. हिचें विस्मरण होणेंच अतिशय श्रेयस्कर आहे. कारण वारवार स्मरण करू लागल्यास ती अनर्थात पडल्यावाचून रहात नाहीं. आत्म्याच्या सानिध्यामुळेंच ही आपलीं कार्यें करू शकते. पापामध्ये हिची वाढ फार होते. विषयुक्त मोदकाप्रमाणे ती आरंभी अतिशय गोड व परिणामी अतिशय दारुण होते. ती नष्ट झाली ह्मणजे दिव्याच्या नष्ट झालेल्या ज्योतीप्रमाणें कोठें जाते काही समजत नाहीं. हिनें चित्तास व्यापून सोडले ह्मणजे लोक ससाररूपी दीर्घ स्वप्न पाहू लागतात सर्व भ्रम हिच्यामुळेच होतात. ही करीत नाहीं असे काहींच नाहीं. राघवा, अकिंचन अशाही तिची ही केवढी शक्ति आहे तें पहा. तस्मात् विवेकबुद्धीने विषयबुद्धीचा निरोध करावा. प्रवाहाचा निरोध केला असता खालची नदी जशी शुष्क होते त्याप्रमाणे निरोधाच्या योगानें मनोनदीही क्षीण होते.

**श्रीराम**—प्रभो, आपण हा मला मोठाच चमत्कार सांगितलात. असत्, कोमल, तुच्छ, मिथ्याभावना करणारी, नीरूप, निराकार, चेतनहीन, असत्य असूनही नाश न पावणारी, प्रकाशास भिणारी व अंधकारात स्फुरण पावणारी, नियमानें कुकर्मेंच करणारी, ज्ञानास सहन न करणारी, देहासही न जाणणारी, काम, क्रोध इत्यादिकानीं युक्त असलेली, जड व अंधरूप अशा या वासनामय अविद्येनें जगास अध करून सोडलें आहे. हा मोठाच चमत्कार होय. ही पुरुषाची प्रतिकूल भार्या आहे. त्यास पाहावें, असें तिला वाटत नाहीं. पण तिनें त्याला अध करून सोडिलें आहे. तर आता, गुरुराज, हिचा निरोध कसा होईल तें सांगा ११३.

**सर्ग ११४—आत्मदर्शन हाच तिच्या क्षयाचा उपाय आहे, असें सांगून या सर्गात विशुद्ध आत्म्याच्या स्वरूपाचें वर्णन करितात.**

**श्रीवसिष्ठ**—राघवा, दंवाचा लहानसा बिंदु सूर्याचे दर्शन होतांच जसा नाहींसा होतो त्याप्रमाणें आत्म्याच्या दर्शनाबरोबर ही अविद्या नाहींशी होते. आत्मदर्शनाची इच्छा होई तोच अविद्या देहाभिमानी अहंकारा( जीवा )स संसाररूपी झोंपाळ्यावर बसवून आपल्या बरोबरच त्यासही झोंके खावयास लाविते. पण तिने परमात्म्यास पाहिले कीं, तिचें आयुष्य संपले. ह्मणजे कडकडीत उन्हाचा अनुभव घेण्याची इच्छा करणाऱ्या छायेप्रमाणेच हिची दशा होते इच्छा हीं कार्याविद्या व आत्मदर्शनाने जिचा नाश होतो ह्मणून ह्मटले आहे ती कारणाविद्या आहे. इच्छारूपी कार्याविद्येचा नाश होणें हाच मोक्ष व तो केवल असंकल्पानेच सिद्ध होतो. मनोरूपी आकाशातील वासनारूपी रात्र क्षीण झाली असता व ज्ञानरूपी सूर्य उगवला असता अविद्या–आवरण–रूपी अंधकार पार नाहींसा होतो. सूर्योदयानंतर रात्र जशी कोठें पळून जाते त्याप्रमाणें विवेकोदयानंतर अविद्या कोठे तरी जाऊन लपते. बालकाच्या भूताविषयींच्या कल्पनेप्रमाणें दृढ वासनेमुळें चित्ताचा बंध दृढ होतो.

**श्रीराम**—ब्राह्मणवर्य, आपणास जेवढें ह्मणून हे काहीं दिसत आहे ते सर्व अविद्या आहे व तिचा आत्मभावनेनें क्षय होतो, असें आपण सांगितलें, ते मी समजलो. आता त्या आत्म्याचे स्वरूप कसे आहे ते मला सांगा.

**श्रीवसिष्ठ**—विषयरहित, विक्षेप–आवरण–शून्य व अनिर्वचनीय असे जें चित्–तत्त्व तोच आत्मा व परमेश्वर आहे. तृणकाष्ठापासून आब्रह्मस्तंभपर्यंत जे हे जगत् तें सर्वही सर्वदा आत्माच आहे. अविद्या नव्हे. हे सर्व नित्य अखंड व चिद्रूप ब्रह्म आहे. मन ह्मणून निराळी कल्पना नाहींच. या त्रिभुवनांत काहीं मरत नाहीं व काही उत्पन्न होत नाहीं. तर केवळ चिन्मात्रसत्ता आहे. पण शांत निर्विकार व स्वयंप्रकाश आत्म्याचे ठायीं चैतन्यादि स्वभावाच्या विरुद्ध जाड्य, मर्यादितपणा इत्यादिकाची कल्पना करून धावणारी जी विक्षेपशक्ति तेच मन होय. या सर्वगामी व सर्वशक्तिमान् मनो–देवापासून, पाण्यापासून उत्पन्न होणाऱ्या लहरीप्रमाणें, पदार्थांचा विभाग करणारी शक्ति उत्पन्न होते. केवल संकल्पानेंच ती

सिद्ध झाली आहे. यास्तव, वायूपासून उत्पन्न झालेल्या व वायूच्या योगानेच बुझणाऱ्या अग्नीच्या ज्वालेप्रमाणे, संकल्पानेच तिचा नाश होतो. पुरुषाच्या दीर्घ व दृढ प्रयत्नाने आत्मसाक्षात्कार झाला असतां तिची निवृत्ति होते, हे मीं मागे सांगितलेच आहे. बंध व मोक्ष हे मनाचे धर्म आहेत. मी ब्रह्म नव्हे, अशी दृढ भावना झाली असतां मन बद्ध होतें व मी आणि हें सर्व ब्रह्म आहे, अशा दृढ भावनेने तें मुक्त होतें. संकल्प हाच परम बंध आहे व असंकल्प हीच मुक्तता आहे. मी कृश आहे, मी अति दुःखी आहे, मी बद्ध आहे; मी हस्तपादादियुक्त आहें अशी भावना व तदनुरूप व्यवहार केल्याने मन बद्ध होते व या भावनाच्या विरुद्ध भावना केल्याने ह्मणजे मी दुःखी नाही; माझा देह नव्हे, मग बंध कोणास असणार ? असा व्यवहार केल्याने ते मुक्त होते. मांस मी नव्हे, हाडे मी नव्हे, तर देहाहून अगदीं विलक्षण व भिन्न मी आहे असा ज्याचा आतल्या आत निश्चय असतो तो अविद्यारहित आहे, असे ह्मणतात. आकाशाचे यथार्थ स्वरूप ज्यास अवगत नसतें, असा एकादा अज्ञ भूमीवर उभा राहून आकाशात हत्ती, घोडा, इत्यादि अनेक आकृतींची कल्पना करितो. त्याचप्रमाणे अनात्मज्ञ आत्म्याचे ठायीं अनात्मकल्पना करितो. पण ज्ञानी आत्म्यास अनात्मा व देहादि अनात्म्यास आत्मा कधी समजत नाही.

**श्रीराम**—गुरुराज, या आकाशाच्या दृष्टांतावरून मला बरी आठवण झाली. वरील आकाशाकडे पाहिले ह्मणजे आह्मास सुंदर नीलवर्ण दिसतो. जणु काय निळ्या वर्णाची मोठी कढईच पालथी घातली आहे असा भास होतो. पण त्याचे कारण काय ? तेथे नीलवर्ण कोठून आला ? ती मेरूच्या रत्नाची छाया आहे की, अंधकार आहे ?

**श्रीवसिष्ठ**—रामभद्रा, नीलता हा शून्य आकाशाचा गुण नव्हे व रत्नाची छायाही नव्हे. ब्रह्मांड तेजोमय असल्यामुळें व त्याच्या उदरातील आकाशात प्रकाश भरलेला असल्यामुळे अंधकाराचाही संभव नाहीं. तर खोट्या अविद्येप्रमाणे असन्मय अशी ही केवल विपुल शून्यताच आहे. आपल्या नेत्राची दर्शनशक्ति दूरवर जाऊन पुढे कुंठित होते. त्यामुळे स्वाभाविकपणेंच उद्भवणारे जे तम ( अदर्शन ) तेंच आकाशाचें नैल्य ( नीलता ) होय. आता हें ऐकल्यावर आकाशांत दिसणारी कालिमा

खरी कालिमा नव्हे अशी तुझी भावना झाली कीं नाहीं? त्याचप्रमाणें अविद्या तिमिर आहे असें तू समज. त्याकरितांच असंकल्प हा अविद्येचा निग्रह आहे, असें ज्ञानी पुरुषानीं सागून ठेविलें आहे. तो स्वभावतः सुकर आहे असे वाटतें, दुष्कर वाटत नाहीं. आकाशाच्या नीलवर्णाप्रमाणें उद्भवलेल्या या जगद्भ्रमाचें पुनः स्मरण न करणें हेच सर्वोत्तम विस्मरण होय. स्वप्नात मी नाश पावलों आहें, अशा सकल्पानें पुरुष दुःखी होतो. पण जाग्रत् होऊन मी नष्ट झालेलों नाहीं, असें समजलें असतां संकल्पानेंच तो सुखी होतो. समूढ सकल्प केल्याने मन मूढ होतें व ज्ञानयुक्त उदार सकल्प केला असता तेंच मन ज्ञानस्वरूप ब्रह्मभावास योग्य होते. मी अज्ञ आहे, अशी कल्पना अथवा स्मरण केले असता अनादि अविद्या व्यक्त होते. पण तिला विसरून तिचे सकल्पवासनामूल नाहींसे केलें असता ती नित्य नष्ट होते. सर्व भूताचे कारण व सर्व भूतांस मोह पाडणारी अशी ती अविद्या, आत्मा परिच्छिन्न ( मर्यादित ) होऊन त्याचें अदर्शन झाले ह्मणजे वाढते व आत्म्याचे अपरिच्छिन्न स्वरूप व त्याचें दर्शन झालें ह्मणजे स्वतः नष्ट होते. राजाची आज्ञा मत्री शिरसा मान्य करितात. त्याचप्रमाणें मन ज्याचें अनुसधान करिते तेंच इद्रिये संपादितात. अर्थात् मनाचा निरोध केला असता इद्रियें वासनेस उत्पन्न करू शकत नाहींत. यास्तव बाह्य वस्तूविषयीं जो मनोनुसंधान करीत नाहीं त्यास ब्रह्माहभावनेनें ( मी ब्रह्म आहें, या आतर भावनेने ) शाति प्राप्त होते. ज्याची उत्पत्ति झाली नाहीं त्याची स्थिति कशी होणार? असा विवेक करून हें जे काहीं भासत आहे तें सर्व शांत, एक व अनिंद्य ब्रह्म आहे, असा निश्चय करावा. चित्तातून भोगाशा समूल उपटून टाकावी. आत्म्याचें अज्ञानच जरा—मरण—कारण आहे. माझे पुत्र, माझें धन, हा मी, हें माझे, अशा प्रकारें ही वासनाच वल्गना करीत असते. जलात वायूच्या योगानें भासणाऱ्या तरंगरूपी सर्पाप्रमाणे आत्म्यामध्यें वासनेच्या योगानें हा अहभावरूप सर्प कल्पिलेला आहे. परंतु हे तत्त्वज्ञ रामा, पारमार्थिक दृष्टया पाहिल्यास माझें व मी हीं दोन्ही असत्य आहेत. आकाश, पर्वत, अतरिक्ष, पृथ्वी, नद्या इत्यादि सर्व दृष्टिसृष्टीनें वारवार भासतें. ती अविद्याच स्वतः त्या त्या रूपानें परिणत होत असते. ( पाही पर्यंत सृष्टि; पाहणें सुटलें कीं, सृष्टिही गेली. अर्थात्

चित्ताचें अनुसंधान असेपर्यंत सृष्टीचा अनुभव व ते सुटल की, सृष्टीचा अनुभवही गेला. असा दृष्टिसृष्टि या शब्दाचा अर्थ आहे. ) सृष्टीविषयींची दृष्टि केवल अज्ञानाने उत्पन्न होते व ज्ञानानें नाहींशी होते. ज्ञान्याच्या दृष्टीनें पूर्वोक्त आकाशादि सर्व ब्रह्मच आहे. यास्तव तू अज्ञ होऊं नकोस; प्राज्ञ हो. ससारवासना सोड. अनात्म्याच्या ठायी आत्मबुद्धि ठेवून मूर्खा-सारखा उगीच का रडतोस ? अरे, ज्याच्या करिता तू सुखदुःखाच्या योगानें परतत्र होऊन तिरस्कारास पात्र होतोस तो हा जड व मूढ देह तुझा कोण आहे? लाकुड व दगड अथवा भाडे व बोरे याचा जरी सबध झालेला असला तरी ऐक्य नसते. त्याप्रमाणेच देह व देही ( आत्मा ) याचा सबध झाला आहे. पण ऐक्य नाहीं. लोहाराचा भाता जळला तरी त्यातील वारा जळत नाहीं. त्याप्रमाणें देह नष्ट झाला तरी आत्मा नष्ट होत नाहीं. मी दुःखित आहें; मी सुखसपन्न आहें, ही मृगजळासारखी भ्राति आहे, असें जाणून तिचा त्याग कर व सत्याचा आश्रय कर. काय चमत्कार आहे, पहा. मनुष्य प्राणी सत्यास विसरून असत्याचा परम भक्त झाला आहे. पण या असत्य दृष्टीमुळेच त्याचे असे हाल होत आहेत. ससार वासनेने चित्तास जर न भरून सोडलें तर जाग्रत् व स्वप्न यातील आपत्ती कशा येणार? रामा, तू वासना सोड, स्फटिकासारखा स्वच्छ होऊन रहा. आपलीं कर्तव्य कार्यें कर. पण त्यात आसक्त होऊं नकोस. चित्राचे सानिध्य असेपर्यंत त्याच्याप्रमाणें होऊन ह्मणजे त्याचें प्रतिबिंब ग्रहण करून तीं दूर केली असता स्फटिक जसा निर्लेप रहातो त्याप्रमाणें तूंही कार्यकाली कर्त्यासारिखा होऊन त्यानतर निर्लेप हो. अशारीतीने तू जर विवेकी झालास तर तुला उपमाच देता येणार नाही. तूं लोकोत्तर होशील ११४.

**सर्ग ११५**—या सर्गात, रामाचें बोधजन्य आश्चर्य व त्यानें केलेला लवणाच्या आपत्तीविषयींचा प्रश्न व वसिष्ठाचें उत्तर याचे वर्णन केलें आहे.

**श्रीवाल्मीकि**—राजा, भगवान् वसिष्ठानीं असें सागितलें असता रामाचें अंतःकरण प्रफुल्लित झालें. त्याच्या मुखावर एक प्रकारची उत्तम शोभा आली व तो हसत हसत असे ह्मणाला.

**श्रीराम**—गुरुवर्य, खरोखर आपण मला आज हें मोठें आश्चर्य सांगि-तलेंत. कारण, हा सर्व प्रकार कमलतंतूनीं पर्वतास बांधून ठेवण्यासार-

खाच चमत्कारिक आहे. अहो, या अविद्यमान ( मिथ्या ) अविद्येने सर्वांस आपल्या वश करून ठेविलें आहे ! निर्बल तृणानें वज्राप्रमाणें कठिण होण्यासारखेंच हे सर्व दिसतें. सद्गुरो, नदीप्रमाणें प्रवाहयुक्त असलेली व संसाराचें आदि कारण अशा या मायेचे स्वरूप मला पुनः चागले समजून सागा. तसाच मला आणखीं एक सशय आहे. आपण सागितलेल्या त्या महाप्रभावशाली लवण राजाला ती आपत्ति का भोगावी लागली ? देह व देही याचा काष्ठ व पाषाण याच्याप्रमाणे सबध झालेला असो कीं, दोघा मल्लाप्रमाणे ते एकमेकाशी भिडलेले असोत, पण त्यातील ससारी व शुभाशुभ कर्मांचे फल भोगणारा कोण ? नुस्ता देह कीं देही ? त्याचप्रमाणें लवणास ती परम आपत्ति दाखवून तेथेच गुप्त झालेला तो ऐंद्रजालिक कोण ?

श्रीवसिष्ठ—बा सज्जना, देह काष्ठ किंवा भित याप्रमाणे जड आहे ? यास्तव अचेतन व असत् असा तो कर्मफल भोगण्यास समर्थ नाही. तर चिदाभासाशी तादात्म्य पावून चित्त जीव होते, व मी भोक्ता आहे, असा अभिमान धारण करिते. तोच देही, कर्मभाक्, व नानाप्रकारचीं शरीरें धारण करणारा होय. या चिच्छक्तिभूषित चित्तालाच जीव, अहंकार, मन इत्यादि नावे योजितात. रामा, अशाप्रकारच्या अज्ञ जीवाची हीं सर्व सुखदु खे आहेत. जड शरीरास जशी ती होत नाहीत तशीच आत्मज्ञासही होत नाहीत. अप्रबुद्ध मन नाना कल्पना करिते व त्याप्रमाणे विचित्र आकाराचे होते. ते अप्रबुद्ध ( अज्ञ ) असेपर्यत निद्रित असते व निद्रित असेपर्यंतच जगद्भ्रमरूपी स्वप्न पहाते. गाढ अज्ञान–निद्रेंत असलेल्या जीवास जोपर्यंत कोणी जागवीत नाही तोपर्यंत तो ससारभ्रमांत निमग्न असतो पण तोच जागा झाला कीं, त्याचे सर्व अज्ञान, व भ्रमादि अज्ञान–कार्य नष्ट होते. चित्त, अविद्या, मन, जीव, वासना व कर्मात्मा असे ज्यास ह्मणतात तो देहीच दु.खभोक्ता होय. कारण जड देह दुःख भोगण्यास योग्यच नाही. देही मात्र अविवेकामुळे दुःखी होण्यास योग्य आहे घन अज्ञानामुळे अविवेक उद्भवतो व अज्ञानच दुःखाचे कारण आहे. एका अविवेकदोषामुळेच जीव शुभाशुभ धर्माचा विषय झाला आहे. अविवेकरूपी रोगाने बद्ध झालेलें मन विविध वृत्तियुक्त होऊन चक्राप्रमाणें भ्रमण करीत रहाते. या शरीरातील हे मन उत्कर्षयुक्त होतें, रडतें, हंसतें,

मारितें, खातें, जाते, वल्गना करते, निंदा करते व अशाच दुसऱ्याही सर्व क्रिया करितें. देह कांही करीत नाहीं. गृहात रहाणारा गृहाचा स्वामी अनेक चेष्टा करितो. जड गृह कांहीं करीत नाहीं. तस्मात् सर्व सुखदुःखादि अवस्थांमध्यें मनच कर्ता, व मनच भोक्ता आहे. फार काय पण हें मनच मानव आहे. आता याविषयीं मी तुला एक उत्तम वृत्तांत सागतों. ह्मणजे लवणराजा मनोभ्रमामुळें चाडाल कसा झाला ते तुला समजेल. शिवाय मनच शुभाशुभ कर्मांचे फल भोगतें हेंही त्यावरून तुझ्या लक्षांत येईल.

राघवा, हरिश्चद्राच्या कुलात उत्पन्न झालेल्या त्याने एकदा एकांतांत बसून पुष्कळ वेळ मनात असा विचार केला. माझा पितामह हरिश्चद्र राजसूययाजक होता. मी त्याच्या कुलात उत्पन्न होऊन अजून त्याच्या नावास शोभेसें काहींएक केलें नाहीं. यास्तव आता मीही यज्ञ करीन. असा निश्चय करून त्यानें सर्व मानसिक यज्ञसभार मिळविला व मोठ्या आदरानें राजसूययज्ञाची मानसिक दीक्षा घेऊन ऋत्विजास पाचारण केले. त्या सन्मुनीचे त्याने पूजन केले. देवाचे आवाहन केले. अग्नि प्रज्वलित केला आणि उपवनामध्ये मनाने यथेच्छ यजन करीत असताना व देव, ऋषि, द्विज इत्यादिकाची पूजा करण्यात त्याचा साग्र सवत्सर गेला. शेवटीं ब्राह्मणादि भूतास सर्वस्व दक्षिणा देऊन तो त्या यज्ञाचे चिंतन सोडून त्या दिवसाच्या अतीं आपल्याच उपवनात बाह्यवृत्ति झाला. त्याप्रमाणें लवण राजानें मनानेच राजसूय यज्ञ केला व त्याचे फल मनानेच भोगिले. यास्तव चित्तच नर आहे व सुखदुःख भोगणारे आहे, असे जाणून तू त्यास पवित्र व सत्य उपायात नियुक्त कर. हे सर्व सभासदहो, मी या रामाप्रमाणेंच तुह्मासही हे रहस्य सागून ठेवितो ते ऐका. हा मनोरूप पुरुष पूर्ण वस्तूशीं सगत झाल्यास पूर्ण होतो व देहादि नश्वर पदार्थांशीं त्याचा समागम झाल्यास तो स्वतः नश्वर व अपूर्ण होतो. यास्तव देहच मी आहे, असा ज्याचा निश्चय असेल त्याच्याशी तुह्मी समागम करू नका. शास्त्र व आचार्य याच्या उपदेशाने चित्त मारामार विचारयुक्त झाले असता व मी देहादि अनात्मभूत नव्हे तर परिपूर्ण परमानदरूप आहें, असा निश्चय झाला असतां सर्व दुःखें क्षीण होतात ११५.

**सर्ग ११६—लवणाच्या कथेचा अवशिष्ट अर्थ सागून योगभूमींचा उल्लेख या सर्गांत करितात.**

**श्रीराम—**प्रभो, लवणानें राजसुययज्ञाचे फल भोगिलें याविषयीं प्रमाण काय ?

**श्रीवसिष्ठ—**जेव्हा तो शाबरिक लवणाच्या सभेत आला तेव्हा मी तेथे होतो व हा सर्व प्रकार प्रत्यक्ष पाहिला. तो शाबरिक गुप्त झाल्यावर सभासदानी व राजानेही मला " हा काय चमत्कार आहे ? " ह्मणून प्रश्न केला. तेव्हा अतर्दृष्टीने सर्व सत्यार्थ जाणून मीं त्यास काय सागितलें ते ऐक. जे राजसूययज्ञ करितात त्याना बारा वर्षे आपत्ति भोगावी लागते. व त्या बारा वर्षांत त्यास नाना प्रकारची व्यथा होते, असा नियम आहे. यास्तव बा रामा, इद्रानें लवणास दुःख देण्याकरितां त्या शबराकृति देवदूतास पाठविलें व त्या दूतानेही स्वामीच्या आज्ञेप्रमाणे राजास साठ वर्षें मानस दुःख दिलें. ( कर्त्यास शरीराने केलेल्या यज्ञाचे जितके फल मिळते त्याच्या पाचपट मानस यज्ञाचें फळ मिळावें, असा ईश्वरी सकेत आहे. यज्ञात होणाऱ्या हिंसादिकाचे अनिष्ट ह्मणजे दुःखरूप फल इष्टफलाच्या मानाने फारच अल्प काल ह्मणजे बारा वर्षें भोगावें लागतें. अर्थात् त्या यज्ञाचें सुखमय इष्ट फल दीर्घकाल प्राप्त होते व मानस यज्ञाचें तर शारीर यज्ञाच्या पाचपट फल मिळणार हें उघड आहे. प्राण्यानीं आपल्या कर्माचे अल्प फल प्रथम भोगून दीर्घफल मागून भोगावे, असाही ईश्वरी सकेत आहे, व त्यास अनुसरून येथें मानस यज्ञाचें अनिष्ट फल लवणानें साठ वर्षें भोगिलें असे वर्णन केलें आहे. ) यास्तव हे रामा, मीं हा सर्व प्रकार प्रत्यक्ष पाहिला आहे. तेव्हा याविषयीं शका बाळगण्याचे कारण नाही. असो, साराश मनच सर्व विलक्षण क्रियाचा कर्ता व फलभोक्ता पुरुष आहे. त्यालाच रत्नाप्रमाणे घांसून अति शुद्ध करावें. उन्हाच्या योगानें द्रवाचा बिंदु जसा सुकून जातो त्याप्रमाणें विवेकानें चित्तास शुद्ध करून सोडावे. चित्तच सर्व भूताडंबर करणारी अविद्या होय. ती विचित्रशक्तीमुळें हें सर्व उत्पन्न करिते. वृक्ष व तरु हे जसे एकाच वस्तूचे वाचक शब्द ( नावें ) आहेत त्याप्रमाणें बुद्धि, जीव, चित्त, अविद्या या शब्दांच्या अर्थांत अंतर नाहीं, असें जाणून तूं आपल्या चित्तास कल्पनारहित कर. तें निर्मल झालें असता सर्व विकल्पमय जगत् क्षीण होतें. त्यानतर अज्ञात असें कांहीं

रहात नाहीं, सर्व आत्मरूप होतें; सर्वांचा परित्याग होतो; सर्व नष्ट होते व आत्म्याचे नव्हे, असे काहीं रहात नाहीं. (ह्मणजे सर्व आत्म्याचें होते.) अर्थात् तें चित्त सर्वदा सर्वरूप होतें. हाच परमार्थ होय. मातीचीं अपक्क ( कच्चीं ) भाडीं पाण्यात घातली असता त्याचा जसा एक गोळा होतो त्याप्रमाणें चित्त निर्मळ झाल्यावर हे सर्व बाह्य पदार्थ बोधाचा एक गोळा बनतात. त्यांचा निरनिराळा आकार व नावे यांचे भान होत नाहीं

**श्रीराम**—गुरुवर्य, याप्रमाणे मनाचा क्षय झाला असता सर्व सुख-दु खाचा अत होतो, असे आपण सागता खरे; पण चचल मनाचा क्षय कसा होणार ?

**श्रीवसिष्ठ**—रामा, मी आता तुला मनःशातीची युक्ति सांगतो. ह्मणजे तिच्या योगाने अतींद्रिय ब्रह्माशी तुझ्या मनाचा सबंध होईल. पूर्वी ( ९४ सर्गात ) बाराप्रकारची जीवजाति सागितली आहे. पण स्थूलदृष्ट्या तिचे सात्विक, राजस व तामस असे तीनच भेद होतात. हिरण्यगर्भाचें मनच त्या त्रिविध जीवाचे मूल कारण आहे व त्याच्या सकल्पाप्रमाणें व्यष्टि मने सकल्प करीत असतात, असेही मागें सांगितलें आहे. त्यातील हिरण्यगर्भाचें मन कल्पाती लीन होतें व आमच्या मनाचा स्वभावही त्याच्याप्रमाणेच असल्यामुळे त्याचाही लय होतो, असें अनुमान करिता येते. यास्तव या अनादि ससारांतील मनाचा क्षय कसा होईल ? अशी शका घेणें उचित नाही. असो, ती मनःशक्तीच चतुर्मुखाच्या शरीराच्या भावनेनें ब्रह्मदेवरूप होऊन नतर आपल्या सत्यसकल्पानें ज्याची ज्याची कल्पना करिते तें तें होते. ह्मणजे याप्रमाणे हे सर्व ब्रह्माडाडबर केवळ मनःकल्पनेनें झालें आहे. जन्म, मरण, सुख, दुःख मोह—इत्यादिरूप आमच्या संसाराचीही कल्पना तेंच करितें व कल्पभर तेंच नानाप्रकारची रचना करीत राहून शेवटीं आपोआप शेषशायी विष्णूमध्यें लीन होते. कल्पाच्या आरंभीं उत्पन्न होऊन, कल्पभर अनेक कल्पना करून, कल्पांतीं स्वकारणात लीन होणें हा याचा स्वभावच आहे. याप्रमाणें अनत ब्रह्मदेव या व इतर ब्रह्माडांतही आजपर्यंत होऊन गेले आहेत व पुढें होतील. ( ह्मणजे त्रिकालीं होणाऱ्या ब्रह्मदेवाची व ब्रह्मांडांची गणना करितां येत नाहीं. ) पण अशाप्रकारच्या या चमत्कारिक सृष्टींत ईश्वरापासून उत्पन्न होऊन जीव 'जीवभा-

वानेंच कसा रहातो व मुक्त कसा होतो तें ऐक. ब्रह्मदेवाच्या शरीरात व्यक्त झालेली मनःशक्ति भूततन्मात्रादि क्रमाने स्थूल आकाशवाय्वादिरूप होऊन सकल्पानेंच मेघजलरूप होते. पुढें औषधीत प्रवेश करून तें जल प्राण्याचे गर्भ बनते. त्यानतर त्याचा जन्म होऊन ते पुरुष होते. त्याने उत्पत्तीनतर बालपणापासूनच विद्याग्रहण करावें, गुरूच्या गृही वास व गुरुशुश्रूषा करावी. पुढें पुण्याधिक्याने कर्म व ज्ञान यांमध्ये त्याने अधिकृत व्हावें, असा जगातील सामान्य नियम आहे. त्या अधिकारी पुरुषातील तुझ्यासारख्या महा भाग्यवानास विवेक–वैराग्यादि सपत्ति अनायासाने लाभते ज्याची चित्तवृत्ति शुद्ध झाली आहे अशा पुरुषास ससार अनर्थावह असल्यामुळे त्याज्य आहे व मोक्षाचा उपाय ग्राह्य आहे, असा विवेक आपोआप होतो राघवा, अशाप्रकारचा विवेक जाग्रत् झाला ह्मणजे त्या निराभिमान व शुद्ध पुरुषाच्या केवल सत्त्वमय चित्तात क्रमाने साती योगभूमी उद्भवतात व त्या चित्तास प्रकाशित करणाऱ्या असल्यामुळे जीवाचे परम हित होतें ११६.

**सर्ग ११७.**—अज्ञानभूमि व ज्ञानभूमि याचा विचार करितात.

**श्रीराम**—अहो श्रेष्ठ तत्त्वज्ञ, सिद्धि देणाऱ्या सात भूमी कोणत्या ते मला थोडक्यात सांगा.

**श्रीवसिष्ठ**—राघवा, अज्ञानभूमींत स्थित होण्याची–स्वाभाविक प्रवृत्ति व भोगतृष्णा–ही दोन कारणे आहेत. आणि ज्ञानभूमीत स्थित होण्याची–शास्त्रीय साधनचतुष्टययुक्त श्रवणादि प्रयत्न व मोक्षाची अति तृष्णा–ही दोन कारणे आहेत. अज्ञानभूमी सात आहेत व त्यामुळेच ज्ञानभूमीही सात आहेत. त्यांतील अज्ञानभूमी तू प्रथम ऐक. नतर ज्ञानभूमींचें मी वर्णन करीन. स्वरूपामध्ये स्थित होणें हीच मुक्ति असून ' अह ' असे जाणणे हाच भ्रश होय. ज्ञत्व व अज्ञत्व याचीं हीच संक्षिप्त लक्षणें आहेत. राग व द्वेष याच्या अभावामुळे शुद्ध सन्मात्र तत्त्वापासून जे भ्रष्ट होत नाहींत त्याच्या ठायीं अज्ञत्वाचा सभवच नाही. पण चित्स्वरूपापासून भ्रष्ट होऊन चित्तत्त्वास चेत्यविषयात बुडवून सोडणें, यासारखा मोह दुसरा कोणताही नाही. एका विषयाविषयींचें चितन सोडून दुसऱ्या विषयाच्या चिंतनास चित्त आरभ करीपर्यंत मध्यें जो थोडासा मननरहित अवस्थेंत काल जातो तीच स्वरूपस्थिति होय. सर्व सकल्पशून्य व

त्यामुळेच मोठ्या थोरल्या शिळेच्या आंतील मध्यभागाप्रमाणें चित्तानें स्थिर असणे व त्याच वेळीं त्यानें जाड्यनिद्रारहितही रहाणें ह्मणजे लौकिक निद्रावस्थेत नसताना चित्तानें संकल्परहित व त्यामुळेंच शांत असणे हीच स्वरूपस्थिति होय. अहतेचा अत झाला असता व भेदाचा अनुभव येईनासा झाला असता जी अजडता ( चैतन्य ) अवशिष्ट रहाते तेंच स्वरूप किंवा तोच आत्मा होय. आत्म्याचे ठायीं अज्ञानाचा आरोप होतो. आता त्याच्या सात भूमींचीं नावें ऐक. बीज-जाग्रत्, जाग्रत्, महा जाग्रत्, जाग्रत्स्वप्न, स्वप्न, स्वप्न-जाग्रत् व सुषुप्ति असा सात प्रकारचा मोह आहे व त्याच्या या प्रकाराचा परस्पर विविध सबध आहे. आतां त्यातील प्रत्येकाचे लक्षण सागतो. १ मायाशबल चैतन्यापासून सृष्टीच्या अथवा जागराच्या आरभीं प्रथमतः चिदाभास युक्त असें जें रूप बनते तेंच प्राण धारण करणे इत्यादि उपाधींमुळे पुढें प्राप्त होणाऱ्या जीवादि-सञ्ज्ञेस पात्र होते. तेंच रूप पुढें सागितल्या जाणाऱ्या जाग्रत्चे बीज आहे. ह्मणून त्यास बीज-जाग्रत् असें ह्मणतात. ही ज्ञप्तीची नवी अवस्था आहे. २ या नवप्रसूत बीज-जाग्रत्च्या नंतर हा स्थूलदेह मी आहें व हे सर्व भोग्य माझें आहे, असा चित्तामध्ये उत्पन्न झालेला प्रत्यय हीच जाग्रत्-संसृति होय. ३ पूर्व जन्मातील दृढ अभिमानामुळे ' तो हा मी' व 'तें हे माझें' अशा प्रकारचा जो पुष्ट प्रत्यय तीच महा जाग्रत् होय. ( एकादा ब्राह्मणच इतरापेक्षा आपल्या कर्मात अथवा विद्येंत जन्मतःच अधिक निपुण व आपल्या-जाती, आचार-इत्यादिकाविषयीं अधिक अभिमानी असतो. त्याचे कारण पूर्व जन्मातील अथवा याच जन्मातील दृढ अभ्यास होय. ) ४ अभ्यासाच्या अभावीं दृढ न झालेलें व अभ्या-सानें दृढ झालेलें असे तन्मय होऊन केलेले जे मनोराज्य तेंच जाग्रत्स्वप्न होय. दोन चद्र दिसणें, रज्जूचे ठायी सर्पाचा भास होणे इत्यादि सर्व भ्राती या जाग्रत्स्वप्नातच अतर्भूत होतात. ५ निद्रेच्या अतीं, निद्रेच्या ऐन भरात अथवा आरभीं ज्याचा थोडा वेळ अनुभव येतो व जागें होताच ( पाहिलेला पदार्थ ) असत्य आहे, असे वाटते ते स्वप्न होय. अज्ञाच्या स्थूल शरीरामध्यें कठापासून हृदयापर्यंत असलेल्या सूक्ष्म नाडी-मध्यें तें होतें. पण ६ फार वेळ अनुभव आल्याकारणाने ज्या स्वप्नाचा अभिनिवेश दृढ झालेला असतो व त्यामुळें जे ( स्वप्न ) जाग्रत्-प्रमाणेंच

खरें वाटतें त्यास स्वप्नजाग्रत् ह्मणतात. अशा प्रकारचा हा प्रत्यय दैवयोगानें देह क्षीण झाला अथवा तो अक्षत राहिला तरी पुढें अनुवृत्त होतो. हरिश्चंद्राचे बारा वर्षांचे स्वप्न हें याचें उदाहरण आहे. ७ ह्या सहाही अवस्थांचा परित्याग केल्यावर जीवाची जी जड अवस्था रहाते तीच सुषुप्ति होय. पुढील दुःखाचा अनुभव घेणाऱ्या वासना व कर्मे यांनी ती संपन्न असते. पहिल्या उद्भूत कर्मांचा भोगानें क्षय झाला असता व पुढच्या कर्मांचा उद्भव होण्यापूर्वी, अशी एक अवस्था प्राप्त होते की, त्या अवस्थेंत स्थूल–सूक्ष्म–प्रपंचाचा विलय होऊन त्याचे बीज अज्ञान मात्र अवशिष्ट रहात असल्यामुळे अज्ञान–उपहित आत्मा मात्र बाकी रहातो. ह्मणून ती अवस्था अज्ञानोपहित आत्ममात्ररूप असते असो, या अवस्थेत तृण, शिला इत्यादि पदार्थ कारणात लीन होऊन संस्काररूपाने असतात कारण तसें न मानिल्यास जागे झाल्यावर पुनः त्यांचा उद्भव होणार नाहीं राघवा, याप्रमाणें मी तुला अज्ञानाच्या सात अवस्था येथे सांगितल्या. त्यातील प्रत्येकीचे अनेक भेद आहेत. चक्राप्रमाणे त्यांची गति एकसारखी चालते व त्या एकमेकींस दृढ करीत असतात. या सात अवस्थांमुळेंच जगास विचित्रता आली आहे यास्तव त्यांचा त्याग अवश्य केला पाहिजे. रामा, तू उत्तम विचाराच्या योगानें आपल्या अत्यंत शुद्ध चित्तात विमल आत्म्याचे दर्शन घेतलेस ह्मणजे तुला या अज्ञान–अवस्थांतून तरून जातां येईल ११७.

**सर्ग ११८—या सर्गांत मोक्षापर्यंत सर्व ज्ञान–अवस्थांचे वर्णन करितात.**

**श्रीवसिष्ठ**—रामभद्रा, आता तू ज्ञानभूमी कोणत्या ते ऐक. त्यांच्या ज्ञानानंतर तू पुनरपि मोहरूपी चिखलांत रुतणार नाहींस. निरनिराळे वादी योगाच्या अनेक भूमिका ठरवितात. पण मला याच शुभप्रद भूमी मान्य आहेत. अखंड आत्माकार बुद्धिवृत्तीवर आरूढ झालेले ब्रह्म अज्ञानाची निवृत्ति करिते. यास्तव तेंच ज्ञान होय व ज्याच्या विषयींचें अज्ञान निवृत्त झालें आहे असें ब्रह्मच ज्ञेय आहे, असें ह्मणतात. त्यातील ज्ञानाच्या सात भूमी असून ज्ञेय त्यांच्या पलीकडे आहे. पण ज्ञेय ह्मणजे मुक्तिच. सत्य ज्ञान व मोक्ष हीं घट व कुंभ याप्रमाणें एकाच वस्तुचीं पर्याय नावे आहेत. ज्याला सत्य बोध झाला आहे तो जीव पुनः जन्मास येत नाहीं. शुभेच्छा, विचारणा, तनुमानसा, सत्त्वापत्ति, असंसक्ति, पदा-

र्थभाविनी, व तुर्यगा अशीं त्या ज्ञानभूमींची नावें आहेत. या भूमींच्या अतीं मुक्ति स्थित आहे. त्या मुक्तीमध्ये पुनः शोक करण्याचा प्रसग येत नाहीं. आता त्यातील प्रत्येकीचे लक्षण सागतों, तें ऐक. मी असा मूढ होऊन कां बसलों आहे? मला वेदातवाक्यें व परमगुणसपन्न गुरु याच्याशीं परिचय केला पाहिजे, असें समजून मोक्षाच्या उत्कट इच्छेनें विवेक, वैराग्य, शमादिसपत्ति यानी युक्त होऊन श्रवणादि साधनानुष्ठान करणे ही शुभेच्छा-नामक पहिली ज्ञानभूमि होय. शास्त्र व सज्जन याच्याशीं सपर्क ठेवून व वैराग्याचा सतत अभ्यास करून गुरुशुश्रूषा, भिक्षाशन, शौच इत्यादि सदाचारांचें परिपालन करणे ही विचारणा होय विवेकादि चार साधनासह श्रवण, मनन व निदिध्यासन केल्यामुळे मन तनु ( कृश ) होते. शब्द, स्पर्श, इत्यादि विषयाचें स्वभावतःच ग्रहण न होणे ही मनाच्या तनुतेची अत्य अवधि ( मर्यादा, सीमा, हद्द ) आहे. तिलाच सविकल्पसमाधि ह्मणतात. श्रोत्रादि इंद्रियाच्या योगाने शब्दादि विषयाचें ग्रहण जोवर होत असतें तोंवर चित्तैकाग्र्यास ध्यान ह्मणावें व शब्दादिकाचें ग्रहण होईनासें झालें कीं तेंच ( चित्तैकाग्र्य ) समाधि होते, असें योगशास्त्रात ह्मटले आहे. असो, हीच तिसरी तनुमानसा भूमि होय या पूर्वोक्त तीन अवस्थाचा अभ्यास केल्यामुळें बाह्य विषयांविषयींची सूक्ष्म संस्काररूप आसक्तिही चित्तात न रहाणें ह्मणजे पूर्ण विरक्ति बाणणें आणि त्या विरक्तीच्या स्थैर्यामुळें शुद्ध व सत्य आत्म्यामध्ये मनानें अगदीं लीन होऊन जाणें हीच सत्त्वापत्ति भूमि होय. या भूमींत गेलेल्या साधकाचें चित्त दुधात जसें पाणी मिळून जातें त्याप्रमाणें आत्म्यामध्यें त्रिपुटीरहित होऊन मिळून जातें. ही स्थिति निर्विकल्प समाधिरूप आहे व या भूमिकेस प्राप्त झालेल्या योग्यास ब्रह्मवित् ह्मणतात. या चार दशाचा अभ्यास केल्यामुळें व चित्ताचा बाह्य आणि आभ्यन्तर आकारांशीं ससर्ग न होणें एतल्लक्षण समाधीचा परिपाक झाल्यामुळें चित्तात ब्रह्मात्मभाव अति दृढ होतो. ह्मणजे निरतिशय आनद व 'नित्य अपरोक्ष ब्रह्मच मी आहें' असा साक्षात्कार दृढ होतो. आता उत्तमाधिकाऱ्यास दुसऱ्या मंद व मध्यम अधिकाऱ्यांच्या भूमिकेंतही ब्रह्मात्मसात्कार होणें शक्य आहे. पण पचम भूमींतील साक्षात्काराप्रमाणें तो द्वैतसंस्कारांच्या अत्यत उच्छेदरूप नसतो. हा त्यामध्यें विशेष आहे. ह्मणून चवथ्या भूमीच्या शेवटीं पांचव्या भूमींत

प्राप्त झालेल्या त्या योग्यास ब्रह्मविद्वर असें क्वचित् ह्मणतात. या भूमींत अविद्या व तिचें कार्य यांची ससक्ति मुळीच नसते. ह्मणून तिला असंसक्ति ह्मणतात. सहावी व सातवी भूमिका या हिच्याच परिपक्व अवस्था आहेत. या पूर्वोक्त पाचही अवस्थाचा अभ्यास केल्यामुळे योगी अत्यत आत्माराम होतो. आत्म्यामध्येंच ज्याचा आराम ( क्रीडा ) असतो व बाह्य पदार्थांत नसतो तो आत्माराम होय. त्यामुळे त्यास आभ्यतर किंवा बाह्य पदार्थांची भावना होत नाहीं. भोजन, शयन, मूत्रोत्सर्गादि इत्यादि देहयात्रेस अवश्य असलेल्या क्रियाही त्यास दुसरा जेव्हा बराच वेळ प्रेरणा करील तेव्हां त्या त्याच्या हातून घडतात. कारण कोणी तरी पुष्कळ वेळ समजाविल्यावाचून त्यास पदार्थांचे भानच होत नाहीं. तो ब्रह्मविद्वरीयान् सतत आत्मानदात निमग्न असतो. ह्मणून या भूमिकेस पदार्थाभावना असें ह्मटले आहे. या सहा भूमींचा दीर्घ काल अभ्यास केला असता साधकास भेदाचे भान होईनासें होतें. दुसऱ्याने भगीरथ प्रयत्न केला तरी तो देहभानावर येत नाहीं. तो स्वाभाविक आत्मनिष्ठेचा अनुभव घेतो. या भूमीस तुर्यगा असें ह्मणतात. कारण जाग्रदादि व्यावहारिक तीन अवस्थाचा हिला गधही नसतो. या अवस्थेत तो स्वत. ब्रह्म होतो व त्यामुळेच त्यास ब्रह्मविद्वरिष्ठ ह्मणतात. जीवन्मुक्ताची ही शेवटची अवस्था आहे. कारण हिच्या पुढची अवस्था ह्मणजे विदेह मुक्तिच होय. ह्मणजे तेच ब्रह्म. यास्तव तिची गणना अवस्थामध्यें करिता येत नाहीं. रामा, जे कोणी महाभाग या सप्तम भूमिकेस प्राप्त होतात ते आत्माराम महात्मे त्या महत्पदासच पोंचले आहेत, यात सशय नाहीं. जीवन्मुक्त सुख व दुःख याच्या रसाचा आस्वाद घेत नाहीत व त्या त्या अवस्थेत ते आसक्तही होत नसतात. सहाव्या भूमींत असताना ते थोडीशीं तरी स्वाभाविक कार्ये करितात व तींही सदाचाराचें उल्लघन करून करीत नाहींत. तर जवळचा शिष्य अथवा दुसरा कोणी जें स्वाश्र-मोचित कार्य सागेल तेवढेंच करितात. पण सातव्या भूमींत ते तींही करीत नाहींत. कारण निद्रित पुरुषास अतिरूपवती स्त्रियाही जशा कामी करू शकत नाहींत त्याप्रमाणे आत्माराम पुरुषास कोणत्याही प्रकारच्या जगत्क्रिया सुखवीत नाहींत. या सात भूमिका शुभ बुद्धिमानासच आवडतात. पशु, वृक्षादि स्थावर पदार्थ व देहच मी आहे, असे समजणारे म्लेच्छप्राय मानव यास त्याचा कांहीं उपयोग नाहीं. पशूमध्यें हनुमानादि

म्लेच्छांमध्यें सात व्याध, राक्षसांत प्रह्लाद, कर्कटी इत्यादि यांसही ही ज्ञानदशा प्राप्त झाली होती व ते सदेह असतांना आणि विदेह अवस्थेंतही मुक्तच आहेत, यांत कांहीं संशय नाहीं. चित् व जड यांची ग्रंथि सुटणें म्हणजे यांचा तादात्म्य-अध्यास नाहींसा होणें हेंच ज्ञान आहे. तें झालें असतां मुक्ति सिद्ध असते. दुसऱ्या व तिसऱ्या भूमींत अथवा चवथ्या भूमींत, आत्मज्ञान होऊन अज्ञान-आवरणाचा भंग झाला असतां, योगी मोहांतून पूर्णपणें पार झालेले असतात, यांत कांहीं शंका नाहीं. पण प्रबल प्रारब्धामुळें त्यांच्या चित्तांत विक्षेप होत असल्याकारणानें, त्यांस मनोनाशानंतरच प्राप्त होणाऱ्या निरतिशय आनंदपूर्ण पदार्थाचा पूर्णपणें लाभ होत नाहीं. म्हणून आत्मलाभामध्यें परायण होऊन ते पुढच्या अवस्थांतील कोणत्या तरी एका अवस्थेंत रहातात. कांहीं योगी एकाच जन्मांत सातही भूमिकांचा क्रमानें अभ्यास करितात. कित्येक दोन किंवा तीनच भूमिकांचें उल्लंघन करूं शकतात व सनकादिकांसारखे कांहीं थोडे योगी केवळ सप्तमभूमींतच रहातात. सारांश या भूलोकीं जे विवेकी जन असतात, ते या सात भूमींतील कोणत्या तरी एका भूमिकेचा अभ्यास करीत, अंतर्बाह्य विषय, इंद्रियें, शरीर व त्या सर्वांच्या संबंधामुळें होणारें त्रिविध दुःख या सर्वांस आत्म्यामध्यें मिळविण्यास उद्युक्त होतात. इंद्रियांसह मनास जिंकणें हेंच ऐहिक सर्व शत्रुजयाहून अति कठीण व त्यामुळेंच सर्वोत्कृष्ट कर्म होय. आणि स्वात्मसाम्राज्य हेच सर्वोत्तम स्वराज्य आहे. ब्रह्मलोकापर्यंत जेवढीं उत्तमोत्तम ऐश्वर्यें आहेत त्या सर्वांस तृणाप्रमाणें तुच्छ मानून जे या ज्ञानभूमींचा अधिक अधिक अभ्यास करितात ते वंद्य होत ११८.

**सर्ग ११९.**—मायिक रूपाचे निरसन करून पूर्वोक्त भूमिकांमध्यें सन्मात्रदर्शन स्थिर करण्याकरितां या सर्गांत युक्ति सांगतात.

**श्रीवसिष्ठ**—राघवा, सुवर्ण स्वतः सर्वदां सुवर्ण-एकस्वभाव असतें. त्यामध्यें असुवर्णतेचा गंधही नसतो. पण त्याचे ठायीं मुद्रिका-भावाचा आरोप करून व स्वाभाविक सुवर्णता विसरून बाह्य मळाचा संकल्प झाल्यामुळें; हें पितळ आहे, असें समजून माझें सोनें गेलें, असा आक्रोश करीत जसा एकादा भ्रांतिकट पुरुष रडूं लागतो त्याप्रमाणें आत्मा अहंभावयुक्त

होऊन व आपल्या ब्रह्मत्वास विसरून मी जीव व सुखी–दुःखी आहे असें ह्मणून रडू लागतो.

**श्रीराम**—सोन्याच्या ठायीं मुद्रिकाभ्रांति कशी होते ? व त्याचप्रमाणे आत्म्याचे ठायीं अहंता कशी उद्भवते ?

**श्रीवसिष्ठ**—रामा, सत् व असत् याचा संबंध त्रिकालींही शक्य नसल्यामुळें व उत्पत्ति, अस्तित्व, वृद्धि, क्षय इत्यादि भाव सत्–वस्तूच्या आश्रयानेंच होणें शक्य व युक्त असल्यामुळें सद्रूपच सुवर्ण अथवा ब्रह्म मुद्रिका व अहंता या वेषाने उत्पन्न होते, असे ह्मणावे लागतें. शिवाय त्याग व ग्रहण या क्रियाचा संबधही सद्वस्तूशींच असतो. कारण बाजारात सोन्याची मुद्रिका विकावयास नेली असतां विकत घेणारा व देणाराही सोन्याची किंमत देतात व घेतात. मुद्रिकेची किंमत देत किंवा घेत नाहीत. कारण मुद्रिका ह्मणजे एक विशेष आकार. त्याची किंमत जरी काहीं आहे असे ह्मटले तरी ती सोन्याच्या मानाने अगदींच अल्प असणार हे उघड आहे. अर्थात् आपली अंगठी विकणारा ती करावयास जी दोन–चार आणे मजुरी लागली असेल ती घेऊनच अंगठी कधींही विकणार नाहीं. ह्मणजे मुद्रिकेचा व्यापार होत नसून सोन्याचा होतो. त्याचप्रमाणे सर्व व्यवहाराचा विषय ब्रह्म आहे. घट, पट, पुस्तक, लेखणी, इत्यादि त्याचे आकार नव्हेत. आता—तू ह्मणशील कीं, सुवर्णच जर सर्व क्रय–विक्रयादि व्यापाराचा विषय आहे तर मुद्रिकेचा आकार व तिचे मुद्रिका हे नाव याचे सुवर्णाहून निराळें कोणते स्वरूप आहे! तर त्याचे उत्तर थोडक्यात असे आहे—मुद्रिकेचे सुवर्णातिरिक्त स्वरूप व नाव हीं विचार करीपर्यंत रमणीय वाटतात. तत्त्वाविषयी विचार करू लागले कीं तीं दोन्हीं वंध्यापुत्राप्रमाणें होतात. यास्तव मुद्रिकात्व हीं व्यर्थ भ्रांति आहे. केवळ अविचार–कालीं असणें हेच मायेचे स्वरूप आहे. यास्तव अविचार-कालीं प्रतीत होणारे मुद्रिकात्वही मायिक आहे. विचारपूर्वक पाहू लागलें असता अनुभवास न येणे हेही मायिक वस्तूचे चिह्न आहे व तेंही मुद्रिकेमध्ये आढळतें. यास्तव सुवर्णाचे ठायीं मुद्रिकात्वाचा उदय व नाश हे भ्रम आहेत. भ्रमानें भासणारा पदार्थ, ज्याच्या ठायीं तो भासतो, त्या आपल्या अधिष्ठानामध्ये एक रतिभरही नसतो. शिंपेच्या ठायीं रुप्याचा भास होतो.

दोरीमध्ये सर्पभ्रम होतो. पण शिप व दोरी यामध्यें रुप्याचा एकादा कण सर्पाचा थोडासा अशही नसतो. त्याचप्रमाणे सोन्यामध्यें मुद्रिकादि अलकाराचा अथवा ब्रह्मामध्ये चराचराचा अशही नाही. पण अलकारात जसें सोनें त्याचप्रमाणे चराचरात ब्रह्म अनुस्यूत आहे. चराचर जग जर मिथ्या आहे तर त्याचा अगदीं व्यवस्थित व नियमित व्यवहार कसा होतो ? मिथ्या जलाने खरी तहान कशी भागते, ह्मणून विचारशील तर त्याचे उत्तर (याच प्रकरणात पूर्वी दिलें आहे तरी पुन:) सागतों. जी सत्य वस्तु असते तीच अर्थक्रिया करू शकते व जी असत्य असते ती अर्थक्रिया करू शकत नाहीं असा काहीं कोठें नियम नाहीं.तर सत् किंवा असत् यातील जी वस्तु चित्तावर आरूढ होते ती अर्थक्रिया करू शकते. चित्तारूढ झालेला मिथ्या सर्पही कपादि अर्थक्रिया करू शकतो, हें प्रसिद्ध आहे. तस्मात् असत् व प्रतिष्ठाशून्य अशा अहभावाची कल्पना करणे हीच परम अविद्या, हीच माया व हीच ससृति ( ससार ) होय. सुवर्णामध्ये मुद्रिकात्वादि जसे असत् त्याप्रमाणें आत्म्याचे ठायीं अहत्वादि असत् आहे. शुद्ध, शात व आनद अशा परमात्म्याचे ठायी सनातनता, विरिचिता, ब्रह्माडता, पुत्रता, लोकातरता, स्वर्गता, मेरुता, देवता, असुरता, मनस्ता (.मनस्त्व ) देहता, व महाभूतता यातील एकही भाव नसतो. तीन काल, भाव–अभाव, त्वत्ता, अहता, आत्मता, अन्यता, सत्ता, असत्ता, इत्यादि सर्व अविचारामुळे उद्भवणाऱ्या व दृढ होणाऱ्या भावना आहेत. जगाचे पारमार्थिक रूप शात, शिव, अनामय ( उपद्रवर-हित ) अनामक व अकारण आहे. ते सत् नव्हे व असत्‌ही नव्हे त्याला मध्यावस्था नाहीं व अत्यावस्थाही नाही. ते असग असल्यामुळे सर्वरूप नव्हे. पण सर्वांचे अधिष्ठान असल्यामुळे सर्वरूपही आहे. साराश त्याच्याविषयीं मनानें चितन करवत व वाणीने काहीं बोलवत नाहीं तें शून्याहून शून्य व सुखाहून सुख आहे. ( याप्रमाणें श्रीवसिष्ठानीं निष्प्रपच व परमार्थकारण ब्रह्माचा बोध केला. तरी त्या ब्रह्मामध्यें आपली चित्तवृत्ति स्थिर करण्यास असमर्थ असलेला राम त्याच्यापासून पराङ्मुख होऊन पुनरपि जगाचें भान होणें, या विपरीत भावनेनें भयभीत होत्सात। प्रश्न करू लागला)

**श्रीराम**—गुरुराज, सर्वच सम ब्रह्म आहे, हें आता मला समजले. पण मला ब्रह्मज्ञान होऊन अज्ञान नष्ट झालें तरी अजून हें जग का भासतें ? त्याचें मूळ अज्ञान आहे व तें नष्ट झाल्यावर त्याचें कार्य अशा ह्या जगाचाही बाध होणें युक्त आहे.

**श्रीवसिष्ठ**—तूं ह्मणतोस तें खरें; पण तुला जर खरोखरच तत्त्वज्ञान झालेलें असलें तर त्यानंतर भासणारें जगही ब्रह्मच आहे. कारण परम तत्त्व आपल्या स्वभावभूत परम शातीमध्येंच सदा स्थित असतें. त्यामुळें सर्गाचें नावही तेथें नसते. तर मग तो दिसतो कसा या तुझ्या प्रश्नाचें आतां उत्तर सागतों. सागरांत जसे जल त्याप्रमाणें ब्रह्मामध्यें सर्ग दिसतो. पण समुद्रांतील जल व ब्रह्मांतील सर्ग यांमध्ये अतर आहे. जल पातळ असल्यामुळे ते सखल प्रदेशाकडे आपोआप वाहू लागते. ह्मणजे त्यांत चलन आहे व ब्रह्मामध्ये ते नाही. सूर्यादि प्रकाशमय गोल जसे आपणच आपणास प्रकाशित करितात त्याप्रमाणे ब्रह्महो स्वयप्रकाश आहे. पण बाह्य अधकारास हटवून बाह्य प्रकाश पाडणें हा त्यांचा स्वभाव आहे व ब्रह्म, निष्क्रिय असल्यामुळें, प्रकाशन ही क्रिया करीत नाही. आता ब्रह्मज्ञानानतर सर्ग दिसतोच का, ह्मणून ह्मणशील तर त्याचेंही कारण सागतो. तुझा तो बोध परिपक्व झालेला नसल्यामुळें तुला सर्गाचें भान होते. पण ज्ञानाच्या परिपाकानतर तो स्थिर ब्रह्मरूप होईल. सर्ग ही परमार्थाचीच सज्ञा आहे, असा निश्चय झाला कीं, आकाशाचे जसें दुसरें आकाश नसते त्याप्रमाणे त्यात नाना असे काहींच भासत नाहीं. सारांश चित्ताचा आत्यंतिक नाश न होणे हेंच तुला पुनः सर्ग दिसण्याचें कारण आहे. चित्ताच्या शांतीचा उदय झाला असतां सत्यरूपानें प्रतीत होणाराही प्रपच असत्य होतो व चित्तवृत्तीचा उदय झाला असतां असत् प्रपचही सत्य भासतो. राघवा, हें सर्व अनंत, अज व पूर्ण ब्रह्म आहे. प्रपच ब्रह्मामध्यें स्थित आहे. कुंभारानें केलेल्या मातीच्या नाममात्र सेनेप्रमाणें हें सर्व नाममात्र जग आहे. आरशांत नऊ योजनें दूर असलेल्या एकाद्या नगराचे प्रतिबिंब पडलें असतां त्यांत जसा दूरसमीपभाव रहात नाहीं त्याचप्रमाणें ब्रह्माच्या ठायीं दूर-समीपता नाहीं. तर दूर व समीप हे केवल कल्पना करणाऱ्या जीवाच्या दृष्टीचे भेद आहेत. वास्तव प्रतिबिंबाप्रमाणें, मृगजळाप्रमाणें अथवा दोषदृष्टीस भासणाऱ्या दोन

चंद्राप्रमाणें असलेल्या या जगात सत्यता कोठून असणार ? विचाररूपी प्रखर अग्नीनें अविद्यारूपी फार दिवसांच्या वेलीस जोंवर समूल जाळून टाकिलें नाहीं तोंवर ती सुखदुःखरूप विविध विस्तार करीत रहणारच, हें तू विसरूं नको, ह्मणजे झालें ११९.

**सर्ग १२०—लवणानें पुनः जाऊन तें चांडाळाचें वन पाहिलें व चांडाळ जातीच्या सासूशीं भाषण केलें, असें येथें सांगतात.**

वसिष्ठ—रामा, सोन्याच्या मुद्रिकात्वाप्रमाणें ब्रह्माचें विश्वत्व आहे. म्हणजे सोन्यामध्यें मुद्रिकात्व जसें आरोपित त्याप्रमाणें ब्रह्माचे ठायीं विश्व आरोपित आहे, हे मी तुला आतांच सांगितले. पण अविद्या मिथ्या आहे, असें सांगितल्याबरोबर तिचें महत्त्व कसें चमत्कारिक रीतीनें क्षीण होऊं लागतें तें ऐक. लवण राजा तशाप्रकारचा तो भ्रम पाहून दुसऱ्या दिवशी ते अरण्य पाहण्याकरिता निघाला. "मी ज्या अरण्यात तें दुःख पाहिले त्याचे मला चांगलें स्मरण आहे. यास्तव ज्याचे संस्कार चित्तात दृढ झाले आहेत तें अरण्य विंध्याचलावर गेल्यावर कदाचित् मला सांपडेल" असे मनात आणून सचिवासह तो दक्षिणमार्गानें निघाला आपल्या चतुरंग सैन्यासह तो यावेळी निघालेला असल्यामुळे पुनः दिग्विजयाकरताच तो येत आहे, असें इतर राजास वाटलें. जाता जातां तो विंध्यपर्वतावर येऊन पोंचला व चोहोंकडे मोठ्या कौतुकानें फिरूं लागला. शेवटीं त्यास तें अरण्यही सापडले. त्यात शिरून पूर्वी अनुभविलेले अनेक प्रदेशादि पाहिल्यावर त्यास मोठें आश्चर्य वाटलें. तेथील परिचित लोकास त्यानें ओळखिलें. तो आणखीं पुढे गेला. तों त्यास त्याच्या सासऱ्याचा गांव लागला. चार घटिका झालेल्या भ्रमात त्यानें पाहिलेले ते सर्व लोक, त्या स्त्रिया, त्या झोंपड्या, तीच भूमि, वृक्ष, इत्यादिकास अगदीं बरोबर ओळखून तो क्षणभर देहभान विसरला. तेथें दुष्काळ पडल्यामुळें जिकडे तिकडे हाहाकार झाला होता. कोणी पुत्राकरितां, कोणी कन्येकरितां, कोणी मातेकरितां, कोणी पित्याकरिता, कोणी पतीकरिता व कोणी इतर आप्ताकरितां रडत होते. कोणी कोणी तर आपल्या शारीरिक व्यथेमुळेंच दुःखी होऊन हाय हाय करीत होते. सासऱ्याच्या अगदीं घराजवळ गेल्यावर अंगणांतच दुसऱ्या पुष्कळ वृद्ध स्त्रियांमध्यें बसून व डोळ्यांत पाणी आणून आपलें दुःख सांगत असलेली वृद्ध सासू त्यास दिसली.

तिचे स्वरूप स्वभावतःच वाईट होतें व त्यांतून दुष्काळाचे कष्ट सोसून तर ते अधिकच विचित्र झाले होतें. तिचे डोळे खोल गेले होते. गालाची हाडे बाहेर येऊन बोथरे तोंड अतिशय विद्रूप दिसत होते. हातापायाच्या काड्या होऊन मासरहित चामडी लोंबत होती. पिकलेल्या तिच्या केसाचें तर वर्णनच करवत नाहीं. बोलताना व रडताना मध्येच दोन्ही हातानीं ओरपून त्यास ती जर्जर करीत असे. अगावरील मळाचीं पुटे तिच्या दुर्भाग्याची, न बोलताच, साक्ष देत होती. असो, तिच्या मुलीच्या व जावयाच्या दुर्दशेची वार्ता तिला नुक्तीच कळल्यामुळे ती त्याच्याकरिता यावेळी रडत आहे व सभोंवारच्या तिच्या मैत्रिणी तिचे समाधान करण्याकरिता आल्या आहेत, असे तिच्या पुढील भाषणावरून राजास समजले. ती ह्मणाली—अगे माझे बये, तीन दिवसात तुला अन्न मिळालें नाही व त्यामुळे तू अतिशय भागलीस, तुला फार कष्ट झाले, पतीबरोबर देशातरास जात असताना तुला मार्गात एका झाडाखालीं ग्लानीची निद्रा आली व तुझी पोरें तुझ्या अगावर येऊन लोळू लागलीं. इतक्यात तुझा तो प्रियपति तुला सोडून कोठे गेला. अन्नकष्टामुळे ज्याचे देह क्षीण झाले आहेत अशा तुला, मुलाना व आम्हालाही पाहून त्याचा जीव व्याकुळ होत असे व तुम्हीं त्याला प्राणाहूनही प्रिय होता. पण असे असताना तो तुम्हास सोडून कसा गेला! अरे माझ्या जावया, बाळा, तू कुटुब पोषणाकरिता काय काय करीत होतास. डोगराच्या उच कड्यावर असलेल्या ताडाच्या झाडावरही चढून तू ताडगोळे काढीत असस. खालीं उतरताना दोन्ही हात झाडास धरण्याकडे गुतून जात व त्यामुळें ताडफळे कोठे ठेवावीं असा तुला विचार पडे. पण तू त्याचे देठ दातात धरून भराभर खालीं उतरस. एकादे वेळी उतरताना तुझे हातपाय सुटल्यास तू जवळच्या लहान ताडाच्या झावळ्यास धरून काहीं वेळ वादरासारखा लोंबत रहास व आपला तोल सावरला म्हणजे पायानीं त्याचे काड धरून हळु हळु खालीं येऊन उभा रहास. पण आतां तुझीं ती साहसी कर्मे मला कोठून दिसणार? झाडींतून लपत लपत फिरणाऱ्या तरसास पाहून ओरडत वेगाने त्याच्या मागे धावणाऱ्या तुझें धैर्य खरोखरच विलक्षण होतें. काय सागू, माझ्या बयेचा व त्याचा जोडा रतिमदनाच्या जोडयासारखा माझ्या मनास आनद देत होता. माझ्या

पोरीला व तिच्या नवऱ्याला काळानें माझ्यापासून कसें ओढून नेलें? अरे माझ्या फुटक्या दैवा, अतःपुरातील स्त्रियांस सोडून जणुं काय तो कोणी राजपिंडच अकस्मात् येथें आला व माझ्या कन्येशीं विलास करूं लागला. पण तें तुला आवडलें नाहीं. दोघांचा एकाच कालीं नाश झाला. एका श्रेष्ठाचा चांडालकन्येशीं संबंध करविणाऱ्या संसारनदींतील तरंगाकार कर्मांनीं आपल्या तुच्छतेस सीमाच नाहींसे करून सोडिलें आहे. मज मंदभागिणीस धिक्कार असो. मजवर एकदांच किती दुःखे पडलीं आहेत पहा, धनी मेला, गुणी कन्या व चिंतामणीसारखा जावई गेला. नातवडांची काय वाट झाली आहे, ईश्वर जाणे. मी दरिद्री झालें; वाईट देशांत जन्म घेतला, सर्व आयुष्य संकटांत घालविलें, हीन जातींत उपजले; मी साक्षात् भय आहे, महा आपत्ति आहे, विधात्यानें क्रोध, शोक, दुर्भाग्य इत्यादिकांचे आश्रयस्थानच मला केले आहे, यांत संशय नाहीं. अशा अवस्थेंत यापुढे जीवंत रहाणे हेच मरण असून मरणे हेच जीवित आहे.

राघवा, अशाप्रकारचा अर्थ ज्यामध्यें भरला आहे असा विलाप करीत असलेल्या तिला पाहून राजानें आपल्या बरोबरच्या दासीकडून तिचे थोडें सांत्वन करवून तिला सर्व वर्तमान विचारिलें. तेव्हां नेत्रांतून अश्रुधारा चालल्या असतानाच तिनें आपला सर्व वृत्तांत त्या करुणानिधीस सांगितला. पुष्कसघोष असें या गांवाचे नांव असून माझा चांडाल पति येथें रहात होता. त्याला एक सुंदर कन्या होती. तिला दैवयोगानें देवासारखा पति मिळाला. तो एकाएकी येथे आपण होऊन आला होता. माझ्या लाडक्या मुलीनें त्याच्या सहवासांत पुष्कळ दिवस घालविले. ऐहिक सुख भोगिले. मुले, बाळें झालीं व या वनांत आम्हीं त्याची जोपासनाही केली १२०.

**सर्ग १२१**—पुढील वृत्तांत ऐकून आश्चर्यचकित झालेला राजा आपल्या नगरास परत आला. व वसिष्ठाच्या वचनावरून त्यानें या सर्व चमत्काराचा निर्णय करून घेतला, असें या सर्गांत सांगतात.

**चांडाली**—राजा, कांहीं कालानें या ग्रामांत भयंकर दुष्काळ पडला. त्यामुळें अनेक जीव प्राणास मुकले. येथील प्रायः सर्व लोक, अन्नकष्ट असह्य झाल्यामुळें, जीव घेऊन दुसऱ्या कोठें जावयास निघाले. पण त्यांतील बहुतेक मार्गांतच मेले. येथें या सगळ्याजणी मजप्रमाणेंच अतिशय दुःखी आहेत.

श्रीवसिष्ठ—रामा, तिचे तें करुणरसप्रधान वर्तमान ऐकून राजास मोठा चमत्कार वाटला. तो आपल्या मन्त्र्यांच्या तोंडाकडे वारंवार पाहून त्या वृद्ध चांडाळीला नानाप्रकारचे प्रश्न विचारूं लागला व आपण भ्रमावस्थेंत पाहिलेलें सर्व सत्य आहे, असा त्यानें निर्णय करून घेतला. नतर दयार्द्र चित्तानें तेथील सर्वांस, अन्नवस्त्रादि इष्ट पदार्थ पुरवून, संतुष्ट केल्यावर कांहीं काल तेथें राहून तो तेथून परत फिरला व नियतीच्या विचित्र गतीविषयीं मनांत विचार करीत आपल्या नगरास येऊन पोंचला व नगरवासी लोकांनीं ज्याचा सत्कार केला आहे असा तो आपल्या गृहांत प्रविष्ट झाला. दुसऱ्या दिवशीं सभा भरवून त्यानें "हें स्वप्न खरें कसें झालें?" असा मला मोठ्या आश्चर्यानें प्रश्न केला व मीही त्याचें समाधान केलें. राघवा, याप्रमाणें ही अविद्या भयकर मोह पाडणारी आहे. अविद्येमध्यें सर्व संभवतें. स्वप्न–भ्रमामध्यें घटाचे ठायीं पटाचाही भास होतो आरशात प्रतिबिंबित झालेल्या पर्वताप्रमाणें स्वप्नांत दूरचा पदार्थही समीप दिसतो. गाढ निद्रेत थंडीच्या दिवसांतील मोठी रात्रही जशी अगदीं थोड्या अवकाशांत सपल्यासारखी वाटते त्याप्रमाणें दीर्घकालही भ्रमात अगदीं शीघ्र जातो. स्वप्नात असंभवनीय वाटणारें आपलें मरणही सभवनीय होतें. आकाशातून जाणें–येणें, स्थिर भूमीचें भ्रमण, पर्वताचें नृत्य इत्यादि सर्व भ्रमावस्थेंत सुघट आहे. वासनायुक्त चित्त जशी जशी भावना करितें तसें तसें तें पहातें. हा सर्व प्रतिभास आहे. त्याच्या योगानें क्षणही कल्प होतो व असत्‌ही सत्‌ होतें. तात्पर्य अविद्या विषय–भ्रम उत्पन्न करिते. कधीं ती सवादी भ्रम उत्पन्न करिते व कधीं विसवादी. व्यवहारात सवादी भ्रमास सत्य ह्मणतात व विसंवादी भ्रमास मिथ्या ह्मणतात. लवणाचा भ्रम सवादी होता. त्या चांडाल–वाड्यात पूर्वी कोणा एका पुरुषानें चांडालकन्येशीं विवाहादि केला व त्याचें तें वृत्तच राजाच्या मनात जसेंच्या तसे स्फुरलें. आपणास जीं अनेक स्वप्नें पडतात त्यांतही काहीं विसवादी असतात व काहीं सवादी असतात. (संवादी ह्मणजे सत्य ठरणारें व विसंवादी ह्मणजे असत्य ठरणारें.) आपण चित्तक्रियेचा अनुभव घेऊनही तिला विसरतों. ह्मणजे अनुभविलेल्या गोष्टींचें विस्मरण होतें. त्याचप्रमाणें न अनुभविलेल्या गोष्टींचें स्मरण होणेंही फारसें अशक्य किंवा दोषास्पद नाहीं. कारण सर्वच चित्तवृत्ति आत्म्यामध्यें

कल्पित आहेत, असें विस्तृत दृष्टीनें पाहिलें ह्मणजे अनुभव, स्मृति इत्यादि ज्ञानाचे पोटभेदही वस्तुतः मिथ्या ठरत असल्या कारणानें त्यांविषयीं फारसा विचार करण्याचें कारण नाहीं. स्वप्नात मी भोजन करून तृप्त झालों आहें; व दूर कोठें देशांतरीं गेलो आहें;असे वस्तुतः भुकेनें व्याकुळ झालेल्या व कोठेंही न जाता एकाच ठिकाणीं स्थिर असलेल्या प्राकृत पुरुषालाही वाटतें. पूर्वी घडलेला वृत्तांत पुनः स्वप्नात जसा दिसावा त्याप्रमाणें विंध्य पर्वतावरील चाडालाच्या ग्रामांत घडलेला हा व्यवहार राजाच्या चित्तांत व्यक्त झाला. किंवा लवणानें जो भ्रम पाहिला तोच चांडालग्रामांतील स्त्रीपुरुषाच्या चित्तावर आरूढ झाला. हें एक विचित्र गौडबगाल आहे. भिन्न भिन्न स्थळीं व काळीं रहाणाऱ्या कवींचें एकादें काव्यरूप वचन जसें शब्दतः व अर्थतः अगदी एकसारखें असतें त्याप्रमाणें लवण व चाडाल याच्या भ्रातिरूप स्वप्नाची एकवाक्यता झाली, असें तू समज. पण तसल्या व्यवहाराची गति अत्यत असत् नसते; कारण अधिष्ठानभूत चैतन्याच्या सत्तेनेंच सर्व वस्तु सत्तायुक्त होतात. त्यांना स्वतत्र सत्ता नसते. सवेदनसत्ताच भूत, वर्तमान व भविष्य प्रपचांत प्रविष्ट होऊन जलांतील तरंगाप्रमाणें अथवा बीजातील वृक्षाप्रमाणे त्या सवेदनाहून निराळी आहे, असें वाटतें. पण त्या संवेदनेतर सत्तेचें सत्त्व व असत्त्व याचा निर्णय होत नाहीं. कारण तीं दोन्ही ( ह्म० सत्त्वासत्त्व ) भ्रातिसवेदनाच्या अधीन असतात. परतु थोड्याशा विचारानें, रेतींत तेलाचा जसा अभाव असतो त्याप्रमाणें, आत्म्याचे ठायीं वस्तुतः अविद्येचा अभाव आहे, असें ध्यानात येतें. अविद्या व आत्मतत्त्व याचा संबध होणें शक्य नाहीं. कारण एकसारख्या योग्यतेच्या वस्तूचा सबध होत असतो, असाच सर्वत्र अनुभव येतो. आतां लाख व काष्ट या असदृश पदार्थांचा संबंध होतो, असें दिसतें खरें; पण त्यांचें उदाहरण येथें घेतां येत नाहीं. कारण ते दोन्ही पदार्थ एका अविद्येचेच स्पद ( विलास ) आहेत. ह्मणजे जड आहेत. त्यामुळें चेतनानें केल्यासच त्याचा सबंध होणें शक्य आहे. पण अजड आत्मतत्त्व व जड अविद्या याच्यामध्यें फारच वैलक्षण्य असल्यामुळें त्यांचा संबंध त्रिकालीं होणार नाहीं. बरें सर्व चिन्मयच आहे असें जर मानलें तर पाषाणादिकही जशा प्रकारें चिन्मय झालेले असतात तशाच प्रकारें त्यांचा व चैतन्याचा संबंध

होऊन चैतन्याकडून ते प्रकाशित होतात, असे ह्मणावें तर त्यांतही दोष आहे. कारण जगातील सर्व पदार्थ चिन्मात्र व सन्मात्र आहेत असे समजल्यावर त्याचे भान स्वप्रकाशचैतन्याच्या बळानेंच होणें शक्य आहे. चैतन्य व जड याचा सबध मानण्याचें काहीं कारण नाहीं. दिवा आपणच आपल्या स्वरूपास व्यक्त करीत असतो. दुसऱ्या दिव्याच्या सबधाची अपेक्षा धरीत नाही. तात्पर्य विषम पदार्थांचा निरतर सबध सभवत नाहीं व परस्परसबधावाचून परस्पर अनुभव येत नाहीं. बरें, सर्वच चिन्मात्र आहे, असें समजल्यास सर्वच एकरूप होऊन संबधास अवकाश रहात नाहीं व त्याची आवश्यकताही नसते. आता अनात्मज्ञास ज्ञाता, ज्ञान व ज्ञेय या त्रिपुटीच्या द्वारा अनुभव येतो, असे वाटते. पण चित् व जड याचा अभेद–सबध स्वीकारून त्याचें उपपादन करिता येत नाहीं. कारण चित् व जड यामध्यें अति वैलक्षण्य असल्यामुळे त्याचें ऐक्य होणे शक्य नाहीं, हे वर सागितलेंच आहे. भेदसबंध मानूनही त्याच्या अनुभवाचे समर्थन करिता येत नाही. कारण चित् व जड याचे एका त्रिपुटींत वास्तव्य कसे होणार ? चिन्मय वस्तूचा चित्शी सबध होतो व त्यामुळे चिन्मय पदार्थाचा अनुभव येतो ह्मणून ह्मणावे तरी जुळत नाही. कारण चिन्मय पदार्थ व चित् याच्यामध्ये सादृश्य असल्यामुळे त्याचे ऐक्य होणे जरी शक्य असले तरी त्यातील एक वेद्य व दुसरे वेत्तृ ( ह्मणजे ज्ञानाचे विषय व चित् यास जाणणारे, विषयि ) हा भेद रहात नाही. आता तूं ह्मणशील कीं लाकूड, पाषाण व मृत्तिका याचे जडत्व या दृष्टीनें साम्य असतानाही घर बाधताना त्याचा परस्पर सबध होतो व त्यामुळे घर हे एक कार्य होते. किंवा जिह्वा व रस हीं दोन्हीं जल–तत्त्वाचीं कार्यें असल्यामुळें त्यांचे साम्य असूनही परस्पर योग होऊन रसज्ञान होतें; त्याप्रमाणे चित्त्व या रूपानें साम्य असलें तरी दृक् व दृश्य याचा योग होण्यास कोणती अडचण आहे? तर त्याचे उत्तर सागतों, लांकूड, माती इत्यादि जड पदार्थ गृहादि पदार्थांच्या रूपानें परिणाम पावतात असा अनुभव येतो. पण चित् कोणत्याही अवस्थेंत परिणाम पावत असल्याचें कोठेंच अनुभवास येत नाहीं. जिह्वा व रस यांच्या संबधानें रसास्वाद समजणें हाही रासनचित्त वृत्तिरूप परिणाम आहे. संबध ह्मणजे ऐक्य. पण जड व चित् याचें

साम्य नसल्यामुळें त्याचा संबंध होणें दुर्घट आहे. तस्मात् पाषाणादि जड आहेत, असे आह्मास समत नाही. चित्‌च पाषणादिरूप आहे, जग मिथ्या असतानाही ते मिथ्या आहे असें न समजणें हाच चिच्चमत्कार होय व त्यात निमग्न झालेल्या पुरुषास हें विश्व कोट्यवधि भ्रमानी भरलेले आहे, असें वाटते. असो, रामा, कुंभादि मृत्तिकेचे विकार जसे केवल मृन्मय असतात त्याप्रमाणे त्रिजगत्‌ब्रह्ममात्र आहे. द्रष्टा, दर्शन, दृश्य, इत्यादि त्रिपुटींत साक्षिचैतन्य अनुस्यूत असतें. त्या त्रिपुटीनें रहित चैतन्य हेच परतत्त्व होय. जाग्रत्, स्वप्न व निद्रा या तिन्हीं अवस्थानीं रहित अशा तुझें जे सनातन रूप तन्मय होऊन तू सदा रहा. त्या रूपास अचेतनही ह्मणता येत नाहीं व चेतनही ह्मणवत नाही. शिलेचे हृदय जसें निश्चल असतें तसेंच ते रूप निश्चल असते, पण शिलाहृदय व ब्रह्मरूप यांमध्यें जाड्य व अजाड्य एवढाच कायनो विशेष असतो. राघवा, तू समाधिस्थ असलास तरी व व्यवहार करीत असलास तरी तन्मय होऊन रहा आत्मा देहात असतानाही कशाची इच्छा करीत नाहीं व कोणाशीं द्वेष ठेवीत नाही. हें जाणून तूं स्वस्थ व निःशंक रहा. भ्रमानें देहव्यापारात पडू नकोस. पुढे होणाऱ्या एखाद्या पदार्थामध्यें जसा चित्ताचा आसंग नसतो त्याप्रमाणें वर्तमान पदार्थांचे ठायींही मिथ्यात्वदृष्टि संपादन करून त्याचे ठायीं आसंग ठेवू नये. असे केल्यानें पुरुष आत्मरूप होतो. दूर देशात असलेला पुरुष जसा असून नसल्यासारखा असतो अथवा काष्ठपाषाण इत्यादि पदार्थ जवळ असूनही अचेतन असल्यामुळे आसंगाभिमानास अयोग्य असतात त्याप्रमाणे चित्त असून नसल्यासारखें व आसंगाभिमानास अयोग्य आहे, असे तू जाण. कारण आत्मस्वरूपानें विवेचन करून पाहिले आता चित्तराहित्याचाच ज्ञान्यास अनुभव येतो. पाषाणात जसें जल नसतें व जलांत अग्नि नसतो त्याप्रमाणें आत्म्यामध्यें चित्त नसतें. मग परमात्म्यांत कोठून असणार? निरूपण करू लागलें असता जें काहींएक नाहीं, व त्याच्या योगाने जें झाल्यासारखें वाटतें, ते खरें नव्हे. शुद्ध आत्म्यानें अशुद्ध चित्ताचें अनुवर्तन करणे मुळींच उचित नव्हे. कारण अनात्मभूत अशा त्याचें अनुकरण करू लागल्यास प्रत्यंतदेशांतील म्लेच्छांचें अनुकरण करण्यास कोणता प्रत्यवाय आहे? तस्मात् रामा, तू या चित्तचांडालास आपल्या समीप येऊं देऊ नकोस व मातीच्या मूर्तीप्रमाणें स्वस्थ रहा. चित्त नाहींच

असें समजणें हा उत्तम पक्ष व मागें तें होतें, पण आता तें मरून मिथ्या कल्पना करीत आहे, असें जाणणें हा गौण पक्ष होय. राघवा, निश्चय कर व त्यांतच स्थिर हो. आत्मा व चित्त यांच्या विषयीं विचार केला असतां चित्ताची सिद्धिच होत नाहीं. यास्तव तत्त्वतः तूं चित्तरहित आहेस. मग त्याच्या योगानें असे क्लेश का भोगितोस. या चित्तरूपी असत् यक्षानें ज्यास आपल्या अधीन करून घेतलें आहे त्या मूर्खास चद्रातूनही अग्नीच्या ज्वाला निघत आहेत, असें वाटेल. यास्तव चित्ताचा दूर त्याग करून तूं जसा आहेस तसाच स्थिर हो; मनन कर व ध्यानानें मुक्त हो. प्रथम तत्त्वबोधयुक्त होऊन मनाचा नाश कर. त्यानतर तत्त्वबोधानेंच अमलात्मा होऊन संसारांतून पार हो. मी मनस्तत्त्वाच्या लाभाकरितां पुष्कळ दिवस विचार केला. पण शुद्ध आत्म्यामध्यें मला मनोरूप मलाचा लेशही आढळला नाहीं. तस्मात् या माझ्या अनुभवाचा विचार करून तू स्थिर हो १२१.

**सर्ग १२२**—या सर्गांत पुरुषाच्या ज्ञानभूमींच्या उदयाचा क्रम व रामाच्या शोक-मोहादिकांचें निरसन करून त्यास केलेला बोध यांचें वर्णन केलें आहे.

**श्रीवसिष्ठ**—रामभद्रा, या ससारात उत्पन्न झालेल्या प्रत्येक पुरुषानें, याजन्मीं अथवा पूर्वजन्मी केलेल्या निष्काम कर्मांच्या योगानें चित्त शुद्ध झालें असता सत्सगमपरायण व्हावें. कारण, बा सज्जना, सतत ससार-प्रवाहात पडलेला हा जीव शास्त्र व सत्संग यावाचून अविद्या नदींतून पार होऊ शकत नाहीं. शास्त्र व सत्संग यांच्या संपर्कानें त्याज्य काय आहे व ग्राह्य काय आहे याचा विचार पुरुषास होतो आणि त्यामुळें तो शुभेच्छा नामक प्रथम भूमिकेंत आरूढ होतो. त्यानतर विवेकवशात् तो विचारणेंत प्रवृत्त होतो. त्या दुसऱ्या भूमिकेचाही काहीं काल अभ्यास केल्यावर त्या अधिकाऱ्यास आत्म्याचें यथार्थ ज्ञान होतें. त्याच्या योगानें त्याची अनात्मवासना आपोआप क्षीण होऊन ससारभावने-पासून मन पराङ्मुख होतें. हीच तनुमानसा नामक तिसरी भूमिका होय. योग्याचें सम्यग्ज्ञान दृढ झालें कीं तात्काल सत्त्वापत्तिसज्ञक चतुर्थभूमि सिद्ध होते. सत्त्वापत्तीमुळें वासना अगदीं क्षीण झाली म्हणजे तो योगी कर्मफलानें बद्ध होत नाहीं व म्हणून त्यास असंसक्त असें म्हणतात. ही पाचवी भूमिका सिद्ध झाल्यावर सर्वदा अतर्मुख राहून व "मी ब्रह्म आहें" अशी

वासना दृढ करून क्रमानें मिथ्या बाह्य विषयांस तो विसरतो. दीर्घकाल अभ्यास केल्यावाचून हें विषयविस्मरण स्थित होत नाहीं. ( आतां तो अभ्यास किती दिवस करावा म्हणून म्हणशील तर त्याचा अवधि सांगतों. ) समाधिस्थ असतांना, व्यत्थित अवस्थेंत व स्नानभोजनादि बाह्य क्रिया करीत असतांनाही अभ्यासवशात् मन आत्म्यामध्यें क्षीण झाल्याकारणानें तें अनात्म्यास पहात नाहीं; रुचीनें त्यांचें सेवन करीत नाहीं व त्यांचें स्मरण करीत नाहीं. तर वासना क्षीण झाल्याकारणानें मूढ ( बालक किंवा वेडा ), अथवा नुक्ताच निजून उठलेला पण चांगला जागा न झालेला पुरुष याप्रमाणें केवळ दुसऱ्याच्या इच्छेनें स्नानभोजनादि करितो. सारांश अति सूक्ष्म ब्रह्मामध्यें ज्यानें आपलें चित्त अगदीं मिळवून सोडलें आहे तो पदार्थाभावनासञ्ज्ञक सहाव्या योगभूमींत आरूढ झाला आहे, असें समजावें. त्यानतर पूर्वोक्त प्रकारें चित्त ब्रह्मामध्यें लीन करून योगी कांहीं वर्षें त्याच भूमिकेचा अभ्यास करीतो व परेच्छेनें स्नानभोजनादि करीत असतांनाही त्याविषयींची वासना सर्वथैव सोडितो आणि ही अवस्था अति दृढ झाली कीं, तो स्वतः तुर्यात्मा होतो. सहाव्या भूमिकेंत चित्ताची ब्रह्माकारता स्थिर करण्याकरिता पुरुषास थोडासा प्रयत्न करावा लागतो. पण या सातव्या अवस्थेंत ती स्थिति स्वभावसिद्ध होते. म्हणजे चित्ताच्या, ब्रह्माकारतेकरितां प्रयत्न करावा लागत नाहीं. या भूमींत आरूढ झालेलाच मुख्य जीवन्मुक्त होय. ( पूर्वींच्या भूमींतही ज्यांस आत्मसाक्षात्कार झालेला असतो ते जीवन्मुक्तच असतात, हें खरें, पण केव्हां केव्हां प्रबल प्रारब्धामुळे त्यास इष्टानिष्टाचा अनुभव येतो. तसा या भूमींतील योग्यांस त्यांचा अनुभव येत नाही. कारण योगपरिपाकजन्य पुण्यातिशयामुळें त्याचे प्रबल प्रारब्धही त्याच्या जीवनावांचून दुसरें कांहीं करू शकत नाहीं. ) तो इष्ट वस्तूच्या प्राप्तीनें आनंदित होत नाहीं व अनिष्ट वस्तूच्या लाभाने दुःखी होत नाहीं. तर निःशंकपणें जें प्राप्त होईल त्याचा समचित्ताने स्वीकार करितो. राघवा, तुझेंही चित्त अत्यंत शुद्ध झालें आहे. तुला सर्व ज्ञातव्य (जाणण्यास योग्य असलेले ) ज्ञात झालें आहे व तुझी वासना सर्व कार्यापासून परावृत्त झाली आहे. तूं सदा समाधिस्थ रहा अथवा लौकिक

व्यवहार करीत रहा. पण हर्षशोकयुक्त होऊ नको. कारण तू उपद्रव-शून्य आत्मा आहेस. स्वयप्रकाश, शुद्ध, सर्वव्यापी व नित्य अशा तुला आत्म्यामध्ये सुख, दु:ख, जन्म, मरण कोठून असणार? रामा, तू अबधु आहेस. तेव्हा तुला बधूकरिता तरी शोक कसा होईल, अद्वितीय आत्म्यामध्ये बधू रहाणार कसे? शिवाय बधू म्हणजे कोण? आपल्या सबधी जनाचे देह कीं आत्मे? त्याचे देहच बधु आहेत व तेच शोकार्ह आहेत म्हणून म्हणावे तर भस्मीभूत देह परमाणूचा ढीग आहे व अचेतन अस-ल्यामुळेंच तो शोकार्ह नव्हे. बरे त्याचे आत्मे शोकार्ह आहेत म्हणून म्हणावें तर आत्मा एक व नित्य असल्यामुळे कोणत्याही काळीं व देशी तो शोकार्ह होत नाही. रामा, तू अविनाशी असतानाही 'मी विनाश पावतों' असे खोटेच समजून व्यर्थ शोक करितोस. मृत्युशून्य आत्म्यामध्ये विनाश राहू लागल्यास प्रकाशातही अधकार का नाही राहणार! घट फुटल्यावर घटाकाश नष्ट होत नाहीं, मृगजळाची नदी नाहींशी झाली असता सूर्याचे किरण नाहींसे होत नाहींत, त्याप्रमाणे शरीर नष्ट झाले तरी तू नष्ट होणार नाहीस. तुझ्या चित्तात व्यर्थ इच्छाच का उद्भवते. अद्वितीय आत्मा दुसऱ्या कोणत्या वस्तूची इच्छा करणार? राघवा, श्रवण करण्यास, स्पर्श करण्यास, दर्शनास, रस घेण्यास व हुगण्यास योग्य असे आत्म्यावाचून दुसरे काहींही या जगात नाहीं. त्या सर्व-शक्तियुक्त आत्म्यामध्ये, व्यापी आकाशातील शून्यतेप्रमाणे, सर्व शक्ती स्थित आहेत. अत्यत असत् जगाच्या उत्पत्तीचें बीज चित्त आहे, हे मागें सागितलेच आहे. वासना-क्षय असेंही ज्याला ह्मणतात तो मन:शम (चित्तक्षय) सिद्ध झाला असता कर्माचे वसतिस्थान अशी ही माया नष्ट होते. वासना ही ससार-चक्रास लाविलेली दोरी आहे तिला मोठ्या प्रयत्नाने तोडून टाक. ह्मणजे तें चक्र बद पडेल. महा मोहात पाडणाऱ्या मायेचें स्वरूप जोंवर समजत नाहीं तोवर ती प्राण्यास भ्रमण करावयास लाविते. पण तिचें स्वरूप जाणले की, तीच अनत सुखरूप ब्रह्म देते. कारण ब्रह्मापासून झालेली ही ससाराचा उपभोग घेऊन, स्वलीलाभूत अशा ब्रह्मविद्येनें ब्रह्माचें स्मरण करून ब्रह्मामध्येंच लीन होते. तेजापासून जसे प्रकाश निघतात त्याप्र-माणे शिव, नीरूप, अप्रमेय व निरामय अशा आत्म्यापासून सर्व भूतें उद्भवतात. वृक्षाच्या पर्णामध्यें जशा शिरा, जलामध्ये जशा लाटा, सोन्या-

मध्ये जसे कटकादि अलकार व अग्नीत जसें उष्णादि त्याप्रमाणे वासनानीं मर्यादित झालेल्या ब्रह्मामध्यें हें त्रिभुवन आहे. ते त्याच्यापासूनच होतें व त्याच्या आश्रयानेच रहाते. फार काय पण हें तेंच आहे. सर्व प्राण्याच्य आत्म्यासच ब्रह्म ह्मणतात. त्याला जाणलें असता सर्व जग ज्ञात होते. त्रिभुवनात ज्ञाता तेंच आहे त्या सर्वव्यापी तत्त्वास, शास्त्रीय व्यवहार करिता यावा ह्मणून, चित्, ब्रह्म, आत्मा, इत्यादि नावें विद्वानानीं योजिलीं आहेत विषय व इंद्रियें याचा सयोग झाला असताही हर्षविषादरहित अशी जी ही शुद्ध अनुभूति ( अनुभव ) तोच अव्यय चिदात्मा होय. सर्व प्रिय व अप्रिय विषय मिथ्या आहेत, असा निश्चय झाला असता, दैवयोगाने जरी विषयेंद्रियसयोग झाला तरी चित्तात विकार उत्पन्न होत नाहींत. आत्म्यामध्येंच जग पृथक् असल्याप्रमाणे प्रतिबिंबित होते. पण शुद्ध साक्षीस प्रतिबिबित जगाचे प्रियाप्रियरूपानें विवेचन करितां येत नाहीं. ह्मणून त्याच्या विवेचनाकरिता आत्मा व जग याहून निराळी बुद्धि त्याच्यामध्ये प्रतिबिबित होते व तीच हे प्रिय आहे, हें अप्रिय आहे इत्यादि विकल्प करून लोभ, मोह इत्यादि भावास प्राप्त होते. आत्मा त्या भावास कधींच प्राप्त होत नाहीं. जग, त्याविषयींची बुद्धि व लोभमोहादिक मिथ्या भेदाने आत्म्यामध्यें प्रतिबिंबित होतात. ह्मणजे त्याचा भेद वास्तविक नव्हे. तर परमार्थतः ते आत्मरूपच आहेत. यास्तव देहच मी आहे, असें जाणणाऱ्या मूढासच भय–विषाद इत्यादि होणे युक्त आहे. केवल चिदाकार अशा तुझ्या ठायीं त्याचा सभव नाहीं. पण असे असतानाही देहाभिमानशून्य असा तू देहजन्य विकाराच्या योगाने व्याकुळ होतोस हें आश्चर्य नव्हे का? ज्याना आत्मज्ञान झालेले नसते त्याच्या शरीराचे तुकडे झाले तरी चिदात्म्याचा नाश होत नाही, मग ज्ञान्याच्या चिदात्म्याचा नाश कसा होणार? चित्त सर्वत्र सचार करण्यास समर्थ आहे. सूर्याच्या निराधार मार्गातही त्यास प्रतिबध होत नाहीं व तेच शरीररूपी पुरींत रहात असल्यामुळें पुरुष होय. ससारी आत्मा तेंच आहे. शरीर नव्हे. त्यामुळें शरीराच्या नाशानें त्याचा नाश होत नाहीं. या विचित्र दुःखाचा तुला अनुभव येतो खरा, पण तीं दु.खे अग्राह्य आत्म्याचीं नव्हेत. तर तीं सर्व जड कोटींत अतर्भूत होणाऱ्या चित्ताचीं आहेत. कारण मनाचाही विषय न होणाऱ्या आत्म्याशी सुखदुःखाचा सबध

कसा होणार ? असो; देह नष्ट झाल्यावर जीव कोठें जातो ह्मणून ह्मणशील तर सांगतों. नष्ट झालेल्या देहावरील अभिमान सोडून जीव प्रथम स्वप्रतिष्ठाभूत परमात्म्यापाशीं जातो. पण त्यास आत्मज्ञान झालेलें नसल्यामुळें, मी परमात्म्याहून भिन्न आहें व या सृष्टींतील हे सर्व पदार्थ परस्पर भिन्न आहेत अशा प्रकारची त्याची भेदवासना समूल नष्ट झालेली नसते. आणि त्यामुळें तो तात्काळ मुक्त होत नाहीं. जीवाचें स्वरूप औपाधिक आहे. अर्थात् उपाधि असेपर्यंतच तें असणार हें उघड आहे. कांहीं काल रहाणाऱ्या वस्तु अनित्य असतात, हेंही न्यायानें सिद्ध आहे. तेव्हां उपाधींचा नाश झाल्याकारणानें औपाधिक जीवाचाही जर नाश झाला तर त्यांत तुज नित्य आत्म्याची कोणती हानि आहे ? यास्तव सत्यत्वाची भावना कर. असत्य व भ्रांतिमय अशा देहादिकाची भावना दृढ करूं नकोस. ह्मणजे पूर्ण ब्रह्मभावनेनें तृप्त झालेल्या तुला कोणत्याही मिथ्या वस्तूची इच्छा होणार नाहीं. साक्षिभूत, सम, स्वच्छ, निर्विकल्प व निरिच्छ अशा चिदात्म्याचे ठायीं त्याची इच्छा नसतांनाही जगाचें प्रतिबिंब पडतें. आकाशाची इच्छा नसली तरी सुद्धा वस्तुस्वभावामुळेच त्यात जसें बिंबाचें प्रतिबिंब पडतें तसाच हा सर्व प्रकार आहे. सूर्याच्या केवळ सांनिध्यामुळें जसा जगाचा व्यापार सुरू होतो त्याप्रमाणें केवल चित्सत्तेनेंच हें जग निष्पन्न होतें. दीपाच्या सत्तेनें स्वभावतःच जसा प्रकाश पसरतो त्याप्रमाणें चित्तत्त्वाच्या स्वभावानेच जगाची स्थिति होते. शून्य आकाशानें या सर्वांनुभवसिद्ध शून्य नीलवर्ण कटाहास ( कढईच्या आकाराच्या निळ्या आच्छादनास ) जसें निर्माण केलें आहे त्याप्रमाणें परमात्म्यापासून प्रथम उत्पन्न झालेल्या मनानें आपल्या विकल्पानें हें सर्व जग निर्मिलें आहे. त्यामुळें संकल्पक्षीण होऊन चित्त शांत झालें कीं, संसारमोह नाहींसे होतात आणि शेवटीं एक, अज, आद्य, व अनंत चिन्मात्र अवशिष्ट रहातें १२१.

इति श्रीशंकराचार्यभक्त विष्णुकृत श्रीमद्बृहद्योगवासिष्ठसाराचें

तिसरें उत्पत्तिप्रकरण समाप्त झालें. ३.

श्रीकृष्णार्पणमस्तु

ग्रंथसंपादक व ग्रंथप्रसारक मंडळीची ग्रंथमाला

ग्रंथ ४६ वा.

# बृहद्योगवासिष्ठसार.

## भाग २ रा.

( स्थिति व उपशम प्रकरणात्मक )

सारलेखक

वे. शा. सं. विष्णु वामन बापट शास्त्री,

प्रकाशक,

दामोदर सांवळाराम आणि मंडळी.

प्रिंटर्स, पब्लिशर्स, एजंटस इत्यादि,—ठाकुरद्वार, मुंबई

मुंबई,—'इंदुप्रकाश' स्टीम प्रेसमध्यें छापिला.

सन १९१० इसवी

किंमत २॥ रुपये.

# प्रकाशकाचे दोन शब्द

बृहद्योगवासिष्ठसाराचा हा ( चतुर्थ व पचम प्रकरणात्मक ) दुसरा भाग आज आम्ही, पूर्वी प्रसिद्ध केल्याप्रमाणे, प्रकाशित करीत आहो. हा भागही अनेक सुदर कथानके व रम्य उपदेश याच्या योगाने किती उत्कृष्ट वठला आहे, हे प्रत्यक्ष पुस्तक वाचल्यावर वाचकाच्या ध्यानात येईलच. आता या वासिष्ठ महारामायणाचे निर्वाण-नामक एकच मोठे, पण हृदयगम प्रकरण राहिले आहे व ते लिहिण्याचे काम चालू आहे. लवकरच तो चरम भागही प्रिय वाचकाच्या हाती देऊन एकाच लेखकाने, एकाच शैलीने सपविलेल्या या मोठ्या ग्रथाच्या प्रकाशनातून आम्ही पार पडणार आहो. तिसऱ्या भागाच्या शेवटी लेखक वे. शा. **विष्णुशास्त्री बापट** हे दोन परिशिष्टे जोडून त्यातील एकात या विस्तृत ग्रंथाचा मथितार्थ व दुसऱ्यात कठिण पारिभाषिक शब्दाचा अक्षरानुक्रमाने स्पष्टार्थ देणार आहेत, तरी वाचकानी आमची ही सेवा गोड करून घ्यावी.

# विषयानुक्रमणिका.

## ४. स्थितिप्रकरण ४९७–६५२.


| सर्ग. | विषय. | पृष्ठ |
| --- | --- | --- |
| १ | जग मिथ्या व ब्रह्ममात्र आहे. .... .... .... .... | ४९७ |
| २ | तर्कांनी जगत्स्थितीचें निरसन. पूर्ण आनंदरूपता. .... | ५०० |
| ३ | जग ब्रह्मविवर्त आहे, ते ब्रह्मरूप आहे अनंत आहे. ... | ५०२ |
| ४ | जगत्स्थितीचें मूळ सेंद्रिय मन. त्याच्या उच्छेदानें जगाचा उच्छेद. | ५०४ |
| | ( भार्गवोपाख्यान ). | |
| ५ | पर्वतावर क्रीडा करणाऱ्या शुक्राला अप्सरे पासून मोह. .... | ५०५ |
| ६ | शुक्र मनाने स्वर्गाला गेला. इंद्राने त्याचा सत्कार केला. .... | ५०६ |
| ७ | त्याला प्रियेचें दर्शन झालें. समागम. .... .... .... | ५०८ |
| ८ | स्वर्गभोगानंतर शुक्राचे अधःपतन व अनेक जन्म. .... | ५१० |
| ९ | भृगुपाशी असलेले शुक्राचे शरीर सुकून धुळींत पडून राहिले. | ५१२ |
| १० | मृतपुत्रास पहाताच भृगु रागावला कालाने त्याला बोध केला. | ५१३ |
| ११ | जगत्स्थिति म्हणजे मन क्रिडा आहे असें वर्णन काल करतो. | ५१८ |
| १२ | आत्म्याच्या विकारत्वाचे निवारण. जगद्वैचित्र्य भ्रमरूप आहे. | ५२२ |
| १३ | मनःशक्तीचें वर्णन. भृगु व काल शुक्राकडे जावयास निघतात. | ५२३ |
| १४ | त्यानीं समाधिस्थ शुक्राला जागे केलें व पूर्ववृत्तांताचें स्मरण दिलें. | ५२५ |
| १५ | शरीराची दुर्दशा पाहून शुक्राचा खेद. . .... | ५२७ |
| १६ | शुक्र व भृगु जीवन्मुक्त होऊन आपापल्या अधिकारारूढ झाले. | ५३१ |
| १७ | शुद्ध चित्ताची सत्यसंकल्पता, शुद्धचित्त-जीवाचा परस्पर संबंध | ५३२ |
| १८ | मलिन-चित्ताचा मलिन-चित्ताशीं संबंध. आत्मज्ञानाचीं साधनें. | ५३५ |
| १९ | उपासनेप्रमाणे फलप्राप्ति, सत्य आत्म्याची स्थिर सिद्धि, .... | ५३९ |
| २० | मनाच्या स्वरूपाचें निरूपण आत्मप्रवणोपदेश. .... .... | ५४२ |
| २१ | विशुद्ध अवस्थेंत मनःकल्पना भाव. .... .... .... | ५४३ |
| २२ | बोधयुक्त चित्ताचे सर्व दोष क्षीण होतात. .... .... .... | ५४७ |
| २३ | शरीर नगरातील राज्य, सद्योगामुळें चित्तविनोद; सुखानुभव. | ५४९ |
| २४ | इंद्रियाचें प्राबल्य; त्यास जिंकण्याचा उपाय. .... .... | ५५३ |

सर्ग विषय. पृष्ठ.

## ( दामादिकांचा न्याय ).

२५ शंबर दामादिकास उत्पन्न करतो व जयाची आशा करतो. ५५५
२६ देव व मानव याचा भयकर सग्राम. .... .... ... ५५७
२७ वासनावृद्धि हाच दामादिकाच्या नाशाचा उपाय .... .... ५५८
२८ देव थोडी विश्रांति घेऊन पुन. युद्ध करू लागले .... ... ५६०
२९ दामादिकाचा अभिमान, त्याचा विषाद, पलायन व पराभव. ५६१
३० दामादिकास अहकारामुळें पुढे अनर्थात पडावे लागले .... ५६३
३१ अहमानामुळे पुरुषार्थाची हानि व अनर्थाची प्राप्ति होते. ५६५
३२ दामादिकाच्या अनेक योनी, मशकादि भाव, ज्ञान व मोक्ष. ५६८
३३ शुभ उद्योग, साधु व सच्छास्त्र याचे वैभव, बध व मोक्ष..... ५७२
३४ देवानी हरीची प्रार्थना केली. त्याने शबरासुराला मारले .... ५७८
३५ सत्सग, विवेक, आत्मज्ञान, समाधि, भोगविरक्ति. ... ५८०
३६ असक्त चित् सर्वत्र स्थित आहे तिच्या योगाने भावाची स्थिति. ५८४
३७ अविद्या, काम व कर्म याच्या योगाने आत्म्याचा अनात्मभाव. ५८७
३८ मन:सगामुळें कर्तृत्व व त्याच्या अभावी बध नाहीं. .... ५८८
३९ ब्रह्माचें सर्वशक्तित्व, रामाचा मोह, वसिष्ठाचा विचार व बोध. ५९१
४० उपाधीमुळे जीवभेद जीव व त्याच्या उपाधी ब्रह्ममय आहेत. ५९३
४१ सर्व ससाराचे बीज माया आहे व ती अनिर्वचनीय आहे.... ५९५
४२ अनत चिच्छक्तीपासून वासनाक्रमाने जीवाचे अवतरण. .... ५९७
४३ जीवाच्या कर्मगती विवेकादिकाच्या दौर्लभ्यामुळे मुक्तिदौर्लभ्य. ६००
४४ मुक्ति व प्रलय यातील विशेष. विरिंचि-जीवाचा शरीर-धारण-क्रम ६०२
४५ मनाचें कार्य जग सत्य नाहीं. सत् त्रिकालीं सत्च. ... ६०५
४६ संसारात विहार करतानाहीं त्यात मग्न न करणारे गुण. .... ६०७
४७ होऊन गेलेल्या व पुढें होणाऱ्या असख्य ब्रह्मादिकाचें वर्णन. ६१०

## ( दाशूरोपाख्यान ).

४८ भोगेच्छेची निंदा, दाशूराचा जन्म व मिळालेला वर. .... ६१४
४९ शाखादिकांच्या योगानें मनोहर झालेल्या कदंबाचे वर्णन. .... ६१७
५० दाशूरानें केलेलें दिशाचें स्त्रियांच्या आकाराचें वर्णन. .... ६१९

| सर्ग. | विषय. | पृष्ठ. |
|---|---|---|
| ५१ | दाशूराचे मानसिक यज्ञ, आत्मबोध, पुत्रोत्पत्ति व ज्ञान. .... | ६२० |
| ५२ | खोत्थाचें कल्पित चरित्र. .... .. .... ... | ६२२ |
| ५३ | खोत्थाच्या आख्यानाचे तात्पर्य. .... .. . .... ... | ६२५ |
| ५४ | संकल्पाची उत्पत्ति, रूप, घनता, व उच्छेदाचा उपाय .... | ६२९ |
| ५५ | दाशूर व वसिष्ठ यांचा संवाद. . .... .... | ६३२ |
| ५६ | जडाची सत्तासत्ता व चित्‌ची कर्त्रकर्तृता यांचा विचार. .... | ६३८ |
| ५७ | वासना वर्ज करून सिद्ध झालेल्याची प्रशंसा. .... | ६३८ |
| ५८ | कचाची गाथा. .... .... .... .. .... ... | ६४२ |
| ५९ | ब्रह्मदेवाच्या संकल्पापासून विश्वाची कल्पना .... ... | ६४२ |
| ६० | बोधास पात्र असलेल्या सात्त्विक जीवाचा देहग्रहणक्रम. .... | ६४६ |
| ६१ | राजस-सात्त्विक लोकांची प्रशंसा. विवेकवैराग्यादिकांचा क्रम. | ६४८ |

## ५. उपशमप्रकरण ६५२—८७१.

| | | |
|---|---|---|
| १ | मध्याह्नसमयीं शंखध्वनि होताच सभा उठते ... .... | ६५२ |
| २ | रामाची आह्निकक्रिया, चिंतन व बुद्धीची प्रार्थना ... ... | ६५४ |
| ३ | प्रातःस्नानादि, रामादिकांसह वसिष्ठमुनीचें सभेंत जाणें .... | ६५६ |
| ४ | रामानें केलेली वसिष्ठाची प्रशंसा, वसिष्ठांनीं रामास केलेले प्रश्न, रामाचें उत्तर व पुढील उपदेशाविषयीं प्रार्थना .... | ६५८ |
| ५ | अविवेकजन्य मनोमात्र जगत्स्थितीच्या उपशमाचा उपाय.... | ६५९ |
| ६ | कर्माची गति, जीवन्मुक्तीकरिता संपादनीय गुणांचा क्रम.... | ६६२ |
| ७ | भाग्यवानास अनायासानें ज्ञानप्राप्ति .... .... .... | ६६४ |

### ( जनकाची आख्यायिका. )

| | | |
|---|---|---|
| ८ | जनकानें सिद्धांनीं म्हटलेले श्लोक ऐकले .... .... .... | ६६४ |
| ९ | सिद्धगीता ऐकलेल्या राजाचा निर्वेद व विचार .. . .... | ६६६ |
| १० | प्रतीहाराची कर्मानुष्ठानाविषयीं प्रार्थना व राजाचा विचार .... | ६६७ |
| ११ | राजाचें आह्निकानुष्ठान व पहाटे त्यानें चित्ताला केलेला बोध | ६७२ |
| १२ | जनकाची जीवन्मुक्तस्थिति विचार व प्रज्ञा यांचें विचित्र माहात्म्य | ६७३ |
| १३ | जनकाच्या विचाराच्या दृष्टांतानें चित्तशांतीचा उपाय .... | ६७५ |
| १४ | प्राकृत लोकांची उपेक्षा. मनाच्या मार्जनाचा उपाय .... | ६८२ |

| सर्ग. | विषय. | पृष्ठ. |
|---|---|---|
| १५ | तृष्णेचें वर्णन .... .. .... .... .... .... | ६८७ |
| १६ | ध्येय व ज्ञेयत्याग. जीवन्मुक्त व विदेहमुक्त याचे लक्षण .... | ६८८ |
| १७ | जीवन्मुक्त बद्धकरो होत नाहीं, व अज्ञ कसे होतात .... | ६९० |
| १८ | संसारांत राहूनही दुःखी न होणाऱ्या विद्वानाची स्थिति. | ६९२ |
| | **( पुण्य व पावन यांचें आख्यान. )** | |
| १९ | पुण्यानें पितृशोकार्त पावनास केलेला उपदेश .... .... | ६९४ |
| २० | पुण्य व पावन याच्या पूर्वजन्माचें वर्णन. .... .... .... | ६९६ |
| २१ | तृष्णापाशक्षय हाच मोक्ष. आत्मपूर्ण पुरुषाला मुक्ति मिळते. | ६९७ |
| | **( बलीचे आख्यान. )** | |
| २२ | पाताळाचे वर्णन, बलीचे राज्य, त्याने केलेला विचार .... | ६९९ |
| २३ | राजमन्त्र्याचें उपाख्यान मंत्र्याचे अप्रतिद्वंद्व व ऊर्जित वीर्य..... | ७०१ |
| २४ | त्या दुर्मन्त्र्याला जिकण्याचा व राजदर्शनाचा उपाय. .... | ७०४ |
| २५ | बलीचा विचार व त्यानें केलेलें शुक्राचार्याचे स्मरण .... | ७०९ |
| २६ | बलीस तत्त्वसारोपदेश करून शुक्र स्वर्गलोकी गेला. .... | ७१० |
| २७ | बलीला ज्ञान झाले व विश्राति घेत तो दीर्घकाल राहिला. .... | ७१२ |
| २८ | दानवाचा शुक्रानें शोक घालविला.... .... .... .... | ७१३ |
| २९ | बलीची राज्यश्री रामाला बलीप्रमाणे होण्याचा उपदेश. .... | ७१४ |
| | **( प्रल्हादाचें आख्यान )** | |
| ३० | हिरण्यकशिपूचें वीर्य, नृसिहकृत त्याचा वध, और्ध्वदेहिक. .... | ७१९ |
| ३१ | प्रल्हादानें विचार केला आणि हरिभक्तीने तो तद्रूप झाला. .... | ७१० |
| ३२ | प्रल्हादाने केलेली विष्णूची मानसपूजा देवानीं हरीस केलेला प्रश्न | ७२३ |
| ३३ | हरिभक्तीने दैत्याच्या विवेकादि गुणाचा उदय. हरीची स्तुति.... | ७२५ |
| ३४ | प्रल्हादाने सुविचारानें आपल्या सच्चिदद्वय आत्म्यास पाहिलें. | ७२७ |
| ३५ | साक्षात् आत्म्याचें वर्णन करून प्रल्हाद आनदित होतो. .... | ७३१ |
| ३६ | आत्म्याची प्रल्हाद स्तुति करितो व आनद भोगतो. .... | ७३६ |
| ३७ | प्रल्हाद समाधिस्थ असतांना दानवपुराची शत्रूंनीं दुर्दशा केली. | ७३८ |
| ३८ | जगाची व्यवस्था व दैत्यकुलाचें रक्षण याविषयीं हरीची चिंता. | ७३९ |
| ३९ | हरीनें प्रल्हादास सावध केलें व राज्य करावयास सांगितलें. | ७४१ |
| ४० | ज्ञानी पुरुषानें विदेहाप्रमाणें व क्रियापराप्रमाणें व्यवहार करावा. | ७४३ |

| सर्ग. | विषय. | पृष्ठ. |
| --- | --- | --- |
| ४१ | हरीनें प्रल्हादाला राज्याभिषेक वर मागावयास सांगितले. .... | ७४४ |
| ४२ | या आख्यानाचें व समाधि सोडून उठण्याचें उत्तम फळ. .... | ७४६ |
| ४३ | ज्ञान प्रयत्न, व इंद्रियजय यांच्या योगानेंच संपादन करावें.... | ७४७ |
| | ( गाधीचें आख्यान. ) | |
| ४४ | दृश्याचें मिथ्या दुःखस्वरूप .... .... .... . . | ७४९ |
| ४५ | गाधीचा चांडाल—जन्म, किराताची स्थिति व राज्यप्राप्ति. .... | ७५१ |
| ४६ | दुःखीराजानें अग्निप्रवेश केला, व गाधि देहभानावर आला. | ७५४ |
| ४७ | अतिथीच्या तोंडून कीरराजाचें चरित्र ऐकून गाधि विस्मित झाला | ७५६ |
| ४८ | विष्णूनें तीं सर्व माया आहे, असे सांगितलें .... ... | ७६० |
| ४९ | गाधीला पुष्कळ विचार व प्रयत्न केल्यावर सर्व माया हें कळलें | ७६२ |
| ५० | चित्तजयाचे उपाय, ज्ञानमाहात्म्य, चित्तसर्पाच्या पुष्टीचे हेतू | ७६६ |
| ५१ | प्रयत्न करणाऱ्या उद्दालकाच्या विक्षेपाचे वर्णन. .... .... | ७६९ |
| ५२ | गृहस्थ उद्दालकानें चित्तप्रबोधनाच्या उपायाचें चिंतन केलें. | ७७१ |
| ५३ | वासना व मन यांचा आत्म्याशीं असंबंध शरीर व मन यांचें वैर | ७७५ |
| ५४ | उद्दालक वैष्णवीतनूची भावना करीत समाधींत विश्रांति घेतो. | ७८१ |
| ५५ | सत्तासामान्याचे लक्षण, देहत्याग व आख्यानोपसंहार .... | ७८५ |
| ५६ | प्रबुद्ध व वासनाशून्य झालेला व्यवहारकालींही समाधिस्थ आहे | ७८७ |
| ५७ | चित् दृश्यस्वरूप धारण करते, तीच सर्व आहे. .... | ७९१ |
| | ( सुरघूचें आख्यान. ) | |
| ५८ | किरातराज सुरघूचें नैराश्य, मांडव्यानें केलेला उपदेश. .... | ७९३ |
| ५९ | बाह्याभ्यंतर दशांचा त्याग करणाऱ्या सुरघूचा आत्मलाभ.... | ७९५ |
| ६० | मरणपर्यंत सुरघूचा असंग आचार व नंतर विदेहमुक्ति .... | ७९७ |
| ६१ | सुरघूचा परिघाशीं झालेला संवाद .... .... .... | ७९८ |
| ६२ | विद्वानाचें समाधान . .... .... .... .... .... | ८०१ |
| ६३ | सुरघु आपल्या सहज स्थितीचें वर्णन करतो. .... .... | ८०१ |
| ६४ | मनाला दूषित न करतां आत्म्याचा उद्धार करणारे उपाय.... | ८०३ |
| | ( विलास व भास यांचें आख्यान. ) | |
| ६६ | सह्य पर्वताचें वर्णन. विलास व भास यांचा जन्म, व शोक. | ८०६ |
| ६६ | भासानें व्यक्त केलेलें अज्ञांचें दुःखमागरांतील परिवर्तन .... | ८०८ |

| सर्ग. | विषय. | पृष्ठ. |
|---|---|---|
| ६७ | आसक्ति सोडल्याने आसक्तिकृत बंधाचें निवारण.... .... | ८१० |
| ६८ | संग व असग याचें लक्षण, यांच्या चिकित्सेचा उपाय. .... | ८११ |
| ६९ | सर्व आसक्ति सोडून मनाला चिन्मात्र करावें. .... .... | ८१३ |
| ७० | असग-सुखसपन्न पुरुष व्यवहारजन्य दोषानी दु:खी होत नाही | ८१३ |
| ७१ | परतत्त्व अनिर्वाच्य यास्तव तुर्याचे वर्णन शरीरादिकाचा निरास | ८१५ |
| ७२ | दृश्य-दर्शनसबध व शुद्ध साक्षी याचे वर्णन. .... .... | ८१९ |
| ७३ | तिन्ही अहभाव सोडल ह्मणजे मुक्ति व वैराग्य हस्तगत होते. | ८२२ |
| ७४ | प्रमादामुळें ससारभ्राति, प्रबोधामुळे पूर्णता, जीवन्मुक्त गुण ... | ८२३ |
| ७५ | अनेक अधिकारारूढ मुक्त देवासुरनराचे वर्णन. .... .... | ८२८ |
| ७६ | ससारसागर, त्याच्या तरणाचा उपाय व यथेच्छ क्रीडा. .... | ८३० |
| ७७ | प्राज्ञास ग्राह्य असलेले जीवन्मुक्ताचे गुण. .... .... .... | ८३२ |
| ७८ | चित्तस्पदामुळे जगद्भ्राति. योगाभ्यासानें त्याचा निरोध. . . | ८३४ |
| ७९ | चित्तन शाच्या ज्ञानरूप दुसऱ्या उपायाचे निरूपण .... | ८३७ |
| ८० | भोगाविषयीं विरक्त करणारा दृढ विमर्श, चित्तवेताळाचे निरसन | ८३७ |
| ८१ | अनुभव व युक्ति याच्या योगानें चित्ताची असत्ता.... .... | ८४० |


## वीतहव्याचें आख्यान.


| | | |
|---|---|---|
| ८२ | वीतहव्याने इद्रियें व मन यास केलेला बोध. .... .... | ८४१ |
| ८३ | तीं असेपर्यंत सर्व अनर्थ व त्याच्या अभावी निरंतर सुख. | ८४३ |
| ८४ | वीतहव्याची समाधि, भूविवरातील निवास, व हृदयातील भास. | ८४५ |
| ८५ | त्याच्या शरीराचा पिंगलानें केलेला उद्धार. .... ... | ८४८ |
| ८६ | पुन: सहा दिवस समाधि, दीर्घ जीवन्मुक्तस्थिति. .... .... | ८४९ |
| ८७ | वीतहव्याच्या विदेहमुक्तीचा क्रम .... .... .... .. | ८५१ |
| ८८ | मुक्तीनतर वीतहव्याच्या प्राणाचा लय. .... .... .... | ८५४ |
| ८९ | मोहरहित पुरुषाना सिद्धीची इच्छा नसते .... .. .... | ८५५ |
| ९० | द्विविध चित्तनाश .... .... .... .... .... .... | ८५८ |
| ९१ | संसारवल्लीचें बीज शरीर. .... .... .... .... .... | ८५९ |
| ९२ | स्थितीप्रमाणें यलागौरव लाघव वासनादिक्षय .... .... | ८६४ |
| ९३ | विचार व वैराग्य यांच्या योगानें प्राप्त झालेल्या समस्थितीचें वर्णन | ८६७ |

॥ श्रीः ॥

# अथ चतुर्थं स्थितिप्रकरणम्

**सर्ग १**—जग मिथ्या व ब्रह्ममात्र आहे.

**श्रीवसिष्ठ**—रामभद्रा, उत्पत्ति-प्रकरणानतर आता हें स्थितिप्रकरण ऐक. याचे यथार्थ ज्ञान झाले असता निर्वाण प्राप्त होत असतें. जगत् या रूपाने स्थित असलेलें हें सर्व दृश्य व त्याला पहाणारा (द्रष्टा, अह) जीव भ्रांतिमात्र व असन्मय आहे. हे एक कर्त्यावाचून, रगाची अपेक्षा न करिता, शून्य आकाशात आपोआप उद्भवलेले चित्र आहे. यातील अनेक वस्तूना पहाणारे द्रष्टे जीवही दृश्य-कोटीत येत असल्यामुळें याचा द्रष्टाही कोणी नाही हे एक जाग्रदवस्थेत अनुभवास येणारें स्वप्न आहे. मनोरथाने बनविलेल्या नगराप्रमाणे याची रचना केवळ कल्पनेनें झाली आहे. ज्याप्रमाणे मूढ पुरुष समोर असलेल्या गुंजेच्या पुजक्याकडे पाहून तो अग्नि आहे अशी कल्पना करतात त्याप्रमाणे मायेने मोहित झालेले लोक सत् ला जगत् समजतात. पण ते जगत् असत् असूनही व्यावहारिक अर्थ (प्रयोजनें) करू शकते. जलतरग-न्यायाने वस्तुत. ब्रह्माहून भिन्न नसतानाही भिन्न असल्यासारखे भासतें. मृगजळाप्रमाणें हें असत्य असूनही सत्य भासते. हें स्वप्नात पाहिलेल्या पर्वतासारखे आहे. नीलवर्ण उपड्या कढई-प्रमाणें अनुभवास येणाऱ्या या प्रसिद्ध भूताकाशाप्रमाणें हें वस्तुनः शून्य-रूप आहे. चित्रात काढलेल्या प्रफुल्लित उद्यानाप्रमाणें हें नीरस असूनही सरस असल्याप्रमाणें वाटते. चित्रातील सूर्य व अग्नीप्रमाणे हें प्रकाशरूप असल्यासारखा जरी भास झाला तरी तें निस्तेज आहे. मनोराज्यातील अनुभवाप्रमाणे ते स्वत. असत्य व फलतः अवास्तव आहे. पडद्यावर काढलेल्या कमलवनाप्रमाणें यात सार काहीं नाहीं. शून्यस्थानीं हें नाना-कार झालें आहे इद्रधनुष्याप्रमाणें यातील काहीं हातीं लागत नसलें तरी त्याचा रम्य आकार अवश्य अनुभवास येतो. हें धुक्याप्रमाणें पसरलें आहे. कोणी याला केवल जडरूप म्हणतात, कोणी मायिक म्हणतात व कोणी शून्य समजतात; कोणी हें कालतः परमाणुयुक्त आहे आणि कोणी देशतः व कालतःही परमाणुरूप आहे, असें समजतात व कोणी केवल

देशतः परमाणुरूप आहे असें मानतात. सारांश अनेकांनीं याविषयीं अनेक तर्क केले आहेत. ह्या बाह्य जगाप्रमाणेंच आध्यात्मिक अहंचीही मिथ्या स्थिति झाली आहे. तो आपल्याला भूतमय समजतो. पण तो सुद्धा भासत असूनही निशाचराप्रमाणे परमार्थतः नाहीं.

**श्रीराम**—भगवन् असे जर आहे तर महाकल्पाचा क्षय झाला असता हें दृश्य, बीजामध्यें जसा अंकुर त्याप्रमाणें आपल्या सूक्ष्म कारणांत रहातें व सृष्टिसमयीं त्यातूनच पुनः उद्भवते असें जे महात्म्यानीं सागितलें आहे त्याची काय वाट ? त्या महात्म्याना अज्ञ ह्मणावयाचे कीं ज्ञानी ?

**श्रीवसिष्ठः**—हे दृश्य प्रलयसमयीं, बीजामध्यें जसा अंकुर त्याप्रमाणें, आपल्या कारणात लीन झालेले असतें असे ह्मणणारे जे कपिलादि ( साख्यादि शास्त्रांचे ) आचार्य त्यांच्यामध्ये फार नसलें तरी थोडेसें बालिशपण असतेंच. कारण आत्मा असंग आहे, असें जरी ते बरोबर समजत असले तरी त्याचवेळीं जग सत्य आहे हा आपला विश्वास ढळूं देत नाहींत. यास्तव हे अवास्तव कसें आणि तें वस्तुभूत आहे असें समजणें हा श्रोता व वक्ता या दोघांनाही मोह पाडणारा विपरीत बोध कसा ? तेंच मी आता तुला अनेक युक्तींच्या, द्वारा सागतों. 'बीजांतील अंकुराप्रमाणे प्रलयसमयीं जग कारणांत असते; या वाक्यातील बीजांकुर-दृष्टातच मुळीं बरोबर नाहीं. कारण दृष्टांतातील बीज दृश्य आहे. स्थूल आहे. तेव्हां त्याच्यापासून, भूमि, जल इत्यादि अनुकूल सहकारी सामग्री मिळाली, ह्मणजे दृश्य अंकुर उद्भवणे शक्य आहे. पण दार्ष्टांतिकाची अवस्था याहून अगदीं निराळी आहे. चिदेकरस आत्मा इंद्रियें व मन यांचा विषय होत नाहीं. तो अणूहून अणु आहे. शिवाय तो कूटस्थ ह्मणजे निर्विकार आहे. तेव्हां तो जगाचें बीज कसा होणार आणि बीजां-तील अंकुराप्रमाणें जग तरी त्या असंगाचे ठायीं कसें रहाणार ? आका-शाच्या अंगाहूनही अति स्वच्छ व अति शून्य अशा त्या परम पदाच्या ठायीं जग व जगातील मेरु, समुद्र, गगन इत्यादि पदार्थ कसे असणार ? आकाशाहूनही सूक्ष्म व नामशून्य अशा परमात्म्याच्या ठिकाणीं बीजता रहाणें अशक्य आहे. ज्ञानीपुरुषाच्या दृष्टीने आत्मा जगद्बीज होऊं शकत-नाहीं, असे तुला यावरून समजलेच असेल. पण आतां आज्ञांच्या दृष्टीनेंही तो जगत्कारण कसा नाहीं तें सांगतों.

परमात्मा वस्तुतः जरी सत् या एकाच रूपाने सदा सिद्ध आहे, तरी अज्ञ पुरुषांच्या दृष्टीनें तो अगदीं सूक्ष्म असल्यामुळे असत्‌च आहे. तेव्हा त्याच्या समजुतीप्रमाणें तरी तो बीज कसा होणार ? आणि बीजाचाच जर मुळीं अभाव झाला तर त्याच्यापासून जगदंकुर कसा निपजणार ? यास्तव त्या वस्तुभूत ( सत्य ) आत्म्याच्या ठायीं दुसरी कोणतीही वस्तु खरोखर राहू शकत नाहीं. बरें इतकेही असून रहाते, ह्मणून ह्मणावे तर तिचा अनुभव का येत नाही ? कारण आत्मा स्वतः अनुभवरूप असल्यामुळे त्याच्यामध्ये असलेल्या प्रत्येक वस्तूचा अनुभव, निदान त्याला तरी, झोपेतील आनंदाप्रमाणें यावयास पाहिजे. साराश आत्म्यापासून काहीं एक झाले नाहीं. शून्यरूप घटाकाशापासून पर्वत होणे कधीं तरी शक्य आहे का ?

शिवाय चिदेकरससत्ता व जड–अनेक-रससत्ता याचा परस्पर विरोध आहे. छाया व ऊन यान्याप्रमाणें त्याचें हाडवैर आहे. त्यामुळे आत्म्याच्याठायी जगाची सत्ता सभवत नाहीं. कारण सूर्याचे ठायी तम कसें असणार ? अग्नीमध्ये हिम कसें रहाणार ? अणूमध्ये मेरु कसा मावणार ? आकाररहित वस्तूच्याठायीं काहीं एक असणे शक्य नाहीं आत्मरूप व अनात्मरूप याचे ऐक्य होणे शक्य नाहीं. साकार वटबीजादिकाच्या ठायीं साकार अकुर असणें युक्तिसिद्ध आहे, पण निराकार ब्रह्माचे ठायीं हें महाकार जग असणे युक्त नाहीं. बुद्ध्यादि सर्व इद्रिय-शक्तींनी दिसणारें जग प्रलयकालीं दिसत नाहींसें होतें. यास्तव लौकिकदृष्ट्या तें त्यावेळीं आहे असें ह्मणता येणें शक्य नाहीं. बरें शास्त्रीयदृष्ट्या ते प्रलयसमयीं असतें ह्मणून ह्मणावें तर 'पूर्वी सत्‌च होतें' हें श्रुतिरूप परमशास्त्र आत्मा व जग याच्या भिन्न सत्ताचा निर्देशच करीत नाहीं. तर 'एक सत् होतें' एवढेंच सागत आहे यास्तव रामा, तूं मूढानीं कल्पिलेल्या या कार्य–कारणभावाचा, उपादान–उपादेयभावाचा व असल्याच दुसऱ्याही अनेक कल्पनाचा त्याग करून ह्मणजे त्या मिथ्या आहेत, पारमार्थिक नव्हेत, असें निश्चयानें समजून सर्व कल्पनातीत पण सर्वांचें अधिष्ठान असें आदि–अत–मध्यरहित व सत्य ब्रह्मच भ्रमानें जगद्रूप भासत आहे, असें जाण १.

सर्ग २—तर्कांनी जगत्स्थितीचे निरसन. पूर्ण आनंदरूपता.

**श्रीवसिष्ठ**—रामा, समस्त कलनाशून्य व निर्मल महा चैतन्याकाशात प्रलयसमयी जगाची पृथक्सत्ता मानल्यास कोणते दोष येतात ते सागतों. जगादिकांचा अंकुर त्यांतूनच निघतो ह्मणून जर तूं ह्मणत असशील तर कोणत्या सहकारि कारणांपासून तो होतो, तें साग पाहू. कारण कोणत्याही कार्याला कर्त्याप्रमाणेंच सहकारि कारणाचीही अत्यत आवश्यकता असते. त्याच्या अभावी, वंध्येच्या कन्येप्रमाणें, अंकुराची उत्पत्ति होणेंही शक्य नाहीं. आतां रज्जुसर्पाप्रमाणें सहकारी कारणावाचूनच तें अभिव्यक्त झाले आहे, ह्मणून जर ह्मणावें तर मूल कारणच भ्रांत जगाच्या स्वभावस्थितीस प्राप्त झालें आहे, असें होईल. पण वस्तुतः जगाची उत्पत्ति होत नसल्यामुळें प्रलयसमयी जग विद्यमान असते अशी कल्पना करणें व्यर्थ आहे. सर्गाच्या आरंभीं ब्रह्मच सर्गरूपाने भासतें व त्याचवेळी ते आपल्या शुद्धरूपानेंही व्यक्त होत असतें. सृष्टिसमयींही ते तसेच आकारशून्य असतें. तेव्हा जन्य व जनक हा क्रम कसा व कोठें असणार?

**श्रीराम**—पण गुरुवर्य, प्रलयकाळी सर्व जगाचेंच अस्तित्व मानल्यावर–सहकारी कारणाचा अभाव असतो व त्याच्या अभावीं अकुर कसा उद्भवणार–ही शंका रहात नाहीं. कारण त्यातील पृथिव्यादि पदार्थ परस्पराच्या उत्पत्तीस सहाय करतील.

**श्रीवासिष्ठ**—अरे वेड्या, पृथिवीप्रभृति पदार्थ जरी तेथे असले तरी ते स्वतः उत्पन्न झालेले नसतानाच दुसऱ्याच्या उत्पत्तीला सहाय कसे करणार? तस्मात् प्रलयसमयीं प्रकृतियुक्त ब्रह्माचे ठायीं जगाची सत्ता असते. हें सांख्यादि-आचार्यांचे ह्मणणे युक्तिशून्य आहे. रामा, हे जग पूर्वी कधी नव्हते, आता नाहीं, व पुढेही नसेल. तर चेतनाकाशच त्रिकाळीं भ्रमाने जगद्रूप दिसतें. जगाचा याप्रमाणें अत्यताभाव असल्यामुळेंच 'हें सर्व ब्रह्म आहे' 'सर्व आत्मा आहे' 'पुरुषच सर्व आहे' इत्यादि श्रुतिवाक्यें सार्थ होतात; नाहींपेक्षा तीं कधींही समजस झालीं नसतीं. जगातील घट, पट, इत्यादि वस्तूंचा दगड मारणें, कोलीत लावणें इत्यादि उपायाच्या योगानेंही नाश होतो हें खरें; पण तो त्याचा खरा बाध नव्हे. तर त्याच्या आकाराचा [illegible]मुळें ते केवळ त्याचे अदर्शन होय. पण आह्मांला अत्यताभाव [illegible]गाचा ज्ञानतः बाध होणें हा अर्थ सुचवावयाचा आहे.

चित्तातील जगद्वासनेचाही क्षय होणे हा खरा बाध आहे व तो वर सांगितलेल्या प्रकारच्या ज्ञानावाचून होणें शक्य नाही. कामादि वासना शांत झाल्या ह्मणजे आमचा हा सिद्धान्त न सांगताच समजतो. पण त्याची शांति होणें फार कठिण आहे. या मायिक वस्तूही चित्ताला अतिशय परतंत्र व व्याकुळ करून सोडतात. त्या प्रयत्नवान् पुरुषाच्या मनालाही आपल्यामध्यें आसक्त करतात. त्यामुळे वासनाक्षय ह्मणजे एक काल्पनिक कथा होऊन बसली आहे आणि त्या कारणानेच आमचे हे त्रिकाल सत्य सांगणेंही सर्वांना पटत नाही. पण बाबारे, अनुभव हे सर्वोत्तम प्रमाण आहे. आह्माला जगाच्या अत्यंताभावाचा प्रत्यय पूर्णपणें आलेला आहे. यास्तव कोणी काही जरी ह्मटले, तरी आह्माला जे साक्षात् कळले आहे तेंच आह्मी सांगणार. जगद्रूप दृश्याचा अत्यंत अभाव आहे, हा आमचा परम सिद्धान्त असून तसें निश्चयपूर्वक जाणणें यावाचून अनर्थनिवृत्तीस दुसरा उपायच नाही.

जगाच्या तत्त्वाचा साक्षात्कार झाल्याकारणाने चिदाकाशाचा पूर्ण अनुभव आला ह्मणजे मग हा मी, तें जग, तो तू इत्यादि सर्व चित्रकथा होतात. म्हणजे ज्या भिंतीवर अनेक चित्रें काढली आहेत अशा भिंतीच्या स्वरूपाकडे लक्ष दिले असता तिच्यावरील चित्राकडे पाहून हा घोडा, हा हत्ती, हे मनुष्य, ही नदी, हा राम, हा रावण इत्यादि प्रत्यय जसे मिथ्या व शब्दमात्र आहेत असे ठरतें, त्याप्रमाणे तत्त्वसाक्षात्कारानंतर मी, तू, इत्यादि भावनाही मिथ्या आहेत, असे प्रत्यक्ष अनुभवास येऊं लागतें. पर्वत, पृथ्वी इत्यादि, क्षण, संवत्सर, युग, कल्प इत्यादि, मरण, जन्म, कल्पान्त, महाकल्पान्त इत्यादि सर्व वस्तुतः नसून ते महाचित्परमाकाशांत आपोआप स्फुरण पावते चित् जसें ह्या तसेंच असतें. पण कुवडशांतील तरंगणाऱ्या परमाणूप्रमाणें त्यांत मनरूपी अनंत परमाणू फिरत रहातात. ज्याप्रमाणे एकाद्या लहानशा फळाला पिळून त्यांतून रस किंवा चीक काढावा, त्याप्रमाणें मनाच्या योगानें मर्यादित झालेल्या व वासनांनीं पिळलेल्या चैतन्यांतून जग निघते. नेत्रगत दोषामुळें स्फटिकमण्यामध्येंही जशा रेखा दिसतात, त्याप्रमाणें वासनाच्या योगानें मलिन झालेल्या चित्तात नदी-पर्वत-वृक्षादि दिसतात. पण स्फटिकमण्यातील त्या भ्रामक रेखा जशा कधीं खरोखर उत्पन्न होत नाहींत व त्याचा नाशही होत

नाहीं, त्याप्रमाणें जगातील वस्तूही कधीं उत्पन्न होऊन नाश पावत नाहींत. निराकार आकाशामध्यें जसे निराकार आकाशभाग दिसतात. त्याप्रमाणें निर्मल आत्म्यामध्यें हे सर्ग आपोआप स्फुरण पावतात. जलाच्या द्रवत्वाप्रमाणे, वायूच्या स्पंदाप्रमाणें, सागराच्या लाटांप्रमाणे, गुणी पुरुषाच्या स्वाभाविक गुणाप्रमाणे हे सर्व जग विज्ञानघन चिदात्म्याहून भिन्न नाहीं. अनंत व शांत आत्मतत्त्वच जगद्रूपाने पसरले आहे. सारांश, दाशरथे, सहकारी कारणांच्या अभावीं जगत् शून्यरूप प्रकृतीपासून आपोआप होते हें ह्मणणे अगदी युक्तिशून्य आहे. यास्तव बा शिष्या, तू सर्व जगाचा अनुभव या स्वप्नाचा त्याग कर; सर्व विकल्प ही शय्या सोड व अविद्यारूपी दीर्घ निद्रेतून जागा होऊन व तिला पळवून लावून जन्म, मृत्यु इत्यादि भयातून पार निघून जा आणि उत्तमप्रकार जागा ( प्रबुद्ध ) होऊन ब्रह्मज्ञांच्या सभेला भूषित कर २.

**सर्ग ३**—जग ब्रह्मविवर्त आहे, तें ब्रह्मरूप आहे, ज्ञानी व अज्ञ या दोघांच्याही दृष्टीनें तें अनंत आहे

**श्रीराम**—गुरुवर्य, जगांतील इतर पदार्थांना जरी उत्पत्तिसमयीं कर्ता व इतर सहकारी साधनें याची जरूर असली तरी जगाच्या उत्पत्तीला त्याची गरज असेल असे वाटत नाहीं. कारण जग हिरण्यगर्भाच्या मनःसंकल्पासून झाले आहे. त्यामुळे ते त्याच्या स्मृति अथवा संकल्पाप्रमाणें आहे, असे आपणच मला सांगितले आहे. स्मृति व संकल्प यांना सहकारी कारणाची मुळीच गरज नसते. यास्तव प्रलयसमयीं प्रकृतीत लीन होऊन राहिलेलाच प्रजापति प्रथम स्मृतिरूप उत्पन्न होतो व त्याच्यामध्यें संस्काररूपानें सत् असलेले जगच स्मृतिरूपानें व्यक्त होते, असें ह्मटल्यास कोणता दोष येतो ?

**श्रीवसिष्ठ**—रामचंद्रा, तुझ्या म्हणण्याप्रमाणें जरी क्षणभर कबूल केलें, तरी प्रलयसमयीं जग असतें असें ठरत नाहीं. कारण स्वप्न, मनोरथ, स्मृति इत्यादिकांचा विषय त्या त्या वेळींही जर सत् नसतो, तर तो त्यापूर्वी सत् कोठून असणार ? ( सत् ह्मणजे विद्यमान ) आता तूं कदाचित् म्हणशील कीं, चित्रातील घोडा, मासाचा गोळा या रूपानें, जरी असत्य असला, तरी रंगाचा एक परिणाम या रूपानें जसा सत्य असतो, तसें जग बाह्य विकार या रूपानें जरी सत्य नसलें तरी मनोविकार या

रूपानें सत्य आहे असें म्हणण्यास कोणता प्रत्यवाय आहे? तर सांगतों. स्मरण करणारा जर असला तर स्मृत्यादि सर्व मनःपरिणाम होणार! पण परमात्मा असंग व उदासीन असल्यामुळें वस्तुतः स्मरणकर्ताच कोणी नाहीं. शिवाय तो 'अमनाः' म्हणजे मनोरहित आहे असें स्वतः श्रुतीनें सांगितलें आहे. तेव्हां मनावाचून स्मरण कोणाला होणार? सारांश परमात्म्याची स्मृति आकाशवृक्षाप्रमाणे शब्दमात्र आहे. सृष्टीच्या आरंभीं पूर्व संस्कारामुळे स्मृति झाली असती, पण पूर्वसृष्टींतील प्रजापति प्रलयसमयीं मुक्त होऊन जात असल्यामुळे स्मृतिकर्ताच रहात नाहीं. मग जगाची स्मृति व तिला कारण होणारे संस्कार कसे व कोठें रहाणार? यास्तव पूर्व कल्पातील सर्गसुद्धां स्मृतिरूप नव्हेत, तर जगत्स्थिति म्हणजे प्रौढ ब्रह्मचित्प्रभाच होय व ती मात्र सर्वदा असते. त्या चित्प्रभेला उद्देशूनच 'पूर्वी हें सर्व सत्‌च होतें' इत्यादि श्रुतिवचनें प्रवृत्त झालीं आहेत. आदि-अंतरहित सचित्प्रभाच जगद्रूपानें भासते. अनादिकालापासून नित्य सिद्ध असलेलें जें ब्रह्माचें निज भान तोच ब्रह्मांडाकाराचा उपादानभूत सूक्ष्म देह आहे. ब्रह्मच सूक्ष्म व स्थूलभावाच्या आरोपक्रमानें जगद्रूप भासतें. जगाचा स्वभाव अव्यवस्थित असल्यामुळेंही त्याला स्वतः सत्ता आहे, असें म्हणता येत नाहीं. कारण लीलोपाख्यानांत वर्णिल्याप्रमाणे एका परमाणूमध्ये हें अवाढव्य त्रिभुवन भासतें. त्या परमाणूंत तसल्याच दुसऱ्या अवाढव्य जगाला धारण करणारा दुसरा परमाणु असतो. त्यांत तसलाच तिसरा परमाणू असतो व असेच उत्तरोत्तर अनेक परमाणु एकांत एक रहातात. तस्मात् असल्या अव्यवस्थित स्वभावाच्या जगाला वास्तविक समजूं नये.

तत्त्वज्ञाला सन्मात्रदृष्टि जशी स्वतः अनंत वाटते तशीच अज्ञाला अनृत जगदृष्टीही अनंत भासते. कारण त्यांतील वस्तूंची संख्या त्याच्यानें करवत नाहीं. तत्त्वज्ञाला हें सर्व शांत, केवल व अद्वय ब्रह्म भासतें. पण अतत्त्वज्ञाला त्या ब्रह्माच्याच ठिकाणीं भासुर त्रिभुवन दिसतें. त्या ब्रह्मांडांत आणखीं अनेक ब्रह्मांडें दिसतात. ज्याप्रमाणें एकाद्या लाकडी खांबावर एक मोठी पुतळी खोदलेली असून तिच्या अंगावर आणखीं अनेक बाहुल्या कोरलेल्या असाव्या तशीच ही ब्रह्मांडरचना आहे. तत्त्वज्ञ त्या खांबाकडे पाहून हें लाकूड आहे असें समजतो व अतत्त्वज्ञ हीं अनेक निरनिराळीं

रमणीय चित्रें आहेत असें मानतो. त्याची दृष्टि बाह्य आकाराच्या पलीकडे जातच नाहीं. पर्वतावरील परमाणू जसे असंख्येय असतात त्याप्रमाणें ब्रह्मरूपी मोठ्या मेरूवर असंख्य त्रैलोक्य-परमाणू भासतात, पाण्याबरोबर वहात जाणाऱ्या असंख्य मृत्कणांसारखे अनंत त्रैलोक्य-परमाणू चिदाकाशांत वहातात. भूताकाश शून्यरूप असतानाही त्याचा जसा नीलादिरूपानें साक्षात् अनुभव येतो, त्याप्रमाणे हे चिदाकाश साक्षात् सृष्टिरूप दिसतें. पण रामचंद्रा, सृष्टीचें सृष्टिरूपानें ग्रहण केल्यास ती सृष्टीच जीवाला अधोगतीस पोंचविते व तिला ब्रह्मरूपानें ओळखल्यास अत्यंत हित होतें. पण तें ब्रह्म तटस्थ ( आपल्यापासून कोठे दूर व भिन्न ) आहे असें समजून उपयोगी नाहीं. तर जीवसंज्ञक विज्ञानात्मा व विश्वाचें बीज ईश्वर यांचें शोधन केलें असतां त्या दोघांचें ऐक्य होतें व तेंच पूर्ण, चिदेकरस ब्रह्म आहे, असें समजलें पाहिजे. यास्तव, हे सात्त्विका, ज्याच्यापासून हें सर्व झालें तें व जें झालें तें असें सर्व शुद्ध चिन्मात्र आहे, त्यांत भेदाचा गंधही नाहीं, असा निश्चय कर ३.

**सर्ग ४.**—विश्वाच्या स्थितीचें मूळ इंद्रियांसह मन आहे यास्तव मनाचाच उच्छेद झाला कीं जगही शून्य होतें.

**श्रीवसिष्ठ**—इंद्रियसमुदायाचा विजय करणें, त्यांना जिंकणें हा भवसागराच्या पार जाण्याचा सेतु आहे. त्यावाचून दुसऱ्या कोणत्याही उपायानें त्यांतून निघतां येत नाहीं. शास्त्र व संत्समागम याच्या योगानें विवेक उत्पन्न होतो आणि विवेकाच्या योगानें दुर्जय इंद्रियांनाही जिंकतां येतें. इंद्रियांना आत्मवश केलें असतां दृश्याचा अत्यंताभाव कसा असतो तें साक्षात् कळतें. असो, सुंदर रामा, मी तुला हें संसारस्वरूप सांगितलें आहे. संसारसागराच्या पंक्ती एकामागून एक उद्भवून लीन कशा होतात तें स्पष्ट केलें. आतां फार सांगून काय करावयाचें आहे? बाबारे, मन हेंच कर्मवृक्षाचें मूळ आहे. यास्तव त्या मनाला तोडून टाकलें असतां कर्ममय जगद्वृक्षही तुटतो. मन हें सर्व आहे. यास्तव आंतल्या आंत त्याची शांति केली असतां जगज्जालरूपी सर्व रोग नाहींसा होतो. देहाच्या संबंधानें होणारें सुख, दुःखही मनामुळेंच अनुभवास येतें. कारण मनानें हा मी व हें माझें असा निश्चयच जर केला नाहीं, तर कोठचा देह व कोठचें सुख-दुःख? यास्तव मनःशांति हाच परम उपाय योजला पाहिजे. पण दृश्याचा अत्यंत

असंभव आहे असे कळल्यावाचून मनाची शांति होणे शक्य नाहीं. 'हें आहे' असा मोह मनालाच होतो. मनच मरतें व उत्पन्न होते. ते स्वचिंतनाने बद्ध होते व स्वशुद्धीने मुक्त होते. चित्त मननाच्या योगानें वृद्धि पावले ह्मणजे त्यात जगत् स्फुरते. यास्तव जग हा मनाचा धर्म आहे. त्यामुळे धर्मी मन नाहींसे झाले की, त्याचा धर्महीं आपोआप क्षीण होतो. पुष्पाच्या गुच्छात जसा सुवास, तिळामध्ये जसे तेल, गुणी पुरुषामध्यें अथवा पदार्थांमध्ये जसे गुण तसें चित्तामध्ये हे जग असते. सूर्याचे ठायीं जसे किरण, तेजामध्ये जसा प्रकाश, अग्नीमध्ये जशी उष्णता, बर्फामध्यें जसे शैत्य, आकाशात जशी शून्यता, व वायूमध्ये जशी चंचलता तसें मनामध्ये हें जग आहे. पण मन धर्मी व जग धर्म असल्यामुळे त्या दोघाचा जरी अभेद असला तरी धर्मी मनाचा क्षय झाला असता धर्मरूप जगाचा क्षय होतो. पण तेच धर्मरूप जगाचा क्षय झाला असता मनाचा क्षय कधींही होत नाही. यास्तव मनोनाशाकरिता प्रयत्न करावा. जगाचा–दृश्याचा–अत्यत अभाव आहे, ते रज्जुसर्पाप्रमाणे मिथ्या आहे, तें भ्रमरूप आहे, असे निश्चयाने समजणे हाच त्याच्या नाशाचा उत्तम उपाय आहे ४.

**सर्ग ५**—भार्गवोपाख्यान, भृगुमुनि समाधिस्थ असताना पर्वतावर खेळणाऱ्या शुक्राला अप्सरा दिसली व तो तन्मय झाला

**श्रीराम**—गुरुवर्य, बाहेर असल्यासारखा भासणारा हा संसार मनामध्ये साक्षात् कसा दिसतो ते एखाद्या दृष्टांतरूप इतिहासाच्या द्वारा मला समजावून सांगा.

**श्रीवसिष्ठ**—राघवा, ऐंदव ब्राह्मण व लवण राजा यांच्या इतिहासात मीं हेंच तत्त्व तुला सांगितले आहे. तथापि जग मनामध्येच कसें स्थित आहे, हे मी तुला भार्गवाच्या उपाख्यानाने पुनः सांगतों.

राघवा, पूर्वी भगवान् भृगु मंदरपर्वताच्या पुष्पित वृक्षानीं भरून गेलेल्या रम्य शिखरावर घोर तप करीत बसला होता. त्याचा तेजस्वी पण अल्पवयस्क पुत्र शुक्र त्याची उपासना करीत असे. भृगु सर्वकाल समाधि लावून, चित्राप्रमाणे अथवा शिळेवर खोदलेल्या प्रतिमेप्रमाणें निश्चल रहात असे. पण शुक्र तेथील आपोआप गळून पडलेल्या पुष्पाचा ज्यावर थर जमला आहे, अशा स्वाभाविक रूप्यमय व सुवर्णमय वेदींवर खेळत आपला काल घालवी. त्यावेळीं तो विद्या व अविद्या या दोन दृष्टींच्या

मध्यभागीं स्थित होता. ( म्हणजे तो पूर्ण विद्वान्ही नव्हता व अगदींच मूढ नव्हता. तर अंतरिक्षांत लटकणाऱ्या त्रिशंकूप्रमाणें त्याची स्थिति झाली होती ) धड शहाणाही नाही व वेडाही नाहीं. एकदा त्याचा पिता निर्विकल्पसमाधींत स्थित असताना शुक्राने आकाशमार्गातून जात असलेल्या एका अप्सरेला पाहिले. मंदर पर्वतावर लोळणाऱ्या लक्ष्मीप्रमाणें ती देवस्त्री सुंदर होती. तिच्या गळ्यात मंदारपुष्पाची माळ होती. मंद वायूच्या योगाने तिचे केस थोडथोडे हालत होते. तिच्या गळ्यांतील दिव्य पुष्पहाराच्या सुगंधाने अंतरिक्षातील सर्व वायु सुगंधित झाला होता. ती जणुं काय लावण्यवृक्षाची कोमल शाखाच होती. मदाच्या योगानें तिचे नेत्र फिरून गेले होते व आपल्या शरीर कांतीने तिने तो सर्व प्रदेश प्रकाशित करून सोडला होता असो; अशा प्रकारच्या त्या दिव्य स्त्रीला पहाताच शुक्राचे मन चंचल झालें. पूर्ण चंद्राप्रमाणें आल्हादकारक वाटणारे त्याचे मुख पाहून ती अप्सराही परवश झाली. राघवा. स्त्री-पुरुषाच्या मनात कामप्रवेश झाला म्हणजे ती दोघेंही परस्परमय ( म्हणजे पुरुष स्त्रीमय व स्त्री पुरुषमय ) होत असतात; या न्यायास अनुसरून शुक्राचें चित्तही, सर्व विद्या व बोध यास विसरून, त्या अप्सरामय झाले १.

**सर्ग ६**—शुक्र मनाने स्वर्गास गेला. इंद्राने मोठ्या सन्मानानें त्याला जवळ बसवून घेतले.

**श्रीवासिष्ठ**—रामा, मनाने तिचेच ध्यान करीत डोळे मिटून शुक्राने मनोराज्य चालविले. तो तेथें एकटाच होता. त्यामुळे त्याच्या मनोराज्यात काहीं विघ्नही आले नाही हा मी तिच्या मागून चाललो आहे ती स्वर्ग लोकास जात आहे. मीही तिच्या मागोमाग देवानी गजबजलेल्या स्वर्गास येऊन पोचलो आहे आहाहा! मृदु मंदार पुष्पाच्या माळा घातलेले व पातळ सुवर्णरसाप्रमाणे ज्याची अंगकांति आहे असे हे देव माझ्या मनाला फार आनंद देत आहेत अरे, हरणाच्या भितऱ्या पोराप्रमाणे आपले विशाल व काळेभोर नेत्र वारंवार फिरविणाऱ्या व पुरुषाकडे पाहून त्याच्या हृदयास विद्ध करण्याकरिता स्मित हास्यासह कटाक्षवृष्टि करणाऱ्या किती ह्या अप्सरा यथे आहेत!! ऐरावताच्या गंडस्थळावरील मदाचा स्वाद घ्यावयाचा सोडून हे खुळे भ्रमर येथील मधुर गायनावरच कसे लोलुप झाले आहेत पहा! जिच्यातील सुवर्णकमलावर चंचल झालेले ब्रह्म-

देवाचे हस व सारस आहेत व जिन्या काठच्या रम्य उद्यानात बसून देवसुदरी विश्राति घेत आहेत अशी ही मदाकिनी आज माझ्या दृष्टी पडली. आपल्या शरीरकातीने, सवत पसरणाऱ्या अग्नीच्या ज्वालेलाही तुच्छ करून सोडणारे हे यम, चद्र, इद्र, सूर्य, अग्नि, वरुण, वायु इत्यादि लोकपाल आहेत. अरे, हा कोण? हा, समजले. हाच तो सग्रामात दैत्याचीं शरीरे आपल्या दातात ओवणारा व देवासुराच्या युद्धप्रसगी शस्त्राच्या घर्षणाने आपल्या तोडाचा कडू घालविणारा ऐरावत आहे. उची सोन्याप्रमाणें ज्याची अगे चकाकत आहेत असे हे विमानात बसलेले पुण्यवान् लोक आहेत हेच ते भूलोकातून ग्रह, नक्षत्रे व तारा याच्यारूपाने दिसत असतात देवतास भिजविणारे हे मदारपुष्पयुक्त गगाजलाचे तरग किती मनोहर आहेत हे सुदर मार्ग इद्राच्या उपवनात जात असावेत. कारण यातून जाऊ लागताच समोरून येणारा अतिशय सुगधी वायु माझ्या घ्राणेंद्रियाला व त्वगिंद्रियाला सुखवू लागला आहे वा! हा मी आता नदनवनाच्या मुख्य द्वारातच येऊन पोंचलो आहे यात रागेने लागलेले कितीहो हे विविध वृक्ष! मोठमोठ्या वृक्षाच्या शाखाना बाधलेल्या उच झोपाळ्यावर बसून अप्सरा कामी पुरुषाच्या चित्ताप्रमाणें झोके घेत आहेत. हे यात जागजागीं मोठमोठे लतामडप असून त्यात सुवासिक जलाचे कारजे उडत आहेत. त्यात अनेक विलासी देव आपल्या स्त्रियासह विविध विलास करीत स्वर्गसुख भोगीत आहेत या उपवनात सर्व ऋतूचा अनुभव एकाच काळीं येतो. हें खरोखरच आनद देणारें आहे. अहाहा! पारिजात वृक्षावरून वाहत येणारा वायु माझ्या शरीरास किती सुखवीत आहे हा! येथें नेहमीं रहाणारे हे देव खरोखरच मोठे भाग्यवान् होत, यात सशय नाहीं. एकाद्या विस्तृत अंगण्यात ओळीने बसलेल्या तरुण व पुष्ट अवयवसपन्न स्त्रियांप्रमाणें ह्या अनेक पुष्पित लता या उपवनात रागेने स्थित आहेत. ह्याचीं अगें इतर पुष्पाच्या परागानें माखलीं आहेत. वाहवा, हे पहा ते नारद व तुबुरु. हे मधुर व स्निग्ध स्वरानें आपापल्या वीणा वाजवून गात आहेत व तें त्याचें रम्य गायन ऐकून देवागना आनदानें नाचत आहेत हे पहा पुण्यकर्मे करणारे लोक. मर्त्य लोकातून येथें येताच अनेक भूषणानीं भूषित होऊन आकाशगामी विमानात बसले आहेत. आजपर्यंत मी केवळ अप्सराचें

नांव ऐकत होतों. पण आतां त्यांना प्रत्यक्ष पाहत आहें. वनलता जशा वनाची सेवा करितात त्याप्रमाणें त्या देवेंद्राची सेवा करीत आहेत. हे समोर दिसणारे कल्पवृक्ष असावेत. कारण यांवर इंद्रनीलमण्याच्या समूहाप्रमाणे पुष्पाचे गुच्छ आहेत, चिंतामणीसारखे कळ्याचें घोस आहेत व पिकलेल्या फळांच्या योगानें हे दाताळ असल्यासारखे भासत आहेत. हा महेंद्र येथे महासनावर बसला आहे. तो साक्षात् त्रैलोक्यस्रष्टाच असावा असें मला वाटते. या महात्म्याला आपण आता वंदन करावें. असा मनात विचार करून शुक्राने त्याला मनोरथरूपानेच नमस्कार केला.

त्याबरोबर देवेंद्र मोठ्या आदराने आपल्या आसनावरून उठला. त्याने मुनिपुत्राचा मोठा सत्कार केला व हात धरून त्याला जवळ आणून बसविले आणि हसत म्हटले "शुक्रा, तुझ्या आगमनाने हा स्वर्ग धन्य झाला आहे. तो पहिल्यापेक्षा अधिक शोभू लागला आहे. आतां पुष्कळ दिवस तू येथेंच रहा."

इंद्राचे हे मधुर भाषण ऐकून शुक्राला मोठा आनद झाला. त्यामुळें त्याचे मुख फार शोभू लागले. निर्मल व पूर्ण चद्राच्या शोभेलाही त्याने तुच्छ करून सोडले. सर्व देव जेव्हा त्याला वदन करूं लागले तेव्हा तर इद्राच्या बाजूस बसलेल्या त्या भृगुनंदनाला अवर्णनीय सतोष वाटला. त्यामुळे तो पुष्कळ दिवस तेथेंच राहिला व इंद्रालाही तो पुत्रादिकाप्रमाणेच अतिशय प्रिय झाला ६.

**सर्ग ७**—स्वर्गात शुक्राने आपल्या प्रियेला पाहिले. एकमेकाच्या अनुरागाने त्याचा समागम झाला

**श्रीवसिष्ठ**—रामभद्रा, याप्रमाणे शुक्र आपल्या पुण्यप्रभावाने देवलोकास गेला. मरणदुःखावाचूनच तो आपल्या पूर्वभावास विसरला. कांहीं वेळ इद्रापाशीं बसून विश्राति घेतल्यावर तेथल्या अतिशय सुखाने हर्षित झालेला तो स्वर्गात विहार करावयास निघाला. स्त्रीजनास अत्यंत इष्ट असलेली स्वर्गशोभा पाहून, सारस पक्षी जसा नलिनीकडे जातो त्याप्रमाणें तोही तेथील स्त्रीसमूह पहावयास गेला. उपवनातील आम्रशाखेप्रमाणे त्या स्त्रीसघात असलेल्या आपल्या रमणीस त्याने पाहिले. तिनेही त्या भृगुपुत्राला पाहिलें. दोघे एकमेकाविषयीं अतिशय उत्सुक झाली. कामदेवानें त्याच्या चित्तात पूर्णपणे प्रवेश केला. चंद्रकिरणाचा संसर्ग होतांच चंद्र-

कांतमणी जसा आर्द्र होतो त्याप्रमाणें त्या दोघाचींही हृदयें प्रेमरसानें अतिशय आर्द्र झालीं. रात्रभर वियोगदुःख सहन करून प्रातःकाळ होतांच चक्रवाक-पक्ष्यांच्या जोडप्याची अगदी प्रथम गांठ पडली असतां जी अवस्था होते तीच त्या दोघाची झाली. प्रातःकाळीं सूर्य व कमलिनी यांना जशी शोभा येते तशी त्यावेळीं त्यांना प्रेमामुळें अवर्णनीय शोभा आली. नंदनवनातील तो प्रदेश मनांत आणलेली वस्तु तत्काल देणारा असल्यामुळे शुक्राकरिता ती अप्सरा अतिशय विह्वल झाली. ती कामाच्या सर्वस्वीं अधीन झाली. कमलिनीच्या पानावर मेघांतून जशा जलधारा पडतात त्याप्रमाणे तिच्या मृदु अंगावर अनेक स्मरशर पडले. मदवायूने हालविलेल्या मंजिरीप्रमाणें तिची अवस्था झाली. जिचे नेत्र नीलकमलाप्रमाणे काळे व पाणिदार आहेत अशा हंस व सारस पक्ष्याप्रमाणे गमन करणाऱ्या तिला मदनाने क्षुब्ध करून सोडलें. तिची तशी अवस्था झाली आहे हे पहाताच शुक्राने अंधकाराचा संकल्प केला त्याबरोबर स्वर्गाचा तेवढा तो भाग तिमिराकुल झाला. तेथें काहीं एक दिसेनासें झाले. वर्षर्तूतील अमावास्येस रात्रीं या लोकीं जसा काळोख पसरतो तसा दाट काळोख तेथें पडला. पण लज्जेचें निवारण करणारा तो अंधकार त्या दोघाही कामी स्त्रीपुरुषाच्या फार उपयोगी पडला. तीं दोघेच त्या काळोखात राहून तिच्या इतर सख्या तेथून दूर गेल्या. कामसंतप्त झालेली ती सुंदरी शुक्रापाशीं आली. तेव्हा भृगुपुत्रानें रतिसुसुखाला उचित अशा एका रम्य शय्यागृहाचा संकल्प केला. त्याबरोबर त्या काळोखातच सर्व उपकरणासह एक सर्वोत्तम स्फटिकमणिमय गृह उत्पन्न झालें. तेव्हा लज्जेने खाली मान घातलेल्या तिचा हात धरून तो भृगुपुत्र त्यात शिरला.

त्यातील सुंदर पर्यंकावर जाऊन बसल्यावर ती मधुरवाणीने त्याला बोलली "प्रिया, मला हा दुष्ट मदन अतिशय संतप्त करीत आहे. यास्तव हे नाथ, मज शरणागतेचे रक्षण कर. दीनाचें समाधान करणे हेंच साधूंचें मोठें व्रत असतें. स्नेहदृष्टीस न जाणणारे मूढ जसे प्रेमाचा अनादर करितात तसे रसज्ञ सज्जन करीत नाहींत. अकस्मात् एकमेकांवर आसक्त झालेल्या स्त्रीपुरुषाचें प्रेम देवांस जीवन देणाऱ्या चंद्राच्या अमृतासही तुच्छ करून सोडीत असतें. प्रथमतःच एकमेकांवर अनुरक्त झालेल्या

स्त्रीपुरुषांचा स्नेह परस्परास जसा आनंद देतो त्याप्रमाणें इंद्राचें त्रिभुवनैश्वर्यही सुख देत नाहीं. प्रभो, या पादस्पर्शानेंच मी अतिशय तृप्त झालें आहें. हे सुंदरा, रात्रीं चंद्रकिरणांचा स्पर्श झाला असता कुमुद्वती ( चंद्रविकासीकमलभूमि ) जशी टवटवीत होते त्याप्रमाणे तुझ्या स्पर्शरूपी अमृतपानानें मी सजीव होत आहें. चरणावर लीन झालेल्या मला आलिंगन देऊन आपल्या हृदयाशी घट्ट धर.

राघवा, असे बोलून ती देवस्त्री मुनिपुत्राच्या अंगावर पडली. तिनें त्याला आलिंगन दिलें. अशा स्थितीतून, विषयपरवश न होता, धैर्याने, शुद्धमनाने व पवित्र देहाने निघणें फार कठिण आहे. तें खरें पौरुष सर्वच नामधारी पुरुषाचे ठायी नसतें. त्यातूनही ऐन तारुण्यांत प्रायः त्याचा सर्वत्र अभावच असतो. असो; शुक्रही कामवश होऊन तिच्या प्रेमपाशात अडकून पडला ७.

**सर्ग** ८—विविधस्वर्गभोग भोगल्यावर शुक्र या लोकीं आला व वासनावशात अनेक जन्म घेऊन शेवटीं मोठा तापसी झाला.

**श्रीवसिष्ठ**—रामचंद्रा, शुक्र याप्रमाणे चित्तविलासाने कल्पिलेल्या अनेक प्रियविषयाच्या योगाने दीर्घकाल सुख भोगीत तेथें राहिला. तो प्रियासमागम त्याला अतिशय आवडला. मंदारमाला धारण करणाऱ्या व देवांच्या अमृतासवानें मत्त झालेल्या तिच्या सहवर्तमान तो मत्त हंस, सारस इत्यादि पक्षी व सुगंधि सुवर्णकमलें यानीं रम्य झालेल्या मंदाकिनीच्या तटावर विहार करूं लागला. चारण व किन्नर वेळोवेळी त्याची सेवा करीत असत. देवांचें अमृत त्याने यथेच्छ प्राशन केलें. पारिजातलतागृहांमध्यें त्यानें तिच्याशीं विविध विलास केले. शंकराच्या प्रमथांसह तो पुष्कळ फिरला. लहान लहान सुवर्ण कमलिनीच्या जाळ्यांनीं भरलेल्या नदींत त्यानें मत्त हत्तीप्रमाणें जलक्रीडा केली. कैलास पर्वतावरील वनात शंकराच्या मस्तकावरील चंद्राचा प्रकाश सतत पडत असे. त्यामुळे कृष्णपक्षांतही तेथील चांदण्यामध्यें बसून शंभूच्या गणाचें रम्य गायन ऐकत त्या विलासी ब्राह्मणानें तिच्यासह अनेक रात्री घालविल्या. गंधमादन पर्वताच्या उंच शिखरावर बसून तेथल्या सुवर्णकमलांनीं त्यानें तिला पायापासून मस्तकापर्यंत भूषित केलें. लोकालोक पर्वताच्या विचित्र तटांवर त्यानें तिच्याशीं हसत क्रिडा केली. मंदरावरील जलमय व त्यामुळे

शीतळ झालेल्या प्रदेशांत संकल्पाने देवमंदिर निर्माण करून त्यांत तो तिच्या प्रिय हरिण बालकासह साठ वर्षे मोठ्या आनंदानें राहिला. क्षीर-सागराच्या तीरावर तो स्त्रीसह फिरत असतांना अर्धे कृतयुग संपलें. चैत्ररथ उद्यानांत असंख्य लीलारचना केवळ संकल्पानेच करणारा तो काहीं वेळ कालाच्या साम्यतेस प्राप्त झाला. त्यानंतर शुक्र पुनः इंद्राच्या नगरांत येऊन त्या हरिणनयनेसह तेथे मोठ्या सुखाने चतुर्युगाचे आठ फेरे होत तो राहिला.

इतक्यात त्याला पुण्य क्षीण झाल्यासारखे वाटले व ते मनांत येताच तो आपल्या दिव्य शरीरापासून च्युत होऊन प्रियेसह भूलोकीं पडला. त्यांचीं सर्व अंगे गळली, देवानी बलात्काराने त्याचा रथ नंदवनांतील वास, अलंकारादि उपभोगसामग्री इत्यादिकाचे हरण केले. त्याचें आनंदसाधन नाहींसे झाले. तो चिंतापरवश झाला. युद्धात मेलेल्या शूराप्रमाणे तो भूमीवर पडला. मोठ्या शिळेवर पडणाऱ्या पाण्याच्या मोठ्या धारेप्रमाणें दीर्घ चितेसह भूमीवर स्वसंकल्पानेच कोसळलेल्या त्याच्या शरीराचे शेंकडो तुकडे उडाले. त्याच्या बरोबर त्याच्या प्रियेच्या शरीराचीही तीच दशा झाली होती. तेव्हा ज्याचे देह छिन्न-भिन्न होऊन पडले आहेत अशा त्या दोघाचीही दुःखित चित्तें, ज्यांचीं घरटीं नाहींशी झालीं आहेत अशा दोन पक्ष्याप्रमाणे आकाशात फिरत राहिलीं. काहीं वेळाने तीं चंद्राच्या किरणात शिरली. किरणाच्या योगानें तीं दोन्हीं दवरूप झाली. ( दंवात येऊन मिळाली ). दंवाच्या द्वारा साळीच्या भाताच्या अंकुरात शिरलीं. तो मोठा होऊन त्याला कणीस आलें. तें पिकले तेव्हा शेतकऱ्यानें इतर शेतांबरोबर त्यालाही कापून, झोडून व सडून ते तांदुळ एका दाशार्ण देशातील ब्राह्मणास दिले. द्विजाने त्याचा भात करून खाला, तेव्हा भाताबरोबर भृगुपुत्र शुक्र त्याच्या पोटात जाऊन रस, रक्त, मांस इत्यादि क्रमाने त्याचें वीर्य झाला. त्याच्या उदरातून ग्राम्यधर्मद्वारा तो विद्वान् ब्राह्मणपत्नीच्या गर्भाशयात शिरला. तेथें तिच्या शोणिताने त्याचा स्थूलदेह बनला योग्यसमयीं तो जन्मास आला. मोठा झाला. मुनींच्या संगतीने त्याला तप करावें अशी इच्छा झाली. त्याप्रमाणें त्यानें उग्र तपास आरंभ केला. मेरुपर्वतावरील भयंकर अरण्यांत तो एक मन्वंतरभर तसेंच तप करीत राहिला. त्याची

प्रियाही त्याच्या चित्ताप्रमाणेच अन्नरूप होऊन एका हरणाच्या पोटांत शिरली. तेथून वीर्यरूपानें हरणीच्या योनींत गेली. योग्यसमयीं तिची आई प्रसूत होऊन तिलाही हरणी झाली. मेरुपर्वतावर तप करीत बसलेल्या त्या ब्राह्मणपुत्राच्या सहवासाने ती गर्भवती होऊन तिला मनुष्याकृति पुत्र झाला. त्याच्या स्नेहामुळें तो पुनः मोहित झाला. हा माझा पुत्र आहे, असें ह्मणून तो त्याच्या सुखदुःखाने स्वतः सुखी व दुःखी होऊं लागला. या माझ्या पुत्राला धन मिळाले पाहिजे. याच्यामध्ये पुष्कळ गुण आले पाहिजेत. हा दीर्घकाळ वाचला पाहिजे. याचे सुंदर भार्येशीं लग्न झाले पाहिजे. याला रहावयास योग्य घर पाहिजे. पुष्कळ उत्पन्नाचे शेत पाहिजे इत्यादि अनेक चितांनी व्याकुळ होऊन तो आपल्या स्वाभाविक सत्य स्थितीपासून च्युत झाला. तप, ध्यान, इत्यादि निष्ठेपासून ढळला. धर्मचिंतनापासून भ्रष्ट झाल्यामुळे व पुत्राच्या भोग्यवस्तूंची काळजी लागल्यामुळें त्याचें आयुष्य क्षीण झालें, तेव्हा सर्प जसा वायूला खातो त्याप्रमाणे मृत्यूने त्याला ग्रासले. भोगचिंतेसह त्याची चेतनाशक्ति शरीर सोडून गेली. त्यानंतर तो मद्रराजाचा पुत्र झाला. पुढें योग्य समयीं त्याला मद्रदेशाचे राज्य मिळालें. शत्रूंचा उच्छेद करून त्यानें आपल्या सपन्न राज्याचा उपभाग दीर्घकाल घेतला. शेवटी विविध भोग भोगणाऱ्या त्याला जरा आली. तेव्हा तप करावें या वासनेसह त्यानें तें जर्जर झालेले शरीर सोडलें. त्या अंत्यवासनेमुळेच तो एका तापसाच्या येथे जन्मास आला व मोठा होताच समंगानदीच्या तीरावर बसून तो महाबुद्धिमान् ब्राह्मण आनंदानें उत्तम तप करूं लागला. सारांश, राघवा, याप्रमाणे भृगुपुत्र शुक्र नानाप्रकारच्या वासनांनीं वासित होऊन व त्या वासनाप्रमाणे नानाप्रकारच्या जन्मदशेस प्राप्त होऊन आणि अनेक शरीरपरपरेचा अनुभव घेऊन शेवटी मोठ्या भाग्यवशात् वैराग्यादि उत्तम साधनाचा परम लाभ झाला असता विक्षेपशून्य होऊन समंगानदीच्या काठीं वृक्षाप्रमाणे निश्चल राहिला ८.

**सर्ग ९**—भृगूपाशी असलेले शुक्राचे शरीर सुकून धुळींत पडून राहिले.

**श्रीवसिष्ठ**—याप्रमाणें पित्याच्या अग्रभागीं बसून मनोराज्य करीत असताना शुक्राचीं पुष्कळ वर्षे निघून गेलीं. त्यामुळें वायु, ऊन, वर्षाव यांच्या योगानें जर्जर झालेला त्याचा देह तुटलेल्या वृक्षाप्रमाणे भूमीवर

पडला. त्याचे चचल मन मात्र स्वर्गगमनादि अनेक कल्पित दशांमध्यें, बनांत भटकणाऱ्या हरणाप्रमाणे, फिरत राहिलें. वेगाने फिरणाऱ्या चक्रा-वर घातल्याप्रमाणे भोगाच्या कल्पनानी भ्रात झालेले व जन्म-मरणपरंपरा-कल्पनानी उद्भ्रात झालेलें त्याचे मन फार दिवसानी समगानदीच्या तटावर स्थिर झालें. त्याला तेथें विश्राति मिळाली. अनत वृत्तातानीं घन, मनोमात्र ( कल्पित ) असल्यामुळें कोमल ( नाजुक ) व सत्यताभ्रातीमुळें प्राक्तन देहाचे विस्मरण पडते ह्मणून अति दृढ अशा ससारदशेचा शुक्राने, आपल्या देहाविषयी निरपेक्ष असतानाही, अनुभव घेतला. मदर पर्वतावरील त्या बुद्धिमानाची ती तनु सूर्याच्या तापाने अगदी शुष्क होऊन चर्मशेष होऊन राहिली होती ( म्ह. आतून हाडाचा सागाडा व वरून मास–रक्तहीन चामडें अवशिष्ट राहिले होते ) त्यामुळें वायु तिच्या रध्रांत शिरून सुदर ध्वनि करीत बाहेर पडूं लागला. तेव्हा तो–शरीरावरील अभिमान सोडला असता दुःखाचा क्षय व परम आनंदाचा लाभ होतो आणि पाचभौतिक शरीराची ही पहा अशी गति होते;–असेंच जणुं काय सर्वास मधुर शब्दानें सागत आहे, असें वाटले. ससार-भूमींतील खड्ड्यात पडलेल्या दीन मनाला जणुं काय तें शुक्रशरीर दांत काढून हंसतच होते. ती शुक्राची तनु आपल्या मुखरूपी अरण्यातील नासा–नेत्रादि छिद्ररूपी जुन्या कूपाच्या शोभेनें विवेक्याच्या दृष्टीला जगाचें शून्यत्वच साक्षात् भासवीत होती. प्रथम सूर्याच्या प्रखर तेजाने सतप्त होऊन मागून तिच्यावरून पावसाच्या धारा वाहू लागल्या असता पूर्वज-न्मींच्या बाधवाचे स्मरण झाल्यामुळेच जणु काय ती ढळढळ रडत आहे, असें वाटले. असो; तात्पर्य शुक्राची तनु अस्थिचर्ममय होऊन राहिली. हिंस्र पशु-पक्ष्यानी तिचाही केव्हांच फन्ना उडविला असता पण तो पुण्याश्रम रागद्वेषशून्य असल्यामुळे व भृगूच्या महा तपःप्रभावामुळें मासभक्षक प्राण्यांनीं तिला स्पर्शही केला नाही. राघवा, याप्रमाणें शुक्राचे चित्त समंगानदीवरील यमनियमानीं कृश केलेल्या शरीरात तप करीत राहिले व प्राक्तन शरीर भृगूच्या आश्रमांतील दगडात व धुळींत लोळत पडले ९.

**सर्ग १०**—पुत्राचे मृतशरीर पाहून भृगु कालावर रागावला व कालानें त्याला आत्मविद्येचा बोध केला.

**श्रीवसिष्ठ**—दाशरथे, पुढें पुष्कळ दिव्य वर्षांनीं भृगु परमबोधमय

समाधि सोडून उठला. पण विनयानें नम्र झालेला पुत्र त्याला सम दिसला नाहीं. जो साक्षात् गुणांचा सामंतराजा व मूर्तिमान् पुण्य होता त्याच्या जागीं एक मोठा सुकलेला देहपंजर मात्र साक्षात् अ ग्य अथवा मूर्तिमान् दारिद्र्याप्रमाणें त्याला दिसला. तो मानुष देह सु गेला होता. त्याच्या मुख—कर्णादि छिद्रातून बारिक पखयुक्त किड्य आपलीं घरटीं केलीं होतीं. उदरगुहेंत बसून बेडकी विश्रांति घेत हो नेत्रछिद्रांत किड्यानीं अंडीं घातलीं होती. पाठीच्या हाडावर कोळ्य घरें केलीं होतीं. तें शरीर अस्थींच्या योगानें प्राक्तन भोगवासना अनुकरण करीत होतें कपालास्थीवरील चामडी सडून गेल्यामुळे नरोटी, ज्याच्यावर कर्पूराचा अभिषेक केला आहे अशा शिवलिंगा अग्राप्रमाणे दिसत होती. जिच्या शिरा सुकून गेल्या आहेत व हाडें राहिली आहेत अशी सरळ मान वासनाच्या द्वारा पसरलेल्या आत्म अनुकरण करण्याकरिताच जणु काय लाब झाली होती. मांसर नाकाचे हाड मुखमडलाच्या मध्यबिदूची सीमाच ठरवीत होतें. तें शरीर तोंड वर करून आकाशात निघून गेलेल्या प्राणानाच जणुं पहात होतें. हात, माड्या, गुडघे व पोटऱ्या यातील आठ हाडे शरी ओझे वहाता वहाता जणुं काय कंटाळूनच आठ दिशास पळून जाण्य विचारास लागलीं व रिकामी उदरगुहा मूर्खाच्या हृदयाची शून्यता करून दाखवूं लागली.

असो; दुःखरूपी हत्तींचें जणूं काय बधनस्थानच अशा त्या शरीरास पहाताच पूर्वापर विचार न करिता भृगुमुनि तेथून उठ 'अरे, या माझ्या पुत्राचें प्राणोत्क्रमण होऊन तर फार दिवस आहेत' असें ह्मणाला आणि अवश्य होणाऱ्या गोष्टी टाळता येत नाहीं परम सिद्धात मनात न आणता मृत पुत्रास पहाताच तो कालावर शय रागावला. 'माझ्या अल्पवयस्क पुत्राला त्यानें अकालीं कसें ने असें ह्मणून तो अंतकालाही शाप देण्यास सज्ज झाला. त्याबरोबर खाणारा काळ आधिभौतिक शरीर धारण करून मुनीच्या पुढें खड्ग, पाश, कवच, कुंडलें, बारा भुजा व सहा मुखें यानीं तो भूषित झाला होता. त्याच्या भयंकर दूताची सेना त्याच्या बरोबर त्याच्या अगातून लाल अग्निज्वाला निघत असल्यामुळें तो सर्वतः

टलेल्या पळसाप्रमाणें दिसत होता. त्याच्या हातांतील त्रिशूल, परशु, खड्ग हीं आयुधें चमकत होतीं.

असो; अशाप्रकारचें स्थूल शरीर धारण करून तो कल्पांतीं सागराप्रमाणें अतिशय क्षुब्ध झालेल्या महामुनीपाशीं येऊन शांत म्हणाला "मुने, ज्यांना लोकस्थिति माहीत आहे असे ज्ञानी, दुसऱ्या खरोखरीच अपराध झाला असला तरी, क्षुब्ध होत नाहींत. मग निमि वाचून ते कसे रागावतील? व जर विनाकारण रागावू लागले तर ते उ कसले? तू महातपस्वी ब्राह्मण आहेस व आह्मी नियतीचें पालन कर आहों. एवढ्याकरितांच तुज पूज्याची आह्मी पूजा करतों. शापभीत नव्हे. कारण तू मला जरी शाप दिलास तरी त्यात माझी कोणतीच ह नसून तुझें मात्र फार मोठें नुकसान होणार आहे. यास्तव, शाप दे व्यर्थ आपल्या तपाचा क्षय करून घेऊ नकोस. जो मी कल्पांतीं महा-अग्नीनेंही जळत नाहीं तो तुझ्या शापानें कसा नष्ट होईन? मी आ पर्यंत संसाराच्या परपरा खाऊन सोडल्या आहेत. कोट्यवधि रुद्राना केलें आहे. विष्णूच्या सघानाही आपल्या पोटात साठवून ठेविले अ तेव्हां हे मुने, आह्मी काय करावयास असमर्थ आहों तें साग बरें! ब्राह्मणा, आह्मी भोक्ते व तुह्मी आमचें भोजन आहां. स्वतः नियत अशी आहे. त्यात आमचा काहीं अपराध नाहीं. अग्नीची ज्वाला स्व वर जाते, पाणी स्वयं सखल प्रदेशाकडे वाहूं लागतें. त्याचप्रमाणें भो भोक्त्याकडे जातें आणि सृष्टीही याच न्यायाने आमच्या तोंडात येऊन प हें स्थूल-सूक्ष्म जग मज परमात्म्याच्या भोज्यरूपानें स्थित आहे. हें आ स्वरूपात स्वतःच व्यक्त झालें आहे. व ते त्यातच आपोआप लीन होई निष्कलंक दृष्टीनें पाहिल्यास यांत कोणी कर्ता नाहीं व भोक्ताही नाहीं. दृष्टीचा कलंक झडलेला नसल्यास या सृष्टींत एकचसा काय, पण अ कर्ते दिसतात. ज्याला यथार्थ आत्मसाक्षात्कार झाला आहे त्याला क व अकर्तृता हे दोन्ही भाव कल्पित ( मिथ्या, कल्पनामात्र ) आहेत वाटतें. पण आत्मसाक्षात्कारशून्यांना ते अगदीं खरे वाटतात. वृक्ष फुलें व भुवनांत भूते स्वतः येतात व जातात. प्राण्याचे कर्मच वि असल्यामुळें तें विचित्र कार्यें निर्माण करण्यास समर्थ आहे. जलां प्रतिबिंबित झालेला चंद्र हालूं लागला असतां त्याची कर्तृता व अक

सत्यही नव्हे व मिथ्याही नव्हे. कारण तात्त्विकदृष्ट्या विचार केल्यास चंद्र त्या चलनाचा कर्ता आहे असें ठरत नाहीं. ह्मणून तो अकर्ता. पण व्यावहारिकदृष्ट्या त्याचे चाचल्य प्रत्यक्ष दिसतें. ह्मणून तो चलनकर्ता. यास्तव त्यातील एकालाही सत्य किंवा असत्य ह्मणता येत नाहीं. त्याप्रमाणेंच कालरूप परमात्म्याचे सृष्टिकर्तृत्व व अकर्तृत्व अनिर्वाच्य आहे. ज्याच्या दृष्टींत दोष आहे त्याला दोरी जशी सापासारखी दिसते त्याप्रमाणें दोषी मन भ्रमाने कर्तृता व अकर्तृता यांची कल्पना करतें. यास्तव, मुने, रागावूं नको. माझा काही अपराध नाहीं. आपत्तींचा हा असाच क्रम आहे. जगस्थितीचे तत्त्व काय आहे ते विवेकदृष्ट्या पहा. आह्माला मिथ्या मान, पूजा इत्यादिकाची इच्छा नाही व मी असा आहे, तसा आहें, असें करतो, तसें करतो इत्यादि अभिमानही नाहीं ह्मणजे आह्मी राग, द्वेष, अभिमान इत्यादि दोषानीं रहित आहों व सदा नियतीमध्यें स्थित असतो. तिचें उल्लंघन करून आह्मी कोणतेही कार्य करीत नाहीं. तूं शाप द्यावयास तयार झाला आहेस असें पाहून आह्मी जे तुजपाशीं आलों ते तरी तपस्वी मान्य आहेत या नियतीस अनुसरून होय. भयाने मुळींच नव्हे. जगत्पालक ईश्वराची इच्छा ही महा नियति असून तिच्या अनुरोधानें आपलें नेमलेलें कर्तव्य करणे, या स्वरूपाच्या अनेक अवांतर नियती प्रवृत्त होत असतात. यास्तव महात्म्यास मान देणें ह्या नियतीच्या अनुरोधानें आमचें चालणे उचित असून तुझी क्रोध व अभिमानरूप तमोवृत्ति सर्वथा अनुचित आहे. व्यवहार चतुरानीं केवल नियत कर्तव्य करावे. आपापल्या उचित मर्यादेचें पालन करावें. तमोवृत्तीचा आश्रय करून मर्यादेचें उल्लंघन कधींहीं करू नये. भृगो, अज्ञानमयी दृष्टि कोठे व धीरता कोठें? प्राज्ञाच्या या प्रसिद्ध मार्गांत तूं आंधळ्यासारखा मोहित का होतोस? आपल्या कर्मफलपाकामुळें उद्भवलेल्या दशेचा विचार न करिता (ह्मणजे प्राण्यास प्राप्त झालेली प्रत्येक दशा त्याच्या कर्माचें फळ आहे, या परम सिद्धांताचा विचार न करतां,) सर्वज्ञ असूनही तूं एकाद्या मूर्खाप्रमाणें मला शाप देण्यास कसा उद्युक्त झाला आहेस? मुने, सर्व प्राण्याचें द्विविध शरीर असतें. देह हे एक व मन हें दुसरे. त्यातील पहिल्याला स्थूल व दुसऱ्याला सूक्ष्म असें ह्मणतात. पण देह अत्यंत जड असून थोड्याशा निमित्तानेंही नाश पावणारा आहे. मन शून्यरूप ( प्रातिभासिक ) असलें

तरी मोक्षापर्यंत रहणारे आहे. तेंच तुला क्रोधादिकाच्या योगानें पीडा देत आहे. बा साधो, चतुर सारथि जसा रथाला नेतो त्याप्रमाणें हें मन देहावर 'अहं' असा अभिमान ठेवून त्याच्याकडून नानाप्रकारचे व्यवहार करवितें. पण तें आतून त्याला कशी प्रेरणा करतें हें काहीं कोणाला कळत नाहीं व पुष्कळ विचारानतर कळलें तरी सांगता येत नाहीं. एकादा ओल्या मातीशीं खेळणारा बालक जसा क्षणात एक चित्र बनवितो व लागलेच ते मोडून दुसरें करतो त्याप्रमाणे हें मन दुसऱ्या देहाची कल्पना करून हा प्राप्त देह नाहींसा करते. चित्तच पुरुष असून त्यानें जें केलें त्यालाच केले असें ह्मणतात. असत् वस्तूच्या संकल्पामुळें ते बद्ध होते व संकल्पाचा अस्त झाला असता ते मुक्त होते. हा देह, हे अग, हें मस्तक इत्यादि भावना मनच करितें तेच पूर्व पूर्व जीवापासून उत्तर–उत्तर जीवसज्ञक होतें. 'मी' असा अभिमान धरल्यामुळे ते अभिमन्तृ (अभिमान करणारे) होतें. ते स्वत च नानारूप बनते. देहवासनेच्या योगानें आपली दुसरीं अनेक असत् पार्थिव शरीरें पहाते. पण त्याचे हें देहादिकाचें कल्पकत्व आत्मसाक्षात्कार होईतोंच असते. त्याला सत्याचें दर्शन झाले ह्मणजे असन्मयी शरीरभावना सोडून ते परम निर्वृतीस (परमानदास) प्राप्त होते. तू समाधीत स्थित असताना, हे भृगो, तुझ्या पुत्राचे मन आपल्या मनोरथ–मार्गाने अति दूर गेले घरट्यातून उडालेल्या पक्ष्याप्रमाणे ते या शुक्रसबधी शरीरास येथेच सोडून देव-लोकास गेलें. तेथे तें कल्पवृक्षाच्या कुजात, पारिजात लताच्या जाळ्या-मध्यें, नंदनवनातील ताटव्यात व लोकपालाच्या नगरात आठ चतुर्युगें विश्वाची–अप्सरेसह रममाण होत राहिले. नंतर तीव्रसवेगाने केलेल्या त्याच्याच सकल्पामुळें पुण्यक्षय झाला असता त्याचे तेथील शरीरा-वयव शिथिल झाले. त्याच्यावरील पुष्पे कोमेजलीं व कालयोगाने पिकलेल्या फळाप्रमाणें त्या अप्सरेसह तें (शरीर) पतित झालें. तेव्हा मनानें देवशरी-राचा त्याग केला. ते आकाशरूप झाले व पुन: मर्त्यलोकीं जन्मास आलें. मुने, याप्रमाणे स्वसकल्पानेच संसारचक्रात पडलेला तुझा तो मनोमय पुत्र दशार्णदेशात ब्राह्मण झाला; कोसलात राजा झाला, एका मोठ्या अरण्यांत व्याध झाला; गगेच्या काठीं हस बनला, सूर्यवंशात पौड्राधिपति झाला; सौरदेशांत मंत्रोपदेशक बनला; व तेथें मंत्रोपासना केल्यामुळेंच तो

एक कल्पभर विद्याधर होऊन राहिला. नंतर महाबुद्धिमान् मुनिपुत्र झाला. पुढें मद्रदेशाचा राजा झाला व आता वासुदेव या नांवाचा एक तापस बालक होऊन समंगानदीच्या तीरावर तप करीत राहिला आहे. हे मुने, मी तुला हे त्याचे मुख्य मुख्य योनींतील जन्म सांगितले आहेत. पण तो स्वर्गांतून च्युत झाल्यापासून आपल्या वासनाबळाने दुसऱ्याही अनेक विचित्र व क्षुद्र योनींमध्ये फिरत होता. विविध देश, विविध अरण्यें, विविध लोक व या जगातील विविध योनी यांचा आजपर्यंत यथेच्छ अनुभव घेऊन, विविध सुख-दुःखे भोगून व आता त्या सर्वांविषयीं अगदीं विरक्त होऊन समगेच्या तीरावर बसलेला तो केवळ अध्ययनपरायण, जपपरायण, ध्यानपरायण व तपःपरायण झाला आहे १०.

**सर्ग ११**—भृगु योगदृष्टीने पुत्रवृत्तात पहातो व त्याच्याविषयीं विरक्त होतो. काल जगाची स्थिति ह्मणजे शुद्ध मन क्रीडा आहे असे वर्णन करतो.

**काल**—भृगो, यावेळी तुझा पुत्र समगेच्या रम्य तरंगावरून ' सूं सू ' असा ध्वनि करीत येत असलेल्या वायूकडून पवित्र होणाऱ्या त्याच नदीच्या तीरावर तप करीत आहे. त्यानें जटा ठेवल्या आहेत. त्याच्या हातात रुद्राक्षाची माळ आहे. त्यानें सर्व इंद्रियांच्या विलासास जिंकलें आहे व अशा अवस्थेत तो तेथें आज आठशे वर्षे स्थिर तप करीत राहिला आहे. मुने, पुत्राचा तो स्वप्नासारखा मनोभ्रम जर तुला पहावयाच असेल तर आपली ज्ञानदृष्टि उघडून पहा.

**श्रीवसिष्ठ**—राघवा, भगवान् कालानें असे सांगितले असता भृगूनें योगदृष्ट्या पुत्राचे चरित्र पाहिलें. योगजन्य धर्मामुळें अतिशुद्ध झालेल्या बुद्धिरूप आरशात प्रतिबिंबित झाल्याप्रमाणें प्रत्यक्ष दिसणारा पुत्राचा वृत्तात त्याला तत्काल दिसू लागला. तो पूर्णपणे पाहून झाल्यावर भृगु समगेच्या तीरावर परतला व कालाच्या पुढें असलेल्या मंदरावरील आपल्या स्वस्थ शरीरात एका क्षणात परत आला. ( या ठिकाणीं समगेच्या तीरावरून परत येणे ह्मणजे त्याचें चिंतन सोडणें असा अर्थ समजावा. कारण तो आपलें शरीर सोडून तेथें गेला नव्हता. तर केवल योगजन्य दिव्य दृष्टीनें त्यानें आपल्या चित्तातच पुत्रचरित्राचा साक्षात्कार केला होता ) व ज्याचें पुत्रप्रेम पार नाहींसें झालें आहे असा तो मुनि कालाकडे विस्मित दृष्टीनें पाहून म्हणाला " भगवन्, आमचें

चित्त रागादि दोषांनीं मलिन झालेलें असल्यामुळें आम्ही अज्ञ आहों. देवा, तुझ्यासारख्या आत्मज्ञांची दृष्टि मलरहित असून त्या कारणानेंच ते सर्व त्रिकालज्ञ असतात. नाना आकार-विकारांनीं संपन्न असलेली व असत्य असूनही सत्य भासणारी ही जगत्स्थिति विद्वानालाही भ्रमांत पाडते. हे देव, गारुडाप्रमाणें मोह पाडणारें मनोवृत्तीचें रूपही तूंच जाणतोस. आम्हांला त्याचें ज्ञान होत नाहीं. मला दोन कारणानीं पुत्राविषयीं व्यामोह झाला होता एक त्याला मृत्युच नाहीं; तो अजरामर आहे, असें समजणे व दुसरे आयुर्मर्यादा क्षीण न होताच काळाने त्याला नेलें आहे, असें वाटणे. या दोन कारणानीं चित्तभ्रम होऊन मी तुजवर क्रोध केला. ज्याना संसारगती ज्ञात झाल्या आहेत असे आम्ही संपत्ति व विपत्ति यांचा संबध झाला असता क्रमानें हर्ष व विषाद याच्या वश होतों. आपल्याशी जो प्रतिकूल आचरण करील त्याच्यावर क्रोध करावा व जो अनुकूल वागेल त्याच्यावर प्रसन्न व्हावें अशा प्रकारची ही नियति जगांत रूढ झाली आहे व ती हें इष्ट आहे व हें अनिष्ट आहे असा भ्रम असे-पर्यंत कदापि क्षीण होत नाहीं. पण तत्त्वबोधानें तो भ्रम गेला म्हणजे प्रसाद व क्रोध याना अवकाश रहात नसल्यामुळें ती आपोआप क्षय पावते. भगवन्, तू नियतीचें परिपालन करणें एवढेंच आपले कर्तव्य समजून त्याप्रमाणें वागत असतोस, हे न जाणता मी व्यर्थ तुजवर रागावलो. खरोखर या अपराधामुळे मी तुझ्या दडास पात्र झालो आहें. तुझ्या सागण्याप्रमाणे मी आपल्या मनोमय पुत्राला समंगेच्या तीरावर पाहिलें व त्यामुळे—भूताचीं दोन शरीरें असून त्यातील मनोरूप सूक्ष्म शरीर सर्वगामि व सर्व जगास स्वसंकल्पानें निर्माण करणारें आहे—असें मला निःसंशय कळले आहे.

**काल**—ब्रह्मन्, तुझें हे ज्ञान यथार्थ आहे. कुंभार संकल्पानें जसा घट बनवितो त्याप्रमाणे मन संकल्पानें शरीर बनवितें. नसलेला आकार बनवून असलेला एका क्षणात कसा नाहींसा करावा हें त्याला चागले अवगत आहे. मनाच्या मननामुळेंच निर्माण झालेलें त्रिभुवन अनिर्वाच्य आहे. त्याला सत् ह्मणतां येत नाहीं व असत्‌ही ह्मणता येत नाहीं. चित्तदेहाच्या विस्तार पावणाऱ्या अवयवरूप भेदवासनालतेपासून हा जगद्भेद झाला आहे. ( एकाद्या लौकिक वेलीला जसे फळ लागते त्याचप्रमाणें मनाच्या

71 conscious principle



भेदवासनावेलीला हें द्वैतरूप फळ आलें आहे.) भेदवासनेमुळेंच मन जगांतील पदार्थसमूहास पहातें. त्याला हे अनेक भिन्न भिन्न पदार्थ पुढें दिसतात. मी कृश आहे, अति दुःखी आहें, मूढ आहें, या व अशाच प्रकारच्या दुसऱ्याही भावना करीत तें ससारित्वास प्राप्त होतें. मनन हें कृत्रिम रूप आहे; ते माझें स्वाभाविक स्वरूप नव्हे असें समजून विचार व दीर्घ प्रयत्न यांच्या योगानें त्याचा त्याग केला असता स्वभावतःच शात होणारे चित्त सनातन ब्रह्म होतें. ज्याप्रमाणे अगाध जलाने परिपूर्ण असलेल्या विस्तीर्ण सागरामध्ये लहान, मोठ्या, वृद्धि पावणाऱ्या, क्षीण होणाऱ्या, गर्जना करणाऱ्या, मौन धारण करणाऱ्या, आखड, लाब इत्यादि नानाप्रकारच्या तरगाची उत्पत्ति, स्थिति व लय एकसारखा होत असतो, पुनः पुनः नाहीसे होणारेच तरग पुनः पुनः उठतात, पण ते तिन्ही अवस्थेत जलरूप असतात व त्यामुळेच त्याना सत् ह्मणावे की असत् ह्मणावे हें कळत नाही त्याप्रमाणे या अतिशुद्ध, शात, निरुपद्रव, व अनाद्यनत ब्रह्मामध्ये अनेक विचित्र आचारानी चचल झालेल्या व वस्तुतः पृथक् नसतानाही पृथक् असल्याप्रमाणे भासणाऱ्या नाना शक्ति अनेकशक्तिसंपन्न मनाच्या योगाने उद्भवतात. या सृष्टीमध्ये अनुभवास येणाऱ्या अनेक पदार्थांच्या रूपाने ब्रह्माचेच परिवर्तन होत असते. जगत् या नावाची कल्पना त्रिकाली ब्रह्माहून भिन्न नाहीं. ब्रह्म व जग याच्यामध्यें यत्किचित्ही भेद नाही. हें सर्व ब्रह्म आहे, जगत् केवल ब्रह्मच आहे; अशी तूं मोठ्या प्रयत्नाने भावना कर व इतर सर्व चिता सोड. सर्वत्र सदा एकरूप असणारी सत्ता सर्व पदार्थांत आहे व तिच्या आधारानेंच दुसरी अनेक रूपें भासत असतात. चिदाभास चित्तात आला ह्मणजे तो आपल्याला अहं असें ह्मणून मी आत्मा आहे असें जाणतो व त्याहून भिन्न असलेले सर्व अनात्मरूप आहे अशी कल्पना करतो. पण त्या दोन्हीं प्रकारच्या कल्पनामध्यें ब्रह्मसत्ता असतेच. त्यामुळें चित्ताच्या भेदवासनेच्या योगानें जड, अजड, आत्मरूप, अनात्मरूप इत्यादि परस्पर विरुद्ध स्वभावाचे पदार्थ जरी प्रत्ययास आले तरी अधिष्ठानरूप व सर्वगत सत्ता जशीच्या तशीच अबाधित असते. यास्तव हे निष्पाप मुने, पूर्ण सागराप्रमाणें हें ब्रह्मच नाना विवर्तरूपानें अनुभवास येतें. ज्याप्रमाणें तरंग जलाहून विचित्र नसतात त्याप्रमाणें त्या विश्वेश्वराहून कोणतीही

कल्पना पृथक् नसते. एका बीजामध्यें जशी–अंकुर, शाखा, पानें, कळ्या, फुलें, फळें–इत्यादिरूप अनेकता असते तशी त्या परम देवामध्यें सर्व-शक्तिता रहाते. सूर्याच्या तीक्ष्ण प्रकाशामध्ये जसे अनेक वर्ण भासतात त्याप्रमाणें परमात्म्यामध्यें ही सदसन्मयी विचित्र शक्तिता असते. एकरूप मेघापासून जसें अनेकरूप इंद्रधनुष्य उत्पन्न होते त्याप्रमाणे विचित्ररूप नसलेल्या ह्मणजेच एकरूप असलेल्या शिवापासून अनेकरूप जगत्स्थिति उत्पन्न होते. ज्याप्रमाणे कोळ्याच्या अंगातून तंतू निघतात अथवा निजलेल्या पुरुषाच्या चित्तापासून स्वप्नातील अनेक पदार्थ प्रकट होतात त्याप्रमाणे चित्ताच्या जाड्य भावनेमुळें अजडापासून ह्मणजे चित्-तत्त्वापासून जडाचा उद्भव होतो. एका जातीचा कोळी आपल्यालाच बांधून घेण्याकरिता जसा तंतूचें जाळें पसरतो त्याप्रमाणे चित्तगत चिदाभास आपल्याच बंधाकरितां स्वेच्छेनें वासनावैचित्र्य उत्पन्न करितो व द्वैतभावनेनें आपल्या स्वरूपाला विसरतो. पण मनोनिग्रहाच्या द्वारा वासनावैचित्र्य नाहींसे केलें असता पुरुष आपल्या पूर्ण स्वरूपाचा साक्षात् अनुभव घेऊन मुक्त होतो. स्वतःविषयीं जशी भावना करावी तसाच तो स्वतः होतो. दीर्घकाल भावना केल्यामुळे दृढ झालेली वासना पुरुषाला तत्काल आपल्यासारखी बनविते. जो ऋतु लागेल त्याप्रमाणे वृक्ष तत्काल बनतो, हें प्रसिद्ध आहे त्याचप्रमाणे जी शक्ति उद्भवेल त्याप्रमाणे अज आत्मा तत्क्षणी होतो. तत्त्वदृष्ट्या बंध व मोक्ष यांची कल्पनाच संभवत नाही. पण बंध व मोक्ष यांचा अभाव असतानाच आत्मा भ्रांतीनें बंध–मोक्षमय आहे असे वाटतें. नित्याला अनित्यानें ग्रासून टाकले आहे. अहाहा! हें जग मायामय आहे! चित्ताचा उद्भव हा मुख्य बंध आहे व बाकीचे बंध त्याच्यामुळें होणारे आहेत. समुद्रावरील तरंगाप्रमाणे अथवा चंद्रापासून निघणाऱ्या किरणाप्रमाणे कर्मेंद्रिय–ज्ञानेंद्रिय–तामस–सात्त्विक इत्यादि भेद त्याच्यापासूनच उत्पन्न होऊन त्याच्या ठायींच रहाणारे आहेत. ते भेद वस्तुतः पृथक् नसतानाही पृथक् असल्यासारखे भासतात. या स्पंदमय, विस्तीर्ण, चिज्जलमय, परमात्मसागरात, अनेक मनःशक्ती उद्भवतात. त्यातील कांहीं स्थिर व कांहीं अस्थिर असतात. कांहीं ब्रह्म–विष्णु–रुद्रात्मक, काहीं पुरुषरूप, काही शक्ती देवरूप व कांहीं कृमि, कीट, पतंग, सर्प, गाय, मशक, अजगर इत्यादि-रूप उत्पन्न होतात. त्यांतील कित्येक शक्तींचें दीर्घ जीवित असतें; कित्येकींचें

अल्प असतें. कित्येकींची देहकल्पना मोठी असते; कित्येकींची अति तुच्छ असते. या संसार–स्वप्नामध्यें काहीं शक्ती चिरस्थायी आहेत, असा भास होतो, व त्यामुळे दृढविकल्पानें मोहित झालेले कित्येक जग सुस्थिर आहे अशी संभावना करतात. कित्येक अल्प–अल्प भावना करणारे दैन्यदोषाच्या वश होतात व मी कृश आहें, अति दुःखी आहें, मूढ आहे असें समजतात. साराश, बा भृगो, ब्रह्मसागरापासून उद्भवलेल्या चंचल व मनननामक चिच्छक्तीतील कित्येक स्थावरतेस, कित्येक देवत्वास, कित्येक सदेहतेस व कित्येक सागररूपत्वास प्राप्त होऊन त्यातील कांहीं या जगात शेकडों कल्पपर्यंत रहातात आणि चंद्राप्रमाणें ज्ञानामृतानें परिपूर्ण व त्यामुळेंच शुद्ध असलेल्या कित्येक परम पदास जातात ११.

*सर्ग* १२-तरंग व सागर याच्या दृष्टांतावरून आत्म्याच्या ठिकाणीं येत असलेल्या विकारत्वाचें निवारण. मोहापासून उद्भवलेले जगद्वैचित्र्य भ्रमरूप आहे

**काल**—बा मुने, देव, दानव, मानव इत्यादिकाच्या आकाराच्या ज्या ह्या चित्कल्पना ब्रह्मसागरापासून झाल्या आहेत त्या ब्रह्माहून भिन्न नाहींत. हे ब्राह्मणा, मिथ्या भावनेने कलंकित झालेले मूढ जीव आम्ही ब्रह्म नव्हे असें आतल्या आत निश्चयपूर्वक जाणून अधोगतीस जातात. ब्रह्मसागरातच असताना ते आपण ब्रह्माहून भिन्न आहो अशी भावना करून भयंकर संसार-भूमीत लोळत पडतात. देहच मी आहें अशी पुनः पुनः भावना करणें हेंच पुण्यपापप्रवृत्तीचें कारण आहे तथापि देहात्मभावनाही ब्रह्माहून भिन्न नाहीं, असें तू जाण. कर्मबीजापासून उद्भवणाऱ्या फलवैचित्र्याचेंही संकल्पच कारण आहे. संकल्पापासून उद्भवणाऱ्या या विस्तीर्ण शरीरपंक्तीतील काहीं शरीरें उभीं असतात, काहीं वल्गना करितात, काहीं रडतात व काहीं हसतात. वायूचा, स्पंदाच्या योगानें, जसा विचित्र व्यवहार चालतो त्याप्रमाणें आब्रह्मस्तंबपर्यंत असलेल्या शरीरातील काहीं उत्पन्न होतात, काही लीन होतात, काही म्लान होतात व कांहीं हंसतात. आत्मसागरापासून उठणाऱ्या या लहरींतील हरि-हरादिक कांहीं लहरी अतिशय स्वच्छ असतात. कारण त्यांच्या ठायीं ज्ञान व ऐश्वर्य यांची परमावधि झालेली असते. काहीं नर, अमर इत्यादि लहरी अल्प मोहयुक्त असतात. कारण त्याच्यामध्यें ज्ञानाधिकाराची योग्यता असते. वृक्ष, वेली, गवत इत्यादि कांहीं अत्यंत मूढ असतात. पशु–पक्ष्यादि दुसऱ्या

कांहीं अज्ञानाच्या योगानें अतिशय मूढ असतात; पण वृक्षादि स्थावरापेक्षां त्यांची योग्यता अधिक असते. कारण इष्ट वस्तूच्या ठायीं प्रवृत्ति करून अनिष्टापासून निवृत्त होण्याची योग्यता त्याच्यामध्यें असते. शास्त्रप्रतिकूल आचरण केल्यामुळे कित्येक जीव ब्रह्मसागरात फार दूरवर वहात गेलेले असतात. त्यामुळें त्याना मुक्ति मिळणें अतिशय कठिण होतें. केवल सत्त्वाचा आश्रय करून कित्येक देवत्वास प्राप्त होतात. जन्म-मरण-परंपरारूप संसारात फिरता फिरता कित्येक नरादिभावास प्राप्त होतात व संसरण करिता करिता अतिशय श्रम झाल्याकारणानें विश्रांति देणाऱ्या योगभूमीचा आश्रय करितात. पण शास्त्रावलोकन करून ते वारवार सत्त्वाचा आश्रय करीत असले तरी कृतांतरूपी वृद्ध उंदीर त्याची भूमिका वारंवार पोखरून त्यांना स्वार्थ साधू देत नाहीं. तथापि कृतांत असा वारंवार प्रतिबंध करीत असतानाही काहीं महाप्रयत्नशील पुरुष त्यालाही तुच्छ करून ब्रह्मतत्त्वमहासागराशीं मिळून जातात. ते जीवन्मुक्त होतात. कित्येक अल्पमोहयुक्त पुरुष ज्याचा पार मुळीच दिसलेला नाही अशा ब्रह्मसागराचा आश्रय करून रहातात. साराश अशा या चित्सागरावरील लहरींत कांहीं वरून खाली जातात, काहीं फारच उंच चढतात व कित्येक अगदींच नीच योनींत पडतात. बा साधो, परम पदाला विसरल्यामुळे सुख-दुःखदायी जन्माची जणुं खाणच अशी ही जीवता उद्भवली आहे. पण गरुडाच्या स्मरणानें जशी विषव्यथा नाहीशी होते त्याप्रमाणें ती परमपदाच्या ज्ञानानें विनाश पावते १२.

**सर्ग १३**—मन शक्तीचे वर्णन करून शुक्रापाशीं जाण्याकरितां भृगु व काल उठतात.

**काल**—सागराच्या उर्मींप्रमाणें व वसंत ऋतूतील लताप्रमाणें असलेल्या या विचित्र व विविध भूतजातींतील जे प्राणी मनोमोहास जिंकितात ते कृतार्थ होत. त्याना तत्त्वसाक्षात्कार होतो. ते जीवन्मुक्त होऊन भ्रमण करितात. पण मनोमोहास न जिंकणारे दुसरे सर्व स्थावर-जंगम प्राणी, काष्ठें व भिंती यासारखे, मूढ असतात. तथापि त्यातलेही जे अज्ञ साधनचतुष्टयसंपन्न असतात तेच शास्त्रविचाराचे अधिकारी होत. ज्यांचा मोह क्षीण झालेला असतो ते नव्हेत. कारण ते अगोदरच कृतार्थ झालेले असतात. ते शास्त्रोपदेशाच्या द्वारा अज्ञांवर उपकार करण्या-

करितांच देहधारण करून या लोकीं येतात. त्याचे उपदेश हीच शास्त्रें होत. तीं ज्ञानसंपादन करण्याची इच्छा करणाऱ्या पुरुषाच्या उपयोगीं पडतात दुष्कर्मांचा क्षय झाला असता साधकाचें चित्त शुद्ध होतें व अशा शुद्धचित्त पुरुषाची निर्मल बुद्धि शास्त्रामध्यें प्रवृत्त होते. सच्छास्त्राचा चांगला विचार केला असता मनोमोह नाहीसा होतो. क्षीण न झालेलें मन मोह मात्र पाडते. ते सिद्धीच्या मुळींच उपयोगी पडत नाहीं. सर्व जीवाच्या सुख-दुःखाचें कारण हे मनःशरीरच आहे. मांसमय शरीर नव्हे. पांचभौतिक मांस-अस्थिसंघातही मनःकल्पनारूप आहे. भृगो, तुझ्या पुत्रानें मनःशरीरानें स्वतःला जसें कल्पिलें तसा तो झाला. त्यांत आमचा काय अपराध आहे बाबा? आपल्या वासनेनें जीव जे जे कर्म करतो त्याचें त्याला तसेंच फळ मिळतें. त्यांत दुसऱ्याचें कांहीं नाहीं. मनोवासनेनें केवळ अनुसंधानाच्या योगानें एका क्षणांत केलेलें कार्य आह्माला मोठ्या प्रयत्नानें व पुष्कळ वेळानेंही करतां येत नाहीं. स्वर्ग, नरक, भोग, जन्म-मरणकल्पना इत्यादि सर्व मनाच्या मननानें निष्पन्न झालें आहे मननरूप मनाचें चलनही मोठें दुःखद असतें. असो, उगीच अधिक बोलून शब्दसंग्रह वाढविण्यांत काय अर्थ आहे? ऊठ. तुझा पुत्र जेथें आहे तेथें जाऊं या, चल. तो चित्तशरीरानेंच एका क्षणांत सर्व स्वर्गभोग भोगून या लोकीं आला व विविध उच्चनीच योनींचा मनानेंच भोग घेऊन आतां समंगेच्या तीरीं तप करीत राहिला आहे.

असें सांगून जगद्गतीला जणूं काय हसतच असलेल्या कालानें आपल्या हातानें भृगूचा हात धरला असतां भगवान् भृगुही 'अहाहा! नियतीची व्यवस्था कांहीं विचित्र आहे' असें हळुच ह्मणत उठला. एकाच वेळीं उठलेल्या त्या दोघां तेजोनिधींच्या अंगकांतीनें प्रकाशित झालेलें अंबर-तल रमणीय दिसूं लागलें.

**श्रीवाल्मीकि**—वसिष्ठमुनि रामाला इतकें सांगत आहेत तो सूर्यास्त झाला. त्यामुळे सर्व सभासद सभेंतून उठून सायंतन विधि करावयास आपापल्या स्थानीं गेले व दुसऱ्या दिवशीं सूर्योदय होताच प्रातःकृत्यें आटोपून पुनः उपदेशामृताचें प्राशन करण्याकरितां मोठ्या आशेनें सभेंत येऊन बसले १३. येथें आठवा दिवस समाप्त झाला.

**सर्ग १४**–काल व भृगु यानीं समाधिस्थ शुक्राला जागें केलें व पूर्व वृत्तांताचें स्मरण दिलें.

**श्रीवसिष्ठ**—राघवा, नंतर भृगु व काल मंदरावरून निघून समंगानदीच्या काठी आले. पर्वतावरून उतरून येत असताना त्यानीं सामान्य जनांच्या मनास हरण करणारी विचित्र सृष्टिशोभा पाहिली. आकाशचरांच्या विविध गती व विलास, प्रफुल्लित वृक्ष, नानाप्रकारच्या वेली, त्याचा आश्रय करून राहिलेले व विविध क्रियामध्यें आसक्त झालेले असंख्य जातीचे अनेक प्राणी, नानाप्रकारच्या पशुजाती, त्याच्या विविध लीला, अनेक सरोवरें व त्यातील नानाप्रकारचीं कमले, अनेक जलचर प्राणी व पक्षी, मोठाल्या तरंगानी भूषित झालेल्या नद्या, अंतरिक्षातील विविध देखावे व असेच आणखी अनेक जल, स्थल व अंतराल प्रदेश यातील उद्वेग, विस्मय व आनंद देणारे पदार्थ त्याच्या दृष्टीं पडले. त्याच्या अवलोकनाने परमात्म्याच्या अचिंत्य शक्तीची व त्याबरोबरच तिच्या मोहकतेची चागली कल्पना झाली. प्राण्याच्या एकमेकाविरुद्ध अनेक क्रिया कशा चालत असतात व त्यामुळेंच हा संसार भयकर व अति दु:खद कसा झाला आहे हें त्याच्या लक्षात आले. असो, अनेक नगरें, गांव, मोठमोठ्या राजधान्या, अनेक जातीचे, वर्णाचे, वेषाचे व अनेक विचित्र भाषा बोलणारे लोक, ग्राम्य पशू व पक्षी, वापी–कूप–उद्यानादि अनेक कृत्रिम पदार्थ इत्यादिकानीं भरलेल्या पृथ्वीवर येताच ते थेट जेथें शुक्र तप करीत बसला होता त्या समगेच्या तीरावर गेले. तेथें भृगूनें अन्य देहात असल्यामुळें अगदींच निराळ्या आकाराने शोभणाऱ्या आपल्या पुत्राला पाहिलें. त्याचीं सर्व इद्रियें त्यावेळीं शात झालीं होतीं. तो समाधीमध्यें स्थित होता. त्याचें मनोरूपी हरिण त्यावेळीं चंचलता सोडून स्वस्थ बसलें होतें. फार दिवसांपासून झालेले श्रम घालविण्याकरितांच जणुं काय तें फार दिवस विश्रांति घेत होतें. ज्याच्यामध्यें हर्ष व शोक यांची परंपरा लागलेली असते अशा व फार दिवस उपभोग घेऊन नुकत्याच सोडलेल्या संसारगतीचें चिंतनच जणुं काय तें करीत होतें. वेगानें फिरणारें चक्र जसे वेग क्षीण झाला असता शात होतें त्याप्रमाणें अनंत जगदावर्तांमध्यें अतिशय फिरल्यामुळें कष्टी झालेलें तें जणुं काय आपोआपच शांत झालें होतें. असो; एकांतांत असलेल्या, रमणीय, तेजस्वी,

ज्याच्या सर्व प्रवृत्ती क्षीण झाल्या आहेत, ज्याचें सर्व भोक्तृत्व नष्ट झालें आहे, ज्याचें सर्व कल्पनाजाल नाहींसें झालें आहे, ज्यानें महापदाचा (अमर्यादित आत्मसुखाचा) अवलंब केला आहे, सर्व इच्छा शांत झाल्यामुळें ज्याचा चित्त भ्रम भग्न झाला आहे, जो निर्विकल्पसमाधींत स्थित आहे, जो शीत–उष्ण सुख–दुःख इत्यादि वृत्तींपासून विरत झाला आहे, जो अनंत विश्रांतीचें स्थानच अशा आत्म्यामध्यें विश्राम पावला आहे, जो प्रतिबिंब न घेणाऱ्या स्वच्छ मणीप्रमाणें निर्मळ झाला आहे, ग्राह्य व त्याज्य याच्या संकल्प-विकल्पापासून जो मुक्त आहे व ज्याची मति चागली जागी आहे आहे अशा महाधीमान् पुत्राला भृगूनें पाहिले. कालानेंही त्याला पाहून ' आता हा देहभानावर येवो ' असें गंभीर ध्वनीनें ह्मटलें. त्याबरोबर तो भृगुपुत्र समाधि सोडून उठला व डोळे उघडून तो जो पुढें पहातो तों एकाच काळीं उदय पावलेल्या चद्रसूर्याप्रमाणें ते दोघे ( काल व भृगु ) त्याला दिसले. हरिहराप्रमाणें मिळून आलेल्या त्या दोघा कांतिमान् विप्रास त्यानें आपल्या कदंबपल्लवाच्या आसनावरून उठून प्रणाम केला व परस्पर योग्य सत्कार करून, मेरूपर्वतावर जगत्पूज्य ब्रह्म-विष्णु-महेश जसे बसतात त्याप्रमाणे, ते तिथे जवळच्याच एका मोठ्या शिळेवर बसले व नुक्तीच समाधि सोडून व्युत्थित झालेला तापस त्यांस असें शांत व रम्य वचन बोलला.–तुमच्या दर्शनानें मला आज परम सुख झाले आहे. जो माझा मनोमोह शास्त्र, तप, धन व आत्मविद्या याच्या योगानेंही नाहींसा झाला नव्हता तो तुमच्या पवित्र दर्शनानें झाला आहे. महात्म्याच्या दृष्टी जशा अंतरात्म्यास तृप्त करतात तशा निर्मळ अमृताच्या वृष्टीही करीत नाहींत. आपल्या चरणाच्या धुळीनें या प्रदेशास पवित्र करणारे तुह्मी कोण ? हें मला कळलें नाहीं.

असें बोलणाऱ्या त्याला भृगु ह्मणतो–तूं कोण आहेस याची आठवण कर. कारण तूं आतां ज्ञानी ( जागा ) झाला आहेस. अविद्या–निद्रेंत झोंप घेत पडलेला नाहींस. भृगूनें अशी प्रेरणा केली असता त्याच्या पूर्व पुत्रानें नेत्र मिटून ध्यान केलें. त्याबरोबर सर्व कळल्यामुळें तो अतिशय आश्चर्यचकित झाला व गंभीर वाणीनें ह्मणाला " जिचा आरंभ कळत नाहीं अशी ही परमात्म्याची नियति अचिंत्य आहे. तिचा जयजय[illegible] असो. तिच्या योगानेंच हें अवाढव्य जगचक्र चालत असतें. आज पर्यंत मला न कळतांच माझे अनेक जन्म झाले व त्यांत अनेक [illegible]ळे मं

भोगलीं. द्रव्यार्जनाच्या श्रमामुळें ज्यांचा क्रोध व उद्योग कठिण आहे अशा राजांचें व श्रीमानांचें दर्शन घेतलें. मंदरावरील कुंजामध्यें, प्रफुल्लित सुवर्णलतापंक्तींमध्यें कल्पतरूंची छाया व पुष्पें यांच्या योगानें रम्य झालेल्या मेरूच्या शिखरावर भटकलों. त्या अनुकूल व प्रतिकूल दशांमध्यें मीं भोगलें नाहीं; पाहिलें नाहीं व केलें नाहीं असे कांहीं नाहीं. आता मीं सर्व ज्ञातव्य ( जाणण्यास योग्य असलेलें ) जाणलें आहे, व सर्व द्रष्टव्य पाहिलें आहे. फार दिवसापासून थकलेल्या मला आता विश्रांति मिळाली आहे. माझा सर्व श्रम नाहींसा झाला आहे. बाबा, उठा. आपण मंदरपर्वतावर जाऊं या व सुकलेल्या वनलतेसारख्या त्या माझ्या पूर्व तनूला पाहूं या. वस्तुतः मला आता तिला पाहून काही सपादन करावयाचें नाहीं. केवळ नियतीची रचना पहाण्याकरिता मीं हा विहार करणार आहें. एक आत्माच सत्य आहे, दुसरें कांहीं नाहीं; असा माझा दृढ निश्चय झालेला असल्यामुळें मी आता अन्य जीवन्मुक्तांनीं सेविलेल्या अति शुभावह चारित्राचेंच सेवन करण्याचा स्थिर निश्चय केला आहे. त्यामुळे मीं जरी तें शरीर पाहिलें तरी त्याविषयीं पुनः मोहात पडणार नाहीं. अर्थात् मूढाप्रमाणें ' हें माझे आहे ' असा अभिनिवेश न करिता मी केवळ अवशिष्ट प्रारब्ध—भोगास अवश्य असलेला व्यवहार मात्र करीन १४.

**सर्ग १५**—आपल्या शरीराची दुर्दशा पाहून शुक शोक करतो. त्याचे कारण व देहस्वभाव.

**श्रीवसिष्ठ**—राघवा, त्यानंतर जगद्गतीचा विचार करीत ते तत्त्वज्ञ समंगेच्या तीरावरून निघाले. क्रमानें आकाशाचें आक्रमण करून मेघछिद्रातून निघून सिद्धमार्गानें एका क्षणात मदराच्या गुहेपाशीं आले. तेथें झाडावरून गळून पडलेल्या पानामध्ये लोळत पडलेली आपली शुष्क तनु शुकानें पाहिली व तो म्हणाला "बाबा, पूर्वीं सुखसभोगाच्या योगानें तुम्ही जिचें लालन केलेंत ती ही सुकुमार तनु आहे. धात्री जिला प्रथम सुवासिक तेल लावून व ऊन पाण्याने न्हावूं घालून नंतर कापूर, अगरु, चंदन इत्यादिकांच्या कल्काचा लेप लावीत होती तीच ही माझी काया आहे. मेरूच्या उपवन-भूमीमध्यें मंदारपुष्पाची शीतळ शय्या तुह्मी जिच्याकरितां रचित होता तीच ही माझी आकृति आहे. मत्त देवस्त्रीसमूहानें लालन केलेली ही माझी तनु नानाप्रकारच्या किड्यांनीं भोकें पाडल्यामुळें

चाळणीसारखी छिद्रमय होऊन भूमीवर कशी धूळ खात पडली आहे पहा! ज्या माझ्या या तनूनें हरिचंदनांच्या उद्यानांत दीर्घ काल क्रीडा केली तीच ही आतां शुष्क कंकाल होऊन कशी पडली आहे पहा!! अति उच्च कामतरंगानीं विह्वल होणाऱ्या चित्तवृत्तीचा लोप झाल्यामुळें आता ही कशी सुकली आहे, पहा!!! अरे माझ्या देहा, काय ही तुझी दर्दशा? देवोद्यानादि विविध प्रदेशात व बाल्य–तारुण्यादि विविध दशामध्ये नानाप्रकारच्या गीत-हास्यादि विलासाचा अनुभव घेऊन आता तूं असा स्वस्थ कां? हे शरीरा, हाय हाय, तुला आता शव हें नाव प्राप्त झाले आहेना? एकाद्या महातपस्व्याच्या शरीराप्रमाणे तू सुकले आहेस. तुझा अस्थिपंजर मात्र आता अवशिष्ट राहिला आहे. अरे दुर्भाग्या, जे तू मला अति प्रिय होतेस तेंच आता भिववीत आहेस. ज्याला मी 'अहं' असे म्हणत होतों तेंच तूं अस्थिमय झालें आहेस, म्हणून मी तुला भितो. जेथे पूर्वी नक्षत्रसमूहासारखा उज्ज्वल हार लोळत होता त्याच उरःस्थळावर आता अनेक मुंग्या घरें करून राहत आहेत. ज्या सोन्यासारख्या दीप्त कांतिमान् आकाराने मी अनेक स्त्रियाना मागे मोहित करीत होतो तोच हा माझा आकार आता कसा कंकाल होऊन पडला आहे पहा. ज्याच्यावरील चामडी सडून व कुजून गेली आहे अशा या तोंड वासून पडलेल्या भयंकर कंकालाकडे पाहून या वनातील हरिणादि पशूही भीत आहेत पहा!! याची सुकून गेलेली उदरगर्ता आतून स्पष्ट दिसत आहे. माझी ही शुष्क तनु–पहा, मी ही अशी तुच्छ आहें, कुत्सित आहें, मलिन आहें,' असा तिच्याकडे पहाणारास उपदेश करून सज्जनांच्या मनांत जणु काय वैराग्यच उत्पन्न करीत आहे. शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध इत्यादिकांच्या अभिलाषापासून मुक्त होऊन इतके दिवस माझ्या परोक्ष व आता माझ्या समक्ष ही तनु जणु काय या पर्वतावर निर्विकल्प समाधीच लावून बसली आहे. चित्तपिशाचानें सोडल्यामुळें जणुं काय ही आता स्वस्थ होऊन राहिली आहे. दैवी विपत्तींना ती आतां मुळींच भीत नाहीं. चित्त वेताळ शांत झाला असतां तनु ज्या आनंद कलेला प्राप्त होते तिचा अनुभव जगाचें राज्य मिळाल्यानेंही येणें शक्य नाहीं. चित्तरूपी मर्कटाच्या वेगानें क्षुब्ध झालेला देहवृक्ष इतक्या वेगानें हालूं लागतो कीं, तो मुळापासून उपटून पडतो. तस्मात् अचित्तत्वावाचून

प्राण्यांना दुसरें कांहीं कल्याणकर नाहीं. जे अमनस्कतेस (ह्म. मनःशून्य अवस्थेस) प्राप्त होतात तेच सुखसंभोगाच्या पराकाष्ठेस पोंचतात. तेच महात्मे शांतबुद्धी होत. खरोखर मोठी हर्षाची गोष्ट आहे कीं, मी सर्व दुःखदशापासून मुक्त झालेल्या, ज्वररहित व मननशून्य अशा या आपल्या तनूस पहात आहें."

**श्रीराम**—भगवन्, भृगुपुत्रानें वारंवार दुसऱ्याही पुष्कळ शरीराचा अनुभव घेतला होता. मग भृगूपासून उत्पन्न झालेल्या याच शरीरावर त्याचें इतकें प्रेम का व त्याच्याच करितां तो इतका कष्टी का झाला?

**श्रीवसिष्ठ**—रामा, भृगुपुत्र होण्यापूर्वी शुक्राला जें शरीर प्राप्त झालें होतें तें सोडताना उत्तर देहाविषयीं त्यानें जशी भावना केली होती त्याप्रमाणें तो आकाशादि क्रमानें अन्नादिकाच्या द्वारा प्राणापानप्रवाहाने भृगूच्या शरीरात प्रवेश करून त्याच्या रेतोरूप झाला व चिरकाल अभ्यास केल्यामुळें दृढ झालेल्या प्राक्तन काम-कर्म-वासनेप्रमाणे मातेच्या उदरात त्याच्या देहास आरंभ झाला. पण त्या देहाने आपल्या सर्व कर्मांचा भोग घेतला नव्हता. तर कांहीं थोड्याशा कर्मांचा भोग घेऊन बाकीचीं बरींच कर्में अवशिष्ट असतानाच तो त्यातून निघून गेला. ह्मणून त्याचा याच शरीरावर इतका स्नेह राहिला व इतर शरीरातील भोग्य कर्में अवशिष्ट राहिलेलीं नसल्यामुळे त्यावर त्याचा स्नेह राहिला नाहीं. तो जरी विरक्त, निरभिलाष व समगानदीच्या तीरावरील तापस ब्राह्मणाचे रूप धारण करणारा होता तरी प्रारब्धशेषामुळें त्याने या आपल्या पूर्व तनूकरितां शोक केला. हा देहजन्य स्वभाव आहे. (साराश ज्ञानी पुरुषालाही प्रारब्धाचें उल्लंघन करिता येत नाहीं.) कोणी ज्ञानी असो कीं, अज्ञानी असो. देह असेपर्यंत हा नियम असाच चालावयाचा. तत्त्वज्ञ व पशुधर्मी अज्ञ असे दोन्ही प्रकारचे लोक लोकव्यवहारामध्यें असेपर्यंत एकसारखेच असतात. पण व्यवहारदृष्टीनें जसा अज्ञ तसा पंडित; अशी वस्तुस्थिति जरी असली, तरी त्यांच्या वासनामध्यें भेद असतो व त्या कारणानेंच अज्ञ बद्ध होतात व ज्ञानी मुक्त होतात. ज्यांची बुद्धि सुख-दुःखामध्यें आसक्त होत नाहीं असे ज्ञानी शरीर असेपर्यंत दुःखाचें निमित्त झालें असतां दुःख होत आहे व सुखनिमित्त झालें असतां सुख होत आहे, असें अज्ञाप्रमाणेंच दाखवितात; पण हें त्यांचें अज्ञतुल्य

कृत्य केवळ व्यवहारांत होत असतें. परमार्थांत नाहीं. कारण व्यवहारांत अज्ञाप्रमाणें दुःखाला दुःख व सुखाला सुख असें जरी ते ह्मणत असले तरी स्वात्मतत्त्वाविषयी सुस्थिर असतात. पण एकाच पुरुषाचीं एकाच वेळीं स्थिर व अस्थिर वृत्ति कशी राहूं शकते ह्मणून ह्मणशील तर सांगतों. सूर्याचीं पाण्यातील प्रतिबिंबें जशीं चंचल होतात तसें त्याचें आकाशस्थ बिंब कांहीं केव्हांही चंचल होत नाहीं. त्याचप्रमाणें शरीर-उपाधीमुळें ज्ञानी जरी चंचल होत असला तरी तो आपल्या स्वरूपानें कांहीं चंचल होत नसतो. पाण्यातील प्रतिबिंब खालीं हालत असतानाही वर सूर्य जसा स्वस्थ असतो त्याप्रमाणें ज्ञानी व्यवहारात चंचल होत असताना सुद्धां आत स्वस्थ ( निश्चल ) असतो. पण—असे जर आहे तर अज्ञाप्रमाणेंच विहित व निषिद्ध कर्मामुळे त्याला बंधही होईल—असें कदाचित् तूं ह्मणशील पण तें बरोबर नव्हे. कारण बुद्धींद्रियाच्या आसक्तीनें केलेलीं कर्मेंच प्राण्याला बद्ध करीत असतात. त्याच्या आसक्तीवाचून केलेलीं कर्मे त्याला कधींही बद्ध करीत नाहीत. लोकातील बंध-मोक्ष व सुखदुःखदृष्टीचें कारण हीं ज्ञानेंद्रियेंच आहेत. यास्तव राघवा. तूंही बाहेर लोकोचित आचार कर व आंतून कूटस्थ आत्म्याविषयीं दृढ निश्चय ठेव आणि सर्व अवस्थामध्यें सम, शांत व निःस्पृह होऊन रहा सर्व कर्मफलासक्ति सोडून व चित्ताला आत्म्यामध्यें स्थिर करून तूं कर्तव्य कर्मे कर. कारण कर्मे हा देहस्वभाव आहे. मानस दुःखें, शारीर पीडा, मरण-जन्मादि परिवर्तनें हेच ज्याच्यातील मोठमोठे खड्डे आहेत अशा संसारमार्गांतील ममतारूपी खोल विहिरींत पडूं नकोस. कारण ती ममताच महा ताप देणारी आहे. ( आतां तिच्यामध्ये न पडण्याचा उपाय सागतों तो ऐक. ) कमलनयना, तूं देहादि दृश्य वस्तूमध्यें नाहींस व तेही तुझ्यामध्यें नाहींत. तर तूं शुद्ध-बुद्ध-स्वभाव आहेस, असें जाणून आतल्या आत अति स्थिर हो. तूं अमल व शुद्ध ब्रह्म आहेस. तूच सर्वात्मा व सर्वकर्ता आहेस. यास्तव सर्व विश्व शांत व अज आहे अशी भावना करून तूं सुखी हो. दशरथ पुत्रा, ममता—महांधकारातून निघून सर्व इच्छास नाहींसें करणाऱ्या पूर्णा-

१ श्रीमद्भगवद्गीतेच्या 'कर्मेन्द्रियाणि संयम्य य आस्ते मनसा स्मरन् । इन्द्रियार्थान्वि मूढात्मा मिथ्याचार स उच्यते ॥ यस्त्विन्द्रियाणि मनसा नियम्यारभतेऽर्जुन । कर्मेन्द्रियैः कर्मयोगमसक्तः स विशिष्यते ॥ या श्लोकांत हेंच सांगितलें आहे.

नंद व अविद्यादिशून्य पदाचा अनुभव घे. चित्ताचा वध करण्यास जर तूं समर्थ झालास तर अपरिमित बुद्धिमान्, पूर्ण व परमार्थ सत्य अशा तुज ब्रह्मभूताला सर्व नमस्कार करतील १९.

**सर्ग १६**—शुक्राला पूर्व शरीरात प्रवेश करावयास सागून काल निघून गेला; शुक्र आपल्या पूर्व तनूत शिरला व दोघेही जीवन्मुक्त होऊन आपापल्या अधिकारावर आरूढ झाले.

**श्रीवसिष्ठ**—असो, राघवा, वर सांगितल्याप्रमाणें शुक्र शोक करीत असताना मध्येच त्याच्या वचनास प्रतिबंध करून ( असा शोक करणे उचित नव्हे असे सागून ) काल ह्मणाला "समंगानदीच्या तीरावरील तापसाच्या या शरीराचा त्याग करून जसा एकादा राजा नगरींत शिरतो त्याप्रमाणे तूं या आपल्या पूर्व शरीरात शीर. कारण या पूर्वशरीरानें तप करून तुला योग्यसमयी असुराचें गुरुत्व सपादन करावयाचें आहे. महाकल्पान्त झाला ह्मणजे अतिशय म्लान झालेल्या पुष्पाप्रमाणे तूं ही भार्गवी तनु, पुनः ग्रहण न करण्याकरिता (कायमची ), सोडशील. पण तोपर्यंत हे महामते, या प्राक्तन कर्मामुळें उद्भलेल्या तनूनेंच, जीवन्मुक्तपदास प्राप्त होऊन, तूं राक्षसेश्वराचा गुरु हो तुमचे दोघाचेही कल्याण असो. आह्मी आतां इष्टस्थानीं ( परप्रेमास्पद आत्मभावावस्थानास ) जातो."

राघवा, इतके सागून, ते दोघेही ( पिता–पुत्र ) स्नेहामुळे नेत्रातून अश्रू ढाळूं लागले असता, तो भगवान् गुप्त झाला. तो गेला असतां अवश्य भावि कर्मगति व ईश्वराच्या इच्छेमुळे अनिवार्य झालेली नियति याचा विचार करून, लहानशा सुकुमार लतेमध्यें वसंत जसा प्रवेश करतो त्याप्रमाणे दीर्घ काल व हेमंत-शिशिरादि कालनिमित्तें याच्या योगानें सुकलेल्या आणि पुढें जिच्यापासून शुभ फल प्राप्त होणार आहे अशा तनूंत शिरला त्याबरोबर वासुदेव–संज्ञक तापस ब्राह्मण–तनु मूळ तोडलेल्या वेलीप्रमाणे निस्तेज होऊन भूमीवर पडली. आपल्या पुत्राच्या शरीरांत जीव आला आहे असे पाहून भृगूने कमंडलूंतील जल शिंपडून मंत्रांच्या योगाने तिचे आप्यायन ( तृप्ति ) केलें. त्यामुळे त्या तनूतील सर्व नाड्या वर्षर्तूंतील नद्याप्रमाणें भरल्या. पावसाळ्यात जशी नलिनी अथवा वसंत–ऋतूंत वनलता त्याप्रमाणें ती तनु जेव्हां पूर्ण झाली तेव्हां तिचे-नखें केंस इत्यादि-प्रांतभागही नव्या पालवीप्रमाणें फुटले. जल व समोरून येणारा

वायु याचा संयोग होताच पूर्ण मेघाप्रमाणें पुष्ट झालेला शुक्र श्वासोच्छ्वासासह उठला. त्यानें अगोदर पुण्याकृति पित्याला वंदन केलें. तेव्हां पूर्वीप्रमाणेंच तारुण्य, सौंदर्य इत्यादिकाच्या योगानें शोभणाऱ्या पुत्राच्या आकृतीस भृगूनेही मोठ्या प्रेमाने आलिंगन दिलें. 'ही तनु मजपासून झाली' या आस्थेस आतल्या आत हंसत असूनही भृगूनें आपल्या बालकाच्या सुकुमार तनूस पाहिले. 'हा माझा पुत्र आहे' या स्नेहानें भृगूलाही परवश केलें. प्रारब्ध प्राबल्यामुळे यावज्जीव तसे होणे अगदीं अवश्य होतें. रात्र सपल्यामुळें आनंदित झालेल्या-सूर्य व पद्माकर-याच्याप्रमाणें ते दोघे पिता-पुत्र एकमेकास सुशोभित करूं लागले. असो, काहीं वेळ आनंदाचा अनुभव घेत त्याच अवस्थेंत राहून नतर ते तेथून उठले व समंगानदीवरील ब्राह्मणाच्या शरीरास त्यानीं अग्नि दिला. कारण लौकिक आचाराचें उल्लंघन कोण करणार आहे? नतर आकाशस्थ चंद्र-सूर्याप्रमाणें ते दोघे दीप्त तापसी त्या पावन अरण्यात राहिले. ज्याना विज्ञेय तत्त्व समजलें आहे असे ते जीवन्मुक्त जगद्गुरू देश-कालानुरूप प्राप्त झालेल्या सुख-दुःखदशामध्यें सम (हर्ष-विषादरहित) व स्वरूपामध्यें सुस्थिर होऊन राहिले. त्यानतर योग्यसमयीं शुक्राला असुराचें गुरुत्व मिळालें. भृगुही आपल्याला योग्य असलेल्या निरुपद्रव प्राजापत्य-अधिकारावर आरुढ झाला (म्ह. तो प्रजापति झाला.) साराश, हे रामभद्रा, पूर्वसंकल्पक्रमानें शुक्र त्या परम पदापासून झाला व वारवार मनात येणाऱ्या अप्सरेविषयींच्या मनोराज्यभ्रमाने पुढच्या अनेक दशामध्यें पडला १६.

**सर्ग १७**—शुद्ध चित्ताची सत्यसंकल्पता. शुद्ध मनानें युक्त झालेल्या जीवाचा परस्पर संबंध होतो.

**श्रीराम**—भगवन्, भृगुपुत्राची मनोरथरूपी प्रतिभा स्वर्गादिकाच्या अनुभवानें जशी सफळ झाली तशीच दुसऱ्या लोकाची प्रतिभाही सफळ का होत नाहीं, किंवा दुसऱ्या कोणी केलेला मनोरथ सफल का होऊ नये?

**श्रीवसिष्ठ**—शुक्राचे पूर्व कल्पांतील सर्व दोष त्यातील शेवटच्या जन्मात केलेल्या कर्मानुष्ठानामुळें क्षीण झाले होते. यास्तव या कल्पामध्यें ब्रह्मदेवाच्या संकल्पामुळें असुरगुरुत्व या अधिकाराचा भोग घेण्याकरिता त्याची ही प्रथम तनु उत्पन्न झाली. त्यामुळें ती पूर्व संकल्पाच्या

योगानें दूषित झालेली नव्हती. हा त्याचा जन्म अति शुद्ध होता. यास्तव तो सत्यसंकल्प झाला होता. मनोरथ सफळ होण्याचीं दोन कारणें आहेत. एक सत्य संकल्प करण्यास योग्य अशी चित्तशुद्धि व दुसरें मरणसमयीं उत्तर भोग देणाऱ्या तसल्याच कर्मांचा उद्भव होणें. यातील चित्त-शुद्धिरूपी प्रथम कारण शुक्राच्या ठायीं होतें. सर्व इच्छाची शांति होऊन अति शुद्ध झालेल्या चित्ताची जी स्थिति तेंच सत्य होय. तिलाच विमल चित् असे ह्मणतात. सत्य आत्म्याची भावना करणारें निर्मळ मन जशी जशी भावना करते तसे तसे ते तत्काळ होतें. भृगु-पुत्राचा हा विभ्रम जसा आपोआप उठला व तो सत्य संकल्पामुळे खरा झाला त्याप्रमाणे इतर जीवाचें चित्त शुद्ध जरी नसले व त्यामुळे त्याचे संकल्प सत्य जरी नसले तरी प्राक्तन कर्मवासनेमुळें (ह्मणजे वर सांगितलेल्या कारणातील दुसऱ्या कारणाने) त्याचेही मनोरथ सफळ होतात. बीजातील अंकुरादिकाप्रमाणे सर्व भूतसंघाचे भ्रांतिकृत द्वैतविभाग योग्य काळीं आपोआप उद्भवतात. हे दृश्य जगत् असेच प्रतिजीवाच्या संकल्पामुळें मिथ्या उत्पन्न झाले आहे व ते तसेच अस्त पावेल. पण परमार्थदृष्ट्या हें दृश्य उत्पन्न होत नाहीं व अस्तही पावत नाही. तर हें भ्रांतिमात्र आहे. शुक्राप्रमाणेच आह्मीही सर्व असेच झालो आहों. आमचा आकारही स्वसंकल्परूप आहे. आह्मी मिथ्या वस्तूला सत्य ह्मणतों. ही सर्गसंतति हिरण्यगर्भामध्येही अशीच अंधपरंपरेने स्थित आहे. सर्व जीव-जगदाकारानें ब्रह्मच उदय पावले आहे. आमचा प्राथमिक संकल्पच जगद्रूप झाला आहे ही सत्य गोष्ट तत्त्वज्ञानानें कळते. अनादि अज्ञानात असलेलें चित्तच जगत् आहे, असे पहाणारा आपोआप नष्ट होतो. जोवर जगाचा प्रतिभास होत असतो तोवरच त्याची सत्ता असते. ह्मणून त्याच्या वास्तविक अधिष्ठानाचे दर्शन झालें असता तें राहूं शकत नाहीं. जगज्जाल हें दीर्घ स्वप्न व चित्तरूपी मत्त हत्तीचे बंधनस्थान आहे. चित्सत्ताच जग-त्सत्ता असून जगत्सत्ताच चित्त आहे. यास्तव चित्ताचा नाश झाला कीं, जगाचाही नाश होतो. सत्य आत्म्याचा विचार केला असता चित्ताचा नाश होतो. धुणें, घांसणे इत्यादि उपायांच्या योगानें मलिन मण्याला शुद्ध केलें असतां तो जसा आपलें प्रकाशादि-कार्य करूं लागतो त्याप्रमाणें ऐकाग्र्याचा दृढ अभ्यास केला असतां चित्ताची शुद्धि होते व त्यामुळें

ते सत्याचा विचार करण्यास योग्य होतें. संकल्पानीं ज्याचें आक्रमण केलेलें नाही अशा चित्तामध्येंच सत्य प्रतिभा उठते. मलिन वस्त्रावर जसा दुसरा चागला रंग चढत नाही त्याप्रमाणे अद्वैत-आत्मज्ञान कलुषित चित्तात स्थिर होत नाहीं.

**श्रीराम**—गुरुवर्य, वासनानुरूप जगद्भ्रम होतो असें आपण सागितलेंत, पण शुक्राचा तो प्रथम जन्म होता. त्यामुळे त्याला स्वर्ग, अप्सरा, जन्म-मरणपरंपरा इत्यादिकाचा पूर्वी अनुभवच आलेला नव्हता. तेव्हा त्याच्या चित्तात त्याच्याविषयींच्या वासना असणेंही संभवत नाही. मग वासनाबीज नसताना त्याचा आरोप कसा झाला?

**श्रीवासिष्ठ**—रामा, पिता व शास्त्र याच्या उपदेशावरून शुक्राला जशा प्रकारच्या उत्पत्तिविनाशादिशील जगाचा व ऐहिक-पारलौकिक भावाचा बोध झाला होता व आईबापाच्या शोणितशुक्रापासून झालेल्या शरीरातील पंच ज्ञानेंद्रियांच्या योगाने त्याला जशा प्रकारचें जग प्रत्यक्ष दिसत होतें तशाच प्रकारचे सस्कार त्याच्या चित्तात, मोराच्या अंड्यातील मोराप्रमाणें, स्थित होते, व त्यापासून बीजांकुर-न्यायाने स्वर्गादिकाचा आरोप झाला. जीव ज्या वासनेने बद्ध असतो तेच तो आत पहातो. स्वप्नातील कल्पित स्वशरीराचाच याला दृष्टात आहे व हे जग दीर्घ स्वप्न आहे. ज्याप्रमाणे सैन्यातील लोक दिवसां आपले सर्व सैन्य पाहून व रात्रीं त्याच्या वासनेनें वासित होऊन निजले असता त्यातील प्रत्येक जण आपापल्या दृष्टीने निरनिराळे सैन्य पहातो पण तें वस्तुतः एकच असतें त्याप्रमाणे प्रत्येक जीव आपापल्या वासनेप्रमाणें एकाच जगाला निरनिराळें पहातों.

**श्रीराम**—पण गुरुवर्य, असें मानल्यावर प्रत्येक पुरुष व त्याचा ससार दुसऱ्याला दिसणार नाहीं. कारण स्वप्नातील पुरुष व त्याचा संसार दुसऱ्याला दिसत असतो, असा कोठेंहि अनुभव येत नाहीं. मग गुरु व शिष्य याचा सबंध, उपदेश, शास्त्ररचना इत्यादि कसें होणार? बरें प्रत्येक पुरुष व त्याचा ससार दुसऱ्याला दिसतो म्हणून ह्मणावें तर सर्वांना साधारण असणारा हा संसार एकेकाच्या ज्ञानानें बाधित होणार नाहीं. मिळून दोन्हीकडून मोक्ष होणें अशक्य. तेव्हां या अडचणींतून कसें पार पडावयाचें, तें सागा.

**श्रीवसिष्ठ**—रामभद्रा, या तुझ्या दोन्ही प्रश्नाचें उत्तर क्रमानें देतों. शुद्ध मनाशीं मिळून जाण्यास लागणारें सूक्ष्म सामर्थ्य ज्याच्यामध्यें नसतें तें मलिन मन दुसऱ्याशीं मिळत नाहीं; हें जरी खरें आहे तरी औषधरस घालून द्रवमय केलेला सुवर्णादि धातु दुसऱ्या द्रवमय धातूशीं जसा एक-रूप होऊन जातो त्याप्रमाणें शुद्ध मन दुसऱ्या शुद्ध मनाशीं मिळून जातें. मलिन व शुद्ध जल एकत्र केल्यास त्यांचा परिणामही मलिन होतो. पण दोन निर्मल जलाचा सयोग केल्यास त्याचा एकजीव होतो कीं नाहीं? त्याचप्रमाणे शुद्ध चित्ततत्त्वे परस्पर मिळून जातात. देवांचीं चित्तें वीर्यवान् असतात. त्यामुळें ते स्वप्नामध्यें भक्ताच्या मनात प्रवेश करून त्याच्यावर अनुग्रह करितात, हें शास्त्रातरीं प्रसिद्ध आहे. त्याप्रमाणेंच समाधि, ज्ञान इत्यादिकाच्या अभ्यासाने वीर्यवान् झालेल्या मनानें युक्त असलेले गुरुही शिष्याच्या मनात किंवा त्यानी मनाने कल्पिलेल्या जगात प्रवेश करून त्यास बोध करितात. आम्ही जग सर्वसाधारण आहे असें मुळी मानीतच नाहीं, तर प्रत्येक जीवाचे जग निरनिराळें आहे, असें मानतों. त्यामुळे तुझा दुसरा प्रश्न निरवकाश आहे वासनाराहित्य हीच चित्तशुद्धि आहे. तिच्या योगाने व चिन्मात्रभावनेनें साधक ज्ञानी होतो व त्यामुळेंच तो मुक्त होतो १७.

**सर्ग १८**—मलीन चित्ताचा मलीन चित्ताशी संबध होतो. आत्मज्ञानाची विवेकादि काहीं साधनें.

**श्रीवसिष्ठ**—रामभद्रा, शुद्ध मनोराज्याचा परस्पर सबध होतो हें वर सांगितलें. आता मलिन मनाचा मलिनाशीं कसा ससर्ग होतो तें सांगतों. सर्व जीवानीं आपापल्या कल्पिलेल्या संसारखंडामध्ये स्थूल-सूक्ष्म कलारूप कारणप्रपंच उद्भवतो व त्या कल्पनेमुळेंच तो भिन्न भिन्न आहे. पण त्याचा आधार एकच आहे. जागर व स्वप्न या अवस्थात होणारी सर्व जीवाची प्रवृत्ति अथवा निवृत्ति चिदेकरस आत्म्याच्या आसमंतात् व्याप्ती-मुळेंच होत असते. प्रवृत्ति ( म्हणजे व्यवहार ) करणारे जे जे जीव आहेत ते सर्व चिन्मात्र-ज्योतीनेंच अर्थजात पहातात. ती ज्योतिच सर्वांचे साक्षिचैतन्य आहे व तें सर्वत्र एक असल्यामुळें जीव एकमेकाचा कल्पित सर्ग पाहूं शकतात. अधिष्ठान अथवा साक्षिचैतन्य याच एका मार्गानें विचित्र सर्गरूपी जलाशय एकमेकांस मिळतात व ते सर्व एक

होऊन घनरूप ( अवाढव्य आकाराचे ) होतात. त्यांतील कित्येक अगदीं निराळे रहातात, कित्येक लय पावतात व कित्येक परस्पर मिळून रहातात. रामा, या ब्रह्मसंज्ञक अरण्यांत एकेका अणूमध्यें परस्परास न मिळालेल्या अशाही असख्य जगद्गुंजा आहेत. प्राक्तनामुळें त्यातील ज्याचा ज्यांच्याशीं निकट संबंध येतो त्याच्या त्या जगाचा एक सघ होऊन त्यांच्याच मात्र व्यवहाराला तो साधारण होऊन रहातो. हीच गोष्ट उदाहरणाने स्पष्ट करू या. समज कीं, एके ठिकाणीं दहा मनुष्यें प्राक्तनकर्मामुळे जमली आहेत. त्यातील प्रत्येकाचे जग निराळे आहे. कारण त्यातील एकाला जशा प्रकारच्या जगाचा अनुभव येतो तशाच प्रकारच्या जगाचा अनुभव दुसऱ्याला येत नाहीं. एका कुटुबातील दोघा भावांच्या भार्या, त्या दोघींच्याही माहेरचीं माणसे व त्याचे सुखदुःखादि भोग त्यातील प्रत्येक भावाला जरी प्रिय वाटत असले तरी परस्परास अप्रिय वाटतात. आईला अनुकूल वाटणारा पदार्थ मुलाला प्रतिकूल वाटतो. तस्मात् प्रत्येकाचे जग निरनिराळे आहे, हें सिद्ध झालें. पण त्या दहाजणांचा ससर्ग झाल्यामुळे त्याच्या दहा जगाचा जणुं काय एक गोळा होतो व त्या कारणानें वस्तुतः साधारण नसतानाही तो एक साधारण पदार्थ आहे, असा भास होतो व त्या सर्वांची चित्ते एकसारखीच मलिन असल्यामुळें त्याचा परस्पर ससर्ग होऊन एकाच्या दुःखानें दुसरे दुःखी व सुखाने सुखी होतात. ) साराश हा सर्व भ्रम आहे, चित्त सर्व भेदाचें कारण आहे. चित्तामुळेच जीवाचा परस्पर भेद झाला आहे. शुद्ध सोनेच आपल्याला विसरून कडें होऊन बसलें आहे. सर्व जीवराशींच्या तिन्ही अवस्थाचा आश्रय आत्मा आहे जागरादि तीन अवस्थांचें कारण जीव आहे, देह नव्हे. यास्तव जळच तरग आहे असे समजले असता तरंग जसे जलाहून पृथक् रहात नाहींत त्याप्रमाणें जीवच तीन अवस्थाचा आत्मा आहे असा विचार केला ह्मणजे वस्तुभूत देहता अवशिष्ट रहात नाही. अशारीतीनेच बुद्ध ( तत्त्वज्ञ ) जीव तुर्यपदीं रहाणाऱ्या चैतन्य–एक–रस आत्मतत्त्वास प्राप्त होऊन जीवभावापासून निवृत्त होतो. पण जो अतत्त्वज्ञ असतो तो आपल्याच कल्पनेनें पुनः देहाद्याकारकल्पनारूप सृष्टींत प्रवृत्त होतो. अज्ञ व ज्ञानी यांच्या सुषुप्तींत भेद मुळींच नसतो. पण त्यातील पहिला ( अज्ञ ) गाढ निद्रासमयीं वास्तव–

आत्मज्ञानहीन व देहच आत्मा आहे या वासनेनें वासित असतो. ह्मणजे त्याची सुषुप्ति वासनाबीजयुक्त असते व ज्ञानी पुरुषाची सुषुप्ति वासनाशून्य असते. हाच काय तो त्याच्यामध्ये फरक आहे व त्यामुळें एक संसारभाक् व दुसरा मुक्तिभाक् होतो. चित् सर्वगत असल्यामुळें एकाला दुसऱ्याच्या सर्गांत प्रवेश करिता येतो. त्यामुळेच प्रत्येक सर्गांत दुसरे अनेक सर्गही पृथक्रूपानें रहातात. केळीचीं सोपटे जशीं एकात एक असतात त्याप्रमाणें सर्गांचे समूहही एकात एक, एकांत एक असे असतात. पण ब्रह्म सर्वांमध्यें एकरूपाने रहातें. केळीच्या पानाऱ्या मंडपाप्रमाणें ब्रह्मस्वभाव शीतळ आहे. शेकडो पाने जरी आलीं तरी कदलीमध्ये काहीं अन्यता येत नाहीं. त्याप्रमाणें शेकडो सर्ग झाले तरी ब्रह्मामध्यें अन्यता नाही. एकाद्या बीजाला जलाचे सहाय मिळाले असतां ते अकुरादि क्रमानें पुनः फुलानंतर फळभावास ह्मणजे आपल्या स्वरूपास प्राप्त होते त्याप्रमाणे ब्रह्मही काम-कर्मादि रसाचा सपर्क झाला असता मन होऊन व जन्म-मरणादि कल्पनेने संसार करीत असताना ब्राह्मणादि अधिकारी शरीरास प्राप्त होऊन श्रवण–मननादि क्रमाने बोध झाला असता प्राक्तन ब्रह्मभावाने व्यक्त होते. पण एका बीजापासून क्रमाने झालेल्या दुसऱ्या बीजालाही भूमींत पेरून पाणी घातलें असता त्याचाही जसा पुनः अकुरादिरूपानें परिणाम होतो तसा मुक्तालाही पुनः जीवभाव प्राप्त होईल, ह्मणून ह्मणशील तर बीजाबद्दल रसाचाच दृष्टात घे. ह्मणजे रस हे ज्याचे सहकारी कारण आहे असे बीज जसें फळभावाने परिणाम पावते त्याप्रमाणे ब्रह्म हे ज्याचे कारण आहे असा जीव जगद्रूपाने व्यक्त होतो. पण रस हा स्वाभाविक धर्म असल्यामुळें त्याचे कारण काय आहे? असा प्रश्न करिता येत नाही. त्याप्रमाणेंच ब्रह्माचे कारण काय आहे असे विचारता येत नाही. कारण तें स्वभावसिद्ध आहे. शिवाय निर्विकार, अद्वितीय व असंग असलेले ब्रह्म वस्तुतः प्रपंचाचें कारणही होऊ शकत नाही व त्यामुळे त्याचे निराळें कारण शोधण्याचा प्रसगच येत नाही. कारण जे स्वतः अकारण आहे त्याचें आणखीं कारण कसें असणार? यास्तव जगत् अकारण ब्रह्माचें विवर्तरूप आहे आणि ह्मणूनच ते मिथ्या आहे. पण यावर–जड, अनृत व दुःखरूप जगाचें तसलेच कारण कोणतें आहे? याचा विचार केला पाहिजे–ह्मणन ह्मणशील तर सांगतों–असार वस्तूंचा विचार करून कोणता पुरुषार्थ मिळ-

णार ? सार वस्तूचा विचार करावा. बीजापेक्षां ब्रह्मामध्ये कांहीं विशेष आहे. ह्मणूनच तें आदिकारण अकारण आहे असे आह्मी ह्मणतों. तो विशेष कोणता ते सागतों ऐक. बीज आपला आकार सोडून अकुरादिरूप होतें, असें आपण पहातों. पण ब्रह्म आपला आकार सोडून जग होत नाहीं. तर ते त्रिकालीं स्वरूपानें विराजमान होतें. जग हा त्याचा विवर्त आहे. यास्तव तें जगाचें विवर्तोपादन आहे. आरंभ किंवा परिणाम–उपोदान नव्हे. सारांश ब्रह्मासारख्याच पारमार्थिक सत्तेने युक्त असें कार्य नसल्यामुळें ते अकारण आहे.

शिवाय बीजाचें स्वरूप, अवयव, इत्यादि सर्व साकार आहे. यास्तव आकारशून्य वस्तूशीं त्याची तुलना कशी करिता येणार? तस्मात् कल्याणरूप ब्रह्माला उपमाच देता येत नाहीं. तें स्वत च अनात्माभास होते. स्वतःच जगदाभास पहाते. पण ते आपल्याला यथाभूत पहात नसल्यामुळे अनर्थात पडतें व त्यातून सोडविण्याकरिता शास्त्रादिकाची गरज असते. मृगजळाची भ्रान्ति होणे यात विद्वत्ता ती कोणती व विद्वत्ता आल्यावर मृगजळ कसे भासणार? आत्मा निर्मल, स्वप्रकाश व सर्वगत असल्याकारणाने सर्वांना सदा साक्षात् अनुभवगोचर होण्यास योग्य आहे. पण त्याला केव्हाही कोणीही साक्षात् जाणत नाही. बाहेर्मुख पुरुषाच्या भ्रातीचें केवढ प्राबल्य आहे पहा! नेत्र बाह्यमुख असल्याकारणानें तो जसा आपल्याला पाहू शकत नाहीं त्याचप्रमाणे या सर्व बाहिर्मुख प्राण्याची स्थिति आहे. बहिर्मुख पुरुष आपल्या आत्म्याल जरी पहात नसले तरी ते इतराच्या आत्म्यास पहात असतील ह्मणून ह्मणावें, तर तसेंही हात नाहीं. कारण त्याचे नेत्र बाह्य वस्तूच्या आकारा वरच अडकून रहातात. ते प्रत्येक पदार्थात असणाऱ्या पारमार्थिक सद्रू पापर्यंत जाऊ शकत नाहींत. भ्रातिशून्य मुक्त जसा दृश्य द्वैत पहात नाहीं कारण त्याची सूक्ष्म दृष्टि प्रत्येक पदार्थांतील सूक्ष्म सत्त्वाच प्रथम विषय करते व त्यामुळें तिला बाह्य आकार व त्याचा परस्पर भेद याचा अनुभव येत नाहीं त्याप्रमाणें बाहिर्वृत्ति पुरुषांची स्थिति होते. यास्तव दृश्याला दृश्य या रूपानें पाहिल्यास आकाशासारखें शुद्ध ब्रह्म मोठ्या यत्नानेंही मिळणं शक्य नाहीं. ह्मणून त्याला दृङ्मात्ररूपानें पहावें.

रामा, याप्रमाणें जीवांचा परस्परसंबंध होतो. केळीच्या पानाप्रमाणें एकांत एक एकात एक, असे अनेक जीव उद्भवतात. दृश्यबुद्धि परावृत्त झाली, ( ती अंतर्मुख झाली ) ह्मणजे आतर व बाह्य वस्तूचें तात्त्विक ज्ञान होते. बाह्य असार आहे, असें कळल्यामुळें त्याचा बाध होतो. मी कोण व हें काय आहे असा विचार ज्याला होत नाहीं त्याचा हा दीर्घ जीवभ्रम नाहींसा होत नाही. वैराग्यपूर्वक विचार केला असता तो सफल होतो. ज्याची भोगतृष्णा क्षीण झालेली नसते त्याचा विचार निष्फल आहे. पण अध्यात्म शास्त्रांचें सतत चिंतन केल्यास भोगतृष्णा प्रतिदिन क्षीण होत जाते व शेवटी त्या मतिमानाचा विचार सफल होतो. पथ्यादि नियमपूर्वक घेतलेले औषध जसें रोगाला घालविते त्याप्रमाणें इंद्रियास जिंकण्याचा अभ्यास केला असता विवेक सफळ होतो. विवेकही ज्याच्या केवळ वाणीमध्येच असून मनात नसतो त्याची अविवेकिता जात नाही, तर ती दुःखालाच कारण होते. ज्याप्रमाणे स्पर्शानें वायूची सत्ता कळते, केवळ वाणीने कळत नाहीं, त्याप्रमाणें इच्छेच्या न्यूनतेवरून पुरुषाचा विवेक कळतो, नुस्त्या शब्दावरून कळत नाही. चित्रातील अमृत हे खरे अमृत नव्हे. चित्रातील अग्नि हा खरा अग्नि नव्हे व चित्रातील अगना ही खरी अंगना नव्हे. त्याप्रमाणे केवल वाणीतील विवेक हा अविवेक होय. विवेकाच्या योगाने प्रथम राग ( आसक्ति ) क्षीण होतो. वैर समूल नाहींसें होते व नतर इष्टप्राप्ति व अनिष्टनिवृत्ति याविषयींचा प्रयत्न सर्वथा क्षीण होतो. तस्मात् ज्याच्या ठायी विवेकिता असते तोच पावन पुरुष होय १८.

**सर्ग १९**—उपासनेप्रमाणे फलप्राप्ति, बोधानें सत्य आत्म्याची स्थिर सिद्धि, जाग-रादि चार अवस्थाची स्थिति.

**श्रीवसिष्ठ**—रामा, जीवाचें बीज पर ब्रह्म आहे. ते आकाशाप्रमाणें सर्वत्र स्थित आहे. त्यामुळे जीवामधील जगातही अनेक जीव असतात. केळींच्या पानाप्रमाणे अथवा पृथ्वीतील किड्यांप्रमाणे जीवामध्यें अनेक जीव-जाती असतात. स्वात्मसिद्धीकरितां जीव जसे जसे प्रयत्न करतात, तसे तसे, विचित्र उपासना क्रमानें, तत्काल होतात. देवांची पूजा करणारे देवांस जाऊन पोचतात, यक्षाचे पूजक यक्षास प्राप्त होतात व ब्रह्मपूजक ब्रह्मरूप होतात. यास्तव यातील जे तुच्छ नसेल तें ध्यावें. आपल्या निर्मल ज्ञानानें शुक्र मागून मुक्त झाला व प्रथम दृष्टीं पडलेल्या अप्सरारूप दृश्या-

च्या योगानें तो स्वाभाविकपणेंच बद्ध झाला होता. भोळ्या जीवसंवित्–ला जसे संस्कार करावे तशी ती होते. यास्तव तिला वास्तव ब्रह्मभावानेंच सुसस्कृत करावे. मिथ्या जीवादि भावाने संस्कृत करूं नये.

**श्रीराम**—मुनिराज, जाग्रत् व स्वप्न यामध्यें भेद कोणता आहे? विषयांचा साक्षात् अवभास दोन्ही अवस्थामध्ये एकसारखाच होतो. मग जाग्रत् सत्य आहे व स्वप्न भ्रम आहे असा व्यवहार कां होतो?

**श्रीवासिष्ठ**—राघवा, स्थिरप्रतीतियोग्यता हीच जाग्रत् व अस्थिर प्रत्यय हेच स्वप्न. जाग्रत्–अवस्थेत पुन पुनः तोच तो पदार्थ अनुभवास येतो हेंच तो सत्य आहे, असें ह्मणण्याचे कारण आहे. स्वप्नात पाहिलेला पदार्थ जर अन्य काळीं दिसू लागला तर ते स्वप्न जाग्रत् होईल व जाग्रत्–वस्तूचाही अन्य काळीं अनुभव जर न आला तर ती जाग्रतीही स्वप्न होईल. जाग्रत् व स्वप्न या दोन अवस्थाचा भेद स्थिरता व अस्थिरता यावाचून नाहीं. पण त्याचा अनुभवाश सदा सर्वदा सारखाच असतो. स्वप्नही स्वप्नाच्या वेळीं स्थिर असल्यामुळें तेवढ्या वेळेपुरते जाग्रत्च असतें व जाग्रत्–समयींही जे अस्थिर असते किंवा अस्थिर आहे असें कळते तें स्वप्नच होय. हरिश्चंद्राच्या बारा वर्षांच्या स्वप्नाप्रमाणें ज्या स्वप्नाचा स्थैर्याश जाग्रद्बुद्धिग्राह्य असतो ते स्वप्न जाग्रत्च होय. जोंपर्यंत जे स्थिर आहे असें वाटतें तोंपर्यंत ते जाग्रत्च. पण क्षणात नष्ट होणारें सर्व स्वप्नतुल्यच कसें ते आता सागतो ऐक.

ज्याच्या योगाने प्राणी जिवत रहातो तो जीव-धातु शरीरात असतो. (अर्थात् जीवन हेंच त्याच्या अस्तित्वाचें प्रमाण.) तेज व वीर्य (ह्मणजे शरीरातील उष्मा व शरीराच्या चेष्टेस कारण होणारें बल) हे त्याचे लिंग होय. त्याचप्रमाणे निरुपाधि प्रेम, अभिमानाचें निमित्त ज्ञान इत्यादिकही जीवधातूचें चिह्नच होय. शरीर जेव्हा मनानें, वाणीनें अथवा कर्मानें व्यवहार करू लागतें तेव्हा प्राणवायूने ज्याला प्रेरणा केली आहे असा जीव-धातु, पाटातून वहात बाहेर पडणाऱ्या सरोवर-जलाप्रमाणें हृदयांतून बाहेर पडून सचार करू लागतो. तो सचार करू लागला ह्मणजे अगांतील सर्व नाड्यांमध्यें संवित् (ज्ञान) उत्पन्न होते व ती दृष्ट असल्यामुळें चित्तरूप होते. तिच्यामध्यें जगत्-भ्रम लीन असतो. नेत्रादि गोलकांमध्यें पसरणारी ती संवित् नाना आकार व विकार यांनीं संपन्न

असलेलें रूप आपल्यामध्यें पहाते. अनुभवकाळीं जाग्रत् व स्वप्न यांमध्यें कांहीं अंतर नसतें. पण एकदां अनुभविलेला पदार्थ पुनः पुनः अनुभवास आल्यामुळें व तोच हा अशी प्रत्यभिज्ञा ( ओळख ) होत असल्यामुळें तो स्थिर आहे अशी कल्पना होते. आतां सुषुप्ति व तुर्य यांचा क्रम सांगतों. वाचिक व कायिक विक्षेप शांत झाला ह्मणजे स्वप्नाचा उदय होतो व त्याच्यासह मानस विक्षेपही शांत झाला कीं, सुषुप्तीस आरंभ होतो. हा तिन्ही प्रकारचा शरीरक्षोभ क्षीण झाला असता जीवधातु शांत व स्वस्थ रहातो. समतेस प्राप्त झालेले वायू हृदयाकाशात क्षोभ उत्पन्न करीत नाहीत, असें झाले ह्मणजे तो जीवधातु, वायुरहित गृहात ठेवलेल्या दिव्याच्या ज्योतीप्रमाणें, केवल निर्विक्षेप-अवस्थेस प्रकाशित करतो. त्यामुळें शरीरगत नाड्यामध्ये संवित् उत्पन्न होत नाहीं. संवित्च्या अभावीं हृदय-क्षोभ होत नाहीं. चित्तवृत्ति नेत्रादि रध्रांकडे येत नाहीं व ती बाहेरही पडत नाहीं.

उपनिषदात ' त्यावेळीं जीव सत्संपन्न होतो. सद्रूप ब्रह्माशीं मिळून जातो ' असे म्हटलें आहे, हे खरे. पण तो ' मी जीव आहें ' या संस्कारासहितच ब्रह्माशीं मिळत असतो. ह्मणून सत्संपन्न होत असूनही तो मुक्त होत नाहीं. किंवा त्याला आत्म्याचा साक्षात्कार होत नाहीं. तर तिळातील तेलाप्रमाणे हिमातील शीतसंवित् प्रमाणें अथवा घृतातील स्नेहसंवित्-प्रमाणें जीव आतल्या आत स्फुरत असतो. वेदांत–सुषुप्तिकाळीं जीव हृदयाच्या सर्व शोकापासून मुक्त होतो–असे ह्मटलें आहे व त्यामुळें तो ब्रह्ममय होऊन जातो असें वाटते. पण त्याची भेदवासना लीन झालेली नसल्यामुळें जीवाचे तें आत्यंतिक अथवा निरवशेष ब्रह्मैक्य नव्हे. तर मनोरूपी उपाधि लीन झाल्यामुळें व जीवाकार चिति स्वच्छ असल्यामुळे तिचें स्वाभाविकपणें होणारें ब्रह्मैक्य होय. प्राणवातकृत विक्षेपही सुषुप्तींत होत नाहीं. कारण त्यावेळीं वायूची गति अति सौम्य असते.

असो; चित्त सर्व व्यवहारापासून उपरत झालें असता–चैतन्याचे ठायीं वैषम्य मुळींच नाही, तर तें सर्वत्र सम आहे–असें शास्त्रतः जाणून, विचार व ऐकाग्र्य याच्या योगानें साक्षात्कारवान् झालेला योगी कोणत्याही दशेंत व्यवहार करीत असला तरी सदा तुर्यवान्च असतो. सुषुप्तींत सौम्य झालेले प्राण जेव्हां भोगदायी कर्माच्या योगानें चंचल होतात तेव्हां जीव-

चित्, त्या त्या भोगास अनुकूल असलेले प्राक्तन संस्कार जागे झाल्यामुळें, चित्तरूपानें उदय पावते. नंतर योगी आपल्या योगशक्तीनें बीजातील पुढें विस्तार पावणारा वृक्ष जसा पहातो त्याप्रमाणें जीव आपल्यामध्यें असलेलें जगज्जाल आंतल्या आत पण जाग्रत्-प्रमाणेंच व्यवस्थितपणें पहातो. निजलेला जीव वायूच्या योगानें जेव्हां किंचित् क्षुब्ध होतो तेव्हा 'मी आहें' असें तो पहातो व जेव्हा बराचसा क्षुब्ध होतो तेव्हा 'मी आकाशात गमन करीत आहें' असें तो पहातो. जेव्हा नाड्यातील श्लेष्मगत् जलानें तो भिजल्यासारखा होतो तेव्हा त्याला जलाचा भ्रम होतो. तो पित्तादिकानें जेव्हा व्याप्त होतो तेव्हा ग्रीष्मादिकाचा अनुभव घेतो. साराश तो आतील उद्भूत सस्काराप्रमणे आतल्या आत, बाहेर असल्याप्रमाणें, सर्व पदार्थ पहातो. हृदयातच तो हे सर्व क्षोभ पहात असल्यामुळें स्वप्नसमयीं इंद्रियछिद्रांत येत नाहीं.

पुढें वायूनें क्षोभ केला असता इंद्रियछिद्राच्या द्वारा तो बाह्य सृष्टि पाहूं लागतो व त्या अवस्थेलाच मुनींनीं जाग्रत् ह्मटलें आहे. रामा; साराश याप्रमाणें हा सर्व मनाचा खेळ आहे, असें जाणून त्या असत् जगामध्यें सत्य-भावना करू नकोस. कारण ती भावनाच आध्यात्मिकादि त्रिविध मरण व त्यास कारण होणारे दोष यास अवश्य सपादन करणारी आहे १९.

सर्ग २०—मनाच्या स्वरूपाचें निरूपण व त्याला आत्मप्रवण करण्याचा उपदेश.

**श्रीवसिष्ठ**—राघवा, मनाचें रूप कळावें ह्मणून मी तुला चार अवस्थाचें रूप सागितलें. जाग्रत्–आदि चार अवस्थाचें वर्णन ऐकून मनाचा स्वभाव सहज कळतो. दृढ भावित पदार्थाचा आकार धारण करणें हा मनाचा स्वभाव आहे. अग्नींत घालून तापविलेला लोखडाचा गोळा जसा अग्नीसारखा होतो त्याप्रमाणें दृढनिश्चययुक्त चित्त ज्याची पुष्कळ भावना करितें, तद्रूप तें होतें. यास्तव सत् व असद्रूप, ग्राह्य व त्याज्य विषयीं इत्यादि सर्व मनःकल्पनामात्र आहे. त्याना सत्यही ह्मणतां येत नाहीं व असत्यही ह्मणवत नाही. मन समष्टि-व्यष्टिरूप असल्यामुळें तें व्यष्टिरूपानें मोहविषय जगाचें उपादान होतें. मनच पुरुष आहे. यास्तव मोहकारी व्यष्टिमनाला शुभ मार्गात प्रवृत्त कर. ह्मणजे त्याच्या विजयानें समष्टिगत मनांतील अणिमादि सिद्ध व तत्त्वबोध निश्चयानें प्राप्त होईल. शरीरच जर

पुरुष असता तर शुक्र विविध आकार व शेकडों जन्मांतर-भ्रम यांस कसा प्राप्त झाला असता ? तस्मात् चित्तच पुरुष असून शरीर चित्तविषय आहे. चित्त ज्या रूपाचें होतें तेंच त्याला सत्वर प्राप्त होतें, यांत कांहीं संशय नाहीं. यास्तव सज्जना, जें अतुच्छ, अनायास, अनुपाधि व भ्रमरहित तत्त्व आहे त्याचें मोठ्या यत्नानें अनुसंधान कर. ह्मणजे तूं तद्रूप होशील.

मनानें इच्छिलेल्या देशामध्यें अथवा विषयामध्ये शरीर व इंद्रियें नियमानें जातात. पण शरीर जेथें असेल तेथें मन रहातेंच असा कांहीं नियम नाहीं. तर शरीर शिवालयात असताना मन अमंगल जागींही जातें. यास्तव आपलें इष्ट संपादन करण्याकरिता मन, शरीर व इंद्रियें, यांचें नियमन करण्यास समर्थ आहे. यास्तव तुझें मनही सत्य आत्मतत्त्वाकडे लागो. अनित्य देहादिकाकडे त्याचा कल न होवो १०.

**सर्ग २१**—विशुद्ध अवस्थेंत कल्पना करणाराच नसल्यामुळें मन कल्पना सभवत नाही पण अशुद्ध अवस्थेंत मनाची सिद्धि होऊन नाना मत–कल्पना सभवतात.

**श्रीराम**—हे सर्वधर्मज्ञ भगवन्, सागरांतील कल्लोलाप्रमाणे माझ्या मनांत हा एक मोठा संशय आहे. दिशा, काल इत्यादिकानीं मर्यादित न होणाऱ्या व त्यामुळेच नित्य व निरामय अशा ब्रह्मामध्ये ही मन या नावाची संवित् कोठून अथवा का उत्पन्न झाली ? ज्याच्यामध्ये त्रिकालीं दुसरें ह्मणून काही नाहीं त्याच्यामध्ये, हा कलंक का, कसा व कोणत्या प्रकारें रहातो ?

**श्रीवसिष्ठ**—रामा, चागला प्रश्न केलास. मनोहर परागाचा स्राव करणाऱ्या नंदनवनातील मजिरीप्रमाणें तुला मोक्षभागिनी मति उत्पन्न झाली आहे. तुझी मति पूर्वापर-विषयांत तत्पर झाली आहे. यास्तव शंकरादिकांस प्राप्त झालेले उच्च स्थान तुला मिळेल. पण रामा, तुझ्या या प्रश्नाचा हा काल नव्हे. मी जेव्हा सिद्धात सागेन तेव्हां तूं हा प्रश्न कर. ह्मणजे मी सांगितलेला सिद्धांत तुला तळहातावरील आंवळ्या प्रमाणें साक्षात् कळेल. वर्षासमयीं मोराच्या केका व शरदतूंतच हंसवाणी शोभते. पावसाळा संपला ह्मणजे आकाशाची स्वाभाविक नीलिमा व पावसाळ्यांत मोठमोठ्या ढगांनीं आच्छादित झालेले आकाशच नेत्रांना आनंद देतें. सारांश, सर्व कांहीं योग्य काळीं झालें पाहिजे. या वेळीं उत्तम मनोनिर्णय चालला आहे.

मनामुळेंच जनतेचा जन्म झाला आहे. यास्तव सुव्रता प्रथम त्याचेच स्वरूप चागले समजून घे.

मालिन्य सर्व अज्ञ पुरुषांच्या अनुभवानें सिद्ध आहे. त्याच उपाधीच्या योगानें चित् विकार पाऊं लागली म्हणजे प्रकृति होते. मनन करूं लागली ह्मणजे मन होते. पाहूं लागली ह्मणजे नेत्र होते व ऐकू लागली ह्मणजे श्रोत्र होते. त्याचप्रमाणे कर्मेंद्रियरूपास प्राप्त होऊन त्यांच्या व्यापारानें धर्म व अधर्म-संज्ञक कर्मही ती चित्च स्वतः होते, असें मुमुक्षूंनीं श्रुत्यादि प्रमाणांवरून ठरविलें आहे. अनेक वादी शास्त्रकारानीं आपापल्या इच्छे-प्रमाणें तिच्याच अनेक नावाची रूपाची, व आकाराची कल्पना केली आहे. मननामुळें चचल झालेलें मन ज्या ज्या भावाचे ग्रहण करतें त्या त्या भावास ते प्राप्त होते. सुगधी पुष्पावरून येणारा वायु जसा सुगधमय होतो त्याप्रमाणे ते तन्मय होतें. यास्तव आत्म्याचा निर्णय करून मनाला तन्मय करून सोड. वारवार त्याचाच आस्वाद घे. मन तन्मय झालें कीं त्याच्या अधीन असलेले शरीरही तन्मय होईल. मनाच्या प्रेरणेनेच शरीर, ज्ञानें-द्रियें व कर्मेंद्रियें याचा क्रमानें व्यवहार सुरू होत असतो. त्यामुळें वस्तुतः सर्व कर्म मनाचें आहे. पुष्प व त्याचा वास याची सत्ता जशी एक त्या-प्रमाणे मन व कर्म याची सत्ता एक. दृढ अभ्यासामुळें मन ज्या ज्या भावाचा स्वीकार करते त्या त्याप्रमाणेच पुढें वासना, कर्म व फलानुभव याचा विस्तार होतो व त्याचाच आस्वाद घेऊन तत्काल तें बद्ध होतें. ते ज्या ज्या भावाचा स्वीकार करतें तें तेंच खरें व तत्त्व आहे, असा त्याचा दृढ निश्चय होतो व तेंच श्रेयस्कर आहे दुसरें काहीं नाहीं असें त्याला वाटतें. याच अबाधित नियमास अनुसरून प्रत्येक मन धर्म, अर्थ, काम अथवा मोक्ष यातील कोणत्या तरी पुरुषार्थाकरिता प्रयत्न करितें. कापिलाचें ( साख्याचें ) मन असग व चिन्मात्र त्वपदार्थाला मात्र आपल्याच विवेक-शक्तीनें जाणतें व तत्पदार्थाविषयीं श्रुतींचा आश्रय न केल्यामुळें मोहित होतें. त्यानीं आपल्या बुद्धीनेंच सुख-दुःख-मोहात्मक जड जगाचें उपादान तसलेंच त्रिगुणात्मक प्रधान असलें पाहिजे असें समजून, पुनः पुनः त्याचाच आस्वाद घेऊन, तेंच तत्त्व आहे असा निर्णय करून, तशाच शास्त्रदृष्टींची कल्पना केली आहे. तें त्याचें मन 'या आमच्या सिद्धांताप्रमाणें विचार केल्यावाचून कोणालाही मोक्ष मिळणें शक्य नाहीं' असें ग्रंथद्वारा दुस-

त्यांच्या मनांतही भरवून देते. वेदातवेत्ते हें सर्व ब्रह्म आहे या रूढबुद्धीनें निर्णय करून मुक्ति ह्मणजे सर्वअनर्थनिवृत्ति व निरतिशय आनंदरूप अपरिछिन्न ब्रह्मात्मभावप्राप्ति होय, असें म्हणतात आणि ती आम्ही सांगतों त्या उपायांनींच प्राप्त होईल. दुसऱ्या कोणत्याही रीतीनें प्राप्त होणार नाहीं, असें आपल्याच मताविषयीं निश्चित होऊन आपले नियम-भ्रम आपल्या अनुयायींस सागतात. ( म्हणजे त्याचें उपेय तत्त्व जरी वास्तव असलें तरी उपायप्रक्रिया कल्पितच आहेत. ) विज्ञानवादी बौद्ध, आपल्याच भ्रमपूर्ण बुद्धीनें मुक्ति शम-दमादिकाच्या योगानें प्राप्त होते असे समजून तसेंच दुसऱ्याना शिकवितात. तात्पर्य जैनादि इतर विचारीही आपल्या इच्छेप्रमाणें विचित्र कल्पना करितात. ह्या नाना आकाराच्या कल्पना जलावर कारणावाचूनच उद्भवणाऱ्या बुडबुड्याप्रमाणें आपल्या निश्चित मतीपासून उद्भवत असतात. पण त्या सर्वांची खाण मनच होय. अभ्यासामुळें कडू लिंबही कडू लागत नाहीं आणि ऊंस गोड लागत नाहीं. अभ्यासामुळेंच चद्रमडलात राहणाऱ्या प्राण्याना चंद्र शीतळ वाटत नाहीं आणि सूर्यमडळातील लोकास सूर्य उष्ण वाटत नाहीं. तात्पर्य ज्याचा परम अभ्यास झाला असेल तेंच सत्य व हितकर आहे, असें भासूं लागतें.

यास्तव राघवा, पुरुषांनीं अकृत्रिम आनंदाकरिता प्रयत्न करावा. मनाला आनंदमय करावें. म्हणजे तो मिळेल. दृश्याचे परिमार्जन करून आनंदाचें अनुसंधान करूं लागलें असता दृश्यापासून उद्भवणाऱ्या सुख-दुःखाचा अनुभव येत नाहीं. सुखदुःखें मनाला आकर्षण करूं शकत नाहींत. दृश्य अपवित्र, असद्रूप, मोह पाडणारें, भयकारण व बद्ध करणारें आहे. यास्तव त्याची भावना करूं नकोस. दृश्य हीच ईश्वराची माया व दृश्य हीच भयावह अविद्या आहे. संविद्नें दृश्यरूप होणें हेंच पूर्वोक्त क्रमानें उद्भवणारें बंधक कर्म होय. मन दृश्याच्या सौंदर्यामध्यें आसक्त झालें की, तें मोह पाडूं लागलें आहे, असें समज व तत्काळ त्या महामलिन चिखलाचा परिहार कर. ही जी स्वाभाविक दृश्यतन्मयता अनुभवास येते तेलाच ज्ञानी अविद्या-संज्ञक संसारमदिरा म्हणतात. आंधळ्याला जसा सूर्यप्रकाश लाधत नाहीं, त्याप्रमाणें तिच्या सेवनानें मत्त झालेल्या लोकांचें कल्याण होत नाहीं. संकल्पामुळें उद्भवणाऱ्या आकाशवृक्षाप्रमाणें ती

(संसारमदिरा) आपोआप उत्पन्न झाली आहे. केवळ संकल्पांचा त्याग केल्यानेंच ती क्षीण होत असते. श्रवण-मननरूप विचार व समाधीकरितां दृढ अभ्यास याच्या योगानें सर्व पदार्थांविषयींचा असग स्थिर होतो. सत्य दृष्टि प्राप्त होऊन असत्याचा क्षय झाला असता निर्विकल्प व निर्मल चिद्रूप आत्मा प्राप्त होतो. तो व्यक्त आहे की अव्यक्त आहे हें कळत नाहीं आणि सुखरूप आहे कीं दुःखमय आहे, याचा निर्णय होत नाहीं. तर त्याच्या अंत केवल केवलीभाव आहे, असा अनुभव येतो. अनर्थकारक देहाभिमानानें त्याची प्राप्ति होत नाहीं. यास्तव देह, इंद्रियें, मन, अनंत वासना इत्यादि सर्वांहून भिन्न असलेल्या पण रज्जुसर्पन्यायाने तद्रूप झालेल्या आत्म्याला पृथक्-रूपानें जाणून कल्पित बधापासून मुक्त करावें. अविद्यावेष्टित आत्म्याच्या कल्पनेनेच त्याला संसारित्व प्राप्त झालें आहे. यास्तव कल्पनात्याग केला म्हणजे परम पुरुषार्थरूप सुख अवशिष्ट राहतें. शून्य प्रदेशीं सिंह आहे किंवा भूत आहे, अशी कल्पना उठताच जसें हृदयासह शरीर थरथर कांपूं लागतें, त्याप्रमाणें शून्य शरीरात मी बद्ध आहें असें वाटतांच तो बद्ध व त्यामुळे भयभीत होतो. पण त्या शून्य प्रदेशीं सिंह किंवा पिशाच खरेंच आहे कीं काय म्हणून विचारपूर्वक पाहू लागल्यास त्याला जसें कांहीं दिसत नाहीं, त्याप्रमाणें संसारबध हा काय पदार्थ आहे म्हणून विचार करूं लागल्यास त्याचें कांहीं स्वरूप दिसत नाहीं. हें जगत् व हा मी हे दोन्ही भ्रम आहेत. कारण जगांतील कोणताही पदार्थ अथवा स्थिति स्थिर नाही. पदार्थ असता असतां नाहींसा होतो. आणि प्राण्याची बरी-वाईट स्थिति हा हा म्हणता बदलते. एका क्षणात रंकाचा राव व रावाचा रंक होतो. आलिंगन देणाऱ्या मातेच्या ठायीं पत्नीचा भाव ठेवल्यास ती सुरतानंदाच्या द्वारा पत्नीचें कार्य करू शकते, पण तेंच, आलिंगन देणाऱ्या भार्येलाही माता मानल्यास तिच्या स्पर्शानेंही चित्त विकारयुक्त होत नाहीं. अर्थात् जगांतील पदार्थ प्राण्यास भावाप्रमाणें फल देतात. चित्त जशी भावना करतें तसें त्याला फळ मिळतें. सृष्टींत सत्य नाहीं असेंही कांहीं नाहीं आणि असत्य नाहीं असेंही कांहीं नाहीं. तर ज्याच्या त्याच्या दृष्टीप्रमाणें सर्व सत्य व सर्व असत्य आहे. प्रत्येकाच्या निर्णयाप्रमाणें त्याला प्रत्येक वस्तु दिसते.

ास्तव, हे रामा, सर्व पदार्थरूप संकल्प सोडून तूं स्वाभाविक आत्मभावानें स्थित हो. अद्वय आनंदरूप हो. क्षणिक दुःखमय होऊं नकोस.

'गुरुराज, संकल्पांसह द्वैतभावांचा त्याग जरी केला आणि त्यांच्याविषयीं पुनः इच्छा जरी न केली तरी, आरशामध्यें प्रतिबिंब जसें त्याच्या इच्छे-विरुद्ध पडतें त्याप्रमाणें, ते भाव मजमध्यें व्यक्त होतात' म्हणून म्हणशील तर सांगतों–आरसा जड असल्यामुळें तो प्रतिबिंबाचें निवारण करूं शकत नाहीं. पण तू जड नाहींस. चेतन आहेस. चित्तामध्यें जगाचें प्रतिबिंब पडूं नये असें मनात आणल्यास तू त्याचें निवारण करण्यास समर्थ आहेस. चित्ताचा निरोध कर कीं, जगाचा गंधही तुझ्या अनुभवास येणार नाही. आणि कदाचित् चित्तनिरोध शिथिल झाल्यावर त्याचा अनुभव आल्यास तें मिथ्या आहे, असें अनुसधान करून तूं तद्रूप होऊं नकोस. अथवा त्याच्या अनुभवसमयींही चिदैक्याचें अनुसधान कर. जगातील पदार्थांस चित्ताचें आकर्षण करूं देऊ नकोस. त्याचें वारवार अनुसंधान करूं लागल्यास ते चित्ताला ओढून नेल्यावाचून राहणार नाहींत. आत्मानुसंधान सोडून चित्तानें त्याच्या ठिकाणीं अनुरक्त होणें यासारखी दुसरी कोणतीही हानि नाहीं २१.

**सर्ग २२**—ज्याचा बोध चांगला दृढ झाला आहे त्या चित्ताचे सर्व दोष क्षीण होतात; तें प्रसन्न होतें व त्याला सुशुद्ध आत्म्याचें दर्शन होतें.

**श्रीवसिष्ठ**--रामा, ज्यानें विचार केला आहे, ज्याचें वृत्तिज्ञान क्षीण झालें आहे, समाधीच्या अभ्यासानें ज्याने क्रमानें बाह्य व आंतर मनन सोडलें आहे, त्यामुळे ज्याचे मन विश्रांति घेत आहे, त्याज्य जगाचा त्याग करून जो ग्राह्य ज्ञानभूमिकाचा स्वीकार करीत आहे, सर्व दृश्य चिन्मात्र आहे असें जाणून जो भ्रामक चित्-हून निराळें कांहीं पाहत नाहीं, जो आत्मतत्त्वाविषयीं जागरूक राहून भयंकर संसार-मोहमार्गाविषयीं गाढ झोप घेत असतो (म्हणजे त्याला त्याचे भानही नसतें). भोगापर्यंतच रम्य वाटणारे स्वर्गादि-ब्रह्मलोकान्त सरस व ऐहिक अरस विषयाविषयीं जो अत्यंत विरक्त झाला आहे आणि त्यामुळेंच लोकसंग्रहार्थ केलेल्या कर्मांच्या फळांविषयीं व प्रारब्ध-प्राप्त भोगांविषयीं जो निराश झाला आहे, जो मिठाच्या खड्याप्रमाणें आत्मरूप जलाशीं तादात्म्य पावला असून, ज्याचे अनादि अज्ञानाकाश, हातांत ठेवलेल्या बर्फाच्या तुकड्याप्रमाणें, गळून गेलें आहे; तरंग व

मोठाल्या लाटा यांच्या योगानें क्षुब्ध झालेल्या नद्या वर्षाकाळ निघून गेल असता जशा क्षीण होतात, त्याप्रमाणें ज्याच्या तृष्णानद्या उत्तरोत्तर क्षीण होत जाऊन शेवटीं शांत झाल्या आहेत; उंदरानें तोडलेल्या पक्ष्यांच्य जाळ्याप्रमाणें ज्याचें संसारवासनाजाळ तुटलें आहे आणि वैराग्याच्या वेगानें ज्याची हृदयग्रंथी शिथिल झाली आहे, त्याचे मन, कतकबीजाच्या योगानें जल जसें प्रसन्न होतें त्याप्रमाणें अति प्रसन्न होतें. कामनारहित, विषय गुणानुसंधानशून्य, भार्यादि परिग्रहरहित आणि पुनः पुनः भोगलाभभूमीच त्याग करणारें मन, पिंजऱ्यांतून सुटलेल्या पक्ष्याप्रमाणें, मोहांतून पा निघून जाते. नतर संदेह-दौरात्म्य शात झालें असतां व कौतुकभ्रम न झाला असतां परिपूर्ण झालेलें चित्त, पूर्ण चंद्राप्रमाणें, शोभतें. वायु शांत झाला असता समुद्र जसा स्थ होतो, त्याप्रमाणें वासनाशून्य चित्तांत सुदर समता उत्पन्न होते. प्रसिद्ध सूर्योदयामुळें क्षीण होणाऱ्या रात्री प्रमाणें चित्सूर्योदयाच्या योगानें संसारवासना क्षीण होते. प्रातःकाळ प्रफुल्लित झालेल्या कमळिनीप्रमाणें चित्त निर्मल झालें असता हृदयंगा प्रज्ञा उत्पन्न होतात आणि पूर्ण चंद्राच्या किरणाप्रमाणें त्या सात्त्विक प्रज्ञा ( बुद्धी ) त्रिभुवनास आह्लाददायी होतात व उत्तरोत्तर वाढत जातात.

राघवा, तूं ज्ञानी आहेस. महा बुद्धिमान् आहेस. यास्तव तुला काहं फार सांगावयास नको. वायु, तेज इत्यादि चार भूतानीं रहित असलेल्य आकाशकोशाप्रमाणें सृष्टींतील काहींएक उत्पन्न होत नाहीं व नाश पावत नाहीं. ज्याला आत्मज्ञान झालेलें असतें त्याला उत्पत्ति, स्थिति, लय विविध अवतार इत्यादि प्रपंचांत पडून दुःखी होणाऱ्या ब्रह्मा-विष्णु इंद्र-शकर-इत्यादिकाचीही दया येते. ज्याचें चित्त निरहंकार आहे अश आत्मज्ञास पुनः कधीं विकल्प होत नाहींत. तरंगाप्रमाणें हे जीव आपल्याच चित्तवासनेमुळें सृष्टींत येतात व जातात, असा खरा प्रकार असल्यामुळें जन्म व मरण हे भाव अज्ञाप्रमाणें ज्ञानी पुरुषाला आसक्त करीत नाहींत. आत्म ज्ञाला देह भूषित झाला तरी व दूषित झाला तरी त्याविषयीं कांहीं वाटत नाहीं. विवेकानें वासना क्षीण होते, हें वर सांगितलेंच आहे. मी कोण? हें का आहे? याचा जोंवर विचार केला नाहीं तोंवर हें संसाराडंबर अंधकाराप्रमाणे असेंच राहणार. मिथ्या भ्रमामुळें उद्भवलेलें हें शरीर आपत्तींचें स्थान आहे असें जाणून व त्याच्यावरील आसक्ति सोडून आत्मभावानें जो त्याल

र्वथा विसरतो तोच खरा धार्मिक व तत्त्वज्ञ होय. देश-कालवशात् प्राप्त ालेलीं सुखदुःखें माझीं नव्हेत तीं शरीराचीं आहेत असें जो जाणतो ोच खरा ज्ञाता होय. ज्याचा अंत लागत नाहीं असें आकाश, काल व देश आणि त्यातील चलनादि क्रियायुक्त मर्यादित वस्तू मीच आहें से जो पाहतो तोच खरा डोळस होय. जो आपणाला सूक्ष्म व व्यापी ाणतो तोच ज्ञानी होय. स्वतःचा जीवात्मा व इतर सर्व दृश्य केवळ चेन्मात्रज्योति आहे असे जो नित्य अभिन्न दृष्टीनें पहातो तोच खरा ाहणारा आहे. सर्वशक्ति, अनतात्मा, व सर्व पदार्थांचा अंतर्यामी अशा पुरु-ास जो आपल्या हृदयात पाहतो, आधि-व्याधिभयानें उद्विग्न व जरा-रण-जन्मवान् देह मी नव्हे, असें जो मनात ओळखतो, माझा महिमा र्वत्र व्यापक आहे व माझ्यासारखा दुसरा कोणी नाहीं असे ज्याला ळलें, सूत्रातील मणिगणाप्रमाणें माझ्यामध्यें हें सर्व ओंवलेलें आहे, चित्त ो नव्हे, मी ब्रह्म आहें, त्रैलोक्य माझाच अवयव आहे, इत्यादि जो पाहतो ोच खरा ब्रह्मज्ञानी आहे. ज्याची ग्राह्य व त्याज्य भावना नष्ट झाली ाहे तोच पुरुष होय. सर्व अवस्थामध्यें जो एकरूप असतो व कोठेंही नुरक्त होत नाहीं तो महात्मा साक्षात् महेश्वर होय. या जगातील विचित्र रम्य वैभवामध्ये ज्याची वृत्ति सदा सम असते त्या परम बोधरूप ेवाला नमस्कार असो २२.

**सर्ग २३**—ज्ञानी शरीररूपी नगरात राज्य कसें करतो ? सद्भोगांच्या योगानें ाचा विनोद व मनोजयामुळे होणारा सुखानुभव.

**श्रीवसिष्ठ**—घट करून झाला तरी त्याकरिता वेग देऊन फिरविलेलें क्र वेग क्षीण होई तों जसे फिरत रहाते त्याप्रमाणें उत्तम पदाचा आश्रय रून प्रारब्धकर्मांचा क्षय होई तों जो देहधारण करितो व अवश्यप्राप्त यवहार करीत असूनही देह व व्यवहार यांतील एकालाही सत्य समजत ाहीं तो शरीररूपी नगरीचें राज्य करीत असला तरी लिप्त होत नाहीं. ा जीवन्मुक्ताच्या विनोदास कारण होणारी ही उपवनासारखी शरीर महापुरी ााला सुखच देते. दुःख कधींही देत नाहीं.

**श्रीराम**—मुनिराज, या तुच्छ शरीराला आपण नगरी कशी म्हणतां तिच्यामध्यें राहणारा योगी केवळ राज्यसुखालाच पात्र कसा होतो ?

**श्रीवसिष्ठ**—रामा, ज्ञानी पुरुषाला ही नगरी रम्य, सर्व गुणसंपन्न व अनेक विलासांनीं युक्त आहे असें वाटतें. आत्मजोतीरूपी सूर्याच्या प्रकाशानें ती सतत प्रकाशित झालेली असते. तिच्या नेत्ररूपी खिडक्यात ठेवलेल्या इंद्रियरूपी दोन प्रदीपाच्या योगानें दुसरीं भुवनें त्या नगरींत प्रकाशित होतात. दोन हात हेच तिच्यातील दोन मोठे मार्ग असून त्यांच्या द्वारा गुडघ्यापर्यंत येऊन पोंचल्यावर त्याच्यापुढें पादरूपी नगरीच्या जवळचें जंगल सुरू होतें. शरीरावरील रोमपंक्ती ह्याच त्यांतील लता व गुल्म होत, त्वचेंतील शिरा ह्याच त्यातील जाळ्या आहेत; माड्या हेच त्यातील स्तंभ, रेखा याच सीमा, उपस्थ हीच नदी, केस हींच वनें, सुंदर भुवया, ललाट, ओंठ यानीं युक्त असलेलें मनोहर मुख हेंच उद्यान, कटाक्षरूपी नील कमलांनीं भूषित झालेले गाल हींच त्यांतील मैदानें व वक्षःस्थल हेंच तिच्यांतील रम्य सरोवर असून त्यात स्तनरूपी कमळाचे कळे आले आहेत. खाल्लून ( तृणस्थानीय ) दाट केसांनीं अच्छादित झालेले खांदे हेच जिच्यातील क्रीडापर्वत आहेत, उदर हेंच जिच्यातील कोशागार असून त्यांत भरलेलीं प्रारब्ध प्राप्त अन्नें हींच जिच्यातील विविध धनें आहेत दीर्घ व ऊर्ध्व-मुखयुक्त असलेलें जे कठबिल त्यातून येणाऱ्या प्राणवायूचा जिच्यामध्यें शब्द होत आहे; हृदयरूपी बाजारात बसलेल्या विचाररूपी रत्नपारखी–पुरुषानीं परीक्षण करून घेतलेल्या व नेत्रादिकांच्या द्वारा आलेल्या विषयाच्या वासनारूपी मालानें जी भरलेली आहे; जिच्या नऊ दारातून प्राणापानादि वायुरूपी नागरिक जन एकसारखे जात-येत आहेत; मुखातील विरल दातांची रांग हीच जिच्या मुख्य द्वारावरील हस्तिदंती वेलबुट्टी आहे; मुखरूपी मंदिरात सर्वतः भ्रमण करणाऱ्या जिह्वारूपी कालीकडून ज्या नगरींत भक्ष्य-भोज्यादि चतुर्विध पदार्थांचा स्वाद घेतला जात असतो; रोम हेंच जिच्यातील नुकतेंच उगवलेलें गवत आहे, कानांचीं छिद्रें हेच जिच्यातील कूप ( आड, विहिरी ) आहेत; चित्त हीच ज्यातील उद्यानभूमि असून त्यांत आत्मचिंता ह्याच फिरणाऱ्या श्रेष्ठ स्त्रिया आहेत, ज्या शरीरनगरांत चपल इंद्रियें हींच माकडें बुद्धिरूपी दोरीनें बांधून ठेविलीं आहेत आणि वदनरूपी उद्यानांतील हास्यरूपी पुष्पांच्या योगानें जी मनोरम झाली आहे, अशी सर्व सौभाग्यसुंदरी नगरी तत्त्वज्ञाच्या सुखालाच कारण होते. तिच्यापासून त्याला दुःख कधींही होत नाहीं. त्या नगरीचा आश्रय करून

उपदेशादिकांच्या योगानें दुसऱ्याचेंही हित करता येतें. ही अज्ञांच्या अनंत दुःखांच्या परंपरेला जरी कारण होत असली तरी ज्ञान्यांच्या अनंत सुखांचें भांडारच होते. कारण ही नष्ट झाली तर ज्ञानी पुरुषाला एक तुच्छ वस्तु गेली असें वाटून क्लेश होत नाहींत. पण ती असली तर त्याला तिच्या द्वारा सर्व भोग-मोक्षसुख मिळतें. देह हा ज्ञान्याचा रथ आहे असें म्हणतात. कारण तो त्यात बसून सर्व भोग व मोक्ष याकरिता ससारात यथेच्छ फिरतो. शब्द, स्पर्श रूप, रस, गंध, बाधव, संपत्ति इत्यादि सर्व या शरीरनगरीच्या योगानेंच मिळत असते. म्हणून ती ज्ञान्यास लाभदायिनी वाटते. ही सुख, दुःख, क्रिया इत्यादिकाचा भार वहात असते; म्हणून सर्वज्ञाला आवडते.

असो; अशा प्रकारच्या शरीरनगरींत राज्य करणाऱ्या ज्ञान्याला पीडा न होता तो अमरावतींतील इंद्राप्रमाणें त्यात सुखानें राहतो. तो आपल्या मनोरूपी मत्त घोड्याला—कामाचा विषय—अशा योनिरूपी खड्ड्यात पाडीत नाहीं. तो लोभरूपी विषवृक्ष घेऊन आपली प्रज्ञाकन्या देऊन टाकीत नाहीं. अज्ञानरूपी परराष्ट्राला त्याचें लहानसेंही छिद्र दिसत नाहीं. तो ससारशत्रूची भीति समूळ नाहींशी करून टाकतो. काम व भोग हेच ज्यामध्यें मोठे थोरले मकर आहेत अशा तृष्णारूपी नदीच्या दुःखदायी भोंवऱ्यात तो बहिर्मुख होऊन पडत नाहीं. तो अतर्बहिः परमात्म्यालाच पहात असल्यामुळें मानस ब्रह्माकार वृत्तीचा आधार घेऊन सतत आधिभौतिक व आध्यात्मिक नदीसंगम-तीर्थावर स्नान करितो. विषयसुखापासून पराङ्मुख झालेला तो सर्व इंद्रियरूपी लोकांच्या दृष्टीं न पडणाऱ्या ध्याननामक अतःपुरात सुखानें रहातो. म्हणूनच ही नगरी ज्ञानी पुरुषाला सुखावह होते. अहो, जी नगरी असली तर सर्व आहे व जी नष्ट झाली तर कांहींएक नष्ट झाले नाही ती सुखावह कशी नव्हे! घागर फुटली असतां त्यांतील आकाशाला ज्यानें आपल्या स्वरूपांत घेतलें आहे अशा आकाशाची कोणती हानि होणार! स्थितिकालींही ज्ञान्याला ज्याचा स्पर्श होत नाहीं त्याचा नाश झाल्यावर स्पर्श कसा होणार! या शरीरनगरांत राहून ज्ञानी प्रारब्ध प्राप्त कल्पित भोगाचा स्वाद घेतो व पूर्ण ब्रह्माचाही साक्षात् अनुभव घेतो. व्यवहारदृष्टया सर्व करीत असला तरी पारमार्थिक दृष्टया कांहीं न करणारा ज्ञानी कदाचित् सर्व कर्तव्य व्यवहार करतो. ज्याची गति कोठेंही कुंठित होत नाहीं अशा सुंदर, निर्मल व चंचल

श्रीवसिष्ठ—रामा, ज्ञानी पुरुषाला ही नगरी रम्य, सर्व गुणसंपन्न व अनेक विलासांनीं युक्त आहे असें वाटतें. आत्मजोतीरूपी सूर्याच्या प्रकाशानें ती सतत प्रकाशित झालेली असते. तिच्या नेत्ररूपी खिडक्यात ठेवलेल्या इंद्रियरूपी दोन प्रदीपांच्या योगानें दुसरीं भुवनें त्या नगरींत प्रकाशित होतात. दोन हात हेच तिच्यातील दोन मोठे मार्ग असून त्याच्या द्वारा गुडघ्यापर्यंत येऊन पोंचल्यावर त्याच्यापुढें पादरूपी नगरीच्या जवळचें जंगल सुरू होतें. शरीरावरील रोमपक्ती ह्याच त्यांतील लता व गुल्म होत, त्वचेंतील शिरा ह्याच त्यातील जाळ्या आहेत; मांड्या हेच त्यातील स्तभ, रेखा याच सीमा, उपस्थ हीच नदी, कस हींच वनें, मुदर भुवया, ललाट, ओंठ यांनीं युक्त असलेलें मनोहर मुख हेच उद्यान, कटाक्षरूपी नील कमलांनीं भूषित झालेले गाल हींच त्यातील मैदाने व वक्षःस्थल हेंच तिच्यांतील रम्य सरोवर असून त्यात स्तनरूपी कमळाचे कळे आले आहेत. खालून ( तृणस्थानीय ) दाट केसांनीं अच्छादित झालेले खांदे हेच जिच्यातील क्रीडापर्वत आहेत, उदर हेंच जिच्यातील कोशागार असून त्यांत भरलेलीं प्रारब्ध प्राप्त अन्नें हीच जिच्यातील विविध धनें आहेत दीर्घ व ऊर्ध्व-मुखयुक्त असलेलें जे कठबिल त्यातून येणाऱ्या प्राणवायूचा जिच्यामध्यें शब्द होत आहे; हृदयरूपी बाजारात बसलेल्या विचाररूपी रत्नपारखी–पुरुषानीं परीक्षण करून घेतलेल्या व नेत्रादिकाच्या द्वारा आलेल्या विषयाच्या वासनारूपी मालाने जी भरलेली आहे, जिच्या नऊ दारातून प्राणापानादि वायुरूपी नागरिक जन एकसारखे जात-येत आहेत; मुखातील विरल दाताची राग हीच जिच्या मुख्य द्वारावरील हस्तिदती वेलबुट्टी आहे, मुखरूपी मंदिरात सर्वतः भ्रमण करणाऱ्या जिह्वारूपी कालीकडून ज्या नगरींत भक्ष्य-भोज्यादि चतुर्विध पदार्थाचा स्वाद घेतला जात असतो; रोम हेंच जिच्यातील नुक्तेंच उगवलेलें गवत आहे, कानांचीं छिद्रें हेच जिच्यातील कूप ( आड, विहिरी ) आहेत; चित्त हीच ज्यातील उद्यानभूमि असून त्यात आत्मचिंता ह्याच फिरणाऱ्या श्रेष्ठ स्त्रिया आहेत, ज्या शरीरनगरात चपल इंद्रियें हींच माकडें बुद्धिरूपी दोरीनें बाधून ठेविलीं आहेत आणि वदनरूपी उद्यानातील हास्यरूपी पुष्पांच्या योगानें जी मनोरम झाली आहे, अशी सर्व सौभाग्यसुंदरी नगरी तत्त्वज्ञाच्या सुखालाच कारण होते. तिच्यापासून त्याला दुःख कधींही होत नाहीं. त्या नगरीचा आश्रय करून

उपदेशादिकांच्या योगाने दुसऱ्याचेंही हित करतां येतें. ही अज्ञांच्या अनंत दुःखाच्या परंपरेला जरी कारण होत असली तरी ज्ञान्यांच्या अनंत सुखांचें भाडारच होते. कारण ही नष्ट झाली तर ज्ञानी पुरुषाला एक तुच्छ वस्तु गेली असें वाटून क्लेश होत नाहींत. पण ती असली तर त्याला तिच्या द्वारा सर्व भोग-मोक्षसुख मिळतें. देह हा ज्ञान्याचा रथ आहे असें म्हणतात. कारण तो त्यात बसून सर्व भोग व मोक्ष याकरिता ससारात यथेच्छ फिरतो. शब्द, स्पर्श रूप, रस, गंध, बाधव, संपत्ति इत्यादि सर्व या शरीरनगरीच्या योगानेंच मिळत असते. म्हणून ती ज्ञान्यास लाभदायिनी वाटते. ही सुख, दुःख, क्रिया इत्यादिकाचा भार वहात असते; म्हणून सर्वज्ञाला आवडते.

असो; अशा प्रकारच्या शरीरनगरींत राज्य करणाऱ्या ज्ञान्याला पीडा न होता तो अमरावतींतील इंद्राप्रमाणे त्यात सुखानें राहतो. तो आपल्या मनोरूपी मत्त घोड्याला–कामाचा विषय–अशा योनिरूपी खड्डयात पाडीत नाहीं. तो लोभरूपी विषवृक्ष घेऊन आपली प्रज्ञाकन्या देऊन टाकीत नाहीं. अज्ञानरूपी परराष्ट्राला त्याचे लहानसेंही छिद्र दिसत नाहीं. तो ससारशत्रूची भीति समूळ नाहींशी करून टाकतो. काम व भोग हेच ज्यामध्ये मोठे थोरले मकर आहेत अशा तृष्णारूपी नदीच्या दुःखदायी भोंवऱ्यात तो बहिर्मुख होऊन पडत नाहीं. तो अंतर्बहिः परमात्म्यालाच पहात असल्यामुळे मानस ब्रह्माकार वृत्तीचा आधार घेऊन सतत आधिभौतिक व आध्यात्मिक नदीसंगम-तीर्थावर स्नान करितो. विषयसुखापासून पराङ्मुख झालेला तो सर्व इद्रियरूपी लोकांच्या दृष्टीं न पडणाऱ्या ध्याननामक अतःपुरात सुखानें रहातो. म्हणूनच ही नगरी ज्ञानी पुरुषाला सुखावह होते. अहो, जी नगरी असली तर सर्व आहे व जी नष्ट झाली तर काहींएक नष्ट झाले नाहीं ती सुखावह कशी नव्हे? घागर फुटली असता त्यांतील आकाशाला ज्यानें आपल्या स्वरूपांत घेतलें आहे अशा आकाशाची कोणती हानि होणार? स्थितिकालींही ज्ञान्याला ज्याचा स्पर्श होत नाहीं त्याचा नाश झाल्यावर स्पर्श कसा होणार? या शरीरनगरात राहून ज्ञानी प्रारब्ध प्राप्त कल्पित भोगाचा स्वाद घेतो व पूर्ण ब्रह्माचाही साक्षात् अनुभव घेतो. व्यवहारदृष्टया सर्व करीत असला तरी पारमार्थिक दृष्टया कांहीं न करणारा ज्ञानी कदाचित् सर्व कर्तव्य व्यवहार करतो. ज्याची गति कोठेंही कुंठित होत नाहीं अशा सुंदर, निर्मल व चंचल

मनोरूपी विमानांत बसून हा विहार करितो. हृदयाख्य अंतःपुरांत त्रिभुवन सुंदरी व शीतलांगी अशा मन्त्रीनामक प्रिय भार्येशीं तो सदा रममाण होतो. चंद्राच्या बाजूस रहाणाऱ्या दोन विशाखांप्रमाणें त्याच्या दोन्ही बाजूंस सत्यता व एकता या दोन भार्या सतत उभ्या असतात. आकाशांतील सूर्याप्रमाणें संसाररूपी अरण्यांतून फार दूर गेलेला तो तत्त्वज्ञ दुःखरूपी करवतींनीं कापून पाडलेल्या पण शाखांच्या द्वारा एक-मेकांस कवटाळून राहिलेल्या संसार–जंगलातील प्राणिवृक्षांस पाहतो. ज्याच्या सर्व आशा पूर्ण झाल्या आहेत व जो सर्वात्म-भाव-संपत्तीनें सुंदर झाला आहे असा तो, पुनः क्षीण न होणाऱ्या चंद्राप्रमाणें विराजमान होतो. तो भोगसमूहाचें सेवन करीत असला तरी शंकरानें प्यालेल्या कालकूटाप्रमाणें ते त्याला दुःख देत नाहींत. तर एकप्रकारचें भूषण होऊन रहातात. कारण चोराला ओळखून त्याच्याशीं मैत्री केली असतां तो जसा कांहीं हानि करूं शकत नाहीं ( कारण मैत्री करणारा त्याच्या-विषयीं नेहमीं सावध असतो ) त्याप्रमाणें भोगाचें खरें स्वरूप ओळखून त्याचा उपभोग घेतला असतां तो क्षणिक संतोषालाच कारण होतो. कारण नाटकगृहांत नाटक पहावयास आलेल्या व नाटक संपतांच भराभर उठून इष्टस्थानीं निघून जाणाऱ्या स्त्री-पुरुषाप्रमाणें तो संसारांत एकत्र जमलेल्या लोकांना लेखितो व त्यामुळें त्याला त्याच्या संयोगापासून हर्ष–विषाद होत नाहीं. प्रवाशी लोक मार्गामध्यें दिसणाऱ्या वस्तूकडे जसे अनासक्तीनें पहातात त्याप्रमाणें ज्ञानी सर्व व्यवहारास पहातो. नेत्र पर्वत, वनें, सरोवरें, कमळें, वेली इत्यादि पदार्थांच्या चांगल्या व वाईट अशा दोन्ही स्थितींत जसे त्यास एकसारख्याच वृत्तीनें पहातात त्याप्रमाणें विद्वा-नाची बुद्धि पुत्र-मित्रादि व व्यवहार कार्यें यांमध्यें एकाच भावनेनें प्रवृत्त होते. इंद्रियाना अनायासानें प्राप्त झालेल्या विषयांपासून हटवीत नाहीं व अप्राप्त विषयांच्या मागें मुद्दाम लावीत नाहींत. पिसाचा आघात पर्व-ताला जसा कंपायमान करीत नाहीं त्याप्रमाणें अप्राप्त विषयाची चिंता व प्राप्त विषयाची उपेक्षा त्याला कंपित करीत नाहींत. त्याचे सर्व संदेह नाहींसे झालेले असतात. सर्व जिज्ञासा गळून गेलेली असते. त्याचे सूक्ष्म व स्थूल असे दोन्ही कल्पित देह क्षीण झालेले अस-तात व त्यामुळें तो ज्ञानी आपल्या शरीररूपी सुंदर राजधानींत

एकाद्या सार्वभौम राजाप्रमाणें विराजमान होतो. भोगांच्या इच्छांमुळें कृपण व दीन झालेल्या प्राण्यांस व इंद्रियांस तो शांत व सावधान चित्त पुरुष वेड्यांप्रमाणें हंसतो. रामा, आंतील स्वात्मसुख सोडून बाहेरचें विषयसुख घेण्याकरितां धावणाऱ्या मनाला परतवावें. भोगाकडे नेणाऱ्या मनोवृत्तीला विषाच्या अंकुराप्रमाणें आधीं खुडून टाकावें. अगोदर लाथ मारून मागून पायां पडलें ह्मणजे मूर्खाला आपला मोठा सन्मान केला असें वाटत असतें. सूर्याच्या प्रखर उन्हाने करपून गेलेल्या शाळीच्या शेताला कुवृष्टीही ( थोडासा पाऊसही ) अमृतासारखी वाटते. पण जो आर्त झालेला नाहीं त्याचा केवढाही जरी सन्मान केला तरी तो त्याला बहुमान वाटत नसतो. सिंधू, गंगा इत्यादि नेहमींच तुडुंब भरून रहाणाऱ्या नद्याना पावसाच्या लहानशा पुराचें थोडेच कौतुक वाटणार आहे ! त्याप्रमाणे संपन्न स्थितींत असलेला प्राकृत अधिकाधिक संपत्तीची इच्छा करीत सुटतो. समुद्र जगास बुडवून सोडण्यास योग्य असलेलें जलही आपल्या दुष्पूर जठरात सांठवितो, हें प्रसिद्धच आहे. पण तेंच, ज्या मनाचा चागला निग्रह करून नंतर त्याला थोडासा भोग घेण्यास मोकळें सोडलें आहे त्याला फार मोठा आनंद वाटतो. बधमुक्त केलेल्या राजाला एकादा गाव दिला तरी फार फार मोठा लाभ झाला, असें वाटतें. पण ज्याच्यावर शत्रूनें आक्रमण केलेलें नाहीं त्याला सार्वभौम राज्यही पुरेसें होत नाहीं. रामा, हातावर हात चोळून, दांत आवळून धरून व अगाने अगाचें नियमन करून इंद्रिय-शत्रूंना जिकावें. दुसऱ्यास जिकण्याचा उत्साह धरणाऱ्या सुज्ञ पुरुषांनीं प्रथम इंद्रियसंज्ञक हृदय-शत्रूंस जिकावें. स्वचित्तानें ज्याना जिकलेलें नाहीं तेच या भूलोकीं सुभग, साधु व खरे पुरुष होत. राघवा, हृदयरूपी बिळामध्यें वेटोळे करून व गर्वपरवश होऊन रहाणाऱ्या मनो-भुजंगाला ज्यांनीं निर्जीव करून सोडले आहे ते धन्य होत. त्या महापुरुषांस मी वंदन करितों २१.

**सर्ग २४**—इंद्रियाचें प्राबल्य, त्यांस जिकण्याचा उपाय व त्यांच्या पराभवामुळें होणारा प्रसाद. बोध व त्याच्या योगानें होणारा वासनाक्षय.

**श्रीवसिष्ठ**—राघवा, महानरकाच्या साम्राज्यावर ज्यास अभिषेक केला आहे असे हे इंद्रिय-शत्रू दुर्जय आहेत. दुष्कृत्यें हेच त्यांचे मत्त गज व आशा हेच त्यांचे तीक्ष्ण बाण आहेत. ते कृतघ्न आपल्या देहरूपी आश्र-

याचाच प्रथम नाश करून सोडतात. कुकर्म हाच त्यांचा मोठा थोरला कोश ( खजीना ) आहे. शरीररूपी घरट्यांत येतांच विषयरूपी मांसाची इच्छा करणारे व कार्य आणि अकार्य हेच ज्यांचे दोन पंख आहेत असे इंद्रिय-गृध्र एकसारखी धडपड करीत असतात. पण विवेकरूपी तंतूंच्या जाळ्यामध्यें ज्याने त्या शठांस अडकविलें आहे त्यांच्या शांत्यादिकांचा भग ते करूं शकत नाहींत. जो विवेक-धनवान् पुरुष सकृद्दर्शनीं रमणीय वाटणाऱ्या विषयामध्यें या निंद्य शरीरनगरात राहूनच, रममाण होतो त्याला अतःस्थ इंद्रिय-शत्रू पराभूत करूं शकत नाहींत. ज्यांनीं आपल्या चित्ताला स्वाधीन ठेवलें आहे अशा स्वशरीरपुरींत वास्तव्य करणाऱ्या पुरुषाप्रमाणें मातीच्या फार मोठ्या नगरांत रहाणारे राजेही सुखी नसतात. ज्यानें इंद्रियशत्रूंस कैद करून सोडलें आहे व चित्ताचा दर्प घालविला आहे त्याच्या शुद्ध बुद्धी वसंत ऋतूतील मंजिऱ्यांप्रमाणें वाढतात व भोगवासना हेमत-ऋतूतील कमलिनीप्रमाणें क्षीण होतात. एका तत्त्वाचा दृढ अभ्यास करून मनाला जिंकले नाहीं तोंवरच वासना हृदयात नाचत असतात. विवेकी पुरुषाचें मन इष्ट कार्य करीत असल्यामुळें भृत्यासारखें, सत्कार्य केल्यामुळें मंत्र्यासारखें व इंद्रियाचे आक्रमण केल्यामुळें सामंत राजासारखें असते. विद्वानाला सुख देत असल्यामुळें मन हीच त्याची प्रिय भार्या, पालन करीत असल्यामुळे तेंच त्याचा पवित्र पिता, व मोठ्या विश्वासास पात्र असल्यामुळें तेंच त्याचा उत्तम मित्र होय. शास्त्र व अनुभव याच्या द्वारा हा मनःपिता आपलाही नाश करून घेऊन ज्ञानी पुत्राला परम सिद्धि देतो. उपदेश, चागले संस्कार व सद्गुण याच्या योगानें हा मनोमणि हृदयात फार शोभतो. हा उत्तम मनोमंत्री, जन्मवृक्षांस तोडणाऱ्या जणुं काय कुऱ्हाडीच, अशीं कर्मे करावयास लावितो.

रामा, रागादि चिखलानें भरलेल्या या मनो-मण्याला विवेकजलानें धुवून त्याच्या प्रकाशाचा अनुभव घे. या भयकर संसारभूमीमध्यें तूं विवेकशून्य राहून प्राकृतांसारखा परतंत्र होऊं नकोस. या महामोहाकडे दुर्लक्ष्य करूं नकोस. सर्वोत्तम विवेकाचा आश्रय करून, सत्याची पारख करून, इंद्रियशत्रूंस पूर्णपणें जिंकून या भवसागरांतून पार हो. तात्त्विकदृष्ट्या शरीर, सुख, दुःख इत्यादि सर्व जरी मिथ्या असलें तरी मोहदृष्ट्या त्याचा साक्षात् अनुभव येत असल्याकारणानें त्यांच्याकडे दुर्लक्ष्य केल्यास दाम-व्याल-कट-

न्यायानें मोठा अनर्थ ओढवेल व विवेकादिकांच्या दृढ अभ्यासानें त्याची चिकित्सा केल्यास भीम-भास-दृढ-न्यायानें अनर्थाची निवृत्ति होईल. 'हा मी' असा जो देहादिकांच्या ठायीं मिथ्या भ्रम झाला आहे त्याचें विवेकबुद्धीनें निरसन करून देहादिकांच्या अगदीं आंत व त्याहून विलक्षण असलेल्या चित्पदाचा आश्रय करून व त्यामुळेंच मनोहरहित होऊन तूं खुशाल खा, पी, जा, ये, बैस, नीज व आणखींही काय पाहिजे तें कर. त्या मनः संकल्पशून्य विरल व्यवहारामुळें तूं बद्ध होणार नाहींस २४.

**सर्ग २५**—शंबराच्या सेनापतींना देवांनीं वारंवार मारलें म्हणून त्यानें दामादि आणखीं तीन राक्षसांना उत्पन्न केलें व तो जयाची आशा करूं लागला.

**श्रीराम**—भगवन, आपण वर दोन न्याय सुचविले आहेत. पण त्याचा अर्थ मला ठाऊक नाहीं. यास्तव कृपा करून त्याचे सविस्तर वर्णन करा.

**श्रीवसिष्ठ**—रामा, बरें आहे. तुझ्या इच्छेप्रमाणे मी दाम-व्याल-कट-न्याय व भीम-भास-दृढस्थिति तुला सांगतों. त्याचें चांगलें श्रवण करून त्यातील वाटेल त्याचा तूं स्वीकार कर. सर्व आश्चर्यांनीं मनोरम झालेल्या पाताळकुहरात शंबर या नावाचा एक मोठा राक्षस होता त्यानें आकाश-नगरोद्यानात असुराचीं मंदिरें रचलीं होतीं; कृत्रिम उत्तम चंद्र-सूर्यांच्या योगानें आपले पाताळमंडळ भूषित केलें होतें; पद्मादि मणी त्यानें तेथे खड्यासारखे सुलभ करून सोडले होते. गृहातील रत्नभूत स्त्रियांच्या गायनांनीं त्यानें देववधूंच्या ध्वनींस तुच्छ करून सोडलें होतें. साराश असख्य मायिक वस्तूंच्या योगानें त्यानें आपल्या लोकास संपन्न केलें होतें. त्रैलोक्यातील सर्व ऐश्वर्य त्यानें आपल्या अंतःपुरात साठविलें होते. तो सर्व ऐश्वर्यसंपन्न, सर्व संपत्तिसुभग व सर्व आश्चर्यमय होता. सर्व दैत्य सामंत त्याचें उग्र शासन (आज्ञा) शिरसा मान्य करीत असत. सर्व असुरमंडल त्याच्या महा भुजरूपी वनाच्या छायेंत स्वस्थ विश्रांति घेत पडले होते. सर्व देवाचा नाश करणाऱ्या व प्रसंग पडल्यास आकाशातूनही गमन करणाऱ्या त्याच्यापाशीं पुष्कळ सैन्य होतें. त्यांत सर्व वीर राक्षसाचाच भरणा केलेला असल्यामुळें तें देवांचा नाश करण्यास समर्थ होतें.

पण तो मायावी राक्षस निजला असला अथवा देशांतरीं गेला असतां देव वेगानें येऊन त्याच्या सैन्यास मारीत. म्हणून शंबर दैत्यानें मुंडी, क्रोध, द्रुम इत्यादि सामंत-दैत्यांस आपल्या सैन्याचें रक्षण करावयास ठेवलें. पण

आकाशात श्येनपक्षी कपोतांना जसे मारितात त्याप्रमाणें अनुकूल अवसर पाहून भयानक देवांनीं त्यांना मारिलें. ह्मणून सागर जसा मोठाल्या तरंगांस उत्पन्न करतो त्याप्रमाणें त्या श्रेष्ठ असुरानें चपळ व भयकर ध्वनी करणाऱ्या दुसऱ्या राक्षसांस उत्पन्न करून सेनारक्षक केलें. पण देवांनी त्यांनाही लवकरच मारलें. त्यामुळें अतिशय रागावलेला शबर देवांस मारण्याकरतां स्वर्गलोकीं गेला. पण इतक्यात त्याच्या मायेस भ्यालेले देव मेरुपर्वताच्या गुहादि गुप्त प्रदेशीं जाऊन लपून राहिले. त्यामुळें कल्पाच्या शेवटीं क्षीण झालेल्या जगाप्रमाणें शून्य स्वर्ग त्याला दिसला. तेथें आक्रोश करणारे क्षुद्र देवगण व अश्रूंनीं ज्यांचीं मुखकमलें भिजलीं आहेत अशा अप्सरा मात्र होत्या. तेथ त्यानें पुष्कळ शोध केला. पण त्याला मुख्य मुख्य देव कोठेंच आढळले नाहींत. म्हणून तेथें जेवढें ह्मणून कांहीं सुदर होते तें सर्व घेऊन व लोकपालाची नगरी जाळून तो आपल्या लोकीं परत आला.

याप्रमाणें देव व दानव याचा द्वेष अगदीं दृढ झाला. देव स्वर्ग सोडून दश दिशामध्यें गेले. पण शंबर जे जे सेनापती निर्माण करीत असे त्याना त्याना मात्र ते प्रयत्नानें मारीत. त्यामुळें शबराचा कोप अतिशय भडकला. देवाना आतां खावूं कीं गिळूं असें त्यास झालें. पण पाप्याला दीर्घ प्रयत्न करूनही जसें निधान सापडत नाहीं त्याप्रमाणें त्याला देव कोठेंच सापडेनात. ह्मणून त्यानें पुनः जणुं काय साक्षात् यममूर्तीच, असे तीन घोर राक्षस निर्माण केले. शंबराच्या मायेपासून झालेले ते जणु काय तीन भयकर पर्वतच होते. त्यांतील एक शत्रूचें दमन करणारा, दुसरा शत्रूस सर्पाप्रमाणें वेढणारा व तिसरा आपल्या वीराना चटईप्रमाणें झाकून त्यांचें शत्रूच्या अस्त्रांपासून रक्षण करणारा होता. म्हणून क्रमानें दाम, व्याळ व कट अशीं त्यांचीं नावें शंबरानें ठेविलीं. ते तिघेही प्राप्त होईल तें करणारे व चेतनामात्र धर्मवान् होते. म्हणजे इतरांपेक्षां यांच्यामध्यें हा विशेष होता. त्यांचा हा अगदीं पहिलाच जन्म असल्यामुळें त्यांचीं पूर्व धर्माधर्म कर्में नव्हतीं व प्राक्तन वासनाही नव्हत्या. ते भय, शंका, पळून जाणें इत्यादि विकल्पशून्य व चैतन्याच्या सांनिध्यामुळें देहाचें स्फुरण होणें या एकाच धर्मानें युक्त होते. पण यावर तूं–काम-कर्मवासना नसतांना त्याना जन्म कां घ्यावा लागला? कामादि बीजाच्या अभावींही जन्म होतो म्हणून

म्हणावें तर मुक्तांनाही पुनः जन्म प्राप्त होण्याचा संभव आहे, असें होईल.– असें ह्मणशील म्हणून सांगतों–ते स्वतंत्र जीव नव्हते. तर कर्मजीव जो शंबर त्याच्या कौशलरूप, कर्म–वासनादिकांनीं पुष्ट न झालेल्या मायामयी व असार संकल्पवृत्तीचा आधार घेऊन, ते उदय पावले होते. सिद्धिमान् योगी पुरुषाच्या देहभेदाप्रमाणेंच शंबराचे ते तीन देह होते. ते अंधपरंपरेनें वासनेवाचूनच प्राप्त क्रिया करीत असत. अर्धवट निजलेल्या बालकांची अंगचेष्टा ( अवयवाची हालचाल ) वासना व अभिमान या दोन निमित्तांवाचून जशी होते त्याप्रमाणें त्यांची चेष्टा होत असे. युद्धसमयीं शत्रु पुढून येत आहेत; विश्रांति घेत असतांना ते अकस्मात् येऊन हल्ला करितात व अशा वेळीं पलायन करून आपलें रक्षण करावें इत्यादि देहाभिमानप्रयुक्त गोष्टी त्यांना ठाऊक नव्हत्या. फार काय पण जीवित, मरण, रण, जय, अजय यांचीही त्यांना कांहीं कल्पना नव्हती. केवळ समोर जे सैनिक असतील त्याच्या अंगावर जाऊन त्यांस मारावें एवढेंच ते जाणत होते. ते तिघेही इतके बळकट होते कीं, एकेका तळ हाताच्या प्रहारानें मोठमोठ्या पर्वताचीही धूळ उडवीत असत.

असो; अशाप्रकारच्या त्या घोर मायाराक्षसांस पाहून शंबराच्या मनाला मोठा संतोष वाटला. या अति मत्त व ज्यांना देहाचेंही भान नाहीं अशा माया–असुराकडून रक्षण केली जाणारी माझी सेना आतां खचित विजयी होईल व ती देवाशीं लढताना कधींही क्षीण होणार नाहीं, अशी त्याला मोठी आशा वाटली २९.

**सर्ग २६–देव व दानव यांचा भयंकर संग्राम.**

**श्रीवसिष्ठ**—रामभद्रा, आशाच प्राण्याला प्रवृत्तीमध्यें पाडीत असते. शंबराला वर सांगितल्याप्रमाणें आशा वाटली असता त्यानें त्या तीन राक्षसांबरोबर आपली मोठी सेना, देवांचा नाश करण्याकरितां भूलोकीं पाठविली. सशस्त्र दैत्य सागर, दऱ्या, खोरीं, गुहा, झाडें, झुडपें, भुईंतील खळगे इत्यादिकांमध्यें शिरून देवास शोधूं लागले. त्यांनीं द्यावा-पृथ्वीस एक करून सोडलें. त्यांच्या प्रभावानें सूर्यही दिपून गेला. त्यांच्या हालचालीनें पृथ्वींतील प्रत्येक भूत व्याकुळ झालें. सर्वत्र हाहाकार उडाला व त्यामुळें देवांना त्यांच्या पुढें येणें भाग पडलें.

सर्व स्वर्गवासी एकाएकीं राक्षसांच्या समोर येऊन उभे राहिले व तत्काल देवासुराच्या घोर कदनास आरंभ झाला. त्यांत असंख्य वीराचीं कुंडलादिकानीं सुशोभित झालेलीं मस्तकें भराभर तुटून पडूं लागलीं. रक्ताचे पाट वाहिले. वीरांचीं छिन्न भिन्न शरीरें रक्तानें मांखलीं. शास्त्रांचा खणखणाट एकसारखा चालला होता. दोन्ही पक्ष सबळ असल्यामुळें त्याच्या घोर कलहांत इतर दुर्बळाचा विनाकारण क्षय होऊं लागला. दोन्ही सैन्यांतील मत्त वीरानीं एकमेकास भूमीवर लोळविण्याचा सपाटा चालविला होता. पृथ्वींतील अनेक संपन्न राष्ट्रें, नगरें, ग्राम, अरण्यें, नद्या, पर्वत इत्यादिकाचा विध्वस झाला. प्रत्येक मानव आकाशाकडे तोंड करून व हात जोडून 'त्राहि भगवन्' असें दीनवाणीनें ह्मणत लोककर्त्याची प्रार्थना करूं लागला. त्या देवासुरसंग्रामात अनेक रणवाद्याचे विविध ध्वनी प्राणिमात्रास भयभीत करीत होते सर्वत्र 'हाय, हाय' हा दुःखद्योतक शब्द ऐकूं येऊ लागला. याप्रमाणें तें घोर युद्ध फार वेळ झालें. देवानीं भयंकर दैत्याशीं लढताना मोठेंच धैर्य दाखविलें. पुष्कळ शत्रूना मारून पाडलें. पण शेवटीं दाम, व्याल व कट याच्या प्रभावापुढे त्याना हात टेंकावे लागले. त्याना प्रतिकूल चिह्नें स्पष्ट दिसूं लागलीं. आणि त्यामुळें इंद्रादि सर्व देव निरुत्साह झाले २६.

**सर्ग २७**—पराभूत झालेले देव ब्रह्मदेवाकडे गेले व वासनावृद्धि हाच दामादिकाच्या नाशाचा उपाय आहे असें त्यानें त्यास सांगितलें.

**श्रीवसिष्ठ**—राघवा, रक्तमय झालेल्या रणागणांत दामानें देवाचे दमन केलें, व्यालानें देवलोकाचा चूर केला व कटानें सर्व देवाना रणात शक्तिशून्य करून सोडलें. तेव्हा बांध फुटला असता जळ जसें वेगाने धावूं लागत त्याप्रमाणें ते सर्व आपलीं क्षत शरीरें घेऊन पळाले. दामादि दैत्य त्याच्या मागें लागले. पण गुप्त झालेले देव त्याना दिसले नाहींत. पुष्कळ वेळ शोधून थकल्यावर दामादि घोर वीर पाताळांत गेले व आनदानें झालेला वृत्तांत प्रभूस सांगूं लागले. देवाचा झालेला नाश व पराभव ऐकून शबराला हर्ष वाटला.

इकडे पराभव पावलेले देवही कांहीं वेळ विश्रांति घेऊन जयाचा उपाय विचारण्याकरितां अमिततेजस्वी ब्रह्मदेवाकडे गेले. त्या कमलासनस्थ प्रभूला विनयानें प्रणाम करून देवानीं शंबरानें आणलेला प्रसंग व

दाम-व्याल-कटांचा पराक्रम सांगितला. त्याचें म्हणणें ऐकून चतुरानन त्यांस असें समाधानाचें वचन बोलला—

देवांनो, शंबराची आयुर्मर्यादा अद्यापि क्षीण झालेली नाहीं ती क्षीण होई तों तुह्मी धीर धरा. त्याचा काल समीप आला ह्मणजे हरीच्या हातून तो मरेल. ज्याच्या वीर्यास भिऊन तुह्मी आज पळालांत त्या मायायुद्ध करणाऱ्या दामादि राक्षसांना युद्धाभ्यासामुळें आता लवकरच अहंकार वाटेल. शुद्ध आरशातील प्रतिबिंबाप्रमाणें तो त्याच्या हृदयात आपोआप स्फुरेल, आणि त्यांनीं एकदा वासना धारण केली म्हणजे जाळ्यात सापडलेल्या पक्ष्याप्रमाणें ते तुह्मास सुजेय होतील. यावेळीं ते वासनारहित आहेत. सुख-दुःखशून्य आहेत. त्यामुळें धैर्यानें शत्रूस मारणारे ते अजिंक्य झाले आहेत. जे वासनातंतूनें बद्ध व आशापाशांनीं परवश झालेले असतात तेच दोरींत बांधलेल्या पक्ष्याप्रमाणें या लोकीं वश्य होतात. ज्या धीरास वासना नसते, ज्याची बुद्धि कोठेंहि आसक्त झालेली नसते, जे इष्टप्राप्ति झाली असता आनंद मानीत नाहींत व अनिष्ट-प्राप्तीनें दुःखी होत नाहींत ते महाबुद्धिमान् पुरुष दुर्जय होत. ज्याच्या चित्तात वासनारज्जूची गांठ घट्ट बसलेली असते तो मोठा बुद्धिमान् व विद्वान् जरी असला तरी एकादा बालकही त्याला जिंकू शकतो. हा मी व हें माझें अशा कल्पनेने व्याकुळ झालेला पुरुष आपत्तींसच पात्र होतो. जेवढे हें माझे शरीर आहे तेवढाच मी आहे, असें समजणारा मोठा ज्ञानी जरी असला तरी तो कृपण होय. सर्व दुर्वासनातील आत्म्याला देहादिरूप समजणें ही वासना, सर्व अनर्थाचें बीज असल्यामुळें, मोठी भयंकर आहे. अनंत व अप्रमेय आत्म्याची इयत्ता ज्यानें केली त्याने आपणच आपल्याला संसार-अनर्थात लोटलें असें समजावें. आत्म्याहून निराळें असें जर कांहीं या जगांत असते तर त्याच्याकरितां 'हें प्राह्य आहे' अशी भावना होणें योग्य होतें. पण आत्मव्यातिरिक्त मुळीं वस्तुच नाहीं. यास्तव जगातील असद्वस्तूंवर आस्था ठेवणें अगदीं अनुचित होय. कोणतीही जरी आस्था झाली तरी ती अनंत दुःखांची जननी आहे व सर्वत्र अनास्था ही सर्व सुखाचें आगर आहे, असें जाणावें. देवांनो, दाम, व्याल व कट जोंपर्यंत संसारस्थितीविषयीं आस्थारहित आहेत तोंपर्यंत ते तुह्मांस जिंकतां येणार नाहींत. देह हाच मी आहे या अंतर्बा-

सनेमुळें ' अरे देहाचा नाश झाल्यास माझाच नाश होईल ' असें समजून प्राणी दीन होत असतो आणि असें झालें तरच तो पराभूत होतो. पण तशी वासना नसल्यास मशकही मेरूसारखा अचल ( निश्चल ) राहतो. जेथें वासना असते तेथेंच ती पुष्ट होते. कारण गुण गुणीच्या ठायींच वृद्धि पावत असतो. निर्गुण पदार्थाचे ठायीं गुण-वृद्धि होणें शक्य नाहीं.

यास्तव बा इंद्रा, दामादि दैत्य ' हा मी, हें माझें ' असें आंतल्या आंत समजतील असें तूं कर. प्राण्याच्या सर्व विपत्ती व दशा तृष्णाकरंज-वेलीच्या कडू व कोमल मंजिऱ्या आहेत. वासनातंतु जसा जसा वाढेल तसें तसें प्राण्याचें दुःखही वाढतें. यास्तव सुज्ञानें वासनेचा क्षय करावा. तिला उगीच वाढवूं नये. कारण वासनाक्षय साक्षात् सुख देत असतो. धीमान्, बहुश्रुत, कुलीन व मोठा माणूसही, सिंहाप्रमाणें, तृष्णारूपी शृंखलेनें बांधला जातो. देहरूपी वृक्षावर नसलेल्या व हृदयरूपी घरट्यांत रहाणाऱ्या चित्तपक्ष्यास अडकविण्याचें तृष्णा हें जाळें आहे. वासनेनें दीन झालेल्या जीवालाच कृतान्त ओढून नेत असतो. यास्तव तू शस्त्रें जमवून संग्राम करावयाच्या नादीं लागूं नको. तर आधीं युक्तीनें वासना उत्पन्न करून त्यांच्या बुद्धीचा भेद कर. वासनेनें अंतःकरण क्षुब्ध होई तों कोणतेंही शस्त्र किंवा अस्त्र त्या शत्रूवर चालणार नाहीं. शास्त्रांचाही तेथें कांहीं उपयोग होणार नाहीं.

हे दामादि तीन अजिंक्य व मत्त राक्षस युद्धाच्या अभ्यासानें लवकरच अहंकारमयी वासना धारण करतील. तोंपर्यंत तुह्मी युक्तीनें त्यांच्याशीं लढत रहा. त्यांना अहंकार झाला कीं ते लगेच इतर राक्षसांप्रमाणें तुह्मांस सहज जिंकता येतील. कारण हें सम-विषम जग अंतर्वासनेनेंच स्थिर झालें आहे २७.

सर्ग २८—देव थोडी विश्रांति घेऊन पुन. युद्ध करूं लागले.

श्रीवसिष्ठ—दशरथतनया, देवांना असें सांगून ब्रह्मा गुप्त झाला. देवही तें ऐकून आपापल्या इष्ट स्थानीं गेले. कांहीं दिवस आपल्या स्थिरकांतियुक्त रम्य गृहांत राहून त्यानीं विश्रांति घेतली आणि आतां अनुकूल काल आहे असें जाणून त्यांनीं आत्मोत्कर्ष करणारा शुभ दुंदुभिनिर्घोष केला. तेव्हां दैत्यही, पावसाळ्यांत भूछिद्रांतून वर निघणाऱ्या पंखांच्या किड्यांप्रमाणें, पाताळांतून भराभर वर निघाले. देवांनीं कालक्षेप

करण्याकरिता त्यांच्याशीं घोर युद्ध केलें. खड्गें, बाण, शक्ती, मुद्गर, मुसळें, गदा, परशू, शंख, चक्र, अशनी, पर्वत,शिला, अग्नि, व दुसरींही अनेक आयुधें याचा वर्षाव उभय पक्षाकडून एकसारखा होऊं लागला. कोणत्याही युद्धांत प्रायः होणारे सर्व घोर अतिप्रसग या युद्धप्रसंगींही झाले. देव मुद्दामच असुरांना थकविण्याकरिता हळु हळु युद्ध करीत होते. सृष्टींतील सर्व प्राणी दुःखी झाले. त्या मत्त देवासुरानीं त्राहि त्राहि करून सोडलें. वीरांचा सिंहनाद, रणवाद्यांचा घोष व दुःखिताचा आक्रोश यांच्या योगानें त्रिभुवन भरून गेलें. अकाली कल्पातच होत आहे कीं काय ? असा भास झाला. साराश अशास्त्रीय चित्तवृत्ती व शास्त्रीय चित्तवृत्ती याचा चित्तभूमींत भयकर सग्राम सुरू झाला असता संसार जसा अति दुःखद होतो, त्याप्रमाणें तो देवासुर सग्राम सृष्टीस दुःखदायी झाला.

**सर्ग २९**—दामादिकास अभिमान वाटूं लागतो त्याचा विषाद, पलायन व पराभव.

**श्रीवसिष्ठ**—रामचद्रा, याप्रमाणें शत्रूंचे प्राण घेणाऱ्या असुरानीं संग्राम सतत चालविला. देव कदाचित् कपटानें, कदाचित् वाग्युद्धानें, केव्हां केव्हा दानादि उपायानीं, केव्हा पळून जाऊन व एकादे वेळीं आपल्या लोकाना लपवून ठेवूनही पुष्कळ दिवस युद्ध करीत राहिले. त्याचें पहिले युद्ध तीस वर्षें चाललें होतें. दुसरें पाच वर्षें, आठ महिने व दहा दिवस टिकलें आणि तिसरे युद्ध बारा दिवसच झालें. पण त्यातील प्रत्येक युद्ध एकसारखेच भयकर होतें. इतक्या अवकाशात दामादिकास अहंकार वाटला. वासनेनें ज्याच्या चित्तास ग्रासलें आहे अशा त्या तिघानाही 'मी' अशी आस्था वाटू लागली. समीप असलेल्या दर्पणात जसें प्रतिबिंब पडतें त्याप्रमाणें त्यांच्या चित्तात अति अभ्यासामुळे अहंकार उठला. दूर असलेली वस्तु जशी आरशात प्रतिबिंबित होत नाहीं त्याप्रमाणें अभ्यासाच्या अभावीं पदार्थवासनाही उद्भवत नाही. दामादिकांना जेव्हां अहकार झाला तेव्हा माझे जीवित असेच राहवें, मला धन मिळावे इत्यादि दैन्य त्याच्यामध्यें आलें. त्यानंतर विहित-निषिद्ध प्रवृत्तीविषयीं वासना आणि माझा देह असाच नीरोगी, दृढ व भोग घेण्यास समर्थ असावा अशी मोहवासना यांच्या योगानें ते ग्रासले गेले; आशापाशांमध्यें अडकले आणि त्यामुळें दीन झाले. अरे अरे, अहंकारशून्य असलेल्या दामादिकांनीं रज्जूच्या

ठिकाणीं भासलेल्या सर्पाप्रमाणें ममत्वाची व्यर्थ कल्पना केली. हा माझा नखशिखांत देह स्थिर कसा होईल, या तृष्णेनें कृपण झालेले ते तिघेही दीन झाले. माझें शरीर स्थित राहून शिवाय माझ्या सुखाकरितां मला धन मिळो अशी आस्था धारण करणाऱ्या त्यांचें धैर्य गळालें. वासनायुक्त झाल्या कारणानें त्यांचें बळ कमी झालें. पूर्वी केवळ शत्रूंना मारण्यामध्येंच ते जसे तत्पर होते तसे आतां राहिले नाहींत. ( म्ह. त्यांचा प्रहारपरता पार नाहींशी झाली. ) या सृष्टींत आम्ही देव कसें होऊं या चिंतेनें ते परतत्र व दीन झाले. जलरहित कमलां-प्रमाणें त्यांची मुखश्री पार नाहींशी झाली. अहंकारयुक्त झालेल्या त्यांच्या चित्तांत स्त्री, अन्न, पान, इत्यादि विषयाविषयींची भयंकर आसक्ति उत्पन्न झाली. ती त्यांना अनर्थमय संसारांत लोटणारीच होती. असो अहंकृतीमुळें ते दैत्य जीविताची अपेक्षा करूं लागले. आम्ही मरूं कीं काय ? आम्हांला हे मारतील कीं काय? या चिंतेनें त्याची चित्तें व्याकुळ झालीं. रागावलेल्या ऐरावतामुळें भयकर झालेल्या रणात ते मंद मंद संचार करूं लागले. तेव्हा केवल शरीराची इच्छा करणाऱ्या व मृत्यूला भ्यालेल्या त्यांचें सत्त्व कमी झालें, आणि शत्रूंनीं त्यांच्या मस्तकावर पाय ठेवला. सर्व जळण संपलें असतां अग्नि जसा जाळूं शकत नाहीं त्याप्रमाणें त्यांचें सर्व धैर्य नाहींसें झालें असतां ते पुढें आलेल्या सामान्य देवालाही मारण्यास समर्थ झाले नाहींत. देव वेगानें सर्व सैन्याला मारूं लागले असतां ते दीन झालेले दामादि सेनापती मशकासारखे झाले. तात्पर्य रामा, मरणास भ्यालेले ते सर्व दैत्य, देव रणात विजयी होऊं लागले असतां, युद्धापासून पराङ्मुख झाले.

दाम, व्याल व कट स्वर्गामध्यें फार प्रसिद्ध झाले होते. पण ते रण सोडून पळूं लागले असता त्याचें, वाट फुटेल तिकडे पळणारें, दैत्यसैन्य आकाशांतून खालीं इतस्ततः पडलें. पर्वत, नद्या, वृक्ष, वनें, उपवनें, नगरें ग्राम, माळ जमीन, दलदलीची जागा इत्यादि पृथ्वीवरील सर्व इष्टानिष्ट स्थानीं ते अस्ताव्यस्तरीतीनें पडूं लागले. शत्रूच्या शस्त्रांनीं अंगें छिन्न भिन्न होऊं नयेत म्हणून जीव घेऊन धावणारे व अडखळून पडणारे ते व्याकुळ झाले. आकाशांतून खालीं पडतांना कित्येक जलाशयांत पडून गटंगळ्या खाऊं लागले. कित्येक कांट्यांमध्यें पडले आणि त्यामुळें त्यांच्या अंगांत अनेक

कांटे शिरले. कित्येक वृक्षांच्या अग्रांवर पडून मान, किंवा पाठ, किंवा कंबर, अथवा हातपाय मोडल्यामुळें भूमीवर तडफडत व हाय हाय करीतच कोसळले. कित्येकांचीं मस्तकें दगडावर हापटल्यामुळें त्यांचीं नारळाप्रमाणें शकलें उडालीं. कित्येकाचीं आतडीं मात्र वृक्षावर लोंबत राहून शरीरें खालीं आलीं. कित्येकांचीं हाडें मोडलीं. काहींजणाचे, तोंडघशीं पडल्यामुळें, दांत मोडले. कित्येकांचे डोळे फुटले आणि कित्येकांच्या जिभा दांतांखालीं सांपडून तुटल्या. साराश दामादिकांच्या अधैर्यामुळें सर्व राक्षससैन्याची अशी दुर्दशा झाली. सर्वांचीं अंगें फुटलीं. सर्वांच्या अंगांतील रक्तांचा पृथ्वीवर सडा घातल्यासारखा झाला. सर्व हाय हाय करून आक्रोश करूं लागले आणि असंख्य दैत्यांचे प्राण गेले. राघवा, याप्रमाणें देवाचा विजय होऊन दैत्यांचा पूर्ण पराभव झाला असतां मरून व अतिशय व्याकुळ होऊन पडलेल्या दैत्यावाचून इतर सर्व राक्षस एका क्षणांत नाहींसे झाले. समुद्रात पडलेल्या धुळीच्या कणाप्रमाणें त्यांचा कोठें मागमूसही लागला नाहीं २९.

**सर्ग ३०**—दामादिकांना अहंकारामुळें पुढें अनर्थपरंपरेंत पडावें लागलें.

**श्रीवसिष्ठ**—राजपुत्रा, याप्रमाणें दानवाचा पराभव होऊन देवाचा हर्षोत्पादक विजय झाला असतां दाम, व्याल व कट खिन्न व भयविह्वळ झाले. शंबराला जेव्हा हा वृत्तांत कळला तेव्हां तो दामादिकांवर अतिशय रागावला आणि ते उन्मत्त सेनापती कोठें आहेत असें विचारूं लागला. पण सैन्याचा भयंकर नाश झाल्यामुळें कोपाविष्ट झालेला राजा शंबर आह्मांलाच शोधित आहे असें कळतांच ते तिघेही भयभीत झालेले दैत्य आपला प्रदेश सोडून सातव्या पाताळांत गेले. तेथें मृत्यूप्रमाणें शंबरादि सर्व प्राण्यांना भिवविणारे यमकिंकर होते. त्याना हे तिघे शरण गेले. तेव्हां त्या निर्भय नरकपालकांनींही त्याना अभय देऊन तेथें ठेवून घेतलें. त्यांची विवाह करण्याची इच्छा आहे, असें पाहून मूर्तिमती तीन चिंताच अशा तीन कुमारी त्यांनीं त्याना दिल्या. त्याच्यासहवर्तमान ते तेथें आयुष्य घालवूं लागले. नरकातील त्या रमणीसह ते तिघे यथेच्छ विषयसुख भोगीत दहा हजार वर्षें राहिले. तेवढ्या अवकाशांत त्यांना अनेक कुवासना जडल्या. ही माझी प्रियभार्या, हा माझा आनंद देणारा पुत्र, ही माझी

लाडकी कन्या, हें माझें घर, इत्यादि वासनांनीं तर त्यांच्या चित्तात कायमचेंच ठाणें दिलें.

एकदां तेथील काम कसें काय चाललें आहे तें पहाण्याकरितां धर्मराज ( यम ) तेथें गेला. तेव्हां दुसऱ्या सर्वांनीं त्याला प्रणाम केला. पण या तिघांनीं तो कोण आहे हेंच ठाऊक नसल्यामुळें, हा असाच कोणी असेल असें समजून, त्याला प्रणाम केला नाहीं. तेव्हां यमराजानें केवळ भ्रूभंगानेंच त्यांना जळणाऱ्या उग्रभूमींत फेंकलें. त्याबरोबर आक्रोश करणाऱ्या सर्व परिवारासह, वणव्यात जळणाऱ्या एकाद्या शाखा-पर्णयुक्त वृक्षाप्रमाणें ते दग्ध झाले. नतर त्याच आपल्या क्रूर वासनेमुळें ते पशु, पक्षी इत्यादिकाना बाधणारे ( पकडणारे ) किरात झाले. पण त्या जन्मांतही त्याना किरात राजाचे किंकरच होऊन रहावें लागलें. काहीं दिवस त्या योनींत राहून व अनेक क्रूर कर्मे करून ते अधोगतीस लागले. उत्तर जन्मीं ते कावळे झाले. त्यामागून क्रमानें गृध्र, पोपट, डुकर, बकरे, व किडे होऊन ते निरनिराळ्या प्रदेशीं फिरले. त्यानतर त्या दुर्बुद्धींनीं दुसऱ्याही अनेक योनींत तसेच जन्म घेतले. अनेक विचित्र दुःखाचा अनुभव घेतला आणि आता, हे रामा, ते काश्मीराजवळच्या एका अरण्यातील डबक्यात मासे होऊन राहिले आहेत. उन्हाळ्यात ते सुकून जातात, पावसाळ्यात पुनः तेथेच पुष्ट होऊन काहीं दिवस मौज करितात पण पुढें शरदृतु लागून पाणी आटत चाललें म्हणजे तेथेंच चिखल पीत मोठ्या कष्टानें राहतात. फार दिवसाच्या जुन्या चिखलात रुतून राहणाऱ्या त्याना मरणही येत नाहीं व ते चागलेसे जिवंतही नसतात. साराश, प्रिय शिष्या, ते तिघे अजिक्य राक्षस अह-वासनेमुळें अनर्थात पडून, अनेक विचित्र योनींचा पुनः पुनः अनुभव घेऊन आणि जलाशयातील तरगाप्रमाणें पुनः पुनः उत्पन्न होऊन पुनः पुनः नाश पावत राहिले आहेत. वासना-तंतूनें प्रेरणा केल्यामुळें ते तृणासारिखे तुच्छ झाले व भवसागरात पडून देहरूपी तरगाच्या योगानें नाना प्रदेशात फिरले. त्याना अजूनही शाति मिळाली नाहीं. यावरून तूं आतां वासनेच्या दारुणतेची कल्पना कर ३०.

**सर्ग ३१—अहंमानामुळें पुरुषार्थाची हानि व अनर्थाची प्राप्ति होते. दामादिभावांच्या सत्त्वासत्त्वाचें निराकरण.**

**श्रीवसिष्ठ**—यास्तव, हे महामते रामा, तुझ्या बोधाकारितां, दामादिकांचा न्याय तुझ्या ठायीं प्राप्त न व्हावो असें, मीं वर म्हटलें. विवेकाचें अनुसंधान न केल्यामुळें चित्त अशा आपत्तींत पडतें आणि अनंत संसार-दुःखे भोगतें. देवांचा विध्वंस करणाऱ्या शंबराच्या सैन्याचें नायकत्व कोठें व तापलेल्या चिखलांत पडून जर्जर करणारी मीनता कोठें ? इंद्रादिकास पळावयास लावणारें तें मोठें धैर्य कोठें ? व किरातराजाची क्षुद्र चाकरी कोठें ? निरहंकार-अवस्थेतील उदारता कोठें ? व अंतःकरणात मिथ्या वासना शिरल्यामुळें उद्भवलेली अहकार-कुकल्पना कोठें ? शाखा-विस्तारानें गहन झालेली ही संसार-विष-मंजिरी अहंकाराकुरापासूनच उद्भवते यास्तव रामभद्रा, दीर्घ प्रयत्नाने अहंकराचे परिमार्जन कर दृक् व दृश्य या दोन जातींच्या पदार्थावाचून या त्रिभुवनात आणखीं काहीं नाहीं. यास्तव अहं ह्मणून निराळें काहींएक नाहीं, असें समजून तू सुखी हो. आनदैकरस व तापत्रयशून्य असें परमार्थ-चंद्रमडळ, अहंकारमेघाने झांकून टाकल्यामुळेंच, प्राकृतास दिसेनासें होते. शंबराने मायेनें निर्माण केलेले व त्यामुळेच असत् असलेले ते तिघे राक्षस अहंकार-पिशाचानें पछाडल्यामुळें सत्तायुक्त झाले. आणि आता काश्मीरातील डबक्यात चिखल पीत पडले आहेत.

**श्रीराम**—पण प्रभो, असत् वस्तूची सत्ता व सद्वस्तूची असत्ता होणें शक्य नाही. मग असे असताना ते असत् दैत्य सत्तासपन्न कसे झाले ?

**श्रीवसिष्ठ**—रामा, तूं ह्मणतोस ते खरें आहे. कोणतेंही असत् सत् होणे शक्य नाहीं. पण सूक्ष्म वस्तूच सदा आविर्भावाच्या योगाने बृहत् (मोठी) होते. तीच वस्तूची उत्पत्ति आणि बृहत् वस्तुच तिरोभावाने सूक्ष्म होते. तोच नाश होय. पण दशरथतनया, या सृष्टींत सत् काय आहे व असत् आहे ते आधी तू मला साग. म्हणजे मग मी तुझ्या प्रश्नाचें निदर्शनपूर्वक उत्तर देईन.

**श्रीराम**—गुरुवर्य, हे आह्मी येथे असलेले सर्व सत् आहो. पण शंबरानें मायेने उत्पन्न केलेले दामादिक असत् होत, असें मी समजतों.

**श्रीवसिष्ठ**—रामा, दामादिक मायामय होते व त्यामुळेच ते असत्य. पण असत्य असूनही ते जसे मृगजळाप्रमाणे सत्य असल्याचा भास झाला तसेच हे सर्व आम्हीही असत्य असून सत्यासारखा व्यवहार करतों. येतों, जातों, बसतों व बोलतों. त्वद्भाव व मद्भाव ( म्हणजे तूं राम व

मी वसिष्ठ यांच्या शरीराचा भाव ) मिथ्या आहे. तो सत्य असल्यासारिखा जरी अनुभव आला तरी स्वप्नांतील मरणाप्रमाणें असत्य आहे. मेलेला बंधु स्वप्नांत दिसला तरी तो जसा, जागें झाल्यावर, असत् त्याप्रमाणें तत्त्वदर्शनानंतर सर्व जगत् असत् होतें. सत्य आहे असें निश्चयानें जाणणारा अतिमूढ होय. त्याला जग असत्य आहे असें सांगूं लागल्यास तें मुळींच आवडत नाहीं. कारण परमार्थतत्त्व-विचाराभ्यासावाचून जगत् सत्य आहे या अनुभवाचा अपलाप होणें शक्य नाहीं. चित्तात अतिरूढ होऊन वसलेला जगत्सत्यत्व–संस्कारही पुष्कळ दिवस तत्त्वाभ्यास केल्यावाचून जात नाहीं. म्हणूनच अनधिकाऱ्यास जग असत्य असून ब्रह्म सत्य आहे असें सांगूं लागल्यास तो 'हें वेड्याचें बरळणें आहे' असें समजून त्याची थट्टा करूं लागतो. मत्त व अमत्त याचें मतैक्य कसें होणार? छाया व प्रकाश यांचा सहवास जसा अशक्य त्याप्रमाणें जगत्तत्त्वज्ञ व प्राकृत यांचा सहवास अशक्य आहे. प्राकृत पुरुषाला तत्त्वोपदेश, केवढाही प्रयत्न करून, जरी केला तरी हें विषयमय जग ब्रह्ममय आहे असा निश्चय त्याच्यानें करवत नाहीं. प्रेताच्या चालण्याप्रमाणेंच तो अशक्य आहे. यास्तव हें सर्व जग ब्रह्म आहे असें हवें त्याला सागत सुटू नये. वेदाध्ययन, तप, यज्ञ इत्यादिकांच्या योगानें ज्ञानाची योग्यता येत असते. यास्तव त्याचें अनुष्ठान ज्यांनीं पूर्वजन्मीं अथवा या जन्मीं केलेलें नाहीं त्यांना तत्त्वोपदेश करणें ह्मणजे आपल्या ज्ञानाचा दुरुपयोग करणेंच आहे.

तर मग तत्त्वोपदेशाचा खरा अधिकारी कोण? म्हणून विचारशील तर पूर्वी सागितलेली गोष्टच पुनः सांगतों ऐक. अध्ययनादिकांच्या योगानें ज्यांचें चित्त शुद्ध झालें आहे व ज्यांच्या चित्तात वैराग्यादिभाव स्थिर झाले आहेत अशा अल्पबुद्ध पुरुषाला तत्त्वोपदेश करावा. कारण जो बुद्ध आहे त्याला मी बुद्ध आहें असा मुळीं कधीं अनुभवच येत नाहीं. तर तो सदा शांत ब्रह्माचाच अनुभव घेत असतो; त्याविषयीं त्याचा दृढ निश्चय झालेला असतो; म्हणून त्याला बोध करण्याला अवकाशच रहात नाहीं. अज्ञाला, त्याच्या विरुद्ध, जगांतील अनेक पदार्थांचा पदोपदीं अनुभव येऊन ते सर्व सत्य आहेत असें निश्चयानें वाटतें. म्हणून त्यालाही उपदेश करितां येत नाहीं. तेव्हां राहिला अल्पबुद्ध. त्याला जगाचेंही भान होत

असतें व 'हा मी' असेंही वाटत असतें. पण यांतलें सत्य काय व असत्य काय याचा निर्णय करतां येत नाहीं. तो व्हावा असें तर त्याला मनापासून वाटतें. यास्तव असा पुरुष उपदेशाचा अधिकारी आहे. ज्ञानी सत्य–एकात्ममय व अज्ञानी मिथ्या अहंतामय. तेव्हा त्याच्या स्वभावामध्यें बदल कसा करितां येणार! ज्ञान्याच्या दृष्टीनें जग जसें असत् तसाच प्राकृताच्या दृष्टीनें परमार्थ असत्. यास्तव जो अति ज्ञानी व अति अज्ञानी असतो तो उपदेशाचा अधिकारी नव्हे. तर जो अल्पबुद्ध असतो तोच तत्त्वज्ञानाचा अधिकारी आहे.

असो; हे रामा, तूं, मी व हे सर्व शास्त्रदृष्ट्या, विद्वान् पुरुषांच्या अनुभवदृष्ट्या व युक्तिदृष्ट्याही देहरूपानें असत् आहेत. दामादिक दैत्यही तसेच असत्. 'तर मग सत्य काय' ह्मणून विचारशील तर सांगतों. शुद्ध, बोधाकाश व निरंजन संवेदन ( ज्ञान ) सत्य आहे. तें सर्वगत, शांत व अस्तोदयरहित आहे. सर्व जगत्ही शांत आहे. पण तें शून्य नव्हे. तर मग शांत ह्मणजे काय? तर सर्वशून्य असल्यासारखें व सन्मात्रपूर्ण आहे. ( केवल सत्तेनें भरलेलें आहे. ) तर मग हें सर्व दिसणारे काय आहे? निव्वळ भास. ज्याच्या दृष्टीला तैमिरिक रोग झाला आहे त्याच्या डोळ्यापुढें जसे काळे कुरळे केंस दिसतात त्याप्रमाणें मनोरूपी दृष्टीला संस्काररूपी दीर्घ रोग झाल्यामुळें जगाचा भास होतो. यास्तव या त्रिभुवनांत सत्य किंवा असत्य असें काहीं नाहीं. चिद्रूप जसें जाणतें तसें सर्व होतें. राजपुत्रा, जसे दामादि राक्षस तसेच आह्मीहि सत्य व असत्य आहों. मग त्याच्याच विषयीं तेवढा संशय घेण्यांत काय अर्थ आहे? आत चित् ज्या आकारानें उदय पावते त्या आकाराचें हें सर्व होतें. दामादिकांच्या आकारोत्पत्तीचाही तोच प्रकार आहे. आपल्याच स्वप्नप्रतिभासाला लोकांनीं जग असें नांव दिलें आहे. चिदाकाश बाह्यार्थरूप झालें ह्मणजे तेंच दृश्य जग होय, असें समज. पण बाह्याकार सोडून तें स्वरूपानें स्थिर झालें म्हणजे तोच मोक्ष. चिदाकाश प्रबुद्ध ( जागें ) झालें कीं जग व तें स्वस्थ निजलें म्हणजे मोक्ष. पण या दोन अवस्थाही बोधाकरितां कल्पिल्या आहेत. त्या खऱ्या नव्हेत. चिदाकाशच जगत्. निर्वाणच सर्गश्री व सर्गश्रीच निर्वाण होय. घट व कलश या पर्यायशब्दांप्रमाणें त्यांच्या अर्थांत भेद नाहीं. रोगि-दृष्टीला

दिसणाऱ्या केंसाप्रमाणें अज्ञाला परमार्थच जग दिसतें. परंतु शुद्धदृष्टि पुरुषाला हें जगच चिदाकाश दिसतें. सारांश अध्यारोपदृष्ट्या सर्वव्यापी चिदाकाशांत सर्वांचा आरोप होणे शक्य असल्यामुळें सर्वत्र सर्व आहे. पण अपवाददृष्ट्या कोठेंही कांही नाहीं ३१.

**सर्ग ३२**—दामादिकांच्या अनेक योनी, शेवटीं प्राप्त झालेला मशकादि भाव, ज्ञान व मोक्ष.

**श्रीराम**—विद्वद्वर्य, बरें असो, बालकानीं काल्पिलेल्या यक्ष-पिशाचाप्रमाणें दाम, व्याल व कट हे जरी सत्-असत्-रूप असले तरी त्यांच्या दु:खाचा अत कसा व केव्हा होणार?

**श्रीवसिष्ठ**—रामा, त्या दैत्याच्या आप्त-संबधी यमकिंकरानीं त्याच यमराजाची नम्रपणें प्रार्थना केली असता धर्मराज त्यास म्हणाला "त्याचा परस्पर वियोग होऊन ते जेव्हा आपली ही कहाणी ऐकतील तेव्हा मुक्त होतील." रामभद्रा, पितृपतीच्या या सागण्याप्रमाणे ते पुढे कसे मुक्त होतील ते मी सागतो ऐक. काश्मीरातील महापद्मसरोवराच्या तीरावरील चिखलात दीर्घकाल मत्स्ययोनींचा अनुभव घेऊन ते त्या योनींतून मोठ्या कष्टाने सुटतील आणि त्याच पद्मसरोवरात सारस पक्षी होतील. विविध जातीचीं कमलें, सुंदर तरंग, रम्य शेवाळ, हालणारे पुष्पगुच्छ, नील कमलाचीं बेटे, शीतल वायु इत्यादिकाच्या योगानें अतिशय सुशोभित व रम्य झालेल्या त्या सरोवरात भुवनभूषणभूत सारसींशीं सरस भोग भोगीत दीर्घकाल विहार करतील. शेवटीं त्याना विचारबुद्धि प्राप्त होऊन ते एकमेकापासून दूर होतील ज्याप्रमाणें सत्त्व, रज व तम याचें विवेकदृष्टीनें पर्यालोचन करू लागलें असता मुक्तीकरिता ते भिन्न होतात त्याप्रमाणें तेही तिघे मुक्तीकरिता वियुक्त होऊन त्यातील व्याल चिमणा होईल आणि काश्मीर देशातील अधिष्ठान-नगरात एका सर्वोत्तम घराच्या ईशान्येकडील भितीच्या भोंकात राहील. तेथें तो थोडेंच अध्ययन केलेल्या ब्राह्मणाच्या अर्थरहित शास्त्रपाठाप्रमाणें ची-ची-ची असा शब्द करीत आनंदानें काल घालवू लागेल. दाम—दानव त्याच नगरांतील श्रीयशस्करदेव नावाच्या राजाच्या राजमदिरातील एका मोठ्या स्तंभाच्या छिद्रांत मृदुध्वनि करणारा मशक होऊन राहील. त्याच अधिष्ठान-नगरात रत्नावली-विहार नावाचें क्रीडागृह असेल. त्यांत राजाचा नरसिंह या

नांवाचा एक अमात्य राहील. त्या ज्ञानी पुरुषाला बंध व मोक्ष हातावरील आवळ्याप्रमाणें साक्षात् दिसतील. त्याच्या गृहांत कट-असुर शाळुंखी-पक्षी होऊन रुप्याच्या पिंजऱ्यांत आनंदानें राहील. नरसिंह-अमात्य दाम-व्याल-कटाची कथा काव्यरूपानें रचील व तो ती वाचीत असतांना पिंजऱ्यांतून ऐकून, कटाला आपल्या पूर्वजन्माचें स्मरण होईल. सर्वत्र आत्माच भरून राहिला आहे. त्यावाचून या सृष्टींत दुसरें कांहीं नाहीं, असेंही त्याला त्या कथेंतील वर्णनावरून कळेल आणि त्याविषयीं त्याचा पूर्ण निश्चय झाला म्हणजे तो शांतरूप होऊन निजरूपास पोंचेल. चिमणा व मुरकूट झालेल्या व्याल व दाम-दैत्यासही ती सर्वतोमुखी झालेली काव्यमय कथा प्रसंगोपात्त ऐकू येईल आणि त्यामुळें त्यानाही आत्मज्ञान होऊन तेही मुक्त होतील.

राघवा, याप्रमाणें मी तुला ही दाम-व्याल-कटाची कथा सांगितली आहे. त्याच्या जन्मादिकाप्रमाणे हा संसारही शून्य आहे. मायामय आहे. पण भ्रामक द्वैत-ज्ञान प्राण्याला फार मोठ्या पदापासून च्युत करून अधोगतीस लावते. त्रिभुवनाला भिववण्याचें सामर्थ्य कोठें व खाबांतील मशक, भितींतील चिमणी व मंत्र्याच्या घरच्या पिंजऱ्यातील साळुंकी कोठें ? राजस–अहंकाराने रंजित झालेल्या चिदाकाशालाच, स्वरूप न सोडता, विरूपाचें भान होतें. ( म्हणजे स्वाभाविक स्वप्रकाशतेचा त्याग न करताच तें अहंकार, प्राण, मन, इंद्रियें, देह इत्यादिरूप होते. ) असत्य असतानाही सत्य असल्याप्रमाणे वाटणाऱ्या आपल्या वासनाभ्रांतीमुळेंच प्राणी हा कोणी आपल्याहून भिन्न पदार्थ आहे असें तें ( चैतन्याकाश ) जाणतें. यास्तव असल्या या मिथ्या संसारसागरातून तरून पार जावयाचें असल्यास बुद्धीचा प्रवाह आत्म्याकडे वळवून महावाक्यादिरूप शास्त्राच्या योगाने हें सर्व दृश्य असत् आहे असा निश्चय केला पाहिजे. शुष्क तर्कमय मताचा अवलंब करणे यासारखी आत्महानि दुसरी कोणतीही नाहीं. आमच्या या उपनिषत्प्रतिपाद्य मार्गाला अनुभवही पुष्टि देतो. तार्किकांच्या तर्कानें ठरविलेल्या मार्गाला अनुभवाचें पाठबळ मुळींच नसते. आम्हीं सांगत असलेल्या या वैदिक मार्गानें जाणाऱ्या साधूची ऐहिक व पारलौकिक पुरुषार्थ-हानि कधींही होत नाहीं. हें मला हवें, असें म्हणून कुत्र्याप्रमाणें आशेनें एक क्षणभरही चित्त व शरीर स्थिर न ठेवतां इतस्ततः पळणाऱ्या दुर्भाग्याला मातीसुद्धा मिळत नाहीं. उलट त्याला भयंकर-

दैन्य सहन करावें लागतें. पण जो उदारात्मा त्रैलोक्याला सदा तृणासारखें तुच्छ समजतो त्याला, सर्प जसे कांत टाकितात त्याप्रमाणें, सर्व आपत्ती सोडतात. अशा विरक्त पुरुषाच्या अंतःकरणांत ज्ञानाची जेव्हां थोडीशी कलाही उद्भवते तेव्हां आपत्तीची शंका तर दूरच राहूं दे पण त्याच्या रक्षणाचीही त्याला चिंता करावी लागत नाहीं. कारण लोकपाल, ब्रह्मांडाप्रमाणें, त्याचें रक्षण करितात. यास्तव साधक अवस्थेंत असतांना एकादे वेळीं भयकर आपत्ति जरी येऊन कोसळली तरी असन्मार्गानें जाऊं नये. कारण उन्मार्गानें अमृत पिणाराही राहु मरण पावला. उग्र प्रकाश देणाऱ्या सच्छास्त्र व साधुसमागमरूपी सूर्याचा जे आश्रय करितात ते पुनः मोहान्धकाराला वश होत नाहींत. ते स्वतंत्र होतात. त्यांच्या सर्व आपत्ती क्षय पावतात. ज्यांनीं वैराग्यादि गुणांच्या योगानें मोठें यश संपादन केलें आहे त्यांचें अक्षय कल्याण होतें. वैराग्यादि गुणांचें उत्तरोत्तर अधिक संपादन करावें असें ज्यास वाटतें, अध्यात्मशास्त्राभ्यासाची ज्याना मोठी आवड असते आणि सत्याचें व्यसनच लागलेलें असतें तेच पुरुष बाकीचे सर्व पशू. ज्यांच्या यशश्चंद्रिकेनें ( म्हणजे यशोरूपी चांदण्यानें ) प्राण्यांचें हृत्सरोवर प्रकाशित केलें आहे त्या क्षीरसागराच्या मूर्तीमध्यें हरि रहातो.

बाबा रे राघवा, या अनादि संसारांत अनेक जन्म घेऊन, प्रत्येक प्राण्यानें सर्व भोग भोगलेले असतात. सर्व अनुभव घेतलेले असतात. मग आणखीं उत्तर जन्मपरंपरेमध्यें पडून स्वात्मविनाश करण्याकरिताच पुनः भोगांविषयीं लुब्ध होणें योग्य आहे का ? मुळींच योग्य नव्हे. यास्तव आपल्या अधिकारानुरूप, यथाशास्त्र, पूर्व पूर्व आचार्यांनीं प्रवृत्त केलेल्या संप्रदायाप्रमाणें, एकेका भूमिकेंत, त्या त्या भूमिकेचा परिपाक होई तों, स्थिर राहून मिथ्या भोगजालावरील आस्था कमी करावी. स्वर्गापर्यंत जाऊन पोचणाऱ्या गुणांच्या योगानें कीर्तिमान् व्हावें. साधुजनांच्या तोंडूनही धन्यता मिळवावी. कारण कीर्ति व साधुवाद प्राण्याला मृत्यूपासून तारतात. भोग कधींही तारीत नाहींत. सिद्धांच्या सुंदर स्त्रिया, ज्यांचें चंद्रतुल्य शुभ्र व आकाशतुल्य सर्व देश-कालव्यापी यश गीतींच्या द्वारा गातात तेच जिवंत असून बाकीचे मृत होत. दीर्घ प्रयत्न व सतत उद्यम करून न कंटाळता, यथाशास्त्र आचरण करणारा कोणता पुरुष सिद्धीला पात्र होणार नाहीं ? पण यथाशास्त्र व्यवहार करणारानें सिद्धीविषयीं त्वरा

करूं नये. चिरकाल परिपक्क झालेल्या सिद्धीचें फळही पुष्ट मिळतें. यास्तव शोक, भय, आयास, गर्व व गडबड न करितां यथाशास्त्र व्यवहार करावा. आपलाच विनाश करून घेऊं नये. जीर्ण अंधकूपासारख्या या संसारांत पडून जीव जणुं काय मेला आहे. इंद्रियरूपी दोऱ्यांचा जणुं काय त्याच्या गळ्याभोंवतीं फांस लागला आहे. यास्तव वीरा भोगांची आस्था सोड. म्हणजे तूं उत्तरोत्तर खालीं घसरणार नाहींस. या शास्त्राचा चांगला विचार कर. कारण तें मृत्यु, जरा इत्यादि अनेक आपत्तींचें निवारण करणारें अमोघ अस्त्र आहे. या घाणेरड्या चिखलासारख्या संसारात जिवंत राहण्याची आशा करूं नये. भोगवासना हृदयांतून घालवावी. भोगांची वासनाही गेल्यावर त्या ( भोगा ) करितां अवश्य लागणाऱ्या द्रव्यलेशाची गरज रहाणार नाहीं. तस्मात्, हे सर्वश्रेष्ठ पुरुषानो, सर्वस्वाचा त्याग करून मोक्षशास्त्राचेंच अवलोकन करा. विषयाकार चित्तवृत्तींमध्यें प्रतिबिंबित झालेल्या चिदाभासाचें बिंब अतःकरणानें मर्यादित झालेलें चैतन्य आहे व अतःकरणोपहित चिदाभासाचें बिंब शुद्ध. ब्रह्मचैतन्य आहे. प्रतिबिंबें व त्याऱ्या दोन्ही उपाधी असत्य आहेत आणि बिंब सत्य आहे. पण अतःकरण ही उपाधि जरी असत्य असली तरी तिच्या योगाने मर्यादित झालेलें बिंब-चैतन्य व त्यांत नियमानें रहाणाऱ्या चिदाभासाचें बिंबभूत ब्रह्मचैतन्य याचा भेद मिथ्या आहे. त्यामुळें उपाधीचा निरोध केल्यावर अखड, सत्य, प्रत्यगभिन्न ब्रह्मचैतन्यच अवशिष्ट रहातें. म्हणून तोच परमार्थ आहे; असा विचार करावा.

**श्रीराम**—पण गुरुवर्य, सांख्य, पातजल, गौतम, कणाद, बुद्ध, जैन इत्यादि दुसरे लोक ही प्रतिबिंब-प्रक्रिया मानीत नाहींत. ते निराळ्याच रीतीनें तत्त्वोपदेश करितात. तेव्हा त्याच्या सांगण्याप्रमाणें चालावें कीं नाहीं ?

**श्रीवसिष्ठ**—प्रिय शिष्या, आपल्या या शास्त्रांत नसेल तर त्याच्या पासूनही उत्तम साधनाचा उपदेश घ्यावा. नाहीं असें नाहीं. पण या शास्त्रांत नाहीं असें ते कांहींच सागत नाहींत. उलट या आमच्या अध्यात्म-विद्येंत तत्त्वनिरीक्षण अगदीं सूक्ष्म व अगदीं न्याय्य दृष्टीनें केलेलें आहे. यास्तव वैदिक धर्मानुयायी पुरुषांना उपदेशाकरितां दुसऱ्यांच्या तोंडाकडे पहाण्याची मुळींच गरज नसते. शिवाय सांख्यादिकांचें सांगणें

केवल तर्कमय व त्यामुळेंच निराधार असतें. यास्तव बा रामा, त्यांच्या उपदेशाची आपल्याला मुळींच गरज नाहीं. असो; परिणामीं दौर्भाग्य देणारी, कृपण करणारी व शुभहीन अशी ही अविचारणारूपी गाढ व दीर्घ महा निद्रा, टाकून जागे व्हावे. डबक्यातील म्हाताऱ्या कासवाप्रमाणें सदा निजूनच राहू नये. जरा व मरण याच्या शांतीकरिता उत्थानाचा अंगीकार करावा. द्रव्यसंचय अनर्थांत पाडतो. भोगसमूह भवरोग उत्पन्न करितो. इतर सर्व संपत्ती या आपत्तीच आहेत आणि या सर्वांचा अनादर करणे हा जय होय. लोकव्यवहाराच्या विरुद्ध नसलेल्या शास्त्राचारांचें अनुसरण करून त्यांचें शुभ फल मिळविण्यास सज्ज व्हावें. कारण, हे सज्जना, आचाराच्या योगाने ज्याचें चरित्र रम्य झालें आहे, ज्याची बुद्धि विवेकसंपन्न झाली आहे व जो सांसारिक सुखादिकांविषयीं निरिच्छ आहे, अशा पुरुषाचे आयुष्य, यश व गुण लक्ष्मीसह, वसंत-ऋतूतील वेलींप्रमाणे, सत्फलाकरितां, प्रफुल्लित होतात ३२.

सर्ग ३३—शुभ उद्योग, साधु व सच्छास्त्र यांचे वैभव, अहंकारामुळे बंध व त्याच्या त्यागाने मुक्ति

**श्रीवसिष्ठ**—सर्व तीव्र साधनाचें फळ अवश्य मिळते असा नियम असल्यामळे व शेतातील कष्ट, सेवा इत्यादि लौकिक व वैराग्य, विचार, अभ्यास इत्यादि शास्त्रीय साधनाचे फल सदा प्रत्यक्ष मिळत असल्याचा अनुभवही येत असल्याकारणानें रामा, तूंही शुभ उद्योग सोडू नकोस. शास्त्रीय शुभोद्योगाला असाध्य असें काही नाही यांविषयीं मी आता तुला एक आख्यायिका सांगतो-पूर्वी शीलाद म्हणून एक मुनि होता. आपल्याला सर्वज्ञ पुत्र व्हावा या इच्छेनें त्यानें तप करून भगवान् रुद्राला संतुष्ट केलें. दीर्घ तपाच्या योगानें प्रसन्न झालेला ईश्वर, त्याला इष्ट वर द्यावयास सिद्ध झाला असता, म्हणाला "माझ्या वाचून दुसरा कोणी सर्वज्ञ असणे संभवत नाहीं. यास्तव मीच अशानें तुझा पुत्र होईन. पण तो तुझा पुत्र सोळा वर्षाचा होताच मरण पावेल." तें ऐकून त्याच्या इच्छेविरुद्ध तोंडातून ब्र काढण्याचेंही सामर्थ्य न झाल्यामुळें शिलादानें त्याच्या पायावर मस्तक ठेवून त्याच्या म्हणण्याला मुकाट्याने अनुमोदन दिले. कांहीं दिवसांनीं त्याला नंदी या नावाचा पुत्र झाला. पण लहान असतांनाच त्यानें बापाच्या तोंडून सोळाव्या वर्षी आपला मृत्यु आहे असें ऐकून तपाच्या

योगानें त्याच रुद्राची आराधना केली. तथापि सोळावें वर्ष लागतांच, आयुर्मर्यादा संपल्यामुळें, सरोवराच्या कांठीं शिवलिंगार्चन करीत असलेल्या नंदीला यमानें आपल्या पाशांनीं बांधलें. पण इतक्यांत साक्षात् शंकर तेथें प्रकट झाला व त्यानें मृत्यूचें निवारण करून त्याला आपला अनुचर केलें. त्याचप्रमाणें बलिप्रभृति दानवांनीं शुभोद्योगामुळेंच, गज जसे कमलिनीचा विध्वंस करितात त्याप्रमाणें, सर्वोत्कर्षानें संपन्न असलेल्या देवाचें यथेच्छ मर्दन केले आहे. मरुत्त राजाच्या यज्ञात इंद्रानें मोठें विघ्न केलें असता संवर्त महर्षींने, साक्षात् ब्रह्मदेवाप्रमाणें, देव व असुर यासह दुसरी सृष्टि निर्माण करण्यास आरभ केला हें प्रसिद्धच आहे. महा-निश्चयी विश्वामित्रानें वारंवार उग्र व उग्रतर तप करून अलभ्य असलेलेंही ब्राह्मण्य मिळविलें. पाण्यात कालवलेले पीठच दूध आहे असे समजून तें अमृताप्रमाणें प्राशन करणाऱ्या महा दरिद्री उपमन्यूला तपाच्या योगानें क्षीरसागर मिळाला. त्रैलोक्यातील महाबलाढ्य मल्लच अशा-ब्रह्मा, विष्णु इत्यादि थोरासही तृणाप्रमाणें गट्ट करणाऱ्या-काळाला श्वेत मुनींनें अति तीव्र भक्तीनें जिंकलें. सावित्रीनामक राजकन्येने भर्त्याच्या प्राणामागून जाणे, स्तुति करणें इत्यादि उपायानी यमाला प्रसन्न करून व युक्तीनें वर मागून आपल्या सत्यवान्-पतीला परत आणले. तात्पर्य स्पष्ट फळ मिळत नाहीं असा कोणताही शास्त्रीय शुभ उद्योग नाहीं. यास्तव मुज्ञ पुरुषाने फलाच्या न्यूनाधिकतेचा चागला विचार करून सर्वोत्तम फलाकरिता शुभ प्रयत्न आरंभावा. आत्मज्ञान सुखदुःखादि सर्व दशाचे मूळ उपटून काढणारे आहे. यास्तव त्याच्याचकरिता सर्वोत्तम शुद्ध उद्योग करावा. प्रथम भोगाभिलाषाचा नाश व्हावा म्हणून विषयाविषयी दोषदृष्टि धारण करावी. वैराग्यादिकाचा अभ्यास करताना आरभी मोठे दुःख होईल, हे खरें, पण ते सहन केल्यावाचून अखड सुख कसे मिळणार? चिदात्मा पर ब्रह्म आहे, हें जरी खरें आहे, तरी कारणासह संसार-अनर्थ-निवृत्तिरूप शमही परम पुरुषार्थच आहे यास्तव प्रथम वैराग्याभ्यासाने रागादि दोषाचे शमन करणे हें अखड ब्रह्मसुख देणारें आहे, असे तू समज. ( प्रशम जसा साक्षात् स्पष्ट आनंद देणारा आहे तसें चित्-ब्रह्मैक्य व्यक्त आनद देणारें नाहीं. यास्तव प्रशमाचाच उपयोग अधिक आहे, असा याचा भावार्थ ).

आतां असल्या त्या, साक्षात् फल देणाऱ्या प्रशमाचा उपाय कोणता म्हणून विचारशील तर पुनः सांगतों--अभिमानाचा परित्याग करावा आणि विषयाच्या दोषाचें वारवार स्मरण करून विषयाभिलाष कमी कमी करीत जावें. चित्-चें निश्चल कैवल्य व आपला मोक्षयोग्य श्रेष्ठ (मानुष) जन्म यांचा विचार करावा आणि सज्जनांच्या चरणाचें सेवन करावें. कारण सज्जनसमागमावाचून चित्तशुद्धीकरितां केलेलीं तपें, तीर्थाटन, व शास्त्राध्ययन संसारसागरांतून सोडविण्यास समर्थ होत नाहींत. सज्जन कोणाला म्हणावें तेंही तेथें सागून ठेवतों. ज्याचा लोभ, मोह व क्रोध हे दोष प्रत्यहीं क्षीण होत असतात व जो आपल्या कर्मामध्यें यथाशास्त्र निमग्न असतो तो सज्जन होय, असें जाणून त्याचा समागम करावा. कारण अशा पुरुषाच्या समागमानें एकादे वेळीं अकस्मात् आत्मवेत्याचा संगही घडतो व त्यामुळें या दृश्याचा अत्यंताभाव कसा आहे, तें कळतें. म्हणजेच ज्ञानलाभ होतो. दृश्याचा अत्यत-अभाव झाला म्हणजे परब्रह्मच अवशिष्ट रहातें व त्यावाचून दुसरा आधारच नाहींसा झाल्याकारणानें जीव त्यातच लीन होतो. दृश्य कधीं उत्पन्न झालें नाहीं, होत नाहीं व होणार नाहीं. वर्तमानसमयी त्याचें अस्तित्वही नाहीं. तर त्रिकाळीं निराबाध ब्रह्मच आहे.

रामभद्रा, उत्पत्तिप्रकरणांत अनेकयुक्तींनीं दृश्याचा असंभव कसा आहे तें दाखविलेंच आहे व त्याच्याच दृढतेकरिता येथेंही दाखवूं. पण आता अगोदर सर्व विद्वानानीं जसा अनुभव घेतला आहे तसेंच हें निर्मल व शात त्रिजगत्संविदाकाश तुला दाखवितों.

हें संविदाकाश तत्त्व आहे; परमार्थरूप आहे. तेव्हां त्याच्यामध्यें अतत्त्व म्हणजे माया व तिचें आकाशादि कार्य कसें असणार? परमार्थ व अपरमार्थ याचा तात्त्विक सहवास होणें अशक्य आहे. तर मग जगत् हें काय आहे? पाण्यावरील बुडबुडा. त्रिभुवनात जो जो अनुभव येतो तो तो सर्व ब्रह्मचिदादित्याच्या किरणरूप आहे. म्हणजे त्याहून निराळा नव्हे. कारण किरणवान् पदार्थ व किरण यांमध्यें भेद तो कोणता? या चित्-दृष्टीचे स्वभावतः होणारे उन्मेष-निमेष ( उघड-झांप, विकास-सकोच ) हेच जगद्रूप अनुभवाचे उदयास्त होत. अहं ( मी ) याचा खरा अर्थ न जाणणें हाच परमार्थाकाशातील मळ असून ( म्हणजे तीच अविद्या

अथवा उन्मेष असून ) त्याचा तात्त्विक अर्थ जाणणें हेंच परमार्थाकाशाचें नैर्मल्य आहे. तोच मोक्ष होय. अहंभावाला तत्त्वतः जाणलें म्हणजे तोच नाहंभाव होतो. कारण अहं ही शुद्ध कल्पना आहे, तो चिद्विलास आहे, असें कळलें म्हणजे जल जलांशीं जसें मिळून जातें त्याप्रमाणें तो ( अहंभाव ) चिदाकाशाशीं एकरूप होतो. अहं हें दृश्याचें बीज आहे. यास्तव तेंच कारणांत लीन झालें म्हणजे दृश्यांकुर कसा उद्भवणार ? एवढ्या-साठींच 'दृश्य वस्तुतः नाहीं.' असें आम्ही म्हणतों. अहं हा काय पदार्थ आहे असा शास्त्र व संतवचन यांच्या साह्यानें विचार केला म्हणजे त्याचें तत्त्व कळणें अगदीं साहजिक आहे आणि तें कळलें म्हणजे एकटें चिदा-काश रहातें. पिशाचाचा वस्तुतः अभाव असतानाही तें आहे असा संशय आल्यास प्रौढबुद्धिपुरुषांनाही मोठे क्लेश होतात आणि त्यांनाही जर त्याची बाधा होते तर मग ज्याची बुद्धिच अपरिपक्व आहे अशा बाळकाविषयीं काय सांगावें ? चिच्चंद्रिका जोंवर अहंकारमेघानीं आच्छादित झालेली असते तोंवर ती परमार्थकुमुद्वतीला विकसित करीत नाहीं. अहं अशा या अभिमानाचा नाश झाला असतां नरक, स्वर्ग, मोक्ष इत्यादिकाविषयींची इच्छाही पार नाहींशी होते. हृदयामध्यें अहंकार-मेघ जोंपर्यंत स्थिर असतो तोंपर्यंत तृष्णारूपी कुड्याची मंजिरी विकास पावते. अहंकाररूपी ढग चेतनेचें आक्रमण करून राहिला असता अंधकारच पसरतो. प्रकाश मुळींच नाहीं. हा असत्-अहंकार स्वतः मिथ्याकल्पित जरी असला तरी तो दुःखाला कारण होतो. हर्षाला नव्हे. व्यर्थ कल्पिलेला हा अभिमान अनंत संसार देणाऱ्या मोहात पाडतो. 'हा देहच मी' या दुर्मतीसारखी अनर्थभूत मति या संसारांत दुसरी कोणतीही नाहीं. सर्व दुःखें अहंकारामुळें होतात. ज्यानें अहंकाररूपी महा विषवृक्षाचा अंकुर विचारपूर्वक समूळ उपटून टाकला आहे त्याच्या हृदयात ज्ञानतृण जोरानें वाढतें. कारण अहंभाव हाच अक्षय जन्मवृक्षांचा अंकुर असून हें माझें या त्याच्या सहस्रावधि शाखा आहेत. परंतु तो वृक्ष आणि त्याच्या शाखा जणु काय कावळ्याच्या उडीनेंही कोसळून पडण्यासारख्या निर्बल असतात. कारण त्यांना उलथून पाडा-वयाचें झाल्यास ज्ञानावाचून दुसरें कोणतेंच साधन लागत नाहीं. अहंभा-वनाच आत्म्याला संसारचक्रात पाडणारी आहे. जन्मरूपी अरण्यामध्यें जोंवर अहंभावरूपी अंधकार पसरलेला असतो तोंवरच त्यात या चिंतारूपी

मत्तपिशाचिका धांवत असतात. ज्या नराधमाला अहंकार पिशाचानें पछाडलें आहे त्याला शास्त्रें, मंत्र, तंत्र इत्यादि कांहीं लाभ देत नाहींत.

**श्रीराम**—भगवन्, कोणत्या उपायानें अहंकाराची वृद्धि होत नाहीं, तें मला संसारभयशांत्यर्थ सांगा.

**श्रीवसिष्ठ**—पूर्वोक्त आत्मस्वभावाचें सदा स्मरण करूं लागले असतां चित् जशीच्या तशी निर्मल रहाते आणि त्यामुळें अहंकाराची वृद्धि खुंटते. ही जगद्रूपी इंद्रजालश्री मिथ्या आहे. तेव्हां त्यांतील पदार्थांविषयीं राग-द्वेष करून काय करावयाचें आहे ? असा मनांत विचार करूं लागले म्हणजे अहंकार लीन होतो. ज्या पुरुषाला आपल्याविषयीं अहंभाव नसतो आणि दृश्यशोभेविषयीं आसक्ति नसते तो शांत व्यवहार करूं लागला तरी त्याचा अहंकार वाढत नाहीं. हा आंत असलेला मी व हें बाहेर असलेलें जग या—त्याज्य व ग्राह्य व्यवहारास निमित्त होणाऱ्या—दोन्ही दृष्टींचा क्षय झाला असतां व समभाव वाढला असतां अहंभावही उत्तरोत्तर क्षीण होऊं लागतो. मी द्रष्टा, हें चित्त दर्शन ( ज्ञानसाधन ) व हें जग दृश्य ही त्रिपुटी आणि त्यांतही हें शत्रुरूप असल्यामुळें त्याज्य व हें मित्ररूप असल्यामुळें ग्राह्य या भावाचा क्षय होऊन सर्वात्मतारूप समता रूढ झाली असतां अहंभाव दुर्बल बनतो.

**श्रीराम**—प्रभो, अहंकाराची आकृति कशी काय आहे ? त्याचा त्याग कसा करतां येतो ? तो सशरीर आहे कीं अशरीर ? आणि त्याचा त्याग केल्यानें कोणता लाभ होतो ?

**श्रीवसिष्ठ**—राघवा, या जगांत त्रिविध अहंकार आहे. त्यांतील दोन प्रकारचा अहंकार श्रेष्ठ असून तिसरा त्याज्य आहे. 'मी हें सर्व विश्व आहें. मी अच्युत परमात्मा आहें. मजवाचून या जगांत दुसरें कांहीं नाहीं.' हा अहंकार श्रेष्ठ आहे. हा मोक्षास कारण होणारा अहंकार तिसऱ्या प्रकरणांत ( सर्ग ११८ पृष्ठ ४७९ ) सांगितलेल्या चवथ्या व पांचव्या भूमिकेंतील जीवन्मुक्ताचे ठायीं असतो. तो बंध मुळींच उत्पन्न करीत नाहीं. मी सर्वांहून निराळा व अतिसूक्ष्म आहें अशा प्रकारचा जो अहंकार तो दुसरा शुभ अहंकार आहे. सहाव्या भूमिकेंतील जीवन्मुक्ताचे ठायीं असणारा तोही बंधाला कारण होत नाहीं. हात, पाय, कान, पोट, इत्यादि अवय वांनीं युक्त असलेला हा देहच मी आहें, अशा प्रकारचा जो मिथ्य

अभिमान तोच लौकिक व तुच्छ तिसरा अभिमान होय. या दुरात्म्याला वर्जच केलें पाहिजे. तो महाशत्रु आहे. हा चांडाळ ज्याला जर्जर करून सोडतो त्याचा पारमार्थिक अभ्युदय कधींही होत नाहीं. हा निर्दय शत्रु नानाप्रकारच्या मानस व्यथा देतो. याच्या योगानें कष्टी झालेले लोक संकटांत पडतात. यास्तव, बा सज्जना, या दुष्ट अहंभावाचा त्याग करून पहिल्या अहंभावाचा अंगीकार करावा. म्हणजे ईश्वर स्वत: अंत:करणात प्रकट होतो. मी देह नव्हे, असा निर्णय करून त्या लौकिक अहंकाराचा त्याग व अलौकिक शास्त्रीय अहंकाराचें ग्रहण करणें हें सर्व महात्म्याना मान्य आहे. दामादिकाना या भयंकर लौकिक अभिमानामुळेंच असह्य दु:खांत पडावें लागलें.

**श्रीराम**—गुरुवर्य, या तिसऱ्या अहंकृतीला चित्तातून पार धुवून टाकल्यानें पुरुषाला कोणता हितकर भाव प्राप्त होतो ?

**श्रीवसिष्ठ**—रामा, अगोदर कांहीं विचार न करिता तिचा त्याग करावा. म्हणजे ती जशी जशी कमी होऊं लागते तसा तसा साधक पर-पदापाशीं जातो. त्याचें स्वरूपसुख वाढतें आणि शुभ अहंकाराची भावना करूं लागल्याने तो थोडक्याच अवकाशात परम पदीं आरूढ होतो. पुढे त्या धन्य पुरुषानें शुभ अहंकाराचाही त्याग करून निरहंकार-स्थितींत काल घालवावा. म्हणजे सर्वोत्तम पदप्राप्ति होते. ‘हितवचन शभरदा सांगावे; पण अहितवचन एकदाही सांगू नये,’ असा न्याय असल्यामुळें रामा, मी पुन: एकदा सांगतों कीं, परमानंदाचा साक्षात्कार व्हावा म्हणून सदा सर्व प्रयत्नानें ही लौकिक दुरहंकृति सोड. कारण तो एक शरीरातील असाध्य रोग आहे. त्याला वर्ज करणें हेच परम श्रेय व परम पद आहे.. विचारानें या स्थूल लौकिक अहंकाराचा त्याग केल्यावर साधक कोणताही जरी व्यवहार करीत असला तरी अधोगतीस जात नाहीं. ज्याचा अहंकार शांत झाला आहे अशा अतितृप्त पुरुषाचे भोग-रूपी रोग वाढत नाहींत. पुरुषानें विषयोपभोगाचा स्वाद सोडला म्हणजे साधकाचें श्रेय त्याच्यापुढें चालून येतें. अहंकार हा आत्मग्रहण न करतां अनात्मग्रहण करविणारा मनाचा नेत्र आहे. पण तोच साधकाच्या प्रयत्नानें फुटला म्हणजे मग आत्म्यावाचून त्याला दुसऱ्या कोणाचा आधार रहाणार ? राघवा, भगीरथ प्रयत्नानें अहंकार सोड. म्हणजे तूं भवसागराचें उल्लंघन

करशील. देह मी नव्हे व त्याचें कांहीं नाहीं असें समजून आणि हें सर्व माझें आहे व मीच हें सर्व आहें अशी भावना करून पूज्य संवित् चित्तात स्थिर करावी. म्हणजे अनायासानें परम पद प्राप्ति होते ३१.

**सर्ग ३४**—भीमादि दैत्यांच्या हातून पराभूत झालेल्या देवांनीं हरीची प्रार्थना केली; त्यानें शंबरासुराला मारलें व वासनारहित भीमादिकही मुक्त झाले.

**श्रीवसिष्ठ**—रामा, दामादि सेनापती पळून गेल्यावर शंबरासुराच्या पर्वततुल्य नगरात काय झालें तें सांगतों ऐक. देवाच्या हातून पराभव पावलेल्या दैत्यसेनेचा वर सांगितल्याप्रमाणें विध्वंस झाला असता शंबरासुर कांहीं दिवस स्वस्थ राहिला व नंतर पुनः देवाच्या वधास उद्युक्त झालेल्या त्यानें असा विचार केला— मी आपल्या मायेनें दामादिकास निर्माण केलें होतें. पण त्या मूर्ख असुरानीं मिथ्या अहंकाराच्या अधीन होऊन सर्वस्वाचा नाश केला. यास्तव आता मी दुसऱ्या अध्यात्मशास्त्रज्ञ व विवेकी दैत्यास मायेनेंच उत्पन्न करतों. म्हणजे तत्त्वज्ञानानें युक्त असलेले ते मिथ्या भावनेचा त्याग करतील. त्यामुळें त्याना अहकार पिशाचाची बाधा होणार नाहीं आणि ते देवानाही जिंकू शकतील-असा विचार करून शंबरानें मायेनें समुद्रांतील तरगाप्रमाणें तसलेच दानव उत्पन्न केले.

ते सर्वज्ञ, आत्मतत्त्वज्ञ, विरक्त, निष्पाप, प्राप्त होईल तेवढेंच कृत्य करणारे व त्यामुळें सर्वोत्तम होते. शंबरानें भीम, भास व दृढ अशीं त्याचीं नावें ठेविलीं. वायु भक्षण करणारे ते सर्व त्रिभुवनाला तृणाप्रमाणें लेखित होते. ( पोटाची चिंता नसल्यामुळें ते इतके निःस्पृह झाले यात काहीं फारसें नवल नाहीं. ) ते तिघेही वीर शबराच्या आज्ञेनें भूमीवर आले व त्यांनीं अतरिक्षास आच्छादित करून सोडून पावसाळ्यातील मेघांप्रमाणें भयंकर गर्जना करण्यास आरंभ केला. तेव्हां देवही त्यांच्याशीं युद्ध करावयास आले. उभय पक्षाचें रोमहर्षण युद्ध पुष्कळ वर्षे होत राहिलें. पण भीमादिदैत्य विज्ञानी असल्यामुळें अहंकारवश झाले नाहींत. कारण 'हें माझें' इतकी वासना जा त्यांच्या मनांत येत आहे तोंच 'मी कोण ?' हा विचार उत्पन्न होऊन तत्काळ ती (वासना) असत्य ठरत होती. आमचीं शरीरें व हे देवही जर असत आहेत तर आम्ही भ्यावें कोणाला व कां ? शिवाय मी कोण ? हा विचार त्यांच्या चित्तांत सतत जागत असल्यामुळें भयाचा उदयच झाला नाहीं.

हें असत् शरीर मुळीं नाहींच. शुद्ध चित्त आपल्या स्वरूपामध्यें स्थित आहे आणि त्यामुळें अहं म्हणून कोणी नाहीं; अशा दृढ निश्चयानेंच ते सदा व्यवहार करीत. असो; अनेक वर्षे युद्ध केल्यावर त्या निरहंकार, जरा-मरणाविषयीं निर्भय, प्राप्त होईल तेवढेंच करणाऱ्या, प्रसंग पडेल तसें वागणाऱ्या, कोठेंही सक्त न होणाऱ्या, शत्रूस मारूनही अहंकार न करणाऱ्या, वासनाजाळ्यातून मुक्त झालेल्या, प्रभूचें हें कार्य अवश्य केलें पाहिजे एवढेंच समजणाऱ्या, राग-द्वेषशून्य व समदृष्टी दानवांनीं देवसेनेचा विध्वंस करून सोडला. भीम, भास व दृढ या शूर दैत्यांनीं तिला तुडवून सोडलें. तेंव्हा ती दीन झालेली देवसेना हिमालया-वरून निघालेल्या गंगेप्रमाणें वाट फुटेल तिकडे पळून गेली. इंद्रादि देव क्षीरसागरस्थ भगवानाला शरण गेले. तेंव्हा लोकनाथ हरीनें त्यांचें सांत्वन करून युद्धाची तयारी केली. शौरी व शंबर यांचें घोर युद्ध झालें. त्यांत तो मायावी दैत्य महा मायावी विष्णूच्या हातून मरण पावला आणि त्याच्याच स्वरूपांत लीन झाला. ज्ञानी भीमादिकांनाही त्या लक्ष्मीशानें आपल्या स्वरूपांत मिळवून सोडलें. ते वासनाशून्य असल्या कारणानें, वि-झलेल्या दिव्याप्रमाणें त्यांची गति कोणालाही कळली नाहीं. तस्मात् राम-भद्रा, मन वासनेनें बद्ध होतें आणि तेंच वासनाशून्य झालें असतां मुक्त होतें. यास्तव तूंही विवेकतः निर्वासनी-भाव संपादन कर. सत्य वस्तूचें यथार्थ ज्ञान झालें असतां वासना क्षीण होते. वासनाक्षय झाला म्हणजे मन नाश पावतें. हा सत्य चिदात्मा ज्या दृश्याची भावना करितो त्यांतील कांहींही सत्य नाहीं. त्यामुळें दृश्यभावना (दृश्यदर्शन) ही मिथ्या आहे, असें जाणून बाकी रहाणाऱ्या स्वप्रकाश चिन्मात्राचें दर्शन घेणें, त्याचें वारं-वार स्मरण करणें व त्याच्याकडे सतत अनुसंधान ठेवणें हेंच सत्य वस्तूचें यथार्थ ज्ञान आहे. आत्माच हें सर्व आहे. तेंव्हा कोण, कोठें, कशाची भावना करणार! फार काय पण दृश्याची वासनाही नाहीं, असें समजणें हें यथार्थ ज्ञान होय. वासना व चित्त हे दोन शब्द त्याच्या अर्थासह जेथें लीन होतात तें परम पद होय. वासनायुक्त चित्त हीच जगत्स्थिति व वासनाराहित्य हीच मुक्ति. अनेक विषयाच्या आकारानें चित्ताची स्थिति झाली आहे. यास्तव त्याला विषयाकार न होऊं देतां शांत करावें.

माझ्या प्रिय व सद्गुणी शिष्या, तुला दामादिकांचा न्याय प्राप्त न होवो. भीमादिकाचा न्याय तुझ्या ठायीं अचल निवास करो. हीं दोन्हीं आख्याने मला ब्रह्मदेवानें मागें सांगितलीं होतीं. असो; रामा, ही भयंकर संसार-वाट मोठमोठ्या सुख-दुःखमय कांट्यांनीं दुर्गम झाली आहे. तथापि विषयांमध्यें आसक्त न होणें याच दृढ पादुका पायांत घालून तत्त्वबोधरूपी दंड हातांत घेतला असता तिचे सहज उल्लंघन करतां येतें. यास्तव तूं निराश होऊ नकोस. प्रयत्न कर ३४.

**सर्ग ३५**—*सत्संग, विवेक, आत्मज्ञान व समाधि यानीं युक्त असलेला भोगेच्छा-त्याग हाच शमाचा उपाय आहे.*

**श्रीवसिष्ठ**—ज्यानीं आपल्या विषयोन्मुख मनाला जिंकलें आहे त्या महाशूर साधूंचा जय-जयकार असो. सर्व उपद्रव देणाऱ्या या संसाररूपी दुःखाच्या नाशाचा—आपल्या मनाचा निग्रह करणे—हा एकच उपाय आहे. ज्ञानसर्वस्व ऐकावें. त्याच्या अर्थाविषयीं निश्चय करावा. पण इतकें करूनही भोगेच्छा न सोडल्यास तो सर्व व्यर्थ खटाटोप होत असल्यामुळे मनो-निग्रहासाठीं प्रथम भोगेच्छा टाकावी. कारण भोगाची इच्छा हाच बंध व तिचा त्याग हाच परंपरेनें मोक्ष आहे. अनेक ग्रंथाचा भार वाहून काय करावयाचें आहे? तू आधीं एवढें कर—या सृष्टींत जे जे रम्य वाटेल ते ते सर्व विषाप्रमाणें अनर्थकर आहे असे समज. विचार न करिता सहसा केलेला विषयत्याग अति दुःखद होतो. पण चांगला विचार करून गुरु व शास्त्र यानीं सांगितलेल्या क्रमानें त्याग केला असता तो सकृद्दर्शनीं जरी थोडासा कडु वाटला तरी परिणामी महासुख देतो. चित्तात भोग-वासना असल्या म्हणजे त्या पुनः पुनः विषयाचे स्मरण करून देऊन राग-द्वेषादि दोषास उत्पन्न करितात. जी मति वासनाजाळ्यात अडकलेली नसते व त्यामुळें जी रागादि दोषरहित असते ती चांचल्यरहित होऊन हळु हळु शांत होत जाते. जशी चांगली जमीन नानाप्रकारचें धान्य प्रसवतें त्याप्रमाणें शुभमति, ज्याच्यापासून ग्लानि कधींही येत नाहीं, अशा शांति, दांति, इत्यादि सद्गुणयुक्त व ज्ञान-समाधि-विश्रांति-लक्षण मोक्षफल देणारें अंकुर प्रसवते. शुभ भावाचें अनुसंधान केल्यामुळें मन प्रसन्न झालें असतां, मिथ्या अज्ञानरूपी महा मेघ हळु हळु शांत झाला असतां, शुक्लपक्षांतील चंद्राप्रमाणें सौजन्य वृद्धि पावलें असता,

आकाशांत जसें सूर्याचें तेज त्याप्रमाणें पुण्यकारक विवेक पसरला असतां, वेळूंतील मोत्याप्रमाणें अंतःकरणात संतोष अथवा इंद्रियनिग्रहाचें धैर्य पुष्ट होऊं लागलें असतां, वसत-ऋतूंतील चंद्राप्रमाणें आत्मसौख्याचा लाभ झाल्यानें मानसिक स्थिति कृतार्थ झाली असतां, सत्संगरूपी सफळ व शीतळ छायाप्रधान वृक्ष फळास आला असता, आणि समाधिरूपी देवदारुवृक्ष आनंदरूपी सुरसाचा स्राव करू लागला असता, मन निर्द्वंद्व, निष्काम व निरुपद्रव होतें. चापल्य, अनर्थ, शोक, मोह व भय या रोगानीं रहित होतें. शास्त्रार्थाविषयींचे त्याचे सर्व संदेह क्षीण होतात. विचित्र विषय पहाण्याची उत्कंठा नाहींशी होते. कल्पनाजालाचे निरसन होते व तें (मन) मोहशून्य बनतें. तें इच्छारहित, दयाभावरहित, निरपेक्ष, प्रवृत्त्युन्मुखतारहित, आधिरहित, शोकरहित, असक्त व आसंगशून्य होतें. आत्मा कसा आहे, तो कोणता ? कोणत्या साधनानें प्राप्य आहे, ज्ञान म्हणजे काय, साधनें कोणतीं इत्यादि अनेक वाद्यांच्या भिन्न भिन्न कल्पनामुळें उत्पन्न झालेले अनेक संदेह हेच उग्र पुत्र, अनेक मनोरथरूपी आप्त, तृष्णारूपी स्त्री व स्थूल शरीररूपी पिंजरा, यानीं युक्त अशा आपल्याला (मनःस्वरूपाला) मारूनच ते आत्मसंबंधीं ऐश्वर्य (म्हणजे पुरुषार्थ) प्राप्त करून घेतें. (आता मन कोणत्या क्रमाने आपला नाश करून घेतें तें सांगतों.) प्रथमतः आपल्या पुष्टीला कारण होणाऱ्या संकल्पास ते सोडते. हा माझा मित्र आहे, हा शत्रु आहे, हे चागलें आहे, हें वाईट आहे इत्यादि प्रकारचे विकल्प मनाला पुष्ट करीत असतात. वास्तव यांना उत्पन्न करण्यास जसे मी समर्थ आहें तसेंच याचा निग्रह करण्यासही मी समर्थ आहे, या गोष्टीचें स्मरण करून ते आपल्या देहाकार कल्पित रूपास तृणाप्रामाणें टाकून देतें. म्हणजे जोंपर्यंत देहाहभावाने वासित झालेलें मन देहाकार होत असते तोंपर्यंतच देहास अनुकूल असलेल्या विषयाचे ठायीं राग व प्रतिकूल असलेल्या विषयाविषयीं द्वेष त्याला वाटतो व रागद्वेषामुळें सहस्रवधि विकल्प उठून ते वाढते. पण तोच देहाहभाव नाहींसा झाला म्हणजे 'बीज नास्ति कुतः शाखा' बीज नाहीं, मग शाखा कोठच्या या न्यायानें रागादिकाचा क्षय होऊन ते स्वतःही क्षय पावतें. पण तें स्वतःच आपल्यावर असा अनर्थ कसा ओढवून घेईल ? म्हणून म्हणशील तर सांगतों. आत्मभूत मनाचा उभ्युदय म्हणजेच आत्मनाश असून

मनाचा नाशच सर्व-अनर्थ-निवृत्तिरूप व निरतिशय आनंदाभिव्यंजक असल्यामुळें खरा अभ्युदय आहे. ब्रह्म व आत्मा यांचें ऐक्यज्ञान ज्याला झालेलें असतें त्याचें मन शांत होतें व अज्ञाचें मन वाढतें. पण पुष्कळ खत घातल्यामुळें जोरानें फोंफावणाऱ्या शेताप्रमाणें अज्ञानादि दोषामुळें मनाची भयंकर वाढ होऊं लागली असता अनर्थ ओढवतात. कारण जगच्चक्र मनोमात्र आहे. मनच पर्वतसमूह आहे. मनच आकाश, मनच देव, मनच मित्र व मनच शत्रु आहे. विकल्पाच्या योगानें कलुषित झालेली जी चित्-तत्त्वाची विस्मृति तेंच मन होय. आत्म्याच्या विस्मरणामुळें उद्भवणाऱ्या नाना विकल्पवासना हेंच मनाचें त्याज्य रूप आहे. (आतां असल्या मनाच्या योगानें बद्ध होणारा जीव कोण, ते सागतों) मनामध्यें वासनारूपानें विषयांचा प्रवेश झाला असतां त्याच्या योगानें परिच्छिन्न झालेल्या चिन्मात्रात स्थित असें जें विकल्पवासना-कलुपित ब्रह्म तोच जीव होय. जीव व मन यामध्ये फारच थोडें अंतर आहे. विषयाभिमुख होऊन, दृढ अभ्यासामुळें, तो विषयच मी आहें, असें वाटणें व त्याच अज्ञानामुळें आत्मस्वरूपाला विसरणे हें जीवाचे रूप व तेंच जेव्हा हजारों संकल्प करून मोह पावतें, सारभूत स्वस्वभावापासून दूर जातें व बाह्य पदार्थांशीं संबद्ध होतें तेव्हा जीवाचें उपकरण मन होतें. एकाच आत्मस्वरूपाच्या विस्मरणाला निरनिराळ्या अवस्थेंत दोन सज्ञा प्राप्त झाल्या आहेत. तें जेव्हा अहं अशा अभिमानानें युक्त असतें तेव्हा जीव व जेव्हा त्याचें सकल्पद्वारा उपकरण होतें तेव्हा मन होय. आता जीव व त्याची उपाधि मन याहून अगदीं विलक्षण असलेलें शुद्ध आत्मस्वरूप कसें असतें ते सागतों. आत्मा ससारी पुरुप (ह्म. जीवस्वभाव) नव्हे, शरीर नव्हे व त्यातील रक्तादि नव्हे. कारण शरीरादि सर्व जड आहे आणि देही (देहस्वामी आत्मा) आकाशाप्रमाणें निर्लेप आहे. आता शरीर जडच आहे हें कशावरून म्हणून विचारशील तर सांगतों—शरीराचे लहान लहान तुकडे जरी केले तरी त्यात रक्त, मांस, अस्थि यांवाचून दुसरें कांहीं आढळत नाहीं. केळीचा खाब सोलला असता त्यांत जसें पाना (सोपटा) वाचून दुसरें कांहीं नसतें, तसेंच शरीरांत सप्त धातूंवाचून काहीं नसतें. ते तर प्रत्यक्ष जड आहेत. यास्तव त्याच्या योगानें बनलेलें शरीर जडच असणार हें उघड होय. साकार मनच नर

होय. तो आपल्या विकल्पानेंच, आपल्या बंधाकरितां, कोशकार कृमीप्रमाणें, जाळें पसरतो. एक देहभ्रम सोडून दुसऱ्या देशीं व दुसऱ्या काळीं तो दुसरें शरीर धारण करतो. एके ठिकाणचा अंकुर दुसऱ्या ठिकाणीं नेऊन लावला असतां त्याला जशीं तेथें नवीं पानें येतात त्याचप्रमाणें जीवाची अवस्था होते. वासनेप्रमाणें मन होते. मोठ्या शुभ वासनेनें तें मोठें होतें. इंद्रपदाविषयीं मनोराज्य केले असता नर योग्यसमयीं इंद्रपदास प्राप्त होतो. त्याचप्रमाणें क्षुद्र वासनेच्या योगानें चित्त क्षुद्र होतें. पिशाचाविषयीं मनोरथ केला असता पुरुष रात्रीं स्वप्नात भुतें पहातो. सरोवराच्या अति निर्मल जलामध्यें मळ फार वेळ टिकत नाहीं आणि अति मलिन जलामध्यें निर्मलता फारशी टिकत नाहीं, हें प्रसिद्धच आहे. त्याचप्रमाणें कलुषित मनामध्यें तसलेच फळ निपजतें व शुद्ध मनामध्यें शुद्ध फल उत्पन्न होतें. चंद्र अमावास्येच्या दिवशीं जरी अगदीं क्षीण झाला तरी तो 'मी पूर्ण होईन' ही आशा जशी सोडीत नाहीं त्याप्रमाणें उदार पुरुष राष्ट्रीय आपत्तीमुळें जरी संकटात पडून चित्तसमाधानरहित झाला तरी तो उद्यमशील महात्मा आपली उदार गति सोडीत नाहीं. तो चित्तसमाधानाकरिता पुनः दीर्घ प्रयत्न करतो. अथवा कितीही जरी बाह्य संकटे आलीं तरी बंध, मोक्ष, सुख, दुःख इत्यादिकातील काहींच सत्य नसल्यामुळे तो त्याची तितिक्षा करतो.

सर्वत्र एक ब्रह्मसत्ता पसरली आहे, हा निःसार संसार असन्मय स्फुरण पावत आहे. असें महात्मे निश्चयाने जाणत असतात. मी मर्यादित व दीन, दुर्बळ आहें ही त्याची भावना मी अनंत व ईश्वर आहें या भावनेनें पार नाहींशी झालेली असते. सर्वगामी स्वच्छ स्वात्म्यामध्ये 'हा मी' अशी संकुचित भावना करणें हेंच संकल्पजन्य बंधन होय. बंधमोक्ष दशाहीन व द्वित्व-एकत्वरहित अशी ही सर्व ब्रह्मसत्ता आहे. अति निर्मलतेमुळें ज्याचें मरण समीप आलें आहे, असें कोठे सक्त न होणारें मन अमन होऊन याच शरीरात ब्रह्म पहातें. 'चित्तशांतीच्या अभ्यासरूपी जलानें निर्मल झालेलें मन ब्राह्मी दृष्टी धारण करतें. सर्वच माझा आत्मा आहे, या भावनेनें ग्राह्य व त्याज्य ह्या भावाचे बल क्षीण झालें असतां बंध व मोक्ष-कल्पनाही सोडावी. हें जग आत्माच आहे या भावाशिवाय जगच्छ्री कधींही सुखकर होत नाहीं. जल निराळें व

तरंग निराळा असें जाणणें ही अज्ञता व जलच तरग आहे असें समजणें ही ज्ञता आहे. नानात्व असत् असल्यामुळें तें दुःख, जन्म, मरण इत्यादिकाचें अनुसरण करतें. म्हणून तें त्याज्य व आत्मतत्त्व दुःखादिकांनीं रहित असतें, म्हणून ग्राह्य होय. मन असत् असल्यामुळें त्याचा जरी विनाश झाला तरी दुःख होत नाहीं. कारण मृगजळाचा नाश झाल्यास त्याबद्दल शोक काय करावयाचा आहे ? त्याच्यावर प्रेम नसतें अशा बंधूविषयींही जसा एकादा व्यवहारी पुरुष उदासीन असतो त्याप्रमाणें रामा, तूं या देहपंजराविषयीं उदासीन रहा. स्नेहशून्य बंधूच्या सुख-दुखांनीं पुरुष जसा सुखी व दु खी होत नाहीं त्याप्रमाणें मृतांचा सघ अशा या देहाच्या सुखदुःखानीं तू सुखी-दुःखी होऊ नकोस. दृक्-रूप ज्ञान अनादि व शिवरूप आहे. वारा बद झाला असता धूळ जशी भूमीवर शात होऊन रहाते त्याप्रमाणें सकल्प-विकल्प-वायु शात झाला असता मनरूपी धूळ सत्य शिवरूप आत्म्यामध्यें शात होऊन रहाते. मनोरूपी वायु शात झाला असता देहरूपी धूळही उडेनाशी होते व त्यामुळे ससारनगरांत सूर्यप्रकाशास प्रतिबध करणारें दुर्दिन कधींही होत नाहीं. वासना, जाड्य, तृष्णा, मनोरथ, इंद्रियविलास, मिथ्याज्ञान व मोह याचा क्षय झाला असता अज्ञान पार कोठें निघून जातें. देहरूपी पर्वतावरून भयरूपी क्षुद्र नद्या वहात नाहींत. शरद्-ऋतूंतील आकाशाप्रमाणे चिदाकाश स्वच्छ होतें. ज्याचा महा-उदय झाला आहे असा जीव-सूर्य स्वच्छ तळपू लागतो आणि सात्त्विक आशारूपी महा दिशा शोभू लागतात.

साराश रामभद्रा, परम आनंद देणारा आत्मप्रकाश प्राप्त झाला असतां विवेक अति पवित्र व सफल होतो. सर्व त्रिभुवन अति स्वच्छ व शीतल होतें. विस्तृत हृत्सरोवर अति निर्मळ होतें आणि त्यातील अहकाररूपी महा ग्राह कोठें नाहींसा होतो. सर्व सदेहशून्य, सर्वगामी, सर्वनायक, वासना-रहित व शातचित्त ज्ञानी स्वदेहरूपी नगराचा ईश्वर होतो ३५.

**सर्ग ३६**—स्वभावतःच असक्त चित् सर्वत्र स्थित आहे व तिच्या स्थितीनेंच सर्व भावांची स्थिति होते.

**श्रीवसिष्ठ**--रामा, पुढें उत्पन्न होणाऱ्या अव्यक्त लाटा जलामध्यें जशा स्थित असतात त्याप्रमाणें सर्व सृष्टी चित्-तत्त्वांत असतात पण आकाश सर्वगामी असूनही सूक्ष्मत्वामुळें जसें साक्षात् अनुभवास येत नाहीं त्याप्रमाणें

निरश चिद्भाव सर्वत्र असूनही दिसत नाहीं. रत्नातील प्रतिबिंबाप्रमाणें ही आत्म्यांतील सृष्टि सत्यही नव्हे व असत्यही नव्हे. आकाशाच्या आधारानें रहाणाऱ्या मेघाना आकाश जसें स्पर्श करीत नाहीं त्याप्रमाणें चैतन्याच्या आधारानें रहाणाऱ्या चैतन्यस्थ सर्गांना परा चित् स्पर्श करीत नाहीं. जलाशीं संयुक्त झालेले किरण स्पष्ट भासत नाहींत. पण तेच त्यात प्रतिबिंबित झाले असता स्पष्ट दिसतात. त्याप्रमाणेच पुर्यष्टकात्मक देहामध्यें मात्र चित् स्पष्ट दिसते इतरत्र दिसत नाहीं. ती वस्तुतः सर्वसकल्पशून्य, सर्वसज्ञारहित, व नित्य आहे. तीच विषयरूप झाली आहे. ती आकाशाहून शतपट स्वच्छ व शतपट सूक्ष्म आहे. विद्वानाच्या ठायीं ती निष्कलरूपिणी ( कलाशून्य ) असते. समुद्रातील तरंगाप्रमाणे चित्सागरातील ही त्वत्ता-मत्ता-मयी नानाता चिन्मात्रसत्तेहून भिन्न नाहीं. चित्-मुळें विषयस्फुरण होतें, हें जर खरें आहे तर विषयाचे खरें स्वरूप अथवा त्याना सत्ता देणारी चित्च आहे, असें समजण्यास कोणती अडचण आहे? पण अज्ञ पुरुष या परमार्थ दृष्टीचा आश्रय न करिता चित् निराळी व चेत्य ( विषय ) निराळे असें समजतो. त्यामुळें अज्ञामध्ये असलेली चित् असत्स्वभाव असल्याप्रमाणे होऊन उग्र ससार समूहाचे बीज धारण करते. पण तीच ज्ञानी पुरुषाचे ठायीं प्रकाशात्मिका व सकल-एक-रूपा होऊन रहाते. तिच्या अनुभवस्वभावामुळेंच सूर्यादिकाचें ज्ञान होते. तीच सर्वभूताच्या विषयस्वादाचे निमित्त आहे. तीच सर्व जीवाच्या जन्मादिकाचें कारण आहे ती स्थूल व सूक्ष्मशरीराहून भिन्न असल्यामुळे वस्तुतः कधीं उदय पावत नाहीं, कधीं अस्त पावत नाहीं, कधीं उठत नाहीं, बसत नाहीं, येत नाहीं, जात नाही. ती येथें आहे असेंही नाही व नाहीं असेंही नाहीं. तर ही चित् निर्मलाकार व आत्मस्वरूपात स्थित आहे. तेजःपुजापासून जसे तेज किंवा जलपूरातून जसे जल शतधा बाहेर पसरूं लागतें त्याप्रमाणे या चित्-पासून शतशः सर्गसंभ्रम उद्भवतात. स्वतः शुद्ध अशाही चैतन्याचें अविद्येमुळें सर्गसंभ्रमानीं स्फुरण होणे हेंच सर्गकर्तृत्व आहे व त्या कारणानेच एक शुद्ध व दुसरें औपाधिक अशीं त्याचीं दोन रूपें मानलेलीं आहेत. तीं कशीं तें सागतों—तें स्वभावानें चित् व व्यवहारतः सर्वग आहे. परमार्थतः प्रकाश व मी स्वतःला जाणत नाहीं, असा व्यवहार होत असल्यामुळें, अप्रकाश आणि वस्तुतः निरंश व व्यवहारतः साश आहे. अविद्येंत प्रतिबिंबित होणें या

कृत्रिम वेषामुळें तें आपल्या स्वतःसिद्ध अनंतस्वरूपास विसरून 'मी मनुष्य आहें' इत्यादि भावानें जीवतेस प्राप्त होते. नंतर नानापणा रूढ झाला म्हणजे आहे, नाहीं, ग्रहण करणें, इत्यादिकाच्या उपयोगीं असलेला देहभाव स्थिर होतो व संसारप्रवाह निघतो. याप्रमाणें पुर्यष्टकावर आत्मभावाचा आरोप करून विहित व निषिद्ध कर्मांच्या योगानें तें चैतन्य भोग्य जग करतें. पण वस्तुतः तें करीत नाहीं. तेंच भूमींतील बीजापासून अंकुररूपानें वर येतें. त्याला तेंच आकाशरूपानें अवकाश देतें. स्पंदरूप वायु त्याला घालवून वर काढतो. जलरूपानें तें चैतन्यच रस देतें. पृथ्वीच्या रूपानें तेंच त्या अंकुराला दृढ करते. तेजामुळें त्याला रूप प्राप्त होतें. याप्रमाणें जगातील सर्व कार्यांना सर्व वस्तु आपापल्या स्वभावाप्रमाणें सहाय करितात. कालही वस्तुमात्रावर सतत उपकार करीत असतो. तो कोणाला क्षीण करतो, कोणाला उत्पन्न करतो, कोणाला वाढवितो, कोणाला अनुकूल होतो व कोणाला प्रतिकूल बनतो. पण हा सर्व चित्‌चा विलास आहे. चित्‌च स्वतः अनुग्राह्य व अनुग्राहकही आहे. ती पुष्पामध्यें सुगंध, फळामध्यें रस व वृक्षामध्ये कठिण काष्ठ होते. तिच्या योगानेंच मुळातील सूक्ष्म रस फळामध्ये परिपक्व रस होतात, पानात शिरा होतात. व नानाप्रकारच्या फुलांत नानाप्रकारचे रंग होतात. चित् वसंत-ऋतूच्या रूपानें नवीं पुष्पें, पल्लव इत्यादिकाच्या उत्पत्तीस सहाय करते. तिच्या सत्तेनेंच ग्रीष्मऋतूंत सूर्यदाहाच्या योगानें सर्व संतप्त होतें, वर्षासमयीं मेघांची क्रीडा चालते, शरत्समयीं शेतें पिकतात, हेमंतात दश दिशा धुंद होतात व शिशिरात पाणी गोठून बर्फ होतें. कालरूपी चित् याप्रमाणें सृष्टिमर्यादेवर अनुग्रह करीत असते. तिच्या माहात्म्यानेच, नदीच्या तरंगाच्या ओघाप्रमाणें, या सृष्टी लीलेनें चालल्या आहेत. नियतीच्या रूपानेंही चित्‌च जगाच्या प्रलयापर्यंत स्थिर रहाते. चवदा भुवनात रहाणाऱ्या चवदा प्रकारचीं —नानाआकार, नाना विहार व नाना रचना यानीं युक्त असलेलीं—भूतें ही चित्‌च पुनः पुनः होते व नाश पावते. पण जल नाहीसें झालें म्हणजे बुडबुड्यांची परंपरा जशी आपोआप क्षीण होते त्याप्रमाणें या कारणभूत चित्-ला ओळखलें ह्मणजे भूताची धारेसारखी सतत चालणारी जन्म-मरण-परंपरा तुटते. सारांश, रामभद्रा, याप्रमाणें ब्रह्मांडकोटि-लक्षण व प्राणि-कोटि-लक्षण अशी ही दुष्ट जनता, प्राक्तन वासनावशात् वेड्याप्रमाणें

या लोकीं जन्मद्वारा येते, मरून परलोकीं जाते, सर्वतः स्थावरादि जन्मांच्या योगानें रहाते, भोगांच्या इच्छेनें अनेक ऐहिक व पारलौकिक विषयांचें उपार्जन करते व जन्म–नाशांच्या द्वारा या संसारांत धावते ३१.

**सर्ग ३७**—आत्म्याचा हा अनात्मभाव अविद्या, काम व कर्म यांच्या योगानें उद्भवतो आणि ज्ञान, वैराग्य, नैष्कर्म्य यांच्या योगानें स्वरूपावस्थिति प्राप्त होते.

**श्रीवासिष्ठ**—रामा, याप्रमाणे ब्रह्माच्या स्वभावापासून या सर्व अतिस्थिर आकाराच्या जगत्पंक्ती सर्वतः उद्भवतात व लय पावतात. एकमेकास कारण होणाऱ्या असंख्य वस्तूंनीं भरलेलें हें जग अधिष्ठान-चैतन्यापासून झालें आहे व एकमेकाच्या निमित्ताने नाश पावणारे त्यांतील पदार्थ अधिष्ठानांतच लीन होतात. अगाध जलाच्या मध्यभागीं जलरहित प्रदेशच नसल्यामुळें तेथील जलस्पंदही जसा वस्तुत. अस्पद, त्याप्रमाणें असत् व सत् अशी ही सर्व चित्‌च दिसत आहे. निराकार आकाशामध्यें सूर्यकिरणामुळें जसे मृगजळाचे प्रवाह दिसतात त्याप्रमाणेंच या चित्-तत्त्वामध्यें सृष्टिकल्पना अनुभवास येतात. मदवशात् आपलेंच स्वरूप आपल्याला जसे निराळेंच दिसतें, त्याप्रमाणे चित्त्वधर्मामुळें चिद्धातु जड असल्यासारखा भासतो. जगाचा अनिर्वचनीय स्वभाव आहे. त्याला सत्, असत्, स्थिर, अस्थिर, भिन्न, अभिन्न इत्यादि कांहींच म्हणता येत नाहीं. हे रामा, ज्याच्या योगानें तू शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध जाणतोस तो आत्माच परब्रह्म असून सर्वत्र व्यापून राहिला आहे. नानात्व व एकत्व यांचा ज्याला स्पर्शही नाहीं अशा अमल आत्म्याच्या ठायीं द्वितीय ही कल्पनाच कशी होणार ? सर्व सत्, असत्, शुभ, अशुभ इत्यादि सृष्टी वासनावशात् कल्पिलेल्या असल्यामुळें त्या सर्व मायिक आहेत. अथवा तत्त्वदृष्ट्या त्या सर्व आत्ममात्र आहेत. ही अमुक एक वस्तु आत्म्याहून निराळी आहे असें वाटलें म्हणजे तिच्याविषयीं इच्छा होते, हें युक्तच आहे. पण सर्व आत्माच आहे, त्याच्याहून भिन्न दुसरें कांहीं नाहीं असें जेव्हा साक्षात् कळतें तेव्हा ज्ञानी कशाच्या इच्छेने, कशाचें स्मरण करीत इतस्ततः धावणार ? अथवा धावून तरी त्याला आत्म्यावाचून काय मिळणार ? हें इष्ट आहे, हें अनिष्ट आहे, हे विकल्प आत्म्याला स्पर्श करीत नाहींत. यास्तव निरिच्छता बाणली म्हणजे कर्ता, करण व कर्म यांचें ऐक्य झाल्या कारणानें, ज्ञानी कांहीं

करीत नाहींत. आधार व आधेय यांचें ऐक्य असल्यामुळें तो कोठेंही मर्यादित होऊन रहात नाहीं. इच्छा नाहींशी झाली म्हणजे द्वैत-कल्पनाच क्षीण झाल्यामुळें नैष्कर्म्यही इष्ट वाटत नाहीं. रामा, हीच ब्रह्मस्थिति आहे. तूं याहून भिन्न कल्पना करूं नकोस. पण तशी भिन्न कल्पना जर होतच असेल तर तूं सर्व द्वंद्वरहित व संतापशून्य होऊन खुशाल कर्मकर्ता हो. मग तुझे मी निवारण करणार नाहीं. शिवाय हे रामभद्रा, मोठ्या वेगाने मी कर्ता आहे, असें समजून व वारंवार हें नानाप्रकारचे कर्म करून तू शरीरगत भूताच्या पुष्टीस कारण होणाऱ्या विषयावाचून दुसरें काय मिळविणार, तें साग पाहूं ? त्यापासून कोणतेंही उचित फळ मिळणें शक्य नाहीं. यास्तव सर्व प्रकारचा कर्तृत्वाभिनिवेश टाकून तू स्वस्वरूपोचित अकर्तृत्वामध्यच आस्था ठेव. कारण श्रुति व गुरु याच्या वचनानीं तुला आत्मबोध झाला आहे. आता वातरहित सागराप्रमाणें तूं निश्चल, स्वस्थ व स्वच्छ हो. बाबारे, ज्याच्या योगानें अनत सुखाचा लाभ होऊन इच्छा पूर्ण होईल असें साधन, प्रत्येक दिशेच्या टोंकापर्यंत जरी भटकत गेलें तरी, अति यत्नशील पुरुषालाही, प्राप्त होणें शक्य नाहीं, असा निश्चय करून, रामा, तू मनानेही बाह्य पदार्थांकडे जाऊ नकोस. तूं देहाने मर्यादित झालेला जीव नव्हेस. तर पूर्ण-आनंद-चिदात्मा आहेस ३७.

**सर्ग ३८**—आत्मा असंग आहे असे न जाणणाराना मन संगामुळें कर्तृता प्राप्त होते. पण ज्ञानी मी कर्ता व भोक्ता नव्हे असें जाणतो त्यामुळें त्याला बंध नाहीं.

**श्रीवसिष्ठ**--राघवा, तत्त्वज्ञ व अतत्त्वज्ञ याच्या कर्मामध्यें भेद आहे. एक कर्में करीत असतानाही हीं असत आहेत व मी कर्ता नव्हे, असे जाणतो व दुसरा तीं सत्य आहेत व मी कर्ता आहें असें समजतो. अर्थात् 'मी याचा कर्ता' अशा प्रकारची वासना हेच कर्तृत्व होय त्यामुळेंच चेष्टेप्रमाणे फळभोक्तृत्वही उद्भवते. वासनेप्रमाणे पुरुष चेष्टा करतो. व चेष्टेप्रमाणें फलभोग घेतो. अर्थात् फलभोक्तृत्व हा कर्तृत्वाचा परिणाम आहे. शारीर क्रिया होणें म्हणजे त्या क्रियेचा कर्ता होणें नव्हे. तर ही अमुक क्रिया मी अमुक फलाकरिता करितों, असा संकल्प करून शरीराची चेष्टा ( हालचाल ) करणें हे कर्तृत्व आहे. कोणत्याही अवस्थेंत मन वासनेप्रमाणें अनुभव घेतें. यास्तव ज्यांना तत्त्वज्ञान झालेलें नसतें असे पुरुष शरीरानें कर्म करोत किंवा नुस्ता

कर्माविषयींचा मानस संकल्प करीत, त्यांची कर्तृता सिद्ध आहे. पण तत्त्वज्ञानी पुरुष वासनाशून्य असल्यामुळें सदा अकर्ता असतो. कारण तत्त्वज्ञाची वासना शिथिल झालेली असते. त्यामुळें तो शरीरानें कर्म करीत असला तरी फलाची इच्छा करीत नाहीं. असक्तबुद्धि राहून नुस्तें स्पंदन करतो. प्राप्त फलही आत्मरूप आहे असें जाणतो. पण अज्ञाचे चित्त भोगामध्यें आसक्त असल्यामुळें तो साक्षात् कर्म करीत नसला तरी कर्ता आहे. मन जे करते तेंच कर्म होतें व तें जें करीत नाहीं तें कर्म नव्हे. यास्तव मनच कर्ता आहे, देह नव्हे. चित्तामुळेंच हा संसार आला आहे. तो चित्तमय आहे. चित्तातच स्थित आहे, असें जाणणें हे ज्ञान. त्यामुळे विषय-वृत्ती शात होतात. पण इतकें होऊनही वासना लीन झालेल्या नसल्यास तो अज्ञ जीवच रहातो. आत्मज्ञाचें मन, पाऊस पडू लागला असता मृगजळाप्रमाणे अथवा प्रखर उन्हातील बर्फाच्या तुकड्याप्रमाणें, अत्यंत लीन होऊन जाते व ते आत्मरूप होऊन रहातें. नंतर त्याचे वर्णन करिता येत नाहीं. तत्त्वज्ञ पुरुष वासनामय स्पंदरसामध्यें बुडून जात नाही. पण मूर्खाचे मन भोगभूमीलाच पहाते. सत्-तत्त्वाला पहात नाहीं. याविषयीं एक दृष्टात देतो. एक पुरुष शय्येवर किंवा आसनावर बसलेला आहे; खळग्यात पडत नाहीं. पण तो खळग्यात पडण्याच्या वासनेने वासित झालेल्या चित्तात खड्डयात पडण्याचें दुःख अनुभवितो. दुसरा पुरुष खळग्यात पडत आहे. पण शात चित्तात तो शय्या व आसन यावर स्वस्थपणें बसल्याचा अनुभव घेतो. याप्रमाणें या दोघापैकीं एक खळग्यात पडण या क्रियेचा अकर्ता असूनही संकल्पवशात् कर्ता होतो व दुसरा कर्ता असूनही अकर्ता होतो. तस्मात् पुरुष चित्तमय होतो, हा सिद्धात होय. यास्तव चित्त सदा असंसक्त रहूं द्यावें. ज्यामध्ये संसक्ति करावयाची ते आत्मव्यतिरिक्त नाहीं. जगातील सर्व काहीं शुद्ध चित्-तत्त्व आहे. आत्मा सुखदुःखाचा विषय नाही, आधार व आधेय-दृष्टी आत्म्याहून भिन्न नाहींत, मी अकर्ता, अभोक्ता, सर्व पदार्थाहून विलक्षण व अति सूक्ष्म आहें, जें काहीं दिसतें तें सर्व मीच आहे व सर्वावभासक मीच आहे, असा निश्चय झाला असता चित्तवृत्ति चिंताशून्य होते व ती व्यवहारामध्यें सहज लीलेने रहाते. त्यामुळें संकटसमयींही अशा ज्ञान्याला दुःखाचा अनुभव येत नाहीं. तर आनंदाचाच अनुभव येतो. चित्त संकल्पशून्य

असल्यामुळें ज्ञानी कर्म करीत असतांनाही अकर्ता होतो. त्याचें चित्त कर्म-समयीं ' अहं कर्ता ' या दुर्भावनेनें लिप्त होत नाहीं. यास्तव तो हस्तपाद-विक्षेप ( ह्म. हातापायांची हालचाल ) एतद्रूप कर्म मोठ्या यत्नानें जरी करीत असला तरी त्याचें फळ भोगीत नाहीं. याप्रमाणें मनच सर्व कर्मांचें सर्व इच्छांचें, सर्व सुख-दुःखादि भावांचें, सर्व लोकांचें व सर्व गतींचें बीज आहे. यास्तव त्याचा परिहार केला असतां सर्व कर्मांचा परिहार केल्यासारखा होतो. सर्व दुःखें क्षय पावतात व प्रारब्धादि कर्मांचाही लय होतो. ज्ञानी मानस कर्मांनेंही पराभूत होत नाहीं. तीं त्याला परतंत्र करीत नाहींत व तो त्याच्या फलामध्येंही अनुरक्त होत नाहीं. कारण तीं कर्में आत्म्याहून भिन्न आहेत, असे त्याला वाटतच नाहीं. ज्याप्रमाणें एकादा बालक मनानें एकाद्या नगरास निर्माण करतो व त्याला पताका, ध्वज, इत्यादिकांनीं भूषित करतो. पण तें मनःकल्पित असल्यामुळें खोटें समजतो. कांहीं वेळ चित्ताचा विनोद झाल्यावर विस्मरणाच्या योगानें तो त्याचा नाश करून सोडतो. पण त्यामुळे ' अरे अरे, माझे नगर नष्ट झालें ' असे म्हणून त्याच्या करिता रडत नाहीं. अथवा लीलेनें ' अरेरे माझें कृत्रिम नगर नष्ट झाले आता मी काय करूं ? हाय हाय ' असें म्हणून तो जरी रडण्याचें अनुकरण करीत असला तरी खरोखर दुःखी होत नाहीं त्याप्रमाणे ज्ञानी परमार्थतः कर्मादिकाचें अनुकरण करीत असला तरी, आसक्तीच्या अभावीं, त्यामुळें लिप्त होत नाहीं. या जगात दुःखाचें कारण काय आहे ? कांहीं नाहीं, कारण आत्म्याहून भिन्न पदार्थच नस-ल्यामुळें सर्व अविनाशि आहे. तेव्हां नाशप्रयुक्त दुःख कसें होणार ! आत्मा तत्त्वतः अकर्ता व त्यामुळेंच अभोक्ता आहे. पण तत्त्वज्ञानाच्या अभावीं अनुभवास येणारें कर्तृत्व निव्वळ आरोप आहे. आवश्यक कर्मेही वस्तुतः आत्मसबंधी नव्हे. अनुकूल व प्रतिकूल विषयाविषयीं क्रमानें अभिलाष व द्वेष होणें हें सुद्धा विषयाकडे विषयदृष्टीनें पहाणाऱ्या पुरुषाचे ठायींच संभवतें. सर्व आत्मा आहे असें पहाणाऱ्या पुरुषाचे ठायीं राग-द्वेष संभवत नाहींत. पूर्ण आत्म्यामध्यें ज्याचें मन आसक्त असतें त्याच्या दृष्टीनें संसारांत मोक्षही नसतो. पण अजून अभ्यास-दशेंत असल्यामुळें ज्याचें मन आत्मरूप झालेलें नसतें त्यांच्या दृष्टीनें बंध-मोक्षादि सर्व आहे. ज्ञान्याला जसें आहे तसेंच हें केवल आत्मतत्त्व भासतें. तो लोक-

सिद्ध व वादिसिद्ध द्वित्व, एकत्व, सत्त्व असत्त्व, इत्यादि व्यावहारिक भावांना तात्कालिक महत्त्व देऊन तेवढ्यापुरताच व्यवहार करतो. पण तो करीत असतांनाही पदार्थांच्या अनेक शक्तिसमूहाहून भिन्न नसलेली परमात्म्याची सर्वशक्तिता व्यक्त करितो. रामा, अज्ञानामुळें हें दुःख उद्भवतें व ज्ञानानें तें लीन होतें. साराश राघवा, या जगात मोक्षबुद्धि व बंधनबुद्धि व्यर्थ कल्पिलेली आहे. यास्तव तू सर्व कल्पना सोडून, निरहंकार व आत्मनिष्ठ होऊन निश्चित बुद्धीनें व्यवहार करीत भूलोकीं रहा ३८.

सर्ग ३९—ब्रह्माचें सर्वशक्तित्व, रामाचा मोह, त्याच्या बोधाकरिता वसिष्ठांचा विचार व बोध.

**श्रीराम**—भगवन्, सर्व जर ब्रह्मच आहे व बंध-मोक्षादि दुसरें काहीं नाहीं, तर आधाररहित चित्राप्रमाणें ह्या सृष्टीचा उद्भव कसा झाला?

**श्रीवसिष्ठ**—राजपुत्रा, ब्रह्मतत्त्व या सर्व सृष्टीच्या रूपानें विवर्त पावतें. तें सर्वशक्ति असल्यामुळे पदार्थांच्या सर्व शक्ति त्याच्यामध्यें असतात, असें अनुमान करिता येतें. सत्त्व, असत्त्व, द्वित्व, एकत्व, आद्यत्व, अंतत्व इत्यादि सर्व त्याच्या विचित्र स्वरूपात राहूं शकतें. ज्याप्रमाणें चंद्रोदयामुळें उद्भवणारा समुद्राचा पूर तरंगाच्या नृत्यानें नाना-आकारता दाखवीत प्रकट होतो त्याप्रमाणें चिद्घन परमात्मा चित्त व कर्ममय, वासनामय, आणि मनोमय शक्ती धारण करतो. त्याना फलोन्मुख करून दाखवितो व पुनः आपल्याच स्वरूपात लीन करतो. तात्पर्य सर्व जीव, सर्व सृष्टी व सर्व पदार्थ याची उत्पत्ति सतत ब्रह्मापासून होते. तरंग सागरापासून उत्पन्न होऊन त्यांतच जसे लीन होतात त्याप्रमाणें सर्व भाव परमात्म्यापासून प्रकट होऊन त्यातच लीन होतात. अर्थात् ते सर्व तन्मय असतात.

**श्रीराम**—भगवन्, ही तुमची वचनव्यक्ति ( भाषा, बोली ) मला कळत नाहीं. ती फार गहन आहे. मनासह पाच ज्ञानेंद्रियास ज्याचें ज्ञान होत नाहीं ( जें त्यांचा विषय नव्हे ) असें ब्रह्म कोठें व त्याच्यापासून झालेली ही भंगुर पदार्थश्री कोठें? त्यांतूनही हा सृष्टीचा आरंभ ब्रह्मापासूनच होतो असें जर म्हटलें तर तीही त्याच्याच स्वभावाची व त्याच्याच सारखी व्हावयास पाहिजे होती. कारण जो पदार्थ ज्या कारणापासून होतो तो त्याच्यासारखा असतो. जसा एका दिव्यापासून झालेला दुसरा दिवा, एका पुरुषापासून झालेला दुसरा पुरुष व एका धान्यापासून झालेलें दुसरें

धान्य. अथवा निर्विकार ब्रह्मापासून झालेलें हें जगही निर्विकार असलें पाहिजे. बरें, हें चिदात्म्याहून भिन्न आहे असें समजावें तर निष्कलंक परमेश्वर जगद्रूप होतो असें म्हणणें म्हणजे त्याला कलंक लावणें आहे, असें होतें.

**श्रीवसिष्ठ**—रामा, आपल्याला दिसत असलेलें हें सर्व ब्रह्मच स्थिर आहे. त्याच्यामध्यें मलाचा गंधही नाहीं. समुद्रामध्यें जलच तरंगाच्या ओघानें स्फुरण पावत असतें, धूळ नव्हे. रघुनाथा, अग्नीमध्ये उष्णते-वाचून जशी दुसरी कल्पना नाहीं त्याप्रमाणें जगात केवळ ब्रह्मावाचून निराळी कल्पनाच नाहीं.

**श्रीराम**—महाराज, आपले हें वचन अस्पष्टार्थ आहे. हें दुःखमय जग निर्दुःख व निर्द्वंद्व ब्रह्मापासून झालेलें कसें ?

**श्रीवाल्मीकि**—याप्रमाणे रामाने वसिष्ठांना निरुत्तर केलें असता, याला आता कोणत्या उपायानें उपदेश करावा, म्हणून ते मुनिश्रेष्ठ विचार करू लागले.—याची बुद्धि अद्यापि चागलीशी विकसित झालेली नाही. थोडी-शीच निर्मल झाली आहे. त्यामुळें त्याला असे संदेह येतात. यास्तव आप-ल्याला अजून याला उपदेश केला पाहिजे. कारण ज्याच्या मनाला चागला विद्यासंस्कार झालेला असतो त्या ज्ञेय–पदार्थास जाणणाऱ्या, व विवेकतः मोक्षोपाय सागणाऱ्या वाणीच्या पार गेलेल्या बुद्धिमानाला तत्त्वज्ञानामध्यें विरोध भासत नाहीं. यास्तव याच्या चित्त-विश्रांतीकरिता मला आर्धी युक्तीनें उपदेशच केला पाहिजे. अर्धव्युत्पन्न पुरुषाला हें सर्व ब्रह्मच आहे, असा उपदेश करणें उचित नव्हे. कारण भोगदृष्टीनें व्याकुळ झालेल्या त्याला त्यामुळें तत्त्वबोध होत नाहीं. श्रेष्ठदृष्टि प्राप्त झालेल्या पुरुषाची भोगदृष्टि क्षीण होते आणि ती चागली क्षीण झाली म्हणजे सागितलेला सिद्धात मनात चागला ठसतो. यास्तव प्रथमतः शम-दमादि गुणाचा उपदेश करून शिष्याची बुद्धि शुद्ध झाली म्हणजे मग हें सर्व ब्रह्म असून शुद्ध तूंही तेंच आहेस, असें सागितलें पाहिजे. अर्द्धप्र बुद्धाला ‘ हें सर्व ब्रह्म आहे ’ असें जो सागतो तो त्याला नरकातच लोटतो. शिष्याची योग्यता न जाणतां उपदेश करणें यासारखें महापाप नाहीं. असा बराच विचार करून **श्रीवसिष्ठ** म्हणतात—रामा, ब्रह्माच्या ठिकाणी कलंकलेश आहे कीं नाहीं हें तुला पुढें आपोआप कळेल. तू

तूं इतकेंच जाण कीं, ब्रह्म सर्वशक्ति, सर्वव्यापि, सर्वगत असून मीच सर्व आहें. गारुडी मायेनें विचित्र वस्तू कशा उत्पन्न करतो तें तुला ठाऊक आहेच. तो पहातां पहातां विद्यमान वस्तु नाहींशी करितो आणि अविद्यमान वस्तु उत्पन्न करून दाखवितो. त्याप्रमाणें आत्मा वस्तुतः मायामय नसतानाही लौकिक अथवा अलौकिक मायाव्याप्रमाणें या जगांत नानाप्रकार करून दाखवितो. तो अव्यक्त असतानाही विचित्रतेस प्राप्त होऊन आपल्याला प्रकट करतो. त्याच्या सत्तेनें सर्व सत्तायुक्त होतें. याप्रमाण एकच वस्तु हें सर्व होत असल्याकारणानें, असें कसें होईल, असें म्हणणे किंवा हर्ष, क्रोध, विस्मय करणें युक्त नव्हे. सदा समता व संतोष धारण करावा. समबुद्धि ज्ञानी विस्मय, हर्ष इत्यादि विकारयुक्त होत नाहीं. पण आत्मा जगातील कोणत्याही पदार्थास स्वप्रयत्नानें उत्पन्न करीत नाहीं किंवा त्याचा नाशही प्रयत्नपूर्वक करीत नाहीं. तर समुद्रांतील तरंग, दुधातील घृत, मातींतील घट, तंतंतील वस्त्र व वट-बीजातील वट याप्रमाणें आत्म्यामध्ये असलेल्या शक्ती अनुकूल कारण झालें असता आपोआप व्यक्त होतात व तीच जगाची उत्पत्ति होय. पण त्याचा कर्ता अथवा भोक्ता कोणी नाहीं. अथवा त्याचा अत्यत नाशही कधी होत नाहीं. केवल आत्मतत्त्व साक्षी, निरामय व समस्वरूपानें स्थित असतानाच हें सर्व होतें. दिवा असला कीं, रात्री त्याचा प्रकाश आपोआप पडतो, सूर्य असला कीं, दिवस आपोआप होतो व पुष्प असले की, वास आपोआप येतो, त्याप्रमाणें आत्मसत्तेनें हे जगत् आपोआप होतें. ते आभासमात्र आहे. जगत्समयींही आत्मा निर्दोष असतो. यथार्थ ज्ञान झालें म्हणजे ब्रह्मापासून सर्व पदार्थांचा उद्भव कसा झाला तें कळतें. असो, राघवा, काम-कर्म-वासनारूपी सहस्रावधि शाखांनी व विचित्र शुभाशुभ फलांनी भरलेला हा महा भयंकर ससारवृक्ष आत्म्याच्या अज्ञानामुळे दृढमूळ झाला आहे. यास्तव आत्म्याचा जणु काय खोडाच अशा या विशाल वृक्षाला विवेकरूपी खड्गानें तोडून टाकून तूं स्वस्थ व मुक्त हो ३९.

**सर्ग ४०**—उपाधींमुळें जीव भिन्न भिन्न होतात. जीव व त्याच्या सर्व उपाधी ब्रह्ममय आहेत.

**श्रीवसिष्ठ**—शूर रामा, ब्रह्मापासूनच या सर्व विचित्र भूतजाती कशा उत्पन्न होतात, त्याच्यामुळेच त्या नाश कशा पावतात, मुक्त कशा होतात,

वृद्धि कशा पावतात व त्यामध्येंच लीन होऊन कशा राहतात तें मी तुला थोडक्यात सागतों. निर्मल ब्राह्मी चिच्छक्ति यदृच्छेनें कल्पना करून जीवरूप होते. नंतर ते जीवरूपच सकल्प-विकल्पवशात् मन बनतें. मन संकल्पाने एका क्षणात ब्राह्मी स्थितीचा त्याग केल्याप्रमाणेंच जणु काय तिला विसरून हें सर्व दृश्य पहातें. चित् स्वप्रकाशपूर्ण आहे. पण तीं, प्रत्यक्-अतरदृष्टि सोडून पराक्-( बहिर् ) दृष्टि झाली म्हणजे आपल्याच स्वरूपाला शून्यरूप पाहूं लागते. तेंच सर्व लोकास दिसणारें आकाश होय. त्यातच ती, प्राक्तन वासनानुरूप, सृष्टिकर्ता ब्रह्मा व चतुर्दश भुवनांतर्गत प्राण्यांसह भुवनें केवळ सकल्पानें निर्मिते. याप्रमाणे ही सर्व सृष्टि चित्तनिर्मित आहे. त्यामुळेंच ती सकल्पमय नगराप्रमाणें भ्रांतिरूप व असत् होय. त्यातील काहीं वृक्ष-पाषाणादि भूतजाती महामोहमय असतात. सनकादि मुनींसारख्या काहीं मुनींच्या जाती ज्ञानसंपन्नच उद्भवतात व इतर सर्व मध्येंच हेलकावे खात रहातात. कारण वैराग्य नसल्यामुळें त्याना परमात्म्याचे ज्ञान होत नाहीं. या भूलोकीं मनुष्य-योनींत उत्पन्न झालेल्या जीवाना अनेक रोग, दुःखें, मोह, द्वेष, भय इत्यादिकाचा साक्षात् अनुभव येत असल्यामुळें व त्याचें स्मरण ठेवून त्याविषयीं विचार करण्याचीही योग्यता असल्यामुळें ते सर्वच वैराग्यसंपन्न व उपदेशास पात्र व्हावयास पाहिजे होते. पण त्याच्यामध्यें बरेच जीव तामसी प्रकृतीचे असतात. त्यामुळें त्याना पशुवृत्तींतच मोठा आनद वाटतो. मानवयोनींत काहीं राजस-सात्त्विक प्रकृतीचे लोक उत्पन्न होतात. पण त्यातही वैराग्यसपन्न थोडे. तथापि त्याचें वर्णन मी वेचाळिसाव्या सर्गात करीन. अमूर्त ब्रह्म चिदाभासरूप जीव कसें झालें? तेंही तेथेंच सांगेन. स्पंदरहित परमात्म्याच्या सत्तेच्या एकदेशापासून, समुद्रातील तरगांच्या चाचल्याप्रमाणें, जीवपद कसा उद्भवतो तेंही तेथेंच अधिक स्पष्ट करून सागेन. पण आता अगोदर अनत आत्मतत्त्वाचा एकदेश व तेंच ( आत्मतत्त्वच ) विकार पावतें असें कसें म्हणता येतें, तें सांगतों. रामा, हें जग त्याच्या योगानें झालें, त्याच्यापासून झाले इत्यादि वाक्यांची रचना केवळ शास्त्रव्यवहाराकरिता केलेली असते. ती सत्य नव्हे. विकारिता, अवयविता, सत्ता, देशता इत्यादि भाव साक्षात् दिसत जरी असले तरी परमात्म्याचे ठायीं संभवत नाहींत. परमात्म्यावाचून

दुसरी कल्पनाच नसल्यामुळें या ( पूर्वोक्त ) उक्ती खऱ्या कशा असणार ? अर्थात् त्या व्यावहारिक आहेत. शब्द, त्याचा अर्थ, विचार इत्यादि सर्व परमात्ममय आहे. एका अग्नीपासून झालेला दुसरा अग्नि वस्तुतः भिन्न नसतो. पण हा याचा जनक व हा याच्यापासून झालेला अशी व्यावहारिक भेदकल्पना होते कीं नाहीं? त्याचप्रमाणें परमात्मा कारण व जग कार्य इत्यादि म्हणणें हा शुद्ध व्यवहार आहे. ज्याला बोध करावयाचा त्याच्या ज्ञानाकरिता हीं मिथ्या वचनें आम्ही योजतों. परमात्मतत्त्व एक व अनंत आहे. तेव्हा ते कोणाला कसे उत्पन्न करणार? वाणी नेहमीं सापेक्ष असते ( म्ह. एकाच्या अपेक्षेने दोन हा शब्द प्रवृत्त होतो व स्वतः एकही दोन, तीन इत्यादिकाच्या अपेक्षेनें प्रवृत्त झालेला असतो. ) ती व्यवहाराच्याच मात्र उपयोगीं आहे. परम पुरुषार्थाच्या साक्षात् उपयोगीं नाही. कारण परम पुरुषार्थरूप ब्रह्म स्वतः निर्विषय आहे. यास्तव सूक्ष्माच्या अपेक्षेने प्रवृत्त झालेल्या ब्रह्म ( ह्म. अति अति मोठे ) या शब्दाच्या योगाने आत्मतत्त्वाची नुस्ती कल्पना करून तत्त्वाचा साक्षात् अनुभव समाधि–अवस्थेत जाऊनच घ्यावा लागतो. पण ती अवस्था प्रयत्नसाध्य आहे. दीर्घ प्रयत्नाने तिचा लाभ होतो. यास्तव तिच्याविषयीं रुचि उत्पन्न होऊन मानवाने प्रयत्नही करावा म्हणून आम्ही असल्या मिथ्या ( कल्पित ) वचनाचाही उपयोग करून शिष्याच्या परम हिताकरिता उपदेश करितो. यास्तव रामा, हें सर्व ब्रह्मच आहे, अशी तूं आपली भावना दृढ कर. सर्वत्र त्याचे दर्शन घे. स्थूल दृष्टीनें जरी तुला घटपटादि अनेक वस्तू दिसल्या तरी विवेक-दृष्टीनें तुला त्याचा साक्षात् अनुभव येणे शक्य आहे. बाबारे, सर्व चित्ताच्या अधीन आहे. चित्त संसार आहे व तेच मोक्षपद आहे. विवेकाने त्याला शांत कर. चित्त शांत व अति निर्मल झालें म्हणजे तू स्वतःच तें सत्य पद होशील ४०.

**सर्ग ४१**—सर्व संसाराचे बीज माया आहे व ती अनिर्वचनीय आहे.

**श्रीराम**—गुरुवर्य, आपल्या या गंभीर उपदेशाच्या योगाने माझ्या मनाची स्थिति काही चमत्कारिक होत. क्षणात मोह गेला आहे असें वाटते व क्षणात तो पुनः बुद्धीला बुचकळ्यांत पाडतो. अनंत, अप्रमेय, सर्व, एक, स्वयंप्रकाश व नित्य अशा ब्रह्माला अहंभावच कसा व कां आला ? तें मला सांगा.

श्रीवसिष्ठ—रामा, मी जें सांगत आहें तें अगदीं यथार्थ व स्पष्ट सांगत आहें. त्यांत दुर्बोधादि कांहीं नाहीं. तुझी ज्ञानदृष्टि प्रसन्न झाली व प्रबोध-सूर्य स्पष्ट उदय पावला म्हणजे स्वस्थचित्त झालेल्या तुला माझ्या उपदेशाचें रहस्य कळेल. उपदेश्याच्या उपदेशाकरितां भ्रमरूप वाक्यरचना योजलेली असते. यास्तव तूं वाक्यांतच गुरफटूं नकोस. त्यांच्यापासून ज्ञात होणाऱ्या तत्त्वाकडे ध्यान दे. स्वप्नादि असत्य भावापासूनही पुढें होणाऱ्या सत्य गोष्टीचा बोध होतो. तुला वाक्यार्थ ज्ञानावरून अत्यंत निर्मल सत्य कळलें म्हणजे तू आपोआप शब्दार्थभेद सोडशील. वाक्प्रपंच असत् असला तरी त्यावाचून ज्ञान होऊन अज्ञान-तम जात नाहीं. वाणीचा विस्तार व तज्जन्य ज्ञान हीं दोन्हीं जरी अविद्येचीं कार्यें असलीं तरी बहु-जन्म-संचित पुण्यामुळें शुद्ध अंतःकरणाकार झालेली ती अविद्याच स्वहिताकरिता विद्येची प्रार्थना करूं लागते. हितबुद्धीनें पतिव्रता स्त्री शरीर-नाशक पतिसहगमन कशी करिते, हें प्रसिद्धच आहे. अस्त्र अस्त्रानें शांत होतें; मळ मला (क्षारा) नें नाश पावतो; विष विषानें शमतें व शत्रूला शत्रु मारतो. त्याचप्रमाणें अविद्यारूप विद्याच अविद्येला मारते. सारांश रामा, अविद्या ही अशा प्रकारची आहे. ती आपल्या नाशानें हर्ष देते. हिचा स्वभाव कळत नाहीं. ही पहाता पहाता नाहींशी होते. ही विवेकाला आच्छादित करते. विविध जगास उत्पन्न करते. ही कोण आहे हेंही कळत नाहीं. तस्मात् हे जग म्हणजे महा आश्चर्य आहे. तिच्याकडे पाहिलेच नाही म्हणजे ही स्फुरण पावते व पाहिलें म्हणजे लागलीच नाश पावते. ह्या मायेला जर ओळखले नाहीं तर ती प्रमाण-रूपच म्हणजे सत्यच होऊन बसते. खरोखर संसारबंध उत्पन्न करणारी ही माया अति विचित्र आहे. ही अक्षरात्मक माया अति अभिन्न पदार्मध्यें (म्हणजे एका आत्म्याचे ठायीं) हें क्षर जगत् पसरते. त्यामुळेंच क्षर व अक्षर या पुरुषाहून भिन्न असलेला हा आत्मा पुरुषोत्तम होय. आचार्य, श्रुति, तर्क, स्वानुभव व अभ्यास याच्या योगानें दीप्त झालेल्या 'माया वस्तुतः नाहीं' या भावनेनें तूं तत्त्ववित् झालास व तुला ज्ञेयप्राप्ति झाली म्हणजे तिचा आशय तुला कळेल. पण जोंपर्यंत तुला तत्त्वसाक्षात्कार झालेला नाहीं तोंपर्यंत माझ्या सांगण्यावर विश्वास ठेवूनच-अविद्या नाही, ती मिथ्या आहे-असा तूं दृढ निश्चय कर. मनोमात्र असलेलें हें सर्व दृश्य

असत् आहे व ब्रह्म मात्र सत् आहे, असा ज्याचा निश्चय असतो तो मोक्षाला पात्र होतो. अहो ही माया म्हणजे सर्व जगांतील जीवरूपी पक्ष्यांस बाधणारे जाळें आहे. पण जो जगाला स्वप्न समजतो व त्यांतील वस्तूमध्यें आसक्त होत नाहीं तो त्या दुःखरूप जाळ्यात अडकून पडत नाहीं. परंतु असले भव्य पुरुष थोडे. प्रायः सर्व प्राण्यांना इंद्रियादिकांस आत्मा समजण्याचीच फार दिवसांपासून संवय झालेली असल्यामुळे ते माया-जाळयात मग्न होऊन रहातात. अनात्म्यास आत्मा समजल्यामुळेच आत्मज्ञान दुर्लभ झालें आहे. पराग्दृष्टी (बाह्यदृष्टी) मुळेंच तत्त्वाविषयीं संशय उत्पन्न होतात. पण असल्या मिथ्या शास्त्रार्थ ज्ञानाच्या योगानेंही आत्मज्ञान सपादन केल्यावाचून या अविद्यानदींतून पार जाता येत नाहीं. तिच्या पार झाल्यावाचून आत्मज्ञान होत नाहीं व आत्मज्ञान झाल्यावाचून ते अक्षय पद प्राप्त होत नाहीं. ही मळ देणारी अविद्या कोठून तरी व कशी तरी होऊन आत्मवस्तूच्या आश्रयानेच ती स्थित झाली आहे. यास्तव ती कोठून आली हा विचार करण्यात व्यर्थ काल न घालविता ही नाहींशी कशी होईल, मी हिला मारून कसें टाकीन याचा विचार कर. हिचा अस्त झाला, ही क्षीण झाली, म्हणजे ही कोणापासून झाली, कशी झाली, इत्यादि सर्व कळेल. वस्तुतः ही नाही. विवेकदृष्टीनें पाहू लागलें असता ही दिसत नाहीं. मग तिला सत्य जाणणे हें स्वप्नात पाहिलेल्या पुरुषाचें कुल, गोत्र, इत्यादिकांचा शोध करण्यासारखेंच व्यर्थ नव्हे का? ही दुष्ट डाकीण दोषाकरिता उत्पन्न होऊन वाढली आहे, यास्तव, बा क्षत्रिया, तूं हिला बलात्कारानें मारून टाक. म्हणजे तुला सर्व समजेल. या अविद्येने ज्याना परवश केलें नाहीं असे अति शूर व महा प्राज्ञ पुरुष त्रिभुवनात अति विरळा. यास्तव या रोगशील मायेचा विनाश करण्याविषयीं यत्न कर. म्हणजे पुनः ही तुला जन्मदुःखामध्यें पाडणार नाही. सर्व आपत्तींची मुख्य सखी, अज्ञान वृक्षाची मजिरी व अनर्थसघाची जननी अशा या अविद्येचा तू समूळ उद्धार कर. आणि भवार्णवातून पार हो ४१.

**सर्ग ४२**—अनंत चिच्छक्तीपासून वासनाक्रमानें जीवाचे अवतरण.

**श्रीवसिष्ठ**—रामा, अतिशय वाढलेल्या व पहाताच नाश पावणाऱ्या या अविद्यारूपी भयंकर व्याधीचें औषध मी आधीं सागतों. चाळिसाव्या सर्गात 'राजस-सात्त्विकी जन्माचे वर्णन मी पुढें करीन' असें म्हटलें

मोठ्या प्रेमाने पडून मरतो. संसारात पुष्कळ भ्रमण करून थकलेलें त्याचें चित्त खुडलेल्या कमलाप्रमाणें म्लान होतें. सारांश बा शुभ शिष्या, आपल्याच बंधाविषयीं आस्था धरणारें मन घोर दुःखांत पडलें आहे. यास्तव हे देवतुल्य पराक्रमी रामा, मोठ्या धैर्यानें तू त्याचा उद्धार कर. चिखलांत रुतलेल्या मत्त बैलाप्रमाणें मदनवश झालेल्या मनाला बलात्कारानें वर काढ. त्याला स्वतंत्र कर. मन शुभ व अशुभ याच्या योगानें मलिन झालें आहे आणि जरा, मरण व दुःख याच्या योगाने मूर्च्छित झालें आहे, असें पाहूनही ज्याला खेद होत नाहीं व जो त्याला आपत्तींतून सोडविविण्याचा प्रयत्न करीत नाहीं तो या जगात नराकृति राक्षसच आहे ४२.

**सर्ग ४३**—जीवाच्या कर्मगतींचें वर्णन. विवेकादि दुर्लभ असल्यामुळें मुक्ति फारच थोड्या लोकाना मिळते.

**श्रीवसिष्ठ**—रामा, याप्रमाणें चित्-चे औपाधिक-भावरूप-जीव संसारवासनेमुळें संसारप्रवाहात पडले आहेत. ज्याच्या ठिकाणीं आकाराची कल्पना केली आहे अशा ब्रह्मापासून ते झाले आहेत. झऱ्यातून सतत निघणाऱ्या असख्य जलबिंदूप्रमाणे आजपर्यंत असे अनेक जीव ब्रह्मापासून झाले आहेत; हल्लीं होत आहेत व पुढें होतील. आपल्याच वासनामुळें आशाच्या अधीन झालेले ते सर्व विचित्र दशामध्यें पडतात. जलातील बुडबुड्याप्रमाणें ते सर्व दिशा व प्रदेश यातील जल व स्थल यांमध्यें सतत उत्पन्न होऊन मरत असतात. त्यातील कित्येकांचा या कल्पांत एकच जन्म झालेला असतो. कित्येकाचे शंभरापेक्षा अधिक झालेले असतात व कित्येकाचे असंख्य जन्म होऊन गेलेले असतात. कित्येकाचे जन्म पुढें व्हावयाचे असतात. कित्येकाची जन्मपरंपरा सपून ते शेवटच्या जन्माचा अनुभव घेत असतात. म्हणजे जीवन्मुक्त-अवस्थेंत असतात. कित्येक अनेक कल्प एकाच योनींत, पुनः पुनः उत्पन्न होत, रहातात. कोणी दुसऱ्या योनीचा आश्रय करितात. काहीं नारक योनींतील जीव महादुःख भोगीत असतात. मानव अल्पसुखाचा स्वाद घेतात. कांहीं देव होऊन पुष्कळ सुख भोगतात व कित्येक सत्यलोकीं जातात. कित्येक गंधर्व, किन्नर, विद्याधर व महा उरग होतात. कित्येक सूर्य, इंद्र, वरुण, शंकर विष्णु व ब्रह्मदेव होतात. कांहीं कूष्मांड, वेताळ, यक्ष, राक्षस व पिशाच-योनींत उत्पन्न होतात. कित्येक ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र होतात. कित्येक

चांडाल, भिल्ल, इत्यादि अति नीच मानव योनींत उद्भवतात. कित्येक नाना प्रकारचें गवत, औषधी, फळें, मूळें, नानाप्रकारच्या लता, गुल्म, विविध पशू, पक्षी, नानाप्रकारचे लहान–मोठे किडे, इत्यादि निपजतात. त्यांतील कित्येक आपत्तींत पडलेले असतात. कित्येक सुख व संपत्ति यांचा अनुभव घेतात. कित्येक स्वर्गपुरात असतात. कित्येक भूलोकीं येतात व बरेच नरकांत वास करितात. कित्येक नक्षत्रें होऊन रहातात. कित्येक वृक्षांच्या रंध्रात निवास करितात. कांहीं वायुरूप झालेले असतात. कांहीं आकाशांत स्थित असतात. कित्येक सूर्य व चंद्र यांच्या किरणात असतात. बहुतेक विषयलंपट झालेले असतात. काहीं कल्याणभाजन जीवन्मुक्त होऊन या लोकीं भ्रमण करितात. काहीं फार दिवसांपासून मुक्त होऊन रहातात व कित्येक परमात्म्यामध्यें तादात्म्य पावतात. काहीं जीवाना थोड्याच दिवसांत मुक्ति मिळावयाची असते. काहीं भोगलपट जीव कैवल्याचा द्वेष करितात. कांहीं विशाल दिग्देवता होतात. कित्येक महा वेगवाल्या नद्या होतात. कांहीं जीव स्त्रिया व काहीं नपुसक असतात. कित्येक अति बुद्धिमान् असतात. कित्येक जडमती असतात. कित्येक ज्ञानाचा उपदेश करणारे व कित्येक समाधि लावून बसलेले असतात.

तात्पर्य हे रामभद्रा, याप्रमाणें हे सर्व जीव आपल्याच संसारविषयक वासनेमुळें परतंत्र होऊन अशा अनेक विचित्र अवस्थामध्यें पडलेले असतात. मृत्यु ज्याना आपल्या हाताने सतत उडवीत आहे अशा चेंडूप्रमाणेंच हे सर्व वारंवार खालीं, वर व तिरकस उडत असतात. एका वृक्षावरून दुसऱ्या वृक्षावर उडून जाणाऱ्या पक्ष्याप्रमाणें आशापाशानीं बद्ध झालेले ते वासनाप्रमाणें एका शरीरातून दुसऱ्या शरीरांत, दुसऱ्यातून तिसऱ्यात इत्यादि प्रकारे फिरत रहातात. अनंत विषयांविषयींच्या अनत कल्पनास उत्पन्न करणाऱ्या अविद्येच्या योगानें ते हें मोठें जगन्मय इंद्रजाल पसरतात. त मूढ आपल्या अनंत आत्म्याला जोंपर्यंत पहात नाहींत तोंपर्यंत पाण्यांतील भोंवऱ्याप्रमाणें ते संसारांतच भ्रमण करीत असतात. त्यांतील जे कांहीं अभ्यास व वैराग्य यांच्या दृढतेमुळें आत्म्याला पहातात व असत् सोडतात ते पुनः या संसारांत उत्पन्न होत नाहींत. काहीं विवेकभ्रष्ट सहस्रावधि जन्म भोगूनही पुनः संसारसंकटांत पडतात. कित्येक उत्तम जन्म, उचित देश, काल, प्रतिभा,

विनय, सत्समागम इत्यादि सर्व उत्तम सामग्रीनें युक्त होऊनही तुच्छ विषयलंपट बुद्धीनें पुनः तिर्यग्-योनींत पडतात व पशु-पक्षी इत्यादि तिर्यग्-योनींतून ते नरकांतही जातात. कित्येक महा बुद्धिमान् संत ब्रह्मपदापासून उत्पन्न होऊन एकाच जन्मानें संसारातून मुक्त होतात सारांश या विस्तीर्ण सृष्टींत प्राण्यांचा उत्कर्ष व अपकर्ष एकसारखा चालला आहे. या विस्तीर्ण जगाप्रमाणेंच दुसरींही अनत जगें साप्रतकाळी आहेत. आजपर्यंत होऊन गेलीं आहेत व पुढे होतील. विचित्र हेतूने विचित्र सृष्टी उद्भवतात व नाश पावतात. इतर ब्रह्मांडातही कोणी गंधर्व होतो, कोणी यक्ष बनतो, कोणी देवत्व धारण करितो व कोणी दैत्य होतो. हे प्राणी या ब्रह्मांडात जसे व्यवहार करीत राहिले आहेत तसेच ते इतर ब्रह्मांडातही असतात. पण त्याच्या शरीररचनेंत अतर असतें. आपापल्या सात्त्विक, राजस व तामस स्वभावा-प्रमाणे व्यवहार करणाऱ्या त्याच्यामध्ये एकाच विषयाविषयीं स्पर्धा लागून एकमेकाच्या सघर्षामुळे सृष्टीचें परिवर्तन होतें. व्यक्त होणे, गुप्त होणें, वाढणे, लीन होणे इत्यादिकाच्या योगानें, नद्यांच्या लाटाप्रमाणे, सृष्टीचें परिवर्तन होतें. दीपापासून जसा उजेड, सूर्यापासून जसे किरण, अग्नी-पासून जशा ठिणग्या त्याप्रमाणें परमात्म्यापासून सतत जीवराशी उद्भ-वतात. कालामुळे होणाऱ्या विचित्र ऋतूप्रमाणे, पुष्पापासून सुटणाऱ्या वासाप्रमाणें व मेघांतून पडणाऱ्या शीतळ तुषाराप्रमाणे वारंवार उत्पन्न होऊन व देहपरपरा भोगून त्या ( जीवराशी ) प्रलयसमयी बीजावस्थेंत लीन होऊन रहातात.

तात्पर्य, हे रामभद्रा, समुद्रातील लाटाप्रमाणे परमपदी ही त्रिभुवन-रचनादि महामाया व्यर्थ उत्पन्न होऊन वृद्धि पावते व नष्ट होते. हिचा हा क्रम सतत असाच चालू आहे ४३.

**सर्ग ४४**—मुक्ति व प्रळय याचें बहुतेक साम्य असले तरी त्यातील विशेष व विरिचा जीवाचा शरीर-धारण क्रम

**श्रीराम**—गुरुवर्य, प्रळयसमयीं जीवाला आपोआप आत्मस्थिति मिळत असते व आत्मस्थिति मिळणें म्हणजे मुक्त होणेंच आहे. मग एकदां ब्रह्म-मय झाल्यावर पुनः त्याला शरीर का घ्यावें लागतें?

**श्रीवसिष्ठ**—याचें उत्तर मी तुला पूर्वीच (प्रकरण ४ सर्ग १८ पृष्ठ ५१६) दिलें आहे. पण तें तुझ्या ध्यानांत राहिलें नाहीं, असें वाटतें. असो;

शरीरादि हें सर्व आभासमात्र असत् व स्वप्नतुल्य आहे. हे निष्पापा, हें दीर्घ स्वप्न व्यर्थ दिसत आहे. अज्ञाननिद्रा जाऊन व भावना गळून ज्याचें चित्त जागे झालेलें असतें तो संसारस्वप्नास पहात असला तरी परमार्थतः त्यास पहात नाही. पण जो अज्ञान-निद्रेंतून जागा झालेला नसतो तो मोक्ष-पदप्राप्ति होई तों पुन. पुनः ससार करतो. पाण्यामध्यें जसा भोंवरा, बीजामध्यें जसा अकुर, अकुरामध्यें जसा पल्लव, पल्लवामध्ये जसें फूल व फ़लामध्यें जसें फळ त्याप्रमाणे जीवाचा कल्पना-मय देह मनात असतो. मातीचा गोळाच जसा घट होतो त्याप्रमाणे मनाचा सकल्पच देह बनतो. मन बहुरूप आहे हे खरें पण त्यात वासनारूपानें स्थित असलेल्या अनेक देहांतील जो एकच देह, परिपक्क झालेल्या कर्मांमुळें, अभिव्यक्त होतो त्याचाच तो अनुभव घेतो, असा नियम आहे. त्यामुळें मनातील बीजरूप अनेक देह एकाच वेळीं उद्भवत नाहींत. उत्तम कर्माचा परिपाक झालेला असल्यास मनही उत्तम देहरूप होते. आदि सर्गामध्यें याचा प्रथम देह उत्तम असतो. कारण त्यावेळीं विभु ब्रह्मा आपल्या कमल-कोश-गृहात राहिलेला असतो. नंतर त्याच्या संकल्प क्रमानेच ही अपार सृष्टि उत्पन्न होते.

**श्रीराम—**प्रभो, जीव मनःपदास ( म्हणजे मनोरूपास ) प्राप्त होऊन ब्रह्मदेव-कसा झाला, ते मला सागा.

**श्रीवसिष्ठ—**शूर राजतनया, ब्रह्मदेवाच्या शरीरग्रहाणाचा क्रम मी तुला थोडक्यात सागतो म्हणजे त्याच दृष्टाताने तू सर्व जगत्स्थिति जाण-शील. दिशा, काल इत्यादिकांनी मर्यादित न झालेले आत्मतत्त्व स्वशक्तीनें, लीलेनेंच, जेव्हा मर्यादित रूपाची भावना करतें तेव्हांच वासनावशात् तें जीवसंज्ञेस पात्र होतें. संकल्पोन्मुख झालेले तेंच चंचल मन होतें. पूर्व सर्गात 'हिरण्यगर्भच मी आहे' अशा अहंग्रहोपासनेने संस्कारसंपन्न होऊन तसेंच प्रलयसमयीं अव्याकृतात लीन झालेले मन हीच मनःशक्ति होय. ती पूर्वक्रमानेंच आपल्या आविर्भावाची कल्पना करू लागली असता एका क्षणांत आकाशाची भावना करिते. ती स्वच्छ आकाशभावना शब्द-तन्मात्र व श्रोत्रेंद्रिय होण्यास सज्ज असते. नंतर शब्दतन्मात्र व श्रोत्रेंद्रिय-रूप असलेल्या आकाशाच्या रूपास प्राप्त होऊन वृद्धि पावलेलें मन वायु-स्पंदाची भावना करितें. तो वायुस्पंद स्पर्शतन्मात्र व त्वग्-इंद्रियरूप असतो.

पण हीं दोन्हीं भूतें अपंचीकृत असल्यामुळें सूक्ष्म असतात. त्यामुळें मनानें मर्यादित झालेल्या चैतन्यरूप जीवास प्रत्यक्ष दिसत नाहींत. पुढें त्यांची वृद्धि व परस्पर संघर्ष झाला म्हणजे अग्नि उद्भवतो. त्यानंतर याच क्रमानें सूक्ष्म जल व पृथ्वी यांच्या भावास मन प्राप्त होतें. तेजाचा गुण रूप व इद्रिय चक्षु. जलाचा गुण रस व इंद्रिय रसना. पृथ्वीचा गुण सुगंध आणि इंद्रिय घ्राण आहे. असो; केवळ भावनेनें सूक्ष्म पंच भूतानीं वेष्टित झालेलें मन हळु हळु सूक्ष्मतेस सोडून, आकाशात स्फुरण पावलेल्या अग्निकणाकार शरीरास पाहतें. ते अहकारकला व बुद्धीचें बीज यांनीं युक्त असतें. त्यालाच पुर्यष्टक असें म्हणतात. तें हृदयकमलात रहातें. त्यांत असलेलें मन तीव्र वेगानें स्थूल शरीराची भावना करूं लागलें म्हणजे वाढणाऱ्या बेलफलाप्रमाणें तें स्थूल होतें. मूशींत ओतलेल्या सोन्याच्या रसाप्रमाणें विमल आकाशात स्फुरण पावलेलें तें तेज स्वभावतःच आकार धारण करतें. त्या तेजःपुज आकारात अनेक अवयव विकास पावतात. वर मस्तक, खालीं पाय, दोन्ही बाजूला दोन हात, मध्यभागीं उदर, व त्याच्या आजुबाजूस दुसरे आणखीं उपयुक्त भाग उद्भवतात. याप्रमाणें हा ब्रह्मा मनोरथवशात् सशरीरी होतो. आपल्या वासनेमुळेच, पूर्व उपासनेप्रमाणें, मनन करणारें मन अगयुक्त होतें. ऋतूप्रमाणें तें देहास पुष्ट करतें व याप्रमाणे काहीं कालानें तें स्थूल आकारानें प्रकट होऊन निर्मल शरीरी होतें.

ज्ञान, वैराग्य, ऐश्वर्य, धर्म, बल व शक्ति यानीं युक्त असलेला तोच सर्व लोकपितामह ब्रह्मा होय. अद्वय ब्रह्मामध्यें तो जशा प्रकारच्या आपल्या सत्तेनें राहतो तशाच प्रकारच्या व्यावहारिक सत्तेनें आपल्या अज्ञानाला चित्तलीलेनें पचीकृत स्थूल भूताच्या आकारानें उत्पन्न करतो. कधीं अपार आकाश, कधीं (दैनंदिनप्रलयसमयीं) निर्मल जल, कधीं (कल्पांतसमयीं) भयंकर अग्नी, कधीं (पृथ्वीला उत्पन्न केल्यावर व भूतोत्पत्तीच्या पूर्वी) काळे भोर वृक्षमय अरण्य इत्यादि अनेक कल्पना करीत तो प्रभु नाना आकार उत्पन्न करतो व त्यांचें पालन करतो. त्याचें शरीर हेंच पहिलें शरीर व तोच पहिला शरीरी होय. तो ब्रह्मपदापासून अवतीर्ण झाला. त्याच्या अज्ञानामुळें परमआनंदास विसरला व गर्भनिद्रा गेली असता त्यानें आपलें हें अवाढव्य शरीर पाहिलें. प्राण व अपान यांच्या प्रवाहानें युक्त, पंचभूतांच्या पाच

स्वच्छ भागांनीं निर्मिलेलें, कोट्यवधि रोमांनीं व्याप्त, बत्तीस दातांनीं शोभणारें, मांड्यांतील दोन व पाठीचा कणा या तीन खांबांनीं सुदृढ, प्राणादि पांच वायुरूपी देवतांचें स्थान, हात, पाय, मस्तक, वक्षःस्थल, व कुशी या पांच विभागांनीं-संपन्न, ज्याला नऊं द्वारें आहेत व जें त्वचेनें मढविलेलें आहे असें, वीस अंगुली व वीस नखें यांनीं चिह्नत झालेलें आणि दोन हात, दोन स्तन, दोन नेत्र (क्वचित् अनेक नेत्र व अनेक भुजा) यांनीं युक्त असें हें-चित्तरूपी पक्ष्याचें घरटें, मदनरूपी भुजंगाचें बिळ, तृष्णारूपी पिशाचीचें घर, जीवरूपी सिंहाची गुहा, अभिमानरूपी गजाचें बंधनस्थान व मनोरूपी कमलानें सुशोभित झालेलें-रम्य शरीर ब्रह्मदेवानें पाहिलें. नंतर तो त्रिकालज्ञ देव या अपार आकाशात प्रथम काय बरें झालेले असावें? (म्हणजे माझ्या उत्पत्तीच्या पूर्वीं काय बरें असावें?) म्हणून विचार करूं लागला. तेव्हा त्याला आपलें मूळ काय आहे तें कळलें. त्याला मागें होऊन गेलेले असंख्य सर्गसमूह दिसले. त्याला क्रमानें सर्व सांगोपाग धर्म व अधर्म समजले. वसंत जसा पुष्पांना धारण करतो त्याप्रमाणे त्यानें वेदांचें धारण केलें. नतर वेदोक्त क्रमानेंच विचित्र संकल्पशक्तीने सर्व प्रजा निर्माण केली. त्याच्या स्वर्ग-मोक्षाकरितां व धर्म, अर्थ आणि काम याच्या सिद्धीकरिता अनेक विचित्र शास्त्रें रचलीं व पदार्थ निर्माण केलें. सारांश, रामा, याप्रमाणे विरिंचीच्या मनापासून ही सर्व सृष्टि उद्भवली आहे ४४.

**सर्ग ४५**—मनाचें कार्य जग सत्य नाही, व सत् त्रिकालीं सत्यच असतें.

**श्रीवसिष्ठ**—अशारीतीनें हे जग जरी झालें आहे तरी तें वस्तुतः झालेलें नाहीं. या एवढ्या मोठ्या आकाशरूपी ब्रह्मांडानें देश व काल थोडे सुद्धां आवृत होत नाहींत. हें देहादि सर्व भुवनत्रय मनाने कल्पिलेलें आहे. पण दर्शनाचें कारण जसें नेत्र त्याप्रमाणें स्मृतीचें कारण मन आहे. यास्तव मनानें रचलेलें सर्व स्मृतीसारखें आहे. स्मृतीचा विषय स्मृतिसमयीं सत् नसतो. (म्हणजे ज्याचें स्मरण होते तो पदार्थ, जेव्हां स्मरण होतें, तेव्हां पुढें नसतो. प्रत्यक्ष दिसत नसतो.) चित्त-संकल्पाप्रमाणें होत नाहीं असें कांहीं नाहीं. मनोगुहांचा आश्रय न करणाऱ्या शक्ती जगदीश्वरामध्यें तरी कशा असणार? व जरी असल्या तरी त्यांचा उपयोग काय? सर्व शक्तिमान् विभूच्या सत्तेनेंच सर्व पदार्थांची सत्ता व असत्ता सदा संभवते.

ब्रह्मदेवाचे शरीर मननानेंच कसें झाले तें तूं पहा व त्यावरून त्याच्या मनाप्रमाणें आमच्या मनातही सर्वेश्वराची शक्ति आहे असें तूं जाण. देव, दैत्य, मानव इत्यादि सर्व स्वसंकल्पापासून झाले आहेत. यास्तव स्वसंकल्प शांत झाला म्हणजे तेल संपलेल्या दिव्याप्रमाणें, सर्व शांत होतें. हे महाबुद्धे, जग दीर्घस्वप्न आहे असे तू निःशंकपणें जाण. परमार्थतः यांत कांहीं उत्पन्न होत नाही व यांतील काहीं नाश पावत नाहीं. विवेक-दृष्टीनें पाहिल्यास ब्रह्मादिकही मिथ्या भासू लागतात. नौकेंतून अथवा गाडींतून जाणाराना आजुबाजूचे वृक्ष चालत असल्याचा जसा भास होतो त्याप्रमाणे या शरीरपरंपरेचा भास होतो. हें इंद्रजाल, मायिक, मनोमय व अनिर्वाच्य आहे. सर्व जग जर ब्रह्मच आहे तर त्यात अन्यतेला अवकाश कसा मिळणार ? हा पर्वत हा वृक्ष, ही गंगा, हा प्रपंच इत्यादि भ्रम, मनाच्या दार्ढ्यामुळें, सत्य आहे तसे वाटतात. विचारहीनाला हें जग प्रपंचात पाडणारें आहे. यास्तव रामा, तू त्याला सोडून निष्प्रपंच आत्म्याची भावना कर. या दीर्घ स्वप्न सदृश जगाचा विस्तार मात्र फार मोठा दिसतो. पण घेऊं लागले असत त्यातील काहीं हाताला मात्र लागत नाहीं. यास्तव आशा-भुजगाचा जणुं काय कोशच असे हे जगदाडंबर तू सोड. त्यावर आसक्ति ठेवू नकोस. हें मृगजळ आहे, असें समजल्यावर कोणता शहाणा त्याच्या मागे धांवत जाणार आहे ? व जो मूढ त्या मनोरथमयी शोभेच्या मागें लागतो तो केवळ दुःखाचेच भाजन होतो. रामा, या सृष्टींत परमार्थतः सत्य वस्तु नसतीच व मग जर हे अनेक लोक अवस्तूच्या मागें लागते तर त्यात मोठासा दोष नव्हता. पण सत्-वस्तु असताना तिला सोडून असतूच्या मागें लागणारास काय ह्मणावें ?

रामा, जग नष्ट झालें तरी तुझें काहीं नष्ट होत नाहीं व तें समृद्ध झालें तरी तुझें स्वरूप समृद्ध होत नाहीं. जें मूळचेंच असत् तें असत् झालें म्हणून तुझें काय जातें ? असत्चें नष्ट काय होणार ? व नाश पावण्यासारखेंच जर त्यांत कांहीं नाहीं तर दुःखाचें तरी कारण काय ? त्याचप्रमाणें जें अत्यंत सत् आहे त्याचें काय नष्ट होणार ? व त्यांतील काहीं नष्ट झाल्यास तें अत्यंत सत् कसलें ! यास्तव ब्रह्म अत्यंत सत्य असल्यामुळें व जगही ब्रह्मरूप असल्यामुळें त्याच्या भ्रामक वृद्धि-क्षया-

करिता सुखी व दुःखी होणें उचित नव्हे. अत्यंत असत् व सत् वस्तूच्या नाशाप्रमाणेच त्यांची वृद्धिही असभवनीय आहे. यास्तव तिच्या करितां हर्ष करण्यासही फारसा अवकाश रहात नाहीं. तस्मात् असल्या या असत्य संसारांत ग्राह्य काय आहे, याचा विचार सुज्ञ पुरुष करोत. त्याचप्रमाणें सत्य ब्रह्मतत्त्वभूत त्रिभुवनात त्याज्य काय आहे याचाही निर्णय करून प्राज्ञ त्याचा त्याग करोत. जग ज्याला अत्यंत असत् वाटतें किंवा जो त्याला अत्यत सत् समजतो त्याला सुख व दुःखही होत नाहीं. पण मूढ सत् व असत् याचें चमत्कारिक रीतीने मिश्रण करीत असल्यामुळें जगाच्या नाशानें तो दुःखी व वृद्धीनें सुखी होतो. जे उत्पत्तीपूर्वी नसून नाशानंतरही नसतें ते वर्तमान म्हणजे मध्य अवस्थेतही नसतें. (म्हणजे तें असत् होय.) अशा असत् प्रपंचाची जो इच्छा करतो त्याला तोच मिळतो. पण आधीं, अतीं व मध्य अवस्थेंतही जें सत् असतें तें सर्व सदा सत्च होय. ज्याच्या दृष्टीनें सर्व सत्च असतें त्याची सदा सत्ताच अनुभवास येते.

राघवा, जलात प्रतिबिंबित झालेल्या-चद्र, आकाशतल-इत्यादिकांप्रमाणें असत्यभूत जगाची वाछा मूढ करितात. उत्तम पुरुष करीत नाहींत. मूढ अर्थशून्य सुखाभासानी, पुढे दुःखी होण्याकरिताच, सतुष्ट होतो. यास्तव दशरथतनया, तूं असा मूढ होऊ नकोस. यातील स्थिर वस्तूचा निश्चय करून त्या नित्याचाच आश्रय कर. मूढानीं कल्पिलेल्या अहकारासह हे सर्व जग असत् आहे असें मानून तूं राग व द्वेष याचा परिहार कर व पूर्वी सागितलेल्या तीन प्रकारच्या अहंकारातील ज्ञानी पुरुषांनीं कल्पिलेल्या दोन प्रकारच्या अहकारासह हे सर्व सत् आहे अशी भावना करून तू हर्ष-शोकयुक्त होऊ नकोस.

श्रीवाल्मीकि—वसिष्ठमुनि इतकें सांगत आहेत तों सूर्य अस्त पावला. व सभासद सायंतन अनुष्ठाने करण्याकरिता निघून गेले आणि रात्र संपतांच प्रातःकृत्यें आटोपून ते सर्व सूर्यकिरणाबरोबरच सभेंत येऊन तिला सुशोभित करूं लागले ४५. येथे नववा दिवस समाप्त झाला.

सर्ग ४६—ससारात विहार करीत असतानाही साधक ज्या गुणाच्या योगानें त्यात मग्न होत नाहीं ते जीवन्मुक्ताचे गुण.

श्रीवसिष्ठ—हें सर्व इंद्रजाल आहे असें समजल्यावर, त्यांतील रम्य धन

व स्त्रीप्रभृति इतर सुखसाधनें यांचा नाश झाला तरी, दुःख कसें होणार? गंधर्व-नगरांतील एकादा पदार्थ दूषित किंवा भूषित झाला म्हणून त्यामुळे पहाणाराला जसें दुःख किंवा हर्ष होत नाहीं त्याप्रमाणें अविद्याविलासरूप पुत्रादिकाच्या उत्कर्षापकर्षामुळेंही सुख-दुःख होणें युक्त नव्हे. मृगजळ कितीही जरी वाढलें तरी जलाची इच्छा करणारांना जसा आनंद होत नाहीं तसा धनादिकांच्या वृद्धीचाही आनंद मानूं नये. उलट धन, पुत्र, परिवार इत्यादिकांची वृद्धि होऊं लागल्यास दुःखी होणेंच युक्त आहे. कारण मोह-माया वाढल्यास आनंदी होणें कधींच शहाणपणाचें नव्हे. मूढांना ज्या विविध विषयोपभोगामुळे राग वाढतो त्याच्याच योगानें सुज्ञास विराग वाटतो. नश्वरस्वभाव विषयाविषयी हर्ष मानण्यास वस्तुतः अवकाशच नसतो. परिणामाकडे दृष्टि देणारे साधू त्यांच्या योगानें विरक्त होतात. यास्तव हे राघवा, तूंही तत्त्वज्ञाप्रमाणें व्यवहार करीत असतांना संसारांतील जे जे नष्ट होईल त्याची त्याची उपेक्षा कर व जे जें प्राप्त होईल त्याचा त्याचा उपयोग कर. अप्राप्त भोगांची इच्छा न करणे व प्राप्त वस्तूंचा, आसक्त न होता, उपभोग घेणें हें पंडिताचें लक्षण आहे. आत्म्यास आच्छादित करून सोडणारा व म्हणूनच महा घातकी अशा या संसारसभ्रमात तू सावधपणें असा विहार कर कीं, ज्याच्या योगानें तूं मोहित होणार नाहीस. संसाराचें हें अवडंबर मिथ्या आहे, असे ज्यांना कळत नाही ते सुज्ञही नाश पावतात. हें जग मिथ्या आहे, किंवा तें अनर्थाचे कारण आहे अथवा तें परमार्थापासून भ्रष्ट करणारें आहे इत्यादिकांतील कोणत्याही एकाद्या युक्तीनें ज्याची दृश्याविषयींची रति ( आसक्ति ) पार नाहींशी झाली आहे त्यांची शुद्ध मति कोणत्याच मोहात निमग्न होत नाहीं. हें सर्व असत् आहे, असें समजल्यामुळें ज्याची आस्था कोणत्याही वस्तूमध्यें रहात नाहीं त्या सर्वज्ञाला मिथ्या अविद्या कधींही स्पर्श करीत नाहीं. ज्याची बुद्धि मी व हें सर्व जग एकच असें जाणून व आस्था आणि अनास्था सोडून स्थि[र] रहाते तो मोहवश होत नाहीं. सत् व असत् यांमध्यें अनुवृत्त असले[ल्या] व सत्तामात्र अशा पदाचा स्वबुद्धीनें अवलंब करून बाह्य व आभ्यंतर दृ[श्य] तूं घेऊं किंवा सोडूं नकोस. अत्यंत उपरति ( शांति ), संतोष, गृहा[दि] निवासस्थानावर 'हें माझें' असा अभिमान न ठेवणें व आसक्ति सोडणें [य]

चार गुणांचा तूं आश्रय कर. ज्या ज्ञानी पुरुषाची कर्मे करीत असतांनाही, इच्छा किंवा अनिच्छा नसते, त्याची बुद्धि लिप्त होत नाहीं. इंद्रियांसह मन दर्शन, स्पर्श, श्रवण इत्यादि क्रिया करो अथवा न करो, तूं निरिच्छ व आत्मानुसंधानवान् रहा. 'माझें हें' असें म्हणून तुझें मन इंद्रियांच्या विषयांमध्यें आसक्त न होवो. तुझ्या मनाला विषयश्री जेव्हां रुचेनाशी होईल, तेव्हा तूं ज्ञानसंपन्न व संसारसागरातून पार झाला आहेस, असें समज. समाधिकालीं शरीराचें भान नसतांना व व्युत्थानसमयीं शरीराचें भान असतांनाही ऐहिक व पारलौकिक विषयाविषयीं अरुचि वाटूं लागली म्हणजे तुला इच्छा नसली तरी मुक्ति मिळेल. रामा, पुष्पापासून जसा उदार गंध कौशल्यानें पृथक् करून अत्तरांत आणतात, त्याप्रमाणें विवेकबुद्धीनें परम पदाकरिता वासनासमूहापासून तूं आपलें विरक्त चित्त पृथक् कर. वासनाजलाने भरलेल्या या अगाध संसारसागरात जे प्रज्ञारूपी नौकेवर आरूढ होतात, तेच पार जातात व बाकीचे सर्व त्यात बुडतात. वरतऱ्याच्या धारेसारख्या तीक्ष्ण व अति धीर बुद्धीनें आत्मतत्त्वाचा विचार करून स्वपदीं प्रवेश कर. ज्ञानवृद्ध तत्त्वज्ञ जसा या प्रपंचात विहार करितात, त्याप्रमाणेंच तूंही व्यवहार कर. मूढाप्रमाणें व्यवहार करूं नको. नित्य तृप्त व महाबुद्धिमान् अशा महात्म्या जीवन्मुक्ताच्या आचाराचें तूं अनुकरण कर. भोगाच्या आसक्तीनें आपल्याला व दुसऱ्याना ठकविणाऱ्या पामरांच्या आचरणाचे तू अनुकरण करूं नकोस. ब्रह्मतत्त्व व जगत्तत्त्व यास जाणणारे जन जगातील व्यवहार सोडीत नाहींत व त्याची इच्छाही करीत नाहींत. तर जसा प्रसंग येईल तसे वागतात. विद्या, तप, पराक्रम इत्यादि उत्कर्ष; दक्षता, कुल, शील इत्यादि गुण, सपत्ति इत्यादि विषयांचे ठायीं, ते मिथ्या असल्यामुळें, पुरुषार्थाच्या निरुपयोगी आहेत, असें जाणणारे तत्त्वज्ञ लोलुप होत नाहींत. सर्वस्वाचा नाश झाला तरी ते खिन्न होत नाहींत. सर्व उपभोग-साधनानी सपन्न असलेल्या नदनवनादि देवांच्या विहारस्थानींही ते आसक्त होत नाहीत व सूर्याप्रमाणें शास्त्रमर्यादा सोडीत नाहींत. ज्याची इच्छा पार निघून गेली आहे, असें ते महात्मे प्रसंगीं प्राप्त होईल तो व्यवहार करतात. सारांश विज्ञान-सारथि, इंद्रियेंच अश्व व मन हेच लगाम यांनीं युक्त असलेल्या देहरथांत स्वस्थपणें बसलेले ते प्रपंचांत मोठ्या

आनदानें सचार करतात. राघवा, तूंही या विस्तृत विचारानें संपन्न झाला आहेस. हे सुंदर राजपुत्रा, स्वाभाविक बुद्धिबलानेच तुझ्यामध्यें हे सर्व उत्तम गुण आले आहेत. यास्तव आत्मदृष्टीचा आश्रय करून मान व मत्सर यांनीं रहित हो व या भूलोकीं विहार कर; म्हणजे तुला परम सिद्धि मिळेल. स्वस्थ व निरिच्छ हो. विषयांचें कौतुक पहाण्याची इच्छा सोड. चित्तात अति शीतल हो आणि मग तू या संसारांत खुशाल विहार कर.

**श्रीवाल्मीकि**—शुद्धचित्त मुनीच्या या निर्मल वाणीनें राम तत्काल निर्मल आकाशासारखा भासूं लागला व मधुर ज्ञानामृताने विराजमान झालेला तो पूर्णचंद्राप्रमाणें शीतल झाला ४६.

**सर्ग ४७**—होऊन गेलेल्या व पुढें होणाऱ्या असंख्य ब्रह्मादिकाचें वर्णन.

**श्रीराम**—भगवन्, आपली ही उदार, मधुर, अर्थपूर्ण, तात्त्विक व शुद्ध वाणी कितीही ऐकली तरी मनाची तृप्ति होत नाहीं. राजस-सात्त्विकी जाती सागत असताना प्रसगोपात्त ब्रह्मदेवाची उत्पत्ति आपण शास्त्रप्रमाणतः सागितलीत ती मी ऐकली. आता पुढील भाग सागा.

**श्रीवसिष्ठ**—राघवा, आजपर्यंत लक्षावधि ब्रह्मदेव, शकर, इंद्र व नारायण होऊन गेले आहेत. दुसऱ्या अनेक व याही विचित्र ब्रह्माडात नाना आचार व विहार यानीं युक्त असलेलीं देव, असुर इत्यादिकाचीं अनेक शरीरें मागें झाली आहेत, साप्रत कालीं आहेत व पुढें होणार आहेत. निरनिराळ्या ब्रह्माडात ब्रह्मदेवादि देवाच्या उत्पत्ती नानाप्रकारानें होतात. त्याच्याविषयीं एकच नियम नाहीं. केव्हा सर्व सृष्टी शंकरापासून होतात. केव्हा ब्रह्मदेवापासून होतात. कधीं कधीं भगवान् विष्णूपासून होतात. कधीं त्यास मुनी निर्माण करतात. कधीं ( पाद्मकल्पात ) ब्रह्मदेव कमलापासून होतो. केव्हा केव्हा ( आपवसंज्ञक कल्पात ) जलापासून होतो. कधीं तर अंड्यापासून हिरण्यगर्भ निपजतो. एकाद्या ब्रह्माडात शकरच सूर्य असतो. एकाद्यात इंद्र किंवा पुंडरीकाक्षही सूर्य होतो. एकाद्या सृष्टींत भूमि दाट झाडानीं भरलेली असते. एकाद्या सृष्टींत मानवानीं भरलेली असते. क्वचित् ती पर्वतानीं व्याप्त झालेली असते. एकादी भूमि मृत्तिकामय असते. एकादी पाषाणमयी असते. एकादी सुवर्णमयी व ताम्रमयी असते. फार दूर कशाला? या एकाच ब्रह्माडात किती आश्चर्यें भरलीं आहेत तीं पहा व त्यावरून इतर ब्रह्माडांतही तसेंच अचिंत्य आश्चर्य

असेल असें अनुमान कर. त्यांतील कित्येकांत एकेक किंवा दोन दोन सूर्यासारखे तेजोगोल असतात आणि कित्येक प्रकाशरहित असतात. या ब्रह्मतत्त्वमहा-आकाशात अनेक जगें समुद्रातील लाटांप्रमाणें उत्पन्न होतात व नाश पावतात. जलाशयातील तरग, माळ जमिनीवरील मृगजळ अथवा आमृवृक्षावरील केसरें यांप्रमाणें परब्रह्मामध्यें जगच्छोभा उत्पन्न होतात. सूर्याच्या किरणांतील त्रसरेणूही मोजता येतील, पण ब्रह्मातील जगाची गणना करितां येणार नाहीं. वर्षादि-ऋतूंमध्यें मशकादि किडे जसे वारंवार उत्पन्न होऊन नाश पावतात, त्याप्रमाणें या लोकसृष्टी वारंवार उत्पन्न होऊन नाश पावतात. पण त्या अशा केव्हापासून होत आहेत तें काहीं कळत नाहीं. पहिल्या तरंगापासून पुढचा तरग, त्याच्यापासून त्याच्यापुढचा अशी जलशयातील तरगाची परपरा जशी लागते त्याप्रमाणें या सृष्टींची परपरा लागलेली असते. ही सृष्टि पूर्वीच्या सृष्टीपासून झाली आहे. पूर्वीची तिच्याही पूर्वीच्या सृष्टीपासून झाली आहे. एवढेंच फार तर हिच्याविषयी सागता येईल. पण या परपरेचा अगदीं मूळ आरभ कोठून झाला आहे हे, तरगाच्या आरभाप्रमाणेच, सागता येत नाहीं. सृष्टि-परंपरा अनादि आहे. देव, असुर, मानव इत्यादि सर्व प्राणिसमूह पुनः पुनः होऊन मरण पावतात एका सवत्सरात क्षीण होणाऱ्या सहस्रावधि घटिकां-प्रमाणें आजपर्यंत अनेक ब्रह्माड-पंक्ती नाश पावल्या आहेत.

रामा, लीलेच्या आख्यानात सागितल्याप्रमाणे सर्व ब्रह्मांडाची कल्पना हृदयाकाशस्थ ब्रह्माडामध्येच होते. मातीच्या राशींतील घटांप्रमाणें, व अंकुरातील पल्लवाप्रमाणे पुढे होणाऱ्या जगत्परपरा ब्रह्मामध्यें राहतात. तत्त्वज्ञानाच्या योगानें पाहू लागले असता, या त्रिभुवनशोभा मिथ्या आहेत, असें समजेपर्यंतच त्या ब्रह्मचिदाकाशात राहतात. त्या सर्व चित्रासारख्या खोट्या आहेत. तत्त्वज्ञाच्या दृष्टीनें सर्व सृष्टी, जलापासून होणाऱ्या वृष्टीप्रमाणें देवापासून होतात. म्हणूनच त्या आपल्या कारणाहून निराळ्या नाहींत. पण अतत्त्वज्ञाच्या दृष्टीने मेघांतून होणाऱ्या वृष्टीप्रमाणे त्या तटस्थ ईश्वरापासून होतात. अव्याकृत आकाशापासून झालेल्या भूतसूक्ष्मसंज्ञक ( पंचतन्मात्र-रूप ) मायामळरूपी सूत्रात सर्व स्थूल ( देहादि ) व सूक्ष्म ( इद्रियादि ) भाव ओवलेले आहेत. केव्हा केव्हा प्रथम आकाश होतें व त्याच्यापासून ब्रह्मा निपजतो. तोच आकाशज प्रजापति आहे. कदाचित् वायु प्रथम होतो व

त्याच्यापासून ब्रह्मा निपजतो. कधीं कधीं तर तेज प्रथम होतें व त्याच्यापासून होणारा ब्रह्मा तैजस प्रजापति हें नांव धारण करतो. जल व पृथ्वी यांच्या विषयींही असेंच जाणावें. पांच भूतांतील कोणतेंही एक भूत इतर चार भूतास निर्बल करून स्वतः वाढतें व त्याच्यापासून झालेला ब्रह्मा त्याच्या पुढची सृष्टिक्रिया करतो. सर्व प्रजापती पचभूतांचीं कार्ये आहेत. तरी त्यांतील ज्या मुख्य भूतापासून जो होतो त्याला आकाशज, वायुज, तैजस आपव व पार्थिव अशीं नावें प्राप्त होतात. नंतर त्याच्या देहावयवांपासून सर्व ब्राह्मणादि विषयमय सृष्टी उत्पन्न होते. या नारायणसंज्ञक देवाच्या नाभीपासून कदाचित् कमल उद्भवतें. त्यात ब्रह्मा होतो—तोच पद्मज होय. तोही स्वसंकल्पानें असंख्य पदार्थ निर्मितो—पण हें सर्व कसें होतें व काय होतें तें कांहीं कळत नाहीं. कारण ही सर्व देवाची माया आहे. त्याच्या त्या अचिंत्य शक्तीनें हें सर्व आपोआप होतें. त्यात कोणताही एक नियम नाहीं अथवा व्यवस्था नाहीं. सर्व मनोराज्याचा खेळ. विद्यमान पुरुषाचा जन्म नाभीमध्ये सभवत नाहीं. म्हणून जर म्हणावें तर या असग व अद्वितीय ब्रह्मामध्यें सद्वितीय जग तरी कसें सभवतें? साराश या जगाच्या विचित्र उत्पत्तीसंबंधानें हें कसें झालें? असें कसे होईल? इत्यादि विचारीत बसणें म्हणजे बालकानें मनोराज्याच्या योगानें कल्पिलेल्या वस्तूंविषयीं प्रश्न करण्यासारखेंच अप्रयोजक आहे. मनामध्यें व्यक्त झालेल्या परमात्म्याच्या अचिंत्य शक्तीच्या योगानें सर्व अघटितही सुघट होतें. सर्व चमत्कार आहे. त्यात नियमाचा गंधही नाहीं. कदाचित् शुद्ध आकाशात मनस्तत्त्व उद्भवतें. कदाचित् सुवर्ण-अड व त्यातील ब्रह्मगर्भ उत्पन्न होतो. कदाचित् पुरुष जलामध्यें वीर्य सोडतो आणि त्याच्यापासून कमल अथवा मोठें ब्रह्मांड उद्भवतें. त्यांत ब्रह्मा निपजतो. कदाचित् पूर्वकल्पातील सूर्य या कल्पांत ब्रह्मा होतो. कदाचित् वरुण अथवा वायुही अडज बनतो. प्रत्यगात्म्यामध्यें अशा या अत्यंत असत् व अति विचित्र सृष्टी उत्पन्न होतात. रामा, अशा प्रकारच्या विविध विचित्र सृष्टी ब्रह्मापासून उद्भवल्या आहेत. दृष्टांता-करितां म्हणून त्यांतील एका सृष्टीच्या प्रजापतीची उत्पति मी तुला सांगि-तली. पण त्याविषयीं नियम मुळींच नाहीं. संसार म्हणून आपण ज्याला समजतो तो शुद्ध मनोविलास आहे. पण तुला बोध व्हावा म्हणून हा सृष्टिक्रम सांगितला. याच न्यायानें व रीतीनें उत्पन्न झालेल्या सात्त्विकी-

प्रभृति जातीं( जन्मां )चें वर्णन करण्याकरितां मी हा सृष्टिक्रम तुला सांगितला. मन जोंपर्यंत समूळ नाहींसें झालें नाहीं तोंपर्यंत पुनः सृष्टि, पुनः नाश, पुनः दुःख, पुनः सुख, पुनः अज्ञ, पुनः तज्ज्ञ, पुनः बंधदृष्टि, पुनः मोक्षदृष्टि, भूत, वर्तमान व भविष्यत्–विषयाविषयीं पुनः प्रेम व पुनः अप्रेम इत्यादि चक्र एकसारखें चाललेलें असतें. दीप व ब्रह्मदेव यांच्या उत्पत्ति–नाशामध्ये कालाच्या न्यूनाधिकतेवाचून दुसरा कोणत्याही प्रकारचा भेद नाहीं. कृत, त्रेता, द्वापर व कलि हीं युगेंही वारंवार येत व जात असतात. मन्वतराचे आरभ, कल्पाची परंपरा, कार्यदशा, दिवस–रात्र, प्रकाश–अधकार, इत्यादि हें सर्व पुनः पुनः परिवर्तन पावत असतें. तापवून लाल केलेल्या लोखडाच्या गोळ्यामध्ये त्याला घणानें ठोकण्यापूर्वी जसे अग्निकण असतात, त्याप्रमाणें चिदाकाशामध्यें स्वभावतःच सदा हे सर्व भाव स्थित असतात. वृक्षातील पुष्प–फळाप्रमाणें परतत्त्वामध्यें हें कदाचित् अव्यक्त असतें व केव्हा व्यक्त होतें. चैतन्यविवर्तच हें सर्व आहे. सर्व सृष्टिदृष्टी चित्–पासून उद्भवतात.

पण, रामा, हा संसार कधींही सत् नव्हे. कारण सर्व शक्तिमान् परमात्म्यामध्ये परमार्थतः असंसारस्वभावता आहे. त्याचप्रमाणे हें जग असें नाही, असेंही नव्हे. कारण त्या सर्व शक्तिमानामध्यें ससारशक्तिताही असते. ज्ञानी हें सर्व ब्रह्म आहे असें जाणतो. म्हणून त्याच्या दृष्टीनें ससार नाहीं, असे म्हणणें युक्तच आहे. त्याचप्रमाणें अज्ञांना हा संसार असाच अखड भासत असल्याकारणानें त्याच्या दृष्टीनें तो सत्यही आहे. जग पुनः पुनः तसेच होत असल्यामुळे हें असेंच आहे, प्रवाहरूपानें नित्य आहे, म्हणून जें मीमांसकादि कित्येक म्हणतात तें कांहीं खोटें नव्हे. अज्ञाच्या दृष्टी विचित्र असल्यामुळें बुद्धादिकांनीं आपापल्या प्रक्रियेच्या निर्वाहाकरिता केलेल्या क्षणिक परमाणु, क्षणिक विज्ञान, शून्य इत्यादि कल्पनाही त्याच्या त्यांच्या दृष्टीने बरोबर आहेत. या एक सर्वव्यापि आत्म्यामध्यें त्याच्या कल्पित अर्थांपैकीं अनुपपन्न असें कांहीं नाहीं आणि खरोखरच जर काहीं अनुपपन्न ( अयुक्त ) असेल तर हें सर्व संकल्पजालच अनुपपन्न आहे.

सारांश, हें सर्व असेंच पुनः पुनः होत असतें. पुनः जन्म, पुनः मरण पुनः सुख, पुनः करण व कर्म, पुनः त्याच दिशा, पुनः आकाश, पुनः

समुद्र व पुनः पर्वत. अनेक खिडक्या व साणीं यांनीं युक्त असलेल्या गृहात एकच सूर्यप्रभा जशी नानारूपाने पसरते, त्याप्रमाणे अनेक ब्रह्मांड-युक्त सृष्टींत एकच ब्रह्म-सत्ता पुनः पुनः विचित्र जगाच्या रूपांन उद्भवते. पुनः दैत्य, पुनः देव, पुनः लोकांतरक्रम, पुनः स्वर्ग-मोक्ष-इच्छा, पुनः इंद्र, पुनः चंद्र, पुनः नारायण देव व पुनः दनुज उद्भवतात. सुमेरु पर्वत ही जिची कर्णिका आहे व सह्य पर्वत हे जिचे केसर आहे, अशा प्रकारची ही पूर्ण व जिचा मध्यभाग विशाल आहे, अशी द्यावा-पृथ्वीरूपी नलिनी पुनः उत्पन्न होते. आकाशरूपी अरण्याचे आक्रमण करून व किरणरूपी नखें बाहेर काढून हा भास्कर-सिंह अंधकाररूपी हत्तीचें गंडस्थळ फोडण्याकरिता पुनः पुनः उदय पावतो. पुनः पुनः हा चंद्रमा हालणाऱ्या स्वच्छ मंजिऱ्यांसारख्या सुंदर करानीं (किरणांनीं अथवा हातानीं), दिशारूपी स्त्रीचें जणुं काय मुखमंडणच, असें आल्हादायी अमृत संपादन करतो. पुनः पुनः स्वर्गरूपी वृक्षावरून पुण्यक्षयरूपी वायूनें हालविल्यामुळे स्वर्गस्थ जनरूपी पुष्पाच्या राशी खालीं पडतात. कालसंज्ञक पक्षी कार्य व क्रिया याच दोन पंखांच्या योगाने काही वेळ संसारारंभ ही फडफड करून पुनः पुनः जातो. पहिल्या इंद्रसंज्ञक क्षुद्र भ्रमराचा अधिकार-काल संपला असतां तो जाऊन स्वर्गकमलावर दुसरा इंद्र-भ्रमर येऊन बसतो. कृतयुगानें पवित्र केलेल्या वस्तूंना कलि (अधर्म) पुनः पुनः मलिन करतो. कालसंज्ञक कुंभाराने ज्याच्यावर प्राणिरूपी मडकी घडवून ठेवली आहेत, असें हे कल्पनाचाचे चाक पुनः पुनः वेगानें सतत भ्रमण करीत रहातें. तेव्हा हे रामा, दीर्घ भ्रम अशा या महामाया-आडंबरामध्ये सत्य व असत्य याचा निर्णय कसा करावा? अथवा यांत सत्यासत्य निर्णय करण्यासारखें काय आहे? ही संसार-परंपरा दाशराच्या आख्यायिकेप्रमाणें कल्पनारचित व वस्तुशून्य आहे ४७.

**सर्ग ४८**—भोगेच्छेची निंदा, दाशराचा जन्म व प्रसन्न झालेल्या अग्नीपासून त्याला मिळालेला वर.

**श्रीवसिष्ठ**—पण रामा, संसारचक्र जरी कल्पनामात्र असलें व ब्रह्मच जरी तत्त्वतः असले तरी मोठमोठे बुद्धिमान्‌ही त्याला जाणत नाहींत. कारण त्यांना त्याची अपेक्षा वाटत नाहीं. शिवाय ते विषयभोग, ऐश्वर्य इत्यादिकामध्यें गढून गेलेले असतात. परंतु जे महात्मे इंद्रियांच्या अधीन

नसतात ते 'मम' या अभिमानास कारण होणारी बाह्य व 'अहं' या अभिमानास कारण होणारी आंतर अशा दोन्ही जगन्मायांना हातातील बेलफळाप्रमाणें साक्षात् पहातात. नंतर ती जगत्संबंधी माया तुच्छ आहे, असे जाणून ते विचारी जीव तिचा त्याग करितात. त्यानंतर त्यांच्या चित्तात पूर्ण विरक्ति वाणते, आणि त्यामुळें भाजलेलें बीज शेतात कितीही दिवस जरी असले तरी त्यापासून जसा अंकुर उद्भवत नाहीं, त्याप्रमाणे ते ज्ञानी विरक्त पुरुष पुनः जन्म घेत नाहींत. अज्ञ पुरुष आधिव्याधींनी भरलेल्या व उद्या किंवा आज नाश पावणाऱ्या शरीराकरिता सर्व उद्यम करीत असतात. आत्म्याकरिता मुळींच उद्यम करीत नाहीत. पण रामा, तू तरी, अज्ञासारखा, शरीर व मन यासच प्रसन्न करण्यात गुंतू नकोस. तर केवळ आत्मपरायण हो.

**श्रीराम**—गुरुवर्य, आपण मला दाशूराची आख्यायिका सांगता ना ?

**श्रीवसिष्ठ**—होय. तुझी ऐकण्याची इच्छा असल्यास सांगतो. जगन्माया-स्वरूपाचे वर्णन करण्याच्या मिषानें मी सांगत असलेली ही कथा ऐक. या भूपृष्ठावर ज्याच्यामध्यें असंख्य विचित्र फुलझाडें आहेत, असा मागध नावाचा श्रीमान् व प्रख्यात देश आहे. तेथील अरण्यात कदंब वृक्ष फार असतात. विचित्र पक्षिसमूहाच्या योगाने तो देश सर्वाश्चर्य-मनोहर झाला आहे. त्यातील प्रत्येक गावाच्या सीमेवर पुष्कळ कोवळे गवत व दाट शेतें उगवलेलीं असतात. प्रायः सर्व नगरे उपवनानी रमणीय झालेली असतात. कमळ, उत्पल, कल्हार इत्यादि नानाप्रकारच्या फुलझाडानी त्यातील सरोवराची तीरे भरलेली असतात. उद्यानात बांधलेल्या झोपाळ्यावर बसून विलासिनी स्त्रिया गाणीं गातात व विलासी जन कामदेवाच्या बाणानी जर्जर न होण्याकरिता, शय्या, भूषणे इत्यादिकामध्ये सुवासिक व कोमल पुष्पाचा उपयोग करून, त्यास म्लान करीत असतात.

असो, अशा प्रकारच्या त्या देशात एक उत्तम पर्वत असून त्यावर नानाप्रकारचे वृक्ष, कदलीवने, फुलझाडें, लहानमोठी सरोवरे, अनेक जलचर व स्थलचर प्राणी इत्यादि रम्य पदार्थाची समृद्धि होती. त्या पुण्य

पर्वतावर एक दाशूर या नांवाचा महातपस्वी व परम धार्मिक मुनि रहात असे. तो विरक्त महामति एका कदंब वृक्षावर राही.

**श्रीराम**—हे भगवन्, तो तपस्वी कोणत्या हेतूने अरण्यांत गेला व कदंब वृक्षावर कसा राहूं लागला ?

**श्रीवसिष्ठ**—रामा, शरलोमा म्हणून त्याचा विख्यात पिता असून ब्रह्मदेवासारखा तो महात्मा त्याच पर्वतावर रहात होता. देवगुरूच्या कचासारखा त्याला हा एकच पुत्र झाला. त्यासह त्यानें आपले जीवित वनात घालविलें. नतर एकदा पक्षी घरटे सोडून जसा जातो, त्याप्रमाणें शरलोमा पुष्कळ दिवस भोग भोगल्यावर शरीर सोडून स्वर्गलोकीं गेला. तेव्हा त्या वनात एकटाच दाशूर मरण पावलेल्या पित्याकरिता रडूं लागला. हेमतऋतूत कमलें जशी म्लान होतात, त्याप्रमाणें माता-पितृवियोगजन्य शोकानें सतप्त झालेला तो म्लान झाला. तेव्हा हा बालक अति दीन झाला आहे असें जाणून, राघवा, एका दयाळू वनदेवतेनें अदृश्य राहूनच त्याचें असें समाधान केलें.—हे महाबुद्धिमान् ऋषिपुत्रा, तूं असा अज्ञासारखा रडतोस कां ? ससाराचें चचल स्वरूप तूं कसें जाणत नाहींस ? साधो, ससृति अशीच सदा चल असते हिच्यामध्यें प्राणी उत्पन्न होतात, मागून जिवंत रहातात व शेवटीं अवश्य मरतात. या व्यवहारात ब्रह्मादि—स्तंबपर्यंत जें जे काहीं आहे तें तें सर्व नाश पावणार, यात संशय नाही. यास्तव पित्याच्या मरणाविषयीं तू व्यर्थ शोक करू नकोस. सूर्याप्रमाणें, उदय पावलेल्या प्रत्येकाचा अस्त होणारच.

राघवा, वनदेवतेची ही वाणी ऐकून ज्याचे नेत्र रडून लाल झाले होते, अशा दाशूरानें धैर्य धरलें तो डोळे पुसून उठला. त्याने मोठ्या आदरानें पित्याचें आवश्यक अत्य कृत्य केलें व उत्तम सिद्धीकरिता उत्तम तप करण्याचा त्याने निश्चय केला. ब्राह्मण-कर्मानें अरण्यात तप करणाऱ्या त्याला शुद्धि, अशुद्धि, विधि-निषेध इत्यादि कल्पनाचें ज्यात प्राचुर्य आहे, असें श्रोत्रियत्व ( म्हणजे वेदाध्ययन, त्याच्या अर्थाचा विचार इत्यादि अनुष्ठानाची निष्ठा ) प्राप्त झालें. पण ज्याच्या बुद्धीला ज्ञेय तत्त्व ( ब्रह्म ) कळलेलें नाहीं, अशा त्या श्रोत्रियाच्या मनाला, पवित्र पृथ्वीच्या पाठीवरही, शुद्धि-अशुद्धि इत्यादि कल्पनामुळें शांति मिळाली नाहीं. हें सर्वच भूतल अति शुद्ध असतानाही तें अशुद्ध आहे, असें समजून त्याला कोठेंच चैन पडेना.

नंतर त्यानें आपल्याच कल्पनेनें-वृक्षाचें अग्र चांगलें शुद्ध आहे व तेथेंच माझी स्थिति होणें उचित होय. यास्तव पक्ष्यांप्रमाणें वृक्षांच्या शाखावर व टाळ्यांवर माझी गति व्हावी व तेथें मला सुखानें रहाता यावे म्हणून मी आता उग्र तप करतों-असे ठरविलें व लागलाच एका कुंडांत यथाविधि उत्तम अग्नि पेटवून त्यात तो आपल्या खाद्याच्या मांसाचा होम करू लागला. तेव्हां अग्नीला मोठी चिंता लागली. तो मनात म्हणाला "देवाचें मी मुख आहें. यास्तव जळलेल्या या ब्राह्मणमासानें देवाचे कंठदेश भस्म न होवोत, म्हणजे झाले" असा विचार करून भगवान् अग्निदेव, बृहस्पतीच्या पुढें जसा सूर्य तसा, त्याच्यापुढें उभा राहिला व त्याला बोलला "हे कुमारा, कोशातून जसा उत्तम मणि काढून घेतात त्याप्रमाणें तुला इष्ट असेल तो वर मागून घे."

रामा, सतुष्ट झालेल्या अग्नीचें हे म्हणणें ऐकून विप्रपुत्रही आनंदित झाला व पुष्पमिश्रित सुदर अर्घ्यानें अग्नीची पूजा करून व पुष्कळ स्तुति करून म्हणाला "भगवन्, प्राण्यानीं भरलेल्या या भूमीवर मला पवित्र स्थान मिळत नाही. यास्तव मला वृक्षाच्या अग्रभागीं रहाता यावें, अशी इच्छा आहे" मुनिपुत्राने असा वर मागितला असता सर्व देवाचें मुख असा अग्नि 'तथास्तु' असे बोलून गुप्त झाला. इष्ट वर मिळाल्यामुळे दाशूरालाही मोठा आनद झाला व त्या कारणानें त्याच्या मुखावर चद्र व कमल यानाही तुच्छ करून सोडणारे उत्तम व रम्य तेज पसरलें ४८.

**सर्ग ४९**--शाखा, पल्लव, पुष्पसमूह, फळभर पक्षी इत्यादिकाच्या योगानें मनोहर झालेल्या कदबाचें उत्प्रेक्षादि अलकारांनी वर्णन

**श्रीवसिष्ठ**—नंतर जो अरण्याच्या मध्यभागीं असून, मेघमंडलास स्पर्श करीत आहे, मध्याह्नसमयीं खिन्न झालेले सूर्याचे घोडे ज्याच्या शाखेचा आश्रय करीत असतात, जो आपल्या शाखारूपी बाहूंनीं दिशांच्या दीर्घ कुक्षींस जणु काय आच्छादितच करीत असतो, जो फुललेल्या पुष्परूपी नेत्रांनीं आपल्या बाहूंनीं आच्छादित न झालेला, असा काही दिशाचा भाग राहिला आहे की काय ? म्हणूनच पहात आहे, वाऱ्याच्या योगाने ज्यांच्या अंगावरील धूळ उडून गेली आहे व त्यामुळे जे काळे भोर दिसत आहेत अशा भ्रमण करणाऱ्या असख्य भ्रमररूपी दिशांच्या मुखावरील केसांस जो आपल्या पल्लवरूपी तळहातानीं मागे करीत आहे,

लाल कोमल पल्लव व त्यातूनच बाहेर आलेल्या आरक्त-शुभ्र मजिऱ्या याच्यायोगानें जो जणुं काय विडा खालेल्या तोंडानेंच वनमालेस हसत आहे, ज्याची दीप्ति पूर्णचद्रासारखी आहे, ज्याच्या पालवींत बसलेले चकोर पक्षी अव्यक्त व मधुर ध्वनी करीत आहेत अशा शाखानीं जो व्याप्त झाला आहे, खाद्यावर बसलेल्या मोराच्या-खाली तिरकस लोंबणाऱ्या पिसाऱ्यामुळें जो इंद्रधनुष्ययुक्त मेघानी व्याप्त झालेल्या आकाशाप्रमाणें दिसत आहे, वारंवार दिसून नष्ट होणाऱ्या चद्राच्या योगाने पूर्ण होणाऱ्या संवत्सराप्रमाणे प्रत्येक शाखेवरील ढोलींत जाऊन बसणाऱ्या व पुनः बाहेर येणाऱ्या शुभ्र चमरसञ्ज्ञक हरिणाच्या योगानें जो पूर्ण आहे, कपिंजल पक्ष्याच्या आलापानीं, कोकिलाच्या सुदर कूजितानीं व चकोराच्या ध्वनींनी जो जणु काय उच्चस्वराने गातच आहे, स्वर्गकोटरात रहाणाऱ्या सिद्धाच्या योगाने जसे जगत् त्याप्रमाणें घरट्यात क्रीडा करणाऱ्या कलहंसाच्या समूहानी जो आवृत झाला आहे, अप्सरा जशा स्वर्गाचा आश्रय करितात त्याप्रमाणे प्रवाल ( कोमल पल्लव ) हेच ज्याचे हात आहेत व भ्रमर हेच ज्याचे नेत्र आहेत अशा मजिऱ्यानी ज्याचा आश्रय केला आहे, नानाप्रकारच्या पुष्पापासून उडणारा पिवळा परागसघ व मजिऱ्या याच्या योगाने जो इद्रधनुष्य व विद्युत् यानी युक्त असलेल्या मेघाप्रमाणें दिसत आहे, शाखारूपी सहस्र बाहूनी युक्त असलेला, अतरिक्षास व्यापून रहाणारा, व चद्र-सूर्यरूपी दोन कुडलानी विराजमान होणारा जो, विश्वरूप दाखविणाऱ्या विष्णुप्रमाणेच, स्थित आहे अशा एका विशाल कदब वृक्षास दाशराने पाहिले त्याच्या मुळाशी मोठा हत्ती रहात असे. त्याचा मध्यभाग लतापुष्पमय होता. त्यामुळे दिग्गज व तारागण यानी युक्त असलेल्या ब्रह्माडोदराप्रमाणे तो दिसत होता. राघवा, त्या वृक्षाचें वर्णन करावें तितकें थोडेच होणार आहे. भूतलाप्रमाणे त्याचा सर्व भाग पशु, पक्षी, कीट इत्यादिकानीं व्याप्त झाला होता. तो मजिऱ्या ह्याच पताका व लता हे मडप यानीं भूषित झाला होता, नानाप्रकारच्या पक्ष्याच्या ध्वनींनी तो गजबजून गेला होता. त्याच्यावर पुष्कळ पक्षी संचार करीत होते. तें एक सर्व वनदेवीचें अंत:पुरच होते भगवान् विष्णु जसा आपल्या पार्षदानीं वेष्टित असतो त्याप्रमाणें तो नानाप्रकारच्या पक्ष्यानीं आवृत होता. पुष्पगुच्छ याच चंचल अंगुलींनीं, वन-

वायूच्या योगानें नाचणाऱ्या वेलींना, तो जणु काय अभिनय कसा करावा हेंच शिकवीत होता. 'माझ्या सर्व शरीरावयवातील एकादाच अवयव फार तर रिकामा असेल बाकीचे मुळापासून अग्रापर्यंत सर्व भाग मृग, पशु, पक्षी, इत्यादि प्राण्यानी युक्त आहेत. वाहवा! केवढे हें माझें परोपकारित्व,' असें म्हणून, तो जणुं काय सतुष्टच होत होता, माझीं सर्व अंगें सफळ झालीं आहेत, असे जाणून, हृष्ट झालेला तो आपले शाखारूपी हात पसरून जणुं काय नाचतच होता. त्याच्यावर चढलेल्या अनेक लताचा तो एकच कांत असल्यामुळे, मत्त भ्रमराच्या गुंजारवाच्या द्वारा जणु काय शृंगाररसपूर्ण गायनच करीत होता. तो मोठ्या आदरानें पुष्पे समर्पण करून, कोकलादिकाच्या सुदर ध्वनींनी, वरून जाणाऱ्या सिद्धाचे जणु स्वागतच करीत होता. वेली, पुष्पें व फळे यानी भरलेल्या व जवळच असलेल्या पाच कल्पवृक्षाना तो जणु काय आपल्या पुष्पादिकाच्या दीप्तींनी हंसतच होता. पारिजातास जिंकण्याकरिता डोके वर करून उद्धटपणाने वर जाणारा तो जणु काय प्रतिमल्लासारखाच दिसत होता. असो, साराश हे दशरथसुता, आपल्या फलयुक्त छायेने सर्व लोकाचें कल्याण करणाऱ्या त्या सर्वोत्तम कदब वृक्षाला दाशूराने पाहिलें ४९.

**सर्ग ५०**—कदबाच्या अग्रावर बसलेल्या दाशूराने पाहिलेल्या दिशाचें, स्त्रियाच्या आकाराने, वर्णन.

**श्रीवसिष्ठ**—नंतर भूमि अपवित्र आहे, असे समजणारा दाशूर पुष्पपर्वततुल्य, फलपल्लवशाली व द्यावापृथ्वीचा जणु काय मोठा स्तभच अशा या कदंब वृक्षास पाहून आनदित झाला आणि सर्व जलमय झाल्यावर भगवान् विष्णु जसा वटवृक्षावर चढतो त्याप्रमाणे तो त्यावर चढला. त्याच्या अगदीं शेवटच्या शाखेच्या टोकावर बसून तो तपस्वी निःशकपणें एकाग्रमनाने तप करू लागला. नूतन पल्लवरूपी मृदु-आसनावर बसून त्याने एकदा कौतुकाने चचल झालेल्या चित्ताने ( म्हणजे व्युत्थानसमयीं ) सर्व दिशाकडे पाहिले. तेव्हा नद्या ह्याच ज्याच्या गळ्यातील एक पदरी माळा आहेत, मोठे पर्वत हेच ज्याचे स्तन आहेत, निर्मल आकाश हीच ज्याची वेणी आहे, चंचल निळे मेघ हेच ज्याच्या वेणीचे आजूबाजूस लोंबणारे केस आहेत, नीलवर्ण पल्लव हीच ज्याचीं वस्त्रे आहेत, पुष्पाचा भर हींच ज्यांचीं कर्णभूषणें आहेत, सागर हेच पूर्ण कलश ज्यानीं कडेवर

घेतले आहेत, ज्यांच्या शरीरावर अनेक विचित्र भूषणें आहेत, ज्यांनीं प्रफुल्ल पद्मिनी धारण केल्या आहेत, ज्यांच्या तोंडाचा वारा फार सुगंधी आहे, भ्रमर, कोकिला इत्यादिकाचे घु घुं ध्वनी हींच ज्यांची अव्यक्त व मधुर भाषणे आहेत, जलप्रवाहाचा खळ खळ ध्वनि हाच ज्यांच्या पायांतील नूपुराचा ध्वनि आहे, अतःरिक्ष हींच ज्याचीं मस्तके, पृथ्वी हेच पाय. वनपक्ती याच रोमपक्ती, जगले हेच पुष्ट नितंब प्रदेश; व चद्र-सूर्य हींच कुंडलें आहेत अशा प्रकारच्या त्या दाही दिशा त्रिभुवन वनितासारिख्या त्याला दिसल्या. तेव्हा अर्थातच त्या महा मुनीला मोठा संतोष झाला ५०.

**सर्ग ५१**—दाशूराचे मानसिक यज्ञ, त्यामुळें झालेला आत्मबोध, वनदेवतेच्या ठायीं त्यास झालेला पुत्र व त्याला दिलेले ज्ञान.

**श्रीवसिष्ठ**—त्यानतर दारुण तपामध्यें शूर असलेला तो मुनी तापसाच्या आश्रमात कदब दाशूर या नावाने प्रसिद्ध झाला. त्या शाखेच्या दलावर बसून व एका क्षणात दिशाकडे पाहून त्याने आपलें मन त्याच्यापासून परतविले व दृढ पद्मासन घालून परमार्थाचें ज्ञान नसल्यामुळें केवल कर्मामध्ये निष्ठा ठेवणाऱ्या त्याने फलाच्या इच्छेनें मनाने यज्ञ केला. अंतरिक्षात पसरलेल्या शाखेच्या पानावर बसूनच त्यानें सकल्पानें आधानापासून अश्वमेधापर्यंत सर्व यज्ञक्रिया केल्या. तेथे दहा वर्षे बसून त्यानें मनानेच गवालंभ, अश्वमेध, नरमेध इत्यादि विपुल दक्षिणायुक्त यज्ञांनी देवाचे पूजन केले. एवढ्या अवकाशात कर्मसामर्थ्यामुळें त्याचे चित्त रागादि मळशून्य झाले आणि त्या निर्मल चित्तात आत्मप्रसादजन्य ज्ञान बलात्कारानें शिरलें.

त्यानतर ज्याचें अविद्या-आवरण नाहींसें झालें आहे व वासनामळ गळून गेला आहे अशा त्यानें एकदा शाखेच्या अग्रावर बसलेल्या एका वनदेवतेस पाहिलें. तिचे नेत्र विशाल होते, वस्त्र पुष्पाप्रमाणें शुभ्र होतें, त्या कामिनीचें वदन मोठें होतें. नेत्र मदाने फिरले होते. तिच्या अगास नील कमलाचा वास येत होता व ती फारच मनोहर होती. असो; तो मुनि त्या सुंदरीस म्हणाला—" हे कमलाक्षि, तूं कोण ? भक्तीनें प्रणाम करीत असलेली व लज्जेनेंही खालीं मुख घातलेली तूं कोकिला व पुष्पभर याच्या योगानें वाकलेल्या लतेप्रमाणें दिसतेस. आपल्या कांतीनें तूं पुरु-

त्याच्या कामास क्षुब्ध करतेस. जिवलग सखीप्रमाणें पुष्पयुक्त लतेचा आश्रय करून तूं का राहिली आहेस ? ”

मुनीचा हा प्रश्न ऐकून ती हरिणाक्षी त्यास उलट असें मनोहर वचन बोलली “ या लोकीं जे जे अलभ्य विषय आहेत ते ते सर्व महात्म्यांस केवळ प्रार्थनेनेंच सुलभ होतात. मी लतानीं भरलेल्या व या तुझ्या कदंबानें अति अलंकृत झालेल्या वनात रहाणारी वनदेवता आहे. येथील लताकुंज हींच माझीं क्रीडागृहें आहेत. गेल्या चैत्रशुक्लपक्षाच्या त्रयोदशीस मदनोत्सव प्रसंगानें नंदनवनात वनदेवताचा जो मोठा समाज जमला होता त्यांत मी गेले. हे नाथ, तेथें त्रैलोक्यातील सर्व वनदेवता मला दिसल्या. मदनोत्सव प्रसगी माझ्या सर्व सख्या मला तेथें भेटल्या. पण त्या सगळ्याजणी पुत्रयुक्त असून त्यात मीच कायती एकटी पुत्ररहित होतें. त्यामुळें मला फार वाईट वाटलें. पण हे नाथ, सर्व इष्ट मनोरथ पूर्ण करणारा तूं कल्पतरु स्थित असताना मी एकाद्या अनाथ अबलेप्रमाणें कष्टी व्हावें हें काहीं चागलें नव्हे, यास्तव भगवन्, मला पुत्र दे. नाहींतर पुत्रदुःखामुळें होणाऱ्या तापाची शाति करण्याकरितां मी येथेच अग्नीमध्यें आपल्या शरीराची आहुति देईन. ”

याप्रमाणें भाषण करणाऱ्या तिला आपल्या हातातील पुष्प देऊन दयालु मुनिश्रेष्ठ हसून म्हणाला “ सुदरि, जा, उत्तम वेलीला जसें फूल येते त्याप्रमाणे एका महिन्याने तुला रमणीय पुत्र होईल. पण प्राणसंकटप्रसगीं आपल्या नाशाचा सकल्प करून तूं त्याची मजपाशीं प्रार्थना केल्यामुळे तो तत्त्वज्ञ होईल. अन्य वनदेवताच्या पुत्राप्रमाणें भोगलंपट होणार नाहीं. ”

इतके बोलून जिचे मुखमंडळ प्रसन्न झालें आहे अशा त्या सुंदरीचें त्यानें विसर्जन केले. त्या महामुनीची परिचर्या करण्याकरिता ती फार उत्सुक झाली होती, पण त्याने तिची ती प्रार्थना मान्य केली नाहीं. यास्तव ती आपल्या घरी परत गेली व कदंब-दाशूर तेथे एकटाच राहिला. त्यानंतर ऋतु-संवत्सरात्मक काल भराभर जाऊं लागला व बारा वर्षे बारा दिवसासारखीं निघून गेलीं असता तीच सुंदरी बारा वर्षांच्या पुत्रास घेऊन मुनीकडे आली. चद्राप्रमाणें ज्याचें मुखमंडल आल्हादकारक आहे अशा त्या दाशूरास नमस्कार करून व त्याच्या पुढें बसून ती म्हणाली

" भगवन्, हा तो आमचा भव्य कुमार आहे. मी त्याला सर्व कलांमध्यें कुशल केले आहे. पण हे प्रभो, त्याला केवल शुभ ज्ञान प्राप्त झालेलें नाहीं. यास्तव, हा पुनः या ससारचक्रांत पडणार नाहीं, असें ज्ञान आपणच याला शिकवा. आता याला ज्ञानोपदेश करण्यास आपणच योग्य आहां. शिवाय कुलीन पुत्रास मूर्ख कोण राहू देईल ? "

रामा, ही तिची प्रार्थना मान्य करून दाशूरानें तिच्या पुत्राला आपल्या पाशी ठेवून घेतले व तिला परत पाठविलें. ती गेली असता तो बालकही पित्याचा अतेवासी ( शिष्य ) होऊन राहिला. परिचर्यादिकामुळें होणारे क्लेश सहन करीत तो तेथें काही दिवस राहिला असता पित्याच्या विचित्र उक्तींनी त्याला परोक्षज्ञान झाले. तथापि त्याला आत्म्याचें अपरोक्ष ज्ञान व्हावे म्हणून त्याच्या पित्यानें त्याला आख्यानें, आख्यायिका, इतिहास, वेद-वेदात-निश्चय इत्यादिकाच्या योगाने पुष्कळ दिवस बोध केला. ( केवल सिद्धाताचेंच एकसारिखे प्रतिपादन करू लागल्यास श्रोत्याला कटाळा येतो. म्हणून उत्तम प्रतीचे उपदेशक त्यास आख्यानादिकाच्या योगानें रम्य व चित्ताकर्षक करीत असतात. ) हा आपला पुत्र प्रत्यगात्म्याचे ठायीं दृढनिष्ठायुक्त व्हावा ह्मणून त्यानें त्याला अतराळीं वृक्षाग्रावर बसूनच अनेक कथा सागितल्या ५१.

**सर्ग** ५२—सकल्पानें कल्पिलेलें विश्व मिथ्या आहे हे सागण्याच्या इच्छेनें आकाशोत्थ राजाचें कल्पित चरित्र येथें सागतात.

**श्रीवासिष्ठ**—राघवा, एकदा मी गगेत स्नान करण्याकरितां अदृश्य आकाराने आकाशमार्गानें जात होतों. सात ऋषींचें मडल हा ज्याचा एक भाग आहे अशा विपुल आकाशातून निघून मी शात रात्रीं दाशूराच्या उंच कदंब वृक्षावरून जात असताना याच्या अग्र शाखेच्या पल्लवगुहेंतून ऐकू येणारें, कमलाच्या कळ्यात अडकून राहिलेल्या भ्रमराच्या गुजारवाप्रमाणे फारच रमणीय वचन माझ्या कानीं पडलें. निर्जन वनात मनुष्यवाणीचा प्रायः असभव असल्यामुळें कौतुकानें मी आकाशात थाबून ऐकू लागलों. तों हे शब्द माझ्या कानीं पडले—

महाबुद्धिमान् पुत्रा, या ससारासारखीच एक अति आश्चर्यकारक कथा मी तुला सागतों, ती ऐक. एक महा वीर्यवान व त्रिभुवनांत प्रख्यात असा खोत्थ—( आकाशातून उठलेला ) नावाचा राजा आहे. तो जसा श्रीमान्

तसाच जगाचें आक्रमण करण्यासही समर्थ आहे. धनवान् लोक जसे चूडामणीला आपल्या मस्तकावर धारण करितात त्याप्रमाणें भुवनांतील सर्व नायक ( ब्रह्मा-विष्णु-इंद्र ) त्याची आज्ञा शिरसा मान्य करितात. साहस करण्याची त्याला मोठी आवड असून नानाप्रकारचे आश्चर्यकारक विहार तो करितो. त्रिभुवनांतील कोणींही त्याला आपल्या अधीन करून घेतलें नाहीं. समुद्राच्या लाटाप्रमाणें असलेल्या त्याच्या सहस्रावधी सुख-दुःखदायी कर्मांची गणना करण्यास कोण समर्थ आहे? आकाश जसे मुठींत धरता येत नाहीं त्याप्रमाणें त्या अतिवीर्यवान् राजाचें वीर्य शस्त्रे, अग्नि इत्यादि कोणत्याही उपायानीं कुंठित करिता येणे शक्य नाहीं. त्याच्या अल्पप्रयोजनाकरिता सहस्रावधि संकल्पानें व्याकुल झालेल्या लीलेचें अनुकरण इंद्र, उपेंद्र व शंकरही अंशतः सुद्धा, करूं शकत नाहीत. त्या राजाचे उत्तम, मध्यम व अधम असे तीन देह सर्व जगाचें आक्रमण करून रहातात आणि ते सर्व व्यवहार-क्रीडा करण्यास समर्थ आहेत. तीन शरीरानीं युक्त असलेला तो अति विस्तृत अव्याकृताकाशात झाला. ज्याप्रमाणे एकादा पक्षी क्रमानें आकाशातच अंडे, पिंड व पंख या तीन शरीरानीं युक्त होऊन उत्पन्न होतो व सर्वतः भयभीत होऊन पिंपळादिकाचीं निःसार फळें खाण्यात गुतला असता एकाएकीं खट्, खुट् असा थोडासा ध्वनि होताच ( तो शब्द का झाला? कोठून झाला याचा विचार न करिता ) उडून जातो त्याप्रमाणे स्थूल, सूक्ष्म व कारण या तीन शरीरानीं युक्त असलेला तो खोत्थ, ब्रह्माकाशात उत्पन्न होऊन, सर्वतः भयभीत होत्साता तुच्छ विषयात आसक्त होतो व विधि-निषेधरूप शब्दाप्रमाणे चेष्टा करूं लागतो. त्याच अपार आकाशात त्याने एक नगर ( ब्रह्मांड ) निर्मिले आहे. त्यात चवदा ( लोक किंवा विद्या ) महामार्ग असून तीन भुवने अथवा वेद या भागानीं ते भूषित झाले आहे. ( नंदनादि ) वने व ( चैत्ररथादि ) उपवने यानीं तें युक्त आहे मेरु-मंदारादि क्रीडा पर्वतानी ते सुंदर झाले आहे. मोत्याच्या पंक्तीनीं संपन्न असलेल्या सात ( समुद्ररूपी ) वापींनीं ते भूषित झाले आहे. शीतळ व उष्ण प्रकाश देणारे ( चंद्र-सूर्य ) दोन दिवे त्यात लाविले आहेत. शास्त्रीय कर्मांनी मिळणारी ऊर्ध्व गति व अशास्त्रीय आचरणाने प्राप्त होणारी अधोगति यानीं त्यांतील बाजाराचा मार्ग सदा वहात असतो. असो;

वाळा, त्या नगरात त्या राजानें ससारी ( जंगम, चर, ) व विषयांत आसक्त होणाऱ्या लहान लहान ( मानुषादि शरीररूप ) खोल्या केल्या आहेत. त्यातील कांहीं खालीं, कांहीं वर, व कांहीं मध्यें आहेत. पण त्या सर्व विनाशी असून त्यातील काहीं फार दिवसांनीं नाश पावणाऱ्या व कांहीं सत्वर नाश पावणाऱ्या आहेत. त्या खोल्या ( केंसरूपी ) काळया गवतानें आच्छादित केलेल्या आहेत. नऊ द्वारानीं भूषित केल्या आहेत. ज्यांतून सतत वारा वाहत आहे अशी पुष्कळ वातायनें ( खिडक्या ) त्यास आहेत. ( ज्ञानेद्रियसज्ञक ) पाच दीपाच्या योगानें त्या खोल्या प्रकाशित झाल्या आहेत. दोन माड्या व तिसरा पाठीचा कणा या तीन स्तंभाचा त्याना चागला आधार आहे. शुभ्र हाडे हेच त्यातील वेळू असून त्यास वरून मऊ चामड्यानें मढविलें आहे. हात हेच त्यातील दोन मार्ग आहेत. त्या महात्म्या राजानें मायेनेच त्या खोल्यावर 'मी' असा अभिमान ठेवून त्याचें रक्षण करणारे यक्ष ( पूज्य अहंकार ) उत्पन्न केले आहेत. ते ( आत्मविवेकरूप ) प्रकाशास फार भितात. असो, अशा त्या असख्य खोल्या व्यवहार करू लागल्या, म्हणजे घरटयातील पक्ष्याप्रमाणें तो राजा ( संकल्परूप जीव ) विविध क्रिया करितो. याप्रमाणें शेकडों त्रिशरीरांतल्या यक्षांसह, लीलेनेंच त्याच्या वश न होतां, राहून तो पुनः तेथून निघून जातो. वत्सा, त्या चलचित्त पुरुषाला पुनः केव्हा तरी अविद्यमान ( ज्याची उत्पत्ति पुढें व्हावयाची आहे अशा ) स्वप्नादि जगात जावें अशी स्थिर इच्छा होते आणि अगात भूत शिरल्याप्रमाणें ( निद्रादि ) आवेशानें तो तेथून निघून ( जाग्रद्-देहादिकाचा अभिमान सोडून ) धांवत जातो. गधर्वानीं निर्मिलेल्या पुरासारख्या त्या आपल्या मिथ्या इष्ट पुरास पोंचतो. पुत्रा, त्या चलचित्त पुरुषाला केव्हा केव्हा मी नष्ट व्हावें असेंही वाटतें व त्याबरोबर तो नष्ट होतो. ( येथील नाश म्हणजे सुषुप्ति, सकल्पाच्या लयाची अवस्था असे समजावें. ) पुनः आपल्या पूर्ण स्वभावापासून उत्पन्न होतो. पुनः मोठमोठीं कर्मे करतो. पण त्या व्यवहारसमयीं शत्रु, रोग, दारिद्र्य इत्यादिकाकडून त्यास मोठी पीडा होऊं लागली असता 'हाय हाय, काय करूं! मी अज्ञ आहें. दुःखित आहें.' असें म्हणून तो शोक करूं लागतो. कदाचित् त्याला आनद होतो व पुनः दुःख होतें. तो पुनः दीन होतो. तात्पर्य, हे पुत्रा, तो महात्मा राजा, अंगांत सामर्थ्य असल्यास

दुसऱ्यांवर चाल करून जातो व त्यांचा पराभव करतो. संपत्ति मिळवतो. धनमद वहातो. इष्टानिष्ट व्यवहार करतो. जाग्रत् व स्वप्न या अवस्थांमध्यें तो भासतो व सुषुप्ति, मरण, समाधि यांत भासत नाहीं. पण तो अंतर्गत आत्मज्योतीनें सदा भासुर असतो ५०.

**सर्ग ५३**—विश्व संकल्पकल्पित आहे, याविषयी सांगितलेल्या खोत्थाच्या आख्यानाचें तात्पर्य.

**श्रीवसिष्ठ**—रामा, कदंबाच्या अग्रशाखेवर बसून पित्यानें सांगितलेलें हें अद्भुत आख्यान ऐकून पुत्र म्हणालाः—" बाबा, खोत्थ नांवाचा हा प्रख्यात राजा कोण? व तुह्मी हें मला काय सांगितलेंत? भविष्यत् ( पुढें होणारें ) नगर कोठें व तो त्याच वेळीं त्यांत जातो कसा? या आख्यायिकेचें तात्पर्य मला काही समजलें नाहीं." पुत्रानें असें सांगितलें असतां दाशूर म्हणतो-बाळा, या कथेचें रहस्य मी तुला सांगतों; म्हणजे संसारचक्राचें तत्त्व तुला कळेल. ही संसाररचना असत् ( परमार्थ-सत्ता-शून्य ) असतानाही अज्ञानामुळें तिचा उद्भव झाला आहे. अर्थात् ती मायामय आहे. हें तत्त्व तुला चांगल्या रीतीनें कळावें, म्हणून मी ही कथा सांगितली. प्रथम आकाशापासून संकल्पप्रधान मन होतें. त्याच्या समष्टि-व्यष्टि-भावाचें एकीकरण करून त्यालाच मी येथें खोत्थ असें म्हटलें आहे. प्रवृत्तिवासनेमुळें तो आपोआप उत्पन्न होतो व निवृत्ति-वासनेमुळें आपोआप लीन होतो. हें सर्व विस्तृत जग हा त्याचाच परिणाम आहे. कारण त्याचा उद्भव झाला असतां हें सर्व होतें व त्याचा लय झाला असतां हें सर्व जातें. वृक्षाच्या शाखांप्रमाणें अथवा पर्वताच्या शिखराप्रमाणें ब्रह्मा, विष्णु, इंद्र, रुद्र इत्यादि सर्व त्याचे अवयव आहेत. केवल अधिष्ठान चैतन्याच्या अनुग्रहानें चेतन ब्रह्माकार होऊन यानें शून्य ( जगदभावयुक्त ) आकाशांत ( ब्रह्ममध्यें ) आपलें त्रिजगत्पुर निर्मिलें. त्यातच हे चवदा लोक विस्तार पावलेले असून ते जणुं काय प्राण्यांचे कोशच आहेत. त्यांत वनें, उपवनें, उद्यानें, सह्य, मेरु, विंध्य, मंदार इत्यादि क्रीडा पर्वत, सूर्य व चंद्र हे ऊन व थंड दिवे, ज्यांच्या पात्रांतील जल-बिंदू सूर्याच्या किरणांनीं, मोत्यांसारखे चमकत असतात, अशा गंगा, यमुना, सिंधु, नर्मदा, गोदावरी, कृष्णा, कावेरी इत्यादि नद्या, व क्षीरादि सात समुद्र याच सात विहिरी आहेत. भूमी व स्वर्ग यांच्या मधील अंतराल प्रदेश हाच मोठा बाजार

मार्ग असून त्यात नर पंचमहायज्ञजन्य पुण्य हें धन देऊन देवापासून वृष्टि-प्रभृति वस्तू विकत घेतात. देवही मानवांस आपल्या जवळचें अमृत, वृष्टि, प्रकाश इत्यादि धन देऊन त्याच्या पासून हव्य विकत घेतात. याच न्यायानें त्या सर्व बाजारभर प्राण्यांची देव घेव-एकसारखी चालली आहे. पुण्य व अपुण्य हीं दोनच नाणीं त्या पेठेंत चालतात, आणि सुख व दुःख या दोनच जिनसांची तेथें प्रायः सर्व जीव खरेदी करीत असतात. त्या संकल्पराजानें आपल्या या जगन्नगरात आपल्या क्रीडेकरितां विचित्र देहरूप खोल्या रचल्या आहेत. त्यातील कित्येकास देव असें नाव देऊन ऊर्ध्वप्रदेशीं नियुक्त केलें आहे. नर, नाग इत्यादि दुसऱ्या कित्येकाची खालीं योजना केली आहे. मांसरूपी मातीनें लिंपलेल्या त्या खोल्या प्राण-संज्ञक वातयंत्र-प्रवाहानें चालतात. शुभ्र हाडें हींच त्यातील लाकडें व त्वचा हाच त्यास वरून केलेला रम्य व मृदु गिलावा होय. आपापल्या आयुर्मर्यादेप्रमाणें तीं शरीरें क्रमानें नाश पावतात. कान, नाक, तोंड इत्यादि त्याचीं नऊ द्वारें आहेत. त्याच्या डोक्यावर केंसाचें छप्पर आहे. नाकपुड्या ह्याच त्याच्या मुख्य खिडक्या असून त्यातून प्राण हा उष्ण वायु व अपान हा शीत वायु एकसारखा वहात असतो. हात, पाय इत्यादि त्यातील मार्ग असून श्रोत्र-नेत्रादि पाच इंद्रियें हेच त्यात लावलेले पाच दिवे होत. त्यातील प्रत्येक देहात अहंकार या नावाचा संकल्पानेंच निर्मि-लेला एकेक यक्ष त्याचें रक्षण करण्याकरिता ठेविलेला आहे. ते सर्व यक्ष परमात्म-दर्शनास फार भितात. कारण आत्मज्ञान झालें म्हणजे हृद-यग्रंथिरूप अहंकार क्षीण होतो, असा अनुभवही आहे. म्हणून ते त्याला भितात. उघडच आहे कीं, आपल्याला निश्चयानें ठार मारणाऱ्या बलाढ्य शत्रूला कोण भिणार नाहीं? देहच अहंकार आहे, असें काहीं लोक सम-जतात. पण तें बरोबर नाहीं. कारण देह हा आधार असून त्यांत टोप-लींतील मांजराप्रमाणें, पिशवींतील सर्पाप्रमाणें अथवा वेळूंतील मोत्याप्रमाणें हा अहंकार आधेयमात्रानें रहातो. समुद्रांतील तरंगाप्रमाणेंच संकल्पतर-गही देहगृहामध्यें दिव्यासारखे क्षणात उदय पावतात व क्षणात शांत होतात. आता तो राजा भविष्यत्—नगरात कसा जातो ते सांगतो. मनो-राज्य, स्वप्न इत्यादि अवस्थामध्यें जेव्हा तो आपल्या इष्ट देहनगराचा संकल्प करतो, तेव्हां संकल्पित देह उत्पन्न झाला आहे असें तो तत्काल पहातो

व त्यामुळें त्याला नुकत्याच उद्भवलेल्या त्या देहांत शिरतां येतें आणि संकल्प सोडतांच तो आपोआप नाश पावतो. जाग्रत् व स्वप्न या दोन अवस्थामध्यें विक्षेपामुळें त्याला पुष्कळ आयास होतात. ते घालविण्याकरितां तो ( जीव ) संकल्प सोडून आपोआप आपल्या कारणात लीन होतो. त्याला तेथें विश्राति मिळते. ( ही विश्राति सुषुप्ति, मरण, व समाधि या तीन अवस्थात मिळते. त्यातील पहिल्या सुषुप्तींत जीवाचा म्हणजे संकल्पप्रधान मनाचा लय होतो. मरणसमयीं तो कारणभूत अविद्यामात्र होतो व समाधीच्या वेळीं साक्षात् स्वस्वरूपास मिळतो. ) आता पुनः तो उत्पन्न कसा होतो, तें सागतो. एकाद्या लहान मुलानें कल्पिलेल्या यक्षाप्रमाणें केवल कल्पनामय असा तो आपोआप आपल्या अनंत दुःखाकरिताच उत्पन्न होतो. नतर आपल्या सत्तेनें तो हें सर्व जग म्हणजे विपुल दुःखच निर्माण करतो आणि आपल्याच असत्तेनें त्याचा नाश करतो. तो आपल्याच दुःखदायिनी निषिद्ध आचरणाभिमानरूप चेष्टेनें दुःखी होऊन, अर्ध्या चिरलेल्या तुळईमध्ये ठोकलेली खुटी उपटून, तुळईच्या सांधींत मर्मस्थान अडकल्यामुळें, प्राण जाण्याचा प्रसग आला असतां ओरडणाऱ्या वानराप्रमाणें, रडत बसतो. अकस्मात् पुढें पडलेला मधाचा थेंब चाटून जसा गर्दभ आनदित होतो, त्याप्रमाणें जीव आपल्या सकल्पित विषयानंदाचा लेश मिळताच छाती पुढे काढून, डोकें वर उचलून व हात फुगवून चालू लागतो. ( पण गर्दभाला मध मिळणें जसे दुर्लभ तसेंच जीवाला भोगसुख मिळणेंही दुर्लभ आहे. मग मोक्षसुखाची वार्ता तर दूरच राहिली. ) तो बालकाप्रमाणें आपल्या सकल्पानेंच एका क्षणात विरक्त होतो. एका क्षणात अनुरक्त होतो व एका क्षणात विकारयुक्त होतो.

यास्तव हे माझ्या लाडक्या, या संकल्पालाच सर्व बाह्य वस्तूपासून परतवून चित्तैकाग्र्याचा अभ्यास व तत्त्वज्ञान याच्या योगानें निर्मूल करून सोड. सर्व वासना सोडणे हेच त्याला निर्मूल करणे आहे. त्यानंतर तुझी माति प्रत्यगात्मभूत ब्रह्माचा आश्रय करून विश्राति घेईल असें कर. मागच्या सर्गात सागितलेले उत्तम, मध्यम व अधम देह कोणते तें आता सांगतो. सत्त्व, रज व तम या नावाचे ते तीन देहच या जगाच्या स्थितीचे कारण आहेत. तमोरूप संकल्प, प्राकृत चेष्टेच्या ( म्ह. स्वाभाविक प्रवृत्तीच्या) योगाने नरकातील प्रसिद्ध कृमि-कीट-स्थावर इत्यादि भावांस

प्राप्त होतात. सत्त्वसंकल्प धर्म व उपासना (अर्थात् शास्त्रीय प्रवृत्ति) यांमध्यें परायण होतो. त्यामुळें त्याला स्वाराज्य ( म्हणजे हिरण्यगर्भाच्या पदापर्यंत उत्तरोत्तर देवताभाव ) प्राप्त होतें. त्याच्यापासून मोक्ष दूर नसतो. रजोरूप संकल्प मनुष्यजन्म घेऊन त्याला योग्य असा व्यवहार करतो व पुत्र, स्त्री इत्यादिकांवर आसक्त होऊन तो संसारांत स्थिर रहातो. पण, हे महामते, हें त्रिविध रूप सोडून सकल्पानें आपला अत्यंत उच्छेद करून घेतला असतां तोच स्वतः मोक्षरूप होतो.

पुत्रा, आतां मी तुला संकल्पक्षयाचा उपाय सांगतों. बाह्य इंद्रियांचें वैराग्यानें नियमन करून विवेकानें मनाचाही निग्रह कर आणि बाह्य व आभ्यंतर विषयां-विषयींच्या संकल्पाचा क्षय कर. बाळा, तूं जरी सहस्रावधि वर्षें दारुण तप केलेंस, अथवा आपल्या विनाशी शरीराला पाषाणावर वांटलेंस, किंवा अग्नींत अथवा सागरांत उडी घातलीस, पर्वताच्या कड्यावरून आपल्याला ढकललेंस, तरवारीच्या धारेनें आपले शतशः तुकडे करून घेतलेस, साक्षात् ब्रह्मा, विष्णु व महेश यांच्यापासून जरी तूं उपदेश घेतलास, अथवा अति दयाळु दिगबर दत्त जरी तुला उपदेश करावयास आला व तूं जरी स्वर्ग, भूमि व पाताळ यांतील कोठेंही जाऊन राहिलास तरी संकल्पशातीवाचून मुक्त होण्यास दुसरा उपाय नाहीं. यास्तव वत्सा, त्या परम पावन सुखासाठीं तू संकल्पशाति संपादन कर. दृढ निश्चयानें त्याच एका उपयाचा सतत अभ्यास कर. संकल्पदोरीमध्येंच हे सर्व भाव ओंवलेले आहेत. पण त्यांची आधारभूत दोरी तोडली म्हणजे ते कोठें जातात तें काहीं समजत नाहीं. संकल्पानेंच सत् असत् होतें व असत् सत् होतें. म्हणजे सर्व विकल्प संकल्पाबरोबर उठले आहेत. पण ते आपल्या कारणरूप संकल्पालाच बरोबर ओळखू शकत नाहींत. तो सत् आहे कीं असत् हें त्यांना कळत नाहीं. सर्व कार्यांची हीच स्थिति आहे. मग कार्यें आपल्या जनक कारणाचे ठायींही जर कुंठित होतात तर तीं असंग परमात्म्याला कशीं ओळखूं शकणार? प्राणी जसा जसा संकल्प करतो त्या-त्याप्रमाणें एका क्षणांत सर्व होतें. ( प्रारब्ध प्रतिबंधामुळें आमच्या पुष्कळ संकल्पांचें फळ त्याच क्षणीं आपल्या अनुभवास येत नाहीं, असें येथें कोणास वाटेल, पण तें बरोबर नव्हे. कारण संकल्पसमयीं सर्व चित्तवृत्ति संकल्पित पदार्थमय होते असा अनुभव

आहे. तेंच त्या पदार्थाचें तत्काल होणें आहे. शिवाय संकल्पित पदार्थाचा बीजभाव सकल्प-समयींच उत्पन्न होऊन मनांत संस्कार अथवा वासनारूपानें रहातो, हेंही प्रत्येकास थोड्याशा विचारानेंच कळण्यासारखें आहे.) यास्तव बाळा, तूं मुळीं कशाचा संकल्पच करूं नकोस. तूं निःसंकल्प व प्राप्त होईल तो व्यवहार करणारा हो. संकल्पाचा क्षय झाला असतां चित्त आपोआप आत्माभिमुख होतें. सत्यैकस्वभाव ब्रह्म असत्य मायावशात् योनिद्वारा प्राणिरूप होतें आणि व्यर्थ जगदुःख भोगतें. पण ते त्याला योग्य नव्हे. केवल दुःखाकरिताच वारंवार मरण्यांत कोणता पुरुषार्थ आहे? प्राज्ञ जन ज्याच्या पासून सुख होईल त्याचाच आश्रय करितात. यास्तव बाळा, तूही तत्त्वज्ञानी हो. विकल्प-जालाचें बलात्कारानें उन्मूलन कर व अद्वितीय मोक्षाख्य पद अक्षय सुखाकरिता स्वप्रयत्नानें संपादन कर. तुझी चित्तवृत्ति निजल्यासारखी शांत झाली म्हणजे यातील कांहींएक अशक्य नाहीं, असें तुझें तुलाच कळेल ५३.

**सर्ग ५४**—संकल्पाची उत्पत्ति, रूप, घनता व उच्छेदाचा उपाय.

**श्रीवासिष्ठ**—राघवा, त्यानतर 'बाबा, सकल्प कसा असतो, वृद्धि कसा पावतो व नष्ट कसा होतो?' असा पुत्रानें प्रश्न केला असता दाशूर त्यास म्हणालाः—"बाळा, अनंत, सत्तामात्रस्वरूपी व चित्–अशा आत्मतत्त्वाचें विषयोन्मुखत्व हाच संकल्पवृक्षाचा अविद्याबीजोद्भव प्रथम अंकुर होय. त्यालाच मागें मन असें म्हटलें आहे. चित्-लेशानें जो सत्तावान् झाला आहे. असा तोच अकुर चित्ताकाशास सर्वतः व्यापून, अधिष्ठानचैतन्याच्या चित्स्वभावतेस झाकून सोडून जड प्रपंचाकार करण्याकरितां मेघाप्रमाणें हळु हळु घन होतो. (म्हणजे समष्टिमनाच्या संकल्पापासून जगाचा उद्भव होतो.) नंतर चेत्य म्हणजे चिद्विषय आपल्याहून जणु पृथक् आहे अशी भावना करणारी चिति, बीजाकुर-न्यायानें, संकल्पतेस प्राप्त होते. (म्हणजे बुद्धि-अहंकार-प्राण-इंद्रियें-देह इत्यादि आकाराचा व्यष्टिसंकल्प उत्पन्न होतो.) नंतर मूलाकुरापासून जसे शाखांकुर उत्पन्न होतात त्याप्रमाणें संकल्पापासून सकल्प आपोआप उत्पन्न होतो आणि दुःख देण्याकरितां आपोआप वाढतो. सुखाकरितां नव्हे. समुद्र जसा जलमात्र तसें जग संकल्पमात्र. संकल्पावाचून दुसरें संसारदुःख कोणतेंच नाहीं. निर्विकार व अद्वय वस्तूच्या ठिकाणींही काकतालीय न्यायानें उगीचच जगाचा उद्भव

झाला आहे. मृगजळ अथवा दोन चंद्र या विवर्तांप्रमाणें जग हाही असत्य विवर्त आहे. पित्तप्रकोप करणारे पदार्थ खाले असतां शुभ्रपदार्थही जसा पिवळा दिसूं लागतो त्याप्रमाणे तुझ्या हृदयांत असत्य संकल्प आपोआप येतो. तू असत्यच उत्पन्न झाला आहेस. असत्य असूनही रहातोस. पण मी सांगत असलेलें हें तत्त्व तुला बरोबर कळलें म्हणजे तुझ्या ठिकाणचा असत्य अंश लीन होईल. वेदांतांत प्रसिद्ध असलेला पूर्णात्मा मीच आहें. माझे सुख-दुःखादिमय जन्मादि भाव मिथ्या आहेत, असे ज्ञान नसल्यामुळेंच तूं संतप्त होत आहेस. आपल्याच संकल्पामुळें तू व्यर्थ मूढ होत आहेस. यास्तव बाळा, संकल्प करूं नकोस. वर्तमानसमयीं, पूर्वी अनुभविलेल्या सुख-दुःखाचें स्मरण करूं नकोस. भ्रमनिवृत्तीचे हेच दोन उपाय आहेत. कारण संकल्पाचा क्षय झाला म्हणजे सर्व प्रकारचें भय क्षीण होतें. आणि पूर्व भावाचें स्मरण केलें नाहीं, म्हणजे संकल्प आपोआप क्षय पावतो. पुत्रा, हा उपाय फारच सुकर आहे. कोमल पल्लव व पुष्पें याना चुरावयाचें झाल्यास थोडासा तरी प्रयत्न लागतो पण केवळ भावना आणि संकल्प न करणें याला प्रयत्नाची मुळींच गरज नाहीं. ( कारण आपल्याला कांहीं कार्य करावयाचें असल्यास त्याकरिता कमी-अधिक प्रयत्न करावा लागतो पण जें करावयाचें नसते त्याकरिता प्रयत्न मुळींच करावा लागत नाहीं. हें सर्वांना ठाऊक आहे. ) कोठें जावयाचें झाल्यास प्रयत्न. जावयाचें नसल्यास प्रयत्न मुळींच नाही, फुलझाडावरील फूल काढावयाचें झाल्यास त्याकरिता आपल्याला हात उचलावा लागतो. पण संकल्प सोडावयाचा झाल्यास तेवढाही प्रयत्न करावा लागत नाहीं. ज्याला संकल्पाचा क्षय करावयाचा असतो त्याला गत गोष्टींचा विचार न करणें या एकाच उपायानें निमिषार्धात तो करिता येतो. पण-संकल्पक्षयानें दुःखक्षय झाला तरी निरतिशय आनंदाची प्राप्ति कशी होईल-म्हणून विचारशील तर सांगतों-मी पूर्ण आनंदरूप आहें, असें निरंतर चिंतन करणें या एकाच उपायानें स्वतःसिद्ध आनंद अभिव्यक्त होतो. ( तो नवा उत्पन्न होत नाहीं. ) आजपासून संकल्प करावयाचा नाहीं, या एका संकल्पानें सर्व संकल्पांचा व आत्मतत्त्वमननरूप मनानें विषय-विक्षिप्त मनाचा छेद करून तूं आत्म्यामध्यें स्थिर होऊन रहा. हें कांहीं फारसें दुष्कर नव्हे. या दोन उपायांनीं संकल्प समूळ नष्ट झाला असतां दुःखही समूळ नाहींसें

होतें. संकल्पच मन, जीव, चित्त, बुद्धि व वासना आहे. त्यांचा भेद नाममात्र आहे. अर्थतः नाहीं. यास्तव संकल्प क्षीण झाला म्हणजे मन-जीव इत्यादि सर्व भाव क्षीण होतात. सकल्पच सर्व आहे. यास्तव त्याला हृदयांतून तोडून टाक. असा कष्टी का होतोस ? या आकाशाप्रमाणेंच हें जगही आहे. कारण तीं दोन्ही असन्मय सकल्पापासून झालीं आहेत. पण संकल्प सोडल्यावर सर्वच सकल्पमय असल्यामुळें सर्वांचाच अभाव होतो व त्या कारणानें शून्य रहाते असें म्हणू नये. कारण सकल्प व त्याचें कार्य विवर्तरूप आहे. त्यामुळें विवर्तरूप मृगजळ अथवा रज्जुसर्प निवृत्त झाला तरी त्याचे अधिष्ठान ( मरुभूमि व दोरी ) जसें रहातें त्याप्रमाणें सकल्पादिकाची निवृत्ति झाली तरी दृक्–आत्मा अवशिष्ट रहातो. नंतर एकदा बाधित झालेल्या अर्थाविषयीं ( मिथ्या ठरलेल्या विषयाविषयीं ) पुनः भावनाच उद्भवत नसल्यामुळे त्याचा पुनः उद्भव होत नाहीं. यास्तव भावनेचा उच्छेद करण्याची ज्याला इच्छा असेल त्यानें प्रथम जग मिथ्या आहे, ही कल्पना अभ्यासानें दृढ करावी म्हणजे शरीर व त्याचे सबधी पुत्रादि याच्या सुख-दुःखानें सुखी व दु·खी होण्याचा प्रसंग येत नाहीं. हे सर्व मिथ्या आहे, असा निर्णय झाला म्हणजे कोणत्याही वस्तूविषयीं स्नेह अथवा आस्था वाटत नाहीं. आस्थेच्या अभावीं हर्ष, शोक, क्रोध, भव, अभव इत्यादि काहीं होत नाहीं. मनच चित्प्रतिबिंबामुळे जीव होऊन जगत् या नावाचें मानस नगर रचीत व त्याचा विनाश करीत राहिलें आहे. तें विषयसंबधामुळें त्याच्या त्याच्या वासनानी युक्त व अधिष्ठानचित्संबधामुळें स्फुरण-शक्तियुक्त होऊन राहिलें आहे. त्यामुळें मलिन व चल होऊन तें ही सर्ग–व्यवस्था करू शकतें.–असें जर आहे तर तें आपल्याला इष्ट असेल तेंच का करीत नाहीं, अनिष्ट का करिते ? म्हणून म्हणशील तर त्याचें कारण सागतो. जीव म्हणजे हृदयरूप वनातील एक मर्कट आहे. त्यामुळें तो आपल्याला अनुरूप अशीच क्रीडा करीत असतो. जीवमर्कट एका क्षणात दीर्घ आकार घेऊन तत्काल ऱ्हस्वही होतो. संकल्पजलावरील तरंगाचें नियमनही करता येत नाहीं. विषयांच्या दर्शनानें ते वाढतात व विषयदर्शन आणि स्मरण यांचा त्याग केला असतां क्षीण होतात. अग्नीची लहानशी ठिणगी थोड्याशा गवताचें सहाय मिळालें तरी जशी वाढते त्याप्रमाणें क्षुद्र विषयानेंही संकल्प दीप्त होतात. त्याचें

स्वरूप जर पाहूं लागलें तर ते विजेसारखे चंचल, भ्रमात पाडणारे, क्षणभंगुर, प्रदीप्त व जगामध्यें आकारानें प्रकट न होणारे आहेत, असें कळतें.

पुत्रा, आतां त्याच्या नाशाचा उपाय सांगतों. जें असत्य अज्ञान विकारभूत असतें त्याचीच सत्वर चिकित्सा करतां येते, यात संशय नाहीं. असत् कधींहीं सत् होत नाहीं; तसेंच सत् असत् होत नाहीं, असा नियम आहे. यास्तव संकल्प जर सत् असता तर त्याची चिकित्सा अशक्य झाली असती. पण तो स्वतः असत् आहे व त्यामुळें सुचिकित्स्य आहे. कोळशाच्या काळेपणाप्रमाणें ससार मळ जर स्वाभाविक असता तर तो धुवून टाकण्यास कोणता मूर्ख तयार झाला असता ? पण तो तांदळावरील कोंड्याप्रमाणें असल्यामुळे त्याचें निरसन करून तादुळासारख्या शुद्ध आत्म्याला व्यक्त करता येतें. पुत्रा, दीर्घ प्रयासानें अनादि संसाराचीही निवृत्ति करता येते. बाळा, हा संसारमळ जरी सर्वतः दाट पसरला आहे तरी तो तत्त्वज्ञाला अनायासानें घालविता येतो. कारण स्वप्नादि भ्रम केवळ प्रबोधानें ( जागें होणे अथवा ज्ञान यांच्या योगानें ) तत्काल क्षीण होत असल्याचें आपण प्रत्यक्ष पहातो. असंभावना, विपरीत-भावना इत्यादि मळ ज्ञानभूमिकाभ्यासरूपी पुरुष प्रयत्नानें नष्ट होतात. यास्तव तूं उद्यम कर. मिथ्या संकल्प व विकल्प यानीं युक्त असलेला व अगदीं स्वल्प उपायानेंही नष्ट होणारा हा ससार तू आजवर उगाचि जिकला नाहींस. अरे बाबा, असत् वस्तु चिरकाल कशी रहाणार ? पुत्रा, हा ससार किंवा त्यातील इष्ट विषय तुझे आहेत व तू त्याचा आहेस ही भ्राति सोड. कारण सर्वच आत्मा असल्यामुळें त्यात विषय-विषयी-भाव रहाणें शक्य नाहीं ५४.

**सर्ग ५५**—दाशूर व वसिष्ट याचा संवाद, वसिष्ठानीं कदंबशोभा पाहिली व उजा त्यावर गमन गेलें.

**श्रीवसिष्ठ**—रघुनंदना, रात्रीं पिता-पुत्रांचा, त्या वृक्षावर बसून, चाललेला हा संवाद मीं ऐकला आणि मुकाट्यानें पानें, फुलें व फळें यानीं भरलेल्या त्या कदंबावर उतरलों. तेथें बसलेल्या दाशूरास पाहिलें. इंद्रियनिग्रहाविषयीं अति शूर असलेला तो मुनि तपाच्या योगाने अग्नीसारखा दीप्त दिसत होता. देहांतून निघणाऱ्या प्रभेनें त्यानें भूतळ सोन्यासारखें करून सोडलें होतें. सूर्य जसा भुवनास तप्त करतो त्याप्रमाणें तो त्या

प्रदेशास संतप्त करीत होता. मला पहातांच तो महात्मा उठला. आणि पत्रासनावर बसवून त्यानें माझी फल पुष्पमिश्रित अर्घ्यादि उपचारांनीं पूजा केली. नंतर पुत्राच्या बोधाकरितां दाशूरानें पूर्वींच चालविलेली व संसारांतून तरून जाण्यास समर्थ असलेली ब्रह्माचर्चा मी त्याच्याशीं केली. तो वृक्ष पाहिला. त्याच्या आसपास अनेक मृगसमूह शांतपणें बसले होते. तो लतामंडलानें परिवेष्टित झाला होता. त्याच्या पानावर पडलेले दवाचे थेंब चांदण्यामध्यें मोत्यासारखे चमकत होते. त्याचें सर्व अंग पुष्पांच्या भारानें नम्र व शुभ्रही झालें होतें. त्याच्या अंगावर चढलेल्या वेलींच्या मंजिऱ्या वाऱ्यानें हालू लागल्या म्हणजे त्याला कांहीं अवर्णनीय शोभा येत होती. मुनींनीं बांधलेल्या पर्णकुटीप्रमाणें त्याच्या अंगावरील लतांचे सुंदर मंडप आपोआप बनले होते. हरणें आपलीं अंगें वेलींना घाशीत असत. त्यामुळे त्यांच्या पुष्पांतील सर्व रज खालीं पडून भूमि सुवर्णरेणूंनीं युक्त असल्यासारखी दिसत असे. त्या महावृक्षानें आसपासच्या सर्व वृक्षांना तुच्छ करून सोडलें होतें. मोराच्या अंगावर पुष्पपरागांचा अति वर्षाव होत असल्यामुळें त्याची अंगकांति बदलल्यासारखी दिसत होती. तो वृक्ष वसंत व वनदेवी यांचें निवासस्थानच आहे, असें मला त्यावेळीं वाटलें. भ्रमराचा गुंजारव तेथील शांतीचा भंग करीत होता. मुनीच्या प्रभावानें पक्षी त्याच्यावरील घरट्यांत स्वस्थपणें निजले होते. वानर शाखांवर डोकीं टेंकून घोरत होते. मुळाशीं डोळे झांकून झोंप घेत बसलेल्या अनेक आरण्य पशूंनीं एकमेव-अद्वितीय-तत्त्वाचाच जणुं काय अनुभव घेण्यास आरंभ केला होता. टवटवीत पानांनीं भरलेल्या त्या वृक्षावरील जीवांची संख्या, सृष्टींतील जीवसंख्येप्रमाणेंच, न कळण्यासारखी होती. त्याच्या खालीं फळांची जणु काय शय्याच हांतरली होती आणि त्या एकाच शय्येवर अनेक पशू बसून विश्रांति घेत होते. त्याचीं पिकलेलीं फळें वारंवार खालच्या प्राण्याच्या अंगावर पडून त्यांच्या एकाग्रसुखांत यत्किंचित् विघ्न आणीत असत. सारांश हे रामा, तो कदंब म्हणजे एक मोठा राजाच असून अनेक जीव त्याच्या आश्रयानें आपले जीवित सुखानें घालवीत होते.

वीर राजपुत्रा, अशाप्रकारच्या त्या अद्भुत वृक्षाला पहाणाऱ्या माझी ती रात्र मोठ्या आनंदानें गेली. वृक्षाची शोभा पाहिल्यावर मीही दाशूराच्या पुत्राला विचित्र कथा सांगून आत्मबोध केला. आमच्या परस्पर अशा

विचित्र कथा चालल्या असता ती दीर्घ यामिनी केव्हां निघून गेली तेंही कळलें नाहीं. अरुणोदय होताच पूर्व दिशेचें मुख सतेज झालें. पण बिचाऱ्या तारका फिक्या पडल्या. त्या वृक्षावरील सर्व शुभ पक्षी व खालचे बहुतेक पशू जागे होऊन रम्य ध्वनी व चेष्टा करूं लागले. पण आपला अनिष्ट काल जवळ आला आहे, असें जाणून घुबडे घाबरलीं. रात्रभर स्वच्छेनें फिरणारे सर्प बिळें शोधूं लागले आणि निशाचर आता दिवसभर कोठें लपून रहावें? या चिंतेंत पडले. असो; रामा, लागलाच मी त्या पिता-पुत्रास विचारून तेथून निघालों. तेही दोघे सत्पुरुष माझ्या मागोमाग काहीं अंतरावर मला पोंचविण्याकरिता आले होते. पण मी त्या नम्र साधूंना परतवून मदाकिनीवर गेलों. त्या आकाश गगेच्या शीत व स्वच्छ जलांत आह्लाददायी स्नान करून लागलाच मी आपल्या आकाशगत स्थानीं परत आलों.

रघुनदना, जगाची प्रतिभा सत्य असल्यासारखी जरी भासली तरी ती असत्य आहे, हें तुला चागले समजावें, म्हणून मीं ही दाशूराची कथा सागितली. आता तूं दाशूराच्या सिद्धाताप्रमाणें सदा उदार व आत्मानुसधानवान् हो. विकल्परूप आत्ममळ घालवून तू निर्मल आत्मतत्त्व पहा. म्हणजे सर्व भुवनांत पूज्य होशील ५५.

**सर्ग ५६**—जडाची सत्ता व असत्ता आणि चित्‌ची कर्तृता व अकर्तृता यांचा विचार करून सर्व दृश्याविषयीची आस्था सोडावी, असा उपदेश.

**श्रीवसिष्ठ**—रामभद्रा, दिसतें हें काहीं नाहीं, असा निर्णय करून 'अहं व मम' ही अध्यासरूप आस्था सोड. विवेकीजन अभावरूप वस्तूवर आस्था ठेवीत नाहींत. ज्याचें स्वरूप अनिश्चित आहे त्यावर आस्था ठेवणें अगदीं अयुक्त होय. या जगाला कोणत्या कारागिरानें कोणत्या योग्य साधनानीं रचिलें आहे, ते सागता येत नाहीं. बरें कर्त्यावाचूनच तें झालें आहे म्हणून म्हणावें तर कार्याला कर्त्याची अति आवश्यकता असल्यामुळें तसेंही म्हणण्याचें धैर्य होत नाहीं. यास्तव हें भ्रमानें आपोआप भासतें असेंच ठरवावें लागतें. पण रामा, जगज्जाल कर्त्यानें केलेलें असो कीं, अकर्तृक झालेलें असो तूं त्या मलिनाची भावना करीत बसूं नको. आत्मा सर्व इंद्रिय-रहित व त्यामुळेंच पर्वतादिकांसारखा जड असल्याप्रमाणें आहे. यास्तव त्याचें कर्तृत्व औपचारिक आहे; खरें नव्हे. म्हणूनच आम्ही हें सर्व जग परमार्थतः कर्तृशून्य व काकतालीयन्यायानें

झालेलें आहे, असें म्हणतों. अकस्मात् झालेल्या वस्तूंवर मूर्खावाचून दुसरा कोणीही आस्था ठेवीत नाहीं. जग अत्यंत-अभावरूपही नाहीं व प्रध्वंसाभावरूपही नाहीं. कारण अत्यंत अभावरूप वस्तु कधीं दिसत नाहीं. जग प्रवाहरूपानें सदा दिसत असतें. तसाच ध्वंस नेहमीं उत्पत्तीच्या विरुद्ध असतो. त्यामुळे जग जर ध्वंसाभावरूप असतें तर त्याची वारंवार उत्पत्ति झाली नसती. ते आत्म्याप्रमाणें नित्यसत्ता-स्वभाव अथवा क्षणिक-सत्ता-स्वभावही नाहीं. कारण त्याचा प्रतिक्षणीं परिणामरूप क्षय होत असतो. तेव्हा त्याला नित्यसत्ता-स्वभाव कसें म्हणावें ? त्याचप्रमाणें आदि व अंत ( भूत व भविष्य ) या अवस्थेंत नसलेली वस्तु मध्य ( वर्तमान ) अवस्थेंतही नसते, असा न्याय असल्यामुळे त्याला क्षणिकसत्तास्वभावही अनुमानाने ठरविता येत नाही. अथवा नियतिवशात् होणाऱ्या सर्गादिकाचे कर्तृत्व केवल सांनिध्यामुळें, आत्म्याला आहे, म्हणून म्हणावें तर सृज्य ( उत्पन्न करावयाच्या ) पदार्थाविषयी अभिमान धरून त्याकरिता खेद करणें युक्त नव्हे. यास्तव ही भावाभावमयी अस्थिर, दीर्घ व मिथ्या दशा कशी तरी उद्भवली आहे. अनादि अनंत कालाचा शंभर वर्षे हा अगदीच अल्प अंश आहे. मग तेवढ्याशा अल्पकाल रहाणाऱ्या, मनुष्यादि शरीर-रूपी महा-आश्चर्यानें युक्त होऊन, सर्व इंद्रियादि-रहित असलेला आत्मा त्याच्या मागून काय म्हणून धावेल ? कधीही धावणार नाहीं. बरें जगातील भाव स्थिर आहेत म्हणून जरी समजले तरी त्याच्या ठिकाणीं आस्था ठेवणें युक्त नव्हे. कारण ते सर्व स्थिर असल्यामुळेच त्याचे ग्रहण अथवा त्याग करता येत नाहीं. असंग चैतन्याचा जड वस्तूशीं संबंध होणेंही दुर्घट असल्यामुळें जड जगाचे ठायीं आस्था ठेवणें अनुचित आहे. जगद्भाव अस्थिर आहेत, असें समजले तर त्याच्याविषयीं आस्था बाळगणें मुळींच शोभत नाहीं. कारण अस्थिर पदार्थावरही आस्था ठेवू लागल्यास पाण्या-वरील फेंस गेला तरी रडण्याचा प्रसंग येऊ लागेल. आत्मा जगत्स्वभाव आहे. म्हणजे जन्म व नाश हे त्याचे स्वभाव आहेत, असें समजणें हाच आस्थाबंध आहे. पण तत्त्वविचार केला असता, जग स्थिर आहे अथवा अस्थिर आहे, यांतील कोणताही जरी पक्ष घेतला तरी, त्याविषयींची आस्था शोभत नाहीं. आत्मा सर्व-कर्ता असूनही अकर्ता आहे, तो कांहीं एक करीत नाहीं. प्रकाश देणाऱ्या

दिव्याप्रमाणे तो उदासीन असतो. लोकांच्या दिनकृत्यांस कारण होणारा सूर्य जसा वस्तुतः अकर्ता त्याप्रमाणें तो ही अकर्ता आहे. आपल्या स्थानामध्येंच स्थित असलेला सूर्य वस्तुतः कोठें जात नसतानाही लोक त्याला जाणारा समजतात त्याचप्रमाणें आपल्याच महिम्यामध्यें स्थित असलेला आत्मा कांहीं करीत नसतांनाही करणारा आहे. अरुणाख्य नदीचें तीर स्वभावतःच पाषाणांच्या योगानें विषम व उदासीन असतें व सखल प्रदेशाकडे जाणें हाही जलाचा स्वभावच असतो. पण भिन्न भिन्न स्वभावाच्या त्या दोन वस्तूंचें सानिध्य झालें म्हणजे प्रवाहाची विषमता हें कार्य आपोआप होतें. त्याचप्रमाणें आत्मा व माया याच्या सांनिध्यामुळें जग हें कार्य झालें आहे. दृष्टांतांतील तीर व जलाचा पूर यातील कोणीही जसा प्रवाहविषमतेचा कर्ता नव्हे त्याप्रमाणेंच आत्मा व माया यांतील कोणीही जगत्कर्ता नव्हे. तर हें कसें तरी झालें आहेसें दिसतें. राघवा, असा विचार केला म्हणजे तर जगांत आस्था ठेवणें अगदींच अनुचित आहे, असें वाटतें. अलातचक्र, स्वप्न, भ्रम इत्यादिकांच्या ठायीं काय आस्था ठेवावयाची आहे ? अकस्मात् आलेल्या जंतूंशीं कोणी कधीं मैत्री करीत नसतें. भ्रमोद्भूत जगज्जाल आस्थेचें स्थानच नव्हे. चंद्राचे ठायीं उष्णतेची, सूर्याचे ठायी शीततेची व मृगजळाचे ठायीं खऱ्या जलाची आस्था जशी तूं ठेवीत नाहींस त्याप्रमाणेंच या जगाच्या स्थितीचीही आस्था धरूं नकोस. यातील प्रत्येक पदार्थ स्वप्नपदार्थासारखा आहे, असें तू पहा. भावनामयी अतरास्था सोड व ' मी जो आहें तो आहें ' असें समजून लीलेनें व्यवहार कर. केवल आत्मसांनिध्यामुळें नियति विकास पावते. मेघांच्या सांनिध्यानें जशीं कुड्याचीं झाडें फुलतात त्याप्रमाणें आत्मसांनिध्यामुळें त्रिभुवन आपोआप विकास पावतें. सर्व इच्छारहित सूर्य आकाशात आला असतां जसा लोकसमूह व्यवहाराचा होऊं लागतो त्याप्रमाणें परमात्मा चित्ताकाशात उदित झाला असता जगत्क्रिया सुरू होते. रत्नाची इच्छा नसतांनाच जसा त्याचा प्रकाश पसरतो त्याप्रमाणें निरिच्छ देवाच्या सत्तेनेंच जगद्गण उद्भवतो. वास्तव रामा, आत्म्यामध्यें कर्तृत्व व अकर्तृत्वही स्थित आहे. निरिच्छ असल्यामुळें तो अकर्ता व केवळ सांनिध्यानें कर्ता. सर्व इंद्रियातीत असल्याकारणानें तो सन्मय आत्मा कर्ताही नव्हे व

भोक्ताही नव्हे. पण सर्व इंद्रियांच्या अंतर्गत असल्यामुळें तो कर्ताही आहे व भोक्ताही आहे.

सारांश रामभद्रा, कर्तृता व अकर्तृता हे दोन्ही भाव आत्म्यामध्यें असतात. त्यांतील ज्याच्या योगानें तुझें कल्याण होईल असें वाटत असेल, त्याचाच आश्रय करून तूं स्थिर हो. मी अकर्ता व सर्वांमध्यें स्थित आहें अशी दृढ भावना केल्यावर तूं ओघानें प्राप्त झालेलें कार्य जरी केलेंस तरी त्याच्या योगानें लिप्त होणार नाहींस. कारण अकर्तृ-भावनेनें तूं प्रवृत्तीविषयीं नीरस ( विरक्त ) होशील. मी नित्य अकर्ता आहें, अशी भावना केल्यास परमामृत नावाची समता अवशिष्ट रहाते. बरें, मीच हें सर्व करतों, असें म्हणून महाकर्तृतेचा आरोप जरी आपल्या ठिकाणीं कोणी केला, तरी त्याला राग-द्वेषादि प्राप्त होत नाहींत. कारण सर्वकर्तृता स्वीकारल्यावर अनें पाळलेल्या शरीराला बनें जाळलें, असे म्हणण्याची सोयच नसल्यामुळें, खेद व हर्ष यांना अवकाशच रहात नाहीं. कारण शरीराला पाळणारा व जाळणारा मीच आहें, असा त्याचा निश्चय झालेला असतो. सुख, असुख, उदय, अस्त इत्यादि सर्वांचा कर्ता मीच, असें मनांतल्या मनात जाणणारा पुरुष खेद व हर्ष करीत नाहीं आणि त्या दोन्ही भावांचा क्षय झाला असता समता अवशिष्ट रहाते. सर्व भूतांचे ठायीं समता ठेवणें ही परा स्थिति आहे. त्या सत्य स्थितींत ज्याचें चित्त अवस्थित झालें आहे, तो पुनः जन्मभाक् होत नाहीं.

अथवा, बा प्रिय शिष्या, सर्व-कर्तृत्व व अकर्तृत्व या दोन्ही दृष्टींचा त्याग कर आणि मनाला नाहींसें करून जसा आहेस तसा रहा. कारण हा मी, हा मी नव्हे, मी हें करतों, हें करीत नाहीं, इत्यादि अनुसंधान करणेंही दुःखाचें मूळ आहे. त्याच्या योगानें खरें समाधान होत नाहीं. पण असें असतांनाही आम्ही जें त्याचें अनुसंधान करण्याविषयीं सांगितलें आहे तें केवळ देहात्मभाव जावा याच हेतूनें होय. कारण देह मी असे समजणें ही भयंकर नरकस्थितिच आहे. यास्तव प्राण जाण्याचा जरी प्रसंग आला तरी शहाण्यानें कुत्र्याचें मांस घेतलेल्या चांडालीप्रमाणें, तिला स्पर्श करूं नये. सर्व प्रयत्नानें त्या कुदृष्टीचा त्याग केला, म्हणजे मेघांच्या अभावीं जसें चांदणें त्याप्रमाणें, परम दृष्टि उदय पावते. तिच्या योगानें भवसागरांतून तरून जातां येतें. यास्तव रघुत्तमा, मी कर्ता नव्हे; अथवा मी

सर्वकर्ता आहें किंवा मी जड दृश्यरूप नसून सर्व विलक्षण पूर्णानंद चिदात्मा आहें, या तीन दृष्टींतील तुला वाटेल ती दृष्टि घेऊन जेथें तत्त्वज्ञ उत्तम साधू स्थित आहेत, अशा त्या आत्मभूत सर्वोत्तम पदीं आरूढ हो ५१.

**सर्ग ५७**—रामाच्या प्रश्नाचा अनवसर, वासनावर्जन-क्रम, त्याच एका उपायाने सिद्ध झालेल्यांची प्रशंसा.

**श्रीराम**—महाराज, आपण सांगितलेंत तें सर्व खरें आहे. भूतकर्ता वस्तुतः अकर्ता व अभोक्ता असतानाच कर्ता व भोक्ता असल्यासारखा भासतो. तो सर्वेश्वरच हें सर्व आहे. आपण सांगितलेलें ब्रह्म माझ्या चित्तात आता चांगलें आरूढ झालें आहे. मेघजलाची वृष्टि झाली असता ग्रीष्मर्तूतील उष्णाने तापलेला पर्वत जसा शांत होतो त्याप्रमाणें आपल्या उक्तींनीं मी शांत झालों आहे. औदासिन्य व अनिच्छा यामुळे तो देव काहीं करीत नाहीं व भोगीत नाहीं. पण तोच सर्व प्रकाशक असल्यामुळें सर्व करतो व भोगतो, हें सर्व मला चांगलें समजलें. आता एक संशय राहिला आहे. तेवढा घालावा म्हणजे झालें. एका आत्मतत्त्वामध्यें हें सत्, हें असत्, समष्टिच मी आहें व देह मी नव्हे, हा प्रपंच समष्टि-दृष्ट्या एक व व्यष्टि-दृष्ट्या अनेक इत्यादि विकल्प कसे रहातात?

**श्रीवसिष्ठ**—रामा, या तुझ्या प्रश्नाचें स्थिर उत्तर मी सिद्धांताच्या वेळीं (म्हणजे निर्वाण-संज्ञक सहाव्या प्रकरणाच्या उत्तरार्धात पाषाणादिकाच्या आख्यायिकेंत) देईन. कारण तें तुला त्याच वेळीं तत्त्वतः कळेल. राघवा, तुला उपदेशाचा सिद्धांत (म्हणजे निष्ठारूप अखंडाकार बोध) जोंपर्यंत प्राप्त झालेला नाहीं, तोंपर्यंत या प्रश्नाचीं उत्तरें ऐकण्यास तू योग्य नाहींस. रमणींच्या विषयप्रधान गायनाचें व उक्तींचें तरुणच भाजन असतो. अल्प बालक नव्हे. त्याचप्रमाणे या सर्वोत्तम प्रश्नाचें उत्तर ऐकण्यास महा पुण्यवान् जनच पात्र असतात. अल्प पुण्यवान् व अल्पज्ञ नव्हेत. शरदृतूंत लागणारें फळ शरत्समयीं जसें शोभतें तसें वसंतसमयीं शोभत नाहीं. ज्ञानवृद्ध व विवेकीजन यांच्या चित्तात वैराग्याच्या गोष्टी जशा ठसतात तशा विषयासक्त व अविवेकी जनांच्या हृदयात ठसत नाहींत. शुक्राच्या उपाख्यानाच्या शेवटीं या प्रश्नाचें उत्तर मी अंशतः दिलें आहे. पण तें तुला कळलें नाहीं. तुला अखंड तत्त्वाचा बोध झाला म्हणजे माझ्या उत्तरावाचूनच तुझा संशय आपोआप नाहींसा होईल. माझा उप-

देश केवल द्वार दाखविणारा आहे. त्यातून आंत शिरून चित्तैकाग्र्यानें सर्वांतर्यामीचें दर्शन तुझें तुलाच स्वपौरुषानें घेतलें पाहिजे.

असो; रामा, वासना-क्षय झाल्यावाचून कर्ता-अकर्ता, भोक्ता-अभोक्ता इत्यादि विचारही चांगले ठसणार नाहींत. यास्तव तूं अगोदर वासना सोड. फार काय पण मोक्षेच्छाही सोड. विषयाच्या सेवनाने चित्तांत स्थिर झालेल्या व तिर्यग्योनि देणाऱ्या तामसी वासनांचा अगोदर त्याग करून मैत्री, करुणा, मुदिता व उपेक्षा यांची शुद्ध भावना धर. कांहीं दिवसांनीं ती भावना दृढ होईल. नंतर बाहेरून मैत्र्यादिकांनीं व्यवहार करीत असतांनाही आंतून मैत्र्यादिक चिन्मात्राहून भिन्न नाहींत, असा विचार करून त्यांचा त्याग करावा. सर्व इच्छा सोडाव्या व चिन्मात्रच मी आहें, अशी वासना दृढ करावी. नंतर चित्त व त्याच्या वृत्ती यांसह तिचाही त्याग करावा आणि शेवटीं सर्व त्याग केल्यावर ज्याचा त्याग करतां येणें शक्य नाहीं, असा प्रत्यगात्मा अवशिष्ट राहिला असतां, त्याच्याच स्वरूपांत मिळून जाऊन स्थिर समाधाना(विश्रांती)चा अनुभव घ्यावा आणि तें स्थिर झालें म्हणजे सर्व द्वैतकल्पनांचें मूळ व ज्याच्या योगानें पूर्वोक्त सर्व सोडतां आलें त्या अहंकाराचा त्याग कर. प्राणस्पंदन कलना, काल, प्रकाश, अंधकार, वासना, वासनावान्, विषय, इंद्रियें, अहंकार इत्यादि सर्वांचें उन्मूलन करून ज्याची बुद्धि आकाशाप्रमाणें सौम्य, निर्मल, विक्षेपशून्य व ब्रह्मात्म-अखंड एकाकार झाली आहे, असा तुझें चिन्मात्र परमार्थरूप सर्वांस पूज्य होईल.

राघवा, हृदयांतून सर्वांचा त्याग करून जो महामति अभिमानशून्य होऊन रहातो तो मुक्त परमेश्वरच होय. ज्याच्या सर्व आस्था पार निघून गेल्या आहेत तो, समाधीचा अभ्यास किंवा कर्म करो किंवा न करो, सदा मुक्तच आहे. ज्याचें मन वासनाशून्य असतें त्याला नैष्कर्म्य, कर्म, समाधान, जप इत्यादिकांचा कांहीं उपयोग नाहीं. त्यानें शास्त्रविचार जितका केला असेल तितका पुरे आहे. विद्वानांसह संवाद करून जेवढें ज्ञान संपादन केलें असेल तेवढें बस आहे. आतां त्याला केवळ मौन केलें पाहिजे. कारण वासनारहित मौनावाचून दुसरें परम पदच नाहीं. दश दिशेस फिरफिरून नाना प्रकारचें कौतुक पहाणाऱ्या लोकांना तत्त्वदर्शन होणें शक्य नाहीं. त्यामुळेंच तत्त्वज्ञ दुर्लभ असतात. प्रायः

सर्वजन बहिर्मुख असतात. इष्ट व अनिष्ट यांची प्रतीतीही त्यांना बाहेरच येते आणि त्यामुळें त्यांतील इष्टाची प्राप्ति व अनिष्टाचा परिहार कसा होणार या विवंचनेंत ते पडतात. आत्म्याकडे त्यांची दृष्टि जातच नाहीं. त्यांना आत्मचिंतन करावयास फुरसतच होत नाहीं. त्यांचे जेवढे म्हणून लौकिक व वैदिक कर्मारंभ होत असतात तेवढे सर्व केवल देहाकरितां असतात. आत्म्याकरितां त्यांतलि एकही नसतो. पाताल, ब्रह्मलोक, स्वर्ग, पृथ्वीतल व अतरिक्ष-लोक यातील कोठेंही जरी गेलें तरी चिदेकरस ब्रह्माला जाणणारे पुरुष अगदीं थोडे आढळतात. हें ग्राह्य व हें त्याज्य अशा भावना ज्याच्या नाहींशा झाल्या आहेत तो ज्ञानी अति दुर्लभ होय. प्राणी एकाद्या भुवनाचा राजा होऊं दे कीं, त्रिभुवनाचा अधिपति होऊं दे, पण उत्तम पदाला जाणल्यावाचून त्याला नित्य व निरतिशय विश्रांति मिळणें शक्य नाहीं. जे महा मतिमान् संत इंद्रिय-शत्रूंवर शौर्य गाजवूं शकतात तेच, जन्मदु.खाच्या नाशाकरितां, इतरांस सेव्य होतात. पाताळ, भूलोक व स्वर्ग यातील कोठेंही जाऊन जरी पाहिलें तरी सर्वत्र पांच भूतांचें मिश्रण दिसतें. सहावें भूत अथवा पांच भूतावाचून अन्य कांहीं दिसत नाहीं, मग आसक्त कोठें व्हावयाचें ? वेद, शास्त्र व आर्य यांनीं सांगितलेल्या युक्तीनें व्यवहार करणारास संसार, गायीच्या चिखलात रुतलेल्या व पाण्यानें भरलेल्या पावलासारखा क्षुद्र होतो. पण जे युक्तीचा त्याग करितात त्यांना तोच अपरंपार व दुस्तर सागर भासतो. अमर्यादित आत्मानंदाच्या दृष्टीनें पाहिल्यास ब्रह्मांड लहानशा उंबराच्या फळा-एवढें दिसूं लागतें. मग त्यातलें तो घेणार काय व टाकणार काय ? पण या असल्या क्षुद्र ब्रह्मांडांतील एकाद्या क्षुद्रतर भागाकरितां लढून मरणाऱ्या व असंख्य प्राण्यांचे बळी देणाऱ्या व घेणाऱ्या राजांस काय म्हणावें, तेंच समजत नाहीं. दयालु तत्त्ववेत्त्यांच्या धिक्कारास ते पात्र आहेत. तत्त्वज्ञ पुरुष महाप्रलयापर्यंत रहाणाऱ्या ब्राह्म पदावरही आसक्ति ठेवीत नाहींत. कारण त्यांच्या दृष्टीनें कांहीं उत्पन्नच झालेलें नसतें. तेव्हा वांझेच्या मुलासारख्या या जगातील एकाद्या अंशाचा लाभ झाल्यानें त्याच्या चिदात्म्यावर कोणता मोठा उपकार होणार आहे ? सार्वभौम पदाची तर त्याच्या विपुल हृदयांत मुळींच दाद लागत नाहीं. कारण एकीकडून शेकडों पर्वतांनीं व दुसरीकडून महा सागरांनीं भरलेल्या या पृथ्वींत त्यांना सारभूत अंशापेक्षां असार भागच फार

दिसतो. तात्पर्य आत्मज्ञाच्या अतिशय उपयोगी असें या त्रिभुवनांत कांहीं नसतें. मृगजळाला सूर्याची जरी अपेक्षा असली तरी सूर्याला जशी त्याची मुळींच गरज नसते त्याप्रमाणें तत्त्ववेत्त्याच्या चित्प्रकाशाच्या आधारानेंच सिद्ध होणाऱ्या जगाला तत्त्ववेत्त्याची अपेक्षा असते. पण पूर्ण आनंदामध्यें क्रीडा करणारा तत्त्वज्ञ त्याच्याकडे ढुंकूनही पहात नाहीं. जगाला आत्मवेत्त्याच्या चित्प्रकाशाची कशी गरज असते तेंच आतां सांगतों-सर्व कुल पर्वत हे विस्तीर्ण व निर्मल ब्रह्मसागराचे फेंस आहेत. चित्सूर्याच्या तीक्ष्ण प्रकाशामुळेंच सर्व नद्या व समुद्ररूपी मृगजळ उद्भवतें. सर्व सर्ग-पंक्ती ह्या आत्मतत्त्व महासागराच्या लाटा आहेत. शास्त्रदृष्टी या अनुत्तमपदरूपी मेघापासून होणाऱ्या वृष्टी आहेत. चंद्र, सूर्य व अग्नि हे दगड व काष्ठें यांच्याप्रमाणें जड असून इतर मळांच्या कणाप्रमाणेंच चिज्ज्योतीनें प्रकाशित होतात. संसाररूपी अरण्यात फिरणारे असुर, सुर व मानवरूपी पशू कामभोगरूपी गवत खात विहार करितात. पण रामा, एका प्रकारें वनांत संचार करणारे पशुही बरे! कारण ते स्वतंत्र तरी असतात. पण मानव, देव इत्यादि उच्च जीव देहपिंजऱ्यांत व्यक्त अभिमानानें बद्ध झाल्यामुळें पारतंत्र्य-दुःख भोगीत असतात. धात्यानें त्यांच्या बंधनाकरिता हे रक्त-मांसाचें पिंजरेच बनविले आहेत. चामड्याच्या सजीव बाहुल्या हेच वन-पशू असून विवेकशून्य बाळाच्या चित्त-विनोदाकरितां भोगभूमिरूप नगरमार्गावर ब्रह्मदेवानें त्याची योजना केली आहे. पण महामति तत्त्ववेत्ता या सगळ्या गौडबंगालाकडे पाहून थोडासाही चंचल होत नाहीं. रामा, चंद्र व सूर्य ज्यातून संचार करितात तें आकाशछिद्र ज्याच्या अपेक्षेनें लहानशा भूछिद्रा एवढेंही नाहीं अशा अति मोठ्या पदात जाऊन बसलेल्या आत्मज्ञाला आकाशाच्याही एका लहानशा कोपऱ्यांत रहाणाऱ्या एखाद्या पदार्थाची तृष्णा कशी होणार? ब्रह्मादि लोकपालही त्याच्या स्वरूपभूत चित्प्रकाशानेंच आपापल्या अधिकारावर नियत कृत्य करीत आरूढ होतात. त्यामुळें बा साधो, धन्य व अतिविरळ तत्त्वज्ञाला जगाची व त्यांतील क्षुद्र भोगांची कांहीं गरज नसते. राजहंसाला क्षुद्र पक्ष्यांप्रमाणें शेवाळ आवडत नाहीं. त्याप्रमाणेंच तत्त्वज्ञाला विषय प्रिय वाटत नाहींत ५७.

**सर्ग ५८**—सर्वात्मबोध करणारी कचाची गाथा.

**श्रीवसिष्ठ**—रामभद्रा, याविषयीं मी तुला कचाची गाथा सागतों, ता ऐक. मेरूवरील अति निर्जन प्रदेशात रहाणारा देवगुरूचा पुत्र एकदा अभ्यासवशात् आत्म्यामध्यें स्थिर विश्राम पावला. तत्त्वज्ञानामृतानें परिपूर्ण झालेली त्याची मति पचभूतमय व अनादर करण्यास योग्य असलेल्या दृश्यामध्यें रममाण झाली नाहीं. आत्मतत्त्वावाचून त्याला कांहीं दिसेना. त्यामुळें अतिशय विरक्त झालेला तो आपल्याशींच गद्गद वाणीनें म्हणाला "मी काय करूं? कोठें जाऊं? काय घेऊं? व त्याग कशाचा करूं? महा कल्पातील जलाप्रमाणें आत्म्यानें सर्व विश्व भरून सोडलें आहे. सुख, दुःख जीव, आकाश, आशा, इत्यादि सर्व आत्ममय आहे, हें मला कळलें आहे. आत्म्याच्या योगानें माझे सर्व कष्ट नष्ट झाले आहेत. देहाच्या आत, बाहेर, खालीं, वर, व चोहों बाजूंस आत्माच आत्मा पसरला आहे. अनात्ममय असें कांहींच नाहीं. सर्वत्र आत्मा स्थित आहे. सर्व आत्ममय आहे. मी आत्म्यामध्येंच स्थित आहें. चेतन व अचेतन असें सर्व मीच अंतर्यामी आहें. मी अपार आकाशालाही भरून सर्वत्र सन्मय होऊन राहिलों आहें. मी परिपूर्ण सुखसागर आहें."

राघवा, अशी भावना करीत, वारंवार घंटेच्या नादाप्रमाणें उत्तरोत्तर क्षीण होत जाणारा प्रवणोच्चार करीत व मनात कोणत्याही आंतर–बाह्य वस्तूचें चिंतन न करीत तो बृहस्पतीचा पुत्र कच निरहंकार, शुद्ध व प्राणविक्षेपशून्य होऊन परम शातीचा अनुभव घेत मेरुपर्वतावर तसाच दीर्घकाळ राहिला ५८.

**सर्ग ५९**—विषय असार आहेत, ब्रह्मदेवाच्या संकल्पापासून विश्वाची कल्पना, त्याची विश्रांति व शास्त्रोत्पत्ति.

**श्रीवसिष्ठ**—रामा, या संसारात अन्न, पान, स्त्री इत्यादि विषयांच्या योगानें जिह्वा, उपस्थ इत्यादि इंद्रियाना तृप्त करण्यावाचून आणखीं शुभ काय आहे, याचा शास्त्रानुरूप विचार व निश्चय केल्यावर परम–पदारूढ झालेला महात्मा भोगातील कशाची इच्छा करणार ? मोक्षाप्रमाणें काम हाही एक पुरुषार्थच आहे असें तू म्हणशील तर सागतों. जे असाधू तिर्यग्योनींतील पशूप्रमाणें मूढ होऊन, कृपणांचें जणु सर्वस्वच व आदि, मध्य आणि अंत या तिन्ही काळीं तुच्छ अशा भोगांनीं सतुष्ट होतात

गाणि त्यांचा मोठा विश्वास धरतात त्या नररूपी गर्दभाचें दर्शनही नको. स्त्रियांच्या शरीरांत पहावें तों इकडे केंस व इकडे रक्त यांवाचून दुसरें कांहीं नाहीं. पण अशा अमंगळ स्त्रीशरीरानेंही जे संतुष्ट होतात ते मानव नसून कुत्रेच असले पाहिजेत. सर्व भूमि मृत्तिकामय आहे. वृक्ष काष्ठमय आहेत व देह मासमय आहेत. खालीं भूमि व वर आकाश, मग सुखाच्या उपयोगीं असें सारभूत यात काय आहे? काहीं नाहीं. सर्व लोकव्यवहार इंद्रियें व विषय याच्या संबधानुसारी असतात. तत्त्वविवेक केला असता ते पार नाहींसे होतात. विचार करीपर्यंतच ते रमणीय वाटतात. दिव्याच्या ज्योतींतून निघणाऱ्या काजळाप्रमाणें सर्व सुखाशेच्या शेवटी दुःख असतें. मनासह सर्व इंद्रियाच्या क्रिया, इंद्रियांची शक्ति किंवा विषय संपत्ति क्षीण झालीं असता अवश्य नाश पावणाऱ्या आहेत. विषयसंपत्तींचा सतत उपभोग घेऊ लागलें असतां वृत्तीनें तुडविलेल्या लताप्रमाणे त्या फार दिवस टिकत नाहींत. कांता ही रक्त-मासाची पुतळी आहे. पण मूढ त्या हाडाच्या मोळीलाच मोठ्या प्रेमानें मिठी मारतात. बाबारे, हा सर्व कामाचा विलास आहे. तेव्हां नरकाला कवटाळावयास लावणाऱ्या त्याला पुरुषार्थ कसें ह्मणावें? अज्ञाच्या संतोषाकरिता पाहिजे तर त्याला पुरुषार्थ म्हणा. कारण त्याला हे सर्व सत्य व शुचि वाटत असते. पण ज्ञान्याला त्याच्या योगानें कधींही संतोष होणार नाही. भोगतृष्णा, भोग न घेतला तरी, विषाप्रमाणे मूर्च्छित करते. मग प्रत्यक्ष विषय भोग घेतल्यावर काय विचारावें! यास्तव, हे वीरा, भोगास्था सोड व स्वात्मैकगतीचें सेवन कर. अनात्ममय भावनेनें चित्त जेव्हा उद्भवते तेव्हा हें असन्मय जगज्जाल होतें. ब्रह्मदेवाच्या मनानें याचा आकार कल्पनेने बनविला आहे.

**श्रीराम**—गुरुवर्य, अवातर सर्गामध्यें मन विरिंचिभावास प्राप्त होऊन क्रमानें या जगाला असे स्थूलरूप ( चतुर्विध भूतसमूहमय ) कसे करतें?

**श्रीवसिष्ठ**—रामा, पद्मज नावाचा तो प्रथम बालक गर्भ-शय्येवरून उठून 'ब्रह्म' असा शब्द करूं लागला. म्हणून त्याला ब्रह्मा म्हणतात. संकल्पसमूहरूप व मनःकल्पित अशा त्यानें संकल्पानेंच पुढील व्यवसाय केला. त्यानें प्रथम सर्व व्यवहारोपयोगी तेज निर्माण केले. त्याच्या त्या तेजांत चतुर्मुखाच्या शरीराकारानें स्थित असलेल्या मनानें तेजोमय व

पुराणप्रसिद्ध अशा आपल्याच दुसऱ्या शरीराची कल्पना केली. तो देव त्या पींडीभूत तेजापासून दिवाकर झाला व तो अद्यापि प्रत्यहीं उदय पावून जगाची रक्षा करीत असतो. त्या प्रभाजाल-मंडलाच्या मध्यें ज्याचीं दीप्त सुवर्ण कुंडलें आहेत, ज्याच्या पाशीं ज्वालायुक्त अग्नी आहेत, ज्याचे विशाल अवयव ज्वालप्रधान आहेत व ज्यानें आकाशमंडलाला आपल्या तेजानें भरून सोडलें आहे असा तो नारायण रहातो. त्यानंतर चतुर्मुख ब्रह्मानें दिवाकरास उत्पन्न करून राहिलेल्या तेजाचे नऊ भाग केले. तेही त्याच्या संकल्पानें सर्व सिद्धिसंपन्न मरीच्यादि प्रजापती झाले. तेही जो जो संकल्प करीत तो तो पूर्ण झाल्याचें तत्काल पहात. अशा विलक्षण सामर्थ्यामुळेंच त्यांनीं देव, दानव, यक्ष, राक्षस, मानव, पशू, पक्षी इत्यादि नानाप्रकारच्या भूतगणांस निर्मिलें. त्यानतर मैथुनादि धर्मानें पुत्र-पौत्रादि सृष्टि त्यांच्याच संकल्पानें प्रवृत्त झाली. भूतांपासून भूतें होऊं लागलीं. त्यांनीं वेदांस आठवून यज्ञादि कर्मप्रवृत्ति केली. ब्रह्मदेवानें जगद्गृहांत मानवादिकाची मर्यादा केली. सारांश मनच, ब्राह्म शरीर घेऊन, या भूतसंततीनें व्याकुळ झालेल्या, समुद्र, पर्वत व वृक्ष यानीं संपन्न असलेल्या, सत्यलोकरूपी शेवटच्या शिखरानें भूषित झालेल्या, मेरु, भूपृष्ठ, दिक्कुंज इत्यादिकांनीं मध्यभागीं जटिल झालेल्या, सुख, दुःख, जन्म, जरा, व्याधि इत्यादिकांचा अनुभव घेणाऱ्या व रागद्वेषाच्या योगानें उद्विग्न होणाऱ्या त्रिगुणात्मक सृष्टीला रचतें. विरींचीच्या मनोरूपी हातानीं पूर्वी जशी रचना केली होती तशीच ती आताही दिसणें शक्य आहे. तात्पर्य याप्रमाणें हा सर्व जगत्संबंधी मोह मिथ्या उद्भवला आहे. मनाच्या संकल्पापासून झाला आहे. संकल्पामुळेंच सर्व जगत्क्रिया उद्भवतात. संकल्पामुळेंच नियतीचें पालन करणारे देव उत्पन्न होतात. पण इंद्रादिदेव व विरोचनादि असुर, आपापल्या उत्कर्षाकरितां मनुष्यादि प्रजाजनामध्यें क्रमानें धर्म व अधर्म याची वृद्धि करण्याचा प्रयत्न करितात. ते प्राण्याना सात्विक, राजस व तामस वृत्तींत बलात्कारानें प्रवृत्त करितात. त्यामुळें वध, बंध, जरा, जन्म इत्यादि सहस्रावधि क्लेशांनीं सृष्टि अतिशय पीडित होते तें पाहून कुलोद्भव ब्रह्मा कंटाळतो व असा विचार करूं लागतो.-मनःस्पंदनापासूनच केवल व्यष्टिजीवोपाधिभूत विचित्र चित्त उद्भवलें आहे त्याच्या उपभोगाकरितां ही विस्तीर्ण, अनेक व्यवहारविकारयुक्त, रुद्र

उपेंद्र, इंद्र, पर्वत, सागर इत्यादिकांनीं व्याप्त व पाताळ, द्यावाभूमी, दिशा, स्वर्गमार्ग इत्यादि छिद्रांनीं संपन्न असलेली सृष्टिही निर्माण झाली आहे. मी हा सर्व संकल्पच सर्वतः पसरला आहे. पण त्यामुळें केव्हढा विक्षेप होत आहे हा! आतां हा सर्व त्रास पुरे झाला. मी आतां आपला संकल्प सोडून शांत होतों.

रामा, असा विचार व निश्चयही करून ब्रह्मा कल्पनारूपी अनर्थास सोडून स्वस्थ होतो. आत्मस्वरूप-अनादि-पर-ब्रह्माचें स्मरण करतो. स्मरण करितांच तो त्या परमात्म्यास प्राप्त होऊन सर्वतः भासमान, मानसरहित व शांत ( सप्तमभूमिकामय ) पदीं सुखानें रहातो. अक्षुब्ध सागरासारखा तो निर्मम व निरहंकार झालेला मनोरूप चतुर्मुख शांत स्वरूपात निश्चल रहातो. याप्रमाणें पुष्कळ काल निघून गेल्यावर, तो भगवान् एकाकार वृत्ति ठेवण्याविषयींचा जो निश्चय त्याला एकादे वेळीं शिथिल करतो. त्यामुळें लागलीच त्याच्या मनात संसारभावना उठते. सुखदुःखयुक्त, शेकडो आशापाशांनीं बद्ध व राग-द्वेष-भयाने आतुर झालेल्या संसाराविषयीं विचार करताच त्याच्या मनात दुःखिताची करुणा येते. तो भूतांच्या ऐश्वर्याकरिता ( उत्कर्षाकरितां ) महा-अर्थयुक्त विविध शास्त्रें करतो. ज्यामध्यें अध्यात्मज्ञान भरले आहे, वेद व वेदांगे याच्या अर्थाचा संग्रह केला आहे, अशीं पुराणादिक दुसरींही शास्त्रें, सर्व प्राण्याच्या मुक्तीकरितां, तो निर्माण करतो. त्यानंतर पुनः त्या परम पदाचा आश्रय करून व आपत्तींतून पार होऊन तो शांत व स्वस्थ होऊन रहातो. जगाची चेष्टा पाहून व मर्यादा ठरवून कमलपीठस्थ ब्रह्मा पुनः स्वात्म्या-मध्यें स्थित होतो. कदाचित् तो संकल्पशून्य यदृच्छेनें, केवळ लोकानुग्रहा-करिता, लोकाप्रमाणे व्यवहार करून दाखवितो; पण त्याच्यामध्यें कोण-त्याही वेळीं वैषम्य नसतें. तो सर्व वृत्तींमध्यें सम असतो. सागराप्रमाणें परिपूर्ण असतो. लोकानुग्रहार्थ तो केव्हां केव्हां जागतो.

असो; हे महामते, ही ब्राह्मी पुण्यस्थिति आहे. या सर्वोत्तम सात्त्विक स्थितीस ब्रह्मादि देवही प्राप्त होवोत. सृष्ट प्राण्यांचे उत्तम, मध्यम व अधम असे तीन संघ मानलेले आहेत. पहिला विधिसंघ, दुसरा सुरसंघ व तिसरा मानवसंघ. त्यांतील पहिल्या मानससर्गांतील प्रजापतीस संक-ल्पानेंच सिद्धि प्राप्त होते. त्यांस ज्ञान, योग व ऐश्वर्य आपोआप प्राप्त होतें.

मैथुन-सर्गात दुसऱ्या व तिसऱ्या संघांचा अंतर्भाव होतो. दुसऱ्या संघांतील देव, गंधर्व, यक्ष इत्यादि प्राणी सात्त्विक असल्यामुळें त्यांस एकदाच उपदेश केल्यानें प्रायः ऐश्वर्यादिकांचा लाभ होतो. पण तिसऱ्या सर्गांतील मनुष्यादि प्राणी रजस्तमोग्रस्त असतात. त्यामुळें त्यांस सहस्रावधि प्रयत्नांनीं ज्ञान व ऐश्वर्य संपादन करावें लागतें. पण या तीन संघांतील सर्वच प्राणी मुक्त होत नाहींत. कारण मुक्ति वैराग्य, चित्त-शुद्धि इत्यादि साधनानी प्राप्त होणाऱ्या आत्मविषयक साक्षात्कारात्मक ज्ञानानें लभ्य असते. यास्तव त्यातील ज्याना साक्षात्कार होतो ते मुक्त होतात व बाकीचे भोग व ऐश्वर्य यात बुडून जातात. राघवा, या नियतीचे स्मरण ठेवून मानवानीं दीर्घ प्रयत्नाने साधुसगम, सच्छास्त्र-श्रवण, इंद्रियनिग्रह, मनोजय इत्यादि उपायाचा आरभ करावा व फळ मिळेपर्यंत त्याचा सतत अभ्यास करीत रहावें.

रामभद्रा, अनेक उपासनाप्रकार, यज्ञादि शुभ कर्मसघ व निषिद्ध कर्म-रूपी सकटें यानीं भरलेली ही सृष्टि सर्गोन्मुख झालेल्या ब्रह्माचे ठायीं पूर्वोक्त संकल्पक्रमानें व्यक्त झाली आहे ५९.

**सर्ग ६०**—ब्रह्मदेवापासून उत्पन्न झालेल्या व विशेषत बोधास पात्र असलेल्या सात्त्विक जीवाचा देहग्रहणक्रम,

**श्रीवसिष्ठ**—रामा, याप्रमाणें भगवान् ब्रह्मा समाधि सोडून उठला असता व त्यानें सर्गव्यवस्था केली असता, हा जगत्-रूपी जीर्ण रहाट आपल्या नियत व्यवस्थेप्रमाणें चालू लागतो. मेलेले प्राणी हेच त्या रहाटाच्या माळेला बांधलेले मोघे आहेत आणि जीवित—तृष्णा हीच माळेची दोरी आहे. असो, अशा प्रकारचा तो रहाट सुरू झाला कीं, कांहीं जीव ब्रह्मा-पासून निघून भवपंजरात शिरू लागतात. काहीं त्यातून निघतात व कांहीं त्यांतच रहातात. साराश, हे सत्पुत्रा, ब्रह्मामध्यें काहीं जीवसंघ सतत अग्नीपासून निघणाऱ्या ठिणग्यांप्रमाणें उत्पन्न होतात. आणि कांहीं उपाधीचा विलय झाल्यामुळें सुषुप्तीप्रमाणें विश्रांति घेण्याकरितां प्रविष्ट होतात. जे समुद्रातील तरंगाप्रमाणें उत्पन्न होतात ते भूताकाशात प्रवेश करितात व ब्रह्माचे ठायीं आरोपित केलेल्या आकाशवायूशीं, दुधाशीं एकरूप होणाऱ्या जलाप्रमाणें, मिळून जातात. पुढें अशाच क्रमानें इतर भूतांशीं मिळून ते प्राणवायूच्या अधीन होतात. म्हणजे ते पूर्णपणें लिंगदेह-

प्रधान होतात. नंतर अन्नादिकांच्या द्वारा जरायुज शरीरांत प्रवेश करून त्यांच्या वीर्यभावास ( रेतोरूपास ) प्राप्त होतात. नंतर ज्याचें ज्ञान व ऐश्वर्य व्यक्त नाहीं असे प्राणी होऊन ते या जगांत उत्पन्न होतात. रामा, मागच्या सर्गांत सागितलेल्या तिसऱ्या संघाचा हा उत्पत्तिक्रम आहे. आतां दुसऱ्या संघाचा क्रम सागतों, ऐक. त्याचाही लिंगदेह-प्राप्तीपर्यंत पूर्वोक्त क्रमच आहे. नतर ओषधि-वनस्पतीमध्यें प्रवेश करून, पशूंच्या शरीरांत जाऊन दूध, तूप इत्यादि परिणामास प्राप्त झाल्यावर होमाचे वेळीं आहुतिरूपानें अग्नींत जाऊन धूमद्वारा सूर्यमडलास प्राप्त होतात. किंवा सूर्यकिरणाच्या द्वारा चद्रांत प्रवेश करतात. चद्रकिरणांच्या द्वारा कल्पवृक्षाच्या फळात रसरूपाने त्याचा प्रवेश होतो व तीं फळें खाणाऱ्या कश्यपादिकाच्या शरीरात जाऊन वीर्यरूप झालेले जीव अमूर्च्छित बाप व आई याच्या गर्भाशयात मूर्च्छित झाल्यासारखे रहातात. म्हणजे ज्याच्या शाखा, पानें, फळे इत्यादि सर्व व्यक्त आहे अशा वडाच्या झाडावर ज्याच्या शाखा, पाने इत्यादि अव्यक्त नाहीं अशीं वटबीजें रहातात अथवा काष्ठामध्यें जसा आग्नि रहातो किंवा मातीमध्यें जसे अव्यक्त घट रहातात त्याप्रमाणे जागत असलेल्या आईबापाच्या गर्भाशयात ते निजल्यासारखे रहातात. ही त्याची मूर्च्छित अवस्था केवळ गर्भाशयांतच असते असें नाहीं तर अव्यक्तापासून निघणे, आकाशादि भाव, लिगशरीराचा आरंभ, चद्रादिकाच्या किरणात प्रवेश इत्यादि समयींही ते सर्व निजल्यासारखेच असतात.

रामा, येथपर्यंत सर्वांची स्थिति व क्रम एकसारखाच असतो. पण प्रत्येक जीवाच्या जन्माचें निमित्त भिन्न भिन्न असल्यामुळे जन्मानंतर त्यांच्या जीवनचर्येतही विलक्षण भेद पडतो. पूर्वजन्मी मरेपर्यंत अति विरक्त राहून लौकिक व वैदिक कर्मांमध्यें शास्त्रे प्रवृत्त करीत असलीं तरी जो तीं करीत नाहीं तो धीर पुरुष देवगर्भात अत्यत सात्त्विक जन्म घेतो व त्यात ज्ञानसपन्न होऊन जीवन्मुक्तासारखा उदार व्यवहार करतो. मला देवपदाचा अधिकार प्राप्त व्हावा या इच्छेने जो तदनुकूल कर्मे अथवा उपासना यावज्जीव करतो तो मरणोत्तर पूर्वोक्त क्रमानेच देवयोनींत जन्म घेऊन, तोडण्यास योग्य असलेल्याही भोगपरंपरेला भोगलंपटतेमुळें न तोडता, स्वाधिकाराचेच रक्षण करीत रहातो. त्याला तमोयुक्त राजससात्त्विक ह्मणतात.

रघुनायका, आतां मुख्य प्रथम संघांत प्राजापत्य अधिकारानें आलेल्या केवळ सात्त्विकास मोक्ष कसा मिळतो तें सांगतों. विधिसंघांत उत्पन्न झालेला कोणताही जीव पुनः कधींही जन्म घेत नाहीं. तर तो मुक्त होतो. राजससात्त्विक पुरुषच पुनः पुनः जन्म घेतात. केवळ सात्त्विक पुनः जन्म कां घेत नाहींत तेंही सांगतों. पूर्व जन्मामध्येंच श्रवणादि उपायांच्या योगानें आत्मतत्त्वाचा विचार करून, केवल प्रतिबंध क्षीण करण्याकरितांच, ते हा सात्त्विक जन्म घेतात. या उत्तम व योग्य जन्मांतही त्यांना सदा आत्मतत्त्वाचेंच मनन व अनुसंधान करावयाचें असतें. पण रामा, असले महा गुणशाली पुरुष फार दुर्लभ होत. या तीन सघाहून निराळे असलेले राक्षस, पिशाचें, तिर्यक इत्यादि प्राणी, स्थावरासारखेच असल्यामुळें, ज्ञानाधिकार-कथेमध्यें विचार करण्याच्या योग्यतेचे नसतात. म्हणून मी त्या तामस जातीच्या लोकांचा निर्देश येथें करीत नाहीं.

असो; राघवा, एवढ्या या वर्णनावरून देव व नरच तत्त्वज्ञानाचे खरे अधिकारी आहेत, हें तुला कळलें असेल. पण बाबारे, नुस्त्या उत्तम जन्मानेंच काम भागत नाहीं; तर विषयाविषयीं अचल वैराग्यही लागतें. त्यावाचून तत्त्वज्ञान अति दुर्लभ आहे. देव व नर यातील कांहीं अगदीं थोडेसेच जीव सासारिक भोग-रुचीस प्राप्त होत नाहींत. त्यातील माझ्यासारखा एकादा जन्मापासूनच शम-दमादि-सपन्न असल्यामुळें आत्मविचार करण्यास योग्य असला तरी त्यास पुरोहितपणा-सारखे कष्टकर प्रारब्ध अधिकार चालवावयाचे असल्यामुळें, निरतर समाधिसुख मिळत नाहीं. यास्तव तो राजस-सात्त्विक होय. शुद्ध सात्त्विक नव्हे. दशरथपुत्रा, माझ्याप्रमाणें तूंही वैराग्य, शम, दम इत्यादि संपत्तीनें परिपूर्ण आहेस. पण परमात्म-पदाचा विचार केलेला नाहींस. म्हणून तुला ही ससारभ्रांति सोडीत नाही. यास्तव तूं आतां येथें माझ्या समोर त्या पदाचा सत्वर विचार कर. म्हणजे तूच अद्वय पद होशील ६०.

**सर्ग ६१**—मुक्तियोग्य राजस-सात्त्विक लोकांची प्रशंसा व त्याच्या विवेक-वैराग्यादिकांचा क्रम.

**श्रीवसिष्ठ**—रामचंद्रा, जे महागुणवान् व विचार करण्यास योग्य असलेले पुरुष भूलोकीं राजस-सात्त्विकी जातीनें उत्पन्न होतात ते धन्य होत.

आकाशास जसा मळ लागत नाहीं त्याप्रमाणें त्यांस खेद स्पर्श करीत नाहीं. रात्रीं सुवर्ण-कमळ जसें म्लान होत नाहीं, त्याप्रमाणें ते आपत्तीच्या योगानें शरीर दुःख भोगीत नाहींत. ज्याप्रमाणें वृक्षादिक प्रारब्ध भोगावाचून दुसरें कांहीं करीत नाहींत त्याप्रमाणें ते प्रकृत ज्ञान व त्याची साधनसंपत्ति यावाचून दुसरें कांहीं करीत नाहींत. वृक्ष जसे आपल्या पुष्प-फलादिकांनीं, त्याप्रमाणें ते आपल्या सदाचारांनीं रममाण होतात. रामा, राजस-सत्त्वसपन्न पुरुषाची बुद्धि शांत्यादि अमृताची वृद्धि झाली असता स्वतः परिपूर्ण होते व त्यामुळेंच ती शुक्लपक्षातील पूर्णचद्राप्रमाणें सुदर दिसते., अशा प्रकारची बुद्धिच मोक्षास प्राप्त होते. राजस-सात्त्विक पुरुष आपत्कालींही आपली सौम्यता सोडीत नाहींत. ते स्वाभाविक मैत्र्यादिगुणरूप कांतेच्या योगानें विराजमान होत असतात. ते सर्वत्र समभाव ठेवणारे पुरुष सतत साधूंहूनही अति साधू आहेत. ते नेहमीं मर्यादेचें पालन करितात. त्याना निरुपद्रव पदास जावयाचें असतें. यास्तव त्यानीं या जगात अखिन्न मनानें व्यवहार करावा. रजोगुणाचा क्षय करून सात्त्विक होणारे पुरुष स्वानंद लाभ झाला असतां, जसे जसे वृद्धि पावत जातात तसें तसें त्याना विषयचिंतन सोडून सच्छास्त्रचिंतन करणें उचित होतें. पदार्थांच्या अनित्यतेचा विचार मोठ्या आदरानें करावा. त्याचप्रमाणें शुद्धबुद्धि पुरुषाने ऐहिक व पारलौकिक क्रिया आणि पशु-पुत्रादि ऐहिक व विमानें, अप्सरा इत्यादि पारलौकिक पदार्थ म्हणजे महा आपत्तिच आहे असे जाणावें. व्यर्थ व अज्ञानसंततियुक्त अयथार्थ दर्शन सोडून सार्थ, अनंत व यथार्थ ज्ञान संपादन करावें. सत्पुरुषास शरण जाऊन व शुश्रुषाप्रभृति उपायानीं त्यांस प्रसन्न करून 'प्रभो' मी कोण? हें संसार-आडंबर कसें झालें? इत्यादि प्रश्न करावा. ते जें सांगतील त्याविषयीं विचार करावा व त्याविषयीं निश्चय करून तत्त्वाचें अनुसंधान करावें. लौकिक व वैदिक कर्मांमध्यें बुडून जाऊं नये. अनर्थांचा सहवास करू नये. संसारांत क्षणोक्षणीं अनुभवास येणाऱ्या प्रियवियोगाचा विचार करावा. साधूंचीच सगति धरून त्याच्या मार्गाचेंच अनुकरण करावें. अहंकार, देह व पुत्रादि हे तीन महा सागर आहेत. त्यांतून पार होण्याकरितां विचार करावा. सत्याचा शोध करावा. अस्थिर शरीर व अहंकार यांचा त्याग करून अत्यंत शुभ व साक्षिचिन्मात्राचें अनुसंधान करावें. त्याच नित्य, सर्वगत, शिव पदामध्यें, माळेच्या दोरींतील मण्यां-

प्रमाणें, हें सर्व ओंवळें आहे. जी चित् भुवनाविस्तारांत, आकाशांत, सूर्यांत, व भूमींतील विवरांत असते तीच एकाद्या अल्प किड्याच्याही पोटांत असते. एकाद्या विस्तृत प्रदेशीं सहस्रावधि नाना आकाराच्या घागरी जरी ठेविलेल्या असल्या तरी त्यांतील आकाशांत जसा परमार्थतः भेद नाहीं त्याप्रमाणें अनेक विचित्र शरीरात असलेल्या चैतन्यातही भेद नाहीं. सर्व भूताना आंबट, तिखट इत्यादि पदार्थांचा जर एकसारखाच अनुभव येत आहे तर चिन्मात्र तत्त्वामध्यें भेद आहे, असे कसें ह्मणता येईल? एक सन्मात्र वस्तुच जर सतत स्थित आहे तर 'हा झाला, हा मेला' इत्यादि दृष्टिही कुदृष्टि होय; शास्त्रदृष्टि नव्हे. जगात असें काहीं नाहीं कीं, जें असून नष्ट होईल. यास्तव आहे असें वाटणारें हें सर्व सत् नव्हे व असतही नव्हे. कारण तें व्यवहारकालीं दिसतें म्हणून असत् नव्हे. व समाधि, सुषुप्ति इत्यादि कालीं बाधित होतें म्हणून सत् नव्हे. ज्ञान जरी सफल असले तरी त्या ज्ञानानें बाधित होणाऱ्या मोहालाही याच न्यायानें सदसद्विलक्षण म्हणावे लागतें. तस्मात् अनिर्वचनीय अध्यासामुळ कसें तरी उद्भवलेले हे जग मोहाचें कारण आहे, हें सिद्ध झालें ६१.

**सर्ग** ६२—शास्त्रोक्त गुणसपत्ति, सत्सग व पौरुष याच्या योगाने अश्रेष्ठालाही श्रेष्ठ स्थिति प्राप्त होते.

**श्रीवसिष्ठ**—रामा, बाह्य व आभ्यतर द्वंद्वांस सहन करणाऱ्या व ऊहापोह-कुशल पुरुषानें विद्वान् व सुजन गुरूस शरण जाऊन शास्त्रविचार करावा. कुलीन, महा विद्वान् व निःस्पृह अशा गुरूबरोबर शास्त्रविचार केला असता मनोनाशापर्यंत समाधि प्राप्त होते. अध्यात्मशास्त्र, सत्सग, वैराग्य इत्यादिकांच्या सतत अभ्यासानें सस्कृत झालेला पुरुष आत्मज्ञानाचें पात्र होऊन तुझ्याप्रमाणें शोभतो. तुझ्यामध्यें सर्व उक्त गुण आहेत. कारण तूं उदार, आपल्या आचारानें संपन्न, द्वंद्वसहिष्णु व विचारवान् आहेस. सर्गसबधी मनोमल सोडून तू दुःखशून्य झाला आहेस. खरोखर तूं स्वच्छ आकाशासारखा आहेस. तू ससार भावनेचा त्याग केला आहेस. तू उत्तम ज्ञानसंपन्न झाला आहेस. सर्व चिंता सोडून ब्रह्माकार झालेलें मन मुक्त होय. तुझें मनही मुक्त झालें आहे. यास्तव पूर्वोक्त जीवन्मुक्त रागद्वेपरहित होऊन आता तुझेंच अनुकरण करतील. जे तुजसारखे महा बुद्धिमान् जन आत आत्मज्ञ राहून बाहेर लोकाप्रमाणें व्यवहार करितात ते संसार-

सागराचें उल्लंघन सहज करूं शकतात. तुझ्यासारखी ज्याची मति असेल तोच समदृष्टि सुजन मी सांगितलेल्या या ज्ञानदृष्टीस योग्य होय. रामा, तूं रागद्वेषशून्य बुद्धीनें रहा. बाहेरून लोकोचित आचार कर व आंतून निरिच्छ रहा. इतर गुणशाली पुरुषाप्रमाणें परम शांति धर. दुसऱ्यास फसविणाऱ्या व यथेष्ट आचरण करणाऱ्या मूढाविषयीं तू मुळींच विचार करूं नकोस. शुद्ध सात्विक जीवन्मुक्ताच्या शम-दमादि स्वाभाविक गुणांचें संपादन करणारा साधारण पुरुषही क्रमानें ज्ञानी होतो. आणि शेवटच्या जीवन्मुक्तावस्थेचा अनुभव घेतो. कारण उत्कृष्ट जातीच्या गुणांचे सेवन केलें असता प्राणी उत्कृष्ट जातींत जन्म घेतो व निकृष्ट जातीच्या गुणाचे सेवन केल्यानें तो निकृष्ट योनींत पडतो, असा नियम आहे. कर्मवश झालेले जीव मरणसमयीं चिंतिलेल्या भावास अवश्य प्राप्त होतात, असें जरी आहे तरी निकृष्ट जातींत झालेल्या पुरुषानेंही मोक्षाकरिता अवश्य यत्न करावा. कारण सर्व कांहीं प्रयत्नसाध्य आहे. प्रयत्नानेंच राजे राज्ये मिळवितात. तामसी, राजसी इत्यादि कोणत्याही जातींतील पुरुषानें चिखलात रुतलेल्या गायीप्रमाणें, विषयात आसक्त झालेल्या बुद्धीला धैर्यानें वर काढावें. तिला विषयपराङ्मुख करावें. संत आत्मविवेकामुळेच सात्विक जातीस प्राप्त होतात. स्वच्छ चित्तस्फटिकामध्यें ज्याला आसक्त करावें तन्मय तें (चित्त) होते. यास्तव तू उद्यम कर. सर्वोत्तम गुणशाली पुरुष भगीरथ प्रयत्नानें मुमुक्षू होऊन शेवटीं याच जन्मात जीवन्मुक्त होतात. गुणवानास दीर्घ प्रयत्नानें प्राप्त होत नाहीं असे या जगांत काहीं नाहीं. ब्रह्मचर्य, धैर्य, वीर्य, वैराग्य व युक्तियुक्त निश्चय यांवाचून ते इष्ट पद तुला मिळणार नाही. एकाग्र बुद्धीनें अत्यंत हितकर आत्मतत्त्वास जाणून तू शोकरहित हो. तुला सांगितलेला क्रम सर्वसाधारण आहे. ह्मणजे या क्रमानें दुसराही अधिकारी जन मुक्त होईल. हे रामभद्रा, विवेकाच्या महा महिम्यानें युक्त व पुष्ट झालेल्या शांत्यादि सर्व गुणांनीं अभिराम असा शेवटचा जन्म प्राप्त झाला असता तूं जीवन्मुक्तांच्या सप्तमभूमीकालक्षण कर्मामध्यें स्थित हो. वैराग्यप्रकरणांत वर्णिलेली व सर्व जनप्रसिद्ध अशी ही भवसंगमोह-चिंता तुझ्या ठायीं स्थान न करो ६२.

इति श्रीमच्छंकराचार्यभक्त विष्णुकृत बृहद्योगवासिष्ठसाराचें चवथें स्थितिप्रकरण समाप्त झालें.

॥ श्रीः ॥

# अथ पचंमं उपशमप्रकरणम्

**सर्ग १**—मध्याह्नकाळीं शंखध्वनि होताच सभा उठते.

**श्रीवसिष्ठ**—रामभद्रा, स्थितिप्रकरणानंतर आता हें उपशम-प्रकरण ऐक. याचें पूर्ण ज्ञान झालें असता निर्वाण प्राप्त होतें.

**श्रीवाल्मीकि**—मुनिवर्यांचें हें पवित्र व आह्लाद देणारें वचन ऐकून सर्व सभा स्तब्ध झाली. श्रवणाच्या इच्छेनें सर्व सभासदांनीं मौन धारण केलें. फार काय पण विलासिनी स्त्रियासुद्धां फार दिवसांपासून संन्यास केलेल्या प्रव्रजित-स्त्रियांप्रमाणें शांतचित्त होऊन बसल्या. त्यामुळें त्यांच्या भूषणादिकाचाही ध्वनि त्यावेळीं होत नव्हता. त्या सभेजवळच्या वृक्षांव-रील पक्ष्यांनींही आपला किलकिलाट बंद केला. विवेकी राजे विज्ञानकलेचा विचार करूं लागले. प्रभातसमयीं कमल जसें विकसित होतें त्याप्रमाणें रामाचें मुख व हृदयही गुरूंच्या त्या वचनानें विकसित झालें. राजा दशरथही श्रीवसिष्ठांची वाणी मोठ्या प्रेमानें ऐकत होता. मुख्य मंत्र्यानें मर्कटासारख्या

---

१ तिसऱ्या उत्पत्ति-प्रकरणांत उपनिषदांतील सर्व सृष्टि-प्रतिपादक वचनाचें तात्पर्य प्रकट करण्याकरितां सर्व प्रपंच-रचना मनाच्या अधीन आहे, असें सांगितलें. चवथ्या स्थिति-प्रकरणांत जगाच्या स्थितीचें प्रतिपादन करणाऱ्या श्रुतींचें तात्पर्य स्पष्ट कर-ण्याकरिता मन स्थितीच्या अधीनच सर्व प्रपंचस्थिति आहे, असें दाखविलें व आतां —अस्त पावणाऱ्या सूर्याचे किरण जसे त्याच्या मंडलांत जाऊन मिळतात, त्याप्रमाणें या आत्म्याच्या सोळा कला त्याच्यामध्यें मिळतात, सुषुप्तीसमयीं सर्वांचा लय झाला असतां पुरुष तमोभिभूत होत्साता सुखरूपास प्राप्त होतो; प्रलयसमयीं सर्व भूतें ज्याच्यामध्यें जाऊन लीन होतात, जशा वाहत जाणाऱ्या नद्या समुद्रांत जाऊन व नाम-रूप सोडून अस्त पावतात, पंधराही कला प्रतिष्ठेस प्राप्त होतात,—इत्यादि प्रपंचोपशमाचें प्रतिपादन करणाऱ्या उपनिषद्वाक्यांचें तात्पर्य व्यक्त करण्याकरितां या उपशम-प्रकरणाचा आरंभ करीत आहेत. सुषुप्ति, मरण, समाधि, साक्षात्कार व विदेहमुक्ति या दशांमध्यें प्रपंचाचा उपशम होत असतो. पण तो मनाच्या उपशमामुळेंच होत असल्यामुळें सर्व उपशम-प्रतिपादक वाक्यांचें तात्पर्य मनःशांती-मध्यें आहे, असें या प्रकरणांत मुख्यतः सांगावयाचें आहे.

चंचल मनाला सर्व भोगांपासून परतवून श्रवणाभिमुख केलें. शिक्षणाच्या बलामुळें विचक्षण झालेल्या लक्ष्मणाच्या चंद्रासारख्या निर्मल चित्तांत, ब्रह्म स्फुरण पावूं लागलें. शत्रुनाशक शत्रुघ्न आनंदपूर्ण मनानें शोभूं लागला. सुमित्र नांवाच्या मंत्र्याच्या हृदयात ज्ञानसूर्याचा प्रकाश पडला. तात्पर्य वसिष्ठानीं उपशम-प्रकरण सांगण्याची प्रतिज्ञा केली असतां त्या सभेंत सर्वतः उपशम पसरला आणि सर्व उपदेश ऐकण्याविषयीं अतिशय उत्सुक झाले. पण इतक्यांत 'शुभकृत्याला विघ्नें नेहमीं प्रतिबंध करितात' ही म्हण जणुं काय सार्थ करण्याकरितांच मध्याह्नकाल झाला हें सुचविणारा सागरासारखा गंभीर शंखध्वनी झाला. त्याबरोबर मेघाच्या नादानें कोकिलांचे ध्वनी जसे बंद पडतात त्याप्रमाणें त्या मोठ्या शंखध्वनीपुढें मुनीचा शब्द कोणालाही ऐकूं जाईनासा झाला. म्हणून भगवान् वसिष्ठानें आपली वाणी बंद केली. कारण सुज्ञ पुरुष आपला गुण व्यर्थ प्रकट करीत नसतात. तो महा मुनि क्षणभर स्वस्थ राहिला व शंखाचा ध्वनि आणि त्यामुळें झालेला लोकांचा कोलाहल शांत झाला असतां, रामास म्हणाला, "प्रिय शिष्या, आज हें इतकेंच सांगून झालें आहे. आता या पुढें जें कांहीं वक्तव्य आहे तें उद्यां सकाळीं सांगेन. द्विजास अवश्य कर्तव्य असलेलें मध्याह्नकृत्य मलाही केलें पाहिजे. यास्तव हे आचारचतुरा, हे सुभगा, तूं सुद्धा ऊठ. स्नान, दान, पूजन इत्यादि आचार-सत्कर्मे कर." असें बोलून मुनि व प्रभु दशरथ एकाच वेळीं उठले. त्याबरोबर सर्व सभेंत हालचाल सुरू झाली. शेकडों राजांनीं भरलेली ती सभा उठली. दशरथाला प्रणाम करून राजे राजमंदिरांतून निघून गेले. सुमंत्र-प्रभृति रसज्ञ मंत्री राजा व मुनि यांस प्रणाम करून स्नानाकरितां आपापल्या घराकडे निघाले. वामदेवादिक व विश्वामित्रादिक वसिष्ठास पुढें करून राजाच्या अनुज्ञेची प्रतीक्षा करीत राहिले. राजा दशरथानें मुनींचें पूजन केलें, व त्यांची आज्ञा घेऊन आणि त्यांस अनुज्ञा देऊन स्वकार्याकरितां स्वमंदिरीं गमन केलें.

नंतर वानप्रस्थ वनांत गेले. आकाशनिवासी आकाशांत गेले व नागरिक नगरांत गेले. राजा व वसिष्ठ यांनीं प्रेमानें आमंत्रण दिल्यामुळें प्रभु विश्वामित्र वसिष्ठाच्या घरींच जाऊन राहिला. त्यानें तो अवशिष्ट दिवस आणि रात्र तेथेंच घालविली. ब्राह्मण, राजे, मुनी व रामादिक सर्व दश-

रथपुत्र ज्याची उपासना करीत आहेत असा मुनि वसिष्ठ आपल्या आश्रमांत गेला व तेथपर्यंत बरोबर आलेल्या राजपुत्रादिकास आपापल्या मंदिरीं जावयास सागून, चरणांवर मस्तकें ठेवून ते सर्व भूचर, खेचर व अधश्चर श्रेष्ठ जीव तेथून परत फिरले असतां उदार सत्त्ववान् वसिष्ठानें क्रमानें सर्व आह्निक कर्म केलें आणि विश्वामित्राशीं ब्रह्मचर्चा करण्यांत अवशिष्ट काल सुखानें घालविला १.

**सर्ग २**—रामाची आह्निक क्रिया रात्रौ, ऐकलेल्या उपदेशाचें चिंतन, व श्रुत अर्थामध्यें स्थिर होण्याविषयीं बुद्धीची प्रार्थना.

**श्रीवाल्मीकि**—नतर ते सर्व चद्रासारखे तेजस्वी राजपुत्र आपापल्या घरीं गेले. त्यानी सर्व दिनकृत्यें केलीं. वसिष्ठ, राघव, राजे, मुनी व ब्राह्मण यांनीं आपापल्या गृहात व नदीतीरादि बाह्य प्रदेशीं या क्रमानें सर्व उचित कर्में केलीं.—नानाप्रकारचीं कमलें व हसादि जलचर पक्षी यांच्या योगानें अतिशय रम्य झालेल्या जलाशयांत त्यानीं स्नानें केलीं. गाय, भूमि, तिल, सोने, शय्या, आसन, पात्रें व वस्त्रें याचीं दानें ब्राह्मणास दिलीं. सोने व रत्नें यानीं भूषित केलेल्या आपापल्या देवमंदिरांत जाऊन त्यानीं अच्युत, ईशान, अग्नि, सूर्य इत्यादि आपापल्या इष्ट देवाचें पूजन केलें. नंतर पुत्र, पौत्र, मित्र, सेवकवर्ग, आप्त इत्यादिकासह त्यानीं उचित भोजनाचा स्वाद घेतला. भोजनोत्तर ते थोडीशी विश्रांति जों घेत आहेत तों इतक्यात अर्धा प्रहर दिवस राहिला. म्हणून पुराणश्रवणादि उचित कर्मामध्यें राहिलेला काल घालवून सध्यासमयीं त्यानीं संध्यावदन केलें. अघमर्षण जप केला. पुण्यकारक स्तोत्राचा पाठ केला. मनोहर गाथा गायिल्या. तों प्रहर रात्र होऊन पृथ्वीच्या छायेनें सर्व भूलोकाला कृष्णवर्ण करून सोडलें. थोडासा उपहार करून सर्व धार्मिक जन उचित शय्येवर जाऊन बसले व ईश्वरस्मरणपूर्वक प्रातःकालापासून त्या वेळेपर्यंत केलेल्या सर्व कृत्याच्या शुभाशुभतेचें परीक्षण करून शय्येवर पडले. रामावाचून बाकी सर्वाना झोंप लागली व त्याची ती रात्र दोन घटिकासारखी हां हां म्हणता गेली.

पण दशरथाचा ज्येष्ठ पुत्र राम दिवसां ऐकलेल्या वसिष्ठांच्या उपदेशाविषयींच विचार करीत बसला.—हें संसारभ्रमण म्हणजे काय आहे? हे सर्व जन ह्मणजे आहे तरी काय? हीं सर्व विचित्र भूतें येतात कां व

जातात कां? मनाचें रूप काय आहे? तें शांत कसें होईल? ही माया कोणापासून उद्भवली आहे? ती निवृत्त कशी होणार? ही निवृत्त झाल्यानें कोणता गुण अथवा दोष होणार आहे? आत्मा आकाशाहूनही विस्तीर्ण असताना हा जीव असा संकुचित कसा झाला? भगवान् वसिष्ठ मुनीनें मनाच्या क्षयाविषयीं काय सांगितलें आहे? त्याचा क्षय कसा होईल व तो झाल्यास कोणता लाभ होणार? इंद्रियजयाचें फळ काय आहे? आत्म्याचें ज्ञान झालें असता कोणतें फळ मिळेल. जीव, चित्त, मन, माया इत्यादि विस्तार पावलेल्या रूपानीं आत्माच हा असन्मय संसार पसरतो. यास्तव याना मनोमात्र ततूनें बाधून क्षीण केलें असता दुःखाची शाति होणें शक्य आहे. पण मी याना बाधू कसें? भोगसबंधी वासना घनरूप होऊन चित्ताकाशास आच्छादित करितात व सहस्रावधि दुःखधाराचा वर्षाव करितात. बुद्धिरूपी बलाकाही त्या मेघपंक्तीच्या मागोमाग जात असते. पण हंस जसा जलापासून दूध निराळें करतो त्याप्रमाणें मी त्या वासना-मेघांशीं सलग्न झालेल्या बुद्धीला पृथक् कसें करूं? भोगाचा त्याग करतां येत नाहीं व त्याच्या त्यागावाचून विपत्ती नाहींशा होत नाहींत. कोण हें भयकर संकट! अवश्य प्राप्तव्य आत्मतत्त्वाचें प्रमाण मन आहे. पण त तर बाह्य विषयामध्यें आसक्त होऊन राहिलें आहे. त्यामुळें बाह्यविषयांस संपादन करणें हाच मोठा थोरला पुरुषार्थ झाला आहे. त्याला धैर्यान विषयविमुख करिता येत नाहीं. हिमालयादि पर्वताच्या उल्लघना-इतकच त काम अवघड होऊन बसलें आहे. पण ते विषयापासून निवृत्त झाल्यावाचून तत्त्वसाक्षात्कार कसा होणार? आमची मति अति शात व संसारसंभ्रमशून्य होऊन, पतिव्रतेप्रमाणें, ब्रह्मावाचून दुसऱ्या कोणाचेंही स्मरणसुद्धां करीत नाहीं, अशी केव्हां होईल. माझें मन काम-क्रोध रहित, पुण्य-पापशून्य आत्म्यामध्येंच विश्राति, घेणारें व त्या कारणानेंच अति पावन कधीं होईल? पूर्णचंद्राहूनही शीतळ अशा पदीं आरूढ होऊन ( म्हणजे जीवन्मुक्तिसुखाचा अनुभव घेऊन ) या जगाला मी आपल्या सत्तेनेंच भ्रमण करावयास कसें लावीन? जलातील तरंगाप्रमाणें मन आत्म्यामध्यें लीन केव्हां होईल? तृष्णारूपी तरगानीं आकुल व आशारूपी मकरांनीं भयंकर झालेल्या संसारसागरास तरून मी दुःखरहित कसा होईन? उपशमानें शुद्ध झालेल्या मुमुक्षूंच्या मार्गामध्यें मी निःशोक व समदर्शन

होऊन कसा राहीन? ज्यानें सर्व अंगास संतप्त करून सोडलें आहे व ज्यानें शरीरांतील सर्व धातूंना जाळून टाकलें आहे असा हा भयंकर व दीर्घ संसारज्वर कधीं नाहींसा होईल? वायुरहित प्रदेशांतील दिव्याच्या ज्योतीप्रमाणें व्यथारहित झालेलें चित्त शांत केव्हां होईल. इंद्रियें विषयांचा नाद सोडून दुःखशून्य कशीं होतील? पशु, पुत्र, धन, अन्न, पान इत्यादिकांची अप्राप्ति अथवा वियोग झाला असतां रडणाऱ्या मज मूढाचा 'देहच आत्मा' किंवा 'देहच मी' हा भ्रम कसा जाईल? मुक्त होण्याची इच्छा अति उत्कट झाली म्हणजे स्वर्गही तृणासारखा तुच्छ वाटूं लागतो. अरे बा माझ्या मना, विरक्त लोकानीं सांगितलेल्या निर्मल ज्ञान दृष्टी तुझ्यामध्यें कधीं येतील का? दुःखरूपी सर्पाचें भोजन होऊन हा तात, अगे आई, अरे वत्सा, इत्यादि आक्रंदन करण्याचा प्रसंग मजवर न येवो! हे बुद्धे भगिनि, मी तुझा भाऊ ना? मग माझा मनोरथ पूर्ण कां करीत नाहींस? तुझें व माझेंही दुःख क्षीण व्हावें, म्हणून मुनींच्या वाणीचा चांगला विचार कर. अग साध्वि, कन्ये, मते, मी तुझ्या पायां पडून प्रेमानें प्रार्थना करतों कीं, तूं संसारोच्छेदरूपी कल्याणाकरिता अति स्थिर हो व वसिष्ठ मुनींनीं वैराग्यादि चार प्रकरणात सुदर दृष्टात देऊन सागितलेल्या ज्ञानाचें स्मरण कर. कारण मनानें कितीही जरी मनन केलें तरी निश्चयात्मक मतीनें जोंपर्यंत त्याचा अंगीकार केलेला नसतो तोंपर्यंत तत्त्व स्थिर होत नाहीं. यास्तव श्रवणानंतर मनन व मननानंतर निश्चयबुद्धि अवश्य संपादिली पाहिजे. म्हणून हे मते, मी पुनः प्रार्थना करीत आहें १.

**सर्ग २**—प्रात स्नानादि, घरीं आलेल्या रामादिकांसह वसिष्ठ मुनींचें सभेंत जाणें व सभेचें स्वास्थ्य.

**श्रीवाल्मीकि**—प्रायः अशाच प्रकारची उदार चिंता करण्यांत रामाची ती रात्र गेली. पहाटे आकाशाला कांहीं विचित्र शोभा आली. अंधकार व अरुणोदय याच्या योगानें तें पश्चिमेकडे कपिश व पूर्वेकडे आरक्त झालें. संमार्जित केल्याप्रमाणें, दिशांतील तारा विरल दिसूं लागल्या. इतक्यात प्रभात कालचा मंगल वाद्यघोष झाला. त्याबरोबर राजीवनयन राम उठला.

१ बुद्धि व जीव या दोघांचाही अविद्येच्या पोटीं जन्म झालेला असल्यामुळें येथें भगिनि, असें म्हटलें आहे. २ धाक व सन्मान यांच्या प्रभावानें मागून उद्भवलेल्या मतीला येथें कन्या असें म्हटलें आहे.

त्यानें प्रातःस्नानप्रभृति सर्व [illegible] कलीं व संध्यावंदनादि उचित कर्में आटोपून वसिष्ठांच्या घरीं [illegible]ण्याकरितां आलेल्या-लक्ष्मणादि भ्राते व अति प्राप्त-भृत्य यां[illegible] तो त्या मुनींच्या येथें गेला. तों तो आत्मपरायण मुनि एकांतांत समाधि लावून बसला आहे, असें त्यांना आढळलें. तेव्हां रामानें मस्तक नम्र करून त्यांस दुरूनच वंदन केलें व ते सर्व विनयसंपन्न राजपुत्र बाहेर अंगण्यांतच उभे राहिले. इतक्यात चांगलें उजाडून भगवान् भास्कर क्षितिजावर आला. तों ब्रह्मलोकास जसे देव जातात त्याप्रमाणे इतर राजे, राजपुत्र, ऋषी व ब्राह्मण त्या मुनींच्या येथें आले. वसिष्ठाच्या घरांत गर्दी झाली. क्षणात भगवान् वसिष्ठ समाधि सोडून उठले. नम्र झालेल्या त्या सर्वांच त्यानें विनयादि आचार व प्रिय भाषणादि उपचार यांच्या योगानें स्वागत केलें. नंतर विश्वामित्रासह तो मुनि सज्ज असलेल्या रथावर आरूढ झाला व देवासह ब्रह्मा जसा इंद्राच्या नगरास जातो त्याप्रमाणें त्या सर्व परिवारासह दशरथाच्या सभेस गेला. रथातून उतरून मुनिवर्य सभेच्या द्वारापाशीं आला आहे असे कळताच राजा दशरथ सिंहासनावरून उठून त्याचा सत्कार करण्याकरितां पुढें गेला. सर्व सभेंत गेले व आपापल्या उचित स्थानी बसले. सर्वांची दृष्टि वसिष्ठांच्या तोंडाकडे लागली. सभेतील कलकल शब्द शांत झाला. स्तुतिपाठक गप्प बसले. परस्पर चालणाऱ्या गोष्टी थांबल्या व ते सर्व स्थान अगदीं सौम्य झालें. त्या सभास्थानीं नानाप्रकारचीं सुगंधीं द्रव्यें उधळलीं होतीं व ताज्या पुष्पांचाही घमघमाट सुटला होता. वातायनातून सुवासिक पुष्पांच्या माळा टांगलेल्या असल्यामुळें प्रभात वायु सभेंत प्रवेश करताना त्याचा सुगंध घेऊनच सर्वांच्या घ्राणेंद्रियास तृप्त करण्याकरितां येत होता. राजांच्या व नागरिकांच्या स्त्रिया जाळीच्या पडद्याच्या आंत पुष्पमय उचित आसनांवर येऊन बसल्या होत्या. तात्पर्य शीत, मद व सुगंध वायु, नानाप्रकारचीं पुष्पें, अनेक परिमल द्रव्यें व उत्तम स्त्रीपुरुषांचे सुगंधी श्वासवायू यांच्या योगानें ते सभास्थान स्वभावतःच चित्तप्रसाद उत्पन्न करणारें झालें. त्यांतूनही श्रवणेच्छेनें सर्व व्यापार सोडून सर्व लोक स्वस्थ बसले असतां त्या दशरथाच्या सभेला समाधिस्थ ज्ञान्याच्या हृदयाचीच उपमा प्राप्त झाली २.

सर्ग ४—राजाने केलेली वसिष्ठांची प्रशंसा. वसिष्ठांनी रामास केलेले प्रश्न. रामाचें उत्तर व पुढील उपदेशाविषयीं प्रार्थना.

श्रीवाल्मीकि—याप्रमाणें सर्वत्र शांतता पसरली असतां राजा दशरथ मुनींस म्हणाला, "प्रभो, काल उपदेश करीत असतांना आपल्याला झालेले श्रम रात्रीं घेतलेल्या विश्रांतीनें कमी झालेना ? आनंददायी व शुद्ध अशा आपल्या उपदेशामृतानें खऱ्या अमृत वृष्टीप्रमाणें आह्मी तृप्त झालों आहो. चंद्रकिरणासारख्या महात्म्याच्या अति निर्मळ वाणी मोहांधकारास हटवून चित्तास शीतळ करीत असतात. ब्रह्मसुख देणाऱ्या साधूंच्या उक्तींची प्रशंसा करितां येणें शक्य नाहीं. त्या आत्मरत्नांस दाखविणाऱ्या उत्तम दीप-ज्योतीच होत. ज्याच्यापासून युक्तिरूप लता उत्पन्न होतात तो सुजनरूपी वृक्ष वंद्य होय. चंद्रकिरण जसे अंधकाराचा नाश करितात त्याप्रमाणें सज्जनाचे उत्तम उपदेश मानस, शारीर व इंद्रियसंबंधी दोष घालवितात. शरत्कालीं नद्या जशा क्षीण होऊं लागतात त्याप्रमाणें गुरुवर्य, आमचे तृष्णा-लोभादि समारंभ तुमच्या उत्तम वाणीनें क्षीण होऊं लागले आहेत. रसांजनानें ज्याची दृष्टि निर्दोष झाली आहे असे आंधळेही ज्याप्रमाणें सुवर्णादि वस्तूंस पाहूं लागतात त्याप्रमाणें,—बाह्य ह्मणजे अनात्म वस्तूमध्यें आसक्त झाल्यामुळें आत्मदृष्टिशून्य झालेले—आम्ही निष्पाप आत्म्याचें दर्शन घेण्यास तयार झालों आहो. आमची संसार-वासना हळु हळु क्षीण होऊं लागली आहे. मुनिराज, आपल्या वाणीप्रमाणें मंदाराच्या मंजिऱ्या अथवा अमृतसागराचे तरंगही आल्हाद देत नसतील. राघवा, जो दिवस असल्या ब्रह्मवेत्त्याच्या पूजनामध्यें जातो तोच प्रकाश-युक्त असून बाकीचे दिवस अंधकारमय आहेत, असें मी समजतों. यास्तव सत्पुत्रा, आतां मुनींना प्रकृत अर्थाविषयीं प्रश्न कर.

दशरथानें रामाला अशी अनुज्ञा दिली असतां रामाच्या सन्मुख बस-लेला उदारात्मा वसिष्ठमुनि असें म्हणाला.—

श्रीवसिष्ठ—रामभद्रा, मी मागच्या प्रकरणांत काय सांगितलें तें तुझ्या स्मरणांत आहेना ? सत्त्वादि गुणभेदांमुळें विचित्र जीवजाती कशा उद्भवतात तें तुला आठवत असेलच. परमात्म्याचें सर्व, असर्व, सत्, असत् व सदा उदय पावलेलें असें चिन्मात्रस्वरूप तूं विसरला नसशीलच. विश्वेश्वरापासून हें विश्व कसें उत्पन्न झालें तें तुझ्या ध्यानांत असेल असें

मी समजतों. अविद्येचें कालबलानें भंगुर झालेलें, संख्येनें अनंत पण देशकालादिकांच्या योगानें अंतवत् असें स्वरूप तूं लक्षांत ठेवलें असशील, असा मी तर्क करितों. चित्त हाच पुरुष आहे, असें जें मी सांगितलें होतें तें तुला आठवतें ना? गेल्या रात्रीं कालच्या उपदेशाचा तू चांगला विचार केलास कीं नाहीं? कारण ऐकलेल्या तत्त्वोपदेशाचा वारवार विचार करून उपदिष्ट अर्थाला मनात स्थिर केलें असतां त्याचें चागलें फळ मिळतें व अनादरानें त्याच्याकडे दुर्लक्ष केल्यास श्रवणाचे व्यर्थ श्रम मात्र होतात. तू या असल्या पारमार्थिक शुद्ध वचनाचें खरें पात्र आहेस, म्हणून विचारतों.

**श्रीवाल्मीकि**—ब्रह्मपुत्र मुनीनें याप्रमाणें प्रश्न करून बोलावयास अवकाश दिला असता, राम त्यास असें म्हणाला—

**श्रीराम**—भगवन्, मीं आपल्या उदार वचनाचा अर्थ जाणला, हा सुद्धा आपलाच प्रभाव आहे. गुरुवर्य, आपल्या तर्काप्रमाणेंच सर्व घडलें. काल मी, न निजता, आपल्या उपदेशाचा मनात विचार करीत होतों. आजपर्यंत आपण जें जें काहीं पवित्र, रम्य व पुण्यकारक वचन सागितलें होते तें ते सर्व मी मनात स्थिर केले आहे. हितकारी, हृद्य व आनद देणारें असें तें सर्व आपल्या मस्तकीं कोण धारण करणार नाहीं? वर्षेतु सपल्यावर दिवस जसा स्वच्छ होतो त्याप्रमाणें ससाररूपी धुक्याचें आवरण एकीकडे सारून आम्ही प्रसन्न झालों आहों. आपला उपदेश आरंभीं नुस्ता ऐकत असतानाही मधुर वाटणारा, मनन व निदिध्यासन या मध्यकालीं शमादिसपत्तीचें सुख वाढविणारा व शेवटीं मोक्षाख्य उत्तम फळ देणारा आहे. विकास पावणारें, शुभ्र, टवटवीत व पुण्य-पाप-सुखदुःख इत्यादिकांस आनंद-एक-रसमय करणारें असें तुमचें वचनरूपी-कल्पवृक्षाचें पुष्प सदा सुंदर फळ देणारें होवो. गुरुवर्य, आपण सर्व शास्त्रविचारांत विशारद आहा. आपण तीर्थरूप असून आपल्यामध्यें ज्ञानरूप पुण्य-जल तुडुंब भरलें आहे. यास्तव हे भगवन्, आतां आपण काल सांगितल्याप्रमाणें उपशमाचा उपदेश करा ४.

**सर्ग ५—अविवेकामुळें वाढलेल्या मनोमात्र जगत्स्थितीच्या उपशमाचा उपाय.**

**श्रीवसिष्ठ**—बा सुंदरा, आतां हें सुंदर व हितकर उपशमप्रकरण लक्षपूर्वक ऐक. चांगले खांब मंडपाला जसे धारण करितात, तसे राजस व

तामस जीव या दीर्घ संसारमायेला धारण करितात. पण तुझ्यासारखे जे राज-ससात्त्विक अथवा शुद्ध सात्त्विक जीव असतात ते या पिकलेल्या मायेला, सर्पाच्या कातेप्रमाणें, अनायासानें टाकितात. जे शुद्ध सात्विक अथवा राजस-सात्त्विक असतात ते जगाच्या मूळ परंपरेचा विचार करितात. शास्त्र, सज्जन, यज्ञादि पुण्यकर्में इत्यादिकांच्या योगानें ज्यांचें पाप नष्ट झालें आहे अशा पुरुषांची दीपिकेसारखी सार पहाणारी बुद्धि उद्भवते. आपणच आपल्यापाशीं विचार करून तत्त्वज्ञान संपादन केलें पाहिजे. रघुनंदना, तूं बुद्धिमान्, नीतीमान, धीर व कुलशाली अशा राजस-सात्त्विकांमध्यें श्रेष्ठ आहेस. यास्तव बा साधो, या ससार-आरभ-दृष्टींमध्यें सत्य काय आहे व असत्य काय आहे, याचा तू आपणच विचार कर आणि सत्यपरायण हो. जें उत्पत्तीच्या पूर्वी व नाशानतर नाहीं तें सत्य कसलें ! आदि व अंत यांमध्येंही जें नित्य असतें तेच सत्य होय. आदि व अंत या काळीं असत् असलेल्या वस्तूच्या ठायीं ज्याचें मन आसक्त होतें त्या मूढ पशुतुल्य प्राण्यास विवेक कसा करिता येणार? यथार्थदृष्ट्या विचार केल्यास मनच उत्पन्न होतें, तेंच वाढतें व वस्तुतः तेंच मुक्त होतें.

**श्रीराम**—महाराज, या त्रिभुवनात मनच उत्पन्न होतें, तेंच संसार करतें व तेंच जरा-मरणास पात्र आहे, हें मी जाणलें. आतां त्यातून तरून जाण्याचा उपाय सागा. रघुकुलातील पुरुषांची गति आपणच आहां.

**श्रीवसिष्ठ**—राघवा, पूर्वी शास्त्रावलोकन, तीव्र वैराग्य व सज्जनसंग याच्या योगानें मनाला शुद्ध करावें. त्याच्यामध्यें ज्ञानोदयाची योग्यता आणावी. चित्त अभिमानशून्य व पूर्ण विरक्त झालें असतां आत्मज्ञ व उपदेश करण्यास समर्थ असलेल्या श्रेष्ठ गुरूस शरण जावें. ते सांगतील त्याप्रमाणें सगुण ईश्वराचें ध्यान, पूजा इत्यादि करावें. नंतर त्यांच्याच प्रसादानें विचार करावा. कारण शुद्ध विचारानें आपलेंच आपल्याला ज्ञान होतें. बुद्धिरूपी नौकेच्या आश्रयानें विचाररूपी तीरावर येऊन पोंचेपर्यंतच जीव भवसागरांत गवताप्रमाणें वहात जातो. विचारानें ज्याला वस्तूचा साक्षात्कार झाला आहे अशा पुरुषाची बुद्धि सर्व मानसिक व्यथांना तुच्छ करून सोडते. विचारानें जीवच अक्षय आत्मा होतो. मग मोहाला अवकाश कोठचा! तत्त्व कळेपर्यंत मनाची तळमळ चालते. तें कळलें कीं ती गेली. अहो या सभेंतील लोकांनो,

आत्म्याचें अज्ञान हेंच तुमच्या दुःखांचें कारण आहे. पण त्याला जाणल्यास तुह्मांला अनंत सुख व उपशम होईल. या दुष्ट देहाशीं तो जणुं काय मिळून गेला आहे. पण विचारानें त्या(आत्म्या)ला त्याच्यापासून भिन्न करून सत्वर स्वस्थ व्हा. उशीर लावूं नका. मलिन देहाशीं या निर्मल आत्म्याचा थोडा सुद्धां संबंध नाहीं. ब्रह्म व जीव कमलाचें आधारभूत जल व त्याच कमलाच्या पाकळीवरील थेंब, यांप्रमाणें भिन्न आहेत. (म्हणजे त्यांचा औपाधिक भेद आहे, स्वाभाविक नव्हे.) हें मी हात वर उचलून व ओरडून सांगत आहें; पण माझें कोणी ऐकत नाहीं. जडधर्मी मन आत्मविचार विसरून, भोगांचे मार्गच अशा इंद्रियरूपी खड्डयांत जोंपर्यंत, चिखलातील कांसवाप्रमाणें बसलेलें असतें तोंपर्यंत चंद्र, अग्नि व बारा सूर्य यांच्या योगानेंही संसार-अंधकार थोडा सुद्धां नष्ट होणें शक्य नाहीं. मन विषयमोह सोडून सावध झालें व आपल्या स्थितीचा विचार करूं लागलें म्हणजे सूर्योदयानंतर क्षीण होणाऱ्या रात्रीच्या काळोखाप्रमाणें हृदयस्थ अंधकार पार नाहींसा होतो. यास्तव योगशय्येवर स्वस्थ पडलेल्या मनाला उत्तम आत्म्याच्या ज्ञानाकरितां व संसाराच्या नाशाकरितां बोध करावा. कारण संसार अति दुःखद आहे. धुळीनें गगन व जलानें कमलपत्र जसें लिप्त होत नाहीं त्याप्रमाणें देहांच्या संबधानें आत्मा लिप्त होत नाहीं. सोनें चिखलात पडलें व त्याला वरून कितीही जरी मळ लागला तरी तें आतून जसें दूषित होत नाही त्याप्रमाणें देहांच्या योगानें आत्मा मलिन होत नाहीं. आकाशांतील विविध रंगांप्रमाणें आत्म्यामध्यें सुखदुःखानुभवितृ (म्हणजे सुखादिकांचा अनुभव घेणें हा धर्म) खोटेंच भासतें. सुख व दुःख वस्तुतः जड देहाचें नव्हे आणि सर्वातीत आत्म्याचेंही नव्हे. तर तें अज्ञानाचें आहे. यास्तव अज्ञानाचा नाश झाला म्हणजे तें निराधार होऊन आपोआप नाहींसें होईल. अथवा राघवा, सुख व दुःख कोणाचेंच नव्हे. तर सर्व आत्ममय शांत व अनंत आहे, असें पहा. जळांतील तरंगांप्रमाणें आत्म्यामध्यें सृष्टिदृष्टी पसरल्या आहेत. रत्नाचा प्रकाश जसा आपोआप पसरतो त्याप्रमाणें आत्म्यापासून सृष्टि आपोआप उद्भवते. हें सर्व ब्रह्म आहे. आत्माच सर्वतः पसरला आहे असें जाणून हे निष्पापा, तूं हें निराळें व मी निराळा ही भ्रांति सोड. अग्नीमध्यें जसा हिमकणाचा असंभव त्याप्रमाणें ब्रह्मामध्यें

द्वैतकल्पनेचा असंभव आहे. करितां तूं शुद्ध चित्तानें चिन्मय आत्म्याची भावना सतत कर. सर्व चिन्मय आहे, असें पहा. राघवा, येथें शोक नाहीं, मोह नाहीं, जन्म नाहीं व जन्मवान्‌ही नाहीं. तर जें आहे तें आहे. तूं निश्चिंत हो, म्हणजे झालें. तूं शीतोष्णादि शारीर द्वंद्व–विक्षेपरहित, सत्त्वामध्यें नित्य स्थित झाल्यामुळेंच रजस्तमःप्रयुक्त मानस विक्षेपशून्य आणि त्यामुळें त्या दोन्ही विक्षेपाचा परिहार करण्याचे उपाय अशा योग–क्षेमाविषयींच्या चिंतेनें रहित, नेहमीं सावधान, अद्वितीय व शोकरहित हो. सम, स्वस्थ, शांत, स्थिरमति, मननशील, मौन धारण करणारा, अविद्या व अविद्येचें कार्य यानीं रहित, संकल्परहित, धीर, स्वाधीनचित्त, यदृच्छेनें प्राप्त होईल तेवढेंच करणारा, विरक्त, आयासशून्य, शुद्ध, निष्पाप, ग्रहण व त्याग यानीं रहित, पूर्ण, अक्षुब्ध, विकल्पजाळ्यातून सुटलेला, माया-पटलरहित, अमर्याद, मेरूसारखा अढळ, कशाचीही इच्छा न करतां प्राप्त होईल तें भोगणारा, सागरासारखा गभीर व पूर्णचंद्रासारखा आपल्यामध्येंच स्वतः आह्लाद भोगणारा हो. सर्व प्रपंचरचना असत्य असल्यामुळें तत्त्वज्ञ तिच्या मागें लागत नाहीं. रामा, तूं तत्त्वज्ञ आहेस, यास्तव आतां संकल्प-शून्य व त्यामुळेंच निःशोक हो. तूं कदाचित् ह्मणशील कीं, मज तत्त्वज्ञाला राज्यादिकाची काय गरज आहे ? मी आपला सन्यासच करीन. तर तें मात्र बरोबर नाहीं. कारण तुझा हा देह राज्य करण्याकरितां, साधूंचें रक्षण व असाधूंचा निग्रह करण्याकरिता प्राप्त झाला आहे. यास्तव हा तुझा पिता जेव्हां देईल तेव्हा एकछत्री राज्याचा स्वीकार कर आणि प्रजेचें पालन कर. कारण अवश्य कर्तव्य कर्माचा व अवश्य भोक्तव्य फळाचा त्याग व त्यांच्या विषयींची आसक्ति हीं दोन्हीं युक्त नव्हेत १.

सर्ग ६—कर्मांची गति. चरम जन्मवानांच्या जीवन्मुक्तीकरितां संपादनीय गुणांचा सामान्य क्रम.

**श्रीवसिष्ठ**—लोखंडाच्या गतीस कारण होणाऱ्या लोहचुंबकाप्रमाणें, मी हा सर्व सदाचाररूप व्यापार केवळ सांनिध्यामुळें करीत आहें, असें समजून जो वासनशून्य मनानें प्राप्त व्यवहार करतो तो मुक्त होय, असें

---

१ त्यक्त्वा कर्मफलासंगं नित्यतृप्तो निराश्रयः । कर्मण्यभिप्रवृत्तोऽपि नैव किंचित् करोति सः ॥ म्ह० कर्मफलाविषयींची आसक्ति सोडून नित्यतृप्त व निराश्रय पुरुष कर्मांमध्यें प्रवृत्त झालेला असला तरी कांहीं करीत नाहीं; असें श्रीगीतावचन आहे.

ी जाणतों मानवदेहास प्राप्त होऊनही काहीं अविचारी पुरुष निष्काम कर्मामध्ये आसक्त न होतां सकाम कर्मामध्येंच गढून जातात व त्यामुळें स्वर्गातून नरकास व नरकांतून स्वर्गास असे वारंवार हेलपाटे घालीत रहातात. पुष्कळसे मानव निषिद्ध कर्मामध्येंच आसक्त होतात. कित्येक सत्कर्मापासूनही विरत होतात. त्यामुळें तें एका नरकातून दुसऱ्या नरकात, एका दुःखातून दुसऱ्या दुःखात व एका भयातून दुसऱ्या भयात संचार करीत रहातात. कित्येक स्ववासनारूपी तंतूनीं बद्ध झालेले जीव दुष्कर्माच्या फलाच्या क्रमानें पशु-पक्ष्यादि तीर्यक्-योनींत उत्पन्न होतात. यातून पुनः स्थावर योनीत जातात व स्थावर योनींतून पुनः तिर्यक्-शरीरी होतात. रामा, बहुतेक सर्व प्राण्याचा हा असाच क्रम आहे. या सृष्टीत अगदी थोडे जीव आत्मज्ञ होतात. तेच धन्य होत. मनाचा साक्षी असा जो आत्मा त्याचा ते चागला विचार करितात. तृष्णारूपी बंध ते तोडून सोडतात व परम कैवल्य पदास जातात. पूर्वी काहीं थोडेसे उत्त-रोत्तर उत्कृष्ट मानव जन्म घेऊन या जन्मात जो मुक्त होतो, त्याला राजस-सात्त्विक जीव म्हणतात. तो या जन्मात उत्पन्न होऊन शात्यादि गुणसंपन्न होतो. त्याला निर्मल विद्या प्राप्त होतात. आर्यता, दयता, मैत्री, सौम्यता, करुणा व ज्ञता त्याचा आश्रय करितात. तो सर्व कर्में तर करितो, पण त्याचें फल मिळालें किंवा न मिळाले तरी संतुष्ट अथवा खिन्न होत नाहीं. तर तो त्या दोन्हीं अवस्थेत सम असतो. दिवसा अंधकार जसा क्षीण होतो त्याप्रमाणें त्याच्या ठिकाणीं द्वंद्वें नष्ट होतात.

शरदृतूतील मेघाप्रमाणें त्याचे गुण शुद्ध होतात. वनातील हरिणें मुर-ळीच्या मधुर स्वराची जशी इच्छा करितात त्याप्रमाणे शुद्ध व सौम्य आचारामुळें मधुर झालेल्या त्याची सर्व जन इच्छा करितात. साराश बलाका जशा मेघाकडे धांवतात त्याप्रमाणें ज्याचा हा चरम ( म्हणजे शेवटचा ) जन्म असतो त्याच्यामध्यें बाळपणापासूनच अशा प्रकारचे उत्तम गुण येतात. नंतर गुणसंपन्न झालेला तो योग्य गुरूस शरण जातो. गुरु त्या योग्य शिष्याला पवित्र विवेकामध्यें नियुक्त करतो. कांहीं दिवस विचार केल्यावर तो विवेक व वैराग्य यानीं युक्त आणि गुणशाली चित्तानें एकरूप आत्म-देवास पहातो. शांत चित्तानें तो मनन करतो. तो धन्य पुरुष निजलेल्या मनोमृगाला, तें निर्गुण ब्रह्मच होईल, अशा रीतीनें जागें

करितो. सारांश हे राघवा महा गुणवान् व महा भाग्यवान् असे थोडेसेच पुरुष या क्रमानें हृदयस्थ नित्य प्रकाश पहातात व निर्मल गतीस जातात ६.

**सर्ग ७—** कित्येकं अति भाग्यसंपन्न पुरुषांस अनायासानें ज्ञान प्राप्ति होते.

**श्रीवसिष्ठ**—रामा, सर्व पुरुषांचा हा सामान्य क्रम सांगितला. आतां हा दुसरा विशेष ऐक. या संसारांत उत्पन्न झालेल्या प्राण्यास मोक्षफळ देणारे हे दोन उत्तम क्रम आहेत. एक गुरूनी सांगितल्याप्रमाणें हळु हळु अनुष्ठान करून एका किंवा अनेक जन्मांनीं मुक्त होणें व दुसरा आपोआप जीव व जगत् यांच्या तत्वाचा विचार सुचून अकस्मात् आकाशातून पडलेल्या फळाप्रमाणें, आत्मज्ञान होणें. यातील पहिल्या क्रमाचें विवेचन पूर्वी बरेंच झालें आहे. यास्तव आता या दुसऱ्या क्रमाविषयीं मी एक कथा सागतों, ती ऐक ७.

**सर्ग ८—** वसतसमयीं उपवनात विहार करणाऱ्या जनकाने सिद्धांनी म्हटलेले शुभ श्लोक ऐकले.

**श्रीवसिष्ठ**—विदेह देशाचा जनक म्हणून एक उदारबुद्धि व वीर्यवान् राजा आहे. तो दैवी व मानुषी आपत्तिशून्य असून त्याचा उत्तरोत्तर उत्कर्ष होत असतो. तो याचकाचा कल्पवृक्ष, मित्ररूपी कमलांचा सूर्य, बंधुरूपी पुष्पाचा वसंत, स्त्रियांचा मदन, ब्राह्मणरूपी चंद्रविकासी कमलाचा चंद्र, शत्रुरूपी अंधकाराचा सूर्य व सौजन्यरत्नाचा सागरच आहे. तो या लोकीं विष्णूप्रमाणेच तिच्या पालनार्थ स्थित आहे. तो एकदां वसंत-ऋतु लागून वाल्लता प्रफुल्लित झाल्या असता व कोकिलाचा ध्वनि सर्वतः ऐकू येऊं लागला असता आपल्या रम्य उद्यानांत विहार करावयास गेला आणि अनुचरांना दूर रहावयास सागून, क्रीडापर्वतावर आपोआप वाढलेल्या वेलींच्या मंडपाकार झुडप्यांत एकटाच जाऊन बसला. तों इतक्यांत अदृश्य सिद्धांनीं आपल्यावर अनुग्रह करण्याकरिताच उच्चारलेली अशीं स्मृतिरूप उपनिषद्वचनें त्याच्या कानीं पडलीं.

**सिद्ध**—चक्षु-श्रोत्र इत्यादि इंद्रियांच्या द्वारा विषयग्रहण करणाऱ्या द्रष्टयाचा पुष्पांच्या माळा, चंदनाच्या उट्या, स्त्रिया इत्यादि विषयरूप दृश्याशीं समायोग ( संनिकर्ष, संबंध ) झाला असतां विषयाकार बुद्धिवृत्तीमध्यें आनंद आपोआप व्यक्त होतो, हें प्रसिद्ध आहे. तो आनंद हाच

ज्याचा स्वभाव आहे अशा आत्मतत्त्वशोधनानें निरतिशय भूमानंद रूपानें आविर्भूत झालेल्या आत्म्याची स्थिर व बाह्य विषयविक्षेपशून्य चित्तानें आम्ही उपासना करतों. ( या वाक्याचा भावार्थ असा–विषयाकार चित्तावृत्तीमध्यें आपोआप व्यक्त होणाऱ्या आनंदाची गणना कोणऱ्या कोटींत करावयाची ? विषयकोटींत, साधनकोटींत कीं, कर्तृकोटींत ? विषयकोटींत त्याची गणना केल्यास तो जड आहे, असें होणार व करण आणि कर्ता यातील एकाद्या कोटींत त्याला घालावें तर करण व कर्ता हीं दोन्हीं कारकें ( क्रिया करणारीं ) असल्यामुळें त्यांच्याहून निराळ्या अनुभव-क्रियेची असिद्धि होणार. पण करण व कर्ता याहून भिन्न असलेला आनदानुभव प्रत्यक्ष येतो. तस्मात् त्याला साक्षिकोटींतच घातला पाहिजे. अविद्यावरणामुळें ज्याचा चिदानंदस्वभाव मद झाला आहे, असा साक्षीच दुसऱ्या अहंकारात्म्याची कल्पना करून आपण त्याच्याहून पृथक् असल्यासारखा होतो व विषयाकार वृत्तीमध्यें व्यक्त झालेल्या स्वानंदास, त्याचा विषयसा करून, तो आपल्याला निरतिशयानंद समजत नाहीं. यास्तव स्वतत्त्वाच्या विचारानें व्यक्त झालेल्या त्याच निरतिशयानंद स्वभावाची आम्ही समाहित चित्तानें उपासना करितों. )

**दुसरे कांहीं सिद्ध**—द्रष्टा, दर्शन व दृश्य, कर्ता, करण व कार्य, ज्ञाता, ज्ञान, व ज्ञेय इत्यादि त्रिपुटया जाग्रत् व स्वप्न या दोन अवस्थातच असतात. व सुषुप्तींत त्या दोन्ही अवस्थातील त्रिपुटींच्या बीजरूप वासना असतात. यास्तव त्रिपुटी व वासना याचा त्याग करून त्यांच्या उत्पत्तीच्या पूर्वीही असणाऱ्या स्वप्रकाश साक्षी आत्म्याची आम्ही उपासना करतों.

आणखीं कांहीं **सिद्ध** म्हणतात–कार्य व कारण या दोन्हींमध्यें अनुगत असणारें नित्य व सर्व प्रकाश्य पदार्थांना प्रकाशित करणारें जें साक्षी आत्मतत्त्व त्याची आम्ही उपासना करितों.

**अन्य सिद्ध**–ज्याच्या आधारानें हें सर्व आहे, ज्याच्या संबंधानें हें सर्व आहे, ज्याच्यापासून हें सर्व झालें आहे, ज्याच्याकरितां हें सर्व आहे, ज्याच्या योगानें हें सर्व आहे व जें हें सर्व आहे तें परमार्थ सत्य प्रत्यगात्माच आहे, असें जाणून आम्ही तद्रूप होऊन रहातों.

दुसरे **सिद्ध**–अ हें प्रथमाक्षर व हम् हें अंत्याक्षर यांच्या योगानें झालेल्या

अहं अशा सर्वव्यापी व सर्व व्यवहारांत उच्चारल्या जाणाऱ्या तत्त्वाची भावना अहंकाररूप उपाधीचें निरसन करून आम्ही सतत करितों.

दुसरे—आपल्या हृदयगुहेंतील ईश्वरास सोडून, त्याला अगदीं विसरून, जे दुसऱ्या देवाकडे जातात ते हातांतील कौस्तुभ टाकून अन्य रत्नांची इच्छा करीत बसतात.

दुसरे—हृदयातील ईशाच्या प्राप्तीचे मुख्य साधन वैराग्य असल्यामुळें सर्व आशा सोडल्यावरच हे ज्ञानफल ( ब्रह्म ) मिळतें व त्याच्या योगानें आशारूपी विषवल्लीचीं सर्व मुळें ( वासनांच्या योगानें कठिण झालेल्या हृदयग्रंथी ) तुटतात.

आणखीं कित्येक सिद्ध म्हणतात—भोगानंतर भोग्य पदार्थाविषयीं अत्यंत वैरस्य वाटतें, या गोष्टीचा प्रत्यक्ष अनुभव घेऊनही जो मूर्ख भोग्य वस्तूंमध्यें पुनः आसक्त होतो तो मनुष्य नव्हे तर गर्दभ आहे.

दुसरे सिद्ध—इंद्र आपल्या वज्राने पर्वताचीं मस्तकें ( शिखरें ) जशीं फोडतो त्याप्रमाणें वर डोकें काढलेल्या अथवा पडून राहिलेल्या इंद्रियरूपी सर्पाचीं मस्तकें विवेकदंडानें फोडून उडवावीं.

आणखी कित्येक—बाह्य व आंतर इंद्रियव्यापार सोडणें हा उपशम होय. या उपशमाचें सुख संपादन करावें. तें विषसुखाप्रमाणे दोषयुक्त नाहीं, तर चित्तप्रसादास कारण होणारें असल्यामुळें पवित्र आहे. शमामुळें चित्त क्षीण होतें. तें क्षीण झालें म्हणजे स्वरूपभूत सुखामध्यें उत्तम स्थिति चिरकाल होते ८.

**सर्ग ९.**—सिद्धगीता ऐकलेल्या राजाचा निर्वेद व विचार.

**श्रीवसिष्ठ**—ही सिद्धगीता ऐकून, रणवाद्याच्या ध्वनीनें भितरा जसा खिन्न होतो त्याप्रमाणें, राजा जनक तत्काल खिन्न झाला. आपल्या परिवाराला बरोबर घेऊन तो स्वगृहीं गेला, आणि त्या सर्वांना आपापल्या स्थानीं जावयास सांगून तो एकटाच माडीवर उत्तम आसनावर जाऊन बसला. त्यानें उडणाऱ्या पक्ष्याच्या पंखाप्रमाणें लोकगति चंचल आहे असें पाहून, असा विलाप करावयास आरंभ केला.—

अरे अरे! फार वाईट. जीवांच्या—जन्म, जरा, भय, मरण—इत्यादिकांच्या योगानें चंचल झालेल्या अति कष्टकर दशांमध्यें हा मी जड व कठिण पाषाणाप्रमाणें लोळत पडलों आहें. ज्याला सीमाच नाहीं अशा कालाचा

अगदीं अल्प भाग मी जिवंत रहाणार. पण त्या थोड्याशा कालांतही मी किती आशा करतों व त्या थोडक्याच जीविताची किती तीव्र आकांक्षा करतों, याचा कांहीं नियम आहे का ? हें राज्य म्हणजे केवढेंसें आहे ! अगदींच अल्प. तेंही मी जिवत असेपर्यंत फार तर रहाणार ! पण असल्या राज्यानेंच सतुष्ट होऊन मी मूर्खासारखा भावि दुःखाची चिंता मुळींच करीत नाहीं, हें काय ! देहच आत्मा आहे. यास्तव देहाचा नाश झाला म्हणजे दुःखाचाही नाश होईल. त्याच्या प्रतीकारार्थ व्यर्थ चिंता करण्यात काय अर्थ आहे ? असें कित्येक म्हणतात. पण काम-कर्म-वासना-बीजावाचून भोगवैचित्र्यास कारण होणारा जन्म असिद्ध असल्यामुळें व विधि-निषेध-मोक्षशास्त्र प्रमाण असल्यामुळें मी अनादि-अनत आहें. केवळ देहमात्र नव्हे. मग असे जर आहे तर बालक चित्रातील चद्राला जसा खरा चंद्र समजतो त्याप्रमाणें मी अनात्म देहाला आत्मा समजून असा स्वस्थ कां बसलों आहे ? अरे अरे ! कोणत्या गारुड्यानें मला या प्रपचाची भुरळ घातली आहे, कांहीं कळत नाहीं. सत्य, रम्य, अमर्याद व अजन्य असें या जगात कांहींच नाहीं. मग माझी मति कोणत्या पदार्थाच्या भरवशावर रहाणार ? तसली वस्तु दूर कोठें असेल म्हणून म्हणावें तर दूरही कांहीं नाहीं. कारण सर्व जग माझ्या मनात आहे. त्याच्या बाहेर कांहीं नाहीं. मन देहाच्या बाहेर कोठेंच जात नाहीं. तें देहातच सर्व वस्तूचा अनुभव घेतें. तस्मात् दूरादि कल्पना भासमान आहे. खरी नव्हे; असा निश्चय करून मी आता बाह्य विषयाची भावना सोडतों. लोकाचा—धनादि भोग-साधनाविषयींचा—सर्व प्रयास जलतरगाप्रमाणें भगुर व जन्म-मरणादि दुःखांचा हेतु आहे, असा मला पुष्कळ वेळां अनुभव आला आहे. मग विषयसुखाविषयीं आस्था धरण्यात कोणता लाभ आहे ? प्रतिवर्षी, प्रति-मासीं, प्रत्यहीं व प्रतिक्षणीं दुःखमिश्रित सुखें व साक्षात् दुःखें वारंवार येतात. या ससारांत आतां असलेली वस्तु घटिकेंत नाहीशी होते व पूर्वी नसलेली वस्तु घटकेंत निर्माण होते. अनिश्चित संसारांतील पदार्था-वर विवेकी सताची आस्था कशी रहाणार ! आज जे महात्म्यांचे अग्रे-सर असतात तेच कांहीं दिवसांनीं धुळीस मिळतात. तेव्हां या दुष्ट चित्ताच्या वैभवावर विश्वास कोण ठेवणार ! हर हर ! काय चमत्कार आहे ! ‘ मी दोरीवाचून बांधला गेलों आहें. चिखलावाचून मळीन

झालों आहें व उच्च भागीं स्थित असतांनाही पडलों आहें. हाय हाय, अरे आत्म्या, माझी सर्व स्थिति नष्ट झाली आहे. मी मोठा बुद्धिमान् असतानाही मला असा हा मोठा मोह कसा पडला ? हे महा भोग माझे कोण ? हे बांधव माझे कोण ? भूताच्या कल्पनेनें बाळक जसा व्याकुळ होतो त्याप्रमाणें मी सकेतानें व्याकुळ झालों आहें. जरा व मरण यांची जणुं काय प्रियसखीच व अत्यंत उद्वेग देणारी अशी ही आस्था मी आपण होऊन का उत्पन्न करतों काहीं कळत नाहीं. ते महावैभवसंपन्न पृथु-मरुत्तादि राजे, ते सद्गुणवान् सत्पुरुष व ते सर्व स्निग्ध बांधव जर नामशेष झाले आहेत तर वर्तमान समयीं असणाऱ्या वस्तूंवर तरी आस्था काय ठेवावयाची आहे ? आजवर होऊन गेलेल्या राजाचीं धनें कोठें आहेत ? व ब्रह्मदेवाचीं भुवनें कोठें आहेत ? पाण्यावरील बुडबुड्याप्रमाणें आजपर्यंत लक्षावधि इंद्र कालाने गिळून सोडले आहेत. पण हें ठाऊक असतानाही मी जीविताची आस्था धरीत आहें, असें पाहून साधू मला खरोखर हंसतील. कोट्यवधि ब्रह्मदेव गेले. सृष्टीच्या परंपरा नाहींशा झाल्या व अनेक राजे धुळीसारखे उधळून गेले. मग माझ्याच जीविता-विषयीं आस्था धरणें मला कसें शोभेल ? संसाररात्रींतील या देह–भ्रमावर आस्था ठेवणाऱ्या मला धिक्कार असो. 'हा मी' ही कल्पना व्यर्थ आहे. या अहंकार पिशाचानेंच माझे असे हाल माडले आहेत. क्षण, घटिका इत्यादि सूक्ष्म काललेखा एकसारख्या माझें आयुष्य क्षीण करीत आहेत, हें पाहत असूनही मी असा आंधळ्यासारखा स्वस्थ का बसलों आहें ? महाकल्पपर्यंत रहाणाऱ्या ब्रह्म विष्णु-महेशानाही जर कालाने गट्ट करून सोडलें आहे तर माझी काय कथा ? हे दिवस एकसारखे येत आहेत व जात आहेत. आजपर्यंत असे अनेक दिवस मला न कळता निघून गेले. पण अद्यापि असा एकही दिवस उगवत नाहीं कीं, जो मला नित्य व एक सद्वस्तु दाखवील. प्राणिमात्राच्या हृदयात भोग स्फुरतात पण आत्मविचार स्फुरत नाहीं ! हाय हाय, अति कष्ट व अति दुःख मी भोगीत आहें. अजून माझ्यामध्यें विरक्ति उत्पन्न होत नाहीं काय करावें ! आजवर मी ज्या ज्या रमणीय वस्तूंवर आस्था ठेविली त्या त्या सर्व नाहींशा झाल्या, असाच माझा अनुभव आहे. आयुष्याच्या मध्यावस्थेंत वय रमणीय असतें; अंत्य अवस्थेमध्यें धर्म रमणीय असतो व विषय सकृद्दर्शनीं, विचार करीपर्यंत,

भोग घेईतों, रमणीय असतात. पण तें सर्व अपवित्र व विनाशरूपी नरकानें दूषित झालेलें आहे. मानव ज्या ज्या पदार्थांमध्यें आस्था ठेवतो त्या त्यापासून त्याला दुःख होतें. जड जन उत्तरोत्तर अधिक पापी, अधिक खेदकर व अधिक क्रूर दृष्टीस पडतो. बाल्यावस्थेंत अज्ञानानें, तारुण्यांत मदनवेगानें, व बाकीच्या वयांत कुटुंब-भरणादि चिंतेनें त्याला ग्रासलेलें असतें. आदि व अंत-समयीं असत्, भोगसमयीं विरस, दारिद्र्य, रोग, वार्द्धक्य इत्यादि दशांनीं दूषित व ज्यांत असारच सार वाटत असतें असा संसार मूढ प्राणी व्यर्थ पहातो. राजसूय, अश्वमेध इत्यादि शेंकडों यज्ञ करूनही फार तर कल्पपर्यंत टिकणारा स्वर्ग मिळतो. पण तोही महा कालाच्या दृष्टीनें एक लहानसा कालांशच आहे. शरीर असेपर्यंत प्रिय व अप्रिय याचा क्षय होणें शक्य नाहीं. यास्तव स्वर्ग-लोकीं गेल्यावरही आपत्तींचा नाश होईल, अशी आशा करावयास नको. चित्त-बिळांत रहाणाऱ्या आधिव्याधींचें निवारण कसें होईल? वर्तमानसमयीं अनुभवास येणाऱ्या पदार्थांच्या बोडक्यावर नाश बसलेला आहे; रम्य वस्तूंच्या डोक्या-वर अरम्यता बसली आहे व सुखाच्या मस्तकावर दुःखें बसलीं आहेत. पुनः पुनः उत्पन्न होऊन मरणाऱ्या प्राकृत क्षुद्र जंतूंच्या योगानेंच सर्व पृथ्वी भरून गेली आहे. त्यामुळें साधूंचें दर्शन दुर्लभ झालें आहे. ज्यांच्या नेत्राच्या उघड-झापीमुळें जगाचा उदय व प्रलय होतात असे पुरुष जगांत आहेत. मग माझ्यासारख्या क्षुद्राची गणनाच काय करा-वयाची आहे? रम्याहून रम्य व स्थिराहून स्थिर असे पदार्थ सृष्टींत आहेत. मग त्यांतील एकाद्याच पदार्थाच्या शोभेची इच्छा कां करावी! ती इच्छा चिंता हेंच फल देणार, यांत कांहीं संशय नाहीं. विचित्र संपत्तींना बहुमान देणें म्हणजे महा आपत्तींना थारा देणेंच आहे, असें मी समजतों. कारण त्यांची मोठ्या कष्टानेंच प्राप्ति करून घ्यावी लागते; त्यांचें संरक्षण करतांनाही मोठें दुःख होतें व नाश झाल्यास दुःखाला पारच रहात नाहीं. त्याचप्रमाणे दारिद्र्य, बंधुनाश, राज्यादिकांचा नाश इत्यादि आपत्ती साधुसंग, तीर्थसेवन, तप, ज्ञान इत्यादिकांस कारण होत असल्यामुळें श्रेयस्करच आहेत, असें मनांत समजल्यास त्या संपत्तीच होतात. या असत्य जगाच्या ठिकाणची ममता वाढविणें हीच विपत्ति व विवेकानें तिचा क्षय करणें हीच संपत्ति होय. जग आकाश—फलपतना-

प्रमाण अकस्मात् झालें आहे. पण या भोगलंपट मनानें त्यांतील कांहीं पदार्थ ग्राह्य आहेत व काहीं त्याज्य आहेत अशी व्यर्थ कल्पना केली आहे. पतंग जसा अग्निशिखेवर आसक्त होतो त्याप्रमाणें मर्यादित व त्रिविधतापग्रस्त अशा या सुखनामक दृष्टीमध्यें मी कसा अनुरक्त झालों आहे! नरकादिकांतील निरंतर दुःखभोग संवयीनें अंगवळणी पडतो व त्यामुळें त्याचा फारसा ताप होत नाहीं. पण या संसारांतील थोडें सुख व थोडें दुःख, पुनः सुख, पुनः दुःख अशा रीतीनें पर्यायानें अनुभवास येणारें दुःख असह्य होतें. संसार ही दुःखांची पराकाष्ठा आहे, असें साधू सांगतात. तेव्हा त्यांत पडलेल्या देहांत सुख कसें असणार? पण संसाररूपी स्वाभाविक महादुःखांत पडलेल्या जीवांना त्यांतील सामान्य दुःखें म्हणजे मोठीं सुखेंच आहेत, असें वाटतें. म्हणजे तरवारीच्या मोठ्या आघातापेक्षा लहानशा वादीचा आघात सुखकर आहे, असें म्हणण्यापैकींच तो प्रकार. हाय हाय श्रुति-स्मृति इत्यादि प्रमाणामध्यें कुशल, बुद्धिमान् व मोठा विवेकी असा मीही अशास्त्रदृष्टी मुर्खासारखा होतो, याला काय म्हणावें! या अवाटव्य संसार, वृक्षाचा मूळ अंकुर मन आहे व मनाचें मर्म संकल्प आहे. यास्तव आतां मी अगोदर संकल्पाचा त्याग करतों. म्हणजे अंकुरासह तो महावृक्ष सुकून जाईल. आजपासून मी या चंचल व नाशवंत वस्तूमध्यें रममाण होणार नाहीं. अनेक आशापाश, अधोगति, उर्ध्वगति इत्यादिकांनीं भरलेल्या अनेक संसारगती आजपर्यंत मी भोगल्या आहेत. यास्तव आतां मी शांत होतों. अरेरे मी मेलों, माझा नाश झाला, माझा सर्वस्वी घात झाला, असें म्हणून मी पुनः रडणार नाहीं. आतां मी चांगला जागा झालों आहें. आपल्या परमार्थरूपी धनाला चोरणाऱ्या या मन-नावाच्या चोराला मी आतां पाहिलें आहे. आतां तो कोठ जातो तें मी पहातों. हा केवळ चोरच नव्हे, तर माझा मोठा वैरीही आहे. कारण यानें मला फार दिवसापासून पीडा देण्यास आरंभ केला आहे. आजपर्यंत हे मनोरूपी मोतीं अविद्ध होतें. पण आतां मी त्याला भोंक पाडलें आहे. तेव्हां यापुढें मला त्यांत शम-दमादि गुण (दोरी) घालतां येतील. हा मनोरूपी लहानसा थेंब विवेकसूर्याच्या तापानें ब्रह्मतत्त्वामध्यें स्थिर होण्याकरितां आतां सुकून जाईल. आज त्या परोपकारी सिद्धांनीं मला उत्तम उपदेश केला आहे. त्यामुळें मी आतां आत्म्याचेंच अनुसंधान करीन. मी या आत्ममणीलाच पहात एकांतांत बसेन विवेका,

तुला नमस्कार असो. मी आता अहं व मम हे भाव सोडून आणि अति बलाढ्य मनःशत्रूला मारून शांत होईन ९.

**सर्ग १०**—प्रतीहाराची कर्मानुष्ठानाविषयीं राजास प्रार्थना व राजाचा पुनः विचार.

**श्रीवसिष्ठ**—रामचंद्रा, जनक याप्रमाणें विचार व निश्चय करीत एकांतात बसला असता त्याचा प्रतीहार त्याच्यापुढें आला व नम्र होऊन म्हणाला "स्वामिन्, उठा व राजतेस शोभतील असे दिवस व्यापार करा. प्रभो पुष्पं, कापूर व केशर घालून सुवासिक केलेल्या जलाच्या घागरी भरून घेऊन सुंदर स्त्रिया स्नान-भूमींत, साक्षात् नद्याप्रमाणेंच, उभ्या आहेत. स्नान करावयाच्या सरोवराच्या तीरावर नाजुक वस्त्राचे मंडप सज्ज केले आहेत. तेथे इतर आवश्यक वस्तूंचेंही प्राचुर्य आहे. देवगृहात पूजनाची सर्व तयारी झाली आहे. स्नान, जप, अघमर्षण व तर्पण करून येणाऱ्या तुमचीच दक्षिणेस योग्य असलेले ब्राह्मणश्रेष्ठ, वाट पहात आहेत. महाराज ज्यांच्या हातात चामरें आहेत अशा रम्य स्त्रिया शीतळ भोजन-भूमीमध्यें आपलीच प्रतीक्षा करीत उभ्या राहिल्या आहेत. यास्तव हे देव, सत्वर उठा. आपलें नियत कार्य करा. महात्मे आपल्या कर्तव्याचा उचित काल व्यर्थ घालवीत नाहींत.

राघवा, प्रतीहारानें जवळ येऊन असें जरी सांगितलें तरी राजा पहिल्यासारखा विचार करीतच राहिला—हें राज्य म्हणजे केवढेंसें? व त्यात सुख कोणतें? याचा मला काहीं उपयोग नाहीं. या सर्व गौड-बंगालाला सोडून मी असाच एकांतात शांत बसणार. हे मिथ्या भोग बस झाले. सर्व कर्मे सोडून मी अगदीं स्वस्थ बसतों. अरे चित्ता, जन्म, जरा, जाड्य इत्यादि संकटांची निवृत्ति होण्याकरितां तूं भोगकौशल्य सोड. विषयाभिलाष, त्याच्याविषयीं प्रयत्न, त्याचा उपभोग, त्याचें अनुस्मरण, इत्यादि दशामध्यें जेथें जेथें तुला सुखल व-भ्राति होईल त्यापासूनच तुला मोठें दुःख होईल. चित्ताला भोगभूमीमध्यें वारंवार फिरवीत दीर्घकाळ जरी राहिलें तरी त्याची तृप्ति होत नाहीं. यास्तव ही तुच्छ भोगवासना पुरे झाली. चित्ता, ज्याच्यामध्यें स्वाभाविक तृप्ति होणें शक्य असेल त्याच्याच मागें लाग. असा विचार करून जनक मुकाट्यानें बसला. चंचल मन शांत झाल्या कारणानें तो चित्रासारखा निश्चल झाला.

राजाच्या मनाप्रमाणें चालण्यांत कुशल असलेला प्रतीहारही गौरव व भय यांच्या योगानें कांहीं बोलला नाहीं.

कांहीं वेळ तशा शांत अवस्थेंत बसून तेथील लोकांचें जणुं काय जीवितच असा जनक पुनः शांत चित्तानें विचार करूं लागला. या सृष्टींत ग्राह्य काय आहे? कोणत्या अविनाशी वस्तुमध्यें मी आस्था ठेवूं? मला क्रियापर झाल्यानें अथवा निष्क्रिय झाल्यानें कोणता लाभ होणार आहे? कारण दृश्यामध्यें नित्य असें कांहीं दिसत नाहीं. अथवा लोकरंजनार्थ माझा हा देह विहित कर्में करो अथवा निषिद्धापासून निवृत्त होवो, त्यामुळें माझ्या सम व शुद्ध चैतन्याची कांहीं हानि नाहीं. जे अप्राप्त आहे त्याची मी इच्छा करीत नाहीं व जें प्राप्त झालें आहे तें टाकीत नाहीं. तर आपल्या स्वस्थ स्वरूपांत रहातों. जें माझें असेल तें कांहीं झालें तरी मजपाशीं रहाणारच. कर्म केलें तरी मला कांहीं मिळावयाचें नाहीं व न केलें तरी माझें कांहीं नुकसान नाहीं. कारण आगंतुक असलेलें सर्व फल नाशवत असणार हें उघड आहे. शास्त्रविहित अथवा लोकप्राप्त क्रिया करणाऱ्या मला ग्राह्य व त्यामुळेंच इष्ट असें कांहीं वाटत नाहीं. तस्मात् आतां हा माझा देह उठून आजपर्यंत त्याला ज्याचा दृढ अभ्यास झाला आहे, अशीं कर्में खुशाल करो. कारण यानें जर कांहींच केलें नाहीं; अंग मुळींच हालविलें नाहीं, तर तो आखडून जाईल! त्यात काय अर्थ आहे? मन आंत निष्काम, सम व प्रेमरहित असतांनाच बाहेर शरीरावयव जर हालचाल करीत असले तर करीनात. त्यापासून पुण्यापुण्यरूप फलाचा उदय होणें शक्य नाहीं, हें ठरलेलेंच आहे. कारण मनच आपल्याला कर्माचा कर्ता व त्याच्या फलाचा भोक्ता समजतें व त्यामुळेंच तें प्रत्यवायी होतें. पण त्यानें पूर्वोक्त समजूत सोडून शांतीचा आश्रय केला म्हणजे देहानें केलेलें कर्म त्याचें नव्हे असें उघडच होतें. यास्तव मीही आतां मनाला शांत ठेवून देहाला अभ्यस्त क्रिया खुशाल करूं देतों १०.

**सर्ग ११—राजाचें आह्निकानुष्ठान व पहाटे त्यानें चित्ताला केलेला बोध.**

**श्रीवसिष्ठ**—रामभद्रा, असा पुनः विचार व निश्चय करून जनक दिनकृत्यें करण्याकरितां असक्त मनानें उठला. इष्ट व अनिष्ट वासना टाकून जाग्रत्समयींच सुषुप्तीप्रमाणें त्यानें सर्व क्रिया केल्या. निरभिमानानें

यानें देव-ब्राह्मणपूजनादि सर्व दिनकर्में नेहमींप्रमाणें केलीं. रात्रीं त्याच यानलीलेनें काल घालविला व पहाटे तो आपल्या चित्ताला असा ोध करू लागला.

अरे चचल चित्ता, हा संसार तुझ्या सुखाला कारण होणार नाहीं रें; शात हो. माझें ऐक. शांतीमध्यें खरें सुख आहे. आत्मसुख शातीनेंच मेळतें. बाबारे, तूं जसा जसा संकल्प करतेस तसा तसा संसार विस्तृन ोत जातो. अरे शठा, तू भोगाच्या इच्छेनें अनंत आधींत पडतेस, याचा ाहीं विचार कर. जन्माचा उद्भव चिंतापासूनच होतो. यास्तव त्याना ोडून शात हो. बा सुंदरा, विचार करून पहा व यात जर काहीं सार ाहे, असें वाटलें तर मग तू याच्यावर खुशाल आसक्ति ठेव. हें दृश्य त् असो कीं असत् असो, उदय पावो किंवा अस्त पावो; पण त्यांच्या ुणागुणानीं विषम होऊ नकोस तर सम रहा. तुझ्याप्रमाणेंच ? दृश्य ही र असत् आहे तर तुम्हा दोघा असत्-वस्तूचा संबध कसा होणार, याचा र काहीं विचार कर. बरे तूं सत् आहेस व दृश्य असत् आहे म्हणून हणावें तरी सत् व असत् म्हणजे विद्यमान व अविद्यमान याचा संबध ोणे शक्य नाहीं. आता तुह्मी दोघेही सत् आहात म्हणून समजावें तर तुह्मी तुमचा सबधही सदा असणार. मग कदाचित् हर्ष व कदाचित् विषाद याना वकाश कसा रहाणार ? यास्तव तूं दृश्य व दृश्यचिता या महाव्याधींचा ाग कर. आपला क्षोभ घालीव. व्यर्थ मूढ होऊ नकोस. ज्याच्या ोगानें तू परिपूर्ण होशील अशी या जगात एकही वस्तु नाहीं. यास्तव ाळा, चचलता सोड व अतिधीरता धर ११.

**सर्ग १२**—जनकाची जीवन्मुक्त स्थिति. विचार व प्रज्ञा याचें विचित्र माहात्म्य.

**श्रीवसिष्ठ**—दशरथसुता, याप्रमाणें विचार करून जनक राजानें ापलीं सर्व नियत कर्में करण्याचा परिपाठ चालविला. पण पुनः तो ्वींप्रमाणें अहंता व ममता यानीं व्याकुळ झाला नाहीं. कोणत्याही अनुकूल चींमध्यें त्याचें चित्त उल्लसित झाले नाहीं व प्रतिकूळ दशेंत तें म्लान ालें नाहीं. तर तें सतत निद्रित असल्यासारखें राहिलें. त्या दिवसापासून ानें दृश्याचा इष्टबुद्धीने स्वीकार केला नाहीं व अनिष्टबुद्धीनें त्याग ला नाहीं. तर ज्यावेळीं जें उपस्थित होईल त्यावेळीं त्याचा तो परामर्श ात असे. सदा विचारवान् असलेल्या त्याला पुनः अनादि अहं-ममादि-

मान वाटला नाहीं. आत्मानुसंधानामुळें तो आत्मरूप झाला. त्याच्या हृदयाकाशांत चिदात्मा उदय पावला. सर्व भाव चिच्छक्तीमध्यें अध्यस्त आहेत व त्यामुळें ते आत्मारूप आहेत, असें तो सतत चिंतन करीत असे. त्याचा आत्मा अनंत झाला. त्या दिवसापासून तो माद्रद राजा जीवन्मुक्त झाला. राज्य करीत असतांनाही त्याच्या मुक्तिसुखांत कधींही व्यत्यय आला नाहीं. राज्यातील अर्थ व अनर्थ यांचा परिणाम त्याच्या मनावर कधीं होत नसे. त्यामुळेंच तो सर्व करीत असूनही काहीं करीत नव्हता. निद्रित पुरुषाप्रमाणें त्याच्या सर्व भावना अस्तगत झाल्या होत्या. तो पुढे होणाऱ्या गोष्टींचें आज अनुसंधान करीत नसे, होऊन गेलेल्या गोष्टींना कधीं आठवीत नसे व वर्तमान कार्य हसत करीत असे. तात्पर्य बा रामा, आपल्या विचारानेंच त्याला सर्व प्राप्य प्राप्त झालें. जसा जसा आपल्याशींच विचार करावा तशी तशी विचाराची हद्द जवळ येते. यास्तव शेवटपर्यंत विचार सोडू नये. उतावीळपणें त्याला मध्येंच सोडणें यासारखी हानि नाहीं. आत्मा-विचाराच्या दृष्टीनें पाहिल्यास गुरु, शास्त्र व पुण्य हीं सुद्धां आत्मपदप्राप्तीचीं गौण साधनें ठरतात. सच्छास्त्र, विवेक इत्यादिकांच्या योगानें सुंदर व ऊहापोह-कुशल असल्यामुळें प्रिय सखी अशा शुद्ध प्रज्ञेनेंच तें पद प्राप्त होतें. ज्याची पूर्वापर विचार करणारी प्रज्ञारूपी दिव्याची शिखा उज्ज्वल झालेली असते त्याला मोहरूपी अंधकार बाधा करीत नाहीं. विपत्तिरूपी मोठ्या दुस्तर नदींतून प्रज्ञारूपी नावेच्या योगानें अनायासानें जाता येतें. ज्याला प्रज्ञा नसते त्याला थोडीशी आपत्तीही महासंकटांत पाडते. प्रज्ञावानाला गुरूचें साहाय्य जरी नसलें, शास्त्राचें श्रवणही जरी न घडलें तरी केवळ ज्ञानानें बाधित होणाऱ्या व त्यामुळेंच अति कोमल अशा संसारांतून तो पार जातो. व्यवहारांत सुद्धा प्रज्ञावानाच्या सहायाने मोठमोठीं कामें करिता येतात. इतर कितीही जरी सहाय असलें तरी प्रज्ञेच्या अभावीं स्वल्पकार्यही सिद्धीस जात नाहींत. यास्तव राघवा, शास्त्र व सत्संग यांच्या योगानें प्रथम शुद्ध प्रज्ञा वाढवावी. म्हणजे सर्वोत्तम फळ मिळतें. सामान्य जन बाह्यार्थ संपादन करण्याकरितां जसे वारंवार तोच तो प्रयत्न करितात. त्याप्रमाणें प्रथमतः प्रज्ञावृद्धी-करितां वारवार तोच तो प्रयत्न करावा. सर्व दुःखांची पराकाष्ठा, आपत्तीचा उत्तम कोश व संसारवृक्षाचें बीज अशा प्रज्ञामांद्याचा विनाश

करावा. स्वर्ग, पाताळ व राज्य यांपासून जें जें कांहीं मिळणें शक्य आहे तें तें सर्व प्रज्ञाकोशापासून प्राप्त होतें. राघवा, घोर संसारसागरांतून प्रज्ञेच्या योगानेंच पार जातां येतें. दान, तप, तीर्थ, उपवास इत्यादिकांच्या योगानें नव्हे. भूमीवरील नरानाही दैवी संपत्ति प्राप्त होणें हें प्रज्ञा-पुण्य-लतेचेंच फल आहे. प्रज्ञाबलानेंच कोल्ह्यासारख्या क्षुद्रप्राण्यानीं सिंह, हत्ती इत्यादि महा बलाढ्य पशूना आजवर पुष्कळदा जिंकलें आहे. प्रज्ञावान्च स्वर्ग व मोक्ष यास योग्य होतो. सर्व वादी प्रज्ञेनेंच प्रतिवाद्यास जिंकतात. विवेक्याच्या हृत्कोशात असलेली ही प्रज्ञा म्हणजे चिंतामणीच आहे. कल्पलतेसारखी ही चिंतिलेले फळ देते. यास्तव असल्या या महाफल देणाऱ्या प्रज्ञेला तूं प्रत्यहीं वाढीव. म्हणजे तिच्या योगानेंच तुला उत्तम पद लाधेल १२.

**सर्ग १३**—जनकाच्या विचाराच्या दृष्टातानें चित्तशातीचा उपाय

**श्रीवसिष्ठ**—रामा, जनकाप्रमाणें तूंही विचार कर. म्हणजे तुलाही तें पद मिळेल. जनकासारखे जे प्रज्ञावान् राजस-सात्त्विक शेवटचा जन्म घेतात त्यांना तें तत्त्व आपोआप कळते. सत्त्वगुणाच्या वृद्धीमुळे चित्त प्रसन्न होई तों इद्रिय शत्रूस एकसारखें जिकीत रहावें. चित्त प्रसन्न झालें कीं, त्यात देवाधिदेव परमात्माही प्रसन्न होऊन व्यक्त होतो व त्याचा साक्षात्कार झाला कीं सर्व दुःखदृष्टी क्षय पावतात. तो परात्पर देव साक्षात् दिसला म्हणजे मोहबीजाच्या मुष्टी व विविध आपत्तींच्या वृष्टी अशा या कुदृष्टी क्षीण होतात. जनकाप्रमाणेंच तूही सर्व व्यवहार कर. पण तो करीत असतानाही आत शुद्ध प्रज्ञेनें आत्म्याचे अनुसधान ठेव. आतल्या आत सतत विचार करणाऱ्या व जग भगुर आहे, असें पहाणाऱ्या तुझा आत्मा योग्य समयीं प्रसन्न होईल. ससारास भ्यालेल्या पुरुषाना एका आपल्या प्रयत्नावाचून दैव, कर्म, धन, बाधव इत्यादिकातील दुसरें कोणीही धीर देत नाहीं. जे दैवपरायण व कृत्याच्या आरभींच कुकल्पना करणारे असतात त्यांच्या मंदमतीचें अनुकरण कधींही करूं नये. श्रेष्ठ विवेकानें आत्म्याला पहावें व विरक्त चित्तानें भवसागराला तरून जावें. रामा, आकाशांतून पडणाऱ्या फलासारखी अनायासानें होणारी ज्ञान-प्राप्ति ही मी तुला सांगितली. ही फार सुख देणारी आहे. जनका-प्रमाणें विचार करणाराला ज्ञान आपोआप होतें. ‘ हा मी ’ ही

त्र सपली म्हणजे आत्मप्रकाश आपोआप पसरतो. 'हा मी' हा संकोच ला कीं, अनंत भुवनांस व्यापणारा विस्तार उत्पन्न होतो. जनकानें जशी हंकारवासना सोडली तशी तूंही सोड. अहंभाव हेंच महा तम आहे. ास्तव त्याला घालविलें म्हणजे प्रकाश पसरतो. मी नाहीं, व माझा वेषय, असें हें सर्व जगही नाहीं; तर त्या दोघांचा साक्षी मात्र आहे, अशी ावना केली म्हणजे मन शांत होतें व तें विषयांमध्यें निमग्न होत नाहीं. ाग व द्वेष हेंच मनाचें बंधन आहे. यास्तव तू इष्ट वस्तूंविषयीं राग व अनिष्टाचा द्वेष करूं नकोस. कारण त्याचा क्षय झाल्यावाचून चित्तामध्यें समतेचा उदय होणार नाहीं. ही प्रशस्त वस्तु आहे व ही अप्रशस्त आहे, अशी कल्पना केली कीं, समता नाहींशी झाली. कारण युक्त व अयुक्त असा द्वैधीभाव जेथें आला तेथें वैराग्यानें प्रकाशित होणारी समता व स्वस्थता कशी रहाणार ! निराशता, निर्भयता, नित्यता, समता, ज्ञता, निष्क्रियता, सौम्यता, निर्विकल्पता, संतोष, मैत्री, मति, तुष्टि, मृदुता, मृदुभाषिता इत्यादि सर्व पवित्र भाव वासनारहित व रागद्वेषशून्य ज्ञान्याच्या ठायीं रहातात.

रामा, निकृष्ट विषयांकडे धावणाऱ्या मनाला मागें परतवावें. बाह्य विषयांच्या ठायीं आत्मत्व-भ्रांति न होण्याचा उपाय त्यांचा त्याग करणें, हाच आहे व आंतर विषयाच्या ठिकाणची आत्मभ्रांति जाण्याकरितां शरीरानें जाणें, येणें, बसणें, बोलणें इत्यादि क्रिया करीत असतांनाही विचार करावा. पूर्वोक्त प्रज्ञारूपी कातरीनें वासनारूपी जाळें कातरून सोडावें. संसारवृक्षाचें मूळ उपटून टाकावें. कुऱ्हाडीनें जसा वृक्ष तोडतात त्याप्रमाणें मनानेंच मनाला तोडावें. सर्व विसरून जावें. म्हणजे पुनः मनाचा उदय होत नाहीं. वासनाक्षयरूप विस्मरण झालें असतां पुनः अविद्यासंज्ञक मोह उद्भवत नाहीं व मोहाच्या अभावीं संसाराचा उदय होत नाहीं. कोणत्याही दशेंत हें सर्व असत् आहे ही भावना सोडूं नये. चित्तांत स्थिर समत ठेवून तूं प्राप्त कार्य कर व अप्राप्ताचा विचार करूं नको. जसा महेश्वर शुद्ध चैतन्यदृष्ट्या अष्टमूर्तिरहित असून जगत्कर्ता या दृष्टीनें पृथ्वी-जळ इत्यादि अष्टमूर्तींनी युक्त असतो त्याप्रमाणें तूंही कर्ता व अकर्ता हो. रामा, तूंच वेत्ता, अज, आत्मा व महेश्वर आहेस. आपल्या स्वभावापासून च्युत न होतांच तूं हें सर्व विस्तारलें आहेस. दुसऱ्या कोणी नव्हे. असें जर

आहे तर मला हर्ष-विषाद कसा होतो, असें विचारशील तर सांगतों. जो परमार्थ सन्मात्राच्या भावनेनें इतर सर्व पदार्थांविषयींची भावना सोडतो तो हर्ष-विषादादि दोषांनीं दूषित होत नाहीं. राग-द्वेषरहित व वासना-शून्य पुरुष मुक्त आहे. तो जें करतो, खातो, देतो, मारतो त्यांतील कशाच्याँही योगानें सुखी किंवा दुःखी होत नाहीं. हें माझें कर्तव्य मला अवश्य केलें पाहिजे, असें समजून व त्याविषयींची इष्ट-अनिष्टभावना सोडून जो कार्यामध्यें प्रवृत्त होतो तो कोठेंच निमग्न होत नाहीं. हें सर्व चित्सत्तामात्र आहे, अशा निश्चयानें युक्त असलेलें मन भोगाभिमान सोडून शांत होतें. वनामध्यें मासाच्या इच्छेनें मांजर सिंहाच्या मागून जसें लपत लपत जात असतें त्याप्रमाणें स्वभावतःच जड मन चित्-तत्त्वाच्या मागून धावत असतें. सिंहाच्या वीर्यानें प्राप्त झालेलें मांस त्याचा अनुचर जसा खातो त्याप्रमाणें चित्-च्या वीर्यानें प्राप्त झालेल्या दृश्याच्या ठायीं मन आसक्त होतें. साराश असें हें असत् मन चित्च्या प्रसादानें जिवत रहातें. तें अद्वितीय आत्म्याला विसरून जगाच्या आकाराची भावना करतें. म्हणजे जगदाकार होऊन जिवंत रहातें व त्याला जेव्हा आत्मस्मृति होते तेव्हा तें मनस्त्वाचा त्याग करतें. शवासारख्या जड मनाची प्रकाशशक्ति व स्पंदशक्तिही चित्-च्या अधीन असते. म्हणूनच चित्च्या ठिकाणची स्पंदकल्पना म्हणजे मनच होय, असें विद्वान् म्हणतात. स्पंदशक्तीचा जो विलास तेंच चित्त, चित्तवृत्ती व विषय होत. यास्तव मी चित् आहें, असें जो जाणतो तो शुद्ध चिन्मात्रच होतो. अर्थात् विषयरहित चित् हेंच सनातन ब्रह्म होय आणि विषययुक्त चित् हीच त्रिपुटीरूप कलना. कल-नाच मननामुळें मन होते. आत्म्याला विसरून कलनाच चित् होते व जडासारखी व्यवहार करूं लागते. तात्पर्य चित्च कलना होऊन कलनाच मागच्या अनुभूत विषयाच्या स्मरणानें चित्त व भावि विषयाकार कल्पनेनें, संकल्प व विकल्प याच्या द्वारा, मन होतें. याप्रमाणें शुद्ध चिति आपल्या मायाशक्तिवशात् जगद्भावास प्राप्त झाली आहे. गुरु, शास्त्र व आत्मविचार याच्या योगानें हें तत्त्व जोंवर कळत नाही तोंवर वास्तविक पूर्णानंदाद्वयरूप ज्ञात होत नाहीं. यास्तव शास्त्रविचार, तीव्र वैराग्य व इंद्रियांचा निग्रह यांच्या योगानें जडाकार कलनारूप अवस्थात्रय स्वप्ना-पासून चित्-त्व निवृत्त करावें. शास्त्रजन्य ज्ञान व शमादि साधनें यांच्या

योगानें कोणत्याही प्राण्याची कलना जाग्रत् झाली म्हणजे ती ब्रह्मतेस प्राप्त होते. पण विज्ञान व शम यांच्या योगानें तिला जागें न केल्यास जगत् तसेंच भ्रमण करीत रहातें. विषयासक्ति हेंच मद्य. त्याच्या योगानें मत्त होऊन विषयरूपी खड्डयांत लोळत पडलेल्या व आत्म्याच्या अज्ञानानें निजलेल्या कलनेस जागें करावें. कलना जर निजली आहे तर जग जागें कसे असतें, म्हणून म्हणशील तर सागतों. जग वस्तुतः जागें नसतेंच. जगाचा व्यवहार हा स्वप्नव्यहाराप्रमाणें आहे. विषयाशाचा त्याग केला असता राहिलेली कलनाच आत्मा आहे, असें वर म्हटले आहे. पण त्यावरून वृत्तिज्ञानच आत्मा आहे असें तू समजूं नकोस. तर चित्तवृत्तिरूप कलनेच्याही आत असलेली साक्षिरूप शुद्ध चिति आत्मा आहे, असे जाण. कारण कलना त्या सर्वसाक्षी परमदृष्टीनें व्याप्त झाली तरच आपला विषय व्यक्त करूं शकते. त्यावाचून नाहीं.

**श्रीराम**—गुरुवर्य, चिति जर सर्व साक्षिणी आहे तर ती अतःकरणाचेच तेवढे धर्म का जाणते जगातील सर्व धर्मास का जाणत नाहीं ?

**श्रीवसिष्ठ**—नित्यबोध-स्वभाव अशी साक्षि चित् सर्व व्यापी जरी आहे तरी प्राण्यानीं आपल्या कल्पनेनें तिला आपापल्या अतःकरणापुरतीच निराळी केली आहे. त्यामुळे ती अतःकरणादिकासच जाणते. वृत्तिरूप कलना विवेक केला असता पाषाणासारखी जड आहे, असें कळतें व ती जड-असल्यामुळेंच साक्षि-चेतनाकडून प्रबोधित होते. नैयायिकादिक या नित्य साक्षीस जाणत नाहींत. त्यामुळें परप्रकाश अनित्य ज्ञानच विषयास प्रकाशित करतें, असें ते म्हणतात. पण हें त्याचें म्हणणें अगदीं अयोग्य आहे. कारण दगडी पुतळीला कितीही जरी प्रेरणा केली तरी ती जशी नाचत नाहीं त्याप्रमाणें ही जड कलना स्वत. काहीं जाणत नाहीं. नित्य चित्चें सानिध्य नसल्यास अत करणवृत्त्यादि अचेतनाची विषयाकडे प्रवृत्ति होणेंच दुर्लभ आहे. कारण चित्रातील राजानीं घोर युद्ध केलेलें कोणीं पाहिलें किंवा ऐकलें तरी आहे का ? रक्तानें ज्याचीं अंगे भरलीं आहेत अशीं शवें कधीं पळतात का ? मनुष्यानीं केलेल्या कृत्रिम सूर्याच्या योगानें रात्रीं पडणारा काळोख कधीं नाहींसा झाला आहे का ? आकाशातील कल्पित उपवनांची छाया कोणाच्या उपयोगीं पडली आहे का ? नाहीं. त्याचप्रमाणें ही कलनाही स्वतः काहीं करूं शकत नाहीं. फार

काय, पण नित्य चिदात्म्याचा स्वीकार न केल्यास कलनादिकांच्या अध्यासाचीच सिद्धि होणार नाहीं. आपल्यालाच ठकविणाऱ्या अज्ञानीं स्पंदालाच मन बनविलें आहे. पण स्पंद ही अन्नमय कोशाच्या आत रहाणाऱ्या प्राणमय कोशरूप वायूची शक्ति आहे, असें तूं समज. ती प्राणशक्ति संकल्पापासून उठलेली आहे. वास्तव ज्याचा संकल्पच समूळ नष्ट झालेला असतो त्या योग्यांची विषयाकाररहित चित् म्हणजे पारमार्थिक प्रभाच होय. पण तीच जेव्हां हा मी व हें माझें या आकाराची होते तेव्हा स्पंद व चित् याचा ऐक्याध्यास होतो व अशारीरतीनें बनलेल्या जड–चित्–मिश्रित कलनेलाच जीव हें नाव प्राप्त होतें. कारण जीव म्हणजे प्राणधारण करणारा. या कलनेंत प्राणधारणशक्ति असते. बुद्धि, चित्त याही त्याच असत् संकल्पाच्या मिथ्या संज्ञा आहेत. कारण मन, मति, बुद्धि व शरीर यातील काही सत्य नसून एक आत्माच सत्य आहे आणि सदा सर्वदा असणारा तोच सर्व जग व कालक्रम आहे. तो आकाशाहूनही अधिक स्वच्छ असून, आहे व नाहीं असा तोच. कारण तो आपल्याला व दुसऱ्याना प्रकाशित करीत असल्यामुळें ‘आहे,’ आणि स्थूलता व रूपादि यानीं रहित असल्यामुळें ‘नाही.’ आत्म्याचा अनुभव स्वानुभवानेच येतो. त्याच्या ठायीं स्थौल्यादि धर्म नसल्यामुळें तो बाह्य इंद्रियाचा विषय होत नाहीं, असें जरी मानलें तरी सूक्ष्मार्थाचा निर्णय करणाऱ्या मनाला त्याच्या ठिकाणी प्रवृत्त होण्यास कोणता प्रतिबंध आहे? म्हणून विचारशील तर सांगतों. त्याच्या दर्शनसमयीं मन जर स्वतः नष्ट झाले नसतें तर तें त्याच्या ठिकाणीं प्रवृत्त झाले असतें. पण तें स्वतः अविद्येचे कार्य असल्यामुळें आत्मदर्शनक्षणींच अविद्येसह क्षीण होतें. म्हणून ते त्याला पाहू शकत नाहीं. उजेड आला कीं अंधकार कसा रहाणार? तर मग मनाची प्रवृत्ति कोठें होते? म्हणून विचारशील तर तेही सागतो. ज्या दशेत अति स्वच्छ आत्मरूपसंवित् संकल्पोत्पन्न बाह्य विषयास प्रकाशित करूं लागते त्या दशेंत आत्म्याचें विस्मरण व चित्तजन्य मिथ्या पदार्थाचें स्मरण होते. अर्थात् अशा वेळीं अनात्म पदार्थाचे ठायी त्याची प्रवृत्ति होते. परात्पर पुरुषानें संकल्पमय होणें हेच चित्त होय. त्यामुळे संकल्प सोडणें हाच चित्ताभावाचा उपाय आहे आणि अशा चित्ताभावामुळेंच मोक्ष होतो. म्हणजे आत्मदर्शन मनाच्या उत्पत्तीलाच प्रतिकूल आहे. चित्ताचा जन्म हेंच संसाराचें बीज

आहे. संकल्पोन्मुख झालेल्या आत्म्याच्या शुद्ध स्वरूपांत थोडेसें मालिन्य येणें हाच चित्ताचा जन्म होय. निर्विकल्प अवस्थेपासून च्युत झालेल्या चित्‌ची संकल्प-कलंकित सत्ता म्हणजेच कलना होय. स्त्रीच्या संकल्पामुळें पुरुषाच्या शरीरावर रोमांचादि भाव जसा व्यक्त होतो त्याप्रमाणें संकल्पामुळें जगाच्या उत्पत्तीकरितां आत्म्यापासून मन प्रकट होतें.

रामा, मन व प्राण यांचा हा असा निकट संबंध असल्यामुळें प्राणशक्तीचा निरोध केला म्हणजे मन आपोआप लीन होतें. कारण पदार्थ नष्ट झाला ह्मणजे आरशातील त्याचें प्रतिबिंबही नष्ट होतें, हें प्रसिद्धच आहे. प्रतिबिंब हें आरशाचेंच जसें कल्पित रूप तसें मन हें प्राणाचें कल्पितरूप आहे. तें कशावरून म्हणून विचारशील तर सांगतों. जिवंत पुरुष दूर देशाचा मानस अनुभव हृदयांत घेतो. पण देशांतरसंबंध स्पंदावाचून व वेदनांश चित्-वाचून होणें अशक्य असल्यामुळें म्हणून मन हें प्राणामध्यें स्पंद व वेदन ( ज्ञान ) या दोन्ही शक्ती अति अवश्य आहेत. प्राणाचेंच रूप आहे, असें आम्ही म्हणतों.

असो; प्राणनिरोधाच्या योगानें मनोनिरोध होतो, हें सिद्ध करावयाचे असल्यामुळें मी एवढा वेळ त्याचें ऐक्य दाखविलें. आता त्याच्या निरोधाचा उपाय सांगतों. वैराग्य, प्राणायामाचा अभ्यास, समाधि, बाह्य विषयाकार होणें, हें मनाचें व्यसन घालविणें व परमार्थ ज्ञान या उपायांच्या योगानें प्राणाचा निरोध करिता येतो. एकादे वेळीं पाषाणामध्येंही चलन व ज्वलन-शक्ति संभवेल पण मनाचे ठायीं स्पंद व ज्ञानशक्ति कालत्रयीं संभवणार नाहीं. स्पंद ही प्राणवायूची शक्ति आहे. ती चलद्रूप व जड आहे. सर्वग व स्वच्छ चिच्छक्ति (वेदन-ज्ञान-शक्ति) आत्म्याची आहे. चिच्छक्ति व स्पंदशक्ति यांचा संबंध मनाची कल्पना करवितो. मिथ्या ज्ञान हेंच मन होय. तीच अविद्या व माया होय. संसारादि विष देणारें तें महा अज्ञान आहे. चिच्छक्ति व स्पंदशक्ति यांच्या संबंधाविषयींचें कल्पनारूप निमित्त न झाल्यास सर्व संसारभ्रांति नाहींशीच झाली आहे, असें जाणावें. वायूची स्पंदशक्ति चैतन्याकडून जेव्हा चेतित केली जाते तेव्हां ती विषययुक्त चित्‌च अंतःसंकल्पामुळें चित्ततेस प्राप्त होते. चित्‌ची ही चित्तता मिथ्या कल्पित आहे. जिच्यामध्यें स्पंदरूप नाहीं अशी चित्‌च परमार्थ होय. तेव्हा अशी ही अखंड व पूर्ण चित्-स्व-भावता दुसऱ्या कोणा-

डून बाधित होणार ! अखंडशक्तिमान् इंद्राशीं कोण युद्ध करणार ? कारण चित्‌च्या विरोधी असलेलें सर्व अचित् असणार, हें उघड आहे. त्यामुळें चित् व अचित् परस्पर संबंधी होऊं शकत नाहींत. संबंधी पदार्थांचाच अभाव असल्यामुळें संबंधाचाही अभाव आहे. तेव्हां मनाची वास्तविक सिद्धि कशी होणार ? तात्पर्य चित् व स्पद हे दोन भिन्न पदार्थ आहेत, असें मानल्यास मन मिथ्या आहे, असेंच म्हणावें लागतें.

त्या दोघाची एकता आहे असें मानलें तरी मनाची सिद्धि होत नाहीं. कारण चित् व स्पंद यांचें ऐक्य झाल्यावर तें राहणार कोठें व कसें ? यास्तव रामा, हें दुष्ट चित्त नाहींच, असें तत्त्वतः जाणणें हाच मनोनाश होय. करिता आपल्याच अनर्थाकरितां त्याची व्यर्थ कल्पना करू नकोस. तें व्यर्थ उद्भवलें आहे, परमार्थतः नव्हे. संकल्प न करणें यासारखें मनोनाशाला दुसरें औषध नाहीं. हें मृगजळ अयथार्थ ज्ञानानें उत्पन्न झालें आहे. जड व निःस्वरूप असल्यामुळें मन सदाच मेलेलें आहे. पण मेलेल्या मनाकडूनच सर्व जीव मारले जातात, हा केवढा चमत्कार आहे ! ज्याला आत्मा नाहीं, देह नाहीं, आधार नाहीं व आकृति नाहीं त्याच्याकडून हें सर्व खालें जातें. सर्व प्रकारच्या सामग्रीनें हीन असलेल्या मनाकडूनही जो मारला जातो त्या मूर्खाचें डोकें कमळाच्या पाकळीनेंही फुटेल ! जड, अध व मूक अशा मनाकडूनही जो मारला जातो तो महा मूर्ख चंद्रकिरणांनींही जळून जाईलसे वाटतें ! हें अविद्यमान मन महा शूर लोकांनाही जिंकतें. विवेकी जन महा प्रयत्नाने सपादन केलेल्या वैराग्यादि साधनांनीं व ध्यान-समाधि इत्यादि उपायांनीं या अविद्यमान मनाला मारतात, असें म्हणणेंही व्यर्थ आहे. कारण जें विद्यमानच नाहीं त्याला कोण कसा मारणार ? मिथ्या संकल्पानें झालेलें, मिथ्या अवस्थित असलेलें व शोधूं लागल्यास न दिसणारें अशा त्या मनामध्यें पराभव करण्याचें सामर्थ्य कसें असणार ? अहाहा ! अति चंचल मनाकडूनही प्राणिवर्ग पराभूत केला जावा, ही खरोखर महामायावी मयालाही निर्माण करणारी विचित्र माया आहे. ज्याच्यामध्यें मूर्खता असते तो पुरुष सर्व आपत्तींचें आश्रयस्थान होतो. याविषयीं मतभेद होणें शक्यच नाहीं. ही सृष्टिही मूर्खतेचा ( अज्ञानाचा ) विलास आहे. तेव्हां तिच्यामध्यें सर्व आपत्ती जर भरलेल्या असल्या तर

त्यात नवल तें कोणते ? पण ती याप्रमाणें मूर्खतेमुळें पीडली जात असतानाही हा जीव असन्मार्गाच्या अनुवर्तनानें तिला अधिकाधिक दुःखी करतो, हें पाहून फार वाईट वाटतें. कारण स्वाभाविक अज्ञानानें पीडलेल्या तिला सुज्ञ जीवानें आणखीं पीडणें, हें अगदीं अनुचित होय. ही मौर्ख्य-मयी सृष्टि फारच नाजूक आहे, असें मला वाटते. कारण नुस्त्या विचारानेंच ती नाहींशी होते. पाणी जसें तरंगप्रवाहाच्या द्वारा अगदीं विरल होऊन कणशः क्षीण होतें, त्याप्रमाणें ही ज्ञानानें कणशः क्षीण होते. डोळ्यांत घालावयाच्या काजळाप्रमाणें तिचें चूर्ण होते. यास्तव रामा, अशा या अति नाजुक सृष्टीला व असत् मनाला जो वश करूं शकत नाहीं तो अध्यात्मशास्त्राचा अधिकारी नव्हे. अशा पुरुषाला उपदेश करूं नये. कारण त्याची प्रज्ञा बाह्य विषयामध्येंच आसक्त होऊन त्यांच्या प्राप्तीनेंच आपल्याला कृतकृत्य समजते. ती मनोनिग्रहास उद्युक्त झालेली नसते. तिचा कल आतल्या आत्मस्वरूपाकडे नसतो. त्यामुळे ती सूक्ष्म विषयाचा विचार करण्यास समर्थ नसते. त्यामुळेंच ती वीण्याच्या तारेच्या सूक्ष्म ध्वनीलाही भिते. तिला निजलेल्या बंधूचीही भीति वाटते. असत् प्रतिध्वनि ऐकूनही तिला पळावें लागतें. फार काय सांगावें, पण हिला तिच्या मनानेंही भिवविलें आहे. पण रामा, ही दुष्ट प्रज्ञा जरी अशी भित्री असली तरी तिच्या अधीन होऊन पुरुषानें मोहित होणे सर्वथा युक्त नव्हे १३.

**सर्ग १४**—नानायोनींत दुःख भोगणाऱ्या व उपदेशास योग्य नसलेल्या लोकांची उपेक्षा मनाच्या मार्जनाचा उपाय

**श्रीवसिष्ठ**—रामा, संसारसागराच्या असार कल्लोळांनीं वाहून नेणाऱ्या ज्या जनसमूहानें मतीचें मूकत्व संपादिलें आहे त्याच्या करिता या शास्त्रात मी आता आत्मलाभ करून देणाऱ्या विचार-उक्ती सांगतों. जो नेत्रयुक्त असूनही दूरदृष्टि नसतो त्याला ह्या सांगणें अगदीं अनुचित होय. कारण पीनसरोगानें ज्याचें नाक वास घेण्यास अयोग्य झालेलें असते त्याला सुगंधाच्या परीक्षणसमयीं कोणी परीक्षक करीत नाहींत. मद्य पिऊन मत्त झालेल्या पुरुषाला कोणीही धर्मनिर्णायक समजत नाहीत. श्मशानातील शवाला कोणी कधीं काहीं सांगत नसतो. हृदयाबिळामध्यें बसलेल्या मूक व अंध मनः-सर्पालाही जो मूर्ख जिंकूं शकत नाहीं त्याला उपदेश काय करावयाचा आहे? वस्तुतः जें नाहींच तें मन जिंकलेंच आहे, असें समज.

ा शिळा विद्यमानच नसते तिला आपल्यापासून दूर कोठें फेंकणार ! I असत् मनालाही जिंकूं शकत नाहीं तो विष न खातांही विषमूर्च्छेनें मरेल त काहीं सशय नाहीं. 'वस्तुतः जें नाहींच,' असें जें वरच्या वाक्यांत ्टलें आहे तेच आता पूर्वोक्त युक्तींहून निराळ्याच युक्तींनीं स्पष्ट करितों, ्ा. मनाचें प्रयोजन काय ? ते हवें कशाला ? विषयाच्या ज्ञानाकरितां ां, स्पदाकरिता कीं, ज्ञान-कर्मेंद्रियाकरिता ? विचार करून पाहिल्यास ातील एकाच्याही प्रयोजनाकरिता त्याची गरज नाहीं. कारण प्राणानीं ्याना प्रेरणा केली आहे अशा इंद्रियानीं जवळ आणलेल्या विषयाचें ज्ञान ाक्षी आत्म्याला होणें शक्य आहे. मग मनाची आणखी अधिक कल्पना ्रण्यात काय अर्थ आहे ? बरें सर्व शक्ती मनामध्येंच आहेत, असें ानून प्राण, इंद्रिये, चिदात्मा इत्यादि अनेक पदार्थांची कल्पनाच करूं ्ये म्हणून म्हणावे तर एकच वस्तु परस्पर विरोधी क्रिया कशी करील ? ्राणाची स्पदन ही शक्ति आहे, परमात्म्याची ज्ञानही शक्ति आहे व ्द्रियाची विषयाशी संबद्ध होणे ही शक्ति आहे. तेव्हा या भिन्न भिन्न ्शक्ती एका जड मनामध्ये कशा रहाणार ? तस्मात् सर्वशक्तिमान् आत्म्या- ्चेच हे सर्व औपाधिक किरण आहेत, असें मानून मन म्हणून पृथक् वस्तु ्नाहीं, असें समजणेंच अधिक प्रशस्त होय.

जीव हा चेतन अधिष्ठाता असून इंद्रियरूपी घोड्याचें नियमन कर- ्याकरिता त्याला चित्तरूपी लगामाची गरज आहे, म्हणून म्हणशील तर ्यानें या जगाला आधळें करून सोडलें आहे तो जीव म्हणजे काय ? व तू चित्त कशाला म्हणतोस ? ते साग पाहूं. जीव हा आत्म्याहून भिन्न दुसरा चेतन पदार्थ आहे, म्हणून म्हणशील तर एका आत्म्यावाचून दुसरा द्रष्टा, श्रोता, बोद्धा नाहीं, असे श्रुतीने सागितलें आहे व विद्वानाचा अनुभवही तसाच आहे. बरें तो अचेतन आहे म्हणून म्हणावें तर त्याच्यामध्यें स्वतंत्र शक्ति कोठची असणार ? कारण अचेतन वस्तु नेहमीं चेतनाकरितां असते, असा नियम आहे. त्यामुळें जीव जड आहे, असें मानल्यास इंद्रियादिकापेक्षां त्याच्यामध्यें काहींच विशेष नाहीं, असें होणार. मग त्याच्यामध्यें अधिष्ठाता होण्याचे सामर्थ्य कोठचें ? यास्तव जीव व त्याचें इंद्रियनियमनाचें साधन चित्त हीं दोन्हीं असत् आहेत, असें तूं जाण.

रामा, स्वकल्पित मनानें ज्यांच्या दृष्टींना जाकून सोडलें आहे त्यांची दुःखपरंपरा पाहून माझी मति करुणेनें व्याकुळ होते. पण पुष्कळ विचार करूनही त्यांच्या दुःखाच्या नाशाचा उपाय सुचत नाहीं. कारण जें दुःख कांहीं निमित्तानें उद्भवलेलें असतें त्याच्या निमित्ताचें निवारण केलें असतां तें आपोआप क्षीण होतें. पण अज्ञांचें हें मनामुळें उद्भवलेलें दुःख निमित्तावाचूनच आहे. म्हणून त्याचा क्षय करितां येत नाहीं. अथवा गर्दभांप्रमाणें या प्राकृतांचा जन्म दुःख भोगण्याकरितांच झालेला असतो. म्हणून त्याच्याकरितां अथवा त्याच्या सारख्या दुसऱ्याही असंख्य मूढयोनीं-करिता दुःखी होणें मुळींच उचित नसून आपल्या निरतिशय शांती-करिता त्याच्या विषयीं उपेक्षा बुद्धि करणेंच अधिक श्रेयस्कर आहे. पापी-जन, पाण्यावरील बुडबुड्याप्रमाणे, विनाश पावण्याकरितांच उत्पन्न होत असतात. सर्व सृष्टि दुःखी जीवानींच भरलेली असल्यामुळें त्याच्याविषयीं रडत बसून कोणाचाही निभाव लागणार नाहीं. रामा, प्रत्येक देशातील कसायीखान्यात प्रतिदिवशीं किती पशू मरतात याचा थोडासा विचार तर कर पाहूं! त्यातील प्रत्येकाविषयीं दुःख करीत बसल्यास आमची काय दशा होईल बरें? मनुष्यानीं मुद्दाम आपल्या जिह्वेच्या तृप्तीकरिता केलेल्या हिंसेचा हा एकच प्रकार मी येथें सांगितला आहे. पण अशाप्रकारच्या हिंसा प्रतिक्षणीं किती होतात याची काहीं कल्पना करितां येत नाहीं. भूमींतून उद्भवणाऱ्या—किडे, मुग्या, माशा, चिलटें, पिसा—इत्यादि असंख्य जीवास वायु क्षणोक्षणीं मारतो. प्रत्येक दिशेंतील अरण्यांत व डोंगराळ प्रदेशात भिल्ल, माग, बेरड इत्यादि क्रूर मानव प्रत्यहीं लक्षावधि पशूंचे प्राण घतात. जलातील मोठे जलचरप्राणी असंख्य लहान जलचरांस निर्दयपणें खातात. लिखाना माशा खातात. माशाना डोंगळे, पाली व एका जातीचे कोळी—वाघ खातात. त्यांना चिमण्या, पाली, व दुसरे किडे आपल्या पोटांत साठवितात. किड्याना बेडुक गिळतात. बेडकांना साप गट्ट करितात. सापाना घारी, गिधाडें इत्यादि पक्षी पटकन उचलून नेतात. मुंगूसहीं त्याचे तुकडे उडवितें. मुंगसास मांजर खातें. मांजरास कुतरा धरतो. कुत्र्यांना आस्वलें मारतात. आस्वलांस वाघ खातात. वाघांना सिंह पराभूत करितात. सिंहांस शरभ चट्ट करतात. गर्जना करणारा मेघ वरून गेला असतां शरभ मरतात. मेघांना वायू नाहींसे करितात. वायू

ताकडून पराभूत होतात. वज्र पर्वतांचा चूर उडवितें. तें वज्र इंद्राच्या धीन असतें. इंद्राला विष्णु त्रैलोक्याचा अधिपति करतो व तोच विष्णु रे शरीरांत जीव होऊन मरेपर्यंत दुःख भोगतो. मोठमोठ्या शरीरांनीं क व विद्या आयुष्यें इत्यादिकांनीं संपन्न असलेल्या प्राण्यानाही उवा, सा, डास, ढेकूण, गोचिड्या, व्याघ्र, सिंह इत्यादि खातात. सारांश प्रमाणें हें प्राणिजंगल आधिभौतिक दुःखांनीं छिन्न–भिन्न होऊन येथें ाची गणनाही केली नाहीं अशा आध्यात्मिक व आधिदैविक दुःखांनीं ष्टप्राय झालें आहे. प्राणी एकमेकाचा मळ याप्रमाणें सतत खातात थवा उत्तरकालाकरितां त्याचें रक्षण करितात. नानाप्रकारच्या भूतजाती कसारख्या नाश पावत असून त्या सतत उत्पन्नही होत असतात.

जलाच्या कोशामध्यें मत्स्य, मकर इत्यादि जलचर, भूमींत विंचु, साप िडे इत्यादि अंतरिक्षात आकाशपक्षी या नावाचे क्षुद्र पक्षी, वनांमध्यें ग, व्याघ्र, सिंह इत्यादि पशू, प्राण्याच्या अंगावर उवा वगैरे, काष्टामध्यें णा इत्यादि लांकडे पोखरणारे किडे, पाषाणामध्यें बेडुक, किडे इत्यादि, विष्ठेमध्येंही नानाप्रकारचे किडे प्रतिक्षणीं अनंत उत्पन्न होत असतात. व्हा आतां या सतत होणाऱ्या उत्पत्ति–नाशाविषयीं कारुणिक पुरुषानें सावें कीं रडावें ? उत्पत्ति व विनाश यानीं भरलेल्या या संसाराविषयीं ातुष्ट होणें युक्त नव्हे व दुःखी होणेंही प्रशस्त नव्हे. वृक्षांच्या पानाप्रमाणें ूताच्या असंख्य परंपरा पुनः पुनः होऊन पुनः पुनः मरत असतात. ाण वस्तुस्थिति अशी असतांना जो मूढ मी दयावान् आहें, असा अभि- ाान धरून मूर्खांच्या दुःखाचे परिमार्जन करण्यास प्रवृत्त होतो तो आपल्या डोक्यावरील छत्रीच्या योगानें सर्व आकाशांतील उन्हाचें निवारण करण्यासच तयार होतो, असें मी समजतों. यास्तव राघवा, तिर्यक् प्राण्या- सारख्या प्राकृतांना उपदेश करूं नये. कारण वनामध्यें वाळलेल्या झाडा- पुढें बसून कथा सांगण्यांत कोणता लाभ आहे ! ज्यांचें मन विषयांमध्यें विस्तार पावलें आहे असे मानव व पशू यांच्यामध्यें अंतर तें कोणतें ? पशूंना जसे लोक दोरीनें ओढतात त्याप्रमाणें विषयी जन मनाकडून खेंचले जातात. आपल्याच चित्तरूपी चिखलांत रुतलेल्या व स्वनाशा- करितांच कर्मांचा आरंभ केलेल्या मूर्खांच्या आपत्ती पाहून दगडही रडतील. मग सचेतन प्राण्यांची गोष्ट कशाला हवी !

ज्यांनीं चित्ताला जिंकलेलें नसतें त्यांना सर्व दिशा दुःखद झालेल्या असतात. त्यामुळें भूमीवरील धूळ सर्वथा झाडणें जसें अशक्य त्याप्रमाणें त्यांच्या दुःखाचें परिमार्जन करणें अशक्य आहे. पण हे रघुनंदना, ज्यानीं आपल्या चित्ताचें चांगलें नियमन केलें आहे त्याच्या दुःखाच्या निवारणाविषयीं आत्मज्ञानें अवश्य विचार करावा.

असो; हे राघवा, याप्रमाणें मनाचा वस्तुतः अभाव आहे. यास्तव त्याची कल्पना करूं नको. या कल्पित मनामुळेंच तुझा सर्व घात होत आहे. जोंपर्यंत तुला आत्मतत्त्वाचें भान नव्हतें तोपर्यंत तुझा मनोव्याघ्र गुरगुरत होता, तें ठीकच आहे. पण आता तुला आत्मतत्त्वाचें स्मरण झालें आहे व संकल्पामुळें मन वृद्धि पावतें, हेंही तुला कळलें आहे. यास्तव आतां यापुढे त्याला जिवंत ठेवूं नकोस. या दृश्याचा आश्रय केलास कीं, तूं सचित्त व बद्ध झालास म्हणून समज. तूं दृश्याला जर सोडलेंस तर तत्काल अचित्त व मुक्त होशील. या त्रिगुणात्मक मायामय गुणसंघाचा आश्रय तू बंधाकरिताच केला आहेस, यास्तव त्याला सोड. आंतर व बाह्य दृश्य नाहींच, असें ध्यान करीत तू पर्वताप्रमाणें अचल रहा. तुझा आत्मा अति स्वच्छ आहे. यास्तव अहं व हें ही द्वित्वमयी कल्पना सर्वथा सोडून बाकी तूं जसा रहाशील तसाच सुस्थिर हो. अहं हा द्रष्टा व इद हें दृश्य याचा त्याग केला म्हणजे साक्षि दृक् रहाते. त्या आत्म्याचें तूं ध्यान कर. भोज्य व भोक्ता यास सोडून केवल स्वाद घेणाऱ्या शक्तीचें ध्यान करीत रहा. भव-भावनारहित व भावाभावदशाशून्य अशा आत्म्याचीच भावना करीत तूं आत्मस्थ हो. तू आत्मसत्तेला विसरून विषयाची जेव्हां भावना करतोस तेव्हा अति दुःखद चित्ततेस प्राप्त होतोस. स्वरूपज्ञान-युक्तीनें या चित्तता-नामक शृंखलेस तोडून हे महावीरा, तूं चित्तबिळातून स्वात्मसिंहाला सोडीव. आत्म्याहून भिन्न पदार्थाची कल्पना करणें म्हणजे महादुःखात पडणेच आहे. हा सर्व आत्माच आहे, अशी संविद् आंतल्या आत उत्पन्न झाली म्हणजे त्रिपुटी पार नाहींशी होते. मी आत्मा जीव आहें असें समजलें कीं चित्ताचा उदय झाला व त्यामुळें अनादि-अनंत दुःख बोडक्यावर बसलेंच. पण मी ब्रह्म आहें व जीवनामक ब्रह्मेतर सत्ता सत्य नव्हेत, असा स्थिर निश्चय झाला कीं, चित्ताचा उपशम व परम सुख आपोआप होतें. मनःसर्प शरीरामध्यें जोंवर स्थित आहे तोंवर महद्भय असतें व त्याला

योगाभ्यासानें प्रकदा हुसकून लाविलें म्हणजे भयाला अवकाशच रहात नाहीं. रामा, तूं चित्तांत केवल भ्रांतीनें उद्भवलेल्या अहंकाररूपी महा बलाढ्य वेताळास यथार्थ ज्ञान-मंत्रानें मार. देहगृहांतून भयंकर चित्तपक्ष गेला म्हणजे मग तुला कशाचेंही भय नाहीं. मी निष्काम व सुखसाधनोपार्जनशून्य आहें, असें तुला वाटूं लागलें म्हणजे तुझी चित्तसत्ता गळली आहे असें जाण व नंतर तसाच शांत रहा १४.

**सर्ग १५**—तृष्णेचें वर्णन.

**श्रीवसिष्ठ**—आत्मा या चित्तसत्तेचे अनुकरण करूं लागला म्हणजे तो आपल्या ब्रह्मात्मभावास विसरतो व चित्तानें कल्पिलेला देहादिच मी आहें, असें तो जाणतो आणि विषयाविषयींच्या राग-द्वेष-वासनास धारण करतो. नंतर विषलतेसारखी मरण-मूर्च्छादि अनेक भ्रम देणारी तृष्णा त्या कलना-मल धारण करणाऱ्या आत्म्यास मूर्च्छित करते. तिच्यापासून सुखलेशही मिळत नाहीं. तृष्णा जेव्हा जेव्हां उदय पावते, तेव्हा तेव्हा ती जीवाला महा मोहात पाडते. कल्पाग्नीच्या ज्वालाचा दाह सहन करण्यास हरि-हरादि समर्थ आहेत. पण तृष्णाग्नीच्या ज्वाला कोणाच्यानेंही सहन करवत नाहींत. तृष्णा ही घोर सुरी आहे. सर्व दु:खें तृष्णावेलीचीं फळें आहेत. मानवाच्या मनोरूपी बिळात रहाणारी ही जंगली कुत्री कोणाच्या दृष्टीं न पडताच शरीरातील हाडें, मांस व रक्त खाते ती क्षणात उदय पावते व क्षणात नष्ट होते तृष्णेनें ज्याला जर्जर करून सोडलें आहे तो दीन, निरुत्साह व निर्बल होऊन रहातो, तो अति नीच अवस्थेस पोंचतो. मोहित होतो व रडत पडतो. ज्याच्या हृदयरध्रात तृष्णा नावाची काळी नागीण नसते त्या पुरुषाचे प्राणवायू स्वस्थ असतात. तृष्णानामक कृष्ण पक्ष संपला कीं पुण्यकारक शुक्ल पक्ष सुरू होतो. तृष्णा नावाच्या किडक्या वेलीनें ज्या पुरुषवृक्षाला दूषित केलेलें नसतें त्याच्यावर सदा पुण्यपुष्पे फुलतात. विवेकदृष्टिहीन पुरुषाच्या चित्तारण्यात तृष्णानदी मोठ्या वेगानें वहाते. सूत्रयत्रात बांधलेल्या पक्ष्यांप्रमाणें तृष्णा या सर्व जनांस फिरविते, मारते व सोलते. धर्म-ज्ञानाच्या दया-विवेकादि सूक्ष्म अंकुरांनाही तृष्णाकुऱ्हाड तोडते. तृष्णेच्या मागें लागून जाणारा पुरुष एकाद्या पशूप्रमाणें खळग्यांत पडतो. हृदयांतील साक्षात् पिशाचीच अशी ही तृष्णा पुरुषाला जशी अंध करते तशी प्रौढ

जराही करीत नाहीं. या हृदयस्थ अमंगल तृष्णेनेंच भगवान् विष्णूला वामन केलें. हीच प्राण्यांस भटकावयास लावते. यास्तव या सर्पिणीच्या वाटेलाही जाऊं नये. तृष्णेच्या योगानेंच वायू एकसारखे वहातात, पर्वत उभे रहातात व धरा ( पृथ्वी ) धारण करते. तृष्णेनेंच त्रिभुवनास स्थिर केलें आहे. सर्व लोक-यात्रा तृष्णारूपी दोरींत ओंवलेली आहे. दोरीच्या पाशांतून सुटतां तरी येतें पण या तृष्णापाशांतून मोकळें होतां येत नाहीं. यास्तव राघवा, तू तृष्णा सोड. संकल्प सोडल्यानेंच तिचा क्षय होणें शक्य आहे. मन नाहीं हें तुला मी युक्तेंच सप्रमाण सांगितलें आहे. मग मनाच्या अभावीं तृष्णाप्रसक्ति कशी होणार? 'हा तूं' हा मी' हीच दुराशा मनांत धरूं नकोस. अनेक दुःखास प्रसवणारी अनात्मभावना तूं सोडलीस कीं, तुझी गणना ज्ञान्यामध्यें होऊं लागेल. अहंभावनामयी तृष्णेला सोडून हे कुशल रामा, तूं ब्रह्म हो १५.

**सर्ग १६**—ध्येय व ज्ञेय वासनात्याग. जीवन्मुक्त व विदेहमुक्त यांचे लक्षण.

**श्रीराम**—प्रभो, अहंकार-तृष्णेचें ग्रहण करूं नको, हें आपलें वचन स्वभावतःच गंभीर आहे. कारण मी अहंकाराला सोडलें कीं माझा देहही जाणार! मोठ्या विस्तृत खोडाकडून वृक्ष जसा धारण केला जातो त्याप्रमाणें अहंकाराकडून हा देह धारण केला गेला आहे. त्यामुळें अहंकाराचा क्षय झाला कीं, देहाचाही अवश्य क्षय होणार, हें ठरलेलेंच आहे. कारण करवतीनें मूळ कापल्यावर महावृक्ष उभा कसा रहाणार? यास्तव मी अहंकाराला सोडूं कसा व जिवंत राहूं कसा तें मला सांगा.

**श्रीवसिष्ठ**—कमलनयना, वासनात्याग दोन प्रकारचा सांगितला आहे. एक ज्ञेय व दुसरा ध्येय. त्यांतील ध्येय वासनात्यागाचें उपपादन प्रथम करतों. या देहेंद्रियादि व अन्नपानादि पदार्थांचा मी आहें, हे माझे जीवित आहेत, यांच्या वांचून मी कोणी नाहीं व माझ्यावांचून हे नाहींत, असा जीवाविषयीं आंतल्या आंत निश्चय करून मनासह त्याचें पृथक्करण केलें असतां मी चिदात्मा असून यांचा माझा वस्तुतः कांहीं संबंध नाहीं, असें समजणें व व्यवहारसमयीं त्याचेंच अनुसंधान करणें हा पहिला ध्येय वासनात्याग आहे. जीवन्मुक्तांच्या प्रारब्ध प्राप्त व्यवहारसमयीं या ध्येय-वासनात्यागाचाच विद्वान् लोक उपयोग करीत असतात. आतां समाधिसमयीं व विदेह कैवल्यावस्थेंत असणारा ज्ञानबाधित ज्ञेय वासनात्याग

म्हणजे काय, तें सांगतों. सर्व जग सम ब्रह्ममय आहे, असें साक्षात् जाणून व भूमिकांचा क्रमानें अभ्यास करून ज्या वासनात्यागानें पुरुष निर्मम, निरहंकार व निर्विकल्पसमाधिस्थ होतो अथवा प्रारब्धक्षय झाल्यामुळें सर्वथा देहत्याग करतो तो ज्ञेयवासनात्याग होय. अहंकारमयी वासना सोडून जो लोकसंग्रहोचित व्यवहार करीत रहातो तो ध्येयसंत्यागी जीवन्मुक्त होय. मूळ अज्ञानासह वासना सोडून जो शांत झालेला असतो म्हणजे वरील ज्ञान्याप्रमाणें व्यवहारही करीत नाहीं तर चिन्मात्रप्रधान होऊन रहातो, तो ज्ञेयसत्यागी होय. जनकादिक महात्मे व जीवन्मुक्त सुजन ध्येय-वासनात्याग करून व्यवहाररूपी लीला करीत रहातात. ज्ञेय-वासनात्याग केलेले महात्मे समाधि लावून अथवा देहत्याग करून ब्रह्मामध्यें रहातात. राघवा, हे दोन्ही त्याग एकसारखेच मुक्तपदीं स्थित आहेत. दोन्ही ब्रह्मतेस प्राप्त झाले आहेत व दोन्ही दुःखशून्य आहेत. त्यांतील ज्ञेयत्यागवान् पुरुष समाधीमध्यें आरूढ असतो. म्हणून त्याला युक्तमति म्हणतात. ध्येयत्यागवान् समाधीपासून व्युत्थान पावून व्यवहार करितो. यास्तव त्याला अयुक्तमति म्हणतात. पण ते दोघेही अविद्यामल-रहित ब्रह्मामध्येंच स्थित असतात. त्यांच्यामध्यें जर कांहीं विशेष असला तर तो एवढाच कीं, एकाचा देह व्यवहार करीत असतो व दुसऱ्याचा समाहित असतो. एक देहयुक्त असूनही मुक्त व निःशोक असतो व दुसरा देहाचाही त्याग करून मुक्त होतो. (आता व्यवहार करणाऱ्या मुक्ताचीं लक्षणें सागतात.—) त्याच्या त्याच्या योग्यसमयीं सुखें व दुःखें येऊं लागलीं असतां जो हृष्ट व म्लान होत नाहीं तो मुक्त होय. इष्ट वस्तूविषयीं राग ( प्रेम ) व अनिष्ट वस्तूविषयीं द्वेष ज्याच्यामध्यें नसतात, जो निद्रित असल्याप्रमाणें व्यवहार करितो, ज्याचे ग्राह्य व त्याज्य हे भाव पार नाहींसे झालेले असतात, अहं व मम ह्या कलना ज्याच्या क्षीण झालेल्या असतात व भय, क्रोध, कार्पण्य इत्यादि दृष्टींनीं जो मुक्त असतो तोच जीवन्मुक्त होय. जाग्रत्कालींही ज्याचें चित्त सुषुप्तीप्रमाणें वृत्तिशून्य असतें व पूर्ण चंद्राप्रमाणें ज्याचें मन सदा आह्लादसंपन्न असतें त्याला यालोकीं जीवन्मुक्त म्हणतात.

श्रीवाल्मीकि—मुनिवसिष्ठ इतकें सांगत आहेत तोंच दिवस मुख्य

व सभासद स्वस्थानीं जाऊन दुसऱ्या दिवशीं पुनः नेहमींप्रमाणें सभेमध्यें येऊन बसले ११. येथें अकरावा दिवस समाप्त झाला.

**सर्ग १७**—जीवन्मुक्त कोणत्या प्रकारच्या निश्चयांनीं बद्ध होत नाहीं व अज्ञ कसे बद्ध होतात त्याचें वर्णन.

**श्रीवसिष्ठ**—रामा, विदेहमुक्त वाणीचे विषय होत नाहींत. त्यांचें वर्णन करतां येत नाहीं. यास्तव आता तूं जीवन्मुक्तीचेंच वर्णन ऐक. तृष्णेवाचून कोणतीच प्रवृत्ति होणें शक्य नसते. यास्तव ज्ञानी पुरुषाच्या प्रवृत्तीलाही तृष्णाच कारण होते; पण ती शुद्ध असते. अज्ञाच्या तृष्णेप्रमाणें मलिन नसते. त्यामुळें वासनोत्साहशून्य तृष्णेनें होणारें त्याचें वर्णाश्रमस्वभाव-प्राप्त कर्म त्याच्या मुक्तीस प्रतिबंध करीत नाहीं. बाह्यार्थ सत्य आहेत अशा दृढ भावनायुक्त तृष्णेनें व्यवहार करणें अथवा अशी तृष्णा धरणें हा बंध आहे, असें आचार्य म्हणतात. तीच संसाररूपी खोडा आहे. भोग्य-वर्ग अनित्य आहे, अशा निश्चयानें जिनें हृदयस्थ भोगसंकल्प सोडले आहेत व जी केवल लोकसंग्रहाकरिता बाहेर विहार करीत आहे अशी वासना जीवन्मुक्ताच्या शरीरात रहाते. राघवा, बाह्य विषय–लांपट्यामुळें वृद्धि पावणारी तृष्णा बद्ध असून बाह्य व आंतर विषय-लांपट्य-शून्य तृष्णा मुक्त होय. जी तृष्णा विषयप्राप्तीच्या पूर्वी व त्याच्या नाशानंतर दुःखरहित व भोगसमयींही वृद्धिरहित असते ती मुक्त तृष्णा होय. मला हें असावें अशी आंतल्या आंत भावना होणें हीच तृष्णा-शृंखला व कलना आहे, असें जाणावें व तिला सोडावें. रामा, तूं बंधाची आशा, मोक्षाची आशा, सुख–दुःखदशा आणि सत व असत् वस्तूची आशा सोडून अक्षुब्ध महा-सागराप्रमाणें रहा. आत्मा अजर व अमर आहे, असें जाणून जरा व मरण यांच्या शंकांनीं आपलें मन कलु-षित करून घेऊ नकोस. हें दृश्यपदार्थतत्त्व तुझें नव्हे. तूंही जीव नव्हेस. तर तें सर्व परमार्थ सत्याहून निराळेंच कांहीं आहे. हे रामा, विचारी पुरुषाचा आणखी चतुर्विध निश्चय सांगतों तो ऐक. मला नखशिखांत आईबापांनीं निर्माण केलें आहे. असा असत्, दर्शनामुळें होणारा एक निश्चय आहे. तो बंधालाच कारण होतो. मी देह, इंद्रियें इत्यादि सर्व भावांहून भिन्न व सूक्ष्म आहें, हा दुसरा निश्चय असून तो संताच्या मोक्षास कारण होतो. मी जगांतील अनंत पदार्थांचा आत्मा आहें, मीच अक्षय

हें सर्व आहें, हा तिसरा निश्चयही मोक्ष देतो. देहादिरूप मी व ही जड सृष्टि अशीं दोन्हीं शून्य आहेत, हा चवथा निश्चय असून तोही मोक्ष देतो. तात्पर्य रामा, या चार निश्चयांतील पहिला प्राण्याला बद्ध करतो व शुद्ध भावनेमुळें उत्पन्न झालेले बाकीचे तीन मोक्षोपयोगी आहेत, असें सांगितलेलें आहे. कारण यांतील पहिला निश्चय असला तरच तृष्णा बंध उत्पन्न करूं शकते. यास्तव वस्तुतः तो निश्चयच बंधाचें खरें कारण आहे. ज्यांच्यामध्यें शुद्ध तृष्णा आहे, असे पुढचे तीन निश्चय स्वच्छ असून ते जीवन्मुक्तामध्यें रहातात. त्यांतूनही शेवटचा निश्चय मला फार आवडतो. कारण आत्म्याचा महिमा खालीं, वर व बाजूला व्यापून रहाणारा आहे. त्यामुळें सर्व आत्माच आहे, या निश्चयानें कोणाचीही मति खिन्न होत नाहीं. या शिव ईशान पुरुषालाच वादी शून्यादि अनेक नावें देतात. एका परमार्थस्वरूप दृष्टीनें जग व्याप्त आहे. भ्रांतिबुद्धीनें नव्हे. पाताळापासून सत्यलोकापर्यंत व त्याच्या पलीकडेही आत्मा भरला आहे. एवढ्यासाठींच सर्व सत्य, सर्व नित्य व सर्व मिथ्याशून्य आहे. समुद्रांत सर्व पाणीच; दुसरें ( तरंगादि ) कांहीं नाहीं. कडीं, बाहुभूषणें, आंगठ्या, इत्यादि सर्व सोनेंच दुसरें कांहीं नाहीं. परमात्ममयी अद्वैत शक्तिच द्वैताद्वैत भेदानीं विकास पावते. रामा, आपलें किंवा दुसऱ्याचें कार्य सिद्ध झालें किंवा न झालें तरी तूं सुखी व दुःखी होऊं नको. तूं ब्रह्माप्रमाणेंच आतून अद्वैतपर व बाहेरून द्वैतपर होऊन रहा. विषयभावनेनें भयंकर संसार-भूमींत धक्के खाऊं नकोस. हे महात्मन्, द्वैत संभवत नाहीं. कारण तें चित्तमय आहे. त्याचप्रमाणें आत्म्यामध्यें एकत्व हा संख्यागुणही संभवत नाहीं. कारण त्याला एक म्हणणें, हें सुद्धां द्वित्वादिकाच्या व्यावृत्तीकरितांच होय. तस्मात् तें तत्त्व म्हणजे बोलता न येण्यासारखें व चिंतन करतां न येण्यासारखें असें कांहीं आहे. तें सदा निर्विकार आहे. हें सर्व विज्ञानमात्र असतें. सर्व शांत तत्त्व पसरलें आहे. तें परम अमृत, अनाद्य, सर्व भासांस भासमान करणारें, अजर अज, अचिंत्य, निष्कल, साधनशून्य, जीवशक्तीचें जीवन व सर्व कारणांचें कारण आहे. राघवा, तूं, आम्ही व हें सर्व जग सदा ब्रह्म आहे, असा तुझा आंत दृढनिश्चय असूं दे १७.

सर्ग १८—संसारांत राहूनही दु:खी न होणाऱ्या विद्वानांची स्थिति.

**श्रीवसिष्ठ**—रामा, समाहितचित्त, काम-लोभादि कुदृष्टींनीं अदूषित व लीलेनें व्यवहार करणाऱ्या महात्म्याचा हा स्वभाव ऐक. संसारविहार करणाऱ्याही जीवन्मुक्तमुनीनें प्रारंभीं जन्मादि दु:खांनीं, मध्यभागीं आध्यात्मिकादि दु:खांनीं व अंतीं मृत्यु-नरकादि दु:खांनीं विरस असलेल्या जगत्-स्थितीस हसावें. तिला तुच्छ जाणावें. सर्व प्रकृत कार्यांमध्यें उचित व्यवहार करणारा, शत्रुमित्रादिकांविषयीं सम, ध्येयवासनात्यागाचा अवलंब करून रहाणारा, सर्वत्र उद्वेगशून्य, कोणाचेंही अप्रिय न करणारा, विवेकी, ज्ञानलक्षण उपवनात रहाणारा, सर्वातीत पदाचा अवलंब करणारा, पूर्णचंद्राप्रमाणें शांतचित्त, उद्वेगरहित, व प्रिय वस्तूच्या लाभानें संतुष्ट न होणारा पुरुष संसारात दु:खी होत नाहीं. सर्व शत्रूंविषयीं उदासीन, दाक्षिण्य व दया यांनी युक्त, श्रेष्ठाचें प्राप्त कार्य करणारा, अभिनंदन, द्वेष, शोक व इच्छा यांनीं रहित, मित भाषण करणारा, अवश्य कार्यांमध्यें आळस न करणारा, विचारलें असतां उचित असेल तेंच सांगणारा, कोणी न विचारल्यास स्थाणूप्रमाणें स्तब्ध बसणारा, इष्टानिष्टभावशून्य, कोणी आक्षेप केला असतां रम्य शब्दांनीं समाधान करणारा, भूताचा आशय जाणणारा, पक्षपात न करणारा, परम पदीं आरूढ झालेला व भंगुर जगत्स्थितीकडे अंत:शीतल बुद्धीनें हसत अवलोकन करणारा ज्ञानी संसारात दु:खी होत नाहीं. ज्यांनीं चित्ताला जिंकलें आहे अशा परावरज्ञ महात्म्यांचा हा स्वभावच आहे. पण ज्यांनी चित्ताला जिंकलेलें नाहीं अशा भोगरूपी चिखलांत रुतलेल्या मूर्खांचे मनोरथ, चेष्टा व त्यांचें परिणाम अनंत व अति विचित्र असल्यामुळें त्यांचें वर्णन करतां येत नाहीं. त्याना स्त्रिया अतिशय अभिमत असतात व आम्हांला त्या नरकाग्नीच्या ज्वाला आहेत, असें वाटतें. त्यांना धन इष्ट असतें, पण आम्हांला तें सर्व अनर्थांचें बीज आहे, असें वाटतें. ते धनादिकांच्या योगानें यज्ञादि सत्कर्में करतील म्हणून म्हणावें तर त्यांचीं तीं कर्मेंही साभिमान व सकाम होत असल्याकारणानें व दंभ, मान, मद, मात्सर्य इत्यादि दुराचारांनीं भरलेली असल्यामुळें पुनर्जन्मादि-सुखदु:खांनीं परिपूर्ण असतात. त्यामुळें आम्हांला त्यांच्या स्वभावाचें वर्णन चांगलेंसें करतां येत नाहीं.

वास्तव हे राघवा, तूंही विद्वानांच्या चरित्रानेंच विहार कर. सर्व

आशा, वासना, व अनुराग सोड. आणि बाहेरून केवळ शरीरचेष्टा कर. उदार, सुंदर आचारवान् व कोणाचा बुद्धिभेद न करितां व्यवहार करणारा हो. सर्व संसार-दशांचा विचार करून व अतुच्छ परम पदाचा आश्रय करून लोकांमध्यें वाग. आंतून आशा सोडून बाहेरून आशावान् असल्याप्रमाणें, आंतून शीतळ व बाहेरून तप्त असल्याप्रमाणें, आंतून वेगशून्य व बाहेरून मोठा वेगवान् असल्याप्रमाणें आणि आतून अकर्ता वैं बाहेरून कर्ता असल्याप्रमाणें तूं लोकामध्यें व्यवहार कर. सर्व भावाचें तत्त्व तुला कळलें आहे. यास्तव कृत्रिम हर्ष, कृत्रिम उद्वेग व कृत्रिम आरंभ तूं यथेच्छ कर. अहंकार सोडून, बुद्धीला स्थिर ठेवून, आशापाश तोडून व सर्व वृत्तींमध्यें समभाव ठेवून बाह्य कार्यें कर. देहवानाला वस्तुतः बंध नाहीं व मोक्षही नाहीं. ही सर्व भ्रांति आहे. कारण एक व सर्वगामी आत्म्याला बंध कसा असणार व बंधच जर नाहीं तर मोक्ष कोणाला होणार ? तुला सूक्ष्म दृष्टीनें तत्त्व कळलें आहे व तूं निरहंकारही झाला आहेस. यास्तव आतां तू आकाशाप्रमाणें निर्मल रहा. शरीरसंबंधी जनाविषयीं सुखी किंवा दुःखी होऊ नको. कारण जग, आत्मा व तूं यांच्या स्वभावाचा विचार केला म्हणजे सुख व दुःख याना अवकाशच रहात नाहीं आणि सुखदुःखच करावयाचें म्हटल्यास त्याला सीमा नाहींशी होईल. कारण संसाराचें स्वरूप सदा आधियुक्त आहे. त्या सर्व शक्तिमानाचा हा सर्व खेळ आहे. कोण कोणाचा बंधु व कोण कोणाचा रिपु. अथवा सर्वच सर्वांचे सर्व आहेत. सर्व सर्वेश्वराच्या इच्छेनें होते. हा जगत्प्रवाह असाच चालणार. खालीं असलेले जीव वर जाणार व वरचे खालीं येणार. जीवांचा स्वर्गातून नरकात, नरकांतून स्वर्गात व एका योनींतून दुसऱ्या योनींत जाण्याचा क्रम एकसारखा चालला आहे. आज धीर असतो तो उद्यां कृपण होतो व कृपण धीर होतो. संसारचक्रांत एकरूप कोठेंच आढळत नाहीं. हा आपला व हा परका, हा बंधु व हा शत्रु या भावनाही अस्थिर आहेत. यास्तव राघवा, वासनाभरानें भ्रांत न होतां सुखाने व्यवहार कर. वासनाक्षय जसा जसा दृढ होत जाईल तसा तसा तुझा व्यवहारही कमी होऊं लागेल. एकतर सर्व माझें आहे व मी सर्वांचा आहें, असें समजावें किंवा मी कोणाचा नव्हे व माझें कोणी नव्हे, असें

जाणावें. यातील कोणत्या तरी एका भावनेचा सतत अभ्यास केल्यावाचून मानवाची विषम भावना क्षीण होणें शक्य नाहीं १८.

**सर्ग १९**—पुण्य व पावन यांच्यीं आख्यानाचा आरंभ. पुण्याने पितृशोकार्त पावनास केलेला उपदेश.

**श्रीवसिष्ठ**—रघुनंदना, गंगेच्या तीरावरील दोघा मुनिपुत्रांचा संवाद मी तुला सांगतों. हा बंधु व हा नव्हे, या कथाप्रसंगानें मला आठवलेला तो पुण्यकारक इतिहास तू ऐक. या जंबूद्वीपाच्या एका भागांत महेंद्र या नावाचा एक पर्वत आहे. त्याच्या सभोंवार महा अरण्य असून त्यावरील कल्पद्रुमांच्या छायेंत अनेक मुनी व किन्नर विश्रांति घेत असतात. त्याचीं शिखरें आकाशात ओळीने पसरलेलीं आहेत. मुनींनीं त्याच्या एका रम्य रत्नमय शृंगावर स्नानपानादिकाकरिता गंगेला उतरविलें होतें. त्या गंगा-प्रवाहाच्या तीरीं साक्षात् तपच असा एक दीर्घतपा नावाचा मुनि होता. त्याला चंद्रासारखे सुंदर दोन पुत्र होते. त्यातील एकाचें नाव पुण्य व दुसऱ्याचें पावन होतें. ते दोघेही बृहस्पतीच्या कचासारखे मोठे बुद्धिमान होते. एक भार्या व ते दोघे पुत्र यांसह तो मुनि फळझाडांनीं व्याप्त झालेल्या त्या गंगातीरावर रहात असे. काहीं दिवसांनीं त्यातील गुणांनींही श्रेष्ठ असलेला पुण्य नावाचा ज्येष्ठ पुत्र ज्ञानी झाला व पावन अर्ध्या फुललेल्या पुष्पाप्रमाणें अर्धज्ञानी होता. त्याचें ज्ञान अजून परिपूर्ण झालें नव्हतें. काहीं दिवस लोटल्यावर दीर्घतपा मुनि जराजर्जर झाला व काळ जवळ आल्यामुळें तो संसारावरील आसक्ति सोडून व पक्षी जसें घरटें सोडतो त्याप्रमाणें भौतिक शरीराचा त्याग करून परलोकीं गेला. एकादा भारवाही आपल्या डोक्यावरील भार जसा खालीं टाकतो त्याप्रमाणेंच त्यानें तें भारभूत शरीर गंगातीरीं टाकलें आणि तो महाज्ञानी शांत चिद्धाम जाऊन पोंचला.

नंतर त्याच्या भार्येनेंही, मुनीचा देह प्राणापानरहित होऊन भूमीवर तुटलेल्या कमलाप्रमाणें, म्लान होऊन पडला आहे, असें पाहून त्यानेंच दिलेल्या व फार दिवस अभ्यासिलेल्या योगयुक्तीनें आपली तनु सोडली. लोकांना अदृश्य झालेली ती पतिव्रता, अदृश्य झालेली चंद्रप्रभा जशी चंद्राच्या मागोमाग जाते तशी आपल्या पतीच्या मागोमाग गेली. याप्रमाणें माता व पिता यांचा देहान्त एकाचवेळीं झाला असतां विवेकी पुण्य व्यग्र-

चित्त न होतां, त्यांच्या और्ध्वदैहिक कर्मामध्यें निमग्न झाला व पावन दुःखी झाला. तो आपल्या ज्येष्ठ भ्रात्याप्रमाणें धैर्य न धरिता शोकानें व्याकुळ होऊन विलाप करीत अरण्यांतून इतस्ततः फिरूं लागला. पण आईबापांच्या देहांस अग्निसंस्कार करून व त्यांचें योग्य और्ध्वदैहिक कर्म करून उदारबुद्धि पुण्य दुःखी पावनाकडे आला व त्याला मोठ्या प्रेमानें म्हणाला.—

बाळा, तूं असा शोक का करितोस. तुझा पिता मातेसह आपल्या मोक्षनामक परमात्मपदवीस प्राप्त झाला आहे. उत्पत्त्यादि सर्व कालीं सर्व प्राण्याचें तेंच आधारभूत स्थान आहे. ब्रह्मवेत्त्याचें तें स्वरूप आहे. मग आपल्या स्वरूपाला प्राप्त झालेल्या पित्याविषयीं व्यर्थ शोक का करतोस ? हाच माझा पिता व हीच माझी माता अशी मूढ भावना धरल्यामुळेंच तुला अशोच्य माता–पितराविषयी शोक करण्याचा प्रसंग आला आहे. पण तीच एकटी तुझी माता नाहीं व तोच एकटा पिताही नाहीं आणि आजवर ज्यांना असंख्य पुत्र झाले आहेत, अशा त्याचा तूं एकच पुत्रही नाहींस. अरे बाळा, यापूर्वीही तुझीं सहस्रावधि मातापितरें होऊन गेलीं आहेत व विचारपूर्वक, मोह सोडून, या जन्मीं आत्मस्वरूपास न जाणल्यास यापुढेंही असंख्य आईबाप होतील. त्याचप्रमाणें त्यानाही आजपर्यंत तुझ्यासारखे असंख्य पुत्र झाले होते व ते सर्व नदीच्या तरंगाप्रमाणें नाहींसे झाले आहेत. बाबारे, प्रत्येक ऋतूमध्यें वृक्षाना जशीं अनेक फळें येऊन नाश पावतात त्याप्रमाणें प्राण्याचे अनेक मित्र, आप्त व बांधव प्रत्येक जन्मीं होऊन जातात. मग स्नेहामुळे त्याच्याविषयीं जर शोकच करावयाचा म्हणून म्हटलें तर त्या सर्वांविषयींच शोक करावयास नको का ? (हीं आईबापें याच जन्मीं आता नुक्तींच मलीं आहेत व याच्या स्नेहाचें आणि उपकाराचें आम्हाला स्मरण आहे, म्हणून यांच्याकरिताच मात्र शोक करून ज्याचें स्मरण नाहीं अशा इतर अनेक आईबापाकरिता आम्हांला दुःख होत नाहीं म्हणून म्हणशील तर दुःखाचें कारण आईबाप नसून त्यांचें स्मरण आहे, असें झालें. अर्थात् यांचेंही विस्मरण झालें असता तू याच्या करितांही शोक करणार नाहींस, हें उघड आहे. यास्तव आताच यांना विसर. यांचें स्मरण करून उगीच कष्टी कां होतोस ! ) अथवा जगाच्या स्थितीचा विचार कर. म्हणजे परमार्थतः तुझे कोणी मित्र नाहीत व

बाधवही नाहींत, असें कळेल. जगामध्यें स्वभावतःच नाश नाहीं व तत्त्वबोध झाल्यावर तर तो मुळींच नाहीं. राजे व इतर धनिक लोक यांची ही जी छत्र-चामर-चंचल संपत्ति दिसत आहे, तें कांहीं दिवस रहाणारें स्वप्न आहे. पारमार्थिक दृष्ट्या सत्य काय आहे, याचा विचार कर. हा गेला, मेला इत्यादि दुर्दृष्टी खऱ्या नव्हेत. त्या आपल्याच कल्पना आहेत १९.

**सर्ग २०**—पुण्य पावनाच्या शोकाचा परिहार करण्याकरितां त्याच्या व आपल्या पूर्वजन्मांचें वर्णन करितो.

**पुण्य**—पिता कोण, माता कोण, मित्र कोण व बांधव कोण ? आपल्या संकेतानेंच हा बंधु—मित्र—पुत्र—देह—द्वेष—मोहरूप प्रपंचाख्य रोग प्राणी उत्पन्न करतो. तो दृढ भावनेनें एकाला बंधु म्हणतो व एकाला शत्रु ह्मणतो. पण एका सद्रूप सर्वगामी आत्म्यामध्यें ही भेदबुद्धि शोभत नाहीं. रक्त, मांस, व हाडें यांच्या संघातरूप अशा या देहांत, मी हा कोण, याचा तू आपल्या मनानें विचार कर. म्हणजे पारमार्थिक दृष्टीनें मीही नाहीं व तूही नाहींस, हें तुला कळेल. मी पुण्य व तूं पावन हें मिथ्या ज्ञान आहे. पिता, माता, सुहृत्, बांधव, इत्यादिकांचे देहही भ्रांतिमात्र आहेत. त्यामुळें त्याच्या करितां शोक करणें उचित नव्हे. देहादि उपाधींहून भिन्न केलेल्या चिदाकाशासच जर तू 'मी, तूं, पिता, माता' इत्यादि समजत असशील तर माझा पिता, माझी माता इत्यादि भेदघटित स्वत्वादि संबंध अयुक्त आहे. लिंगशरीरच मी व बांधवादि आहेत म्हणून ह्मणशील तर आजपर्यंत अनेक जन्मामध्यें होऊन गेलेल्या आईबापांच्या शरीरांविषयीं शोक कां करीत नाहींस ? कारण निरनिराळ्या स्थानीं मृग, हंस, वृक्ष, सिंह, मासे, वानर, कावळे, इत्यादि अनेक योनीमध्यें तुझे अनेक बांधव होते. तू दाशार्ण देशात कपिलवर्ण वन-वानर होतास. तुषार देशात राजपुत्र झालास. पुंड्र देशांत वनकावळा होतास. हैहय देशांत हत्ती होतास. त्रिगर्तात गर्दभ होतास. शाल्वांत कुत्रा होतास. तेथेंच सुरूच्या झाडावर पक्षी होतास. विंध्य पर्वतावर पिप्पल झालास. मंदर पर्वतावरील एका वटवृक्षांत लांकडातील किडा झालास. पुढें तेथेंच कोंबडा झालास. कोसल देशांत ब्राह्मण, वंगात तित्तिर पक्षी, व तुषारांत अश्व होऊन एका ब्राह्मणाच्या यज्ञांत पशु झालास. बाळा, अशाच आणखी अनेक योनींचा अनुभव घेऊन तूं माझा

भाऊ झाला आहेस. सूक्ष्म व शुद्ध बुद्धीनें मला हें सर्व प्राक्तन ज्ञान झालें आहे. मीही अशा अनेक योनी आजवर पाहिल्या आहेत व ज्ञान-दृष्टीनें मला त्यांचेंही आज ज्ञान होत आहे. मी त्रिगर्तामध्यें पोपट, नदी-काठीं बेडुक, वनांत लावापक्षी, विंध्यारण्यांत भिल्ल, वंगांत वृक्ष, विंध्याद्री-वर उंट, हिमालयावर चातक, पौंड्रामध्यें राजा व सह्यपर्वतावरील गुहेंत वाघ झालों. मी दहा वर्षें गिधाड होतों. पांच महिने सुसर झालों व शंभर वर्षें सिंह होऊन राहिलों आणि शेवटीं श्रीशैलाचार्यांचा पुत्र होऊन आतां तुझा वडील भाऊ झालों आहे.

बाळा, या जगाची ही अशी अवस्था आहे. आजवर आमचे शतशः बांधव होऊन गेले आहेत. त्यांतील कोणाकोणांकरितां म्हणून रडावें, तें तरी सांग. वनांतील वृक्षाच्या पानाप्रमाणें असंख्य आप्त वारवार होतात व जातात. तेव्हां दुःख व सुख याला कांहीं तरी प्रमाण आहे का? यास्तव सर्वांविषयीं उदासीन होऊन स्वच्छ चित्तानें राहूं या. मनामध्यें स्थित असलेल्या अहं अशा प्रपचभावनेस सोडून तूं ब्रह्मज्ञांच्या गतीस जा. बुद्धिमान् लोक सतत वेगानें होणाऱ्या या भ्रमणाविषयीं मुळींच शोक न करितां निरभिमानानें व्यवहार करितात. यास्तव तूंही जरा-मरणशून्य आत्म्याला आठव. जन्म, दुःख, माता, पिता इत्यादिकांतील तुझें कांहीं नाहीं. तूं आत्मा आहेस. देहादि अनात्मा नव्हेस. या संसारयात्रेंत अभिमा-नानें नानाप्रकारच्या चेष्टा करणारे अज्ञच सारबुद्धि ठेवतात आणि ज्ञानी प्रेक्षक होऊन रहातात. रात्रीं प्रकाशनक्रिया करणाऱ्या दीपांप्रमाणें ते या लोकस्थितींत कर्ते असल्यासारखे रहातात. हातांतील आरसा, रत्न इत्यादिकांमध्यें मुखाचें प्रतिबिंब पडतें; पण त्यांत ते स्वतः प्रवेश करीत नाहींत. त्याप्रमाणें महात्मे स्वात्म्यामध्यें अध्यस्त कार्यांचे कर्ते होतात. पण त्यांत 'मी' असा अभिनिवेश करीत नाहींत. यास्तव बाळा, तूंही कामनामय कलंकशून्य, मननशील, साक्षात् व संसारसंभ्रमशून्य आत्म्याच्या योगानेंच संतुष्ट हो १०.

**सर्ग २१**—तृष्णापाशक्षय हाच मोक्ष. आशेनें चित्तवृत्ती उठतात निराश व आ-त्मपूर्ण पुरुषाला आपोआप मुक्ति मिळते.

**श्रीवसिष्ठ**—राघवा, पुण्यानें याप्रमाणें उपदेश केला असतां पावनास बोध झाला आणि त्यानंतर ते दोघेही सिद्ध व ज्ञान-विज्ञान-पारग होऊन

त्या वनात यथेच्छ विहार करूं लागले. काहीं दिवसांनीं त्यांनाही निर्वाण प्राप्त झालें व तैलरहित दीपाप्रमाणें ते शांत झाले. रामा, याप्रमाणें आताची सख्याच करिता येत नाहीं. तेव्हां त्यांतील कोणाकरितां रडावें व कोणा-करितां हसावें ! यास्तव या सर्व तृष्णांचा त्याग करणें हाच खऱ्या शांतीचा उपाय आहे. उत्तरोत्तर अधिक विषयसंपादन करणें हा नव्हे. जशीं जशीं लांकडें घालावीं तसा तसा अग्नि वाढत जातो. त्याप्रमाणें विष-यांचें चिंतन जसें जसें करावें तशी तशी चिंता वाढत जाते आणि लाकडें काढलीं असता अग्नि जसा शांत होतो त्याप्रमाणें विषयांचें चिंतन सोडलें कीं चिंताही क्षीण होते. ध्येय-वासनात्यागरूपी रथावर आरूढ होऊन सर्व-भूतदयेनें उदार झालेल्या दृष्टीनें दीन लोकाकडे पहात प्रकृत व्यवहार कर. रामा; हीच स्वच्छ, निष्काम व पीडाशून्य ब्राह्मी स्थिति आहे. या स्थितीला प्राप्त झालेला पुरुष व्यवहारामध्यें फारसा चतुर जरी नसला तरी मोहित होत नाहीं. विवेकनामक एक सुहृत् व परमार्थ बोधलक्षण बुद्धिरूपी एक प्रियसखी याना बरोबर घेऊन तं विहार कर. म्हणजे सकटा-मध्येंही मोहित होणार नाहींस. ज्यानें सर्व धनाचा परित्याग केला आहे व बाधवाना जणुं काय गचाड्या देऊन हृदयातून दूर केलें आहे अशा स्व-धैर्यावाचून दुसरें कोणीही सकटातून सोडवीत नाहीं. वैराग्य, शास्त्रविचार व महत्त्वादि गुण याच्या योगानें मोठ्या यत्नाने मनाला विषयगर्तेतून वर काढावें. तुच्छ विषयाचा अभिलाष न करणें या महत्त्वानें पुष्ट केलेल्या चित्तापासून जें फळ मिळतें तें त्रिभुवनाच्या ऐश्वर्यापासून व विविध रत्नानीं भरलेल्या कोशापासूनही मिळणें शक्य नाहीं. मन पूर्ण(तृप्त) झालें कीं, सर्व जग अमृतरसानें परिपूर्ण होतें. जोड्यानीं पाय झाकून टाकले कीं, सर्व पृथ्वी चामड्यानें मढविल्यासारखी होते. मन वैराग्यानें पूर्ण होतें, आशावश झाल्यानें नव्हे. कारण त्यांच्या योगानें तें ग्रीष्मर्तूतील सरोवरा-प्रमाणें रिकामें होत जातें. ज्याचें चित्त आशावश झालेलें असतें त्याचें हृदय अगस्तिमुनीनें पिऊन सोडलेल्या सागराप्रमाणें रितें होतें. ज्याच्या धर्म, ज्ञान, वैराग्य, शांति, दांति इत्यादि पुष्प-फल-पल्लवानीं समृद्ध असलेल्या चित्तवृक्षावर तृष्णानांवाची चपल मर्कटी नाचत नाहीं त्याचें-- मन, बुद्धि, अहंकार व चित्त या चार प्रकारच्या वृक्षांनीं बनलेलें--अंतः-करण वन चांगलें शोभतें. निःस्पृह पुरुषाला त्रिभुवन एकाद्या लहानशा

छिद्राप्रमाणें भासतें. फार मोठा प्रदेशही गायीच्या पावलासारखा वाटतो. व महाकल्प निमिषार्ध भासतो. कारण अमर्याद ब्रह्मसुखापुढें इतर सुखें व सर्वगत आणि नित्य ब्रह्माच्या अपेक्षेनें सर्व देश, काल व वैभव तुच्छ भासतात. निःस्पृह चित्तामध्यें जितकी शीतलता असते तितकी चंद्र, हिमालयाची गुहा व केळींची अथवा चंदनवृक्षाची बाग यांमध्येंही नसते. स्पृहारहित मन जितकें सुंदर दिसतें तितका सुंदर पूर्ण चंद्र, पूर्ण क्षीरसागर अथवा लक्ष्मीचें मुखही नाहीं. मेघमाला चंद्राला व शाईचे ठिपके चुना लावलेल्या भिंतीला जसे दूषित करतात त्याप्रमाणें आशापिशाचिका पुरुषाच्या चित्ताला दूषित करिते. चित्तवृक्षाच्या आशानामक शाखांनीं दश-दिशांस व्यापून सोडलें आहे. यास्तव त्यास धैर्यानें तोडून टाकलें म्हणजे तो चित्तमहावृक्ष नुस्तें खोड होऊन रहतो ( ह्मणजे स्तब्ध ब्रह्म होतो. ) तृष्णा-शाखा तोडून चित्तवृक्षाचा नुस्ता खांब उभा राहिला ह्मणजे त्याच्या खालचा धैर्य-रोपडा जोरानें वाढतो. वैराग्य, जितेंद्रियत्व, द्वंद्वसहिष्णुत्व इत्यादि धैर्यानें युक्त असलेल्या पुरुषाचें चित्त क्षीण झालें म्हणजे हे रामा, त्याला नाशरहित पद मिळतें. राघवा, या आशारूपी चित्तवृत्तींना जर तूं वाढूं दिलें नाहींस तर तुला काहीं भय नाहीं. तुझें चित्त वृत्तिशून्य झालें कीं तूं मोक्षमयी सत्तेस प्राप्त झालासच, असे समज चिंतन हीच वृत्ति. आशेच्या योगाने ती उद्भवते. यास्तव आशेलाच सोडलें ह्मणजे तुला सह-जच चित्तरहित होता येईल. कारण जो ज्या वृत्तीने युक्त असतो त्याचा त्या वृत्तीच्या अभावीं क्षय होतो, असा नियम आहे. यास्तव चित्ताच्या शांतीकरिता त्याच्या वृत्तीचा क्षय कर. महात्म्या रामा, पुत्रादि सर्व इच्छा सोडून तूं मुक्तचित्त हो. मनातील खोड्याप्रमाणें बांधून टाकणाऱ्या आशा नाहींशा झाल्यावर मुक्त कोण नाहीं होणार ? २१.

**सर्ग २२**—बलीच्या आख्यानाचा आरंभ. पाताळाचे वर्णन बलीचे राज्य व त्याने वैराग्यानें मेरुशृंगावर केलेला विचार.

**श्रीवसिष्ठ**—अथवा हे रघुवंशरूपी आकाशातील पूर्णचंद्रा, बलीप्रमाणें अकस्मात् विचारोदय झाल्यामुळें तुला अमल ज्ञान प्राप्त होऊं दे.

**श्रीराम**—भगवन्, सर्वधर्मज्ञ, आपल्या प्रसादानें मला हृदयांत सर्व प्राप्तव्य प्राप्त झालें आहे. मी आतां अमल पदीं विश्रांति घेत आहें. हे विभो, माझ्या चित्तांतील तृष्णारूपी सर्व तम पार नाहींसें झालें आहे. मी आतां

अमृतानें भरून गेलों आहें. स्वस्थ व शीतलात्मा झालों आहें. मला आंतल्या आंत अवर्णनीय आनंद होत आहे. परंतु भगवन्, आपलें मधुर भाषण ऐकत असतांना माझ्या मनाची तृप्ति होत नाहीं. गुरुराज, माझा बोध दृढ व्हावा म्हणून बलीची ज्ञानप्राप्ति मला सांगा. हात जोडून प्रार्थना करणाऱ्या शरणागताचा संत कधींच कंटाळा करीत नसतात.

**श्रीवसिष्ठ**—राघवा, बरें आहे. तुझ्या इच्छेप्रमाणें मी आतां तुला बलीचा उत्तम वृत्तांत सांगतों. अरे वेड्या, तुझ्यासारखे श्रोते तरी वक्त्यांना कोठें सांपडतात ! असो; या आख्यानाचें श्रवण एकाग्रमनानें केल्यास तुजप्रमाणें इतरांचाही बोध दृढ होईल.

या जगत्कोशा(ब्रह्मांडा)च्या एका कोपऱ्यांत भूलोकाच्या खालीं पाताळ म्हणून एक प्रसिद्ध लोक आहे. त्याच्या आंतील भाग क्वचित् स्थळीं क्षीर-सागरांत झालेल्या व ज्याच्या शरीरास अमृतकिरणांचा लेप लागला आहे अशा दानवकन्यांच्या योगानें प्रकाशित होत असतो. कोठें व्याकरण-छंदःशास्त्रादिकांचें व्याख्यान चाललें असतांना होणाऱ्या दोनपासून दोन सहस्रपर्यंत जिह्वांनीं युक्त असलेल्या नागांच्या शब्दांनीं व दोन चंचल जिभांनीं युक्त असलेल्या असंख्य नागांनीं व्याप्त झालेला असतो. कोठें कोठें त्या लोकाचा प्रदेश चालते बोलते मेरुच अशा दानवांनीं परिपूर्ण असतो. कोठें दिग्गज असतात. क्वचित् असंख्य भयभीत प्राण्यांच्या आरोळ्या व दुर्गंधयुक्त नरक यांनीं तो भयंकर झालेला असतो. भूलोक-पर्यंत एकावर एक असे सात पाताळ लोक एकाद्या दोरींत ओंवलेल्या खोब-ऱ्याच्या वाट्याप्रमाणें एकमेकाशीं संबद्ध झाले आहेत. त्यांतील कांहीं भाग मेरूच्या पादांनीं व्याप्त होते. कांहीं भागास भगवान् कपिलानें पवित्र केलें होतें व कोठें कोठें असुरस्त्रियांनीं जमविलेल्या सामर्थ्याचा अभिलाष कर-णाऱ्या सुवर्णलिंगमय शंकराकडून तें ( पाताळ ) पाळलें जात होतें.

असो; अशा प्रकारच्या त्या असुररक्षित पाताळांत विरोचनपुत्र बलि राजा होता. देव, विद्याधर व उरग यांसह देवराजही त्याच्या पादसंवाहनाची ( पाय चेपण्याची ) इच्छा करीत असे. तो राजा त्रैलोक्यांतील रत्नांचा कोश, सर्व शरीरी जीवांचा रक्षक व इंद्र, मनु, शेष इत्यादि लोकधारकांचाही आधार असून स्वतः हरि त्याचा पालक होता. त्या दानवराजाचें नांव ऐकतांच ऐरावताच्या गंडस्थळावरील मदजल सुकून

जात असे. त्याच्या उग्र प्रतापाच्या उष्णतेमुळें समुद्रांचें जळही शुष्क होत असे. त्याच्या दृष्टिपातानेंच कुलपर्वत चळचळ कापूं लागत. फळांच्या भारानें नम्र झालेल्या वेलींप्रमाणें सर्व दिशा त्याच्यापुढें नम्र होत असत. त्याच्या यज्ञाचे धूम मेघरूप होऊन जगद्रक्षक होत असत. त्या शूरानें सर्व भुवनांस लीलेनेंच जिंकून घेऊन दीर्घ काल राज्य केलें. अनेक भोग भोगले. पण त्याच्या मनाचें समाधान झालें नाहीं. विषय सुखाविषयींची त्याची इच्छा अधिकाधिकच वाढूं लागली. तथापि विषयजन्य सुख फार वेळ टिकत नाहीं व भोग घेतांच त्याविषयीं मन विरस होतें, असें पाहून त्याच्या मनात त्यांविषयीं उद्वेग उत्पन्न झाला व एकदां मेरूच्या उच्च शिखरावरील रत्नजडित राजमंदिराच्या खिडकींत बसून तो आपणच या संसारस्थितीविषयीं असा विचार करूं लागला.—

ज्याची शक्ति अकुंठित आहे अशा मींच आतां या त्रिभुवनांत साम्राज्य करावें व यथेच्छ विहार करावा अशी स्थिति प्राप्त झाली आहे. पण अनेक भोगांच्या योगानें अति मनोहर झालेल्या व अद्भुत अशा या माझ्या मोठ्या राष्ट्राचा भोग घेतल्यानें तरी काय होणार! सकृद्दर्शनीं रमणीय व अवश्य क्षय पावणारे, असे हे सर्व भोग जरी मी भोगले तरी मला सुख कितीसें होणार! पुनः तोच दिवस, तीच रात्र, व तींच स्नान-भोजन-शयनादि कर्मे; खरोखर त्याच्या ठिकाणचें आंपत्य संतोषावह तर नाहींच, पण लज्जावह आहे. पुनः कांतेला आलिंगन देऊन पुनः तिचा उपभोग घेणें, ही लहान पोरांस शोभणारी क्रीडा आहे. मोठ्याना तिच्या योगानें लज्जाच वाटली पाहिजे. प्रतिदिवशीं भोग घेऊन झाल्यावर विरस वाटणारे तेच ते व्यापार पुनः पुनः करतांना सुज्ञ प्राणी लाजत कसा नाहीं! पुनः दिवस, पुनः रात्र व पुनः कार्यपरंपरा याप्रमाणें ही पुनः पुनः प्राज्ञाची विटंबनाच चालली आहे, असें मी जाणतों. जळ तरंगरूप होऊन पुनः जसें तेंच तरंगरहित बनतें त्याप्रमाणें हा जन सतत तीच ती क्रिया करतो. लहान पोराच्या किंवा वेड्याच्या चेष्टेसारखी ही प्राण्यांची पुनः पुनः होणारी क्रिया शहाण्यास हसावयास लावते. ज्याच्या प्राप्तीनें कृतकृत्य होतां येईल असा पदार्थ या जगांत कोणता आहे! अथवा हें मोठें आडंबर (दृष्ट व अदृष्ट फळ देणारें कर्मजात) आम्ही असें किती दिवस करीत रहाणार! व त्यापासून कोणता लाभ होणार!

ही बाळलीला वस्तुतः वस्तुशून्य व अनंत आहे. दुःखपरंपरेच्या प्राप्तीची इच्छा करणाऱ्या लोकांकडून व्यर्थ तिची आवृत्ति केली जाते. ज्याची प्राप्ति झाली असतां दुसरें कांहीं कर्तव्य रहात नाहीं असला पुरुषार्थ मला या सृष्टींत तर दिसत नाहीं. यास्तव क्षणिक तुच्छ विषय-सुखावाचून दुसरें नित्य सुख कोणतें आहे, त्याचा मी आतां विचार करतों, असें म्हणून बलिराजा चिंतन करूं लागला.

भुंवया वांकड्या करून थोडा वेळ विचार करितांच 'हां मला आठवलें' असें बोलून तो आपल्याशींच म्हणाला. "पूर्वी मी आपल्या तत्त्वज्ञ व पूज्य विरोचन पित्याला असें विचारलें—सर्व दुःखें व सासारिक सुखें यांचा क्रमानें परिहार व प्राप्ति यांस उद्देशून क्रमानें होणारे सर्व व्यवहार जेथें शांत होतात तो संसारसीमेचा अवधि कोणता? मनाचा मोह कोठें शांत होतो? सर्व इच्छा कोठें जातात? पुनरावृत्तिरहित अशी विश्रांति कोठें आहे? पुरुष कोणत्या सुखास प्राप्त झाला असतां ब्रह्मलोकापर्यंत जेवढे म्हणून सुखद विषय आहेत त्या सर्वांविषयीं विरक्त होतो? कशाचें दर्शन झालें असता तो दुसऱ्या सर्व दर्शनाविषयीं निःस्पृह होतो? कारण हे सर्व भोग जरी असह्य आहेत तरी ते सुखावह नाहींत. ते संतांच्याहि मनास क्षुब्ध करून मोहात पाडतात. यास्तव बाबा, मी जेथें राहून दीर्घ विश्राति घेईन असें काहीं आनंदसुंदर स्थान मला सांगा."

हें माझें वचन ऐकून ज्याच्या मुळाशीं फुलांचा व रसाळ फळांचा थ पडला आहे, अशा स्वर्गातून बलात्कारानें आणलेल्या व आपल्या अंगण्या रोंवलेल्या कल्पवृक्षाखालीं बसलेल्या माझ्या विरोचन पित्यानें त्या कल्प वृक्षाच्या अमृततुल्य फळांप्रमाणेंच मधुर ( म्हणजे जन्म-जरा-मरण दुःखां निवारण करणारें ) असें जें वचन माझ्या अज्ञान-भ्रमनिवारणार्थ सांगित होतें, तें मला आठवलें २१.

**सर्ग २२—चित्तजयाचें प्रतिपादन करण्याकरितां राजमंत्र्याचें उपाख्यान. मंत्र्या अप्रतिद्वंद्व व अजिंत बीर्य.**

**विरोचन—**पुत्रा, एक मोठा ( मोक्षाख्य ) देश आहे. त्यांत सहस्र वाधि त्रैलोक्यें मावतात; पण जलाशय, सागर, पर्वत, वनें, तीर्थें, नद सरोवरें, पृथ्वी, आकाश, अंतरिक्ष, वायु, चंद्र, सूर्य, लोकपाल, दे दानव, भूत, यक्ष, राक्षस, गुच्छ, वनश्री, काष्ठें, तृणें, स्थावर व चर भू

जल, अग्नि, दिशा, ऊर्ध्वभाग, अधोभाग, स्वर्ग, पाताळ, मी विरोचन, हरि, हर, इंद्र, इत्यादि कोणी नाहीं. त्यांत एकच फार मोठा राजा ( आत्मा ) आहे. तो सर्वग, सर्वकृत्, सर्व व निर्विकार आहे. त्यानें सर्व उत्तम मंत्र्यांतील श्रेष्ठ असा एक मंत्री ( मन ) कल्पिला आहे. तो अत्यंत अघटित असलेलेंही कर्म ( आत्म्याचें संसारित्व ) करितो व सुघटित कार्यही ( पूर्णानंदत्व ) पार नाहींसें करून सोडतो. तो स्वतः कशाचा भोग घेऊं शकत नाहीं व काहीं जाणत नाहीं. पण तो असा अज्ञ असूनही राजासाठीं सर्व करतो. त्या राजाचा तोच सर्व-कार्यकर्ता आहे. स्वतः राजा केवल एकांतांत स्वस्थ रहातो.

बलि—बाबा, आधि-व्याधिरहित असा तो कोणता देश आहे ? तो कसा प्राप्त होतो ? प्रभो, आजपर्यंत त्याला कोणीं संपादन केलें आहे का ? तो विलक्षण मंत्री कोण आहे ? त्या महाबल राजाचें नांव काय ? व सहज लीलेनें जगज्जालांस आपलेंसें करणाऱ्या आमच्याकडूनही पराभूत न झालेला तो कोठें आहे ! देवास भय देणाऱ्या पित्या, मला हें अद्भुत आख्यान स्पष्ट करून सांग व माझ्या हृदयाकाशांतील संशय घालीव.

विरोचन—बाळा, लक्षावधि देव व असुर मिळूनही त्या महाबलाढ्य मंत्र्यास जिंकूं शकत नाहींत. तो इंद्र नव्हे, यम नव्हे, देव नव्हे व असुरही नव्हे. तेव्हां त्याला कसें जिंकतां येणार ! पाषाणावर कमळांचे प्रहार जसे कांहीं परिणाम करूं शकत नाहींत त्याप्रमाणें त्याच्यावर खड्ग, मुसल प्रास, वज्र, चक्र, गदा इत्यादि शस्त्रें व अस्त्रें कुंठित होतात. तीं अस्त्रादिकांचा व शूराच्या शौर्याचा विषयच होत नाहींत. उलट त्यानेंच सर्व देवासुरांस सदां आपल्या वश करून घेतलें आहे. विष्णु नसलेल्याही त्यानें हिरण्याक्षादिक असुरांस पराभूत करून कल्पवात जसा मेरूवरील कल्पवृक्षांस पाडवितो त्याप्रमाणें, भूमीवर लोळविलें. सर्वज्ञ नारायणादिक देवानाहीं त्यानें यथेच्छ स्ववश करून घेऊन गर्भ–छिद्रांत कोंबलें. त्या मंत्र्याच्या प्रसादानें ज्याच्या जवळ केवळ पांचच बाण आहेत असा मदन सर्व त्रिभुवनाचें आक्रमण करून मोठी प्रौढि मिरवतो. देव व असुर ज्याच्या योगानें स्वैर वर्तन करूं शकत नाहींत तो निर्गुण, दुर्मति व दुराकृति क्रोधही त्या मंत्र्याच्या प्रसादानेंच वृद्धि पावतो. सहस्रावधि देवासुरांचा जो हा वारंवार रोमहर्षण संग्राम होत असतो तो या मंत्र्याकरी

मंत्र्याचा नुसता खेळ आहे. पुत्रा, तो मंत्री केवळ त्याच्या प्रभूलाच जिंकतां येतो व त्यावाचून बाकी सर्वांना तो पर्वतासारखा अचल भासतो. त्याच्या प्रभूलाच फार दिवसांनीं जेव्हां त्या मंत्र्याला जिंकावेंसें वाटतें. तेव्हां तो त्याला सहज जिंकूं शकतो. त्रैलोक्यातील बलाढ्यांशीं झुंजून विजयी होणारा एक मल्ल व ज्यानें त्रिभुवनास मरावयास टेकलेल्या प्राण्याप्रमाणें ऊर्ध्वश्वासयुक्त केलें आहे अशा त्या मंत्र्याला जिंकण्याचें सामर्थ्य जर तुजमध्यें असेल तर मात्र तूं शूर खरा. तो मंत्रिसूर्य उदय पावला म्हणजे त्रैलोक्यकमलाकार विकसित होतात व त्याचा अस्त झाला असतां त्यांचा लय होतो. यास्तव निश्चित व एकाग्र बुद्धीनें जर तू त्याला जिंकूं शकलास तर मात्र तूं धीर खरा. त्याला जिंकलें की न जिंकलेले लोकही जिंकल्यासारखे होतात व त्याला न जिंकल्यास फार दिवसांपासून जिंकून घेतलेलेही लोक न जिंकल्यासारखेच आहेत. यास्तव वत्सा, श्रमसाध्य अशाही सर्व-त्यागादि चेष्टेनें अनंत सिद्धि व शाश्वत सुख यांकरितां त्याला जिंकण्याचा प्रयत्न कर. कारण त्या दुष्टानें त्रिभुवनातील सर्व प्राण्यांना लीलेनेंच वश केलें आहे २३.

सर्ग २४—त्या दुर्मंत्र्याला जिंकण्याचा व राजदर्शनाचा वैराग्यादि युक्त उपाय.

बलि—बाबा, तो महाबलाढ्य मंत्री कोणत्या उपायानें जिंकता येतो व तो महावीर्यवान् कोण आहे, तें मला सत्वर सांगा. म्हणजे मी त्याला जिंकण्याचा प्रयत्न करीन.

विरोचन—वत्सा, नित्य अजिंक्य असलेल्या त्या मंत्र्याला सहज कसें जिंकतां येईल तें सांगतों. पुत्रा, त्याला युक्तीनें धरल्यास तो एका क्षणात आपल्या हातीं सांपडतो. पण युक्तीवाचून तो उद्धट सर्पाप्रमाणें जाळतो. एकाद्या बालकाप्रमाणें थोडा विषयभोग देऊन व वारंवार विषय-दोष-वर्णन करून जे त्याला ठकवितात आणि राजयोगाच्या योगानें त्याचें नियमन करितात ते त्या राजाच्या अनंत पदाचें दर्शन घेऊन कृतकृत्य होतात. राजाचें दर्शन झालें कीं, तो मंत्री पूर्णपणें वश होतो व त्या मंत्र्याला युक्तीनें जिंकलें म्हणजे राजाचें दर्शन होतें. जोंवर राजदर्शन होत नाहीं तोंवर मंत्री जिंकला जात नाहीं व मंत्र्याला जिंकल्यावाचून राजदर्शन होत नाहीं. राजदर्शनाच्या अभावीं तो दुष्ट मंत्री राग—द्वेषादिकांच्या द्वारा फार दुःख देतो व मंत्र्याच्या विजयापूर्वीं राजा अत्यंत अदृश्य असतो.

यास्तव माझ्या प्रिय पुत्रा, राजदर्शनाचा व मंत्र्याच्या पराभवाचा उपाय एकदम आरंभावा. आपला प्रयत्न व हळु हळु केलेला अभ्यास यांच्या योगानें त्या दोघांचें संपादन केलेंस ह्मणजे तुला तो विस्तीर्ण प्रदेश प्राप्त होईल. तुझा अभ्यास ज्ञानरूपानें परिणत झाला ह्मणजे तूं निःशोक प्रदेशास जाऊन पोंचशील. ज्यांचे सर्व आयास क्षीण झाले आहेत, ज्यांचें चित्त सदा आनंदित आहे व ज्यांचे सर्व संशय शांत झाले आहेत, असे साधू त्या प्रदेशांत रहातात. पुत्रा, आतां तो देश कोणता तें सर्व मी तुला सांगतों.

बाळा, त्या देशाचें नांव मोक्ष असें आहे. त्यांत दुःखाचा गंधही नसतो. तेथील राजा सर्वपदातीत आत्मा. त्यानें मनाला मंत्री केलें आहे. मातीचा गोळा जसा घट होतो अथवा धूर मेघरूप बनतो त्याप्रमाणें मनामध्यें वासनात्मक सूक्ष्म भावानें स्थित असलेलें हें जग स्थूलतेस प्राप्त झालें आहे. त्याला जिंकलें असतां सर्व जिंकल्यासारखें व सर्व मिळविल्यासारखें होतें. पण तें दुर्जय आहे. यास्तव त्याला युक्तीनेंच जिंकावें लागतें.

बलि—बाबा, चित्ताला जिंकण्याची जी उत्तम युक्ति असेल तीच अगोदर मला सांगा, म्हणजे मी त्या दारुण मंत्र्याला जिंकून सोडतों.

विरोचन—बा पुत्रा, सर्व विषयाविषयीं सर्वथा अनास्था हीच मनोजयाची उत्तम युक्ती आहे, याच उत्कृष्ट उपायानें स्वमनोरूपी महामत्त हत्तीचें दमन करितां येते. अभ्यासावाचून ही युक्ति अन्यत्र दुष्प्राप असून चांगल्या अभ्यासानें ती सुलभ होते. क्रमानें अभ्यास करूं लागलें असतां ही विषयाविषयींची अरति, रोज पाणि घालीत असलेल्या वेलीप्रमाणें, शांत्यादिकांच्या योगानें चांगली पोसते. पेरल्यावाचून जसें धान्य मिळत नाहीं त्याप्रमाणें अभ्यासावाचून नुसत्या इच्छेनें ही मिळत नाहीं. संसाररूपी खळग्यांत लोळत पडलेले हे सर्व जीव विषयाविषयीं विरक्त झाले नाहींत, तोंच दुःख भोगतात. अति बलाढ्य पुरुषालाही चालून गेल्यावाचून जसें दुसऱ्या गांवास पोंचतां येत नाहीं त्याप्रमाणें अभ्यासावाचून विषयविरक्ति कधींही प्राप्त होत नाहीं. ध्येयत्यागाचें सतत ध्यान करणाऱ्या पुरुषानें अभ्यासानें तिला वाढवावें. पुरुष-प्रयत्नावाचून हर्ष-क्रोधरहित क्रियाफळ प्राप्त करून घेण्यास अनुकूल असलेलें साधन मिळत नाही. दैवानेंच तें मिळेल म्हणून म्हणावें तर दैव देहासारखें प्रत्यक्ष दिसत नाहीं. कारण

आपल्या नियति-प्रयुक्त शुभाशुभ क्रियेलाच मानुषदृष्टि पुरुष दैव म्हणतात. दिव्य व शास्त्रीयदृष्टी पुरुष म्हणत नाहींत. पण त्या नियतिरूप दैवाला पुरुष-यत्नानें जिंकतां येतें. यत्नानें जसा जसा संकल्प करावा तसें तसें सर्व होतें. हीसुद्धां एक नियतिच आहे. आमच्या मतीं जीव मनच आहे. यास्तव तो जशी कल्पना करतो तसें होतें. चित्त नियत पदार्थांस अनियत करतें व अनियत वस्तूंस नियत करतें. यास्तव चित्त नियतिनियोजक आहे. स्वसंकल्पाप्रमाणें तें फल-नियतीचेंही उपपादक आहे आणि असा नियम असल्यामुळेंच, मोक्ष-योग्य जन्मामध्यें हा चित्तात्मा जीव केवळ परमार्थविषयक साक्षात्कार-नामक निर्विकल्पसमाधि-रूप नियति करीत या ब्रह्मांडामध्यें, आकाशांतील वायूप्रमाणें, स्वरूपानें प्रकाशित होऊं लागतो ( म्हणजे मी आनंदात्मा आहे, अशा भावनेनें तो स्वतः आनंदरूप होतो ). व्युत्थानसमयीं तोच शास्त्ररूप नियतीनें नेमलेलें स्वाश्रमोचित कर्म अज्ञ जनाच्या ज्ञानाकरितां करीत असतांना शिष्ट, सदाचारप्रवर्तक इत्यादि सन्मानयुक्त नावांनीं प्रख्यात होतो. यास्तव मन असेपर्यंत नियति नाहीं व दैवही नाहीं आणि त्याचा अस्त झाला की, हे साधो, जें जसें राहील तें तसेंच असूं दे. जीव, कर्म व ज्ञान यांच्या संपादनास योग्य असलेल्या मानुषादि शरीरास प्राप्त होऊन जसा संकल्प करितो तसें सर्व होतें. या जगात पुरुषार्थावाचून कांहीं नाहीं. यास्तव दृढ पुरुषार्थाचा आश्रय करून भोगाविषयीं विरक्त व्हावें. संसाराचा नाश करणारी भोगांची अरति जोंपर्यंत उत्पन्न झालेली नसते तोंपर्यंत जय देणारी परा शांति प्राप्त होत नाही. भोगरति असेपर्यंत दुःखद भवदशा संपत नाहींत. यास्तव पुत्रा, परमार्थ चिंतन करावें. वैराग्यादिकांचा सतत अभ्यास केल्यास सर्व दुःखाचा नाश होणें, अगदीं साहजिक आहे.

**बलि**—प्रभो, नित्य आत्मभाव देणारी जीवाची भोगविरक्ती स्थिर कशी होईल?

**विरोचन**—ज्याप्रमाणें द्राक्षादि महालता अनुकूल काळ आला असता फळांनीं भरून जाते त्याप्रमाणें मोक्षफल देणारी आत्मदर्शन-लता वैराग्य-नांवाचें अवांतर फळ देते. आत्म-ज्ञानानें तीव्र वैराग्य हृदयांत स्थित होतें. यास्तव प्रज्ञारत्नाला घांसून स्वच्छ करण्याची जणुं काय साणच अशा विचाराच्या योगानें त्या देवाचें दर्शन घ्यावें व त्याच वेळीं विषयविरक्तिही

संपादन करावी. अव्युत्पन्न चित्ताला सन्मार्गामध्यें अथवा शास्त्रीय क्रमामध्यें प्रवृत्त करावयाचें झाल्यास हळु हळुच केलें पाहिजे. प्रथम त्याला देहोपयोगी अन्न-वस्त्रादि विषय संपादन करावयास दिवसाचे दोन भाग देऊन तिसऱ्या भागांत शास्त्रावलोकन व चवथ्यात गुरुशुश्रूषा करावयास लावावें. काहीं दिवसांनीं त्याला बरेचसे शुभ संस्कार झाले म्हणजे दिवसाचा एकभाग देहयात्रेकरितां, दोन भाग गुरूंशीं सहवास करावयाकरिता व एक भाग शास्त्रावलोकनाकरिता द्यावा. गुरूच्या अमृततुल्य उपदेशानें चित्त चागलें व्युत्पन्न झालें म्हणजे त्या चित्ताला वैराग्य व विचार याच अभ्यास करावयास अर्धाकाल देऊन बाकीच्या वेळीं ध्यान व गुरुपूज यांमध्यें त्याला निमग्न करावे. पण या चारी क्रमामध्यें साधुत्वास प्राप्त झालेला ( म्हणजे ज्याचें चित्त स्वच्छ आहे असा ) जीवच अधिकारी आहे. कारण धुवून स्वच्छ केलेल्या वस्त्रावरच रंग चागला बसतो. त मग किंचित् मलिन असलेल्या चित्ताला कसे व्युत्पन्न करावें म्हणू विचारशील तर सांगतों. त्या चित्तबालकाला दुःखाचा अन्वय व व्यतिरेक दाखविणें ( म्हणजे विषयासक्त झाल्यास हें पहा असें दुःख होतें न झाल्यानें हें पहा सुख होतें इत्यादि उदाहरणें देऊन सांगणें ) ही युक्ति वेद, स्मृति, इतिहास इत्यादि उत्तम उक्ती व शास्त्रपीरशीलन याच्या योगा हळु हळु लावावें. म्हणजे कांहीं दिवसानीं तें चित्त शुद्ध होऊन प ज्ञानामध्यें परिणत होतें. बाह्य आकार ग्रहण करणें हा त्याचा आग्रह निघू जातो आणि ज्याच्यावर चांदणें पडलें आहे अशा स्फटिकाप्रमाणें स्वच्छ व शीत होतें. भेदवैषम्य, कौटिल्य इत्यादि दोषानीं रहित व भोग ईश्वर, जीव, देह व इंद्रियादि या सर्वांचें अधिष्ठान, आनंदाद्वय, ब्रह्मस्वरू ब्रह्माकार प्रज्ञेनें पहावें. प्रज्ञा व विचार यांच्या योगानें आत्मज्ञान व तृष्ण त्याग यांना एकाच वेळीं संपादन करावें. परमात्म्याचें दर्शन झालें म्हण वैराग्य पूर्ण बाणतें व तृष्णेचा अभाव झाला म्हणजे परमात्मदर्शन हो म्हणजे तीं दोन्हीं परस्परांच्या आधारानें रहातात. विषयभोगांचा स्वा कमी झाला व परात्पर देवाचें दर्शन झालें म्हणजे परब्रह्मामध्यें अनत शाश्वत विश्राति उदय पावते. विषय हेंच या जगांतील सार आहे त्यांतच आनंद आहे, असें जाणून त्यांचाच स्वाद घेणाऱ्या जीवांना नि तिशय आनंद कधीं प्राप्त होत नाहीं. यज्ञ, दान, तप, तीर्थसे

इत्यादिकांच्या योगानें सुख होतें, नाहीं असें नाहीं. पण तें विषयसुखच होय. ( व विषयसुख विनाशी असते, हें ठरलेंच आहे ) यास्तव त्याच्या-पासून भोगवैराग्य उद्भवत नाहीं. तर तें आत्मभावाच्या साक्षात्कारानेंच उद्भवतें. भोगवैराग्याभ्यासरूपी पुरुषाच्या प्रयत्नावाचून दुसऱ्या कोणत्याही उपयानें बुद्धि आत्मदर्शनामध्यें प्रवृत्त होत नाहीं. भोगत्यागानें प्राप्त झालेल्या परमार्थावाचून ब्रह्मपद विश्रांतिसुख मिळत नाहीं. कारण तें या आब्रह्मस्तबपर्यंत जगात कोठेही नसतें. यास्तव दैवाला दूर सारून, पौरुष प्रयत्न करून, प्राज्ञ पुरुषानें परम कल्याणास प्रतिबंध करणाऱ्या भोगांना तुच्छ करून सोडावे. कारण भोगाचा तुच्छ भाव दृढ झाला म्हणजे विचार उत्पन्न होतो. समुद्र व मेघ यांच्याप्रमाणेंच विचाराच्या योगानें भोगनिंदा व भोगनिंदेनें विचार पूर्ण होतो. भोगवैराग्य, विचार व शाश्वत आत्मदर्शन अति स्निग्ध मित्राप्रमाणें परस्परास वाढवितात पण त्यातूनही प्रथम दैवाचा अनादर करून पौरुष प्रयत्नानें ( दात आवळून ) भोग-विरक्ति संपादन करावी. उपायानें सर्व सुसाध्य होतें. यास्तव मी आतां भोगविरक्तीचा उपाय सांगतो.

देशाचाराच्या विरुद्ध न जाता आप्ताच्या संमतीनें व शुद्ध मार्गानें धन-संपादन करावें. नंतर धनाच्या योगानें गुणशाली सुजनाची आराधना करून त्यास वश करून घ्यावें. ( संत स्वतः विरक्त असतात. त्यामुळें त्यांना प्रसन्न करावयाचें झाल्यास वस्तुत. द्रव्याची काहीं गरज नाहीं पण सन्मार्गानें संपादन केलेल्या द्रव्याचा सत्कृत्यात व्यय केलेला पाहूनही त्यास आनंद होत असतो. यास्तव सत्कर्मात द्रव्यक्षय करून त्याचा प्रसाद संपादन करावा. ) त्याच्या समागमानें भोगनिंदा प्रवृत्त होते. भोग सर्वथा निंद्य आहेत असें वाटलें म्हणजे विचार उद्भवतो. त्यानंतर ज्ञान व ज्ञानाच्या योगानें शास्त्रार्थसंग्रह होतो. नंतर क्रमानें परम-पदप्राप्ति होते.

पुत्रा, तूंही याच क्रमानें प्रयत्न कर. विषयविरक्तीवाचून बाकीचे सर्व प्रयत्न निष्फळ आहेत. पण तूं विषयाचा त्याग करण्यास आजच जर समर्थ नसशील तर तुझें हें यौवन समाप्त होऊन वार्द्धक्य येईपर्यंत धीर धर. तोंपर्यंत तूं श्रवण, विचार, ध्यान इत्यादिकाचा अभ्यास करीत रहा. वृद्धावस्थेंत इंद्रियांच्या शैथिल्याबरोबरच विषयवैराग्य आलें म्हणजे विचार पूर्ण होऊन परम पद आपोआप हातीं लागेल. तात्पर्य विषयो-

परम अतिशय आवश्यक आहे. त्यावाचून अत्यंत पावन आत्म्यामध्यें विश्राति घेता येत नाहीं. तें नित्य सुख जर तुला लवकर हवें असेल तर विषयविरक्ति आताच संपादन कर. म्हणजे विचाराच्या योगानें तूं परम पदीं पोंचशील आणि पुनः दुःख भोगण्याकरिता कल्पनारूपी चिखलांत रुतणार नाहींस. अशा अवस्थेस पोंचलेला तूं मलाही वंद्य होशील. कारण ब्रह्मज्ञ स्वय ब्रह्म होतो असें वेदवाक्य आहे २४.

**सर्ग २५—बलीचा विचार व त्यानें केलेलें शुक्राचार्यांचे स्मरण.**

**बलि**—महा विचारी पित्यानें मला मागें सागितलेलें हें सर्व या वेळीं मला आठवलें ही मोठी आनदाची गोष्ट आहे. त्या वेळीं माझ्या मनात विषय-वैराग्य बाणलें नव्हतें; पण आता तें आपोआप आलें आहे. यास्तव त्याच्या सागण्याप्रमाणें मी आता अमृतासारख्या शीतळ व स्वच्छ शम-सुखांत प्रवेश करतो. पुनः पुन आशा पूर्ण करून घेत असताना पुनः पुनः धन मिळविताना व पुन पुन कांतेचें मनोरंजन करीत अस-तांना मला फार कष्ट होतात. खरोखर ही शातिभूमि फार रम्य आहे. तिचा अतर्भाग फार शीतळ आहे. शातिभूमीमध्यें सर्व सुख-दु खदृष्टी नाश पावतात. यास्तव मी आता शात होतों; चद्रबिंबामध्यें टाकल्या-प्रमाणें अतिशय आनंद भोगतों व सम भावामध्यें स्थित होऊन सुखानें रहातों. हर हर! वैभव स..दन करण्यात केवढें दु ख आहे! एकसारखा क्षोभ कसा होत असतो! मागें मी स्त्रियाच्या मासप्रधान शरीराच्या स्पर्शानें किती आनदित होत असे! पण तो शुद्ध मोहविलास आहे. मी आजवर नाना प्रकारच्या वैभवाचा अनुभव घेतला. विविध भोग भोगले. सर्व भूताचें आक्रमण केलें. पण त्यात खरें सुदर असें काहीं आढळलें नाहीं. पुनः तेच ते चर्वितचर्वण. स्वर्गात जा कीं भूलोकीं या, अपूर्व काहीं नाहीं. यास्तव मी आता या सर्व बाह्य कल्पनाना सोडून स्वस्थ होतों. पूर्णाहूनही पूर्ण होऊन रहातों. त्रिभुवनात स्त्रिया, रत्नें, इत्यादि जें जें म्हणून आज सारभूत असल्यासारखें वाटतें तेंच उद्या असार होते. तुच्छ जगाच्या लोभानें मी देवाशीं व्यर्थ द्वेष केला. खरोखर तो माझा बालिश-पणाच आहे. केवल मनानें निर्मिलेल्या या जगत्-नामक महा-आधीनें सर्वांना जर्जर केलें आहे. यास्तव महात्मे त्याच्यावर प्रेम कसे करणार! हाय हाय इतके दिवस मीं मूढानें अनर्थालाच स्वार्थ समजून व्यर्थ क्लेश

भोगले. चंचल तृष्णेच्या नादीं लागून मी अज्ञानें आपल्याच पश्चातापा-करितां या त्रिभुवनांत काय काय केलें नाहीं ! पण आतां ही तुच्छ पूर्व चिंता जाऊं दे. सांप्रतकालीं विद्यमान असलेल्या मोहाची चिकित्सा करून मी आतां अगोदर या पुरुष-जन्माचें साफल्य कोणत्या उपायानें होईल त्याचा विचार करतों. अपरिच्छिन्न ब्रह्मरूप झाल्यामुळें मला पूर्णानंद कसा प्राप्त होईल ? याविषयीं आतां मी आपल्या शुक्राचार्यांना तरी विचारितों. मी कोण व आत्मा कोण, याचा निर्णय होण्याकरितां त्या गुरूंनाच प्रश्न करावा, हें बरें. त्यावाचून माझ्या अज्ञानाची शांति होणार नाहीं. ते माझे नाथ मला आत्मदर्शनोपाय सांगतील. आतां मजवर प्रसाद करण्यास सदा उद्यत असलेल्या त्याच परमेश्वररूप आचार्यांचें मी स्मरण करितों व त्या आत्मज्ञानीं मला आत्मोपदेश केला म्हणजे मी स्वतः आत्मरूप होऊन राहीन. कारण महात्म्याचा उपदेश निष्फळ कधींही होत नाहीं २५.

**सर्ग २६**—स्मरण करितांच आलेल्या शुक्राचार्यांनीं बलीस तत्त्वसारोपदेश करून स्वर्गलोकीं गमन केलें.

**श्रीवसिष्ठ**—रामा, असा विचार करून बलवान् बलीनें डोळे झांकून ब्रह्माकाश हेंच ज्याचें विश्रांतिस्थान आहे अशा कमलनयन शुक्राचें स्मरण केलें. तेव्हां सतत ध्यानपरायण झालेला भार्गव, ब्रह्मरूप झालेला असल्यामुळें, गुरूच्या सहायाची इच्छा करणाऱ्या बलीनें आपलें स्मरण केलें आहे, असें तत्काल जाणून त्याच्या पूर्वोक्त वातायनांत आला. त्या सर्वगत अनंत चिदात्म्यानें आपल्या शरीराला तेथें आणलें. सूर्यप्रभेचा स्पर्श होताच कमल जसें विकास पावतें त्याप्रमाणें गुरूच्या देहप्रभेचा स्पर्श शरीरास होतांच बलि देहभानावर आला. गुरुमूर्तीला समोर पहातांच त्या भक्तिमान् शिष्यानें रत्नें व मंदार पुष्पें यानीं युक्त असलेलें अर्घ्य देऊन पादवंदन केलें. आचार्यांनींही हस्त पादप्रक्षालन व आचमन करून, मूल्यवान् आसनावर बसून, थोडीशी विश्रांति घेतली. नंतर—

**बलि**—प्रभो, सूर्यप्रभा प्राण्यांना आपल्या उचित कार्यांत जशी प्रवृत्त करिते त्याप्रमाणें तुमच्या प्रसादानें उत्पन्न झालेली प्रतिभा मला मनांतील आशय बोलून दाखविण्याविषयीं प्रेरणा करीत आहे. महामोहांत पाडणाऱ्या भोगांविषयीं मी विरक्त झालों आहें. यास्तव गुरुवर्य, या भोगांच्या उत्कर्षाचा अवधि कोठवर आहे ? त्यांचा स्वभाव काय आहे ! मी, आपण

इत्यादि जीव म्हणजे काय गौडबंगाल आहे ? व या भोग्य वस्तूंचें तत्त्व काय आहे, तें मला सत्वर सांगा.

**श्रीशुक**—दानवेंद्रा, उगीच अधिक सांगत बसण्यांत कांहीं अर्थ नाहीं. शिवाय मला आकाशांत जावयाचें आहे. यास्तव तुझ्या प्रश्नाचें उत्तर मी संक्षेपतः देतों तें ऐक. या जगांत चित् आहे. ह्या दृश्याच्या उत्कर्षाचा अवधि चित् आहे. हें सर्व चिन्मय आहे. तूं, मी इत्यादि सर्व भोक्तृ-वर्ग चित्च आहे व हें सर्व भोग्यजातही चित्च आहे. राजन्, मी सांगितलेल्या या संक्षिप्त तत्त्वबोधावर पूर्ण श्रद्धा ठेवून तूं जर विवेक केलास तर खचित या अल्प उपदेशापासूनच तुला सर्व प्राप्त होईल. पण श्रद्धा व विवेक यांच्या अभावीं तुला कितीही जरी सांगितलें तरी तें सर्व राखेंत टाकलेल्या आहुतीप्रमाणें व्यर्थ होणार आहे. चित्-तत्त्वानें विषयाकार होणें हाच बंध व त्या आगंतुक आकारापासून मुक्त होणें हाच मोक्ष होय. कारण विषयाकाररहित चित् म्हणजे पूर्णात्माच होय, अशा निश्चयानें जर पहाशील तर आपोआप तुला आत्मसाक्षात्कार होईल. असो; दैत्या, आतां मी देवलोकास जातों. कारण तेथें सात मुनी कांहीं देवकार्याकरिता जमले आहेत. तेव्हां मलाही तेथें अवश्य गेलें पाहिजे. कारण हे राजन्, जोंपर्यंत हा देह आहे तोंपर्यंत मुक्तबुद्धि पुरुषानाही स्वभावतः प्राप्त होणाऱ्या क्रियांचा त्याग करणें शोभत नाहीं.

रामा, असें बोलून भार्गव ग्रहगणांनीं सुशोभित झालेल्या अंतरिक्षांत उडून गेला. २६.

**सर्ग २७**—शुक्रानें सांगितलेल्या मार्गानें विचार करितांच बलीला ज्ञान झालें व चित्पूर्णानंद-विश्रांति घेत तो दीर्घ काल राहिला.

**श्रीवसिष्ठ**—देव व दानव यांच्या सभेंत श्रेष्ठ मानला गेलेला भृगुपुत्र गेला असता बुद्धिमानांतील श्रेष्ठ बलि मनानें असा विचार करूं लागला—

पूज्य शुक्राचार्यांनीं सांगितलें तें अगदीं योग्य आहे. हें जगत्त्रय चित्च आहे. मी चित, हे लोक चित् व क्रिया चित् होय. हें सर्व सबाह्याभ्यंतर परमार्थतः चित्च आहे. त्यावाचून येथें कोठेंही कांहीं नाहीं. 'हा सूर्य' अशा रीतीनें चित्-नें सूर्याला प्रकाशित न केल्यास सूर्य व अंधकार यांचा भेद कसा व्यक्त होणार ? कारण सूर्याच्या ज्ञानाभावीं तोही अंधकारासारखाच असतो. 'ही भूमि' अशा रीतीनें आत्मप्रकाशानें भूमीला जर

प्रकाशित न केलें तर ती असली काय व नसली काय सारखीच. तात्पर्य दिशा, पर्वत, जगत, आकाश, इत्यादि सर्व चित्प्रकाशानेंप्रकाशित होतें. या दगडा सारख्या शरीरास चैतन्यानें सचेतन न केल्यास त्याला शरीर कोण ह्मणणार? साराश इंद्रियें, मन, इच्छा, प्रयत्न, इत्यादि सर्व चित्. या परमात्मरूप चिच्छक्तीनेंच मी बोलतों, चालतो, पहातो, स्पर्श करतों व दृश्य पदार्थांचा भोग घेतों. नुस्त्या शरीरानें, इंद्रियानी अथवा मनानें मी काहीं करीत नाहीं. लाकूड अथवा पाषाण यासारख्या या शरीरानें मी काय करूं शकणार? सर्व जगाचा चेतनात्मक आत्मा मी आहें. मी चित्च आकाशात, सूर्यादि तेजात, वायु, जल व पृथ्वी या तीन भूतांत, देव, असुर इत्यादिकाच्या देहात व चराचर पदार्थांत आहें. चित्-वाचून येथें दुसरी कल्पनाच नाहीं. द्वित्वाचाच असंभव झाल्यावर शत्रु कोण व मित्र कोठचा? या बलिनामक शरीराचें भासुर मस्तक जरी तोडलें तरी त्यात सर्व लोकास व्यापून राहणाऱ्या मज चित्ची कोणती हानि आहे? चित्नें ज्याला चेतित केले आहे असा द्वेषच द्वेष होतो, त्यावाचून तो होत नाहीं. यास्तव द्वेषादि सर्व भाव व अभाव चिदात्मक आहेत. या विस्तीर्ण त्रिभुवनोदरात कितीही विचार केला तरी चित्-वाचून दुसरें काहीं आढळत नाहीं. वस्तुतः द्वेष नाहीं, राग नाहीं, मन नाहीं, त्याच्या वृत्ती नाहींत. कारण अतिशुद्ध चेतन्याचे ठायीं ह्या विकल्पकलना कोठच्या असणार? सर्वग, व्यापी व नित्यानंदमयात्मक चित् मी आहे. मजमध्यें द्वितीयांश नाहीं. जगाचें रूप व नाम याचें अधिष्ठान अशा या चित्चें चित् हें नावसुद्धा कल्पित आहे. मी कोण? या प्रश्नाचें उत्तरही माझें मलाच मिळालें आहे. दृश्यदर्शनरहित केवळ शुद्धस्वरूपी, नित्योदित, निराभास व द्रष्टा परमेश्वर मी आहे. मजमध्यें स्फुरण पावणारें हें सर्व दृश्य आरशांतील मुखाप्रमाणें मिथ्या आहे. माझ्या प्रत्यक्चेतन स्वरूपास नमस्कार असो. मी आकाशाहून मोठा व अणूहून अणु आहें. सर्व मी आहें. त्यामुळें कोणीं कोणाला कांहीं दिलें अथवा घेतलें, कोणी कोणाला मारलें अथवा सुख दिलें, कोणी कोणाशीं द्वेष केला अथवा प्रेम ठेवलें तरी तें सर्व माझें माझ्याशींच होत असल्यामुळें मला क्षुब्ध होण्याचें मुळींच कारण नाहीं.

राघवा, परम तत्त्वज्ञ बलि असा विचार करीत, ओंकाराच्या अर्धमात्रेच्या अर्थ अशा तुरीय आत्म्याचें ध्यान करीत मौन धरून बसला. त्याचे सर्व

संकल्प शांत झाले. सर्व वृत्ती लीन झाल्या. तो निःशंक व त्रिपुटीशून्य झाला. त्या निर्मलचित्त दैत्याच्या सर्व वासना शांत झाल्या. महापदास प्राप्त झालेला बलि वायुरहित प्रदेशांतील दिवसाच्या ज्योतीप्रमाणें निश्चल झाला. त्याचें चित्त अगदीं शांत झालें आणि तो महात्मा त्याच अवस्थेंत दगडावर खोदलेल्या चित्राप्रमाणें, त्या वातायनांतच फार दिवस राहिला. बलि इच्छा नसल्यामुळें परिपूर्ण, मननदोषरहित व निर्मल सत्तेनें युक्त झाल्याकारणानें शरदृतूतील स्वच्छ आकाशाप्रमाणें शोभूं लागला २७.

**सर्ग २८**—बलीला निश्चेष्ट पाहून दानव खिन्न झाले पण स्मरण करतांच आलेल्या शुक्रानें त्याच्या स्थितीचें वर्णन करून त्यांचा शोक घालविला.

**श्रीवसिष्ठ**—नंतर कांहीं दिवसानीं बलीचे अनुचर दानव आपला स्वामी एकटाच बसून वर काय करीत आहे, तें पहाण्याकरितां त्या रम्य मंदिराच्या माडीवर गेले. त्यांत त्याचे डिंभादि मंत्री, कुमुदादिक सामंत, सुरादिक राजे, वृत्तादिक सेनाध्यक्ष, हयग्रीवादिक सैनिक, चाक्राजादिक बांधव, लडुकादिक मित्र, वल्कादिक आप्त, कुबेर, यम, इंद्र इत्यादि हातांत भेटी घेऊन आलेले देव, या अधिराजाची सेवा करावयास आह्माला अवकाश केव्हां मिळतो म्हणून वाट पहाणारे यक्ष, विद्याधर व नाग, चवऱ्या वारणाऱ्या रंभा–तिलोत्तमादिक श्रेष्ठ स्त्रिया, सागर, नद्या, पर्वत, दिशा व उपदिशा यांच्या देवता आणि त्रैलोक्यवासी दुसरेही अनेक सिद्ध तेथें त्या दानवराजापाशीं आले. ते सर्व उचित कार्यें करून त्याला प्रसन्न करण्याची इच्छा करीत होते. पण ध्यान व मौन यांचा आश्रय करून चित्रांत काढलेल्या पर्वताप्रमाणें निश्चेष्ट झालेल्या त्याला त्यांनीं मोठ्या आदरानें पाहिलें. सर्वांनीं त्याला दुरूनच प्रणाम केला. पण दानव त्याची ती अपूर्व दशा पाहून खिन्न व विस्मित झाले. देवांना आनंद झाला व बलीचे आप्त भयभीत झाले. मंत्र्यांनीं पुष्कळ विचार केला व सर्वज्ञांतील श्रेष्ठ भार्गवाचें स्मरण केलें. त्याबरोबर त्यांना कल्पित गंधर्वनगराप्रमाणें शुक्राचें तेजःपुंज शरीर दिसलें. देव व असुर त्याची पूजा करूं लागले व त्यांच्या सत्काराचा स्वीकार करीत गुरु उचित आसनावर जाऊन बसला. त्यानें ध्यान करीत, मौन धारण करून बसलेल्या दानवेश्वरास पाहिलें व क्षणभर विश्रांति घेतल्यावर बलिराजाच्या त्या निश्चेष्टतेचा चांगला विचार करून तो तेथील सर्व दानवांस हंसत म्हणाला

"दैत्यांनो, हा तुमचा स्वामी आपल्या विचारानेंच सर्वाधिष्ठान ब्रह्मास प्राप्त झाला आहे. खरोखर ही फार मोठी गोष्ट आहे. हा भगवान् बलि आतां सिद्ध झाला आहे. यास्तव याला आतां येथें असाच राहूं द्या. निरतिशय आनदरूप आत्म्यामध्यें याला स्थित होऊं द्या. याला निरुपद्रव पद पाहूं द्या. फार दिवसांपासून भोग्य वस्तूंचें संपादन करण्यांत निमग्न झालेला हा श्रांत झाला आहे. यास्तव याला आतां विश्रांति घेऊं द्या. याचा चित्तभ्रम क्षीण झाला आहे. याची संसारकलना शांत झाली आहे. यास्तव दानवांनो, आतां अगदीं मुकाट्यानें बसा. अज्ञान-संकटांतून सुटलेल्या याला आत्मलोक प्राप्त झाला आहे. यास्तव व्यर्थ कोलाहल करून तुम्ही याच्या आत्मसुखात विघ्न आणूं नका. हा योग्यसमयीं आपोआप देहभानावर येईल. हा राजा एक सहस्र वर्षांनीं समाधि सोडून उठेल. तोंपर्यंत श्रेष्ठ मंत्र्यानो, तुम्ही राजकार्ये सभाळा."

गुरूचें हें आशाजनक भाषण ऐकून, वृक्ष जसे शुष्क मंजिऱ्यांचा त्याग करितात त्याप्रमाणें, सर्व दैत्यांनीं राजाविषयींची शोकमय चिंता सोडली व ते सर्व पूर्वीच्या व्यवस्थेप्रमाणेंच एक मोटी सभा स्थापन करून आपापला व्यवहार आनंदानें करू लागले. मानव, सर्प, देव इत्यादि इतर जे तेथें आले होते ते सर्व आपापल्या स्थानीं गेले २८.

**सर्ग २९**—जीवन्मुक्त बलीची राज्यश्री, पाताळांत अडकून रहाणे, रामाला बलीप्रमाणें होण्याचा उपदेश.

**श्रीवसिष्ठ**—राघवा, त्यानंतर दिव्य सहस्र वर्षे झालीं असता बलि समाधि सोडून उठला व त्यामुळें त्याच्या नगरात मोठा आनंद झाला. पण त्याचे मत्री त्याच्याकडे येत तों तो असा विचार करूं लागला.—

अहो, या समाधीचें सुख किती अवर्णनीय आहे! मी हा एक क्षणभरच या स्थितींत होतों; पण त्या थोड्या काळांतही माझ्या चित्ताला केवढी विश्रांति मिळाली आहे म्हणून सांगूं! या बाह्य विभूतींचा कितीही जरी उपभोग घेतला तरी त्यामुळें काय होणार! या विवेकाख्यरूप उत्तम सिद्धीपासून मला जसा आंतल्या आंत संतोष होत आहे तसा चंद्रबिंबामध्यें जाऊन राहिल्यानेंही होणें शक्य नाहीं.

रामा, बलि असा जों विचार करीत आहे तों त्याचे मंत्री व इतर दैत्य

त्याच्याकडे आले व सभोंवार उभे राहिले. प्रणाम करून उभ्या राहि-लेल्या त्यांच्याकडे पाहून तो पुनः मनांत विचार करूं लागला.

जिचे सर्व संकल्प क्षीण झाले आहेत अशा चितूला ग्राह्य काय आहे? कांहीं नाहीं. पण बाह्य अर्थ ग्राह्य आहेत अशा कल्पनेनें मन त्यांकडे पाहूं लागलें म्हणजे त्याच्या ठिकाणीं आसक्तिरूप मळ उद्भवतो. नुस्त्या पाहण्यानें तें कांहीं मलिन होत नाहीं. तेव्हां मी समाधि लावून बसूं कीं व्यवहार करूं? मोक्षाच्या इच्छेनें समाधीचाच अवलंब केला पाहिजे म्हणून म्हणावें तर मला मुळीं मोक्षाची इच्छाच नाहीं. जो बद्धच नाहीं तो मुक्त होण्याची इच्छा काय म्हणून करील? कोणी बांधलेलें नसतांनाही मोक्षाची इच्छा करणें हा शुद्ध बालिशपणा आहे. मला बंध नाहीं व मोक्षही नाहीं. माझी मूर्खता क्षीण झाली आहे. तेव्हा मला आता, मनाला विषयासक्त होऊं न देता केवळ साक्षिरूपानें जगाचा व्यवहार पहाण्यास कोणती हरकत आहे! मी नुसत्या ध्यानामध्येंच आसक्त का व्हावें? मी पुरुष आहें. यास्तव आता यदृच्छेनें जें यावयाचें असेल तें येवो व जें जावयाचें असेल तें जावो. मला त्यामुळें हर्ष होणार नाहीं व शोकही होणार नाहीं. मला आतां कशाचीही इच्छा राहिलेली नाहीं. मी संतापशून्य झालों आहें. मला परतत्त्वाची वांछा नाहीं व जगत्स्थितीचीही आकांक्षा नाहीं. मला ध्यानाशीं कांहीं करावयाचें नाहीं व वैभवाशीं कांहीं कर्तव्य नाहीं. मी मृत नाहीं व जीवंतही नाहीं. सत् नाहीं व असतही नाहीं. हें शरीर माझें नव्हे व त्याच्या पलीकडे असलेले विषयही माझे नव्हेत. मज ब्रह्मरूपाला नमस्कार असो. हें राज्य असो कीं नसो, मी आत्मस्वरूपांत शीतल असणार. मला ध्यानाला घेऊन काय करावयाचें आहे व राज्यवैभवाला तरी घेऊन काय करावयाचें आहे? जें जसे असेल तसें असो. मला स्वतः जर कांहीं करावयाचेंच नाहीं तर प्राप्त व अभ्यस्त कर्म करणाऱ्या या शरीराला तरी मी काय म्हणून प्रतिबंध करावा? मनाला त्याच्या मार्गोमाग जाऊन त्यांत आसक्त होऊं दिलें नाहीं कीं, माझी कांहीं एक हानि होणें शक्य नाहीं.

असा विचार करून ज्ञानानंदपूर्ण बलीनें दैत्यांकडे पाहिलें. वायु जसा पुष्पांचा सुगंध घेतो त्याप्रमाणें त्यानें केवळ दृष्टिपातानेंच सर्व दैत्यांचे प्रणाम घेतले व तो पूर्वोक्त ध्येयवासनात्यागानें सर्व राजकार्यें करूं

लागला. देव, ब्राह्मण व गुरु यांची त्यानें पूजा केली. सुहृत्, संबंधी, बांधव, सामंत व इतर सज्जन याचा सन्मान केला. भृत्यांस देणग्या व याचकांस दानें दिलीं आणि विचित्र वैभवाच्या योगानें कलनांचीं मनें प्रसन्न केलीं.

याप्रमाणें बलीचें राज्य वृद्धि पावलें. त्याची आज्ञा देवादि सर्व शिरसा मान्य करूं लागले. काहीं दिवस या स्थितींत गेल्यावर त्या ज्ञानी दानवेश्वराला यज्ञ करावा अशी इच्छा झाली. त्याप्रमाणें त्यानें शुक्रादि मुख्य मंत्र्यांसह अश्वमेध केला. त्या यज्ञात सर्व भुवन तृप्त झालें. देव व ऋषी यानींही त्या यज्ञाची फार प्रशसा केली. पण हा बलि भोगार्थी नाहीं, मोक्षार्थी आहे, असा निर्णय करून त्याचें इष्ट करण्याकरिता सिद्धि देणारा माधव त्याच्या यज्ञात आला आणि केवळ भोगांकरिता दीन झालेल्या व त्यामुळेच कीव करण्यास योग्य असलेल्या वडील इंद्राला जगज्जगलाचा तुकडा देण्याच्या उद्देशानें बलीला बाह्य दृष्टया फसवून पण अतर्दृष्टया त्याचें कोटकल्याण करून त्या पापहारक हरीनें मायाबलानें तीन पावलानीं तीन्हीं भुवनें त्याच्यापासून हिरावून घेतलीं व त्याला तळघरातील माकडाप्रमाणें पाताळात बांधून ठेवलें. रामा, सांप्रतकाळीं तो ध्यानात निमग्न होऊन जीवन्मुक्त स्थितींत स्वस्थ राहिला आहे. त्याचें प्रारब्ध त्याला इंद्रत्व देणार आहे. म्हणून तो त्याकरिता अद्यापि शरीर धारण करून जीवन्मुक्ताच्या गतीचा अनुभव घेत आहे. तो महात्मा आपत्ति व सपत्ति याना समदृष्टीनें पहातो. त्याची बुद्धि सुख-दुःखप्रसगीं चित्रातील सूर्यमंडलाप्रमाणें स्थिर रहाते. जीवनाविषयीं आस्था ठेवणाऱ्या भोगलंपट जीवाचे सहस्रावधि उत्कर्ष व अपकर्ष दीर्घकाळ पहात राहिल्यामुळें त्याचें मन भोगाविषयीं अतिशय विरक्त झालें. असंख्य सुखदु.खाचे उत्पत्तिविनाश, जीवाची चचल सपत्ति व अस्थिर विपत्ती याचा बलिराजानें दीर्घ काल अनुभव घेतला व त्यामुळें त्या विचारवानाला दहा कोटी वर्षें पाताळाचें राज्य केल्यावर पूर्ण विरक्ति आली. त्याचें मन शांत झालें. भोगाचा अभिलाप सोडल्यामुळें बलीचें मन तृप्त झालें. तो आत्माराम होऊन सतत पाताल-गुहेंत राहिला. त्रिभुवनाच्या ऐश्वर्यापासून भ्रष्ट झाल्याबद्दल त्याला मुळींच वाईट वाटलें नाहीं. तो सर्व भावांमध्यें सम व संतुष्ट चित्त झाला. जें कर्तव्य प्राप्त होईल तें स्वस्थ मनानें करावयाचें अशी त्याची शैली असल्यामुळें तो महात्मा स्वयं आनंद झाला.

राघवा, बलीची ही ज्ञानप्राप्ति मी तुला सांगितली आहे. त्याच्या दृष्टीचा आश्रय करून तूंही जीवन्मुक्त हो. सतत आत्मविचार करून मी नित्य आहें, असा निश्चय कर. म्हणजे आत्मप्रयत्नानें तूं अद्वैत-पदास प्राप्त होशील. असुरश्रेष्ठ बलिही दहा कोटी वर्षें त्रिभुवनाचें राज्य करून शेवटीं विरक्त झाला. यास्तव बा साधो, भोगभार दुःखपर्यवसायी आहे, असें जाणून त्याचा त्याग कर व दुःखरहित सत्य आनंदपदास जा. रामा, या दृश्यदृष्टी नानाप्रकारचे विकार देणाऱ्या आहेत. यास्तव दुरून डोंगर जरी साजरे दिसले तरी त्यांना जसे कोणी रम्य समजत नाहींत त्याप्रमाणें तूं त्याना रम्य समजूं नकोस. लोकवृत्तीमध्यें इतस्ततः धावणाऱ्या व लोळणाऱ्या चित्ताला आपल्या हृदयगुहेमध्यें बांधून स्थिर कर. चित्सूर्य तूंच आहेस. तूं जगामध्यें सर्वत्र स्थित आहेस, मग तुला परका कोण व आपला कोण? व्यर्थ का भुलतोस. हे महाबाहो, तूं अनंत, आद्य व पुरुषोत्तम असून तूंच चिच्छरीरी शेकडों पदार्थांच्या आकारानें स्फुरण पावतोस. हें सर्व स्थावर-जंगम जग माळेच्या दोऱ्यातील मण्याप्रमाणे शुद्ध बोधरूप अशा तुझ्या ठायीं ओतप्रोत आहे. तूं उत्पन्न होत नाहींस व मरत नाहींस. तूं पुरुष, अज व नानाप्रकारें जगद्रूपानें भासणारा आहेस. तूं शुद्ध चित् आहेस तुला जन्म-मरणभ्रांति न होवोत. तृष्णेची वृद्धि झाली असता जन्मादि सर्व रोगाचे प्राबल्य होतें व तिचा क्षय झाला असता ते दुर्बल होतात, असें अन्वय-व्यतिरेकावरून जाणून तूं भोगांची तृष्णा सोड व भोगसाक्षि चिन्मात्र होऊन रहा. सदा उदय पावलेला तूं जगन्नाथ चित्सूर्य अस्तित्वात असल्यामुळेंच हें सर्व संसारस्वप्नभूषण भासतें. व्यर्थ विषाद करूं नकोस. तूं सुख-दुःखशून्य सर्वात्मा, सर्वपदार्थावभासक व प्रबुद्धचित्त आहेस. कदाचित् मी प्रबुद्ध-चित्त नाहीं, असें जर तुला वाटत असेल तर त्याकरितां उपाय कसा करावा, तें सांगतों; ऐक. प्रथमतः तुझ्या मनाला जें जें इष्ट वाटत असेल तें तें अनिष्ट आहे असें समज व याच एका साधनाचा सातव्या भूमि-केचा परिपाक होईपर्यंत अभ्यास करून मनोजय झाला, कीं मग हें साध-नही टाक. इष्ट व अनिष्ट-दृष्टि सोडली म्हणजे नित्य समता उदय पावते व ती हृदयांत स्थिर झाली कीं प्राणी पुनः जन्म घेत नाहीं. ज्या ज्या प्रदेशामध्यें मन बालकाप्रमाणें निमग्न होतें. तेथून तेथून त्याला परतवून

तत्त्वाकडे लावावें व मत्त पशूप्रमाणें तें संकल्पीचें झालें म्हणजे त्याला आत्म्यामध्येंच निश्चयरूपी दाव्यानें घट्ट बांधून सोडावें. या एकभावनेनें परमहित होतें. संकल्पांस विकलेल्या व शरीरच सत्य आहे, असें जाणणाऱ्या मूढदृष्टी प्राकृतांसारखा तूं होऊं नकोस. स्वतः विचार करण्यास असमर्थ असलेल्या पराधीनप्रज्ञांचें मौर्ख्य हाच मोठा अनर्थ आहे. आत्मविचारास अवश्य लागणारें विवेक-वैराग्यादि धन त्यांच्यापाशी नसतें. म्हणून त्यांना नेहमीं दुसऱ्यानीं बांधून दिलेल्या शिधेरीवरच निर्वाह करावा लागतो. यास्तव रामा, तू या हृदयाकाशांत उठलेल्या अविवेक मेघांस विवेकवायूनें दूर उडवून टाक. विचारच मौर्ख्यनिरासाचा हेतु आहे. पण तो अनेक जन्मसंचित-पुण्यकर्मांच्या परिपाकामुळें आत्मप्रसाद झाल्यावाचून उत्पन्न होत नाहीं. यास्तव श्रवण-वैराग्यादि पुरुषप्रयत्नानें आत्मप्रसाद संपादन करावा. वेद, वेदान्त, शास्त्रार्थ, तर्क इत्यादिकांनीं युक्त पुरुषही बहिर्वृत्ति असल्यास त्याला ज्ञान होत नाहीं. यास्तव प्रत्यग्-दृष्टि ( आत्मदृष्टि ) अवश्य संपादन केली पाहिजे. पण नुसत्या आत्मदृष्टीनेंच काम भागत नाहीं. कारण पुष्कळ शिकलेल्याही लोकांचें चित्त स्वतःच्या ज्ञानाविषयीं साशंक असतें; या न्यायानें गुरु व शास्त्र यांच्या उपदेशाशीं आपला अनुभव जुळला म्हणजेच प्राज्ञाला आपल्या ज्ञानाचा विश्वास येत असतो. यास्तव असंदिग्ध बोध होण्याकरितां गुरूपदेश व शास्त्रावलोकन याचीही सहायता लागते. संशयादि चित्त-विकारांनीं रहित असलेल्या या चित्सूर्याची विस्तृत व्याप्ति माझ्या सांगण्यावरून तुला कळली आहे. त्यामुळें तू आतां सर्व संदेहविकल्पशून्य, अभिलाषरहित व संतापशून्य झाला आहेस. हे मननशील रामा, तूं जेव्हां बोधैकरस आत्म्याच्या आवरण-विक्षेपरहित होशील तेव्हां तुला अप्राप्त ज्ञान व विचारादि ज्ञानसाधन प्राप्त होईल. त्यानंतर विवेक-वैराग्यादिकांचें यत्नानें रक्षण करणें, प्रमादादि दोषांचा त्याग करणें, समाधिसुखामृताचें प्राशन करणें, उत्तरोत्तर भूमिकांचा जय करून विस्मित होणें व उत्तरोत्तर अधिक

---

१ याविषयीं श्रीसुरेश्वराचार्यांनीं ' अपामार्गफलेवायं विरुद्धफलदो भवः । प्रत्यग्दृशां विमोक्षाय विबन्धाय पराग्दृशाम् ' असें म्हटलें आहे. याचा सारांश–अपामार्गाप्रमाणें हा संसार विरुद्ध फल देणारा आहे. तो आत्मदृष्टि पुरुषास मोक्ष व अनात्मदृष्टि पुरुषास बंध देतो.

सुखाच्या योगानें वृद्धि पावणें यांतील कांहींही तुला करावें लागणार नाहीं; तर तूं स्वस्थ ब्रह्म होशील २९.

**सर्ग ३०—हिरण्यकशिपूचें वीर्य, प्रऱ्हादादि पुत्रांचा उद्भव, नृसिंहकृत त्याचा वध, व प्रऱ्हादानें शोकानें केलेलें त्याचें और्ध्वदेहिक.**

**श्रीवसिष्ठ**—रामा, केवळ काकतालीय-न्यायानें प्रवृत्त झालेल्या व शास्त्र आणि आचार्य यांच्या उपदेशानें अनुगृहीत असलेल्या स्वविचारानें ज्ञानोदय कसा होतो तें जनकादिकांच्या आख्यानांनीं सांगितलें. आतां उपासनेच्या योगानें ईश्वराचा अनुग्रह होऊन त्यामुळें उद्भवलेल्या विचारापासून ज्ञानोदय कसा होतो तें कळावें ह्मणून दैत्येश्वर प्रऱ्हाद सिद्ध कसा झाला, तें सांगतों; ऐक.

पातालगुहेमध्यें देवासुरास युद्धातून पळविणारा हिरण्यकशिपु म्हणून एक राक्षस होता. नारायणाच्या पराक्रमासारखा त्याचा पराक्रम असून त्यानें इंद्राचें आधिपत्य आपल्याकडे घेतलें होतें. देवादिकांचा पराभव करून त्या महाशूरानें सर्व त्रिभुवनाचें राज्य केलें. त्रैलोक्येशतेचा अनुभव घेत असतांना, वसंतसमयीं वृक्षाना जसे अंकुर फुटतात त्याप्रमाणें त्याला योग्यसमयीं पुत्र झाले. ते क्रमानें वाढले. त्यांत प्रऱ्हाद या नांवाचा युवराज होता. रत्नांतील कौस्तुभाप्रमाणें दानवेश्वरपुत्रांतील त्या श्रेष्ठ प्रऱ्हादाच्या योगानें. सर्व सौंदर्ययुक्त वसताच्या योगानें जसा संवत्सर त्याप्रमाणें, हिरण्यकशिपु फार शोभत असे. पण ज्याला पुत्राचें चांगलें सहाय आहे असा तो सैन्यकोशयुक्त दानवेश्वर हत्तीप्रमाणें मत्त झाला. त्यानें त्रिभुवनास संताप दिला. त्याच्या प्रतापापुढें सूर्य-चद्र-प्रभृति देव निस्तेज झाले. एकाद्या दुर्वृत्त पुत्राच्या वाईट कृत्यांनीं त्याचे आप्तजन जसे कष्टी होतात त्याप्रमाणें देवर्षिगण खिन्न झाले व त्यांनीं दैत्येंद्राचा वध करण्याविषयीं भगवान् नारायणाची प्रार्थना केली. कारण महात्म्यांनाही वारंवार केलेला अपराध सहन होत नाहीं.

देव व ऋषी यांच्या प्रार्थनेस मान देऊन भगवानानें भयंकर नारसिंहरूप धारण केलें व त्या महा असुराला मारलें. नंतर तो क्रुद्ध झालेला ईश्वर आपल्या नेत्रांच्या दीप्तीनेंच सर्वांस जाळूं लागला. तेव्हां त्या असुराचे सहायकर्ते दैत्य भराभर पळून गेले. निस्तेज दिव्याप्रमाणें ते कोठें आहेत हेंही कोणाला कळलें नाहीं. त्या ईश्वराच्या नेत्राग्नीनें पाताळांत

कल्पांत करून सोडला. सर्वत्र हाहाकार उडाला व तेथील प्रत्येक जण आपापला जीव कसा तरी वाचवूं लागला.

असो; याप्रमाणें सर्व जगाला संताप देणाऱ्या प्रऱ्हादाच्या पित्याला मारून नारायण कोठें अदृश्य झाला असता व देवादि सर्व सज्जन प्रसन्न होऊन त्याच अधियज्ञाच्या संतोषाकरिता शास्त्रीय कर्मे करून त्यालाच समर्पण करूं लागले असता तिकडे मरून राहिलेल्या दैत्यांचें पालन प्रऱ्हाद करूं लागला. ते सर्व जेथें हिरण्यकशिपु व इतर जन गतप्राण होऊन पडले होते तेथें आले व कालवशात् शुष्क झालेल्या सरोवरावर येऊन जलचरप्राणी जसा किलकिलाट करतात त्याप्रमाणें रडूं लागले. प्रऱ्हादादिकानीं मृत बंधूस उद्देशून मोठ्या दुःखानें और्ध्वदेहिक कर्मे केली. व ज्याचे आप्त मेले अथवा जळून गेले आहेत अशा दुःखी जनाना बोध करून सर्वांचें सान्त्वन केलें. पण चिंतेमुळें निश्चेष्ट झालेले व त्यामुळेंच चित्रात लिहिलेल्याप्रमाणें दिसणारे प्रऱ्हादादि सर्व दैत्य शोकानें अतिशय व्याकुळ झाले. वणव्यानें जळलेल्या वृक्षाप्रमाणें त्याची स्थिति झाली ३०.

**सर्ग ३१**—प्रऱ्हादानें हरीच्या पराक्रमाविषयी व स्वजनाच्या क्षेमाविषयीं विचार केला आणि त्यांच्याच भक्तीनें तो तद्रूप झाला

**श्रीवसिष्ठ**—नतर हे रामभद्रा, हरीनें ज्यातील क्रूर दानव मारून टाकले आहेत अशा पाताळात बसून व मौन धारण करून प्रऱ्हाद असा विचार करूं लागला.—

आह्मी आता कोणता बरें उपाय करावा? कारण येथें जो जो ह्मणून तीक्ष्ण अंकुर उद्भवतो त्याला त्याच्या वानराप्रमाणें हा हरि खाऊन सोडतो. हिमालयावर उद्भवलेल्या कमलाप्रमाणें या आमच्या पाताळांत उत्पन्न झालेले बाहुशाली दैत्य कधींही स्थिर रहात नाहींत. सागरावरील तरंगाप्रमाणें ते भासुर आकाराचे दैत्य वारंवार उत्पन्न होऊन नाश पावतात. अरेरे, मोठी खेदाची गोष्ट आहे, कीं आमचे शत्रु (देव) उत्कर्ष पावत असून सुहृद् दुःख भोगीत आहेत. मृगराज नाहींसा झाला म्हणजे त्याचें अरण्य जसें सहस्रावधि क्षुद्र हरिणाच्या पायानीं तुडविलें जातें त्याप्रमाणें माझ्या पित्याच्या अभावीं त्रिभुवन देवांच्या पराक्रमांनीं व्यापून गेलें आहे. पण पूर्वी तेच देव द्वेषकलुषित मनानें माझ्या बापाच्या पायांवर लोटांगणें घालीत होते. ज्यांचीं पानें जळून गेलीं आहेत अशा कमलांप्रमाणें माझे हे निरुद्योग, निस्तेज

दीन व दुःखी बांधव पूर्वीप्रमाणें शोभत नाहींत. त्यांचा मोठी दुर्दशा उडाली आहे. हाय हाय मत्त गजांसारख्या दैत्यांना सांप्रतकालीं माझ्या पित्याच्या वेळच्या देवाप्रमाणें दीन करून सोडणाऱ्या दैवाला असाध्य काय आहे! थोडें कोठें पान हाललें तरी ते शत्रु आला असें समजून भितात. गांवात आलेल्या हरिणीप्रमाणें दानवस्त्रिया उद्विग्न होतात. त्यांचे सर्व दिव्य भोग नृसिंहानें नाहींसे केले आहेत. येथील कल्पवृक्ष शुष्क खाब होऊन उभे आहेत. नंदनवनामध्यें मात्र त्यांची लागवड मोठ्या त्वरेनें होत असून तेथें ते वाढतही आहेत. पूर्वी देवाच्या बंदी करून आणलेल्या स्त्रियांचीं मुखें असुर प्रशंसापूर्वक पहात असत व हल्लीं असुराच्या बंदी करून नेलेल्या स्त्रियाचीं तोंडें देव पहात आहेत. मला वाटतें, कीं आतां देवाच्या हत्तींच्या गंडस्थळावरून, पर्वतावरील जलप्रवाहाप्रमाणें, मदप्रवाह वाहूं लागले असतील व तीच आमच्या गजाचीं गंडस्थळें माळावरील काळ्या दगडाप्रमाणें कोरडीं ठणठणीत झालीं आहेत. ज्याच्या अंगास शुभ्र मंदारपुष्पाचा सुवास येत आहे, असे मेरुशिखरासारखे दैत्य अलीकडे दृष्टीं पडेनातसे झाले आहेत. दानवाच्या अंतःपुरात ठेवण्यास योग्य असलेल्या देव-गंधर्वस्त्रिया यावेळीं झाडावरील मंजिऱ्याप्रमाणे मेरूवर जाऊन राहिल्या आहेत. हाय हाय, देवस्त्रिया आमची विटंबना करण्याकरितां आमच्या विलासिनी स्त्रियाचे हावभाव, नाचण्याचे वेळीं मुद्दाम करून दाखवितात. पूर्वी माझ्या पित्यावर जे चवऱ्या वारीत होते तेच आतां इंद्रावर वारीत आहेत. ज्याच्या पराक्रमाचे स्मरण करणेंही दुःखद आहे त्या एकट्या हरीच्या प्रसादानेंच त्याची अशी भरभराट झालेली असून आमची हानि झाली आहे. त्याच्या अकृपेमुळेंच आम्ही असल्या भयंकर आपत्तींत पडलो आहों. शिकारी लोकाच्या बरोबरेच कुत्रे जसे वानरास अडवितात त्याप्रमाणे शौरीच्या कृपेचा आश्रय करून रहाणारे हे देव आम्हाला आतां छळीत आहेत. त्यामुळें प्रत्यहीं वेणी-फणी करण्याचे वेळीं असुरस्त्रियांच्या नेत्रात पाणी येतें. अहाहा! या जगद्रूपी जीर्ण मंडपाला त्या भगवानाच्याच भुजस्तंभाचा आधार आहे! विपत्तिसागरांत बुडणाऱ्या देवसैन्याला तोच तारतो. माझ्या बाबासारख्या दुसऱ्याही अनेक महा वीर्यवान् राक्षसांना त्यानेंच मारलें व पुढेंही तोच मारील. तो अजिंक्य ईश्वरच या जगाचा संहार करणारा अग्नि व

देवांचा श्रीमान् गुरु आहे. दैत्यांच्या भुजदंडांचा जणुं काय परशुच (कुन्हाडच) अशा त्याच्या वीर्यानें वीर्यवान् झालेला इंद्र आम्हांस पीडतो. पुंडरीकाक्षापाशीं शस्त्रास्त्रें जरी नसलीं तरी तो सदा दुर्जय आहे वज्राहूनही कठिण असलेला तो कोणत्याही शस्त्रानें अथवा अस्त्रानें विदीर्ण होण्यासारखा नाहीं. आमच्या पितामहादिकांशीं लढून त्यानें पुष्कळ युद्धकौशल संपादन केलें आहे, असें मला वाटतें. त्या घोर प्रसंगींही ज्याला भय वाटलें नाहीं तो आता आह्माला भिईल याचें नाव कशाला हवें ? त्याला वश करून घ्यावयाचें झाल्यास एकच उपाय मला सुचतो. या जगांत सर्व वस्तुस्वभाव, सर्व प्रकारच्या बुद्धी, व सर्व क्रियाविषयींचा उद्यम यांच्या योगानें आश्रयाची इच्छा करणारास तोच एक शरण आहे. दुसरी काहीं गति नाहीं. कारण या त्रिभुवनात त्याच्याहून अधिक वीर्यवान् कोणी नाहीं. प्रलय, स्थिति व सर्ग याचें कारण तोच होऊन राहिला आहे. यास्तव मी आता या घटिकेपासून त्या अज नारायणास शरण ज तों. मी नारायणमय आहे. 'नमो नारायणाय' हा सर्वार्थसाधक मंत्र माझ्या हृदयकोशातून, आकाशातील वायूप्रमाणें, कधींही जाणार नाहीं. हा हरिच दिशा, आकाश, पृथ्वी व सर्व जगत् आहे. मी अमेय आत्मा हरि झालो आहें. मी विष्णुमय आहें. जो स्वतः विष्णु न होतां विष्णूची पूजा करतो त्याला पूजाफल मिळत नाहीं. विष्णु होऊनच त्याचें पूजन केले पाहिजे. 'प्रल्हाद हरीच आहे, तो माझ्याहून पृथक् नाहीं' असा आत निश्चय केल्यामुळें मी सर्वतः व्यापक झालो आहे. हा सुवर्णवर्ण [illegible] अनत आकाशास व्यापून माझे आसन झाला आहे. त्याचीं सर्व शस्त्रें माझ्या हातात आहेत. मदारमाला व भूषणें यानीं भूषित [illegible]लेले हे माझे चार बाहू आहेत. क्षीरसागरातून निघालेली ही लक्ष्मी ह[illegible]त शुभ्र चामर घेऊन माझ्या बाजूला उभी आहे. सर्व जगाला [illegible] लुब्ध करणारी कीर्ति, सतत जगज्जाल निर्माण करणारी इंद्रजाला[illegible]ही माया व ही त्रैलोक्यास जिंकणारी जया अशा या मजपाशीं उभ्या [illegible]हेत. नित्य शीत व नित्य उष्ण असणारे दे दोघे चद्र व सूर्य देव माझ्या [illegible] मंडळांत नेत्र होऊन राहिले आहेत. माझ्या या शरीराची ही मेघश्याम [illegible] दश दिशांमध्यें पसरत आहे. भयंकर ध्वनि करणारा हा पांचजन्य शं[illegible] माझ्या हातांत आहे. ब्रह्मदेवाच्या उत्पत्तीचें स्थान असें हें नाभीपासून [illegible]वलें

कमल माझ्या हातांत आहे. ही विचित्र अंगानें युक्त असलेली व त्यामुळेंच सुमेरूच्या शिखरासारखी दैत्य-दानवनाशक, जड व सुंदर गदा माझ्या हातांत झळकत आहे. उदय पावणाऱ्या सूर्याप्रमाणें आपल्या ज्वालांनीं दिक्तटांस लाल करणारें हें सुदर्शन-चक्र माझ्या या हातांत शोभत आहे. साक्षात् धूमयुक्त अग्नीप्रमाणें सुंदर, दीप्त, चकचकीत व दैत्यवृक्षांचा जणुं काय कुठारच असा हा नंदक-खड्ग मला आनंद देत माझ्या हातांत आहे. पुष्करावर्तक नांवाच्या कल्पांतीच्या मेघांप्रमाणें शरधरावर्षाव करणारें हें माझे इंद्रधनुष्यासारखे शार्ङ्ग धनुष्य आहे. हीं मी आपल्या उदरांत अनेक ( भूत-भविष्य-वर्तमान ) जगें सांठवीत आहें. ही पृथ्वी हेच माझे चरण, आकाशच शिर, त्रिभुवन शरीर व माझ्या कुशीच दिश आहेत. मी साक्षात् घनःशाम विष्णु आहें. गरुडपर्वतावर बसून मी शंख-चक्र-गदाधर झालो आहें. हे सर्व दुष्टचित्त पुरुष मजपासून दूर पळून जात आहेत. हा मी नीलकमलाप्रमाणें श्यामवर्ण, पीतांबरधारी, गदाधर, लक्ष्मीवान् व गरुडारूढ स्वतः अच्युत आहे. क्षुब्ध कालाग्नींत पडणाऱ्या पतंगाप्रमाणें आपल्या विनाशाकरिता माझा कोणता विरोधी त्रैलोक्य जाळण्यास समर्थ असलेल्या माझ्यापुढे येणार आहे ! माझ्यापुढे असलेले हे सुरासुर माझ्या या दीप्त सृष्टीस प्रतिबंध करूं शकत नाहींत. मज ईश्वर-रूप विष्णूची ब्रह्मा, इंद्र, अग्नि, हर इत्यादि देव अनेक मुखांतून निघणाऱ्या अनंत वाणीने स्तुति करितात. हा मी ऐश्वर्यवान् व विष्णूच्या आकाराचा झालो आहे. मी सर्व द्वंद्वपदातीत व परम महिम्यानें युक्त आहें. त्रिभुवनयुक्त असंख्य भुवनें ज्याच्या जठरांत आहेत, ज्याने सर्व दुष्ट प्राण्यांस मारले आहे व जे मेघ, पर्वत, तृण, अरण्य इत्यादि सर्वांमध्यें आहे त्या सर्व भयाचा नाश करणाऱ्या शरीरास मी प्रणाम करतो ११.

**सर्ग ३२**—प्रल्हादानें केलेली विष्णूची मानस-पूजा व बाह्यपूजा. दैत्यांची विष्णु-भक्ति व तें वर्तमान ऐकून विस्मित झालेल्या देवांचा हरीस प्रश्न.

**श्रीवसिष्ठ**—राघवा, अशा मानस संकल्पाने प्रल्हादानें आपली तनु नारायणमय केली व पुनः त्या असुरा-शत्रूच्या पूजेकरितां असा विचार चालविला—

मी कल्पिलेल्या या विष्णूच्या शरीराहून निराळी, दुसरी कोणतीही समष्टि अथवा व्यष्टि देवतारूप मूर्ति नाहीं. पण हाच मद्रूप विष्णु माझ्या-

हून निराळा आहे, अशी मी, पूजा होईतों, भावना करतों. तो गरुडावर बसला आहे. याच्या पाशीं चार शक्ती स्फुरण पावत आहेत. त्याच्या हातांत शंख-चक्र गदा आहे. त्याचें शरीर श्यामवर्ण आहे. तो चतुर्भुज आहे. चंद्र व सूर्य हे त्याचे नेत्र आहेत. हा श्रीमान्, रम्य नंदक-खड्गानें भूषित, पद्महस्त, विशालनयन, शार्ङ्गधनुर्धारी, व महा तेजस्वी आहे. मी आतां अगोदर सर्व परिवारासह मनोमय सामग्रीनें याची पूजा करतों, नंतर बहु-रत्नमय बाह्य सामग्रीनें करीन.

असा विचार करून प्रल्हादानें मनोमय सर्व संभार सज्ज केला व मनानेंच कमलाधव माधवाची पूजा केली. रत्नजडित पात्रानीं त्यानें त्याला अभिषेक केला. मानसिक चंदनादिकाचे लेप लाविले. विचित्र धूप, दीप, नैवेद्य, वैभव, भूषणें, मंदारमाला, सुवर्ण कमलें व इतर जातींचीं अनेक सुवासिक पुष्पें, दिव्य वृक्षाचे पल्लव, अंकुर, सर्व सुंदर पदार्थ, फळें, परिमल द्रव्यें, कर्पूरदीप, तांबूल इत्यादि सर्व कल्पित उपचारानीं सांग पूजा करून शेवटीं त्यानें त्या महेश्वराला आत्मसमर्पण केलें. ही मानस पूजा आटोपल्यावर प्रल्हादानें लोकसंग्रहार्थ भव्य विष्णुमंदिर बांधवून त्यांत श्यामसुंदर, चतुर्भुज लक्ष्मीनारायणाची स्थापना केली. सर्व प्रकारचे बाह्य उपचार जमविले व पूर्वोक्त क्रमानेंच त्याची बाह्य पूजाही केली. वारंवार अशी पूजा केल्यानें त्याच्या मनाला फार संतोष झाला. त्यानंतर तो प्रति दिवशीं तशाच परम भक्तीनें त्या देवाधिदेवाची आंतर व बाह्य पूजा करूं लागला. इतर जन श्रेष्ठाचें अनुकरण करितात, या न्यायानें त्या नगरांतील सर्व दैत्यही त्या राजाचें हळु हळु अनुकरण करूं लागले. थोडक्याच दिवसांत ते सर्व देवशत्रू महावैष्णव बनले व त्यामुळें सर्वांचें कल्याण झालें. राजा आचाराचें कारण आहे, म्हणून म्हणतात तें खोटें नव्हे. राघवा, ही शुभवार्ता स्वर्गांत जाऊन जेव्हां पोंचली, तेव्हां देवांना मोठा विस्मय वाटला. दैत्यानीं विष्णुभक्तीचा अंगीकार कसा केला, असें म्हणून विस्मयाकुल झालेले सर्व देव क्षीरसागरांत सर्पशयनावर विश्रांति घेत पडलेल्या हरीकडे गेले आणि तेथें हा दैत्यवृत्तांत सांगून ते म्हणाले,—

" भगवन्, हें काय आश्चर्य आहे? जे दैत्य सदां तुमच्या विरुद्ध असा-वयाचे तेच आतां तुमच्यामध्यें तादात्म्य पावले आहेत, हें काय? यांत कांहीं तरी कपट असावें, असें वाटतें. पर्वतांचाही चूर करणारे अत्यंत दुर्दैव

दानव कोठें व शेवटच्या जन्मींच महा पुण्यानें प्राप्त होणारी जनार्दनाची भक्ति कोठें? भगवन्, प्राकृत पुरुष गुणवान् झाला ही कथा अकाली येणाऱ्या फुलाप्रमाणें सुख व उद्वेग या दोघानाही कारण होत असते. जें ज्याला योग्य नसतें तें त्याला शोभतही नाहीं. काचेच्या ढिगात महामूल्यवान् रत्न कसें खपणार? जो ज्या सात्त्विक, राजस किंवा तामस प्रकृतीचा प्राणी असतो तो त्याच स्थितींत रहाणें, हें युक्त होय. सारख्याच रंगाच्या व उंचीच्या बकऱ्यामध्यें कुत्रा कधीं रहात नाहीं. अयोग्याशीं योग्याचा सबद्ध होणें, हें सुज्ञाच्या चित्ताला जितकी पीडा देतें तितकी पीडा अगात वज्राच्या सुया टोचल्यानेही होत नाहीं. कमल जलामध्यें जसें शोभतें तसें स्थलावर शोभत नाहीं कारण तें त्याचें उचित स्थान नव्हे. अधम, नीच कर्में करणारा, सत्कर्मांचा द्वेष करणारा, दुष्ट व हीन जातीचा एकादा दानव कोठे आणि विष्णुभक्ति कोठें! यास्तव हे प्रभो, दितिपुत्र माधवभक्त झाला आहे ही वार्ता आह्माला मुळींच सुख देत नाहीं १२.

**सर्ग ३३**—हरिभक्तीनें दैत्याच्या विवेकादि गुणाचा उदय. हरि प्रसन्न आहे, असे पाहून त्याची स्तुति.

**श्रीवसिष्ठ**—राघवा, याप्रमाणें गर्जना करणाऱ्या व क्षुब्ध झालेल्या देवास शत्रुनाशक माधव म्हणाला.

" देवांनो, प्रऱ्हाद भक्तिमान् झाला आहे हें पाहून तुम्ही उद्विग्न होऊ नका. स्वभावतःच बलाढ्य असलेले दैत्य माझ्या भक्तीने अधिक बलाढ्य होतात, हें जरी खरें आहे, तरी मोक्षास योग्य असलेल्या त्या महात्म्याचा हा शेवटचा जन्म आहे. पूर्वकल्पातील बलीप्रमाणें याला तुमचें राज्य घेण्याची इच्छा नाहीं. कारण याच्या सारखे महात्मे राज्यालाही कसपटाप्रमाणे तुच्छ समजत असतात. जळलेले बीज जशी अंकुरक्रिया करीत नाहीं त्याप्रमाणें या दनुपुत्राला या जन्मानतर मातेच्या उदरात वास्तव्य

१ येथें टीकाकारानीं ' शशी दिवसधूसरो गलितयौवना कामिनी० ' या भर्तृहरींच्या नीति-शतकातील श्लोकाचा निर्देश केला आहे त्याचा सारांश असा—१ सूर्य-प्रकाशाने मलिन झालेला चंद्र, २ जिचें तारुण्य नष्ट झालें आहे अशी स्त्री, ३ कमलशून्य सरोवर, ४ सुंदर पुरुषाचें अक्षरशून्य मुख, ५ धनपरायण प्रभु, ६ सतत दारिद्र्य भोगणारा सज्जन, व ७ राजाच्या अंगण्यांत असलेला खळ हीं सात माझ्या मनांतील शल्यें आहेत.

करावयाचें नाहीं. एकादा प्रथम गुणवान् असून मागून निर्गुण झाल्यास तो क्रम अनर्थ–पर्यवसायी व त्यामुळेंच पुरुषार्थाचा विघात करणारा आहे, असें विद्वान् समजतात. पण एकादा प्रथम निर्गुण असून मागून गुणवान् झाल्यास तो सिद्धि देणारा क्रम आहे, असेंच सर्व मानतात. यास्तव तुह्मी आपापल्या विचित्र भुवनांस जा. प्रऱ्हादाची ही भक्तिरूपी गुणिता तुमच्या असुखास कारण होणार नाहीं."

**श्रीवसिष्ठ**—राघवा, असें सांगून तो देव अंतर्धान पावला. तेव्हां देवही त्याला प्रणाम करून स्वस्थानीं गेले. प्रऱ्हादाविषयींचा त्यांचा क्षोभ कमी झाला. कारण घरातील वडील माणसें ज्याला भीत नाहींत त्याच्यावर लहान बालकही विश्वास ठेवतात, असें आपण व्यवहारांतही पहातों. इकडे प्रऱ्हाद भक्तियुक्त चित्तानें प्रत्यहीं देवाधिदेव जनार्दनाची पूजा करीतच होता. शरीर, मन व वाणी यांच्या द्वारा होणारी प्रत्येकक्रिया तो भगवानास अर्पण करीतच असे. कांहीं दिवसांनीं पूजापरायण असलेल्या त्याचे-विवेक, आनंद, वैराग्य, वैभव इत्यादि-गुण वाढले. शुष्क वृक्षाप्रमाणें नीरस असलेल्या भोगाचें त्यानें अभिनंदन केलें नाहीं. हरिण लोकसमूहांत जसें रममाण होत नाहीं त्याप्रमाणें तो स्त्रियाचे ठायीं रममाण झाला नाहीं. शास्त्रार्थ कथना-वाचून इतर कोणत्याही अशास्त्रीय लोकप्रवृत्तीमध्यें त्याचें मन आसक्त झालें नाहीं. यात्रादि दर्शनार्ह समाजांत जावें, असें त्याला कधींही वाटत नसे. त्याचें चित्त भोगरूपी रोगांमध्यें कधींही विश्रांत झालें नाहीं. पण तें भोगादि सर्व कल्पना सोडून शांतही झालें नाहीं; तर पाळण्याप्रमाणें मध्येंच झोके घेत राहिलें.

त्या वैष्णवाची ही अवस्था क्षीरसागरस्थ भगवानानें अंतर्दृष्टीनें पाहिली व भक्तांस आह्लाद देणारा तो विष्णु पाताल-मार्गानें प्रऱ्हादाच्या देवपूजागृहांत आला. तें समजतांच दैत्यानें त्याची मोठ्या आदरानें द्विगुण-पूजा केली आणि देवगृहांत प्रत्यक्ष येऊन उभ्या राहिलेल्या त्या देवाची मोठ्या आनंदानें स्तुति केली. ती अशी–

**प्रऱ्हाद**—त्रिभुवनास सुरक्षितपणें ठेवण्याचा सुंदर कोश, बाह्य व आभ्यंतर कलंकाचा नाश करणारा, स्वयंज्योति, अनाथाचा नाथ, शरण जाण्यास योग्य, सर्वशक्तिसंपन्न आणि रजोगुणाच्या योगानें ब्रह्मा, सत्त्वगुणानें अच्युत व तमोगुणानें ईश्वर होणारा अशा हरीला मी शरण आलों आहे.

नीलकमळाप्रमाणें ज्याची अंगकांति आहे, त्यामुळें शरत्कालीन आकाशाच्या उपमेचें जो उपमेय होतो, व भ्रमर, अंधकार अथवा काजळ यांप्रमाणें ज्याचा वर्ण आहे अशा कमल-चक्र-गदाधरास मी नमस्कार करतों. भ्रमरसमूहाप्रमाणें ज्याचीं अंगें कोमल आहेत, शुभ्र कमलाप्रमाणें ज्याचा शंख आहे, वेदवचनरूप गुंजारव करणारा ब्रह्मदेव या नांवाचा भ्रमर ज्याच्या नाभिकमलांत आहे व आपल्या भक्तांचीं हृदयकमळें हाच ज्याचा आधार आहे त्या भगवान् विष्णूला मी शरण आहें. मी हरिरूप शरत्काळच्या आकाशास, वटपत्रावर शयन करणाऱ्या शिशुरूपी हरीस, पीतांबरधारी देवास, व दैत्यनाशक हृदयस्थ विभूस अनन्य शरण आहें. चिदात्मतत्त्व व सर्व जगाची पीडा नाहींशी करणारा, अशा हरीचा मी आश्रय करतों.

**सर्ग ३४**—हरीच्या वरामुळें प्रऱ्हादास सुविचार सुचला. त्याच्या योगानें अनात्मवर्गाचें निरसन करून त्यानें आपल्या सच्चिद्रूप आत्म्यास पाहिलें.

**श्रीभगवान्**—हे दैत्यकुलचूडामहामणे, पुनर्जन्माचें दुःख नाहींसें होण्याकरितां तूं इष्ट वर माग.

**प्रऱ्हाद**—सर्व संकल्पाचें फळ देणाऱ्या व सर्व लोकांच्या अंतर्भागीं रहाणाऱ्या देवा, जें तुला सर्वोत्तम म्हणून वाटत असेल तेंच मला सांग.

**श्रीभगवान्**—सर्व विक्षेपाची शांति व निरतिशय आनंदाची प्राप्ति यांचा लाभ होण्याकरितां तुला ब्रह्मविश्रांति देणारा विचार सुचो.

**श्रीवसिष्ठ**—असा सर्वोत्तम वर देऊन भगवान् गुप्त झाला. तेव्हां प्रऱ्हादही त्याला पुष्पांजलि समर्पण करून आपल्या आसनावर स्वस्थ चित्तानें बसला व स्तोत्रपाठसमयीं आंतल्या आंत असा विचार करूं लागला. 'तूं विचारवान् हो' अशा अर्थाचा वर भवनाशक देवानें मला दिला आहे. यास्तव मी आतां आपल्या अंतःकरणांत आत्मविचार करतों. या भुवनांत मी कोण आहें? मी बोलतों, जातों, उभा रहातों व प्रयत्नानें विषयापभोग घेतों. वृक्ष, तृण, पर्वत, इत्यादिकांनीं भरलेलें हें जगत् तर मी नव्हे. कारण माझ्याहून अगदीं भिन्न व बाह्य असलेलें जग मी कसा असेन? पूर्वी नसून मातेच्या उदरांतून उत्पन्न झालेला, जड, प्राणवायूंनीं आपल्या संचाराच्या वेळीं संचालित केलेला व थोड्याच कालानें नाश पावणारा देह मी नव्हें. जड कर्णेंद्रियाकडून ग्रहण केला जाणारा, शून्याकार व शून्यापासून झालेला शब्दही मी नव्हें. त्याचप्रमाणें त्वचा, चक्षु, रसना व घ्राण या जड

व विनाशी इंद्रियांकडून क्रमानें ग्रहण केले जाणारे स्पर्श, रूप, रस, व गंध-विषयही मी नव्हें. कारण त्याच्या नाशानंतरही त्यांचें स्मरण करणारा मी असतों. प्राण जड आहेत मन, चित्त, बुद्धि, व अहंकार क्षणिक आहेत; व कर्मेंद्रियें तर धडधडीत जड आहेत. यास्तव मी ममतारहित, मननशून्य, शांत, इंद्रियभ्रमशून्य व शुद्ध चिन्मात्र साक्षी आत्मा आहें. जड-विषयरहित चिन्मात्र मी आहें. मी सबाह्याभ्यन्तर व्यापी आहें. या चेतनामुळेंच हे सर्व मातीच्या घागरीपासून सूर्यापर्यंत सर्व पदार्थ प्रकाशित होतात. हा! आतां मला आठवलें. मीच सर्वगामी चिदात्मा आहें. या आत्म्यामुळेंच विचित्र इंद्रिय-वृत्ती स्फुरण पावतात. निखाऱ्यापासून जशा ठिणग्या उडाव्या त्याप्रमाणें या चिदात्म्यापासून विचित्र इंद्रियें निघतात. याच्या मुळेंच सृष्टींतील मिथ्यावस्तूही सत्य भासतात. त्यांचें स्फुरणहि याच्या प्रभावानेंच होतें. ज्याप्रमाणें आरसा सर्व प्रतिबिंबाचा आधार त्याप्रमाणें सर्व सचित्त प्राण्यांचे सर्व अनुभव घेणारा हाच चिदात्मा आहे. त्या अद्वितीय चिद्रूपाच्या प्रसादानेंच सूर्य उष्ण, चंद्र शीत, पर्वत घन व जल पातळ झालें आहे. एकसारख्या अनुभवास येणाऱ्या या सर्व पदार्थांच्या उत्पत्त्यादिकाचें आद्य कारण हा चिदात्मा असून याचें कारण दुसरें कोणी नाहीं. सर्व पदार्थांना याच्याच प्रभावानें पदार्थत्व प्राप्त होतें. वस्तुतः कारण नसतानाही मायेमुळें सर्व कारणाचें कारण होणाऱ्या याच्यापासून सर्व जग उत्पन्न झालें आहे. ब्रह्मा, विष्णु, इंद्र, रुद्र, इत्यादि जगत्स्थितीच्या कारणांचाही हा चिदात्मा जनक आहे. मज नित्य प्रकाश आत्म्याला नमस्कार असो. कारणामध्यें सूक्ष्मरूपानें असंख्य पदार्थ असतात. पण त्यांतील जो पदार्थ आतां स्थूलरूपानें व्यक्त होतो, असें हा चेतन आत्मा कल्पितो तोच तत्काळ उत्पन्न होतो बाकी सर्व तसेच रहातात. सारांश पदार्थमात्राची उत्पत्ति, स्थिति व नाश याच्या संकल्पाधीन आहेत. चित् ज्याला आपली सत्ता व स्फूर्ति देते तेंच जिवंत होतें व ती ज्याला सत्ता-स्फूर्ति देत नाहीं तें मृततुल्य असतें. हे जगांतील हजारों पदार्थ या विस्तीर्ण चिदाकाशरूपी आरशांत प्रतिबिंबित झाले आहेत. अति वृद्धि पावलेल्या पदार्थांमध्यें हें चैतन्य वृद्धियुक्त झाल्याप्रमाणें व अति सूक्ष्म पदार्थांमध्यें तें सूक्ष्म असल्यासारखें होतें. ( म्हणजे उत्पत्ति, वृद्धि, इत्यादि सर्व भावविकार याच्या ठिकाणी आरोपित आहेत.]

हें आत्मतत्त्व सर्व भूतांस अदृश्य व ज्यांचें चित्त क्षीण झालें आहे त्यांसच प्राप्य आहे. कारणाच्या एका भागामध्यें परिमाण होणें हेंच जग आहे, असें कोणी म्हणतात. पण त्याच्या या कल्पनेचाही आधार चिदात्माच. कारण त्रैलोक्यात रहाणाऱ्या सर्वांचा हा आत्मा आहे. ब्रह्मदेवापासून तृणापर्यंत सर्व पदर्थांचा तो प्रकाशक आहे. तो एक, आद्यन्तरहित, सर्वगामी व चराचर भूताच्या अंतःकरणात स्वानुभवरूपानें स्थित आहे. त्या मद्रूप आत्म्याचीं असंख्य शरीरें जरी असलीं तरी तो स्वतः एक व अनुभवरूप आहे. आपल्या अनुभवस्वरूपानें तोच सर्व त्रिपुटीमय होतो. हा मी आकाशात सुंदर सूर्य-देहानें विहार करीत आहें. वायुदेहानेंही माझाच संचार सर्वत्र होतो. माझे हे शरीर नीलवर्ण, शंक चक्र-गदाधर व सर्व सौभाग्याच्या पराकाष्ठेने युक्त होऊन या जगात वावरत आहे. मीच कमलोद्भव ब्रह्मा व त्रिनेत्र रुद्र आहें. तापसी जसा मठाचें रक्षण करतो त्याप्रमाणें मी इंद्ररूपानें क्रमानें प्राप्त झालेल्या या सर्व त्रैलोक्याचें रक्षण करतों. स्त्री, पुरुष, कुमार, कुमारी, बाल, वृद्ध, उत्पन्न होणारा व मरत असलेला मीच आहें. तृण, लता, गुल्म इत्यादिकाचे जीवन मी आहें. चिद्भूमींतून मीच त्याना उठवितों. मातीचीं खेळणीं तयार करण्यात निपुण असलेल्या बालकाप्रमाणे मी आपल्या चित्तविनोदार्थ हें सर्व जगदाडंबर रचलें आहे. मला सोडून यांतील कांहीं नाहीं. पुष्पांतील सुवास मी, पुष्पे-पानें इत्यादिकातील कांति मी व सर्व पदार्थांचा अनुभव मी. रसतन्मात्र ही आद्य शक्ति असून ती सागर, नदी, सरोवर, विहीर इत्यादिकाच्या जलरूप होते व तीच वृक्ष, शाखा, पल्लव, तृण, अंकुर इत्यादिकातील रसरूपाने सर्व कार्यात पसरते. त्याप्रमाणें मीही सर्व कार्यां-च्या उत्पत्तीचे निमित्त होऊन सर्वत्र पसरलो आहे. स्वतः उत्पन्न केलेल्या कार्यामध्यें प्रवेश करून विचित्र जीव होणाराही मीच. दुधामध्ये जसें घृत, जलामध्यें जशी रसशक्ति त्याप्रमाणें सर्व भावांमध्यें मी चिच्छक्ति आहें. भूत, वर्तमान व भविष्यत्-कालचें जग चैतन्यामध्यें स्थित आहे. सर्वत्र रहाणारा विराट् व सम्राट् मीच. इंद्रास न बाधतां व देवांना शस्त्रास्त्रांनीं तोडल्यावाचूनच मला हें अप्रार्थित जगद्राज्य मिळालें आहे. मी व्यापी आत्मा आहें. प्रळयकाळच्या समुद्राप्रमाणें मी मजमध्येंच राहूं शकत नाहीं. समुद्रांतील थकलेल्या सर्पाला समुद्राचा जसा अंत लागत नाहीं त्याप्रमाणें

मला या मज आनंदसागराचा अंत लागत नाही. हें ब्रह्मांड म्हणजे एक अगदीं संकुचित स्थान आहे. त्यामुळें बेलफळांत जसा हत्ती मावत नाहीं त्याप्रमाणें मी त्यांत मावत नाहीं विरिंचीच्या. सत्यलोकाच्याही पलीकडे फार लांबवर माझें स्वरूप पसरलें आहे. मी प्रल्हाद आहें, पाताळांतील या मंदिरांत रहातों इत्यादि संकुचित कल्पना करणें हा माझा मोठा भ्रम आहे. देह कोण, अदेह कोण? मृत कोण, जिवंत कोण? सर्व मिथ्या माया. माझे सर्व पितृ-पितामहादि पूर्वज कृपण होते. म्हणून ते हें साम्राज्य सोडून संसारभूमीमध्यें रममाण झाले. ही महा दृष्टि कोठें? व अनेक सकटांनीं भरलेली राज्यलक्ष्मी कोठें? अनंत आनंदाचा संभोग देणारी व उत्कृष्ट शांतीनें शोभणारी ही चिन्मय दृष्टि सर्व दृष्टींहून श्रेष्ठ आहे. हें उत्तम व नित्य बोध-साम्राज्य सोडून माझें मन दुःखकारक राज्यवैभवामध्यें रममाण होत नाहीं. माझ्या पित्यानें सर्व त्रिभुवन जिंकून घेतलें होतें. पण त्याचा उपभोग किती दिवस घेतला? व त्याकरितां प्राणान्त संकटें कशीं भोगलीं? या आनंदाचा स्वाद न घेतां शेकडों जगद्राज्यें करणाराचेंही जीवित व्यर्थ आहे. या असल्या अखंडित व पूर्ण आनंदाचा अव्हेर मूर्ख करतो; ज्ञानी कधींही करीत नाहीं. कारण उंट चांगली वेल सोडून काट्याकडे जाणार हें ठरलेलेंच आहे. उसाचा रस सोडून कडु लिंबाचा रस जसा कोणी पीत नाहीं त्याप्रमाणें ही परदृष्टि सोडून जळक्या राज्यामध्यें कोणीही शहाणा आसक्त होणार नाहीं. नंदन-वनांतील प्रफुल्लित वेलींनीं सुशोभित झालेली भूमि कोठें व वणवा लागून जळून खाक झालेली माळ जमीन कोठें? त्याचप्रमाणें ही बोधदृष्टि कोठें व भोगदृष्टि कोठें? या चित्-तत्त्वामध्यें सर्व आहे. मग त्याचा अनुभव कां घेतला जात नाहीं? चैतन्याच्या योगानें सर्व सर्वत्र सदा प्राप्त होतें. तेजाची प्रकाशन शक्ति, चंद्रांतील अमृतप्राप्ति, ब्रह्माची मोठी मान्यता, इंद्राची त्रैलोक्यराज्यता, शंकराची पूर्णता, विष्णूची जयलक्ष्मी, मनाची शीघ्र गति, वायूची बलवत्ता, अग्नीची दाहशक्ति, जलाची रसशक्ति, मुनींची महातपःसिद्धि, बृहस्पतीची विद्या, विमानाची आकाशगति, पर्वतांची स्थिरता, समुद्राची गंभीरता, मेरूची अति उंची, सुगतांची शून्यता, वसंताची पुष्पमयता, वर्षर्तूची मेघगर्जना, यक्षांची मायामयता, आकाशाची स्वच्छता, तुषारांची शीतलता, व ग्रीष्मर्तूची तप्तता या व अशाच दुसऱ्याही

अनेक शक्ती चित्-तत्त्वापासून उत्पन्न होतात. सर्व विकल्पशून्य चित् शेकडों पदार्थांमध्यें, सूर्याच्या प्रभेप्रमाणें, एकाच वेळीं पडते. चित् ज्ञानस्वरूप असल्यामुळें तिला त्रिकाल ज्ञान असतें. पण अशा या शाश्वत कामधेनूला सोडून पुष्कळ हताश लोक संसाररूपी अंधकूपामध्येंच खितपत पडले आहेत. या पृथ्वीच्या पाठीवर मशकासारखे असंख्य मूर्ख आजपर्यंत उत्पन्न होऊन थोडक्याच दिवसांत व्यर्थ मरून गेले आहेत. पण भोगदु:खाची इच्छा करणाऱ्या त्यांना हें तत्त्व जर कळतें तर त्यांनीं आपला जन्म अगदींच निरर्थक केला नसता. इच्छा व द्वेष यांपासून उत्पन्न होणाऱ्या द्वंद्वमोहाच्या योगानें मानवासारखे बुद्धिमान् प्राणीही पृथ्वीच्या विवरांत रहाणाऱ्या कीटकांसारखे झाले आहेत. सत्य परमात्म्याच्या ज्ञानानें ज्याच्या सर्व तृष्णा शांत झाल्या आहेत तोच खरोखर जिवत आहे. माझ्या अखंड चिदात्म्यास नमस्कार असो. देवा, फार दिवसांनीं मीं तुला ओळखलें. परमात्म्या, आता मी तुला विसरणार नाहीं. विकल्परूपी चिखलातून मी मोठ्या यत्नानेंच तुझा उद्धार केला आहे. मद्रूप तुज अनंत, शिव, देवाधिदेव परमात्म्यास नमस्कार असो. मीं आता या आपल्या स्वाभाविक, स्वयं प्रकट झालेल्या, स्वतंत्र व स्वसंस्थ स्वरूपाला अनन्य शरण आहें ३४.

**सर्ग ३५**—साक्षात् जाणलेल्या आत्म्याचें वर्णन करून, आंतल्या आत प्रणाम करून व त्याच्या बलानें जिंकलेल्या बंधांचें अनुसंधान करून प्रल्हाद आनंदित होतो.

प्रल्हाद—ॐ हाच चिदाकार आहे. तो विकाररहित आहे. या जगांत असलेलें हें सर्व आत्माच आहे. मेद, अस्थि, मांस, मज्जा, रक्त यांहून हा चेतन भिन्न आहे. आत असलेलाही हा दीपक सूर्यादिकास प्रकाशित करतो; अग्नीला उष्ण करतो व रसाला अमृताप्रमाणें गोड करतो. राजा जसे भोग भोगतो त्याप्रमाणें हा इंद्रियांच्या विषयाचे अनुभव घेतो. तो उभा असूनही एकत्र रहात नाहीं व जात असूनही निश्चल रहातो. शांत असूनही व्यवहारात स्थित आहे व सर्व करीत असूनही लिप्त होत नाहीं. पूर्वी, आज, आतां, या लोकीं, पर लोकीं, विहित-अविहित इत्यादि सर्व वृत्तींमध्यें हा सदा सम आहे. तो वस्तुतः निर्भय असतांनाही कर्मानुरूप स्वत: उद्भवतो व उद्भवलेले ब्रह्मादिस्तंभपर्यंत भोक्तृ-भोग्यभाव व चवदा भुवनें यांचा निर्वाह केवल आपल्या सांनिध्यानें करतो. हेंच त्याचें कर्मफल होय. सर्वांना याचीच सत्ता असल्यामुळें हा वायू-

हूनही अधिक स्पंदवान् आहे, स्थाणूहूनही अक्रिय आहे; व आकाशाहूनही निर्लेप आहे. वायु झाडांच्या पानांना जसें हालवितो त्याप्रमाणें हा मनांना क्षुब्ध करतो. सारथि जसा घोड्यांना चालवितो त्याप्रमाणें हा डोळ्यांच्या पात्यांना वारंवार लववितो व इंद्रियांना आपापल्या विषयांकडे जावयाचें सामर्थ्य देतो. एकाद्या भिकाऱ्याप्रमाणें हाच देहगृहातील कामांत सदा निमग्न असतो व एकाद्या राजाप्रमाणें तोच विभु भोग भोगीत आपल्या राजगृहात स्वस्थ बसतो. यास्तव याचाच सदा शोध करावा, स्तुति करावी, ध्यान करावें. म्हणजे जरा-मरणरूप संमोहांतून पार जातां येतें. हा अत्यंत सुलभ ( नुसत्या ज्ञानानें प्राप्त होणारा ) व अत्यंत सुजेय ( केवल स्मरणानें वश करण्यास योग्य ) आहे. हा सर्वांच्या हृदयकमलांतील भ्रमर आहे. दूर असलेल्या मित्रादिकांना मोठ्यानें हाक मारली असता ते जवळ येतात व जवळच असलेले मित्रादिक नाव घेताच ओ म्हणतात. पण हा स्वतः आत्माच असल्यामुळें मोठ्यानें न ओरडतां व हळु हाक न मारताच नुस्ता स्मरणानें तत्काळ सन्मुख होतो. धनिक लोकांची सेवा करूं लागलें असता पदोपदीं अपमान होण्याचा फार संभव असतो. कारण ते प्रायः धन-मदानें मत्त असतात. पण सर्व संपत्तींनीं शोभणाऱ्या याची कशीही जरी सेवा केली तरी अपमान होण्याचा प्रसंग कधींही येत नाहीं. पुष्पांतील वास, तिळांतील तेल व रसाळ पदार्थांतील माधुर्य याप्रमाणें हा देव देहांमध्यें स्थित आहे. फार दिवसांत न पाहिलेल्या बंधूप्रमाणें, अविचारामुळें, ह्या हृदयस्थ चेतनाचीही ओळख पटत नाहीं. प्रिय मनुष्य भेटलें असतां जसा अत्यानंद होतो त्याप्रमाणें विचारानें या परमेश्वराचें ज्ञान झालें असता परानंदाचा लाभ होतो. या श्रेष्ठ आत्म्याचें दर्शन झालें असता मरणादि विच्छेद रहात नाहीं. सर्व बाजूंचे आशादि पाश तटातट तुटून जातात. सर्व शत्रूंचा क्षय होतो. दुष्ट उंदिर जसे घराला पोखरतात, त्याप्रमाणें संशय त्याच्या मनाला पोखरीत नाहींत. याचें दर्शन घेतलें असतां सर्व पाहिल्यासारखें होतें. याचें श्रवण केलें असता सर्व ऐकल्यासारखें होतें. याला स्पर्श केला असतां सर्व जगाला स्पर्श केल्याचें श्रेय येतें व याच्या अस्तित्वानें जगाचेंही अस्तित्व सिद्ध होतें. प्राणी निजले तरी हा त्यांच्या मध्यें सदा जागत रहातो. अविचारी लोकांस हाच प्रहार करतो. आर्तांच्या

आपत्तीचे हाच हरण करतो व तटस्थ ईश्वराची उपासना करणारांस त्याचें इष्ट हाच देतो. जगत्स्थितीमध्यें हा आत्माच जीव होऊन संचार करतो, भोगविलास करतो व वस्त्र, अलंकार, समाज, उत्सव इत्यादि वस्तूंमध्यें शोभतो. मिऱ्यातील तिखटाप्रमाणें सर्व देहामध्यें हा आहे. तो आंतल्या आंत आपल्या शांत स्वरूपाचा अनुभव घेत असतो. शाईतील काळेपणाप्रमाणें अथवा बर्फातील शैत्याप्रमाणें देहांत हा देहपति असतो. आकाश, वायु, तेज, जल पृथ्वी, अग्नि, चंद्र व जगद्गण या वस्तूंमध्यें क्रमानें असणारे—शून्यत्व, स्पंद, प्रकाश, रस, काठिन्य, उष्णता, शैत्य व सत्ता-हे धर्म याचेच आहेत. अथवा हाच त्याच्या रूपानें व्यक्त होतो. सत्ता, काल व राजाची प्रभुशक्ति जशी सर्वगत असते त्याप्रमाणें इंद्रियें व मन याच्या व्यापारासह बाह्याभ्यंतर प्रकाशन हें आत्म्याचें सार्वत्रिक कृत्य आहे. त्याचा प्रकाश हाच एक स्वभाव आहे, हाच देवास बोध करणारा महादेव आहे. मी तो आहें, याहून अन्य कल्पनाच नाही. धुळीचा आकाशास व जलाचा कमलपत्रास जसा स्पर्श होत नाही त्याप्रमाणें मला अनात्मपदार्थांचा स्पर्श होत नाहीं. वाळलेल्या भोपळ्यावर कितीही जरी पाणी ओतलें तरी त्यामुळें आंतील आकाशाची जशी कांहीं हानि नाहीं त्याप्रमाणें सुख-दुःखप्रसंग माझ्या देहावर पाहिजे तितके येऊन पडले तरी माझी कांहीं हानि नाहीं. तेल, वात व दिव्याचे टवळे यास सोडून गेलेल्या दिव्याचा प्रकाश जसा दोरीनें बांधतां येत नाहीं त्याप्रमाणें सर्व भावाहून निराळा असलेला मी कोणालाही बांधतां येण्यासारखा नाहीं. सत् व असत्, काम आणि इंद्रिये याच्याशीं माझा कोणता संबंध असणार? आकाशाशीं कधीं कोणाचा संबंध होत नाहीं. निराकार मनाला तरी कोण कशी पीडा देणार? शरीराचे शतशः जरी तुकडे झाले तरी त्यामुळे शरीरी आत्म्याला काय होणार? मातीची घागर तुटली, फुटली, किंवा नाहींशी झाली तरी त्याचें त्यांतील आकाशाला काय आहे? मन हें एक व्यर्थ उठलेलें पिशाच आहे. तेव्हां बोधामुळें त्याचा जर नाश झाला तर त्यांत आमची कोणती हानि आहे? माझें मन मागें सुख-दुःखवासनामय होतें,-पण आतां तसें राहिलेलें नाहीं. आतां केवल अमर्याद शांति पसरली आहे. सर्व करणारा एक आत्माच असतांना मूर्ख प्राणी दुसराच खातो, दुसराच कोणी घेतो, तिसरा अनर्थांत पडतो व चवथाच कोणी पहातो, असें म्हणतो. हें चातुर्य कोणत्या गारु-

ज्याचें आहे, तें काहीं कळत नाहीं. मला भोगस्थितीची अथवा भोगांस वर्ज करण्याची इच्छा नाहीं. जें येत असेल तें येऊं दे व जात असेल तें जाऊं दे. मला सुखाची अपेक्षा नाहीं व दुःखाची मी अपेक्षा करीत नाहीं. नाना प्रकारच्या वासना देहामध्यें उदय पावोत कीं अस्त पावोत. मी त्यांच्यामध्यें नाहीं व त्या माझ्या नाहींत. आजपर्यंत अज्ञान-शत्रूनें मला मारून टाकलें होतें. त्या चोरानें माझें सर्व विवेक-सर्वस्व लुटून मला एका कोपऱ्यांत गाडून ठेवलें होतें. पण आतां आपोआप झालेल्या या विष्णूच्या महाप्रसादानें मला माझें ज्ञान होऊन मी सुटलों आहें. अहंकार—पिशाचाला मी या शरीररूपी वृक्षाच्या ढोलींतून आत्मज्ञानमंत्रानें दूर घालवून दिलें आहे. त्यामुळें अत्यंत पुण्यकारक झालेला माझा हा शरीरवृक्ष आतां प्रफुल्लित झाल्यासारखा दिसतो. माझें मोह-दारिद्र्य नष्ट झालें, दुराशा दोष क्षीण झाले व विवेक-धन-संभार मिळाल्यामुळें मी आतां परमेश्वर बनलों आहें. मी सर्व ज्ञातव्य जाणलें; द्रष्टव्य पाहिलें व सर्व प्राप्तव्य प्राप्त करून घेतलें आहे. मी आतां सर्व अनर्थशून्य पारमार्थिकी भूमीस प्राप्त झालों आहें. स्तुति, प्रणाम, प्रार्थना, शम व नियम यांच्या योगानें हा भगवान् आत्मा मला प्राप्त झाला आहे. अहंकाराच्याही पलीकडे असलेल्या सर्व व्यापी सनातन ब्रह्मात्म्याची आज मला फार दिवसांनीं स्मृति झाली. या अहंकारशत्रूनें मला फार दिवस उत्कर्ष-अपकर्षरूप शेकडों दशांमध्यें, आविर्भाव व तिरोभाव इत्यादिकांच्या योगानें इंद्रियरूप सर्पांच्या बिळामध्यें, मरणरूप मोठमोठ्या खड्ड्यामध्यें, तृष्णारूपी कांटेऱ्या जंगलांमध्यें, कामरूप कोलाहलामध्यें, वासना—वनांमध्यें, जन्मरूप कूपामध्यें व दुःखरूप वणव्यामध्यें घालून नानाप्रकारचें दुःख दिलें. पण आतां शौरीनें केलेल्या अनुग्रहामुळें माझी विवेकदृष्टि उघडली आहे. त्यामुळें मला तो अहंकार-राक्षस दिसत नाहीं. मनोरूप विवरामध्यें रहाणारा अहंकारयक्ष आतां कोठें गेला तेंही मला कळत नाहीं. चोराच्या हातांतून आपल्या सर्व निधीसह सुटल्यामुळें मी आतां अति सुखी झालों आहें. मोह, दुःख, दुराशा, आधी, नरक, स्वर्ग, मोक्ष इत्यादि भ्रम अहंकारामुळेंच होतात. नानाप्रकारच्या भिंतीवरील चित्रांना जसा एका भिंतीचाच आधार असतो त्याप्रमाणें सर्व अनर्थांना या दुष्ट अहंभावाचा आधार आहे. हे आत्मन्, निरहंकार, प्रसन्न व आनंदात्मा अशा तुला नमस्कार असो. तुज आनंदसागरांत इंद्रिय ग्राह व चित्त-

डवाग्नि मुळींच रहात नाहींत. तुज आनंद-पर्वतास नमस्कार असो. आत्मन्, तुज प्रफुल्ल आनंद कमलास मी नमस्कार करतों. निष्फळ, अमृतरूप, सदा उदित व पूर्ण आत्मचंद्रास, संविद् व आभास या पंखांनीं युक्त असलेल्या व हृदय कमळांवर रहाणाऱ्या मानस-हंसास, सदा उदित, शांत, हृदयांतील महा-अंधकाराचें हरण करणाऱ्या व सर्वग असूनही अदृश्य चित्सूर्याला, पर प्रेमरूप स्नेह-दीपाला, सर्व वृत्तींचे उल्लंघन करून रहाणाराला व सर्व वस्तूंच्या स्वभावाच्या आधाराला मी नमस्कार करतों. पोलादी टांकीने तापलेलें लोखंड जसे तोडतात त्याप्रमाणें मी शमादि युक्त मनानें मदनसंतप्त मनाला तोडलें आहे. अंतर्मुख इंद्रियांना मी प्रतिबंध केला आहे आणि 'मी आनंदात्मा आहे' या शुद्ध अहंकारानें 'मी जरा-मरण-धर्मवान् अनात्मा आहें' या मलिन अहंकाराला जिंकलें आहे. त्यामुळे मी आतां केवल चित् राहिलो आहें. श्रद्धेनें अश्रद्धेला, वैराग्यानें तृष्णेला, व ऊहापोहवती प्रज्ञेनें अविचार-संदेहादि-लक्षण प्रज्ञेला क्षीण करून मी ज्ञातृत्वाभिमानरहित असल्यामुळें अज्ञ व ज्ञप्तिमात्रस्वभाव असल्यामुळें ज्ञ झालों आहें. मन निरहंकार होऊन, ब्रह्माहंभावाने देहाहंभाव गळला असता, मी आता स्वच्छ व केवळ होऊन राहिलों आहें. अंतःकरणाच्या चारी भावांचा अभाव झाल्या कारणाने मी आतां जीवन्मुक्तावस्थेंत स्थित आहें. माझें हें सुख स्वभक्तावर मोठमोठे अनुग्रह करणाऱ्या ब्रह्म-रुद्रादिकांच्या सुखाहूनही अधिक आहे. मी आतां सर्व दुःखशून्य झालो आहें. दुरहंकाररूपी पक्षी तृष्णारज्जु तोडून माझ्या देहपिंजऱ्यातून कधीं निघून गेला कांहीं कळत नाहीं. अहंभावपक्षी शरीरवृक्षावरून कोठे उडून गेला, कोण जाणे! अहंकाररूपी महा मेघानें सोडल्याकारणाने मी आता महा मतिमान् झालों आहें. त्या कारणानेंच मी हा भगवान् आत्मा पाहिला. त्याचा मला साक्षात्कार झाला. समाधीमध्यें मी त्याला दीर्घ काळ घट्ट आलिंगन दिलें व व्युत्थानदशेंतही आपल्या देहाप्रमाणेंच सदा स्वानुभवामध्यें त्याची योजना केली. निर्विषय, मननरहित, इच्छाशून्य, अहंकारशून्य, चेष्टारहित व भोगोत्कंठारहित झालेलें माझे मन निरिंधन (काष्ठरहित) अग्नीप्रमाणें शांत झालें आहे. दुरुत्तर, सम व विषम महा-आपत्तींनीं युक्त, सुदुःसह आणि उत्पत्तिरूप दीर्घ दोष देणारे सर्व अनर्थ मनः—शांतीमुळेंच

क्षीण झाले आहेत व मी आतां निरतिशय आनंदानुभव घेत राहिलों आहे. मला साक्षात् पूर्णानंदात्मा महेश्वर प्राप्त झाला आहे ३५.

सर्ग ३६—दुर्लभ आत्म्यास प्राप्त होऊन वारंवार प्रणाम करणारा प्रल्हाद त्याची स्तुति करतो व आनंद भोगतो.

प्रल्हाद—माझ्या सर्व पदातीत आत्म्याचें स्मरण मला फार दिवसानीं झालें. हे भगवन्, मोठी आनंदाची गोष्ट आहे, कीं तू माझ्या दृष्टीं पडलास. तुज अपरिच्छिन्न-स्वभाव महात्म्यास नमस्कार असो. समाधीमध्यें तुला अभिवादन करून, तुझें दर्शन घेऊन मी दीर्घ काल त्वन्मय होऊन जातों. तेव्हा हे भगवन्, या त्रिभुवनात तुझ्यावाचून दुसरा कोण बधु असणार ? जोंवर तुझें दर्शन व प्राप्ति झालेली नसते तोंवर तू मृत्यु होऊन अभक्तास मारतोस, भक्ताचे रक्षण करतोस व जे तुझी उपासना करतात त्यास इष्ट फळ देतोस. स्तुतिकर्त्यांच्या रूपानें तूच स्तुति करतोस. जाणाऱ्याच्या रूपानें जातोस. सर्व प्राण्यांच्या रूपानें व्यवहार करतोस. नित्य अपरोक्ष असलेल्या तुला मी आता प्राप्त झालों आहें व चागलें पाहिलेंही आहे. तेव्हा आता यापुढें तू मला काय करशील अथवा कोठें जाशील ? सर्व सृष्टीस हितकर असलेल्या देवा, तू मला सर्वत्र दिसत आहेस. तेव्हा आता कोठें जाणार ? आह्मा दोघामध्ये फार मोठें अतर पाडणारें जें अज्ञान होतें तें आता नाहींसें झालें आहे. त्यामुळें आमचा भेदभावही आता संपुष्टात आला आहे. बाधवा, मोठी आनंदाची गोष्ट आहे कीं मीं तुला पाहिलें. कृतकृत्य, कर्ता, भर्ता, संसाररूपी पानाचा देठ, नित्य व निर्मळ अशा तुला नमस्कार असो. तुज शंख-चक्रगदाधरास, चंद्रार्धधारी महादेवास, देवेंद्रास व कमलोद्भवास नमस्कार असो. तुझा व माझा हा भेद वाच्य-वाचकदृष्टीनेंच आहे. जल-तरंगाप्रमाणें ती असत्य कल्पनाच आहे. तू आपल्या नित्य व विचित्र कल्पनेनेंच सदा विकास पावतोस. प्रथम उत्पन्न करावयाच्या पदार्थांस पहाणाऱ्या, नंतर त्यांस उत्पन्न करणाऱ्या, अनंत रूपानीं विकास पावणाऱ्या व सर्वस्वभाव आत्म्यास नमस्कार असो. इतके दिवस माझ्या रूपानें तूच अनेक संसार-दुःखपरंपरा भोगल्यास व आतां तूच आपल्या स्वरूपाला ओळखून विश्राति घेत आहेस. हें काष्ठ-पाषाण-जलमात्र जगत् तुजवाचून नाहीं. यास्तव तुझा लाभ झाल्यावर त्यातील सर्व कांहीं प्राप्त झाल्यासारखें होतें. सर्व इंद्रियांमध्यें राहून

त्यांच्या विषयाचें ग्रहण करणारा तूं अप्राप्य कसा असशील ? वेद, शास्त्रें व पुराणें ज्याचें सतत गायन करीत आहेत त्याचें एकदां दर्शन झाल्यावर पुनः विस्मरण कसें होईल ? हे आत्मदेवा, तूंच या सर्वांचें धारण केलें आहेस. मोठ्या आनंदाची गोष्ट आहे कीं तूं मद्रूप झाला आहेस व मी त्वद्रूप झालों आहें. आमच्यामध्यें आता भेद राहिलेला नाहीं. महेश्वरा, तुला नमस्कार असो. तुज परमाणुरूपामध्यें वटबीजातील वटवृक्षाप्रमाणें त्रिकालीं सर्व जग आहे. आकाशात मेघ जसे घोडा, हत्ती, रथ इत्यादिकाच्या आकाराचे दिसतात त्याप्रमाणें हे देवा, तूंही शेकडों पदार्थांच्या भ्रामक स्वरूपानें प्रकट होतोस. हे देवा, फार दिवस व्यर्थ कष्ट भोगल्यावर मला तुझा लाभ झाला आहे. मी आतां मुक्त झालों आहें. माझ्यासारखीच ज्यांना मुक्ति पाहिजे असेल त्यानें मान, मद, कोप, कालुष्य व क्रूरता सोडावी. कारण महात्मे प्राकृत गुणसंकटामध्यें निमग्न होत नसतात. मागची दीर्घ दुर्दशा कशी असह्य होती, याचें स्मरण ठेवून मी कोण व हें काय झालें आहे? याच्या विषयींही चागला विचार करावा. अरे बा माझ्या आत्म्या, ते मोठे प्रयास व भयंकर दिवस आतां निघून गेले आहेत. तुझा प्रतिकूल काल जाऊन आता अनुकूल काल आला आहे. तूं आता या माझ्या देह-नगरात राजा झाला आहेस. आता तुला सुख-दुःखाविषयीं फारशी चिंता करावयास नको. इंद्रिय-घोड्यांस व मनो-गजांस जिंकून आणि भोगशत्रूंचा सर्व प्रकारें पराभव करून आता तूं साम्राज्यावर बसशील. तूं आता अपार आकाशांतील प्रवाशी झाला आहेस. तुझ्यामुळें जगाचा अस्त व उदय होतो. आंत व बाहेर प्रकाश पाडणारा तूं भास्कर आहेस. हे प्रभो, तूं सदां निजलेला आहेस. पण एकादी कामिनी भोगलीलार्थ आपल्या कामुकाला जशी उठविते त्याप्रमाणें तुझी शक्ति तुला जागें करिते. इंद्रिय-वृत्तिरूप माशांनीं दुरून आणलेला रूपादिलक्षण मध नेत्रादि वातायनात बसलेल्या तुज चिच्छक्तीकडून यथेच्छ प्याला जातो. हे आत्मन्, मरणसमयीं योग्याना सुषुम्नादि मार्ग दाखविणाराही तूंच आहेस. देहरूपी पुष्पांतील वास तूं आहेस. देहचंद्रातील तूं अमृत आहेस. देहशाखेंतील रागादि-पल्लवाच्या उद्भवास कारण होणारा रस तूंच आहेस. शरीररूप दुधांतील सार असा जो तूं त्या तुजमध्यें विस्मयस्नेह आहे. काष्ठातील अग्नीप्रमाणें तूं या शरीरांत स्थित आहेस. तूंच अमृतरूप अत्युत्तम स्वाद आहेस; सूर्यादिकांच्या प्रकाशाचें

निमित्त आहेस; विषयांचा ज्ञाता व इंद्रियांचा अवभासक आहेस. तूं प्राणादि सर्व वायूचा स्पंद आहेस. तूं मनोगजाचा मद आहेस. प्रज्ञारूपी अग्निशिखेचा प्रकाश व उष्णता तूं आहेस. तूंच उपसंहार करून घेतल्यामुळें ही तुझी वाणी मरण, मूर्च्छा व निद्रा या काळीं शांत होते व तुझ्याच अनुग्रहामुळें इतर दशेंत उत्पन्न होते. सोन्यांतील कडें, कंकण, बाहुभूषण इत्यादि घटनांप्रमाणें तुझ्या ठिकाणीं या सर्व संसारातील पदार्थपंक्ती आहेत. हे भगवन्, तूं स्वतःच आपली स्तुति करतोस. तुझ्या अभावीं असलेली ही वस्तुस्थिति नष्ट होते. आरशातील प्रतिबिंब जसें चुंबनादि भोगाच्या उपयोगीं नसतें त्याप्रमाणें तू ज्याच्यावर अनुग्रह केलेला नाहींस तें सर्व व्यर्थ होतें. तुझ्यावाचून हा देह काष्ठ किंवा मातीचें ढेंकूळ याप्रमाणें भूमीवर लोळत पडतो. तुझी प्राप्ति झाली कीं सुखदुःखक्रम नष्ट होतो. सूर्याच्या प्रकाशानें शुक्लादि वर्ण जसे ज्ञात होतात त्याप्रमाणें तुझ्या प्रकाशानें सुखादिकाची स्थिति होते. हे आत्मन्, विवेकिजनांच्या हृदयात स्थित होऊनच तू ही सुखादि लक्ष्मी ग्रहण करतोस व आपली स्वभाविक समस्थिति सोडीत नाहींस. पण अविवेकि-जनांच्या हृदयात तू कसा असतोस तें काहीं सांगता येत नाहीं. कारण त्यांच्या कल्पना अनंत असल्यामुळें तुलाही त्याप्रमाणें अनंत रूपें धारण करावीं लागतात. निरिच्छ, निरंश, निरहंकार, स्थूलोपाधि व सूक्ष्मोपाधि अशा तू कर्तृत्वाचा अंगीकार केला आहेस. यास्तव हे ब्रह्मांडाकार, हे शांतिपरायण, हे प्रमाणातीत, हे शास्त्राधार, हे उत्पन्न झालेल्या व हे उत्पन्न न झालेल्या, हे क्षत व हे अक्षत, हे भाव व हे अभाव, हे जेय व हे अजेय तुझा जयजयकार असो. मी त्वद्रूप झाल्यामुळें माझे सर्व अनर्थ नष्ट झाले आहेत. मी आतां विजयी झालों आहें व केवळ प्रारब्धभोगाकरिताच यापुढें जिवंत रहाणार. हे भगवन्, हे आत्मन्, तुझा साक्षात्कार होऊन मी व तू एक झाल्यामुळें आतां कोठचें बंधन, कोठचें संकट, कोठची संपत्ति व कोठचा संसार! मी आता केवळ शाश्वत सुख भोगतों. त्यावाचून मला दुसरें कांहीं कर्तव्य राहिलें नाहीं ३६.

**सर्ग ३७—प्रल्हाद समाधि लावून बसला असतां निर्नायक झालेल्या दानवपुराची शत्रूंनी दुर्दशा केली.**

**श्रीवसिष्ठ—असा विचार करीतच शत्रुनाशक प्रल्हाद निर्विकल्प**

परानंद समाधीस प्राप्त झाला. स्वपदीं आरूढ झाल्यामुळें तो चित्राप्रमाणें अचल राहिला. त्याच आनंददायी अवस्थेंत त्याचा पुष्कळ काळ लोटला. त्याच्या मंत्र्यादि अधिकाऱ्यांनीं त्याला जागें करण्याचा प्रयत्न केला. पण तो देहभानावर आला नाहीं. हजारो वर्षें तो एकचित्त होऊन राहिला. त्यानें त्या अवस्थेत पूर्ण शांतीचा अनुभव घेतला. पण प्रऱ्हाद असा निजानंदांत निमग्न झाला असता रसातलमंडल राजरहित झालें. हिरण्यकशिपु मेला व त्याचा पुत्र समाधि लावून बसला असता तेथें योग्य राजा कोणी राहिला नाहीं. दानवांचा त्याला देहभानावर आणण्याचा प्रयत्नही व्यर्थ गेला (हें वर सांगितलेंच आहे). त्यामुळें ते सर्व उद्विग्न होऊन मन मानेल तिकडे निघून गेले. तेंव्हा त्या दानवनगरात कोणी त्राता राहिला नाहीं. दुर्जनांना सुजनाचा व सबळांना निर्बळाचा छळ करण्यास अनुकूल अवसर मिळाला दिवसा-ढवळ्या चोऱ्या होऊं लागल्या स्त्रियांची लज्जा राहिली नाहीं. दुष्टजन अंगावरील वस्त्रेंही ओढून नेऊ लागले. जो तो स्वार्थपरायण झाला. अबला धीट झाल्या. प्रत्येकाला जीविताचा संशय वाटू लागला. केंव्हा कोणता प्रसंग येईल याचा काहीं नेम राहिला नाहीं जगभर हाय हाय व उद्वेग सुरू झाला. लुटालूट व हाणमार यांचें प्राचुर्य झालें. देवांचीं पोरेंही येऊन तेथील आबालवृद्धास त्रास देऊ लागलीं. प्रऱ्हादाचें तें नगर रक्षकाऱ्या अभावीं राजदंडाची भीतिच नाहींशी झाल्यामुळें, दुःखमय व अनीतिप्रधान झालें. तात्पर्य, कलियुगातील दुःखी प्रजेप्रमाणें प्रऱ्हादाच्या राजधानींतील दानवप्रजा मोठ्या अनर्थांत पडली आणि स्त्री व धन यांचेही संरक्षण होईनासें झालें ३७.

**सर्ग ३८**—जगाची व्यवस्था व दैत्यकुलाचें रक्षण याविषयीं हरीची चिंता.

**श्रीवसिष्ठ**—राघवा, पाताळांत असा भयंकर प्रकार घडला असतां सर्व जगाच्या नियतीचें रक्षण करणे, हीच ज्याची क्रीडा आहे,—असा क्षीरसागरांतील शेष-शय्येवर निजलेला हरि चातुर्मास संपतांच कार्तिकांत देवांचें प्रयोजन साधून देण्याकरितां जागा झाला व त्या वेळची जगत्स्थिति त्यानें सहज पाहिली. स्वर्ग व भूलोक यांना आपल्या मनानें पाहून तो पाताळांत मनानेच आला. तेथें प्रऱ्हाद स्थिर समाधि लावून बसला आहे व इंद्राच्या नगरांत संपत्ति अतिशय वाढली आहे, असें पाहून शेष-

शय्येवर बसलेल्या व सर्वांच्या अंतःकरणांत संचार करणाऱ्या भगवान् गदाधरानें आपल्या अति भास्वर मनःशरीरानें असें चिंतन केलें—

अरे अरे, माझा परम भक्त प्रल्हाद निजपदीं विश्रांति घेत राहिल्या-कारणानें पाताळलोक निर्नायक झाला व त्यामुळें प्रायः ही सृष्टि दैत्यरहित झाली आहे. दैत्यांचा अभाव झाल्यामुळें देव शांत झाले आहेत. पण आतां त्यामुळें भूलोकीं होणाऱ्या यज्ञ-तपःक्रिया बंद पडतील. कारण दैत्य व देव ( अर्थात् सत् व असत् वृत्ती ) जोंपर्यंत एकमेकांशीं द्वेष व कलह करीत असतात तोंपर्यंतच स्वर्गसुख दुर्लभ झालेलें असतें. पण त्यांतील दुष्ट दैत्याचा नाश होऊन साधु देव शांत झाले म्हणजे क्षुद्र स्वर्ग-तर एका बाजूलाच राहूं दे; पण साक्षात् मोक्षही सुलभ होतो. यास्तव देवत्वाची प्राप्ति होणें हा मोठासा पुरुषार्थ आहे, असें लोकांना वाटेनासें झालें म्हणजे मग त्याकरिता श्रुति-स्मृतिप्रोक्त कर्में कोण करणार! कर्माचा लोप झाला म्हणजे भूलोकाचा क्षय झाल्यावाचून रहाणार नाहीं आणि मनुष्यलोकाचाच अभाव झाल्यावर सर्व संसाराचाच ध्वंस होण्याचा प्रसंग येणार. पण तो मला इष्ट नाहीं. कारण त्यामुळें मी 'प्रलयापर्यंत रहावें' अशा संकल्पानें कल्पिलेल्या या जगाचा अकालीं नाश होईल. म्हणजे नियतीचा क्षय होणार. पण तसें होणें अगदीं उचित नव्हे आणि कदा-चित् तसें घडल्यास स्वतःच्या लीलेचाच क्षय करणाऱ्या मीं कांहीं केलें नाहीं, अथवा करण्यास समर्थ नाहीं असेंच होणार! शिवाय एकाद्या संसारा-सक्त पुरुषाचा सर्व परिवार अकस्मात् काळाच्या अधीन झाला असतां त्याला जसा सर्व प्रपंच शून्य वाटतो त्याप्रमाणें आकाश, चंद्र, सूर्य, तारा इत्यादि सर्व खेळण्याचा क्षय झाला असतां मलाही आपल्या लीलाशरीराचा उपसंहार करून पुनः संसार न करण्याकरितांच पूर्णात्मपदीं लीन व्हावें लागेल. पण माझा अधिकारकाल अद्यापि संपलेला नसल्यामुळें, भर तारु-ण्यांत मरणाऱ्या पुरुषाप्रमाणेंच, माझा लयही दुःखद होय. सारांश दैत्यांच्या राज्यांत अशी अव्यवस्था होऊन त्यामुळें सर्व जगाचा क्षय व्हावा, हें अगदीं अनुचित आहे. त्यांत कल्याणाचा लेशही नाहीं. यास्तव दानवांचें रक्षण मला केलेंच पाहिजे. त्यांच्या भीतीनें देवही आळस सोडून स्वसं-रक्षणाविषयीं सावध राहतील. त्यामुळें यज्ञादिक्रिया सुरळीत चालतील व संसाराची सुस्थिति होईल.

यास्तव आतां अगोदर रसातळास जाऊन मी प्रल्हादाला सावध करतों व राज्य करावयास लावतों. त्याच्यावाचून दुसऱ्या कोणाला जर दानवराज केलें तर तो देवांचा पराभव करील. प्रल्हादाचा हा शेवटचा पावन देह आहे. या कल्पाची समाप्ति होई तों त्याला या देहानेंच रहावयाचें आहे. कारण परमेश्वराची इच्छारूपी नियति-देवी अशी आहे. यास्तव त्यालाच जाऊन जागें केलें पाहिजे. जीवन्मुक्ताच्या असंसक्तिलक्षण समाधीमध्यें स्थित असलेल्या व त्यामुळेंच मनश्चेष्टारहित झालेल्या त्याला असुरनाथता करूं दे. म्हणजे सुरासुरांसह हा सर्ग नष्ट होणार नाहीं. त्याचें परस्पर युद्ध चालेल व त्यामुळें माझा खेळ होईल. यद्यपि मला जगाचे उदयास्त एकसारखेच आहेत तरी हें आहे तसेंच राखणें, उचित होय. थोड्याशा प्रयत्नाला भिऊन याचा नाश होऊ दिल्यावर मला दुसरा सर्ग घेऊन तरी काय करावयाचें आहे? तेव्हा आता ठरल्याप्रमाणें करावें, हेंच बरें ३८.

**सर्ग ३९**—हरीनें दैत्यपुरास जाऊन शंखनादानें प्रल्हादास सावध केलें व कल्पपर्यंत राज्य कर, असे सांगितलें.

**श्रीवसिष्ठ**—राघवा, असा मनात विचार करून तो सर्व परिवारासह क्षीरसागरांतील आपल्या नगरातून निघाला व त्याच्याच तळरंध्रातून प्रल्हादपुरास आला. हरीनें सोन्याच्या मंदिरात, मेरूच्या गुहेंत समाधि लावून बसलेल्या ब्रह्मदेवाप्रमाणें, समाधिस्थ दैत्येंद्रास पाहिलें. भगवान् दैत्यनगरात जातांच सूर्यकिरणास भिऊन उलूक जसे पळून जातात व अंधकारात लपून बसतात त्याप्रमाणें तेथील दैत्य त्याच्या तेजास भिऊन पळून गेले. तेव्हा दोन-तीन मुख्य असुरांसह आपल्या परिवारानें वेष्टित झालेला तो सुरेश, आकाशात येणाऱ्या तारायुक्त चंद्राप्रमाणें, असुराच्या गृहांत शिरला. गरुडाच्या पाठीवर बसलेल्या त्याला लक्ष्मी वारा घालीत होती. चक्रादि आयुधें त्याच्याबरोबर होतीं आणि देव, ऋषी व मुनी त्याला वंदन करीत होते. असो; प्रल्हादापाशीं जातांच ' हे महात्मन्, ऊठ ' असें बोलून त्यानें आपला पांचजन्य वाजविला. त्याच्या नादानें सर्व दिशा दुमदुमल्या. नगरांतील आबालवृद्ध दानव भयभीत झाले व दानवेशही हळु हळु सावध झाला. कोमेजलेल्या वेलीला पाणी घातलें असतां ती जशी टवटवीत होते त्याप्रमाणें हळु हळु त्याच्या सर्व प्राणशक्ती, अंगभर पसरल्या. उदयानंतर सूर्यतेज जसें भूमंडलावर सर्वतः पसरतें त्याप्रमाणें त्याची प्राणश्री

शरीरावर पसरली. सूक्ष्म शरीरांत चित् प्रतिबिंबित झाली व ती विषयोन्मुख होतांच मनाचा व्यापार सुरू झाला. काळ्या भोर नेत्रांत सुंदर तेज चमकूं लागलें. प्राणापानगति सुरू झाली व इतक्यांत 'सावध हो; देहभानावर ये.' असें प्रभूनें गंभीर वाणीनें पुनः म्हटलें असतां तो चांगला जागा झाला. तेव्हां भगवान् म्हणतो–बा साधो, आपली महा लक्ष्मी व आकृति यांस आठव. तूं उगीच अकालीं देहविराम कां करतोस? ग्राह्य व त्याज्य या संकल्पांनीं शून्य असलेल्या तुझ्या शरीरांतील भावाभावांनीं तुझी कोणती हानि होणार आहे? यास्तव ऊठ. तुला या देहानें असेंच येथें एक कल्पभर रहावयाचें आहे. तुझ्या आयुष्याची मर्यादा आम्ही जाणतों. जीवन्मुक्त झालेल्या तू आतां, राज्य करीत, राहिलेलें आयुष्य घालवावेंस. कल्पांतीं मातीच्या घागरीप्रमाणें हें शरीर विशीर्ण झालें ह्मणजे तूं स्वमहिम्यामध्यें स्थित होशील. ही तुझी जीवन्मुक्तांचे विलास करणारी शुद्ध तनु कल्पातापर्यंत रहाणारी आहे. मग तूं बारा आदित्याचा उदय, पर्वताची धूळ, व भूगोलाची राख होण्यापूर्वी व्यर्थ तिचा का त्याग करतोस? कल्पांत वायु अजून वाहू लागलेला नाहीं. त्रैलोक्य जळलें नाहीं! पुष्करावर्तादि मेघ अजून भयंकर विजेसह आकाशात उठले नाहींत. दिशा अजून निराधार झाल्या नाहींत ब्रह्मा, विष्णु व रुद्र हे तीनच देव अजून या जगांत अवशिष्ट राहिलेले नाहींत! मग इतक्यात तु शरीर कां टाकतोस? मी जरायुजादि चतुर्विध प्राण्यांनीं व्यापिलेल्या या दशदिशामध्यें विहार करीत असताना आपल्या शरीराचा त्याग करणें, तुला शोभत नाहीं. या सृष्टीची रचना अजून जशीची तशीच आहे. तु भिऊं नकोस. बा प्रऱ्हादा, अज्ञानामुळें ज्याच्या मनास दुःखें तोडीत असतील, मी दुःखी आहें, मूढ आहें, कृश आहें इत्यादि भावना ज्याच्या मतीस व्याकुळ करीत असतील; चंचल मनोवृत्ती ज्याला आंतल्या आत शेकडों आशापाशांनीं बांधून इतस्ततः ओढीत असतील; तृष्णा ज्याच्या हृदयाला एकसारख्या खात असतील, ज्याच्या उंच मनोवनातील चित्तवृत्तिलता सुख-दुःखफलांनीं भरली असेल, ज्याच्या देहारण्यास आधि-व्याधिरूप वणवा लागला असेल; ज्याच्या शरीररूपी शुष्क वृक्षाच्या ढोलींत काम व क्रोध हे दोघे जीर्ण अजगर आनंदानें रहात असतील त्याला मरण शोभतें. तुझ्या सारख्या आनंदी जीवाला तें शोभत नाहीं. मरणाच्या स्वरूपाचें

जरी पर्यालोचन केलें तरी तत्त्वज्ञाला मरण संभवत नाहीं. कारण देह-त्यागालाच मरण म्हणतात. पण तत्त्वज्ञाला सत् आत्म्याच्या योगानें अथवा असत् देहाच्या योगानें तें संपादन करितां येत नाहीं. कारण आत्मा सदा अक्रिय व असंग असल्यामुळें त्याच्याठायीं त्यागक्रिया अथवा देहासक्ति संभवत नाहीं. असत्-देह आपलाच त्याग करील म्हणून म्हणावें तर तें अगदींच अशक्य आहे. स्वात्म्याचें ज्ञान हेंच देहादिकाच्या अज्ञानाचें कारण आहे.

असो; ज्याची मति स्वात्मतत्त्वदर्शनापासून कधीं हटत नाहीं, ज्याला अहंकार-भाव नाहीं, ज्याची बुद्धि पुण्य-पापकल्पनानीं लिप्त होत नाहीं, जो सर्व भूतामध्यें समभाव ठेवतो, जो राग-द्वेषशून्य शीतळ बुद्धीनें साक्षीप्रमाणें हें दृश्य पाहतो, आत्म्याचें यथार्थ ज्ञान झाल्यामुळें ग्राह्य-त्याज्यभाव सोडून आंतल्या आंत जो साक्षीमध्यें चित्त लावतो, सत्य दृष्टीचा आश्रय करून जो लीलेनें जगत्क्रिया करतो, ज्याला इष्टानिष्ट प्राप्तीमुळें संतोष व उद्वेग होत नाहीं, सरोवरावरील मेघाप्रमाणें ज्याच्यापासून गुण-संघ निघतो व ज्याचें नाव कानीं पडताच प्राणिमात्राला आनंद होतो त्याचेंच जीवित शोभते. यास्तव हे सज्जना, तू प्राण्याचें संरक्षण करून आपल्या अवशिष्ट जीविताला सफल कर ३९.

**सर्ग ४०**—ज्ञानी पुरुषानें सदेह असूनहीं विदेहाप्रमाणें व कूटस्थ असूनही क्रिया-पर असल्याप्रमाणें कसा व्यवहार करावा त्याचें दिग्दर्शन.

**श्रीभगवान**—लोक दृष्ट देहाच्या स्थैर्यालाच जीवित व दुसरा देह धारण करण्याकरिता एका देहाचा त्याग करणें, यास मरण म्हणतात. पण हे महामते, तू या दोन्ही पक्षापासून मुक्त झालेला आहेस. तेव्हां तुला मरण कसले व जीवित कसलें? पण केवल ज्ञान व अज्ञान याच्या गुण-दोषांचा प्रपंच करण्याकरिता मी 'अमुक जीवित शोभतें व अमक्याचें मरण शोभतें' असें तुला सांगितलें. तू वस्तुतः जिवंत रहात नाहींस व मरतही नाहींस. देहामध्यें असूनही 'देहच मी' अशी भावना नसल्या-मुळें तूं विदेहच आहेस. तूं ज्ञानी आहेस. तूं सर्वदा सत् आहेस. तूं पर चित्प्रकाश आहेस. तेव्हां तुला देह कोणता व अदेह कोणता? तिकडे वसंतोदय हावो कीं प्रळयवायु सुटो भावाभावहीन असलेल्या आत्म्याला त्याचें काय? तो काहीं झालें तरी आपल्या स्वरूपांतच रहाणार! सर्व

भूतें राहोत, कीं जावोत; तीं नाश पावोत की वाढोत; ज्ञानी आत्म्यामध्येंच रहातो. अनात्म वस्तूचा क्षय झाला तरी परमेश्वर क्षीण होत नाहीं व त्याची वृद्धि झाली तरी याची वृद्धि होत नाही व हें शरीर चेष्टा करीत असलें तरी तो कोणतीही चेष्टा करीत नाहीं. मी देहसंबंधी देही आहें, हा चित्तभ्रम गेला ह्मणजे मी टाकतों किंवा टाकीत नाहीं ही व्यर्थ कल्पना कधीं होत नाहीं. हें टाकून हें घेतों, हें करून हें करतों, इत्यादि संकल्प तत्त्ववेत्त्याच्या चित्तात उद्भवत नाहींत. ज्ञानी व सर्वकर्ते पुरुष कांहीं करीत नाहींत. कारण ते अकर्तृ-पदास पोचलेले असतात. अकर्तृत्वामुळें त्याचें अभोक्तृत्वही अर्थसिद्ध आहे. कारण ज्यानें पेरलेंच नाहीं तो घेणार काय? कर्तृत्व व भोक्तृत्व नाहींसें झालें की शांति रहाते व तीच प्रौढ झाली असता मुक्ति होते. ज्ञानी सदा जागे ( सावधान ) शुद्ध व चिन्मय असतात. ग्राह्य-ग्राहकसंबंध क्षीण झाला कीं शांति उदय पावते व तीच स्थिर झाली ह्मणजे मोक्षरूप होते. तसल्या सर्वोत्तम शांतीमध्यें स्थित असलेले तुझ्यासारखे उत्तम पुरुष निजलेल्या पुरुषाच्या अंग-चाळवण्याप्रमाणें निर्हेतुक व्यवहार करतात. यास्तव हे प्रऱ्हादा, प्रारब्धाचा क्षय होई तों तूही वासना-शून्य मनानें राज्यपालन कर. ज्याचें चित्त स्वात्म्यामध्यें तल्लीन झालेलें असतें ते तुझ्यासारखे पुरुष रम्य अनात्म वस्तूंमध्यें रत होत नाहींत व आत्मसुखाचा आतल्या आत स्वाद घेणारे ते संतं आत्म्याशीं संबंध न ठेवणाऱ्या दुःखामुळें दुःखी होत नाहींत. नित्य प्रबुद्ध पंडित आरशातील प्रतिबिंबाप्रमाणें प्राप्त कार्याचें ग्रहण अनिच्छेनें करतात. यास्तव हे दैत्येश्वरा, तू आतां अशाच स्थिर चित्तानें ब्रह्ममय होऊन, ब्रह्मदेवाच्या एकच दिवस, गुणांनीं भरलेल्या राज्यलक्ष्मीचा उपभोग घे व नंतर हे महात्म्या अच्युत परमास्पदास जा ४०.

सर्ग ४१—दैत्यानें केलेल्या पूजेचा स्वीकार करून हरीनें त्याला दैत्य-राज्यावर अभिषेक केला व वर मागावयास सांगितलें.

श्रीवसिष्ठ—भगवानाचें हें शांत व गंभीर वचन ऐकून प्रऱ्हादनामक देह आनंदानें असें बोलला—

देवा! हित व अहित यांच्या विचारांनीं भरलेलीं शेकडों राज्यकार्यें करून मी अगदीं थकलों व त्याकरितां एक क्षणभर विश्रांति घेत बसलों होतों. भगवन्, आपल्या प्रसादानें मला उत्तम स्थिति प्राप्त

झाली आहे. समाधि व व्युत्थान या दोन्ही दशेंत मी एकसारखीच भावना ठेवतों. हे महादेवा, निर्मल बुद्धीनें मी तुला फार दिवसापासून आतल्या आंत पहात होतों. पण तोच तू आतां मला या बाह्य दृष्टीनेंही साक्षात् दिसत आहेस. हे महेश्वरा, मी या सर्वसंकल्पशून्य अनंत दृष्टीमध्यें जो आजवर स्थित होतों तो शोक, मोह, वैराग्यचिंता, देहत्याग, संसारभय इत्यादिकातील कोणत्याही निमित्तानें नव्हे. कारण एका परम तत्त्वाचा साक्षात्कार झाल्यावर शोकादिकाना अवकाश कोठून रहाणार ? मी विश्रांतीच्या विचारजन्य इच्छेमुळेंच समाधिस्थ झालों होतों. अप्रबुद्ध जन 'हाय हाय मी विरक्त झालों आहें. आतां देहत्याग करतों' इत्यादि अनेक संकल्प करून व्याकुळ होत असतात. हें सुख, हें दुःख, हे आहे, हें नाहीं, इत्यादि प्रकारें चंचल होणारें चित्त मूढ होय. मी निराळा व हा निराळा ही आत्मबुद्धिशून्य अज्ञाची वासना आहे. पण हे त्याज्य व हें ग्राह्य हा मिथ्या मनोभ्रम दुर्बुद्धि अज्ञाप्रमाणें सुज्ञाला उन्मत्त करीत नाहीं. हे कमलनयना, तूच सर्वांच्या अंतर्यामीं आहेस, व जगत् असत् आहे. तेव्हा त्यात ग्राह्य किंवा त्याज्य काय असणार ? यास्तव हे नारायणा, मी द्रष्टा व दृश्य याचा विचार करीत असताना असाच स्वाभाविकपणें क्षणभर विश्रात झालों व एवढा वेळ त्याच भावाभाव-शून्य स्थितींत राहून आता तुझ्या इच्छेनें पुनः देहभानावर आलों आहें. परमात्मन्, मला माझें सर्वस्व मिळालें आहे. यास्तव आता तू जें सागशील तें मी करीन. हे पुंडरीकाक्षा, तूं त्रिभुवनात परमपूज्य आहेस. यास्तव शास्त्र व लोक-नियति याच्या योगानें प्राप्त झालेली पूजा मजपासून ग्रहण कर.

असें बोलून दानवाधीशानें त्या देवास अर्घ्य समर्पण केलें आणि आयुध-देवता, अप्सराचा सघ, देव व गरुड यांसह श्रेष्ठ गोविंदास पूजलें. तेव्हां पूजा करून, समोर हात जोडून बसलेल्या दानवेशास भगवान् कमलापति म्हणाला, "प्रल्हादा, ऊठ. सिंहासनाचा स्वीकार कर. म्हणजे मी स्वतः तुला राज्याभिषेक करीन. माझ्या पाचजन्याचा ध्वनि ऐकून येथें आलेले हे सर्व सिद्ध, साध्य व देव तुझें सुमंगल करोत." असें बोलून पुंडरीकाक्षानें दानवास सिंहासनावर बसविलें. नंतर हरीनें बोलावल्यामुळें आलेल्या समुद्र, नद्या व तीर्थें यांच्या जलांनीं देव-ऋषि-मुनि-

सिद्ध इत्यादिकांनीं त्याला अभिषेक केला; सर्व त्याची स्तुति करूं लागले व इतक्यांत भगवान् ह्मणाला—

हे निष्पापा, मेरु, पृथ्वी व चंद्र-सूर्य असत तों तूं गुणवान् राजा हो. इष्टानिष्ट फलाची इच्छा न करितां राग, भय व क्रोध सोडून समदृष्टीनें तूं राज्याचें परिपालन कर. तुला उत्तम पदाची प्राप्ति झाली आहे. यास्तव तू आतां आपल्या राज्यकृत्यांत दुर्लक्ष्य करूं नकोस व बापाप्रमाणे देव व मानव यांनाही त्रास देऊं नकोस. देशकालानुरूप प्राप्त कार्य करीत तू सुखानें रहा. अहंता व ममता सोडून तूं आपलें कर्तव्य करूं लागलास ह्मणजे तुला कोणत्याही प्रकारची पीडा होणार नाहीं. आतां तूं सर्वज्ञ झाला आहेस. तुला सर्व कळत आहे. तेव्हां अधिक उपदेश करण्यात काहीं अर्थ नाहीं. तुझ्या सारखा महात्मा राजा मिळाल्यामुळें देवांनाही फारसे क्लेश होणार नाहीत. दानवस्त्रियांना रडण्याचा प्रसंग येणार नाहीं. सर्व जगत् पूर्ण शांतीचा अनुभव घेईल. आजपासून देव व असुर यांच्या स्त्रियांना आपापल्या अंतःपुरांत सुखानें राहूं दे आणि हे साधो, तूंही समृद्ध दानवश्रीचा यथेच्छ उपभोग घे ४१.

सर्ग ४२—विष्णूचें क्षीरसागरा गमन, या आख्यानाचें उत्तम फल व समाधि सोडून उठण्याचें प्रयोजन.

श्रीवसिष्ठ—रामा, असें बोलून तो भगवान् सर्व परिवारासह तेथून निघून स्वस्थानीं गेला, व त्यानंतर त्रिभुवनांतील सर्व जीव स्वस्थचित्तानें नियतिप्राप्त व्यवहार करूं लागले दशरथतनया, प्रल्हादाची ही सुंदर ज्ञानप्राप्ति मी तुला सांगितली. हिचा जे शांत मनानें विचार करतील त्यांनाही परम सिद्धि अवश्य प्राप्त होईल सामान्य विचारानेंही जर पाप जातें तर योगयुक्त विचारानें परम पद मिळेल यांत काय संशय आहे ! रामा, अज्ञान हेंच पाप आहे व तें विचारानें क्षीण होतें. यास्तव काहीं झालें तरी विचार सोडूं नये. या प्रल्हादाच्या सिद्धीचा जे विचार करितात त्याच्या सात जन्माचें पाप नष्ट होतें.

श्रीराम—भगवन्, परम पदीं परिणत झालेलें महात्म्या प्रल्हादाचें मन पांचजन्याचा गंभीर ध्वनि ऐकून जागें कसें झालें !

श्रीवसिष्ठ—बा सज्जना, सदेहा व विदेहा अशी दोन प्रकारची मुक्ति आहे. त्यांचा हा पृथक् विचार ऐक. ज्याची बुद्धि विषयांमध्यें आसक्त

नसते त्याची त्याविषयींची इच्छा सर्वथैव नष्ट होते, व अशा पुरुषाची जी स्थिति तीच जीवन्मुक्तता होय. पुढें प्रारब्ध संपल्यामुळें देहक्षय झाला असतां तीच पुनर्जन्मरहित विदेह मुक्ति होते. ती कोणाला प्रत्यक्ष दिसत नाहीं. जीवन्मुक्ताच्या हृदयामध्यें भाजलेल्या बीजासारखी पुनर्जन्मांकुर-रहित शुद्ध वासना रहाते. पवित्र, अतिउदार, शुद्ध सत्त्वमय व आत्मध्यान-मय, अशी ती वासना त्याच्या ठायीं निजलेल्या पुरुषाप्रमाणें रहाते व तिच्या योगानें त्याचा व्यवहार यदृच्छेनें होतो. राघवा, हृदयातील त्या शुद्ध वासनेमुळें प्रारब्ध अवशिष्ट असल्यास समाधिस्थ जीवन्मुक्त हजार वर्षांनीही उठतात ( देहभानावर येतात ). प्रल्हादही या अतःस्थ वासनेमुळेंच शंखाचा शब्द ऐकून जागा झाला. पण समाधींत श्रोत्रेंद्रियही लीन झालेलें असल्यामुळें तो शब्द त्याला ऐकू कसा गेला म्हणून म्हणशील तर सांगतों. हरि सर्व भूताचा आत्मा आहे. यास्तव त्याच्या मनात जसा प्रतिभास होतो, तसेंच सर्व होतें. त्याचा सत्य संकल्पच या सर्वांचें कारण आहे. 'प्रल्हाद आता देहभानावर येवो' असें जेव्हा त्यानें मनात चिंतन केलें तेव्हा एका क्षणात त्याप्रमाणें घडलें. स्वतः कारणशून्य पण भूताचे कारण ( अव्याकृत ) अशा त्यानें आपल्यामध्येंच जग उत्पन्न करण्याकरितां वासुदेवमय शरीर धारण केलें आहे आणि असा प्रकार असल्यामुळें त्या माधवाच्या आराधनेनें आत्मदर्शन सत्वर होतें व आत्मदर्शनानें त्याचें दर्शन सुलभ होतें. यास्तव राघवा, तूही याच दृष्टीचा आश्रय करून विहार कर. म्हणजे तुला तें शाश्वत पद प्राप्त होईल. दुःखाचा वर्षाव करणाऱ्या संसारमेघानीं हृदयाकाशास आच्छादित केल्यामुळे विचारसूर्य दिसत नाहीं आणि त्या कारणानें मौर्ख्य पसरतें. पण एकादी यक्षीण मंत्र्याला जशी पीडा देत नाहीं त्याप्रमाणें आत्मप्रसादवान् धीराला विष्णूची ही अति भासुर माया बाधा करीत नाहीं. आत्म्याच्या इच्छेनेच संसारजाल रचणारी माया वाढते व योग्यसमयीं क्षीण होते. यास्तव सात्त्विक राजपुत्रा, तू आपली शुद्ध वासना पुष्ट कर ४२.

**सर्ग ४३**—ज्ञान ईशप्रसादप्राप्य असलें तरी आपला प्रयत्न व इंद्रियजय यांच्या योगानेंच तें संपादन करावें.

**श्रीराम**—भगवन्, चंद्राच्या किरणांनीं औषधी जशा तृप्त होतात त्याप्रमाणें आपल्या या वचनामृतानें आम्ही सर्व तृप्त झालों आहों. हातांत

घेतलेल्या अति सुवासिक पुष्पांप्रमाणें आपली मृदु व स्वादिष्ट वचनें आम्हांला सुख देतात. प्रभो, पुरुषाच्या प्रयत्नानेंच जर सर्व प्राप्त होतें तर प्रल्हादाला माधवाच्या वराचाचूनच बोध कां नाहीं झाला!

श्रीवसिष्ठ—राघवा, तूं असे काय म्हणतोस! प्रल्हादाला सर्व कांहीं त्याच्या प्रयत्नानेंच मिळालें. तिळ व त्यांतील तेल यांप्रमाणें आत्मा व नारायण भिन्न नाहींत. पुष्पांचें सार जसा वास त्याप्रमाणें जीवांचें सार विष्णु. तोच आत्मा व आत्मा तोच जनार्दन. वृक्ष व पादप यांप्रमाणें आत्मा व विष्णु हे पर्याय शब्द आहेत. आत्मभूत विष्णूनें स्वतःच आपलें मन विचारात लावून स्वतःच आपल्याला जाणलें. कदाचित् प्रयत्नानें केलेल्या विचारानें बोध होतो व कदाचित् भक्तिलक्षण प्रयत्नानें प्राप्त झालेल्या विष्णुदेहाच्या द्वारा होतो. माधवाची पुष्कळ दिवस आराधना केली व त्यामुळें तो जरी अतिशय संतुष्ट झाला तरी विचारशून्य पुरुषाला तो ज्ञान देऊ शकत नाहीं. स्वप्रयत्नप्राप्त विचार हाच आत्मदर्शनाचा मुख्य उपाय आहे. वरप्राप्ति, ईशप्रसाद इत्यादि दुसरे सर्व गौण उपाय होत. रामा, तूं मुख्य उपायपरायण हो. प्रथमतःच इंद्रियांना बलात्कारानें आपल्या अधीन करून घेऊन व सर्व प्रयत्नानें अभ्यास करून चित्ताला विचावान् कर. स्वप्रयत्नानें केलेल्या शुभाचरणानेंच सर्व कांहीं शुभ प्राप्त होत असतें. यास्तव पौरुषयत्नाचा आश्रय करून, इंद्रियपर्वतास ओलांडून व संसारसागरास तरून पलीकडच्या परम पदास जा. स्वप्रयत्नावाचूनच जर जनार्दन दिसणें शक्य असतें तर त्यानें पशु–पक्ष्यांना दुःखांतच कां ठेवलें असतें. स्वप्रयत्नावाचूनच गुरु जर शिष्याचा अज्ञानांतून उद्धार करूं शकता तर उंट व बैल यांना भारवाहकाचें काम शिकविणाऱ्या पुरुषानेंही त्यांना आत्मज्ञ केलें असतें! तस्मात् हरि व गुरु यांच्या पासून कांहीं मिळत नाहीं. जें मिळतें तें आपल्या दृढ प्रयत्नानें मिळतें. ज्ञानदृढतेनें मनोविजय संपादन केला की पुरुषार्थ तळहातावरील मळ होतो. यास्तव तूं आपलीच आराधना कर; आत्म्याचीच पूजा कर; त्याचेंच मनोभावानें दर्शन घे. शास्त्रीय प्रयत्न व विचार यांपासून दूर पळणाऱ्या मूर्खांनीं शुभस्थितींत रहावें म्हणून विष्णुभक्तीची योजना केली आहे. अभ्यास व यत्न हा मुख्यक्रम असाध्य झाल्यास पूज्याची पूजा हा दुसरा क्रम हितकर आहे, असें जाणावें. कारण इंद्रियजय झाल्यावर पूजनाचें कोणतें

फळ मिळणार ! व तो नसल्यास कितीही जरी पूजन केलें तरी काय होणार ! विचार व उपशम यांवाचून हरीची प्राप्ति होणें शक्य नाहीं व त्यांच्या योगानें मुक्त झालेल्या पुरुषाला ज्याच्या हातांत कमळ आहे अशा हरीच्या देहापासून कोणता अधिक लाभ होणार आहे ! रामा, तूं आपल्या चित्तालाच विचार व उपशम यांनीं युक्त कर. तें सिद्ध झालें कीं तूं सिद्ध झालास. माधवादिकांची जशी मोठ्या भक्तीनें आराधना करतोस तशीच स्वात्म्याची करण्यास कोणती आड काठी आहे ? प्राणिमात्राच्या हृदयात विष्णु स्थित आहे. पण त्याला सोडून जे बाहेरच्या विष्णूची आराधना करतात त्यास काय म्हणावें ? हृदय-गुहेंत रहाणारें चित्-तत्व हें त्याचें मुख्य सनातन शरीर आहे व चक्र-गदा-युक्त हा त्याचा गौण आकार आहे. मुख्य सोडून गौणाच्या मागें लागणें अगदीं प्रशस्त नव्हे. तयार असलेलें रसायन सोडून दुसरें तयार करावयास लागणें यासारखी बालिशता आणखीं कोणती असणार ? नित्य अभ्यास व विवेक याच्या योगानें चित्त अवश्य प्रसन्न होतें. विष्णूचा वर मिळणें हें सुद्धा प्राण्याच्या अभ्यासवृक्षाचेंच फळ आहे. सर्व उत्तम दशाची स्वमनोनिग्रह हीच उत्तम भूमि आहे. सगरपुत्रानी पृथ्वीला खणलें व देवासुरानी मदराचलास रवीसारखें ओढलें; पण तें सुद्धा मनोनिग्रहाचेंच फळ आहे. मनोरूपी महामत्त सागर शात होई तो प्राणी सहस्रावधि योनींत जन्म घेत भ्रमण करितात. ब्रह्मा, विष्णु, इंद्र, रुद्र इत्यादिकांची दीर्घ काल आराधना केली व ते प्रसन्न झाले तरी मनोव्याधीपासून सोडवूं शकत नाहींत. यास्तव राजपुत्रा, जन्मक्षयाकरितां केवल संवित्-चें चिंतन कर ४३.

**सर्ग ४४**—गाधींचे आख्यान. दृश्याचें मिथ्या दुःखस्वरूप.

**श्रीवसिष्ठ**—रामा, ही अनंत संसारमाया आत्मचित्तजयानेंच क्षीण होते. तिचे वैचित्र्य तुझ्या ध्यानांत यावें म्हणून हा इतिहास सांगतों तो ऐक.—

या पृथ्वीच्या पाठीवर कोशल म्हणून एक देश आहे. त्यांत गाधि या नांवाचा एक गुणी ब्राह्मण होता. तो महा श्रोत्रिय ( वेदाध्यायी ) बुद्धिमान् व साक्षात् धर्ममूर्तिच होता. बाळपणापासूनच तो फार विरक्त असे. एकदां तो कांहीं तरी निमित्त सांगून आप्तवर्गाला सोडून निघाला व एका अर-

कर वनात जाऊन एका रम्य सरोवराच्या कांठीं तप करूं लागला. 'भगवान् शौरीचें दर्शन होई तों मी असेंच उग्र तप करणार' असा निश्चय करून तो गळाभर पाण्यांत उभा राहिला. त्याच अवस्थेंत त्याचे आठ महिने लोटले. नंतर एकदा उग्रतपानें सतप्त झालेल्या त्याच्याकडे हरि आपण होऊन आला आणि म्हणाला, " ब्राह्मणा, पाण्यांतून वर ये व अभिमत वर माग. तुझा नियमवृक्ष सफळ झाला आहे "

त्यावर ब्राह्मण म्हणतो—भगवन्, तुला नमस्कार असो. तुझी ही जगत्-नावाची पारिमार्थिकी माया मला दाखीव. तिला साक्षात् पहावें, अशी माझी इच्छा आहे. तें ऐकून भगवान् 'बरें आहे, त्या मायेला तू पहाशील व तिचा त्यागही करशील' असें म्हणाला व गुप्त झाला. त्यानंतर, हे रामा, ब्राह्मण पाण्यातून निघून कोरड्या भूमीवर आला. सरोवराच्या जलानें त्याचें अंग व जगत्पतीच्या दर्शनानें त्याचे मन शीतळ झालें होतें. हरिदर्शनानें अति संतुष्ट झालेल्या त्याचे कांहीं दिवस ब्राह्मण-कर्मानेंच त्या वनात गेले. नंतर एकदा तो महर्षितुल्य गाधि मनात विष्णूच्या वाक्याचें स्मरण करीत ज्यांतील कमळें फुललीं आहेत अशा सरोवरात स्नान करूं लागला, व अघमर्षण मंत्राचा जप करीत असताना अकस्मात् त्याच्या चित्ताला भ्रम झाला. वायूच्या वेगानें गुहेंत पडणाऱ्या वृक्षाप्रमाणें त्यानें आपलें शरीर घरात मरून पडलेले पाहिलें. त्याची प्राणापान-क्रिया बंद पडली होती. सुकलेल्या पानाप्रमाणें त्याचें मुख निस्तेज झालें होतें. देठापासून तोडून टाकलेल्या कमळाप्रमाणें त्याचें शव झालेलें शरीर सर्वतः म्लान झालें होतें. ज्याच्यांतील नक्षत्रें लोपलीं आहेत अशा प्रातःकाळच्या आकाशाप्रमाणें त्याचे नेत्र पांढरे झाले. वृष्टिरहित ग्रामाप्रमाणें त्याचें शरीर धुळीनें भरलें. टिटव्या जशा एकाद्या वृक्षाला कर्कश आवाज करीत वेढितात त्याप्रमाणें आक्रोश करणाऱ्या त्याच्या आप्तांनी त्याला सर्वतः वेढिलें होतें. जिच्या नेत्रांतून अश्रूंच्या सतत धारा चालल्या आहेत अशा त्याच्या भार्येनें त्याच्या पायांचा आश्रय केला होता. रडणाऱ्या वृद्ध मातेनें आपल्या हातानें त्याच्या हनुवटीला स्पर्श केला होता व बाकीचे आक्रोश करणारे आप्त सभोंवर बसले होते. त्याचे ओंठ उघडे राहून एकमेकांस लागलेले दांत बाहेर दिसत होते. त्यामुळें तें शव आपल्या अनित्य जीविताला हसतच आहे, असा भास होत असे.

असा बराच वेळ रडण्याचा प्रकार आटोपल्यावर बांधवांनीं त्याच्या शरीरास श्मशानांत नेलें. तेथें. अनेक शवें जळत असून तीं 'पहा, तुमचा सुद्धां असाच शेवट होणार! सावध व्हा.' असेंच जणुं काय उंच ज्वालांनीं सर्वांस सुचवीत होतीं. रामा, श्मशानांतील बीभत्स प्रकाराचें वर्णन करण्यांत फारसें तात्पर्य नाहीं. तेथें गेल्यावर काष्ठादिकांची रचना करून त्याच्या आप्तांनीं त्याला अग्नि दिला असतां भगवान् पावक त्याच्या मांस-मेदयुक्त शरीरास जाळूं लागला. थोड्याच अवकाशात अग्नीनें त्याचें भस्म केलें व हळु हळु आपणही शात झाला. नंतर सर्व शरीर जळून गेलें आहे, असें पाहून त्याचे आप्त स्नान करून व जलांजलि देऊन घरीं परत आले. सारांश राघवा, त्या तपस्वी ब्राह्मणानें सरोवरांत अघमर्षण करीत असतांना हा सर्व चमत्कार पाहिला ४४.

सर्ग ४५—गाधीचा चांडाळीच्या उदरात जन्म. किराताची स्थिति व राज्यप्राप्ति.

**श्रीवसिष्ठ**—त्यानतर जलामध्यें एकाग्र मनानें अघमर्षण करीत असलेल्या गाधीनें आपला पुढचा जन्म पाहिला. भूतमंडल-देशाच्या सीमेवरील एका गावाच्या बाहेरील म्हारवाड्यात एका चाडाळस्त्रीच्या उदरांत आपण गेलों आहों; तेथील साक्षात् नरकवास भोगीत आहों, योग्य समयीं आपले सुकुमार शरीर तिच्या योनिच्छिद्रातून मोठ्या कष्टानें बाहेर पडलें आहे, तेथें दुग्धादि प्राशन करीत आपण हळु हळु मोठे होत आहों; चांडाळी मळकट माडीवर आपल्याला घेऊन फार आनदित होत आहे; आपल्या घाणेरड्या तोंडानें मुके घेत आहे; जणुं काय साक्षात् यमदूतच असा आपला चाडाळ बापही मोठ्या लडिवाळपणानें आपल्याला उचलून सुयाप्रमाणें टोंचणाऱ्या तोंडावरील केसानीं आपल्या सुकुमार तोडास बोचीत चुबन घेत आहे; आपण उत्तरोत्तर मोठे होऊन, लंगोटी लावून, उघड्या अंगानें म्हारवडाभर फिरण्याची व बरोबरीच्या पोराना अश्लील शिव्या देत ग्राम्य भाषा बोलण्याची शक्ति आल्यामुळें भाडखोरपणाचा अभ्यासच करीत आहों, असें त्यानें पाहिलें. त्या चांडाळपुत्राला बारावें वर्ष लागलें. तेव्हा तो हातांत तीक्ष्ण शस्त्रें व बरोबर कुत्र्यांचा परिवार घेऊन घोर अरण्यात जाऊं लागला. एकादा ब्राह्मणपुत्र जसा दिवसभर गुरूपाशीं बसून अध्ययन करतो त्याप्रमाणें तो अरण्यांत शिरून दिवसभर हिंसेचा पाठ करूं लागला. थोड्याच वर्षांत तो त्या

कलेंत फार निष्णात झाला. त्याच्या त्या गुणावर लुब्ध होऊन एका त्याच्या सारख्याच काळ्याकुट्ट चांडाळानें आपली तरुण व काळी कन्या त्याला विवाहविधीनें दिली. त्या समानवर्ण वधूवरांचा जोडा चांगला शोभत होता. भगवान् मदनाने त्यांच्या अस्पृश्य जातीकडे न पहातां, त्यांच्याही शरीरांत यथेच्छ संचार करून त्या जोडप्याला ग्राम्यधर्मांत नियुक्त केलें. तेव्हां त्याचें साक्षात् फळच, अशीं त्यांना वारंवार अपत्यें होऊं लागलीं. त्याचें पोषण व त्यांच्यापासून होणारा सुखाभास यात तीं दोघें निमग्न झालीं. काहीं काळानें, तीं कोल्ह्यांसारखीं असलेली पोरें मोठीं झालीं व गाधि-चंडाळाला जरेनें ग्रासलें. तो तपस्व्या-प्रमाणें आपल्या झोंपड्यातच राहून आयुष्य घालवू लागला. त्याच्या तरुण-पुत्रांचीं चारित्रेही त्याच्यासारखींच उच्चार न करण्यासारखीं होतीं. ते सर्व बापाप्रमाणेच अरण्यातील पशूंना मारण्यात पटाईत झाले होते. पण काळानें त्याच्या सर्व परिवाराला अकस्मात् नष्ट केलें. त्या गाधि चांडाळाची प्रियभार्या व तिची करतीं-सवरतीं अपत्ये एकाएकीं एका भयंकर रोगाने मेलीं. तेव्हा त्या म्हाताऱ्याच्या दु.खाला पार नाहींसा झाला. क्रमानें त्या सर्वांना अग्नि देऊन तो रडत रानोमाळ फिरूं लागला. काहीं दिवसानीं आपला देश सोडून तो वाट फुटेल तिकडे जाऊं लागला. पुष्कळ भटक-ल्यावर त्याला कीराचा देश लागला. त्यातील राजधानीस यदृच्छेनें पोंच-ल्यावर तेथे मोठा उत्सव चालला आहे, असे त्याला आढळलें. तो काय चमत्कार आहे, ते पहावे म्हणून गाधि पुढें गेला. तों त्याला एक मोठा शृंगारलेला हत्ती समोर येत असून त्याच्या आजुबाजूस हजारों स्त्रीपुरुषांचा घोळका जमला आहे, असें दिसलें. तेथील राजा मेल्यामुळें व त्याला अपत्य नसल्यामुळें दुसरा राजा कोण करावा हें ठरविण्याकरितां त्याला स्वैर सोडलें होते. त्याच्या मागोमाग अनेक भूषित सुंदर स्त्रिया, सामंत राजे व राजपुरुष होते. या वृद्ध दुःखी चांडाळानें कौतुकानें व निश्चल दृष्टीनें त्या हत्तीकडे पुष्कळ वेळ पाहिलें. हत्तीनेंही त्याच्याकडे पाहिलें आणि एकाएकीं जवळ जाऊन त्याला सोंडेनें वर उचललें. दुसरा कोणी नागरिक तर तेव्हांच भिऊन मेला असता; पण हा चांडाळ पशूंशी झटा-पटी करण्यांत चांगला कुशल असल्यामुळें त्याला त्याची मुळीच भीति

वाटली नाहीं. सर्व लोक मोठ्या आश्चर्यानें व भीतीनें जों पहात आहेत तों त्या पशूनें त्या भाग्यवानाला आपल्या मस्तकावर बसविलें.

त्याबरोबर मंगलवाद्यांचा ध्वनि व आनंदी जनांचा जयजयकार दशदिशांस व्यापूं लागला. बंदिजन त्या नव्या राजाची स्तुति करूं लागले. त्याला भूषित करण्याकरितां श्रेष्ठ स्त्रिया त्याच्यापाशीं आल्या. त्या सुंदरींनीं त्याला हत्तीवरून उतरविलें व राजमंदिराच्या अंतर्गृहांत नेलें. त्या रमणींनीं आपल्या कोमल तळहातानीं त्याच्या राठ शरीरास सुवासिक द्रव्यें लाविलीं. जन्मापासून न घासलेल्या व त्यामुळेंच बुरशी चढलेल्या दातास सुवासिक चूर्ण लावून शुभ्र केलें. पाढऱ्या केंसांस अत्तरें व दुसरीं तेलें लाविलीं. उष्णोदकानें स्नान घातलें. मऊ वस्त्रें नेसावयास दिलीं. रत्नें व भूषणें योग्य स्थानीं घातलीं. कपाळीं कस्तुरीचा टिळा लाविला. सुग्रास तांबूलादि दिल्यावर तयार केलेल्या पर्यंकावर पडून थोडी विश्रांति घ्यावयास सांगितलें व त्यानंतर सुंदर वस्त्रें व वेष देऊन त्याला राजसभेंत आणलें. राघवा, वस्त्रें व भूषणें यांच्या योगानें शरीराला शतगुण शोभा येत असते व बाह्य दृष्टी पामराचें चित्त आकर्षण करून घ्यावयाचें झाल्यास अमंगल शरीरालाही बाह्य व जड भूषणादिकांनींच रम्य बनवावें लागतें. जो वृद्ध, भिकारी व दुःखी चांडाळ एका प्रहारापूर्वी अतिशय कुरूप दिसत होता तोच आतां सुंदर दिसूं लागला. सभासद मोठ्या कौतुकानें त्याच्याकडे पाहूं लागले व सर्वांनीं मोठ्या आनंदानें त्याला आपला राजा केलें. देव जसे इंद्राच्या आज्ञेंत रहातात त्याप्रमाणें सर्व प्रजा त्याच्या आज्ञेंत रहाण्यास सज्ज झाली. सर्व नगरभर आनंद पसरला व सामंत राजे त्यास सर्वथा अनुकूल झाले.

सारांश हे राघवा, कावळ्याला जसें अरण्यांत मरून पडलेलें पुष्ट हरिण सांपडावें त्याप्रमाणें त्या गाधिचांडाळाला कीरपुरांतील राज्य मिळालें. तो तेथें गवल या नांवानें प्रसिद्ध झाला. सुंदर स्त्रिया त्याची सेवा करूं लागल्या. जन्मभर धुळींत लोळणाऱ्या त्याच्या अंगाला स्त्रिया कोमल तळहातांनीं कस्तुरी-केशर-मिश्र चंदनाची उटी लावूं लागल्या व त्यामुळें अकस्मात् राज्यलक्ष्मीवान् झालेल्या त्याचें शरीर, थोड्याच दिवसांत, हृष्ट, पुष्ट व मन निश्चित झालें ४९.

सर्ग ४६—हा चांडाळ आहे, असें ऐकून सर्व जनांनीं अग्नीत प्रवेश केला. त्याच्या दु खाने दु खी होऊन त्यानेंही अग्निप्रवेश केला. तों इतक्यांत इकडे गाधि-ब्राह्मण देहभानावर आला.

श्रीवसिष्ठ—रघुनंदना, याप्रमाणें तो चांडाल दैववशात् विलासिनींकडून परिवेष्टित, मंत्रिमंडलानें पूजित, सर्व सामंतांकडून वंदित व छत्रचामरयुक्त झाला. तो सुंदर दिसूं लागला. हळु हळु त्याला सर्व राज्यगुण व कार्यें कळूं लागलीं. त्याचा शोक, भय व आयास नाहींसा झाला. 'सर्व गुण कांचनाचा आश्रय करितात' या न्यायानें तो ज्ञानी आहे, गुणी आहे असें म्हणून सर्व त्याची प्रशंसा करूं लागले. त्याला आपल्या जातीचें व पूर्व स्वभावाचें विस्मरण झालें. याप्रमाणें पूर्ण आनंदवृत्तीनें युक्त व नानाप्रकारच्या आसवानीं प्रत्यहीं मत्त होणाऱ्या त्यानें कीरदेशांत आठ वर्षें राज्य केले. तो तेथें मोठा सदाचारसंपन्न होऊन राहिला होता.

एकदा यदृच्छेनें सर्व भूषणे काढून ज्यामध्यें तारा, चंद्र, सूर्य, व मेघही नाहींत, अशा सर्वतः नीलवर्ण आकाशाप्रमाणें तो झाला. कारण प्रभुतेने पुष्ट झालेलें चित्त कृत्रिम भूषणादिकाचें अभिनंदन करीत नाहीं. नंतर तो तशा अवस्थेंत एकटाच बाह्य अंगण्यात निघून आला. तों तेथें त्याला गात असलेल्या काळ्या भोर अंगाच्या चांडाळाचा संघ दिसला. तो तुणतुणें वाजवून त्यावर मृदुस्वरानें लावण्या म्हणत होता. त्यांतील एक चंडाळाचा वृद्ध नायक राजाला पाहून वर उठला. त्याचें अंग कोळशा-सारखें काळें व नेत्र गुंजेसारखे लाल होते. तो एकाएकीं कीरराजाला म्हणाला "अरे कटजा[1], येथला राजा तुला किंवा दुसऱ्या कोणा सुंदर लावण्या म्हणणाराला कधीं तरी वस्त्रालंकारादि देतो का? फार दिवसांनीं तुला आज पाहून मला मोठा आनंद झाला आहे. कारण बंधुदर्शन सर्व आनंदाचें व मोठ्या लाभाचें निधान आहे."

तो चांडाळ असें बोलत आहे तोंच राजानें त्याचा तिरस्कार केला व त्याची व आपली जणु काय ओळखच नाहीं, असें दाखविलें. पण राजवाड्याच्या माडीवरून खिडकींतून तें पहात असलेल्या राजपत्नींना व अमात्यांना तो चांडाळ आहे, हें त्यावरून कळलें व तीं सर्वजणें म्लान झालीं. राजा तर त्या वृद्धचांडाळाचा धिक्कार करून अंतःपुरांत गेला. पण

१ हें त्याचें चांडळवाड्यांतील प्रख्यात नांव होतें.

तेथील सर्व माणसें खिन्न झालीं आहेत, असें त्याला आढळलें. त्याचेंही तोंड उतरलें. इतक्यांत ती कष्टकर वार्ता सर्व नगरभर पसरली. सर्वांना अतिशय पश्चात्ताप झाला. राजाला बाहेर तोंड काढण्याची लाज वाटूं लागली. घरांत असलेल्याही त्याला शवाप्रमाणें कोणी शिवेनासें झालें. भृत्यजन त्याच्या वाऱ्यालाही उभे रहातनासे झाले. त्याला कोणी मान देईना. वाळूमध्यें टाकलेल्या जलबिंदूप्रमाणें त्याची आज्ञा कार्यक्षम झाली नाहीं. राक्षसापासून जसे सर्व भिऊन दूर जातात त्याप्रमाणें मंत्री व सैनिकही त्याच्यापासून दूर गेले. त्यामुळें तो दुर्दैवी राजा तेथें एकटाच राहिला. तो लोकाना पुष्कळ हाका मारीत होता; पण त्याला कोणी ओच देईना.

तिकडे 'या चाडाळानें आह्मांला भ्रष्ट करून सोडलें आहे. याला प्रायश्चित तर काहीं दिसत नाहीं. यास्तव आतां आपण सर्वांनीं मिळून अग्निप्रवेश करूं या' असा निर्णय करून नगरातील लोक व मंत्री यांनीं शुष्क काष्ठांनीं सर्वतः अग्नि पेटविला व सर्वांनीं त्यांत भराभर उड्या टाकल्या. सर्व नगरभर आक्रोश सुरू झाला. जिकडे तिकडे 'हाय हाय' या ध्वनीवाचून दुसरें कांहीं ऐकू येईनासें झालें. अगोदर अग्नींत पडलेल्या लोकाकरितां मागें राहिलेले त्याचे आप्त करुणेनें विलाप करीत होते. जळणाऱ्या लोकांच्या अंगाचा दुर्गंध सर्व राजधानींत पसरला. मुख्य मुख्य लोकांनीं याप्रमाणें स्वदेहांस अग्नींत टाकून जाळून घेतलें असतां तेथें चांगला रक्षक कोणीच न राहिल्यामुळें चोर, लुटारू व क्रूर लोकांनीं स्त्रिया, अर्भकें व दीन वृद्ध याना यथेच्छ छळलें व अनेक अत्याचार केले. सारांश त्या नगरांत कल्पांत उडाला.

पण रामभद्रा, आपल्या दुर्नीतीमुळें या सर्व लोकांवर हा भयंकर प्रसंग आला आहे, हें जाणून राज्य करीत असताना झालेल्या सज्जनांच्या संपर्कामुळें ज्याच्या मनावर चांगले संस्कार झाले आहेत असा राजा गवल शोकानें व्याकुळ होऊन असा विचार करूं लागला.—

मजकरितां हे सर्व लोक या अशा विपत्तींत पडले आहेत. या राज्यांतील सर्व श्रेष्ठ पुरुषांच्या नाशाचें कारण मी आहें. माझ्या भयंकर दोषांमुळें या सर्वांनीं आत्महत्या केल्या. तेव्हां आतां मला तरी जिवंत राहून काय करावयाचें आहे! यापुढील माझें जीवित म्हणजे साक्षात् दुःखच होय. यावेळीं मरण हाच मला महोत्सव वाटत आहे. कारण

लोकात निंद्य ठरलेल्या दुष्ट प्राण्याच्या जीवितापेक्षां मरण शतपट चांगलें असतें.

असा निश्चय करून गवलानें त्याच पेटलेल्या अग्नींत उडी टाकली व त्याचें अंग भाजून असह्य वेदना होऊं लागली असतां इकडे जलांत अघमर्षण करीत असलेला गाधि ब्राह्मण, स्वप्नांत जसा एकादा दचकून जागा होतो त्याप्रमाणें, झटकन देहभानावर आला.

**श्रीवाल्मीकि**—मुनि वसिष्ठ इतकें सांगत आहेत तों दिवस मावळला आणि सर्व सभासद आपापल्या स्थानीं जाऊन व पूर्वोक्त क्रमानें सर्व क्रिया व रात्र संपवून प्रातःकालीं उचित समयीं नेहमींप्रमाणें राजसभेंत आले ४६. येथें बारावा दिवस संपला.

**सर्ग ४७**—गाधीनें अतिथीपासून कीरराजाचें चरित्र ऐकलें व स्वतः तेथें जाऊन, पाहून व लोकांना विचारून तो विस्मित झाला.

**श्रीवसिष्ठ**—राघवा, याप्रमाणें गाधि चार घटिकांनीं मानसिक संसार-भ्रमापासून मुक्त झाला. त्याचें मन पुनः शांत झालें. कल्पांतसमयीं ब्रह्मदेव जसा जगद्रचना सोडतो त्याप्रमाणें तो ब्राह्मण मानसिक संमोहास सोडून शांत झाला. मद्याचा मद उतरला असतां जशी एकाद्याची बुद्धि शांत होते अथवा निद्रित पुरुष चांगला जागा झाला असतां जसा विचार करण्यास समर्थ होतो त्याप्रमाणें गाधि हळु हळु शांत झाला व त्याला विचार सुचला. रात्र संपली म्हणजे उद्योगी पुरुष जसा 'आज मला अमुक अमुक करावयाचें आहे' असा संकेत करतो त्याप्रमाणें गाधिही 'मी अमुक असून माझें हें कर्तव्य व हें अकर्तव्य आहे' असें मनांत ठरवूं लागला. आपल्या स्वरूपाचें चांगलें भान होतांच तो सरोवरांतून वर आला. तेथले ते सर्व पदार्थ दुसरेच आहेत, असें वाटल्यामुळें तो अतिशय विस्मित झाला व 'मी कोण ? हें काय पहात आहें, व मी काय केलें ?' असें म्हणून तो एकच भुवयी चढवून विचार करूं लागला. पण एका क्षणांतच 'मला भ्रम झाला होता' हें त्याच्या लक्षांत आलें. नंतर त्या सरोवराच्या कांठीं बसून तो पुनः असें चिंतन करूं लागला.—ती माता कोठें व ती प्रिया कोठें आहे? आणि मी माता व प्रिया यांच्यामध्यें मरून पडलों असें पाहिलें तें काय ? माझे आई-बाप लहानपणींच इह लोक सोडून गेले.

माझा विवाह झालेला नसून, ब्राह्मण दुष्ट मदिरेचें स्वरूप जसें पहात नाहीं त्याप्रमाणें मी स्त्रीचें मुखही पाहिलेलें नाहीं. माझ्या देशांतील माझे बांधव येथून फार दूर आहेत. मग त्यांच्यामध्यें मी मरून पडलों आहें असें पाहिलें ते कोण ? मला वाटतें कीं, हा सारा भ्रम आहे. हें स्वप्न आहे. हें दुष्ट चित्त, वनातील मत्त सिंहाप्रमाणें, असेंच नेहमीं भटकत असतें. यास्तव त्याविषयीं आतां अधिक विचार करीत बसण्यात कांहीं अर्थ नाहीं.

राघवा, याप्रमाणें मनाची समजूत घालून तो ब्राह्मण एकटाच आणखीं कांहीं दिवस त्या आश्रमात राहिला. नतर एकदा ब्रह्मदेवाकडे जसा दुर्वास मुनि येतो त्याप्रमाणें त्याच्याकडे एक प्रिय अतिथि आला. तेव्हां गाधीनें त्याचें उचित आतिथ्य केलें. बसावयास दर्भासन दिले. हातपाय धुवून चूळ भरावयास स्वच्छ व शीतळ अर्घ्य दिले आणि पुष्पें व फळें समर्पण केलीं. तेव्हा त्या सर्वांचा स्वीकार करून तो अतिथि मार्गातील श्रम घालविण्याकरिता तेथें सुखानें राहिला. काहीं वेळानें भगवान् सूर्य अस्ताचलावर जाऊन पोंचला असता ते दोघेही सध्यावदन करावयास उठले. त्यानीं सरोवराच्या काठीं बसून जपादि सर्व सांग सायविधि आटोपला व शेवटीं अमृतप्राय जलपान करून पर्णकुटींत परत आल्यावर पल्लवशय्येवर शयन केलें. पण झोंप न आल्यामुळें पडल्या पडल्या त्याच्या अशा शात गोष्टी सुरू झाल्या. गाधीने त्या अतिथीस म्हटले "ब्रह्मन्, तू असा कृश व अतिशय श्रांत कां झाला आहेस?" तेव्हा अतिथि बोलला भगवन्, माझ्या कृशतेचें व श्रमाचें खरें कारण ऐक. आम्ही कधीं असत्य बोलत नसतों. या भूलोकीं उत्तरदिशेंत कीर या नावाचा एक मोठा श्रीमान् देश आहे. तेथें लोकाच्या पूजेचा स्वीकार करीत मी एक महिनाभर रहात होतों. चित्तवेताळाच्या योगानें मोहित झाल्यामुळें मी तेथें नानाप्रकारच्या लोभात पडलों होतों. तेथें असतांना एकदा एकानें सहज बोलताना मला म्हटलें, "ब्राह्मणा, येथें आठ वर्षें चाडाळ राजा होता." तें ऐकून मला मोठें आश्चर्य वाटलें व मी तीच गोष्ट गांवांतील दुसऱ्याही सज्जनाना विचारली. त्यानींही तसेंच सांगितलें. ते म्हणाले, "काय सांगावें, ब्राह्मणा! येथें खरोखरच एक चांडाळ आठ वर्षें राज्य करीत होता. शेवटीं तो अंत्यज आहे, असें जेव्हां सर्वांना कळलें तेव्हां गांवभर हाहाकार झाला. शेकडों पवित्र ब्राह्मणां-

दिकांनीं भराभर जीव दिले. राजानेंही अग्निप्रवेश केला." पण विश्वासु लोकांच्या तोंडची ही वार्ता ऐकून मला मोठा पश्चात्ताप झाला व तेथून निघून मी प्रयागास गेलों. स्वतःच्या शुद्धीकरितां प्रायश्चित्त केलें. तीन चांद्रायणें करून आज पारणें झाल्यावर येथें आलों. त्यामुळें मी असा कृश व श्रांत दिसत आहें."

**श्रीवासिष्ठ**—तें ऐकून गाधीला मोठें आश्चर्य वाटलें व त्याविषयींच त्यानें त्या अतिथीला पुनः पुनः अनेक प्रश्न विचारून आपल्या मनाचा निश्चय करून घेतला. नंतर त्या दोघांनींही ती रात्र तेथें घालविली. दुसऱ्या दिवशीं जगद्दीप सूर्य उदय पावला असतां प्रातः-कृत्यें संपवून व गाधीची अनुज्ञा घेऊन अतिथि गेला आणि संध्यावंदनादि नियत कर्मांचें अनुष्ठान करून झाल्यावर गाधि एकटाच आपल्या रम्य कुटींत बसून विस्मित चित्तानें असा विचार करूं लागला.—

मी भ्रमावस्थेंत जें पाहिलें होतें तेंच या ब्राह्मणानें खरें पाहिलें व मला सांगितलें. तेव्हां हें काय बरें असावें ! ही निव्वळ माया दिसते. मी आतामध्यें मेलों आहे, असें जें पाहिलें तें खोटें आहे, यांत मुळींच संदेह नाहीं. पण या पुढच्या वृत्तांताविषयीं मन थोडेसें साशंक होत आहे. यास्तव मी आतां त्या भूतमंडळांतील गावाबाहेरील म्हारवाड्यांत जाऊन खरा प्रकार काय आहे, तो पहातों.

रामा, असा निश्चय करून तो उठला. उद्योगी प्राज्ञांना मनोराज्यही सुलभ असतें. गाधीनें स्वप्नांत जसें पाहिलें होतें तसेंच तेथें जाऊन पुनः अवलोकन केलें. निश्चयानें दुष्प्राप्यही सहज मिळतें, असें ठरविण्यास हेंच एक निदर्शन पुरे आहे. असो; गाधि आपल्या कुटींतून निघून जगन्माया प्रत्यक्ष पहात त्वरेनें अनेक देशास ओलांडून चालला. कांहीं दिवसांनीं, एकटेंच उंटाचें पोर करज नांवाच्या कांटेऱ्या झाडापाशीं जसें जाऊन पोंचतें त्याप्रमाणें तो भूतमंडलास पोंचला. त्यांत स्मरणकालीं मनांत उभ्या रहाणाऱ्या आकाराच्या एका गावास त्यानें पाहिलें. त्याच्या बाहेर तो म्हारवाडा होता. पाताळांतील नरकाप्रमाणेंच तो त्याला भासला. तेथें स्वप्नांत पाहिलेल्या सर्व खुणा त्याला दिसल्या. तोच हा चांडाळवाडा. येथेंच मी या घरांत श्वपच झालों होतों. या या स्थळीं अशीं अशीं दुष्कृत्यें केलीं इत्यादि सर्व त्याला आठवलें व सर्व पदार्थांची ओळखही पटली. पण त्या बीभत्स

वाऱ्यानें त्या श्रोत्रियाच्या मनांत तीव्र वैराग्य उत्पन्न केलें. त्याच्या घरावरील छप्पर पडून नुसत्या भिंती उभ्या होत्या. त्यांवर गवत उगवलें होतें. मध्यें मध्यें त्यांस खिंडारें पडलीं होतीं. त्याचीं दारें मोडून पडलेलीं असल्यामुळें त्यांत वानर, कुत्रे, कोल्हे इत्यादि प्राणी स्वैर संचार करीत होते. तो म्हार-वडा म्हणजे मूर्तिमंत दारिद्य, दौर्भाग्य, दौरात्म्य व अखडित दुःस्थितिच होती. गायी, म्हशी, घोडे इत्यादिकांच्या–दांतानीं फोडलेल्या–हाडाचे पांढरे तुकडे त्याच्या घराबाहेर चोहोंकडे पडले होते. ते जणु काय हेंच तें तुझें घर, असें म्हणून साक्षिच देत होते. गाधीनें पूर्वी ज्या खापरातून खान पान केलें होतें तीं त्याच्या दाराबाहेरच फुटून पडलीं होतीं. घरातील भिंती मोठमोठया तृष्णांसारख्या गुरांच्या वरून खालीं लोंबणाऱ्या लांब लांब शुष्क आंतड्यांनीं सुशोभित दिसत होत्या. आत्मज्ञ पुरुष विचारतः शुष्क शवतुल्य झालेल्या आपल्या पूर्व देहाला जसा पहातो त्याप्रमाणें गाधि आपल्या गृहाकडे पुष्कळ वेळ पहात राहिला. नंतर तो जवळच्या कुग्रामांत जाऊन तेथील एकास म्हणाला, "बा साधो, तूं या ग्रामाचा पूर्ववृत्तांत जाणतोस काय; कारण सर्व शहाणे मागचा वृत्तांतही प्रत्यक्ष घडलेल्या वार्तेप्रमाणें जाणत असतात, असें मी सुजनांच्या तोंडून ऐकले आहे. यास्तव तुला येथल्या एका ज्ञातांच्या चांडाळाचा वृत्तात ठाऊक असल्यास मला सांग. वाटसरू लोकाचा सशय दूर केल्यास मोठें पुण्य लागतें."

रामा, एकादा रोगी जसा अनेक वैद्यांना औषध विचारीत सुटतो त्याप्रमाणे तो ब्राह्मण तेथल्या अनेक लोकांना वारंवार असें विचारूं लागला असतां तेथील लोक म्हणाले "होय. ब्राह्मणा, तूं म्हणतोस तें खरें आहे. कटंज या नांवाचा एक दारुणाकृति चांडाळ येथें होता. पुत्र, पौत्र, सुहृत्, भृत्य, बंधु, आप्त इत्यादि त्याचा परिवार फार मोठा होता. तो वृद्ध झाला असतां त्याच्या सर्व कुटुंबास कालानें गट्ट केलें. तेव्हां अतिशय उद्विग्न झालेला तो हा प्रदेश सोडून कीरपुरास गेला. तेथें भाग्यवशात् तो आठ वर्षे राजा होऊन राहिला. पण त्याचा शेवट चांगला झाला नाहीं. कारण तो जातीचा म्हार आहे, असें कळतांच प्रजा, मंत्री व भृत्य यांनीं त्याला अनर्थाप्रमाणें दूर केलें व श्रेष्ठ लोकांनीं त्या महापातकाचा परिहार करण्याकरितां अग्नींत प्रवेश केला. स्वतः त्या चांडाळा-

लाही घडलेल्या गोष्टीबद्दल पश्चात्ताप झाला व त्यानेंही लोकांच्या मार्गोमा ग्नींत उडी घातली. पण हे प्रभो, तूं त्याच्याविषयीं एवढ्या आस्थेनें का विचारीत आहेस ! तो तुझा कोणी लागतो की काय ! की तूंच तो आहेस ! असें ग्रामस्थ लोक सांगूं व विचारूं लागले असतां त्यानेंही त्याना वारवार प्रश्न करून आपले अनेक संशय दूर करीत त्या प्रांतांत एक महिना वास्तव्य केलें. स्वप्नभ्रमामध्यें त्यानें जसें जसें पाहिलें होतें तसें तसेंच त्या लोकांनीं सर्व सांगितलें. स्वतः गाधीनेंही आसपासच्या प्रदेशांत हिंडून सर्व खुणा बरोबर पाहिल्या व त्यामुळें त्याच्या मनाला अवर्णनीय विस्मय वाटला ४७.

**सर्ग ४८**—गाधि कीरनगरास गेला. तेथील सर्व जनांत ऐकला व त्याच्या तपानें संतुष्ट झालेल्या विष्णूनें ती सर्व माया आहे, असें सांगितलें.

**श्रीवसिष्ठ**—राघवा, चांडाळाच्या त्या गृहांत अतिशय आसक्त झालेलें गाधीचें मन चकित झालें व त्याला काहीं केल्या तें आश्चर्य पहावयाचें सोडून जावें, असें वाटेना. तेथें त्यानें थोडथोडी बदललेलीं स्थानें व गृहें पाहिलीं व तो मागच्या गोष्टी आठवून आपल्याशीं असें म्हणूं लागला. —मी आपल्या हातानीं ओंवलेली ही पशूंच्या दातांची माळ येथें खुंटीवर लोंबत आहे. या स्थळीं मी आपल्या मद्य पिऊन मस्त झालेल्या चांडाळ बंधूसह वेळूच्या कोंबांबरोबर शिजविलेलें वानरीचें मांस खालें. मी येथें सिंहाच्या चामड्यावर आपल्या काळ्या भार्येला आलिंगन देऊन पुष्कळ दिवस निजत असें. येथें मांस घालून वाढविलेल्या कुत्र्याना आम्ही चामड्याच्या दोऱ्यानीं बांधून ठेवीत असों. मी येथें चांडाळ—बाळकासह पुष्कळ दिवस धुळींत खेळलों आहें. आम्ही या स्थळीं पुष्कळ गाऊन कुत्र्याचें रक्त यथेच्छ प्यालें आहे. स्मशानांतील शवांच्या अंगावरील वस्त्रें व पुष्पमाळा यानी आपलीं अंगें भूषित करून आम्ही आपल्याला मोठे भाग्यवान् समजत होतों. येथें मी आपल्या कुटुंबासह यथेच्छ दारू पिऊन उन्मत्ताप्रमाणें वाटेल तसें गायन व नृत्य केलें आहे. आपल्या हातांनीं धरून आणलेल्या कावळे, भास, तित्तिर, इत्यादि पक्ष्यांचे गळे कापून त्यांना सोडून मी अनेकदां भाजून किंवा शिजवून खालें आहे.

रामा, अशा प्रकारच्या मागच्या अनेक चांडाळ-क्रिया आठवीत व त्यांविषयीं वारवार विस्मित होत गाधि काहीं दिवसांनीं तेथून निघाला

व क्रमानें अनेक ग्रामादिकांचें उल्लंघन करीत कीर देशास येऊन पोंचला. तेथें त्यानें ओळखीचे अनेक पदार्थ पाहिले व तेथील लोकांना श्वपच-राजाविषयीं प्रश्न केला. तेव्हां नागरिक म्हणाले, "होय, येथें आठ वर्षें श्वपच राजा होता. मंगळ-हत्तीनें त्याला राज्य दिलें व त्यामुळें लोकांनींही त्याच्याविषयीं संशय घेतला नाहीं. शेवटीं लोकांना जेव्हां त्याच्या हीन जातीचें ज्ञान झालें तेव्हां त्यानें अग्नींत प्रवेश केला. या गोष्टीस आज बारा वर्षें झालीं." गाधि ज्याला ज्याला विचारीत असे तो तो प्रायः असेंच सांगे. इतक्यांत मंदिरातून निघालेल्या आणि सैन्य व वाहनें यांसह मोठ्या थाटानें जात असलेल्या विष्णुरूपी राजास त्यानें पाहिलें. त्याबरोबर त्याला आपल्या पूर्व राजतेचें स्मरण झालें आणि तो म्हणाला, "अहाहा, या सर्व वैभवाचा उपभोग मीं कांहीं वर्षें घेतला आहे. हत्तिणी, घोड्या, सैनिक इत्यादि हें सर्व माझ्या ओळखीचें आहे. ज्या सुंदर स्त्रिया मजवर चवऱ्या वारीत होत्या त्याच या आता याच्यावर वारीत आहेत. माझ्या पुढें जाणाराच हा गजसंघ त्याच्या पुढें जात आहे. इंद्राच्या पुढें चालणाऱ्या यम-कुबेर-वरुणासारखे हे सर्व माझेच सामंत याच्या अग्रभागीं चालले आहेत. माझींच अमूल्य भूषणें यानें आपल्या अंगावर घातलीं आहेत. सारांश मीं पूर्वी भोगलेलें हें कीरदेशाचें राज्य आज मला, जणु काय दुसऱ्या जन्मातील आचाराप्रमाणेंच, प्रत्यक्ष दिसत आहे. माझें स्वप्नच जाग्रद्वृत्तांताप्रमाणें खरें होऊन बसलें आहे ही सर्व माया कोणी रचली आहे कांहीं कळत नाहीं. हर हर! या दीर्घ मोहानें मला मूढ करून सोडलें आहे. हाय हाय, माझे मूर्ख मन वासनेनें नष्ट झालें आहे. तें विस्मृत भ्रमजालांनाच पहात सुटलें आहे. काय करावें? अरे हो! आतां मात्र आठवलें. भगवानानेंच मला ही मोठी माया दाखविली असावी. यास्तव आतां आणखीं या मोहात न पडता गिरिगुहेमध्यें बसून मी अगोदर याची उत्पत्ति व स्थिति समजून घेतो."

रामभद्रा, असा विचार करून गाधि तसाच त्या नगरांतून निघाला व एका पर्वताच्या गुहेत जाऊन श्रांत सिंहाप्रमाणें बसला. त्या महात्म्यानें तेथें प्रत्यहीं एक चुळकाभर पाणी पिऊन दीड वर्ष विष्णूची आराधना केली. तेव्हा भगवान् त्या ब्राह्मणाकडे आला व म्हणाला, "गाधे, तूं माझी श्रेष्ठ माया पाहिलीस का? मिथ्या जगज्जालचेष्टित तुझ्या अनुभवास आलें

काय? आतां आणखीं तुला काय पाहिजे? तूं ही तपस्या कां करतोस?" भगवानाचें हें मधुर भाषण ऐकून गाधीनें आपले विशाल नेत्र उघडले व समोरील विष्णु मूर्तीस पाहतांच त्याचा कंठ दाटून आला. त्यानें भगवानाच्या मृदुचरणांस वंदन केलें. अर्घ्यादि उपचारांनीं त्याची पूजा केली व ह्मटलें "देवा, तूं मला आपली तमोमय माया दाखविलीस खरी; पण तिचें तत्त्व मला कळले नाहीं. तें तू सांग. जलामध्यें अघमर्षण करीत असतांना मी जें स्वप्न पाहिलें तेंच खरें कसें झालें? एका घटिकेंत पाहिलेला भ्रम चांडाळादिकांच्या ग्रामांत अनेक वर्षें कसा टिकला? श्वपचाचा जन्म व नाश वस्तुतः माझ्या मनातच असतांना ते बाहेर सत्य कसे ठरले?"

त्यावर भगवान् म्हणतो–गाधे, हा सर्व वासनायुक्त मनाचा विलास आहे. जें कांहीं आहेसें वाटत असतें तें सर्व आपल्या चित्तांतच वाटतें. पर्वत, नद्या, समुद्र, वृक्ष इत्यादि सर्व चित्तात आहे. बाहेर कांहीं नाहीं. चित्तवृत्तीच्या द्वारा अनुभवास येणारा प्रत्येक पदार्थ भ्रमरूप आहे. वृक्षातील पर्णें, पुष्पें व फळें याप्रमाणें वासनामय चित्तात लक्षावधि आकार असतात. पण भूमींतून ज्याला वर उपटून काढलें आहे अशा वृक्षाला जशीं पानें वगैरे पुनः येत नाहींत त्याप्रमाणें वासनाशून्य चित्तांत पुनः जन्मादि-अंकुर उगवत नाहींत. तेंव्हा ज्याच्यामध्ये अनंत जगज्जाल आहे अशा तेजानें चांडालत्व प्रकट केल्यास त्यांत आश्चर्य कोणतें? अतिथीचें आगमन, त्यानें सांगितलेला वृत्तांत, तुझें भूतमंडळास येणें, तेथें श्वपचालय साक्षात् पहाणें, कीर देशास जाणें, तेथल्या लोकांस विचारणें इत्यादि सर्व मनोभ्रम आहे. बा साधो, त्यांतील एकही प्रकार खरा नाहीं. वासनायुक्त चित्त असे असंख्य चमत्कार प्रत्यहीं करीत असतें, त्याचा निर्णय होणें शक्य नाहीं. यास्तव गाधे, अशक्य गोष्टींच्या मागें न लागतां शांत चित्तानें आपल्या नियत कर्मांचें अनुष्ठान कर. स्वकर्मावाचून मानवांचें कल्याण होत नाहीं.

राघवा, असें सागून पूज्य भगवान् स्वस्थानी गेला ४८.

**सर्ग ४९.—गाधीला पुष्कळ विचार व प्रयत्न केल्यावर सर्व माया आहे, असें कळलें.**

श्रीवसिष्ठ—रघुनंदना, भगवान् विष्णु निघून गेल्यावर गाधि स्वतः आपल्याशींच मोहाचा विचार करण्याकरितां, अभ्र जसें आकाशांत भ्रमण करतें त्याप्रमाणें, भूतमंडल व कीर देश यांमध्यें वारंवार फिरला. त्याने पुनः पुनः तोच तो आपला वृत्तांत लोकांच्या तोंडून ऐकला. नतर पुनरपि तो गुहेंत येऊन हरीची आराधना करूं लागला. थोडक्याच अवकाशांत भगवान् त्याच्याकडे आला. कारण एकदा आराधना केल्यानेंही माधव बधुतेस प्राप्त होत असतो. असो, 'गाधे, तुला आतां आणखीं काय पाहिजे ? तूं पुनः तपश्चर्या कां करतोस ?' असें तो नारायण मोठ्या प्रेमळ वाणीने विचारूं लागला असतां गाधि म्हणतो—भगवन्, मी सहा महिने भूत व कीर देशांत एकसारखा फिरलों व तेथल्या निरनिराळ्या लोकांना विचारले; पण ते सर्व एकसारखाच वृत्तांत मला सागत होते. त्याच्या सांगण्यांत तिळभरही अंतर पडलें नाहीं. पण हे प्रभो, तू तर ही सर्व भूतभू मीं मायेनें पाहिली, असें सागत आहेस. तेव्हा आतां मी काय समजूं? महात्म्यांचें वचन मोहाचा नाश करीत असतें; त्याला कधींही बाढवीत नाहीं.

श्रीभगवान—ब्राह्मणा, तुझ्याप्रमाणेंच त्या लोकांच्या चित्तांत श्वपच-स्थिति काकतालीय योगानें प्रतिबिंबित झाली. त्यामुळें ते तुझा वृत्तांत जशाचा तसाच सांगत आहेत. कारण एकदा अनुभवास आलेला प्रतिभास पुनः कधीं नष्ट होत नाहीं. कोणातरी एका श्वपचानें भूतग्रामाबाहेर आपलें घर केलें होतें. व तेंच 'मी हें पूर्वी रचलें' असें तूं भ्रांतीनें समजलास. कदाचित् एकच प्रतिभास पुष्कळांनाही होतो. मनोगति विचित्र आहे. पुष्कळ मानव एकच स्वप्न पहातात. हिरव्या गवतानें भरलेल्या एकाच भूमींत रममाण होणाऱ्या अनेक हरिण बालकांप्रमाणें एकाच लीलेंत पुष्कळ बालक रममाण होतात. एकाच वेळीं अनेक लोक वध, बंध, पराजय, पलायन इत्यादिकांच्या द्वारा अनेक उद्यम करीत असतात. वसंतकाल फळपाकास प्रतिबंध करतो व शरत्काल त्याला ( फळांच्या पाकास ) अनुकूल आहे, असें पाहून लोक कालाला सर्व कार्यांचें कारण समजतात; पण तोही भ्रमच आहे. कारण मनानेंच सूर्याच्या अस्तोदया-वरून मास, ऋतु इत्यादिरूप कालाची गणना केली आहे. यास्तव तो कल्पित आहे असें म्हणण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं. पण जो अखंड अक-

ल्पित काल आहे तो स्वयं परमात्माच असून तो स्वरूपांतच रहातो. तो कोणाला प्रतिबंध करीत नाहीं व अनुमोदनही देत नाहीं. भगवान् काळ अमूर्त आहे. त्यालाच ब्रह्म व अज म्हणतात. तो कोणाचें कधीं कांहीं घेत व टाकीत नाहीं. पण वर्ष-कल्प-युगात्मक जो दुसरा लौकिक काल आहे तो सर्व उत्पन्न होणाऱ्या पदार्थांचें निमित्त असल्यामुळें सूर्यादिकांच्या क्रियांवरून कल्पिला जातो. तो कल्पित काळच प्रतिबंध व अनुज्ञा यांच्या योगानें पदार्थसंघ, क्रिया, फळ इत्यादिकांची व्यवस्था करतो. तस्मात् भ्रांतचित्त पुरुष समानप्रतिभासामुळें उत्पन्न झालेल्या संभ्रमास जसे पहातात त्याचप्रमाणें भूतमंडळ व कीरग्राम यांतील लोकांनीं कटंजाला पाहिलें. यास्तव तूं आपल्या कर्तव्यामध्यें तत्पर राहून सूक्ष्म बुद्धीने आत्म्याचा विचार कर आणि हे साधो, मनोमोह सोडून येथेंच सुखानें रहा. मी आता जातों.

राघवा, असें सांगून श्रीविष्णु गुप्त झाला व गाधि व्याकुळ मनानें तेथेंच राहिला. त्यानंतर त्या पर्वतावर कांहीं महिने घालवून त्यानें पुनः भगवानाची आराधना केली तेव्हां भक्तवत्सल ईश्वर त्याच्या पुढें व्यक्त झाला व पूर्वीप्रमाणेंच त्याला आराधनेचें कारण विचारूं लागला. गाधी-नेंही साष्टांग प्रणामपूर्वक पूजन करून म्हटलें, "भगवन्, चांडालस्थितीचें स्मरण माझ्या चित्ताला मोहित करीत आहे. यास्तव मला आत्मवस्तूचें यथार्थ ज्ञान देऊन एकाच निर्मळ कर्मांत नियुक्त कर."

तें ऐकून भगवान् म्हणतो—ब्राह्मणा, हें जग म्हणजे महा माया आहे. आत्मतत्त्वाच्या विस्मरणामुळें आवरण उत्पन्न होऊन सर्व आश्चर्यरूपी विक्षेप संभवतात. निद्रेंत असंभावित पदार्थांचीही जशी संभावना होते त्याप्रमाणें अज्ञानावस्थेंत तूं पाहिलास तशा प्रकारचा भ्रम संभवतो. या ईश्वराच्या मायेमध्यें अशा तऱ्हेचे असंख्य चमत्कार भरले आहेत सम संकल्प व सम काल यांच्या योगानें त्या दोन देशांतील लोकांनींही मिथ्या पदार्थांस सत्यासारखें पाहिलें. आतां चांडाळासंबंधीं तुझ्या मनास लाग-लेली चिंता कशी जाईल तें सांगतों. भूतमंडळामध्यें तूं जसा पाहिलास तशाच तऱ्हेचा कटंज नांवाचा श्वपच होता. शरीर, ग्राम, गृह, स्त्री इत्यादिकांसह जशा आकारानें तूं त्याला पाहिलें होतेंस तसाच तो तेथें पूर्वी रहात असे. त्याचें कुटुंब मेलें, तो कीरदेशांत जाऊन राजा झाला

व शेवटीं अग्नींत पडून मेला. त्यानंतर कांहीं काळानें तीच स्थिति सकल्पदोषामुळें जळांत असलेल्या तुझ्या चित्तात प्रकट झाली. एकादे वेळीं अनुभविलेल्या गोष्टीलाही जसा द्रष्टा अगदीं विसरतो त्याप्रमाणें कदाचित न पाहिलेली स्थितिही चित्त साक्षात् अनुभविल्याप्रमाणें पहातें. मनोराज्य, पित्तादिकाचा प्रकोप इत्यादि कारणानीं जाग्रत्कालींही मनाला अनेक भ्रम दिसतात. स्वप्नाविषयीं तर बोलावयासच नको. त्रिकालज्ञानी योगी भविष्यत्कालीं घडणारी गोष्टही भूतकाळीं झाल्यासारखी जशी पहातात त्याप्रमाणें गाधे, मागें घडलेलें कटंजचरितही तुला वर्तमानाप्रमाणें भासणे अगदीं शक्य आहे. पण 'मीच तो' असा भलताच भ्रम का झाला म्हणून जर म्हणशील तर त्याचेंही कारण सागतों. बाबारे, सर्व अनात्मज्ञ पुरुष आत्मभिन्न देह-पुत्र-कलत्रादिकामध्यें 'हा मी' व 'हें माझें' असा अभिमान ठेवतात, हें प्रसिद्ध आहे. त्याचप्रमाणें तूही देहासारख्या आत्मभिन्न कटजावर 'हा मी' असा व त्याच्या गृहादिकावर 'हीं माझीं' असा मिथ्या अभिनिवश टेवलास. पण आत्मज्ञ अशा मोहात निमग्न होत नाहींत. सर्व मीच आहें, असें जाणणारा तो पदार्थाच्या अनर्थकारक विभागास ओळखीतच नाहीं व त्यामुळें त्याला सुख:दुख-विलासमय भ्रमांत बुडण्याचा प्रसगही येत नाहीं. तूं या दोन स्थितींतील मध्यभागीं आहेस. (म्हणजे पूर्ण अनात्मज्ञ नव्हेस व ज्ञानीही नव्हेस.) तुझें चित्त वासनाजालानें ग्रस्त झालें आहे. त्यामुळें ज्याची महाव्याधि थोडीशी अवशिष्ट आहे अशा पुरुषाप्रमाणें तूं अद्यापि स्वस्थ झालेला नाहींस. तुझें ज्ञान परिपूर्ण नसल्यामुळें घर बाधावयाचा यत्न न करणाऱ्या पुरुषास वृष्टीचें जसें निवारण करता येत नाहीं त्याप्रमाणें तुला मनोभ्रमाचें निवारण करतां येत नाहीं. उच्च पुरुष वृक्षाला जसा एकदम कवटाळतो त्याप्रमाणें तुझ्या मनात अकस्मात् जें भासतें त्याचाच अभिमान तें धरतें. या माया-चक्राची नाभि (तुंबा) चित्त आहे. त्याचें आक्रमण केलें पाहिजे. त्याला जिंकलें कीं सर्व बाधा पार नाहींशी झालीच. यास्तव, तूं आतां ऊठ व या पर्वतावरील कुंजामध्यें बसून अव्याकुल चित्तानें दहा वर्षें तपश्चर्या कर. म्हणजे तुला अनंत ज्ञान प्राप्त होईल.

राघवा, असें बोलून भगवान् विष्णु वाताभ्र, दीप व यमुनेचा तरंग याप्रमाणें, क्षणांत अदृश्य झाला. इकडे गाधिही शरत्समयाच्या शेवटीं

श्रीरस होणाऱ्या वृक्षाप्रमाणें विवेकजन्य वैराग्य-संपन्न झाला. भ्रमशून्य होऊन त्यानें देवाच्या श्वपच-भावदर्शनरूप अयुक्त चेष्टिताची निंदा केली व ज्याचें चित्त करुणेनें आर्द्र झालें आहे, असा तो साधु चित्तनियमाचा अभ्यास करण्याकरितां, मेघ विश्रांतीकरितां जसा पर्वतशिखरावर जातो त्याप्रमाणें, ऋष्यमूक पर्वतावर गेला. तेथें त्यानें सर्व संकल्प सोडून दहा वर्षें उत्तम तप केलें. त्यामुळें तो आत्मज्ञानी झाला. आपल्या नित्य सत्तेस प्राप्त झालेला तो महात्मा भय व शोक यानीं रहित झाला. त्याचें चित्त अगदीं शांत झालें. त्याचें जीवन्मुक्तस्वरूप उदय पावलें व चंद्राप्रमाणें तो पूर्णचित्त गाधि सर्वांस आल्हाद देऊं लागला ४९.

सर्ग ५०—चित्तजयाचे उपाय, ज्ञानमाहात्म्य व चित्तसर्पाच्या पुष्टीचे हेतु.

श्रीवसिष्ठ—रघुवीरा, याप्रमाणें ही महामाया पसरली आहे. दोन घटिका झालेला स्वप्नभ्रम कोठें व अनेक वर्षें टिकणारी श्वपचता व राजता कोठें! भ्रमानें पहाणें कोठें व प्रत्यक्ष दिसणें कोठें! असत्यत्व व असदिग्धत्व कोठें आणि सत्यपरिणामिता कोठें? एवढ्यासाठींच हे महाबाहो, मी नेहमीं सांगत असतों कीं ही महामाया अति कठिण आहे व ती ज्याचें मन असावध असतें त्याला संकटांत पाडते.

श्रीराम—पण, विप्रवर्य, सर्व अंगास आंतून तोडणाऱ्या व वेगानें फिरत रहाणाऱ्या या मायाचक्राचा निरोध कसा करितां येईल?

श्रीवसिष्ठ—या भ्रमण करणाऱ्या व भ्रमांत पाडणाऱ्या संसाररूप मायाचक्राची नाभि चित्त आहे. यास्तव निश्चयात्मक बुद्धीनें व मोठ्या यत्नानें त्याला घट्ट धरून ठेवलें म्हणजे मायाचक्र थांबतें. लहान मुलें पितळेच्या किंवा लोखंडी चाकाला दोरा बांधून व त्याला पीळ घालून गरगर फिरवितात. पण तो दोराच घट्ट धरून ठेवल्यावर जसें तें फिरेनासें होतें त्याप्रमाणें चित्तरूपी नाभीला प्रतिबंध केला कीं चाकाची गति बंद पडते. रामा, तूं चक्रयुद्धांत फार निष्णात आहेस. तेव्हां त्याच्या भ्रमणादिकाविषयीं तुला अधिक कांहीं सांगण्याची गरज नाहीं. यास्तव चित्ताला प्रतिबंध कर. या युक्तीवांचून दुःखक्षय होणें शक्य नाहीं व हिचा आश्रय केल्यावर तें एक क्षणभरही टिकत नाहीं. हें रामबाण औषध न घेतल्यास मोठ्या प्रयत्नानेंही संसारमहारोग शांत होत नाहीं. यास्तव बा सच्छिष्या, तीर्थ, दान, तपःक्रिया इत्यादि सर्व टाकून तूं परम कल्याणाकरितां चित्ताला

वश करून घे. कुंभामध्यें जसें कुंभाकाश त्याप्रमाणें चित्तामध्यें संसार असतो. यास्तव कुंभाचा नाश झाल्यावर कुंभाकाश जसें आपोआप नाहींसें होतें त्याप्रमाणें चित्तक्षय झाल्यावर संसार नाहींसा होतो. भूत व भविष्यत् विषयानुसंधानाचा त्याग केला व वर्तमान विषयांशींही अनासक्त चित्तानें व्यवहार केला म्हणजे चित्त क्रमानें क्षीण होतें. संकल्पानुसंधानाचें वर्जन जर तूं प्रतिक्षणीं करशील तर पवित्र अचित्तत्वास हां हां म्हणतां प्राप्त होशील. मेघविस्तार असेपर्यंत आकाशजलाचा जसा संभव असतो त्याप्रमाणें सकल्प असत तों चित्तविभूति. ते गेले कीं चित्तविभूति संपली. पण चिदात्मरूप चित्तयुक्त असेपर्यंत संकल्पांचा क्षय होणें अगदीं अशक्य आहे. चिदात्मा चित्त-रहित झाला कीं संसार समूळ जळलाच म्हणून समजावें. चित्तशून्य चेतन म्हणजे प्रत्यगात्मरूपच होय. त्याच्यामध्यें मनाचा गधही रहात नसल्यामुळे पुनः संकल्प उठत नाहीं. चित्तशून्य अवस्था हीच सत्यता, शिवता, परमार्थता, सर्वज्ञता व परमार्थ दृष्टि होय. स्मशानात जसे कावळे त्याप्रमाणे जेथें मन तेथे आशा, दुःख व विषय-सुखें सदा तयार असतात. विद्वानाचेंही मन असतें. पण त्यांतील वासनाबीज तत्त्वज्ञानानें बाधित झालेलें असतें. शास्त्र, सज्जन-सपर्क, व सतत अभ्यास याच्या योगानें जगातील भावांचें अवस्तुत्व ज्ञात होते. पुरुषयत्न व मी या जन्मीं अवश्य ज्ञान संपादन करीन, असा निश्चय यांच्या योगानें चित्ताला अविवेकापासून निवृत्त करून बलात्कारानें शास्त्र व सत्पुरुषसमागम यात नियुक्त करावें. अगाध जलांत पडलेले रत्न दुसऱ्या रत्नाच्या प्रकाशानेंच जसें पहातात त्याप्रमाणें परमात्म-दर्शनाचें मुख्य कारण स्वयंज्योति प्रत्यगात्माच होय. स्वतः अनुभविलेलीं दुःखे पुरुष स्वतःच टाकण्याची इच्छा करितो. यास्तव आत्माच आत्मविज्ञानाचा मुख्य हेतु आहे. याकरितां तूं सदा तत्परायण हो. कोणतीही क्रिया करीत असतांना, उत्पत्तिसमयीं, जीवितकालीं व मरणप्रसंगींही तू ज्ञानमात्र निर्मल आत्म्यामध्ये स्थिर हो. हें माझें व हा मी ही वासना सोड, व एकनिष्ठतेनें सवित्परायण हो. बाल्यादि वर्तमान स्थिति व यौवन-राज्यादि भविष्यत् अवस्था यांमध्यें तू यावज्जीव एकबुद्धि होऊन आत्मध्यान व समाधि यांत तत्पर रहा. बाल्यादि दशेंतील सुखें व दुःखें आणि जाग्रदादि अवस्था यांमध्ये सतत आत्मपरायण हो.

रागादि मळाचे प्रतिक्षणीं निरसन करीत मनाला निर्मळ ठेव. आशापाशास पूर्णपणे तोडून स्वात्मपरायण हो. हे सर्व मीच आहें, अशी भावना ठेवून सत्तारूप हो. आत्मता व परता सोडून जगत्स्थितींत विभाग न पहाता वज्रस्तंभासारख्या दृढ आत्म्याचा आश्रय धर. उदार व धैर्ययुक्त बुद्धीनें आशारूपी मानस पाशास तोडता येते. स्थिर चित्ताने तत्त्वाचा आस्वाद घेणाऱ्या पुरुषास विषही अमृततुल्य होते. निर्मळ व निरंश आत्मस्वरूपाला विसरताच संसारकारणभूत महामोह उद्भवतो व त्याच आत्म्याचें स्थिर ध्यान केले म्हणजे तो क्षीण होतो. आशा-महार्णवाचें उल्लंघन करून स्वरूपास प्राप्त झालेल्या तुझी संवित् सूर्यकिरणाप्रमाणें सर्वतः पसरेल. आनंदाढ्य आत्म्याचा स्वभाव पहाणाऱ्या पुरुषाला गोड रसायनही विषासारखे कडु लागते. जे आत्मस्वभावास प्राप्त झाले आहेत त्यांच्याशीं आम्ही मैत्री करतो. बाकीचे, पुरुषार्थोपयोगी पौरुषहीन असल्यामुळें, नावाचेच पुरुष आहेत अशा लोकांचें दर्शनही न घेता उपेक्षाच करावी. सिद्ध तत्त्वज्ञाच्या अपेक्षेने साधक अवस्थेत असलेले योगी व उपासकही न्यून होत. आत्मज्ञाना आत्मज्ञानामुळेच उन्नत अवस्था प्राप्त झालेली असते. आत्मदृष्टीनें युक्त असलेल्या त्याच्यावर सूर्यादि दुसरीं कोणतींही तेजें उपकार करूं शकत नाहींत; इतकेंच नव्हे तर भरदुपारीं लावलेल्या दिव्याप्रमाणें तीं सर्व त्याच्या पुढे निस्तेज होतात. आत्मज्ञ पुरुष सर्वांपेक्षा जसा अति उन्नत तसाच अनात्मज्ञ सर्वांहून अति तुच्छ होय. अनात्मज्ञ इष्ट पदार्थांच्या प्राप्तीकरिता जरी प्रयत्न करीत असला तरी शवच होय.

चित्त पुष्ट झाले कीं आत्मज्ञता दूर पळते. यास्तव विषयसेवनाचा तिरस्कार करून मनाला कृश करावें. अनात्म्याचे ठायीं आत्मभाव ठेवल्यानें, केवळ देहाच्या आस्थेनें व पुत्र, स्त्री आणि कुटुंब यांच्या योगानें चित्त पुष्ट होत असतें. अहंकार, ममता, हें माझें अशी भावना, जरा मरणदुःख, उन्नतीची व्यर्थ इच्छा, राग-लोभादि दोष, आधि-व्याधि-विलास, संसारावरील विश्वास, स्नेह, धनलोभ, रत्नें व स्त्रिया यांचा लाभ इत्यादिकांच्या योगानें चित्त पुष्ट होतें. यास्तव राघवा, तूं या सर्व दोषांचा परिहार करून विचाररूपी तीक्ष्ण शस्त्रानें चित्त-विषवृक्षास बलात्कारानें तोडून टाक. शरीररूपी अरण्यांतील या चिताख्य पुष्ट गजाला हे राघवसिंहा, तूं आपल्या विवेकयुक्त बुद्धिहस्ताच्या नखांनीं फाडून टाक. त्या

दुष्ट कावळ्याला शरीररूपी घरट्यांतून दूर हाकून लाव. तृष्णारूपी पिशाची ज्याची परिचर्या करीत आहे, अज्ञान महावृक्षाखालीं जें विश्रांति घेत असतें, व जें संसाररूपी महा अरण्यातील असंख्य देहांत फिरत असतें त्या चित्त पिशाचास विवेक, वैराग्य, गुरूपदेश व आपला प्रयत्न या स्वतंत्र मंत्रानीं आपल्या चिदात्मगृहांतून हुसकून लावावें. रामा, हृदयरूपी मोठ्या ढोलींत रहाणाऱ्या मनोरूपी महा सर्पाला अमोघ चिद्गरुड-मंत्रानें मारून टाकून व सर्व भय सोडून तू अभयरूप हो. भोगरूपी मांस मिळेनासें झालें म्हणजे चित्तगृध्र देहवृक्षावरून उडून जातो. रामा अंतःकरणांत नाचणाऱ्या या मनो-महा-मर्कटाला स्वसिद्धीकरितां मारून टाक. संकल्प सोडणें याच उग्रमंत्राच्या प्रभावानें हृदयाकाशांतील चित्तमेघास उडवून टाक व मोठ्या उत्साहानें उत्कृष्ट फल संपादन कर. चित्तपाश तोडून सुखानें निःशंकपणें विहार कर. एका घोर अस्त्रानें दुसऱ्या घोर अस्त्राचें जसें शमन करतात त्याप्रमाणें शुद्ध चित्तानें मलिन चित्ताचें नियमन कर. चांचल्य सोड. सारांश रघुकुलतिलका, देहापर्यंत सर्व बाह्य पदार्थांना तृणाप्रमाणें तुच्छ समजून व चित्ताला स्वाधीन ठेवून अगोदर संसारांतून पार हो व नंतर हेयबुद्धीनें खा, पी, विहार कर व रममाण हो ५०.

**सर्ग ५१**—शांत-पदीं विश्रांति घेण्याकरितां चित्त स्थिर करण्याचा प्रयत्न करणाऱ्या उद्दालकाच्या विक्षेपाचें वर्णन.

**श्रीवसिष्ठ**—लांब, अगदीं पातळ, तीक्ष्ण, व पांढरी शुभ्र अशा वस्तऱ्याच्या धारेसारख्या चित्तवृत्तींमध्यें तू निमग्न होऊन राहूं नकोस. फार दिवसांनीं या क्षेत्रांत उत्पन्न झालेल्या बुद्धिलतेस विवेकजलसेकानें वाढवावें. कालसूर्याच्या तापानें शरीररूपी लता कोमेजून भूमीवर पडली नाहीं तोंच तिला उचलून धर. मेघरवानें मयूर जसा आनंदित होतो त्याप्रमाणें मी आतां सांगणार आहें त्या आख्यायिकेचा अर्थ चांगला ध्यानांत धरून त्याचेंच पुनः पुनः मनन केलेंस कीं तूंही आनंदित होशील. उद्दालकाप्रमाणें तूंही पुनः पुनः अति धैर्ययुक्त बुद्धीनें भूतपंचकाविषयीं विचार कर. उद्दालकानें कसा विचार केला म्हणून म्हणशील तर सांगतों.

या जगत्संज्ञक जीर्ण घराच्या विस्तृत वायव्य कोपऱ्यांत गंधमादन नामक एक स्थळ आहे. तें पुष्पित वृक्षांनीं व्याप्त, विचित्र वर्णांच्या

पक्ष्यांनी परिपूर्ण, नानाप्रकारच्या वेलींनी संपन्न, वनेचर प्राण्यांनी भरलेलें, आणि क्वचित् महारत्नांनी, क्वचित् चंचल कमळांनी व क्वचित् स्वच्छ सरोवररूपी महा दर्पणांनीं सुशोभित झालें होतें. त्या गंधमादन-स्थळाच्या एका उंच व देवदारुवृक्षांनी भरलेल्या शिखरावर एका सर्वतः पुष्पित छायाप्रधान वृक्षाखालीं उद्दालक नावाचा एक मौनी, मी अवश्य पुरुषार्थ संपादन करीन अशा अभिमानाने युक्त असलेला, प्रमाणकुशल, उदारचित्त व ज्यास तारुण्य प्राप्त झालेलें नाहीं असा उद्दाम तापसी पूर्वी रहात असे. प्रथमतः तो अल्पज्ञ, विचारशून्य, पण शुभाशय होता. पण पुढे तो जसा जसा तप व शास्त्रार्थविचार करूं लागला तसा तसा त्याला शुभ विचार सुचूं लागला. एकदा एकांतांत बसलेला तो शुभ चिंतानें या संसार-व्याधीविषयीं असा विचार करूं लागला.–

ज्याची प्राप्ति झाली असतां पुनः शोक करण्याचा प्रसंग येत नाहीं, असें या जगांत कोणतें बरें मुख्य प्राप्य आहे? पुनरपि जन्मसंबंध होणार नाहीं, असेंच तें प्राप्य असलें पाहिजे. मेरुशृंगावर जसा मेघ त्याप्रमाणें मी. मननशून्य परम पावन पदीं केव्हां बरें निश्चल विश्रांति घेत राहीन? माझ्या भोगतृष्णा केव्हां बरें शांत होतील? परम पदीं विश्रांति घेणाऱ्या मनानें 'हें करून मला हें कर्तव्य आहे' ही कल्पना मी केव्हां बरें सोडीन? विकल्पजाल माझ्या मनाला स्पर्श करीत नाहीं, असें केव्हां होईल. मी या मत्त तृष्णानदींतून विवेकबुद्धिरूप नावेनें केव्हां पार होईन? चित्तनाश झाल्यामुळें मी शांत, संतुष्ट, निःस्पृह, केवल साक्षीप्रमाणें जगच्चमत्कार पहाणारा व सर्व चिन्मात्र आहे, अशी भावना करणारा केव्हां होईन? शांतस्वरूप व परदृष्टि यांचा लाभ मला कधीं होणार? अभ्यासवशात् प्राप्त होणाऱ्या चित्प्रकाशाच्या योगानें मी फार दूरवर केव्हां पाहूं शकेन? ही काळोखी दीर्घरात्र कधीं संपणार? ज्याचें मनन शांत झालें आहे, असा मी गिरिगुहेंत बसून निर्विकल्प समाधीनें शिलेसारखा कधीं होईन. निरंश आत्म्याच्या ध्यानामध्यें विश्रांति घेत राहिलेल्या व त्यामुळेंच मौनव्रत धारण करणाऱ्या माझ्या मस्तकावर पक्षी गवताचीं घरटीं कधीं बांधतील? दगडाप्रमाणें निश्चल झालेल्या माझ्या हृदयावर व खांद्यावर बसून पक्षी विश्रांति कधीं घेतील? तृष्णा, जन्म यांसारख्या कांटेऱ्या वृक्षांनीं व वेलींनीं भरलेल्या या संसार-अरण्यांतून मी पार कधीं पडेन?

या चिंतेंत निमग्न झालेला उद्दालक ब्राह्मण त्या वनांत पुनः पुनः बसून अभ्यास करूं लागला. पण माकडासारख्या चंचल चित्तास विषय बाहेर ओढून नेऊं लागले असतां त्याला आनंददायी समाधान लाधलें नाहीं. मोठ्या प्रयत्नानें त्यानें चित्ताला अंतर्मुख केल्यास तें रजोगुणाच्या योगानें आंतल्या आंत क्षुब्ध होत असे. एकादे वेळीं आंतर समाधिसुखस्पर्शास भिऊन मनःसंज्ञक वानर बाह्य विषयाकडे उडी मारून जात असे. एकादे वेळीं आत सूर्यासारखें दीप्त तेज पाहूनच तें झटकन विषयोन्मुख होई. कधीं कधीं तर अगदीं शांत होऊन तें अकस्मात् भ्यालेल्या पक्ष्याप्रमाणें भुरकन उडून बाहेर आसक्त होत असे. एकादे वेळीं तो चित्तैकाग्र्याचा अभ्यास करूं लागला म्हणजे तें दुष्टचित्त कोठल्या कोठल्या फार जुन्या गोष्टींचें स्मरण करी, अथवा पुढच्याविषयीं नानाप्रकारचे संकल्प करीत सुटे. तात्पर्य याप्रमाणें तो महात्मा चित्तवृत्तीमुळें अतिशय व्याकुळ झाला. काय करावें, हें त्याला समजेना. तो एकटाच भ्रांत चित्तानें त्या पर्वतावर इतस्ततः प्रत्यहीं भटकत असे. एकदा त्याला एक भूतास दुष्प्राप असलेली सुंदर गुहा सापडली. तिच्यामध्यें कोणत्याही प्राण्याचा संचार होत नसे. त्यांत वायूची बाधा व पशुपक्ष्यांचा उपद्रव मुळींच होण्यासारखा नव्हता. देव व गंधर्व यानाही ती आजवर दिसली नसावी. परमाकाशाप्रमाणेंच ती शांत होती. तिच्या तोंडाशीं पुष्पाचा थर पडत असे व सभोंवार कोंवळे गवत उगवलें होते. त्यामुळें रत्नमंडित मठीप्रमाणें ती रम्य दिसत होती. तिच्या आसपास शीतल छाया पसरली होती व आंतील भाग रत्नदीपांनीं प्रकाशित होत होता. वनदेवींच्या अंतःपुरकुटीप्रमाणेंच ती गुहा अगदीं सुरक्षित होती. तिचें तोंड पूर्वेकडे होतें. त्यामुळें प्रातःकाळीं सूर्योदय झाला की त्याची फार उष्णही नाहीं व शीतही नाहीं अशी पिवळी प्रभा तिच्या द्वारांत पडत असे. सारांश हे रामचंद्रा, उपशमपदवीस योग्य असलेली ती रम्य गुहा उद्दालकाच्या दृष्टीं पडली ५१.

**सर्ग ५२**—गुहेमध्यें आसन घालून बसलेल्या उद्दालकानें चित्तप्रबोधनाच्या उपायांचें चिंतन केलें.

**श्रीवसिष्ठ**—दशरथपुत्रा, तो धर्मात्मा मुनि सहज फिरतांना मिळालेल्या त्या गंधमादनाच्या गुहेंत शिरला. चित्तसमाधानाच्या उत्सुकतेनें

आत जाणारा तो, सृष्टिव्यापार सोडून विश्रांति घेण्याकरिता आपल्या नगरींत जाणाऱ्या ब्रह्मदेवाप्रमाणें दिसला. पुष्पगुच्छयुक्त ताज्या पानांचें त्याने आसन केलें. त्यावर सुंदर कृष्णाजिन हांतरलें व त्यावर तो चित्ताच्या वृत्तींस क्षीण करीत बसला. त्यानें उत्तरेकडे तोंड करून दृढ पद्मासन घातलें होते. खोटानीं वृषणाच्या शिरा दाबून धरून त्यानें ब्रह्मादि गुरुपरंपरेस उद्देशून प्रणामांजलि जोडली. नंतर वासनांपासून मनाला परतवून निर्विकल्पसमाधीकरिता त्याने असा विचार केला.—

अरे मूर्ख मना, संसारवृत्तींनीं तुला कोणता लाभ होणार ? बुद्धिमान् पुरुष परिणामीं दुःख देणाऱ्या क्रियेचें सेवन करीत नाहींत. शमरसायन सोडून जो भोगाच्या मागें धावतो तो मंदारवन सोडून विषजंगलांतच शिरतो. बाबारे, तूं पाताळांत अथवा ब्रह्मलोकांतही जरी गेलेंस तरी उपशमामृतावाचून निर्वाणास प्राप्त होणार नाहींस. तूं शेंकडों भोगाशांनीं पूर्ण झालेंस म्हणजे पूर्वोक्त प्रकारें सर्व दुःखें देणारें होतेस. यास्तव त्यांचा त्याग करून अति सुंदर परम कल्याणास प्राप्त हो. या सर्व उग्र भावाभावात्मक कल्पना तुझ्या दुःखालाच कारण होतात. अरे मूर्खा, या शब्दादि दुष्ट वृत्तींनीं असें भ्रांत कां होतेस इतके दिवस व्यर्थ भ्रमण करून तूं काय मिळविलेंस ? अरे वेड्या, ज्याच्यापासून तुला विदेह कैवल्यसुख अथवा जीवन्मुक्ति सुख मिळणें शक्य आहे अशा सर्व वृत्तींच्या उपशमरूप समाधीमध्यें आसक्ति कां ठेवीत नाहींस? श्रोत्रत्व, त्वक्त्व, नेत्रत्व, रसनात्व व घ्राणत्व, या भावास प्राप्त होऊन शब्दादि विषयांकरिता क्रमानें गाण्यावर लुब्ध होणाऱ्या हरिणाप्रमाणें, हस्तिणीवर लुब्ध होणाऱ्या मत्त हत्तीप्रमाणें, कांतीवर लुब्ध होणाऱ्या पतंगाप्रमाणें, रसावर लुब्ध होणाऱ्या माशाप्रमाणें व सुवासावर आसक्त होणाऱ्या भ्रमराप्रमाणें अनर्थांत पडूं नकोस. अरे चित्ता आपल्या बंधाकरिता जाळें पसरणाऱ्या कोळ्याप्रमाणें तूंही आपल्याच अनर्थाकरितां वासनाजाल पसरलें आहेस. या प्रमादामुळें झालेल्या बंधांतून सुटण्याचा जर उपाय विचारशील तर सांगतों- प्रथम कर्म-उपासना इत्यादि उत्तम साधनांच्या योगानें शरत्कालाच्या मेघाप्रमाणें शुद्ध व्हावें. नंतर श्रवणादिकांच्या परिपाकामुळें ज्ञानोदय होऊन तूं जर निर्मूल शांत होशील तर या बंधांतून अगदीं मुक्त होशील. क्षय व उत्कर्ष यांची जणु काय जननीच अशा या संताप-

दायिनी जगत्सृष्टीस ओळखूनही जर तू न सोडशील तर नष्ट होशील. अथवा तुज शत्रूला मी हा उपदेश कशाला करित बसलों आहें? बलात्कारानें तुझा निग्रह करून विचाराने उच्छेद करणें उचित होय. पण चित्ताच्या उच्छेदाकरिताही पृथक् यत्न करण्याचे काही कारण दिसत नाहीं. कारण मूल–अज्ञान असे तों चित्त असतें व अज्ञानाचा जसा जसा क्षय होत जातो तसा तसा त्याचाही क्षय होतो, असा अनुभव असल्यामुळें अज्ञानाचा उच्छेद केल्यानेंच त्याचा उच्छेद आपोआप होणे शक्य आहे. विचारानें वासनाचा क्षय करणें हेंच चित्ताचें कृशत्व होय. कृश किंवा सूक्ष्म चित्त फार शुद्ध होतें. यास्तव या दुष्टाला उपदेश करीत बसणें व्यर्थ आहे. मी आता त्या असत् व क्षीण होणाऱ्या चित्ताचा त्याग करतो. एकाद्याचा त्याग करून फिरून उपदेश करीत बसणें हें महा-मौर्ख्य आहे. अरे चित्ता, मी अहकार व वासना यानीं रहित निर्विकल्प चिद्दीप आहें. अहकाराचे बीज अशा तुझ्याशी माझा काही सबध नाहीं. आजवर 'हा मी' अशी दुर्दृष्टि व्यर्थ धरली होती. पण अणुपरिमाण मनामध्यें अनत आत्मतत्त्व राहील कसें? मोठ्या थोरल्या फार खोल खळग्याप्रमाणें तू ही दु खद, गभीर व वासनाश्रित चित्तता धारण केली आहेस. पण मी तिचें अनुकरण करणार नाहीं. बालकाच्या मूर्ख कल्पने-प्रमाणें हा देहच मी अशी भ्राति तू मला पाडली होतीस. पण आता मी विवेकी झालों आहे, चागला जागा झालो आहे, मी असल्या भ्रमात पुन: कधींही पडणार नाहीं. पायाच्या आगठ्यापासून मस्तकावरील केंसापर्यंत शरीराचे राईएवढे तुकडे करून जरी पाहिले तरी त्यात अह कोणीच सापडत नाहीं. मग तो आहे तरी कोठें? या त्रिभुवनात सर्वत्र भरलेलें मला एक निर्विषय ज्ञान मात्र दिसत आहे. त्याला इयत्ता, कल्पना, एकता, अन्यता, महत्ता, अणुता इत्यादि कांहीं नाहीं. मी सवेदनात्मा असल्या-मुळेंच स्वतःच्या साक्षिरूपानें ज्ञानगोचर होणाऱ्या तु( चित्ता )ला पहातों व तू दुःखकारण आहेस असें निश्चयानें कळल्यामुळें या पुढच्या विवेकानें मी तुला मारतो.

शरीरांत रक्त, मास, अस्थि इत्यादिकावाचून काहीं आढळत नाहीं. प्राण तर जड वायु आहे. शरीराची हालचाल त्याच्यामुळेंच होते. ज्ञानशक्ति महाचैतन्याची आहे. जन्म, जरा व मरण हे शरीरधर्म

आहेत. मांसादि जड पदार्थ व बोध यांच्यामध्यें परम वैलक्षण्य आहे. अवयवांकडे पहावें तर एक नाक, दुसरा डोळा, तिसरा कान, चवथी जीभ, पांचवी त्वचा, सहावा हात इत्यादि अनेक आहेत. पण यांत अहं कोठेंच नाहीं. परमार्थदृष्टीनें पाहिल्यास मन अहं नव्हे, चित्त अहं नव्हे, व वासनाही अहं नव्हे असें दिसतें. आत्मा तर शुद्ध चिदाभास आहे. तेव्हां त्याला अहंचा स्पर्श होणेंही शक्य नाहीं. आत्म्यामध्यें अध्यारोपदृष्टि जर ठेवली तर मीच सर्वत्र अधिष्ठान असल्यामुळें सर्वच मी आहें व अपवाददृष्टीनें पाहिलें तर मी कांहीं नव्हे. मत्त लांडगा अरण्यांत सांपडलेल्या हरिणीच्या पोराला जसे क्लेश देतो त्याप्रमाणें हें लबाड अज्ञान मला फार दिवसांपासून क्लेश देत होतें. पण आज मी त्या चोराला ओळखलें आहे. स्वरूपद्रव्याला लुटणाऱ्या या धूर्तावर मी यापुढें मुळींच विश्वास ठेवणार नाहीं. मी स्वतः दुःखशून्य आहें, यास्तव दुःखास योग्य असलेल्या त्याचा मी कोणी नव्हे व तें माझें कोणी नव्हे. पर्वताच्या शिखरावर रहाणारा मेघ त्याचा कोणी तरी लागतो का? तुला जर अहंकारादि सर्वथा नाहीं तर तू भाषणादि व्यवहार कसा करतोस? म्हणून विचारशील तर सांगतों. नटाप्रमाणें तेवढ्या वेळेपुर्ता त्या भावाची कल्पना करून व अहंकारादि होऊन मी बोलणें, जाणें, येणें इत्यादि करितों. आत्म्याच्या स्वरूपाचें ज्ञान झाल्यामुळें मी अनहंकारतेस प्राप्त झालों आहें. खरोखर मी असें समजतों कीं हे चक्षुःश्रोत्रादिक तत्त्वतः मीच आहें. पण ते जर माझ्याहून निराळे असतील तर ते जड असल्याकारणानें देहांत राहोत कीं आणखी कोठें जावोत, त्याची मला मुळींच अपेक्षा ( गरज ) नाहीं. हर हर! हा अहं कोण आहे? याची कल्पना कोणी व कशी केली? हा जगद्बालकाला दिसणारा भयंकर वेताळ आहे. मी इतके दिवस या खड्ड्यांत व्यर्थ लोळत पडलों होतों. श्रोत्रादि इंद्रियें आपापल्या स्वार्थाकरितां आपापल्या विषयाचें ग्रहण करीत असतात. पण असें असतांना मी वास घेणारा, मी चव जाणणारा इत्यादि म्हणत हा अहंचोर मध्येंच कोठून येतो, काहीं कळत नाहीं. ही अहंकल्पना व्यर्थ उद्भवते व तिच्यामुळेंच 'हा मी' असा भ्रम होतो. वासना सोडल्यास बाह्य प्रवृत्ति होणार नाहीं व प्रवृत्तीच्या अभावीं जीवनच कुंठित होईल; म्हणून कोणी म्हणेल पण तें बरोबर नाहीं. कारण हें शरीर वासनेवांचूनही आपल्या

जीवनास अत्यत अवश्य असलेल्या कर्मामध्यें प्रवृत्त होतें. स्वाभाविक प्रवृत्तीला वासनेचें कांहीं कारण लागत नाहीं. वासना सोडून शरीराला स्वाभाविक कर्म करू दिल्यास ' मी सुखी किंवा दुःखी आहें ' असा अनुभव येत नाहीं. हा निर्वासन व्यवहारांत लाभ आहे. यास्तव चित्ता, जड इंद्रियें व वासना यांस सोडून यदृच्छाप्राप्त कर्म कर. म्हणजे तुला दुःख होणार नाहीं. बाबारे, तूच आपल्या दुःखाकरिता भोग-वासना धरलीस. इंद्रिय बाळांनो, तृष्णेच्या योगानें तुह्मी व्यर्थ आपला घात करून घेत आहा. या तृष्णेमुळेंच जरा-मरणसकटात पडला आहा. वासनाच तुम्हाला एकत्र बाधावयास कारण झाली आहे. पण ती काल्पनिक व त्यामुळेंच असत्य आहे. त्यामुळें संकल्प सोडल्यानेंच ती शस्त्राने तोडल्याप्रमाणें नाहींशी होते. तीच तुमच्या मोहास व मरणादि दुःखास कारण झाली आहे. यास्तव सर्व इद्रियाचा जणु काय कोशच अशा हे चित्ता, इंद्रियाशीं संकेत करून एकमतानें आपल्या असत्स्वरूपास ओळख व शात बोधस्वरूप होऊन रहा. अमर्याद विषयविषसूचिका व अहस्थिति वासना याचा त्याग कर. मनाला जें इष्ट वाटतें तें अनर्थकर असते. यास्तव त्याचा परिहार करणें या मंत्रयुक्तीने तूं अससारी व निर्भय हो ५२.

**सर्ग ५३**—वासना व मन याचा आत्म्याशीं सबध नाहीं. शरीर व मन याचें वैर.

**उद्दालक**—अति मोठ्या व अति सूक्ष्म अशा निर्विषय चित्-तत्त्वाचें आक्रमण करण्यास वासनादिक समर्थ नाहींत. मन माझ्या सत्तेनें वासनेचा अनुभव घेतें. पण मी निर्लेप आहें. देह दुर्भावनेमुळे उद्भवलेल्या संसार स्थितीचें ग्रहण करो अथवा त्याग करो, मी चित् निर्लेप आहे. चित्-ला जन्म-मरण नाहीं. कारण सर्वगामिनी चितूचे मरणार काय व तिला मारणार कोण ? तिला जीविताची गरज नसते. कारण तीच सर्वांचें जीवित व सर्वांचा आत्मा आहे. मरण व जीवन या मनाच्या कल्पना आहेत. शुद्ध आत्म्याच्या नव्हेत. जो देहाहंभावास प्राप्त झालेला असतो त्याच्या बोकाडीं हे जन्म-मरणभाव बसतात. आत्म्याला अहंभाव नाहीं म्हणून त्याला जन्म-मरणही नाहीं. देहाहंभाव वस्तुतः अहंकार व मन यासही नसतो. कारण तीं दोन्हीं मिथ्या आहेत. बरें तो पदार्थांचा आहे म्हणून म्हणावें तर ते जड असतात. यास्तव तो निराश्रय व निर्विषय आहे,

असेच म्हटलें पाहिजे. तसेंच-देह रक्तमांसमय आहे, मन विचार केला असता नष्ट होतें, आणि चित्तादि सर्व जड आहेत. तेव्हां अहंभावना कोठे रहाणार? सर्व पदार्थ पदार्थरूपानें स्थित आहेत व इंद्रियें आपली पोटें भरण्यातच गुतलीं आहेत. त्या आपलपोट्याना अहंकारपुष्टिरूपी परोपकार ठाऊकच नाहीं. सत्त्वादि गुण आप-आपल्या प्रकाश, प्रवृत्ति व मोह या व्यापारात तत्पर असतात. प्रधाननावाची माया गुणसाम्यावस्थेत स्थित आहे. सद्ब्रह्म स्वात्मभूत सत्स्वरूपानें विश्रांति घेत असते. तेव्हा अहंभाव यातील कोणाच्या ठिकाणीं रहाणार? या देहातील चिदात्माही सर्वग, सर्वदेहस्थ, सर्वकालमय, महान, व केवल परमात्म्यासच अहं असें समजून राहिला आहे. वास्तव तो (देहस्थ चिदात्मा)ही अहंकाराचा आधार नव्हे. तेव्हा केवल देहावर अहं असा अभिमान ठेवणारा कोणत्या जातीचा, कोणत्या आकाराचा, कोण, कसा, कोणत्या कारणानें झालेला, कोणत्या वर्णाचा व कोणाचा विकार आहे? व त्याच्या भावनेनें मी कोणाचें ग्रहण करून कोणाचा त्याग करूं? सारांश अहंकाराचें वर्णन करिता येत नसल्यामुळे तो मिथ्या आहे, असेंच म्हणावें लागतें आणि त्या कारणानें त्याचा आत्म्याशीं संबंध नाहीं. अहंकारच जर अत्यंत असत् आहे तर कोणाचा कोणाशीं कोणता संबंध होणार? संबंधच असिद्ध झाला की द्वित्वकल्पना दूर मेली. याप्रमाणे जगांत असलेलें हें ब्रह्मरूप आहे, मी तद्रूप व तत्पर आहें. तेव्हा आता व्यर्थ शोक कशाला करूं? सदंतर्निर्दोषाच्या सामर्थ्यानेंच अहंकार-कलंकाचा क्षय करिता येतो. या दृष्टीनें पदार्थलक्ष्मी नाहींच. एक सर्वगामी आत्माच आहे आणि पदार्थलक्ष्मी जरी असली तरी तिच्याशीं संबंध कसा होतो, हें सांगता येत नाहीं. कारण मन आपल्या अवयवरूप इंद्रियांच्या योगानें स्वभावप्रमाणें आतल्या आंत व्यापार करीत असतें. तें बाहेर जाऊन पदार्थांस स्पर्श करूं शकत नाहीं. चित् तर सर्वांपासून अलिप्त असतें. तेव्हा कोणाचा कोणाशी झाला तरी कसा संबंध होणार? तस्मात् माझें धन इत्यादि प्राकृत पुरुषाचा व्यवहार भ्रममूलक आहे. तत्त्वज्ञानाच्या अभावीं ही अहंकारचमत्कृति उत्पन्न झाली आहे. ही तत्त्वज्ञान होताच क्षीण होते. आत्मभिन्न कांहीं नाहीं. सर्व ब्रह्म आहे. वास्तव मी त्याचीच भावना करतों. आकाशाच्या वर्णाप्रमाणें उत्पन्न

झालेल्या या अहंकार-भ्रमाचें पुनः स्मरण न करणें हेंच श्रेष्ठ विस्मरण आहे. मी या कुकल्पनेला सोडून स्वात्म्यामध्येंच शांत होऊन रहातों. अहंकाराचें अनुसंधान अनर्थपरंपरेंत पाडतें, दुष्कृत वाढवितें व संताप देतें. मरणाचा शेवट जिविताने व जीविताचा क्षय मरणानें होतो. हर हर! ही दुःखवेदना कष्टकर आहे. हें मला मिळालें आहे व हें मी मिळवीन, ही सर्वांगाचा दाह करणारी मूर्खाची पीडा कधींही शांत होत नाहीं. पण अहंभाव क्षीण झाला कीं संसारवृक्ष सुकला. मग त्याच्यापासून अंकुर उद्भवत नाही. देहवृक्षावर ज्यांचीं मोठमोठीं बिळें आहेत अशा तृष्णारूपी काळ्या नागिणी विचारगरुड प्रगट होताच पार कोठे नाहींशा होतात. निष्कारण उद्भवलेल्या जगाला सत् कसें ह्मणावें, व तें जर असत् तर त्याच्यावर आसक्ति ठेवणें म्हणजे मृगजळाच्या मागें धावणाऱ्या पशूचें अनुकरणच करणें नव्हे का? तात्पर्य उत्पत्तीच्या पूर्वी देहाची जी स्थिति होती तीच आता आहे व पुढे( मरणोत्तर )ही असेल. तरंग जसा त्रिकाळीं जलमय तसे देहादि सर्व जग त्रिकाळीं ब्रह्ममय. यास्तव क्षण-भंगुर तरंग व देहादि यांवर जे आस्था ठेवितात त्या कुबुद्धींचा घात होतो. उत्पत्तीच्या पूर्वी व नाशानंतर कोणतीही वस्तु नसते. ती मध्ये मात्र असते. तेव्हा तिच्यावर आस्था काय ठेवावयाची आहे? चित्त उत्पत्तीपूर्वी व नाशानंतर चिद्रूप व शांत असते. यास्तव ते मध्यावस्थेंतही चिद्रूपच आहे. अरे चित्ता, केवळ भ्रमामुळे तूही न्यूनाधिकता कल्पिली आहेस. पण त्याच्यापासून दुःख व दुःखमिश्रित सुख यावाचून तुला काहीं लाभ झाला आहे का? अथवा हा तुझा अपराध नव्हे, तर तुझ्याठायीं अहंभाव ठेव-ण्याचा अभ्यास करणाऱ्या माझाच हा सर्व अपराध आहे. त्यामुळेंच तू असत् असूनही सत् आहेस, असें वाटतें व तू केलेले सर्व मी केले आहे, असे होते. यास्तव तूं मजहून भिन्न आहेस, या ज्ञानानेच तुझी शांति होईल. हें सर्व मिथ्या आहे, असा निश्चय दृढ झाला कीं भोगवासना क्षीण होतात. अथवा चित्प्रतिबिंबाच्या ग्रहणाने चिद्रूप झालेलें मनच व्यापार सोडून आपोआप स्वस्थ होतें. तत्त्वबोधानें ज्याला परमात्म-अग्नीमध्यें फेकलें आहे असें चित्त आपल्या चित्तरूपास जाळून घेऊन अत्यंत नित्य शुद्धीस प्राप्त होतें. ज्याप्रमाणें वीर पुरुष स्वर्गास जाणाऱ्या आपल्याहून आपल्या देहास भिन्न समजतो व तत्संबंधी गृह-क्षेत्र-धनादिविषयवासना

सोडून मरणाचा अंगीकार करतो आणि त्यामुळें ब्रह्मलोकास जिंकतो त्याप्रमाणें मनही देह आपल्याहून भिन्न आहे असें जाणून, विषयवासना सोडून स्वतःचा नाशही करून घेऊन परम पद जिंकतें.

मन शरीराचा शत्रु व शरीर मनाचा रिपु आहे. त्यांतील एकाचा नाश झाला असतां दुसऱ्याचाही होतो. ( म्हणजे आधार घागर व त्यांत घातलेलें-पाणी-आधेय यांच्या संयोगाचा नाश घागर फुटली तरी होणार व पाणी ओतून टाकलें किंवा तें आटून गेलें तरी होणार, हें उघड आहे. त्याचप्रमाणें शरीर आधार व त्यांत रहाणारें मन आधेय यांच्या संयोगाचा नाश शरीराचा नाश झाला तरी व मनाचा नाश झाला तरी होतो. ) रागद्वेषवान् व सतत एकमेकांच्या अति विरुद्ध अशा या दोघांचा समूल ( अज्ञानासह ) नाश केल्यामच जीवाला सुख होतें. मरणाच्या योगानें देहाचा नाश होतो, हे खरे. पण त्यामुळें सर्व दुःखांचा परिहार होत नाहीं. कारण मन वासनायुक्त असेपर्यंत तें देहाची कल्पना केल्यावाचून रहात नाहीं. यास्तव देह मेला हें म्हणणें अप्रयोजक आहे. स्वभावतःच विरुद्ध असलेलीं हीं दोघें जेव्हां एकमेकांशीं भिडतात तेव्हा युद्ध करणाऱ्या दोघांच्या मध्यें असलेल्या पुरुषाच्या अंगावर जशा शस्त्रादिकांच्या धारा पडतात त्याप्रमाणें जीवावर अनर्थपरंपरा कोसळतात. परस्परविरुद्ध असलेल्या देह-मनांचा ज्यामध्यें संसर्ग होतो अशा विषयभोगांत आसक्त होणारा अधम पुरुष वडवाग्नींत टाकल्यास तेथेंही सुखी होईल. ( मन व देह अशीं दोघेंही रागद्वेषवान् आहेत, असें वर म्हटलें आहे. त्यांतील मनाचे देहाविषयीं व देहाचे मनाविषयीं राग व द्वेष कसे असतात, तें सांगतात. ) मन आपल्या संकल्पानें शरीराची कल्पना करून व यावज्जीव अन्न देऊन, त्याला पुष्ट करून स्वाभिमाननिमित्तक सर्व दुःखेंही देतें, पण त्या दुःखांच्या योगानें संतप्त झालेला देह दुर्विषयसेवनानें मनामध्यें राग-द्वेष-शोक-मोह-पाप

---

१ देह व मन परस्पर तप्य-तापक आहेत. तप्य म्हणजे संतप्त होणारें व तापक म्हणजे संतप्त करणारें. देह मनाला संतप्त करतो व मन देहाला संतप्त करतें. त्यामुळे त्यांचा परस्पर विरोध आहे. पण परस्पर तादात्म्याभिमानामुळें त्या दोघांचीही परस्पर अभिवृद्धि होत असल्याकारणानें ती परस्परांवर उपजीविका करणारी आहेत. व त्यांतील एकाचा उच्छेद झाला असतां दुसऱ्याचाही होतो, हें सविस्तर येथून पुढें सांगतात.

इत्यादि उत्पन्न करून त्याला पीडा देण्याची इच्छा करतो. 'मनापासून झालेला व त्यामुळेंच पुत्राप्रमाणें असलेला देह पितृतुल्य मनाला पीडा देण्याची इच्छा कशी करतो ह्मणून म्हणशील तर सांगतों? सर्वस्वीं नाश करावयास सज्ज झालेल्या ह्मणजेच आततायि पित्याला पुत्रही मारतो, हें सर्वांस माहितच आहे. स्वभावतः कोणी कोणाचा शत्रु नाहीं व मित्र नाहीं. सुख देणाऱ्या प्राण्याला मित्र व दुःख देणाऱ्या प्राण्याला अथवा वस्तूला शत्रु म्हणत असतात. यास्तव मनामुळे दुःखी होणारा देह मनाला मारण्याची इच्छा करतो. मन मोठें धूर्त आहे तें एका क्षणात देहाला आपल्या दुःखाचें आयतन करतें. तेव्हा अशा परस्पर विरुद्ध व दुःखद पण एकामेकांशीं सबद्ध झालेल्या या दोघांपासून सुखाचा लाभ कसा होणार! मनच क्षीण झालें म्हणजे देह दुःखाचें भाजन होत नाहीं? एवढ्यासाठींच तो त्याच्या क्षयाच्या उत्कंठेनें ज्ञानसाधनाविषयीं यत्न करतो. मग मनही उलट तसाच प्रयत्न का करीत नाहीं? म्हणून कोणी विचारील तर सांगतों–ज्याला आत्मविवेक झालेला नाहीं अशा मनानें नाश करून सोडलेलें अथवा नाश न केलेलें शरीर अनर्थालाच कारण होतें. त्यामुळें त्याच्या नाशानें मनाची इष्टसिद्धि होत नाहीं. मन व शरीर जडरूप असूनही परस्परामुळें पुष्ट होतात. तीं परस्पर विरोधी असूनही पुरुषास दुःख देण्याकरिता अन्योन्य तादात्म्य–अध्यासाने एकरूप होतात. चित्त क्षीण झालें असता देहही समूळ क्षीण होतो व तें वृद्धिगत होऊं लागलें असता हाही वृक्षाप्रमाणें शेकडो शाखानीं विस्तार पावतो. पण देह क्षीण झाल्यानें मन क्षीण होत नाहीं. यास्तव मन क्षीण करण्याविषयींच प्रयत्न करणे उचित होय. मीही आतां संकल्प हेच ज्याच्यांतील वृक्ष आहेत व तृष्णा या लता आहेत अशा मनोवनास तोडून सपाट भूमींत सुखानें विहार करतों संकल्पांचा नाश झाला म्हणजे मन मनःस्वभावामध्येंच रहात नाहीं. तर तें वासनाजाल सोडून क्षीण होतें. मनाचा क्षय झाला म्हणजे सप्त धातूचा गोळा असा हा देह राहो कीं जावो त्यामुळें माझी कांहीं हानि नाहीं. कारण देह जरी असला तरी मन नसल्याकारणानें दुःखसंबंध होत नाहीं. मी देह नव्हे, असें जाणावयास सबळ कारणही आहे. मेलेला देह सर्व अवयव जसेच्या तसेच असताना दर्शन-श्रवणादि क्रिया करीत नाहीं, हें प्रसिद्ध आहे. पण त्याच्यामध्यें अहं म्हणणारा

कोणी असेपर्यंत तो सर्व कांहीं करतो हेंही कोणाला नव्यानेंच सांगावयास नको. यावरून बोधात्मा अहं देहाहून निराळा आहे, असें ठरतें. जो विभु असल्याकारणानें सूर्यमंडलांतही असतो, तोच मी आहें. मी अज्ञ नव्हे, मला दुःख नाहीं. मी अनर्थात पडत नाहीं व मला दुःखिता नाहीं. शरीर असो कीं नसो मी संतापशून्य होऊन राहिलों आहें. भूमा-नामक आत्म्यामध्ये मन, इंद्रियें व वासना यांतील कांहीं नाहीं. कारण श्रेष्ठापुढे क्षुद्र उभेही रहात नसतात. मी त्या प्रसिद्ध पदास प्राप्त झालों आहें. मी केवल आहें. माझा विजय झाला आहे. मी शांत, निरंश व निरिच्छ आहे. मन, इंद्रियें व देह यांच्याशीं आतां माझा कांहीं संबंध राहिलेला नाहीं. आपल्या श्रेष्ठ पदापासून प्रारब्धशेष भोगण्याकरितां किंचित् चलित झालेल्या पण पूर्व वासनेनें देहादिकांस पृथक् केलेल्या माझा हा देहादि-समूह शुभ सेवकाप्रमाणें उपकारक झाला आहे. स्वच्छता, सत्यता, मृदुभाषिता, पूर्णता, उदारता, सर्वैकता, निर्भयता इत्यादि सर्व सुंदर धर्म, सुभग सुंदरीप्रमाणेंच, माझी सेवा करावयास सदा सज्ज असतात. या मज सर्वात्म्याला ते सर्व कांहीं कल्पनेनें संभवतें. त्यामुळेंच सर्व विषयाविषयीं माझे राग-द्वेष, व त्यांचें फल सुख-दुःख क्षीण झालें आहे. तात्पर्य, मोह गेल्यामुळें, मन क्षीण झाल्याकारणानें व चित्त विकल्पशून्य झाल्यामुळें मी आतां शीतळ आत्म्यामध्यें शांत होऊन राहिलों आहे ५२.

**सर्ग ५४**—उद्दालक मुनीची ततच्ची भावना करीत सर्व विकल्प सोडून समाधीत विश्रांति घेणें.

**श्रीवसिष्ठ**—राघवा, शुद्ध व उदार मतीनें असा निर्णय करून तो मुनि पद्मासन घालून व नेत्र अर्धोन्मीलित करून बसला. ॐ हेंच पर ब्रह्म आहे. कारण ज्यानें ज्यानें ॐकाराचा उच्चार केला तो तो परम पदास गेला असा विद्वानांचा अनुभव आहे; असा निर्णय करून ब्रह्माचें नाव व प्रतीक अशा त्याचा उच्च स्वरानें उच्चार केला. घंटेचा लोळा चांगला हालवून घंटा जशी मोठ्यानें वाजवितात त्याप्रमाणें तोंडामध्यें जीभ चांगली हालवून ओंकाराचा स्पष्ट उच्चार करणाऱ्या त्यानें जीव चैतन्य ब्रह्मचैतन्योन्मुख होई तों त्याचाच वारंवार अभ्यास केला. प्राणायामादि सौम्य उपायांनीं सर्व योगभूमींचा जय केला. त्यामुळें त्याचा प्राण व देह यांचा वियोग झाला. रेचक प्राणायामाच्या योगानें बाहेर सोड-

लेला प्राण घरटें सोडलेल्या पक्ष्याप्रमाणे ब्रह्मभावनेनें व्यक्त झालेल्या व हृदयगत रसानें भरलेल्या बाह्य आकाशात राहिला. नंतर भावनेनेंच दीप्त झालेल्या हृदयाग्नीनें त्याच्या सर्व शरीरास जाळलें. प्रणवाच्या अकार-रूप प्रथम अंशामध्येंच हें सर्व भावनेनें झाले. हठानें नव्हे. बलात्काराने प्राणांचें नियमन करूं लागलें असता मरण-मूर्च्छादि-जन्य दुःख भोगण्याचा प्रसंग येतो. प्रणवाचा दुसरा अंश उकार. त्याचा अनुदात्त व मंद्र उच्चार करताना कुंभक–नावाचा प्राणायाम होतो. एखाद्या भांड्यात अडवून ठेवलेल्या पाण्याप्रमाणें कुंभकसमयीं प्राण बाहेर, आत, खालीं, वर, पुढे, मागें व बाजूस जात नाहीं. तर स्थिर रहातो. असो; ज्याने देहनगरास जाळलें आहे असा अग्नि विजेच्या ज्योतीप्रमाणे क्षणांत शांत झाला व शरीराचें पांढरे भस्म दिसू लागलें. त्या अवस्थेत शरीराचीं हाडें कापुराच्या धुळीनें रचलेल्या शय्येवर निजल्याप्रमाणे भावनादृष्टीनें दिसत होतीं. वायूनें भस्मासह त्यास वर उडविलें व त्यामुळें तीं शरत्कालच्या अभ्राप्रमाणें कोठे दिसेनाशीं झालीं. प्रणवाच्या दुसऱ्या क्रमात भावनामय योगानेंच हे इतकें झालें. नंतर त्याच्या तिसऱ्या क्रमात म्हणजे मकारोच्चारसमयीं पूरकप्राणायाम झाला. यावेळीं प्राण चेतनामृतामध्यें राहिले. ते रसायनमय धारारूप झाले. त्यानीं सर्व शरीरास भरून सोडलें. त्यामुळें उद्दालकाचे ते आनंदप्रधानशरीर नारायणमय झाले. चक्राकार भोंवऱ्यानीं वहाणाऱ्या गंगेला जसे मेघ आपल्या जलाने भरतात त्याप्रमाणें प्राणानीं कुंडलिनीस भरून सोडले, त्यामुळें ब्राह्मणाचें ते शरीर समाधिकार्यस्थ झालें.

नंतर पद्मासनबंधानें बसून व पंच-इंद्रियास दृढ बांधून तो निर्विकल्प समाधीकरितां व्यवसाय करूं लागला. स्वतःच्या मनास स्वच्छ करण्याकरिता त्यानें प्रयत्न चालविला. प्राणायामाच्या अभ्यासाने त्यानें प्राणादि वायूस शांत केलें व एखाद्या पशूस जसें दांव्याला बांधून ठेवितात त्याप्रमाणें त्यानें मनाला हृदयांतच स्थिर केलें. दगडी बांध जसा पाण्याला अडवून धरतो त्याप्रमाणें क्षुद्रविषयांकडे धांवणाऱ्या चित्ताला विवेकानें शुद्ध करून अडवून धरलें. संध्याकाळच्या कमळाप्रमाणें नेत्र अर्धे मिटून त्यांतील तारा निश्चळ ठेवली. मौन धारण करून त्यानें प्राणापानांचा वेग सौम्य केला. तिळांतील तेल जसें प्रयत्नानें प्रथक् करतात त्याप्रमाणें

त्यानें इंद्रियांस विषयांपासून दूर केलें व कांसव आपले अवयव जसे झांकून घेतो त्याप्रमाणें त्यानें त्यांस आंतल्या आंतच झांकून ठेवलें. बाह्य स्पर्शास त्यानें दूर टाकलें व आतर वासनांस अधिष्ठानतत्त्वांत आकर्षण करून घेतले. नवद्वारांस बंद केले. मान सारखी धरली व युक्तीनें वश केलेल्या हत्तीप्रमाणें वश झालेल्या मनाला त्यानें हृदयांतून बाहेर पडूं दिले नाहीं. त्याकारणानें अतिनिर्मल सौम्यतेस प्राप्त झालेल्या त्याला वातरहित पूर्ण-सागराची शोभा प्राप्त झाली. मशकास जसा वायू उडवून सोडतो त्याप्र-माणें त्यानें सर्व विकल्पास दूर उडवून सोडलें. जसा एकादा शूर खड्गानें रणांत शत्रूंस तोडतो त्याप्रमाणें वारवार उठणाऱ्या सकल्पास त्यानें यथेच्छ कापून काढलें. विकल्पौघ नाहींसा होतांच हृदयाकाशात त्यानें तमोगुणप्रयुक्त अध-कारानें आच्छादित झालेल्या विवेकसूर्यास पाहिलें. पण प्रयत्नशील पुरुषांना असलीं विघ्नें फार वेळ प्रतिबंध करूं शकत नाहींत. त्या धीरानें तत्काल आपला सत्त्वगुण वाढविला व त्यामुळें प्रदीप्त झालेल्या ज्ञानमय मनो-सूर्यानें त्यास हटविलें. तेव्हा रात्रींचा अधकार लोपला असता कमळ उदय पावणाऱ्या सूर्यानें युक्त असलेल्या प्रातःसंध्येस जसें पहातें त्याप्र-माणें त्यानें तम शात झालें असता सुदर तेजःपुज पाहिला. पण त्या शूरानें अधिष्ठानतत्त्व–दर्शनानें त्याला बाधित केलें. तेव्हां रज व समा-धान या दोघांपासून चाळविलेले चित्त विषयच न मिळाल्यामुळें लीन झालें ( तें निद्रेत मग्न झालें ). पण वायु मेघपक्तीस, हत्ती कमलिनीस अथवा सूर्य रात्रीस जसा क्षीण करून सोडतो त्याप्रमाणें त्यानें चित्ताला जागें करून निद्रा घालविली. नतर त्याच्या मनानें नाना वासना-परिकल्पितरूप-युक्त आकाशाची भावना केली. तेव्हा उद्दालकानें त्याचेंही परिमार्जन केलें पण आकाशसवित् नाहींशी झाली असता याचें मन मूढ झालें. तथापि त्या महा प्रयत्नशाली पुरुषानें त्या मोहाचेंही परिमार्जन केलें. तेव्हा शेवटीं हे रामभद्रा ( तेज, तम, निद्रा, व मोह यांचा परिहार केला असतां ) त्याचें मन काहीं विलक्षण अवस्थेस प्राप्त होऊन क्षणभर विश्राम पावलें. पण नियतीनें त्या दुर्भाग्याला तेथें फार वेळ टिकूं दिलें नाहीं. पाण्याचा ओघ पुढें प्रतिबंध झाला असतां जसा मागें वळतो त्याप्रमाणें तें थोडा वेळ विश्रांति घेऊन पुनः बाह्य प्रपंचाकडे वळलें. पण त्यामुळें कंटाळून प्रयत्न न सोडतां उद्दालक-महा-

मुनि त्याला बाह्य आकारापासून परतवूं लागला. पण ध्यानादिकांचा पुष्कळ अभ्यास झालेला असल्यामुळें व आनंदाचा स्वादही कळलेला असल्यामुळें तें मध्येंच चिन्मय सविकल्प समाधीस प्राप्त झालें आणि त्याच क्रमानें त्या साधकानें पुढें अभ्यास चालविला असता निरिंधन अग्नीप्रमाणें चित्त स्वतःच चित्ततेस सोडून चिद्रूप झालें. पूर्व अवस्थेहून निराळी अवस्था त्याला प्राप्त झाली. एकाद्या मातीच्या घागरींत गढूळ पाणी भरून ठेवलें असता कांहीं दिवसांनी त्यातील जलांश सुकून जाऊन चिखल जसा घागरीला चिकटून बसतो व कुंभरूप बनतो त्याप्रमाणें त्याचे शुष्क मन तत्त्वमय झाले. याप्रमाणे चित्ताचा चित्त भाव गेला असता त्यातील चित्प्रतिबिंबही बिंबभूत सर्व-सामान्य शुद्ध चित् झाली. त्यानतर उद्दालक तशा प्रकारच्या बोधास प्राप्त होऊन स्वतः चिदधिष्ठानभूत, द्वैतप्रतिभासरहित, शुद्ध व महत् चिदाकाश झाला. त्या अवस्थेंत दृश्यदर्शनशून्य, अनंत, ब्रह्मादिकाकडूनही स्वाद घेतला जाणारा, व सर्व विषयसुखकणाचा जणु काय आधारभूत सागरच अशा आनदास तो प्राप्त झाला. शरीरापासून अगदीं पृथक् झालेल्या त्याला कांहीं अवर्णनीय शुद्धि प्राप्त झाली. तो सत्तासामान्यरूप आनदसागर झाला. तो चेतन हस आनदसरोवरात यथेच्छ विहार करूं लागला. निर्मळ हृदाकाशांत तो कलापूर्ण चद्राप्रमाणे होऊन राहिला. तो चित्रासारखा, निर्वात दीपासारखा, तरगरहित जलाशयासारखा अथवा सर्व जलाचा वर्षाव केल्यामुळें गर्जना न करणाऱ्या मेघासारखा होऊन राहिला.

त्या महाप्रकाशात फार वेळ राहिलेल्या उद्दालकानें आकाशांतून गमन करणाऱ्या अनेक सिद्धास व पुष्कळ अमरासही पाहिले. इंद्र, सूर्य इत्यादिकाचे अधिकार देणाऱ्या व अप्सरागणानीं भरलेल्या अनेक विचित्र सिद्धी चोहोंकडून त्याच्याकडे आल्या. पण एकादा पोक्त व गभीरमति पुरुष जसा बाळलीलेस फारसा मान देत नाहीं त्याप्रमाणें त्या द्विजानें त्याचा आदर केला नाहीं. सर्व सिद्धींना कस्पटाप्रमाणें तुच्छ समजून याप्रमाणें तो सहा महिने त्या आनदमदिरात राहिला. तो द्विज सातव्या भूमिकेपर्यत उत्तरोत्तर उत्कृष्ट पदास प्राप्त होई तो सिद्धादिक सर्व तेथें राहिले. पण विषयबुद्धीनें त्या आनदाचा स्वाद न घेतल्यामुळें तो महात्मा अनानंदपदास पोंचला. त्यामुळें त्याचें आत्मचैतन्य विषयी पुरुषाप्रमाणे क्षुद्र आनंदांत आसक्त झालें नाहीं व दुःखांतही निमग्न झालें नाहीं. तर स्वप्रकाशैकर-

संपूर्ण होऊन राहिले. ज्यानें स्वर्गाच्या ऐश्वर्याचा अनुभव घेतला आहे त्या पुरुषाला भूलोकच्या ऐश्वर्याची जशी इच्छा होत नाहीं त्याप्रमाणें एक क्षणभरही त्या स्थितींत स्थिर झालेल्या मनाची रति भोगामध्यें होत नाहीं. अशा प्रकारचा आनंद हेंच शाश्वत व कल्याणकर श्रेय आहे. तेथें विश्रांति पावलेल्या मनाला पुनः भ्रम होत नाहीं. कुबेराच्या चैत्ररथ वनात विहार करणारा मनुष्य खदिराच्या वनात जसा कधींही येत नाहीं त्याप्रमाणें त्या परमानंदास प्राप्त झालेला साधु दृश्याकडे ढुंकूनही पहात नाहीं. राजे दीनतेस जसे फारसे जुमानीत नाहींत त्याप्रमाणे या महा–आनंदपदवीस प्राप्त झाल्यावर साधू दृश्यास फारसा मान देत नाहींत. सहाव्या भूमिकेस पोंचलेलें बुद्ध चित्त दुसऱ्यांच्या मोठ्या प्रयत्नानेंच व्युत्थान पावतें. पण सातव्या भूमींत रूढ झालेलें तें दुसऱ्याच्या प्रयत्नानेंही समाधि सोडीत नाहीं.

असो, राघवा, उद्दालक सहा महिने सर्व सिद्धींस सोडून त्या अवस्थेत राहिला व त्यानंतर चैत्रांत धुक्यांतून पार पडणाऱ्या सूर्याप्रमाणें सावध झाला. पण त्याबरोबर त्याला पूर्वी दिसलेल्याच अप्सरा, सिद्ध इत्यादिकांच्या विमानपरंपरा पुनः दृष्टीं पडल्या. दर्भांच्या योगानें ज्यांचे तळहात पवित्र झाले आहेत अशा आम्हा मुनींस व विद्याधरींसह विद्याधरास त्यानें पाहिलें. ते सर्व त्या उद्दालक महामुनींस म्हणाले, " भगवन्, प्रणाम करणाऱ्या आमच्याकडे कृपादृष्टीनें पहा. या विमानात आरूढ होऊन स्वर्गास चल. जगातील सर्व संभोग-संपत्तींची पराकाष्ठा स्वर्गच आहे. हे विभो, तेथें आनंदानें राहून कल्पपर्यंत उचित व इष्ट विषयाचा भोग घे. स्वर्गादि फल-भोगाकरिताच सर्व तप क्रिया आहेत. ह्या पहा हार व चामरें धारण करणाऱ्या विद्याधराच्या अंगना तुझी उपासना करावयास तयार झाल्या आहेत. धर्म व अर्थ यांचें सार काम आहे. कारण तेंच त्यांचें फल आहे. सुंदर स्त्रिया हें कामाचें फल आहे. पण त्या, वसंत ऋतूंतच येणाऱ्या मंजिऱ्याप्रमाणें, स्वर्गातच रहातात."

रघुकुलभूषणा, याप्रमाणें मनास क्षोभ उत्पन्न करणाऱ्या त्या सर्वांस अतिथी समजून त्यानें त्यांची पूजा केली व तो महात्मा तसाच स्तब्ध राहिला. त्या धीरानें त्या विभूतींचें अभिनंदन केलें नाहीं व त्यागही केला नाहीं. नुसतें ' अहो सिद्धांनो, तुम्ही जा ' एवढेंच बोलून तो आपल्या समाधींत तत्पर झाला. नंतर भोगांविषयीं विरक्त झालेल्या व स्वधर्मामध्यें

निरत असलेल्या त्या महा सिद्धाची उपासना करून कांहीं दिवसांनीं ते सर्व सिद्ध आपापल्या स्थानीं निघून गेले. पुढें तो जीवन्मुक्त मुनि मोठ्या आनंदानें व स्वेच्छेनें वनें व मुनींचे आश्रम यातून विहार करीत राहिला. मेरु, मंदार, कैलास, हिमालय व विंध्य यांचीं शिखरें, द्वीपें, उपवनें इत्यादिकांतून त्यानें स्वैर संचार केला. तेव्हापासून तो ब्रह्ममय होऊन राहिला. पर्वतांच्या गुहादिकामध्यें त्यान ध्यानलीलेनें काल घालविला. (म्हणजे ध्यान ही सुद्धा त्याची लीला होय. कोणत्याही साध्याचें साधन नव्हे.) ध्यानामध्यें आसक्त झालेला तो कधीं एका दिवसानें, कधीं महिन्यानें, कधीं वर्षानें तर कधीं वर्षसमूहानेंही देहभानावर येत असे. चित्-तत्त्वाशीं ऐक्य पावलेला तो महामुनि त्या दिवसापासून व्यवहारपरायण असतानाही अति शांत (समाहित) राहिला. केवळ चित्-तत्त्वाचाच दृढ अभ्यास केल्यामुळे महा चित्त्वास प्राप्त झालेला तो सूर्याच्या पृथ्वीवरील तेजाप्रमाणें सर्वत्र सम राहिला. साक्षिचैतन्याचें सतत अनुसंधान केल्यामुळे सामान्यसत्तारूप झालेला तो, चित्रातील सूर्याप्रमाणें, या दृश्यामध्यें उदय किंवा अस्त पावला नाहीं. साराश या क्रमानें तो महात्मा शातचित्त, जननपाशरहित, संदेहशून्य व आनंद पूर्ण झाला ५४.

**सर्ग ५५**—सत्तासामान्याचें चिह्न, देहत्याग, व आख्यानोपसंहार.

**श्रीराम**—प्रभो सामान्यसत्ता अथवा सत्तासामान्य म्हणजे काय ?

**श्रीवसिष्ठ**—कौसल्यातनया, विषयाचा अत्यत अभाव आहे, अशा भावनेनें चित्त क्षीण झालें असता स्वतःसिद्ध आणि चित व अचित् या दोन्हीमध्यें अनुगत अशी सत्ता राहते. तेंच सत्तासामान्य होय. खरोखर चेत्यांशरहित चित् जेव्हा बिंबभूत चैतन्यामध्ये लीन होते तेव्हा आकाशाप्रमाणें अति स्वच्छ सत्ता रहाते तेंच सत्तासामान्य आहे. ज्यावेळीं चित्त या सर्व बाह्य व आभ्यंतर दृश्यास सोडून केवळ चिन्मय होते तेव्हां सत्तासामान्य असतें. जेव्हा सर्व भूतें पारमार्थिकरूपानें चित्स्वरूप होतात तेव्हां सत्तासामान्य असतें. कासवाच्या अंगाप्रमाणें सर्व दृश्यें जेव्हां आपोआप आत्म्यामध्ये लीन होतात तेव्हां सत्तासामान्य असतें. ही सप्तम भूमिकेमध्यें आरुढ झालेली दृष्टि तुर्यावस्थेसारखीच असल्यामुळें सदेह व अदेह मुक्तांमध्यें संभवते. पांचव्या सहाव्या व नूतन सातव्या ज्ञान भूमिकेंतही समाधिस्थ पुरुषाची ही दृष्टि असते व सातव्या भूमिकेंत अतिरूढ

झालेल्या पुरुषाची व्युत्थित दशेंतही ती असते. पण अज्ञाला तिचा केव्हांही अनुभव येत नाहीं. भूमींतील पारदादि रसांप्रमाणें अथवा आकाशमार्गांतील वायूप्रमाणें या दृष्टीमध्यें सर्व जीवन्मुक्त महाशय असतात. राघवा, आम्ही सर्व, नारदादिक, व ब्रह्मा-विष्णु-महेशादिक या दृष्टीमध्येंच स्थिर स्थित असतात. या समस्तभयनाशक पदवीचा आश्रय करून उद्दालक इच्छेस येईल तितके दिवस जगद्गृहांत राहिला. नंतर एकदा देह सोडून विदेह व्हावें असें त्याला वाटलें आणि त्या बरोबर तो पर्वतगुहेमध्ये पल्लवासनावर पद्मासन घालून व नेत्र अर्धोन्मीलित करून बसला. त्यानें नऊं ही द्वारें बंद केलीं. शब्द-स्पर्शादि एकेका विषयवृत्तीस आपल्या अधीन करीत सर्वांस चिद्रूप करून सोडलें. प्राणायाम, मान सरळ धरणें इत्यादि सर्व योग-उपायांनीं त्यानें मनालाही निश्चल केलें. त्यामुळे त्याच्या तोंडावर शांति पसरली. चित्तांत आनंदातिशयाचा उद्भव झाल्यामुळे अंगभर रोमांच उठले. मी चिदानंद आहे, असा मनांत अभ्यास केल्याकारणानें तो आत्मसत्तासामान्यास प्राप्त झाला. अगदीं विक्षेपशून्य अशा श्रेष्ठविश्रांतीचा तो अनुभव घेऊं लागला. अनुपम आनंद झाल्यामुळे त्याची मुखकांति फार फार सुंदर झाली. कांहीं वेळानें आनंद रूढ झाल्यावर त्या महात्म्याच्या अंगावरील रोमांचादि आनंदचिह्नें हळु हळु लोपलीं. त्याचा मननादि समारंभ पार नाहींसा झालेला असल्यामुळें तो महा उदार पुरुष चित्रासारखा निश्चल व शरत्कालच्या पूर्णचंद्राप्रमाणें आल्हादकारक झाला. कांहीं दिवसांनीं हळु हळु तो आपल्या विमल आत्म्यामध्यें शांत झाला.

याप्रमाणें प्राणादिकांचा उपशम झाला असतां बाकी अवशिष्ट राहिलेलें त्याचें स्वरूप सर्व विकल्पशून्य, निर्विकार, सुंदर व उपाधिशून्य होतें. ज्यामध्यें समुद्र-जलांतील तृणाप्रमाणें इंद्राची लक्ष्मी तरंगत असते तें आद्य व अवर्णनीय सुख त्याला प्राप्त झालें. तो उद्दालक ब्राह्मण अपरिच्छिन्न, परिपूर्ण, सर्व भुवनाचें धारण व पोषण करणार व अनेक उत्तमांकडून सुसेवित, असें सत्य, अनंत व आद्य सुख झाला.

असो; याप्रमाणें त्याचा जीव निर्मळ व आद्य पदास प्राप्त झाला असतां सुमारें सहा महिन्यांतच त्याची तनु सूर्यकिरणांनीं सुकून गेली. तों इतक्यांत पार्वतीसह ब्राह्मीप्रभृति सर्व मातृदेवता कोणा भक्ताचें इष्ट संपादन करण्याकरितां तेथें आल्या, व त्यांतील देवादिकांनाही वंद्य असलेल्या

व रात्रीं नवीं नवीं विचित्र भूपणें घालून नृत्य करणाऱ्या चामुंडा नांवाच्या मातेने ते ब्राह्मणाचें शुष्क शरीर आपल्या मुकुटांत घातलें. ज्याचा मूढदृष्टि लोकांनीं कल्पिलेला मासादिमय देहही त्रिजगद्वंद्य देवीच्या शिरोभूषणतेस प्राप्त झाला तो महात्मा स्वतः सर्वोत्कृष्ट पदास प्राप्त झाला हें काय सांगावें !

राघवा, अशा प्रकारच्या या उद्दालकाच्या विदेह कैवल्यप्राप्तीपर्यंत सर्व चरित्राचें चिंतन मोठ्या आदरानें व सतत जो करतो तो पुरुष तापत्रयानीं भरलेल्या व्यवहार-अरण्यात विहार करीत असतानाही सत्य, शांति, दम, संतोष इत्यादि सद्गुणापासून वियुक्त होत नाहीं व शेवटीं त्याला मोक्षफळ अवश्य मिळतें ९९.

**सर्ग ५६**—मायातिमिर घालवून प्रबुद्ध व वासनाशून्य झालेला पुरुष व्यवहार करीत असला तरी समाधिस्थच होय.

**श्रीवसिष्ठ**—कमलनयना, या क्रमानें विहार करीत व आपणच आपल्याशीं विचार करून तू विततपदीं विश्रांत हो. शास्त्रश्रवण, तत्त्वपरीक्षण, गुरुवचनावर विश्वास व स्वचित्तशोधन यांच्या योगाने सर्व दृश्याचा बाध होऊन परम पदीं विश्रांति मिळेपर्यंत विचार अवश्य करावा. वैराग्याभ्यास, शास्त्रश्रवण, तत्त्वपरीक्षण, प्रज्ञा व गुरुप्रोक्त क्रम, याच्या योगानें अथवा एका प्रज्ञेनेंच पुण्य पद मिळतें. उत्तम बोधवती तीक्ष्ण व कलंकरहित मति इतर सर्व सामग्रीनें रहित असली तरी शाश्वत पदास पोंचते.

**श्रीराम**—भगवान्, कोणी ज्ञानी व्यवहारपरायण असूनही समाधिस्थाप्रमाणें विश्रांत होतो व दुसरा कोणी समाधि लावून स्वस्थ बसलेला असतो. तेव्हा या दोघापैकीं श्रेष्ठ कोण ? ते मला सांगा.

**श्रीवसिष्ठ**—रामा, या सर्व गुणसमाहारास अनात्मरूपानें पहाणाऱ्या पुरुषाची अंतःशीतलता हीच समाधि होय. मन असलें म्हणजे विक्षेप उत्पन्न करणारा दृश्यसंबंध होतो. पण माझें मनच नाहीं, असा निश्चय करून शीतल झालेला कोणी व्यवहार करतो व कोणी ध्यानामध्यें व्यवस्थित असतो. हे रामा, हे दोघेही आत शीतळ असल्यास सुखीच होत. अंतःशीतलता हें अनंत तपाचें फळ आहे. पण समाधिस्थानीं बसूनही ज्याचें चित्त वृत्तींच्या योगानें चंचल होतें त्याचें तें समाधान म्हणजे उन्मत्ताचें तांडवच होय. त्याचप्रमाणें शरीरद्वारा उन्मत्तासारखें तांडवनृत्य करीत

असतानाही ज्याचें चित्त वासनाशून्य असतें तो बुद्ध व समाधिस्थच आहे. पुरुष व्यवहार करीत असो की वनांत जाऊन राहिलेला असो, तो सिद्धच होय. कथाश्रवण करावयास बसलेल्या मनुष्याचें चित्त कथेकडे नसून दुसऱ्याच कोठें गेलें असल्यास तो जसा दूर गेल्यासारखाच होतो त्याप्रमाणें वासनाशून्य चित्त व्यवहारसमयींही अकर्तृ असतें. आंथरुणावर झोंप घेत निश्चल पडलेला पुरुष जसा स्वप्नांत खळग्यांत पडत असतो त्याप्रमाणे वासनापूर्ण चित्त कांहीं करीत नसलें तरी कर्तृ आहे. चित्ताचें अकर्तृत्व हेंच उत्तम समाधान होय. तोच केवलभाग व तीच शुभ व श्रेष्ठ शांति होय. ध्यान व अध्यान यांचें परम कारण चित्त आहे. यास्तव त्यालाच अंकुररहित कर. वासनाशून्य मन स्थिर होतें व तेंच ध्यान होय. ज्याच्या वासना क्षीण होऊं लागल्या आहेत तेंच चित्त श्रेष्ठ पदीं जाण्यास उद्यत झालें आहे असें म्हणतात यास्तव बा उद्योगप्रिय रामा, दुःखद वासनेस क्षीण करावें. ज्याच्या योगानें आत्मा स्वस्थ, जगदास्थाशून्य व शोक-भय-इच्छारहित होतो तोच समाधि होय. रामभद्रा, सर्व पदार्थांविषयींचा अहं-ममाभ्यास सोडून गृहामध्यें, पर्वतावर किंवा आणखी कोठें तुला जसें रहावयाचें असेल तसा रहा. ज्याचा अहंकारदोष शांत व चित्त समाहित झालें आहे अशा गृहस्थाचें गृहच निर्जन वनभूमी आहेत. ज्याची मनोदृष्टि समाहित झाली आहे अशा नित्य अपरोक्ष प्रत्यगात्म्यामध्यें स्थित असलेल्या प्राण्यांना अरण्य व गृह हीं दोन्हीं सारखींच भासतात. शांतचित्त पुरुषाला गजबजलेलीं नगरेंही शून्य वनासारखीं वाटतात व वृत्तियुक्त चित्तानें मत्त झालेल्या प्राज्ञ पुरुषाला निर्जन वनेंही मोठ्या नगराप्रमाणें दुःखद होतात. विक्षिप्तचित्त संसार देतें व शांतचित्त मोक्ष देतें, अशी

---

१ संस्कृतांत समाधिशब्द पुल्लिंगी आहे

२ गृहमेव गृहस्थानां सुसमाहितचेतसाम् । शान्ताहंकृतिदोषाणां विजना वनभूमयः ॥ याच अर्थाचा—वनेऽपि दोषाः प्रभवन्ति रागिणां गृहेऽपि पंचेन्द्रियनिग्रहस्तप. । अकुत्सिते कर्मणि यः प्रवर्तते निवृत्तरागस्य गृहं तपोवनं हा श्लोक हितोपदेशांत आहे. याचा सारांश—वनामध्येंही रागी पुरुषांच्या हातून दोष संभवतात व गृहामध्येंही पंचेंद्रियसंयम हें तप आहे. अनिंद्य कर्मांमध्यें प्रवृत्त होणाऱ्या रागरहित पुरुषाचें गृहच तपोवन आहे.

वस्तुस्थिति आहे. यास्तव आतां तुला वाटेल तसें कर. सर्व भावपदातीत व सर्वभावात्मक अशा आत्म्याला जो सदा पहातो तो समाहित होय. राग-द्वेष क्षीण झाल्यामुळें ज्याला सर्व भाव सम वाटतात त्याला समाहित ( समाधिस्थ ) म्हणतात. कारण त्याचें मन जसें झोपेंत तसेंच जागेपणींही हें दृश्य सत्-आत्म्याच्या योगानें सत्च आहे, असें पहातें. बाजारांत जमलेले अनेक लोक आपापला व्यवहार बरोबर करीत असले तरी संबंध नसल्यामुळें उदासीन पुरुषाच्या दृष्टीनें जसे ते सर्व असत् त्याप्रमाणें संबंधाभावीं ज्ञानाच्या दृष्टीनें ग्रामही अरण्य होय. ज्याचें मन अंतर्मुख आहे तो निजलेला, जागा अथवा जात-येत असला तरी मोठमोठ्या नगरांसही अरण्याप्रमाणें पहातो. नित्य अंतर्मुख स्थितीनें रहाणाऱ्या पुरुषाला, प्राण्यांनीं भरलेल्या या जगाचा कांहीं उपयोग नसल्यामुळें, सर्व आकाशतुल्य भासतें. मन शीतळ झालें कीं सर्व जग शीतळ. पण तेंच तृष्णेने तप्त झालें कीं सर्व जगास वणवा लागल्यासारखा होतो. कारण प्राण्यांच्या जे आत असतें तेंच बाहेर दिसतें. आकाश, पृथ्वी, वायु, अंतरिक्ष, पर्वत, नद्या, दिशा, इत्यादि सर्व अंतःकरणतत्त्वाचे जणुं काय फार दूर असलेले भागच आहेत. वडाच्या बीजांतील वृक्षाप्रमाणें अथवा सूर्योदयानंतर फुललेल्या कमळांतून पसरणाऱ्या वासाप्रमाणें जें आंत असतें तेंच बाहेर अनुभवास येतें. ( हें अध्यारोप दृष्टीनें झालें. पण अपवाददृष्टीनें पाहिल्यास ) आंत किंवा बाहेर एका चैतन्यावाचून दुसरें कांहीं नाहीं. तर मग जगाचा आकार भासतो कसा? म्हणून म्हणशील तर सांगतों–प्राग्वासनाबलात् प्राणी जशी कल्पना करतो तशाच वेषानें चित् तत्त्व उद्भवतें. आत्मतत्त्वरूप जी आंतर वस्तु तीच बाह्यरूप होऊन जगत्तेनें भासते. उपाधीप्रमाणें ती संकोच व विकास पावते. जगत्त्वाप्रमाणें अहंतारूपानेंही आत्माच भासतो, हें खरें; पण वस्तुतः तद्रूप होत नाहीं. तर तो विभु ( त्या दोघांनाही व्यापून सन्मात्ररूपानें ) असतो. बाह्य व आभ्यंतर असें दोन्ही प्रकारचें जग आत्म्याहून भिन्न केलें म्हणजे असत् होतें. पण त्याला विचारानें पृथक् करी तों त्याचा बाह्य व आंतर भेद अबाधित असतो व त्याच्या ठायीं अहं–मम–अध्यास झाल्यामुळें त्यांच्या भंगाचें पुष्कळ भय वाटतें. सर्व वस्तुजात तापत्रयमय आहे, असें भासतें. यास्तव जो आंत आत्मरति असून बाहेर कर्मेंद्रियांच्या योगानें क्रिया

करतो व हर्षशोकांना वश होत नाहीं तो समाहित होय. जो सर्वगत आत्म्यास पहात शांतचित्त रहातो व शोक अथवा चिंता करीत नाहीं त्याला समाहित म्हणावें. या उत्पत्ति–विनाशशील जगस्थितीस जो हसत असतो तोच ज्ञानी खरा. अहं, जगत्, द्रष्टा, दृश्य इत्यादि कांहीं नाहीं. तर एक अनिर्वचनीय सत्ता–आनंदस्वरूप चित् आहे, असें जो जाणतो त्याला साधु म्हणावें. अशा सत्पुरुषाचीं लक्षणें पुनः सांगतों, ऐक. कारण आदरानें केलेल्या पुनरुक्तीवर पुनरुक्त दोष येत नाहीं. तो महात्मा आकाशाप्रमाणे स्वच्छ, शास्त्र व शिष्टाचार याच्या विरुद्ध आचरण न करणारा, हर्ष व क्रोध या विकारप्रसंगींही काष्ठ अथवा पाषाण याप्रमाणें शांत, आपल्याप्रमाणें सर्व भूतास पहाणारा व परद्रव्यास स्वभावतःच, भीतीनें नव्हे, मातीच्या ढेकळाप्रमाणें पहाणारा असतो. अज्ञ लहान–मोठ्या ऐश्वर्यास असद्रूपानें कधींच पहात नाहीं व त्याच्या सद्रूप अधिष्ठानाचें त्यास भानही नसतें. पण ज्ञानी हिरण्यगर्भाच्या ऐश्वर्यालाही कस्पटाप्रमाणें मानून सर्वाधिष्ठान सद्रूपास सतत पहातो. यास्तव अशा आशयानें संपन्न असलेला व महासत्त्व पदास पोंचलेला महात्मा उभा राहो, येवो, जावो, निजो, मरो कीं आणखीं काहीं करीत असो, तो दरिद्री होवो, महा ऐश्वर्यवान् होवो, त्याचीं सर्व इष्ट माणसें मरोत, तो भरलेल्या घरात असो, की शून्य वनात राहो, कामवशात् वेड्याप्रमाणें नाचो कीं सर्वसंगपरित्याग करून पर्वतावर जाऊन राहो, चंदन, कर्पूर, अगुरु इत्यादिकांच्या कल्काच्या उट्या अंगास लावो, कीं प्रदीप्त अग्नींत पडो, पुष्कळ पाप करो, कीं विपुल पुण्यसंपादन करो, आज मरो, कीं अनेक कल्प जिवंत राहो. कांहीं झालें तरी तो सत्पुरुष कांहीं करीत नाहीं. चिखलांतील कमळाप्रमाणें त्याला कांहीं लेप लागत नाहीं. अहंकारवान् अज्ञ शास्त्रविरुद्ध आचरण केल्यामुळें दूषित झालेल्या वासनारूप व शरीरेंद्रियभोग्य विषयांच्या योगानें कुत्सित होतात. पण ज्ञानी समस्त वस्तु मिथ्या आहेत, असें समजत असल्यामुळें त्याच्या चित्ताचा कळक नाहींसा होतो. अहं असा अध्यास करणें हेंच संसारदुःखाचें कारण आहे. अहंत्वामुळेंच वासनालक्षण अनर्थ उत्पन्न होऊन ते पुरुषास अनेक जन्म देतात. रज्जूच्या ठिकाणचा सर्पभ्रम शांत झाला म्हणजे सर्प नाहीं अशी मनाची खात्री होऊन जसें सुख होतें व भय जातें त्याप्रमाणें अहंभाव गेला म्हणजे

आत समता बाणते ( दुःखवैषम्य जातें ). ज्ञानी जें करतो, खातो, देतो व हवन करतो तें त्याचें नव्हे. यास्तव पाहिजे तर तो तें करो किंवा सोडून देवो. कर्म किंवा अकर्म याचा त्याला कांहीं उपयोग नाहीं. स्वरूप-स्थिति कळल्यामुळें तो सदा स्वरूपामध्येंच स्थित असतो. पाषाणाला जशा मंजिऱ्या येत नाहींत त्याप्रमाणें त्याच्यापासून इच्छा उद्भवत नाहींत व जरी कदाचित् उद्भवल्या तरी त्या सर्व, जलतरंगन्यायानें, आत्माच होत. हें सर्व तो व तोच हें सर्व आहे. जग व तो महात्मा यामध्यें अणुरेणू-इतकाही भेद नाहीं. सर्व कार्य-कारण उपाधी साक्षिचिन्मात्र असल्यामुळें तो तत्त्ववेत्ता जगदधिष्ठान सन्मात्रच होय. तो परम पूर्ण व सर्वदोषशून्य परमात्मा पुरुषच आहे ५६.

**सर्ग ५७**—जिला आपला स्वभाव कळलेला नाहीं अशी चित् दृश्यरूप धरते. सर्व चित्च आहे, दुसरें कांहीं नाहीं.

**श्रीवसिष्ठ**—रघुनंदना, आत्मरूप मिऱ्यातील, चैतन्यबळानें, तिखट-पणाचें ज्ञान होणें हेंच अहंतादि, घट-पटादि व देशकालादिरूप जग आहे. ( चैतन्याच्या अभेदसिद्धिमुळें प्राप्त होणारें हें फळ आहे. ) आत्मलवणाच्या खारटपणाचें ज्ञान, आत्मरूप उसातील माधुर्यज्ञान, आत्मरूप पाषाणातील काठिन्यज्ञान व आत्मपर्वताचें जाड्यज्ञान हेंच जग होय सारांश आत्म्यामध्यें विषयविषयीभावानें स्फुरण होणें हेंच जगत्त्व होय. आत्मसत्तेचें सत्त्व, अंत-रात्मप्रकाशाचा स्वतः अवभास ( ज्ञान ), आत्मचंद्राचें चिद्रूप चिद्रसायन, इत्यादिकाचा स्वतःच चित्प्रकाशामुळें अनुभव येणें हाच अहंकारादिकाचा उदय होय. परमात्मगुळामध्यें जें गोडपण असते त्याचा स्वात्म्यामध्येंच अहंकारा-दिकाच्या योगाने अनुभव येतो. परमात्ममणीचें जें चित्त्वामुळें आपोआप अंतःस्फुरण तेच आपल्याला अहं असे जाणते. पण राघवा, या सर्गात तें जाणतें, स्वाद घेते, इत्यादि जो कर्म कर्तृ-निर्देश केला आहे तो मायिक जगदाकारानुभवाला स्वप्रकाश-आत्मानुभवमात्रत्व आहे, हें दाखविण्याकरितां केला आहे. खरोखरच त्यांचा भेद आहे, हें सांगण्याकरिता नव्हे. कारण वस्तुतः वेद्याचा असंभव असल्यामुळें ते आंत कांहीं जाणत नाहीं; स्वाद्याचा असंभव असल्यामुळें स्वाद घेत नाहीं, चेत्याचा असंभव अस-ल्यामुळें कशाला चेतित करीत नाहीं व लभ्य वस्तूचा असंभव असल्या-मुळें तें कशाचा लाभ घेत नाही. तर ज्याच्यामध्यें मिथ्या जगदाकार

भासतो असा सदेकरूप अनंत व पूर्णाकृति आत्मा आत्मस्वरूपातच स्थित असतो.

रामभद्रा, या वचनपद्धतीनें मी तुला अहंतादि व जगत्तादि भेद नाहीं, हे दाखविलें. चित्त नाहीं, चेता नाहीं व जगत्तादि भ्रम नाहीं. तर शांत अधिष्ठान चिन्मात्रच आहे. ज्याप्रमाणें पाण्यामध्यें पाणीच आवर्तादि रूपास प्राप्त होतें त्याप्रमाणें मायावी ज्ञाता (सर्वज्ञ) मायेनें आवृत झालेल्या ज्ञप्तिरूप आत्म्यामध्यें अहंतादि व जगत्तादि भावास प्राप्त होतो. ज्याप्रमाणें जलामध्यें द्रवत्व व वायूमध्यें स्पंद असतो त्याप्रमाणें परमार्थतः ज्ञप्तिमात्ररूप आत्म्यांत अहंता, देश, काल इत्यादि स्वाभाविकपणेंच असतें. आता तूं कदाचित् विचारशील कीं, जीव व जगत् याच्या रूपामध्यें जर ज्ञप्ति अनन्य आहे तर जीव व ईश्वर या भावांमध्यें ज्ञप्तीचा कोणता विशेष आहे? तर सांगतों. ईश्वर आवरण व परिच्छेद यांनीं रहित असलेल्या आपल्या ज्ञानाभिवृद्धीनें ईश्वरभावातील निरतिशय आनंदरूप स्वरूपज्ञान नित्य जाणतो. 'पण मी' तो अशा अहंकार-स्थूल-देहरूप जीवभावास प्राप्त झालेला चेतनभूत असाही तो जीवनास कारण होणाऱ्या प्राण, इंद्रियें व विषयसंबंधरूप अध्यासाच्या योगानें आत्मा जीवादिरूपच आहे, असें जाणतो. तत्त्वतः त्याला जाणत नाहीं. हा त्या दोघांमध्यें विशेष आहे. एवढ्या साठींच जीवाला जशी जशी भ्रांति होते तसा तसा ईश्वर विवर्त पावतो. सच्छास्त्र व गुरूपदेश, याच्या योगानें साधकाला जेव्हां भोग्य व भोक्ता याचें सार कळतें तेव्हां दोघांचेंही अधिष्ठान चिद्रूप असल्यामुळें जीवेश्वरांमध्यें अत्यंत भेद रहात नाहीं. जीव व ईश्वर याच्यामध्यें भेद पाडणारें अज्ञान नाहींसें झालें म्हणजे प्राज्ञ व तुरीय यांच्यामधील भेदही निवृत्त होत असल्याकारणानें अखंड पूर्णानंदैकरस चिन्मात्र साम्राज्य सिद्ध होतें.

सारांश, राजपुत्रा, सर्व जगत् सर्वतः पूर्णप्रकाशरूप, आनंदैकरस, विषय व लक्षण यांनीं रहित व शांत ब्रह्मरूप आहे. पण सर्व प्रशांत आहे, असें म्हणणें सुद्धां वाच्यार्थवृत्त्या साक्षात्प्रयोजनशून्य असल्यामुळें व्यर्थ आहे. लक्ष्यार्थदृष्ट्या मात्र त्यावरून अखंड बोध होत असतो १७.

**सर्ग ५८**—*किरातराज सुरघूचें वैराग्य, सर्वत्यागादि उपायानें मांडव्यानें केलेला उपदेश.*

श्रीवासिष्ठ—याविषयीं असा एक पुरातन वृत्तांत सांगतात. हा किरातेश सुरघूचा वृत्तांत मोठा आश्चर्यकारक आहे. उत्तर दिशेंत कैलास पर्वत या नांवाचें एक हिमालयाचें शृंग असून तें विष्णूच्या क्षीरसागराप्रमाणें, इंद्राच्या स्वर्गाप्रमाणें व ब्रह्मदेवाच्या नाभिकमलाप्रमाणें शंकराचें गृह आहे. तो कैलास पर्वत, चंचल लहरींनीं शोभणाऱ्या सागराप्रमाणें, हालणारे रुद्राक्षवृक्ष व अप्सरा यांच्या योगानें शोभत होता. मत्तगणांच्या स्त्रियांकडून चरणांनीं तुडविले गेलेले सुखी विलासी तेथे अशोकवृक्षाप्रमाणें विराजमान होत होते. त्या पर्वताच्या ज्या दिशेंत शंकर संचार करीत असे त्या दिशेंतील चंद्रकांत-मण्यांच्या द्रवाचे प्रवाह सुरू होत असत. तो पर्वत लता, वृक्ष, गुल्म, वापी, ऱ्हद, नद्या, नद, हरिणें, इतर पशुगण व दुसरीं नानाप्रकारचीं भूतें याच्या योगानें ब्रह्मांडाप्रमाणेंच सदा भरलेला होता. त्याच्या पायथ्याशीं, वटवृक्षाच्या मुळाशीं रहाणाऱ्या मुंग्यांप्रमाणें, हेमजटा नांवाचे किरात असत. आसपासच्या अरण्यातील फलपुष्पांवर ते आपला निर्वाह करीत होते. त्यांचा एक उदारात्मा, पराक्रमी व प्रजारक्षणामध्यें दक्ष असा राजा होता. त्याचें नाव सुरघु. तो बलाढ्य असुरनाशक वीर पराक्रमामध्यें सूर्याप्रमाणें होता. तो मूर्तिमान् वायुच आहे, असा त्याच्या वेगावरून भ्रम होत असे. राज्यवैभव व धन यांच्या योगानें त्यानें कुबेरास जिंकलें; बोधाच्या योगानें देवगुरूस पराभूत केलें व काव्यांच्या योगानें असुराचार्यास तुच्छ करून सोडलें होतें. तो प्रथम काहीं दिवस निग्रहानुग्रह-क्रमानें प्राप्त कार्यें अखिन्न मनानें करीत असे. पण पुढें निग्रहामुळें प्राण्यांस होणारें दुःख व अनुग्रहामुळें होणारें सुख पाहून त्याला मोठी चिंता लागली. अगोदरच पीडलेल्या या लोकांना घाण्यांत घातलेल्या तिळांप्रमाणें मी आणखीं कसें पीडूं ? मजप्रमाणेंच याही सर्व भूतांना दुःख होत असेल. यास्तव अपराधी लोकाना मी धन वाटतों. कारण धनाच्या योगानें सर्व आनंदी होत असतात. धन मिळालें म्हणजे सर्वच माझ्या सारखे भाग्यवान् होतील व मग निग्रह करण्याचा प्रसंगच येणार नाहीं. अथवा निग्रहावाचून प्रजा आपापल्या मर्यादेंत रहाणार नाहीं. यास्तव प्राप्त निग्रह केलाच पाहिजे. असें म्हणून तो मोठ्या खेदानें राज्यकार्यें करूं लागला. एकाद्याला दंड करण्याचा प्रसंग आला असतां 'अरेरे, या बिचाऱ्याला आतां मला दंड करावा लागणार! काय करूं!' असें म्हणून

तो मनात व्याकुळ होत असे व एकाद्यावर अनुग्रह करण्याचा प्रसंग आला म्हणजे तो फार संतुष्ट होई. पण त्यामुळें त्याचें चित्त अस्थिर झालें. त्या राजाला विश्रांति मुळींच मिळेनाशी झाली. पुढें एकदां त्याच्या येथें माडव्यमुनि आला. तेव्हा यथाविधि पूजा करून राजा त्या संदेह-छेदक ज्ञानी मुनीला असें म्हणाला.—

मुनिराज, वसंताच्या आगमनानें भूपृष्ठ जसें आनंदित होतें त्याप्रमाणें आपल्या आगमनानें मी अतिशय सुखी झालों आहें. आज मी धन्य लोकाच्या अग्रभागीं धर्मत. स्थित आहें. विकास पावणाऱ्या कमलांकडे जसा सूर्य पहातो त्याप्रमाणें आपण मजकडे कृपादृष्टीनें अवलोकन करीत आहां हा काहीं सामान्य अनुग्रह नव्हे. भगवन्, आपण सर्वधर्मज्ञ असून फार दिवसापासून ब्रह्मपदीं विश्रांति घेत आहा. यास्तव सूर्य जसा अंधकाराचा नाश करतो त्याप्रमाणें माझ्या या संशयाचा उच्छेद करा. महात्म्याच्या समागमानें कोणाची पीडा नाहींशी होत नाहीं? संदेह ही मोठी पीडा आहे. माझ्या निग्रहानुग्रहामुळें होणारी प्रजेविषयींची चिंता मला आतून खात आहे. हे प्रभो, माझ्या चित्तात समता उत्पन्न होईल असें कृपा करून करा.

**मांडव्य**—राजन्, आपल्याच प्रयत्नानें व आपल्याच उपायानें ही मनाची कोमलता घालविता येते. स्वविचारानेंच मनोज्वर सत्वर शांत होतो. तू आपल्याच मनानें आपल्यापाशींच पुत्र-मित्रादिक, स्वशरीरगत इंद्रियें, व दुसरींही सर्व तत्त्वतः कोण आहेत व युक्तितः कशा प्रकारचीं आहेत, त्याचा विचार कर. मी कोण? हें कसें किंवा काय आहे? मरण व जन्म कसे होतात? याचा तू आपल्याशींच विचार कर, म्हणजे पूर्ण महत्त्वास प्राप्त होशील. त्यानंतर विचारानें ज्याला स्वभाव कळला आहे अशा पर्वतासारख्या तुला हर्ष-क्रोध-दशा उचलू शकणार नाहींत. मनः-स्वरूप सोडून तूं शांत होशील. (म्हणजे मन असतांनाच तें कलंकशून्य होऊन जीवन्मुक्त व्यवहारास योग्य होईल.) राजन्, भाग्यवशात् ही सर्वोत्तम दशा जर तुला प्राप्त झाली तर विष्णु-इत्यादि महाश्रीमान्ही तुला अनुकंप्य वाटूं लागतील. विवेकदीपानें तूं त्रिभुवनांतील सार शोधून काढलेंस म्हणजे तुला सर्वोत्तम महत्त्व प्राप्त होईल. नंतर हे साधो, तुझें चित्त संसारवृत्तीमध्यें निमग्न होणार नाहीं. कामरूपी कृपणतेनें दूषित

झालेलें चित्त क्षुद्र कार्यामध्येंही निमग्न होतें. चित्त वासना व सर्व दृश्याचा आश्रय करणारी दीनता यांच्या योगानें, चिखलांतील किड्याप्रमाणें, मोहांत बुडतें. जसा जसा सर्वस्वत्याग करूं लागावें तसा तसा स्वयंज्योति परमात्मा अवशिष्ट रहातो. शुद्ध सोनें हातीं लागेपर्यंत खाणींतून काढलेल्या सोन्याच्या धातूचें जसे वारवार शोधन करतात त्याप्रमाणें आत्मा मिळेपर्यंत सर्व वस्तूंचें परीक्षण करावें लागतें. सर्वदा सर्व ठिकाणचे सर्व दृश्य सर्वथा सोडून दिलें म्हणजे पूर्णात्मा आपला आपल्यालाच मिळतो. जोंपर्यंत सर्व अनात्म-वस्तूचा त्याग केला नाहीं तोंपर्यंत आत्मा हातीं लागत नाहीं. सर्व अवस्थाचा त्याग केल्यावर बाकी राहणाराच आत्मा होय, असें विद्वान् सागतात. व्यवहारात सुद्धा जर एकादि सामान्य वस्तु, तिच्या विरोधी वस्तूंचा त्याग केल्यावाचून मिळत नाहीं तर स्वात्मलाभाविषयीं काय सागावें ? राजन्, पुरुष ज्याच्या लाभाकरिता सर्व व्यापारें इतर सर्व कार्याचा त्याग करून स्वतः प्रयत्न करतो तेंच त्याला प्राप्त होतें. दुसरें काहीं लाभत नाहीं. यास्तव आपल्या आत्म्याच्या दर्शनाकरिता सर्व दृश्याचा त्याग करावा आणि सर्वाचा त्याग केल्यावर त्याग करिता न येण्यासारखें असें जें काही रहातें तेंच परम पद होय, असें जाणावें. बा सुरघो, तूही याच उपायानें आनंदात्म्यास प्राप्त हो ५८.

**सर्ग** ५९.—बाह्य व आभ्यंतर दशाचा त्याग करणाऱ्या सुरघूला विचारानें आत्मलाभ झाला.

**श्रीवसिष्ठ**—रघुविरा, माडव्य महर्षि सुरघूला असा उपदेश करून आपल्या आश्रमास गेला. त्यानंतर राजा एका शुद्ध एकातस्थानीं बसून मी कोण ? असा आपल्याच बुद्धीनें आपल्यापाशीं असा विचार करूं लागला.—

मी मेरु नव्हें, माझा मेरु नव्हे. मी जग नव्हें व माझें जग नव्हे. मी पर्वत नव्हें व ते माझे नव्हेत. मीं पृथ्वी नव्हें व माझी पृथ्वी नव्हे. हें किरातमंडल माझे नव्हे व मी स्वतः किरातमडल नव्हे. तर लोकांच्या समतीनें पट्टाभिषेकादिकांच्या योगाने उद्भवलेल्या ‘ मी राजा ’ या कल्पनेनेच हा देश माझा झाला आहे. यास्तव मी ही कल्पना सोडतों. मी हा देश नव्हें व तो माझा नव्हे. आतां राहिली ही नगरी. पण तिच्याविषयींही हाच निश्चय आहे. पताका, भृत्यवर्ग, चतुरगसेना, वाहनें, आबालवृद्ध पौर

इत्यादिकानीं भरलेली ही नगरी माझी नव्हे. व्यर्थ संकेतामुळें या सर्वांचा माझ्याशीं संबंध झाला होता. यास्तव संकेत सोडल्यानें तो जाईल. स्त्री व इतर भोगसमूह माझा नव्हे व मी त्याचा नव्हे, मी राज्य नव्हे व तें माझें नव्हे. हस्तपादादियुक्त देहालाच 'मी' असें मी समजतों. पण तो तर क्षणभंगुर व मांसादि जड वस्तूंनीं परिपूर्ण आहे. यास्तव नित्य चेतन अशा माझा त्याच्याशीं सत्य संबंध कसा होणार ? जड कर्मेंद्रियें व त्याचप्रमाणें या शरीरांत जें जें म्हणून जड आहे त्या सर्वांशीं माझा कांहीं संबंध नाहीं. बाह्य भोग व परतंत्र ज्ञानेंद्रियेंही मी नव्हे. संसारदोषाचें मूळ मन मी नव्हें. कारण तें जड आहे. बुद्धि, अहंकार इत्यादिही अंतःकरणाचेच भेद असल्यामुळे त्याचा माझा संबंध नाहीं. याप्रमाणें बाह्य शरीरापासून मन व ज्ञानेंद्रियें येथपर्यंत सर्व स्थूल-सूक्ष्म भूतकोश चंचलाकार आहे. यास्तव त्यातील एकही मी नव्हें. आता याच्या पलीकडे काय राहिलें आहे तें पहातो. शेष चेतन जीव असून तो ( प्रमाता ) प्रमेयासह भासतो. त्यामुळेंच मी याचा अनुभव घेतों. पण अशा रीतीनें त्रिपुटीच्या साक्षीकडून जाणला जाणारा प्रमाता जीव आत्म्याचें तात्त्विक रूप नव्हे, या युक्तीनें मी साक्षिसंवेद्य त्रिपुटीचाही त्याग करतों. मग राहिलें काय ? शुद्ध साक्षि चित् राहिली. तोच मी आत्मा आहें. झाला, हाच माझा निश्चय दृढ झाला. वा ! काय चमत्कार आहे ? अनादि कालापासून प्रयत्न करीत असतांनाही मी आज परमपुरुषार्थ-फलवान् झालों आहें. मोत्याच्या माळेमध्यें ज्याप्रमाणें तंतु असतो त्याप्रमाणें हा मी भगवान् आत्मा ब्रह्मदेव, इंद्र, यम, वायु व सर्व भूतसमूह यांमध्यें स्थित आहें. ही अमल चिच्छक्ति विषयरोगरहित आहे. तिनें सर्व दिकुंजांस भरून सोडलें आहे. तिनें विशाल आकार धारण केला आहे. ती सर्व मनोवृत्तींमध्यें व्याप्त आहे. वस्तुतः ती सूक्ष्म व भावाभावशून्य आहे. या लोकापासून ब्रह्मलोकापर्यंत जितक्या वस्तू आहेत, त्या सर्वांमध्यें ती आहे. ती सर्व शक्तींचें जणु काय संपुटच असून निरतिशय आनंदानें पूर्ण आहे. संसाररूपी मोत्यांतील ती सूत्ररूप आहे. ती सर्व आकार व विकार यांनीं संपन्न, सर्वाकारविवर्जित, व सर्व भूतसमूहमय आहे. ही महाशक्ति चवदा भुवनांतील प्राण्यांना धारण करते. जगत्संबंधिनी वेदनात्मक कलनाही या चिच्छक्तिमयच आहे. सुख-दुःखदशा-गती मिथ्या अवभासमात्र आहेत. हा नाना

आकारमय आभास स्वयं आत्माच आहे व आत्माच परा चित् आहे. तो हा माझा आत्मा व्यापी ( जगामध्यें अनुगत ) आहे. माझ्या बुद्धीचा साक्षिणी अशी ही चिच्छक्तिच तो आत्मा होय. ती चित्च द्रष्टा, दृश्य इत्यादि भेदानें युक्त होत्साती 'मी राजा' असा भ्रम, या शरीरांत राहून, करीत होती. या चित्च्या प्रसादानें मन देहरथामध्यें राहून संसारजाळ-लीलेमध्यें जातें, व्यवहार करतें व नाचतें. पण मन, शरीर इत्यादि हें सर्व वस्तुतः नाहीं. यास्तव यांतील काहीं नष्ट झालें तरी माझें काहीं नष्ट होत नाहीं. हाय हाय, या चित्तनटांनीं हें जगज्जालमय नृत्य चालविलें आहे व तें या एकाच बुद्धिसंज्ञक दीपज्योतीच्या योगानें दिसतें. हं! मी देहसंबंधी निग्रहानुग्रहचिंता व्यर्थ करीत होतों. कारण देह म्हणजे वस्तुतः काहीं नाहीं. अहाहा! मी आता जागा झालों आहें. माझें दुर्दर्शन गेलें, सर्व द्रष्टव्य मीं पाहिले व ज्ञातव्य जाणलें. हें जें सर्व जगद्गत दृश्य दिसत आहे त्यात चिदंशावाचून दुसरें काहीं शाश्वत नाहीं. मग सर्व ब्रह्मच जर आहे तर निग्रहानुग्रह, हर्ष-शोक, सुख-दुःख इत्यादि कसें व कोठें रहाणार? मी आजवर मूर्ख होतों म्हणून त्याच्या योगाने व्याकुळ झालों. आता हा सुंदर आत्मा मला दिसला आहे. अथवा मीच स्वतः आत्मा झालों आहें. अथवा मी आत्मा आहें, या सत्य स्थितीचें मला आज स्मरण झालें आहे. त्यामुळें मला किती सुख होत आहे म्हणून सांगू! अथवा त्या अनिर्वाच्य व स्वसंवेद्य सुखाविषयीं मी काय सांगू शकणार! हे भगवन्, आत्मन्, तुला नमस्कार असो; मी आता यापुढें तुला सोडून एक क्षण-भरही रहाणार नाहीं १९.

**सर्ग ६०**—मरणपर्यंत सुरघूचा असंग आचार व त्या जीवन्मुक्ताची देहपातानंतर विदेहमुक्ति.

**श्रीवसिष्ठ**—रामराया, याप्रमाणें त्या किरातराजाला विवेक व निश्चय याच्या योगानें अनुत्तम पद मिळालें. विश्वामित्रानें केवल स्वप्रयत्नानेंच जसें ब्राह्मण्य संपादन केलें त्याप्रमाणेंच सुरघूनें केवळ स्वपौरुषानें तें पद मिळविलें. वारंवार उदय पावून दिवस करणाऱ्या सूर्याप्रमाणें अनर्थाकार कार्यें फिरफिरून करीत असतांनाही तो खिन्न झाला नाहीं. त्या दिवसापासून तो सर्वदा संतापशून्य होऊन राहिला. आपलीं सम–विषम कार्यें करीत असतांनाही त्यानें आपल्या चित्तास विकारयुक्त

होऊ दिलें नाहीं. हर्ष व क्रोध यास सोडून तो प्रत्यहीं आपलें कार्य करीत असे. ज्याचें शरीर उदार व गंभीर आहे असा तो सागरतुल्य दिसूं लागला. त्याची चित्तवृत्ति निजल्याप्रमाणें स्वस्थ झाल्यामुळें तो निष्कंप व प्रकाशमान शिखायुक्त दीपाप्रमाणें दिसत असे. निर्दय नाहीं, दयाळुही नाहीं, द्वंद्वयुक्त नाहीं, मत्सरीही नाहीं, बुद्धिमान नाहीं व अबुद्धिमान् नाहीं, सकाम नाहीं व निष्कामही नाहीं, असा तो झाला. स्थिर व सम चित्तवृत्तीमुळें तो फारच शांत दिसत होता. जगत् हा सर्व चित्-तत्त्वाचा खेळ आहे, असें विचारपूर्वक जाणल्यामुळें सुखदुःखशून्य झालेली त्याची मति परिपूर्ण व तृप्त झाली. तो सर्व व्यवहार करीत असतांनाही समाधिस्थ असल्याप्रमाणें होता.

सारांश हे रघुराजा, अशा निःसंगवृत्तीनें राज्य करीत त्यानें अवशिष्ट दीर्घ आयुष्य घालविलें. प्रारब्ध क्षीण झालें असतां त्याचा देहसंज्ञक आकार आपोआप पडला. त्यामुळें घटभंगानंतर महाकाशांत मिळून जाणाऱ्या घटाकाशाप्रमाणें त्याचा आत्मा परात्म्याशीं ऐक्य पावला. औपाधिक भेद जाऊन स्वाभाविक अभेद सिद्ध झाला. नद्यांचें जल सागरांत जाऊन तद्रूप झाल्यावर जसें भिन्न करून दाखवितां येत नाहीं त्याप्रमाणें कारणेश्वरांत जाऊन मिळालेल्या त्याचा पृथक् अवभास होईनासा झाला. तो महात्मा स्वयं परब्रह्मरूप झाला १०.

**सर्ग ६१**—सुरघु व परिघाचा झालेला संवाद.

**श्रीवसिष्ठ**—याप्रमाणें हे राघवा, हर्षशोकादिकांना निमित्त होणाऱ्या पापाचा तत्त्वबोधानें समूळ उच्छेद करून तूंही अद्वय पदास प्राप्त हो व शोकशून्य होऊन रहा. बालकाप्रमाणें घोर अज्ञानतमांत बुडालेलें मन या दृष्टीचा आश्रय करून दीप मिळाल्याप्रमाणेंच जणु काय सतत होत नाहीं. खोल विहिरींत पडत असतांना एकादी दृढ वेल हातीं लागल्याप्रमाणें विवेकाच्या योगानें मन सुखी होतें. यास्तव तू आतां याच दृष्टीचें पुनः पुनः परिशीलन करून दुसऱ्यास तिचाच उपदेश करीत नित्य एक-समाधानयुक्त हो. म्हणजे तू या सर्व भूतलाला भूषित करशील.

**श्रीराम**—पण गुरुवर्य, वाऱ्यानें हालणाऱ्या मोराच्या अंगावरील पिसाप्रमाणें चंचळ मन एक-समाधानयुक्त कसें होईल ?

**श्रीवसिष्ठ**—रामचंद्रा, ज्ञानी झालेला सुरघु व पर्णाद राजा यांचा हा अद्भुत वृत्तांत तूं ऐक. एकसमाधानामध्येंच ज्यानीं आत्म्याची योजना केली आहे असा त्या दोघांचा परस्पर झालेला संवाद मी तुला सांगतों. पारसीकाचा परिघ किंवा पर्णाद या नावाचा राजा होता. नंदनवनस्थ माधव व मदन याच्याप्रमाणेंच सुरघु व परिघ याची मैत्री होती. प्रजेच्या पापामुळें परिघाच्या राज्यात अवर्षे झालें त्यामुळें दुष्काळ पडून भूक व तहान यानीं व्याकूळ झालेली प्रजा नष्ट झाली. वणव्यात सापडलेल्या प्राण्याप्रमाणें त्याची अवस्था झाली. आपल्या प्रजाजनाचें तें दुःख पाहून दयाळु परिघाचें चित्त आर्द्र व व्याकुळ झालें. वाटसरु आग लागलेल्या गावाला किंवा घराला सोडून जसा जातो त्याप्रमाणें तो सर्व राज्य सोडून निघाला. प्रजामहारास प्रतीकार करण्याचें सामर्थ्य नसल्यामुळें मुनी-प्रमाणे तप करण्याच्या उद्देशानें तो अरण्यात गेला. तो विरक्त पुरुष, लोका-तराप्रमाणेंच, पौरजनास कळणार नाहीं, अशा एकान्त स्थानीं जाऊन राहिला. इंद्रियाचा निग्रह करून तो शांतमति पुरुष गुहामंदिरात तप करूं लागला. वाळलेलीं वृक्षाचीं पानें खाऊन तो शरीरयात्रा करीत असे. अग्नीप्रमाणे दीर्घकाळ पर्णभक्षण केल्यामुळेंच त्याला पुढें पर्णाद असें नाव प्राप्त झालें होते. तो मुनींच्या आश्रमात प्रख्यात झाला

याप्रमाणे पुष्कळ दिवस तप केल्यामुळें चित्तशुद्ध होऊन आत्मविचा-राच्या योगानें तो ज्ञानी झाला. तो शीतोष्णादि द्वंद्वरहित, निराश, शांत-चित्त, आसक्तिरहित व दयाशून्य जीवन्मुक्त झाला, तो या [illegible] मठीमध्यें सिद्ध व साध्य यासह यथेच्छ संचार करूं लागला. एकदा तो सुरघूच्या घरीं गेला. तेव्हा त्या प्राक्तन मित्रानीं परस्पराचा सत्कार केला. मूर्खता-रूपी गर्भातून बाहेर पडलेले ते दोघेही तृप्त व ज्ञानी होते ' अहाहा आज माझें पुण्य फळास आलें ' असें परस्पराच्या दर्शनानें संतुष्ट झालेल्या त्यांनीं एकमेकास म्हटलें; एकमेकांच्या शरीरास आलिंगन दिलें व ते दोघेही एका आसनावर बसले.

**परिघ**—तुझ्या दर्शनानें माझ्या चित्ताला मोठा आनंद झाला आहे. चंद्रबिंबामध्यें बुडी मारल्याप्रमाणें माझें मन शीतळ झाले आहे. शाखा तोडल्या असतां वृक्ष जसा जोरानें फोफावतो त्याप्रमाणे स्वाभाविक प्रेम वियोग झाला असतां, विस्तार पावतें. आपल्या मागच्या सर्व क्रीडा,

चेष्टा, विश्वासानें सांगितलेल्या गोष्टी इत्यादिकांचें स्मरण झाल्यामुळें मला फिरून फिरून हर्ष होत आहे. तुला जसें मांडव्याच्या प्रसादानें ज्ञान प्राप्त झालें आहे त्याप्रमाणें मला तपाच्या योगानें प्रसन्न केलेल्या परमेश्वराच्या अनुग्रहानें तें लाधलें आहे. आतां तूं दुःखरहित झाला आहेस ना ? तुझ्या चित्ताला विश्रांति मिळाली कीं नाहीं? आत्माराम झाल्याकारणानें तुझ्या चित्तामध्यें सुंदर प्रसाद उत्पन्न झाला कीं नाहीं? सम, सुप्रसन्न व गंभीर दृष्टीनेंच तूं सर्व उचित कार्यें करतोसना ! तुझी सर्व प्रजा आधि-व्याधिशून्य व ज्वररहित आहे कीं नाहीं ? पृथ्वी फलपूर्ण होऊन जनसमूहाचें मातेप्रमाणें पोषण करीत असते ना ? तुझें पावन यश दिशांमध्यें पसरतें कीं नाहीं ? आपल्या गुणसमूहानें तूं या सर्व भूमंडलास अशून्य करून सोडलें आहेस असें मी जाणतों. कारण लहानमोठ्या ग्रामाच्या सीमेवरील शेताचें रक्षण करावयास बसलेल्या कुमारिका मोठ्या हर्षानें तुझें आनंददायी यश गात असतात, असें मी ऐकलें आहे. धान्य, धन, वैभव, भृत्यवर्ग, स्त्री, पुत्र, नगर व स्वतः तुझें हें नवद्वारयुक्त शरीरसंज्ञक गृह कुशल आहे कीं नाहीं ? ही कायलता आधिव्याधिशून्य असल्यासच तिच्या द्वारा ऐहिक व पारलौकिक फल मिळत असतें. सकृद्दर्शनीं रमणीय वाटणाऱ्या व अत्यंत वैरी अशा या विषयसर्पांविषयीं तुझें मन विरक्त झालें असेलच. अरे अरे, आज किती दिवस आपण एकमेकास सोडून दूर राहिलों होतों बरें ? खरोखर फार दिवसांनीं आज आपली पुनः गाठ पडली आहे. मित्रा, जीवत प्राण्यास या जगात सयोगजन्य अनेक सुखदुःखदशा पहाव्या लागतात. त्यांतीलच आपली आज पुनः गांठ पडणें ही एक दशा आहे. नियतीचें कृत्य काहीं विचित्र आहे; यात संशय नाहीं.

सुरघु—भगवन्, या दैवीनियतीची गभीर व विस्मयास्पद गति कोण जाणणार ? आपणांस फार दूर नेऊन तिनें पुनः आज एकत्र केलें आहे. तुझ्या आगमनानें माझ्या मनाला संतोष झाला आहे. मी आज पावन झालों प्राकृत जनाचें दर्शन दुर्लभ नसल्यामुळें त्यापासून इतका आनद होत नाहीं. पण तुजसारख्या सत्पुरुषाचें दर्शन महापुण्यानेंच होणारें व त्यामुळें दुर्लभ असल्याकारणानें माझ्या चित्ताप्रमाणेंच शरीरही आनंदित होऊन रोमांचाच्या द्वारा तें त्याला व्यक्त करीत आहे. खरोखर मी आज

धन्य झालों. एकाद्या स्निग्ध मित्राचें दर्शनही जर अवर्णनीय सुख देत असतें तर तुझ्यासारख्या ब्रह्मभूत स्निग्ध महात्म्याचें दर्शन आनंदशिखरावर बसवील यात काय संशय आहे? साधुसंग परमपदप्राप्तीसारखा आहे. राजर्षे, तुझ्या आगमनानें सर्व संपत्ती माझ्या अग्रभागीं उभ्या आहेत. हे महानुभाव, तुझें मधुर वचन माझ्या सर्वांगावर जणुं काय रसायनाचाच वर्षाव करीत आहे. तुझें नुस्तें पाहणेंही अतिशय पुण्यरूप आहे ६१.

**सर्ग ६२**—विद्वानाचें समाधान.

**श्रीवसिष्ठ**—राघवा, याप्रमाणें बराच वेळ बोलून व एकत्र राहून परिघ स्नेहपूर्ण वाणीनें म्हणाला, "राजन्, या संसारात जें जें कर्म केलें जातें तें तें शांतचित्त पुरुषास सुख देतें. वास्तव विक्षेपदुःखरहित व सांसारिक सुखाहून उत्तम अशा समाधानसुखाचा तूं एकांतात बसून अनुभव घेतोस का?

**सुरघु**—भगवन्, सर्व संकल्परहित व परम शांत समाधि कशाला म्हणतात? कारण जो ज्ञानी असतो तो केव्हां तरी असमाहितचित्त असतो का? ज्याचें चित्त सदा प्रबुद्ध असतें ते आत्मनिष्ठ असल्याकारणानें जगत्क्रिया करीत असले तरी सदा समाधानाचाच अनुभव घेत असतात. चित्त जर शांत झालेलें नाहीं तर नुस्तें पद्मासन घालून बसल्यानें व ब्रह्मांजलि जोडल्यानें काय होणार? भगवन् तत्त्वाचा साक्षात्कार हा सर्व आशातृणाचा अग्नि आहे. समाधिशब्दानें त्याचाच निर्देश करीत असतात. हातपाय जोडून व तोंड आवळून धरून बसणें ही समाधीच नव्हे शांत, नित्य तृप्त व यथाभूत अर्थ दाखविणारी परा प्रज्ञाच समाधि होय. अक्षुब्ध, निरहंकार व द्वंद्वाच्या मागून न जाणारी मेरूसारखी अति स्थिर आकृतिच समाधिशब्दाचा अर्थ आहे, असें मी समजतो. परिपूर्ण व निश्चित मनोगतिच समाधि आहे. ज्या क्षणापासून मन बोधयुक्त होतें तेव्हापासून महात्म्याचें अछिन्न समाधानच सुरू होतें. ज्ञानी पुरुषाच्या मनाचें समाधान कधीं व्युच्छिन्न होतच नाहीं असें मी जाणतों. सूर्य सर्व दिवसभर जसा प्रकाशरहित होत नाहीं, त्याप्रमाणें ब्रह्माकार वृत्ति देह पात होऊन विदेह कैवल्य मिळेपर्यंत तत्त्वावलोकनास सोडीत नाहीं. नदीचा प्रवाह जसा एकसारखा जात असतो त्याप्रमाणें ज्ञानी पुरुषाच्या चित्तसमाधानाचा प्रवाह सतत चालतो. त्याचें

चित्त एक क्षणभरही विज्ञानदृष्टीस सोडून रहात नाहीं. काल आपल्या गतीस जसा कधीं विसरत नाहीं त्याप्रमाणें प्राज्ञाची बुद्धि स्वात्म्याला कधींही विसरत नाहीं. वायूला आपल्या गतीचें जसें कधीं विस्मरण पडत नाहीं त्याप्रमाणें प्राज्ञबुद्धीला चिन्मात्राचें विस्मरण पडत नाहीं. सत्ताशून्य पदार्थ जसा कोणाच्या कधीं अनुभवास येत नाहीं त्याप्रमाणें ज्ञान्याचा आत्मज्ञानशून्य काल केव्हांही अनुभवास येत नाहीं. या संसारात गुणी पुरुष गुणहीन असणें जसें अशक्य, त्याप्रमाणें आत्मज्ञ आत्मज्ञान-शून्य असणें अशक्य आहे. मी सदा संबुद्ध, सदा निर्मल, सदा शांत व सदा समाहित आहें. आत्मभिन्न वस्तुच नाहीं, असें जाणणाऱ्या माझ्या समाधीचा भेद कोण कसा करणार ? यास्तव मित्रा, मी कधीं एकांतात समाधि लावून बसत नाहीं व सदा आत्मतत्त्व पाहणाऱ्या माझें समाधान कधीं तुटत नाहीं. सर्वथा सर्व आत्माच असल्यामुळें असमाधि व समाधि या शब्दाचा अर्थच माझ्या ध्यानात येत नाहीं ६२.

**सर्ग ६३**—परिघानें स्तुति केली असतां सुरघु आपल्या सहज स्थितीचें वर्णन करतो.

**परिघ**—राजन्, तूं खरा आत्मज्ञ आहेस. तुला परम पद प्राप्त झालें आहे. तुझें अंतःकरण अतिशय शीतळ असून तूं पूर्ण चंद्राप्रमाणें शोभत आहेस. आनंदमकरंदानें भरलेला तूं परा लक्ष्मीनें आश्रय केल्यामुळें कमलाप्रमाणें शीतळ, स्निग्ध व मधुर झाला आहेस. तू निर्मल, अहंकार-शून्य, गंभीर, स्वस्थ, संतुष्ट व इष्टानिष्टांविषयीं वीतराग (विरक्त) होऊन शोभत आहेस. तू आपल्या विशाल बुद्धीनें सारासार निर्णय केला आहेस. हे सर्व अखंडित ब्रह्मरूप आहे, हें तू जाणतोस. तुझें शरीर आशाजन्य चांचल्यानें रहित आहे. अंतःस्थ अमृताच्या योगानें तृप्त होणाऱ्या क्षीरसागराप्रमाणें अनुत्तम आत्मतत्त्वाच्या योगानें हे सुंदरा, तूं तृप्त झाला आहेस.

**सुरघु**—मुने, दिसणारें हें सर्व अभावरूप असल्यामुळें त्यांत आम्हाला ग्राह्य कांहींच वाटत नाहीं. ग्राह्याच्या अभावीं त्याज्याचाही अभाव झाला आहे. कारण ग्राह्याच्या अपेक्षेनें त्याज्याची कल्पना होत असते. जें तुच्छ असतें तें त्याज्य व जें अतुच्छ असतें तें ग्राह्य, म्हणून म्हणावें तर सर्व भाव तुच्छ असल्यामुळें व कालतः तेच अतुच्छ असल्याकारणानें माझ्या

तुच्छ व अतुच्छ मनःस्थिती फार दिवसांपासून क्षीण झाल्या आहेत. देश कालवशात् लोक तुच्छाला अतुच्छ व अतुच्छाला तुच्छम्हणत असतात यास्तव शहाण्यानीं कोणत्याही पदार्थाची तुच्छ किंवा अतुच्छ बुद्धी निंदा-स्तुति करूं नये. लोकामध्यें आसक्तीमुळें, प्रेमामुळें, निंदा व स्तुति प्रवृत्त होतात. प्रेम इष्ट वस्तूचीच इच्छा करतें. पण शोभनबुद्धि पुरु अति उत्कृष्ट पदार्थाची वाञ्छा करतो. या त्रैलोक्यातील स्त्रिया, पर्वत, समुद्र वनें, भूतें व इतर सर्व असार आहे. त्यात वस्तुतः सार नाहीं. मास, हाडें काष्ठे, माती, दगड यानीं भरलेल्या या जगात मला इच्छा करण्या सारखे कांहीं आढळत नाहीं. कारण जेथें सर्वच शून्य ते इच्छा कशाची करावयाची ? दिन-लक्ष्मी गेली म्हणजे प्रकाश व ऊ याचा जसा आपोआप क्षय होतो त्याप्रमाणें वाञ्छाच निवृत्त झाली म्हणजे राग-द्वेषाचा क्षय होतो. असो; उगीच विस्तृत भाषण करण्यात काह अर्थ नाहीं. मन विरक्त व वैषम्यशून्य होऊन जर आत्म्यामध्येंच मुदित झालें तर तीच प्रतिष्ठा व विश्रांति होय. यास्तव याच एका उचित व सुखकर दृष्टीचे सदा सेवन करावें ६३.

**सर्ग ६४**—ज्याच्या योगानें पुरुष मनोदोषांनीं दूषित होत नाहीं व आत्म्याच दुःखांतून उद्धार करिता येतो ते उपाय.

**श्रीवसिष्ठ**—याप्रमाणें जगद्भ्रमाचा विचार करून व एकमेकाचा मोठ आदर करून संतुष्ट झालेले ते दोघे आपापल्या व्यापारात निमग्न झाले राघवा, तूंही याच युक्तीनें आत्मज्ञ हो. सुरघु व पर्णाद याचा संवाद ऐकून त्याप्रमाणें निश्चय केल्यानें आत्मबोध होणें शक्य आहे व हाच बोध सुप्रतिष्ठित झाला असता परम पदाची प्राप्ति अनायासें होते. विद्वानां बरोबर विचार केल्यानें बुद्धि तीक्ष्ण होते. हृदयाकाशांतील अहंकार मेघ नाहींसा होतो व चिदाकाश प्रसन्न होते. जो सत्य आत्मविचारांत निमग्न असतो, सदा अंतर्मुख व सुखी असतो, सतत चित्‌चें अनुसंधान करीत रहातो त्याचें मन शोकानें बाधित होत नाहीं. तो व्यवहार करीत असतांनाही, रागद्वेषमय आहे, असें वाटत असलें तरी चित्तांत कलंकमय होत नाहीं. जो मुनि यथार्थज्ञानवान्, शुद्ध, व शांत असतो त्याला मन पीडा देऊं शकत नाहीं. ज्ञानीपुरुषाचें चित्त भोगैकशरण व दीन झालेलें नसतें त्याचे चित्त क्षुद्र सुखाविषयीं निस्पृह असतें. जसा एकादा विरक्त पुरु

पत्नी मेली असता कामुकाप्रमाणें दु:खी पुत्र झाला असतां अपत्यार्थी गृहस्थाप्रमाणें सुखी होत नाहीं त्याप्रमाणें ही सर्व माया आहे, असें जाणणारें चित्त दु:खित होत नाहीं. अंधकाराचें जसें दिवा हें औषध त्याप्रमाणें जगद्रूप विस्तीर्ण व्याधीचें जगत् मिथ्या आहे, असें जाणणें, हें महौषध आहे. माशाच्या नेत्राला जसा जलाचा स्पर्श होत नाहीं त्याप्रमाणें व्यवहारपरायण असलेला पुरुषही आतून आसक्तिरहित असल्यास, त्याला पाप स्पर्श करीत नाहीं. चैतन्यप्रकाश प्राप्त होऊन अज्ञानरात्र संपली म्हणजे परमानंदास प्राप्त झालेली ज्ञान्याची प्रज्ञा फार शोभूं लागते. अज्ञाननिद्रा संपून ज्ञानसूर्यानें जागा केलेला जन पुन: मोहांत न पडणाऱ्या बोधास प्राप्त होतो. त्याच्या हृदयात आत्मचंद्राची चिज्ज्योत्स्ना ( चैतन्यचांदणें ) आल्हाद देत पसरते. चंद्रमा जसा आपल्या अमृतानें त्याप्रमाणें मोहांतून पार झालेला मानव सतत स्वात्मचिंता केल्यानें अंत:शीतलतेस प्राप्त होतो. ज्यांच्या संगतीनें चित्ताचा वैराग्ययुक्त अभ्युदय स्पष्टपणें सिद्ध होतो तेच खरे मित्र व शास्त्रें होत. जे पापी आत्मज्ञानाची उपेक्षा करितात ते दीन होऊन कल्पांतापर्यंत रडत रहातात. राघवा, तू या शेकडों आशापाशांनीं बद्ध झालेल्या, भोग तृणादि इच्छा करणाऱ्या, जरेनें जर्जरित झालेल्या, शोकानें दीन बनलेल्या, दु:खरूपी मोठा भार वहाणाऱ्या, जन्मरूपी जंगलावर निर्वाह करणाऱ्या, कुकर्मरूपी चिखलानें माखलेल्या, मोह-डबक्यांत निजणाऱ्या, राग( स्नेह, प्रेम )रूपी मच्छराचे दंश सहन करणाऱ्या, तृष्णारूपी दाव्यानें बांधून ठेवलेल्या पुत्र-स्त्री-इत्यादि जुन्या व दुस्तर चिखलांत रुतलेल्या, थकलेल्या, विश्रांतिरहित, दीर्घ मार्ग क्रमीत असतांना ज्याचे पाय, मान इत्यादि अवयव मोडल्यासारखे झाले आहेत अशा, संसार-अरण्यात फिरतां फिरतां हताश झालेल्या, तीव्र तापानें संतप्त होऊन ज्याला शीतळ छाया कोठेंच मिळेनाशी झाली आहे अशा, बाह्य आकारानें मात्र भासुर पण आतून दीन व इंद्रियांच्या अधीन झालेल्या, सदा आपल्या अनर्थांत मग्न असलेल्या, दु:खी, निष्कांचन, शिथिल व कर्मभार असह्य झाल्यामुळें करुणा येईल अशा रीतीनें हंबरडा फोडणाऱ्या जीव-बैलास संसारडबक्यांतून मोठ्या प्रयत्नानें पार कर. तत्त्वावलोकनानें चित्त क्षीण झालें म्हणजे जीव पुन: कधीं उत्पन्न होत नाहीं. तर तो भवसागरांतून पार जातो. नावाड्याच्या संसर्गानें प्राप्त होणाऱ्या दृढ नौकेप्रमाणें

महात्म्याध्या संसर्गानें संसारसागर तरून जाण्याची युक्ति सांपडते. ज्या माळजमिनीवर उत्तम ज्ञानफळें व समाधानरूपी शीतळ छाया यांनीं युक्त असलेला सज्जनवृक्ष नसतो तेथें, रामा, एक क्षणभरही राहूं नये. स्मितरूपी पुष्पानीं ओथबलेल्या ( नमलेल्या ) सज्जनरूपीं चंपक-वृक्षापाशीं जाताच चित्ताला विश्रांति मिळते. बाबारे एकाद्या विश्वास देऊन फसविणाऱ्या ल..डाऱ्या मांडीवर डोकें ठेवून निजणें जसें भयकर त्याप्रमाणें अल्पविवेकी पुरुषाचा आश्रय करणें भयंकर आहे. त्यापेक्षा कोणाऱ्याही सगतीला न लागता मीच माझा बंधु व गुरु आहें असें जाणून आपणच आपला उद्धार करून घ्यावा. व्यर्थ अभिमानानें आपल्याला जन्मचिखलात फेकू नये. हें काय आहे ? कसें आले ? याचें मूळ काय आहे व याचा क्षय कसा होईल ? याचा आपली बुद्धि शास्त्र व सज्जन याऱ्या सहायानें विचार करावा. देहाधीन दुःख आहे असें शहाण्यानीं प्रयत्नपूर्वक जाणावें. ससारसागरात बुडत असलेल्या आत्म्याला वर काढावयाचें झाल्यास नराना धन, मित्र, विचारशून्य शास्त्रे व बाधव याचा काहीं उपयोग होत नाहीं. सतत सहवास करणाऱ्या व अतिशुद्ध झाल्यामुळें सुहृद्भूत अशा केवल मनाशीं विचार केल्यानेंच आत्म्याचा उद्धार होतो. वैराग्य व चित्तैकाग्र्याचा अभ्यास या दोन प्रकारच्या प्रयत्नाने व आत्मपरामर्शजन्य तत्त्वज्ञानरूप नौकेनें भवसागर तरता येतो. लोकाकडून शोक केला जाणाऱ्या व दुराशेकडून जाळला जाणाऱ्या आत्म्याची उपेक्षा करू नये, तर मोठ्या आदराने त्याचा उद्धार करावा. अहंकार हेंच ज्याचें मोठें बधनस्थान आहे, तृष्णा ही ज्याला बाधावयाची दोरी आहे व जन्म याच चिखलामध्यें जो बुडाला आहे अशा जीव हत्तीचा उद्धार करावा. मोहाचा त्याग करून देहाहंकाराचें मार्जन केल्यानेंच आत्म्याचें त्राण केल्यासारखें होतें. मनोभाव सोडून अहंभाव घालविणें या उपायानेंच तो सन्मार्गात प्रवृत्त होतो. देह काष्ठ व ढेंकुळ यांसारखा आहे, असें पाहिल्यानेंच देवेश परमात्मा ज्ञात होतो. अहंकार-मेघ क्षीण झाला कीं, चिदिवाकर दृष्टीं पडतो. अंधकार हटला कीं उजेड. त्याप्रमाणें अहंकार तुटला कीं, आत्मसाक्षात्कार. अहंकाराच्या अभावीं निरतिशय आनंदाचा आविर्भाव होतो. राघवा, त्या पूर्णानंद अवस्थेचेंच मोठ्या प्रयत्नानें सेवन करावें. एका तुर्यावस्थेवाचून दुसऱ्या कशाचीही तिला उपमा देतां येत नाहीं.

मनोहकार विलीन झाला असतां सर्वभावांच्या आंत असणारी परमेश्वराची परानंद तनु उदय पावते. सुषुप्तीप्रमाणें हृदयांतच अनुभवास येणाऱ्या त्या अवस्थेचें स्वानुभवातिरिक्त प्रमाण नाहीं. आत्म्याचें परमार्थस्वरूप स्वानुभवानेंच कळतें. हें सर्व अनंत आत्मतत्त्व सतत परिणाम पावणाऱ्या चित्तांत असतें. यास्तव चित्तांतील बाह्य चराचर विषय क्षीण झाले व तें प्रयत्नानें परिणामरहित झालें म्हणजे देवाधिदेवाचा अनुभव आपोआप होतो. आत्मानुभवानतर विषयवासनाविनाश होतो. त्यानतर तो ज्ञानी स्वरूपात मिळतो. त्यावेळचें त्याचें स्वरूप ब्रह्मादिकांसही अचिंत्य आहे ६४.

**सर्ग ६५** सह्य पर्वत व त्यावरील अत्रीचा आश्रम, यांचें वर्णन, विलास व भास यांचा जन्म, वृद्धि व पितृमरणजन्य शोक.

**श्रीवसिष्ठ**—कमलनयना, विवेकिमनानेंच मनाचा उच्छेद करून व अहं आणि मम याचा त्याग करून जर आत्मदर्शन घेतलें नाहीं तर चित्रांतील सूर्य जसा कधीं अस्त पावत नाहीं त्याप्रमाणें जगद्दुःख नाहींसें होत नाहीं. उलट विस्तीर्ण आपत्ति येऊन कोसळते. याविषयीं हा पुरातन इतिहास सांगतात. मागें सह्याद्रीच्या शिखरावर भास व विलास या नावाच्या दोघां मित्राचा संवाद झाला. त्याचाच साराश मी आता तुला सांगतों.

ज्यानें आपल्या उंचीनें आकाश ठेंगणें केलें आहे, पायथ्यानें भूतलास भरून सोडल आहे व तळानें पाताळास जिंकलें आहे असा एक त्रैलोक्य वीर पर्वत आहे. त्यावर असह्य पुष्पाचा सदा पूर आलेला असतो. असह्य निर्मल जलाचे झरे झुळ झुळ वहात असतात व त्यातील निधींचें रक्षण गुह्यक करीत असतात. त्याची प्रभा जरी असह्य असली तरी नाव सह्य असेंच आहे. त्यावर नानाप्रकारच्या मूल्यवान् वस्तू असून त्याच्या सौंदर्यानें तो फार रमणीय झाला आहे. आम्र, पनस, पलाश, इत्यादि नानाप्रकारचे वृक्ष, वेळु, प्रफुल्ल कमलयुक्त सरोवरें, मोठमोठे काळे दगड[1], गुहा, थोड्या पाण्याच्या वेली, अनेक औषधी व वनस्पती सिंह-व्याघ्रादि आरण्य पशु, इत्यादिकांचें तेथें प्राचुर्य आहे. त्याच्या शिखरावर देव, गंधर्व, किन्नर विद्याधर, अप्सरा इत्यादि रहात असतात. अंगावर व पायथ्याशीं मानव, पशु-पक्षी व स्थावर पदार्थ वास्तव्य करितात आणि पाताळात

1 म्हणूनच कोंकण देश भिकारी झालेला असून लोकांना तेथें काळे दगड व लाल माती यांवाचून कांहीं सांपडत नाहीं, असें वाटतें.

नाग त्याचा आश्रय करून रहातात. सारांश तो पर्वत म्हणजे प्रति जगद्रूपच आहे. त्याच्या गुहांमध्यें बसून सिद्धयोगी एकांतवास करितात. त्याच्या उदरात निधींचा मोठा साठा आहे. नाग त्यावरील चंदनांचा आश्रय करितात व त्याच्या शिखरावर सिंह क्रीडा करीत असतात. खाली पडलेल्या, पडत असलेल्या व वृक्षांवर फुलून राहिलेल्या शुभ्रपुष्पाच्या योगानें तो शरत्कालीन मेघाप्रमाणें शुभ्र दिसत असतो. जागजागीं लाल धुळीच्या योगानें त्याचें अंग कपिल वर्ण झालेलें असतें. असो; अशा प्रकारच्या त्या पर्वताच्या उत्तर तटावर, मागें, ब्रह्मलोकासारखा सुदर, स्वर्गासारखा रम्य व शिवपुरासारखा उत्तम अत्रीचा एक मोठा आश्रम होता. त्याच्या आसपास अवर्णनीय सृष्टिसौंदर्य पसरलें होते. वृक्ष फळभारानें नम्र झाले होते. पुष्करणींतून रम्य जल चमकत होतें. फुलझाडे आपल्या विविधवर्णांच्या फुलानीं त्यास भूषित करीत होतीं. मोठाल्या घरासारख्याच मोठमोठ्या वेलींच्या जाळ्या, तापसाचे श्रम दूर करीत होत्या.

असो; अशाप्रकारच्या त्या श्रीमान् व सिद्धाच्या संतापास दूर करणाऱ्या अत्रीच्या आश्रमात आकाशमार्गातील शुक्र-बृहस्पतीप्रमाणें तेजस्वी व ज्ञानी दोन तापस रहात होते. एकत्र रहाणाऱ्या त्या दोघाना सरोवरातील फुललेल्या कमलांकुराप्रमाणें शुद्ध शरीरसंपन्न दोन पुत्र झाले. त्यांतील एकाचें नाव विलास व दुसऱ्याचें भास, असें त्यानीं ठेवलें. ते दोघेही पुत्र सृष्टिनियमाप्रमाणें क्रमाने वाढले. ते एकमेकाचे जिवलग मित्र झाले. तिळ व तेल अथवा पुष्प व वास याप्रमाणें ते परस्परसंलग्न होते. शुक्र व बृहस्पती याच नांवाचे त्याचे दोघे स्नेही बापही, अति अनुरक्त पतिपत्नींप्रमाणें, पुत्र झाल्यावरही वियुक्त झाले नाहींत. त्यांचें मन परस्परांविषयीं सारखेच प्रेमळ होतें.

असो ते दोघे पुत्र मुनीप्रमाणे त्या आश्रमात राहूं लागले. त्यांची बाल्यावस्था संपून तारुण्यास आरंभ झाला. इतक्यात त्याच्या जनकानीं जराजर्जरित शरीराचा त्याग केला. तेव्हा त्या मुलाचीं तोंडें म्लान झालीं. ते दोघेही परलोकवासी पित्यांकरितां शोक करूं लागले. कारण, हे मानद रामा, महात्म्यांसही लोकस्थिति अलंघ्य असते. त्या मृताचें उत्तर और्ध्वदेहिक कर्म करून दुःखानें व्याकुळ झालेले ते पुष्कळ वेळ आर्त स्वरानें विलाप करून शेवटीं मूर्च्छित झाले ६५.

सर्ग ६६— भासाच्या तोंडून व्यक्त होणारें अज्ञाचें दुःखसागरांतील परिवर्तन.

श्रीवसिष्ठ—रामभद्रा, संतापानें ज्याचें सर्व अंग शुष्क झालेलें आहे असे ते दोघे शोकपरायण झालेले तापसी अरण्यांतील शुष्क वृक्षाप्रमाणें तेथें कांहीं काल एकत्र राहून पुढें विरक्त मनानें दूर झाले व आपला काळ घालवूं लागले. दिवस गेला, महिना लोटला, वर्ष झाले, असे करिता करितां अनेक वर्षे निघून गेलीं व ते दोघेही वृद्ध झाले. तेव्हा ज्यांना विमल ज्ञान प्राप्त झालेलें नाहीं असे ते दोघे जर्जर तापसी वनात स्वैर फिरता फिरतां फार दिवसांनीं भेटले असता परस्पर असें संभाषण करूं लागले.—

विलास—मित्रा, बधो, भासा, तुझें स्वागत असो. तूं इतके दिवस मला सोडून कोठें होतास ? बा साधो, तुझें तप सफळ झालें का ! बुद्धि सतापशून्य होऊन तूं आत्मज्ञ झालास का ? तुझी विद्या सफल होऊन तू कुशलवान् झाला आहेस कीं नाहीं ?

श्रीवसिष्ठ—रामा, असें विचारणाऱ्या, संसाराविषयीं अगदीं उद्विग्न झालेल्या व महाज्ञानसंपन्न सुहृदास तो सुहृद् भास आदरानें म्हणाला.—

साधो, विलासा, माझ्या प्रिय मित्रा, तुझ्या दर्शनानें मला आनंद झाला आहे. पण या दुष्ट संसारात रहाणाऱ्या आमचें कुशल कसलें असणार ? ज्ञेय कळल्यावाचून काम संकल्पादिक क्षीण होत नाहींत व कामसंकल्पमय संसाराचें उल्लंघन करण्यापूर्वी माझें कुशल कसें होणार ! कोयानें जशा वेली कापतात त्याप्रमाणें चित्तात उद्भवणाऱ्या आशांना असंग शस्त्रानें कापून टाकल्यावाचून माझें कुशल कोठचें ? जोंवर ज्ञान झालें नाहीं, समता उदय पावली नाहीं व प्रबोधचंद्राचा प्रादुर्भाव झाला नाहीं तोंवर कुशलाचें नावच घ्यावयास नको. बा साधो, आत्मज्ञानाच्या अभावीं ज्ञानमहौषध मिळाल्याशिवाय ही संसारमहामारी थांबणार नाहीं. या संसारवृक्षाचा शिशुत्व हा अंकुर, तारुण्य ही पालवी व जरा हें पुष्प आहे. त्याच्यावर आक्रोश करणारे बांधव हेच गुंजारव करणारे भ्रमर असून जरा-पुष्पापासून मरणमंजिरी उत्पन्न होते. मरणोत्तर कर्मानुरूप नरक किंवा स्थावर व जंगम योनीं यात जन्म घ्यावा लागतो. तेथें दुष्कर्मांचा भोग घेत असताना, असह्य दुःखांचा अनुभव घेत असतांना, मन विरस होतें. दैववशात् स्वर्गादिकांची प्राप्ति झाली तरी तेथें अधिक पुण्यसंचय करण्यास मार्ग व अधिकारही नसल्यामुळें संचित पुण्य कर्मांचा क्षय

होतांच पुनः तेथून अवशिष्ट पाप अथवा पुण्यमिश्रित पाप भोगण्याकरितां अधोलोकीं यावें लागतें. शिवाय स्वतः स्वर्गातही हर्ष, क्रोध, असूया, काम इत्यादि अनेक दोषांचें प्राबल्य व शमादि सात्विक गुणांचा असंभव असल्यामुळें ज्ञान दुर्लभ होतें. ज्ञानाभावीं विषयलालसा उत्तरोत्तर वाढते व त्यामुळें जीव वारवार भोगलेल्या त्याच त्या विषयांचा भोग घेत व्यर्थ काल घालवितो. दैववशात् स्वर्गातून च्युत झाल्यावरही मानुष्य किंवा त्यांतही दुर्लभ असलेलें ब्राह्मण्य जरी प्राप्त झालें तरी भोग-लांपट्यामुळें पुनः तशाच भ्रमणात पडावें लागतें. दुःखें अथवा सुखाभास यांच्या योगानें दीर्घ व अदीर्घ, अशुभ व शुभ झालेले दिवस व रात्री भराभर जातात. मिथ्याभूत कर्मांच्या योगानें आयुष्य कसें तरी जात असतें. तें कधीं कोणत्याही कारणानें थांबत नाहीं. मनोरूपी मत्त हत्ती तृष्णारूपी हत्तिणीच्या मागून धावत असतो. शरीररूपी वृक्षाच्या चित्त-ढोलींत राहणारा अभिलाषरूपी म्हातारा गृध्र आयुष्य व विवेकरूपी चिंता-मणी व्यर्थ घालवितो. अज्ञ पुरुषाची नीरस व निःसुख दिवस पंक्ति पिकलेल्या पानाप्रमाणें भराभर गळत असते. वृद्धापकाळीं भृत्य-पुत्रादि अपमान करूं लागले म्हणजे प्राण्याची मुखश्री म्लान होते. यौवन-कमल-रहित व शुष्क शरीररूपी सरोवरांतून आयुष्य—राजहंस पळून जातो. कालवायूनें जोरानें हालविलेल्या व जर्जर झालेल्या जीवित—वृक्षावरून भोगपुष्पें गळून खालीं पडतात. मन मोहात गढून जातें. तृष्णा वाढते. जीविताशारूपी ततूला कालरूपी उंदीर तोडूं लागतो. बा मित्रा, जन्मोजन्मीं ही देहरत्नशलाका नाशरूपी चिखलात केव्हा बुडते तें काहीं कळत नाहीं. चिंता-चक्रास बांधलेलें व कुकर्में करणारे चित्त भोवऱ्यातील तृणा-प्रमाणें फिरत रहातें. तें एक क्षणभरही विश्रांति घेत नाहीं. मीं हें केलें, हें करतों व हे करीन हे बेत मति करीत रहाते. हा मित्र व हा शत्रु हा विचार माझ्या मर्मावर आघात करीत असतो. अनात्म्याचीं दुःखें आत्म्या-चींच आहेत, असें समजून हा जीव दीन होतो. तात्पर्य सुख-दुःख—प्रवाहात पडलेला, जरा-मरणवायूनें तुटलेला व जगद्रूपी आवर्तात लोळणारा हा जीव सुकलेल्या पानाप्रमाणें जर्जर होतो ६६.

**सर्ग ६७—बंध आसक्तिकृत आहे. यास्तव आसक्ति सोडल्यानें त्याचें निवारण होते.**

**श्रीवसिष्ठ**—याप्रमाणें संसाराच्या असारतेविषयीं पुष्कळ विचार करून कांहीं दिवसांनी ते दोघेही ज्ञानवान् झाले. एवढ्यासाठींच हे महाबाहो, संसारांतून तरून जाण्यास ज्ञानावाचून दुसरी गति नाहीं. संसाराचें दुःख जरी अनंत असलें तरी गरुड जसा महासागरास लीलेनें तरून जातो त्याप्रमाणें विचारवान् त्यातून पार पडतो. देहातीत झालेले महात्मे केवल चिन्मात्र आत्म्यामध्ये राहून प्रेक्षकाप्रमाणें दुरूनच देहास पाहतात. देह दुःखाने जरी अतिशय क्षुब्ध झाला तरी त्यांत आमची कोणती हानि आहे? रथ तुटला किंवा फुटला तर त्यांत सारथ्याची कोणती हानि होणार? मन क्षुब्ध झालें तर त्यात चित्-तत्त्वाचे काय गेले! जलाचे हंस कोण? जल व पाषाण याचा काय संबंध? शिला व काष्ठे याचें काय नातें? कांहीं नाहीं. त्याच प्रमाणें भोग व परमात्मा यांचा काहीं सबंध नाहीं. पश्चिम समुद्र व पूर्व पर्वत याचा जसा काहीं सबध नाहीं त्याप्रमाणे परमात्मा व संसार यांचा कांहीं सबंध नाहीं. पाण्यावर लाकुड किंवा दगड टाकले असतां जसे शितोडे उडतात त्याप्रमाणें देह व आत्मा याच्या संबंधामुळें या सर्व चित्तवृत्ती उठतात. जल व काष्ठें यांचा संयोग झाला असतां जलांत जसें काष्टाचें प्रतिबिंब दिसतें त्याप्रमाणें आत्म्यामध्यें शरीरें केवल सांनिध्यामुळें दिसतात. दर्पण, तरंग इत्यादिकातील प्रतिबिंबें वस्तुतः जशीं सत्य अथवा असत्य ह्मणता येत नाहींत त्याप्रमाणेंच अत्म्याच्या शरीराविषयीं कांहीं निश्चय करितां येत नाहीं. लाकुड, पाषाण इत्यादि जड वस्तूंच्या नाशादिकांप्रमाणेंच देहाकार परिणाम पावलेल्या पंच भूतांच्या नाशादिकामुळें आत्म्याला दुःख होण्याचें कांहीं कारण नाहीं. भासमान सुख-दुःखादि—अनुभव शुद्ध आत्म्याचे किंवा जड शरीराचे नव्हेत. तर अज्ञानाचे आहेत. यास्तव अज्ञान गेलें कीं शुद्ध चित् रहाते. अज्ञच या संसाराला सत्य समजत असतो. ज्ञानी कधीं नाहीं. तो त्याला सदा असत्य समजतो. ज्ञानी अभिमानावाचूनच प्रारब्धप्राप्त भोगाचा अनुभव घेतो. सदा सर्वत्र शुद्ध चित्च जरी स्थित आहे तरी मनःसंकल्पामुळें ती मिथ्या सुख-दुःखानीं लिप्त होते. मनोनिश्चयामुळें स्वप्नस्त्रीसंगाप्रमाणें असबंधही संबंध होतो. संग सोडल्यास आत्मा देह-दुःखानीं कधींही लिप्त होत नाहीं. मी देह आहे, या मिथ्या भावनेनेंच आत्मा देह-दुःखाच्या वश होऊन राहिला आहे. यास्तव तिचा त्याग केल्याने तो मुक्त

होतो, असें विद्वान् म्हणतात. नुस्त्या सांनिध्यानें कांहीं होत नाहीं. अंतः-संगामुळें सर्वप्रकारचा अनर्थ कोसळतो. पाने, पाणी, केर, काष्ठें यांचे सानिध्य होते, पण अंतःसंग नसल्यामुळें त्यास परस्पराविषयीं दुःख होत नाहीं. अज्ञानामुळें आत्म्यानें स्वरूपास विसरून देहावर अभिमान ठेवला कीं तो त्याच्या सुख-दुःखानीं सुखी व दुःखी होतो. यास्तव अतःसंग हें सर्व अनर्थांचें कारण आहे. देहाभिमानी पुरुष संसारात मग्न होतो व सस-क्तिशून्य ज्ञानी त्यातून मुक्त होतो. अतःसगयुक्त चित्तच शतशाखांनीं विस्तार पावलेले चित्त होय व सगशून्य चित्ताला विलीनचित्त म्हण-तात. फुटलेल्या स्फटिकाप्रमाणें आसक्तचित्त अपवित्र आहे व तेंच असक्त झाल्यास परम पवित्र होतें. निर्मल व असक्त चित्त संसार करीत असलें तरी मुक्त होय. पण आसक्त चित्त दीर्घ तपानें युक्त असलें तरी बद्ध असते. तस्मात् आसक्ति व अनासक्ति हेच बंधमोक्षाचें कारण आहे. चित्त आपल्याला कर्ता समजू लागले की, देहाचें कर्तृत्व त्याचे ठायी येते व मन मी कर्ता नाही, असे म्हणूं लागलें कीं तें देहामध्येच रहाते. शून्यचित्त पुरुष कर्म करीत असला तरी मी कर्ता आहे, असें त्याला वाटत नाहीं व त्यामुळे तो कर्ता नव्हे. यास्तव हे राघवा, चित्ताने जे केलें ते तूंच केलेस व त्यानें जें केलेलें नाहीं ते तूं केलेले नाहींस. असक्त चित्त कर्मफलाचा भोग घेणारेही नव्हे. असंसक्त पुरुष ब्रह्महत्या व अश्वमेध यांच्या पाप-पुण्यानी लिप्त होत नाहीं. अतःसंग-शून्य व मधुरवृत्तिमान् पुरुष बाहेर काहीं करीत असला तरी व नसला तरी कर्ता व भोक्ता नव्हे. यास्तव बा सच्छिष्या, हा दुष्ट व अनर्थबीजभूत अंतःसग सोड व परम सुखी हो ६७.

**सर्ग ६८**—संग व असंग यांचे लक्षण, त्यांच्या चिकित्सेचा उपाय.

**श्रीराम**—भगवन्, संग कसा असतो. तो मानवास बद्ध कसा करतो व तोच मोक्षोपयोगी कसा होतो ?

**श्रीवसिष्ठ**—देह व देही ( देहवान् आत्मा ) यांचा जडचित्स्वभावरूप विभाग सोडून देहच आत्मा आहे असा विश्वास धरणें हाच बंधहेतु संग आहे. अनत आत्मतत्त्वाला विसरून त्याला परिच्छिन्न ( मर्यादित ) समजणें व या मूढ कल्पनेमुळें आत्मभिन्न विषयांपासून सुखाची इच्छा करणें हाच बंधाला कारण होणारा संग आहे. पण हें सर्व आत्माच आहे. तेव्हां

यांतील मी कशाची इच्छा करूं व त्याग कशाचा करूं ? असें वाटणें ही जीवन्मुक्तीस कारण होणारी असंगस्थिति आहे. अंतःसंगशून्य व त्यामुळेंच मुक्तीस योग्य असलेला नर ' मी नाहीं व दुसराही कोणी नाहीं. सुखें होवोत किंवा न होवोत. ' असें म्हणत असतो. ज्या केवल आत्मतत्त्व-निष्ठ पुरुषाचें मन हर्ष व क्रोध यास वश होत नाहीं तो असंसक्त व जीवन्मुक्त होय. सर्व कर्मफलादिकास मनानेंच जो सोडतो, कर्मानें नव्हे, तो असंसक्त होय. असंसगानें सर्वोत्तम फल प्राप्त होते. त्याच्या योगानें सर्व दुश्चेष्टाची चागली चिकित्सा केल्यासारखी होते. सर्व विस्तीर्ण दुःखराशी संसक्तीमुळेंच उत्पन्न होतात. गाढव पाठीवर भार वहातो, तो आसक्तीमुळे. वृक्ष शीत, उष्ण, वायु, वर्षाव इत्यादि सहन करीत एका किडे स्थानीं स्थित असतात. पण तो आसक्तीचाच विकास होय. या आसक्तीमुळेंच पृथ्वी-च्या पाठीवर व उदरातही असह्य क्लेश सहन करीत असतात. मरणाला भ्यालेले पक्षी क्षुधेनें व्याकुळ झाले तरी वृक्षावरील आपलीं घरटीं सोडून जात नाहींत; दूर्वांकुर व तृण भक्षण करणारीं हरणें किराताच्या बाणानीं मरून जातात; वारंवार मरून जन्म घेणारे हे अनेक लोक कृमि व कीट होतात; नद्याच्या लाटाप्रमाणे अनत भूतें पुनः पुनः उत्पन्न होऊन लीन होतात. जे मानव असतात ते लता व तृण होऊन वारंवार मरतात. सारांश सर्व अनर्थाचें कारण ससक्ति आहे. ती वंद्या व वंध्या अशी दोन प्रकारची आहे. तत्त्व-वेत्त्यांची ससक्ति वद्या व मूढाची संसक्ति वंध्या असते. आत्मबोधहीन, देहादिकास सत्य मानणारी व पुनर्जन्मास कारण होणारी संसक्ति वंध्या होय व याच्या उलट म्हणजे आत्मबोधयुक्त, अनात्म पदार्थास असत्य मानणारी व पुनर्जन्मशून्य संसक्ति वद्या आहे. या उत्तम संगामुळें ब्राह्म शरीर होतें. या वंद्य संसक्तीच्या प्रभावानेंच लोकपाल सर्व सिद्धिमान् होऊन जगत्-अगण्यांत स्थित आहेत. या दोन प्रकारच्या संसक्तीमुळेंच जगातील सर्व इष्टानिष्ट भावाची स्थिति होत असते. ब्रह्मांडरूपी उंबरामध्यें देव, दानव व मानव हे उंच-नीच किडे संसक्तीमुळेंच कोंडून पडलेले असतात. प्राणी एकमेकांस या दुष्ट संगामुळेंच मारतात, खातात, तोड-तात व छळतात. संसक्तीमुळेंच, वृक्षांवरील मशकांप्रमाणें, आकाशात नक्षत्रगण सतत भ्रमण करतो. राघवा, केवळ वासनावशात् आत्माकाशांत कोणी कुशल चितान्यानें हें विचित्र चित्र कसें काढलें आहे पहा. मनः

संगरूपी रंगानें शून्य आकाशांत काढलेलें हें जगन्मय चित्र सत्य नव्हे. पण त्याला सत्य मानून जे त्यांत आसक्त होतात ते दुःखपरंपरा भोगतात. अविद्येनें पसरलेल्या भोगामध्यें आसक्त न झाल्यास, पावसाळ्यांतील नद्यांप्रमाणें सर्व विभूती विस्तार पावतात. राघवा, आसक्त लोकांच्या शरीरांस जणुं काय आग लागलेली असतें. पण तेच संगशून्य पुरुषाचें शरीर चंद्रबिंबाप्रमाणें शीतळ असतें. असक्त मन सर्वत्र सुखालाच कारण होतें. सारांश बा राजीव-लोचना, विद्यायुक्त, अविद्याशून्य व आसक्तिरहित चित्तानें जो सदा रहातो तो मुक्त होय ६८.

**सर्ग ६९**—.सर्व आसक्ति सोडून मनाला चिन्मात्र करावें.

**श्रीवसिष्ठ**—सर्वदा विवेकानें सर्वांमध्यें स्थित असतांना व सर्व कर्में करीत असताना आपल्या मनाला कोणत्याही चेष्टेमध्यें, चिंतेमध्ये किंवा वस्तूमध्यें आसक्त होऊं देऊं नये. आकाश, पाताळ, त्याच्या मधला प्रदेश, दिशा, उपदिशा, लता, आधिभौतिक पदार्थ, स्त्रीपुत्रादि बिषय, भोगरूप इंद्रिय वृत्ती, आध्यात्मिक पदार्थ, प्राण, मूर्धा, देहमध्य इत्यादि योगशास्त्रोक्त काम्य सिद्धींस अनकूल असलेलीं स्थानें, जाग्रदादि अवस्था, कार्य-कारण, आदि-मध्य-अंत, दूर, समीप, नाम, रूप, जीव, शब्दादि विषय, मोह व आनंद वृत्ती, गमनागमनादि चेष्टा, इत्यादि कशामध्येंही त्याला सक्त होऊं न देता केवल चैतन्यतंत्र करावें. अशा स्थितीस पोंचलेला जीव हा सर्व व्यवहार करो की न करो पण तो अजीव आहे. स्वात्म्यामध्यें रत झालेला जीव कर्मफलाशीं संबंध ठेवीत नाहीं. अथवा त्यानें बुद्धिसाक्षित्वही सोडून शांत चिद्धन होऊन रहावे रामा, आत्म्यामध्यें तन्मय होऊन राहिलेला व त्यामुळें व्यवहाराविषयीं विरक्त झालेला पुरुष यदृच्छाप्राप्त व्यवहार जरी करीत असला तरी फलभागी होत नाहीं. तर तो मोठ्या दुःखानें देहभार कसा तरी वहात असतो ६९.

**सर्ग ७०**—असंग-सुखसंपन्न पुरुष व्यवहारजन्य दोषानीं दुःखी होत नाहीं.

**श्रीवसिष्ठ**—असंगसुखाचा अभ्यास करणारे उदार पुरुष व्यवहार जरी करीत असले तरी शोक-भयरहित रहातात. पुत्र-धननाश, बंधन, अपमान इत्यादिकांच्या योगानें क्षुब्ध झाल्याप्रमाणें जरी ते दिसत असले तरी वस्तुतः आंतून क्षोभरहित असतात. त्यामुळेंच परमार्थसुखाचा व त्यांचा कधीं वियोग होत नाहीं. त्याकारणानें त्यांची मुखश्री पूर्णचंद्राप्रमाणें दिसते.

ज्याचें मन निर्विषय चैतन्याचा आश्रय करून राहिलेलें असतें त्याच्याकडे नुस्तें पाहूनच जनसमूहाचें चित्त निर्मळ होतें. पाण्यांत हालत असल्यासारखा दिसणाराही सूर्य जसा वस्तुतः निश्चल असतो त्याप्रमाणें आत्मदृष्टि ज्ञानी शरीरतः चळ आहे, असें भासत असलें तरी आंतून स्वस्थ असतो. अति उत्कर्ष पावलेले प्रबुद्ध, आत्माराम महात्मे बाहेरून पिसाच्या टोंकाप्रमाणें चळ व आतून मेरूप्रमाणें अचल असतात. स्फटिक जासवंदीच्या फुलाच्या सांनिध्यामुळें जरी लाल दिसत असला तरी तो जसा वस्तुतः लाल होत नाहीं, त्याप्रमाणें आत्मत्वास प्राप्त झालेलें चित्त सुख-दुःखानुरक्त होत नाहीं. आत्म्यामध्ये संसक्त होई तो बाह्य अनात्म्याविषयीं असंसक्ति दुर्लभ आहे. जो आत्मज्ञ मळानीं दूषित न होतां आत्मध्यानमय असल्याप्रमाणें सुखमग्न असतो, त्याला स्वसक्त म्हणतात. जसा जसा ज्ञानाचा परिपाक वाढत जाईल तसा तसा आत्मसक्तीचा उत्कर्ष होऊन क्रमानें बाह्यसग क्षीण होतो. या असगदृष्टीमध्यें गेलेला जीव जाग्रत्समयीं सुषुप्तस्थ असल्याप्रमाणें निर्द्वंद्व व नित्य हर्षविषादशून्य असतो. चित्त चित्तदशारहित झालें असतां, क्षीण-चित्त पुरुषाची जी स्थिति तिलाच जाग्रतींत सुषुप्ति म्हणतात. असल्या सुषुप्तीस प्राप्त झालेला पुरुष जीवदवस्थेंत व्यवहार करीत राहिला तरी सुख-दुःखरूपी दोन्यानीं आकृष्ट होत नाहीं कळसूत्री यंत्रातील बाहुल्या व्यवहार करीत असल्या तरी जशा सुखी किंवा दुःखी होत नाहींत, त्याप्रमाणें असला पुरुष व्यवहारसमयीं क्लि होत नाहीं. अहंभावरूप शक्तिच चित्ताला ताप देत असते व तीही इष्टाची अप्राप्ति व अनिष्टाची प्राप्ति या निमित्तानेंच त्याला संताप देते पण तें चित्त आत्मरूप झाल्यावर निमित्ताला अवकाशच मिळत नसल्या मुळें त्याला बाधा होत नाहीं. सुषुप्तबुद्धि पुरुष पूर्वीप्रमाणेंच लीलेनें क करीत असला तरी जीवन्मुक्ततेनें स्थित असल्यामुळें बद्ध होत नाहीं यास्तव हे निष्पाप रामा, सौषुप्ति वृत्तीचा आश्रय करून स्वाभाविक क हवें तर कर, नाहीं तर सोड. ज्ञान्याला कर्मत्याग किंवा ग्रहण यातीं कांहींच आवडत नाहीं. तर तो प्रसंग पडेल तसा वागतो. अतत्त्वज्ञ निद्र समयीं हात-पाय हालविणें, श्वास सोडणें इत्यादि क्रिया करीत असला त मी हें करतों असा अभिमान धरीत नसल्यामुळें त्यांचा कर्ता होत नाहीं स्वप्नांत शरीरतः कोणाला मारीत नसतांनाही संकल्पानें शत्रूच्या उरावर बस

त्याचा गळा कापतो व त्याविषयीं अभिमान धरून हृष्ट होतो, हें प्रसिद्धच आहे. यास्तव राघवा, तूं संकल्प न सोडतां नुस्तें शरीरचेष्टारूपी कर्म जरी सोडलेंस तरी अकर्ता होणार नाहींस. याचा विचार करून तुला जसें करावेसें वाटेल तसें कर. बालकाच्या व्यर्थ लीलेप्रमाणें फलाशारहित कर्में करणें चांगलें. कारण त्यामुळें चित्त वासनाशून्य होतें. पर्वत सर्व ऋतूंमध्यें जसा एकसारखा असतो (म्हणजे त्यावरील औषधि-वनस्पतींमध्यें ऋतुमानाप्रमाणें जरी फरक पडत असला तरी त्याच्या रचनेंत कांहीं अंतर पडत नाहीं) त्याप्रमाणें सुषुप्तस्थ महातेजस्वी ज्ञानी पूर्ण व सर्व अवस्थांमध्यें सम असतो. या सर्वोत्तम अवस्थेस प्राप्त झाल्यावर मग त्यानें पाहिजे तर आपल्या शरीराचा तत्काल त्याग करावा अथवा दीर्घकाल सशरीर रहावें. कांहीं केलें तरी सारखेंच. रामा, ही सुषुप्त-स्थिति अभ्यास योगानें-चांगली परिणात झाली असतां तिलाच तत्त्वज्ञ तुर्या म्हणतात. कारण हिच्या अभ्यासानें तो ज्ञानी-महाशय आनंदमय, सर्व अंतःपीडाशून्य, व मनोभावरहित होत असतो. परमानंदांत मग्न झालेला तो महात्मा जगद्रचनेस तमाशा समजतो. आत्मवान् आपल्या पूर्णावस्थेपासून कधी च्युत होत नाहीं. डोंगरावर चढलेला जसा खालच्या दुर्बळाला हसतो त्याप्रमाणें पुण्य पदवीस प्राप्त झालेला तो जगद्भ्रमाकडे पाहून हसत रहातो. तुर्यावस्थ पुरुष आनदमय झाल्यामुळें अनिर्वाच्य होतो, अनानंद, महानद व कलातीत अशा त्याला मुक्त, योगी व तुर्यातीत पदास प्राप्त झालेला असे म्हणतात. साराश हे रामा, असला महात्मा सर्व जन्मपाशरहित, व तमोमय अभिमानशून्य होतो आणि पाण्यांत टाकलेल्या मिठाच्या खड्याप्रमाणे परम रसमयी सत्तेस प्राप्त होतो ७०.

**सर्ग ७१**—परतत्त्व अनिर्वाच्य असल्यामुळें तुर्येचें वर्णन. शरीरादिकांचा निरास.

**श्रीवसिष्ठ**—रघुनाथा, तुर्यावस्थेचा जोंवर साक्षात् अनुभव येत असतो तोंवरच केवलता-पद जीवन्मुक्ताचा व वाणीचा विषय होतें. त्यानंतर वायूला जावयास योग्य असलेलें आकाश जसें मानवाचा विषय नव्हे त्याप्रमाणे विदेहमुक्त ज्यास प्राप्त होतात तें तुर्यातीत पदही विदेहमुक्त व वेदवचनें यांचा विषय होत नाहीं. सर्व दूर-दूरच्या पदार्थांहून दूर असलेली ती पदवी विश्रांतिमय आहे. ज्ञानी पुरुष काहीं दिवस सुषुप्तावस्थेंत असल्याप्रमाणें जगत्स्थितीचा अनुभव घेऊन त्यानंतर परमानंदानें

धुद झालेला तो तुर्यतेस प्राप्त होतो. यास्तव हे रघूद्वहा, तत्त्वज्ञ तुर्यातीत पदास जसे प्राप्त होतात तूं तसाच ही अगोदर निर्द्वंद्वपदास जाऊन पोंच. निद्रित असल्याप्रमाणें व्यवहार करूं लाग. म्हणजे चित्रांतील चंद्राप्रमाणें तुला हर्षशोक होणार नाहींत. ( शास्त्रीय व्यवहाराच्या निर्वाहार्थ प्रथम पाचव्या ज्ञानभूमीचा अभ्यास करावा, असा याचा भावार्थ. ) देहाचा क्षय किंवा वृद्धि झाल्यास चित्‌चाही क्षय अथवा वृद्धि होते, असें समजूं नकोस. त्याच्या लाभ-हानीने तुझा लाभ किंवा हानि कांहीं नाहीं. देहाला पाहिजे त्या अवस्थेत राहू दे. तूं आपला आत्मबोध स्थिर व्हावा ह्मणून प्रयत्न कर, म्हणजे झालें. तें सत्य तुला कळले आहे. त्या पदाचें ज्ञान तुला झाले आहे व त्या आपल्या रूपास तूं प्राप्त झाला आहेस. यास्तव आता शोकरहित हो. इष्टानिष्टाचा त्याग करून तू आता स्वच्छ आकाशाप्रमाणें शोभत आहेस. तुझें मन आता आत्मा झालें आहे. तें अधोभागीं धावत नाहीं. तर योग-मंत्र-तपःसिद्ध पुरुषाप्रमाणें तें उत्तरोत्तर ऊर्ध्वभागीं जात असते. या त्रिभुवनात शुद्ध चित्‌च असल्यामुळें हा मी असा भ्रांत संकल्प करूं नकोस. त्या विभूला आत्मा हें नावही केवल व्यवहाराकरिता कल्पिलें आहे. नामरूपादि भेद त्याच्यापासून फार दूर रहातो. जलच सागर आहे व तरंगादिकही त्याच्याहून पृथक् नाहींत. त्याप्रमाणें आत्माच हें सर्व आहे व पृथ्वी, जल इत्यादिकही त्याच्याहून पृथक् नाहीं. समुद्रांत पूर्ण जलावाचून काहीं नाहीं. तसेच जगात आत्म्यावाचून दुसरें काहीं नाहीं. मग द्वित्वकल्पना कोठे व कशी रहाणार? द्वैताचा स्वीकार केला तरी विद्यमान देहादिकाशीं विभूचा संबंध होत नाहीं. कारण छाया व ऊन किंवा अंधकार व प्रकाश याच्या संबंधाप्रमाणेंच देह व देही याचा संयोग-संबंध संभवत नाहीं. परस्पर विरोधी असलेल्या शीतोष्णाप्रमाणेंच देह व आत्मा याचा तादात्म्य संबंधही शक्य नाहीं. गुण व गुणी इत्यादि अयुतसिद्ध पदार्थाप्रमाणें जड व चेतन ( देह व देही ) यांचा समवाय-संबंधही शक्य नाहीं. चिन्मात्र आत्म्याचा देहसंबंध ही कथा दावाग्नींतील समुद्राच्या कथेप्रमाणेंच दुरवबोध आहे. बरें त्यांचा आरोपित संबंध आहे, म्हणून म्हणावें तर देहात्मसंबंधाध्यासाचें अधिष्ठान आत्मा असल्यामुळें आत्मदर्शनानेंच त्याचा बाध होईल. चिदात्मा निर्मल, नित्य, स्वप्रकाश व निरुपद्रव आहे आणि देह अनित्य व मलिन आहे. तेव्हां त्यांचा

संबंध कसा होणार ?—आत्माचा देहाशीं जर संबंध नाहीं तर त्याची हालचाल व पुष्टि कशी अनुभवास येते ? मृत शरीरांत यांतील कांहीं दिसत नाहीं !—म्हणून म्हणशील तर सागतों. प्राणवायूच्या योगानें तो हालचाल ( स्पद ) करतो व अन्नादि भूताच्या योगानें पुष्ट होतो. तात्पर्य द्वैत सत्य आहे, असे मानल्यावरही जर देह व आत्मा यांच्या संबधाची उपपत्ति लागत नाहीं तर ते असत्य आहे, असें मानल्यावर ती कशी लागणार ? यास्तव द्वैतभ्रम सोडून अद्वितीय चिन्मात्रामध्येंच स्थिति कर त्यात बध-मोक्षादिकाची शकाच नाहीं. रामा, सर्व सबाह्याभ्यतर शात आत्मामय आहे हा स्पष्ट प्रत्यय दृढ कर. मी सुखी, दु:खी, मूढ आहें या कुदृष्टी आहेत. त्याना जर तू सत्य मानू लागलास तर दीर्घ दु:खाचीच इच्छा करीत आहेस, असें मी समजेन. पर्वत व तृण यातील पर्वत स्थिर व मोठा असल्यामुळें त्याच्या विषयींची दृष्टि सुकर व तृण कोमल व चल असल्यामुळें त्याच्याविषयींची दृष्टि दुष्कर आहे. अथवा त्वचेला मृदु लागणारा रेशमाचा स्पर्श ग्राह्य व कठोर लागणारा पाषाणस्पर्श त्याज्य असतो त्याप्रमाणे अमर्याद, स्वप्रकाश व आनदरूप परमात्म्याची दृष्टि सुकर व ग्राह्य आणि तुच्छ, अस्थिर व मन-आदिकांची अपेक्षा करणारी देहाद्यनात्मदृष्टि दुष्कर व त्याज्य होय. तेज व अधकार याचा परस्पर विरोध असल्यामुळें, त्याच्या संबधाप्रमाणेच साम्यही जसें नाहीं त्याचप्रमाणें अत्यत भिन्न असलेल्या देहात्म्याचें साम्य नाहीं. प्राण वायूच्या योगानें देहाच्या सर्व क्रिया होतात. वेळूच्या भोंकातून वाऱ्यामुळें जसा ध्वनि निघतो तसाच तो याच्या मुख व नासिका या छिद्रातून निघतो नेत्राची उघडझाप वायूच्या योगानेंच होते. इतर इंद्रियाच्या क्रियाही वायूच्या अधीन आहेत. ज्ञान हेंच एक आत्म्याचें कार्य आहे. पण ते ज्ञान ( आत्मसवित् ) सर्वगत जरी असलें तरी प्रतिबिंब जसें आरशासारख्या स्वच्छ पदार्थामध्येंच पडतें त्याप्रमाणें तें ( आत्मसवित्, ज्ञान ) चित्तवृत्तीमध्येंच अभिव्यक्त होतें. शरीररूपी घरट्यास सोडून चित्तपक्षी आपल्या वासनावशात् जेथें जातो तेथें त्याचा अनुभव येतो. पुष्प असेल तेथेंच जसें गधज्ञान होते त्याप्रमाणें चित्त असेल तेथेच आत्मज्ञान स्फुरतें. सर्वव्यापी आकाश आरसा, जल इत्यादि काहीं योग्य पदार्थांतच जसें प्रतिबिंबित होतें त्याप्रमाणें सर्वगामी

आत्मा चित्तामध्येंच मात्र व्यक्त होतो. भूतलावरील सखल भूमि हें जसें जलाचे आस्पद (स्थान) त्याप्रमाणें अंतःकरण हें आत्मसंविदांचें स्थान. अंतःकरणात बिंबलेलें आत्मज्ञान व्यावहारिक व प्रातिभासिक जगद्रूपास व्यक्त करतें. अंतःकरणच संसाराचें कारण आहे. यास्तव जीव, अंतःकरण चित्त, मन इत्यादि नांवांनीं ज्याचा व्यवहार करतां येतो त्या सर्व–संसार–कारणाचाच स्वतः विचार करावा.

**श्रीराम**—पण भगवन्, चित्ताला हीं नावें का प्राप्त झालीं?

**श्रीवसिष्ठ**—रामा, हे सर्व पदार्थ म्हणजे सतत आत्मरूप चित्तापासून निघणारे तरंगच आहेत. त्यात आत्मा स्फुरणरूपाने कोठे कोठे रहातो. पुष्कळ जागीं तर तो महेश्वर अस्पंदरूपानेंच असतो. पाषाणादि स्थावर जीव स्पंदशून्य असतात व मानवादि जंगम प्राणी सुरे (मद्या) वरील फेसाप्रमाणे सस्पंद असतात. सर्व शरीरातील सर्व शक्तींचें बीज आत्मा आहे. स्वकल्पित अज्ञानामुळें तो स्वतःच प्रलय व सुषुप्ति-कालीं अज्ञान होऊन रहातो. ते अज्ञान प्रतिबिंबभावास प्राप्त होऊन अनंत आत्मरूपानें भूषित झालें ह्मणजे त्यालाच जीव असे ह्मणू लागतात. तोच या संसारात महामोहरूपी माया–पिंजऱ्यातील हत्ती आहे प्राण धारण करणें यालाच जीवन म्हणतात. या जीवनामुळेंच तो जीव या संज्ञेस प्राप्त होतो. अहं असा अभिमान त्याला प्रथम झाला. त्यामुळें त्याचें अहं हें नाव रूढ झालें. निश्चय करणे या सामर्थ्यामुळे तो बुद्धिसंज्ञक झाला. संकल्पामुळें मन हें नाव त्याला पडलें. प्रकृतिरूपानें प्रकृति हें त्याचें नांव रूढ झालें रक्त, मांस, अस्थि इत्यादिकांच्या योगाने पुष्ट झालेल्या त्यालाच देह म्हणतात. तो अज्ञानांश–प्राधान्यानं जड व चित्प्राधान्यानें चेतन आहे. जड अज्ञान व अजड साक्षि यांच्या अन्तरालीं असणारें साभास मनच नानात्वास प्राप्त होऊन जीव, बुद्धि, मन, चित्त, अहंकार इत्यादि नाना नावें धारण करतें जीवाचें हे स्वरूप बृहदारण्यकादि अनेक वेदान्त–भागामध्ये बहुत प्रकारें वर्णिलें आहे. अज्ञ व तार्किक यांनीं या संज्ञांमध्यें व्यर्थ व स्वतःच्या मोहाकरिताच आस्था ठेविली आहे.

हे महाबाहो, याप्रमाणें जीव संसाराचें कारण आहे. क्षुद्र, जड व दीन देहानें काहीं केलें नाहीं. आधार व आधेय यांतील एकाचा नाश झाला असतां त्याबरोबर दुसऱ्याचाही नाश होईल, असें समजण्याचें कांहीं

कारण नाहीं. झाडाच्या पानाचा रस सुकला म्हणून तो कांहीं नाश पावत नाहीं. तर सूर्याच्या किरणामध्यें जाऊन रहातो. त्याप्रमाणें शरीर क्षीण झालें तरी कोणाचाही देही क्षीण होत नाहीं. तर तो वासनाशून्य असल्यास आत्मपदीं रहातो व वासनावान् असल्यास मातेच्या योनींत शिरून तिच्या शोणितानें पुनः शरीरवान् होऊं लागतो. जीवाचाही आत्यंतिक नाश होतो; नाहीं असें नाहीं. पण तो केव्हा ? शरीराच्या नाशाबरोबर नव्हे. चित्ताचा नाश झाला म्हणजे मग होतो आणि तोच मोक्ष होय. यास्तव शरीर मेलें असता जीव मेला, नष्ट झाला, असें जें म्हणतात ते मिथ्या आहे. कारण एक देश व काल यास सोडून तो वारंवार अन्य अन्य देशादिकामध्ये सशरीर होऊन अनुभवास येतो याप्रमाणे या संसारनदीमध्यें तरंगाबरोबर वहात जाणाऱ्या तृणतुल्य जीवाकडून मेला, झाला, वाढला, सुखी, दुःखी इत्यादि भ्रांतिकल्पना केल्या जातात. वानर जसा एका झाडावरून दुसऱ्या झाडावर पटकन उडी मारून जातो त्याप्रमाणें वासनावान् जीव एका शरीरास सोडून दुसऱ्या शरीरात अकस्मात् शिरतो. पुनः तें सोडून तिसऱ्यात प्रवेश करतो. याप्रमाणें आपल्याच वासनेकडून जीव, बालकास फिरविणाऱ्या धूर्त धात्रीप्रमाणें, इतस्ततः फिरविले जातात. वासनारज्जूनें बांधून सोडलेले व जीवावरच उपजीविका करणारे जीर्ण जीव आपलें आयुष्य मोठ्या दुःखानें घालवीत असतात. ते वासनानुवृत्तीनें अतिशय जीर्ण होऊन दारिद्र्य, रोग, वियोग इत्यादिकांच्या दुःखभाराखालीं चिरडून जातात व शेवटीं नरकात पडतात.

वाल्मीकि--वसिष्ठ मुनि इतकें सांगत आहेत तों सायंकाळ झाला. त्यामुळें संध्योपासनादि करण्याकरिता सर्व सभासद स्वस्थानीं गेले व दुसऱ्या दिवशीं योग्यसमयीं आपापलीं नित्य कर्में आटोपून सभेंत येऊन बसले ७१. येथें तेरावा दिवस समाप्त झाला.

**सर्ग ७२**—शरीर भौतिक असल्यामुळें त्याविषयीं शोक करणें व्यर्थ आहे. दृश्यदर्शनसंबंध व शुद्धसाक्षी यांचें वर्णन.

**श्रीवसिष्ठ**—रामा, देह तुझा कोणी नव्हे. तूं निष्कलंक आत्मा आहेस. यास्तव देहसंबंधी जन्ममरणाशीं तुझा कांहीं संसर्ग नाहीं. भाड्यांतील बोरें गेलीं तरी भांडें नाहींसें होत नाहीं व भांडें फुटलें तरी बोरें नाहींशीं होत नाहींत. त्याचप्रमाणें देह व आत्मा यांतील एक ( देह ) गेला तरी

आत्मा नष्ट होत नाहीं. विनाशी देह नष्ट होऊन, आपली स्वाभाविक स्थिति प्राप्त झाली असता मी नाश पावतों, असें मानून ज्याचें मन खिन्न होतें त्या मूर्खास धिक्कार असो.–देह व आत्मा यांचा जर वास्तविक संबंध नाहीं तर शाखांच्या कंपानें वृक्ष जसा कंपायमान होतो त्याप्रमाणें देहाच्या प्रवृत्तीनें आत्मा ससारी कसा होतो ?–म्हणून विचारशील तर सागतों. अश्वादिकास बांधलेल्या दोऱ्या व रथ याचा संबंध प्रीति-योग्यता व द्वेषयोग्यता यानीं जसा रहित असतो तसाच देह, चित्त, इंद्रियें इत्यादिकाशीं चैतन्याचा संबंध स्नेह-उद्वेगशून्य असतो. सरोवरातील चिखल व निर्मल जल याच्या संबधा-प्रमाणेच देह-इंद्रियें व आत्मा याचा संबध परस्परप्रेमशून्य आहे. कल्पित वेताळाच्या-विक्राळ तोंड, दाढा-इत्यादिकांच्या योगानें वाटणाऱ्या भीतीप्रमाणें स्नेह-सुखादि मिथ्या आहेत एकाच झाडाच्या लाकडापासून केलेल्या नाना-प्रकारच्या बाहुल्याप्रमाणे भूतपंचकापासून झालेलीं शरीरें अगदीं निर-निराळ्या आकाराचीं असतात. काष्टभारात काष्ठावाचून जसें दुसरें कांहीं नाहीं त्याप्रमाणे भूतापासून झालेल्या शरीरपिंडात भूतावाचून दुसरें कांहीं नाहीं तेव्हा अहो लोकानो, पचभूताचा क्षोभ, नाश उत्पत्ति इत्यादि प्रसंगीं हर्ष, क्रोध व विषाद याच्या वश का होता ? स्वदेहाप्रमाणेच स्त्री-पुत्रादिकाच्या देहावरही आस्था ठेवणें सर्वथा अनुचित आहे. कारण त्याच्या रचनेंत जरी कांहीं फरक असला तरी शरीरद्रव्यात काही अंतर नसल्या मुळें अज्ञाप्रमाणेंच प्राज्ञानीं नुसत्या बाह्य आकारावर भुलून जाणें योग्य नव्हे. दोन चार दगडी, लाकडी किंवा चिरगुटाच्या बाहुल्या एकत्र केल्या असता त्याचा जसा परस्पर स्नेह बसत नाहीं त्याप्रमाणें पचभूताच्या योगानें बनलेल्या अनेक शरीराचा संयोग झाला तरी ज्ञानी प्रेमपाशबद्ध होत नाहीं. मातीच्या बाहुलींचा समागम झाला असता त्याचा जसा आशय असतो तसाच बुद्धि, इंद्रियें, आत्मा व मन याच्या सगमप्रसगीं तुझा असू दे. कारण बाहुल्याप्रमाणेंच देहादिकही प्रेमपात्रें नाहींत. मग त्याविषयीं शोक कसला ? तरंग तृणाला जसे एकत्र करितात त्याप्रमाणें देहदृष्टि भूताना (प्राण्याना) एकत्र करते. जलांमध्यें संयुक्त होऊन वियुक्त होणाऱ्या तृणाप्रमाणें प्राण्याचा सयोग व वियोग होत असतो. पण ‘ हीं माझीं व मी यांचा ही अंतःकल्पना सोडली कीं, मग दृष्टातातील तृणाप्रमाणेच दुःख होत

नाहीं. आत्मा चित्तवेष घेऊन भूतांस जोडतो (एकत्र करतो). यास्तव त्याला चित्ताचा वेषच घेऊं देऊं नये. म्हणजे आत्मज्ञानाने चित्तशून्य झालेला ज्ञानी भूतसमूहास आपल्यापासून फार दूर व खालीं पहातो. त्यामुळें तो देहातीत व अज होतो परप्रकाशास प्राप्त होतो. मदिरेची धुंदी उतरली असतां मद्यप्याला जसें वस्त्रादिकाचें भान होते त्याप्रमाणें देहात्मभाव सोडलेल्या त्याला प्रमाण-प्रमेयशून्य स्वात्म्याचा स्वयं अनुभव येतो. राघवा, महासत्त्वपदास पोंचलेले जीवन्मुक्त असाच व्यवहार करितात. उत्तम पुरुषाचा क्षय झालेला असल्यामुळें आपल्या उचित लोकव्यवहारानें ते म्लान होत नाहींत. तत्त्ववेत्त्यामध्यें रागद्वेष नसतो. जगाविषयीं मनाचे मनन हा विषयोन्मुख झालेल्या चित्-तत्त्वाचा विलास आहे, असें ते समजात. दृश्य-दर्शनसंबंधामुळें भासणारें हें सर्व व मी मनच आहे. दृश्य मूढदृष्ट्या सत् व ज्ञानिदृष्ट्या असत् असते. सत्-प्रमाणें स्वभावतःच असत् असलेल्या वस्तूविषयींही हर्षशोक करणें उचित नव्हे. राघवा, तू यथार्थदृष्टि हो. कारण यथार्थज्ञानी मोहित होत नाही. सर्व लोक भोगसुखाकरिता विषय व इंद्रियें याचा संबंध इच्छितात. पण ते भोगसुखही, त्याची भोग ही उपाधि सोडली म्हणजे वस्तुतः ब्रह्मरूपच आहे. कारण दृश्य व दर्शन याच्या संबंधामध्यें जी अखंडआनंदात्मक अनुभूति तीच मुक्ति होय, असें विद्वान् म्हणतात. तिचा आश्रय केला म्हणजे स्वरूपावरणदृष्टि जाते, व स्वरूपदृष्टि प्रकट होते. याप्रमाणें दृश्यदर्शनसंबंध-ज्ञान तुर्यत्वास प्राप्त होतें. आता तुर्यतालक्षण मुक्तीमध्यें आत्मा कशाप्रकारचा अवशिष्ट रहातो तें सांगतों. तो त्यावेळीं स्थूल, अणु, प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष, चेतन, जड, सत्, असत्, अहं, अनहं, एक, अनेक, समीपस्थ, दूरस्थ, अस्ति, नास्ति, प्राप्य, अप्राप्य, सर्व, असर्व, पदार्थ, अपदार्थ, इत्यादिकांतील कोणत्याही प्रकारचा नसतो. मनासह सहा इंद्रियांच्या द्वारा जे कांहीं ज्ञात होत असतें त्याच्या पलीकडे व शब्दानीं न सांगता येण्यासारखे तें तत्त्व आहे. ज्ञानी सर्व जगच आत्ममय पहातो. आकाशादि सर्व भूतामध्यें तो आत्म्याला पहातो. रामा, चित्–तत्त्वावाचून जगातील कोणत्याही वस्तूला सत्ता प्राप्त होत नाहीं. या वस्तूहून मी निराळा आहें, असें म्हणणे किंवा समजणें हें मूर्खपण आहे. यास्तव जगातील इतर सर्व कल्पना मिथ्या

असून एक आत्माच सत्य आहे, अशी भावना कर म्हणजे हे महात्मन्, तूं संसारातीत होशील ७२.

**सर्ग ७३**—तिन्ही अहंभाव सोडले ह्मणजे मुक्ति व वैराग्य हस्तगत होते.

**श्रीवसिष्ठ**—रामा, असा विचार केला असतां द्वैतत्यागानें स्वरूपावस्थिति प्राप्त होते. आतां आणखीं एक दृष्टि सांगतों, ती ऐक. म्हणजे तूं अचल व दिव्यदृष्टि होशील. मी आकाश आहे, वायु आहें, सूर्य आहे, मीच दैत्य, मीच देवलोक, दिवस, रात्र, तम, अभ्रे, भूमि, समुद्रादिक, रज, वायु, अग्नि व सर्व जगत् आहे. त्रिभुवनात मीच आत्मा सर्वत्र स्थित आहें. मी कोण, देहादि हें सर्व काय आहे? एकाला द्वित्व कसें आलें इत्यादिकाचा विचार करून जगाला आत्मरूपानें पहाणारा ज्ञानी हर्षविषादपरवश होत नाहीं. सर्व जर आत्ममय आहे तर या जगात आपलें काय व दुसऱ्याचे काय? रामा सात्त्विक, निर्मळ, तत्त्वज्ञानापासून प्रवृत्त होणाऱ्या, पारमार्थिक व मोक्षद दोन अहंकारदृष्टी आहेत. एक मी सर्वांहून निराळा व अति सूक्ष्म आहे ही व दुसरी सर्व मीच आहें ही. याहून निराळी आणखीं एक अहंदृष्टि आहे. ती 'मी देह आहें' असें समजणे ही होय. पण ती शांतीच्या उपयोगीं नसून दुःख देणारी आहे. यातील पहिल्या दोन दृष्टी शुभ असून तिसरी जरी अशुभ आहे तरी सर्वोत्तम सिद्धीकरितां अगोदर तिसरी व मागून पहिल्या दोन दृष्टी सोडाव्यात. आत्मा जरी सर्वातीत व सर्वसत्तातिगामी असला तरी तो सर्वप्रकाशक आहेच. तूं आपल्या अनुभवानेंच पहा. तू तोच सदा उदित परमात्मा आहेस. हे तत्त्वज्ञा, तू आशयासह हृदयग्रंथि सोड. आत्मा अनुमान, शब्द इत्यादि प्रमाणानीं गम्य नाहीं. तो सर्वदा सर्वथा स्वानुभवानेंच प्रत्यक्ष आहे. तो सत्, असत्, अणु, महत् इत्यादि कांहीं नाहीं. सदसत् इत्यादि रूपही नाहीं. तोच बोलतो, पण त्याच्याविषयीं बोलतां येत नाहीं. हा आत्मा व हा अनात्मा या भिन्न संज्ञाही त्यानेंच आपल्या स्वरूपांत सर्वगत शक्तीनें कल्पिल्या आहेत. तो भास्वर त्रिकालीं सर्वत्र स्थित आहे, पण अतिसूक्ष्म व अति महान् असल्यामुळेंच केवल दिसत नाहीं. तोच स्वतः पुर्यष्टकांत प्रतिबिंबित होऊन जीवभावास प्राप्त होतो व स्वाभाविकपणेंच स्वभावास विसरून बाह्यदृष्टि बनतो. पुर्यष्टकाचा उदय झाला म्हणजे मगच आत्म्याचा साक्षात् अनुभव येऊं लागतो. सर्व पदार्थांच्या सत्तेप्रमाणेंच हा महेश्वर

सर्वगामी असला तरी पाषाणात व्यक्त होत नाहीं. " तर पुर्यष्टकांत मात्र व्यक्त होतो. ज्याप्रमाणें सूर्य आकाशात असला म्हणजे लोकाना व्यवहार करण्याची इच्छा होते त्याप्रमाणें पुर्यष्टकात हा परम प्रेमास्पद आत्मा असला तर विचित्र भोगेच्छा उद्भवते. तेव्हां नित्य सत्तारूप आत्मा असताना देह जर नाश पावत असेल तर तो नष्ट होईना. आत्मा कधीं उत्पन्न होत नाहीं, मरत नाहीं, कधीं काहीं घेत नाहीं, इच्छीत नाहीं व तो मुक्त नाही आणि बद्धही नाहीं. पण त्याच्या या स्वरूपाचें विस्मरण झालें कीं अनर्थभ्राति होते. तो अनादि असल्यामुळे उत्पन्न होत नाहीं उत्पन्नच न झाल्याकारणानें मरत नाहीं आणि तो असा आहे हें कळलें म्हणजे आत्मातिरिक्त वस्तूचा असंभवच झाल्यामुळें कशाची इच्छा करीत नाहीं. दिशा, काल इत्यादिकाच्या योगाने मर्यादित न झाल्यामुळें हा कधींही बद्ध नाहीं. बधाभावीं मुक्ति कोठची? त्यामुळें अमोक्षच स्थित झाला.

साराश हे राघवा, सर्वांचा आत्मा एवगुणविशिष्ट आहे. पण केवळ अविचारवशात् हे मूढ जन रडत असतात. तुला आता पूर्वापर जगत्क्र॰ कळला आहे. यास्तव तूं तरी त्याच्याप्रमाणें दुःखी होऊ नकोस. बंध॰ मोक्षरूप भ्रम सोडून तुझ्या सारख्या विद्वानानें कळसूत्री यत्राप्रमाणें व्यवहार करावा. मोक्ष काहीं कोठे आकाशात, पाताळात किंवा भूपृष्ठावर राहिलेला नाहीं. तर यथार्थ ज्ञानयुक्त विमल चित्त हाच मोक्ष होय. कोणत्याही आशेमध्ये ससक्त न होता चित्ताचा आपोआप क्षय होणें यालाच तत्त्वज्ञ मोक्ष म्हणतात. जोवर विमल बोध उत्पन्न झालेला नाही तोंवरच प्राणी मूर्खपणामुळे दीन होऊन भक्तीनें मोक्षाची इच्छा करतो. पर बोध प्राप्त होऊन चित्त चित्-तत्त्वतेस प्राप्त झाले म्हणजे मग एकचसा काय पण दहा मोक्षही कोणी इच्छिगार नाहीं. यास्तव या सर्व कल्पना सोडून तूं महात्यागी हो व निःसंगमनानें वशपरपरेनें प्राप्त झालेल्या पृथ्वीचें पालन कर ७३.

**सर्ग ७४**—प्रमादामुळें संसारभ्राति, प्रबोधामुळें पूर्णता व जीवन्मुक्तगुण याचें वर्णन.

**श्रीवासिष्ठ**—ज्याप्रमाणे रम्य काता-पुत्रादिकांचें मुख दृष्टी न पडल्यामुळें विरही पुरुषाच्या चित्तांत म्लानता, कृशता इत्यादि देणारा उद्वेग

उत्पन्न होतो त्याप्रमाणें प्रलय व निद्रा-समयीं अज्ञानाच्या योगानें आच्छादित झाल्यामुळें आत्म्याला आपलें निरतिशय आनंदस्वरूप दिसेनासें झालें असतां काम—कर्म—वासनापरिपाक—क्रमानें प्राप्त झालेल्या सर्ग—जागरादि कालीं सहज चिद्विलासाच्या योगानेंच सूक्ष्म-स्थूल समष्टि व्यष्टि शरीर उत्पन्न होते. त्या देहद्वयाच्या योगानें त्यांच्या ठायीं अहंभावाध्यास होतो व त्यापासून ही राग-लोभ-मोहादि अनर्थरूप मिथ्या मायामदशक्ति उद्भवते. तिच्यामुळेंच हे सर्व झालें आहे. आत्माच मन, बुद्धि, अहंकार, वासना, इंद्रियें इत्यादि नामरूपानीं स्फुरत असतो. चित्त व अहंकार याचें द्वित्व वचनमात्र ( शब्दमात्र ) आहे. वस्तुतः नाहीं. जें चित्त तोच अहकार व जो अहकार तेच मन ( चित्त ) होय. बर्फापेक्षा त्याची शुभ्रता निराळी आहे अशी व्यर्थ कल्पना करीत असतात की नाहीं ? तसाच चित्त व अहंकार याचा भेद व्यर्थ आहे. पाढरे वस्त्र जळलें असता वस्त्र व त्याचें शुभ्रत्व हीं दोन्ही जशी नाहींशीं होतात. याप्रमाणें यातील कोणी तरी एक क्षीण झाले कीं दोन्हीं नाहींशीं होतात. तुच्छ मोक्षबुद्धि, बधबुद्धि व इच्छा याचा त्याग करून वैराग्य व विवेक याच्या योगाने केवल मनाचा क्षय करावा. मला मोक्ष प्राप्त व्हावा, अशी चिंता जरी आत उत्पन्न झाली तरी मन उत्पन्न होतें. तें मनन करू लागलें कीं शरीराकार होते. व त्याच्या द्वारा बाह्य प्रवृत्ति होऊन दोष उद्भवतो. यास्तव मनन निर्मूल कर. वायु, वृक्षाप्रमाणेच, देह व त्याचे अवयव याना हालवितो. पण सर्वव्यापी, सूक्ष्म व अचल चित्-ला हालवू शकत नाहीं. मेरूप्रमाणें स्थिर असलेली चित् स्वतःही हालत नाहीं. जिच्यामध्यें सर्व अर्थ प्रतिबिंबित झाले आहेत अशी केवल स्वात्म्यामध्येंच स्थित असलेली ती चित् दीपाप्रमाणें आपल्या बोधप्रकाशानें जगास प्रकाशित करते. तेव्हां हा मी, हें माझें, इत्यादिकास अवकाश कोठें आहे ? ज्ञातृत्व, कर्तृत्व, भोक्तृत्व व असेच दुसरेही आरोपित भाव मृगजळासारखे मिथ्या आहेत. हा सर्व अविद्येचा खेळ आहे. ही अज्ञताच मनोरूपी मत्त पशूस ओढून नेते. ती वस्तुतः असत्य असूनही सत्य आहे, असा भ्रम होतो. पण तिचें यथार्थ स्वरूप कळलें म्हणजे ब्राह्मणामध्यें जशी चाडाळकन्या उभी राहत नाहीं त्याप्रमाणे ती विद्वानामध्यें क्षणभरही रहात नाहीं. तर पळून जाते. रामा, परमार्थ ज्ञानाच्या योगानें वासनाही सळून नष्ट होते. अविद्या

नाहीं, असा निश्चय शास्त्र व युक्ति यांच्या द्वारा झाला कीं, ती आपोआप उन्हांतील बर्फाप्रमाणें वितळते. या जड देहाकरितां भोगसाधनें संपादन करून काय करावयाचें आहे? त्याची काहीं गरज नाहीं; असा निश्चय झाला कीं आशामल पार नाहींसा होतो. आशा गेली कीं पुरुषाचा मुखचंद्रमा चमकू लागतो. त्यावरील दीनता पार नाहींशी होते. तो अति शीतळ होतो. दरिद्र्याला राज्य मिळालें असता त्याला जसा आनंद होतो त्याप्रमाणें आशारहित पुरुष परम सुखी होतो. त्याचा आनंद त्याच्या शरीरात मावत नाहीं. त्याचा सर्व क्षोभ नाहींसा होतो. तो परम धैर्य व स्थैर्ययुक्त होतो. अमृतप्राशन केल्याप्रमाणें तो तृप्त होतो. तो आपल्याच शुद्ध चित्तात सर्वात्मक, सर्वगत, सर्वेश, सर्वनायक, सर्वाकार व निराकार स्वात्म्यास पहातो. पूर्वीच्या चित्तचाचल्याचें व कामपीडेचें स्मरण झालें असता त्याला हसू येतें. विषयी-जनाचा संग व विषयानुरंजन यापासून दूर झालेला तो शांतचित्त, अध्यात्मरति, पूर्ण व पावनमानस होऊन रहातो. द्वंद्वदोष व भय यातून मुक्त व संसारसागरातून उत्तीर्ण झालेल्या त्याला अलभ्य पदप्राप्ति झाल्याकारणानें अत्युत्तम विश्रांति मिळते. पुनरावृत्तिशून्य साम्राज्यास प्राप्त झालेला तो शरीर, मन व वाणी याच्या योगानें काहीं करीत नाही. सर्व जन ज्याच्या आचरणास ग्राह्य समजतात असा तो काहीं वांछीत नाहीं सर्वांनी ज्याच्या आनंदास अनुमोदन दिलें आहे असा तो स्वतः कशालाही अनुमोदन देत नाहीं. तो काहीं देत नाहीं; घेत नाहीं, कोणाची स्तुति करीत नाहीं, निंदा करीत नाहीं; त्याचें स्वरूप कधी गुप्त होत नाहीं व कधीं उदय पावत नाहीं; तो संतुष्ट होत नाहीं व शोक करीत नाहीं. तो सर्व कर्माचा त्याग करणारा, सर्व उपाधिशून्य, व सर्व आशारहित होतो. म्हणूनच तो जीवन्मुक्त होय. सर्व इच्छा सोडून मनाने मौनी व्हावे मनात बिंबलेल्या निराशेप्रमाणे तरुण स्त्रीचे दृढ आलिंगनही सुख देत नाहीं. नैराश्य जसें सुखी करते तसा चंद्रही आह्लाद देत नाहीं. नैराश्यामुळे ज्याचें मन सम झालें आहे असा उदारबुद्धि मौनी जसा शोभतो तसा पुष्पपूर्ण नूतन-लतायुक्त वसंतही शोभत नाहीं. नैराश्यापासून जें शैत्य प्राप्त होतें ते हिमालय, मोत्यें, केळीचें वन, चंदन, व चंद्र यापासूनही प्राप्त होत नाहीं. राज्य, स्वर्ग व कांतासमागम याहून नैराश्याचे सुख अधिक आहे. त्रिभुवनसंपत्ति तृणासारखी तुच्छ आहे,

असें जिच्या योगानें वाटत असतें, ती परा शांति नैराश्यापासूनच प्राप्त होत असते. निःस्पृहाला त्रिभुवन तृणासारखें वाटतें. आशापाशांतून सुटलेले जन घेणे, देणें इत्यादि जगातील क्रियांना हसत असतात. ज्याच्या हृदयात कलना कधींही उत्पन्न होत नाहीं त्या निःस्पृहाला उपमा कशाची देणार? मला हें हवें व हें नको, असें ज्याला वाटत नाही त्याची कोणाशीं तुलना करता येणार? नैराश्य हें बुद्धीचें परम सौंदर्य आहे. आशा तुझी नाहीं व तूं आशाचा नाहींस व जगत् हा मिथ्या भ्रम आहे. मग तूं व्यर्थ मोहित का होतोस? मी इतका बोध करीत असतानाही हे माझें व हा मी असा संकल्प भ्रांतचित्ताने का करतोस? जगत् एकरूप आहे, आत्ममय आहे, असें जाणून धीर खिन्न होत नाहींत. भाव-अभाव इत्यादि विसवाद सोडून आद्यन्त-अवस्थेत असणाऱ्या रूपाचा अवलंब कर. तेच पदार्थाचें खरें स्वरूप आहे. सिंहापासून हरिणी जशी पळून जाते त्याप्रमाणे वैराग्यामुळें वीर झालेल्या मनापासून ही अति मोह पाडणारी संसारी माया पळून जाते. धीरबुद्धि पुरुष तरुण कांतेस सुकलेल्या वेलीप्रमाणें अथवा शुभ्र दगडाच्या बाहुलीप्रमाणें पहातो. भोग त्याला आतून आनंद देत नाहींत, आपत्ती खेद देत नाहींत व दृश्यशोभा त्याला आकर्षण करून घेत नाहींत. स्मरशर त्याला व्याकुळ करूं शकत नाहींत. ज्ञानी रागद्वेषांना थाराच देत नाहींत. मग त्याना वश होण्याची गोष्ट तर बाजूलाच राहू दे. वाटसरु क्षणभर विश्रांति घेण्याकरिता ज्याच्या छायेंत बसतो त्या वृक्षावर जसा आसक्त होत नाहीं तसाच आत्मज्ञ विषयात रममाण होत नाहीं. पण अनायासानें प्राप्त झालेल्या सर्वांचा लीलेनें भोग घेतो. तो त्याच्या दुःखाला किंवा सुखाला कारण होत नाहीं. कारण त्याला तात्कालिक भोगजन्य सुख व दुःखही जरी होत असले तरी त्यामुळें तो क्षुब्ध होत नाहीं. तर सदा सर्वभूतांतर्गत आत्मपदाचा आश्रय करून रहातो. ब्रह्मदेव जगत् उत्पन्न करीत असतानाही जसा आत्मपरायण असतो त्याप्रमाणें तो कार्यें करीत असतानाही अव्यग्र रहातो. देशकालानुरूप प्राप्त होणाऱ्या सर्वांस सहन करतो. मन असक्त असल्यास, नुसत्या इंद्रियानीं अनिषिद्ध विषयात मग्न होणारा पुरुष वस्तुतः मग्न होतच नाहीं. (म्हणजे अंतःसंगच दूषित करतो. बहिःसंग नव्हे.) सोनें आंतील कलंकानेंच कलंकित होतें. बाहेरच्या माती, चिखल, इत्यादिकांच्या लेपानें खरोखरी कलंकित होत नाहीं.

अंत:संगाचा त्याग केला म्हणजे शरीराचा एकादा अवयव कोणी कापला तरी त्यामुळें ज्ञानी पुरुषाला दु:ख होत नाहीं. आत्मा देहातिरिक्त आहे या गोष्टीचें विस्मरण झाल्यास पुनः दु:ख होईल म्हणून म्हणशील तर सांगतों. एकदा अमुक एक आपला बंधु आहे, असें कळलें म्हणजे तो जसा पुनः अज्ञात होत नाहीं त्याप्रमाणें सदा उदित तत्त्व एकदा ज्ञात झालें म्हणजे पुन: त्याचें विस्मरण होत नाहीं. सर्पभ्रांति एकदा निवृत्त झाली म्हणजे पुन: त्याच रज्जूच्या ठायीं सर्पभ्रम होत नाहीं; वर्षाकाळची नदी एकदा पर्वताच्या कड्यावरून खालीं पडली म्हणजे पुन: वर चढत नाहीं; तापवून शुद्ध केलेले सोनें मातींत पडले तरी मलिन नाहीं; होत त्याप्रमाणें हृदयग्रंथि एकदा क्षीण झाली म्हणजे गुणाच्या योगानें पुन: बंध उत्पन्न होत नाहीं. देंठापासून सुटलेलें फळ पुन: दीर्घ प्रयत्नाने तरी त्याला चिकटविता येईल का? पाषण फोडून त्याच्या उदारातून मणि काढल्यावर पुन: त्याला तेथें बसविता येत नाहीं. त्याप्रमाणें ही सर्व अविद्या पसरली आहे, असे कळल्यावर पुन: त्यात मग्न कोण होणार? ही चाडाळांची यात्रा आहे, असें कळल्यावर त्यात कोणी तरी ब्राह्मण जाईल का? शुद्ध जलाच्या ठिकाणची दुग्धबुद्धि जशी विचारानें निवृत्त होते त्याप्रमाणें संसारवासना बुद्धिस्थ आत्म्याच्या विचाराने निवृत्त होते हें मद्य आहे, असें कळलें नाहीं तोंच ब्राह्मण ते जलाच्या समजुतीने तोंडापाशीं नेतो; पण त्याचे तत्त्व कळलें कीं तो त्याचा तत्काळ त्याग करतो. तत्त्वज्ञ लोक रूपलावण्ययुक्त असलेल्या स्त्रीलाही चित्रातील स्त्रीप्रमाणें पहातात. चित्रातील स्त्री जशी लाल, काळा, पिवळा इत्यादि रगानीं रंगविलेली असते त्याप्रमाणें ही मासमय स्त्रीही रक्त, मास, केस, इत्यादिकाच्या योगानें बनविलेली आहे. मग तिच्याविषयीच एवढी आसक्ति का? गुळाच्या गोडीचा अनुभव आला असता त्याला बदलून तिखट किंवा खारट करण्याचें जसे दुसऱ्या कोणाचें सामर्थ्य नाहीं त्याप्रमाणें आत्म्याचा अनुभव कोणालाही बदलता येत नाहीं. व्यभिचारिणी स्त्री गृहकर्मे करीत असतांनाही आतल्या आत परसंगाचें चिंतन करीत असते त्याप्रमाणें ज्ञानी व्यवहारसमयींही आंत आत्मानुभव घेत असतो. ऋद्ध परतत्त्वामध्यें विश्रांति घेणाऱ्या धीराला इंद्रादि देवही स्वरूपापासून चाळवूं शकत नाहींत परपुरुषाचें व्यसन लागलेल्या स्त्रीला, तिच्या कोणत्या बलाढ्य पतीनें

कल्पित कांताच्या सहागमसुखाचें विस्मरण पाडलें आहे ? कोणत्याही नाहीं. त्याचप्रमाणें महात्म्याच्या बुद्धीस आनंद-चित्-तत्त्वाचा विसर कोण पाडणार ? व्यसनी जन कितीही संकटें ओढवलीं तरी तीं सहन करून जसें आपलें इष्ट व्यसन पुरें करून घेतात त्याप्रमाणें ज्याचा अविद्याबंध तुटून गेला आहे, असा सदाचरसंपन्न सम्यग्दृष्टि पुरुष व्यवहार करीत असतांनाही आंतल्या आत सुखच घेत असतो. त्याचे अवयव जरी तोडले तरी तो तुटत नाहीं. त्याच्या नेत्रांतून अश्रु गळत असले तरी तो रडत नाहीं. त्याला जाळलें तरी तो जळत नाहीं व तो देहतः नष्ट झाला तरी स्वरूपतः नष्ट होत नाहीं.

तात्पर्य, हे रामचंद्रा, मनोनाश होई तों ज्यानें ज्ञानभूमिकांचा अभ्यास केला आहे असा पुरुषश्रेष्ठ प्रारब्धप्राप्त फलानुरूप दारिद्र्यादि हीन दशेंत संकटावस्थेंत, पर्वतावर, वनांत किंवा तपोवनांत जरी रहात असला तरी सदा सुख दुःखसंबंधरहित असतो. ७४.

**सर्ग ७५**--मोटमोठ्या अधिकारावर आरूढ असतांना हर्षशोकरहित रहाणाऱ्या अनेक मुक्त देव-असुर-नरांचें वर्णन

**श्रीवासिष्ठ**—निमिराज्यभार वहात असतांना व तदनुरूप व्यवहार करीत असतांनाही आंतन शांतचित्त व संतापशून्य होता तुझा पूर्वज दिलीप सर्व उचित कर्मामध्यें तत्पर असतांनाही विरक्त मनानें दीर्घकाल पृथ्वीचा उपभोग घेत राहिला होता. रागादि मलशून्य असल्यामुळें ज्ञानी व जीवन्मुक्ताकार मनु दीर्घकाल जनतेचें पालन करीत होता. विचित्र बलशाली योद्ध्यांच्या अनेक भयंकर युद्धांत व व्यवहारांतही दीर्घकाल निमग्न झालेला मांधाता परम पदास प्राप्त झाला आहे. पाताळांतील बलि व्यवहार सत्य असल्याप्रमाणें करीत होता तरी सदा त्यागी, सदा असक्त व जीवन्मुक्त होता. दानवाधीश नमुचि देवांशीं द्वंद्वयुद्ध करण्यांत सदा निमग्न असे. पण तो मनामध्यें कधीं खिन्न झाला नाहीं. इंद्राशीं युद्ध करीत असतांना शरीराचा त्याग करणारा उदार, मानी व देवशत्रु वृत्र आंत सदा शांतचित्त असे. दानवाचीं उचित कर्में करणारा व पाताललोकाचा पालक प्रल्हाद नित्य व अनिर्वाच्य सुखास प्राप्त झाला. रामा, मायेमध्यें तत्पर असलेला पण ज्याचें चिदाकाश सदा उदित आहे असा शंबरासुर या संसारमायेस सोडून शांत झाला. त्या विरक्त पण कुशल मायाव्यानें, हरीशीं युद्ध करीत

असतांनाही, सर्वोत्तम ज्ञानसंपन्न होऊन शरीरत्याग केला. सर्व देवांचें मुखच असा अग्नि क्रियासमूहांत परायण असूनही चिरकाळ यज्ञलक्ष्मीचा उपभोग घेतो व यालोकीं मुक्त होऊनच रहातो. ज्याचें चित ब्रह्ममय आहे, असा सोम आकाशाचें आक्रमण करीत असताना व देव त्याचें प्राशन करीत असतानाही सुख-दुःखरहित असतो. देवगुरु बृहस्पति स्त्री-करिता चंद्राशीं कलह करीत असतानाही मुक्तच होता. आकाशतलास प्रकाशित करणारा ज्ञानी शुक्र ( दैत्यगुरु ) निर्विकारमनानेंच काळ घाल-वीत होता. वायु सर्व प्राण्याच्या शरीरास हालवीत व सदा सर्वत्र सचार करीत असतानाही मुक्त रहातो. ब्रह्मदेव सृष्टिरचनेसारखें अति कठिण कर्म करीत असला तरी समचित्तानेंच आपले दीर्घ आयुष्य घालवितो. भगवान् हरि मुक्त असूनही जरा, मरण, युद्ध, द्वद्व इत्यादि लीलेनें यालोकीं चिर-काल व्यवहार करीत रहातो. मुक्त शकरानेंही एकाद्या कामुकाप्रमाणें गौ-रीला आपल्या अर्धांगीं धारण केलें आहे. मुक्त गौरीनेंही गौरवर्ण शक-राला हाराप्रमाणें आपल्या गळ्यात बाधून ठेवले. सर्व ज्ञानरूपी रत्नाचा सागर, अशा महाबुद्धिमान् षडाननानें तारकासुरादिकाशीं रणक्रिया जरी केली तरी तो आतून मुक्त होता. भृंगी या नावाचा एक शिवगण होता. तो देवीचा अनादर करून एकट्या शकाराचीच आराधना करण्यात तत्पर असे. त्यामुळें गौरीला क्रोध आला व तो हात जोडून प्रसन्न होण्याविषयीं प्रार्थना करू लागला असता देवीनें-माता व पिता यांच्या शोणित—शुक्रा-पासून झालेल्या आपल्या शरीरातील मातृभाग मला निराळा करून दे, असे सांगितलें. तेव्हा त्या धीराने तिला रक्त-मास काढून दिलें, अशी पुराणात कथा आहे. तिच्या अनुरोधाने भृंगी देखील रक्तमास देत अस-तानाही ध्याननिर्मल व मुक्त बुद्धीनें स्थित होता. नारद मुनि मुक्तस्वभाव असूनही शात चित्तानें कळी लावीत जगभर फिरत असतो. हा मान्य प्रभु विश्वामित्र जीवन्मुक्त असूनही वेदोक्त यज्ञक्रिया करीत आहे. शेष पृथ्वीला धारण करतो. सूर्य दिवसपरंपरा करतो व यमही जीवन्मुक्त होऊन प्राण्याचें नियमन करतो. राघवा, असे आणखीं दुसरेही अनेक देव, दानव, यक्ष व नर मुक्त होऊन ससारांत स्थित आहेत. अतःकरणांत शीतळ असलेले काहीं ज्ञानी विचित्र आचरणयुक्त व्यवहारात निमग्न अस-तात. काहीं पाषाणासारखे मुक्त होऊन रहातात व भृगु, भरद्वाज,

विश्वामित्र, शुक इत्यादि कित्येक अरण्यांत जाऊन रहातात. छत्र-चामरांनीं सुशोभित झालेले जनक, शर्याति, मांधातृ, सगर इत्यादि कित्येक राज्य करीत होते व आहेत. बृहस्पति, शुक्र, चंद्र, सूर्य इत्यादि कित्येक ज्योतिश्चक्रात स्थित आहेत. अग्नि, वायु, वरुण, यम इत्यादि काहीं ज्ञानी देव होऊन विमानात बसले आहेत. बलि, सुहोत्र, प्रऱ्हाद, इत्यादि काहीं जीवन्मुक्त पातालांत आहेत. कर्मदोषांमुळें कांहीं ज्ञानी तिर्यक्योनीमध्येंही रहातात व देवामध्येंही काहीं मूर्ख निपजतात. कारण सर्वव्यापी आत्म्यामध्यें सर्व सर्वत्र संभवतें. विधीची नियती काहीं विचित्र आहे. विधि, दैव, विष्णू , धाता, सर्वेश, शिव, ईश्वर, इत्यादि नावें या प्रत्यक्चेतन-आत्म्यालाच प्राप्त होत असतात. ईश्वराच्या मायेनें अवस्तूमध्यें वस्तु मिळते. वाळूत सोने सापडतें व वस्तूतही अवस्तु असते. सोन्याच्या कणांतही मळ असतो. युक्तीनें पाहू लागले असता अयुक्तामध्येंही युक्त आढळतें. रामा, पापाच्या भयानेच लोक धर्मामध्यें निरत हात नाहींत काय? हे साधो, असत्यामध्येंही शाश्वत सत्यता दिसते. शून्य ध्यानयोगानें शाश्वतपद प्राप्त होतें. देशकालवशात् नसलेलेंही एकादें कार्य उदय पावतें. जादूच्या खेळात सशानाहीं शिंगे दिसतात. वज्रासारखा दृढ (अक्षय वाटणाऱ्या) वस्तूंचाही कालवशात् क्षय होतो. चंद्र, सूर्य, पृथ्वी, सागर, देव इत्यादि कल्पांतीं नाश पावतात. याप्रमाणे हे महाबाहो, भावाभावाविषयीं विचार करून व हर्ष, शोक, इच्छा, द्वेष यास सोडून सम हो या संसारांत असत् सत् दिसतें व सत् असलेलें असत् भासतें. यास्तव त्याच्याविषयींची आस्था व अनास्था सोडून सत्वर सम हो. तत्वज्ञानाच्या अभावीं कोट्यवधि लोक संसारपरंपरेत पडत असतात पण तें झालें म्हणजे जीवन्मुक्त अथवा विदेह-मुक्त पुरुष पुनः जन्ममरणपरंपरेंत पडत नाहींत. मुक्ति उज्ज्वल विवेक व अविवेक याच्यायोगानें सुलभ व दुर्लभ झाली आहे. मनःक्षय झाल्यानें ती प्राप्त होते ज्याला उत्कर्षाची इच्छा असेल त्यानें आत्मज्ञानाविषयीं यत्न करावा. आत्मदर्शनानें सर्व दुःखाचा शिरच्छेद होतो. आतां तूं कदाचित् म्हणशील कीं पूर्वीच्या लोकाना मुक्ति मिळत होती; पण ती सांप्रतकाळीं मिळणें शक्य नाहीं. पण तें बरोबर नाहीं. कारण राग (आसक्ति) व अहंकार यानी रहित असलेले महाबुद्धिमान् पुरुष वर्तमानसमयींही पाहिजे तितके जीवन्मुक्त होऊं शकतात. सुहोत्र, जनक

इत्यादि जीवन्मुक्त हल्लीं आहेतच. यास्तव वीरा, वैराग्य व विवेक यांच्या योगानें महाबुद्धिमान् व समलोष्टाश्मकांचन होऊन यालोकीं विहार कर. मागें सांगितल्याप्रमाणे मुक्ति दोन प्रकारची आहे. असत्संगामुळें मनाची शांति होणें हीच विमुक्तता होय. ती देह असला तरी व नसला तरी संभवते. स्नेहाचा सर्वथा क्षय हेंच उत्तम कैवल्य आहे. ते देहाचा भाव किंवा अभाव असला तरी संभवतें. ज्याचें जीवित स्नेहयुक्त असतें तो बद्ध, जो निःस्नेह होऊनच जिवंत रहातो तो जीवन्मुक्त व जो दृढ अभ्यासबलानें मरणोत्तर निःस्नेह होतो तो विदेहमुक्त होय. साधनचतुष्टयातील पूर्व पूर्व साधनाविषयींच्या प्रयत्नाने उत्तर उत्तर साधन संपादन करून विजयी व्हावें. यत्न व युक्ति यावाचून गोष्पदही दुस्तर होतें. केवल मोहाचा आश्रय करून व यत्नाविषयींचा निश्चय सोडून विपुल दुःखाकरितां आत्म्याला अनात्मवश करूं नये. निश्चयी मनानें मोठे धैर्य धरून सिद्धीकरिता यत्न करावा. निश्चयी पुरुषाला जगत् टीचभर होतें. बुद्ध सुंदर विचारवान् झाला. कपिल पुष्कळ विचार करूनही यथार्थ निश्चय करण्यास समर्थ न झाल्याकारणानें त्रिगुणसाम्यावस्थारूप प्रकृतीलाच तत्त्व समजू लागला. कोणी एक वेदनिंदक राजा आत्म्याचे चित्स्वभावत्व जाणून तो शरीरा-एवढाच ( म्हणजे मध्यम परिमाणवान् ) आहे असें समजला. (म्हणजे त्यानें त्याला अनित्य केलें.) व पुष्कळ वेदवेत्ते महात्मे विवेक व वैराग्य यांच्या योगानें सत्य-आनंदपदास प्राप्त झाले, पण तें सर्व प्रयत्न-कल्पवृक्षाचेंच महाफल आहे ७५.

**सर्ग ७६**--संसारसागर, त्याच्या तरणाचा उपाय व तरून गेल्यावर यथेच्छ क्रीडा याचें वर्णन.

श्रीवसिष्ठ—हे राघवा, सर्व भुवनें ब्रह्मापासून उत्पन्न होतात; अविवेकानें त्यांचें स्थैर्य होतें व विवेकानें तीं नष्ट होतात. ब्रह्मसागरातील जगत्-लहरींची गणना करण्यास कोण समर्थ आहे? अयथार्थ ज्ञान हेंच जगत्स्थितीचें कारण आहे व यथार्थ ज्ञान हाच त्याच्या शांतीचा उपाय आहे. या सागराचें पर तीर दिसणें फार दुर्घट आहे. युक्ति व प्रयत्न यावाचून त्यांतून पार होता येतच नाहीं. हा सागर मोहरूपी जलपूरानें भरलेला असतो. अगाध मरणरूपी भोंवऱ्यांनीं भयंकर झालेला असतो. पुण्यरूपी फेसानें कोठें कोठें शोभायमान होतो. दीप्त नरकरूपी वडवाग्नीनें संतप्त झालेला असतो. तृष्णारूपी

चंचल लाटा व मनोरूपी जलहस्ती याच्या योगानें दुर्लंघ्य होतो. जीवित-रूपी शेकडों नद्या त्याला येऊन मिळतात. भोगरूपी रत्नाचा हा एक अगाध करंडाच आहे. यामध्यें रोग हेच क्षुब्ध सर्प सर्वतः पसरलेले असतात. इंद्रियरूपी सुसरींनीं हा अति घातुक झाला आहे. या संसार-सागरांतील स्त्रिया याच लाटा आहेत. त्या पर्वतासारख्या धीर पुरुषांनाही ओढून नेतात. राघवा, अशा दुस्तर समुद्रातून पार होणें हें मोठ्याच पुरुषार्थाचें काम आहे. पण उत्तम प्रज्ञारूपी दृढ नौका व विवेकरूपी कुशल नावाडी याचा लाभ झाला असताही जे या सागरातून तरून जात नाहींत त्याना धिक्कार असो. पारावारशून्य अशा याचें आक्रमण करून (तत्त्वदर्शनानें बाध करून) व त्याला ब्रह्ममात्र करून जो त्यात प्रवेश करतो (प्रत्यगात्म्यालाही ब्रह्मरूप करतो) तोच पुरुष होय. श्रेष्ठ आत्म-ज्ञासह विचार करून व स्वबुद्धीनें ससारसागराचें तत्त्व जाणून नंतर त्यात जो क्रीडा करतो तोच चागला शोभतो. रामा, तूं धन्य आहेस. कारण तूं आपल्या विचारपर बुद्धीनें इतक्या अल्पवयातही त्याचा विचार करूं लागला आहेस तुजप्रमाणेच जो प्रथम विचार करून अति रम्य बुद्धीनें संसारात प्रवेश करतो तो त्यात बुडत नाहीं. सर्पाप्रमाणें भयप्रद असलेल्या भोगाचा प्रथम विचार करावा व नतर त्याचा उपभोग घ्यावा. ऐश्वर्याचें विचारपूर्वक तत्त्व जाणून सेवन केलें म्हणजे मोठा उत्कर्ष होतो व अवि-चारानें भोगलेलें ऐश्वर्य केवल दुःख देतें. वसंत ऋतूंत वृक्षाच्या सौंदर्यादि गुणाप्रमाणें तत्त्वज्ञाची बुद्धि व तेज वाढते. हे रघुनंदना, तुला तत्त्व कळल्यामुळें तू आता आनदामृतपूर्णसंपत्तीनें अतिशय शोभत आहेस ७६.

सर्ग ७७ – प्राज्ञास मस्तक व उरःस्थल या ठिकाणीं धारण करण्यास योग्य असलेली जीवन्मुक्तगुणाची माळा.

श्रीराम—मुनिराज, आपलें भाषण कितीही ऐकलें तरी कान तृप्त होत नाहींत. यास्तव भगवन्, ज्यानें तत्त्वचमत्कार पाहिला आहे अशा पुरुषाचें उदार वृत्त मला सागा.

श्रीवसिष्ठ—प्रिय शिष्या, मी तुला जीवन्मुक्ताचें लक्षण बहुत प्रकारें सागितलें आहे. पण पुनः आणखीं सागतो ऐक. वितृष्ण पुरुष हें सर्व सुषुप्तासारखें पहातो. जिवंतपणींच तो जणु काय केवलतेस प्राप्त झालेला आत्मज्ञ मनाला निजवून सोडतो. तो आनंदाच्या धुंदींत निमग्न

होतो. प्रथम नेत्रादिकानीं ग्रहण केलेलें; व नंतर हातानीं उचललेलेंही धन-वस्त्र-अलंकारादि तो बुद्धिपूर्वक घेत नाहीं. कारण त्याची इंद्रियें जरी बाह्य व्यापारात निमग्न असली तरी बुद्धि अंतर्मुख असते. प्राण्याचा हा सर्व संचार कळसूत्री बाहुल्यांच्या संचाराप्रमाणें परप्रयुक्त आहे, असें अंतर्दृष्टीनें पाहून शांतबुद्धि पुरुषास त्यावर अहंकार ठेवणाऱ्या लोकांचें हसू येते. ज्ञानीही सर्व करतो. पण तो भावि कृत्यांची अथवा फलाची अपेक्षा करीत नाही. वर्तमान कृत्यात आसक्त रहात नाही व मागच्या गोष्टींचे स्मरण करीत नाही तो व्यवहाराविषयीं सुप्त ( निद्रित ) असला तरी स्वात्म्याविषयी प्रबुद्ध असतो व व्यवहारात दक्ष असला तरी फलाविषयी निजल्यासारखा असतो. बाहेरून सर्व कर्म करतो, पण आतून कांही करीत नाही. कर्तृत्वाभिमान सोडून तो प्राप्त क्रिया आप्तादिकांचें मनोरंजन करीत एकाद्या आसक्त पुरुषाप्रमाणें करतो खरा, पण आतून उदासीनाप्रमाणें असतो. इच्छा, द्वेष, शोक, हर्ष या भावांना मनात थारा देत नाहीं. तो सर्व सुखभोगाचा स्वतः आत्माच असतो. अनुकूल व प्रतिकूल प्राण्याविषयी तो एकसारखीच बुद्धि धारण करतो. तो भक्ताविषयीं भक्तासारखे आचरण करणारा, शठाशी शठतुल्य होणारा, पोरामध्यें पोर, थोरामध्ये थोर, धीरामध्यें धीर, तरुणाच्या गोष्टीमध्ये तरुण आणि दुःखितामध्ये दुःखितासारखा होतो. पण त्या सर्वापेक्षा याच्यामध्ये एक विशेष असतो तो हा–ज्ञानी बोलू लागला असता पुण्यकारक कथाच सांगतो. बालाप्रमाणे व्यर्थ प्रलाप करीत नाही. त्याचें चित्त दैन्याचा आश्रय करीत नाही. त्याची बुद्धि सात्त्विक धैर्याने युक्त असते. तो सदा आनंदी असतो. बालाप्रमाणे कांहीं वेळ सुखी होत नाही. तो सौम्यवृत्ति, पुण्यकारक कीर्तन करणारा, प्राज्ञ, प्रसन्नमुख, खेदरहित व सर्वांचा स्निग्ध बांधव, उदार चरित, सम व शीतल ( सर्व संतापहारक ) असतो. सुकृत व दुष्कृत यांचा त्याला कांहीं उपयोग होत नाहीं. कार्यकारणारंभ, नैष्कर्म्य, बंध, मोक्ष, स्वर्ग यातील त्याला कांहीं नको असते. त्याचे मन सुख दुःखाच्या अप्राप्ति-प्राप्तींमुळे कृपण होत नाही. ज्ञानाग्नीने संदेहजाळें जळले कीं त्याचा चित्तपक्षी निःशंकपणें उडून जातो. त्याचें भ्रांतिशून्य मन सर्व दृष्टींत समरस असतें. तें अस्त किंवा उदय पावत नाही. पाळण्यांत निजलेल्या बाळकाप्रमाणें त्याच्या अंगाची चेष्टा अनुसंधानावाचूनच होत

असते. कार्यप्रयुक्त सुख-दुःखाच्या योगानें त्याचें चित्त कलुषित होत नाहीं. त्याला कशाचाही विस्मय वाटत नाहीं. कारण चिदात्म्याच्या शक्ती पाहिजे तें करूं शकतात, असा त्याच्या मनाचा निश्चय असतो. दया, दैन्य, क्रौर्य, लज्जा, अलज्जा इत्यादिकांचेंही तो अनुसंधान करीत नाहीं. तो दीन, उद्धत, प्रमत्त, खिन्न व हर्षवान् नसतो. त्याच्या हृदयांत कोपादिक उत्पन्न होत नाहींत. रामा, ज्यामध्यें प्राणी सतत उत्पन्न होत आहेत व मरत आहेत अशा या संसार स्थितींत (या जगांत) सुखिता व दुःखिता कशी, कोठें व कितिशी असणार? फेंसासारख्या क्षणिक भूताविषयीं सुख-दुःखांचा प्रसंग कसा व कोठें येणार? या सर्व लोकदृष्टी स्वप्नाप्रमाणें आहेत. सुखदुःख क्षीण झालें असता ग्राह्य, त्याज्य, इष्ट, अनिष्ट, शुभ, अशुभ, या दृष्टी गळतात. रम्य व अरम्य दृष्टि जाऊन, भोगेच्छा गळली व नैराश्य सतत वाढत गेले म्हणजे मन वितळून जातें मन समूळ क्षीण झालें म्हणजे संकल्पाचें नावही घ्यावयास नको. कारण तीळ जळले म्हणजे तेल कोठले निघणार? सारांश बा रघूत्तमा, हें सर्व असत् आहे, या दृढ भावनेनें सर्व भावाविषयींचा संकल्प नाहींसा झाला म्हणजे त्या महात्म्याचें चित्त प्रसादशाली होतें, त्यामुळें तो नित्यतृप्त व सदा एकरूप होतो आणि प्रारब्धक्षयाची प्रतीक्षा करीत जिवत राहतो ७७.

**सर्ग ७८**—चित्तस्पंदामुळें जगद्भ्रांति होते. यास्तव योगाभ्यासानें त्याचा निरोध करावा.

**श्रीवसिष्ठ**--कोलित फिरवूं लागले असतां जसें अग्निचक्र दिसतें तसें चित्तस्पंदामुळें जगत् भासतें. जलाच्या भोंवऱ्याप्रमाणें जग हा चित्ताचा भोंवरा ( आवर्त ) आहे. आकाशांतील विविध शोभेप्रमाणें चित्तस्पंदा-पासून होणारी ही जगाची विविध शोभा आहे.

**श्रीराम**--चित्त कोणत्या निमित्तानें स्पंदयुक्त होतें व तें निश्चल कसें होईल, ते मला सांगा.

**श्रीवसिष्ठ**--रामा, बर्फ व शुभ्रता, तिळ व तेल, पुष्प व सुगंध, उष्णता व अग्नि यांच्याप्रमाणें चित्त व चित्तस्पंद एकरूप झालेले आहेत. त्यातील भेद खरा नव्हे. तो कल्पित आहे. यास्तव त्यांतील कोणत्या तरी एकाचा क्षय केला कीं दोघांचा क्षय होतो. चित्ताच्या नाशाचे-ज्ञान

व योग-असे दोन उपाय आहेत. यथार्थदर्शन हे ज्ञान व चित्ताच्या वृत्तींचा निरोध करणें हा योग होय.

**श्रीराम**—भगवन्, केव्हां व कोणत्या प्राणापानसंबंधी योगनामक युक्तीनें अनंत सुखप्रद मनःशांति मिळते.

**श्रीवसिष्ठ**—या देहांत व देहनाडीमध्यें जो हा वायु सर्वतः स्फुरण पावत असतो त्याला प्राण असें म्हणतात. स्पंदवशात् आत निरनिराळ्या क्रिया करणाऱ्या त्यालाच अपान, व्यान इत्यादि नावें विद्वानानीं योजलीं आहेत. प्राण व चित्त याचें ऐक्य होतें. सुगंध व पुष्प याप्रमाणें हा प्राणसंज्ञक चित्ताचा आधार चित्तरूप झाला आहे. आतील प्राणपरिस्पंदामुळें संकल्प करण्यास सज्ज झालेली संवित्च चित्त होय. प्राणस्पंदामुळेंच चित्चा स्पंद होतो. चित्स्पंदामुळें ज्ञान होते. चित्त प्राणपरिस्पंदाच्या अधीन आहे, असें वेदवेत्ते म्हणतात. यास्तव प्राणनिरोध केला म्हणजे मन शांत होतें व मनःस्पंदाची शांति झाली म्हणजे हा संसार लीन होतो.

**श्रीराम**—गुरुवर्य, देहरूपी गृहामध्यें सतत संचार करणाऱ्या वायूचा रोध कसा करिता येईल?

**श्रीवसिष्ठ**—शास्त्र व सज्जन यांचा संपर्क व वैराग्याभ्यास यांच्या योगानें पूर्वसंसार-वृत्तींमध्यें अनास्था केली असता व इष्ट ईशाचें ध्यान केलें असतां चित्त एकाग्र होतें. त्यानंतर एकाच तत्त्वाचा दृढ अभ्यास केला असता प्राणस्पंदाचा निरोध होतो. पूरकादिकांच्या योगानें प्राणाचा आयाम ( दीर्घता ), सहज दृढ अभ्यास व एकांत-ध्यान-योग यांच्या योगानें प्राणस्पंदाचा निरोध होतो. दीर्घ उच्चारलेल्या प्रणवाच्या चवथ्या मात्रेचा अवलंब केल्यामुळें बाह्य विषयज्ञानाचा आत्यंतिक उपशम झाला असता प्राणस्पंद निरुद्ध होतो. रेचक व पूरक यांचा दीर्घ अभ्यास व ध्यान यांच्या योगानेंही प्राणनिरोध करतां येतो. कुंभक, कुंभांतील जलाप्रमाणें, निश्चल झाला म्हणजे प्राणस्पंदाचा निरोध होतो. योगशास्त्रांत सांगितलेल्या पद्धतीनें यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान व समाधि यांच्या अभ्यासानें प्राणनिरोध करतां येतो. गुरु किंवा ईश्वर यांच्या अनुग्रहामुळें झटकन ज्ञान होऊन झटकन चित्तोपशम झाल्यानेंही

प्राणस्पद प्रतिबद्ध होतो. सूक्ष्म हृदयाकाशात चित्ताला स्थिर केले असता आत्मसाक्षात्कार होऊन प्राणस्पद निरुद्ध होतो.

बा साधो, या सृष्टींत भूताचें हृदय दोन प्रकारचें आहे. एक हेय (त्याज्य) व दुसरें उपादेय (ग्राह्य).शरीराच्या एकाभागीं उराच्या आत असलेले हे मर्यादित हृदय हेय आहे व ज्ञानमात्र हृदय उपादेय आहे. तें आत व बाहेरही आहे. अथवा तें नि.सग असल्यामुळे आत नाहीं व बाहेरही नाहीं. तेच मुख्य हृदय असून त्याच्या आत हें सर्व त्रिभुवन साठविलेले आहे. तोच सर्व पदार्थाचा आरसा व सर्व सपत्तीचा कोश आहे. वस्तुतः सवित् हेच सर्व प्राण्याचे हृदय आहे. उरात असलेला एक जड मासाचा तुकडा नव्हे यास्तव सर्व वासना सोडून सवित्-रूप शुद्ध हृदयात चित्ताला बलात्काराने नियुक्त केले असता प्राणस्पद निरुद्ध होतो. अनेक अनुभवी गुरूनी सागितलेल्या या व असल्याच दुसऱ्याही उपायानी प्राणनिरोध करावा. पण हठयोगाने त्याला वश करण्याचा प्रयत्न करू नये हळु हळु अभ्यासानेच पूर्वोक्त युक्ती भाग्यवानाच्या ससारभगास कारण होतात. अभ्यासानें दृढ व वैराग्याने चिह्नित झालेलाच वासनाशून्य प्राणायाम सफल होतो. एवढ्यासाठींच योगशास्त्रात भ्रमध्यादि निरनिराळ्या स्थानीं धारणेचा अभ्यास करावयास सागितले आहे. अभ्यासानें प्राण शात होतो. अभ्यासानेच पुरुष आत्माराम, वीतशोक ( शोकशून्य ) व अत.सुख होतो. यास्तव तू अभ्यास कर. अभ्यासानें प्राणाचा परिस्पद क्षीण झाला असता मन शात होते व निर्वाण अवशिष्ट रहाते. वासनावेष्टित मन हाच जन्म व वासनाशून्य मन हाच मोक्ष होय. प्राणस्पद हेच मनाचे रूप आहे व त्यापासून ससारभ्रम होतो. यास्तव तोच शात झाला म्हणजे ससारज्वर आपोआप उतरतो. विकल्पाश गेला कीं तें पावन पद अवशिष्ट रहाते. त्याचे वाणीनें वर्णन व मनानें सकल्प करता येत नाहीं त्या निर्गुणाला दृष्टान्त कशाचा देणार. कारण त्यावाचून सर्व विनाशि, कल्पित व सगुण आहे. अत करणात चिच्चद्रिका उदय पावली कीं हृदयामध्ये गुप्त असलेलें तत्त्व व्यक्त दिसू लागते. त्या कल्पतरूपासून असख्य रसाळ संसार-फळें नित्य उदय व क्षय पावत असतात. तें तत्त्व म्हणजे सर्व मर्यादाची परा काष्ठा आहे. त्याचा आश्रय करून जो रहातो तो स्थिरचित्त पुरुष जीवन्मुक्त होतो. रामा, मुक्तचित्त पुरुषोत्तम

विषयभोगोत्कंठाशून्य, हिताहितवासनारहित व सर्व व्यवहारात सम ( हर्ष-विषादरहित ) असतो व त्यामुळें तो साक्षात् भगवान् होतो ७८.

**सर्ग ७९.**—चित्तनाशाच्या ज्ञानरूप दुसऱ्या उपायाचें निरूपण.

**श्रीराम**—भगवन्, योगयुक्त चित्ताचा शम सांगितलात. आतां कृपा करून सम्यग्–ज्ञानाचे वर्णन करा.

**श्रीवसिष्ठ**—रामभद्रा, आदि-अंतरहित, ज्ञानस्वरूप, एक परमात्मा या सृष्टीत आहे, असा असाधारण व अमर्यादाकार निश्चय करणे यालाच ज्ञानी यथार्थ ज्ञान म्हणतात. हे घट-पटप्रभृति शेकडों पदार्थ आत्माच आहे, असा निश्चय करणे, हेच यथार्थ ज्ञान होय. अयथार्थ ज्ञानानें जन्म व यथार्थ ज्ञानानें मोक्ष. अज्ञानामुळे रज्जु सर्प होते, पण तिला प्रमाणतः जाणले म्हणजे सर्प कोठें नाहींसा होतो. संकल्पांशरहित, विपयवर्जित व स्वप्रकाश स्वभावामुळेच सर्वतः प्रसिद्ध होणारी संवित् या मुक्तींत असते. शुद्ध संवित् हाच परमात्मा. तोच विषय. त्यामध्ये द्वैतकल्पनाच नाही. आत्माच सर्व जगत्. मग बंध-मोक्ष कोठचा? ब्रह्म सर्व मोठ्या पदार्थांहून अति मोठें आहे. त्याच्या ज्ञानानें द्वैतभ्रम शांत होतो. यास्तव रामा, तूंही या सम्यग्-ज्ञानानें आत्मा हो. त्यानंतर तुला काष्ठ, पाषाण, वस्त्रें इत्यादिकांचा भेद भासणार नाहीं. द्वैत, अद्वैत, जरा, मरण इत्यादि भ्रमाच्या योगानें आत्माच स्फुरतो. अंतःस्थ बुद्धीने शुद्ध आत्म्याला सतत आलिंगन देऊन जो रहातो त्याला कोणते भोग बद्ध करण्यास समर्थ होणार आहेत? ज्यानें फार विचार केला आहे त्याला कामादि सहा रिपू थोडी सुद्धा पीडा देऊं शकत नाहीत. आशापरायण अविचारी मूढासच दुःख गिळून टाकीत असतात. सर्व जग आत्माच आहे, अविद्या कोठेंही नाहीं, या दृष्टीचा आश्रय करून तूं सम्यग्रूप होऊन रहा. कारण आत्मनि-श्चयवान् पुरुष मुक्तच आहे, असे म्हणतात ७९.

**सर्ग ८०**—ज्या दृढविमर्शाच्या योगाने समोर आलेल्या दिव्य भोगाचीही इच्छा होत नाहीं त्याचें वर्णन. चित्तवेतालाचे निरसन.

**श्रीवसिष्ठ**—राघवा, याप्रमाणें मनांत सतत विवेक करणाऱ्या ज्ञानी पुरुषास पुढें आलेल्या भोगाविषयींही इच्छा होत नाहीं. कारण नेत्र केवल पहाण्याकरिता आहेत. सुखदुःख भोगण्याकरितां नाहींत. त्याचा भोक्ता

जीव आहे. बैल भार वाहण्याकरितांच असून भाराचा धनी दुसराच असतो. तेव्हां नेत्र रूपामध्यें निमग्न झाले असतां देही आत्म्याला क्षुब्ध होण्याचें काय कारण ? रजकाच्या भारवाहक गर्दभांतील एकादा चिखलांत रुतला तर त्यांत रजकाची शरीरतः कोणती हानि आहे ? देही नेत्रांचा स्वामी असल्यामुळें विचारानें त्याला त्याचें निवारणही करतां येतें. विचार असा करावा.—हे अधम नयना, या रूपकर्दमाचा स्वाद घेऊं नकोस. कारण तें एका निमिषांत नष्ट होऊन तुझाही घात करील. असा बोधरूप विचार करून सर्व इंद्रियांना विषयपराङ्मुख करावें. असा विचार करणारा प्राज्ञ विषयास आपल्या स्वाभाविक प्रकाशनशक्तीनें प्रकाशित करतो. पण त्यांत रुतून रहात नाहीं. अरे नेत्रा, असन्मय, विनाशी व आपातरमणीय रूपाचा, मृत्यूच्या मुखांत प्रवेश करण्याकरितां, आश्रय करूं नको. सर्वार्थ-प्रकाशक परमात्मा उदासीन. प्रकाश्य विषयही स्वस्थ. मग बा नेत्रा, तूंच व्यर्थ कां संतप्त होतोस ? आपल्या साक्षीला पहा. चित्ता, नेत्र जरी रूपादि विषयांकडे जात असले तरी तूं त्यांच्यामध्यें आसक्त कशाला होतेंस? अथवा चित्तही जरी इंद्रियांच्या द्वारा विषयाकार होत असलें तरी हे अहंकारा, तूं त्याचे ठिकाणीं अभिनिवेश कशाला ठेवतोस ? रूपदर्शन व मनःसंकल्प हे परस्पर असबद्ध आहेत. पण आरसा व मुख यांच्याप्रमाणें परस्परसंबद्ध असल्यासारखे दिसतात. अज्ञानतंतूनें याना एकमेकांशीं शिवून टाकलें आहे. पण ज्ञानरूपी कातरीनें तो ततु तोडून टाकला म्हणजे ते पृथक् व असन्मय होऊन रहातात. मनःसकल्पानेंच ते परस्पर सुसबद्ध झाले आहेत. अभ्यासानें मनाचा नाश करून विचारानें अज्ञानाला तोडून टाकलें म्हणजे रूपदर्शन व मनःसंकल्पादिक याचा संसर्ग होत नाहीं. चित्त सर्व इंद्रियांना जागे करीत असतें. यास्तव घरांतील पिशाचाप्रमाणें त्याचाच उच्छेद करावा. अरे चित्ता, तूं व्यर्थ गडबड करीत आहेस. तुझा बाध करण्याचा उपाय मी शोधून काढला आहे. भूत व भविष्यत् कालाप्रमाणें तूं वर्तमानसमयींही असत् आहेस. तेव्हा इंद्रियांनीं आणून पोंचविलेल्या शब्दादि पांच विषयांच्या योगानें तूं व्यर्थ कष्ट कां करीत आहेस ? जो प्रमाता ( जीव ) तुला आपलें म्हणून समजत असतो त्याचेंच उपकरण होऊन तूं असें व्यर्थ नाचत असतेंस. मज चिदेकरस उदासीनाकरितां नव्हे. अरे दुष्ट मना, तुझें हें नृत्य मला थोडासाही

संतोष देत नाहीं. गारुड्याच्या मायेंतील मनःस्पदाप्रमाणें वृत्तींमध्यें तूं व्यर्थ जळत आहेस. चित्ता, तूं रहा अथवा जा. तू माझें नाहींस व जिवंतही नाहींस. आपल्या स्वाभाविक असत्त्वामुळेंच तूं मृत आहेस. पण मी आणखीं चांगला विचार केला म्हणजे अगदीं मृत (अत्यंत असत्) होशील. तूं निस्तत्त्व, जड, भ्रांत व शठ आहेस. मूढालाच तूं अज्ञानाच्या योगाने बाधा करतेस. विचारवानाला नाहीं. इतके दिवस मिथ्या असलेल्या तुला आम्ही जाणलें नव्हतें. पण दिवा लावताच तिमिर असत् आहे, हें जसे साक्षात् कळतें त्याप्रमाणें ज्ञान होताच आता तूं आम्हाला मृत असल्यासारखें झालें आहेस. आजवर तूं माझें देहगृह अडवून धरलें होतेंस. त्यामुळें शम, दम, विचार, बोध याना त्यांत शिरावयास अवकाशच मिळत नसे. पण हे शठ मना, आतां तूं जड व प्रेततुल्य झाले आहेस. त्यामुळें आजपासून हें माझें गृह शमादि सर्व सज्जनास संसेव्य होईल. हे जगद्रूप चित्तवेताळा, तूं पूर्वीच नव्हतेंस. आतां तर मुळींच नाहींस. पुढेंही नसशील. पण याप्रमाणें मी तुझा त्रिकालीं निषेध करीत असतांनाही येथें राहण्याची तुला लाज वाटत नाहीं. तृष्णा पिशाची व कोपादि गुह्यक यासह हे चित्तवेताळा, तूं माझ्या शरीरगृहातून निघ. मोठी संतोषाची गोष्ट आहे कीं, केवल विवेकाच्या योगानेच मत्त चित्तवेताळ देहमंदिरांतून निघून गेला. काय चमत्कार आहे! या जड व क्षणभगुर मनानें सर्व जीवास परवश करून सोडले आहे. अरे भित्र्या मना, देहाला आत्मा समजल्यामुळें आपोआप मेलेल्या लोकानाच तूं मारतेंस. यांत तुझा कोणता मोठा पुरुषार्थ आहे? तुझ्यामध्ये धैर्य असेल तर मज अद्वितीय आत्मभूत वीरावर चालून ये तूं असत् आहेस, असें जाणणें हाच तुझा वध असल्यामुळें मला आतां तुला मारण्याची गरजच राहिलेली नाहीं. तुझ्या सहायाची आशा सोडून आतां मी आत्म्यामध्यें सुखरूपपणें राहीन. मन मरतांच चिंता सती गेली व विचारमंत्रानें अहकारराक्षस गाडला गेला. आतां मला आपल्या शरीरगृहांत सुखानें नांदण्यास कोणत्याही प्रकारची अडचण नाहीं. एक, कृतकृत्य, नित्य, निर्मळ व निर्विकल्प चिद्रूप अशा मलाच नमस्कार असो. मला शोक नाहीं; मोह नाहीं; मी स्वतःच नाहीं; व अन्यही कोणी नाहीं. मला आशा नाहीं; कर्मे नाहींत; संसार नाहीं; कर्तृता नाहीं; व भोक्तृता नाहीं. देहही माझा नव्हे. मीच आदि,

याता, मीच चित् व मीच सर्व भुवनें आहें. मला मर्यादा मुळीच नाहीं. खरोखर अशा मला नमस्कार असो. निर्विकार, नित्य, निरंश, सर्व इत्यादि शब्दांनी लक्षित होणाऱ्या मला नमस्कार असो. सम, सर्वगत, सूक्ष्म व जगदेकप्रकाशिनी सत्तेस मी प्राप्त झालों आहे. या माझ्या स्वय अजर, अमर, गुणातीत, अच्युत, ईश्वर स्वभावास मी नमस्कार करतो ८०.

**सर्ग ८१**—अनुभव व युक्ति याच्या योगानें चित्ताची असत्ता.

**श्रीवसिष्ठ**—राघवा, याप्रमाणें आतल्या आत चागला विचार करून तत्त्ववेत्त्या महात्म्यानी जाणावें. ज्या चित्तानें आत्माच हे सर्व आहे, असा बोध करून दिला तेच पुनः कसे उठणार? कारण त्याचाही जगात अतर्भाव होत असल्यामुळें जगाबरोबर तेही असत् होतें नौकेंत बसून जात असलेल्या अज्ञाला तीरावरील वृक्ष चालत आहेत, असा भ्रम होतो पाळण्याच्या चक्रात बसलेल्या मनुष्याला आसपासचे सर्व पदार्थ धावत आहेतसे वाटतें. पण तो जसा शुद्ध भ्रम त्याप्रमाणे चित्त हा भ्रम आहे. ते वस्तुत. नाहीच. तर केवळ ब्रह्म आहे. बाह्य व आभ्यतर पदार्थभावना चित्तापासून उद्भवतात. म्हणून ते पदार्थही असत् आहेत, असे जाणून मी त्याचा त्याग केला आहे. त्यामुळे माझे सर्व संदेह शात झालेले असून मी ज्वररहित होऊन स्वस्थ आहें. चित्ताच्या अभावीं माझे चाचल्य, तृष्णा इत्यादि गुण क्षीण झाले आहेत. मन मेल्यामुळ तृष्णेप्रमाणें मोह व अहकारही क्षीण झाले आणि मी आता जाग्रतीतच जागा झालो आहे. शात जगत् एकरूप आहे. त्यात नानात्व मुळीच नाही, तेव्हा आता मी दुसऱ्या कशाचा विचार करू ? ही कथाच पुरे झाली. मी एका चित्ताच्या अभावी अनाद्यन्त व निराभास पावन पदास प्राप्त झालों आहे. मी आता सौम्य, सर्वगत, सूक्ष्म, व शाश्वत आत्मा झालो आहे. आत्म्याची शाश्वत साम्यता उदय पावल्यावर चित्त आहे, की मेले, कीं गेले, कीं त्याचें काय झाले ? याचा विचार करून काय करावयाचें आहे ! मी आपल्याच मूर्खपणामुळे विचार न करिता आजवर देहाद्याकार होऊन राहिलों होतों. पण आता विचाराने अमित-आकार झालो आहें. विचार करणारा कोठे गेला आहे, हेंही कळेनासें झाले आहे. पण मन मरून गेल्यावर मला विचार करणाराविषयीं तरी व्यर्थ कल्पना करून काय करावयाचें

आहे ? यास्तव मी आता हा विचारही सोडतो. मी आता शांत व मूक होऊन आत्म्यामध्ये स्थिर रहातों.

राघवा, तत्त्वज्ञानें जाणे, येणे, भोजन करणे, निजणे, उभे रहाणे इत्यादि प्रसंगीं असा सतत विचार करावा. या विचारानें सज्जनाला शांत अवस्थेंत रहाता येतें. कर्मकाळींही त्यांना उद्वेग होत नाहीं. महामतिमान् पुरुषच मान-मदादि सोडून प्रकृत व्यवहारांत विहार करीत असतानाही शांतचित्त राहू शकतात ८१.

**सर्ग ८२**—वीतहव्याने चित्तैकाग्र्य सिद्ध होण्याकरिता इंद्रिये व मन यांस केलेला बोध

**श्रीवसिष्ठ**—रामराया, पूर्वी बृहस्पतीच्या संवर्तनामक विद्वान् भ्रात्यानें असाच विचार केला व विंध्याद्रीवर त्याने तो मला सांगितला. यास्तव तूंही या दृष्टीचा आश्रय करून विचारपर बुद्धीनें संसारसागरांतून तरून जा. रामा, मी आता तुला आणखीं एक परम पदप्रद दृष्टि सांगतो. तिच्या योगानें वीतहव्य मुनि निःशंकपणे पावन पदीं आरूढ झाला. पूर्वी एकदा तो महात्मा विंध्यपर्वतावर समाधि लावून रमण्यास योग्य गुहा हुडकीत पुष्कळ वेळ वनांत हिंडला. कारण त्याला या घोर संसाराविषयीं पूर्ण वैराग्य आले होते. निर्विकल्प समाधीच्या अंशानेही प्राप्त होणाऱ्या उदार परमात्म्याच्या इच्छेनें त्यानें जगव्द्यापार सोडला होता. उचित गुहा न मिळाल्यामुळे त्याने आपल्याच हातानें एक केळीच्या पानाची पर्णकुटी बांधली व तिच्यामध्ये तो आनंदाने राहू लागला. शुद्ध व सम प्रदेशीं त्यानें आपले हरिणाजिन हांतरले व त्यावर तो निश्चल होऊन बसला. पद्मासन, सरळ मान, अर्धोन्मीलित दृष्टि इत्यादि करून त्या महात्म्यानें आपलें मन सर्वतः आवरले. त्याने बाह्य व आभ्यंतर स्पर्श क्रमानें सोडले व तो निष्पाप मनाने असा विचार करू लागला—

हु ! काय चमत्कार आहे, नदीच्या प्रवाहांत पडलेल्या पानाप्रमाणें कितीही प्रयत्न केला तरी मन स्थिर होत नाहीं. हाताने उडविलेल्या चेंडूप्रमाणें ते एकसारखे वर उडते. तें पूर्व पूर्व वृत्ति सोडून उत्तर-उत्तर वृत्ति धारण करते. त्याला ज्या विषयापासून परतवावें त्याच्याकडेच तें मुद्दाम धावते. तें घट सोडून वस्त्राकडे जातें; वस्त्राला सोडून लाकडाला आपला विषय करतें, त्याला सोडून दगडाचा आश्रय करते. तात्पर्य

अनेक वृक्षावरून फिरणाऱ्या माकडाप्रमाणें तें अनेक विषयाचा क्रमानें विचार करीत सुटतें. मनाचीं नेत्रादि पांच द्वारें आहेत. त्यांना इंद्रियें असें म्हणतात. पण तीं अतिशय दुष्ट आहेत. हे चंचल इंद्रियांनो, मला आत्मदर्शन करविण्यास तुम्हांला अवकाशच नाहीं कीं काय ? व्यर्थ चापल्य कशाला करितां ? मागच्या दुःखाचें स्मरण करा. तुम्ही मनाचींच विशेष रूपें असून जड आहां. पण पाषाणाप्रमाणें जड असलेल्या तुमच्यामध्ये ही चंचलता कोठून आली ? तुमचें हें औद्धत्य अंधाच्या धांवण्याप्रमाणेंच तुम्हांला अंधकूपांत पाडील.—आम्ही जर जड आहोंत तर दर्शनादि व्यापार कोण करतें ?—म्हणून विचाराल तर सांगतों. भगवान् चिदात्मा मी साक्षिरूपानें हें सर्व करतों. तुम्ही व्यर्थ आकुल होऊं नका. तुम्ही सत्यस्वरूपशून्य आहां. तुम्हांला जाणणाऱ्या या बहुज्ञ साक्षीहून तुम्ही पृथक् आहां. सर्पाला पाहून भ्यालेल्या वाटसरूप्रमाणें अथवा चांडालास भ्यालेल्या ब्राह्मणाप्रमाणें चिन्मात्र इंद्रियापासून दूर रहातें. अहो इंद्रियांनो, चित्सत्तेनेंच तुमच्यामध्यें क्षोभ होतो.

हे चित्ता, आपल्याच अनर्थाकरितां जगांत व्यर्थ विहार कशाला करतेंस ? मी सचेतन आहें, ही तुझी वासना व्यर्थ आहे. कारण अत्यंत भिन्न असलेल्या चित्-शीं तुझें ऐक्य होणें अशक्य आहे मी जिवंत रहातें, ही तुझी अहंकारदुर्मति व्यर्थ आहे. शरीरच मी आहें हा दुरहंकार सोड. संविच्चित्त अनाद्यनंत आहे. त्यावाचून दुसरें कांहीं नाहीं. तेव्हां चित्त हे कोण ? व कोठून आलें ? अरे चित्ता, तुझी कर्तृ-भोक्तृकल्पना कांहीं कामाची नाहीं. मूर्ख इंद्रियांचा आश्रय करून तूं उपहासास पात्र होऊं नकोस. तूं जड आहेस. साक्षि तुला सचेतन करतो. तेव्हां भोगाचें तूं कोण व भोग तुझे कोण ? तुज जडाला आत्मा सुद्धां जर नाहीं तर बंधु-मित्रादि कोठून असणार ? जें जड असतें तें स्वभावतः असत असतें. त्याच्या ठिकाणीं ज्ञत्व, कर्तृत्व, भोक्तृत्व संभवत नाहीं. तूं प्रत्यक्चेतन-रूप आहेस म्हणून म्हणावें तर आत्मा हें तुझें शरीर असल्यामुळें तुला सदा निर्विकल्प अवस्थेंत रहाणेंच उचित आहे. दुःखद कर्तृत्वादिभावना करणें योग्य नव्हे. पण तूं अचेतन असून कर्तृत्वादिकांचा अंगीकार केला आहेस. यास्तव मी आतां त्यांचें प्रमार्जन कसें युक्तीनें व हलु हलु करतों तें पहा. तूं तर स्वतः जड आहेस, यांत संशय नाहीं. जडाला कर्तृत्व

कोठचें ! शिळा कधीं तरी नाचली आहे का ! कळसूत्री बाहु-लीप्रमाणें तूं ईश्वराच्या बळावर जिवंत रहातेस, इच्छा करतेस, मारतेस व वृथा चेष्टा करतेस. ज्याच्या शक्तीनें जें होतें तें त्याचेंच कृत्य होय. सुरी, कुऱ्हाड इत्यादि साधनें वेल, वृक्ष इत्यादिकांस, तोडणाऱ्या पुरुषाच्या सामर्थ्यानें, तोडतात. यास्तव त्यांना खरोखरी तोडणारा पुरुषच आहे. जो ज्याच्या शक्तीनें मरतो तोच त्याला मारणारा होय. तरवार पुरुषाच्या शक्तीनें त्याच्या शत्रूस मारते. यास्तव पुरुष हा त्याला मारणारा आहे. पात्रानें पेय पिणारा पुरुष पाता (पान-कर्ता) आहे; पात्र नव्हे. त्याचप्रमाणें हे चित्ता, तूं स्वभावतः जड आहेस. सर्वज्ञ आत्मा तुला बोधसपन्न करीत असतो. परमेश्वर आत्मा तुला सतत ज्ञानशक्ति देत असतो. अज्ञाना ज्ञानसपन्न करणे हे ज्ञान्याचे कर्तव्यच आहे. तुझे नांव व रूपही आत्मबोधाधीन आहे. आत्माच आपल्या अज्ञा-नामुळें तुझ्यासारखा झाला आहे व तो आपल्या ज्ञानानेंच तुझ्या रूपा-पासून मुक्त होत असतो. यास्तव तू मूढ व मृत आहेस. परमार्थतः तू नाहींस. यास्तव व्यर्थ अध्यास करू नकोस. चिज्जड–अध्यासामुळेंच तुला दुःख होतें. अरे मूढा, तू आत्मत्वबोधानें चिन्मय जर झालेस तर परम पदाहून मुळींच भिन्न रहाणार नाहींस. मग तुला शोकाचें कारणच काय आहे. कारण तें पद सर्वग सर्वभावस्थ व सर्वरूप आहे. यास्तव तें प्राप्त झालें ह्मणजे अप्राप्त असें कांहीं रहात नाहीं. वस्तुतः तूं नाहींस व देह नाहीं. तर एक महत् ब्रह्मच हें सर्व स्फुरत आहे. मित्रा, तूं कर्ता नव्हेस. उगीच शोक करू नकोस ईश्वर शोच्य मुळींच नाहीं. तूं माझें ऐक व त्याला अनन्य शरण जा. तो सर्वाधार तुला आपल्या स्वरूपांत घेईल.

राघवा, याप्रमाणें इंद्रियें व मन याना नानाप्रकारचा आत्मतत्त्वोपदेश करीत व त्यांना निश्चयानें आपल्या अधीन आणीत त्या पर्णकुटींत तो महात्मा वीतहव्य राहिला ८२.

**सर्ग ८३—चित्त व इंद्रियें असत तों सर्व अनर्थ व त्यांच्या अभावीं निरंतर सुख.**

**श्रीवसिष्ठ**—दशरथपुत्रा, तो मुनिवर्य शुद्ध बुद्धीनें आपल्या इंद्रिय-गणास पुनः असा बोध करूं लागला.

इंद्रियांनो, तुमची ही मिथ्या सत्ता केवळ दुःखाला व नाशालाच कारण होणारी आहे. यास्तव तिला सोडा. माझ्या या उपदेशानें

तुमची सत्ता गेलीच आहे, असें मी समजतो. तुह्मी अज्ञानापासून झाला अहा. चित्ता, तुझीही तशीच अवस्था आहे. अग्नींत खेळणें म्हणजे आपलें अग भाजून घेणेंच आहे. तू असलेंस तर या सर्व ससारभावना व समार भावनाच्या योगानें दुःखवृष्टी. चित्ता, तुझ्यामुळेच ही रडविणारी व हसविणारी विपत्ति व संपत्ति. अनेक रोग व जरा–मरण हा तुझाच अनुग्रह आहे. अपवित्र व दुराचारी कामरूपी कोंबडा हृदयास उकरीत असतो. लोभादि इतर पक्षी आपल्या तीक्ष्ण चोंचीनीं या शरीररूपी वृक्षावरील गुणास तोडीत असतात. मोठ्या मोहरात्रीमध्यें अज्ञानघुबड हृदयवृक्षावर घू घू करीत असतें. साराश हे चित्ता, तू व ही इंद्रियें असलीं म्हणजे या व अशाच दुसऱ्याही अशुभ शोभा अनुभवास येतात. पण तुम्ही आत्मरूप झालात म्हणजे सर्वच शुभश्री, मोहरहित हृदय फार शोभतें. तुमचा लय झाला कीं सर्वास अह्लाद देणारी, शात व परम पावन मैत्री उत्पन्न होते. चिंता नष्ट होते. ज्ञानप्रकाश प्रकट होतो. हृदय प्रसन्न, अति गभीर, अक्षुब्ध व वायुरहित शात समुद्राप्रमाणें सम होते पुरुष आतून अतिशय शीत व अमृतरसाने पूर्ण होऊन रहातो. आत्माकार वृत्ती विकास पावतात. त्यामुळें चराचर जग बाधित होऊन तें सचित्‌चाच एक अश होऊन रहातें. जळलेल्या पानात जसे रस येत नाहीत त्याप्रमाणे त्याच्या चित्तात आशापाश उद्भवत नाहींत. तात्पर्य, हे चित्ता, परिवारासह तुझा क्षय झाला म्हणजे हे व असेच दुसरेही गुण पुरुषामध्ये येतात. हे अभाशी मना, तू असत् झालेस म्हणजे सर्व आशा तुटतात व तू विद्यमान असलेंस म्हणजे त्या पुष्ट होतात, असा अबाधित नियम आहे. यास्तव आतां तुला यातील जो पक्ष कल्याणकर वाटत असेल त्याचाच स्वीकार कर. स्वात्मभाव हेंच तुला सुख देणारें आहे, असें मला वाटतें. यास्तव आपल्या अभावाची भावना कर. सुखाचा त्याग करणें ही मूढता आहे. चित्ता, तुझें हें प्रसिद्ध रूप जर सत्य असते तर त्याचा अभाव व्हावा असे कोणींही इच्छिलें नसतें पण तें सत्य नाहीं. मी हें श्रुति, शास्त्र व अनुभव यांच्या योगानें विचार करून सांगत आहे. आत्मरूप होऊन राहण्यात खरें सुख आहे. मी आहें, असे जरी तुला वाटत असलें तरी ती भ्राति आहे. पण ती आता विचारानें क्षीण झाली आहे. हे साधो, अविचार हेंच तुझें स्वरूप असल्यामुळें विचार करताच तूं सम (सन्मात्ररूप, विक्षेपशून्य) होतेस. प्रकाशाने

जसें तम त्याप्रमाणे विचाराने तू शांत होतेंस. हे मित्रा, आजपर्यंत अल्पविवेकतेमुळे तू पुष्ट होत होतेंस व त्यामुळें तुला दुःख होत असे.—पण असत् असलेले मी पुष्ट कसे होईन—म्हणून म्हणशील तर सांगतों. केवळ मोहसंकल्पाने, बाळानें कल्पिलेल्या वेताळाप्रमाणे, तुझी पुष्टि संवनीय आहे. तुझ्या स्वरूपांत विलक्षण फरक पाडणाऱ्या विवेकास नमस्कार असो. हे चित्ता, आतां तू स्वतःच बहुतप्रकारें प्रबुद्ध झाले आहेस व तुजवर चांगले शास्त्रसंस्कारही घडले आहेत. त्यामुळें तुझी चित्तता जाऊन तू स्वतः परमेश्वर होऊन राहिलें आहेस. तुझ्या कल्याणाकरिताच तुझे प्राचीन स्वरूप तुला प्राप्त झालें आहे. आतां सर्ववासनांपासून सर्वथा मुक्त झालेले तूं महेश्वरच आहेस ज्याची उत्पत्ति अविवेकामुळेच झालेली असते त्याचा विवेकाने नाश होणे हा न्यायच आहे. हा तुझा सर्वतोमुख नाश सुखोदर्क आहे.

असो, तर हे चित्ता, सिद्धांतयुक्तींनी तू नाहीस, असा मी निर्णय केला आहे. आतां हे इंद्रियांच्या ईश्वरा, तुझे उदंड कल्याण होवो. स्वस्ति भवते. तुझ्या असत्तेनेच मला परमपुरुषार्थाचा लाभ झाला आहे. मी अखंड शांतीचा अनुभव घेत आहे. मी आत्म्यामध्ये स्थित आहे. मी तुर्यपदी आरूढ झालो आहे. मी आत्मा आहे व आत्म्यावाचून काही नाहीं. स्फुरण पावणारी चित् हा बोधात्मा मी आहे शुद्ध चित् मध्ये 'हा आत्मा' एवढीही कल्पना उद्भवत नाही, मग बाकीच्या तर दूरच राहिल्या कारण अन्याच्या अपेक्षेनेच होणारी कल्पना अद्वितीय वस्तूच्या ठायीं संभवणार कशी? यास्तव 'हा मी' असेही न म्हणतां मी मौन धारण करून स्वस्थ बसतों ८३.

**सर्ग ८४**—वीतहव्याची समाधि, पूर्वीच्या विवरांतील निवास, हृदयांत त्याला भासलेले भास.

**श्रीवसिष्ठ**—कौसल्यासूनो, असा निर्णय करून तो वासनारहित वीतहव्य विंध्यपर्वताच्या एका निर्वात गुहेत समाधि लावून बसला. वृत्ति सर्वथा शून्य झाल्याकारणाने तो आनंदसुंदर मुनि शांतसागराप्रमाणे दिसत होता. त्याचा प्राणवायु क्रमाने आतल्या आंत क्षीण झाला व त्यानंतर आसनादि योगमुद्रेने आतून व बाहेरून स्थिर झालेल्या त्याचीं तीनशें वर्षें त्या एकांत स्थळीं एका घटिकेप्रमाणें गेलीं. त्या आत्मज्ञाला एवढा काळ लोटला तरी त्याचें भान झाले नाहीं.

जीवन्मुक्ततेमुळें त्यानें शरीरत्याग केला नाहीं; तर तो ध्यानांत निमग्न होऊन राहिला. मर्त्यलोकचा एवढा मोठा काळ लोटला तरी तो योगवेत्ता चित्राप्रमाणें स्तब्ध राहिला. मोठे ध्वनी करणाऱ्या जलपातांच्या योगानें, मृगयेकरितां आलेल्या राजांच्या हत्तींच्या बृंहितानीं; पक्षि, वानर इत्यादिकांच्या गोंगाटांनीं, सिंह, व्याघ्र इत्यादिकांच्या भयंकर ओरडण्यांनीं, त्यांच्या हातीं लागलेल्या दीन प्राण्यांच्या केविलवाण्या आरोळ्यानीं, भयंकर मेघ-गर्जनेसह झालेल्या विद्युत्पातांनीं, लोकांच्या कोलाहलांनीं, दावाग्नीच्या योगानें, मेघाच्या गडगडाटानीं व जलौघांनींही तो देहभानावर आला नाहीं. याप्रमाणें कालाचा प्रवाह व्यर्थ चालला असतां वर्षासमयीं हळु हळु जमणाऱ्या चिखलांत तो कांहीं वर्षांनीं रुतून राहिला. त्यामुळें त्याला कोणी भूमींत पुरलेंच आहे, असें वाटत असे. पर्वताला चिटकून राहिलेल्या शिलेप्रमाणें त्याचें खांदे भूमींत लिपल्यासारखे झाले. पण समाधिसुखांत निमग्न झालेल्या त्याला कांहीं पीडा झाली नाहीं. तीनशें वर्षांनीं तो आपोआप सावध झाला. लिंगदेहस्थ संवित्-नेंच त्याच्या देहाचें पालन केलें. प्राणवृत्तिरूप स्पंद सूक्ष्म असल्यामुळें तो त्याला धारण करूं शकला नाहीं.

असो; तीनशे वर्षांनंतर त्याची जीवसंवित् अवशिष्ट प्रारब्ध भोगां-करिता हृदयांत उत्पन्न होऊन हळु हळु वाढत मनोरूपिणी झाली व तिनें स्वकल्पनेनेंच हृदयांतल्या हृदयांत विचित्र अनुभव घेतला.

त्यानें कैलास पर्वताजवळच्या अरण्यांत कदंब वृक्षाखालीं शंभर वर्षे जीवन्मुक्त-अवस्थेत मुनित्वाचा अनुभव घेतला. शंभर वर्षे मानसिक पीडारहित विद्याधरत्व व पांच युगें इंद्रत्व भोगलें.

**श्रीराम**—मुनिवर्य, त्या मुनीच्या या प्रतिभासांत दिशा व काल यांचा—कैलासकानन, पांच युगें—हा नियम व—अल्पकाल, हृदयप्रदेश—हा अनियम कसा उत्पन्न होतो? दिशा व काल यांच्या नियतींत बदल पाडणें शक्य नाहीं.

**श्रीवसिष्ठ**—ही सर्वात्मिका चिच्छक्ति जेथें जशी जशी उदय पावते तेथें तशीच तत्काल होते. (म्हणजे चित् सर्वात्मरूप नाहीं; तर ती मर्यादित आहे, असें जाणल्यास अल्प देश व काल यांत विस्तृत देश व काल यांचा असंभव होतो. पण ती सर्वा-

त्मिका आहे, असें समजल्यावर सर्व देश व काल तिथ्या उदरांत रहात असल्यामुळे त्यांत अशक्य असें कांहींच नाहीं. शिवाय ज्यांचा अनुभव घ्यावयाचा त्यांच्या देश–कालामध्यें जर असे विरोध आढळला तर तो दोषच होय, यांत संशय नाहीं. पण अनुभव घेणारा व ज्याचा अनुभव घ्यावयाचा आहे अशा दोघांमध्यें हा विरोध येतच नाहीं. कारण स्वप्नामध्यें अति संकुचित हृदय प्रदेशीं हिमालया-सारखा अतिविस्तृत पदार्थाचा अनुभव येतो; हे सर्वांना माहीत आहे. असो;) त्या कारणानें वीतहव्यानें मनांतल्या मनात नानाप्रकारचीं जगें पाहिलीं. पण त्याची ही वासना होती, असे समजूं नकोस. कारण यथार्थ ज्ञानवानाची असली वासना खरी वासनाच नव्हे. ज्ञानाग्नीनें दग्ध झालेली ती भाजलेल्या बीजाप्रमाणें केवळ वासनाकार असते. एक कल्पभर तो शंकराचा गण होता. त्याचे तें गाणपत्य सर्व विद्यानीं निपुण व त्रिकाळ दर्शनयुक्त होतें. तो जरी जीवन्मुक्त झाला होता तरी भोग देणाऱ्या प्रार-ब्धानें जाग्रत केलेल्या दृढ संस्कारामुळें त्याला देहभोगादि विचित्र प्रति-भास झाले.

**श्रीराम**—मुनिराज, मग जीवन्मुक्ताना सुद्धा बंध-मोक्षदृष्टि असतात, असे म्हणावें लागतें.

**श्रीवसिष्ठ**—छेः; हें सर्व विश्व ब्रह्मच आहे, असें जाणणाऱ्या जीवन्मु-क्ताना बंध-मोक्ष दृष्टी कशा असणार ? आकाश जसें औपाधिक नाना आकार धारण करतें त्याप्रमाणें त्या ब्रह्मरूप महात्म्याला नाना प्रकार दिस-तात. वीतहव्याच्या हृदयांतील चैतन्य हाच आमचा सर्वांचा आत्मा अस-ल्यामुळें सर्व जीवाचे अनुभव हे त्याचेच होत. त्याकारणानेंच जो वस्तुतः निःस्वरूप पण प्रातिभासिकदृष्टया अति विशाळ भुवनांमध्यें इंद्र होता तोच काहीं वेळानें दीन देशाचा राजा होऊन अरण्यात मृगया करावयास प्रवृत्त झाला. पाद्मकल्पांत वीतहव्य जेव्हां गाणपत्याचा अनुभव घेत होता तेव्हा कैलासवनांत त्याचा जो क्रीडाहंस होता तोच आतां निषाद-राजा होऊन राहिला आहे.

**श्रीराम**—महाराज, वीतहव्याची ही सर्व मानस सृष्टि होती. तेव्हां त्यांतील भ्रांतिमात्र इंद्र-हंस इत्यादि देहाकार कसे झाले ?

**श्रीवसिष्ठ**--रामा, सर्व जगच जर मनाचें कार्य असल्यामुळें भ्रांति-

मात्र आहे तर तुला दिसणारे हे जग तरी सचेतन प्राण्यानी युक्त असल्या-सारखे कसे भासतें? हे जसे चिन्मात्र व मनोमात्रभ्रमोपम तसेच ते वीतहव्याचेही मनोमात्र भ्रमतुल्य होय. वस्तुत: कोणतेच जग नाही. तुझे हे प्रसिद्ध जगसुद्धा ब्रह्ममात्र आहे. हे सर्व त्रैकालिक दृश्य मनोमात्र आहे. हे असें आहे हें समजे तों वज्रासारखे दृढ असते, पण त्याचे खरे स्वरूप कळले ह्मणजे ते परम आकाशच होते. अज्ञानामुळें मनच हे सर्व असे विकास पावले आहे ८४.

**सर्ग ८५**—मुनिशरीराचा पिंगलाने केलेला उद्धार

**श्रीराम**—मुनिवर्य, तो महामुनि भूमीतून वर कसा आला व ब्रह्मी-भूत कसा झाला?

**श्रीवसिष्ठ**—नंतर त्याला समाधीमध्ये अनंत ब्रह्माकाराचे भान झालें. आत्मध्यानसमयीं त्याला एकदा आपले पूर्वजन्म पहावे अशी इच्छा झाली व त्याप्रमाणे त्यानें आपले सर्व नष्ट आणि अनष्ट देह पाहिले. अनष्ट देहांतील मातींत रुतलेल्या त्या देहास पाहून त्याला वर काढावें, असें त्याच्या मनात आले. पण एकाद्या किड्याप्रमाणे मातींत रुतलेल्या त्याला वर काढण्याचे सामर्थ्य प्राणवायूचा लय झाल्यामुळे त्याच्यामध्यें नव्हते म्हणून तो शुद्धबुद्धीने पुन: असा विचार करूं लागला.—प्राणवायूनी सोडल्यामुळे माझा देह काही करूं शकत नाही. यास्तव त्याला उठ-वावयाचा उपाय जाणून, परकाया-प्रवेश-प्रकाराने मी सूर्याच्या देहात प्रवेश करतो. म्हणजे त्याच्या आज्ञेने त्याचा पिंगळ गण या शरीराचा उद्धार करील. अथवा मला याला घेऊन काय करावयाचे आहे? मी स्वपदीं लीन होतों, मला देहलीलेची कांहीं गरज नाही.

असा विचार करून वीतहव्य क्षणभर स्वस्थ बसला व पुन: चिंतन करूं लागला. देहाचा त्याग किंवा आश्रय यातील मला कांहींच ग्राह्य वाटत नाहीं. कारण जसा देहत्याग तसाच देहसंश्रय होय. यास्तव तो जोंवर विद्यमान आहे, अणुत्वास प्राप्त झाला नाहीं, तोंवर यावर आरूढ होऊनच मी विहार करतो. पिंगलाकडून याचा उद्धार करविण्याकरितां मी सूर्याच्या शरीरात प्रवेश करतों; असा बेत करून, तो वायुरूपी मुनि सूर्यामध्यें प्रविष्ट झाला. त्याबरोबर भगवान् भास्करानेंही आपल्या पिंगलगणाला विंध्यगुहेंतील चिखलात रुतलेल्या व वरून गवतानें

झाकलेल्या मुनिशरीरास वर काढण्याची आज्ञा केली. तेव्हां वीतहव्यही भगवान् नारायणास नमस्कार करून त्याच्या आज्ञेनें पिंगलाबरोबर विंध्याद्रीवर आला. इष्ट स्थळीं पोंचतांच पिंगलाने नखानें भूमि उकरून त्याच्या शरीरास वर काढलें. तेव्हा मुनीचे पुर्यष्टक आपल्या कलेवरात शिरलें व त्याबरोबर तें जड शरीर घोडे जोडलेल्या रथाप्रमाणें चेष्टा करू लागलें. वीतहव्य व पिंगल यानीं परस्परास नमस्कार केला आणि ते आपापल्या कार्यांत निमग्न झाले. पिंगल आकाशात गेला व मुनि शुद्ध सरोवरावर जाऊन पोंचला. प्रफुल्लित कमलानीं युक्त असलेल्या स्वच्छ सरोवरात त्या महात्म्यानें स्नान केलें. जप करून सूर्याची पूजा केली व मननादि व्यवहारानें युक्त असलेल्या शरीरानें तो पूर्वीप्रमाणें शोभूं लागला. राघवा, नतर मरण, मैत्री, समता, शाति, प्रज्ञा, आनदता, कृपा व श्री यानीं युक्त असलेला तो सकल-संगशून्य मुनि त्या विंध्यपर्वतावरील सरोवराच्या काठीं एकच दिवस रममाण झाला. (म्हणजे समाधि सोडून राहिला.) ८५.

**सर्ग ८६**—पुनः सहा दिवस समाधि, दीर्घकाल जीवन्मुक्त-स्थिति व रागादिकास नमस्कारपूर्वक निरोप.

**श्रीवसिष्ठ**—सायकाळीं पुनः समाधि लावण्याकरिता तो मुनि एका ओळखीच्या विंध्य गुहेत शिरला व आसनावर बसून तो म्हणाला, " मी इंद्रियाचा उपसंहार तर पूर्वीच केला आहे. आता त्याविषयीं अधिक विचार करण्याचें प्रयोजन राहिलें नाहीं यास्तव आहे व नाहीं, ही कल्पना सोडून व बाकी राहिलेल्या साक्षि चिन्मात्राचा आश्रय करून मी निश्चळ रहातों. स्वच्छतेस प्राप्त होऊन मी सम व समरस होऊन बसतों. तुर्यावस्थेचा आश्रय करतो. " असा विचार करून तो पुनः सहा दिवस ध्यान करीत बसला. त्यानंतर क्षणभर झाडाखालीं निजलेल्या वाटसरूप्रमाणें तो जागा झाला आणि तेव्हापासून सिद्ध झालेला तो म ातपस्वी वीतहव्य जीवन्मुक्ततेनें चिरकाल विहार करीत राहिला. त्यानें कोणत्याही वस्तूचें अभिनदन किंवा निंदा केली नाहीं. त्याला उद्वेग किंवा हर्ष कधींही झाला नाहीं. जात येत असताना किंवा एकत्र स्थित असताना चित्त-विनोदार्थ त्याच्या आपल्याशींच अशा गोष्टी चालल्या.

हे इंद्रियेश्वरा मना, शांत झाल्याकारणानें तुला आतां किती सुख होत आहे, याचा विचार कर बरें! आता याच विरक्तदशेंत सतत

व्हा. हे वेगवाना, तू आपलें चापल्य सर्वथा सोड. अहो दुष्ट इंद्रिय-चोरानो, हा आत्मा तुमचा नव्हे व तुम्ही त्याचीं नव्हेत. तुह्मी आता नष्ट व्हा. तुमच्या आशा विफल होऊ देत. ज्याचा आश्रय भगुर आहे, अशीं तुम्ही माझें आक्रमण करण्यास समर्थ नाहीं. 'आम्हीच आत्मा' अशी जी तुमची वासना होती, ती खरी नव्हे. तत्त्वविस्मरणामुळें झालेली ती मिथ्या होय. अनात्म्यास आत्मा समजणे, हीच भ्राति असून अविचारामुळे झालेली ती विचारानें क्षीण होते. तुम्ही इंद्रिये निराळीं, आम्ही मनन करणारे निराळे, अद्वय ब्रह्म निराळें, कर्तृता ( प्राणप्रयुक्त क्रियानिमित्तता ) निराळी व भोक्ता चिदाभास निराळा. मन तर ग्रहण करणारे आहे तेव्हा या सर्वांच्या योगानें होणारा कोणता दोष कोणाला कसा लागणार ? लाकडे जगलात झालीं दोऱ्या चर्म, ताग, काथ्या इत्यादिकांच्या केल्या, कुदळ, पहारय, तासणी, करवत इत्यादि लोखडापासून झाली व त्यांच्या सहायानें घर बाधणारा सुतार पोटाकरिता काम करू लागला तेव्हा ज्याचें प्रयोजन अगदीं भिन्न भिन्न आहे अशा या सर्वांच्या योगानें होणारी गृहनिष्पत्ति काकतालीय–न्यायानेंच होत असते, असे ह्मणावयास नको का ? त्याच प्रमाणें आपापल्या शक्तींनी नियत झालेल्या या इंद्रियांच्या व्यापारासही काकतालीयन्याय–प्राप्तच ह्मणणे उचित होय. तेव्हा असल्या यदृच्छाप्राप्त ससारापासून कोणाची काय हानि होणार ? अविद्या गेली, आत्मविद्या आली. त्यामुळें जें सत् होते ते सत् झालें व असत् होतें तें असत् ठरलें, जे नाशवत होते ते नष्ट झाले व नित्य होतें तें राहिलें.

राघवा, अशाप्रकारें विचार करून तो महातपस्वी भगवान् मुनिश्रेष्ठ अनेक वर्षें तेथे राहिला. त्याची सर्व चिंता नष्ट झाली व मूढता दूर राहिली. तो ध्यानाचा आश्रय करून सुखानें राहू लागला. त्याचें मन इच्छा व अनिच्छा यानीं रहित झालें. जन्म व कर्म यांच्या सीमेवर असणाऱ्या विदेह कैवल्याच्या इच्छेने तो सह्याद्रीच्या एका गुहेमध्यें जाऊन बसला, व तेथेंही पद्मासन घालून तो आपल्याशींच म्हणाला, "हे रागा, तू नीराग हो. अरे द्वेषा, तू निर्द्वेषतेस प्राप्त हो. मी तुमच्यासह या ससारात फार दिवस क्रिडा केली. अहो भोगानो, तुम्हाला नमस्कार असो. तुम्ही मला या ससारात फार दिवस लोळविलेंत. या पर व पुण्य निर्वाणपदवीस ज्याच्या योगानें मी विसरलों त्या विषयसुखाला नमस्कार असो. हे दुःखा, तुझे मजवर

फार उपकार आहेत. तुझ्यामुळें उद्विग्न होऊनच मी आत्म्याचा शोध केला, तेव्हां तूंच मला या मार्गाचा उपदेश केलास. तुझ्या प्रसादानें मला ही पदवी मिळाली. हे दुःखतत्त्वभूत सुखद आत्मन्, दुःख हें नाव धारण करणाऱ्या तुला नमस्कार असो. हे मित्रा देहा, तुझे कल्याण असो. तुझी व माझी वियुक्त स्थिति अनादि सिद्ध आहे. यास्तव आम्ही कधीं तरी वियुक्त होणार, हें ठरलेलेंच आहे. अत्यंत प्रिय वस्तूनाही सोडून जाणें ही प्राण्याची स्वार्थी प्रवृत्ति फार जुनी आहे आणि तोच प्रसंग आता आम्हावर आला आहे. शेकडों जन्म सहवास करून आता मी देहाला सोडून दूर होणार. हर! हर! असो, हे मित्रा, मी आता तुज दीर्घकालच्या बांधवाला सोडतों. पण यात माझा कांहीं अपराध नाहीं बरें. तूंच आपल्या नाशाकरिता मला आत्मज्ञानाच्या नादीं लावून हा प्रसंग आणलास. मला आत्मज्ञान संपादन करून देऊन तूंच आपला घात करून घेतला आहेस. आई तृष्णे, मी आता जातो. पण तू एकटी राहिलीस म्हणून दीन व दुःखी होऊ नकोस. हे भगवन् काम, तुला जिंकण्याकरिता तुझ्या विरुद्ध असलेल्या वैराग्यादिकाचा मी आश्रय केला व त्यामुळें तुझा मोठा अपराधी झालो आहे. पण मला क्षमा कर. मी आता अत्यंत उपशमास प्राप्त होत आहे. मला शुभ आशीर्वाद दे. हे अंबे, तृष्णे, तुझा व माझा हा संयोगापुळेच प्राप्त झालेला वियोग आज फार दिवसानी होत असून तो फार दिवस टिकणार आहे. यास्तव मी तुला शेवटचा प्रणाम करतों. हे सुकृत देवा, तुला मी वंदन करतों. तू मला पूर्वी नरकातून काढून स्वर्गास पोंचविलें आहेस. कुकर्मरूपीभूमींत वाढलेल्या, नरकरूपी मोठमोठ्या शाखास वहाणाऱ्या व यातना याच पुष्पभारानें युक्त असलेल्या दुष्कृतवृक्षास नमस्कार असो. ज्याच्यासह मी असंख्य प्राकृतयोनी भोगल्या त्या आजपासून अदृश्य झालेल्या मोहाला मी रामराम ठोकतो. वाळलेलीं पानें हींच जिचीं वस्त्रे आहेत अशा समाधिसमयीं अत्यंत उपकार करणाऱ्या गुहेला मी प्रणाम करतों. हे गुहे, तू माझी प्रेमळ मैत्रीण आहेस. संसारमार्गानें चालता चालता अतिशय खिन्न झालेल्या मला तूं चांगली निवाऱ्याची जागा दिलीस व त्यामुळें मला मोठें सुख झालें. पूर्णात्मविश्रांति देऊन तूंच माझ्या सर्व लोभाचें हरण केलेंस. शोकनाशाकरिता बाकी सर्वांचा त्याग करून मी एकट्या तुज प्रियसखीचा आश्रय केला. कुत्रा, साप

इत्यादिकाचे भय उपस्थित झालें असतां व उंच-सखल जागीं, हातांत धरणा-रास आधार देणाऱ्या आणि वृद्धावस्थेंत अतिशय मित्र होणाऱ्या दंडकाष्ठाला नमस्कार असो. हे क्षुद्र शरीरा, हाडें, रक्त, आंतडीं व शिरा एवढेंच ज्याचें सार आहे असें तूं तें आपलें सर्व सामान घेऊन आपल्या प्रकृतीस प्राप्त हो मलिन शरीरासही शुद्ध करणाऱ्या माझ्या स्नानादि उपायांचे मजवर अनंत उपकार आहेत. यास्तव त्यानाही मला मोठ्या कृतज्ञतेनें वंदन केलें पाहिजे. व्यवहारास व ससारासही माझा नमस्कार असो. अहो प्राणानों, तुह्मी माझे सहज मित्र आहा. तुमच्या सहवर्तमान मी नाना-प्रकारच्या योनींमध्यें व पर्वताच्या दऱ्यातून वास केला, लोकांतरीं श्रान्त झालों, नगरांतून क्रीडा केली, पर्वतावर राहिलों, नाना विलास केले व अनेक मार्गांनीं गेलो. या ब्रह्मांडात मी तुमच्यासह केलें नाहीं; आणलें नाहीं; भोगलें नाहीं, आलों, गेलों, पाहिलें, दिलें, घेतलें नाहीं असें काहीं नाहीं. आता मी जातों. तुह्मीही आपल्या कारणात लीन व्हा. संसारातील सर्व सयोग असेच वियोगापर्यंत टिकणारे असतात. तेव्हा त्याविषयीं उगीच शोक करणें उचित नव्हे. हें माझें नेत्रातील तेज सूर्यांत जाऊन मिळो. घ्राणेंद्रिय पृथ्वीमध्यें लीन होवो. प्राणवायु महा-वायूशीं एकरूप होऊन जावो. शब्द ऐकण्याची शक्ति आकाशांत तादात्म्य पावो. रसनेंतील रसशक्ति जलतत्त्वांत जाऊन मिळो. आता शांतीचा काल आला आहे तैलरहित दीपाप्रमाणे अथवा इंधनरहित अग्नीप्रमाणें मी आता ओंकारोच्चार करून, त्याच्या शेवटीं सर्व मनन सोडून, आत्म्या-मध्यें शान्त होतों. अहाहा ! किती हा आनंद !! कार्यपरंपरा सोडल्यामुळें, दृश्यदशाचें उल्लंघन केल्यामुळें व ब्रह्माच्या शांतीस अनुसरून बुद्धिही शांत झाल्यामुळें मी हा आता मोहमलरहित होऊन राहिलों आहे व त्याकारणानेंच मला हें परम सुख होत आहे ८६.

**सर्ग ८७**—वीतहव्याच्या विदेहमुक्तीचा क्रम.

**श्रीवसिष्ठ**—रामा, प्रणवाचा लांब उच्चार करून मननादि शांतिक्रमानें सहाव्या व सातव्या भूमिकेस प्राप्त होऊन तो आपल्या हृदयस्थ ब्रह्मास प्राप्त झाला. अकार, उकार, मकार-मात्रा, प्रथम, द्वितीय, तृतीय पाद, जाग्रत्, स्वप्न, सुषुप्ति या तीन अवस्था इत्यादि मांडुक्योपनिषदांत सांगि-तलेल्या प्रकारानें प्रणवाचें स्मरण करणारा तो यति अध्यारोप व अपवाद

( म्हणजे शुद्ध ब्रह्म अशा अशा क्रमान जगत् झालें, हा अध्यारोप व हें सर्व मिथ्या असून याचें सार ब्रह्म आहे व तेंच सत्य आहे, हा अपवाद ) याच्या द्वारा आपल्या अव्यय व शुद्ध स्वरूपास प्राप्त झाला. त्रैलोक्यांतील बाह्य व आभ्यंतर स्थूल-सूक्ष्म कल्पित भाग सोडून तो स्वरूपातच क्षोभरहित होऊन राहिला. पूर्णचंद्राप्रमाणे तो शीतल झाला. इंद्रियादिकाचा लय करून क्रमानें त्यानें प्राणस्पंदही सोडला. संविद्ही शून्य असल्यासारखी झाली. ती सत्तामात्र पदास पहात राहिली. तो महात्मा निजल्यासारखा होऊन पर्वततुल्य अचल झाला. सुषुप्त-स्थैर्यानंतर तो तुर्यरूपास प्राप्त झाला. त्यावेळीं त्याच्या स्वरूपाचें त्यालाच भान होईनासें झालें. मी निरानंद आहें कीं सानंद? सत् आहें की असत्? प्रकाश आहें कीं अंध-कार? किंचित् आहें कीं अकिंचित्? चिन्मय आहे कीं अचिन्मय हेंही त्याला कळेना. तात्पर्य वाणीला अगोचर असलेल्या स्थितींत तो गेला. सर्व भावरहित व अति विस्तीर्ण पावन पदास प्राप्त झाला. शून्यवादी बौद्ध ज्याला शून्य म्हणतात, ब्रह्मवेत्ते ज्याला ब्रह्म हें नाव देतात, विज्ञानवादी बौद्ध ज्याला अमल विज्ञानमात्र म्हणतात, सांख्य ज्याला पुरुष, म्हणतात, योगवेत्ते ज्याला ईश्वर म्हणतात, शैव ज्याला शिव म्हणतात कालवेत्ते ज्याला काल म्हणतात, आत्मवेत्ते ज्याला आत्मा म्हणतात, निरात्मवादी ज्याला नैरात्म्य म्हणतात, समचित्त माध्यमिक ज्याला चित् व अचित् याच्या मध्यवर्ती म्हणतात व जें जीवन्मुक्ताचें सर्वस्व, जो सर्व शास्त्राचा सिद्धांत, जें सर्वांच्या हृदयानुगत व जें सर्व, तेंच तो महात्मा झाला. जें अत्यंत निष्क्रिय, सूर्यादि तेजाचेंही भासक व स्वानुभवमात्र तेंच तो होऊन राहिला. सारांश, तो वीतहव्य या क्रमानें मुक्ताच्या दृष्टीनें आकाशस्वरूपाहूनही निर्मलस्थिति व अज, अजर, अनादि, एक, अमल व निष्कल पद होऊन राहिला आणि बद्ध लोकांच्या दृष्टीनें ईश्वर होऊन स्वकार्यभेदानीं अनेक व सकल झाला ८७.

**सर्ग ८८**– वीतहव्य मुक्त झाला असता त्याच्या प्राणाचा हृदयांत लय, देहशोष व कलांचा कारणात लय.

**श्रीवासिष्ठ**—राघवा, याप्रमाणें संसाराच्या पराकाष्ठेस प्राप्त झालेला व दुःखसागरांतून पार गेलेला तो मुनि आत्यंतिक मनोनाश झाला असतां शांत झाला. सागरात मिळून जाणाऱ्या जलबिंदूप्रमाणें आपल्या पावन पदीं लीन झाला. त्यानंतर त्याचा देह हेमंत ऋतूंतील कमलिनीप्रमाणें

सुकून गेला. सर्व देहात व्यापून रहाणारे त्याचे प्राण देहवृक्षावरील हृदयरूपी घरव्यात आल. सर्व भूतें भूतामध्यें प्रतिष्ठा पावली. आईबापाच्या धातूपासून झालेला मासमय देह तेथेंच भूमीवर पडला. लिंगशरीरात प्रतिबिंबित झालेली चित् बिंबभूत चित्समुद्रात जाऊन मिळाली. त्वचा, रक्त, मास, मेद, अस्थि, मज्जा व शुक्र या नावाचे धातू आपल्या उपादानभूत धातूंमध्यें स्थित झाले सारांश तो मुनि शात झाला असता सर्व आपल्या स्वरूपात जाऊन मिळाले. राघवा, ही मी तुला शेकडो विचारानीं शोभणारी वीतहव्याची विश्राति सागितली आहे. हिचा आपल्या प्रज्ञेने विचार कर. अशा प्रकारच्या रमणीय विचारसरणीने तत्त्व जाणून त्याच मार ग्रहण कर. हे जें मी तुला एवढा वेळ सागितलें आहे, आता सागत आहे व पुढें सागणार आहे तें सर्व मी स्वतः पाहिले आहे कारण मला त्रिकालज्ञान असून शिवाय मी चिरकाल जिवंत आहें. मी त्याचा चागला विचारही केला आहे. यास्तव हे महामते, या अमल दृष्टीचा आश्रय करून तूं ज्ञान सपादन कर. ज्ञानानेच मुक्ति मिळते. ज्ञानानेंच दु.खक्षय व अज्ञानाचा नाश होतो व ज्ञानानेच परा सिद्धि प्राप्त होते. दुसऱ्या कशानेंही नाहीं. ज्ञानानें सर्व आशा समततः तोडून वीतहव्य मुनीश्वराने सर्व चित्तपर्वत फोडून सोडला. आमच्या चक्षुरादि इंद्रियानीं दिसणारा वीतहव्य आमच्या मनोमात्र आहे कारण आमचें मनच अह सारखे व त्व सारखें भासते. मनच हे सर्व जग आहे. तात्पर्य हे सांगो, अविद्या-काम-कर्मादि सर्व मल, त्यामुळें प्राप्त होणारे इंद्रियविकार, तीन देहरूप उपाधि व त्यामुळें प्राप्त होणारे प्रियसंगादि दोष यातून सुटलेला वीतहव्य दीर्घकाल चित्तशुद्धीच्या उपायाचे अनुष्ठान, श्रवण, मनन, साक्षात्कार व समाधिभूमिकाचा अभ्यास याच्या योगानें हृदयात अनुभव घेतलेल्या स्वभावभूत अनत पदास प्राप्त झाला ८८.

सर्ग ८९—मोहरहित पुरुषाना आकाशगमनादि सिद्धींविषयीं इच्छा नसते. शापादिक त्याच्या शरीरास काही करूं शकत नाहींत

**श्रीवसिष्ठ**—रामा, वीतहव्याप्रमाणें तूंही आपल्याला ज्ञानी करून राग, भय, क्रोध व उद्वेग यानीं रहित हो. तो जसा दीर्घ काल निःशोक होऊन विहार करीत राहिला त्याप्रमाणें तूंही दुःखशून्य होऊन विहार करीत रहा. दुसरेही ज्ञानी मुनि जसे राहत होते तसाच तूंही आपल्या राष्ट्रांत रहा. सर्व-

गामी आत्म्याला सुखदु खाचा लेप होत नाही. पुष्कळ ज्ञानी या भूतळावर विहार करितात. पण तुझ्याप्रमाणें कोणी दु:खवश होत नाहींत. तू स्वस्थ हो, उदार हो, सम व सुखी हो तू सर्वग आहेस, तू आत्मा आहेस व तुला पुनर्जन्म नाहीं. तुझ्यासारखे जीवन्मुक्त हर्षामर्ष विकारांना वश होत नाहींत.

**श्रीराम**–गुरुवर्य, याच प्रसंगानें मला एक संशय आला आहे, तेवढा तो घालवा जीवन्मुक्तांच्या शरीरांत आकाशगमनादि शक्ति कां दिसत नाहींत?

**श्रीवसिष्ठ**—रामा, आकाशगमनादि क्रिया ह्या पदार्थांच्या सहज शक्ती आहेत. अग्नीच्या ऊर्ध्वज्वलनाप्रमाणे त्या देवादिकांमध्ये स्वाभाविकपणेंच सिद्ध असतात आत्मज्ञ त्यांची फारशी अपेक्षा करीत नाहींत. अनात्मज्ञ मानवास मणि, औषधी इत्यादि द्रव्यशक्ति, योगाभ्यासादि क्रियाशक्ति, व परिपाक काल-शक्ति यांच्या योगानें त्या केव्हां केव्हां प्राप्त होतात. पण तो आत्मज्ञानरहिताचा विषय आहे, आत्मज्ञाचा नव्हे कारण ते स्वयं आत्मा झालेले असतात. आत्म्याच्या योगानें आत्म्यामध्ये तृप्त होतात. जगद्भाव अविद्यामय आहेत. असा त्यांचा निश्चय असतो. तेव्हां ते अविद्याशून्य आत्मज्ञ त्यांत निमग्न कसे होणार? जे अविद्येलाही युक्तीनें सुखरूप करितात ते अविद्यामयच होत आत्मज्ञ अविद्येला सुखस्वरूप समजत नाहींत. ते निष्काम असतात ते आत्म्यामध्येच संतुष्ट असतात. आकाशगतीचा त्यांना कांहीं उपयोग नसतो. सिद्धि, भोग, भाव मान, मरण, जीवित, यांच्या योगानें त्यांचें कांहीं इष्ट होत नाहीं. ते नित्य तृप्त व शांत असतात. यदृच्छेनें प्राप्त झालेल्या सुखःदुख-जीवित मरण इत्यादिकांच्या योगानें ते सदा तृप्तच असतात. त्यांना कृत, अकृत इत्यादिकांच्या योगानें कांहीं प्राप्त करून घ्यावयाचें नसतें. सिद्धी मंत्र, औषधी इत्यादि उपायांनी साध्य होतात. अमुक उपायानें अमुक सिद्धि मिळावी हा नियतीचा क्रम आहे. त्यांत बदल करण्याचें सामर्थ्य शंकरादि नियति-कर्त्यांसही नाहीं. विष, मद्य, अग्नि इत्यादि वस्तूंमध्यें मारणे, मोह पाडणे, जाळणें हे स्वाभाविक धर्म आहेत. ते नियतीमुळेंच त्यांच्या मध्यें नियत आहेत. त्याप्रमाणेंच सिद्धिही द्रव्य-देश-क्रिया यांचा स्वभाव आहे. वस्तु-स्वभावामध्यें अनात्मज्ञच रत असतात. आत्मज्ञ त्यांत रत होत नाहींत. परमात्मप्राप्ति झाली म्हणजे त्या सिद्धी फारशा उपकारक वाटत नाहींत. ज्याला इच्छा असते तोच त्यांचीही इच्छा करणार, हें उघड आहे. आत्मज्ञ निरिच्छ असतो. तो पूर्णचित्त

असल्यामुळें त्याच्याठायीं इच्छा संभवत नाहीं. इच्छेच्या अभावीं तो त्याविषयीं प्रयत्न करीत नाहीं. प्रयत्नच जर नाहीं तर फळ कोठचें ? आत्मज्ञानेच्छु वीतहव्यलाही इच्छा व प्रयत्न याच्या अभावीं सिद्धी प्राप्त झाल्या नाहींत.

**श्रीराम**—प्रभो, सिद्धी हीं इच्छामूलक प्रयत्नवृक्षाचीं फळें आहेत हें मला कळलें व आत्मज्ञाच्या ठायीं त्याचा असंभव कसा आहे, तेंही माझ्या ध्यानात आलें. पण त्या मुनीच्या मृत शरीराला क्रव्याद पशूंनीं कसें खालें नाहीं ? व भूप्रवेशसमर्थच तो तत्काल विदेह मुक्त कसा झाला, ते मला सागा ?

**श्रीवसिष्ठ**—रामा, जी अज्ञसवित् रागादि दोषानीं दूषित झालेल्या देहाहभाववासनाततूने वेष्टित झालेली असते तीच देहाच्या च्छेद-भेदादि-कामुळें सुख-दुःखादिभाक् होते. पण जी सवित् अति शुद्ध व सविन्मात्र-मयी असते तिच्या सबधी शरीरास तोडण्यास कोणीही कधीं समर्थ नाहीं. योगी कोणत्या युक्तीने शेकडो वर्षें लोटलीं तरी अक्षय शरीराने युक्त असतो तें व त्याला च्छेदादि भ्रम कसे परवश करू शकत नाहींत तें सांगतों. चित्त ज्या ज्या पदार्थात जेव्हा जेव्हा पडतें तेव्हा तेव्हा तें तत्काल तसें होतें. तें शत्रूला पाहताच द्वेषादि विकारयुक्त होतें व मित्राला पहाताच आनदपूर्ण बनतें. रागद्वेषशून्य उदासीन पुरुष, पर्वत, वृक्ष इत्यादिकाकडे पाहून कधीं कोणाला राग-द्वेष वाटत नाहीं, हेंही सर्वांच्या अनुभवानेंच सिद्ध आहे. मन स्वादिष्ट अन्ना-मध्यें आसक्त होते, नीरस पदार्थीविषयीं निःस्पृह असते; कडु पदार्थ त्याला अगदीं आवडत नाहींत, असा अनुभव येतो. रागद्वेष वैषम्य-शून्य सविद्विलासानें सपन्न असलेल्या योग्याच्या देहामध्यें जेव्हा हिंस्र प्राण्याचें चित्त पडतें तेव्हा तत्काल योगिसवित् प्रतिबिंबित झाल्याप्रमाणेंच तें समतेस प्राप्त होतें. त्यामुळें समदर्शी यतीच्या सांनिध्या द्वेषादिरहित झालेल्या हिंस्रप्राण्याच्याही चित्तात त्याच्या शरीरास तोडावें व खावें, असे वाटत नाहीं. पण तेच हिंस्र प्राणी योगिशरीरापासून दूर गेले म्हणजे त्यांना जो पदार्थ दिसेल त्याप्रमाणें त्यांची वृत्ति होते. या कारणानें सिंह, व्याघ्र, किडे, साप इत्यादिकातील कोणीही वीतहव्याच्या शरीरास स्पर्श केला नाहीं. संवित् सत्तासामान्यरूपानें काष्ठ, लोष्ट, पाषाण इत्यादि सर्व पदार्थांमध्यें असते. पण ती पुयष्टकामध्येंच व्यक्त होते. ज्यांचें चित्त समाहित नसतें त्यांना ती अनेक पदार्थांच्या योगानें विषम व मर्यादित आहेशी दिसते.

वीतहव्याच्या पुर्यष्टकानें तत्त्वबोध व समाधि याच्यायोगानें अविषमरूपास पोंचविलेल्या पृथ्वी-जल-तेजो वाय्वादिरूप संवित्तीच्या द्वारा त्याच्या शरीरासही ब्रह्मरूप करून सोडले होतें. त्यामुळें तिला काहीं विकार झाला नाहीं. याविषयीं आणखीं एक युक्ति सागतों तीही ऐक. स्पंद हें नाशाचें कारण आहे व कोणताही विकार, चित्तजन्य अथवा वायुजन्य असतो, हेंही लोकव्यवहारात प्रसिद्ध आहे. स्पंद हेंच प्राण्याचें प्राणन आहे. तें शात होताच धारणेच्या योगानें योग्याचे प्राण देहामध्यें पाषाणासारखे दृढ होऊन रहातात. त्यामुळें त्याची तनु नष्ट होत नाहीं. ज्याचा चित्तजन्य किंवा वातजन्य स्पद सबाह्याभ्यतर नसतो त्याची वृद्धि व क्षय होत नाहीं. बा तत्त्वज्ञा, बाह्य व आतर स्पद शात झाला म्हणजे त्वगादि धातू देहातील पूर्वस्थिति सोडीत नाहींत. देहस्पद अगदी शात झाला म्हणजे अडवून ठेवलेले प्राण मेरूसारखे स्थिर होतात. लोकामध्ये या गोष्टीचा प्रत्यक्ष अनुभव येतो स्पंदाच्या अभावीं शवाचीं अगे काष्ठासारखीं ताठून जातात. असो; यास्तव योग्याचीं शरीरें जगात कितीही वर्षे जरी राहिलीं तरी भूमींतील शिळाप्रमाणें किंवा मेघाप्रमाणे फुटत किंवा कुजत नाहींत.

आता वीतहव्य त्याचवेळी शात का झाला नाहीं व देह सोडून का गेला नाहीं, तें सागतों. जे ज्ञानी, वीतराग, हृदयग्रंथिशून्य असतात ते सर्व स्वतत्रपणे शरीरात रहातात. प्राक्तनकर्मफल देण्यास तयार झालेला ईश्वर किंवा कर्मच प्रधान आहे, असे म्हणणाऱ्या मीमासकाच्या मती कर्मे त्याच्या प्रारब्धशेष भोगावयास प्रवृत्त झालेल्या चित्ताचें नियमन करूं शकत नाहींत. त्याला अन्यथा प्रवृत्त करण्यास तीं समर्थ नसतात. त्यामुळें बा राजपुत्रा, तत्त्ववेत्त्याचें मन आकस्मिक प्रारब्धप्राप्त जीवन किंवा मरण यातील ज्याची ज्याची भावना करते ते तें तत्काल होतें. या न्यायानें वीतहव्याच्या मनानें प्रारब्धप्राप्त जीविताची भावना केली व त्याप्रमाणें तें झालें. पण प्रारब्ध संपताच जेव्हा त्याची संवित् विदेहमुक्तीची भावना करूं लागली तेव्हा तो विदेहमुक्त झाला. वासनापाशरहित झालेलें त्याचें मन वास्तव आत्मभावानें उदय पावलें व मन हीच ज्याची उपाधि आहे, असा जीव स्वयं सकल शक्तिमय शिव झाला ८९.

---

१ याविषयीं एका तत्त्वज्ञानें असें म्हटले आहे तुषेण बद्धो व्रीहिः स्यात्तुषाभावे तु तण्डुल । पाशबद्धः सदा जीवः पाशमुक्तः सदा शिवः ॥ याचा साराश–तुषयुक्त

**सर्ग ९०**—दोन प्रकारचा चित्तनाश

**श्रीवसिष्ठ**—ज्या वेळीं वीतहव्याचें चित्त प्रायः विचारानें अस्त पावल्यासारखे झाले तेव्हा त्याच्यामध्ये मैत्र्यादि गुण उत्पन्न झाले.

**श्रीराम**—पण गुरुवर्य, विचाराच्या उत्कर्षामुळें चित्तस्वरूप लीन झालें असता मैत्र्यादि गुण उद्भवणार कसे? चित्त ब्रह्मामध्यें तादात्म्य पावल्यावर ते कोठें स्फुरणार?

**श्रीवसि०**—रामा, चित्ताचा नाश सरूप व अरूप असा दोन प्रकारचा आहे. जीवन्मुक्ताच्या चित्ताचा सरूप नाश होतो व विदेहमुक्ताचें चित्त अरूप नाश पावते. चित्ताची सत्ता दुःखाला कारण होते व चित्तनाश सुख देतो. यास्तव चित्तसत्तेचा क्षय करावा. तामस वासनाजालानीं व्याप्त असलेले जें जन्मकारण मन तेंच विद्यमान मन असून ते केवल दुःखालाच कारण होतें. प्राक्तन गुणसंभारास (देहादिकास) हें माझे, असें जाणणें हेच मनाचें सत्त्व व दुःखबीज आहे. मन विद्यमान असेपर्यंत दुःखक्षय कोठून होणार? मनाचा अस्त झाला की प्राण्याचा संसारही अस्त पावतो. प्राण्यामध्यें वासनांकुरानीं दृढ झालेले विद्यमान मन दुःख-वृक्षाचें मूळ असून त्यापासून दुःख वृक्षाचें वन पसरतें.

**श्रीराम**—हे ब्रह्मन्, कोणाचें मन नष्ट असतें? तें कसें नष्ट होते व नाश पावलेल्या मनाची सत्ता कशी असते?

**श्रीवसिष्ठ**—ज्या धीराला सुखदुःखदशा साम्यापासून च्युत करूं शकत नाहींत त्याचे चित्त मृत आहे, असें समजतात. हा मी व हा मी नव्हे, ही चिन्ता ज्या श्रेष्ठ नरास देहरूप करीत नाही त्याचें मन नष्ट झाले आहे, असे जाणावें. आपत्ति, कृपणता, उत्साह, मद, माद्य, महोत्सव इत्यादि इष्टानिष्ट भाव ज्याच्या मुखचर्येत बदल करीत नाहींत त्याचें मन नष्ट होय. हे साधो, हा मनोनाश होय. यालाच नष्ट मन म्हणतात. ही चित्तनाश-दशा जीवन्मुक्तामध्यें आढळते. दृश्य सत्य आहे या भ्रांतीने त्याच्याविषयीं मनन करण्याची योग्यता असणें हीच मूढता असून जेव्हा ती नष्ट होते तेव्हा चित्तनाश-नावाचें सत्त्व उदय पावतें. जीवन्मुक्ताच्या स्वभावभूत अशा त्या सत्त्वविलासाला कोणी चित्त म्हणतात. तें उत्तम

भाताच्या गोट्यास व्रीहि म्हणतात पण तुष गेलें की तोच तांदुळ होतो. त्याप्रमाणे पाशबद्ध जीव व पाशमुक्त सदाशिव होय.

वासनानीं युक्त असलेल मन मैत्र्यादि गुणानीं परिपूर्ण होतें. हे निष्पापा, पुनर्जन्मरहित मन जीवन्मुक्ताचे ठायींच आढळतें. हाच सरूप मनोनाश होय. जीवन्मुक्ताच्या या मनोनाशात मैत्र्यादि उत्कृष्ट गुण चंद्रांतील किरणांप्रमाणे सदा स्थित असतात.

अरूप मनोनाश विदेहमुक्ताचे ठायींच असतो. त्यावेळीं सर्वश्रेष्ठ गुणाचें आधारभूत सत्त्वही विदेहमुक्ताच्या परम पावन पदीं लीन होतें. त्यानंतर त्या चित्तात गुण, अगुण, श्री, अश्री, लोलता, स्थिरता, उदय, अस्त, हर्ष, क्रोध इत्यादि काही रहात नाहीं. तेज, तम, संध्या, दिन, रात्र, दिशा अवकाश, वासना, रचना, इत्यादिकाचा त्यात गंधमुद्रा नसतो. जे बुद्धीच्या पार गेले आहेत त्याचे ते विस्तीर्ण आस्पद आहे. विदेहमुक्त प्रातिभासिक चित्त-लवशून्य होऊन परमपदीं लीन होतात ९०.

**सर्ग ९१**– संसारवल्लीचे बीज शरीर, शरीराचें मन आणि मनाचे वासना व प्राणस्पंद

**श्रीराम**—भगवन्, या अपार संसारसागराचे बीज काय आहे? त्या बीजाचे बीज काय आहे व त्याचें बीज काय आहे, हे सर्व माझ्या बोध-वृद्धीकरिता थोडक्यात सांगा.

**श्रीवसिष्ठ**—रामभद्रा, शुभाशुभ महा-अंकुरानीं युक्त असलेल्या या संसारलतेचे बीज शरीर आहे ही वेल शरीरापासूनच वाढते. आशा-वश होणारे चित्त शरीराचे बीज आहे. ते दु:खरत्नाचें संपुट व भावाभाव-दशाचा कोश आहे. शरीरें त्याच्यापासून उद्भवतात. चित्ताच्या संकल्पामुळे भव्य आकार कसा निर्माण होतो ते आह्मी उत्पत्ति–प्रकरणात सविस्तर सांगितलेंच आहे मृत्तिकेचा जसा घटादि विकार त्याप्रमाणें जगात जेवढे म्हणून हे दृश्य आहे तो सर्व चित्ताचा विकार होय चित्तवृक्षाचीं दोन बीजे आहेत. एक प्राणस्पंद व दुसरे दृढभावना. जेव्हा नाड्याना स्पर्श करण्यास तयार झालेला प्राण प्रस्पंद करूं लागतो तेव्हा चैतन्य-विकाररूप चित्त तत्काल उत्पन्न होतें. पण शिरामार्गांतून प्राण जेव्हा संचार करीत नाही तेव्हा बाह्य संवेदनाचे संस्कार जागे होत नसल्यामुळे आत, चित्तही उत्पन्न होत नाहीं. आपल्या या चित्तस्पंद-दृष्टांतावरून, हिरण्यगर्भाच्या चित् पासून जगदाकार होणे, हाही समष्टि-प्राणाच्या स्पंदाचाच परिणाम आहे, असें कळते. प्राण-स्पंदाचा उपराम हीच खरी शांति आहे. कारण प्राणस्पंदाने जाग्रत् केलेली

सवित्‌च देहामध्यें स्फुरण पावते. अति सूक्ष्म संवित्‌-ला जागें करणारा प्राणस्पद आहे. रामा, सवित्‌-ला विक्षिप्त न होऊ देणे यांत परम कल्याण आहे. तिच्या क्षोभाचें कारण, असा जो प्राणस्पंद त्याचा प्राणायामाच्या अभ्यासानें नाश केला ह्मणजे संवित्क्षोभ होत नाहीं. सवित्‌चा चित्ताकाराने समुद्भव झाल्यास कोणता दोष आहे ? म्हणून म्हणशील तर सांगतों. चित्ताकार झालेली सवित्‌ बाह्य विषयाकडे मोठ्या प्रेमाने जाते. नंतर त्याच्या उपभोगाची इच्छा होऊन अनत दुःखे उद्भवतात. पण ज्यावेळीं सवित्‌ बाह्य विषयाविषयीं निजल्यासारखी होऊन आतर आत्म्याच्या बोधास उद्युक्त होते तेव्हा तिला तें अवश्य लब्धव्य पद प्राप्त होते. यास्तव राघवा, प्राणपरिस्पंद व प्रेमातिशयाने वासनाचा उद्भव याच्या योगानें सवित्‌ला मूढ जर न करशील तर तू अज( विकारशून्य, मुक्त )च होस सवित्‌-चें मौढ्य हेंच चित्त असून त्यानें हे सर्व अनर्थजाल विस्तारले आहे प्राणायाम, ध्यान, व मितभोजनादि दुसरे उपाय याच्या योगानें योगी चित्तशात्यर्थ प्राणनिरोध करितात. प्राणाचा सरोध चित्तोपशातिरूप फळ देतो; परम समतेस कारण होतो व सवित्‌-ला सुंदर स्वास्थ्य देतो. रामा, ज्ञानी पुरुषानीं अनुभव घेऊन सागितलेली व वासनामुळें जिवंत झालेली चित्ताची दुसरी उत्पत्ति ऐक. अगोदर मी तुला वासनेचें स्वरूप सागतो. पूर्वीच्या दृढ भावनेमुळे देहादि पदार्थांचें अह, मम इत्यादि संस्काररूपानें पूर्वापर विचारावाचूनच ग्रहण करणें यालाच वासना म्हणतात. पूर्वापर विचार करणाऱ्या जीवन्मुक्ताचे ठायीं देहादि संस्कारच नसतो. शिवाय वासनेच्या विरुद्ध असलेल्या विचाराच्या योगानें त्याना 'मी देह आहें' असें केव्हाही वाटत नाहीं. अज्ञाची स्थिति याहून भिन्न असते. त्याच्या ठायीं वासनाविरोधी विचार नसतो. त्यामुळें तीव्रसवेगानें केलेल्या भावनादार्ढ्यामुळें तो देहादिरूप होऊन जातो. वासनापरवश झालेला अविचारी पुरुष जें पाहतो तेंच सत्य आहे असें जाणून मोहित होतो. मत्त पुरुषाप्रमाणें दुर्दृष्टि पुरुष वासनावशात्‌ स्वरूपाचा त्याग करून सर्व भ्रात जगत्‌ पहातो. तो अतःस्थ वासनेमुळें मानसिक पीडायुक्त होतो अनात्म्याला आत्मा समजणें हे अयथार्थ ज्ञान आहे. अवस्तूला वस्तु समजणें हेंच चित्तत्व होय. दृढ अभ्यासानें पदार्थचिंतन केल्यामुळें अति चचल चित्त उत्पन्न होते. तेंच जन्म, जरा व मरण याचें कारण

आहे आणि असा प्रकार असल्यामुळें वासनानाशानें चित्ताला स्वास्थ्य-रूप मुक्ति मिळते. वासनाभावीं मन सतत मननरहित झालें म्हणजे परम-उपशम देणारी अमनस्ता उदय पावते. संवित्तींत काहीं स्फुरत नाहींसें झालें म्हणजे चित्त उत्पन्न होत नाहीं. जगातील सर्व वस्तूंच्या भावाची भावना सोडली म्हणजे शून्य हृदयाकाशात चित्त कसें उत्पन्न होणार? कारण कोणत्याही वस्तूची मनात सत्यरूपानें व प्रियरूपानें भावना करणें हें एवढेच चित्ताचें रूप आहे, असें मी जाणतों. तेव्हा दृश्य मुळींच कल्पनायोग्य नाहीं, असे समजणाऱ्या हृदयाकाशांत तें कसे उद्भवणार?

आता अचित्तता म्हणजे काय तेंही सांगतों. बाह्य विषयाचें स्मरण न करिता परमार्थ वस्तुस्वरूप पहाणे हेंच अचित्तत्व होय. जीवन्मुक्त आतून सर्व आस्था सोडून व स्वरूपाचे सतत अनुसंधान करून शांत मनानें प्रारब्धप्राप्त व्यवहार करीत असतात. यास्तव त्यांचे चित्तही अचित्तच होय. कारण जळलेल्या वस्त्राच्या राखेप्रमाणे अवशिष्ट राहिलेले तें शुद्ध सत्त्वरूप असतें. वासनाप्रयुक्त विषयरस नसणे हेंच चित्ताचें अचित्तत्व होय. जीवन्मुक्त वासनारसहीन असतात, हें मी वर सांगितलेंच आहे. तात्पर्य रामा, प्राणस्पंद व वासना या दोन चित्तबीजांतील एक क्षीण झाले म्हणजे दुसरें अवश्य नाश पावतें तिळातील तेलाप्रमाणे हीं दोन बीजें एकमेकान्त्यभात असतात व बीजांकुर-न्यायानें एकमेकास कारण होतात. एकटी वासनाच पुनर्जन्माला कारण होत नाहीं, तर ती स्पंदासह अनर्थकारिणी होते. त्याचप्रमाणें चित्तही त्या उभयताचें व विषयजन्य सुखदुःखाचे कारण आहे. संविद्रूप चित्त प्रथम प्राण, मग इंद्रिये, मग इंद्रियजन्य आनंद इत्यादि सर्व क्रमानें उत्पन्न करूं शकतें. त्याचप्रमाणें पूर्वी उपभोग घेतलेल्या विषयाचा आनंद व तात्कालिक जीवनलक्षण वायुस्पंद हेही वासनारूपाने चित्तोत्पादक होतात. (म्हणजे जेव्हा आनंद व वायु वासनात्मक होतात तेव्हा ते दोघे मिळून चित्ताला उत्पन्न करूं शकतात). याप्रमाणे तीं तिन्ही परस्परांच्या आश्रयानें रहाणारीं व परस्परास कारण होणारीं आहेत. विशेषतः प्राणस्पंद व वासना तरी, वास व पुष्प, तेल व तिळ याप्रमाणें, परस्पराश्रय असतातच व अशा नित्य संबंधानेंच तीं दोघें चित्तांकुरांचीं बीजें होतात. वासनेनें प्रेरिलेला प्राणस्पंद संवित्मध्यें क्षोभ उत्पन्न करून चित्ताला जागें करितो. प्राण स्वतः स्पंदधर्मी असल्यामुळें रागादि वास-

नाना प्रेरणा करून सवित्-ला जागे करू लागला की चित्त-बालक निजपतें. याप्रमाणें वासना व प्राणस्पद अशीं चित्ताची दोन कारणें आहेत. त्यातील एक क्षीण झालें कीं तीं दोन्हीं व स्वतः चित्तही नाश पावतें. सुख-दुःखादिकानीं आकुल झालेलें मनन हेंच ज्याचें वाऱ्यानें हालणें आहे, विविध कार्यें हीच ज्याची पालवी आहे, तृष्णा ही ज्याच्या वरील काळी नागीण आहे, आसक्ति व रोग हेच ज्याच्यावर घरटीं करून राहिलेले बक आहेत, अज्ञान हेंच ज्याचें अति दृढ मूळ आहे व इंद्रियें हेच ज्याच्यावरील सामान्य पक्षी आहेत अशा चित्तवृक्षाला वासनाक्षयरूपी सोसाट्याचा वारा एका क्षणात पिकलेल्या फळाप्रमाणें पाडून सोडतो. प्राणस्पंद बद केला कीं चित्त-धूळ उडेनाशी होते. प्राणस्पद व वासना याचे प्रियाप्रिय ज्ञान हें आणखीं एक बीज आहे. शब्दादि प्रिय अथवा अप्रिय विषयाचें मनात स्मरण करून प्राणस्पद व वासना उद्भवतात. यास्तव प्रियाप्रियविषयाचा त्याग केला असता प्राणस्पंद व वासना समूळ नष्ट होतात. हा अमुक विषय, अमक्या विषयाहून निराळा आहे तो इष्ट आहे, हा अनिष्ट आहे इत्यादि प्रकारे भावना न करणे हाच त्याच्या त्यागाचा उत्तम उपाय आहे. विषयाचें वस्तुतः अस्तित्व समजत नाहीं. ते बाहेर किंवा आत संवित्-हून निराळे नसतात. सवित् आपली धीरता सोडून विषयाकार झाल्यासारखी होते व अशी सवित्च चित्ताचें बीज आहे. ज्याप्रमाणें स्वप्नात स्फुरण पावणारी सवित्च सकल्पामुळें आपलें मरण, देशांतरीं गमन इत्यादि पहाते त्याप्रमाणें जाग्रतीतील विषयाशीं तीच तदाकार होऊन पहाते. ह्मणूनच तत्त्वज्ञान झालें की ज्ञानी विषयाचा असंभव आहे, असे ह्मणू लागतो. कारण त्याला आपल्याच सकल्पाच्या भावावाचून दुसरें काहीं दिसत नाहीं. समोरचा खांब जसा पुरुषाकृतीसारखा दिसतो त्याप्रमाणें सवित् विषयाकार भासते. पण तो मिथ्या भास आहे. यथार्थ ज्ञानानें तो लीन होतो. रज्जुसर्पन्यायानें अथवा द्विचंद्रन्यायानें शुद्धसवित्च त्रिजगत् आहे, असें जाणणें हे यथार्थज्ञान आहे.

यास्तव या सवित्-ला जें लौकिक सत् किंवा असत् भासत असेल त्याचें प्रथम मोठ्या प्रयत्नानें मार्जन करावें. कारण त्याचें मार्जन न करणे हाच महा ससार व प्रमार्जन करणें हाच मोक्ष आहे, असा अनुभव येतो. विषयदर्शन हें जन्मरूप अनत दुःखाचे कारण आहे. एवढ्यासाठीं रघु-

वीरा, तूं दृश्यदर्शनाचा त्याग कर व अजड आणि पूर्णानंद हो. तू अविषय व प्रबुद्धात्मा आहेस. आस्थारहित, पदार्थास सत्य न समजणारा, केवल आत्मपरायण, निर्विकल्पसमाधीच्या योगानें वासनात्याग करणारा, सर्वत्र सम व कल्पनारहित पुरुषच अजड व पूर्णानंद होऊं शकतो. आत्माच आपल्या अनादि मायेच्या योगानें सर्व जगत्-वेष घेतो. कोशकार किड्याप्रमाणें आपल्यालाच बांधून घेऊन व पुष्कळ दुःख भोगून हा फार दिवसानीं संवित्स्वभावामुळे आपोआप केवलतेस प्राप्त होतो. आकाश, पृथ्वी, वायु, अंतरिक्ष, पर्वत, नद्या, दिशा, इत्यादि या सर्व संवित्-जलाच्याच लहरी आहेत. सर्व जग संविन्मात्र आहे. दुसरी कल्पनाच नाही. स्पंद, कंप, संवेदन इत्यादि सर्व बंद होऊन संवित् जेव्हा स्वरूपात स्थिर होते तेव्हा यथार्थ आत्मज्ञान होते. पण रामा, ही अंतःकरणात प्रतिबिंबित झालेली संवित् असून तिची बीजभूत सन्मात्ररूप ब्रह्मसंवित् निराळीच आहे. कारण ही प्रतिबिंब-संवित् बिंबभूत संविन्मात्र ब्रह्मसंवित्-पासून उदय पावते. सत्तेचीं दोन रूपें आहेत. एक नाना आकारानीं व्यवस्थित व दुसरें एकरूप. घटता, पटता, त्वत्ता, मत्ता इत्यादि विभाग नानारूप सत्तेमुळे होतात व या विभागावाचून जी सामान्य सत्ता ती एकरूप सत्ता आहे. सर्व विशेषशून्य, सन्मात्र व निर्लेप असे जे सत्तेचें एक महारूप तेच ब्रह्मपद होय. नानारूप व्यावहारिक सत्ता खरी नव्हे. कारण तिचे घटादि विषय सत्य नाहीत. पण सत्तेचें जे विमल एकरूप ते कधींही नाश पावत नसल्यामुळें व त्याची विस्मृतिही होत नसल्यामुळे सत्य आहे यास्तव कालसत्ता, कलासत्ता, वस्तुसत्ता इत्यादि विभागकल्पना सोडून तू केवल सन्मात्रपरायण हो. सत्ताचा विभाग करणे अगदीं उचित नव्हे कारण विभाग भेदभावाला उत्पन्न करणारा आहे. भेददृष्टि नेहमींच अपवित्र आहे. एवढ्यासाठीं, प्रिय रामा, तू सत्तासामान्याची भावना कर व परिपूर्ण परानन्दी हो. सत्तासामान्याचें काहीं एक बीज नाहीं. ते अनादि-अनत आहे. असल्या सामान्यसत्तेमध्ये लीन होऊन जो तेथें निर्विकार रहातो तो पुनः दुःखात पडत नाहीं. तें शुद्ध सत्त्व सर्व कारणाचे कारण आहे. त्या विस्तीर्ण चित्-आरशात समस्त वस्तुदृष्टी प्रतिबिंबित होतात. जिह्वेमध्यें जसे षड्रस व्यक्त होतात त्याप्रमाणें आत्मसंवित्-मध्यें हे सर्व

भाव प्रकट होतात. जगत्सच त्या परमात्म्यापासूनच होतात. त्याच्याच आधारानें रमतात; वाढतात; परिणाम पावतात; क्षयोन्मुख होतात व शेवटीं गळून जातात. तो परमात्मा सर्व गुरूंहून गुरु व लघूंहून लघु, सर्व स्थूलाहून स्थूल, सूक्ष्माहून सूक्ष्म, दूराहून दूर, अगदीं जवळ, अगदींच अल्प, सर्वांहून वडील, सर्व तेजाचें तेज, तमांचे तम व वस्तूंतील साररूप वस्तु आहे. ते परम तत्त्व वर्णन करून सांगतां येण्यासारखें नाहीं. यास्तव रामा, सर्व प्रयत्नानें त्या पावन पदीं प्रतिष्ठित होशील, असें कर. म्हणजे तुला परम शांति होशील ९१.

**सर्ग ९२**--पूर्वोक्त स्थितीप्रमाणें यत्नगौरव व लाघव. वासनादिक्षय व ज्ञान यांचा एकाच काळीं अभ्यास.

**श्रीराम**—गुरुवर्य, आपण हीं चित्तबीजें सांगितलींत. पण आतां कोणत्या उपायानें ते पद शीघ्र प्राप्त होतें ते सांगा!

**श्रीवसिष्ठ**—राघवा, या दुःखबीजाच्या वर्णनाबरोबरच त्याचे उपायही मीं सुचविले आहेत. त्याचा उपयोग केला असता तें पद शीघ्र प्राप्त होतें. तू स्वप्रयत्नानें वासना टाकून सत्तासामान्याच्या पराकाष्ठारूप परानंदांत जर क्षणभरही स्थिर झालास तर त्या क्षणांत तूं त्या पदालाच पोंचला आहेस, असें समज. परंतु असें करितां येणें शक्य नसल्यास शोधित जगत्कारण-तत्त्वांत स्थिर स्थिति कर. म्हणजे थोड्या अधिक प्रयत्नानें तू त्या पदास प्राप्त होशील. हे निष्पापा, शोधित त्वंपदार्थामध्यें जर तू ध्यानानें स्थिर होशील तर बराच यत्न केल्यावांचून तुला तें पद मिळणार नाहीं. केवळ विषयाचेंच ध्यान करावें म्हणून म्हणशील तर तें संभवत नाहीं. कारण कोणतेंही स्फुरण संवित्‌वाचून होतच नसल्यामुळें नुसत्या विषयाचें दर्शनच अशक्य आहे. तूं कांहीं कर, कोठेंही जा, कशाचेंही चिंतन कर, किंवा आणखीं कोणतेंही कायिक, वाचिक व मानसिक कृत्य कर तरी त्यांतील प्रत्येक क्रियेमध्यें संवित्‌वाचून सर्व असत् आहे. घटाची संवित नाहीं तर घटही नाहीं; सूर्याचें भान नाहीं तर तो दीप्त नारायणही नाहींच. असा प्रकार असल्यामुळें, शूरा, वासनात्याग कर. जिचा त्याग करितां येणें सर्वथा अशक्य आहे, त्या संवित्-मध्येंच स्थिर होऊन रहा, म्हणजे तुझीं सर्व शारीरिक व मानसिक दुःखें नाहींशीं होतील.

पण पूर्वीच्या सर्व प्रयत्नांहून हा वासनात्याग कठिण व दुःसाध्य आहे. कारण मन लीन झाल्यावाचून वासनाक्षय होत नाहीं व वासना क्षीण होईतों चित्त शांत होत नाहीं. त्याचप्रमाणे तत्त्वविज्ञानावाचून चित्तक्षय कसा होणार? व चित्तोपशमावाचून तत्त्वविज्ञान कोठचें? वासनाक्षयावाचूनही तत्त्वबोध सुलभ नाहीं. येणेंप्रमाणे तत्त्वज्ञान, मनोनाश व वासनाक्षय परस्परांचे कारण होऊन दुःसाध्य झालीं आहेत. यास्तव, राघवा, विवेकी पुरुषानें प्रयत्नानें भोगेच्छा दूर टाकून या तीन उपायाचा सतत अभ्यास करावा. या तीन उत्तम उपायाचा एकाच वेळीं वारंवार अभ्यास केल्यावाचून तत्त्वसंप्राप्ति होत नाहीं एकाच वेळीं फार दिवस अभ्यास केल्यानेच ते फलद होतात. यातील एकेकाचें अनुष्ठान कितीही दिवस जरी करीत राहिलें तरी त्यापासून काहीं लाभ होत नाहीं. एकेक शिपाई जसा शत्रुसमूहाला जिंकूं शकत नाहीं त्याप्रमाणें यातील एकेक उपाय स्वभावाचा पराभव करूं शकत नाहीं. यास्तव याचें सहानुष्ठान करावे. दीर्घ अभ्यासाने दृढ हृदयग्रंथीही तुटून जातात. रामा, शेकडों जन्मीं या संसारस्थितीचा अभ्यास केलेला असल्यामुळें दीर्घकाल दृढ अभ्यास केल्यावाचून तिचा नाश होत नाहीं. यास्तव तू जाता, येतां, बसता, उठता, ऐकताना, वास घेताना, हातरुणावर पडता पडता, परम-कल्याणाकरिता, *या तीन उपायाचा अभ्यास कर.* वासनात्यागाला प्राण-निरोधाचीही गरज आहे. यास्तव प्राणायामही करावे. म्हणजे चित्त अचित्त होतें. प्राणायामाचा फार दिवस केलेला अभ्यास, गुरूनी कृपा करून सांगितलेली युक्ति, आसन, व मित भोजन याच्या योगाने प्राणांचा निरोध होतो आणि यथार्थज्ञानाने वासनाप्रवृत्त होत नाहीं. ( हे वरही सांगितलेच आहे ) प्रथम प्राणस्पंदाला जिंकण्याविषयी प्रयत्न करावा. अथवा या हठयोगाला सोडून राजयोगाचा अभ्यास करावा. (म्हणजे एकांतात बसून चित्ताला वारंवार विषयविमुख करीत रहावे.) असें केल्यानें पुष्कळ दिवसांनीं तें पद प्राप्त होईल. अंकुशावाचून मत्त व दुष्टगज जसा वश होत नाहीं त्याप्रमाणे अध्यात्मविद्या, साधुसमागम, वासनात्याग व प्राणस्पंदनिरोध या उत्तम उपायावाचून चित्त अधीन होत नाहीं. चित्त-जयाविषयीं याच पुष्ट युक्ती आहेत. पण या असल्या उत्तम व सुलभ युक्ती असताना त्याचा अव्हेर करून जे हठानें चित्ताचें नियमन करूं

लागतात ते दीपाचा त्याग करून काजळानेंच अंधकाराला घालवूं पहातात. हठानें चित्तजय करूं पहाणें म्हणजे कमलतंतूनें मत्त गजेंद्रास बांधूं लागण्यासारखेंच आहे. चित्त किंवा चित्ताशीं अगदीं संलग्न असलेलें शरीर यांना वरील युक्तीवाचून नियमित करण्याचा प्रयत्न करणें हाच हठ होय. पण त्याच्यायोगानें योग्याला भय व क्लेश यावाचून फारसा लाभ होत नाहीं. पाप्याप्रमाणें हठयोग्यानाही धैर्ययुक्त विश्रांति मिळत नाही. फळें व पानें खात जे पर्वतावरून भटकत असतात ते मूढ हरिणाप्रमाणे विषयांना भितात व इंद्रियांना आवळून व बांधून ठेवतात. गावांत आलेल्या हरिणीप्रमाणे त्यांच्या मतीला कोणाचाच विश्वास येत नाहीं. त्याचें चित्त अल्प क्षुब्ध जलाप्रमाणें व्याकुळ होतें. शेकडों आधींनीं युक्त झालेले ते व इतरही पुष्कळ अन्न, यज्ञ, दान, तीर्थ, तप, देवार्चन इत्यादि श्रमांनीं काळ व्यर्थ घालवितात. त्यांतील अगदीं थोड्याशाच भाग्यवानांना कदाचित् तत्त्व कळतें. अथवा कळतही नाहीं. नरक, स्वर्ग, भूलोक यांच्या वाऱ्या ते एकसारख्या करीत रहातात. यास्तव हे राघवा, ही हठयोगाची दुर्दृष्टि सोडून शुद्धसंवित्‌चा आश्रय कर आणि वीतराग व स्थिर हो. बाबारे, खरा ज्ञानवानच सुखी असतो. ज्ञानवानच जिवंत असतो व ज्ञानवानच खरा बलवान आहे यास्तव तूंही ज्ञानवान् हो. प्राप्त कर्म करीत असतानाही हृदयांत संकल्परहित रहा व संवित्पदाला त्रिकाळीं सोडूं नको ९२.

सर्ग ९३—विचार व वैराग्य यांच्या योगानें प्राप्त झालेल्या समस्थितीचें वर्णन

**श्रीवसिष्ठ**—रामा, थोड्याशा विचारानें थोडासा तरी चित्ताचा निग्रह ज्यानें केला आहे त्यानेंच आपल्या जन्माचें साफल्य केलें, असें मी समजतों. कारण हृदयांत उद्भवलेला थोडासा विचार-लेशही अभ्यासाच्या योगानें वटवृक्षासारखा शेकडों शाखांनीं विस्तार पावतो. ज्याचा विचार बराच प्रौढ झालेला असतो त्या नराचा वैराग्यादि सर्व शुद्ध गुण आश्रय करितात. यथार्थ आत्मतत्त्व पाहणाऱ्या विचारी प्राज्ञ पुरुषाला हिरण्यगर्भासारख्या महा अधिकाऱ्याचें विस्तृत अविद्यावैभवही लोभयुक्त करूं शकत नाहीं. यथार्थज्ञानामुळें ज्याची मति सन्मात्र झाली आहे त्याला विषय, मनोवृत्ती, आधी, व्याधी, इत्यादि कोण काय करणार? कारण बालकामध्यें प्रळयकाळच्या मेघांना मुठींत धरण्याचें सामर्थ्य

जसें नसतें त्याप्रमाणें त्यांच्यामध्यें त्याला बाधा करण्याचें सामर्थ्य नसतें. चवथ्या व पाचव्या भूमिकेत जाण्यास तयार झालेला विवेकी विषय व इंद्रियें या चोराकडून कसा लुटला जाणार? विषयवेग ज्याची विचारबुद्धि चांगली प्रौढ झालेली नसते त्या (पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या भूमिकेंतील) साधकालाच हरण करू शकतात. प्रौढ विवेकाला तोडण्यास रागादि कोणताही दुष्ट आशय समर्थ नसतो. चिंता त्याला चंचल करू शकत नाही. जेव्हा ज्याचें चित्त विचारमय नसतें तेव्हा त्याला मृत म्हणतात. यास्तव राघवा, तूं स्वतः आपल्याशींच अथवा सज्जनांसह हें जगत् म्हणजे काय आहे? देह काय आहे? याचा सतत विचार कर. मोहांधकाराचें हरण करणाऱ्या विचाराच्या योगानें ते अमल पद दिसते. प्रकाशरूपी विलास करणाऱ्या सूर्याच्या प्रभावानें अंधकार जसा जातो त्याप्रमाणे ज्ञानाच्या योगानें सर्व दुःखाचा विनाश होतो व ज्ञेय आपोआप प्रकट होते. शास्त्राच्या विचारानें ब्रह्मतत्त्व अवगत होते. विचारोत्पन्न आत्मसाक्षात्कार हेच ज्ञान होय. दुधांतील माधुर्याप्रमाणें, ज्ञेय त्या ज्ञानात असते. यथार्थ ज्ञानाचा प्रकाश ज्याला प्राप्त झाला आहे तो पुरुष ब्रह्मानंदप्रचुर असतो. आनंदाच्या धुंदीत असतो. तो कोणत्याही संकटांत निमग्न होत नाही. तो जीवन्मुक्त, आसक्तिशून्य व राजाधिराजाप्रमाणे पूर्णमनोरथ होऊन रहातो. ज्ञानवान् वीणा, मुरलि, इत्यादिकांच्या रम्य ध्वनीमध्यें, कामिनीच्या विषयप्रधान गायनामध्ये, वसंतमदानें मत्त झालेल्या भ्रमराच्या ध्वनीमध्ये व अशाच दुसऱ्याही अनेक रम्य व मनोहर पदार्थांमध्यें आसक्त होत नाही. शब्दादि पांची अति चित्ताकर्षक वस्तूंविषयीं तो सदा अगदी निःस्पृह असतो. सुगंध, दुर्गंध, सुवास, कुवास, गोड, कडु, सुरूप, कुरूप, मृदु, कठोर, मंजुळ, कर्कश इत्यादि भेदाकडे तो लक्षच देत नाही. उपवनासारख्या आनंददायी स्थानीं गेल्यास त्याला कधी हर्ष होत नाहीं व अमेध्य पदार्थांनीं दूषित झालेल्या स्थानी गेल्यास खेद होत नाहीं. तापलेले वाळूचें मैदान व हिरवें गवत उगवलेली पुष्पमयी

---

१ लिंगपुराणात याविषयी–सा हानिस्तन्महच्छिद्रं सान्धता सा च मूकता । यत्क्षणं वा मुहूर्तं वा शिवमेकं न चिन्तयेत्—असे म्हटलें आहे. याचा अर्थ–एक मुहूर्त किंवा निदान क्षणभरही एका शिवाचें चिंतन न करणे हीच मोठी हानि, तेच मोठे छिद्र, तीच अंधता व मूकता आहे.

भूमि, वस्तऱ्याच्या धारेसारखी अति तीक्ष्ण शय्या कमळाचें कोमल शयन, उन्नत पर्वतप्रदेश व कूपांचा तळ, सूर्यकिरणांनीं तापलेल्या शिला व मृदु अंगाच्या ललना, संपत्ति व उग्र आपत्ति, इत्यादि सर्व स्थानीं व प्रसंगीं तो उद्विग्न किंवा हृष्ट होत नाहीं. आंतून विश्रांतिसुखाचा अनुभव घेणारा तो कर्म करीत असतानाही उदासीन असतो. तो नरकांतील भयंकर, यातनानाही भीत नाहीं. कधीं व्याकुळ होत नाहीं व दीन होत नाहीं. तर पर्वतासारखा सम, स्वस्तचित्त, मौनी व धीर होऊन रहातो. अपवित्र, अपथ्य, विषसिक्त, गोमयादि, नासलेलें, नीरस झालेलें व मिष्ट अन्नही खाऊन तो पचवितो. कडु, गोड, आंबट, तिखट, तुरट, इत्यादि रसांनीं युक्त असलेलीं फळें तो एकसारख्याच चित्तवृत्तीनें खातो. मद्य, रक्त, रस, दुग्ध व घृत याना पाहून तो एक सारखाच हृष्ट होतो. जीविताचें हरण करणारा व तें देणारा या दोघाकडेही तो एकसारख्याच प्रसन्न दृष्टीनें पाहतो. सर्व आस्था सोडल्यामुळें, जगस्थिति अस्थिर असल्यामुळें, सर्व ज्ञातव्याचें ज्ञान झाल्यामुळें व चित्त विरक्त बनल्यामुळें साधुपुरुष कोणत्याही विषयाला केव्हाही अवकाश देत नाहीं व कोणत्याही इंद्रियाला केव्हाही कोणत्याही विषयाकडे जाऊं देत नाहीं. इंद्रियें व विषय अज्ञ, अशांत व आशाप्रधान पुरुषालाच, कुत्र्यासारखे, तोडीत असतात. संसारसागरांतून वासनातरंगाबरोबर वाहत जाणाराला इंद्रियरूपी सुसरी खातात. पण जलौघ जसे पर्वताला त्याप्रमाणें विकल्पौघ विचारी व शांत पुरुषाला हरण करीत नाहींत. सर्व संकल्पाच्या सीमेचाही अंत अशा परमपदीं विश्रांति घेणाराला मेरुही तृणासारखा तुच्छ वाटतो. ज्याचें चित्त पूर्ण व आत्माकार झालें आहे, अशा पुरुषाला जगत् व गवताच्या काडीचा तुकडा, विष व अमृत आणि क्षण व कल्पसहस्र एकसारखेच भासतात. हें सर्व जगत् संविन्मात्र आहे असें जाणून ज्याच्या बुद्धी आनंदित झाल्या आहेत असे पुरुष जगाचा आपल्या स्वरूपांतच अंतर्भाव करून विहार करितात. सर्वच जर संविन्मात्र आहे तर त्यांतील हेय व उपादेय काय असणार ? याकरितां राघवा, अन्य सर्व भ्रांति सोडून संविन्मात्र हो. जें दिसतें तें सर्व संवित्-च होय. कारण उत्पत्तीपूर्वीं व नाशानंतर जें नाहीं तें वर्तमानसमयींही नाहीं. तर वर्तमानसमयीं भासणारी सत्ता ही संवित्-चा विवर्त आहे, असें जाणून व

भाव आणि अभाव यांच्या मागून जाणाऱ्या बुद्धीचा त्याग करून निःसंग संवित्प्रकाशमय हो. केवळ शरीर, मन, बुद्धि व इंद्रियें यांच्या योगानें कर्म करतांना अथवा न करतांना जो पुरुष निःसंग असतो तो पुण्य-पापांनीं लिप्त होत नाहीं. मनोराज्यातील वैभव नष्ट झालें किंवा पुष्ट झालें तरी दुःख व सुख जसें होत नाहीं त्याप्रमाणें संगरहित केलेल्या कर्मामुळें सुखदुःख होत नाहीं. यास्तव मतीला संगशून्य करून केवळ अंगयष्टीनें प्राप्तकार्य करीत रहा. चित्त अन्यत्र व्यासक्त ( दुसरीकडे गढून गेलेलें ) असल्यास शरीरास झालेला स्पर्श कळत नाहीं, नेत्रापुढें आलेला पदार्थ दिसत नाहीं, जवळच्या कोणी कांहीं म्हटल्यास ऐकू येत नाहीं; हें पामरानाही स्वानुभवानेंच ठाऊक आहे. तेव्हा चित्त संगरहित झाल्यास शरीरानें घडणाऱ्या कार्याचा परिणाम त्यावर होत नाहीं हें आमचें म्हणणें किती युक्त आहे, हें कोणालाही कळण्यासारखें आहे. अर्थात् आसक्ति-पूर्वक पदार्थांस पहाणें हेंच बंधाचें कारण आहे. संगच सर्व अर्थ, अनर्थ, संसार, आशा व आपत्ती यांचें कारण आहे. संगत्याग हाच मोक्ष ( वर्तमान-देह-संबंधनिवृत्ति) आहे व संगत्यागानेंच भाविदेहादि बंध निवृत्त होतो. यास्तव हे निष्पाप रामा, तू संगत्याग करून जीवन्मुक्त हो.

**श्रीराम**—प्रभो, संग कशाला म्हणतात, तें थोडक्यात सांगा.

**श्रीवसिष्ठ**—इष्ट पदार्थाचा संयोग व अनिष्ट पदार्थाचा वियोग झाला असतां हर्ष व इष्ट पदार्थाचा वियोग व अनिष्ट पदार्थाचा संयोग झाला असतां शोक हे दोन विकार देणारी जी मलिन वासना तिला संग असे म्हणतात. जीवन्मुक्ताची पुनर्जन्मास कारण न होणारी व हर्ष-विषादरहित वासना शुद्ध असते. देह असेपर्यंत रहाणारी ती असंग-संज्ञक वासना होय. असल्या वासनेनें जें कर्म होतें तें बद्ध करीत नाहीं. पण अजीवन्मुक्त मूढ व दीन पुरुषांची हर्ष-विषादयुक्त वासना बंध उत्पन्न करते. तिलाच संग म्हणतात, हे नुकतेंच वर सांगितलें आहे. ती पुनर्जन्म देते. तिच्या योगानें केलेलें कर्म केवळ बंधालाच कारण होतें. यास्तव चित्ताला विकारयुक्त करणाऱ्या या संगाला सोडून तूं जर नैर्मल्य ( स्वस्थ ) रहाशील तर कोणत्याही कर्मानें लिप्त होणार नाहींस. हर्ष, क्रोध व विषाद यांच्या योगानें जर तूं वैरूप्यास प्राप्त झाला नाहींस (म्हणजे तुझ्या मुखचर्येंत व अंतःकरणांत जर फरक पडला नाहीं ) तर

तू वीतराग-भय-क्रोध व असंग आहेस, असें तुला साधू समजतील. दुःखांच्या योगानें ग्लानि व सुखाच्या योगानें हर्ष यांस प्राप्त न होता तू जर आशापारतंत्र्य सोडशील तर तत्काल निःसंग होशील. व्यवहार व सुखदुःखदशा यामध्यें विहार करीत असतांना जर तूं सत्साम्य ( ब्रह्मैकरस्य ) सोडलें नाहींस तर असंग होशील. चित्तस्वभाव सम व यथाप्राप्त अनुवर्तन करणारा झाला कीं तू असंग झालास असें समज. हे पवित्र रामा, स्थिर जीवन्मुक्त अवस्थेचा अवलंब करून सम, स्वस्थ व विरक्त हो. कारण जीवन्मुक्तमति पुरुष मौनी, जितेंद्रिय, मान-मद-मात्सर्य-रहित, व संतापशून्य असतो. भोग व विक्षेप यास कारण होणारा वस्तुसमूह सदा सज्ज असतानाही तो समचित्त रहातो. त्याचें सत्त्व (चित्त) आशा-याचनादि दैन्यरहित असतें. तो स्ववर्णाश्रमोचित सहज क्रमप्राप्त व्यापारावांचून अन्य कांहीं करीत नाहीं व तें प्राप्त कर्म करीत असतानाही त्याची बुद्धि आतून संसर्गादिहीन रहात असल्यामुळें त्याला खेद होत नाहीं. क्षीरसागर आपलें शुभ्रत्व जसें कधीं सोडीत नाहीं त्याप्रमाणें तो महामति कोणत्याही अनुकूल अथवा प्रतिकूल दर्शन झाल्या पूर्वसिद्ध शांति-दांति-प्रसाद समदर्शन इत्यादि स्वभाव सोडीत नाहीं. साम्राज्य किंवा अठरा विश्वे दारिद्र्य, इंद्रादि सर्पयोनी किंवा देवत्व यापैकीं काही जरी प्राप्त झालें तरी तो सदा अखिन्न असतो. यास्तव तूंही क्रोधशून्य, भेदरहित, व कौतुकाभाववान् होऊन मोक्षनिष्ठ होशील, असा विचार कर. वासनाक्षययुक्त शुद्ध विचारानें तें अवश्य इष्ट पद तुला दिसेल म्हणजे तूं पुनरपि जन्मबंधनांनी बद्ध होणार नाहींस ९३.

इति श्रीशंकराचार्यभक्त विष्णुकृत श्रीबृहद्योगवासिष्ठसाराचें पांचवें उपशम प्रकरण समाप्त झालें ५.

श्रीकृष्णार्पणमस्तु.